'प्रबोधन'मधील प्रबोधनकार

प्रबोधन नियतकालिकातील
केशव सीताराम ठाकरे
यांचे लेख

संपादन : सचिन परब

खंड २

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

‘प्रबोधन’मधील प्रबोधनकार

प्रबोधन नियतकालिकातील केशव सीताराम ठाकरे यांचे लेख

खंड २

संपादन : **सचिन परब**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

‘प्रबोधन’मधील प्रबोधनकार
प्रबोधन नियतकालिकातील केशव सीताराम ठाकरे यांचे लेख
खंड २

पहिली आवृत्ती : १६ ऑक्टोबर २०२१ (प्रबोधन शताब्दी)

संपादन : सचिन परब
संपादन समन्वय : अभिजित सोनावणे
मुखपृष्ठ चित्र : संजय मोरे
मुखपृष्ठ रचना आणि मांडणी : पुष्पराज पोपकर

प्रकाशक : सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५
© प्रकाशकाधीन

मुद्रक : व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, ५ फोटोझिंको पथ,
पुणे - ४११००१

किंमत : रुपये ४८९.००

या पुस्तकात व्यक्त झालेली मते लेखक आणि संपादक यांची असून, या मतांशी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ तसेच महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

संपादन मार्गदर्शक

रणधीर शिंदे
ज्ञानेश महाराव
विश्वंभर चौधरी
सुनील कर्णिक

'मराठी बहुजन समाजाला आपल्या निधड्या लेखनाने आणि वक्तृत्त्वाने जागृत करण्याचे जे थोर सामाजिक कार्य केशव सीताराम ठाकरे यांनी केलेले आहे, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे महाराष्ट्रवासीयांचे कर्तव्य आहे. आजपर्यंत ठाकरे यांनी लिहिलेले सर्व प्रबोधक आणि तेजस्वी वाङ्मय एकत्रित करून ग्रंथरूपाने जर प्रकाशात आले, तर महाराष्ट्राची सामाजिक क्रांती घडवून आणण्याच्या कामी या बंडखोर ब्राह्मणेतराने एका कालखंडात केवढी तेजस्वी कामगिरी करून ठेवलेली आहे, हे महाराष्ट्राला कळून आल्यावाचून राहणार नाही. अशा मान्यतेचा आणि गौरवाचा मुजरा महाराष्ट्र या कलमप्रभूला मोठ्या आनंदाने करेल!'

- आचार्य प्रल्हाद केशव अत्रे,

साप्ताहिक नवयुग,

१६ सप्टेंबर १९४५

उद्धव बाळासाहेब ठाकरे
मा. मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य

शुभेच्छा संदेश

‘प्रबोधन’ विचारांचा वसा आणि वारसा जतन करूया

महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळी आणि त्यातील प्रबोधन परंपरा यांचा उल्लेख ‘प्रबोधन’च्या उल्लेखाशिवाय अपूर्णच राहील. या ‘प्रबोधन’मुळेच केशव सीताराम ठाकरे यांना प्रबोधनकार अशी ओळख मिळाली. ‘प्रबोधन’चे हे शताब्दी वर्ष आहे. या निमित्ताने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ ‘प्रबोधन’मधील लेखांचा संग्रह प्रकाशित करीत आहे, याचे मोठे समाधान आहे.

‘प्रबोधन’चा शतकमहोत्सव साजरा करताना एक मोठा पटही डोळ्यांसमोरून तरळून जातो. प्रबोधनकारांसाठी ‘प्रबोधन’ हे केवळ एक नियतकालिक नव्हते. तर ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग होते. त्यांचा जीवनमार्ग होते. प्रबोधनकारांची ‘प्रबोधन’ प्रकाशनामागची तळमळ आणि त्यासाठी त्यांनी केलेली धडपड विलक्षण प्रेरणादायी आहे. त्याविषयीच्या प्रबोधनकार आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या चर्चा, संवाद मी ऐकले आहेत. आम्हा सर्वांसाठी ही संस्कार शिदोरीच आहे. संपादक प्रबोधनकारांची ग्रंथसंपदा, लेखनशैली आणि त्यांची भूमिका महाराष्ट्राच्या पत्रकारितेचे वेगळेपण सांगणारी अशीच आहे. त्यांचे जीवन आणि लेखन यांची शैली एकरूप अशीच होती. ‘प्रबोधन’मधील अनेक विचार आजही

संदर्भनीय ठरतील, असे आहेत. प्रबोधनकारांच्या विचारांचा हा वसा आणि वारसा जतन करण्याची गरज आहे.

'प्रबोधन'मधील अप्रकाशित लेखांमुळे प्रबोधनकारांचे लेख आणि भूमिका नव्या पिढीसमोर येईल, अशी अपेक्षा आहे. पुरोगामी महाराष्ट्राच्या उभारणीत योगदान दिलेल्या महान विभूतींचे विचार, साहित्य आणि ग्रंथसंपदा वेगवेगळ्या निमित्तांनी तरुणांसमोर आणावे लागतील. यातूनच पुरोगामी विचारांचा जागर होईल. त्यासाठी 'प्रबोधन'च्या निमित्ताने सुरू झालेली मालिका यापुढेही सुरूच राहील, असा विश्वासही व्यक्त करतो.

प्रबोधनकारांच्या विचारांचा समृद्ध वारसा पुढच्या पिढीपर्यंत नेण्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने घेतलेला पुढाकारही निश्चितच अभिनंदनीय आहे. मंडळाच्या पुढील उपक्रमांना तसेच 'प्रबोधन'मधील लेखसंग्रह ग्रंथनिर्मिती आणि त्याच्या प्रकाशनास मनःपूर्वक शुभेच्छा!

□□□

सुभाष देसाई
मा. मंत्री,
मराठी भाषा विभाग, उद्योग, खनिकर्म,
महाराष्ट्र राज्य

शुभेच्छा संदेश

विचारापाठोपाठ आसूड उगारणारे फक्त प्रबोधनकारच!

विसावे शतक उगवले तेच महाराष्ट्रात प्रबोधन युग घेऊन. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, न्या. महादेव गोविंद रानडे, पंडिता रमाबाई, म. जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, गोपाळ गणेश आगरकर आणि प्रबोधनकार ठाकरे. किती नावे घ्यावीत? या सर्वांनी प्रस्थापित व्यवस्थेला मुळापासून गदागदा हलवले. अन्यायाला वाचा फोडली. सत्यशोधक बनून 'बाबा वाक्यं प्रमाणम्' म्हणायला नकार दिला. या सर्वांना प्रस्थापित मुखंडांनी सुखाने जगू दिले नाही.

जसजसा समाज जागा होऊन या आधुनिक विचारांकडे कान टवकारून पाहू लागला, तसतसा समाजजीवनाच्या मानगुटीवर घट्ट बसलेला रूढीवाद मागे हटू लागला. राजा राममोहन रॉय यांच्या बंगालप्रमाणेच किंबहुना त्याहून सकस आणि रसरशीत असे हे परिवर्तन होते. हे सर्व महाराष्ट्रात घडले. युरोपात असेच घडले तेव्हा 'रेनेसान्स' म्हणून त्याला जागतिक इतिहासात चिरंतन स्थान मिळाले. ते भाग्य महाराष्ट्रपुत्रांच्या वाट्याला आले नाही. खरे तर ही क्रांती कोणत्याही कसोटीवर जागतिक महत्त्वाच्या घटनेहून कमी नव्हती. पण देशानेच जिथे महाराष्ट्राची यथोचित दखल घेतली नाही, तेथे जगाला कोण जाब विचारणार? असो.

वर नामोल्लेख केलेले समाजसुधारक थोर खरेच. पण या प्रभावळीत प्रबोधनकारांचे स्थान खास वेगळे. पुस्तकी पांडित्यापुरता त्यांचा सुधारकी बाणा थांबला नाही. मांडलेल्या प्रत्येक विचाराला दादांनी कृतीची जोड दिली. हे करताना त्याची पुरेपूर किंमत मोजली. हुंडाबंदीविरोधात त्याकाळी अनेकांनी विचार मांडले; पण प्रबोधनकार तेवढ्यावर थांबले नाहीत. वैचारिक पुरोगामित्वाला सगळेच माना डोलवत होते. पण त्याचवेळी हुंड्याची देवाणघेवाण सर्रास सुरू होती. प्रबोधनकार नुसत्या वैचारिक बदलावर संतुष्ट होण्याऱ्यांपैकी नव्हते. त्यांनी प्रत्यक्ष कृतीचा आसूड हातात घेतला. ज्या लग्नात हुंडा घेतला आहे, अशी माहिती मिळे तेथे त्यांचा आसूड कडाडलाच. अशी हुंडाग्रस्त लग्ने त्यांनी स्वतः मंडपात घुसून उधळून लावली. संख्येने या घटना कमी असतील; पण ती दहशत शेवटी कामी येत गेली. महाराष्ट्रात हुंडाबंदीचा पुरस्कार होऊ लागला.

अशा सुधारणांमुळेच आपला प्रदेश पुरोगामी महाराष्ट्र म्हणून ओळखला जाऊ लागला. आज तुम्ही आम्ही तसे अभिमानाने म्हणत असतो. ही ताकद प्रबोधनकारांनी दाखवून दिली. या शक्तीचा परिचय करून देण्याच्या उद्देशानं सचिन परब यांनी 'प्रबोधनकार डॉट कॉम' हे संकेतस्थळ सुरू केले आणि निष्ठेने चालविले. त्यांची साप्ताहिक 'मार्मिक'मधील लेखमाला हेच कार्य करीत आहे. 'प्रबोधन' नियतकालिक मोजकी वर्षेच प्रकाशित झाले. विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर तसे प्रबोधन मुंबई, पुणे, सातारा अशा जमेल त्या ठिकाणाहून प्रसिद्ध झाले. त्याचे एकूण ९५ अंक निघाले तरी आजमितीस ९१ अंक अभ्यासू मंडळींच्या हाती लागले. अजून चार अंकांचा शोध सुरूच आहे. १९२१ मध्ये डरकाळी फोडणाऱ्या 'प्रबोधन'चे हे शताब्दी वर्ष. राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागाअंतर्गत येणाऱ्या 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'ने प्रबोधन नियतकालिकामधील शतकापूर्वी प्रसिद्ध झालेल्या लेखांचा संग्रह प्रकाशित करायचे ठरविले. ग्रंथ संपादनासाठी सचिन परब यांच्याखेरीज या विषयाचा ध्यास घेतलेली अन्य व्यक्ती कोण आढळणार?

आता हा ग्रंथ प्रकाशित होत आहे. माझ्या मराठी भाषा विभागाचे हे मी भाग्य समजतो. प्रबोधनकारांचे नातू मुख्यमंत्रिपदी विराजमान असताना हे विचारधन नव्याने समोर येत आहे, हा विलक्षण योग. सुधारकांची मांदियाळी निर्माण करणारा महाराष्ट्र या ग्रंथाचे कसे स्वागत करतो, हे पाहाण्यास मी उत्सुक आहे.

□□□

डॉ. विश्वजित कदम
मा. राज्यमंत्री,
मराठी भाषा विभाग, सहकार, कृषी, सामाजिक न्याय,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ,
महाराष्ट्र राज्य

शुभेच्छा संदेश

मराठी पत्रकारितेतील 'प्रबोधन' हे सुवर्णपान

महाराष्ट्राला नवी दिशा देणाऱ्या 'प्रबोधन' मासिकाच्या शताब्दी वर्षानिमित्त 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'मार्फत त्यातील निवडक लेखांचा संग्रह प्रकाशित होणे हे समयोचित आहे.

प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांनी संपादित केलेल्या 'प्रबोधन' नियतकालिकाचा पहिला अंक दिनांक १६ ऑक्टोबर १९२१ला प्रकाशित झाला होता. यंदा 'प्रबोधन'चे शताब्दी वर्ष साजरे होतेय. महाराष्ट्रातल्या पुरोगामी चळवळीत 'प्रबोधन' नियतकालिकाचे योगदान महत्त्वाचे आहे. 'प्रबोधन'च्या ६ वर्षांच्या कालावधीत ९५ अंक निघाले. ही संख्या कमी असली तरी ते महाराष्ट्राचे खऱ्या अर्थाने 'प्रबोधन पर्व' होतं. प्रबोधनकार ठाकरे यांनी 'प्रबोधन'च्या माध्यमातून जात आणि धर्माच्या नावावर सुरू असलेल्या विषमतेवर केलेला प्रहार आजही क्रांतिकारक आहे.

'प्रबोधन' मासिकाचे आणि सांगली-सातारा जिल्ह्याचे ऋणानुबंध वेगळे आहेत. सत्यशोधक चळवळीचे महत्त्वाचे विचारवंत म्हणून प्रबोधनकरांनी १०० वर्षांपूर्वी पूर्ण महाराष्ट्र ढवळून काढला होता. त्यांचा प्रभाव पश्चिम महाराष्ट्रावर आणि त्यातही जुन्या सातारा जिल्ह्यावर होता. गावोगावी भाषणे

करून त्यांनी हा भाग पिंजून काढला होता. त्यामुळे त्यांची पुस्तके आणि 'प्रबोधन'चे अंक सांगली जिल्ह्यातल्या मिरज तालुक्यातल्या काकडवाडी गावात सापडले. 'प्रबोधन'चे तिसऱ्या वर्षातले १७ अंक हे सातारा रोड जवळच्या पाडळी या गावातून प्रसिद्ध झाले आहेत. याचे ऐतिहासिक महत्त्व माझ्या दृष्टीने वेगळे आहे. हे आमच्या परिसराशी असलेले प्रबोधनकारांचं शंभर वर्षांपूर्वीचे नाते या संग्रहातून वाचकांना कळणार आहे, याचा आनंद आहे.

शिक्षण क्षेत्रातले प्रेरणास्थान कर्मवीर भाऊराव पाटील हे प्रबोधनकार ठाकरे यांचा उल्लेख आपला गुरू म्हणून करत. 'रयत शिक्षण संस्थे'ला मदत उभी करून देण्यासाठी प्रबोधनकारांनी थेट महात्मा गांधी यांच्याकडे धाव घेतली होती. 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'ने प्रबोधनकार ठाकरे यांची पुस्तके यापूर्वीच पाच खंडांत प्रकाशित केली आहेत. त्याच्या नव्या आवृत्त्याही मंडळानं आणल्या आहेत. त्यामुळे प्रबोधनकारांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहचत आहेत; मात्र प्रबोधनकारांच्या विचारांचा गाभा असलेल्या 'प्रबोधन' नियतकालिकातील लेख नव्या पिढीतील अभ्यासकांना उपलब्ध होणे, ही काळाची गरज आहे. ती या संग्रहामुळे पूर्ण होत आहे, याचा मला आनंद वाटतो. त्याग आणि संघर्षामुळे शब्दाला ताकद मिळू शकते. बहुजन समाजाला प्रेरणा आणि आत्मविश्वास देणारे 'प्रबोधन' हे समाजाभिमुख पत्रकारितेचे उदाहरण आहे. त्यामुळेच 'प्रबोधन' हे मराठी पत्रकारितेतील सुवर्णपान आहे.

प्रबोधनकारांचे नातू उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना या पुस्तकाचे प्रकाशन होणे, हा दुग्धशर्करा योग अनेक अर्थांनी महत्त्वाचा आहे. 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'च्या वतीने काढण्यात येणाऱ्या 'प्रबोधन'मधील लेखांच्या या संग्रहास माझ्याकडून मनःपूर्वक शुभेच्छा!

□□□

‘प्रबोधनकार डॉट कॉम’चं स्वप्न
ज्यांच्यामुळे पूर्ण झालं ते
खासदार **राहुल रमेश शेवाळे**
यांच्या मैत्रीला अर्पण

- संपादक -

|| अनुक्रमणिका ||

निवेदन : डॉ. सदानंद मोरे / १८
कृतज्ञता / १९
संपादकीय : सचिन परब / २१

वर्ष ३ : (१ नोव्हेंबर १९२३ - ०४ जुलै १९२४)

अंक २ : गंधर्वांची आशा-निराशा / ६५
Today's Maharashtra (No. 2) / ६९
अंक ३ : Today's Maharashtra (No. 3) / ७३
Day By Day / ७७
Press Owners, please take note / ८०
नरकासुरच मरत नाही! मंगलस्नानें कशाचीं करतां? / ८१
मार्गशीर्ष जवळ आला / ८५
दिवाळीच्या करंज्या / ९२
अंक ६ : इसवी सन १९२४ प्रबोधनाच्या वाचकांस प्रबोधक होवो! / ९५
अंक ७ : Hooliganism In The Liberal Party / ९९
परिषदांचा ना ताळ / १०४
अभिनंदनीय आचार-क्रान्ति / १०६
अंक ८ : Liberal Tradition / ११४
God save Mahatma Gandhi / ११७
रक्तशुद्धीच्या कल्पनेचे भूत / ११९
दिवाण जनतेचे हितवादी कसे? / १२३
अंक १० : Native States - A problem / १२७
माणसांतले सुरवंट / १३१
ठळक टिळक-वाद / १३५
शंभर वर्षापूर्वींचें महाराष्ट्र / १३७
अंक ११ : A Peep into Bombay Presidency Jails / १४०
Of Local Interest Only / १४३
खिलाफतीची खिरापत / १४५
कलमबहाद्दरांस शेलापागोटें - (पुस्तक परिचय) / १५१

१०० वर्षांपूर्वीचे महाराष्ट्र / १५५
प्रबोधनाची वर्गणी बुडविणारे शिष्ठ / १६०
अंक १२ : १०० वर्षांपूर्वीचे महाराष्ट्र / १६३
क्रांतिपूर्वकालिन् वाङ्मय (लेखांक १ला) / १६७
वृद्ध विवेकवाद्याचा मृत्यू / १७१
अंक १३ : क्रांतिपूर्वकालिन् वाङ्मय (लेखांक २) / १७२
रिकामा न्हावी भिंतीला तुंबड्या लावी / १७६
स्वराज्याभिमानी छत्रपतिनिष्ठ प्रभु रंगो बापुजी गुप्ते देशपांडे यांचे संक्षिप्त चरित्र / १८१
अंक १४ : Vykom Satyagraha / १९३
प्रभु रंगो बापूजी गुप्ते देशपांडे यांचे संक्षिप्त चरित्र / १९६
अलार्म बेल अथवा धोक्याच्या घांटेचा घणघणाट / २०२
अंक १५ : Our Youths Non-Plussed ! / २०५
तरुणांची मुस्कटदाबी / २०८
मूळ स्वभाव जाईना / २१२
अंक १६ : CONFLICT OF CULTURES (No. 1) / २१८
चुकतें कोठें ? / २२२
अंक १७ : प्रबोधनाची जीवनक्रान्ति / २२५
अंक १८ : CONFLICT OF CULTURES (No. 2) / २३०
संघशक्तीचा दुरूपयोग / २३३
पुण्यांत प्रबोधन / २३५
आश्रयदात्यांशी हितगुज / २३८

वर्ष ४ : (एप्रिल १९२५ - मे १९२६)

अंक १ : शक्तीचा संदेश / २४३
वैषयिक कवितांची कारण-मीमांसा / २४८
प्राज्ञ पाठशाला, वांई / २५२
निंदकांचे आभार / २६२
संपादकीय खुलासा / २६४

अंक २ : स्त्रियश्चरित्रं देवो न जानाति / २६७
घड्याळाची टक टक / २८२
लग्नासाठी पैसे नाहीत म्हणून आत्महत्या / २८७
कै. धनुर्धारीचे उद्गार / २९९

अंक ३ : संपादकीय स्फुट विचार / ३०७

अंक ४ : वीररत्न बाजीप्रभू देशपांडे यांचा पोवाडा / ३२३
साताऱ्याचें दैव का दैवाचा सतारा! / ३३१
कलमबहादरांस शेलापागोटें (पुस्तक परिचय) / ३४०

अंक ५ : सार्वजनिकपणाचें गाडगें फुटलें / ३४२
Untouchable Gods of the untouchable Brahmins / ३४७
कलमबहादरांस शेलापागोटें (पुस्तक परिचय) / ३५४
पुतळ्यांचा प्लेग / ३५७

अंक ६ : ब्राम्हण्याभिमान्यांनो! इस्लामी बडग्याचा विचार करा / ३६७

अंक ७ : कलम, समशेर आणि तागडी / ३८३
धर्मक्रान्तीसाठीं बण्डाची तयारी / ३८९
श्रीमत् अश्वघोष कृत वज्रसूची / ३९५
बावलाचे लोकमान्य भूत / ४०२

अंक ८ : कलमबहाद्दरांस शेलापागोटें (पुस्तक परिचय) / ४०९

अंक ९ : नाताळातील विचार क्रांतीचा आठवडा / ४१३
देशी संस्थानें आणि आंग्रेजी नोकरशाही / ४२५
निस्पृहस्य तृणं जगत् / ४३५

अंक १० : प्रभु रंगो बापूजी गुप्ते देशपांडे यांचें संक्षिप्त चरित्र / ४४८
शंभर वर्षांपूर्वीचा महाराष्ट्र बळवंतराव मल्हार चिटणीस (प्रकरण ३ रें) / ४५५

अंक ११ : १०० वर्षापूर्वीचा महाराष्ट्र (प्रकरण ३ रें) / ४६८

अंक १२ : मृगजळामागें धांवणारीं हरणें (लेखांक १ ला) / ४७६
श्रीहरीच्या चरणीं / ४८२

निवेदन

महाराष्ट्राच्या संदर्भात काही चर्चा सुरू असल्यास 'पुरोगामी महाराष्ट्र' हा शब्दप्रयोग हमखास केला जातो. हा पुरोगामी महाराष्ट्र आभाळातून पडला नाही. त्याला पुरोगामी बनवण्याच्या प्रक्रियेत काही विचारवंतांची आयुष्ये खर्ची पडली आहेत. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, महात्मा जोतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या परंपरेत असणारे अखेरचे नाव म्हणजे अर्थातच केशव सीताराम ठाकरे हे होय. ठाकरे यांनी ज्या माध्यमातून हे कार्य केले त्याचे नाव 'प्रबोधन'. म्हणून तर ठाकरे यांची प्रबोधनकार ठाकरे अशी ओळखच निर्माण झाली. 'प्रबोधन' या नियतकालिकाचा पहिला अंक मुंबईहून १६ ऑक्टोबर १९२१ या दिवशी प्रसिद्ध झाला. म्हणजेच २०२०-२१ हे 'प्रबोधन'चे शताब्दी वर्ष होय. या शताब्दीच्या निमित्ताने सचिन परब यांनी संपादित केलेला 'प्रबोधन'मधील प्रबोधनकार' हा त्रिखंडात्मक ग्रंथ वाचकांना सुपूर्द करण्यात महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास कर्तव्यपूर्तीचे समाधान लाभत आहे. 'प्रबोधन'चे एकूण ९५ अंक प्रकाशित झाले होते. त्यातील ९१ अंक सचिन परब यांनी परिश्रमपूर्वक उपलब्ध केले. संपादनाला दीर्घ प्रस्तावना लिहून 'प्रबोधन' व प्रबोधनकार यांच्या गुणवैशिष्ट्यांवर प्रकाशझोत टाकला.

महाराष्ट्रामधील ब्राह्मणेतर चळवळीला बुद्धिप्रामाण्यवादी रूप मिळवून देण्यातही प्रबोधनकारांचा वाटा आहे. ही चळवळ 'प्रबोधन'सारख्या नियतकालिकांमुळेच यश प्राप्त करू शकली. त्यांच्यापैकी बडोद्याचे पत्रकार भगवंतराव पाळेकर यांच्या 'जागृति' साप्ताहिकातील लेखांचे संपादन मी केले असल्यामुळे असे काम किती जिकिरीचे असते, याचा मलाही अनुभव आहे. त्यामुळे सचिन परब यांचे विशेष अभिनंदन.

डॉ. सदानंद मोरे

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

कृतज्ञता

दहा वर्षांपूर्वी 'प्रबोधनकार डॉट कॉम'च्या निमित्ताने **शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे** यांच्याशी माझी तीनदा सविस्तर भेट झाली. पहिल्याच भेटीत त्यांनी प्रबोधनकारांविषयीचे खूप संदर्भ मला दिले. त्यात 'प्रबोधन'च्या पहिल्या दोन वर्षांच्या फायली होत्या. प्रबोधनकारांची पुस्तकं आधी वाचली होती; पण 'प्रबोधन'च्या अभ्यासाची ही माझी सुरवात होती. बाळासाहेबांशी प्रबोधनकारांविषयी झालेल्या चर्चेचे संदर्भ आता 'प्रबोधन'मधल्या लेखांचं संपादन करताना उमगत जात आहेत. त्यांनी दिलेली जबाबदारी आपल्या हातून काही अंशी तरी पूर्ण होत आहे, अशी भावना या क्षणी मनात आहे. यापुढेही प्रबोधनकारांविषयीचे इतरही सगळं अप्रकाशित लेखन असंच पुस्तक रूपाने वाचकांसमोर आणू शकलो, तर मी स्वतःला धन्य समजेन.

मुख्यमंत्री **उद्धव ठाकरे** यांनी माझ्यावर विश्वास ठेवून 'प्रबोधनकार डॉट कॉम'साठी संदर्भ मिळवून देण्यात वारंवार मदत केली. दहा वर्षांपूर्वीच्या या गोष्टींचं महत्त्व आता लक्षात येत आहे.

मराठी भाषा विभागाचे मंत्री **सुभाष देसाई** यांनी प्रबोधन शताब्दीच्या निमित्ताने प्रबोधनकारांच्या अप्रकाशित साहित्याचे खंड प्रकाशित करण्याची कल्पना मांडली आणि त्याची जबाबदारी माझ्यावर सोपवली. प्रत्येक टप्प्यावर बारकाईने लक्ष घालून प्रोत्साहन दिलं, ते माझ्यासाठी फार महत्त्वाचं होतं.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे आभार. मंडळाचे अध्यक्ष **डॉ. सदानंद मोरे** यांनी माझ्यावर विश्वास दाखवला. काम करताना जिथे अडलो, तिथे मार्गदर्शन केलं. मंडळाच्या सचिव **मीनाक्षी पाटील** यांनी लक्ष घालून हे काम माझ्याकडून करून घेतलं.

साप्ताहिक चित्रलेखाचे संपादक **ज्ञानेश महाराव** यांनी त्यांच्याकडचे 'प्रबोधन'चे अंक दिलेच; पण त्यांचं प्रबोधनकारांविषयीचं लिहिणं आणि बोलणं नवी दिशा देणारं ठरलं. ते सोबत नसते, तर हे काम माझ्याकडून पूर्ण झालं नसतं.

राज्याच्या ग्रंथालय संचालक **शालिनी इंगोले** आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, भारत इतिहास संशोधन मंडळ आणि इतर ग्रंथालयांमधले 'प्रबोधन'चे अंक उपलब्ध करून दिले.

ज्येष्ठ पत्रकार **डॉ. अनंत गुरव** यांनी 'प्रबोधन'वर पीएचडीसाठी केलेल्या संघर्षाचा मी साक्षीदार आहे.

त्यांनी 'प्रबोधन'वर केलेलं संशोधन हे या विषयावरचं पहिलंच विद्यापीठीय संशोधन आहे, त्यामुळं त्याचं मोल या ग्रंथासाठी खूपच आहे. त्यांनी त्यांच्याकडचे 'प्रबोधन'चे अत्यंत दुर्मिळ अंकही मला दिले. ते मला इतक्या सहजपणे मिळाले नसते, तर कोरोनाकाळात त्या अंकांचा इतरत्र माग काढणं शक्य नव्हतं.

डॉ. विठ्ठल घुले, डॉ. नवनाथ शिंदे, डॉ. मनीष देशमुख हे प्रबोधनकारांवर पीएचडी करणारे संशोधक आणि प्रबोधनकारांवर लेखन केलेले इतर अभ्यासक यांच्यामुळं माझं काम सोपं झालं. साधे पोस्टमन असूनही प्रबोधनकारांवर महत्त्वाचा दस्तावेज गोळा करणारे अभ्यासक **धर्मपाल कांबळे** यांची आठवण आज येणं स्वाभाविक आहे. **प्रा. महावीर मुळे** यांनी काकडवाडी, ता. मिरज, जि. सांगली येथील प्रबोधनकारांच्या साहित्याचा साठा जतन करून ठेवला, म्हणून आज ते आपल्याला वाचायला मिळालं. प्रबोधनकारांचे शिष्य **पंढरीनाथ सावंत** यांचे उपकार तर प्रबोधनकारांच्या अभ्यासकांना कधीच फेडता येणार नाहीत.

सामाजिक कार्यकर्ते आणि लेखक **अमर हबीब** यांनी योग्य वयात माझी प्रबोधनकारांच्या साहित्याशी पहिली ओळख करून दिली. त्या साहित्याने मला माझ्या जगण्याचा रस्ता दाखवला.

अभिजित सोनावणे याने या ग्रंथासाठी हजारहून अधिक पानांच्या टायपिंगचा पसारा आवरला. **पुष्पराज पोपकर** यांनी पानांच्या लेआऊटचं किचकट काम वेळेत केलं. **संजय मोरे** यांनी कव्हरसाठी देखणं पोर्ट्रेट करून दिलं. दहा वर्षांपूर्वी 'प्रबोधनकार डॉट कॉम'साठी काम करताना मित्र **सिद्धार्थ मोकळे** याने 'प्रबोधन'चे अनेक अंक मिळवले होते. **दर्शन आंब्रे** याने अंकांचे फोटो काढण्याचं कठीण काम चिकाटीने केलं होतं.

या सगळ्यांविषयी, माझ्या कुटुंबाविषयी आणि या कामाचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष भाग असलेल्या प्रत्येकाविषयी मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो.

सचिन परब
१५ ऑगस्ट २०२१

संपादकीय

प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे. महाराष्ट्राच्या इतिहास आणि भूगोलालाही वळण लावणारी थोर व्यक्तिमत्त्वं विसाव्या शतकात होऊन गेली, त्यातलं एक महत्त्वाचं नाव. महात्मा फुले यांच्या सत्यशोधनाचा विचार पुढं नेणारे आक्रमक विचारवंत, भिक्षुकशाहीचा कर्दनकाळ ठरलेले समाजसुधारक, हुंड्यासारख्या चालीरितींविरुद्ध उभे ठाकलेले सामाजिक कार्यकर्ते, मराठी पत्रकारितेला नवी दिशा देणारे संपादक, जातनिष्ठ इतिहास लेखनाचा फोलपणा दाखवून इतिहासाची नवी मांडणी करणारे इतिहासकार, महाराष्ट्रभर सातत्याने फिरून विद्रोहाची पेरणी करणारे ज्वलंत वक्ते, समाज सुधारणांना जनसामान्यांपर्यंत पोचवण्यासाठी सर्वस्व पणाला लावणारे नाटककार, दिग्दर्शक आणि निर्मातेही, मोजक्याच पण ठसकेबाज भूमिका करणारे लक्षवेधी अभिनेते, सार्वजनिक नवरात्रोत्सवाचे संस्थापक, रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांचे गुरुतुल्य मार्गदर्शक, संयुक्त महाराष्ट्र प्रत्यक्षात आणण्यासाठी वयाच्या सत्तरीत तुरुंगवास भोगणारे आंदोलनाचे नेते, गेल्या अर्धशतकापेक्षाही जास्त काळ महाराष्ट्राच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी असणाऱ्या ठाकरे कुटुंबाचे प्रेरणास्थान, याशिवाय लेखक, कवी, संगीतकार, सतारवादक, पटकथालेखक, चित्रकार, फोटोग्राफर, शिक्षक, उद्योजक, विक्रेते, जनसंपर्क अधिकारी अशा विविध भूमिकांत वावरलेल्या अफाट बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचं कर्तृत्व शब्दांत पकडणं कठीण आहे.

'प्रबोधन' शताब्दी वर्ष

प्रबोधनकारांचा जन्म १७ सप्टेंबर १८८५ आणि मृत्यू २० नोव्हेंबर १९७३चा. त्यांना ८८ वर्षांचं दीर्घायुष्य लाभलं. हा बहुरंगी माणूस एका आयुष्यात अनेक आयुष्यं जगला. पण त्यात त्यांची ओळख बनलं ते त्यांनी संपादित केलेलं 'प्रबोधन' हे नियतकालिक. १६ ऑक्टोबर १९२१ ला 'प्रबोधन' नियतकालिकाचा पहिला अंक मुंबईहून प्रकाशित झाला. त्याला २०२१च्या १६ ऑक्टोबरला शंभर वर्षं होतील. त्याला धरून २०२०च्या १६ ऑक्टोबरपासून 'प्रबोधन' शताब्दी वर्षं साजरं करण्याची कल्पना सर्वात आधी 'साप्ताहिक चित्रलेखा'चे संपादक ज्ञानेश महाराव यांनी मांडली. आदल्याच वर्षी साजऱ्या झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संपादित 'मूकनायक' पाक्षिकाच्या शताब्दीची पार्श्वभूमी याला

होती. २६ ऑक्टोबर २०२०च्या 'चित्रलेखा'त प्रबोधन शताब्दीचं महत्त्व सांगताना महाराव लिहितात, 'प्रबोधनकारांचे विचार हे मानसिक प्रगतीला चालना देणारे आहेत. अत्याधुनिक विज्ञानाचं प्रतीक असलेला कम्प्युटर वापरण्याचा प्रारंभही फुलं वाहून - नारळ फोडून (सॉरी वाढवून... तेही श्रीफळ आहे ना!) करणाऱ्या आजच्या तरुणांना तर प्रबोधनकारांच्या विचारांची नितांत गरज आहे. प्रबोधनकारांचे ९०-१०० वर्षांपूर्वीचे विचार आजही आवश्यक वाटावेत, ही अभिमानाने सांगण्यासारखी बाब नाही. तथापि, स्वतःला हायफाय, सुधारणावादी, कट्टर धर्म-राष्ट्रवादी म्हणवणाऱ्यांनी आपल्या भूमिकेचा कस पाहण्यासाठी प्रबोधनकारांचे विचार अवश्य वाचावेत.'

मात्र हे वर्ष कोरोनाच्या जागतिक साथीमुळे काळवंडलेलं असल्यामुळं शताब्दी वर्ष उत्साहानं साजरं करण्यावर अनेक मर्यादा आल्या. तरीही काही प्रयत्न झाले. 'प्रबोधन' शताब्दी साजरी करण्यासाठी 'प्रबोधनकार डॉट कॉम' या वेबसाईटने १६ ऑक्टोबर २०२० पासून प्रबोधनकारांवरील ११ ऑनलाइन व्याख्यानं आयोजित केली. ज्येष्ठ पत्रकार हरीश केंची यांच्या प्रयत्नातून 'संवाद' या संस्थेने पुण्याच्या बालगंधर्व नाट्यमंदिरात २० ते २६ जानेवारी २०२१ या काळात 'प्रबोधन शतकोत्सवा'चं आयोजन केलं. त्यात विविध मान्यवरांची व्याख्याने, प्रदर्शन, लघुपटाचं प्रक्षेपण, नाट्यगीत गायन असे कार्यक्रम झाले. महाराष्ट्र सरकारच्या 'मराठी भाषा विभागा'चे मंत्री सुभाष देसाई यांनी १ डिसेंबर २०२० रोजी ऑनलाईन बैठक घेऊन हे वर्ष साजरं करण्याच्या सूचना एकत्र केल्या. त्यानुसार 'प्रबोधनमधील प्रबोधनकार- प्रबोधन नियतकालिकातील केशव सीताराम ठाकरे यांचे लेख' हा ग्रंथ प्रकाशित होत आहे.

आजही 'प्रबोधन' महत्त्वाचं

'प्रबोधन' नियतकालिकाने घडवलेली जागृती हा महाराष्ट्राच्या समाज प्रबोधनाच्या, समाज सुधारणेच्या आणि पत्रकारितेच्या इतिहासाचा फार महत्त्वाचा भाग आहे. लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर गांधीयुगाला सामोरं कसं जावं याविषयी महाराष्ट्र गोंधळलेला होता. त्याचबरोबर वेदोक्त प्रकरण आणि त्यातून निर्माण झालेला ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद टोकाला गेल्याने महाराष्ट्र हादरलेला होता. या पार्श्वभूमीवर 'प्रबोधन'चा जन्म झाला. त्यानंतरच्या म्हणजे १९२०च्या दशकातल्या जवळपास नऊ वर्षांतील महत्त्वाच्या नोंदी 'प्रबोधन'मधे आहेत. किंबहुना 'प्रबोधन' हा या सगळ्या सामाजिक आणि राजकीय घुसळणीचा एक भाग आहे. पहिल्या महायुद्धानंतर अमेरिका आणि जपान यांचा महासत्ता म्हणून होणारा उदय, असहकार आंदोलन, मोपल्यांचा मलबार येथील हिंसाचार, खिलाफत चळवळ या राष्ट्रीय पातळीवरच्या घडामोडी, तसंच १९२३च्या प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका, त्यामुळं ब्राह्मणेतर चळवळीतल्या हालचाली, ब्राह्मणी वर्चस्ववाद्यांच्या कारवाया, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले आणि लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्यांमुळे झालेले वाद, मुळशी सत्याग्रह, या महाराष्ट्रातल्या घडामोडींवर प्रबोधनकार ठाकरे यांच्यासारख्या महाराष्ट्रभर उत्तम जनसंपर्क असलेल्या अभ्यासू संपादकाने केलेली भाष्यं हा आज एक ऐतिहासिक दस्तावेज आहे.

तसंच लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे अशा या काळातील व्यक्तिमत्त्वांशी संबंधित ऐतिहासिक नोंदीही या लेखांमधे वाचता येतात. शिवाय स्वतः प्रबोधनकार ठाकरे यांचं चरित्रही

त्यांच्या साहित्यातून समोर येतं ते महत्त्वाचं आहे. १६ सप्टेंबर १९४५ मधे 'नवयुग' साप्ताहिकातल्या लेखात आचार्य प्र. के. अत्रे सांगतात, 'आजपर्यंत ठाकरे यांनी लिहिलेले सर्व प्रबोधक आणि तेजस्वी वाङ्मय एकत्रित करून ग्रंथरूपाने जर प्रकाशात आले तर महाराष्ट्राची सामाजिक क्रांती घडवून आणण्याच्या कामी या बंडखोर ब्राह्मणेतराने एका कालखंडात केवढी तेजस्वी कामगिरी करून ठेवलेली आहे, हे महाराष्ट्राला कळून आल्यावाचून राहणार नाही. अशा मान्यतेचा आणि गौरवाचा मुजरा महाराष्ट्र या कलमप्रभूला मोठ्या आनंदाने करील!'

महाराष्ट्रातल्या सामाजिक संघर्षाचा तपशीलवार पट 'प्रबोधन'मधून उभा राहतो, तो अधिक महत्त्वाचा आहे. 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' या ग्रंथात रा. के. लेले म्हणतात, 'ठाकरे यांच्या 'प्रबोधन' पत्राची कारकीर्द अवघी पाच-सहा वर्षांचीच होती; पण तेवढ्या अल्पावधीत त्याने केलेली वृत्तपत्राच्या व सामाजिक चळवळीच्या क्षेत्रांतील कामगिरी न विसरता येण्यासारखी आहे. ठाकरे ह्यांच्या पत्राचे स्वरूप राजकीय प्रश्नांवर भर देणारे नव्हते. आगरकरांप्रमाणे सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करणारे हे पत्र होते. आगरकरांच्या सामाजिक सुधारणांचा पाया अत्यंत शास्त्रशुद्ध होता; पण त्यांनी ज्या सुधारणांचा पुरस्कार केला, त्या पांढरपेशा वर्गापुरत्याच मर्यादित होत्या. त्यांच्या सुधारणावादाचे आवाहन बहुजन समाजापर्यंत पोचले नाही. त्यांनी म. जोतीराव फुले यांनी प्रसृत केलेले विचार व केलेले कार्य ह्यांची दखल घेतल्याचेही आढळत नाही. या दृष्टीने पाहिले तर ठाकरे ह्यांनी 'प्रबोधना'द्वारा ज्या सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला त्या अधिक व्यापक होत्या... या दृष्टीने ह्यांचे 'प्रबोधन' आगरकरांच्या पुढे काही पावले गेलेले होते.'

'प्रबोधन'ने त्याच्या प्रकाशनकाळात महाराष्ट्रावर कसा प्रभाव टाकला, हे पुढे दिलेल्या समकालीन पत्रकारांचे दोन उतारे वाचून कळू शकेल. १९३०च्या दरम्यान नागपूरहून ॲड. गोविंदराव प्रधान, शांतारामपंत देशपांडे आणि गोपाळराव दळवी मिळून 'जनता' नावाचं नियतकालिक काढत. या 'जनता'ने ९ जानेवारी १९३०च्या अंकात 'प्रबोधन'विषयी आपला अभिप्राय दिलेला आहे, 'प्रबोधनाने पांच वर्षांत आपल्या निर्भीड व कल्पनारम्य लिखाणाने महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात खळबळ उडवून दिली. प्रबोधनकार ठाकरे व त्यांची तडफदार लेखणी महाराष्ट्राच्या चिरपरिचयाची आहे. त्यांची लिखाणे म्हणजे त्रस्त जिवांचे हाल पाहून भडभडून आलेल्या अंतःकरणाचे पडसाद आहेत. त्यांच्या लेखांतील प्रत्येक ओळींत व अक्षरांत धर्म व राजकारण ह्यांच्या नावाखाली छलवाद करणाऱ्या स्वार्थी सोद्यांचा निषेध दर्शविणारा जळजळीत संतापातिरेक दिसून येतो. मि. ठाकरे यांचे लिखाण म्हणजे डायनॅमिट. ते भटशाही, लाटशाही व भांडवलशाही यांच्या अभेद्य ठरलेल्या स्वार्थी तटांना आपल्या लेखणीच्या सुरुंगाने पार उडवून देते.'

आचार्य अत्रे 'प्रबोधन'विषयी लिहितात, 'अच्युतराव कोल्हटकर यांच्या 'संदेश' या पत्राने महाराष्ट्रात जी जागृती आणि खळबळ केली, तशाच प्रकारची खळबळ ठाकरे यांच्या प्रबोधनने करून सोडली, असे म्हणावयास प्रत्यवाय नाही. सदर मासिकामध्ये पाच-सहा वर्षेपर्यंत निरनिराळ्या सामाजिक, राजकीय आणि ऐतिहासिक विषयांवर खळबळीत लेखमाला आणि निबंध लिहून ठाकरे यांनी बहुजन समाजाचे अक्षरशः प्रबोधन केले, यात संशय नाही. भिक्षुकी वृत्तीच्या आणि सनातनी दृष्टीच्या ब्राह्मण समाजावर अनेक निकराचे हल्ले त्यांनी आपल्या या पाक्षिकात चढविले, त्यामुळे

'कोदण्डाच्या टणत्कारा'पासून ब्राह्मण विद्वानांत अप्रिय झालेले त्यांचे नाव अधिकच तीव्रतेने त्या समाजाच्या डोळ्यांत सलू लागले. तथापि, सनातनी भिक्षुक समाजात हे जितके अप्रिय ठरले, तितकेच ब्राह्मणेतर समाजामध्ये ते लोकप्रिय होऊन बसले.'

'प्रबोधन'कारांनी मराठी समाजातले अनेक दोष १०० वर्षांपूर्वी दाखवलेले आहेत, जे आजही जसेच्या तसे आहेत. हुंड्याच्या विरोधात त्यांनी आंदोलन केलं; पण आजही हुंडा थांबलेला नाही. भिक्षुकशाहीच्या विरुद्ध त्यांनी रणशिंग फुंकलं होतं; पण आज जुनीच भिक्षुकशाही नवे मुखवटे घालून तसंच शोषण करते आहे. महाराष्ट्रातील इतिहास अजूनही स्वजातिभिमानाच्या चिखलात रुतून बसलाय. महिला सक्षमीकरणाची प्रबोधनकार सांगत असलेली निकड अजूनही कायम आहे. पूर्वीइतकी तीव्र अस्पृश्यता उरली नसली तरी जातिभेदाचे दुष्परिणाम महाराष्ट्र अजूनही भोगतोच आहे. महाराष्ट्रातल्या तरुणाला 'मानसिक गुलामगिरीविरुद्ध बंड' करण्याची ताकद आजही प्रबोधनकारांचे हे लेख देऊ शकतात. बहुजनवाद, हिंदुत्ववाद, गांधीवादच नाही तर कम्युनिझमविषयी आजच्या संदर्भात विचार करताना त्यांचा दृष्टीकोन महत्त्वाचा ठरतो. मात्र हे प्रबोधनकारांचं 'प्रबोधन'मध्ये प्रकाशित झालेलं लिखाण आजच्या अभ्यासकांसाठी आणि वाचकांसाठी उपलब्ध नव्हतं. 'प्रबोधन'चे अंक अत्यंत दुर्मिळ झाले आहेत. त्यामुळं हे 'प्रबोधन' शताब्दीच्या निमित्ताने पुन्हा प्रकाशित करणं, ही काळाची गरज होती. नियतकालिकांमधे प्रकाशित लिखाण खूप महत्त्वाचं असलं तरी ते दीर्घकाळ टिकण्यात अडचणी असतात. त्या तुलनेत त्यातील लिखाण पुस्तकरूपाने एकत्र आणल्यास त्याचं जीवनमान वाढतं आणि आजच्या डिजिटल युगात तर ते कायमस्वरूपी चिरंतन होऊ शकतं.

लेख जसेच्या तसे वाचकांसमोर

'प्रबोधन'चा पहिला अंक १६ ऑक्टोबर १९२१ ला प्रकाशित झाला. पहिली दोन वर्षं म्हणजे १९२१-१९२२ आणि १९२२-१९२३ या प्रकाशन वर्षांत 'प्रबोधन' मुंबईतून पाक्षिक म्हणून नियमित प्रकाशित झालं आहे. दोन्ही वर्षी दर महिन्याच्या १ आणि १६ तारखेला 'प्रबोधन' प्रकाशित होत असे. या दोन वर्षांचे मिळून ४८ अंक उपलब्ध आहेत. तिसऱ्या प्रकाशन वर्षात 'प्रबोधन' सातारा रोडहून प्रकाशित होऊ लागलं. १९२३-१९२४ या प्रकाशन वर्षाचेही पाक्षिक म्हणून पहिले १८ अंक सलग निघाले आहेत. त्यानंतर 'प्रबोधन' दहा महिने प्रकाशित होऊ शकलं नव्हतं. चौथ्या वर्षापासून 'प्रबोधन' मासिक बनून पुण्याहून प्रकाशित होऊ लागलं. चौथ्या वर्षात एप्रिल १९२५ पासून मे १९२६ या १४ महिन्यांत 'प्रबोधन'चे १२ अंक प्रकाशित झाले. पाचव्या प्रकाशन वर्षातला पहिला अंक जुलै १९२६ चा आहे. तेव्हापासून नोव्हेंबर १९२७ पर्यंत दहा अंक प्रसिद्ध झालेत. त्यानंतर तब्बल दोन वर्षांचा खंड आहे. ऑक्टोबर १९२९ मधे पाचव्या प्रकाशन वर्षांचा ११-१२ वा जोडअंक प्रकाशित झालाय. सहाव्या प्रकाशन वर्षात नोव्हेंबर १९२९ पासून मार्च १९३० पर्यंत सलग पाच अंक प्रकाशित झाले आहेत. त्यानंतर कोणतीही घोषणा न करता 'प्रबोधन' बंद पडलं. अधिक नेमकेपणानं बोलायचं तर त्यानंतर 'प्रबोधन'चा कोणताही अंक आज उपलब्ध नाही.

याचाच अर्थ 'प्रबोधन'चे पहिल्या प्रकाशन वर्षांत २४, दुसऱ्या प्रकाशन वर्षात २४, तिसऱ्या प्रकाशन वर्षात १८, चौथ्या प्रकाशन वर्षात १२, पाचव्या प्रकाशन वर्षात १२ (एक जोडअंक असल्यामुळे खरंतर अकराच) आणि सहाव्या प्रकाशन वर्षात ५ अंक प्रकाशित झालेले आढळतात.

ऑक्टोबर १९२१ ते मार्च १९३० या ८ वर्षं ५ महिने कालावधीत 'प्रबोधन'चे ९५ अंक प्रकाशित झालेत. ग्रंथालयं आणि वैयक्तिक ग्रंथसंग्रहातून त्यापैकी ९१ अंक या ग्रंथासाठी उपलब्ध झाले. हे अंक कुठून आणि कोणाकडून मिळाले याची नोंद कृतज्ञता या शीर्षकाखाली प्रस्तावनेच्या आधी वेगळी केलेली आहे. मात्र तिसऱ्या वर्षातले १, २, ३ आणि ९ हे सातारा इथे प्रकाशित झालेले अंक उपलब्ध होऊ शकले नाहीत.

या उपलब्ध अंकांमधले प्रबोधनकार ठाकरे यांनी लिहिलेले लेख या संग्रहात समाविष्ट केलेले आहेत. यात या अंकांमधले सगळे अग्रलेख आहेतच. तो काळ संपादकाने एकहाती लेखन करण्याचा होता. प्रबोधनकारही प्रबोधनमधला बरासचा मजकूर स्वतःच लिहीत असत. त्यामुळं संपादक सोडून इतर लेखकानं लेख दिल्यास त्याचं नाव लेखाच्या वर किंवा खाली नोंदवलं जात असे. छोट्या स्फुटांना नाव देणं योग्य वाटत नसलं तरी लिहिणाऱ्याचं टोपण नाव किंवा निदान आद्याक्षरं तरी छापलेली असत. त्यामुळं असं कोणतंही नाव नसलेलं सगळं लिखाण हे संपादकानं लिहिलेलं असे. 'प्रबोधन'मधेही हा शिरस्ता पाळलेला दिसतो. सहसंपादकाचं टिपण असेल तरी त्याखाली सहसंपादक असं लिहिलेलं आढळतं. त्यामुळं एखादा सहसंपादक 'प्रबोधन'मधले अग्रलेख किंवा इतर नाव नसलेले लेख लिहीत असण्याची शक्यता कमीच असावी. त्यामुळं ज्यावर 'बायलाइन' नाही, ते सगळे लेख प्रबोधनकारांचे मानावे लागतात. या निकषानुसार प्रबोधनकारांचे असलेले लेख, स्फुट लेख, अनुवाद, श्रद्धांजलीपर टिपणं, पुस्तक परिचय, पोवाडा आणि वाचकांसाठी लिहिलेली निवेदनं या लेखसंग्रहात घेतलेली आहेत. थोडक्यात प्रबोधनकारांनी 'प्रबोधन'मधे लिहिलेले जास्तीत जास्त लेख, कोणतीही निवड न करता जसेच्या तसे अभ्यासकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न यात केला आहे. त्यात कोणतेही बदल केलेले नाहीत. त्याचं वेगळं वर्गीकरणही केलेलं नाही. अंकांच्या प्रकाशनाच्या काळानुसार एकेका अंकातले लेख ओळीने मांडले आहेत. त्यातलं व्याकरण जुनंच ठेवलं आहे. कागद जुना झाल्यामुळं किंवा फाटल्यामुळं कुठं शब्द किंवा वाक्यं वाचता आली नाहीत, तिथं तसं स्पष्टपणे नोंदवलेलं आहे. प्रबोधनकारांची भाषा जहाल आणि विचार टोकदार असल्यामुळं क्वचित ठिकाणी एखाद्याच्या भावना दुखावू शकतात. त्याऐवजी त्या काळाच्या आणि परिस्थितीचा संदर्भ लक्षात घेऊन या परिवर्तन घडवणाऱ्या विचारांचं महत्त्व लक्षात घ्यावं.

प्रबोधनकारांचं अप्रकाशित साहित्य प्रकाशित करण्याचा उद्देश या ग्रंथनिर्मितीमागे आहे. प्रबोधनकारांनी 'प्रबोधन'मधल्या अनेक लेखांची पुस्तकं किंवा पुस्तिका छापल्या. त्यातली ज्यांची पुस्तकं आज उपलब्ध आहेत, ते 'प्रबोधन'मधले लेख या संग्रहात वगळलेले आहेत. एस. सी. मुकर्जी यांनी लिहिलेल्या 'द डिक्लाइन अँड फॉल ऑफ द हिंदूज' या इंग्रजी ग्रंथाचा प्रबोधनकार ठाकरे यांनी 'हिंदू धर्माचा ऱ्हास आणि अधःपात' या नावाने अनुवाद केला होता. तो ग्रंथ 'प्रबोधन'मधे टप्प्याटप्प्याने लेख स्वरूपात प्रकाशित झाला होता. 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा'च्या प्रबोधनकार ठाकरे समग्र वाङ्मयाच्या चौथ्या खंडात हा संपूर्ण ग्रंथ दिलेला आहे. त्यामुळं ते लेख या संग्रहात घेतलेले नाहीत. शिवाय 'वैदिक विवाहविधीचे संशोधन', 'साताऱ्याचे दैव आणि दैवाचा सतारा', 'बजरंगी सोटा', 'टेम्प्ट्रेस', 'महामायेचे थैमान' या लेखांची झालेली पुस्तकं 'प्रबोधन प्रकाशन'ने गेल्या वर्षीच पुस्तकरूपाने उपलब्ध करून दिली आहेत. त्यामुळं त्याचाही समावेश या संग्रहात नाही. मात्र 'आई'

आणि 'देवळांचा धर्म, धर्माची देवळे' हे दोन लेख त्यातले विचार तसंच शैलीमुळे 'प्रबोधन'ची ओळख ठरले आहेत. त्यामुळे त्यांचं महत्त्व लक्षात घेता, ते लेख पुस्तकरूपाने उपलब्ध असूनही अपवाद म्हणून या संग्रहात ठेवणं आवश्यक वाटलं. 'दगलबाज शिवाजी' हा लेखही पूर्वी पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाला होता. मात्र तो आता वाचकांसाठी उपलब्ध नसल्याने या संग्रहात घेतलेला आहे.

डॉ. अनंत गुरव हे 'केशव सीताराम ठाकरे यांच्या 'प्रबोधन' या नियतकालिकाचा अभ्यास' या अप्रकाशित पीएच.डी. प्रबंधात लिहितात, 'प्रबोधन' नियतकालिकाची संपादकपदाची जबाबदारी सांभाळताना केशव ठाकरे यांनी अनेक टोपण नावांनी विविध विषयावर लिखाण केले आहे. केशव ठाकरे यांनी वापरलेले टोपणनाव आणि लेखाची नावे पुढीलप्रमाणे आहेत. **भारतभृत्य** - कृष्णचारित्र्यावरील दोन आक्षेप, हुंड्याची हुंडादी, **नूर** - शेवटी येळकोट केलाच पाहिजे, **ऐदी उद्योगी** - विचार तरंग, **निर्विकल्प** - ब्राह्मणांचा देव परशुराम, कालाय तस्मै नमः, चळवळ जरा गारठलेली दिसते, **हेमगर्भ** - हेमगर्भाच्या मात्रेचे वळसे, **सवाई दादोबा** - विनोदाचे पान, **हेमगर्भ सहाणपूरकर** - हेमगर्भाचे वळसे.' मात्र ही टोपणनावं प्रबोधनकारांचीच असल्याचा कोणताही भक्कम संदर्भ डॉ. गुरव देत नाहीत. ते सांगतात, 'या लेखातील टीकेचा रोख, त्यातील उपमा, समस्येवर सुचविलेल्या उपाययोजना, सरकारी नोकरांबद्दलचे मत लक्षात घेता हे केशव ठाकरे यांनी केलेले लिखाण आहे हे समजून येते.' डॉ. गुरव यांनी सांगितल्याप्रमाणे या लेखांत ठाकरे शैली आहेच. पण त्यामुळे हे लेख प्रबोधनकारांनीच लिहिल्याचं सिद्ध होत नाही किंवा गृहीतही धरता येत नाही. अनेकदा अंकातला बहुतेक मजकूर एकहाती लिहिणारे प्रबोधनकार या विषयांसाठी टोपण नाव का घेतील, याचं कारण सापडत नाही. त्यामुळं हे लेख या संग्रहात घेतलेले नाहीत.

पत्रकारितेच्या प्रबोधनाची पार्श्वभूमी

इंग्रजी शाळेत जात असताना प्रबोधनकारांनी मुंबईच्या रस्त्यावर विकत घेतलेल्या पॉकेट एन्सायक्लोपीडियातून दोन लेख मराठीत अनुवादित केले होते. त्यातला एक 'वृत्तपत्रांची उत्पत्ती' असा होता आणि तो त्या काळात लोकप्रिय असलेल्या 'करमणूक' साप्ताहिकात त्यांच्या नावासह प्रसिद्ध झाला होता. तो आज उपलब्ध नसल्यामुळे त्यात काय लिहिलं असेल याचा फक्त अंदाज बांधता येतो. प्राचीन काळातल्या ज्युलियस सीझरची ॲक्टा डायरना ही सरकारी पत्रकं, मध्ययुगातली न्यूजलेटर्स, छपाईच्या शोधानंतरच्या हॅण्डबिल, कोरंट आणि गॅझेट या वर्तमानपत्रांच्या पूर्वरूपांचा आढावा त्यात असू शकेल. १६२१ मधे इंग्लंडमधल्या अगदी प्राथमिक स्वरूपाच्या वृत्तपत्राची सुरुवात झाली, हा इतिहासही त्यात असू शकेल. ही पत्रकारितेची पार्श्वभूमी 'प्रबोधन'ची पार्श्वभूमी समजून घेतानाही उपयुक्त ठरते.

ईस्ट इंडिया कंपनी भारतात आली तेव्हा तिने छपाईबरोबरच वर्तमानपत्रंही आणली. जेम्स ऑगस्टस हिकी या कंपनीच्या माजी नोकराने भारतातलं पहिलं वर्तमानपत्रं जन्माला घातलं. २९ जानेवारी १७८०ला 'बेंगाल गॅझेट' किंवा 'हिकीज जर्नल' हे इंग्रजी साप्ताहिक सुरू झालं. त्यानंतर १९ वर्षांनी म्हणजे १७८९ मध्ये मुंबईत 'बॉम्बे हेरॉल्ड' हे इंग्रजी पत्रं निघालं. पुढच्या वर्षी निघालेल्या 'बॉम्बे कुरियर' या इंग्रजी वृत्तपत्रात काही मराठी जाहिराती मोडी लिपीत होत्या. ही सगळी वृत्तपत्रं इंग्रजच काढत. कोलकात्यात गंगाधर भट्टाचार्य हे १८१६ मधे 'बेंगॉल गॅझेट' हे वृत्तपत्र सुरू करणारे पहिले

भारतीय ठरले. कोलकात्याजवळच्या श्रीरामपूर येथील बॅप्टिस्ट मिशनऱ्यांनी धर्मप्रसारासाठी 'समाचार दर्पण' हे बंगाली साप्ताहिक २३ मे १८१८ला सुरू केलं. ती भारतीय भाषेमधल्या पत्रकारितेची सुरुवात होती. राजा राममोहन रॉय यांच्या 'संवाद कौमुदी' आणि 'मिरात उल अखबार' यांनी या पत्रकारितेला देशी स्वरूप मिळवून दिलं.

इथे मुंबईतही इंग्रजी आणि त्यानंतर पारशांमुळे गुजराती वर्तमानपत्रं सुरू झाली होती. त्याची प्रेरणा घेऊन २० जुलै १८२८ला 'मुंबापूर वर्तमान' हे मराठी वर्तमानपत्र सुरू झालं. पण त्याच्याविषयी फारशी माहिती आज उपलब्ध नाही. विद्वान समाजसुधारक बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ला 'दर्पण' हे पाक्षिक सुरू केलं. त्यात मराठीबरोबरच इंग्रजी मजकूरही असायचा. चार महिन्यांनी ते साप्ताहिक रूपात सुरू झालं. जुलै १९४०मधे सुरू झालेलं 'मुंबई अखबार' हे साप्ताहिक पूर्ण मराठी असं पहिलं वर्तमानपत्रं ठरलं. त्यानंतर 'प्रभाकर', 'ज्ञानसिंधु', 'ज्ञानोदय', 'ज्ञानप्रकाश' अशा वर्तमानपत्रांनी मराठी वर्तमानपत्रांचा प्रवाह बळकट केला. तेव्हापासून 'प्रबोधन'च्या आरंभापर्यंतचा काळ 'इंदुप्रकाश', 'विविध ज्ञानविस्तार', 'नेटिव ओपिनियन' , 'सुबोधपत्रिका', 'दीनबंधु', 'केसरी', 'सुधारक', 'करमणूक' , 'काळ', 'दिनमित्र', 'भाला', 'राष्ट्रमत', 'संदेश', 'जागृती', 'विजयी मराठा', 'मूकनायक', 'लोकमान्य' या वर्तमानपत्रांनी गाजवला.

सत्यशोधकी पत्रकारितेचा जोमदार प्रवाह

डॉ. जयसिंगराव पाटील आणि डॉ. रमेश जाधव यांनी 'निवडक विजयी मराठा' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत या काळातल्या मराठी वर्तमानपत्रांना पाच प्रवाहांमधे विभागलं आहे.

एक - केवळ लोकशिक्षण आणि मनोरंजनाचा वसा घेऊन सुरू झालेल्या बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दर्पण'पासून पहिला प्रवाह सुरू होतो.

दोन - ब्राह्मणेतरांची दुःखं अधिक प्रभावीपणे वेशीवर टांगण्याची सामाजिक बांधिलकी मानून अवतरलेला कृष्णराव भालेकरांचा 'दीनबंधु' आणि त्या परंपरेतली पत्रं.

तीन - त्याआधीचा ख्रिश्चन धर्माचा प्रसार आणि प्रचार हेच उद्दिष्ट समोर ठेवून अस्तित्वात आलेला 'ज्ञानोदय' आणि इतर ख्रिश्चन पत्रं.

चार - केवळ राजकीय स्वातंत्र्य हाच ध्यास घेऊन जन्मास आलेला लोकमान्य टिळकांचा 'केसरी' आणि त्या गटातली पत्रं.

पाच - पाचवा प्रवाह म्हणून भाऊ महाजन यांचा 'प्रभाकर' आणि गोपाळ गणेश आगरकरांचा 'सुधारक' यांचा उल्लेख करता येईल.

यात 'प्रबोधन' कोणत्या प्रवाहातलं नियतकालिक आहे? तर त्याला निर्विवादपणे यातल्या दुसऱ्या म्हणजे सत्यशोधकी प्रवाहातलं नियतकालिक मानायला हवं. पण त्याच बरोबर 'प्रभाकर' आणि 'सुधारक' यांच्या समाजप्रबोधन करणाऱ्या पत्रांच्या पाचव्या प्रवाहाशीही ते जोडलेले होते. प्रबोधनकारांवर सर्वाधिक प्रभाव असलेल्या लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांची गाजलेली शतपत्रे ही 'प्रभाकर'मध्येच प्रकाशित झाली होती आणि प्रबोधनकार आगरकरांचे कट्टर समर्थकही होते. त्याचबरोबर विदेशी ज्ञान देशबांधवांपर्यंत घेऊन जाण्यासाठी आग्रही असणाऱ्या दर्पणकारांच्या प्रवाहाचंही त्यांना वावडं नव्हतं. तसे लेख प्रबोधनमधे प्रकाशित झालेले आढळतात. मात्र 'प्रबोधन'

ख्रिश्चन पत्रांपासून फटकून राहतं आणि 'केसरी' गटाच्या प्रवाहाच्या विरुद्ध दोन हात करताना दिसतं.

महात्मा जोतीराव फुले यांच्या सार्वजनिक सत्यधर्माच्या तत्त्वज्ञानाची प्रेरणा घेऊन सत्यशोधकी नियतकालिकांचा जोमदार प्रवाह सुरू झाला. आजही या विचारांची नियतकालिके आणि अनियतकालिके प्रकाशित होत असतात. या प्रवाहाविषयी 'सत्यशोधकीय नियतकालिके' या ग्रंथात डॉ. अरुण शिंदे लिहितात, 'सत्यशोधक विचारांचा व चळवळीचा प्रचार, प्रसार करण्यासाठी १८७७ ते १९३० या काळात सुमारे साठहून अधिक नियतकालिके निघाली. 'दीनबंधु' , 'दीनमित्र', 'शेतकऱ्याचा कैवारी', 'विजयी मराठा', 'जागृति', 'राष्ट्रवीर', 'हंटर', 'प्रबोधन' , 'नवयुग', 'ब्राह्मणेतर', 'कैवारी', 'भगवा झेंडा' इत्यादी नियतकालिकांनी सत्यशोधकांचा लढा वैचारिक पातळीवर लढविला. तत्कालीन पांढरपेशांच्या नियतकालिकांपेक्षा सत्यशोधक चळवळीच्या नियतकालिकांची उद्दिष्टे, त्यांमधील लेखन, वाङ्मय व बातमीपत्रे पूर्णतः भिन्न होती. या नियतकालिकांमुळे बहुजन समाजाच्या पत्रकारितेची एक अत्यंत सकस व लोकनिष्ठ परंपरा मराठीत पहिल्यांदाच निर्माण झाली.'

या परंपरेची सुरुवात महात्मा फुलेंच्या हयातीतच झाली. त्यांचे सहकारी कृष्णराव भालेकर यांनी १ जानेवारी १८७७ ला 'दीनबंधु' हे सत्यशोधकी विचारांचं पहिलं नियतकालिक सुरू केलं. काही वर्षांचा खंड वगळता ते १९३३ पर्यंत सुरू राहिलं. १९०८ ते १९३३ या काळात तानुबाई बिर्जे या मराठा समाजातील विदुषींनी त्याचं संपादकपद भूषवलं. खुद्द जोतीरावांनी 'सत्सार' नावाच्या अनियतकालिकाचे दोन अंक प्रसिद्ध केले. त्यानंतर भालेकरांचे भाचे गणपतराव पाटील यांच्या 'दीनमित्र'ने ही लढाई पुढे नेली. पण गणपतराव यांचं अवघ्या सत्ताविसाव्या वर्षी निधन झालं. कृष्णराव भालेकरांनी आपला मुलगा गणपतरावांच्या पत्नीला दत्तक दिला. तेच दीनमित्रकार मुकुंदराव पाटील होत. भालेकरांनी गणपतरावांच्या मृत्यूमुळे बंद पडलेला 'दीनमित्र' सुरू राहावा म्हणून १९१०ला अहमदनगर जिल्ह्यातल्या सोमठाणे इथे छापखाना थाटला. पण त्या धावपळीतच त्यांचं निधन झालं. तेव्हा त्यांनी तरुण मुकुंदरावांकडून वचन घेतलं, की किमान बारा वर्षं तरी हे नियतकालिक सुरू ठेवशील. त्यानंतर अनेक संकटांना तोंड देत अत्यंत ध्येयनिष्ठेने त्यांनी १९६८ पर्यंत सलग ५७ वर्षं 'दीनमित्र' चालवलं. ज्या गावात एसटीही जात नव्हती त्या तरवडी या गावातून सर्वस्व पणाला लावून 'दीनमित्र' चालवताना विचारांवरची निष्ठा अढळ ठेवली. मृत्यूशयेवर वृत्तपत्र सुरू ठेवण्याचं वचन घेणाऱ्या आणि ते वचन पूर्ण करण्यासाठी एकहाती संघर्ष करणाऱ्या या बापलेकांचं मराठी पत्रकारितेतलं महत्त्व सर्वोच्च मानावं लागेल.

'दीनबंधु', 'सत्सार', 'दीनमित्र' पाठोपाठ आलेल्या सत्यशोधक चळवळीतल्या नियतकालिकांचा आढावा अरुण शिंदे यांच्या ग्रंथात आहे. त्यातली ऑक्टोबर १९२१ पर्यंत प्रकाशित झालेली नियतकालिकं अशी - गुलाबसिंह कौशल यांचं 'राघव भूषण' (स्थापना वर्ष १८८८), कृष्णराव भालेकरांचं 'अंबालहरी' (१८८९), दामोदर सावळाराम यंदे आणि संतुजी आवटे यांचं 'शेतकऱ्याचा कैवारी' (१८९२), भास्करराव जाधव यांचं 'मराठा दीनबंधु' (१९०२), बळवंत पिसाळ यांचं 'विश्वबंधु' (१९११), कृष्णाजी चौधरी यांचं 'सत्योदय' (१९१५), वा. रा. कोठारी यांचं 'जागरूक' (१९१७), भगवंतराव पाळेकर यांचं 'जागृति' (१९१७), अण्णासाहेब लठ्ठे यांचं 'डेक्कन रयत' (१९१६), नारायण विभुते यांचं 'सत्यप्रकाश' (१९१९), श्रीपतराव शिंदे यांचं 'विजयी मराठा' (१९२५), बाबूराव कैवारी

यांचं गरिबांचा 'कैवारी' (१९२०), दत्तोजीराव कुरणे यांचं 'भगवा झेंडा' (१९२०), सखाराम सावंत आणि दिनकरराव जवळकर यांचं 'तरुण मराठा' (१९२०), शामराव भोसले आणि सहकाऱ्यांचं 'राष्ट्रवीर' (मे १९२१). याचा अर्थ प्रबोधनची सुरवात होईपर्यंत सत्यशोधकी नियतकालिकांचा प्रवाह महाराष्ट्राच्या गावागावांत प्रभाव टाकू लागला होता. प्रामुख्याने छत्रपती शाहू महाराज आणि महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या राजाश्रयामुळे या नियतकालिकांची संख्या सतत वाढत होती.

महात्मा फुलेंच्या शिकवणुकीला अनुसरून ही नियतकालिकं समता, बंधुता आणि बुद्धिप्रामाण्य या तत्त्वांचा प्रसार करत होती. शेतकऱ्यांना सावकारांच्या, धर्माला पुरोहितशाहीच्या, देवाला पुजाऱ्यांच्या आणि समाजाला अंधश्रद्धेच्या जोखडातून सोडवण्यासाठी त्यांचा लढा होता. अस्पृश्यता आणि जातिभेदाचं उच्चाटन, धर्मचिकित्सा, इतिहासाचं पुनर्लेखन, स्त्रीपुरुष समानता असे अनेक महत्त्वाचे विचार ती मांडत होती. वैचारिक दृष्टीनं पाहता प्रबोधनकार याच प्रवाहातले होते; पण तरीही त्यांनी सत्यशोधकी विचारांपेक्षा वेगळी मतंही 'प्रबोधन'मधे मांडली. त्याचा संदर्भ घेऊन अरुण शिंदे सत्यशोधकी नियतकालिकांच्या प्रवाहामधलं 'प्रबोधन'चं स्थान निश्चित करताना सांगतात, 'हाडाचा पत्रकार असणाऱ्या के. सी. ठाकरे यांनी प्रबोधनमधून सत्यशोधक चळवळीस पूरक भूमिका घेतली. सत्यशोधक समाजाच्या विचारानुरूप लेखन केले. सत्यशोधक-ब्राह्मणेतर चळवळीतील दोषांवर कडक टीका करून चळवळ निकोप होण्यासाठी प्रयत्न केले. के. सी. ठाकरे व 'प्रबोधन' पूर्णतः सत्यशोधकी मतांचे नसले तरी त्यांची भूमिका व कार्य सत्यशोधक चळवळीला प्रेरक, प्रोत्साहक व दिशादर्शक ठरले, हे निर्विवाद!'

प्रबोधनकारांवरील अभ्यासाचे स्रोत

प्रबोधनकारांचं कर्तृत्व आणि विचार अभ्यासकांच्या दृष्टीने कायम दुर्लक्षित राहिले, अशी खंत नेहमी व्यक्त केली जाते. 'राजर्षि शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे' या ग्रंथात डॉ. जयसिंगराव पवार लिहितात, 'राजर्षि शाहू छत्रपतींवर आता उदंड साहित्य प्रकाशित होत आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांचीही मराठीत, इंग्रजीत अनेक चरित्रे प्रकाशित होत आहेत. त्या मानाने प्रबोधनकारांचे चरित्र मात्र उपेक्षित राहिले आहे. सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेतर चळवळ, वृत्तपत्रीय चळवळ अशा अनेक चळवळी गाजविणारे आणि समाजप्रबोधन, काव्यशास्त्रविनोद, इतिहाससंशोधन, ललितकला इत्यादी क्षेत्रांत लीलयेने संचार करणारे प्रबोधनकार महाराष्ट्रात अजूनही उपेक्षित का राहावेत, हा खरोखरच समाजशास्त्रीय संशोधनाचा विषय आहे.'

एका विचारधारेच्या चाकोरीत किंवा चौकटीत अडकणं प्रबोधनकारांना मान्य नव्हतं. त्यामुळं आजही कोणत्याही एका विचारधारेचे किंवा वादाचे चष्मे घालून त्यांच्या चरित्राकडे बघता येत नाही. ते एकाच वेळी बहुजनवादी असतात आणि त्याच वेळी हिंदुत्ववादीही असतात. प्रबोधनकार म्हणून आवडणाऱ्यांना त्यांचं ठाकरे असणं डाचत होतं आणि ठाकरे म्हणून प्रेमात असणाऱ्यांना त्यांच्या प्रबोधनकार असण्याचा विटाळ होता. त्यामुळं त्यांच्या स्वतंत्र विचारमार्गाचा अनुयायीवर्ग निर्माण झाला नाही. परिणामी महाराष्ट्राच्या प्रबोधनपर्वातल्या अभिजनी विचारवंतांप्रमाणे त्यांच्यावर अभ्यास झालेला दिसत नाही; पण सत्यशोधक परंपरेतले कृष्णराव भालेकरांपासून रा. ना. चव्हाणांपर्यंतचे अनेक विद्वान विचारवंत मोठं कर्तृत्व करूनही अभ्यासकांकडून पूर्णपणे दुर्लक्षित राहिले. तितकंही

दुर्लक्ष प्रबोधनकारांच्या बाबतीत झालं नाही. प्रबोधनकारांचे चिरंजीव शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यामुळे पुढच्या पिढ्यांपर्यंत त्यांचं नाव तरी पोहचत राहील. त्यातून त्यांच्यावर थोडाफार हा होईना पण अभ्यास होत राहिला. प्रबोधनकारांच्या विचारांचे महत्त्वाचे अभ्यासक ज्ञानेश महाराव याविषयी लिहितात, 'शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे वडील, उद्धव व राज ठाकरे यांचे आजोबा, आदित्य ठाकरेंचे पणजोबा म्हणून त्यांचं नाव घेतलं जातं. ही ओळख खरीच आहे; पण पुरेशी नाही. प्रबोधनकारांच्या तडफेनेच सत्यशोधक पत्रकार म्हणून मुकुंदराव पाटील, खंडेराव बागल, श्रीपतराव शिंदे, दिनकरराव जवळकर, भगवंतराव पाळेकर, शामराव देसाई यांनी पत्रकारिता केली. पण त्यांच्या कार्याची नाही चिरा, नाही पणती अशी स्थिती आहे.'

प्रबोधनकारांच्या अभ्यासासाठी त्यांनी लिहिलेलं साहित्य हा सर्वांत महत्त्वाचा संदर्भ आहे. त्यातही त्यांचं 'माझी जीवनगाथा' हे आत्मचरित्र त्यांच्या आयुष्यातल्या साधारण १९४० पर्यंतच्या म्हणजे वाडिया मुविटोन कंपनीत नोकरीला लागेपर्यंतच्या घटना अगदी सविस्तर मांडतं. त्यात कौटुंबिक प्रसंगांची वर्णनं नाहीत, तर आठवणी सांगण्याच्या निमित्ताने महाराष्ट्राचा सामाजिक इतिहासच आहे. 'प्रबोधन'च्या प्रवासातल्या घडामोडींचं तपशीलवार वर्णन त्यात असल्याने 'प्रबोधन'च्या अभ्यासकांसाठी ते फारच महत्त्वाचं आहे. त्याशिवाय त्यांच्या 'शनिमहात्म्य' या पुस्तकात 'प्रबोधन'च्या प्रकाशन काळातल्याच घटनांचा इतिहास रंजकपणे नोंदवलेला आहे. शिवाय 'जुन्या आठवणी' या पुस्तकातही त्यांच्या आयुष्याचे काही कवडसे सापडतात.

प्रबोधनकार ठाकरे यांचं साहित्य दीर्घकाळ उपलब्ध नव्हतं. हे लक्षात घेऊन 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा'ने १९९७ पासून २००७ पर्यंत प्रबोधनकार ठाकरे समग्र वाङ्मयाचे पाच खंड प्रकाशित केले. त्यात त्यांची महत्त्वाची पुस्तकं वाचकांना उपलब्ध झाली.

पहिला खंड - यात 'माझी जीवनगाथा', 'जुन्या आठवणी' ही आत्मचरित्रपर दोन पुस्तकं आहेत.

दुसरा खंड - 'प्रतापसिंह छत्रपति आणि रंगो बापूजी' हे महत्त्वाचं चरित्र या खंडात आहे.

तिसरा खंड - 'संगीत सीताशुद्धी', 'टाकलेलं पोर', 'संगीत काळाचा काळ', 'खरा ब्राह्मण', 'संगीत विधिनिषेध ही प्रबोधनकारांची पाच नाटकं यात आहेत.

चौथा खंड - या खंडाचं शीर्षक 'हिंदुत्व' असं आहे. 'हिंदुधर्माचे दिव्य आणि संस्कृतीचा संग्राम', 'हिंदुजनांचा ऱ्हास आणि अधःपात', 'देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे' ही तीन पुस्तकं या खंडात आहेत.

पाचवा खंड - 'ग्रामण्याचा साद्यंत इतिहास', 'भिक्षुकशाहीचे बंड', 'कोदण्डाचा टणत्कार अथवा भारत इतिहास संशोधक मंडळास उलट सलामी' हे तीन महत्त्वाचे संशोधनात्मक ग्रंथ या खंडात आहेत.

या खंडांची नवी आवृत्ती 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा'ने उपलब्ध करून दिली आहे. 'प्रबोधन प्रकाशन'ने २०१९च्या प्रबोधनकार जयंतीच्या निमित्ताने सात पुस्तकांत प्रबोधनकारांचे अप्रकाशित ग्रंथ उपलब्ध करून दिलेत. त्या पुस्तकांमधे असलेली पुस्तकं - 'शनिमहात्म्य', 'वक्तृत्व कला आणि साधना', 'शेतकऱ्यांचे स्वराज्य', 'बजरंगी सोटा', 'टेम्प्ट्रेस', 'महामायेचे थैमान', 'श्रीसंत गाडगेबाबा', 'स्वाध्याय संदेश', 'कुमारिकांचे शाप', 'रायगड : यात्रा, दर्शन, माहिती', 'पावनखिंडीचा

पोवाडा', 'आई', 'सातारचे दैव का दैवाचा सतारा', 'पोटाचे बंड - माणसातले सुरवंट', 'वैदिक विवाह विधी'. याशिवाय 'दगलबाज शिवाजी' ही पुस्तिका 'नवता प्रकाशन' आणि 'सनय प्रकाशन' यांनी पुनर्प्रकाशित केली होती. प्रबोधनकारांचे संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या काळातील लेखांचा संग्रह प्रबोधन प्रकाशननेच 'घाव घाली निशाणी' या नावाने प्रकाशित केला आहे. शिवाय अजय कुदळे यांनी दैनिक मराठामधले प्रबोधनकारांचे लेख 'संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील प्रबोधन' या नावाने एकत्र केले आहेत. तसेच त्यांनी 'मार्मिक'मधे लिहिलेल्या लेखांचा संग्रह 'ऊठ मऱ्हाठ्या ऊठ' हा पुनर्प्रकाशित होऊनदेखील आता उपलब्ध नाही.

विद्यापीठीय संशोधनाच्या पातळीवर प्रबोधनकार ठाकरे यांच्यावर पीएचडीचे पाच प्रबंध झालेले आढळतात.

१. **डॉ. गोपाळ डिवरे** यांनी 'केशव सीताराम ठाकरे यांची साहित्यिक कामगिरी' या विषयावर अमरावती विद्यापीठातून १९९०ला डॉक्टरेट मिळवली.

२. परभणीच्या **डॉ. विठ्ठल घुले** यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून' 'प्रबोधनकार ठाकरे आणि त्यांचे सत्यशोधक चळवळीला योगदान' या विषयावर २००२ ला पीएचडी मिळवली. डॉ. घुले यांनी संपादित केलेले 'प्रबोधनकारांचे शनिमहात्म्य' हे पुस्तक २०१५ला प्रकाशित झालं आहे.

३. आजरा येथील **डॉ. नवनाथ शिंदे** यांनी 'शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर' इथून २००६ ला प्रबोधनकार ठाकरे यांचे 'महाराष्ट्रातील सामाजिक विचारांचे योगदान : एक समाजशास्त्रीय अभ्यास' या विषयावर डॉक्टरेट मिळवली. त्याआधीच त्यांनी 'सत्यशोधक विचाराची तळपती तलवार प्रबोधनकार ठाकरे' हे पुस्तक लिहिलेले होते. ते आता 'प्रबोधनकार ठाकरे : कार्य आणि कर्तृत्व' या नावाने उपलब्ध आहे. शिवाय त्यांचा पीएचडीचा प्रबंध 'प्रबोधनकार ठाकरे : सामाजिक व सांस्कृतिक क्रांतीचा ज्वालामुखी' या नावाने प्रकाशित झालाय. तसंच त्यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्यावर लिहिलेला एक एकपात्री प्रयोग पुस्तकरूपाने प्रकाशित झाला आहे.

४. पत्रकार **डॉ. अनंत गुरव** यांनी 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा'तून 'केशव सीताराम ठाकरे यांच्या प्रबोधन या नियतकालिकाचा अभ्यास' या विषयावर २०१५ला पीएचडी केली आहे. हे प्रबोधन नियतकालिकावर झालेलं पहिलंच संशोधन आहे.

५. २०१७ ला **डॉ. मनीष देशमुख** यांनी 'संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठा'तून 'प्रबोधनकार उर्फ केशव सीताराम ठाकरे यांच्या कार्याचे ऐतिहासिक परीक्षण' या विषयावर डॉक्टरेट मिळवली आहे.

१९९५ च्या महाराष्ट्रातील सत्तांतरानंतर प्रबोधनकारांवरच्या अभ्यासाला अधिक चालना मिळालेली दिसते. समग्र साहित्याचे खंडही त्याच काळात प्रकाशित झाले. तर पुरोगामी पत्रकार आणि अभ्यासकांनी प्रबोधनकार उजेडात आणण्याचा प्रयत्न केला. त्यात ज्ञानेश महाराव संपादित 'प्रबोधनकारांचे ज्वलंत हिंदुत्व' हे पुस्तक विशेष गाजलं. त्याचं प्रकाशन बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते झालं. या पुस्तकात प्रबोधनकारांची दोन भाषणं आणि तीन पुस्तकं यातले उतारे संदर्भासह दिलेले आहेत. महाराव यांच्या 'ठाकरे फॅमिली' या पुस्तकातही प्रबोधनकारांविषयी बरीच माहिती आहे. प्रख्यात एकपात्री कलाकार रंगनाथ कुलकर्णी यांनी प्रबोधनकारांच्या साहित्यातले छोटे वेचे शोधून त्यांचा संग्रह 'प्रबोधनकार

ठाकरे यांच्या वैचारिक ठिणग्या' या नावाने संपादित केला. याशिवाय 'हिंदू ब्राह्मणी संस्कृतीचा मर्मभेदी दंभस्फोट' हे ज्येष्ठ पत्रकार मधू शेट्ये यांचं छोटेखानी पुस्तकही प्रबोधनकारांच्या विचारांची नव्याने ओळख करून देणारं आहे. एक साधे पोस्टमन असणाऱ्या धर्मपाल कांबळे यांनी 'प्रबोधनकार-व्यक्तित्व, कार्य, साहित्य' हे जवळपास ६०० पानांचं पुस्तक प्रबोधनकारांच्या बहुआयामी कर्तृत्वाचा तपशीलवार आढावा मांडतं. चांद शेख संपादित 'गस्त'चा २०१३चा दिवाळी अंक प्रबोधनकार ठाकरे विशेषांक होता. त्यात प्रबोधनकारांवर वेगवेगळ्या अभ्यासकांचे १५ लेख आहेत.

याशिवाय महावीर मुळे यांचं 'सत्यशोधक प्रबोधनकार आणि कर्मवीर' तसंच डॉ. जयसिंहराव पवार यांचं 'राजर्षि शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे' ही पुस्तकं प्रबोधनकारांच्या आयुष्यातला एक वेगळा तरीही महत्त्वाचा पैलू आपल्या समोर ठेवतात. 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' - रा. के. लेले, 'सत्यशोधकीय नियतकालिके' - अरुण शिंदे, 'सत्यशोधक साहित्याचा इतिहास' - श्रीराम गुंदेकर, 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र' - य. दि. फडके, 'लोकमान्य ते महात्मा' - सदानंद मोरे या ग्रंथांमधे प्रबोधनकारांविषयी महत्त्वाची माहिती आणि मतं वाचता येतात.

प्रबोधनकारांचे चिरंजीव बाळासाहेब ठाकरे यांनी स्वतंत्रपणे प्रबोधनकारांविषयी लिहिलेलं नसलं तरी त्यांचं प्रबोधनकारांवरचं एक भाषण 'विचारांचं सोनं' या पुस्तकात उपलब्ध आहे. तसंच त्यांच्या 'फटकारे' या व्यंगचित्रसंग्रहाच्या सुरुवातीलाच 'मी व्यंगचित्रकार कसा झालो?' हे मनोगत छापलं आहे. त्यात प्रबोधनकारांविषयी वाचता येतं. ते अधिक तपशिलात प्रबोधनकारांचे दुसरे चिरंजीव श्रीकांत ठाकरे यांच्या 'जसं घडलं तसं' या आत्मचरित्रात आहे. तसंच प्रबोधनकारांसोबत दीर्घकाळ राहिलेले त्यांचे शिष्य पंढरीनाथ सावंत यांच्या आत्मचरित्रात 'मी पंढरी गिरणगावचा'मध्ये प्रबोधनकारांवर दोन हृद्य प्रकरणं आहेत. याशिवाय आचार्य अत्रे, धनंजय कीर यांच्या आत्मचरित्रात प्रबोधनकारांविषयी काही प्रसंग वाचता येतात. तसंच भाई माधवराव बागल, आचार्य अत्रे, वा. सी. बेंद्रे, श्री. शं नवरे, विद्याधर गोखले, य. दि. फडके, वि. वा. शिरवाडकर, नामदेव ढसाळ यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्याविषयी लेख लिहिले आहेत. त्यात काही महत्त्वाचे संदर्भ सापडतात.

प्रबोधनकार असे घडले

या सगळ्या संदर्भांमधून प्रबोधनकारांचं सापडणारं आयुष्य फारच अद्भुत आहे. ते 'प्रबोधन'मधले लेख वाचण्याआधी किंवा अभ्यासण्याआधी समजून घेणं आवश्यक ठरतं. ते इथं सविस्तर मांडता येणं शक्य नसलं तरी त्यांच्या विचारांची तसंच एक पत्रकार म्हणून जडणघडण कशी झाली, त्याचा गोषवारा दिलेला आहे.

प्रबोधनकारांची जन्मतारीख १७ सप्टेंबर १८८५. जन्मगाव पनवेल. तेव्हा हे काही मोठं शहर नव्हतं; पण खेडेगावही नव्हतं. रस्ते आणि समुद्री वाहतुकीचं केंद्र असल्यामुळे ते कोकणाचं प्रवेशद्वार होतं. त्यामुळे साधारण पेशवाईपासून तरी हे व्यापाराचं केंद्र बनलं होतं. विशेषतः तांदूळ, भाज्या, बैलगाडीची चाकं यासाठी ते प्रसिद्ध होतं. संत तुकारामही इथे मिरच्या विकायला आले होते, अशी एक कथा आहे. १८५२ सालापासून शहराला नगरपालिका आहे. ती महाराष्ट्रातल्या सर्वांत जुन्या नगरपालिकांपैकी एक आहे. तेव्हा पनवेलहून मुंबईला आतासारखं रस्त्याने जाता येत नसलं तरी पनवेल शहराजवळच्याच उलवे जेट्टीतून मुंबईतल्या भाऊच्या धक्क्याला समुद्र मार्गाने जाणं सोयीचं होतं.

प्रबोधनकारांचं पनवेल हे ना धड शहर ना धड गाव. प्रबोधनकारांचा बालपणीचा काळ ना धड एकोणिसाव्या शतकाच्या मानसिकतेचा ना धड विसाव्या शतकातला, ज्या समाजात जन्मले तो चांद्रसेनीय कायस्थ प्रभू हा पांढरपेशा असूनही ब्राह्मण किंवा ब्राह्मणांमधली पोटजात नसलेला. अशा सर्वच दृष्टीने स्थित्यंतराच्या, संक्रमणाच्या आणि सांध्यावरच्या वातारवणात ते लहानाचे मोठे झाले. आजोबा रामचंद्र ऊर्फ भिकोबा हे स्मॉल कॉज कोर्टात नोकरी करण्यासाठी पनवेलला आले आणि शेवटपर्यंत इथेच राहिले. ते देवीभक्त साधुपुरुष म्हणून प्रसिद्ध होते. पण सिद्धींच्या मागे लागून आधुनिक शाक्तांकडे सर्वसामान्यपणे आढळणारी उग्रता त्यांच्याकडे नव्हती. उलट बावीस वर्षं केलेल्या पंढरीच्या वारीमुळे निःस्पृह लोकसेवेचं व्रत त्यांनी पाळलं. त्या काळात काही लोकांनी पैसे कमावण्यासाठी प्लेगदेवी बनवली होती. ती रेड्यावर बसून गावोगाव फिरून पैसे गोळा करत असे. भिकोबा म्हणजे तात्या अंगण झाडताना ती समोर आली. त्यांनी तिचा खोटेपणा उघड करून पळवून लावलं. प्रबोधनकारांवर अंधश्रद्धेवर प्रहार करण्याचे संस्कार तेव्हाच होत होते. तात्या काशीला गेलेले असताना एका पंड्याने सांगितलं की मागतो तेवढी दक्षिणा देत नसाल तर मंत्र म्हणणार नाही. त्यामुळे तुमचे पूर्वज नरकात जातील. त्यावर तात्यांनी खड्ड्यात गेलं ते श्राद्ध म्हणत त्याला फटकारलं, 'आमच्या पूर्वजांच्या स्वर्ग नरकाच्या किल्ल्या तुझ्या हातात आहेत का?' मग पंड्याने त्यांच्यासमोर लोटांगणं घातली. हा प्रहार अंधश्रद्धेबरोबरच भिक्षुकशाहीवरही होता.

आजोबांपेक्षाही आजीने त्यांच्यावर जास्त प्रभाव टाकला. आजीला ते बय म्हणायचे. तिनं जात पात धर्म याच्या पलीकडे जाऊन साठ वर्षं सुईणीचं काम केलं. मी जन्मभर जातपात आणि हुंड्याचा विरोध केला, त्याची प्रेरणा ही बयच, असं प्रबोधनकार म्हणतात. शाळेतून परतताना एका महाराची सावली छोट्या केशवच्या अंगावर पडली. 'आता ठाकरे विटाळला', असं सोबतची ब्राह्मण मुलं ओरडू लागली. ते बयने ऐकलं. त्यांच्यातल्याच अभ्यंकर नावाच्या मुलाला पुढे ओढलं. त्याची सावली केशववर पाडली. 'महाराच्या सावलीने महार होतो, तर ब्राह्मणाच्या सावलीने आमचा दादा ब्राह्मण झाला', हे तिने त्या मुलांना सांगितलेलं तत्त्वज्ञान 'श्यामची आई'च्या आधी पंधरा वर्षं आणि दोन पावलं पुढं होतं. शिवाय तिच्या आग्रहामुळेच बलिप्रतिपदेला दिवाळी मागायला येणाऱ्या अस्पृश्य बायकांना ठाकरेंच्या घरात बोलावून त्यांच्या हातून मुलांना ओवाळलं जायचं. पुढं गावात एक महार जातीचे सुभेदार राहायला आले. इंग्रजी पाचवीत असलेले प्रबोधनकार त्यांच्या घरी जाऊन चहा पित. त्यामुळं गावात वादळ उठलं. तक्रार घेऊन येणाऱ्यांना बयने सुनावलं, 'माणसाच्या हातचा चहा पिण्यात धर्म कसा बुडतो? चहाच्या कपात बुडण्याइतका आपला धर्म म्हणजे काय टोलेगंड्याची कवडी आहे वाटतं?' धर्माची ही व्यापक संकल्पना प्रबोधनकारांना पुढं मार्गदर्शक ठरली. उतारवयात दादरला वस्तीला असताना बयचं निधन झालं. तेव्हा सगळ्या जातींचे हिंदू तसंच मुसलमान आणि ख्रिश्चनही खांदा द्यायला आले होते.

वडील सीताराम ऊर्फ बाळा असेच सगळ्यांच्या मदतीला धावून जाणारे. त्यांची नोकरी गेली तरी हरहुन्नरीपणा जपत छोटे उद्योगधंदे केले. त्याचा प्रभाव प्रबोधनकारांवर मोठा होता. त्यामुळे नऊ ते पाच मध्यमवर्गीय पांढरपेशा परोपजीवीपणाला प्रबोधनकारांनी आयुष्यभर चाट दिली. अनेक उद्योग केले. गावात आग लागली की सगळ्यात आधी सीतारामपंतच सर्वस्व विसरून धावून जायचे. गावात

प्लेग आला. तेव्हाही असेच धावून गेले; पण प्लेगने त्यांनाच गाठलं. वडील वारले तेव्हा प्रबोधनकार अवघे सोळा सतरा वर्षांचे होते; पण वडिलांपेक्षाही आई जानकीबाईंचा प्रभाव मोलाचा होता. तिने अभ्यासाचे आणि स्वाभिमानाचे संस्कार दिले. प्रबोधनकारांना एकदा लॉटरी लागली. तेव्हा वडिलांना १५ रुपये पगार असताना लॉटरीतून ७५ रुपये मिळणार होते; पण आईने ती रक्कम नाकारली. तिचा आग्रह होता की आपल्याला कष्टाचीच भाकरी हवी. पुढं प्रबोधनकारांनी राजकीय कार्यकर्ते बनून देणग्या गोळा करणाऱ्या फंडगुंडांना नेहमीच ठोकलं. हा संस्कार आजही हरामाचे हसे मागणाऱ्यांविरुद्ध आवाज उठवण्यासाठी उपयोगी आहे.

ठाकरे सीकेपी असल्यामुळे लहानपणी एखाद्या ब्राह्मण शाळासोबत्याच्या घरी पाणी मागितलं की तो पाणी तपेलीतून आणायचा, ओटीच्या खाली उभा ठेवून ओंजळीत ओतायचा. मित्राची आई ती तपेलीही न धुता आत घेऊ द्यायची नाही. सुरुवातीला प्रबोधनकारांना हे कळायचं नाही. कळायला लागलं तेव्हा त्यांनी सोवळेपणाची टिंगल उडवायला सुरुवात केली. ती जन्मभर उडवली. वडिलांच्या कचेरीतल्या मंडळींनी एका ब्राह्मण बेलिफाच्या घरी धुंधुरमासानिमित्त सकाळच्या जेवणाचा कार्यक्रम होता. वडिलांसोबत केशवही गेला होता. तेव्हा ब्राह्मणांची एक पंगत. दुसरी या दोन ठाकरेंची. तर भालेराव आडनावाचे आणखी एक कारकून तिसरीकडेच बसले होते. वाढणाऱ्या बायका वरून टाकत. जेवण झाल्यावर वडील दोघांचं खरकटं स्वतःच स्वच्छ करू लागले, तेव्हा प्रबोधनकार चिडले. त्यांचा सवाल होता, 'हे ब्राह्मण आपल्याशी निराळेपणाने वागतात तर आपण त्यांना आपलेपणाने का वागवायचे?' तेव्हा त्यांचं वय होतं अवघं आठ वर्षं.

प्रबोधनकारांची पहिली चळवळ इंग्रजी शाळेत असतानाच सुरू झाली. गाडगीळ नावाचे उत्तम शिकवणारे अपंग शिक्षक होते. त्यांना हंगामी म्हणून काढून टाकण्यात आलं. त्यासाठी इंग्रजी पाचवीत शिकणाऱ्या केशवने विद्यार्थ्यांच्या सहीचा अर्ज म्युन्सिपाल्टीला केला आणि त्यांची नोकरी वाचवली. अगदी लहान असतानाच जरठ बाला विवाहाच्या पंगतीत जेवताना ते मुद्दामून 'म्हातारा इतुका न अवघे पाऊणशे वयमान' हे पद गात असत. दहा-बारा वर्षांच्या मंजू या बालमैत्रिणीचं लग्न पासष्ट वर्षांच्या म्हाताऱ्याशी लावलं म्हणून त्यांनी वयाच्या दहाव्या वर्षी लग्नाचा मांडव पेटवून दिला होता.

एक पत्रकार म्हणून जडणघडण

प्रबोधनकारांच्या आईने प्रबोधनकारांना वाचनाची आणि त्यातही वर्तमानपत्र वाचनाची सवय लावली. त्या शेजारपाजारहून वर्तमानपत्रं गोळा करून आणत. त्यात 'दैनिक मुंबई वैभव', 'इंदूप्रकाश', 'करमणूक', 'केरळ कोकीळ', 'जगत्समाचार' अशी नियतकालिकं असायची. ती सहा वर्षांच्या केशवला मोठमोठ्याने वाचावी लागत. वाचताना आई कठीण शब्दांचे अर्थ सांगायची. शब्दोच्चार, आरोह अवरोह यावर तिचं लक्ष असायचं. उच्चार चुकला की डावा गाल लाल व्हायचा. प्रसिद्ध कादंबरीकार ह. ना. आपटे यांचं 'करमणूक' हे साप्ताहिक त्या काळात लोकप्रिय होतं. काशीबाई कानिटकर यांना लिहिलेल्या पत्रात हरिभाऊंनी 'करमणूक'चं वर्णन 'आबालवृद्ध घेतील असा पेपर' असं केलंय. त्यातच पुढं कंसात लिहिलंय ते महत्त्वाचं आहे, 'केसरी कितीही उत्कृष्ट असला तरी कुणबी, माळी घेतील असा नाही.' अशा साप्ताहिकात प्रबोधनकारांचे पहिले लेख छापून आले.

आजीबरोबर मुंबईत फिरताना फूटपाथवर त्यांना 'पॉकेट एन्सायक्लोपीडिया' नावाचं छान पुस्तक

सापडलं. त्यात खूप वेगवेगळ्या विषयांवरची मनोरंजक माहिती होती. त्यातल्या छत्र्यांची उत्पत्ती आणि वर्तमानपत्रांची उत्पत्ती अशा दोन प्रकरणांचा त्यांनी इंग्रजीतून मराठीत अनुवाद केला आणि 'करमणूक' साप्ताहिकाला पाठवून दिला. तो छापून आला आणि आपटेंनी त्यांना कौतुक करणारं पत्रही लिहिलं. इंग्रजी इयत्तांमधे शिकू लागल्यावर हे घडलंय. म्हणजे प्रबोधनकार वयाने मोठे नव्हतेच. त्या वयात त्यांचे लेख 'करमणूक'मध्ये प्रकाशित होत राहिले. प्रबोधनकारांनी या खटाटोपाचं वर्णन 'अखेर लागलीच हाताला छापशाई' असं केलंय. पण 'करमणूक'मध्ये लेख छापून येण्यावर त्यांचं समाधान झालेलं नव्हतं. त्या वयातही ते स्वतंत्र साप्ताहिक काढण्याचा विचार करत होते. ते छापायचं कसं याची कल्पना त्यांच्या हुनरबाज डोक्याला मामलेदार कचेरीत सापडली, 'मामलतदार कचेरीत नोटिसा, हुकूम, फर्माने छापण्याचे काम एक शिपाई करीत असे. कारकून जांभळ्या शाईने कागदावर हुकूम लिहायचा. ओल्या टीपकागदावर शिपाई तो कागद अलगद ठेवून लोखंडी दाबयंत्रात दाबायचा. लिहिलेला मजकूर उलटा टीपकागदावर उठायचा. मग त्यावर कोरे कागद भराभर ठेवून दाबयंत्रात दाबून तो भराभर पन्नास-पंचाहत्तर प्रती अस्सल बरहुकूम छापायचा.' हेच तंत्र वापरून प्रबोधनकारांनी एक घरगुती दाबयंत्र तयार केलं. स्वतः मजकूर लिहिला. त्याला चित्र आणि नक्षीने सजवलं. आणि 'साप्ताहिक विद्यार्थी' तयार झाला. त्याच्या पन्नास प्रती काढून शाळेत विद्यार्थी आणि शिक्षकांना वाटल्या. असे चार-सहा अंक काढले. पनवेलमध्ये पहिलं साप्ताहिक हे १९५०च्या सुमारास निघालं. तेही अल्पायुषी निघालं. १९६७ला 'किल्ले रायगड' हे दीर्घकाळ चाललेलं पहिलं साप्ताहिक पनवेलमधून सुरू झालं. हे लक्षात घेता एकोणिसाव्या शतकातच प्रबोधनकारांनी केलेल्या 'साप्ताहिक विद्यार्थी'च्या प्रयोगाचं मोल लक्षात येतं.

वडिलांची नोकरी सुटल्यावर प्रबोधनकार शिक्षणासाठी वडिलांच्या मामांकडे मध्य प्रदेशात देवासला राहिले. तिथल्या शाळेत परीक्षेसाठी आलेल्या शिक्षणाधिकारी आर. एच. गनियन साहेबाने त्यांना विचारलं की, 'तुला काय बनायचंय?' तेव्हा त्यांनी उत्तर दिलं होतं, 'एडिटर.' तेव्हा प्रबोधनकार १६ वर्षांचे असावेत, असा अंदाज बांधता येतो. त्या वयात त्यांचं संपादक बनणं नक्की झालं होतं. पुढं मुंबईत आल्यावर ते 'इंदुप्रकाश' या लोकप्रिय दैनिकात लिहीत होते. त्यांनी पहिली नीट नोकरी केली तीच तत्त्वविवेचक छापखान्यात असिस्टंट शास्त्री म्हणजे असिस्टंट प्रुफरीडर म्हणून. लक्ष्मण नारायण जोशी हे तेव्हाचे प्रसिद्ध कवी, लेखक, नाटककार या छापखान्यात हेडशास्त्री म्हणजे मुख्य प्रुफरिडर होते. त्यांनी प्रबोधनकारांना अल्पजीवी वर्तमानपत्रांसाठी नाव न देता लिहिण्याचं कौशल्य शिकवलं. ते काम त्यांनी पैशासाठी केलं; पण त्यातून त्यांना नियतकालिकं काढण्याची तांत्रिक अंगं समजत गेली.

आजोबांच्या मृत्यूमुळं प्रबोधनकारांना हे सोडून पनवेलला परतावं लागलं होतं. तिथं उपजीविकेसाठी त्यांना आधार मिळाला तो 'इंदुप्रकाश' छापखान्याचे दामोदरशेठ सावळाराम यंदे यांचा. साप्ताहिक 'इंदुप्रकाश'मधल्या लिखाणातून त्यांना थोडंफार उत्पन्न मिळालं. त्याच बरोबर ते ठाण्याच्या 'जगत्समाचार' या साप्ताहिकात तर अग्रलेखासह अंकातलं बहुतेक सगळं स्फुटलेखनही करत. त्यातून प्रबोधनकारांचा लेखनाचा रियाज होत होता, शिवाय बऱ्यापैकी कमाईही होत होती. पण त्यापेक्षीही मोठी कमाई होती ती म्हणजे 'केरळकोकीळ'कार कृष्णाजी नारायण आठल्ये यांचा सहवास. 'केरळकोकीळ' हे त्यांचं मासिक दीर्घकाळ लोकप्रिय होतं. आठल्ये फक्त संपादकच नव्हते, तर रसाळ

वक्ते, लोकप्रिय कवी आणि लेखक, पोर्ट्रेट चित्रकार, फोटोग्राफर अशी त्यांची बहुढंगी ओळख होती. या सगळ्याच गोष्टींचे हुन्नर त्यांनी प्रबोधनकारांना शिकवले. लोकहितवादींचं चरित्र, विवेकानंदांच्या साहित्याचा अनुवाद आणि ज्युलवर्नच्या 'टू द मून अँड बॅक' या दीर्घकथेचा अनुवाद करून विज्ञानकथा या साहित्यप्रकाराची मराठीला करून दिलेली ओळख, या तीन गोष्टी त्यांचं वेगळेपण दाखवून द्यायला पुरेशा आहेत. तितकंच प्रबोधनकार त्यांना गुरू का मानत, हे दाखवून द्यायलाही पुरेशा आहेत.

आठल्येंनी शिकवलेल्या कौशल्यांच्या जोरावर आपण आयुष्य यशस्वी करायचं, हे प्रबोधनकारांनी ठरवलं. ते त्यांनी तसं करूनही दाखवलं. आठल्ये यांनी दिलेला हा आत्मविश्वास ही गुरूने शिष्याला दिलेली सगळ्यात महत्त्वाची शिदोरी होती. 'केरळकोकीळ'चं जे वर्णन उपलब्ध आहे, त्यानुसार त्याचा 'प्रबोधन'च्या रचनेवरही प्रभाव झाल्याचा निष्कर्ष काढता येतो. विशेषतः अनुवादित साहित्य आणि विषयाचं वैविध्य या बाबतीत तरी. आठल्ये 'केरळकोकीळ'मध्ये 'कलमबहाद्दरांस शेलापागोटे' नावाचं पुस्तक परीक्षणांचं सदर चालवायचे. त्याच नावाचं आणि स्वरूपाचं सदर प्रबोधनकारांनीही 'प्रबोधन'मध्ये लिहिलं. फेब्रुवारी १९२७च्या 'प्रबोधन'च्या अंकात प्रबोधनकारांनी कृष्णाजी आठल्येंना श्रद्धांजली वाहिली. त्यात लिहिलंय, 'दादांची व आमची कांही विशिष्ट मते यावज्जन्म कधि जुळली नाहीत. अनेक वेळा दोघांत कडाक्याची चर्चा व भांडणेही होत. परंतु तेवढी लाट गेली की लगेच आमच्या परस्पर प्रेमादरांची गंगा पूर्ववत निर्मळ वाहू लागे... केवळ मते जुळत नाहीत किंवा दोन परस्परविरुद्ध दिशांनी विचारांचा प्रवाह वाहतो, एवढ्याच सबबीवर दक्षिणोत्तर तोंडे फिरविणाऱ्या आजकातल्या मताभिमानी बृहस्पतींना दादा आठल्ये आणि केशव ठाकरे या दोन ब्राह्मण ब्राह्मणेतर व्यक्तींतले प्रेमाचे रहस्य उलगडून दाखविणे फार कठीण काम आहे.'

याच काळात ते सांगलीकर नाटक मंडळीत कामाला लागले. तिथे त्यांचं काम तालीम मास्तरांना म्हणजे मुख्य दिग्दर्शकाला मदत करण्याचं होतं. तसंच कंपनीत आलेल्या नाटक आणि गीतांत आवश्यकतेनुसार बदल करून देण्याची जबाबदारीही होती. त्यांचं प्रसिद्ध झालेलं पहिलं पुस्तक एक नाटकच होतं, 'संगीत सीतास्वयंवर'. त्याच सुमारास त्यांनी 'ध्रुव' आणि 'मंगलतारा' ही दोन नाटकं लिहिली असल्याचं वा. सी. बेंद्रे यांनी नोंदवून ठेवलं आहे. वडिलांमुळे त्यांच्यावर नाट्यप्रेमाचे संस्कार झालेले होतेच. नाटक कंपनीत राहिल्याने त्यांच्यात नाटक मुरत गेलं. त्यातून ते एक उत्तम परफॉर्मर बनले. त्यांनी संपादकासह अनेक भूमिका आयुष्यात वठवल्या. त्या प्रत्येक ठिकाणी त्यांच्यातला परफॉर्मर जागा असायचा. क्षेत्र कुठलंही असो दणक्यात केलेलं नाट्यमय सादरीकरण हे त्यांचं सगळ्यात मोठं वैशिष्ट्य होतं. ते त्यांच्या साध्यात साध्या टिपणातही सापडतं आणि इतिहास संशोधनासारख्या रूक्ष मांडणीतही. त्यांच्या वक्तृत्वात तर ते होतंच पण नावीन्यपूर्ण आंदोलनांमधेही होतं.

सांगलीकर नाटक मंडळीत असतानाच्या पंढरपूर आणि विजापूर अशा दोन शहरांतल्या मुक्कामांचं वर्णन त्यांनी केलं आहे. विशेष म्हणजे त्या दोन्ही ठिकाणी अनोळखी असणारे त्यांचे चाहते वाचक त्यांना शोधत आल्याचे उल्लेख आहेत. म्हणजे त्यांच्या वेगवेगळ्या नियतकालिकांत लिखाणाचा एक चाहतावर्ग तयार झाला होता. ते एकाच नाटक कंपनीत राहिले नाहीत. सतत कंपन्या बदलत राहिले. या मधल्या काळात त्यांनी फेरीवाल्यांसारखे पैसे घेऊन ग्रामोफोनचे कार्यक्रम करण्याचा व्यवसायही

केला. त्यासाठी ते सहा ते सात महिने जळगावात होते. त्या काळात त्यांचा घरोबा 'प्रबोधचंद्रिका' साप्ताहिकाचे संपादक नारायण नरसिंह ऊर्फ नानासाहेब फडणीसांशी झाला. आजही १४० वर्षांपेक्षा जास्त काळ हे साप्ताहिक त्यांच्या पुढच्या पिढ्यांनी सुरू ठेवलं आहे. पण नानासाहेबांची ओळख 'काव्यरत्नावलीकार' हीच होती. कारण 'काव्यरत्नावली' मासिकाच्या ४८ वर्षांत ४५४ अंकांच्या १० हजार ४५ पानांमधे त्यांनी ६५० कवींच्या १ लाख ८३ हजार कविता प्रकाशित केल्या.

नानासाहेबांनी केलेली आणखी ऐतिहासिक गोष्ट म्हणजे त्यांनी प्रबोधनकारांमधला संपादक नेमका हेरला आणि त्यांना एक मासिक सुरू करायला लावलं. प्रबोधनकार म्हणतात तसं जळगाव ही त्यांच्या पत्रव्यवहाराची जन्मभूमी ठरली. तिथे त्यांनी 'सारथी' नावाचं मासिक सुरू केलं. प्रबोधनकार याचं श्रेय नानासाहेबांना देताना म्हणतात, 'माझ्या पत्रव्यवसायाचा श्रीगणेशा नानांनीच हात धरून काढविलेला आहे.' याचा अर्थ नानासाहेबांनी त्यांना अंक छापून तर दिलाच असेल. पण लेखन, संपादनाचे धडेही दिले असावेत. जळगावात असताना 'सारथी'चे चार-पाच अंक निघाले. त्यानंतर मुंबईत येऊन त्यांनी पुढे वर्षभर हे मासिक सुरू ठेवलं. प्रबोधनकारांच्या नोंदीनुसार हे सगळं १९०६-०७ मधे घडत होतं. याचा अर्थ प्रबोधनकार अवघ्या २१-२२व्या वर्षी संपादक बनले. सरकारच्या निर्बंधांमुळे 'सारथी' बंद करावं लागलं. त्यामुळे ते पुन्हा ग्रामोफोन आणि नाटकाच्या धंद्यात जात येत राहिले. त्याच काळात त्यांनी कोल्हापुरात काही महिने एक छापखानाही चालवला.

ही त्यांची धावपळ त्यांच्या लग्नानेच थांबवली. जानेवारी १९१० मधे त्यांचं लग्न अमरावतीतल्या अचलपूरमधील मंजुळा गुप्तेंशी झालं. संसारासाठी त्यांनी मुंबईत अनेक छोट्या-मोठ्या नोकऱ्या आणि धंदे केले. त्यात पहिल्या महायुद्धाच्या काळातल्या मंदीपुढे नाइलाज म्हणून सार्वजनिक बांधकाम खात्यातल्या इलेक्ट्रिक इंजिनिअरच्या ऑफिसात सरकारी नोकरी केली. ते करताना त्यांचे हरहुन्नरी व्यवसाय सुरूच होते. त्यात लिखाणाशी संबंधित कामं सांगायची तर 'कामगार समाचार' या साप्ताहिकात 'अगाध किती विधिकरणी' नावाची एक क्रमशः कथाही लिहिली. त्यांनी बरीच वर्षं मुंबईतल्या बातमीदारांसाठी भाषणाचं शब्दशः रिपोर्टिंग करून दिलं. त्यानंतर त्यांनी 'वक्तृत्वशास्त्र' हा प्रसिद्ध ग्रंथ लिहिला. १३ मे १९१८ मधे प्रकाशित झालेला हा ग्रंथ या विषयावरचा मराठीतला पहिलाच ग्रंथ असल्यामुळे लोकमान्य टिळकांपासून अनेकांनी त्याचं कौतुक केलं. त्यानंतर काही महिन्यांनी त्यांनी समर्थ रामदासांचं छोटेखानी इंग्रजी चरित्र 'लाइफ अँड मिशन ऑफ रामदास' हे लिहिलं.

कोदंडाच्या टणत्काराचा टर्निंग पॉइंट

प्रबोधनकारांचं बुकबाजीचं व्यसन म्हणजे अफाट वाचन सुरूच होतं. पिंड आधीच चळवळ्या होता. त्यात घरातून क्रांतिकारी विचारांचे संस्कार झाले होते. त्यात लोकहितवादी, महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर आणि रॉबर्ट इंगरसॉल यांच्या वाचनाने बंडखोरी अधिक पक्की झाली होती. ब्राह्मणांच्या ब्राह्मणेतरांवरच्या सामाजिक अन्यायाचा प्रतिकार करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. ती त्यांची मानसिकता पुढील शब्दांत व्यक्त झालीय, 'मी चांगला वक्ता आहे. खंबीर लेखक आहे. समाजातले अन्याय मी उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. बहुजन समाजाच्या बाजूने लिहिणारा बोलणारा खमक्या वक्ता लेखक कोणीही नाही. मी स्वस्थ का बसावे? याच सुमारास जातिवर्चस्वाच्या संदर्भाने

तर्र झालेल्या काही विद्वान ब्राह्मणश्रेष्ठींनी पांढरपेशा ब्राह्मणेतर जमातींना आणि काही ब्राह्मण जातींनाही क्षुद्रत्वाच्या किंबहुना शूद्रत्वाच्या खाईत ढकलून, त्यांना हिंदू समाजात बदनाम करण्याचा विद्वत्ताप्रचुर चंग बांधला.'

यात प्रबोधनकारांचा अंगुलीनिर्देश इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांच्याकडे आहे. तो काळ राजवाडेंच्या कारकिर्दीतला शिखराचा काळ होता. 'सत्यशोधकी साहित्याचा इतिहास'मधे डॉ. श्रीराम गुंदेकर लिहितात, 'वि. का. राजवाडे यांचा इतिहास आणि संशोधनावरील अधिकार सर्वमान्य होता. ते लिहितील आणि सांगतील तेच सत्य, असे मानले जात होते. त्यांच्या लेखनाचा प्रतिवाद सहसा केला जात नव्हता.' अशा राजवाडेंनी भारत इतिहास संशोधन मंडळाच्या चौथ्या वर्षाच्या अहवालात 'कायस्थदीप' या पुस्तकावर एक २२ पानी लेख छापला. त्यात चांद्रसेनीय कायस्थ प्रभू म्हणजे सीकेपी समाजाची कुळी हीन असल्याचा आरोप केला. शिवाय संभाजीराजांचा खून, पेशवा नारायणरावाचा खून, दुसऱ्या बाजीरावाच्या विरुद्ध इंग्रजांशी संगनमत आणि सातारच्या गादीचे शेवटचे छत्रपती प्रतापसिंह यांना सिंहासन सोडावं लागणं या चार गोष्टींसाठी सीकेपींना जबाबदार धरलं होतं. कायस्थ विरुद्ध चित्पावन या स्वराज्यापासूनच्या संघर्षाचा हा भाग आहे आणि त्यात कोणताही आधार नसताना सीकेपी समाजाची बदनामी केली जात आहे, हे प्रबोधनकारांच्या लक्षात आलं. त्याचा राग येऊन त्याचा प्रतिवाद करणारी भाषणं महाराष्ट्रभर दिली. त्यातून सीकेपी समाज जागा झाला. त्यांनी राजवाडेंचं संशोधन खोडून काढणारं पुस्तक लिहायचं ठरवलं. त्याचं कारण ते सांगतात, 'एका काळच्या सत्तामदाने शिरजोर झालेले ब्राह्मण पंडित, इतिहास संशोधनाच्या किंवा आखणी कसल्या तरी फिसाटाच्या पांघरुणाखाली कायस्थादी ब्राह्मणेतरांवर आणि अनेक चित्पावनेतर ब्राह्मणांवरही हल्ले चढवायला सवकलेले आहेत. त्यांचा एकदा कायमचा पुरा बंदोबस्त केलाच पाहिजे या हिरीरीने मी 'कोदण्डाचा टणत्कार हे पुस्तक लिहून प्रसिद्ध केले.' कोदण्डाचा टणत्कार अर्थात भारत इतिहास संशोधन मंडळास उलट सलामी' हे तडाखेबंद पुस्तक १७ नोव्हेंबर १९१८ला प्रकाशित झालं. आचार्य अत्रे सांगतात तसं 'राजवाडे यांच्या लिखाणाविरुद्ध किंवा त्यांच्या संशोधनाविरुद्ध ब्र काढण्याचीही त्यावेळी महाराष्ट्रातल्या विद्वानांची छाती नव्हती. पण ठाकरे यांनी ते धाडस करून राजवाडे यांच्यावर पहिले हत्यार उगारले आणि महाराष्ट्रावर एक बाँबगोळा टाकला.'

अत्यंत धारदार शैलीने आरोपांच्या चिंधड्या उडवतानाच आपल्या विधानांच्या समर्थनात आधारांची चळत उभी करायची, असं यातल्या प्रतिवादाचं स्वरूप होतं. त्यामुळे या टणत्काराने अनेकांची झोप उडाली. हा हल्लाच तसा तिखट होता. उदाहरणादाखल, 'राजवाड्यांच्या या बहुमोल कामगिरीचे त्यांच्या चित्पावनी हृदयाने पार मातेरे केले आहे, असे कष्टाने म्हणावे लागते. मेंढी दूध देते पण लेंड्यांनी घाण करते, असलाच हा प्रकार आहे. ते कष्टाळू संग्राहक आहेत, पण प्रामाणिक संशोधक नव्हेत. ते जेव्हा संशोधकी घमेंडीने संग्रहित कागदपत्रांतील मजकुराची ठरवाठरव करू लागतात आणि चिकित्सेच्या दिमाखाने विधानाची अंडी उबऊ लागतात, तेव्हा मोडतोड तांबापित्तलवाल्याने केमिकल अनालायझारयचे काम करण्याचा आव घालण्यासारखा मूर्खपणा त्यांच्या हातून घडत असतो.' या ग्रंथाच्या सहा हजार प्रती अवघ्या पंधरा दिवसात संपल्याचा दावा प्रबोधनकारांनी केला आहे. कारण प्रबोधनकारांचा हा प्रतिवाद फक्त सीकेपींचा उरलेला नव्हता, तर तो ब्राह्मणी संशोधकांच्या बदनामीमुळे

अस्वस्थ असलेल्या सगळ्याच ब्राह्मणेतरांचा झाला होता. प्रबोधनकार दुसऱ्या आवृत्तीच्या प्रास्ताविकात सांगतात तसं हे पुस्तक ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचं रहस्य अचूक पटवणारं हँडबुक बनलं होतं.

कोदण्डाच्या टणत्काराचा महाराष्ट्रावर काय प्रभाव पडला, याचं वर्णन आचार्य अत्रेंनी केलं आहे, 'या पुस्तकातील ठाकरे यांच्या बिनतोड पुराव्याला आणि कोटिक्रमाला उत्तर देण्याची खुद्द राजवाडे यांचीदेखील प्राज्ञा झाली नाही. मान खाली घालून त्यांना आपला पराभव मुकाट्याने कबूल करणे भाग पडले. सर यदुनाथ सरकार यांनी आपल्या शिवचरित्रात या पुस्तकाचा गौरवपर उल्लेख केलेला आहे. या पुस्तकाच्याच आधारावर भारत इतिहास संशोधन मंडळाची वार्षिक तैनात मुंबई सरकारने अगदी परवा-परवापर्यंत बंद केलेली होती. ठाकरे यांचा हा कोदण्डाचा टणत्कार सबंध महाराष्ट्रात कित्येक दिवस तरी गाजून राहिला होता. त्या पुस्तकाच्या हजारो प्रती महाराष्ट्रात घरोघर खपल्या आणि त्यांच्या प्रकाशाने महाराष्ट्रातील निद्रिस्त ब्राह्मणेतर जनता एकदम जागृत झाली. त्यामुळे एक निधड्या छातीचा लढवय्या लेखक आणि प्राणघातक प्रहार करणारा टीकाकार म्हणून ठाकरे यांचे नाव एकदम प्रामुख्याने महाराष्ट्रापुढे आले आणि द्रोणाचार्यांना आपल्या तेजस्वी शरसंधानाने कोदण्डधारी अर्जुनाने जसे हतवीर्य करून टाकले, त्याप्रमाणे महाराष्ट्रातील मी मी म्हणणाऱ्या सुप्रतिष्ठित इतिहासाचार्यांना आणि संशोधकांना आपल्या कोदण्डाच्या टणत्काराने गर्भगळीत करून त्या कोदण्डधारी कायस्थ कलमबहाद्दराने त्यांच्यावर मात केली.'

राजवाडे प्रकरणाने प्रबोधनकारांच्या आयुष्यात मोठाच टर्निंग पॉइंट आणला. त्याने त्यांच्या सामाजिक क्रांतिकारक जीवनाला खऱ्या अर्थाने सुरुवात केली. महाराष्ट्रभरातल्या ब्राह्मणेतर चळवळीतल्या कार्यकर्त्यांनी त्यांची भाषणं ठिकठिकाणी आयोजित केली. त्यांच्या कामाकडे प्रबोधनकार ओढले गेले. शिवाय त्याला छत्रपती शाहू महाराजांची प्रेरणाही होती. विशेष म्हणजे प्रबोधनकार सांगतात तसं, व्याख्यानांच्या दौऱ्यात प्रबोधनकारांना बहुजन समाजाच्या हलाखीचा आणि भिक्षुकशाही पिळवणुकीचा साक्षात्कार झाला. त्यातून आणखी दोन अभ्यासपूर्ण ग्रंथ पुढच्या काही महिन्यांत जन्माला आले. पहिला 'ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास अर्थात नोकरशाहीचे बंड' आणि दुसरा 'भिक्षुकशाहीचे बंड','कोदण्डाचा टणत्कार'मधे प्रामुख्याने ब्राह्मणी इतिहास लेखनाला धक्का दिला होता. तर या दोन ग्रंथांमध्ये बहुजनी इतिहास लेखनपद्धतीचा पाया रचला गेला.

'प्रबोधन'चा पहिला अंक

याच दरम्यान वेदोक्त प्रकरण गाजत होतं. जातवर्चस्ववादाचं हिडीस रूप महाराष्ट्र बघत होता. त्यातून प्रबोधनकारांचीही विचारचक्रं सुरू होती. त्यातून ते एका निष्कर्षापर्यंत पोचले, ब्राह्मणेतर समाजाची पहिली गरज ही भिक्षुकशाहीच्या सापळ्यातून मुक्तता ही आहे. दुसरीकडे छत्रपती शाहू महाराजांच्या प्रेरणेने सत्यशोधकी नियतकालिकं सुरू करण्याचा धडाका सुरू होता. प्रबोधनकारांचा तर छत्रपती शाहूंशी आत्मीय स्नेह निर्माण झाला होता. त्यातून प्रबोधनकारांनी १९२१च्या सप्टेंबर महिन्यात स्वतःचं वृत्तपत्र काढण्याचा निर्णय घेतला. सरकारी नोकरांना पुस्तक लिहिणं, छापणं किंवा वर्तमानपत्रं काढण्याची परवानगी नव्हती. त्यामुळे प्रबोधनकारांनी राजीनामा द्यायचं ठरवलं. ते तेव्हा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरच्या ऑफिसात रेकॉर्ड सेक्शनचे हेडक्लार्क म्हणून काम करत होते. ऑफिसमधले रेकॉर्ड नीट ठेवण्यात झालेला गोंधळ त्यांनीच निस्तरला होता.

त्यामुळे मुंबईचे चीफ इलेक्ट्रिकल इंजिनिअर विल्यम स्टूअर्ट मेंटिथ यांना त्यांना सोडायचं नव्हतं. त्यांनी त्यातून एक मार्ग शोधला. मुंबई इलाख्याचे चीफ सेक्रेटरी एल. रॉबर्टसन यांनी प्रबोधनकारांना भेटायला बोलावलं. त्यांच्याशी चर्चा करून चीफ सेक्रेटरींनी अपवाद म्हणून वर्तमानपत्र काढण्याची परवानगी दिली. प्रबोधनकार सांगतात, 'कर्दनकाळ ब्रिटिश सरकारच्या अमदानीत सरकारी नोकरी असताही वर्तमानपत्र काढण्याची खास परवानगी मिळविणारा मीच पहिला नि अखेरचा गव्हर्नमेण्ट सर्वण्ट आहे.'

'प्रबोधन'चा पहिला अंक १६ ऑक्टोबर १९२१ला प्रसिद्ध झाला. त्या पहिल्या अंकाचं वर्णन करायचं झालं तर ती साधारणपणे ए फोर आकाराची आठ पानं होती. पहिल्या पानावर 'प्रबोधन' असा ठसठशीत लोगो आहे. त्या अक्षरांच्या मागे सूर्य उगवताना दिसतोय. सूर्याच्या बरोबरच एका बाजूला शाईची दौत आणि लेखणी, तर दुसऱ्या बाजूला तलवार दाखवलीय. लोगोच्या खाली अगदी बारीक अक्षरात वैद्य अशी इंग्रजी सही आहे. वार्षिक वर्गणी अडीच रुपये आणि किरकोळ अंकाची किंमत दोन आणे आहे. लोगोच्या खाली इंग्रजीत प्रबोधनच्या स्वरूपाचं वर्णन केलेलं आहे. PRABODHAN - Fortnightly Journal Devoted to the Social, Religious and Moral Regeneration of the Hindu Society. त्याखाली स्वामी विवेकानंदांनी प्रसिद्ध केलेलं उपनिषदांमधलं सूत्र आहे, उत्तिष्ठित जाग्रत प्राप्य वरान्निबोधत. त्याखाली Vol. १. वर्ष १ले. No. 1. अंक १ला अशी नोंद आहे. छापण्याचं ठिकाण दादर - मुंबई असं लिहिलंय. तारीख अशी लिहिलीय. १६ ऑक्टोबर १९२१. श्रीशिवराज शक २४८. त्या काळात प्रचलित असणारा शालिवाहन शक आणि त्याची तिथी लिहिलेली नोंद मात्र केलेली नाही. पहिलं सगळं पान त्या वेळच्या पद्धतीनुसार जाहिरातींनी भरलेलं आहे. त्यात विशेष म्हणजे कोलकात्याच्या इंडियन रॅशनलिस्टिक सोसायटीची जाहिरात आहे. त्या जाहिरातीत संघटनेचं सदस्य बनण्याचं तसंच प्रकाशनं विकत घेण्याचं आवाहन आहे. त्याशिवाय परळच्या स्टार फार्मसीचं स्टार एग्युमिक्श्चर, दादरच्या मनोहर कंपनीचा निलगिरी चहा, त्याच कंपनीचा हनुमान बार सोप, राजाराम लिखिते यांनी छापलेली पुस्तकं यांच्या जाहिराती आहेत. तळाला प्रिंटलाईन आहे, Printed by C. S. Deole, at the Bombay Vaibhav Press, Servants of India Society's Home, Sandhurst Road, Girgaon, Bombay. Published by Keshav Sitaram Thackeray, 20, Miranda's Chawl, Lady Jamshetji Road, Dadar, Bombay.

दुसऱ्या पानापासून दोन उभ्या कॉलमातला मजकूर सुरू होतो. त्यात 'प्रबोधनाचे ध्येय' हा पहिला लेख एका पानापेक्षा थोडा मोठा आहे. लागूनच गो. म. चिपळूणकर यांचा 'विसाव्या शतकांतील सामाजिक व धार्मिक सुधारकांची कर्तव्ये' हा लेख आहे. त्याचा आकारही पहिल्या लेखाइतकाच आहे. त्यानंतर येणारा अग्रलेख 'उत्तिष्ठित जाग्रत प्राप्य वरान्निबोधत' या ब्रीदवाक्यालाच मथळा करणारा आहे. तो साधारण अडीच पानांचा आहे. त्यानंतर कोणाचंही नाव नसलेले एकेका पानाचे दोन लेख आहेत. पहिल्या लेखात पार्वतीबाई आठवले यांच्या अमेरिका दौऱ्याचा गौरव आहे. त्या महर्षी कर्वेंच्या महिला शिक्षण संस्थेसाठी निधी गोळा करण्यासाठी अमेरिकेला गेलेल्या आहेत. पाठोपाठ 'विविधज्ञानविस्तारा'वर दमदार टीका केलीय. शेवटी वर्गणीदारांना वर्गणी आणि पोस्टाच्या व्यवहाराविषयी एक छोटं विनंतीवजा आवाहन केलेलं आहे. पहिल्याच अंकात प्रबोधनकारांनी आपली

अंक काढण्यामागची भूमिका स्पष्ट केलीय. शिवाय महिला सक्षमीकरणासारखा विषय हाताळून आपले अग्रक्रम सांगितलेत. तसंच ब्राह्मणी वर्तमानपत्रांना उत्तर देण्याची तयारीही दाखवून दिलीय. साधारणपणे पुढची दोन वर्षं 'प्रबोधन'चं स्वरूप अशाच प्रकारचं आहे. त्यात पुढे स्वतंत्र कविता, अनुवाद, पुस्तक परिचय यांची भर पडलीय. तिसऱ्या अंकापासून पहिल्या पानावर जाहिरातींच्या बरोबर अंकातल्या लेखांची छोटी अनुक्रमणिकाही आहे.

'प्रबोधन' कशासाठी?

'प्रबोधन'च्या पहिल्या अंकात त्याची भूमिका स्पष्ट करणारे दोन लेख आहेत. पहिला 'प्रबोधनचे ध्येय' या नावाचा आहे. फक्त त्या लेखाचीच नाही, तर 'प्रबोधन'चीच सुरुवात कवी वसंतविहारी यांच्या कवितेने होते. त्यामुळे या कवितेशिवाय 'प्रबोधन'वरचं कोणतंही लिखाण पूर्ण होऊ शकत नाही. या कवितेत 'प्रबोधन'च्या ध्येयाचं सार आलं आहे.

समाजकार्यी स्वधर्मतत्वी सदा शिलेदार।
प्रजापक्षनवमतसंवादी राजस सरदार।
विशिष्टपंथप्रवर्तकांची व्यर्थ न करि पूजा।
व्यक्तीचा नच मिंधा, बंदा सत्याच्या काजा।।
विश्व निर्मिले जयें दयाळें त्या जगदीशाला।
भिउनी केवळ, नच अन्याला, लागे कार्याला।।

प्रबोधनकारांनी 'बुद्धिदाता आणि विघ्नहर्ता श्रीगणेशदेवाच्या चरणी अनन्यभावाने माथा ठेऊन' 'प्रबोधन'ची सुरवात केलीय. याचं काही जणांना आश्चर्य वाटू शकेल. त्याला कारण पुढच्या काळात सार्वजनिक गणेशोत्सवाला केलेला विरोध असू शकतो. प्रबोधनकारांनी अभ्यास आणि अनुभव याच्या आधारे आपली विकसित झालेली समज त्या त्या काळात मोकळेपणाने व्यक्त केली आहे. त्यामुळे एकच गोष्ट धरून ठेवणाऱ्या पोथीबाज मठ्ठ पत्रपंडितांसारखं जडत्व त्यांच्या लिखाणात नाही. उलट त्यांच्या लिखाणाला गतिमानता आहे. प्रबोधनकार अस्सल पत्रकारासारखं त्या त्या दिवसावरचं आपलं मत मांडत जातात. तापलेल्या लोखंडावर हातोडा मारून परिस्थितीला आकार देण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे ते विरोधाभासी वाटत असलं तरी महत्त्वाचं ठरतं. अर्थात त्यामुळे त्यात महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखी समग्र विचारधारा सापडत नाही किंवा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि जागृतिकार भगवंतराव पाळेकरांसारखी विचारांची समतोल मांडणी मिळत नाही. तरीही प्रबोधनकारांच्या विचारांचं मोल तसूभरही कमी होत नाही. उलट परिवर्तनाच्या चळवळीत त्यांच्या विचारांनी आपलं काम चोख पार पाडलेलं दिसून येतं.

'आधी सामाजिक सुधारणा की आधी राजकीय स्वातंत्र्य', टिळक-आगरकर वादात हा मुद्दा ऐरणीवर आला. त्यानंतर महात्मा गांधींनी सामाजिक सुधारणांना स्वातंत्र्य चळवळीचा भाग बनवेपर्यंत प्रत्येक विचारवंताला त्यावर आपलं मत स्पष्टपणे मांडणं गरजेचं ठरत होतं. त्यानुसार प्रबोधनकारांनी आपलं स्पष्ट मत सामाजिक सुधारणांच्या पारड्यात टाकलेलं दिसतं. ते लिहितात, 'स्वराज्याची लॉटरी म्हणजे मूठभर मोठ्या माशांना बाकीच्या अनंत धाकट्या मासोळ्यांना गिळण्याचा सनदपट्टाच होय, यात आम्हाला संशय वाटत नाही. सामाजिक उच्चनीच भेदभाव, आपण व आपला समाज

इतर सर्व समाजांपेक्षा उच्च दर्जाचा मानण्याची नाना फडणिशी आणि धार्मिक क्षेत्रांत भिक्षुकशाहीची दिवसाढवळ्या चालविलेली भांगरेगिरी, या सर्व राष्ट्रविनाशक, समाजविध्वंसक व दास्यप्रवर्तक दोषांचा आमूलाग्र नायनाट झाल्याशिवाय स्वराज्याचे अमृत प्रत्यक्ष ब्रह्मदेवाने जरी हिन्दुस्थानाच्या घशांत कोंबले तरी त्यापासून त्याचा लवमात्र उद्धार होणार नाही.' स्वकीयांचं राज्य आलं तरी सामाजिक धार्मिक गुलामगिरी संपत नाही, हे महाराष्ट्राचा इतिहासच सांगतो, असा दावा ते करतात. धार्मिक म्हणजेच सामाजिक गुलामगिरीचा विरोध याचा 'प्रबोधन'चं एक महत्त्वाचं ध्येय म्हणून उल्लेख आहे.

'प्रबोधन' हा कट्टर नवमतवादी असल्याचं ते सांगतात. पुराणमतवाद्यांकडे दुर्लक्ष करण्याचा इरादा ते व्यक्त करतात. पण त्याचवेळेस हिंदू साम्राज्य उभं करण्याची महत्त्वाकांक्षाही लपवून ठेवत नाहीत. ते सांगतात, 'चालू घडीचा मामला असा आहे की सर्व भेदभावांचा सफाई संन्यास करून हिन्दुजनांनी निरलस भ्रातृभावाने आलेल्या व येणाऱ्या परिस्थितीशी तोंड देऊन आपले हिन्दुत्व, आपले आत्मराज्य, कायम ठेवून हिन्दु साम्राज्याच्या विशाळ आकांक्षांनी हिन्दी राष्ट्राचे विराट हृदय चबचबीत भिजवून सोडले पाहिजे.' त्यावेळेस 'प्रबोधन' हे कोणत्याही एका विचारधारेचा नसल्याचंही ते स्पष्ट करतात. 'प्रबोधन जितका कट्टा नवमतवादी आहे तितकाच तो पक्का स्वराज्यवादी आहे. जितका राष्ट्रीय वैभवाचा महत्त्वाकांक्षी आहे, तितकाच तो सामाजिक व धार्मिक गुलामगिरीच्या पुरस्कर्त्यांचा कट्टा द्वेष्टा आहे. महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या कोणत्याही पक्षाचा प्रबोधन सांप्रदायिक नाही अथवा त्यांच्या मतांचा मिंधा गुलाम नाही. प्रबोधन सत्याचा भोक्ता आहे.' कळप कितीही उच्च ध्येयाने भारलेला का असेना, पण त्याचा भाग न बनण्याचा 'प्रबोधन'चा निर्धार तेव्हाच्या इतर विचारवंतांपेक्षा वेगळा आहे. त्यांना विचारांनी जवळच्या असलेल्या ब्राह्मणेतर चळवळीवर किंवा हिंदू मिशनरी सोसायटीवरही ते टीका करायला मागेपुढे बघत नाहीत. त्यामुळे ते स्वतंत्रपणे एकांडे शिलेदार बनून लढत राहताना दिसतात. 'प्रबोधन'चं एक वर्ष पूर्ण झाल्यावर लिहिलेल्या लेखात ते या भूमिकेचा आढावाही घेतात. ते लिहितात, 'देशाच्या स्वराज्य मुमुक्षू अवस्थेत प्रचलित चळवळींकडे एका विशिष्ट चिकित्सक दृष्टीने पाहण्याची एक नवीन दिशा प्रबोधनाने दाखविली आहे. त्यासाठी स्वीकारलेला सत्य प्रतिपादनाचा निर्भीड बाणा महाराष्ट्रीय जनतेच्या पचनी कसा काय पडतो, याची प्रथमतः आम्हाला शंका वाटत होती. परंतु चार-पाच अंक निघतात न निघतात तोच आश्रयदात्यांच्या वाढत्या संख्येने त्या शंकेची पूर्ण निवृत्ति झाली'. पुढच्या वाटचालीत प्रत्येक टप्प्यावर ते हेच विधान उद्धृत करतात आणि याचं आपण पालन करत असल्याची ग्वाही देतात. दुसऱ्या प्रकाशन वर्षाच्या शेवटच्या अंकात 'प्रबोधन'च्या ध्येयाचा वेगळ्या शब्दांत पुनरुच्चार करताना ते लिहितात, 'देशाच्या कोनाकोपऱ्यात जरा कोठे फट झाले की त्यावर चुटकीसारखे डझनवारी कालमांचे लेख खरडण्याचे काम प्रबोधनाचे नव्हे. ठिकठिकाणची बातमीपत्रे किंवा वर्तमानसारे देण्यासाठी प्रबोधनाचा जन्म नव्हें. ते काम आमच्यापेक्षा आमची इतर भावंडे उत्कृष्टपणे पार पाडीत असतातच. देशाच्या परिस्थितीचे रंग आतांशा इतके झपाझप बदलत आहेत, की कोणता रंग खरा कोणता खोटा, हे निश्चयाने सांगणेसुद्धा धाडसाचे होऊन बसले आहे. अशा अवस्थेंत प्रत्येक महत्त्वाच्या परिस्थितीकडे चिकित्सक दृष्टीने पाहून निश्चित विचारांची निष्पत्ति कशी करावी याची दिशा दाखविण्याचे कार्यच आजपर्यंत प्रबोधन करीत आलेले आहे, आणि हेच त्याचे धोरण पुढेही अबाधित राहील.'

पहिल्या अंकातलं संपादकीय तर प्रबोधनकारांनी चांद्रसेनीय कायस्थ प्रभू म्हणजेच सीकेपी समाजाला उद्देशूनच लिहिलेलं दिसतं. त्यांच्या गौरवशाली इतिहासाची साक्ष काढत त्यांना देशहितासाठी उभं राहण्याचं आवाहन त्यांनी केलंय. महाराष्ट्रातल्या प्रत्येक समाजाने स्वतःची सुधारणा केली तर महाराष्ट्र सुधारेल आणि देशही सुधारेल, असं सूत्र त्यांनी मांडलंय. त्यानुसार त्यांनी मराठा समाजाने अल्प काळात केलेल्या प्रगतीचं उदाहरणही दिलंय. त्यात प्रत्येक समाजाने आपापली नियतकालिकं काढल्याचा संदर्भ त्यांनी दिलाय, 'एकट्या मराठा बांधवांनी चालविलेली साप्ताहिके व मासिके जवळजवळ २५ असून, त्यांचा लोकप्रिय 'विजयी मराठा' लवकरच दैनिक होणार आहे... त्याचप्रमाणे पांचकळशी, भंडारी, वंजारी, तेली, तांबट, लोहार, सुतार, यांनी, फार काय पण, धेड, महार, मांग यांसारख्या आमच्या अवनत देशबांधवांनी आज शेकडो वृत्तपत्रे व मासिके चालवून आपल्या ज्ञातीच्या संघशक्तीला बेसुमार थरारून सोडले आहे'. त्यात सीकेपी मागे पडला आहे आणि सीकेपी समाजातले दोष घालवून जागृती आणण्याचं काम 'प्रबोधन' करणार असल्याचंही त्यांनी सांगितलंय. शेवटी ते सीकेपींनी आवाहन करतात, 'भरतभूमीच्या सौभाग्याकरितां, हे कायस्थ संघा, तूं जर खरा क्षत्रिय असशील तर पूर्व इतिहासाला स्मरून राष्ट्रीय कामगिरी करण्यासाठी उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत.'

उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत, हे 'प्रबोधन'चं ब्रीद असल्याचं इथे लक्षात घ्यायला हवं. प्रबोधनकार सांगतात त्याप्रमाणे सीकेपी समाजाची लोकसंख्या तेव्हा ५० हजार असावी. सीकेपी हे स्वतःला क्षत्रिय मानतात. तरीही ते पांढरपेशा आहेत. पत्रव्यवहार आणि कारकुनी हे त्यांचं परंपरागत काम आहे. पण त्यांनी शिवकाळात तलवारीनेही मोठा पराक्रम गाजवलेला आहे. अशा सीकेपी समाजात नवी जागृती निर्माण करण्याचं काम प्रबोधनकारांनी केलं. त्यासाठी त्यांना 'प्रबोधन'ची मोठी मदत झाली. 'प्रबोधन'च्या आधीही इंग्रजी बुलेटिन काढून ते सीकेपींना सुधारणांसाठी आवाहन करत होतेच. त्यांनी 'प्रबोधन'मधून सीकेपींच्या बदनामीच्या इतिहासाच्या बदनामीचा प्रत्येक प्रयत्न हाणून पाडला. त्यातून सीकेपींमध्ये पूर्वजांच्या इतिहासाविषयी स्वाभिमान उभा केला. दादाजी नरसप्रभू, बाजीप्रभू देशपांडे, रंगो बापूजी असे इतिहासातले अनेक आदर्श जवळपास शून्यातून उभे केले. शिवाय दरोडेखोरांशी सामना करताना मृत्युमुखी पडलेल्या प्रभाकर सुळे यांच्या स्मृती जपण्यासाठीही प्रयत्न केले. समाजाच्या संस्थांच्या भोंगळ कारभारावर टीका करून तो लोकाभिमुख करायला भाग पाडलं. लग्नात होणारा खर्च आणि हुंडा पद्धतीविरुद्ध आंदोलन करून त्याला आळा घातला. विधवाविवाह आणि आंतरजातीय विवाहांना चालना दिली. समाजातल्या उत्तम कवी, लेखकांना मंच मिळवून दिला. काही अपवाद वगळता देशभर पसरलेल्या सीकेपी समाजानेही त्यांना चांगला पाठिंबा दिल्याचं आढळतं. सीकेपी समाजातल्या अनेकांनी प्रबोधनचे वर्गणीदार, देणगीदार, जाहिरातदार, संपादनाच्या कामातले सहकारी, लेखक, पत्रलेखक म्हणून प्रबोधनच्या बऱ्यावाईट दिवसांत साथ दिली. असा एखाद्या समाजातला एकगठ्ठा वाचक नसताना नियतकालिक चालवणं त्या काळात व्यावहारिकदृष्ट्या शक्य नव्हतं. पूर्वायुष्यात प्रबोधनकारांना सीकेपी समाजाच्या संस्थांकडून वाईट अनुभव आलेले असतानाही त्यांनी या समाजाच्या प्रगतीसाठी लढा दिला. त्यांनी १९४५ पासून अखिल भारतीय चां. का. प्रभुहितवर्धक संस्थेसाठी 'समाजसेवा' हे मासिक पंधरा वर्षांपेक्षा जास्त काळ चालवल्याचा संदर्भ सापडतो. सीकेपींनी राजकारणात सक्रिय व्हावं, असा आग्रह त्यांनी 'प्रबोधन'मध्ये सातत्याने

मांडला आहे. तोच विचार बाळासाहेब ठाकरे आणि त्यांच्या कुटुंबाने यांनी प्रत्यक्षात आणलेला दिसतो. त्यांनाही सीकेपी समाजातून कार्यकर्ते अनेक मिळाले पण नेते फारच कमी मिळाले. त्यात उदाहरणादाखल डॉ. हेमचंद्र गुप्ते, सतीश प्रधान, आनंद दिघे किंवा सध्याचे आमदार विलास पोतनीस यांचा उल्लेख करता येईल. काँग्रेसचे माजी खासदार शरद दिघे हे आणखी एक उदाहरण.

'प्रबोधन'चा प्रवास : दादर ते सातारा

प्रबोधनकारांनी लग्न करून १९१०ला दादरमध्ये बिऱ्हाड थाटलं. तेव्हा दादर टुमदार गावच होतं. आज मुंबईचं केंद्र म्हणून दादरच्या झालेल्या विकासात प्रबोधनकारांचं महत्त्वाचं योगदान आहे. गरिबीमुळे प्रबोधनकारांना पनवेलनंतर बारामती, मध्य प्रदेशातलं देवास, कल्याण, कोल्हापूर, सातारा, पुणे, कर्जत, भिवंडी अशा निरनिराळ्या गावांत आपला संसार थाटावा लागला. शेवटी ते वांद्र्याला आले. पण दादर हीच त्यांची खरी कर्मभूमी होती. 'प्रबोधन'ची जन्मभूमीही दादर हीच होती. 'प्रबोधन'च्या कामासाठी प्रबोधनकारांनी दादरमधल्याच खांडके बिल्डिंगमध्ये एक ब्लॉक भाड्याने घेतला होता. तिथे अनेक तरुण प्रबोधनकारांकडे ओढले गेले. अभ्यास करण्यासाठी ते दिवसभर तिथेच असत. त्यातून 'स्वाध्यायाश्रम' नावाची संस्था सुरू झाली. त्यात प्रबोधनकार दर रविवारी वक्तृत्वशास्त्राच्या प्रशिक्षणाचे वर्ग घेत. शिवाय इतरही विद्वानांची भाषणं, कविता वाचन, गायन, असे कार्यक्रम आयोजित केले जात. 'स्वाध्यायाश्रमा'च्या तरुणांनीच 'गोविंदाग्रज मंडळ' स्थापन करून पाच पुस्तकंही काढली. त्यात प्रबोधनकारांच्या काही लेखांचा संग्रह असणारा 'स्वाध्याय संदेश'ही होता. शिवाय दर पंधरवड्याला प्रकाशित होणाऱ्या 'प्रबोधन'च्या अंकांचं पॅकिंग करण्यासाठी २०-२५ तरुण रात्र जागवत. त्यातल्या चर्चा आणि वादविवादांमुळे 'प्रबोधन नाईट' गाजत असे.

या तरुणांनी 'हुंडा विध्वंसन संघ' स्थापन करून मुंबईत एक वादळच निर्माण केलं होतं. प्रबोधनकार तर वयाच्या २२ व्या वर्षापासून म्हणजे १९०७ पासून हुंडाविरोधी प्रचार करत होते. या संघटनेने प्रामुख्याने सीकेपी समाजातली हुंडा घेऊन होणारी लग्नं उधळून लावली. हुंडा निषेधाची गाणी गात मोठ्या मिरवणुका काढल्या. गाढवाच्या वराती घेऊन लग्नाच्या ठिकाणी हल्लाबोल केला. १९२२-२३च्या लग्नसराईत २०-२५ लग्नात 'हुंडा विध्वंसन संघा'ने धुमाकूळ घातला होता. या आंदोलनाला 'प्रबोधन'चा सक्रिय पाठिंबा होता. खरं तर 'प्रबोधन'च्याच नेतृत्वात हे सुरू होतं. हुंडा विरोधामागचा विचार 'प्रबोधन'नेच समजावून सांगितला होता. हुंडा घेऊन लग्न करणाऱ्यांची नावं 'प्रबोधन'मध्येच प्रसिद्ध होत. संघाच्या कारवायांच्या बातम्याही छापून येत. शिवाय हुंडा न घेता लग्न करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी 'वधू पाहिजे'च्या जाहिरातीही 'प्रबोधन'मध्ये छापून येत. त्यात संपर्कासाठी 'प्रबोधन कचेरी' असा पत्ता दिलेला असे. पुढे प्रबोधनकार अचानक साताऱ्याला गेल्यामुळे हे सगळे उपक्रम बंदच पडले. पण त्याची पुण्याई कायम राहिली. वा. सी. बेंद्रे सांगतात तसं प्रबोधनकारांनी आंदोलनं करून हुंड्याच्या व्यापारी मनोवृत्तीपासून सीकेपी समाजाला परावर्तित केलं. तर श्री. शं. नवरे सांगतात, 'पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काढलेल्या 'समाज समता संघा'ला निष्ठावंत कार्यकर्ते पुरविण्याचे काम मुख्यतः स्वाध्यायाश्रम याच संस्थेने केले.' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत सुरुवातीच्या काळात अनेक सीकेपी तरुण सक्रिय दिसतात. त्याची तयारी प्रबोधनकारांनी करून घेतली होती.

याच काळात प्रबोधनकारांनी सरकारी नोकरी सोडली. त्यासाठी प्रबोधनकारांच्या आईचा विशेष

आग्रह होता. त्या नेहमी सांगत की वेळ आली तर भीक माग पण इंग्रज सरकारची नोकरी करू नकोस. सरकारने परवानगी दिल्यामुळे 'प्रबोधन' सुरू ठेवण्यात तांत्रिकदृष्ट्या अडचण काहीच नव्हती. पण प्रबोधनकारांच्या मनाला ते पटत नव्हतं. ते लिहितात, 'एकीकडे नोकरी नि दुसरीकडे बहुजन समाज जागृतीचे कार्य, अशा परस्परविरुद्ध दोन टोकांवरच्या डगरीवरचा कसरती खेळ माझ्या स्वभावाला पटेनासा झाला. सद्सद्विवेकबुद्धी सारखी टोचण्या देऊ लागली. सभांतून सरकारी धोरणांवर टीका करायची आणि प्रबोधनात मानसिक दास्याविरुद्ध बंड या विषयावर स्पष्टोक्तीची लेखमाला लिहायची, हे मला सहन होईना.' सरकारच्या नोकरीला लाथ मारून बहुजन समाजाच्या सेवेला वाहून घे, असं त्यांच्या स्वाभिमानी मातोश्री सांगत होत्याच. प्रत्यक्ष राजीनाम्याची तारीख 'शनिमहात्म्य' या पुस्तकात येते, ती अशी, '१६ डिसेंबर १९२१ पासून मानसिक दास्याविरुद्ध बण्ड ही लेखमाला सुरू झाली आणि तिचा ५ वा अग्रलेखांक ता. १ मार्च १९२२ ला प्रसिद्ध होण्यापूर्वीच ता. १० फेब्रुवारी १९२२ रोजी दुपारी बरोबर १२ वाजता, राहू, शनि आणि मंगळ या त्रिकुटाचे मेतकूट जमताच, अपमानाच्या क्षुल्लक सबबीवर मी ताडकन सरकारी नोकरीच्या दास्याची जाडजूड रौप्यशृंखला तोडून, तज्जन्य मानसिक दास्याविरुद्ध प्रत्यक्ष बंड केले.' केवळ आपले विचार आणि कृती यात तफावत राहू नये, यासाठी अडीचशे रुपये मासिक पगाराची नोकरी सोडून पुन्हा गरिबीत उडी घेणारा संपादक विरळाच. त्यांनी आणि त्यांच्या कुटुंबाने केलेल्या त्यागाची दखल मात्र इतिहासाने हवी तशी घेतलेली नाही.

'प्रबोधन'ला मिळणाऱ्या प्रतिसादामुळे त्यांना 'प्रबोधन'ची पानं आणि प्रती वाढवण्याची इच्छा होती. स्वतंत्र छापखाना नसल्यामुळे त्यांच्या या मनसुब्यात अडचणी येत होत्या. छत्रपती शाहूंनी त्यासाठी २० हजार रुपये देणगी आणि २० हजार रुपये बिनव्याजी कर्ज देण्याची तयारी दाखवली होती. पण त्यांच्या निधनामुळे ते होऊ शकलं नाही. त्यानंतर 'प्रबोधन'चे एक चाहते आत्माराम चित्रे यांनी काळबादेवी इथे छापखानाही उभारून दिला. तिथे कामही सुरू झालं. पण महिन्याभरातच चित्रेंचंही निधन झालं. त्यामुळे तोही प्रयत्न फोल ठरला. ही कहाणी प्रबोधनमध्ये छापून येताच साताऱ्यातील उद्योजक धनजीशेठ कूपर यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांना प्रबोधनकारांकडे पाठवले. कर्मवीरांना गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पैसे हवे होते. त्यासाठी किर्लोस्कर कंपनीतल्या अनुभवाच्या जोरावर त्यांनी कूपर यांच्या गुंतवणुकीच्या आधारे एक नांगरांचा कारखाना सातारा रोड स्टेशनजवळ पाडळी गावात उभारला होता. मॉण्टेग्यू चेम्सफर्ड सुधारणांमुळे देशात १९२३ला लोकल कॉन्सिलच्या निवडणुका होणार होत्या. त्या कूपरना लढवायच्या होत्या. त्यासाठी प्रबोधनकारांसारखा हरहुन्नरी आणि प्रसिद्ध पत्रकार आपल्यासोबत असला तर उत्तम, असा विचार करून कूपर यांनी प्रबोधनकारांसमोर एक उत्तम प्रस्ताव ठेवला. हवा तसा छापखाना, हवा तितका पैसा, राहण्यासाठी घर, कारखान्याच्या जाहिरात खात्याची जबाबदारी, 'प्रबोधन'च्या धोरणात लुडबुड नाही, सन्मानवेतन म्हणून दरमहा १५० रुपये, शिवाय छापखान्याच्या निव्वळ नफ्यात अर्धा वाटा. त्याला भुलून प्रबोधनकारांनी 'प्रबोधन'चा कारभार साताऱ्याला हलवण्याचा निर्णय घेतला.

निवडणुकीच्या दरम्यान प्रबोधनकारांनी कूपर यांच्या गटातले भास्करराव जाधव यांच्याविरोधात भूमिका घेतली. तसंच त्यांनी 'अस्पृश्यांनो, स्पृश्यांपासून सावधान' असं स्फुट 'प्रबोधना'त लिहून बॉम्ब टाकला. त्यापाठोपाठ कर्मवीरांनी नांगर स्वस्तात विकण्याचा आग्रह प्रत्यक्षात आणला होता.

परिणामी या दोघांच्या विरोधात कूपर यांनी षड्यंत्र रचायला सुरवात केली. त्यात प्रबोधनकारांनी साताऱ्याच्या छापखान्यातला माल पुण्याला नेऊन तिथे छापखाना काढल्याची कुजबुज कूपरच्या जवळचे लोक करू लागले. ते कानावर पडताच प्रबोधनकारांनी सगळा हिशेब देऊन कफल्लकपणे सातारा सोडला. प्रबोधनप्रेमी रामचंद्र उर्फ बापूसाहेब चित्रे यांनी पुण्यात कर्जात बुडालेला एक छापखाना विकत घेतला होता. त्याचा व्यवहार करण्यासाठी छापखान्याचा मालक, ज्याचा उल्लेख प्रबोधनकार 'गायतोंड्या भट' असा करतात, सातारा रोडला प्रबोधनकारांना भेटायला आला होता. तो आला त्याच दिवशी प्रबोधनकारांच्या एका मुलीचं डायरियाने अचानक निधन झालं. तिचे अंत्यसंस्कार करत असतानाच घाईत असलेल्या छापखाना मालकाशी जड हृदयाने व्यवहाराच्या गोष्टीही करत होते. ते बघून प्रबोधनकारांच्या पत्नीने त्यांना सुनावलं, 'प्रबोधनापुढे पोटच्या गोळ्याची सुद्धा यांना तिडीक येत नाही.' तो उद्वेग स्वाभाविक असला तरी ते एका अर्थाने प्रबोधनकारांच्या ध्येयनिष्ठेला अभिवादन होतं.

साताऱ्यात प्रबोधनकार साधारण नऊ महिने राहिले. या काळात 'प्रबोधन'ची दादरमध्ये बसलेली घडी पूर्ण विस्कटली. त्यांचं व्यावहारिक आणि कौटुंबिक नुकसानच झालं. पण याच काळात प्रबोधनकारांना महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातल्या राजकारण आणि चळवळींचा जवळून अनुभव घेता आला. ब्राह्मणेतर चळवळीची मुंबईहून लांबवरून दिसली नसती अशी बाजू त्यांना पाहता आली. विशेष म्हणजे छत्रपती शाहूंच्या निधनानंतर या चळवळीला आलेल्या मर्यादा त्यांच्या लक्षात आल्या. साताऱ्यातून त्यांनी 'प्रबोधन'चे १७ अंक काढले. या सगळ्या अंकांची पृष्ठसंख्या पहिल्या दोन वर्षांपेक्षा दुप्पट म्हणजे १६ इतकी होती. त्यात चार ते सात पानं इंग्रजी मजकूर असे. लोगोचा एक भाग म्हणून संपादक केशव सीताराम ठाकरे असं छापायची सुरुवात पहिल्याच वर्षीच्या तिसऱ्या अंकापासून झाली होती. जुन्या लोगोसह तीच पद्धत नवीन अंकातही सुरू असलेली दिसते. 'उत्तिष्ठित... 'हे ब्रीदवाक्य लोगोच्या खाली असायचं, ते लोगोच्या वर करण्यात आलं. तर लोगोच्या खाली प्रबोधनची ओळख PRABODHAN - Fortnightly Journal Devoted to the Social, Religious and Moral Regeneration of the Hindu Society. इतकीच छापून येत असे. त्यात भर पडली ती अशी, A radically rational organ exposing the correct phases of Maharashtrian Movement. पण ही दोन्ही इंग्रजी वाक्यं तिसऱ्या वर्षाच्या सोळाव्या अंकापर्यंतच आहेत.

'प्रबोधना'चा पुण्यातला संघर्ष

साताऱ्यातून प्रकाशित झालेल्या तिसऱ्या वर्षाच्या १७व्या अंकातच पुढचा अंक पुण्यातून प्रकाशित होणार असल्याची घोषणा झाली. त्यानुसार प्रबोधनकारांनी सदाशिव पेठेत घर आणि बुधवार पेठेत छापखाना असा संसार थाटला. पण पुण्यातल्या सनातनी ब्राह्मणांनी मूळ मालकाला छापखाना प्रबोधनकारांना न देण्यासाठी उचकवलं. त्याला बळी पडून त्याने छापखान्याला टाळं लावलं. सनातन्यांनी 'प्रबोधन'च्या नावाची पाटीही भररस्त्यात जाळली. वर पुण्यात 'प्रबोधन'ला जाळून खाक करू अशी शेखी मिरवली. त्यामुळे पुण्यातच 'प्रबोधन'चा छापखाना उभारण्याची प्रतिज्ञा प्रबोधनकारांनी केली. तोवर 'प्रबोधन'चा तिसऱ्या वर्षाचा शेवटचा एकच अंक प्रकाशित होऊ शकला. प्रबोधनकारांनी नव्या छापखान्यासाठी कर्ज आणि देणग्या मिळवल्या. त्यातून सदाशिव पेठेत छापखाना उभा करण्याची

तयारी झाली. पण प्रबोधनकारांनी मुंबईतून विकत घेऊन पाठवलेलं ट्रेडल मशीनचं चाक रेल्वेने पुण्यात पोहचेपर्यंत तुटलं. इतर पार्टही खिळखिळे झाले. तरीही धीर न सोडता प्रबोधनकारांनी भांडवल उभं करण्यासाठी धावाधाव सुरूच ठेवली. त्यासाठी मुंबईत असताना धावपळीमुळे ते आजारी पडले. शरीराचा उजवा भाग प्रचंड वेदना देऊ लागला. त्याचबरोबर डेंग्यू, कावीळ आणि मूळव्याधीने हल्ला केला. त्यातून बाहेर यायला चार महिने लागले. अर्धी मशिनरी पुण्यात, उरलेली अर्धी मुंबईत दुरुस्त होतेय, कारागिरांचे पगार थकलेत, उपचारासाठीही पैसे नाहीत अशी भयंकर परिस्थिती होती. पण यातून बाहेर येत १९२५च्या जानेवारीत ते कसेबसे पुण्याला पोचले. पुन्हा 'प्रबोधन' उभं करण्याच्या प्रयत्नांना लागले. पुढच्या चार महिन्यांत मशीन सातवेळा तुटलं. इतरही अडचणी येतच राहिल्या.

या सगळ्या अडचणींतून मार्ग काढत ९ महिन्यांच्या खंडानंतर 'प्रबोधन' १९२५च्या एप्रिल महिन्यात पुन्हा एकदा सुरू झालं. 'प्रबोधनला देवाज्ञा झाली' अशी टीका करणाऱ्यांना 'प्रबोधन'ने नव्याने सुरुवात करून उत्तर दिलं. चौथ्या महिन्याचा पहिला अंक हा आता पाक्षिक नसून मासिक होता. पानांची संख्या ४० होती. पुढे नोव्हेंबर १९२७ पर्यंत ३२ महिन्यांत 'मासिक प्रबोधन'चे २२ अंक निघाले. त्याचसोबत प्रबोधनकारांनी ३१ ऑगस्ट १९२७ पासून 'लोकहितवादी' हे नवीन साप्ताहिकही सुरू केलं. त्याचा शेवटचा तेरावा अंक पुण्याहूनच डिसेंबर १९२७ला निघाल्याचा उल्लेख 'शनिमहात्म्य'मधे आहे. म्हणजे जून १९२४ ला पुण्यात आल्यापासून नोव्हेंबरमधे मुंबईत परतेपर्यंत प्रबोधनकार अनंत अडचणींवर मात करत आणि सनातन्यांच्या नाकावर टिच्चून 'प्रबोधन' जगवत राहिले. त्याचं श्रेय त्यांनी त्यांचे सहसंपादक बापूसाहेब चित्रे आणि प्रभाकर चित्रे, मारुती हराळे, बापूराव वझे, दिनकर सुरुडकर या छापखान्यातल्या कर्मचाऱ्यांना दिलं आहे. बापूसाहेब चित्रे यांचं मे १९२६ मधे क्षयरोगामुळे निधन झाल्याने प्रबोधनकारांना धक्का बसला होता. त्याच्याही फार आधी दत्ता देशमुख या त्यांच्या खंद्या सहकाऱ्याला वडिलांच्या मृत्यूमुळे 'प्रबोधन' कायमचं सोडावं लागलं होतं. 'प्रबोधन'च्या चौथ्या वर्षाच्या आठव्या अंकापासून 'प्रबोधन'चा लोगो बदलला. 'प्रबोधन'च्या नावामागचा सूर्य जाऊन त्याजागी तराजू आणि ग्रंथ यांची रेखाटणं आली. प्रबोधनकारांनी सातव्या अंकात 'कलम, समशेर आणि तागडी' असा लेख लिहून या बदलाची वैचारिक भूमिका आधीच मांडली होती. शिवाय 'प्रबोधन'चं आधीचं संस्कृत ब्रीदवाक्य आणि 'प्रबोधन'च्या स्वरूपाचं वर्णन करणारी इंग्रजी वाक्यं काढून त्या ठिकाणी 'लोकहितवादी पण स्वतंत्रमतवादी' असं मराठीतलं दणदणीत वाक्य दिसू लागलं.

प्रबोधनकार पुण्यात होते त्या काळात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद अगदी टोकाला पोहोचला होता. पुण्यात पुतळ्यांचं राजकारण सुरू होतं. आधी छत्रपती शिवाजी महाराज, पाठोपाठ लोकमान्य टिळक आणि नंतर महात्मा फुले यांचे पुतळे उभारण्यावरून वाद झाले होते. त्यातून गणेशोत्सवात मेळ्यांमधल्या गाण्यांमधून दोन्ही बाजूंनी होणाऱ्या दर्जाहीन टीकेने त्यात तेल ओतलं. त्यावर दिनकरराव जवळकर यांनी लिहिलेल्या 'देशाचे दुष्मन' या पुस्तिकेने एकच गोंधळ उडवला. त्यात लोकमान्य टिळकांच्या मुलांनी गायकवाड वाड्यातल्या गणपतीसमोर अस्पृश्यांचा मेळ्याचा कार्यक्रम करून भर टाकली. या काळात प्रबोधनकार पुण्यात असल्यामुळे केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर हे ब्राह्मणेतर पक्षाचे तरुण नेते त्यांना भेटण्यासाठी जवळपास दररोज 'प्रबोधन' कचेरीत येत. शिवाय लोकमान्य टिळकांचे

सुपुत्र रामभाऊ आणि श्रीधरपंत हेही असत. त्यामुळे या सगळ्याचे सूत्रधार प्रबोधनकारच असल्याचा समज पुण्यात पसरला होता. विशेषतः 'देशाचे दुष्मन' हे पुस्तक प्रबोधनकारांनीच लिहिलं असल्याचं अनेकांना वाटत होतं. त्याविषयी य. दि. फडके लिहितात, 'जवळकरांची शब्दकळाही ठाकऱ्यांच्या शब्दकळेसारखी तिखटजाळ आणि वाचताना प्रतिपक्षीयांना ठसका लागावा अशी होती... ब्रह्मवांत्युत्पन्न टिळक - चिपळूणकर असा जवळकरांनी केलेला उल्लेख ठाकऱ्यांची आठवण करून देणारा होता. कारण ब्रह्ममुखोत्पन्नऐवजी ब्रह्मवांत्युत्पन्न हा शब्द म्हणजे प्रबोधनकारांनी मराठी भाषेत टाकलेली नवी भर होती. प्रबोधनकारांप्रमाणेच जवळकरांनीही कोकणस्थ पेशव्यांवर तुफान हल्ला चढवताना कायस्थ प्रभूंची तरफदारी केली होती. ठाकऱ्यांच्या प्रमाणेच जवळकरांनाही राम गणेश गडकऱ्यांच्या भरजरी भाषेने भुरळ घातली होती. देशाचे दुष्मन हे प्रकाशित झाल्यानंतर त्यावर दिनकर शंकर जवळकरांचे नाव असले तरी ते प्रबोधनकार ठाकरे यांनीच लिहिले आहे, अशी भालाकार भोपटकर वगैरे टिळक पक्षीयांची समजूत होती. त्यामुळे खुद्द प्रबोधनकारांनी ज्ञानप्रकाशमध्ये पत्र लिहून तो मी नव्हेच अशा आशयाचा खुलासा केला.'

प्रबोधनकारांचा छापखाना अगदी ब्राह्मणी वस्तीमध्ये असल्याने त्यांना या सगळ्याचा त्रास भोगावा लागत असे. धमकी देणारी पत्रं तर आधीपासून सुरूच होती. एका धनवडे आडनावाच्या तरुणाने सरदार बावडेकरांच्या मुलीची छेड काढल्याने १९२६च्या ऑगस्ट महिन्यात पुणे तापलं होतं. त्या घटनेच्या निषेधाच्या सभेवरून येणाऱ्या सनातन्यांनी प्रबोधनच्या छापखान्यावर जाऊन जवळपास दोन तास शिव्याशाप दिले. कारखान्याच्या नावाचा फलक खाली पाडला. त्यानंतर पुढच्याच आठवड्यात प्रबोधनकार पर्वतीजवळ फिरायला गेले असताना तीन चार जणांनी लाठीहल्ला केला. पण प्रबोधनकारांनी वॉकिंग स्टिकमधली गुप्ती बाहेर काढल्याने ते पळून गेले. खोटी निमंत्रणपत्रिका बनवून छापखान्याला पोलिसी प्रकरणात अडकवण्याचा प्रयत्नही केला गेला. गोडबोले नावाचा एक गुंड प्रबोधनकारांना भेटायला आला. छापखान्यातल्या कामगारांमुळे तो काही करू शकला नाही. पुढे पोलिसांना सांगून त्याचा बंदोबस्त करावा लागला. त्यांच्या लिखाणाला प्रक्षोभक ठरवून कोर्टात जाण्याचेही प्रयत्न केले. छापखान्यात आगीचा गोळा टाकून कागदाच्या थप्प्यांना आगही लावण्यात आली. शिवाय मेलेली कुजलेली कुत्री दारासमोर फेकण्यात आली. एकदा तर मेलेलं गाढवही टाकण्यात आलं. अनेकदा पैसे देऊनही छपाईसाठी चांगला कागद मिळून दिला जात नसे. तसंच पुण्यातल्या ब्राह्मण एजंटांनी 'प्रबोधन'वर बहिष्कारही घालून बघितला. 'प्रबोधन'चे अंक विकाल तर 'केसरी', 'ज्ञानप्रकाश'चे अंक मिळणार नाहीत, असा दबाव त्यांनी विक्रेत्यांवर आणला. पण 'प्रबोधन' छापखान्यातल्या कामगारांनी चौकाचौकात विक्री करून त्यावर मात केली. तसंच चांगलं कमिशन दिल्याने विक्रेतेही नरम पडले. अनेकदा तर अंक वाचकांपर्यंत जाऊ नयेत यासाठी एकगठ्ठा विकतही घेतले जात.

या सगळ्या अडचणींवर मात करत प्रबोधनकार पुण्यात 'प्रबोधन' चालवत होते. कोणत्याही मोठ्या जातीचा, सत्ताधाऱ्याचा किंवा चळवळीचाही थेट पाठिंबा नसताना पुण्यात भिक्षुकशाहीच्या विरोधात संघर्ष करणं महाकठीण होतं. त्यासाठी प्रबोधनकारांसारखा वीर योद्धाच हवा होता. खुद्द सदाशिव पेठेत राहून ब्राह्मणेतरी विचारांचे 'प्रबोधन'चे २२ आणि 'लोकहितवादी'चे १३ अंक प्रकाशित करणं, यासाठीची हिंमत कळण्यासाठी तो काळ समजून घ्यावा लागेल. या काळामुळे प्रबोधनकारांना

सनातनी ब्राह्मणी विचारांमधला जहरी विखार अनुभवता आला. त्याचे समाजावरचे दुष्परिणाम जवळून बघता आले. त्याचा खोलवर विचार करत त्याच्या मुळापर्यंत जाता आले. पुण्याने प्रबोधनकारांच्या विचारांमधले विरोधाभास संपवत त्यांना महात्मा फुलेंच्या विचारांच्या अधिक जवळ नेलं. त्याचं दर्शन 'प्रबोधन'च्या पाचव्या वर्षांच्या अंकांमध्ये दिसू लागलं. 'देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे' या एका लेखाचा दाखला त्यासाठी पुरेसा आहे.

'प्रबोधन'चं शेवटचं पर्व : पुन्हा दादर

चौथ्या वर्षाच्या काळात प्रबोधनकारांनी इंदूरचे राजे तुकोजीराव होळकर यांना खुनी ठरवणाऱ्या बावला मुमताज प्रकरणावर आपली लेखणी जोरात चालवली. सगळी ब्राह्मणी वर्तमानपत्रे होळकरांना राजपदावरून खाली खेचण्यासाठी आक्रमक झाली होती. त्याला उत्तर देणारं कुणी नसल्यामुळे प्रबोधनकार होळकरांची बाजू घेऊन या वादात उतरले. त्यांच्या लेखांना तुफान प्रतिसाद मिळत असल्याने त्यांची पुस्तकंही काढली. तीदेखील हजारोंच्या संख्येने विकली गेली. त्यातल्याच 'टेम्प्ट्रेस' या इंग्रजी पुस्तकात 'द बॉम्बे क्रॉनिकल' या वर्तमानपत्राचे प्रख्यात ब्रिटिश संपादक बी. जी. हॉर्निमन यांच्यावर टीका केली होती. त्यामुळे चिडून त्यांनी प्रबोधनकारांच्या विरोधात मुंबईतल्या कोर्टात अब्रूनुकसानीचा खटला दाखल केला. त्यासाठी वकील द्यायला प्रबोधनकारांकडे पैसे नव्हते. त्यामुळे 'प्रबोधन'चे अनेक प्रेमी मदत करण्यासाठी पुढे आले. याच खटल्यासाठी ७ नोव्हेंबर १९२७ला मुंबईत आल्यावर प्रबोधनकार पुन्हा एकदा गंभीर आजारी पडले. ते एकटेच नाहीत तर पत्नी, मुली आणि मुलगा असं संपूर्ण कुटुंबच वेगवेगळ्या आजारांनी ग्रस्त झाले. त्यामुळे मुंबईत अडकलेले प्रबोधनकार पुन्हा 'प्रबोधन' चालवण्यासाठी पुण्यात जाऊ शकले नाहीत.

'प्रबोधन' जवळपास दोन वर्षं बंद होतं. त्यानंतर ते १९२९च्या दसऱ्याला पुन्हा सुरू झालं. त्या अंकाला क्रान्त्यंक असं नाव होतं. किल्ल्यातून बाहेर येणारा वाघ त्यावर दिसत होता. प्रबोधनकार नावाच्या वाघानेही नव्याने डरकाळी फोडली होती. पुण्याच्या दत्तात्रेय छापखान्याचे नारायण वैद्य यांनी छपाई आणि प्रकाशनाची जबाबदारी घेतली होती. तर प्रबोधनकार हे फक्त संपादक होते. नोव्हेंबर १९२९ पासून मार्च १९३० पर्यंत 'प्रबोधन'चे पाच अंक निघालेले दिसतात. त्यानंतर 'प्रबोधन'चा अंक सापडत नाही. 'प्रबोधन' बंद करण्यात येत असल्याची घोषणा केलेली नाही. 'माझी जीवनगाथा' या आत्मचरित्रात प्रबोधनकारांनी 'प्रबोधन'शी संबंधित इतर घडामोडींची तपशीलवार चर्चा आहे. पण त्यात 'प्रबोधन' मुंबईतून पुन्हा कसं सुरू केलं आणि ते सहा अंकात कसं बंद पडलं, याच्याविषयी काहीही सांगितलेलं नाही. फक्त उदरनिर्वाहासाठी 'प्रबोधन'चा छापखाना आधी भाड्याने दिल्याचा आणि नंतर विकल्याचा उल्लेख आहे. पण या व्यवहारात मित्रांनी फसवल्यामुळे प्रबोधनकारांच्या हातात काहीच लागलं नाही. या काळात प्रबोधनकारांनी 'शनिमहात्म्य' आणि 'शेतकऱ्यांचे स्वराज्य' ही दोन महत्त्वाची पुस्तकं लिहिली. दोन्ही पुस्तकं त्या काळात अत्यंत लोकप्रिय झाली होती. शिवाय दादरमध्ये सार्वजनिक गणेशोत्सवातले ब्राह्मणी वर्चस्व मोडीत काढण्यासाठी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसोबत चालवलेली चळवळ आणि त्यातून सार्वजनिक नवरात्रोत्सवाची सुरुवात या त्यांच्या सार्वजनिक जीवनातल्या महत्त्वाच्या घडामोडी 'प्रबोधन'च्या याच टप्प्यात झाल्यात.

'प्रबोधन'च्या शेवटच्या पर्वात म्हणजे नोव्हेंबर १९२७ ते मार्च १९३० या दरम्यान 'प्रबोधन'चे

फक्त सहाच अंक निघालेले आहेत. पण त्यात वेगळे प्रबोधनकार दिसतात. 'प्रबोधन'ची सुरुवात ईशस्मरणाने करणारे 'प्रबोधन'कार नोव्हेंबर १९२९च्या अंकात नवी सुरुवात करताना लिहितात, 'कोणत्याही कार्याच्या प्रारंभी - मग ते बॉम्ब फेकण्याचे असो नाहीतर बोंब मारण्याचे असो - कोणत्या तरी देवदेवतेचे नामस्मरणपूर्वक वन्दन करण्याचा हिन्दुजनांचा शिष्ट संप्रदाय आहे. यापूर्वीच्या माझ्या प्रत्येक ग्रंथारंभी हा शिष्टाचार मी भक्तिपूर्वक इमानेइतबारे पाळलेला आहे... पण प्रागतिक मनुष्याने मतांच्या ठरावीकपणाला चिकटून बसण्याइतका मनाचा दुबळेपणा दाखविणे म्हणजे जगात जगण्याची आपली नालायकी सिद्ध करण्यासारखे आहे. कालपर्यंत मी देवदेवतांचे अस्तित्व मानणारा होतो. आज मी देवविषयक सर्व भावनांच्या छाताडावर बॉम्ब फेकणारा लालबुंद क्रान्तिकारक बनलो आहे.' मार्च १९३०च्या शेवटच्या अंकात ते लिहितात, 'प्रबोधन निरीश्वरवादी आहे. त्याचे सत्यशोधन सत्यशोधक समाजाच्याही पुढे गेलेले आहे. देव मानवात दलाल नको, या काथ्याकुटापेक्षा देवालाच उखडला तर दलाल उरतोच कोठे?' इथे 'प्रबोधन'च्या लिखाणाचं एक वर्तुळ पूर्ण होतं.

'प्रबोधन'नंतर प्रबोधनकार तब्येतीमुळे हवा बदलासाठी कर्जत इथे राहायला होते. तिथूनच त्यांच्या नाट्यव्यवसायातल्या दुसऱ्या इनिंगची सुरुवात झाली. त्यानंतर त्यांनी कधीच स्वतःचं नियतकालिक चालवलं नाही. १९३७-३८ साली त्यांनी मालती तेंडुलकर यांच्या 'प्रतोद' या साप्ताहिकाचं संपादन जवळपास वर्षभर केलं. त्या व्यतिरिक्त ते कधी संपादकही नव्हते. तरी प्रबोधनकारांनी कोल्हापूरच्या 'सेवक'पासून जळगावच्या 'बातमीदार'पर्यंत अनेक नियतकालिकांत लेख लिहिले. विशेषतः संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात त्यांच्यातला कार्यकर्ता पत्रकार वयाच्या सत्तरीतही महाराष्ट्राने बघितला. त्या वयातही त्यांचं लेखन प्रचंड गाजलं. शेवटी त्यांच्या चिरंजीवांनी काढलेल्या 'मार्मिक' या व्यंगचित्र साप्ताहिकात प्रबोधनकारांनी आपला अनुभव ओतलेला दिसतो. त्यात त्यांनी भरपूर लिहिलंदेखील. 'ऊठ मऱ्हाठ्या ऊठ' आणि 'माझी जीवनगाथा' ही त्यांची पुस्तकं त्यातूनच जन्माला आलीत. 'प्रबोधन'चा हा प्रवास बघताना महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदारांनी प्रबोधनकारांच्या साठीनिमित्त लिहिलेल्या दोन ओळी नोंदवाव्याशा वाटतात, 'आमचे केशवराव फिरले पुष्कळ, पण ठरले कोठेच नाहीत. यांतच त्यांचे सारे गुणहि आले आणि दोषही आले.'

'प्रबोधन'च्या तडाखेबंद भाषेची वैशिष्ट्यं

ठाकरी भाषा ही गोष्ट आज महाराष्ट्रात सगळ्यांना माहीत आहे. त्याला प्रबोधनकारांनी जन्म दिलेला आहे आणि 'प्रबोधन'च्या माध्यमातून ही ठाकरी भाषा महाराष्ट्रभर पसरली. त्या भाषेची सगळी वैशिष्ट्यं आपल्याला या संग्रहातल्या लेखांतून बघायला मिळतील. सडेतोड शब्दांमधून व्यक्त होणारी प्रामाणिक तळमळ हे त्यांचं खरं सौंदर्य आहे. त्यामुळे ज्यांना या भाषेचे तडाखे बसले, अशांनीही तिचं कौतुक केलेलं आढळतं. प्रबोधनकारांच्या भाषाशैली विषयीच्या अनेक अभिप्रायांची चिकटवही बाळासाहेब ठाकरे यांच्याकडून मला मिळाली होती. त्यातले हे निवडक अभिप्राय इथे देणं आवश्यक वाटतं. त्यातून 'प्रबोधन'च्या भाषेची सगळी महत्त्वाची वैशिष्ट्य आपोआप नोंदवली जातात.

प्रबोध, धुळे : लेखणीच्या जबरपणात उभ्या महाराष्ट्रात रा. ठाकऱ्यांची बरोबरी क्वचितच कोणी करू शकतो, ही गोष्ट प्रसिद्ध आहे.

भारत, गोवा : महाशय ठाकरे यांची विचारसरणी सर्वसंमत असते असें जरी म्हणता येत नसले,

तरी त्यांच्या भाषासरणीत झळकत असलेले तेजस्वी ओज अद्वितीय असते, याविषयी दुमत असणे शक्य नाही.

केसरी, पुणे : प्रबोधनकारांची लेखणी म्हणजे ज्वालामुखीचा भडका. त्याच्यापुढे आपपर भेद काहीच नाहीत.

सेवक, कोल्हापूर : ठाकरे यांनी संपादन केलेली कीर्ती त्यांच्या विशिष्ट लेखनपद्धतीच्या पोटी जन्म पावलेली आहे. त्यांच्या भाषेत जोम आहे, तडफ आहे. त्यांच्या विचारसरणीत स्वतंत्रपणा आहे, ताजेपणा आहे, जिव्हाळा आहे, म्हणूनच त्यांच्या लिखाणाची पक्कड विचारी मनाला जाणवते.

मन्वंतर, यवतमाळ : रा. ठाकऱ्यांची लेखणी म्हणजे अश्वत्थाम्याची झणझणीत तरवार. जोरदार मराठी भाषा लिहिणारा त्यांच्यासारखा लेखक दुसरा आजकाल नाही.

जागृति, बडोदा : रा. ठाकरे यांचे लेखन अंतःकरणाच्या कळकळीचे असल्याने वाचकांच्या हृदयास जाऊन भिडते. रा. ठाकऱ्यांच्या भाषेत शब्दावडंबरापेक्षा जिवंतपणाच अधिक असल्याने वाचकांच्या मनोवृत्ती एकदम जाग्या होतात.

परीक्षक, बेळगाव : मे. ठाकरे यांच्याशी कोणाचे कितीही मतभेद असोत, आमचेही आहेत, पण त्यांच्या लेखांत जो अत्यंत वंदनीय गुण आहे तो त्यांच्या अंतःकरणांतील तीव्रतम खऱ्या कळकळीचा निस्पृहपणा, निर्भिडपणा किंबहुना निर्दयीपणा होय. आणि या त्यांच्या श्रेष्ठ गुणाच्या जोडीस शोभणारी अशीच त्याची अप्रतिम भाषासरणीही आहे. निर्भय निस्पृहपणा व सुंदर भाषाप्रभुत्व ही त्यांच्या लेखांत दृष्टीस पडतात.

ज्ञानप्रकाश, पुणे : रा. ठाकरे यांची आपली प्रगमनशील मते सणसणीत रीतीने मांडण्याबद्दलची प्रसिद्धी आज कित्येक वर्षे जनतेत दुमदुमीत आहे. सामाजिक अशी कोणतीही बाब असो, तीवरील त्यांची मते ठणठणीत रीतीने व्यक्त व्हावयाची, हे साधारणतः ठरल्यासारखेच आहे. त्यांच्या भाषेत जशी ओजस्विता असते तशीच वाचकांच्या मनास गंमत वाटेल अशी तिची घडणही असते. जुन्यापुराण्या कल्पनांबद्दल त्यांना जसा तीव्र स्वरूपाचा तिरस्कार वाटतो, त्याचप्रमाणे तो व्यक्त करण्यासंबंधांतही ते कशाचीही पर्वा बाळगीत नाहीत. स्वमतनिदर्शनार्थ त्यांच्या हातून होणारी शब्दयोजना कधीही सौम्य किंवा मिळमिळीत अशी आढळून येत नाही. प्रसंगवशात समर्पकता, संगति किंवा सद्रुचि यांचा भंग झाला तरी त्यांची शब्दयोजना दणदणीत असते आणि त्यांचे लेखन सर्वसामान्य वाचकांस स्वादिष्ट वाटते.

ना. ह. आपटे, कोरेगाव, सातारा : श्री. ठाकरे यांची लेखणी जितकी तडफदार आहे तितकीच कटुतिक्त आहे. ती जितकी स्वयंप्रकाशी आहे, तितकीच मुर्दाडांचे डोळे दिपवणारी आहे. ती जितकी धडाडीची आहे तितकीच मेलेल्या मनाला पुनः जिवंत करणारी आहे. त्यांच्या लेखणीत गडकरी नाहीत, चिपळूणकर नाहीत, परांपजे नाहीत किंवा आणखी एखादा ज्ञात अज्ञात लेखक नाही. परंतु लोकहितवादींची कळकळ तिच्या कांडीत भरलेली आहे. चिपळूणकरांच्या भाषेचा जिवंतपणा तिच्या मुखांत आहे आणि आगरकरांचा सडेतोडपणा तिच्या अणकुचीत आहे.

आचार्य अत्रे, संपादक, नवयुग साप्ताहिक : अच्युतराव कोल्हटकरांप्रमाणेच ठाकरे यांची मराठी लेखनशैली तडफदार, तडाखेबंद आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. ठाकरे यांच्या प्रत्येक शब्दावर आणि

वाक्यावर त्यांच्या वीरश्रीयुक्त व्यक्तिमत्त्वाचा ठणठणीत आणि दणदणीत ठसा उमटलेला आहे... मराठी साहित्यांतील शैलीबाज लेखकांमध्ये ठाकरे यांचा क्रम पुष्कळच वर लागेल यांत शंका नाही.

पां. वा. गाडगीळ, संपादक, दैनिक लोकमान्य : ठाकरे यांची लेखणी तिखट पण तडफदार असून ते मार्मिक व रसग्राही टीकाकार आहेत. प्रबोधन मासिकात व इतरत्रही त्यांनी लिहिलेले कित्येक टीकात्मक चर्चात्मक निबंध टिकाऊ वाङ्मयाच्या दर्जाचे आहेत.

प्रबोधनकारांनी हाताळलेल्या विषयांची विविधता

'प्रबोधन'मधील प्रबोधनकारांच्या लिखाणाची महत्त्वाची पार्श्वभूमी मांडण्याचा प्रयत्न आतापर्यंत केला आहे. त्याचा उपयोग प्रबोधनकारांचं लिखाण वाचताना होऊ शकतो. मात्र त्यांच्या लिखाणाचं परीक्षण करण्याची ही जागा नाही. आज शंभर वर्षांनंतर प्रत्येक वाचकाने आणि अभ्यासकाने ते स्वतः करावं, अशी अपेक्षा आहे. मात्र प्रबोधनकारांनी हाताळलेल्या विषयांचा परिचय करून देताना काही निरीक्षणं पुढे मांडलेली आहेत. सर्व प्रकारच्या गुलामगिरीच्या विरोधात प्रचंड एल्गार पुकारण्याचं एक सूत्र धरून प्रबोधनकारांनी 'प्रबोधन'च्या अंकांत विविध विषय हाताळले. भारतात धर्माने समाजाच्या सर्व पैलूंना घेरल्यामुळे सामाजिक चिकित्सेसाठी धार्मिक चिकित्सा महत्त्वाची होती. त्यामुळे प्रबोधनकारांनी 'प्रबोधन'मधे केलेल्या लिखाणात धर्मचिकित्सा हे महत्त्वाचं सूत्र आढळून येतं. फक्त वा-वा करणारा तो वानर आणि का म्हणून प्रश्न विचारणारा तो माणूस, अशी व्याख्या करत ते सर्व प्रकारच्या चिकित्सेचा आग्रह धरतात. ब्राह्मण स्वतःचं वर्चस्व निर्माण करण्यासाठी धर्माचा उपयोग करत असल्याचा आरोप ते करतात. भटशाही, भिक्षुकशाही, पेशवाई, भटी थोतांड अशी भाषा वापरत ते त्यावर तुटून पडतात. ब्राह्मणांवर टीका करताना ते त्यांच्यातल्या लोकहितवादी, भागवत, आगरकर, गोखले अशा अनेकांचा गौरव करताना दिसतात. अश्वघोषकृत वज्रसूचीचा अनुवाद आणि संदर्भ देऊन ते उत्तम चारित्र्याच्या प्रत्येकाला ब्राह्मण ठरवतात. त्याचबरोबर सुरुवातीच्या लेखांमध्ये हिंदू मिशनरी सोसायटीच्या आणि महर्षी दयानंद यांच्या प्रभावात ते स्वतःला आर्य म्हणवून घेण्यात धन्यता मानतात; पण पुढे या सगळ्याच्या पलीकडे जाऊन देव, धर्म, वेद यांना उडवून लावतानाही दिसतात. विवेकवाद आणि विज्ञानाचा आग्रह धरत ते हिंदू धर्मातल्या अंधश्रद्धांवर कोरडे ओढतात. ते हे सारं उघडपणे आणि बिनधास्त करू शकतात. कारण हिंदू धर्माविषयी असणारा अत्यंत अभिमान ते कुठेच लपवत नाहीत. मुस्लीम आणि ख्रिश्चन धर्मगुरूंनी घडवलेल्या धर्मांतरावर ते तुटून पडतात. या दोन्ही धर्मांतल्या अंधश्रद्धांवर आणि पुरोहितशाहीवर हिंदू धर्मातल्या कुप्रथांइतकेच हल्ले चढवतात. मोपल्यांचा हिंसाचार, खिलाफत चळवळ, स्वामी श्रद्धानंद यांची हत्या, गोव्यातील सेंट फ्रान्सिस झेवियर यांच्या प्रेताच्या दर्शनासाठी होणारी गर्दी अशा विषयांवरही त्यांची लेखणी जोरात चालते. त्यांच्या हिंदुत्वामुळे त्यांना एकप्रकारे हिंदू धर्मातल्या चुकीच्या गोष्टींवर टीका करण्याचा हक्क मिळतो. त्यातून बहुजनी हिंदुत्वाचं एक वेगळंच वैचारिक रसायन त्यांच्या लेखांतून बघायला मिळतं.

'ख्रिस्त महंमद मांग ब्राह्मणासी, धरावे पोटाशी बंधूपरी' या महात्मा जोतीराव फुलेंनी सत्यशोधक चळवळीच्या मुळाशी मांडलेल्या विचारांशी ते फारसे सहमत दिसत नाहीत. मात्र सहाव्या वर्षातल्या हिंदवी नीळकण्ठीझमच्या लेखांत त्यांचा सूर थोडा बदललेला दिसतो. 'माझी जीवनगाथा'मध्ये त्यांनी त्याचं सार सांगितलंय, 'सागर मंथनातून निघालेले हलाहल शिवशंकराने असूरपणे प्राशन केले म्हणून

नीळकण्ठ नाम प्रसिद्ध झाले. शंकराने ही जी धडाडी दाखविली तिचे नीळकण्ठीझम. आजकाल हिंदुस्थानावर अनेक बहादर आहे का त्याने आपल्या नीळकण्ठीझमने अनेक झम आपल्या पचनी पाडून त्यांना हिंदुत्वाची दीक्षा दिलेली आहे... आक्रमणाला समोर येईल त्या संस्कृतीतले चांगले घ्यायचे आणि चोथा भिरकावून द्यायचा, हा नीळकण्ठीझमचा धर्म आहे. हिंदुस्थानावर अनेक परधर्माची परचक्रे आली. त्या सगळ्यांना पचनी पाडून हिंदू धर्म आणि संस्कृती आजही आपापल्या पायांवर ताठ उभी आहे. यातले मर्म शोधणाऱ्यांना ते हिंदवी नीळकण्ठीझममध्येच सापडेल, इतरत्र नाही.' सुरुवातीला गजानन वैद्यांच्या हिंदू मिशनरी सोसायटीचा थेट प्रभाव सापडतो. त्यांच्याविषयी प्रबोधनकार लिहितात. ते त्यात सक्रियही आहेत. ते त्यांच्या वैदिक विवाहविधीत संशोधन करून प्रसिद्धही करतात, पण त्याचवेळेस सोसायटीच्या कारभारावर अगदी खरपूस टीका करतानाही दिसतात. मात्र बुद्ध धर्माविषयी त्यांचा सॉफ्ट कॉर्नर आहे. मात्र ते त्याला हिंदू धर्माचाच बंडखोर भाग मानतात. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध धर्मात धर्मांतर करण्याची घोषणा केली, तेव्हा त्यांनी त्याचं समर्थन करणारा लेख 'साप्ताहिक संदेश'मध्ये लिहिलेला आहे. संतांच्या चळवळीलाही ते सनातन्यांच्या विरुद्ध केलेली बंडखोरी मानतात. संत तुकारामांची पालखी पुण्यात बघितल्यावर त्यांनी या एकीचा उपयोग देशाच्या उभारणीसाठी केला गेला पाहिजे, असं मत व्यक्त केलंय. समर्थ रामदास यांच्याविषयी ते इतर सत्यशोधकांप्रमाणे टीका करत नाहीत. उलट त्यांच्याविषयी आदर व्यक्त करतात. पण छत्रपती शिवरायांच्या स्वराज्य उभारणीत रामदास स्वामींच्या योगदानाविषयी त्यांची मतं बदलत गेलेली आढळतात.

सर्व प्रकारच्या जातिभेदाच्या विरोधात प्रबोधनकारांची लेखणी तलवारीपेक्षाही भेदक होते. अस्पृश्यतेला तर ते विरोध करतातच; पण अस्पृश्यांना ते राजकीय मार्गदर्शन करतात. ब्राह्मणी वर्तमानपत्रांतून होणाऱ्या जातिभेदाचा प्रतिवाद करताना ते कुणाचाही मुलाहिजा बाळगत नाहीत. महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाविषयीचं 'प्रबोधन'मधलं लिखाणही वाचण्यासारखं आहे. ते ब्राह्मणेतर चळवळीची बाजू घेऊन ब्राह्मणांशी भांडतात. पण ब्राह्मणेतर चळवळीतल्या चुकांवर टीकाही करतात. ब्राह्मणेतर चळवळीने मिळवलेल्या यशात मराठ्यांनी इतर ब्राह्मणेतर जातींना सामावून घ्यावं, अशी त्यांची भूमिका आहे. त्यासाठी ते भास्करराव जाधवांसारख्या दिग्गजाचाही सामना करतात. इतकंच नाही तर छात्रजगद्गुरू पीठाच्या निमित्ताने याच मुद्द्यावरून ते छत्रपती शाहूंनाही दोष द्यायला मागेपुढे पाहत नाहीत. अर्थात छत्रपती शाहूंशी असलेला त्यांचा स्नेह आणि त्यांच्याविषयी असलेला आदर दाखवणारे लेख 'प्रबोधन'मध्ये आहेतच. मुळात 'प्रबोधन' उभं राहिलं ते शाहू महाराजांच्या प्रेरणेने. पण दुसऱ्याच अंकात ते त्यात 'अंबाबाईचा नायटा'सारखा ऐतिहासिक लेखही लिहितात. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या चरित्रपर लेखात आणि त्यानंतर झालेल्या वादातही शाहू महाराजांविषयीचं लेखन मुळातून वाचायला हवं. आपल्या समोर असलेल्या विषयात एखाद्याची चूक वाटली, तर ते त्यांच्याशी असलेली मैत्री किंवा आधीचं कर्तृत्व याचा कोणताही विचार करत नाही. जे चुकीचं आहे, ते चुकीचंच अशी त्यांची भूमिका असते. कर्मवीर प्रबोधनकारांना गुरूच मानत. रयत शिक्षण संस्थेची सगळी योजना दादरच्या प्रबोधन कार्यालयात बनली होती. त्यामुळे 'प्रबोधन'मधे कर्मवीरांविषयी केवळ आपुलकीचेच शब्द आहेत.

'प्रबोधन'ची सुरुवात होण्याआधीच लोकमान्य टिळकांचा मृत्यू झालेला होता, तरीही त्यांच्याच विचारांचं प्रभुत्व पुण्यावर होतं. त्यामुळे टिळक आणि केसरी हे प्रबोधनकारांच्या दांडपट्ट्याच्या टप्प्यात वारंवार येतात. ते टिळकांचा उल्लेख लोकमान्य असा चुकूनही करत नाही. कै. (कैलासवासी), प. वा. (परलोकवासी), क्वचित लो. मा. (लोकमान्य) आणि बहुतेक वेळा नुसतं टिळक किंवा बाळ गंगाधर टिळक असंच ते म्हणतात. यावरून त्यांचा टिळकांकडे बघण्याचा दृष्टीकोन लक्षात येईल. महात्मा गांधींविषयीही त्यांना विशेष प्रेम नाही. असहकार आंदोलन, सत्याग्रह, अहिंसा यांचा मार्ग त्यांना पटत नाही. त्यांना गांधींजींची व्यक्तिपूजा होते, असं वाटतं. त्याचा ते विरोध करतात. पण गांधीजींनी राजकीय चळवळींमधलं ब्राह्मणांचं एकहाती वर्चस्व संपवून ब्राह्मणेतरांना संधी दिली, यासाठी एक ब्राह्मणेतर म्हणून गांधीजींविषयी त्यांना प्रेमही आहे. त्यामुळे ते टिळकांइतक्या पोटतिडकीने गांधीजींवर तुटून पडत नाहीत.

प्रबोधनकारांसमोरचा सर्वांत मोठा आदर्श हा लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांचा आहे. त्यांच्यावर प्रबोधनकार संधी मिळेल तेव्हा भरभरून लिहितात. त्यांचे लेखही 'प्रबोधन'मधे पुनर्मुद्रित करण्यात आलेले आहेत. तसंच राजारामशास्त्री भागवतांच्या मांडणीविषयीही प्रबोधनकारांना प्रचंड आदराने व्यक्त होताना दिसतात. शिवाय त्यांचा एक लेखही प्रबोधनकारांनी शेवटच्या अंकांमध्ये पुन्हा छापला आहे. त्या तुलनेत प्रबोधनकार महात्मा फुलेंविषयी लिहिताना आढळत नाहीत. अर्थात त्यांच्याविषयी प्रबोधनकारांना आदर आहेच. एके ठिकाणी ते जोतिरावांचा उल्लेख पुरुषोत्तम असा करतात. सत्यशोधक चळवळीविषयीचा त्यांचा जिव्हाळाही लपून राहत नाहीत. पण ते तिच्यावर टीका करण्याचं स्वातंत्र्य राखून ठेवतात. मुकुंदराव पाटील यांनी सत्यशोधक समाज अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून केलेलं भाषण ते मागवून आवर्जून छापतात. रॉबर्ट इंगरसॉल या अमेरिकन तत्त्ववेत्त्याचाही त्यांच्यावर प्रभाव आहे. त्यांच्या विवेकवादाची पाठराखण प्रबोधनकार करतात. पण त्याच्या कर्तृत्वाची किंवा विचारांची सविस्तर ओळख करून देताना आढळत नाहीत.

इतिहास हा प्रबोधनकारांच्या आवडीचा विषय. 'प्रबोधन'मधल्या लिखाणाचा मोठा भाग इतिहासाने व्यापलेला आहे. 'प्रबोधन' सुरू होण्याआधी लिहिलेल्या ग्रंथांमुळे प्रबोधनकारांची ओळख बहुजनांच्या नजरेतून नवा इतिहास लिहिणारा इतिहासकार अशी झालेली आहे. त्यामुळे ते सूत्र पुढे नेत ते 'महाराष्ट्र सारस्वतकार' म्हणून प्रसिद्ध असलेले वि. ल. भावे यांनी केलेली सीकेपींच्या इतिहासाची बदनामी खोडून काढतात. छत्रपती शिवाजी महाराजांना ते परमेश्वर म्हणतात. शिवाजी महाराजांविषयी असलेलं आत्यंतिक प्रेम प्रबोधनच्या पानापानांवर पाहता येतं. पण तिथेही ते चिकित्सक वृत्ती सोडत नाहीत. शिवशाहीच्या कारभाराची चिकित्सा करताना ते शिवाजी महाराजांचे त्यांच्या दृष्टीने असलेले काही दोषही दाखवून देतात. अर्थात शिवाजी महाराजांच्या अमराठी टीकाकारांना ते सोडत नाहीत. पुढे याच संदर्भात त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरूंनाही सोडलेलं नाही. इतिहासकारांचे ब्राह्मणी कंपू छत्रपती संभाजी राजांच्या बदनामीचे डाव रचत असलेले प्रबोधनकार पाहत होते. त्यावर त्यांनी वा. सी. बेंद्रे आणि वि. स. वाकसकर या इतिहासकारांकडून त्या बदनामीला उत्तर देणारे अभ्यासपूर्ण लेख लिहून घेतले. कदाचित या विषयावरचे ते पहिलेच लेख असावेत. हे 'प्रबोधन'चं मराठी इतिहास लेखनामधलं एक महत्त्वाचं पण दुर्लक्षित योगदान आहे. त्यावर प्रबोधनकारांनी एक छोटी नाटिकाही लिहिली आहे.

छत्रपतींचं स्वराज्य हे संभाजी महाराजांमुळे नाही, तर पेशवाईमुळे बुडालं, हा दावा त्यांनी सातत्याने केला आहे. 'प्रबोधन'च्या इतिहासविषयक लिखाणाचे सगळ्यात मोठे नायक रंगो बापूजी हे आहेत. 'छत्रपती प्रतापसिंह आणि रंगो बापूजी' या त्यांच्या १९४८ साली प्रकाशित झालेल्या महान ग्रंथांची मुळं 'प्रबोधन'मध्ये आहेत. शाहू महाराजांच्या प्रेरणेने त्यांनी प्रतापसिंहांचा छळ आणि त्यांना राज्य मिळवून देण्यासाठी रंगो बापूजींनी दिलेला लढा हा इतिहास सातारा परिसरात भाषणांमधून सांगितला. त्याची दोन शब्दांकनं 'प्रबोधन'मध्ये आहेतच. शिवाय रंगो बापूजींविषयी पत्रं, भाषणं असं संदर्भ साहित्यही दिलंय. '१०० वर्षांपूर्वीचा इतिहास' म्हणून त्यांनी हा इतिहास मांडायला सुरुवातही केली होती. पण अडचणींमुळे त्यांना तो मांडता आला नाही. वीस वर्षांनंतर ते या विषयाला न्याय देऊ शकले.

हुंड्याची अन्यायी रूढी, बालविवाह आणि विधवाविवाह या विषयांवर प्रबोधनकारांनी 'प्रबोधन'मधून सातत्याने लिखाण केलंय. फक्त लिहून शांत न बसता त्यासाठी आंदोलन उभारून दाखवलं. सक्षमीकरणासाठी महिलांनीच पुढं येऊन जुन्या चालीरितींची जोखडं फेकून द्यायला हवीत, असा आग्रह ते धरतात. शिवाय त्यांनी त्या काळात कुटुंब नियोजनाची आवश्यकता सांगणारा लेखही 'प्रबोधन'मध्ये छापलाय. पण प्रबोधनकारांना दहा अपत्यं होती, हेही नजरेआड करून चालणार नाही. गोव्यामधील देवदासींचा प्रश्न महाराष्ट्रासमोर मांडून 'प्रबोधन'ने एक मोठं योगदान दिलं. मोतीराम जांबवलीकरांसारख्या देवदासी समाजातल्या महत्त्वाच्या कार्यकर्त्यांना त्यासाठी 'प्रबोधन'ने लिहायला लावलं. प्रबोधनकार स्वतः या समाजाच्या परिषदेसाठी गोव्याला गेले. त्यांनीही या विषयावर लिहिलं. मुली देवाला अर्पण करण्याच्या शेषविधीवर बंदी घालण्याचा पहिला अर्ज प्रबोधनकारांनीच गोव्याच्या गव्हर्नरला दिला. प्रबोधनकारांनी तरुणांमधले न्यूनगंड घालवण्यासाठी, त्यांच्यात उद्योजकी मानसिकता निर्माण व्हावी यासाठी तसंच आत्मविश्वास मिळवण्यासाठी काही लेख लिहिले आहेत. जपान, अमेरिका, तुर्कस्थान, चीन, रशिया या देशांमधल्या घडामोडींवरही 'प्रबोधन'मध्ये लेख आहेत. अमेरिकेत शिक्षणासाठी गेलेल्या विष्णू विठ्ठल ओक यांचं लिखाण प्रबोधनकारांनी अग्रलेख म्हणून छापलं. याशिवाय मुळशी सत्याग्रहाविषयी प्रबोधनकारांनी काही स्फुटं लिहिली आहेत. ते सत्याग्रहाच्या विरोधात होते. मुळशी धरणात गेलेल्या जमिनीचा मोबदला जमीनदार आणि सावकारांना न मिळता शेतकऱ्यांना मिळायला हवा, अशी भूमिका त्यांनी घेतली होती.

तिसऱ्या वर्षांत 'प्रबोधन' साताऱ्यात प्रसिद्ध होत होता तेव्हा मराठीबरोबरच इंग्रजी लेखही प्रकाशित होऊ लागले. तसंच चौथ्या वर्षात बावला मुमताज प्रकरणातही काही इंग्रजी लेख 'प्रबोधन'मध्ये आले. त्यात प्रबोधनकारांचं इंग्रजीवरचं प्रभुत्व दिसून येतं. 'प्रबोधन'मध्ये प्रबोधनकारांच्याच तोडीचे अनेक लेख इतर लेखकांनीही लिहिलेले आहेत. त्यात गो. म. चिपळूणकर, वा. सी. बेंद्रे, कृष्णराव बाबर, नारायण वाळवेकर, बापूसाहेब चित्रे, मोरेश्वर देशमुख यांनी नावं घ्यायला हवीत. प्रबोधनकारांचे धाकटे भाऊ यशवंतराव यांनीही एक लेख लिहिला आहे. लोकमान्य टिळकांचे सुपुत्र श्रीधर टिळक यांनी 'हिंदू जनांचा ऱ्हास आणि अधःपात' या प्रबोधनकारांच्या अनुवादित ग्रंथाचं परीक्षण लिहिलं आहे. किसन फागुजी बनसोडे आणि पांडुरंग घटकर या नागपुरातल्या दोन महार समाजातल्या वक्त्यांची भाषणंही प्रबोधनकारांनी आवर्जून छापली आहेत. वसंतविहार ऊर्फ जोशीबुवा, विनायक बर्वे ऊर्फ कवी आनंद,

गो. गो. अधिकारी ऊर्फ कमलावर, नारायण केशव बेहेरे आणि कुमार यशोद या कवींच्या कवितांना 'प्रबोधन'मध्ये भरपूर जागा मिळाली आहे. प्रबोधनकारांनी स्वतःही 'प्रबोधन'मध्ये दोन पोवाडे लिहिले आहेत. चौथ्या वर्षाच्या चौथ्या अंकात 'वीररत्न बाजीप्रभू देशपांडे' या नावाने त्यांच्या शौर्यावरचा पोवाडा शाहीर केशव या नावाने प्रबोधनकारांनी लिहिलाय. तर १२ ऑक्टोबर १९२६च्या अंकात 'विजयादशमीचा संदेश' या नावाने प्रसिद्ध झालेला दुसरा पोवाडा रमाकांत या नावाने आहे. त्यात प्रबोधनकारांचा वादळी बाणा फार उत्कटपणे व्यक्त झालाय. वानगीदाखल एक कडवं,

देव धर्म हे भटी सापळे घातक झाले देशा ।
मोडा तोडा उलथुनि पाडा उखडा त्यांच्या पाशा ।।
धर्मावाचुनि प्राण न जाई देवाविण नच अडते ।
आत्मशक्ती खंबीर तयाच्या त्रिभुवन पाया पडते ।।

दोन वर्षांच्या खंडानंतर आलेल्या 'प्रबोधन'च्या अंकात छापून येऊनही हा लांबलचक पोवाडा तेव्हा गाजला होता. त्याची पुस्तिकाही बाजारात आली होती. प्रबोधनकारांनी वाचकांना केलेली निवेदनं हाही 'प्रबोधन'मधला वाचनीय भाग आहे. प्रत्येक वर्षाच्या शेवटी प्रबोधनकारांनी वर्षाचा आढावा घेतलाय. तिसऱ्या वर्षापासून आलेल्या एकामागून एक संकटांबद्दलही त्यांनी वाचकांशी हितगुज केलंय. वर्गणी देण्याविषयीची निवेदनं तर अनेक आहेत. मदत देणाऱ्यांच्या याद्या आहेत तशाच वर्गणी बुडवणाऱ्यांही याद्या आहेत. इतर नियतकालिकांना भेट अंक पाठवण्यावरून स्पष्ट खुलासे आहेत. तसंच लेखकांनी लेख पाठवताना त्यात जास्त उद्गारवाचक चिन्हं वापरू नयेत, असंही सांगितलंय. वाचकांच्या पत्रांनाही 'प्रबोधन'मध्ये स्थान आहे. त्यात मालवणपासून इंदूरपर्यंतचे वाचक आहेत. त्याला वाचकांचे पार्लमेंट, लोकमताच्या पार्लमेंटात, संपादकीय टपालाची पेटी अशी आकर्षक शीर्षकं दिलेली आढळतात. अनंत गुरव यांनी केलेल्या मोजणीनुसार 'प्रबोधन'मध्ये वाचकांची एकूण ८४ पत्रं प्रकाशित झालीत. तसंच त्यांनी 'कलमबहाद्दरांस शेलापागोटे' या शीर्षकाखाली वेगवेगळ्या अंकात एकूण १०२ पुस्तकांचे परिचय मोजलेत. वाचकांची दिशाभूल होऊ नये म्हणून या सदरासाठी प्रबोधनकार बरीच मेहनत घेत. प्रत्येक पुस्तक ३-४ चांगल्या वाचकांना वाचण्यासाठी पाठवत. त्यांच्या मतांची गोळाबेरीज करून 'प्रबोधन'चा अभिप्राय प्रसिद्ध होई. यातले बरेचसे परिचय हे प्रबोधनकारांनी स्वतः लिहिलेले आहेत. त्यात त्यांची सडेतोड शैली वाचायला मिळते. प्रसिद्ध लेखकांच्या पुस्तकांऐवजी चांगल्या पण दुर्लक्षित पुस्तकांचा परिचय करून देण्याकडे प्रबोधनकारांचा कल दिसून येतो. 'प्रबोधन'मधल्या जाहिरातींमधून त्या काळातल्या जीवनशैलीतील बदलांचा अंदाज बांधता येतो.

'प्रबोधन' आणि शिवसेना

आजच्या संदर्भात विचार करतानाही 'प्रबोधन'चे विचार आणि शैली अद्याप ताजी असल्याचं जाणवतंच. परिस्थिती बदलली असली तरी जात धर्म पोथ्यांचा त्याग करून निव्वळ माणुसकीला आपलंसं करण्याचा विचार आजही तितकाच उपयुक्त आहे. त्याचबरोबर आजच्या महाराष्ट्राशी 'प्रबोधन'चा सांधा शोधताना महाराष्ट्रातला एक महत्त्वाचा पक्ष असणाऱ्या शिवसेनेवरचा 'प्रबोधन'चा प्रभाव लक्षात येतो. आमचं हिंदुत्व शेंडी जानव्याचं नाही, असं शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे नेहमी म्हणत असत. त्यांच्यानंतर त्यांचे चिरंजीव मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि नातू कॅबिनेट मंत्री आदित्य

ठाकरे हेदेखील हे वाक्य भाषणांमधून सांगतात. बदललेल्या राजकीय परिस्थितीत या वाक्याचं महत्त्व महाराष्ट्राच्या एकंदर राजकारणाच्या दृष्टीनेही आहे. आता या शेंडी जानव्याच्या नसलेल्या हिंदुत्वाचं मूळ आपल्याला प्रबोधनकारांमध्येच शोधत जावं लागतं. बहुजनी हिंदुत्वाचे मूळपुरुष म्हणून आपल्याला प्रबोधनकारांकडे बघता येतं. बहुजनवाद आणि हिंदुत्ववाद यांचा फारच क्वचित आढळणारा समन्वय त्यांच्या विचारांध्ये आहे. हिंदू, मुस्लीम आणि ख्रिश्चन या तिन्ही धर्मांतल्या पुरोहितशाहीला आव्हान देताना वेगळ्याच विचारांचं रसायन तयार झालेलं दिसतं. मुस्लिमांवर केलेली टीका ही 'प्रबोधन' आणि शिवसेना या दोघांचीही दीर्घकाळ ओळख होती. त्याशिवाय सर्वसामान्यांना लगेच आपली वाटेल, अशी ठाकरी भाषा आणि संवाद साधल्यासारखं पण ज्वलंत वक्तृत्व या गोष्टीही प्रबोधनकारांकडूनच शिवसेनेला मिळाल्यात. सीमोल्लंघनाचं महत्त्व सांगणारे प्रबोधनकारांचे 'प्रबोधन'मधले लेख वाचले की शिवसेनेचा मेळावा दसऱ्याला का होतो, हे लक्षात येतं. बाळासाहेब ठाकरेंची व्यंगचित्रं, श्रीकांत ठाकरेंचं संगीत आणि उद्धव ठाकरेंचा कॅमेरा या तिन्ही गोष्टी प्रबोधनकारांकडून आलेल्या आहेत.

प्रबोधनकारांचे दुसरे चिरंजीव श्रीकांत ठाकरे यांच्या आत्मचरित्रात आधी 'मार्मिक' आणि नंतर 'शिवसेना' या दोन्हींच्या जन्मकथा आहेत. त्या अशा, 'न्यूज डे' मधून आमचे बंधू बाहेर पडल्यावर काय करायचं हा प्रश्न उभा राहिला. पण प्रबोधनकारांनी एक मंत्र दिला होता की माणसाने कधीही हताश होऊन जाऊ नये. नव्या क्लृप्त्या काढाव्यात. त्याप्रमाणे बंधूंनी एक डमी तयार केली. शंकर्स विकली होतं, पण आपण दुसरं चांगलं काढलं तर. त्याचं नाव होतं, 'कार्टूनिस्ट'. मोठ्या बंधूंनी दादांच्या कानावर ही गोष्ट घातली. तेव्हा दादा म्हणाले, इंग्लिशमध्ये नको, कारण मजकुरासाठी साऊथ इंडियन लोकांच्या पाया पडावं लागेल. तुला अनुभव आलाच आहे. तेव्हा मराठीत काढा! बंधूंना हा विचार एकदम पसंत पडला. झालं. आमचं नावासाठी डोकं सुरू झालं. तिरंदाज ठेवावं की अंजन? भाऊ दादांकडे गेला. दादा स्वस्थ खुर्चीवर बसले होते, म्हणाले, 'मार्मिक!' मी बाहेर गेलो होतो. आल्यावर त्याने मला सांगितलं. दादांच्या तोंडातून ब्रह्मवाक्यच यायचं नेहमी. काय नाव मार्मिक! मर्मभेद करणारं व्यंगचित्र साप्ताहिक.'

'मार्मिक'ची रचना, भाषाशैली यावर प्रबोधनकारांचा थेट प्रभाव दिसून येतो. 'मार्मिक'मध्ये प्रबोधनकारांनी लिहिलंही खूप. ४०-५०च्या दशकात ते जळगावहून प्रसिद्ध होणाऱ्या साप्ताहिक 'बातमीदार'मध्ये 'वाचकांचे पार्लमेंट' नावाचं सदर चालवायचे. लोकांचे प्रश्न आणि प्रबोधनकारांची नेमकी उत्तरं असं त्याचं स्वरूप होतं. तसंच एक सदर 'मार्मिक'मध्येही चाललं. 'कलमबहाद्दरांस शेलापागोटे' या पुस्तक परिचयाच्या प्रबोधनकारांच्या 'प्रबोधन'मधल्या सदरात श्रीकांत ठाकरेंच्या 'सिनेप्रिक्षान' या 'मार्मिक'मधल्या सिनेमाच्या परीक्षणाच्या सदराच्या लोकप्रिय शैलीची मुळं शोधता येतात. 'मार्मिक'मधून मराठी माणसावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला जात होता. त्याला प्रचंड प्रतिसाद मिळू लागला. बाळासाहेब ठाकरेंची भाषणंही होऊ लागली. त्यालाही तुफान प्रतिसाद मिळत होता. प्रबोधनकार स्वतः ती भाषणं ऐकायला जात. त्यापुढची गोष्ट श्रीकांत ठाकरे सांगतात, 'कुणी म्हणालं की साहेब, तुम्ही विचार दिल्याने मराठी मनं पेटून उठलीत. त्यांना तुम्ही अधिक जवळ आणण्यासाठी एखादा पक्ष स्थापन करा. पण बंधूंच्या डोक्यात एक निराळीच कल्पना होती. त्यांनी प्रबोधनकारांना ही कल्पना सांगितली. ते म्हणाले, 'तू असं कर. एक संघटना काढ!' बंधू म्हणाले

नाव काय द्यायचं? दादा मागच्याप्रमाणे एक ब्रह्मवाक्य बोलले, शिवसेना!' शिवसेनेच्या स्थापनेच्या सभेतच प्रबोधनकार ठाकरेंनी माझा बाळ मी महाराष्ट्राला अर्पण करतो, असं म्हणत बाळासाहेबांना महाराष्ट्राचा बनवलं. त्याच सभेत प्रबोधनकारांनी भाषणात सांगितलं होतं की माझा संप्रदाय वेगळा आहे आणि बाळासाहेबांचा वेगळा आहे. तरीही शिवसेनेच्या जडणघडणीत प्रबोधनकारांचं महत्त्वाचं योगदान होतंच.

सर्वांत महत्त्वाचं म्हणजे स्थानिय लोकाधिकारवाद हा शिवसेनेच्या विचारांचा प्राण मानायला हवा. स्थानिक मराठी माणसाला नोकऱ्यांमध्ये प्राधान्य मिळायला हवं, ही शिवसेनेची कायम मागणी आहे. आश्चर्य वाटेल पण शिवसेनेच्या स्थापनेच्याही चार दशकं आधी 'प्रबोधन'मध्ये प्रबोधनकारांनी हीच मागणी केलीय. १६ जून १९२३च्या प्रबोधनमध्ये प्रबोधनकारांनी 'मद्राशांचा सुळसुळाट', 'स्थानिक रहिवाशांचा कोंडमारा', 'मद्राशी आणि महाराष्ट्रीय' आणि 'मद्राशांचा बोजा मुंबईवर का?' अशी एकाच विषयावरची चार स्फुटं लिहिली आहेत. ती मुळातून वाचण्यासारखीच आहेत. आणि ती एकदा वाचली की शिवसेनेची मुळं 'प्रबोधन'मध्ये कशी सापडतात, हे कळतं.

महाराष्ट्राचा ठेवा महाराष्ट्राला सादर

एका महान महाराष्ट्र सुपुत्राची ही विचारसंपदा पुन्हा एकदा महाराष्ट्राला सादर करताना मोठा आनंद होत आहे. शंभर वर्षं हा छोटा कालावधी नसतो. त्यातही वेगाने बदलणाऱ्या आताच्या जगात तर नाहीच नाही. असं असताना एका नियतकालिकात छापून आलेल्या शब्दांची ताकद काळाला पुरून टिकून राहते. किंबहुना काळाच्या आताच्या वळणावर अधिकच महत्त्वाची ठरते, ही थोरवी खूप आहे. महाराष्ट्राने जपून ठेवलेला महाराष्ट्राचा ठेवा महाराष्ट्राला सादर करण्यासाठी आपण निमित्त असणं, ही माझ्यासारख्या साध्या पत्रकारासाठी मोठ्या समाधानाची गोष्ट आहे. संशोधनाचा आणि अशा प्रकारच्या संपादनाचा कोणताही अनुभव पाठीशी नसताना मी हे मोठं धाडस केलेलं आहे. प्रबोधन शताब्दीचा मुहूर्त गाठण्यासाठी काही महिन्यांच्या अवधीत जवळपास १४०० पानांचा ऐवज उभा करणं, हे मोठं आव्हान होतं. त्यात कोरोनाचा काळ परीक्षा बघणारा होता. छोटे छोटे संदर्भ मिळवण्यातही खूप अडचणी आल्या. टायपिंग, प्रूफरीडिंगसाठी बरीच धावपळ करावी लागली. कोरोनामुळे न सापडलेले चार अंक शोधण्यासाठी पुरेसे प्रयत्न करता आले नाहीत, याचीही चुटपुट आहे. आम्ही आमच्या परीने प्रयत्न केलेत. पण चुका राहून गेल्या असणारच. त्यासाठी आम्हाला माफ करा.

या ग्रंथांच्या संपादनाच्या धावपळीत प्रबोधनकार ठाकरे नावाचा डोंगराएवढा मोठा माणूस मला अधिक उमगत गेला. त्यांचा संघर्ष मला एक पत्रकार म्हणून ताकद देऊन केला. मी समृद्ध होत गेलो. त्यासाठी मी या ग्रंथाचा मनापासून ऋणी आहे.

सचिन परब
१५ ऑगस्ट २०२१

वाचण्याआधी

'प्रबोधन'चा पहिला अंक १६ ऑक्टोबर १९२१ला प्रसिद्ध झाला. मार्च १९३०ला 'प्रबोधन'चा शेवटचा अंक निघाला, तोही अंक थांबवण्याची कोणतीही अधिकृत घोषणा न होता. म्हणजे 'प्रबोधन' प्रसिद्ध होण्याचा एकूण कालावधी ८ वर्षं ५ महिने होता, असं म्हणता येईल. अर्थातच 'प्रबोधन' सलग प्रकाशित होत नव्हतं. त्यात पहिल्यांदा दहा महिन्यांसाठी आणि डिसेंबर १९२७ पासून दोन वर्षांसाठी 'प्रबोधन' बंद होतं. या कालावधीच्या दरम्यान प्रकाशन वर्षानुसार एकूण सहा वर्षं 'प्रबोधन'चे अंक प्रकाशित झालेत. त्यात 'प्रबोधन'चे एकूण ९५ अंक प्रकाशित झालेत. त्यापैकी ९१ अंक या 'प्रबोधन'मधील प्रबोधनकार' प्रकल्पासाठी उपलब्ध झाले आहेत. त्यातील पुस्तकरूपाने सध्या उपलब्ध नसणारे प्रबोधनकारांचे सर्व लेख तीन खंडांमध्ये घेण्यात आलेत.

'प्रबोधन'च्या अंकामध्ये असणारा प्रबोधनकारांचा प्रत्येक लेख जसाच्या तसा या खंडात घेण्याचा प्रयत्न आहे. त्यात इतर कोणताही निकष लावलेला नाही. उपलब्ध लेख अंकांच्या प्रकाशन वर्षानुसार एकामागून एक सलग मांडण्यात आलेत. त्याचं विषयवार कोणतंही वर्गीकरणही केलेलं नाही. हे लेख काळाचा संदर्भ समजून घेऊन वाचावेत, अशी अभ्यासकांकडून अपेक्षा आहे. वाचनाच्या सोयीसाठी सर्व छोट्या मोठ्या लेखांची तीन खंडांमध्ये मांडणी करण्यात आली आहे.

खंड १

'प्रबोधन'च्या पहिल्या दोन प्रकाशन वर्षांमध्ये पाक्षिक म्हणून प्रसिद्ध झालेल्या ४८ अंकांमधले प्रबोधनकारांचे लेख पहिल्या खंडात आहेत. हा काळ 'प्रबोधन'साठी स्थैर्याचा काळ होता. 'प्रबोधन'चं जन्मस्थळ दादरमध्येच यातले सगळे अंक प्रकाशित झालेत. त्यामुळे आपल्या ओळखीच्या परिसरात ओळखीच्या वाचकांपर्यंत 'प्रबोधन' पोहोचत होता. या काळात 'प्रबोधन'च्या कचेरीत येणाऱ्या दादरमधील तरुणांची एक संघटनाच उभी राहिली होती. तिच्यामधून 'प्रबोधन'ने हुंड्याविरुद्ध आंदोलन

चालवलं. सामाजिक, धार्मिक विषयांवर तिखट मतं मांडली. खोट्या इतिहासाविरुद्ध एलगार पुकारला. ते सगळं या खंडातल्या लेखांमध्ये आपल्याला वाचता येईल.

खंड २

स्वतःचा छापखाना हाती नसल्यामुळे 'प्रबोधन'च्या विस्ताराला मर्यादा येत असल्याचं प्रबोधनकारांच्या लक्षात आलं होतं. छत्रपती शाहू महाराजांच्या निधनामुळे स्वतंत्र छापखाना उभारण्याचं त्यांचं स्वप्न भंगलं होतं. त्यात सातारा येथील उद्योजक राजकारणी खानबहादूर धनजीशेठ कूपर यांनी छापखाना उभारून दिल्यामुळे त्यांनी 'प्रबोधन'चं स्थलांतर सातारा शहराजवळच्या पाडळी या गावी केलं. तिथे त्यांच्यासोबत कर्मवीर भाऊराव पाटील होते. कूपर यांच्याशी वाद होण्याआधी साताऱ्यातून 'प्रबोधन'चे १७ अंक निघाले. त्यापैकी ४ अंक आता उपलब्ध नाहीत. साताऱ्यानंतर चौथ्या वर्षी 'प्रबोधन' पुण्यातून प्रकाशित होऊ लागलं. आता ते मासिक स्वरूपात होतं. 'प्रबोधन'चे एप्रिल १९२५ ते मे १९२६ या चौथ्या प्रकाशन वर्षात १२ अंक प्रकाशित झाले. हा पुण्यातला काळ 'प्रबोधन'साठी प्रचंड संघर्षाचा गेला. त्या संघर्षाने प्रबोधनकारांना नव्याने लढण्याचं बळ दिलं. अत्यंत संघर्षमय असलेल्या तिसऱ्या आणि चौथ्या प्रकाशन वर्षांच्या अंकांमधले लेख या दुसऱ्या खंडात आहेत. त्यात प्रबोधनकारांचे काही इंग्रजी लेखही आहेत.

खंड ३

पाचव्या प्रकाशन वर्षातले १२ अंक आणि सहाव्या प्रकाशन वर्षातले ६ अंक अशा 'प्रबोधन'च्या एकूण १८ मासिक अंकांतले प्रबोधनकारांचे लेख या खंडात वाचता येतील. पुण्यातल्या वास्तव्याने प्रबोधनकारांना महाराष्ट्रातल्या समाजवास्तवाची खोल समज अनुभवता येत होती. त्यातून घडलेली विचारक्रांती या खंडांमधल्या लेखांमध्ये वाचता येते. त्यात 'देवळांचा धर्म धर्माची देवळें', 'दगलबाज शिवाजी', 'हिंदवी नीळकण्ठीझम', 'क्रांतीचे कुलपी बॉम्ब' हे लेख प्रबोधनकारांच्या विचारांचं दर्शन घडवणारे आहेत. त्यामुळे संख्येने कमी असूनही या खंडातले लेख महत्त्वाचे ठरतात.

काही सूचना

- 'प्रबोधन'मधील प्रबोधनकारांचे लेख सध्याच्या प्रचलित व्याकरणाऐवजी तेव्हाच्या म्हणजे १०० वर्षांपूर्वीच्या व्याकरणाप्रमाणेच इथे छापले आहेत, याची नोंद घ्यावी.

- 'प्रबोधन' सुरू असण्याच्या काळातही व्याकरणाचे नियम बदलले असण्याची शक्यता आहे किंवा प्रबोधनकारांनी स्वतःहून नवे भाषिक बदल अंकासाठी स्वीकारले असण्याची शक्यता आहे, त्यामुळे सुरुवातीच्या अंकांमध्ये असणारी अनुस्वाराची भाषा नंतरच्या काळात कमी होताना दिसते.

तसेच काही शब्दांचे उकार आणि वेलांटी यातही फरक आढळून येतो. अशा वेळेस मूळ प्रतींत जे आहे, ते आणि तेच ठेवण्याचा प्रयत्न केला आहे, याचीही वाचकांनी नोंद घ्यावी.

- तसेच काही शब्द वेगवेगळ्या पद्धतीनं लिहिले गेले आहेत, असंही निरीक्षण आहे. उदाहरणार्थ म्हणून आणि ह्मणून, सामाजिक आणि सामाजीक. असं आढळलेल्या ठिकाणी मूळ अंक प्रमाण मानण्यात आला असून त्यात असलेल्या शब्दांप्रमाणेच ते पुस्तकात येईल, याची काळजी घेतली आहे.

- मूळ अंकात कदाचित टाइपसेटिंगच्या झालेल्या गोंधळामुळे किंवा अन्य काही कारणांमुळे काही शब्द चुकीचे छापले गेले आहेत, असं जाणवलं. त्या अत्यंत स्वाभाविक चुका झालेले शब्द फक्त बदलून घेतले आहेत, उदा. धोडा ऐवजी घोडा.

- काही ठिकाणी उपलब्ध अंकांमध्ये एखादा शब्द, काही शब्द, काही वाक्यं किंवा काही पॅरेग्राफ वाचता येत नाहीत, तिथे तितका मजकूर तसाच रिकामा सोडला आहे. ✻ अशी खूण देऊन तिथे तसं स्पष्ट म्हटलं आहे.

- कोणताही लेख वाचण्याआधी शक्यतो, संबंधित लेख छापून आलेल्या अंकाचं वर्षं ध्यानात घ्यावं. त्यानुसार संबंधित काळाचा संदर्भ लावल्यास आशय आणि विषयाचं आकलन करणं सोपं जाईल, असं वाटतं.

- संपादक

प्रबोधन वर्ष ३

एकूण अंक १८

पहिला अंक : १६ ऑक्टोबर १९२२

अठरावा अंक : ४ जुलै १९२४

वर्ष ३ : अंक २ : १ नोव्हेंबर १९२३

अग्रलेख

गंधर्वांची आशा-निराशा

आजची तारीख १ नवंबर १९२ ३. आजचा दिवस सर्व मुंबई इलाखाभर इतक्या विलक्षण धामधुमीचा व गडबडीचा आहे की सूर्य उगवला कधीं आणि मावळला कधीं, याची कोणाला दाद रहाणार नाहीं. आज मान्यांच्या मानाचें मान ठरणार. लोकनेत्यांच्या नेतेपणाची कसोटी लागणार. पुढाऱ्यांचा पुढारपणा उकडून निघणार. देशसेवेच्या सकाम-निष्कामपणाची किंमत ठरणार. मरपुरीला अमरावति बनविणाऱ्या, ह्मणजेच परतंत्र हिंदुस्थानाला स्वतंत्र बनविणाऱ्या कौन्सिल-उमेदवार गंधर्वांच्या हृदयांत आज आशा-निराशेची तुंबळ तुफाने सूर्यास्तापर्यंत चालूं राहाणार. या क्षणाला आशा जबरदस्त, तर लगेच दुसऱ्या क्षणाला निराशेचा वरदहस्त. एरवीं तोऱ्यानें छाती वर काढून चालणारें अरेराव आज लोकमताच्या बिनमुर्बत झंझावातापुढें हीनदीन याचकाप्रमाणें 'गाय रे गाय' बनलेले दिसतील. सर्व इलाखाभर शेकडों गंधर्वांच्या खऱ्या खोट्या कर्तबगारीची कसोटी ठरविण्याचा अधिकार आज लोकमताला लाभल्यामुळें, निरक्षर शेतकऱ्यांपासून तों तहत् सात वर्षांवरील ग्रॅज्युएट मुरंब्यांपर्यंत सर्वजणांना आजचा दिवस ह्मणजे परमेश्वरी सत्तेइतकाच सोक्षमोक्षाचा वाटणें सहाजीक आहे. गेले सहा सात महिने गंधर्वांनीं लोकमताची आराधना करण्यांत आपल्या जिभेची टोकें झिजविली, लोकहितवादाच्या लांबलचक पुराणांनीं आपल्या श्रोतृवृंदाची अंतःकरणें भिजविली आणि प्रत्येक ज्ञात अज्ञात मतदार-देवाच्या पायांवर लोटांगणे घालतां घालतां आपली कंबर सुजविली. या त्रिविधा किंबहुना नवविधा भक्तीच्या तपश्चर्येचें फळ आपल्या पदरात काय पडतें? फुटकी कवडी कीं सोन्याच्या लगडी? या आशा निराशेच्या चढत्या उतरत्या भांजणीनें आज सर्व गंधर्वांची मने सूर्यास्तापर्यंत अत्यंत चिंताकूळ व त्रस्त असलेली सर्वांना दिसतील. हिंदुस्थान देश अनेक राजकीय क्रांत्युत्क्रांतीच्या समुद्र-मंथनाचें दिव्य भोगून पार पडलेला आहे. त्यानें भिक्षुकशाही सत्ता जशी अनुभविली आहे, तशी सरदारशाहीहि पाहिलेली आहे. त्यानें पंचायतशाहीचा जसा रसास्वाद घेतला आहे, तसा जन्मप्राप्त श्रेष्ठतेचा राजेशाहीचाहि कटु अनुभव चाखलेला आहे. त्यानें महंमद गिझनी किंवा नादीरशाहाची रक्तबंबाळ तलवार जशी सुखासमाधानानें आपल्या मानेवर फिरवूं दिलेली आहे, तशी अकबराच्या सर्वस्पर्शी न्यायी आलींगनाची मिठीहि कृतज्ञतेनें आपल्या सालस हृदयाशी संलग्न होऊं दिलेली आहे. त्यानें मऱ्हाठ्यांच्या गनिमी काव्याची झांप जशी सहज

लीलेने छातीवर झेलून धरली, तशी औरंगझेबाची मुर्दाड गिधाडशाही तितक्याच सहज सहनशीलतेनें थोपवून धरली. अशा अनेक स्थित्यंतरांतून हिंदुस्थान जरी टिकलेला असला, तरी एकंदर त्यानें खऱ्याखुऱ्या लोकशाहीच्या तत्वाचा परिचय करून घेण्यास नुकतांच कोठें आरंभ केलेला आहे. ब्रिटीश राज्यपद्धतींत कितीहि दोष कोणी दाखविले, किंवा ते कांही असले, नव्हे, आह्मी ह्मणतो बरेच आहेत, - तथापि लोकमतप्रदर्शक किंवा निर्णायक पार्लमेंटरी राज्यव्यवस्थेच्या कल्पना हिंदुस्थानांत ब्रिटिश राज्यपद्धतीनेंच प्रथम रुजत घातल्या आहेत, यांत मुळीच शंका नाही. लोकशाहीचें वास्तवीक स्वरुप जगांत कोणत्याहि राष्ट्रांत अझून व्यक्त झालेलें नाही. सरदारशाही व राजेशाहीच्या धुमाकुळांतच लोळत आलेल्या हिंदुस्थानांत लोकशाहीचें तत्व इतकें नवीन आहे कीं, देशाच्या राजकारणांत लोकमताचा कांही भाग आहे, त्याला त्यावर दाब ठेवतां येतो, आणि कायदे-कौन्सिलच्या विचारविनिमयाची पावलेहि त्याला नियंत्रित करतां येतात, ही भावनाच हिंदी जनतेची मनोवृत्ति बाचकविण्यास पुरेशी आहे. अर्थात् मनोवृत्तीच जेथे बाचकत आहे, तेथे विहित कर्तव्याची पावलें जरा चाचपडत पडणें अगदी सहाजीक आहे. लोकशाही तत्वें आतां नुकतीच कोठें हिंदी जनतेच्या कल्पनेला स्पर्श करीत आहेत. तीं पूर्ण पचनीं पडण्यापूर्वी बरीच विचारक्रान्ति व आचारक्रान्ति झाली पाहिजे आणि त्याला अझून बराच अवधि लागेल.

लोकशाही तत्वाची सध्याची येथली स्थिति मादक दारुप्रमाणें आहे. कधीच दारू न पिणाऱ्या मनुष्याला जसा तिचा नुसतां वासहि गुंगीला कारण होतो; किंवा जन्मदरिद्र्याला अवचित एकाद्या कोट्याधिशाच्या मांडीवर दत्तक बसण्याचा प्रसंग आला कीं तो संपत्तिमदानें बेहोष होतो; तद्वतच सध्यां लोकशाहीच्या नांवावर वाटेल तो धुडगूस सफाईत पचविला जात आहे. लोकशाहीच्या प्राणप्रतिष्ठेपूर्वी लोकमताला एक निश्चित शिक्षणाचे वळण लागावें लागतें. व्यक्तिमात्राच्या भिन्नभिन्न पिंडाप्रमाणें कितीहि प्रकृतिभिन्नत्व असलें, जगांत कोठेंहि अस्तित्वांत नसलेल्या जातिभेदाचा तुसडेपणा कितीहि भयंकर असला, आणि जातिभेदाच्या जोडीनें पक्षभेदाचा शेणसडा कितीहि माजलेला असला, तरी या अनंत भेदांच्या वावटळी राष्ट्रकार्यार्थ दडवून टाकणाऱ्या तेजस्वी राष्ट्रधर्माची प्रस्थापना झाल्याशिवाय, खऱ्या लोकशाहीची बीजें या भेदाळू भुमीवर मुळीच जीव धरणार नाहींत. प्रस्तुतचे आमचे गंधर्व या राष्ट्रधर्माच्या कल्पनेला अज्जीबात पारखे आहेत. निवडणुकीच्या चळवळीचें जो कोणी काळजीपूर्वक निरीक्षण करीत असेल, त्याला सांगणेच नको कीं प्रत्येक उमेदवार पक्षभेदाच्या नरकांतला किडा आहे. या नरकांतल्या किड्यांच्या हातून होणारी कृत्यें त्यांच्या वसतिस्थानाला शोभेशीच होणार. जनाच्या मनांवर आपल्या कर्तबगारीची छाप बसविण्यासाठी हे नाटकी गंधर्व इतक्या कांही चमत्कारीक चळवळींचीं नाटके रंगवितात, कीं तीं पाहून शिसारी येते. विशेषतः स्वतःचें स्तोम - मग तें पक्षाभिमानाच्या भडक रंगाचे असो, किंवा वैयक्तिक कर्तृत्वशक्तीच्या बेजबाबदार ढंगाचें असो, - तें माजविण्यासाठी हे गंधर्व जेव्हां एकमेकांस खाली पाडण्याच्या निमित्तानें आपल्या दिव्य अकलेचे तारे तोडतात व एकप्रकारचा इलेक्शनी शिमगा गाजवितात, तेव्हां तर पट्टीचा विवेकी सुद्धां क्षणभर संतप्त होतो आणि 'तुका म्हणे ऐशा नरा। मोजुनि माराव्या पैजारा' ही तुकोक्ती नकळत त्याच्या तोंडून बाहेर पडते.

'हिंदी जनता स्वराज्यास पात्र आहे.' 'स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे.' वगैरे सूत्रें व्याख्यानांच्या आख्यानांना रंग भरण्यास ठीक आहेत. पोटभरू हरदास सुद्धां बिदागीसाठी भक्तिरसाचा किंवा

शृंगाररसाचा असा कांही उठाव उठवितात की कथा संपल्यावर सारे श्रोते उद्यां पासून तुकाराम किंवा वल्लभाचार्य होणार, असेंच ज्याला त्याला वाटतें. पण जेथें 'मोलेंच घासले रडाया' तेथें 'नाहीं आसूं आणि माया' या परिणामा खेरीज अधिक काय दिसते बरें? तत्वें सत्य असतात. सूत्रें श्रवणीय, मननीय व आचरणीयहि असतात. सूत्रांची पारायणें करणारे पुराणेहि सांगतात. परंतु बहुतेक पुराणीक पुराणांतली वांगी पुराणांतच ठेवणारे व नाकाने कांदे सोलणारे कांदेपंडीत असतात. अशांच्या हातून जनतेला जसा अध्यात्मिक मोक्षाचा गडा हातीं लागणें शक्य नाही, त्याच प्रमाणे नुसती स्वराज्यावर कोरडी पुराणे झोडणाऱ्या स्वराज्यपुराणिकांच्या हांतून राष्ट्रोद्धार होणेंहि शक्य नाही.

राष्ट्र स्वतंत्र असावे. राष्ट्रांतली प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र असावी. स्वराष्ट्राची इभ्रत इतर सर्व राष्ट्रांनीं बिनशर्त मान्य करावी. या सगळ्या गोष्टी खऱ्या आहेत. वाजवी आहेत. परंतु-यांत एक 'परंतु' आहे. या 'परंतु' चा विचार मात्र कोणी करीत नाही. राष्ट्र स्वतंत्र असावे असे ह्मणणारेच हिंदी राष्ट्रांतल्या समाजांच्या व व्यक्तींच्या स्वातंत्र्या विरुद्ध खटपटी करतात. राष्ट्राच्या इभ्रतीविषयी घसाफोडीची व्याख्यानें देणारे वीरपीर स्वराष्ट्रांतल्याच लोकांच्या इभ्रतीला लाथेखालीं तुडविण्यास मागे पुढे पहात नाहीत. 'स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे' या सूत्राच्या जनकानें व त्याच्या अनुयायांनीं जनतेच्या सामाजिक व धार्मिक गुलामगिरी विरुद्ध काय कामगिरी केलेली आहे? का राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याला या दोन गुलामगिरींची बंधनें आडच येत नाहींत? राजकारणांत स्वातंत्र्य पाहिजे, तर तें सामाजिक व धार्मिक क्षेत्रांतच कां नको? राजकारणाला जर चित्तशुद्धीची व आत्मसंयमनाची आवश्यकता, तर समाज-सुधारणेच्या प्रश्नांकडेच हे स्वराज्यवादी 'अस्पृश्य' नजरनें कां पहातात? हिंदी राष्ट्राला स्वातंत्र्य पाहिजे, ते स्वयंनिर्णयी व्हावें, अशी हाकाटी करणारांच्या मुर्दाडपणामुळेंच ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादासारखीं अनेक खेंकटीं आज जन्माला आलेली आहेत. जातिभेदाचा प्लेग ब्राह्मणांप्रमाणेंच ब्राह्मणेतरांतहि बोकाळत आहेच. पक्षभेदाचा इन्फ्लुएंझा तर खुद्द राष्ट्रीय सभेच्या काळजाला जाऊन भिडला आहे. अशा अवस्थेंत या निरनिराळ्या राष्ट्रैक्यघातक रोगांचें समूल उच्चाटन करण्याच्या कामी कसलाहि संघटित व धडाडीचा प्रयत्न न करणाऱ्या गंधर्वांनीं कौन्सिल-निवडणुकीच्या हंगामांतच तेवढें जनसेवेचे व स्वराज्यसंपादनाचे नाटकी सोंग आणावे, हा शुद्ध दांभिकपणा आहे. लुटारूपणा आहे. सात्विक जनमताची शुद्ध भुलभुलावणी आहे.

शिक्षित लोक मानपानासाठी हांवरलेले तर अशिक्षित लोक शिक्षणाच्या अभावी बावरलेले. जनता जर साक्षर असती, तिला जर बरें वाईट समजण्या इतकी विवेक बुद्धी असती, आणि वाटेल त्या बडबड्याला आपला पुढारी मानण्याइतका मनाचा मेलेपणा जर तिच्यांत नसता, तर आशा निराशेची नाटकें नटविणाऱ्या विद्यमान गंधर्वांच्या मयचेष्टेला ती खास बळी पडली नसती! केवळ महाराष्ट्रापुरतेंच बोलावयाचें, तर जनतेच्या नाक्षरतेचा व भोळेपणाचा फायदा घेणारे लोकच फार. पुढारी अनुयायी स्वयंसेवक परिषद ठराव वगैरे शब्द अलीकडे आमच्या कितीहि परिचयाचे झाले असले, अगदीं जिभेच्या कातडीवर त्यांची बुरशी उठली असली, तरी या शब्दांच्या वास्तवीक स्वरूपाची व पवित्र जबाबदारीची कल्पना कोणालाहि नाहीं, असें स्पष्ट ह्मणावें लागतें. पुढारपणाचा उपटसुंभपणा मिरविणाऱ्या कांदेपंडितांनाच जर आपली जबाबदारी कळत नाहीं, कोणी कळविल्यास आचरणांत आणण्याची अक्कल नाही, तर अशिक्षित अफाट जनतेनें वाटेल त्या दे.भ. ला, फंड-गुंडोबाला,

शेमलेसरदाराला किंवा खादीधारकाला आपला पुढारी मानल्यास त्यांत आश्चर्यचकित होण्यासारखें काय आहे? पण ही चिळस आणणारी दुःस्थिति आतां फार दिवस टिकणे शक्य नाही आणि ती टिकूं देणेंहि योग्य नाही.

महाराष्ट्रांत प्रचलित असलेल्या कोणत्याहि पक्षाकडून खरीखुरी राष्ट्रोद्धाराची कार्ये होतील, असे वाटत नाहीं. मतभेदाच्या तत्वावर चालणारे पक्ष हे जगाच्या अंतापर्यंत चालणार आणि चाललेच पाहिजेत, त्याशिवाय कोणत्याहि कारणाच्या जिवंतपणाचा ओघ टिकणार नाहीं. मतवैचित्र्य बाह्यतः कितीहि विघातक दिसत असलें, तरी त्याच्या निष्ठुर चकमकीत पुनरुज्जीवनाची विद्युल्लता उत्पन्न होत असल्यामुळे, बाह्यांगीचा विघातकपणा अखेर विधायकपणालाच सहायभूत होतो. परंतु बाह्यतः अभेदाचे पांघरूण पांघरलेल्या, पण अंतर्यामी घाणेरड्या जातिभेदाने चिघळत असलेल्या ब्राह्मणेतर पक्षासारखें भेद शक्य तितक्या लवकर नष्ट करणें हे तरूण महाराष्ट्राचे आद्य कर्तव्य आहे. आजही ब्राह्मणेतर पक्षाची स्थिति पाहिली, तर उप्पर तो और बनी है, अंदरकी बात खुदा जाने. ब्राह्मणपक्षांतला चित्पावनी कावा आज ब्राह्मणेतर पक्षांत उघड माथ्यानें बोकाळला असून, जातिभेदा विरुद्ध आदळहापट करणारे वीरपीर आज प्रत्यक्ष जाति-मत्सराची भाषा वापरीत आहेत. सत्यशोधकांचा म्होरक्या म्हणून आजपर्यंत मिरवणाऱ्या भास्कराचीहि किरणें प्रस्तुत गंधर्वांच्या आशा निराशेच्या जलशांत जातिभेदाच्या काळ्याकुट्ट काजळीने स्पष्ट माखलेली दिसत आहेत. जातिभेद कायम ठेऊन पक्षभेद टिकवूं पहाणारे लोक एक तर बावळट असले पाहिजेत, किंवा अट्टल लफंगे असले पाहिजेत. असल्या बावळटांच्या किंवा लफंग्यांच्या हातून ब्राह्मणेतर जनतेचे कल्याण कितपत होईल, याचा ज्यांनी त्यांनी आपल्या मनाशींच अंदाज बांधावा. एकंदर परिस्थितीचा विचार केला तर ब्राह्मण झाले काय किंवा ब्राह्मणेतर झाले काय, दोघेहि जातिभेदाळू हिंदूच; अर्थात् सर्व दुःखांच्या मुळांशी कारण असलेल्या जातिभेदाच्या-निदान जातिमत्सराच्या विषारी खाणी सुरुंग लाऊन उध्वस्थ करण्याच्या कामी निराळीच एखादी बिनमुर्वत चैतन्यशक्ति अस्तित्वांत आली पाहिजे. जुन्या चिंध्यांच्या नव्या बाहुल्यांचा नंगा नाच आजपर्यंत झाला तितका पुरें! ही नवचैतन्य शक्ति अस्तित्वांत कशी आणावी; याचा विचार यथाक्रम वाचकांच्या सेवेला रुजूं होईल.

□□□

लेख

Today's Maharashtra

(No. 2)

The credit of organizing the Non-Brahmin Party goes unquestionably to the late Chhatrapati Shahu Maharaj of Kolhapur. As is common in India, the aims and objects declared at the inception of this party were radically liberal and all-embracing. The solidification of the unorganized Non-Brahmin population was a point attractive enough to many a rational mind and there were some Brahmins even who sympathised with the movement heartily. At the outset the cry of the party was against the social and religious supremacy of the Brahmins, especially the *Chitpawuns*, who are unfortunately the only inheritors of condemnation and shame brought to their lot by the treachery of their forefathers during the last days of the Mahratta Empire. But the cry was abstract, till several leaders came forth to give a definite bend to the new power which vibrated through the nerves and veins of the masses. The objects of the party can be tabulated as under :-

1. To relieve the people from the Priestly thraldom and to establish perfect social and religious freedom.
2. To bury deep the caste prejudices and solidify the Non-Brahmin communities in the strong body.
3. To overthrow the scriptural supremacy of the Brahmins in all walks of life.

Noble and praiseworthy were these objects and the whole country viewed with immense gratification the *Maratha* community stepping forth to realise them. (Here the term *Maratha* denotes a particular caste passing under that name, and not the Maharashtrians in general.) The caste-fellows of the Great Shivaji should thus rally round the holy standard of this movement was a sight worth the Angels to see at, and many right-minded people took it as the most blissful repetition of History, more especially so, when the great influential personality of late Shahu Chhatrapati moved in person through all the minor and major details of the propaganda.

Alike almost all indolent and luxurious Indian Princes, late Shahu Maharaja passed most of his precious days of life in doing nothing creditable outside his State. His zeal for public weal remained dormant till a few years before his lamentable death, though in thorough justification we must admit that he was studiously watching all the diverse

currents and storms which raged round his Royal Family and his person. Both were miserable and helpless victims of Brahmanic tyranny in social and religious matters, and the Brahmins were incessantly busy in blackmailing the Maharaja in thousand and one ways. The prudent Maharaja silently solved the intricate problem of the priestly mischiefs, found out a sure remedy to give a final death-blow to the Brahmanical thraldom under which the whole Non-Brahmin populace groaned for ages, and at last came out on the public platform with a definite scheme of arousing the public both from within and without his Native State. In and out of season, the Brahmins were not ashamed to belittle the dignity of his Royal Family by classing him and his caste-fellows the *Marathas* among the degenerated *Shudra* clan. The wicked priestly mischiefs which threatened the Coronation of Shivaji the Great in the 17th century, were continued unhampered and passed unprotested till yesterday, when Shahu Maharaja, with his noble scheme of the *Non-Brahmin Party* rushed forth like a furious lion out of his Kolhapur-Den and stood erect roaring on the plains of Maharashtra as the *Saviour of the People*, determined to break down the chains of their mental slavery. To set an example himself, he forthwith dismissed his Royal Brahmin Priest by confiscating his hereditory Jahagir, on the slightest impudence shown by him, and declared his religious independence. The brave Raja did not stop here. Patiently bearing all the poisonous shafts of scandal hurled against him by the Brahmin Journals of Poona and elsewhere, he steadily proceeded to bring about his ideals one after the other. The first powerful stroke of action, which brought him prominently to the notice of the public at large, *was the immediate eradication of Untouchability in Kolhapur State*. Without waiting for public sanction, or for what they generally call "the preparation of public mind", Shahu Chhatrapati issued a number of Government Orders in his State, removing the bar of education, public service, use of public wells and tanks, dispensaries & c. in favour of the helpless humanity classes as *untouchables* and inflicted exemplary punishments on those who either protested against or broke his Royal Commandments. It should be borne in mind that Shahu's crusade against untouchability preceded that by Mahatma Gandhi, whose saintly desires in this respect have now been disregarded by Congressite India.

Simultaneous with the Non-Brahmin Movement, another Sect of a still more radical type named *Satyashodhak Samaj* made its reappearance with exceptional energy and vigour. The *Satyashodhak Samaj*, which literally means *A sect seeking the Truth* was founded by late Mr. Jyotirao Phule 50 years ago. Late Mr. Phule was the Hindu Ingersol of the 19th Century. Though feebly educated, he succeeded in starting the *Satyashodhak Movement* in the face of extrmem odds and indescribable persecution at the hands of offended Brahmins. He recognized no superiority of the Brahmins, nor the inferiority of the Non-Brahmins. He condemned human agency between Man and God and believed in no holiness or sanctitude claimed by the Brahmins. He preached with forceful condemnation that the Caste System of the Hindus was a creation of the selfish Priestly mind and must be crushed at all costs, being the root cause of India's slavery and downright degeneration of the *Hindus*. He took a pride in calling himself a Hindu plain and simple. In an open Court of Justice, when questioned as to his *Caste and Dharma*, Jyotirao Phule bravely replied that he was *Man by Caste* and *Hindu by Dharma*. While struggling to seek the social and religious emancipation of the masses,

he left no stone unturned to provide means of education for the poor and oppressed brethren of Maharashtra. He was the first to start a small School for Female Education, facing all the while abusive rebuffs from the public as well as his relatives. Like a Martyr he paved the way of his favorite *Satyashodhak Samaj* through innumerable difficulties social and even political, and at last clinched a handful of followers. He wrote some tracts in Marathi and worked like a selfless Missionary to gain the public sympathy. After his death, the Samaj was almost in a pitiable lethargy, except a few admirers here and there, following his principles unnoticed. But no sooner Shahu Chhatrapati stood at the helm of the Non-Brahmin Movement, *Satyashodhak Samaj* re-appeared with double force and within a year or so whole Maharashtra became rekindled with its Ingersolic mission. The *Marathas* especially embraced Satyashodhak principles and many of their sectetarian Journals opened columns to publish news and notes of its spread throughout the country. Consequently, it was a riddle for many as to which was the Non-Brahmin Movement and which was Satyashodhak, so inseparably both were intermingled. The *Marathas* being strong in numbers throughout Maharashtra, and they being thus inspired by the radical rationalism of Phule's *Satyashodhak Samaj*, great hopes were entertained by many Reformers of the country, that the Golden Day of crushing the dirty caste system and soliditying the Hindu Society was last approaching, and that Destiny stood eager with laurels in hands to decorate the sturdy *Marathas* of Shivaji for having brought about this long cherished radical evolution for the good of India and the Indians. But :-

But-a very painful but it is! It is not always gold that glitters and it is never really a power which finds loud trumpetting in Party Papers. The Non-Brahmin movement is no doubt justified to some extent in its unanimous cry against the Brahmins. The ills which they attribute to the notoriety of the Brahmins - whether living or dead-are of such a nature that even without the least co-operation with the Brahmins, they can be eternally eradicated, if they but wished. The Brahmins care a rotten fig if their help is not sought for by their opponents in matters religious nor can they handicap or successfully oppose any activity started for social reformation independent of themselves. Every community is within its rights to evolve its units by any and every means possible. The Non-Brahmins are wrong when they hold the Brahmins alone responsible for preserving the Caste System. It is very easy to accuse others. The evils which have corroded the very foundation of India's national life were certainly not manufactured by Brahmins alone. Every Indian, every Hindu, is responsible for them. Let us take for granted that the caste system is the progeny of Brahmanic wickedness. What have the Non-Brahmins done to kill it? The *Satyasamajists* are bound not to observe caste system. Caste has no place in the Commandments of the Samaj. Have they truthfully followed them? Have the *Satyashodhak-Truth-seeking-Marathas* got rid of their blood-born caste ideas? Eh! Even the President of the Satyashodhak Samaj is not ashamed to dance to the tune of caste-superiority, while making capital for personal ends during the current council elections! Then why bang the heads of the Brahmins? Since the advent of the Non-Brahmin Movement, the Brahmins were in many parts of the country actually non-co-operated and bycotted. Let the caste-walla Bhuts die in their own homes. The Non-Brahmins were quite free to show to the world how they could kill the caste system which

the Brahmins so long preserved for their selfish ends? But they did not progress even an inch. They failed. They have failed not after putting in any efforts in the right direction, but on account of their being busy in manufacturing new methods and new ways to keep it intact within their own fold of Non-Brahmanism.

The Non-Brahmin movement showed some life while its patron Shahu Maharaja of Kolhapur lived. His liberal funds were flying from corner to corner of Maharashtra to keep it steady and working. No sooner the Royal purse was found open for all Jacks and Johns to insert their hands in, hundreds of mock volunteers and leaders cropped up in the Non-Brahmin camp. Journals for the party were started in thick succession. Weeklies, monthlies, Dailies and what not. In short, there gathered around the gracious Prince hundreds of Volunteers, both young and old, whose chief motive always hovered over the smooth rounds of Rupees, rather than the betterment of the people, for whose weal the Raja passed sleepless nights and worried days. With the sudden and unexpected death of Shahu Chhatrapati the Non-Brahmin Movement suffered a mortal shock. Since then various grave defects have become manifest, with which we will deal in our next issue uncompromisingly.

□□□

लेख

Today's Maharashtra

(No. 3)

When the Non-Brahmin Movement commingled with that of the Satyashodhaks, great hopes were entertained that the radical rationalism of the latter would go a great way in tempering the rigidity of the caste prejudices, at least in the Non-Brahmin camp. When Shahu Chhatrapati deported untouchability from his Kolhapur State, these hopes showed definite signs of justification. Externally the Non-Brahmin Party appeared securely united, but internally it was hatching new eggs of a different kind of burocracy, which was neither long * of that attributed to the notoriety of * with the wellknown Ma-* mobilised the Non-Brahmins * his caste-fellows the Marathas with * success and ease; but entirely failed in his project for want of the power of organization. In fact, he ought to have exercised utmost care in handling the new powerful elements which gathered round him. The Marathas by nature are a very impulsive people. They can be quickly set astir and mobilized in strong numbers, if any one correctly touches the cord of their sentimentality; but they horribly lack the faculty of organization and a will to take the initiative. We can quote instances in justification of our statement. Why? The mess they have made of the Shivaji Memorial of Poona is an iastanee in sight. When Shahu stood to the front of this movement, he did not at all take the trouble of surveying the situation whither he himself was drifting and taking the ignorant masses behind. Particularly he slept over the secret motives of his comrades and lieutenants, not to talk of the rough element of his followers. His ideas about the mission in hand were, as is ever the case with human beings, quite abstract and undetermined, with one exception of his open declaration to overthrow the supremacy of the Brahmins at any cost and by any means. These *any means* lured him not to test the correct nature of the rough element which pretended his following, simply for the sake of silver coins which jumped out of his gracious Royal purse whenever required. Shahu was sorely duped by these pretenders. With his death this fountain of money has now been dried and with it the congestion of the Non-Brahmin *Leaders* is fast evaporating. To speak the truth there are now no leaders in this camp. All are leaders without followers.

---

* उपलब्ध झालेल्या अंकातील वाक्ये व मजकूर वाचता येत नाहीत.

Shahu enthusiastically espoused the cause of the Satyashodhak Samaj. His liberal bounties created numerous Samaj Centres throughout the Deccan. He never however thought it his duty to see whether his donations and sympathies were made proper use of or not. Consequently hundreds of vagabonds with the mask of Satyashodhak commenced their devil dance throughout the Deccan. They knew nothing of the principles of Samaj except condemning and terrorising the Brahmins in all ways available. *Down with Brahmins* was and still is their motto, no matter what the tenets of the Samaj may be. Naturally this movement got wild and reports of atrocities committed on the Brahmins by the Satyashodhak Samajists began to flood the newspaper columns. In about a year or so, Shahu realised the coasequences of this movement, and in order to save his skin made a public declaration in papers to the effect that he *never belonged to the Satyashodhak Party and refused to bear any relations to that movement.* This declaration was translated by many people in many shades of meanings; but it is an open secret that it made very little impression on the activities of the *Samajists*. Whatever may be the truth, it is a plain fact that this declaration was merely a political necessity. The wrong selection of comrades and followers at last showed some worst features of this movement to Shahu. The leaders of the Samaj were the human-bees humming round the Prince for the honey of money, while the followers were inwardly false to the mission they professed. As said before, the principles of Phule's Satyashodhak Samaj are of such a radically rational type, that people of some recognized standard of education and culture were needed to handle them prudently and sincerely. Of course when illiterate and rude people in hundreds and thousands came forth as *Samajists*, thoughtful people were quick to foresee a great danger lurking under the surface of the movement. The prophecy came out true to a word. The Samajists do not care to study-study they can't, being either illiterate or ignorant-or follow the commandments of their professed Sect. They know only this much. At any rate the Brahmins and those who *look like Brahmins* both in education and culture must be brought down to their knees, matters not whether the means are just or unjust. Prabodhan, as the whole Maharashtra now knows, holds no brief for those Brahmins who still behave in society with Natuite mischiefs in their brains and Peshwaite heart within. We have mercilessly exposed such creatures wherever and whenever met with. We have no sympathy even for those holy-looking priests of the villages and towns, who have made it their business for generations past to rob the poor and ignorant rayat by this means or that. We are further deadly against any Brahmin or Non-Brahmin community exercising its social or religious supremacy in the Hindu Society; for we are convinced that all are slaves of the English people and as Indians they have no value in the World's bazar of Nations. Equally, we view with pity poor Jyotirao's laudable tenets of Satyashodhak Samaj so wickedly disregarded and insulted by the socalled mock Samajists of the Deccan. Compared with the volume of turmoil created by them, they did not show a single instance of relief offered to the ignorant masses, either in the eradiction of that much cried Mental Slavery or religious aggrandisement. To cut the matter short, let us say in fairness to truth, that this movement is nothing short of a bubble created by interested people of a peculiar bend of mind, for achieving what God alone knows not they! None of them has yet brushed off his Hindu mentality in respect of untouchability. Lately in submission to popular demand when

Government issued orders to grant equal treatment in schools to the boys and girls of the untouchable classes, many wellknown centers of Satyashodhak Movement took the lead to oppose those orders. What a comfort this conduct of the followers doth give to the departed soul of Shahu Maharaja!! Indeed, rationalising the Hindu Society is a Herculean task and martyrs of some special mettle are needed to sacrifice their all for the achievement of the object. If the Satyashodhak Movement had been carried out by sincere and selfless workers in right earnest, probably the people of Maharashtra would have been hundredfold blessed with a new phase of appreciable *cosmopolitanism* so much needed to build the Indian Empire of tomorrow. But the Satyasamajists too are after all caste-ridden Hindus top to toe.

While prattles of throwing off the yoke of priestcraft and granting complete religious freedom to the people were being baked on the ovens of speechmaking, Shahu Maharaja took another hasty and imprudent step. In imitation of Brahmin Jagad Guru he created quite a new religious Head (?) called *Kshatra Jagad Guru*, who, he declared, shall govern the religious conduct of all the Kshatriyas. Shahu knew well that though he ventured to title the new Pore as Kshatra Jagadguru, the non-Maratha Kshatriya communities of Maharashtra would never submit to his spell to admit the Jagadguru as their religious Head; and consequently he had no alternative but to clear the situation by declaring that *Kshatriyas means the Marathas*. As soon as this new doll of Jagatguru was stuffed up by the Shahu and placed on a *gadi* worth a few thousands of Rupees a year, all the Marathas, who till then posed as staunch Satyashodhaks, threw away their mask and bowed prostrate before the new Divinity in shameless defiance of the tenets of the Satyashodhak Sect. This set several Non-Brahmin journals-both honest and dishonest Samajists-to wage a furious war over the utility and futility of the New Pope and their wrangles have now bombed to pieces the trumpetted unity of the Samaj as well as the Non-Brahmin Party too.

The state of the Non-Brahmin Party is not now satisfactory. From the very beginning they conducted the affairs of their League and propanganda in a disorganized manner. They have no constitution well drafted. The leaders neither cared to win the sympathies of all the non-Brahmin communities to their cause and mission, nor did they define what castes fell under the category of Brahmins and non-Brahmins. While stumping their feet against the Brahmanical burocracy, none of the leaders ever took the trouble of studying the grievances of several Non-Brahmin communities as regards their social and religious sentiments. The Marathas, forming the major bulk of the Party, presupposed that they could safely represent all the Non-Brahmin communities in Maharashtra in all respects. Not even this, but as the present situation proves, they actually concentrated their energies to develope their own communal powers under the garb of Non-Brahmanism. The Party, the League, the Conferences, all were mere-farces. The Hindu idea of Caste-predominance secretly throbbed through all these activities and during the recent Council Elections, many Marathas actually made speeches to the effect that Non-Brahmins means Marathas. Such an attitude has at last resulted in estranging the Jain and Lingayat Communities along with many others, and today the Party exists in but a name only. Already its Captain-the President of the League-has been captured by the Bombay Liberals, co-operation with whom was bitterly hissed at by the Party. The

Vice-President-a Parsi gentleman-still hopes to serve the Non-Brahmin Party by clinging to his crumbling chair, while the Hon. Secretaries of the League are yet to be traced. Pardon! One Secretary inspite of the League Council's advice, stood to contest the council elections as an *independent candidate*, while the two candidates recommended by the Council growled against each other during the Election Season. In conclusion, we can only say that the Party is now split up in several factions and wields no influence over the public mind. Of course, journals started to represent the Non-Brahmin Party must anyhow cry aloud to tell the world quite the reverse; but fact is quite otherwise. Party, Thy name is treachery to Democracy!!

□□□

लेख

Day By Day

Journalists' Association

We offer our sincere thanks to our Bombay Brothern who have at last succeded in forming a Journalists' Association for the Presidency. Like all other professions, journalism too is in bad need of a representative body to safeguard its interests and pilot its footsteps. In America they have progressed so far as to prepare a Code of Ethics for the Journalists. In India we have none of the kind. The Bombay Presidency Press Association (we do not know if it exists) partially represented the Presidency Journals; but the Association now formed will, we believe, bring into a focus the scattered forces and disconcerted voices of the Presidency Journalism. We learn with gratification that the organizers of the Association are going to convene a Conference of all Journalists in the near future. If they are genuinely sincere in what they propose to do, perhaps the Conference would result in concentrating a very powerful intellectual force which guides the destiny of India. Economic competition, Party Politics, Communal jeolusies and many other items of differences may remain or may go; yet none should overlook the fact that inspite of these thorns in our way, the Indian Journalists' interests and ideals are one. The quill which moulds the public mind, must also mould the destiny of the Nation. And while doing so, it must face the wrath and twisting of the Law of Burocracy. If the proposed Journalists' Conference adopts some such measure for common guidance like the Kansas Code of Ethics, with suitable modifications, we have no doubt, it would be a Golden Chain to keep all the units of this powerful profession in perfect harmony so far as its purity and dignity is concerned.

Centenary of Malhar Ramrao.

On 20th October, Kayastha Prabhu Mitra Mandal of Baroda, on the initiative of the local energetic student of History Mr. Vakaskar, celebrated the centenary of Mulhar Ramrao Chitnis, the first Marathi Historian of Maharashtra. Mr. Sardesai, the famous Marathi Historian, occupied the chair. Whatever may be the erudite opinion of Prof. Jadunath Sarkar regarding Mulhari Chitnis' Bukhurs, which he describes as "often deliberately false", he must admit that had it not been for Mulhari's literary efforts,

Maratha History would have been a Myth and perhaps our learned Sarkar would not have hesitated to paint it in still more black colours of falsehood and degeneration, on the evidence of his favourite chroniclers of Persia, Aiganistan and Andmans. In the eyes of the exalted Bengal Professor Marathas and their history may look pigmy and childish; but with due respect to his erudition, we must point out to him that Maratha Mind and Maratha Chivalry are yet sealed books to brother provinces. He cannot feel what spirit is there in the name of that Great Worthy whom he is always pleased to call by the diminutive name *Shiva*. Likewise, simultaneous with the sword of "Shiva" Prof. Jadunath cannot fully grasp what chivalrous part the quill of Balaji Avji Chitnis and his illustrious decendants like Mulhar Ramrao has played in painting the Marathas of the past 3 centuries. We give below a short summary of the utterances of Mr. Sardesai, whose authority on Maratha History still remains unquestioned, at least in Maharashtra; for we do not know whether his works fare well or ill with the learned Professor's critical judgement. Mr. Sardesai said :- "When one reviews the history of the *Chitnis Dynasty*, he cannot but be struck with wonder by the unbroken and continuous chain of illustrious men. Scarcely can we find in the history of the world, one dynasty producing chivalrous men from generation to generation, but Chitnis Family is an exception. Balaji Avji, Khundo Bullal, Jivaji Khando, Ramrao Jivaji, Mulhar Ramrao, Bulwant Mulhar, Khanderao Balwant alias Dhanisaheb (died 1917), and Mulhar Khanderao (of Amraoti) all were learned, brave, patriotic statesmen, and loyal devotees of the Maratha Empire. Even the present scion of this family Mr. Nurhar Mulhar Chitnis still retains all these enviable qualifications of heart. Another striking point found in this particular family is that none of the members have ever been reported to be vicious. Mulhar Ramrao-the hero of today's centenary-hailed from this illustrious Dynasty and he wrote the Bukhars of Maharashtra long before Grant Duff lifted up his pen to sketch his memorable "History of the Marathas." Had it not been for those commendable and untiring efforts of Mulhar Ramrao, it would have been very difficult for Grant Duff to progress in inch. Prior to the writing of his Bukhars, Mulhar Ramrao had prepared several jottings, which are now available, and they convince us of the labours he invested in preparing the foundation of the Maratha History. During his life time, Malhari was lowered into the estimation of his Master and lost his estate, which resulted in numerous miseries around him. His son Bulwantrao Mulhar served his Master Pratapsinh Maharaja the unfortunate King of Satara most ably, and sacrificed his all during the troubles which sought at last the ruin of the Maratha Empire. His grandson late Mr. Mulhar Khanderao is remembered throughout Berar as a learned leader, generous public servant, and a poet and writer of reognised merits. Sambhaji though ordered Balaji Avji to be trampled under the feet of elephant, Khundo Bullal connived at the mortal incident, and without the least scruple, served his Master with undiminished loyalty and patriotism. Herein lies the secret of the Chitnis Family. None of them ever cared for individual weal or woe, but concentrated all their energies towards developing the interests of Swarajya." A fair and impartial judgment this is.

Memorials-A slave mentality

We congratulate the public of Bombay and the Nationalist Corporators for having quashed the silly proposal of presenting a memorial to the rising Governor. We have

before us the draft of the memorial published in Times of India dated 9th instant, and we find nothing but dry loyal philosophy throughout. If any one collects all such silly documents presented to all the rising and setting Governors of this Presidency, he will have a very interesting stock of sugar-coated words dribbling with slave mentality. We cannot understand what special objects of public welfare are achieved by such a downright flattery hurled on the backs and faces of setting and rising luminaries of the burocrary! These honorable officers like the Governors and Viceroys come and go, not for the salvation of the Indians, but for the fulfilment of their political duties and political aims. They are the big wheels of a huge political machinery, known throughout the world by the name of *British Diplomacy*. The teeth of these wheels are securely adjusted in other bigger and biggest wheels of proportionate dimentions, and they cannot move an inch outside their alloted vortex, even if they wished to. In the draft memorial we find one stale and sapless paragraph which we remember to have read in about hundreds of such documents, perhaps cloathed in different words and phraseology. It runs thus :- "You come to us, sir, with a unique experience (all the former Governors possessed this. Ed. P.) *of public affairs and in the very responsible and difficult position.* (Indeed it is so, no doubt. Ed. P.) *which Your Excellency is called upon to fill. Your knowledge of men and affairs and Parliamentary practice.* (There is some magic charm no doubt in this word. Ed. P.) *will prove invaluable* (Surely Mr. Writer of the draft. Ed. P.) *in the solution of the many complex problems* (Not so complex as the mentality of the loyal memorialists. Ed. P.) *with which Your Excellency's Government will be confronted. We look forward under Your Excellency's regime to an era of wise, enlightened and sympathetic administration."* Optimism too has its limits. If stretched too far, it degenerates into ridicult. We are expecting the dawn of the said Era for the last twenty years and more, but we find nothing but darkness. Every incoming Governor was trumpetted to be the herald of this Era in similar stereotyped expressions; but let the memorialists ask their conscience, if they have it, whether their trumpetting was ever justified. The loud prophetic talk of "an era of wise, enlightened and sympathetic administration" has become quite a habit with Bombay memorialists since the days of late Pherozsha Mehta. Sooner we stop deceiving ourselves and the people by such vain and slavish expressions the better. Whether memorialised or not, Odwayers cannot be washed to the purity of Lord Hardinge, nor the latter's lovable memories wiped off from the minds of Indians. India cannot any longer tolerate such silly farces of singing songs of vain praises, while she suffers from innumerable chronic diseases and bleeding wounds of insults hurled on the face of her sons and daughters within and without her boundaries. British diplomacy, Thy name is phantum! And Bombay Memorialists, You have lost your hearts, or you have perhaps none at all. Do you mean to say that Bombay has lost its tradition of gratefulness and appreciation for wise and enlightened administrators of the Presidency? Not at all. Look how Lord Hardinge sits on the Throne of Indian Heart, worshipped every moment with undiminished love and loyalty. Did that Viceroy care for any such silly piece of flattery as is evinced by your Scrap?

□□□

निवेदन

Press Owners, please take note

Our Satara Printing Works is quite a new printing concern started near the Railway Station on a MAIDAN which was a waste land till last year and which we now are developing into a nice little colony, in association with Satara Industrial Works (a big manufacturing concern of Iron Ploughs and several other agricultural implements) to whom goes the credit of this colonization. In response to our adveertisements several workers in the printing press line came and joined us. Major portion came from Poona. Alike all other business fields, the Press too holds a number of vagabonds and cheaters, who always hunt after new jobs to save their skin and continue their mischiefs. Unfortunately, we had a very bad experience with the undermentioned people and we think it our duty to warn our Business Brothers to take note of them. There is, we hear, an association at Poona, started to represent Workmen in Press line. We do not know if they have yet thought over such difficulties of the Press Owners, and kept a record of such people whose mischiefs are sufficient enough to blackmail the true interests of good workers, whom probably they profess to represent. It is not our desire to expose the whole record of mischiefs committed by the following men dismissed by us; many Poona Presses know what they are. Unless there is an institute or association keeping a vigilant watch over the mischief-mongers, and exposing them to the notice of the Press Owners from time to time, the dignity and discipline of this particular line of business is sure to go to dogs. We are prepared to help such an institute, if one is started or seeks our help. In the meanwhile, let out co-business brothers take note of the following men, who might now be hunting some other Printing House to continue their mischiefs.

1. Dattatray Ramchandra Parvate, Compositor.
2. Kisan Ramchandra Parvate, Compositor.
3. Pirajirao Sadashiv Jadhav, Compositor.
4. Vithal Tukaram Salunke, Binder.
5. Narhari Tukaram Bhosle, Binder.

□□□

लेख

नरकासुरच मरत नाही! मंगलस्नानें कशाचीं करतां?

मनुष्याचें मन आणि त्याचे व्यापार हा अभ्यासाचा एक अत्यंत चित्ताकर्षक विषय आहे. तत्ववेत्त्यां जनांनीं या विषयाची आमूलाग्र छाननी करून, प्रगमनशीलतेची बिनचूक गुरुकिल्ली ह्मणजे 'आधीं मन मुंडा' हा संदेश सर्व मानव जातीला कधीच देऊन ठेविला आहे. मात्र व्यवहारमग्न माणसें या संदेशाला पाठमोरीं होऊन, प्रगतीचा मार्ग चोखाळण्याचा यत्न करतांनाच दिसतात. हातांतला दिवा विझवून अंधारांत मार्ग हुडकिण्यासारखाच हा प्रकार आहे. मनुष्याच्या वैयक्तिक वा सामुदायिक चढपडीची मख्खी त्याच्या मनांत आहे. उन्नतीचा धवलगिरी गांठणे किंवा अवनतीचे पाताळ पहाणे या दोनहि गोष्टी मनाच्या उच्च नीच मुरडीवर अवलंबून आहेत. आपण इंद्रधनुष्याच्या विविध रंगश्रेणीचें मोठें कौतुक करतों. पण आपले स्वतःचें मन किती विलक्षण रंगाढंगाचे माहेरघर आहे. याचा आपण कधींहि विचार करीत नाहीं. एका निमिषार्धात या मनाच्या रंगाचे किती चमत्कारीक पालट झपाझप होत असतात, हें कोणी अजमावण्याचा यत्न केलाच, तर नित्यनैमित्तिक व्यवहारांच्या धांगडधिंग्यात सुद्धां आपल्या 'मनोमीटर' यंत्रातल्या विकारकांट्याचा नंगा नाच आपल्या अंतश्चक्षूंना स्पष्ट दिसेल. पुष्कळ वेळां अपयशी व निराशाग्रस्त मनुष्य बाह्य परिस्थितीला दोष देतांना आढळतो. अपयशाची जबाबदारी स्वतःवर यत्किंचितहि चिकटूं न देणे हा सुद्धां मनाचाच एक (अ)धर्म आहे. परंतु बाह्य परिस्थितीचा जन्म मनाच्याच पोटीं झालेला असतो, याची मनच दख्खल ठेवीत नाहीं, हा देखिल एक मनोव्यापाराचाच चमत्कार आहे. हिंदुस्थानचें वर्तमान पारतंत्र्य इंग्रेजांच्या व्यापारी तागडीनें उत्पन्न केलेलें नाहीं. मराठी स्वराज्य एल्फिन्स्टनच्या लेखणीच्या फटकाऱ्यापुढें ठोंकर खाऊन रसातळाला गेलेलें नाहीं. हिंदु जनांची आजची सर्वस्वीं दुर्बल स्थिति विलायती व्यापारानें किंवा इतर कोणत्याहि परकीय शक्तीनें आणलेली नाही. याला जबाबदार कारण जर कोणतें असेल, तर तें हिंदी लोकांचें मनच होय. या मनानें कच खाल्ली ह्मणून स्वातंत्र्यानें कच खाल्ली. या मनानें सामाजिक व धार्मिक पारतंत्र्याचें भूत निर्माण केलें, ह्मणून राजकीय गुलामगिरी त्याच्या छातीवर येऊन बसली, मनाची शक्ति अनंत आहे. मन जर मनांतच आणील तर वाटेल त्या बाह्य परिस्थितीचें रूप क्षणार्धात आरपार उलटें सुलटें करील. मनाला कल्पतरूची उपमा अनुरूप साजते. जशी इच्छा तसें फळ. हिंदु जनांच्या मनानें सामाजिक

श्रेष्ठ कनिष्टपणाच्या पायऱ्या ठरविण्यासाठी ब्रह्मसुखोत्पन्न ब्राह्मणांच्या मुखांतून गळलेल्या पाचकळ स्मृत्यांची कारटीं उरांशी आवळतांच, तें तात्काळ गुलाम बनलें. त्याचा ईश्वरदत्त स्वयंनिर्णयाचा प्राण निघून गेला. सारासार विचाराचा देह सडून त्याला स्वार्थाची कीड लागली. अखिल मानवतेला अभेद भावानें आपल्या छत्राच्या छायेंत घेणाऱ्या हिंदु धर्माच्या व्यापक बुद्धीच्या चिंधड्या चिंधड्या उडाल्या, खुद्द मनाचेंच क्रीडांगण संकुचित होत जाऊन, जागच्या जागीं त्याची गळचेपी होऊं लागली. अशा अवस्थेत निर्वाणीचा थैमान करीत असतीं, हिंदु मनानें मानच धर्माबरोबरच स्वतःच्या राष्ट्रधर्मांच्याहि मानेला नख देण्यास कसूर केली नाहीं. त्याचा परिणाम आज आमच्या सर्वांगीण गुलामगिरीच्या रूपानें साऱ्या जगांत 'हिंदु ह्मणजे जगाचा गुलाम' अशी नाचक्की करीत आहे.

हिंदुस्थानवासियांना स्वयंनिर्णयाची आतां तहान लागली आहे. त्यांना स्वराज्याची कडकडीत भूक लागली आहे. त्यांना परराष्ट्राच्या मैफलींत बरोबरीच्या मानाची खुर्ची पाहिजे. हिंदी राष्ट्राच्या तिजोरीच्या किल्ल्या स्वतःच्या कमरेभोंवतीं खुळखुळाच्या; हिंदी राष्ट्राच्या संरक्षणाचें लष्कर व शिबंदी स्वतःच्या नजरे खाली रहावी; आणि आपल्या राष्ट्राच्या सर्वांगीण भवितव्याच्या कणकेचा गोळा आपल्याच हाती रहावा, असें त्यांना वाटत आहे. ही महत्वाकांक्षा स्तुत्य नाहीं, असें कोण ह्मणेल? पण स्वयंनिर्णय आणि स्वराज्य या गोष्टी जिवंत मनाला जशा भाळतात, तशा मेल्या मनाच्या घाणीपासून शंभर योजने दूर पळतात, हा निसर्गाचा नियम आहे. या मेलेल्या मनानें हिंदूंना स्वतःच्या देशांत, स्वतःच्या समाजांत, स्वतःच्या कुटुंबांत गुलामांचे गुलाम बनविलेलें आहे. देशांत भेद, समाजांत भेद, कुटुंबांत भेद, फार काय पण खुद्द स्वतःच्या मनाचा मनाशी भेद, असे अनंत भेद-पर्वत हिंदु मनानें आपल्यासभोवार उभे केले आहेत. धर्मासारखा सर्वव्यापी विषय, पण त्याला सुद्धां या गुलाम मनानें गुलाम करून सोडला आहे. हजारों पंथ आणि संप्रदायांच्या घणांचे घाव घालून त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडविल्या आहेत. जातींची संख्या दिवसेंदिवस सपाटेबंद वाढत असून, कांही कांही जातींची लोकसंख्या अवघ्या पांच सहा घरोट्यांपर्यंत येऊन भिडली आहे. त्याच्या परस्पर उच्चनीचतेच्या भावना, त्यांचा मत्सर, समाज धर्माच्या त्यांच्या संकुचित कोत्या कल्पना, इत्यादि अनिष्ट गोष्टींनी आजचा हिंदु समाज अत्यंत जिकिरीच्या कष्टमय भेदांत पचविला जात आहे. हिंदुस्थान हे एक राष्ट्र आहे. ती आपली जन्मभूमी आहे. नित्यनैमित्तिक कर्त्तव्य धर्मांप्रमाणे या जन्मभूमीविषयीं आपलें कांही तरी विशिष्ट व श्रेष्ठ दर्जाचें कर्त्तव्य आहे. निरनिराळ्या शेंडी दाढीवाल्या धर्मप्रवर्तकांनी सनातन इस्लाम जैन शीख महानुभाव असले कितीही धर्मपंच 'युग* रूपत' अस्तित्वांत आणलेले असले तरी त्या सर्वांवरहि ताण करणारा एक उज्वल राष्ट्रधर्म आहे. ही जाणीव, मुंबई पुणें नागपुरासारख्या मोठमोठ्या शहरांना तेरड्याप्रमाणे नित्य उपटणाऱ्या चळवळींत, वन्दे मातरमच्या घसाफोडी आरोळ्या ठोकणारांनाच जर होत नाही, तर बहुजनसमाजाच्या मनापर्यंत त्या कल्पनेचे वारें कसें जाणार? आणि यदाकदाचित गेलें किंवा मारून मुटकून नेलेंच तर जातिभेदालाच-नव्हे, जातिमत्सराला-देव समजून कंवटाळणाऱ्या लोकांना तो कसा पटणार? जातिभेदाविरुद्ध बराच ओरडा सुरू झाल्यामुळें हल्ली त्याच्या धिंगाण्यानें एक नवीन रूपांतर केलें आहे. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाच्या चालूं चळवळी नीट प्रत्यक्ष पाहिल्या तर असें आढळून येईल

* उपलब्ध झालेल्या अंकात वाक्य वाचता येत नाही.

की कोणत्याहि पक्षाची पावलें 'जनतेचे नांव आणि जातिवर्चस्वाचा ठाव' असल्याच तालठेक्यावर पडत असतात. पक्षाचे नांव ब्राह्मणेतर आणि धिंगाणा मात्र जातिवर्चस्वाचा; या गोष्टी निरक्षर व अज्ञान जनांच्या हातून घडत्या तर त्या क्षम्य अतएव दुर्लक्ष्य ठरत्या. पण खुद्द पुढारीब्रुवच जेव्हां ब्राह्मणेतर पक्षाचे उमेदवार ह्मणून डोक्यांवर पाट्या मारून निवडणुकीच्या पाटाला उभे राहतात आणि 'जो मराठ्याच्या बीजाचा असेल तो मराठ्यालाच मते येईल' अशा अर्थाचा तोंडी व लेखी डांगोरा पिटतात, तेव्हां मात्र त्यांच्या जातिभेदाळू मनाची घाण सहन होत नाही. ब्राह्मण जाति दुष्ट ह्मणून सुष्ट ब्राह्मणेतर पक्ष निघाला. त्यांतहि भिक्षुकशाही आहे व जातिभेदहि आहे. सारांश, जातिभेदाने कुझलेली नादान हिंदु मनोवृत्तीच आमच्या फाटाफुटीला मुख्यतः जबाबदार आहे. अशा अवस्थेत कोणी कितीहि उन्नतीच्या व स्वातंत्र्याच्या वल्गना करो, त्याला लफंगा ह्मणून खड्याप्रमाणे निवडून काढणेच श्रेयस्कर होईल.

जगाच्या राष्ट्रसंघांत प्रामुख्यानें पुढें पुढें मिरवणारी इंग्लंड जपान अमेरिकेसारखीं राष्ट्रें आज जी वरचढ व सवाईसोट्या होऊन बसलीं आहेत, त्यांनी आपल्या राष्ट्रधर्माचें स्वरूप इतकें कडकडीत व जाज्वल्य राखलें आहे की राष्ट्रधर्मापुढें ते समाजधर्म, आत्मधर्म, मातृपितृधर्म, पतिपत्नि धर्म, कसलाहि आणखी धर्म मानीत नाहीत. जपाननें तर जातिभेदाच्या थडग्यावरच आधुनिक दाय निप्पोनच्या नवजीवनाचा पाया उभारला. रूसोजपानी युद्धांत जपाननें आपल्या राष्ट्रधर्माची कमाल शिकस्त करून दाखविली. रणशूर नोगीनें खास हुकूम सोडून सातहि पुत्रांना गोलंदाजाचें काम करतांना मायभूमीच्या चरणी अवघ्या ३० मिनिटांत अर्पण केलें. शेकडों जपानी तरुणींनी रूढी व धर्माची पर्वा न करतां रशियन लष्करी अधिकाऱ्यांबरोबर लग्नें लावली व ऐन युद्धाच्या सुरुवातीला राष्ट्र धर्माला अनुसरून रशियाच्या सर्व राजकीय बित्तंबातमीचा तपशील जपानला कळविण्यासाठी परत मायदेशी आल्या. महाराष्ट्रांत शिवकाली नामधारी हिंदु धर्मापेक्षां शिवानुयायांना अस्सल राष्ट्रधर्माचीच महति जास्त वाटली ह्मणून शिवाजीचे शिवराज्य अस्तित्वांत आलें. नेताजी पालकर पडेल तितक्या प्रसंगी मुसलमानी धर्माची दीक्षा घेत होता व पुन्हा हिंदु होत होता. त्याला राष्ट्रधर्मापुढें या क्षुद्र धर्मांतराची किंमत फुटक्या कवडीचीहि वाटत नव्हती. गेल्या महायुद्धांत इंग्लंडचे तरुण व वृद्ध लढवय्ये समरांगणावर धाऊन जातांच, इंग्लिश स्त्रियांनी भराभर त्यांच्या निरनिराळ्या व्यवसायांची कामें पत्करून, आपला राष्ट्रधर्म किती कसोशीनें बजावला, हें लोकविश्रुतच आहे. मतभेद, स्थितिभेद, धर्मभेद किंवा राजकीय पक्षभेद कितीहि असोत, राष्ट्रावर आपत्ति येतांच सर्व भेदांचा संन्यास करून चटकन एकवटण्याची इंग्लंडची राष्ट्रधर्म प्रवृत्ति स्पॅनिश आरमाराच्या काळापासून सुप्रसिद्ध आहे. या एकाच प्रवृत्तीमुळें इंग्लंड आज सर्वसमर्थ झालें आहे आणि ही प्रवृत्ति कायम आहे तो पर्यंत तें तसेंच राहणार, यांत शंका नाही. राष्ट्रोन्नतीला पुरुषांप्रमाणें स्त्रियाहि सरसाऊन पुढें आल्या पाहिजेत आणि सर्व लहान मोठ्या भेदांचा संन्यास करण्याच्या राष्ट्रधर्माची जनतेच्या हृदय मंदिरांत स्थापना झाली पाहिजे.

मनाचा नैसर्गिक चवचालपणा गुलामगिरीच्या हंगामात जितका व्यक्त होतो, तितका एरवीं नाही. दसरा दिवाळी संक्रांत असल्या राष्ट्र धर्मोत्तेजक सणांचा उद्देश गुलाम मन कसा विकृत करतें आणि भलत्याच नाटकी फंदाचें अवडंबर माजवितें, हे पुष्कळ विचारवंतांच्या निदर्शनास येऊं लागलें आहे. दसऱ्याचें सीमोल्लंघन पाहिलें तर आमच्या सणांची आह्मांला लाजच वाटली पाहिजे. नुकतीच दिवाळीहि साजरी झाली. गोड गोड पक्वान्नांचा फडशा उडला. गांवोंगांव कोट्यावधि पणत्या पेटल्या

आणि खंडोगणती तेलांचे बुधले रिकामे झाले. फटाकड्यांच्या कडकडाटांत हजारों रुपयांची राखरांगोळी केली आणि दारूच्या धुरानें गुदमरलेली लक्ष्मी चीन जपानकडे जीव घेऊन पळत असतांनाच सर्वत्र लक्ष्मीपूजनें चालली होती. नरक चतुर्दशांच्या दिवशी सत्यभामेनें द्वापरयुगांत नरकासुर मारला, ह्मणून कलियुगांतल्या पुरुषानीं मोठ्या पहाटे उठून मंगलस्नानें केलीं. बोलून चालून आह्मी जातिभेदाळू हिंदू मोठे पुराणप्रिय. वडिलांचा बाळबोध कित्ता जशाचा तस्सा घटवीत बसणारे. ठरावीक वेलांटीपुढें गोलांटी चुकून सुद्धां कधिं जावयाची नाहीं. मग, सध्या आमच्या उरावर प्रत्यक्ष नाचणाऱ्या नरकासुरांची कांहीहि दाद न घेतां, पुराणकालच्या नरकासुराच्या वधाप्रीत्यर्थ मंगलस्नानाचा आटारेटा आह्मीं कां उरकूं नये? भूत काळचे आचार, वर्तमान काळचे विचार आणि भविष्य काळचे उच्चार उमटविणारे हिंदु स्वयंनिर्णयाला नालायक कसें बरें ठरतील?

हिंदुजन हो? पुरे झाली ही नाटकें आतां. तुमच्या स्वराज्यविषयक महत्वाकांक्षेला जातिभेदाच्या नरकासुरानें ग्रासलें आहे. या नरकासुराचा तुह्मी अझून वधच केला नाही. मग ही दीपावली कां? आणि मंगलस्नानें तरी कशाची? गुलाम राष्ट्राच्या पारतंत्र्याचे अमंगल चिपटून नष्ट झाल्याशिवाय दीपोत्सव करण्याचा कोणालाहि अधिकार नाही. राष्ट्र धर्माची प्रस्थापना झाल्याशिवाय लक्ष्मीचीहि मेहेरनजर तुह्माकडे वळणार नाहीं; मग नुसती नाटकी लक्ष्मी पूजनें जगाच्या अंतापर्यंत करीत राहिलात, तरी पायांतली पारतंत्र्याची बेडी अणूमात्र ढिली होणार नाही, हें लक्षांत ठेवा. पण तुह्मां पुरुषांना ही सूचनाच करणें अप्रस्तुत आहे.

नरकासुर सत्यभामेनें मारला. तो अधिकार स्त्रियांचा आहें. जातिभेद-नरकासुर ठार मारण्याचें पुण्य हिंदी स्त्रीवर्गाच्याच वाट्याला अखेर खास येणार. आमचा भगिनी वर्ग ज्या दिवशी खराखुरा जागृत होईल, हिंदु राष्ट्रविषयक विशिष्ट कर्तव्याचें त्यांच्या उज्वल अंतःकरणांत प्रबोधन होईल आणि हिंदु क्षेत्रांत पावलोंपावली अडथळा करणाऱ्या नरकासुराच्या खऱ्या राक्षसी स्वरूपाची त्यांना प्रत्यक्ष प्रतीति येईल, त्याच दिवशी हा नरकासुर मारला जाईल आणि सर्व हिंदु जनांना मंगल स्नानाची मोकळीक मिळेल. जें जातिभेद-नाशाचें कार्य मोठमोठ्या भिशाळ, लेखाळ व वाचाळ पुरुषांना आजपर्यंत साधलें नाहीं, ते काय या बाया करणार होय? अशी शंका पुष्कळांच्या जिभेवर नाचूं लागेल. शंका योग्य आहे पण ती वास्तवीक नव्हे. जातिभेद जर कधी मोडणार असेल तर अर्क अवलेह काडें मलमे असल्या उपायांनी मुळींच नव्हे. त्यासाठीं एक भयंकर सामाजीक क्रांतीचे बंड होईल आणि सुरुंग लाऊन ज्या प्रमाणें किल्ला अस्मानांत भिरकाऊन देतात, त्याप्रमाणें त्या क्रांतीचा बाँबगोळा जातिभेदाच्या किल्ल्याच्या राई एवढ्या ठिकऱ्या उडवील. आणि काय? हे क्रांतीचे बंड बायका करतील? होय होय त्रिवार होय. सत्यभामेनेंच नरकासुर मारला पाहिजे. जातिभेद ज्या तत्वामुळें टिकला आहे, ते तत्त्वच टाचेखाली स्त्रिया तुडवूं लागल्या की जातिभेद मरत चाललाच ह्मणून समजावें. हें तत्व कोणतें आणि भाकीत केलेलें बायकांचें बंड कसें घडून येणार, याचा खुलासा पुढील अंकी.

□□□

स्फुट विचार

मार्गशीर्ष जवळ आला

उद्यां परवां तुळशीची लग्नें होतील. तुळशीचीं लग्नें ह्मणजे वार्षिक हुंडेबाजीच्या सट्टेबाजाराचें घनःशिंगच ह्मटलें तरी चालेल. ही झाडपाल्याची लग्नें ह्मणजे 'झाली ज्यांची उपवर दुहिता' त्यावर लवकरच ओढवणाऱ्या विन्घांची प्रभात होय. हुंडेबाजांची दिवाळी ह्मणजे वधुपक्षाचें दिवाळें. हें दिवाळें वाजविण्यांत वरपक्ष इतक्या कांही असुरी वृत्तीचें पाशवी वर्तन करतो कीं तें पाहून खऱ्याखुऱ्या गाढवालाहि चिळस उत्पन्न होतें. हुंड्याच्या रूढीमुळें अखिल हिंदु समाजांत कोणकोणते दोष रक्ताला जाऊन भिडले आहेत, त्यांची आजपर्यंत इतर कोणाहि सुधारकाला व पत्रकर्त्याला करवली नाहीं इतकी वाच्यता प्रबोधनानें निर्भीड स्पष्टोक्तीनें केली आहे. गुदस्त सालीं हुंडाविध्वंसक संघानें केलेली धडाडीची कामगिरी महाराष्ट्राला पूर्ण माहीत आहेच. परंतु तेवढ्यानेंच हा हुंडारक्तापितीचा रोग नाहींसा होईल, किंवा हुंडेबाज सुशिक्षित गध्यांचा मेंदू ताळ्यावर येईल, अशी कल्पना करणें चुकीची आहे. एकदोन काढानिकाढ्याच्या प्राशनानें साधा तापसुद्धां हटत नाहीं. मग हा हुंड्याचा रोग तर उघडउघड रक्तपितीचा महारोग. रक्तांत आरपार भिनलेला. तो काय इवल्याशा संघाच्या झटापटीला दाद देतोय? गुन्हेगार ह्मणून नोंदलेल्या वडारी बेरडाच्या जाती वेळीं उत्तम नागरीक बनूं शकतील; नव्हे, स्वतः ला 'गुन्हेगार' ह्मणवून घ्यायला त्यांनाहि आतां लाज वाटत आहे. पण हुंडेबाज लोक माणुसकीत येण्याची आशा सध्यां तरी बरीच कमी दिसते. बडारी बेरड जन्मसिद्धच अक्षरशत्रू व मतिमंद. पण त्यांना सुद्धां आतां आपल्या वाडवडिलांच्या कृतकर्माच्या परंपरेचा पश्चात्ताप होतो आणि आपल्या सद्वर्तनाच्या पुराव्यावर गुन्हेगारांच्या यादीतून आपलें नांव कमी करावें ह्मणून ते सरकारांशी आज झगडतांना दिसतात. पण हुंडाळू टोणगे व गद्धे सुशिक्षित व पदवीधर कंपूचे उलट्या अंबारीचें वतनदार असल्यामुळें ते आपल्या दिवाळखोर रक्तपितीचें परिमार्जन न करितां, उलट आपल्या चवचाल विद्वत्तेच्या जोरावर त्या पापावर कोटीक्रमाचे फाजील पांघरूण घालण्याचा प्रयत्न करतात. गुदस्त सालीं हुंडाविध्वंसक संघानें प्रसिद्ध केलेले कांहीं अनुभव वाचकांना अवगत असतीलच. त्यावरून या साक्षर व पदवीधर शहाण्यांची मजल खोटें बोलणें, खोट्या शपथा घेणें, पोलीसच्या पहाऱ्यांत लग्नें लावणें, नवऱ्या मुलाला (किती हुंडेबाज हा शब्द!) एखाद्या पळपुट्याप्रमाणें पळविणें वगैरे निंद्य प्रकारांपर्यंत

मजल गेली होती, हें आठवत असेलच. यंदाचा अनुभव कदाचित वेगळ्या तऱ्हेचा परंतु इतकाच निंद्य असूं शकेल. वरवर हुंड्याबद्दल नापसंती दाखविणारे परंतु आंतून हुंडेबाज गधड्यांची वकिली करणारे कांही कज्जेदलाल प्रबोधनावर बहिष्कार घालण्याचें बायकी कृत्य करावयासहि लाजले नाहींत. धारच्या शेंदाड कायस्थ सरदारशाहीचे शेमले प्रबोधनानें खेचतांच, त्यांच्या स्थानिक सभापतीला येवढा राग आला कीं त्या बेट्यानें प्रबोधनाला एकदम मज्जाव केला. कायस्थांच्या या स्थानिक सभा ह्मणजे पुरुषी विधवांच्या घोडशाळा बनल्या आहेत. त्यांच्या 'समाजोन्नति' परिषदेनें एकमताने मंजूर केलेला हुंडाविध्वंसनाचा ठराव ज्या ठाण्याच्या घोडशाळेला अंमलांत आणता येत नाही, तिलाच ठरावाची केवढी मिजास! हुंडाविध्वंसक संघाच्या स्पष्टोक्तीच्या पत्रांतील भाषासरणी या ठाणेकर शहाण्या कायस्थांना 'इन्डेकोरस' (असभ्य) वाटल्यावरून, त्यांनी 'यापुढें संघाच्या कोणत्याहि पत्रव्यवहाराला उत्तर मिळणार नाहीं असा एक ठराव पास केला. जणूं काय 'डेकोरस' (सभ्य) भाषेंत या नाजूक आंतड्याकांतड्यांच्या पुतळ्यांकडे कोणी पत्रें पाठविलीं असती, तर लगेच या बोलक्या प्रागतिकांनी हुंड्याला ठाण्याच्या नव्या लोखंडी पुला खालींच मूठमाती दिली असती! परिषदेचा ठराव लाथांखालीं तुडविणाऱ्यांनींच सभ्याऽसभ्यतेचा दिमाख मिरविणारा ठराव पास करण्याची मिजास दाखवावी, हा शुद्ध बेशरमपणा आहे. संघाला या ठरावाची किंमत फाटक्या पायतणा इतकी तरी वाटेल, अशी अपेक्षा करणारा अट्टल हुंडेबाजच असला पाहिजे.

यंदा तरूण महाराष्ट्र कार्य करणार?

'कुत्ता भुकत वांकू भुकवा दे' या साधूक्ती प्रमाणें हुंडेबाजीच्या पाशवी लीला खुशाल अशाच चालोत. त्यांकडे लक्ष देण्यांत अर्थ नाहीं. हुंडाविध्वंसनाचें पावित्र्य व महत्व ज्यांना पटलें आहे असे विवेकी तरूण व निश्चयी तरुणी यंदाच्या लग्न सराईत काय करणार? हा प्रश्न आजच त्यांना प्रबोधन विचारीत आहे. गुदस्त सालीं सुमारे शेंदिडशें तरुणांनीं मोठ्या उमेदीनें हुंडाविध्वंसक संघाच्या कार्याला मदत केल्यामुळेंच पहिल्या वर्षी संघाच्या कामगिरीचा दणका अचुक बसला. यंदाच्या वर्षी ही स्वयंसेवकांची व विशेषतः स्वयंसेविकांची संख्या हजारावर जाईल अशी आह्मांला आशा आहे. ठिकठिकाणच्या लोकसंग्रही समाजसेवकांनी व देशसेवकांनीं हें समाज सुधारणेचें पवित्र कार्य आंगावर घेतलें, तर ही आशा सफल होणें अगदीच कांही अशक्य नाहीं. बडोद्याचे सुप्रसिद्ध लोकसेवक प्रो. माणिकराव ह्मणजे निश्चयाचे महामेरू. त्यांचा लोकसंग्रह हा माणिकसंग्रह आहे. त्यांच्या स्वयंसेवक पथकाची कदर कांहीं और आहे. गुदस्त सालीं त्यांनी निरीक्षकाचें किंबहुना परीक्षकाचें कार्य केलें. यंदाच्या वर्षी आमचा हा बालब्रह्मचारी बलभीम 'सत्राणें उड्डाणें हुंकार वदनीं' अशा थाटातें बडोद्यांत हुंडाविध्वंसनाचें-निदान हुंडा बहिष्काराचें-कार्य अतुल पराक्रमानें घडवून आणील अशी आमची अपेक्षा आहे. प्रो. माणिकराव महाराष्ट्रीय तरुणांचे प्रतिनिधी व आदर्श आहेत. त्यांनीं हुंडाविध्वंसनाच्या कार्यात पुढारपणा घ्यावा. हा मान त्यांचाच आहे. सर्व हुंडापीडित भगिनी त्यांना प्रेमाश्रूंनी मंगलस्नान घालतील.

सर्व राष्ट्रसेवक संत त्यांना आशीर्वाद देतील आणि हुंडाविध्वंसनेच्छु प्रबोधन त्यांचे पादत्राण प्रसाद म्हणून आपल्या मस्तकीं धारण करील.

सत्यभामेनेंच नरकासुर मारला पाहिजे

पुरुषांच्या प्रयत्नाला स्त्रियांचें पाठबळ मिळाल्याशिवाय विजयश्री लाभत नाहीं. हुंडाविध्वंसनार्थ पुरुषांपेक्षां शतपट आवेशानें स्त्रियांनींच पुढाकार घेतल्याशिवाय हा हुंडा-नरकासूर गतीला जाणार नाहीं. हुंड्याचा प्रश्नच असा आहे की तो पुरुषांपेक्षां स्त्रियांच्या जिवाग्रीं अधिक डसतो. हंडाभर हुंडा देऊन विकत घेतलेला जावई-गधडा दुगाण्याझाडू मिळाला, मुलीला अननुरूप ठरला, किंवा तिला केरसुणी प्रमाणें वागविणारा भेटला, तर त्याच्या वेदना आईच्या हृदयाला जशा झोंबतात, तशा बापाच्या व भावाच्या झोंबत नाहींत. ते अशा प्रसंगीं हाताकपाळाची गांठ घेतात, एवढेंच. शिवाय, लग्नासारख्या जन्माच्या गाठीं विक्री लिलांवाच्या सरगांठीवर सरकूं लागल्या, तर त्याची फळें किती कडू जहर असतात, याचेंहि प्रत्यंतर पुरुषांपेक्षां स्त्रियांनाच अधिक जाणवतें. अर्थात् हा हुंडाविध्वंसनाचा प्रश्न आमच्या माता व भगिनीच जर निश्चयानें हातीं घेतील व हुंड्याची रक्तपिती फुटलेल्या अधमांचा धिःकार करतील, तर या सत्यभामांच्याच हातून हा हुंडा-नरकासूर खास रसातळाला नेला जाईल.

कवींचा प्लेग

मानवी व्यवहाराच्या इतर क्षेत्रांप्रमाणेंच वाङ्मयाच्याहि क्षेत्रांत रोगराई व दुष्काळाचें बंड असतें, हा कांही नवीन शोध नव्हे. असहकारितेच्या धामधुमींत आतांच्या सर्व फेर-नाफेरवाल्या नियतकालिकांत विवेकाचा दुर्गादेवी दुष्काळ पडला होता. बारडोलीचा बार उडण्यापूर्वी हिंदु-मुसलमान-ऐक्याविषयीं त्यांच्यात अदूरदृष्टीचा इन्फ्लुएंझा बोकाळला होता. बार उडाल्यावर असहकाऱ्यांविरुद्ध राष्ट्रीय पत्रांत सभ्य भाषेचा सुकसुकाट उर्फ कोरडा दुष्काळ पडला होता. कांहीं वर्षांपूर्वी मराठी वाङमयांत आणामाला, दिडकीमाला, कवडीमाला अशा अनेकविध मालांचा कॉलेरा बिनअटकाव बिथरला होता. चटकन निघून, वर्गण्या उकळल्यावर पटकन लुप्त होणाऱ्या नियतकालिकांची 'हार्ट फेल्युअर्स' तर महाराष्ट्रांत कुप्रसिद्धच आहेत. या शिवाय चार चार महिन्यांनीं अंक काढणाऱ्या मासिकांचा 'सनस्ट्रोक' पुष्कळांच्या अनुभवाला नेहमींच येत असतो. या अनेक रोगराईत अलीकडे कवींचा प्लेग फारच जोरावला आहे. पुणेरी गणपत्युत्सवांतल्या मेळ्यांनी वास्तवीक या प्लेगाचे जंतु प्रथम निर्माण केले. त्या वेळेपासून 'राष्ट्रीय कविता' नव्हे-काव्यें-प्रसविणाऱ्या कवींची सेना दिवसेंदिवस भरंसाट वाढत चालली आहे. या राष्ट्रीय कवींचा खरपूस समाचार प्रबोधनाच्या १ ल्या वर्षी २४ व्या अंकांत श्री.

सोनगांवकरांनीं घेतलेला वाचकांना आठवतच असेल. या कवींच्या जोडीनेंच अलीकडे बरेच 'लव्हाळे' कधीहि चमकूं लागले आहेत. ते फारच प्रेमाळू! त्यांच्या प्रेमाची झडप कोणावर कशी व केव्हां बसेल याचा कांही नेम नाहीं. हे कधी लव्हाळ्याची लकतरें एकदां कां आपल्या प्रेमाळू स्फूर्तींच्या खातेऱ्यांत धुवूं लागले कीं त्यांच्या मनाला कसल्याहि आचकट विचकट अश्लील प्रसंग-वर्णनाची दरकार रहात नाहीं. मराठी भाषा अधोगतीला चालली आहे, अलीकडचे मराठी गद्य व पद्य लेखक गचाळ आहेत, रसिकांना उत्तान प्रौढ व भडक भरजरी वाङमय वाचावयास मिळत नाही, ही शोचनीय दुःस्थिति आमूलाग्रे उखडून टांकण्याच्या गगनचुंबित महत्वाकांक्षेनें फुरफुरलेल्या एका नटव्या नियतकालिकानें रसिकांना अर्पण केलेली एका मेंढपाळाची कारटी पाहून महाराष्ट्र तर बेशुद्धच पडला होता. निर्भेळ मराठी कवितांना वाहिलेल्या एका मासिकात, कै. गोविंदाग्रजाच्या एका हृदयस्पर्शी पण अपूर्ण काव्याची पूर्णता करण्याच्या दिमाखानें, एका हळकुंड्या कवीनें ओकलेलें काव्य पाहून, बायरनच्या नांवावर बुरख्या बुरख्यांतून मिरविणारी 'एमा' सुद्धां लाजेनें मुरडली, मग रसिकांची तारांबळ रसिकांनींच सांगितलेली बरी! 'झालें आहे उघडें कां तव तारुण्याचें द्वार?' असला हलकट प्रश्न विचारणाऱ्या नायकाची काव्यांतल्या नायिकेनें जरी बत्तिशी रंगविली नाहीं, तरी प्रेमाळू काव्यांचें 'खरें अंतरंग' जाणण्यास नालायक असलेला बहुजन समाज कवीच्या तारतम्य बुद्धीला माणुसकीचा मनोहरपणा आणण्यासाठी हातांत खेंटर घेऊन उठला तर त्यांत अस्वाभाविक असें काय आहे? पूर्वी मऱ्हाठशाही स्वराज्याचा लौकीक असा होता कीं एखाद्या स्त्रीकडे कोणी वांकड्या नजरेनें पाहील, तर त्याचे क्षणार्धात राईराई एवढे तुकडे करणाऱ्या समशेरी खडाखड आपल्या म्यानांतून बाहेर पडत असत. हल्लीं तें स्वराज्य नाहीं, त्या समशेरी नाहींत आणि स्त्रियांच्या विटंबनेबद्दल चीड येणारे मऱ्हाठा मनहि जिवंत नाहीं. त्यामुळें या आधुनिक 'लव्हाळ्या' कवींनी स्त्रियांविषयीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष, उघड वा लपून छपून कितीहि क्षुद्र शृंगारविषयक हलकटपणा आपल्या कवितांत व्यक्त केला, तरी कोणीहि आपला संताप व्यक्त करण्याचे नैतिक धैर्य दाखवीत नाहीं. कारण, सध्यां ह्मणें कलियुग सुरू आहे! जनतेवर नित्य होणारा हा कवि-पिसवांचा मारा पूर्वी एकेकट्याकडून होत असे. आतां हे कवि ठिकठिकाणीं आपापले छोटे मोठें कळप करून निरनिराळ्या काव्यग्रंथांच्याद्वारें भरघोस ठोशाचा मारा करूं लागले आहेत. जात्या ते जातिप्रधान हिंदूच असल्यामुळें त्यांनीं आपापल्या कळपाची एकेक जात ठरविली आहे आणि या जाती एकमेकांस पाण्यांत पहाण्याचा-शक्य तर ढकलण्याचा संघटीत यत्न करीत असतात, कोणी गुच्छ काढतो, कोणी माला गुंफतो, कोणी किरण पाडतो, कोणी पुरण शिजवितो, तर कोण वरण वाढतो. या किरण वरण पुरणामुळें कवींची व्यावहारीक अक्कल जरी सरणावर गेल्याचें स्पष्ट दिसलें, तरी या गुच्छ कच्छ पुच्छांना आश्रय देतांना वाचकांचें मात्र मरण ओढवलें आहे खास! प्रत्येक कपिकंपू एकमेकाला खालीं पाडण्यासाठीं संशोधनाच्या फूट नोटींची शेंदाड कसरत करीत असतांना, स्वतःच्या आत्मस्तोमाचें असें कांही घाणेरडें पुराण सांगतों कीं कोणालाहि शिसारी येते. आत्मप्रौढीच्या आचरटपणाच्या धुरोळ्यांत तीन चार कवि बसले कीं एकानें दुज्याला ह्मणावें ''अरे बेट्या दुज्या, अरे काय रे तुझ्या काव्यशक्तीची ही प्रतिभा. नुसती गंगानदी दुथडी फोंफावत चालली आहे. खरोखर तूं होमरचा बाप आहेस.'' दुज्यानें तिसऱ्या एखाद्या सोन्याला ह्मणावें ''सोन्या, लेका केवढी रे ही तुझी तात्विक काव्याची भरारी! पार गेली कीं थेट अंतराळांत. खरोखर इंग्लंडचा शेले तुझा झाडू शोभेल.''

सोन्यानें हँ हँ हँ करीत ह्मणावें ''कशाचा कशाचा मी शेले! एवया तूं स्वतःच सवाई शेक्सपियर दिढी बायरन आणि 'पावणा कप' मिल्टन आहेस रे. आह्मी सर्व तुझ्याच काव्यमंजिरीच्या घमघमाटावर उदविले गेले आहोंत.'' मृत कवींशीं नातोगोतीं जोडणारे कांही बृहन्नटहि अलीकडे चमकूं लागले आहेत. गोविंदाग्रजाच्या मेंदूंची खरी माहिती याच शहाण्यांना! कां? तर ह्मणे ते वारले तेव्हां हा सगळा कंपू तब्बल १२ वर्षे मूर्छित पडला होता. एका नियतकालिकायच जाहिरातींची पृष्ठें तर खुद्द संपादकाच्या काव्यांच्या इतक्या अवास्तव स्तुतिपाठांनीं नेहमी चिडचिडलेलीं असतात कीं आत्मप्रौढीच्या धुळीचा बनलेला निलाजरेपणाचा तो चिखल पाहून कोणाहि विचारी माणसाला वांतीच होईल. कवींच्या या प्लेगाचा बंदोबस्त विवेकी महाराष्ट्रानें अवश्य केला पाहिजे. कारण त्यामुळें महाराष्ट्राच्या वाङमयाची इभ्रत व मनोवृत्ति अत्यंत अवनत ठरल्याशिवाय रहाणार नाहीं.

निरक्षरतेच्या जखमेवर इलेक्शन-मिठाचे पलिस्तर

यंदाच्या कौन्सिल निवडणुकीपासून विचारवंतांना उपदेश घेण्यासारख्या पुष्कळ गोष्टी घडून आल्या आहेत. त्यांचा यथावकाश वाचकांना परिचय करून देणें प्रबोधनाचें कर्त्तव्य आहे. यंदाची मतदानाची पद्धति अगदीं चमत्कारीक व घोंटाळा उडविणारी होती. कदाचित् ती शुद्ध पार्लमेंटरी पातिव्रत्याची असेल, परंतु हिंदुस्थान ह्मणजे पार्लमेंटची विलायत नव्हे, हे या पद्धतीच्या पित्यांनी वास्तविक लक्षांत घेणें जरूर होतें. मागील निवडणुकींत प्रत्येक उमेदवाराच्या निशाणीची एकेक स्वतंत्र कुलूप लावलेली पेटी ठेवलेली असे. मतदारानें आपला अनुक्रम नंबर पोलींग ऑफीसराला कळवून सही केली किंवा आंगठा उठवला कीं त्याला मतांच्या संख्येइतक्या दोन किंवा तीन मतचिट्या देण्यात येत असत, त्या चिठ्या मतदारानें खुषीला वाटेल त्या पेटींत नुसत्या टाकल्या कीं मतदाराचें काम संपलें. ही पद्धत फार सोईची होती. आमच्या निरक्षर अफाट जनतेची यांत दिशाभूल किंवा चूक मूळींच न होण्याचा संभव जास्त होता. यंदाची पद्धत ह्मणजे उमेदवारांच्या नांवापुढें किंवा त्यांच्या निशाणीच्या चित्रांपुढें XXX आशा फुल्या करणें. ही बऱ्याच बाबतींत हजारों निरक्षर मतदारांना फारच बाचकविणारी ठरली. वृत्तपत्रांनी मतदानाची ही रीत सविस्तर व सोदाहरण प्रसिद्ध केली होती; पण निरक्षरतेपुढें या स्तुत्य यत्नाला फारसें समाधानकारक फळ मुळींच मिळालें नाहीं. कारण ३ च्या ऐवजी चार फुल्या केल्या, त्या बरोबर चित्रापुढें न करितां चित्रावरच किंवा खालीं वर घसरून केल्या कीं तेवढें मत कायद्याप्रमाणें रद्द होतें. लोकांना एवढी कारकुनी एकदम कशी साधणार? बऱ्याच जणांना ती मुळींच साधली नाहीं आणि पुष्कळ मतें फुकट गेल्याचा बोमाटा आहे. मुंबईच्या दक्षिण भागांतल्या एका गुजराथी उमेदवाराच्या मतदारांची संख्या अत्यंत आशाजनक असूनहि त्याला अपयश आलें. कां? तर त्याचे जातभाई शेटे मतपत्रिकेवर तीन फुल्यांच्या ऐवजीं एकेकच फुली करून मोकळे झाले. त्यांची दोन दोन मतें फुकट गेलीं व उमेदवार तोंडघशी पडला. ही जर चांगल्या शिकल्या सवरल्या शेट्यांची स्थिती, तर नाक्षर शेतकऱ्यांची अवस्था काय असेल? एकूण यंदा सुरू केलेली मतदानाची पद्धत फार जिकीरीची

व यातायातीची ठरली आहे. सरकारनें याचा नीट विचार करून पुढील खेपेला जनतेच्या निरक्षरतेला ह्मणजेच दयाळू सरकारच्या प्रजावात्सल्याला-साजे शोभेशी पूर्वीची साधी बिनकारकुनी पद्धत सुरू करावी, अशी आमची आग्रहाची सूचना आहे.

अखेर जातिभेदावर गाडें बितलें

हिंदु समाज आज शेंकडों पक्षभेदांत विभागला असून, या भेदाच्या समर्थनार्थ प्रत्येक पक्षाचा कांहीं तरी उदात्त वेदान्त ऐकूं येतो. जहाल मवाळ फेर नाफेर ब्राह्मण ब्राह्मणेतर टाळकुटे सत्यशोधक सुधारक असे नाना पक्ष किती सांगावे? प्रत्येकाच्या तक्रारीचा वेदान्त बाह्यतः कितीहि स्तुत्यर्ह दिसला तरी अंतर्यामी अखेर सारे जातिभेदावरच कसे घसरतात हे यंदाच्या निवडणुकीत खासें सिद्ध झालें. निवडणुकीचा फाटक्या मानाचा स्वार्थ तो काय! पण तेवढ्यासाठी सुद्धा आपल्या पक्षाच्या ध्येयावर जातिभेदाचें रखरखीत निखारे ठेवायला कित्येक पुढारीबुवा शरमलें नाहींत. एवढ्यावरून हाच निष्कर्ष निघतो कीं सांप्रत हिंदु समाजांत ज्या पक्षभेदाचा आणि त्याच्या उदात्त वेदान्ताचा पुढारी मोठा गवगवा करतात, तो सारा बाहेरचा लफंगेपणाचा देखावा आहे. आंतून जातिभेदाच्या घाणीशिवाय दुसरी कसलीहि चीज आढळत नाही. अर्थात् जोंपर्यंत हा जातिभेद आमच्या काळजाला भिनलेला आहे, तोंपर्यंत पंथ पक्षाचा कितीहि कोणी डांगोरा पिटला तरी यशःप्राप्तीच्या नांवानें शून्यच उरणार, यांत मुळींच संदेह नाहीं.

नुसती श्राद्धें घालण्यांत अर्थ नाहीं

आह्मां हिंदु जनांची समारंभप्रियता जवळ जवळ एक राष्ट्रीय व्यसन होऊं पहाते कीं काय, अशी भीति वाटत आहे. बोलून चालून आह्मी श्रद्धावान्. अर्थात् श्राद्ध तर्पणें घालण्याच्या कामांत आह्मी साऱ्या जगाला हार जाणार नाहीं. आमरण खेटराखालीं तुडविलेला बाप किंवा आई मरण पावल्यावर मात्र आमच्या या हिंदु श्रद्धेला इतकी कांहीं भरती येते कीं त्यांच्या श्राद्ध तर्पणासाठीं आह्मीं वाटेल त्याचें तर्पण करूं. पण ही सर्व धडपड आणि सव्यापसव्याचा फार्स निवळ नांवासाठी! स्वतःच्या बडेजावीसाठीं. निवळ समारंभप्रियता. शुद्ध खादोडीची हौस. या पलीकडे कांही नाहीं. कौटुंबिक श्राद्धाची ही संकुचित मर्यादा आतां राष्ट्र पुरुषांच्या श्राद्ध पर्यंत केवढीहि विस्तृत झालीशी दिसली, तरी त्यांतला हेतूचा संकुचितपणा मात्र जशाचा तसा कायम! कुटुंबातील मृत पूर्वजांचें किंवा राष्ट्रांतल्या वंदनीय राष्ट्र पुरुषांचें स्मरण करण्याची रूढी एवढ्याच साठीं जन्माला आलीं कीं त्या त्या पुरुषाच्या कर्तबगारीला कारण झालेल्या सद्गुणांचा कित्ता आपल्या हृदयावर उमटावा व त्यांचा आपल्या विचार

व आचार सरणींत परिपाक उतरावा. परंतु ही मुख्य गोष्ट स्मृतिदिन प्रसंगी वक्त्यांच्या जिभेवर जरी मुबलक नाचली, तरी समारंभ खलास होतांच 'नळी फुंकिली सोनारें इकडून तिकडें गेलें वारें' या पलीकडे अधिक कांहींच घडत नाहीं. महाराष्ट्राच्या संस्कृतीच्या इतिहासांत कितीक तरी असे महान् कर्तबगार वीर व वीरांगना चमकल्या, कीं ज्यांच्या चरित्र व चारित्र्याविषयीं वाटेल त्या विवेकी परराष्ट्रानें साभिमान कौतुक करावें. परंतु सध्यां आह्मी महाराष्ट्रीय जन त्यांपैकीं पुष्काळांना अज्जिबात विसरलों आहोंत, व ज्यांचें आह्माला स्मरण आहे निदान वर्षातून एकदां चुकतमाकत होतें-त्यांच्या नांवानें कसाबसा कांहीं तरी एखादा दीड दोन तासाचा समावजा उत्सव पार पाडला कीं श्रद्धेच्या गंगेत आमच्या इतिकर्तव्याचे घोडें न्हालें असे आह्मांला वाटतें, या पुढेंहि आमचें कांही कर्तव्य आहे, याची मात्र कोणालाच दाद नसते. हे विचार सुचण्याचें कारण नुकतीच बडोद्याला ता. २० ऑक्टोबर १९२३ रोजीं कायस्थ प्रभु मित्रमंडळानें श्री. सरदेसाई (इतिहासकार) यांच्या अध्यक्षते खालीं साजरी केलेली.

मल्हार रामरावांची शतसांवत्सरीक पुण्यतिथि

या समारंभाचे एकंदर ३ रिपोर्ट आमच्याकडे आले; आणि ता. २७/१०/२३ च्या जागृति पत्रांत विस्तृत हकिकतहि आली आहे. त्यांतला कांहीं चिंतनीय ऐतिहासिक भाग आज इतरत्र उद्धृत केला आहे. या समारंभांत आह्मांला विशेष गोष्ट दिसून आली ती बडोदेकर कायस्थांची उदासीन सुतकी वृत्ति. मुख्य वक्ते श्री. शेजवलकर यांनी ही गोष्ट स्पष्टोक्तीनें जाहीर केली, ते ह्मणाले ''प्रभू जातीची वस्ती या बडोद्यांत सुमारें दोन हजार पर्यंत असून, त्याच्या एक चतुर्थांशहि लोक या उत्सवास येऊं नयेत ही फार दुःखाची गोष्ट आहे.'' उत्सव काठेवाट दिवाणजीच्या वाड्यांत 'मोठ्या थाटाने' (?) साजरा झाला. 'स्त्रीपुरुष समाज जरी बराच जमला होता, तरी वाड्याचा दिवाणखाना रिकामाच दिसत होता.' कां दिसूं नये? बडोद्याचे कायस्थ काय पढतमूर्ख आहेत, तर ते वडिलांचे नुसते गुण गायाला येतील? हां! मल्हररावच्या पुण्यतिथी ऐवजीं जर एखाद्या हुंडेबाज श्रीमंत पुत्राच्या हुंडाळू लग्नाची ती मेजवानी असती, तर पुलाव झोडायला इतक्या कायस्थ वीरांची गचडी झाली असती कीं काठेवाड दिवाणजीच्या दिवाणखान्याच्या भिंतींना दरदरून घाम फुटला असता!

□□□

लेख

दिवाळीच्या करंज्या

दसऱ्याचें सोनें ऐन विजयादशमीच्याच दिवशीं आश्रयदात्यांना देऊन, त्यांचा प्रेमाशिर्वाद प्रबोधनानें मिळविला. कारण त्याच्या नियमित प्रसिद्धीची तारीख व दसरा यांचा योगायोग जवळ जवळच आला. दिवाळीचा योग मात्र साधला नाही! सगळेच योग साधते, तर 'योगायोग' हा शब्दच जन्माला आला नसता आणि त्याला आलेलें दिवाळीच्या करंज्या इतकेंच गोड महत्व प्राप्त झालें नसतें. निरनिराळ्या सणावारीं अथवा महत्वाच्या प्रसंगीं खास अंक काढण्याचें योगसाधन प्रबोधनाला अझून साध्य झालेले नसल्यामुळें, त्यानें आपल्या निर्मळ व स्नेहाळ प्रेमांत तळलेल्या प्रबोधक विचारांच्या करंज्या, दिवाळीची भेट ह्मणून, दिवाळीनंतर उशिरा जरी आश्रयदात्यांच्या स्वीकारार्थ रवाना केल्या, तरी त्यांचा स्वाद लवमात्र कमी होणार नाहीं, किंवा त्यांचा आपल्या विचार व आचारसरणींत परिपाक उतरविण्यास रसिकांची रसिकता रतिमात्र बाचकणार नाही, अशी सबळ आशा आहे.

***

आमचे प्रियमित्र प्रोफेसर खाड्ये (फर्ग्युसन कॉलेज पुणें) यांनी एक विचाराई मनोरंजक अनुभव सांगितला. नुकतेच ते ऑक्टोबरची सुट्टी कोकणांत घालऊन परत पुण्यास आले. आगगाडीत वाचण्यासाठीं मुंबईला त्यांनी सचित्र साप्ताहिक टाईम्सचा ताजा अंक विकत घेतला. त्यांच्या डब्यांत एक युरपियन बाई प्रवाशी होती. तिला कामशेटला (कार्ला लेणी) जावयाचे होते. परंतु वाचावयाला तिच्यापाशीं पुस्तक किंवा वर्तमानपत्र कांहीहि नव्हते. लोणावळा सुटल्यावर गाडी कामशेटला उभी रहात नाहीं व तळेगांवाहून दुसऱ्या गाडीनें परत आलें पाहिजे, असें त्या बाईला समजतांच ती फार रंजीस झाली आणि 'वाचायला मजजवळ कांही नाही, माझा वेळ कसा जाणार?' या चिंतेचे कांही स्पष्ट उद्गार तिच्या तोंडून बाहेर पडले. त्यावर प्रो. खाड्यांनी आपला टाईम्सचा सचित्र अंक 'मर्जी असेल तर आपण हा अंक खुशाल वाचण्यास घेऊन जा. माझें वाचन झालें आहे.' ह्मणून पुढें केला. त्या बाईनें तो आभारपूर्वक घेतला व चटकन पैशाची पिशवी उघडून प्रोफेसरांच्या हातावर सहा आण्याचे पैसे ठेवले. प्रो. खाड्ये पैसे घेईनात. ते ह्मणाले की ''अंक विकण्याकरितां मी कांहीं विकत घेतला नव्हता, किंवा तो विकून पैसे मिळविण्याचा माझा हेतूहि नाहीं. माझें वाचन झालें आहे. आपल्याला त्याची

जरूर आहे. खुशाल वाचा. पैशाची कांहीं जरूर नाही.'' यावर त्या युरपियन बाईनें आभारपूर्वक दिलेले उत्तर विचार करण्यासारखे आहे. ''आपल्या चांगुलपणाबद्दल मी आपली फारफार आभारी आहे. पण दुसऱ्यानें पैसे खर्च करून विकत घेतलेले पुस्तक किंवा वर्तमानपत्र आपण फुकटफाकट वाचणें हा शुद्ध निलाजरेपणा आहे. इंग्लिश प्रतिष्ठित माणसें असें कधिं करींत नाहींत. आपण हे पैसे घेऊन हा अंक मला विकल्याशिवाय तो मी वाचावयास घेणें, किंवा नुसता त्याला स्पर्शहि करणें अप्रतिष्ठित होईल. आपल्याला विकावयाचा नसेल, तर आपली मर्जी! मी आपला वेळ कसाहि घालवीन, पण कोणाचें पत्र किंवा पुस्तक फुकटाफाकट वाचणार नाहीं.'' प्रो. खाड्यांना पैसे घेणें भागच पडलें, हें सांगणें नकोच. परंतु त्या युरपियन बाईच्या सडेतोड उत्तरांत आचरणीय विचाराचें भरलेलें रहस्य आमचे लक्षावधि 'बिलकूल हिंदू' फुकटे वाचक लक्षांत घेतील तो सुदीन! दिवाळीच्या साफसफाईत हा फुकटेपणाचा कचरा साफ झाडून टाकण्याचा निश्चय केला, तर बऱ्याच वाङ्मयसेवकांवर व विचारप्रदर्शकांवर उपकार होतील, आणि बऱ्याच-निदान कांही थोड्या भारदस्त व उपयुक्त नियतकालिकांना जीवदान दिल्याचें श्रेय मिळेल.

***

प्रबोधनाच्या वाचकवर्गाच्या संख्येच्या निमपट पावपट जरी त्याच्या आश्रयदात्यांची संख्या असती, तर त्याला आहे यापेक्षां दसपट सेवेची उमेद आली असती. दसरा दिवाळीचे खास अंक बाहेर पडले असते. अनेक विचारशील विद्वानांचे नवमत चैतन्यात्मक ग्रंथ बक्षिसादाखल हजारोनीं सर्वत्र फैलावले असते. पण-! 'पण' काय? आमचे प्रिय आश्रयदाते निश्चयच करतील, तर काय असें होणार नाहीं? अलबत होईल. प्रबोधनाचा संप्रदाय नैराश्यवादी नव्हे. आशावाद आणि प्रयत्नांची शिकस्त या दोन सनातन विजयशाली तत्वांचा प्रसार करण्यास सरसावलेल्या प्रबोधनाचे आश्रयदाते एवढ्याच बाबतींत निष्क्रीय कसे बसतील? शक्य नाही. यंदाच्या वर्षी प्रत्येक भगिनी बांधव मनावरच घेतील तर चार चार नवीन आश्रयदात्यांच्या प्रेमाचा प्रबोधनास खास लाभ देतील, अशी उमेद आहे.

***

भगवान् श्रीकृष्णाच्या बरोबर रथांत बसून पट्टराणी सत्यभामा प्रत्यक्ष युद्धभूमीवर गेली होती. श्रीकृष्ण एवढे पट्टीचे मुत्सद्दी व योद्धे. त्यांनी भारतीय महायुद्धांत 'न धरी शस्त्र करीं मी' अशी प्रतिज्ञा करून, फक्त 'गोष्टी सांगेन युक्तिच्या चार' एवढीच काय ती सवलत पांडवांना दिली. पण त्या युक्तीच्या चार गोष्टींनीच त्या प्रचंड महायुद्धांत भगवंतानीं पांडवांना जयश्रीची प्राप्ती करून दिली. त्याच भगवान श्रीकृष्णाला नरकासुराशी युद्ध करतांना राणी सत्यभामेच्या प्रसंगावधानी पराक्रमावर विजय मिळवावा लागला. सत्यभामेनें युद्धाच्या ऐन भररंगात आपल्या जगजेत्या पतीच्या हातचें धनुष्य हातीं घेऊन नरकासुराचा सहज लीलेनें वध केला. भारतीय स्त्रियांची पतिनिष्ठा काय आहे, त्यांची सर्वांगपरिजात संस्कृति केवढी जबरदस्त आहे आणि राष्ट्रकार्यार्थ पुरुषांच्या जोडीनें व तोडीनें स्त्रिया काय कार्य करूं शकतात हें दाखविण्याची तिची धडाडी, आजच्या अवनत भारतानें अवश्य विचारांत घेण्यासारखी नव्हे काय? 'बायकांचें काम चुलीपुरतें' ही पाशवी ह्मण प्रसविणाऱ्या व ती अक्षरशः पाळणाऱ्या पुरुषांचीं भाग्यें आज दीडशें वर्षें गुलामगिरीच्या चुलीत धडाड जळत आहेत. 'पायांतली वहाण पायांत' असल्या सूत्रांनी भारतीय सत्यभामांना नुसत्या भाकऱ्या भाजणाऱ्या अन्नपूर्णाकाकू बनविणाऱ्या शहाण्यांच्या

उरावर आज परकीय सवाईसोट्या सत्तेची लाथ ताडताड बसत आहे. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगा उद्धारी' या क्षुद्र उक्तीची अक्षरशः अंमल बजावणी करणाऱ्यांचे पोटपाणी इतके उमाप पिकलें आहे कीं भरंसाट संततिजननामुळें त्यांची अखंड दुष्काळाशीं जानीदोस्ती पडली आहे आणि राष्ट्रकार्यार्थ किंवा समाजकार्यार्थ लागणाऱ्या पौरुषत्वाच्या मानेला कमजोरीच्या दोरीचा फांस बेमालूम बसला आहे. सत्यभामे प्रमाणेंच कैकेयीचाहि पराक्रम प्रसिद्ध आहे. या प्राचीन कथा गाबाळग्रंथी ह्मणून जरी सोडून दिल्या, तरी त्यांत व्यक्त झालेल्या भारतीय वीरांगनांची उज्वल परंपरा अगदीं कालपरवांपर्यंत, माता जिजाई, ताराराणी, अहिल्याबाई, लक्ष्मीबाई, सावित्रीबाई, इत्यादि स्त्रीरत्नांनी निष्कलंक अखंड चालविली आहेच कीं नाहीं? शूद्रांतच स्त्रियांचा समावेश करून, त्यांना साक्षरतेचा प्रतिबंध करणारे व लग्नाच्या गांठीशिवाय बाकी सर्व संस्कारांची गळचेपी करणारे वेदीनारायण नरकासुर जमीनदोस्त करणाऱ्या सत्यभामा आज हळूं हळूं पण वाढत्या प्रमाणावर या भरतभूमीत पुनश्च चमकूं लागत आहेत, ही मोठ्या आशेची प्रभात होय, यांत शंका नाहीं.

□□□

लेख

इसवी सन १९२४ प्रबोधनाच्या वाचकांस प्रबोधक होवो!

आजची तारीख जान्युआरी १ सन १९२४. क्रिस्ती ऊर्फ इसवी शकाची १९२३ वर्षे पूर्ण होऊन आज नवीन वर्षारंभ झाला. हिंदूंच्या पंचरंगी पंचांगांत निदान दोन तीन वर्षप्रतिपदांचा धिंगाणा असून, त्यांच्या शकांच्या गणनेत एका शतकाच्या अंतराची मुर्दाड शर्यत चालू असते. या शिवाय तिथींचे वृद्धिक्षय, अधिकउण्या महिन्यांची लाथाळी आणि घटकापळांची लठ्ठालठ्ठी दररोज चालू आहे ती आहेच. चंद्रसूर्याच्या ग्रहणांतल्या स्पर्शाऽस्पर्श सूक्ष्म क्षणांच्या पळांविपळांच्या भेदांच्या कळा फक्त ज्योतिर्विदांनाच भोगण्यास राखलेल्या बऱ्या. कालगणनेचे साधन असलेले पंचांग ते काय, पण त्याच्या पापी एकट्या महाराष्ट्रांत कोण मारामारी आणि शिमगा! बरोबर आहे. कालगणनेच्या जोडीने पंचांगांत जर यच्चावत हिंदु व्यक्तिमात्राच्या नशिबाचे चढउतार स्पष्ट नमूद केलेले असतात, तर आमच्या हाडींमासीं खिळलेल्या बेकीचे चित्र त्यांत कां असूं नये? अलबत. असलेच पाहिजे. निरनिराळ्या ज्योतिर्विदांची पंचांगेच जरी कुणी उलटसुलट चाळली तरी कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत कसा नाही, हे तेव्हांच दिसून येईल. वर्षप्रतिपदेच्या बाबतीत सुद्धां आमचे एक मत नाही. चैत्र शुद्ध प्रतिपदेचा गुडीपाडवा शुद्ध नामधारी बनला आहे. कडुलिंबाची पाने गुळाबरोबर गिळण्यापलीकडे त्याचा फारसा शास्त्रार्थ आता उरलेला नाही. बरीच मजल पुढे गेली तर बिचाऱ्या शालिवाहनाचे वार्षिक स्मरण शाल्योदंनाबरोबर अजीर्ण न होतां एकदांचे पचनी पडले की झाले. दुसरी वर्षारंभ प्रतिपदा ह्मणजे विक्रम संवताची. ती आयतीच दिवाळखोर दिवाळीत येत असल्यामुळे, वडिलांच्या श्राद्धांत पाहुण्याची बरदास्त या न्यायाने, ती आल्यागेल्याची दाद बहुजन समाज फारशी घेत नाही. शिवाय हा विक्रमसंवंत व्यापाऱ्यांच्या कीर्दखतावण्यांच्या खतांत अडकल्यामुळे, इंग्रजी राज्यपद्धतींत एप्रिलच्या १ तारखेस जे हिशेबी महत्त्व आहे, तेवढीच चक्रवाढी किंमत जनता या प्रतिपदेला देत असते. हा विक्रमसंवतसुद्धा मोठा घोडदवड्या दिसतो! शालिवाहन शक १८४५, इ.स. १९२३ तर हा बेटा १९८०. वडिलांच्या गुणावर विकणाऱ्या शब्दशूर हिंदूंच्या या संवतांत आकडेगणतीच्या बाबतीत तरी निदान प्रगमनशीलतेची भरारी फाजील असणे स्वभावसहज आहे. आश्चर्याची गोष्ट एवढीच की, या संवताचा जनक जो विक्रम त्याच्या कुळामुळाचा पत्ता अझून एकाहि इतिहाससंशोधकास

समाधानकारक रीतीने लागलेला नाही. मात्र व्याजबट्ट्याच्या जोरावर जनतेला पिळून काढणाऱ्या मारवाड्यांनी ज्या अर्थी विक्रमाच्या गळ्याला एवढी घट्ट मिठी मारली आहे, त्या अर्थी हा विक्रम वेताळपंचविशींतील वेताळांचा जानी दोस्त दिसतो खरा. सारांश कसाहि विचार केला तरी 'नवीन वर्ष तुह्मांला सुखाचे जावो' अशा प्रकारची सदिच्छा स्फुरविणारी वर्षप्रतिपदा हिंदूंच्या पंचांगांत जिवंत उरलेली नाही असे स्पष्ट ह्मणणे प्राप्त आहे. हिंदु जनांनी आजपर्यंत अनेकांना शककर्ते बनविले. बौद्ध व जैन धर्मीय बांधव अनुक्रमे बुद्ध व महावीर यांच्या जयंत्या किंवा निर्वाणकालावरून विशिष्ठ शकाची गणना करीत असताना शिवाजी महाराजांचा राज्याभिषेकशक अलीकडे तुरळक तुरळक स्वाभिमानाचे द्योतक ह्मणून कोणी पत्रव्यवहारांत लिहित असतात. परंतु असले शकानुशक काळाला टक्कर देऊन जिवंत राखावयाचे असल्यास त्या शककर्त्यांच्या अनुयायांत जी एका विशिष्ठ संस्कृतीची धडाडी लागत असते, सामाजिक संघटनेचा जो एक विशेष जोर असावा लागतो आणि राजकीय वर्चस्व टिकवून धरून त्याच्या सहाय्याने मानवी व्यवहाराच्या इतर क्षेत्रांत आपले अस्तित्व भासविण्याची जी एक जळजळीत महत्त्वाकांक्षा लागते, तिच्या अभावामुळे हे सर्व हिंदु शककर्ते कालरूपी सिनेमाच्या पटलावरील चित्रांप्रमाणे आभासरूप बनले गेले.

हिंदुप्रमाणे मुसलमानांतहि हिजरी, फसली वगैरे शकांचा कितीहि सुळसुळाट असला, तरी आज अखिल जगतावर इसवी सनाचेच प्राबल्य जबरदस्त आहे. या सनाच्या मागे इंग्रेजी संस्कृतीचा अभेद्य तट उभा आहे. इंग्रज जेते आणि हिंदीजन जित; ते सत्ताधिश, हे सत्ताधीन; ते राजकर्ते, हे गुलाम, या नात्यामुळे इंग्रेज हा शब्द गुलाम हिंदूंना तिरस्करणीय वाटणे स्थितिसिद्ध आहे. परंतु ही दृष्टी बाजूला ठेऊन इसवी सनाला अखिल जगतांत कायमचा रूढ करण्यास कारण झालेल्या इंग्रेजी संस्कृतीचा प्रत्येक स्वयंनिर्णयेच्छू राष्ट्राने अभ्यास करणे इष्ट आहे. राजकीय वर्चस्वाच्या उलाढाली आजपर्यंत अनेक राष्ट्रांनी अनेक वेळा केल्या. रोम, ग्रीस, इजिप्त सारखी मोठमोठी साम्राज्ये आज केवळ नामशेष उरली आहेत. कदाचित ''ज्यांच्या मावळतो रवी न कधिही राज्यावरी थोरल्या'' हा गर्वभार वाहणाऱ्या इंग्रेजांची राजकीय सत्ता जगतीतलावरून आमुलाग्र कधी काळी नष्ट होईल; नाही असे नाही. या अशाश्वत जगांत शाश्वताची घमेंड काय उपयोगी? सर्व जगावर धर्मसाम्राज्याचा वेलविस्तार वाढून, हस्तिनापूरच्या सिंहासनावर त्रिखंडचक्रवर्तींना राज्याभिषेक करणारे स्वातंत्र्यप्रिय हिंदुजन आज कर्मन्यायाने रोख गुलामगिरीत पिचत पडले आहेत. उलट पक्षी हिंदूंच्या सर्वांगीण सुधारणेचा ज्याकाळी कळस झाला होता, त्या काळी अस्तित्वांतहि नसलेले इंग्रज लोक आज अखिल भूगोलाला आपल्या टाचेखाली वाटेल तसा दडपिणारे सत्ताधीश होऊन बसले आहेत. एकाने चढावे, दुसऱ्याने पडावे. पडलेल्याने पुन्हां उठावे आणि चढेलांना तुडवावे. हा कालप्रवाहांतील चमत्काराचा एक सनातन सिद्धांत आहे. परंतु इंग्रेजी संस्कृतीच अशा बलवत्तर पायावर उभारलेली आहे, तिने भूतकालांतील नामशेष राष्ट्रांच्या भल्याबुऱ्या अनुभवांचा असा उत्कृष्ट परिपाक आपल्या प्रकृतीत उतरविलेला आहे आणि लोकसंग्रहाचे आपले धोरण इतके व्यापक पाचक व सर्वस्पर्शी बनविले आहे की, काळाच्या करणीने उद्यां इंग्रजी राज्यसत्ता जगाच्या नकाशावरून अजिबात पुसली गेली, तरी इंग्रजी भाषा जगाला विसरावयास लावण्याची शक्ति कालाच्या हाती राहिलेली नाही. इंग्रजी भाषेने आज जग जिंकलेले आहे. इंग्रेजी भाषा आज जगाची जिवंत भाषा होऊन बसलेली आहे. जगाचे विचारयंत्र इंग्रेजी भाषेच्या

आंसावरच गरगर फिरत आहे. आत्मानात्म विचारांची कोडी याच भाषेच्या मध्यस्थीने आज सारे जग सोडवीत आहे. इंग्रेज व्यक्ति नष्ट झाली, तरी इंग्रेजी भाषा नष्ट होणे शक्य नाही. इंग्रेजी संस्कृतीचा दरारा आज त्यांची भाषा जगाच्या कोनाकोपऱ्यांत नेऊन भिडवीत आहे. हा भाषेचा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. तलवारीने कमावलेली राज्ये धुळीस मिळतात आणि मिळाली. मुत्सद्देगिरीच्या धमधाटीवर उभारलेले राजकीय मनोरथाचे किल्ले धडाड कोसळून मुत्सद्यांच्याच अंगावर पडले. युक्त्याप्रयुक्त्यांनी जिंकलेली राष्ट्रें अनेक जेत्यांच्या हातून निसटून स्वतंत्र झाली व होतील. पण भाषेच्या जिवंत सूत्रांत निगडित केलेल्या जगाला ते सूत्र तोडून टाकणे केव्हांहि शक्य नाही. इंग्रेजी भाषेचा इतिहास हा एक कल्पनारम्य विषय आहे. भाषेने जिंकलेले जग भाषेच्या जनकाची स्मृति कधी तरी गंजू देईल काय?

भाषा जबरदस्त झाली; तिने पृथ्वीचा गोल आंवळ्याप्रमाणे आपल्या तळहातावर खेळविला. म्हणून क्रिस्ती शकाचा आज अखिल दुनियेवर बोलबाला गाजत आहे. तारीख माहे आणि इसवी सन याशिवाय जगाच्या व्यवहाराचे आज पान हालत नाही. शुद्धवद्याची घटपटादि खटपट करणाऱ्या शालिवाहनी शहाण्यांनासुद्धा तारीख माहे सनाच्या आधारानेच आपले दिवस कंठावे लागतात. आजचा मनु असा आहे की, जानेवारीची १ ली तारीख म्हणजे सर्व जगांत वर्षप्रतिपदेचा मंगल दिवस म्हणून गणली जाते. या दिवशी सर्वत्र शुभेच्छेचे संदेश धाडले जातात. आम्हीहि जगन्नियंत्या परमेश्वरापाशी शुभाशिर्वाद मागतो की, देवा, हिंदु समाजाला अंतर्बाह्य अभेद होण्याची बुद्धी दे. त्याच्या अस्तित्वावर प्रत्यक्षाऽप्रत्यक्ष येणाऱ्या भिन्न संस्कृतीच्या संग्रामांत टिकाव धरण्याइतकी त्याची सामाजिक संघटना वज्रप्राय करण्याची त्याला प्रेरणा दे आणि हे नवे वर्ष आमच्या सर्व वाचकवृंदाला विचार उच्चार आणि आचार या त्रयींत प्रबोधक असे होऊ दे.

हिंदुजनांचा तरणोपाय नुसत्या शिव्यागाळीने किंवा हातबोटे मोडण्याने होणार नाही. इंग्रेजी राष्ट्राने आज जे सामर्थ्य संपादन केले आहे, त्याची कमावणी त्यांनी कसकशी केली, याचा चिकित्सापूर्वक स्वाध्याय झाला पाहिजे. इंग्रेजांच्या राजनीतीवर कोरडे वाक्प्रहार करण्यापेक्षां, त्यांच्या सामाजिक व धार्मिक संघटनेची मूलभूत तत्वे काय आहेत आणि या तत्वांवर त्यांनी आपल्या राष्ट्रधर्माची प्रस्थापना कशी केली आहे, याचा शांतपणे विचार केला पाहिजे. इंग्रेजांशी स्वातंत्र्यार्थ झगडा देण्याची क्षेत्रे वर्तमानपत्रांची ऑफिसे खास नव्हती. परिषदांतून बोकाळलेल्या तोंडपाटिलकीचेहि ते तोंड नव्हे. हिंदूंच्या कृतकर्मांनी त्यांच्या समाजाच्या आंगी भिनविलेला गुलामगिरीचा रोग या कोरड्या बाह्य उपचारांनी लवमात्र कमी होणार नाही. आजचा हिंदु समाजापुढचा प्रश्न समाज-संघटनेचा आहे. ही संघटना जातिभेदाची पकड ढिली पाडल्याशिवाय-पडल्याशिवाय नव्हे! पाडल्याशिवाय होणार नाही. आतांपर्यंत या प्रश्नाला राजकारणी हिंदु शहाण्यांनी कःपदार्थ मानल्यामुळेच देशाची प्रगति ह्मणजे घाण्याला जोडलेल्या बैलाच्या प्रवासासारखी झाली. बैल मरमर चालला पन्नास कोश, पण अखेर घाण्यापासून तीनच फुटांवर! राजकारणी चर्चेची उपयुक्तता कितीहि असली तरी तिने सामजिक प्रबोधन केव्हांहि होऊ शकत नाही. हे अलीकडे सुरू झालेल्या संघटनाच्या चळवळीने शुद्ध राजकारणी प्राण्यांना पटलेले दिसते. इंग्रेजांची समाज-रचना ह्मणजे सुरलोकची, असे आह्मी ह्मणत नाही. किंवा तेहि ह्मणत नाहीत त्यांतहि दोष आहेत व असणारच. परंतु ती रचना निदान अशा तत्वावर झालेली आहे की तिजमुळे इंग्लंडच्या राष्ट्रधर्माला कधि अडथळा होत नाही. राष्ट्रहिताच्या स्थंडिलावर इतर सर्व

हितांची आहुती देण्यास ज्या समाजांतील व्यक्तीमात्र सिद्ध होतो, ती समाजरचना काळाच्या उलट सुलट प्रवाहाला टक्कर देण्यास केव्हांहि लायख असते. प्रथम राष्ट्रहित, नंतर इतर हिते. ही जाणीव उत्पन्न होण्यासाठी समाजक्षेत्राची मनोभूमिका चांगली नांगरली पाहिजे. हे कार्य अत्यंत महत्वाचे आहे. पवित्र आहे. या कामी सर्व हिंदु जनांनी भावी काळाकडे नजर देऊन लगबग करावी, अशी प्रार्थना आहे.

□□□

लेख

Hooliganism In The Liberal Party

To,
The Editor, Prabodhan.
Sir,

A propos the last Provincial Anti-Untouchability Conference at Poona, I wonder whether your readers have all noted that to all appearances the most distinctive feature of this the fourth Session of it was its untouchability in the eyes of latter-day Liberals as a party. The lineal political descendants of Ranade, Gokhale and Chandavarkar have, it would appear, hit upon a famous improvement upon the policy advocated and followed all their life by these departed patriots in that behalf, the new policy being to turn a somersault and adopt the least inconvenient method picked up in recent years by Maharashtra Swarajis's, viz. of passing pious resolutions of sympathy with the cause of untouchability and in the same breath secretly swearing non-co-operation with even the self-reliant and self-ameliorative endeavours of Untouchables as a Community.

Nobody present at the Conference could have failed to notice this impression on the part of the public due to the treatment the Conference received this time from the Liberals at Poona. The subject was openly and publicly discussed and resentment shown at the Conference itself. Naturally enough, the feeling on the part of the public about this obvious change of Liberal attitude on the subject in question was one of unmitigated surprise, and it found characteristically sarcastic vent in the columns of the Kesari. The Dnyan Prakash in its issue of the 4th inst. took up the cudgels for what appears to have struck the writer of the leader of that issue as wounded Liberalism. But instead of putting up a dignified fight worthy of the apologist and the great traditions of Liberalism in India, the Dnyan Prakash appears to pique itself on giving Liberalism the unenviable role of a harlot cutting her nose in public to spite a supposed enemy and then screeching and squealing oaths indiscriminately at a recognising stare of astonishment. Liberalism, Sir, would be in a sad plight, indeed, if it required to be defended in the utterly shabby manner the Dnyan Prakash has done or if it really stood in need of such a sobbing and screaming snob of an advocate.

The facts, Sir, as they appear from information collected on the spot and the

revelations, partial as they are, now made by the Dnyan Prakash are the following. A suggestion emanated from the organisers of the Liberal Federation at Poona to the effect that as general preparations for the federation would in nearly all respects, as on some former occasions, serve the purposes of the Anti-Untouchability Conference as well the latter Conference had better be held as a sister demonstration in the same Pandal. This suggestion came rather late, but it was approved of in the end, and special preparations for the Anti-Untouchability Conference set on foot. After the Reception Committee was formed, the Presidentship was discussed. Those from the Liberal camp who inspired the convening of this Conference agreed with the organisers thereof that the first refusal about the chair should be given to Dr. Ambedkar. To the other Liberal suggestions the organisers appear to have demurred. The Liberals wanted one of their own political persuation to be selected, while their confreres on the Reception Committee probably wanted the honour to go this year to the Non-Brahmin party. In respect of a cause about the urgency of which there is by now at least a theoretical consensus of opinion among all political parties is the land, it would not be an unnatural or unjustifiable thing if a desire existed that the honour once accepted by the Loyalist Dr. Sir Ramkrishna G. Bhandarkar following the lead given by the great and good Prince H. H. the Gaekwar, then enjoyed by the Liberal Mr. Kamat, next conferred on the Swarajist Mr. Belvi, should this time go to a Non-Brahman leader like Khan Bahadur Cooper. At least if the Liberal individuals taking part in the discussion on the selection of a President felt sorry that they would not be able to have their way in the matter, they should have taken this view of the question. Probably they did. The Dnyan Prakash tells us that a responsible Federation official like the Secretary did take some such wise view, and was for keeping the promise of lending the Pandal.

All this was good tactics and even good constitutionalism, as the Anti-Untouchability Conference is not a subsidiary adjunct of the annual Liberal gathering but an independent entity in which people of all shades of political thought and creed can take part without compromising their party allegiance. It has all along been treated as such in the past by Liberals. The attitude of the Federation Secretary, therefore, was in keeping with the best traditions of Liberalism. But at this point enters the serpent in the story. The part played by the Tempter on this occasion was an improvement on that recorded in the Old Testament. To the powers of seduction appear to have been joined the powers of threat. The Dnyan Prakash discreetly veils the identity of those untouchables from Poona and those Federation delegates from Satara whom it uses, as the eunuch Shikhandi was used in a memorable battle against the heroic Bhishma to shield itself from the attack of the Kesari. These, the Dnyan Prakash tells us in tears, vowed a deliberate stampede at the conference in the name of Liberalism, if the formal election to the chair of the President-elect Mr. Cooper were to be moved in the Federation Pandal. The Dnyan Prakash, therefore, argues that as it was impossible for the Liberal party as a party to permit both, it was put to an election and it elected to sacrifice its long association of many years with a cause of admitted urgency and importance to the personal whims of a few either unimportant or imaginary untouchables from Poona and a few mushroom Liberals from Satara. As far as the present writer is aware, Sir, not a single individual of any communal importance from the Adi-Hindu classes at Poona is such a sworn enemy

of Mr. Cooper as to be ready to forswear all that the cause of anti-untouchability stands for today simply to spite him. Nor has Mr. Cooper so far caused either by utterance or conduct such a bitterness to the writer's knowledge among the Adi-Hindu castes in general and the Adi-Hindu Community of Poona in particular as to set any member of the community in Poona on fire with either indignation or envy at the mention of his name. In the Satara District Mr. Cooper is said to be the greatest employer of labour and the greatest benefactor of the Adi-Hindu communities directly or indirectly. In fact, if the enthusiastic reception and courtesy, which it is said, he received during the Conference days at Poona from all and sundry among the Adi-Hindus of Poona and elsewhere is to be taken as an index of his popularity among them, the inclusion of Adi-Hindus made by the Dnyan Prakash among those who swore hostility to Mr. Cooper's election cannot be better than a fib, and not even a clever fib at that because it is so transparent.

Divested of its mendacity, therefore, the defence attempted by the Dnyan Prakash amounts to simply this, viz. that the Reception Committee of the federation had to take the stand they did on this question of lending the Pandal because (I), a few-not all, please note, of the members from Satara, (and obviously all members from Satara did not attend and the members from Satara on the Reception Committee were only a few of the Liberals at Satara),-I say because a few of the members from Satara swore to kick a row and cause unseemly scenes at the Anti-Untouchability Conference, claiming to do so because they were a fraction of the hosts and the poor Anti-Untouchability Conference would be their guests and all that for no stronger reason than that Mr. Cooper by his growing popularity had rendered himself such an eyesore to them that they would try and damn him as far as lay in their power and in right of a seat on the Reception Committee of the Federation even to the extent of tarring their own faces in broad day-light and in public to spite Mr. Cooper, and (2) because the rest of the attending members on the Reception Committee did not care to baulk these of their petty and puerile personal whim or revenge.

What strikes me, Sir, as reprehensible to a degree in all this clumsy business in the let-alone attitude, even to the extent of sacrificing a funndamental and salutary party-principle to the seductive or, as the Dnyan Prakash tells us, coercive influence of personality, adopted by the attending fellow-members of these desperadoes of party units from Satara. Everybody of course is welcome to nurse his own private feelings, however unearthly, to his heart's content. But it is subversive of party discipline and party tradition to let him run amok with a party label on to whatever he thinks, speaks or does under the influence of a sinister passion. And this is what the Reception Committee of the Federation has in effect done.

And what after all, are the reasons for the insolence of the "few Satara members"? They did not want Mr. Cooper to preside, because in the first instance he was a leader of the Non-Brahmin party, and secondly he happened to be connected with the liquor trade!! These are all the sins of Mr. Cooper. Now Mr. Editor, could any man outside Bedlam be expected to agree that to avoid participation in the election of such a man to the chair the inheritors of the priceless traditions of Liberalism in the land would be justified in serving the hallowed, long, close and active Liberal association with the cause of anti-untouchability?

Let us examine these two facts of Mr. Cooper's position. They are trotted out as his disqualifications for the honour the Conference thought fit to bestow upon him. The Dnyan Prakash wags its tall and pricks its ears to the tune struck up by some Sir Oracle from Satara!

In assuming that nobody is in illusion about the alleged perniciousness of Mr. Cooper's views in matters social as well as political, it begs the question. It would certainly be interesting to see how the Dnyan Prakash would meet a challenge to prove this! Assuming unproved wickedness of views, it goes on to assume that Mr. Cooper deliberately stirred up strife between Brahmins and Non-Brahmins for his own private ends. I wonder what proofs of Mr. Cooper's special guilt the writer of the leader in question has in his possession besides the word of his Satara Oracle. These assertions are, as everybody in Satara Dt. knows, as unfounded as they are ridiculous. If the leader writer refers to the doctrines of the Non-Brahmin creed, Mr. Cooper by virtue of his position as a leader of Non-Brahmins shares the responsibility with all other leaders of the movement, with Mr. Latthe for instance. Mr. Latthe is the President, while Mr. Cooper is Vice-President, of the Non-Brahmin League. But the Dnyan Prakash like his Satara inspirers was willing to have Mr. Latthe as his choice next to Dr. Ambedkar! The writer in the Dnyan Prakash and the little-minded Liberals of his kidney thus have no quarrel with the Non-Brahmin leaders as such, so far as the Anti-Untouchability chair was concerned. Mr. Cooper is Vice-President of the Non-Brahmin League, was chairman of the Reception Committee at the last Provincial Non-Brahmin Conference, is President of the Satara Municipality, Vice-President of the Satara District Local Board and has been an active member of the Provincial Legislative Council for two successive trienniums, leaving aside his active connection with some other public institutions in his District. Coming nearer home in the argument after his return to the late Bombay Legislative Council by virtue of the same me mods he followed at the last election and during his connection with the liquor trade in the District, the Satara Liberals thought him fit for the Vice-Presidentship of the Satara District National Liberal League which position he occupies today! Does the leader-writer in question suffer from so incurable a paralysis of the nose that in view of this fact his unnecessary, unprovoked, unfounded and lying tirade against Mr. Cooper could not stink in his own nostrills!

The next point levelled against Mr. Cooper is his connection with the liquor trade. It has by now become a too conventional and miserable gibe against Mr. Cooper. One would have wished that a man calling himself a Liberal had desisted from condemning another for the pursuit of a legitimate profession. I have a suspicion, Sir, that the gibe against the legal profession that it is the profession of licensed robbers and instigators has not become as current and general as the gibe against liquor contractors because the former has attracted people more in numbers and better in intellect. The difference between the two professions, speaking morally as well as with reference to utility, is a difference of degree alone. At any rate both are perfectly legitimate professions, and a legitimate profession, however much out of favour with strict moralists, cannot act as a limitation to a man's public career or worth. That I take to be part of the Liberal creed.

The third ground for opposing Mr. Cooper's election, according to the Dnyan Prakash, was a fear on the part of Liberals lest names like the late Mr. Justice Ranade and like

Dr. Paranjapye might be unnecessarily besmitched with mud under a Non-Brahmin in the chair. In its issue of the 6th inst. which reproduces the stinking leader in question prove the * trary to have actually happened as a resolution mourning the deaths of Sir N.G. Chandavarkar and Mr. V. R. Gupte and another, thanking Dr. Paranjapye for having befriended the untouchables during his * among others. The Dnyan Prakash shows itself an adept in the art of blowing hot and cold in the same breath, because in its report of the Anti-Untouchability Conference published in the weekly issue of the 6th inst. it compliments Mr. Cooper's speech as being remarkably full, well thought out, sober and balanced. It devotes a whole panegyric to Mr. Cooper in all sincerity for this speech in its leader of today's issue. The truth appears to be that the paper was really vexed at the venom cast by the Kesari and wanted to make a scapegoat of somebody. It ought to have pilloried the socalled "few Liberal members" from Satara. It was these in fact who put the fair Liberal party into this tight corner. The true Liberals on the Reception Committee preferred to commit the good-natured mistake of refusing the Pandal to prevent ** rather than to show a firmness of mind and sense of party ** line by ostracising the audacious "few members" from Satara, and then sought to repair the mistake by going, or sending influential representatives like Messrs G.K. Devdhar, D.G. Dalvi and G.A. Natesan, to attend the Conference at the theatre.

If the Dnyan Prakash had better sense than seeking to inflict a vicarious punishment, it would have exposed the Satara hooligans with the vigour they deserved and not shed impotent tears at what happened in the manner it has done. Indian Liberalism certainly has greater gifts of vision and judgment than the Dnyan Prakash timidly believes and does not need the halting, prevaricating and tearful advocacy of the Dnyan Prakash.

Yours truly
Liberal Tradition,

Poona, 11th Jan. 1924.

The letter is an exhaustive summary of almost all the grounds which could be adduced in an honest and straightforward defence of Hindu Liberalism from public criticism about the significance of the latest attitude adopted by some Liberals at Poona towards the Anti-Untouchability Conference. Liberal Tradition has rightly given a sound drubbing to the writer of the leader in the Dnyan Prakash of the 4th inst. If the writer of the leader in question had been a true Liberal, he would have taken the right attitude in the matter and expressed sincere * at the impasse created by Mr. Cooper's opponents from Satara on the Reception Committee of the Liberal Federation ** individual members on behalf of the party, so far from weakening solidarity, is sure to reflect credit on the party, and hand it down to posterity as stern adherents of principle. We have independently expressed our opinion on this question in our Marathi columns elsewhere and will soon revert hereafter in these columns to the letter of Liberal Tradition.

Editor - Prabodhan.

□□□

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द लागत नाही. ** उपलब्ध झालेल्या अंकात वाक्य वाचता येत नाही.

अग्रलेख

परिषदांचा ना ताळ

चक्रनेमी क्रमाने दरसाल येणाऱ्या डिसेंबरचा शेवटचा आठवडा म्हणजे राजकीय सामाजीक धार्मिक औद्योगिक तात्विक संगीत वगैरे नाना प्रकारच्या परिषदांच्या एक बोलघेवडा मामुली हंगाम होऊन बसला आहे. निरनिराळ्या जातींच्या सामाजीक उन्नतीच्या परिषदांचे रिपोर्ट वाचले की हसू येते. त्यांची ती स्वागत कबक्ती, तो स्वागताध्यक्ष, त्याचे ते अघळपघळ व्याख्यान, मीठभाकरांचे आदरातिथ्य गोड मानून घ्या म्हणून केलेली हस्तिदंती विनवणी, अध्यक्षाच्या निवडणुकीपूर्वीचा त्यांच्या 'अलौकीक' खऱ्याखोट्या सद्‌गुणांचा पराक्रमाचा समाजसेवेचा दातृत्वाचा विद्वत्तेचा खडीसाखरी स्तुतिपाठ, नंतर खुद्द अध्यक्ष महाराजांचे ते लांबलचक भाडोत्री विचारांचे कंटाळवाणे चऱ्हाट, विषय नियामक कंबक्तीची निवडणूक, त्या कंबक्तीच्या कबक्तीतून जिवंत निसटलेली ती ठरावांची भेंडोळी, त्यावर मुखसुख घ्यावयास धाधावलेल्या वावदुक 'समाजसेवकां'ची भाषणे, ठराव पसार झाल्याची खुण म्हणून श्रोतृवृदांनी लांकडा बाहुल्यांप्रमाणे वर खाली केलेल्या हातांच्या कसरती, अध्यक्षांचा समारोप, अभिनन्दन व आभार प्रदर्शनाच्या आरत्यांचा थाट आणि अखेर चमचमीत किंवा मचमचीत भोजनाचा फडशा पडला की समाजोन्नतीचे कार्य पार पडून पुढल्या नाताळापर्यंत ते बिनधोक खुंटीला लागले. कोणतीहि आणि कसलीहि परिषद असो, तिच्या नाटकाचे प्रवेश व अंक अगदी एक थाटाचे. हिंदुस्थानाच्या काळजाला भिनलेली गुलामगिरी चुटकीसरशी आमूलाग्र उखडून टाकण्यासाठी जन्माला आलेल्या काँग्रेस परिषदेचीहि कथा हीच. विषयनियामक कंबक्तीत ठरावांचे सांचे पडतांना क्षुल्लक शब्द योजनेवर सुद्धा पानिपती रणकंदने माजावयाची व ठरावांची भेंडोळी भराभर पसार व्हायची! यापुढे मजल जाईल तर हराम!! अखिल भारतीय सामाजिक परिषदेचा जलसा पाहिला तरी हाच प्रकार. नुसती व्याख्याने आणि ठराव, ठरव आणि व्याख्याने. दुसरी बात नाही. परिषदेची काकड आरती झाली की गेली सगळी उन्नतिप्रिय पांखरे भुरकन् उडून जिकडच्या तिकडे. मग हिंदु तो हिंदु आणि मुसलमान तो मुसलमान. सगळे भेद, सगळे दोष, सगळे अन्याय, सगळ्या रूढी कायमच्या कायम. त्यांत रतिमात्र बदल नाही, सुधारणा नाही, कांही नाही. तात्पर्य, परिषदांपासून फायद्या ऐवजी तोटेच अधिक होऊ लागले आहेत, असे स्पष्ट म्हणावे लागते. प्रत्यक्ष कार्यक्षमतेपेक्षां कोरडा वावदूकपणा आमच्यांत

जास्त बोकाळला आहे. आचार विचारांत व्यभिचार माजविण्याची आह्मांला दिक्कत वाटेनाशी झाली आहे. ठरावांची अंमलबजावणी खुंटीला अडकविण्याची सवलत असल्यामुळे, आमची अकीन आमचा प्रामाणीकपणा आमची सत्यप्रियता गांवभवानीच्या पातिव्रत्या इतकीच कवडी किंमतीची होऊन राहिली आहे. खुद्द ठराव पुढे मांडणारेच जर ठरावाला आपल्या आचरणाच्या ओसरीवर पाऊल ठेवू देत नाहीत, तर त्याला दुजोरा व पुष्टी देणाऱ्या महात्म्यानी त्या ठरावाच्या तत्वांना मुष्टीप्रसाद देण्याचा मनाचा मोठेपणा कां दाखऊ नये? राष्ट्रीय सभेपासून तो थेट मूठ भर लोकसंख्येच्या एखाद्या जातीच्या 'प्रचंड' परिषदेपर्यंत जिकडे पहाल तिकडे नुसत्या वाचाभ्रष्ट बडबड्यांचा सुळसुळाट! करणीच्या नांवाने ०. लक्षावधि रुपयांचा चुराडा उडवून दरसाल होणारी ही परिषदांची नाटके ह्मणजे गुलाम राष्ट्राच्या नानाविध घाणेरड्या व्यसनांत एका नवीन व्यसनाची भर होय, यांत आह्मांला मुळीच संशय वाटत नाही.

आधी आत्मोद्धार आणि मग राष्ट्रोद्धार. आत्मोद्धाराच्या बिनचुक मार्गाला मनुष्य लागला की त्याला 'तूं राष्ट्रोद्धार केव्हां करणार?' हा प्रश्नच विचारण्याची आवश्यकता उरत नाही. आत्मोद्धाराला सुरुवात झाली की पहिले टप्प्यांतले क्षेत्र ह्मणजे आपला समाज दिसूं लागतो. जातिभेदाळू हिंदूंची दृष्टी जात्याच हत्तीच्या दृष्टीइतकी बारीक असल्यामुळे खऱ्या व्यापक सामाजीक क्षेत्राचे तिला नीटसे अवगाहन करतां येत नाही आणि दृष्टीचा कोन कितीहि आडवा तिडवा ताणला किंवा तिची फेंक कितीहि दूरवर भिरकावली, तरी जातीच्या क्षितिजापलीकडचे तिला मुळीच फारसें कांही दिसत नाही. सामाजिक परिषद अखिल भारतीय करा, नाहीतर अखिल एशियाटिक करा, त्यांत हिंदुमात्र जोपर्यंत आहे, तोपर्यंत तोंडांतून त्याच्या कांहीहि वल्गना उसळत असोत, अंतर्यामी त्या या जातीविषयक कल्पनांची बसलेली मगरमिठी त्याला सोडून क्षणभरहि दूर होत नाही. आज या हिंदुजनांना स्वतःची जात व तद्विषयक भावना यांचा एकाकी संन्यास करण्याचे धैर्य होत नाही. अर्थात् आत्मोद्धाराचा व्याप स्वजातीपुरताच विस्तृत करण्यासाठी तो केव्हांहि उत्सुक असतो. ही उत्सुकता निःसंशय व संघटनेचीच अनास्था, तेथे सगळ्या हिंदूंनी राष्ट्रकार्याच्या पुनर्घटनेसाठी घसे फोड फोडून आकांड तोंडव करावे, हा गुलाम राष्ट्रांतल्या गुलामांच्या गुलाम मनोवृत्तीचा चिळस आणणारा देखावा होय.

हिंदूंना आपल्या सात्विक मनोवृत्तीचा फार अभिमान. परंतु सत्वस्थ वृत्तीमुळेच त्यांचा अधःपात झाला आणि त्या वृत्तीचे पर्यवसान आज उघड उघड नामर्द हलाकीत झालेले आहे, तरी त्यांना त्याची जाणीव नाही. परिषदांचा सुळसुळाट उडवून आपल्या बोलभांडपणाची कोरडी प्रदर्शने भरविण्याऐवजी हिंदूजनांनी आपल्या वर्तमान परिस्थितीचे निर्दय निरीक्षण करून, आत्मोद्धाराच्या खऱ्या आचाराला सुरुवात करावी. ईश्वर त्यांना प्रेरणा देवो!

□□□

स्फुट विचार

अभिनंदनीय आचार-क्रान्ति

हिंदूंच्या सामाजिक संघटनेची, नव्हे, पुनर्घटनेची आवश्यकता आजच्या घडीला जितकी भासत आहे, तितकी यापूर्वी मुळीच भासत नव्हती. सामाजिक सुधारणा अशी करावी आणि तशी करावी, याचा नुसता विचार आणि उच्चार करण्यांतच गेली ५० वर्षे फुकट गेली. आचाराला आतां नुकतीच कोठे थोडी सुरुवात होत आहे. संघटनेला रक्ताचा जिव्हाळा लागतो. नुसत्या सुधारणेच्या पाणीदार वक्तृत्वाच्या पाण्याने संघटना होणे शक्य नाही. ही जाणीव आतां थोडी थोडी सर्वांना पटूं लागली आहे. ही प्रगति इतकी मंदगति आहे की, तिला 'प्रगति, हे नांव देऊन, स्वतःकडे प्रागतिकपणाची पुण्याई लाऊन घेणे निव्वळ आत्मवंचना होय. जपानने आपल्या राष्ट्राची सर्वांगीण पुनर्घटना अवघ्या ३५ वर्षांत केली, पण हिंदु समाजसुधारकांना मिश्रविवाहासारखी किंवा विधवा-पुनर्विवाहासारखी एखादी क्षुल्लक सुधारणा अंमलांत आणावयाला ५० वर्षेहि पुरूं नयेत, यावरून आम्ही हिंदु लोक चालूं जगांत जगण्याच्या लायकीचे कितपत आहोत, याचा प्रत्येकाने आपल्या मनाशीच विचार केलेला बरा. स्वराज्यासाठी आणि स्वयंनिर्णयासाठी तीक्ष्णतम तळमळीच्या उलाढाली करणाऱ्यांना सामाजिक पुनर्घटनेचीच तेवढी दरकार भासूं नये, हा मनोयंत्राच्या उलट ठेवणीचाच पुरावा नव्हे काय? आजचा हिंदू समाज आत्मरिपु आहे. तो गुलामगिरीला सर्वतोपरी लायक असाच आहे. स्वराज्य हा त्याचा जन्मसिद्ध हक्क अतःपर मुळीच राहिलेला नाही. रक्ताला रक्त पारखे झालेले आहे. धर्माची कसोटी जातिभेदावर ठरत असल्यामुळे हिंदुधर्म माणसाला गुलाम बनविण्याचे एक रामबाण रसायन होऊन बसले आहे. मतस्वातंत्र्याच्या दिमाखावर जन्माला आलेल्या अनंत पक्षभेदांचे पर्यवसान सुद्धां जातिभेदाच्याच वळणावर घसरले आहे. स्वजातिवर्चस्वाच्या व रक्तशुद्धीच्या कल्पना आमच्या आत्मोद्धाराच्या नानाविध चळवळींचे मुख्य भांडवल बनले आहे. सारांश, खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याच्या प्रयत्नांना आह्मी अझून सुरुवातच केलेली नाही. आमच्या प्रगमनशीलतेच्या वलाना विचार व उच्चार यांच्या कुंपणापलीकडे फारशा किंवा मुळीच गेलेल्या नाहीत; हे कबूल करणे प्राप्त आहे. अशा स्थितीत एखाद्या निवडक व्यक्तीने उच्चाराची सार्थकता पटविण्यासाठी, प्रचलित गुलाम जनमताची पर्वा न राखतां, प्रत्यक्ष आचार-क्षेत्रांत धैर्याने टाकलेले पाऊल केव्हांहि अभिनंदनयच होते. या दृष्टीने पाहिले तर बडोदे संस्थानचे दिवाण सर मनुभाई

यांची विद्यालंकृत कन्या कुमारी हंसाबेन यांचा डॉ. जीवराज मेथा यांच्याशी ता. ६-१-२४ रोजी झालेल्या मिश्रविवाहाबद्दल प्रबोधनाला अत्यानंद होत आहे. वधूची जात नागरब्राह्मण असून वर जातीने वैश्य आहेत. दोघेहि प्रौढ व सुशिक्षित. परदेश फिरुन तेथल्या भिन्नभिन्न सामाजिक धार्मिक व राजकीय चळवळीचे निरीक्षण केलेले. श्री. सौ. हंसाबेन बाईंनी दाखविलेले आचारक्रांतीचे हे मनोधैर्य अत्यंत कौतुकास्पद आहे. सर मनुभाई व डॉ. जीवराज मेथा या दोनहि कुळांना या आमच्या प्रगमनशील भगिनीने सामाजिक पुनर्घटनेच्या इतिहासांत चिरंजीव केले. जगदीश या वधुवरांना अखंड सौख्यांत ठेवो आणि हिंदुसमाज पुनर्घटनेची अनेक महत्वाची कार्ये त्यांच्या हातून घडोत!

दुसरा मिश्रविवाहाची आनंददायक, बातमी इंदोरहून श्री. दत्तात्रय राजाराम गडकरी कळवितात ते आपल्या पत्रांत ह्मणतात ''जातिभेद नाहीसे होण्यासाठी सर्व जातीचे संघटन झाले पाहिजे. खऱ्या संघटनाला रक्ताचाच जिव्हाळा अवश्य आहे. प्रत्यक्ष रक्ताचा संबंध आल्याशिवाय कळकळीचा जिव्हाळा उत्पन्नच होणे शक्य नाही, हा आपला सिद्धांत अक्षरशः खरा आहे व तो प्रत्येक विचारवंताला पटलाच पाहिजे. तेव्हां असला जिव्हाळ्याचा संबंध घडवून आणणाऱ्या कर्तबगार सुधारकांचे अभिनंदन करणे प्रबोधनाचे कर्तव्य आहे. मिश्रविवाहाच्या बाबतीत आमच्या परमप्रिय इंदोराधिपति महाराजांनी आधीच सक्रीय उदाहरण घालून दिलेले आहे. महाराजांचा नवमतवादी बाणा आणखी एक अभिनंदनीय गोष्टीने पुनश्च सिद्ध झाला आहे. ता. ३०-१२-२३ रोजी आमचे लोकप्रिय श्री युवराज यशवंतराव होळकर यांचा विवाह कागल संस्थानाधिपतीच्या राजकन्येशी होण्याचे निश्चित ठरून, साखरपुड्याचा समारंभ मोठ्या थाटाने पार पडला.'' मराठा जातीच्या जातिशुद्धतेच्या तीव्र कल्पना आणि सप्तकुळी शाण्णवकुळी कडवट गोडवट वगैरे आजहि रूढ असलेल्या भावना विचारांत घेतां, कागलकर मराठा घाटग्यांनी इंदोरकर धनगर जातीच्या होळकरांशी सोयरेसंबंध करण्यास पुढे यावे, ही घटना काळाचा ओघ आता कसा वाहूं लागला आहे याचे अभिनंदनीय द्योतक आहे. 'निसर्गसिद्ध' पुढाऱ्यांनीच अशा रीतीने नवमन्वंतराच्या प्रवाहाकडे आणि अखिल हिंदु समाजाच्या पुनर्घटनेकडे दूरदृष्टी ठेऊन, जातिभेदाची पकड-पोटजाती पुरतीच कां होई ना! ढिली करण्यास याप्रमाणे पुढे सरसावले ह्मणजे त्यांच्या अनुयायांत एक प्रकारचा आत्मविश्वास आपोआपच उत्पन्न होऊं लागतो. श्रीमंत कागलकरांनी दाखविलेल्या या मनोधैर्याबद्दल प्रबोधन त्यांना शाबासकी देत आहे. आम्हाला फार आशा आहे, की मराठा समाजांत आतांशा चमकूं लागलेले साक्षर तरूण नवमताच्या अभिमानाने निदान पोट व उपपोट जातीचे बंड मोडून अखिल मराठा समाज एकजिनसी बनविण्याकडे आपल्या बुद्धिसर्वस्वाची शिकस्त खर्ची घालोत!

मवाळांचे अळणी मीठ

मवाळ ऊर्फ प्रगातिक (!) ब्रुव पक्ष अलीकडे अधःपाताकडे कलंडत चाललेला आहे, असे त्याच्या एकंदर प्रशंसनीय होय. मात्र त्या उत्सुकतेला व्यक्तिशः सक्रीय आत्मोद्धाराच्या तपश्चर्येचा उज्वल पाठिंबा हवा असतो. निरनिराळ्या जातींच्या समाजोन्नति परिषदांत असले आत्मोद्धारी तपस्वी

मुळीच आढळत नसल्यामुळेच या परिषदांचे पर्यवसान क्षुद्र नाटके तमाशावजा जलशांत झालेले आहे. परिषदेत ज्वलज्जहाल व्याख्यानांच्या मुसळधार पावसांत ठराव पास होतो मद्यपाननिषेधाचा आणि इकडे तिकडे बारीक नजरेने चौकशी करावी तो खुद्द अध्यक्ष महाराजांच्या सरबराईच्या थाटांत व्हिस्की ब्रँडीच्या बाटल्यांच्या पेट्या! टाळ्यांच्या कर्णकठोर गडगडाटांत ठराव पास होतो हुंडाविध्वंसनाचा आणि परिषदेचा तमाशा संपून पुरे सहा महिने होतात न होतात तो अध्यक्ष महाराज स्वतःच्या पोराचा हुंडा हबकून गध्यक्ष बनतात! टीचटीचभर जातींच्या परिषदांची सामाजीक सुधारणेच्या बाबतीत ही रडकथा तर अखिल भारतीय सामाजीक परिषदेच्या ठरावांना कोण कुत्रा पुसतो? असे काय शासनयंत्र या बडबड्यांच्या हाती राहिले आहे की यांनी पसार केलेल्या ठरावांना अखिल भारताने मान द्यावा? जेथे जातीला जात भीक घालीत नाही, व्यक्तिमात्राचें मन आत्मरिपु बनले आहे आणि परिषदांचा थाट जेथे तीनचार दिवस उगाच वार्षिक विरंगुळ्यासाठीच करण्यांत येतो, तेथे या अखिल भारतवाल्यांच्या फर्मानाची भेंडोळी कोण रद्दीला विकत घेणार? उगाच भाराभर ठरावांची बिनपीठाची गिरणी घसा फोडफोडून चालविण्यापेक्षां विचार प्रसारार्थ व्याख्यानमालेचा उपक्रम केला तर तो काय वाईट? दूरदूरची मंडळी वर्षांतून एकदां तरी एकत्र भेटावी, एवढीच इच्छा असेल तर त्याला ही व्याख्यानमालेचीहि दगदग नको, तर टोलेजंग मेजवानीचा थाट उडवून दिला की बस्! जेवणच्या जेवण, भेटीच्या भेटी आणि जेवतां जेवतां समाजोन्नतीच्या व राष्ट्रोद्धाराच्या चार तिखट गोड गप्पा झोडल्या की खलास! परंतु 'एक मताने' ठरव-निश्चय-व्यक्त करून, त्यांना आपणच अखेर लाथाडणे हे कृत्य माणुसकीला लांच्छनास्पद आहे. ठरविलेला ठराव, केलेला निश्चय आणि काढलेला उद्गार जर आपल्याला अक्षरशः आचारांत आणतां येत नाही, तर माणसांत आणि पशूंत अंतर ते काय राहिले? ज्या परिषदांचे ठराव कोणी मानीत नाही, खुद्द उरावडेच त्यांच्या तत्त्वावर दरवडे घालतात, त्या परिषदा नसून पशूंची प्रदर्शनेच होत.

समाजोन्नति आणि राष्ट्रोन्नति हे दोन शब्द अलीकडे फार सवंग झाले आहेत. समाजोन्नतिवाल्यांना जशी समाज कशाशी खातात व त्याची उन्नति म्हणजे काय चीज आहे, याची मुळीच स्पष्ट कल्पना नसते, तशी राष्ट्रोन्नतिवाल्यांनाहि राष्ट्राची व त्याच्या उन्नतिची वास्तवीक अटकळ नसते. गेली चार वर्षे काँग्रेसच्या नांवाखाली चाललेला पोरखेळ पाहिला की आमच्या विधानाची सत्यता वाचकांना पटेल. काँग्रेसच्या भटारखान्यांत पूर्वी जहाल आणि मवाळ या दोनच जाती होत्या. परंतु अलीकडे या दोन जातींच्या जवळ जवळ दोनशे जाती होऊन, काँग्रेसच्या कार्यक्रमाचा केवळ विचका होऊन राहिला आहे. जाहाल मवाळांच्या बेकीपासून एकीची छावणी फारशी दूर तरी नव्हती, पण सध्याच्या हजारकीचा प्रादुर्भाव म्हणजे शुद्ध महारकी किंवा चांभारचतराई म्हटली तरी चालेल. यंदांच्या काँग्रेसविषयी देशांच्या सर्व भागांतील निरनिराळ्या वृत्तपत्रांतील अभिप्राय वाचले म्हणजे राष्ट्रीय सभा ही सुद्धां एक अखिल भारतीय पशूंची प्रदर्शन म्हणावयास हरकत नाही. जो उठला तो आत्मस्तोमाचा भोक्ता. आत्मस्तोमापुढे प्रत्यक्ष जनतेचा होम झाला तरी त्याची पर्वा नाही. ब्रह्मदेवाला चार तोंडे तर आमच्या राष्ट्रीय सभेला हजार तोंडे! कोणाचा कोणाशी मेळ नाही. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाही याचा इत्यर्थ एवढाच की आम्हांला अझून गुलामगिरीची खरी चिळस आणि स्वातंत्र्याची खरी लालसाच अझून भासूं लागलेली नाही. प्रस्तुतचा राष्ट्रकार्यकर्त्याचा धिंगाणा म्हणजे तळीरामाची तळी

उचलण्यासाठी जमलेल्या वैद्य डागदारांच्या लठ्ठालठ्ठीचा मोठ्या प्रमाणावरचा संभावीत धुडगूस म्हटला तरी चालेल. राष्ट्रधर्मापुढे स्वतःच्या किंवा स्वपक्षाच्या ठरावीक मतांचा ताठरपणा लवभरहि कमी न करण्याची या देवजीधसाड्यांची मनोवृत्ति भावी लोकशाहीत औरंगझेबाचे पुनरुत्थान कसल्या थाटांत व्हावयाचे आहे त्याचे द्योतकच समजली पाहिजे.

समाजोन्नति किंवा राष्ट्रोन्नति यांचा विचार करण्यापूर्वी समाजाची व त्यामुळे राष्ट्राची अवनति कां झाली? याचा स्पष्ट उच्चार झाला पाहिजे. सामाजीक दुःखांची परवड धैर्याने वेशीवर टांगली पाहिजे. समाजांच्या हतबल स्थितीला कारण झालेल्या सर्व अंतर्बाह्य रूढींवर निकराचा हल्ला चढविणारे वीर व वीरांगना पुढे सरसावल्या पाहिजेत. समाजोन्नतीला धर्म आडवा येत असेल, नीतीच्या खऱ्या खोट्या कल्पना विरोध करीत असतील, किंवा पुराणकालच्या जुन्या रूढी बंड करीत असतील, तर राष्ट्रकार्याचा डांगोरा पिटण्यापूर्वी धर्म नीती आणि रूढी यांच्यावर बेलाशक हल्ले चढवावे. आज हिंदु समाजाचे अस्तित्व संशयित स्थितीत आहे. हिंदूंच्या पुढे 'जगता की मरता?' हा स्पष्ट प्रश्न परिस्थितीने टाकलेला आहे. बहुसंख्यांकत्वाच्या फुगीर पिशवीवर हिंदुजनांचे अस्तित्व अतःपर तगत नाही, हे इस्लामी चढाईच्या धोरणाने स्पष्ट सिद्ध झाले आहे, होत आहे, आणि यापुढे होईल. हिंदु मुसलमानांच्या ऐक्यासाठी जी जी कारणे व सबबी मुसलमान पुढाऱ्यांकडून पुढे मांडण्यांत येत आहेत, त्या इतक्या मगरूरीच्या व गुर्मीच्या आहेत की हिंदु समाजाला जर कांही लाजलज्जा असती, तर त्याने ताबडतोब त्यांचा सक्रीय प्रतिकार केला असता. परंतु इतकी त्याची आज तयारी नाही. माणसागणित पक्षभेदाच्या नरकांत पिचत पडलेल्या आणि विस्कळीत जातीभेदाच्या कुंपणातच ऐहिक पारलौकिक मोक्षाची वाट पहात आयुष्य कंठणाऱ्या हिंदु व्यक्तीला आज कोणत्याहि क्षेत्रांत प्रतिकाराची शक्तीच उरलेली नाही. अशा स्थितीत समाजोन्नतीच्या परिषदांचे नाटकी जलसे नाचविणाऱ्या नटव्यांच्या मंदबुद्धीबद्दल हसावे की रडावे? जेथे सामाजीक स्थैर्याची हालचालींवरुन व विवेकभ्रष्टते वरून म्हणावयास हरकत नाही. जहाल पक्षाच्या दोषांवरच टीका करण्यांत जन्म गेलेल्या मवाळांची ह्या दोषांशी गेली कित्येक वर्षे इतकी एकतानता होऊन गेली की त्या दोषांचा नायटा स्वतःच्या आंगभर फदफदून उठल्याची या बावळटांना दाद सुद्धां राहिलेली दिसत नाही. आम्ही या मवाळांना आजपर्यंत मोठे विवेकी समजत होतो. ज्या पक्षाला स्व. दादाभाई नवरोजी, फिरोजशा मेथा, भारतसेवक गोखले इत्यादि अनेक भारतरत्नांनी जन्म दिला. त्यावर अविवेकाचा नुसता संशय व्यक्त करणंहि अविवेकाचे होईल असे रास्त दिसते. परंतु ज्या प्रमाणे कै. टिळकांच्या मागें त्यांच्या कोरड्या नामघोषावर जहाल पक्षाचे डोंले नाचविणारे बडवे बारगोर उरले आहेत. तद्वतच मेथा गोखल्यांच्या नांवावर प्रागतिक पुण्याईची ढोलगी बडविणारे पुंगीपटाईत हल्ली या अधःपातित प्रागतिकब्रूव मवाळ पक्षांत बोकाळले आहेत. जहालांपेक्षा मवाळांत शिस्त आहे. सामाजिक सुधारणेसाठी त्यांच्या अनेक संस्था पद्धतीने काम करीत आहेत. या संस्थांच्या कार्याचा व्यापहि कांही लहान सहान नाही. परंतु या कार्याच्या शैलीचा व परिणामांचा विचार केला तर बाकी पूज्य. तडफ नाही, धडाडी नाही. जनमतांवर वजन नाही, कांही नाही. येथून तेथून एक जात बिनहाडाचे मांसाचे गोळे! डळमळीत पुळपुळीत मळमळीत मोये वर्षानुवर्ष मेग्ये

* उपलब्ध झालेल्या अंकात मजकूर नाही.

मवाळ मुंबईचा गिरणी-कामगारांच्या सुधारणेसाठी रात्रंदिवस सक्रीय खस्ता खात असतात. त्यांच्या ** पगारवाढीच्या दलामलीपर्यंत झगडत असतात. या कामगारांवर तरी यांचे काही वजन? त्यांच्या करितां खस्ता खाव्या या बावळटांनी आणि वेळ येतांच हारतुरे फंडाची भरभक्कम पाद्यपूजा खावी टिळक बाप्टिस्टा साठे ॲन्ड कोनी! हे मेग्ये बसतात हात चोळीत! असे हे नेहमीच घडत आले आहे. पण हे असे कां होते? हा विचारच त्यांना सुचत नाही. कारण उघडाउघड मवाळ! यंदाच्या कौन्सिल निवडणुकीत मवाळांची सर्व देशांत एकजात एकसारखी ससेहोलपट झाली. त्यांच्या कार्य शैलीत जर खरोखरच कांही राम असता, कळकळीचा थोडा तरी अंश असता, तर या पक्षाला जनतेने इतके चौखूरमुंडी चीत होण्याइतका हकालपट्टीचा खराटा खास दाखविला नसता. इतकी बदनामी झाली तरी हा मवाळ कंपू आपल्या प्रागतिककरणाच्या पोकळ पुराणांत दंगच! या गचाळपणाची कीव करून त्याकडे दुर्लक्ष केले तरी चालले असते. परंतु या मवाळांत अलीकडे 'राष्ट्रीय' पाचकळपणाची लकब घरीच दिसू लागल्यामुळे जहाल व मवाळ पक्षांतली भिक्षुकशाही एकाच रंगाढंगाची बनलेली दिसू लागली आहे. याचे प्रत्यंतर पहाणारांनी ज्ञानप्रकाश ता. ४-१-२४ मधला पोरकट अग्रलेख अवश्य पहावा. केसरी व ज्ञानप्रकाश यांची पुणेरी जोडाजोडी नेहमी पुण्याच्या लौकिकाला साजेशीच असते. परंतु प्रागतिक ** सत्यप्रियता विशेष दाखवली तर हा पक्ष एकदम नरकांत जाईल असे थोडेच आहे? विशेषतः पुण्याच्या अस्पृश्यता निवारक परिषदेविषयी केसरीच्या टोमण्याला उत्तर देतांना ज्ञानप्रकाशाने आपल्या व्यक्तिद्वेषाचे जे आचरट चऱ्हाट वळले आहे, ते पाहून कोणाहि अस्सल प्रागनिकाला शिसारी आल्या वाचून रहाणार नाही. मुद्या पुराव्याचे दिवाळे वाजले म्हणजे भांडकुदळ पोरे जशी एकमेकांची आईमाई काढण्यापर्यंत मजल आणतात तितकाच विवेकी प्रागतिकपणा ज्ञानप्रकाशाने दाखविलेला पाहून आम्हांला अतिशय खेद वाटतो.

मवाळांची भिक्षुकशाही

अस्पृश्यांचा आजपर्यंतचा आत्मोद्धाराचा मार्ग म्हणजे कोणाच्या ना कोणाच्या, विशेषतः मवाळीच्या हाताला हात लावून, 'म्हणा मम आत्मना' असल्या भिक्षुकावलंबी थाटाचा असे. पण यंदा कोठे खरी माशी शिंकली ज्ञानप्रकाश जाणे, जागेच्या अडचणीची सबब अवचित दत्त म्हणून उद्‌भवल्यामुळे मवाळ भटांच्या 'मम आत्मना' शिवाय अस्पृश्यांना आपली * परिषद स्वावलंबनाच्या जोरावर उत्तम रीतीने पार पाडली. इलेक्शनमध्ये मवाळ पक्षाला असलेल्या अपयशाच्या जबरदस्त ठोकरामुळे ती बहुजन समाजाच्या सहानुभूतीला पूर्ण पारखा होऊन बसलाच आहे. आता प्रागतिकपणाचा चौघडा बडवायला एकच आधाराचा फळा उरला. ती म्हणजे कणकेच्या गोळ्याप्रमाणे वाटलं तशी दाबली व फुगवली जाणारी अस्पृश्य जनता. मवाळांना जर खरोखर कांही अक्कल, दूरदृष्टी व विवेक असता,

** उपलब्ध झालेल्या अंकात वाक्य वाचता येत नाही. * उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द लागत नाही.

तर क्षुद्र कारणासाठी अस्पृश्यांच्या सहानुभूतीला पारखा होण्याचा मूर्खपणा त्याच्या हातून खास घडला नसता. बहुजन समाज व अस्पृश्य समाज या दोघांनाहि अप्रिय झालेल्या प्रागतिक पक्षाला आता व्याख्यानांशिवाय धंदा नाही व स्वतःच्या कंपूतील मेंढरांशिवाय अनुयायी नाही, अशी वास्तविक आजची स्थिति आहे. * ज्ञानप्रकाशकार दोन दोन हातांनी वाटेल ते करीत, त्यावर विश्वास ठेवणारा माणूस विरळा! अस्पृश्यांना मवाळांच्या मांडवात लाथ बसली हा एका अर्थी इष्टापत्तीच होय. अमका माझा उद्धार करील आपण तमका माझी अस्पृश्यता निवारण करील. या आशेने स्पृश्य शहाण्यांच्या गळ्याला मिठ्या मारणाऱ्या अस्पृश्यांना असाच कांही तरी अपमानाचा दणका बसायला हवा होता. यदच्छेने तो बसला आणि अस्पृश्यांनीहि त्या दणक्याने आपला धीर खचूं न देतां परिषदेचे कार्य उत्तम पार पाडले, हे त्यांस भूषणावह आहे. अस्पृश्यांना आम्हांला जी एक जाहीर सूचना करावयाची आहे ती दुसरीकडे केलेलीच आहे. येथे येवढेच म्हटले म्हणजे पुरे की मवाळांचा भिक्षुकशाहीला जसा रामराम ठोकलात तसा अखिल स्पृश्यांच्या मध्यस्थीलाहि कायमची मूठमाती देऊन, आत्मद्धाराचा मार्ग निर्लेप स्वावलंबनी बाण्याने चोखाळात चला की तुमच्या सर्व आधीव्याधीचे तेव्हांच परिमार्जन होईल. जो दुसऱ्यावरी विश्वासला त्याचा कार्यभाग बुडाला, ही समर्थ-वाणी अखंड नजरेपुढे ठेवा.

भिक्षुकी मनाचे प्रागतिक

मवाळांना विशेष राग येण्याची व अस्पृश्यांच्या परिषदेला लाथाडण्याची काहीहि कारणे ज्ञानप्रकाशाने दिली तरी त्यांतली मुख्य मख्खी एवढीच कळली की प्रस्तुत परिषदच स्वागताध्यक्ष श्रीयुत बागडे हे ब्राह्मणेतर पक्षाचे आणि स्वागतमंडळाने निवडलेले अध्यक्ष खान बहादुर कूपर हेहि ब्राह्मणेतर पक्षाचे. अर्थात ज्या अस्पृश्य-हितवादाच्या कच्चा मालाच्या भांडवलावर मवाळ पक्षाला आपले जनसेवेचे सोंग कसेबसे रंगविता येत असे आणि बहुजन समाजाचा पाठिंबा गेल्या इलेक्शनमध्ये अगदीच गमाऊन बसल्यामुळे जे एवढेच शिलकी साधन त्यांच्या हाती उरले, तेथे नेमके हे ब्राह्मणेतर वीर पीर बगलेत मारू लागले तर मवाळ पक्षाच्या या मुखपत्राचा तिळपापड कां उडूं नये? त्याची प्रागतिक बांध्याची विवेकबुद्धि भडकली. कां? तर अस्पृश्यांनी मवाळ पुठ्ठ्यांतल्या श्री. लठ्ठे किंवा ठक्कर यांची निवडणूक न करतां स्वा. ब. कूपर सारख्या गृहस्थाची केली. या निवडणुकीचे भयंकर परिणाम काय होतील, याचे ज्ञानप्रकाशाने केलेले भविष्य अस्पृश्यांनी व त्यांच्या परिषदेला हजर असणाऱ्या श्री. देवधर, दळवी, नटेसन प्रभृती विद्वानांनीच प्रत्यक्ष घडलेल्या कार्यक्रमाशी ताडून पाहिले की ज्ञानप्रकाशांतल्या लेखकाची मनोवृत्ति किती भिक्षुकी धाटणीवर भडकली होती, याची त्यांना साक्ष पटेल. हा लेखक ह्मणतोः-

''अस्पृश्यतानिवारणाच्या नांवाखाली जर कांही व्यक्ति ब्राह्मणांविषयीचा आपला द्वेष उगवून

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द लागत नाही.

घेण्याची किंवा तो भलत्याच ठिकाणी व्यक्त करण्याची संधि साधण्याचा प्रयत्न करतील तर तो साधूं देण्याइतका भोळसटपणा प्रागतिक पक्षाने करावा असे आम्हांला तरी वाटत नाही. प्रागतिक परिषदेच्या मंडपांत न्या. मू. रानडे यांना शिव्या देणे, डॉ. परांजपे यांनी अस्पृश्यांसाठी केलेल्या कामगिरीचे महत्त्व मुद्दाम दुष्टबुद्धीने कमी करणे वगैरे प्रकार करण्याला अवसर देणे हे केव्हांही रास्त झाले नसते. अशा प्रकारचे अनिष्ट प्रकार प्रो. लठ्ठे किंवा रा. ठक्कर यांची निवडणूक पूर्वी ठरल्याप्रमाणे करण्यांत आली असती, तर झाले नसते असे धरून चालतां आले असते. पण खा. ब. कुपर यांच्यासारख्यांच्या निवडणुकीमुळे अशी अपेक्षा कोणाला तरी करतां आली असती काय?''

इतके पोरकट विधान व आचरट भविष्य ज्ञा. प्र. सारख्या प्रागतिक मुखपत्रांत व्यक्त व्हावे, हा प्रागतिक उर्फ मवाळ पक्षाच्या सारासार बुद्धीचा अधःपात होय. तरी बरे की याच पत्राच्या ६-१-२४ च्या अंकांत अध्यक्ष खा. ब. कूपर यांचे भाषण 'समतोल वृत्ती'चे झाल्याबद्दल लिहिले आहे. ब्राह्मणेतर पक्षीय पुढारी आजच इतके मवाळांप्रमाणे बेअक्कल बनले आहेत काय की ते अस्पृश्योद्धाराच्या कार्यक्रमांत वंदनीय कै. रानड्यांना शिव्या देतील, अशी या क्षुद्रबुद्धी लेखकांची समजूत आहे? डॉ. परांजप्यांनी सामाजिक परिषदेची नांदी जरी कै. टिळकांच्या निंदेच्या सप्तसुरांत करण्यास मागे पुढे पाहिले नाही, तरी डॉक्टर साहेबांच्या अस्पृश्यता विषयक छोट्या मोठ्या कामगिरीला 'दुष्ट बुद्धीने' पाण्यापेक्षां पातळ किंवा मवाळापेक्षां गचाळ ठरविण्या इतका भिक्षुक उद्दामपणा ब्राह्मणेतरांत खास नाही, हे खुद्द अध्यक्षांनीच आपल्या दिलदार वर्तनाने सिद्ध करून दाखविले. इतकेच नव्हे, तर ज्या ज्या अस्पृश्य बांधवांनी सदरहू परिषदेतल्या अनेक ठरावांवर तळमळीच्या तिडकेने भाषणे केली, त्यांनी सुद्धा 'पवित्र' ब्राह्मणांच्या नुसत्या संदर्भाने सुद्धां आपली जीभ विटाळली नाही. ता. २९-३० डिसेंबरच्या परिषदेच्या कार्यक्रमांत घडलेला हा सर्व प्रकार पुण्यांत शेकडो लोकांनी पाहिला, तरी ४-१-२४ च्या अंकांत वरील उद्‌गार काढण्याइतका भिक्षुकी मुर्दाडपणा ज्या अर्थी ज्ञा. प्र. ने व्यक्त केला, त्या अर्थी एक तर हा लेखक कोणी भाडोत्री तरी असावा, अथवा प्रागतिक मोर्तबाचा असेल तर हाडाचा चित्पावन असावा, त्याशिवाय असल्या बेजबाबदार विधानांनी प्रागतिक पक्षाला नामुष्की आणण्याचे पापकर्म त्याच्या हातून घडतेच ना!

अस्पृश्यांनो, स्पृश्यांपासून सावध रहा

अस्पृश्य समाजाच्या वर्तमान प्रबोधनाचा अनेक लोक अनेक प्रकारांनी आपल्या आत्मस्तोमार्थ उपयोग करून घेत आहेत. अस्पृश्योद्धार म्हणजे वाटेल त्या स्पृश्य प्राण्याला स्वतःच्या महतीचे एक बिनखर्ची भांडवल होऊन बसले आहे. गेल्या इलेक्शनमध्ये अस्पृश्योद्धाराच्या वल्गनांवर अनेक स्पृश्य शहाण्यांनी अस्पृश्यांना हरभऱ्याच्या झाडांवर चढऊन आपल्या निवडणुकीचे चणे कुरमुरे सपाटून भाजून घेतले. नुसत्या अस्पृश्यताविषयक व्याख्यानांवर स्वतःस हारतुऱ्यांच्या थडग्यांत गाडून घेणारे वावदूक स्पृश्य वीर तर किती तरी बोकाळले आहेत. आणि अस्पृश्यांकडे पडावे तर त्या बेट्यांची अशी समजूत होऊन बसली आहे की या सगळ्या बोलघेवड्या स्पृश्य बृहस्पतींच्या हातूनच आमची अस्पृश्यता

निवारण होईल. हेच आमचे कैवारी, यांच्याच तोंडून आमच्या दुःखांचा व अपमानाचा उच्चार व्हावा. याच स्पृश्यांनी आमची वर्तमानपत्रे चालवावी. आम्ही मात्र त्यांच्या हाताला हात लाऊन * आत्मोद्धार! परिषदेच्या कामी सुद्धा स्पृश्यांचाच सुळसुळाट. ही परावलंबी स्थिति जोपर्यंत आहे, तोपर्यंत-आम्ही अस्पृश्यांना मुद्दाम बजाऊन सांगतो-तुमचा आत्मोद्धार कदापि होणे शक्य नाही. अस्पृश्यता-विध्वंसनाचा प्रश्न हिंदी दास्यविध्वंसना इतकाच समगोत्री आहे. स्वराज्य जसे मागून मिळणार नाही, तशी 'अस्पृश्यता घालवा' म्हणून कोणीहि घालविणार नाही. हक्क व अधिकार कोणी कोणाला देत नसतो. ते बळजबरीने घ्यावे लागतात. त्यासाठी आत्मयज्ञांची शिकस्त करावी लागते. स्वावलंबनाचा बाणा कडकडीत आचरावा लागतो. इंग्रेजी नोकरशाही आणि गुलाम हिंदी जनता यांचे नाते आणि स्पृश्य व अस्पृश्य यांचे नाते एकजिनसी आहे. अस्पृश्यांत जर जातिभेदाचा म्हसोबा बोकाळणार नाही आणि सर्व अस्पृश्य जाती एकोप्याने अस्पृश्यताविध्वंसनाचा व समान हक्कप्राप्तीचा प्रयत्न शुद्ध स्वावलंबनाच्या बळावर करतील, तर ही सात कोटी सामर्थ्याची लोकशक्ती देशांतल्या वाटेल त्या राजकारणी पक्षाला पुरून उरण्यास समर्थ होईल, असा जो इषारा अस्पृश्यता-परिषदेचे अध्यक्ष खा. ब. कूपर यांनी दिला आहे, त्याचे आमच्या अस्पृश्य बांधवांनी अगत्य चिंतन करावे. स्पृश्यांची मध्यस्थि ही तरी एक प्रकारची भिक्षुकशाहीच आहे. अस्पृश्यांच्या आत्मोद्धारासाठी निघालेल्या वृत्तपत्रांना स्पृश्य समाजांतील भाडोत्री संपादक कशाला? अस्पृश्यांचा हितवाद अस्पृश्यांनीच केला पाहिजे. स्वराज्यवादी भारतीय आंग्ल दैनिकासाठी कोरा करकरीत टोपडा एडीटर आणणाऱ्यांच्या स्वयंनिर्णयाच्या पुराणांत जेवढा पोकळपणा, तेवढाच भाडोत्रीपणा अस्पृश्यहितवादी पत्रांसाठी स्पृश्य संपादक नेमण्यांत सिद्ध होतो, हे अस्पृश्यांनी लक्षांत ठेवावे. अस्पृश्यांनी खरे पाहिले तर प्रथम स्पृश्यांवरच बहिष्कार घालणे इष्ट आहे. स्वतःच्या पायांवर उभे राहून धिटाईने आपले माणुसकीचे व नागरिकत्वाचे हक्क संपादन करण्यासाठी अखिल अस्पृश्य समाज ज्या दिवशी एकमुखी व एकदिली सज्ज होईल, त्या दिवशी त्यांना विरोध करण्याची कोणत्याहि शक्तीला ताकदच उरणार नाही.

□□□○◆

* उपलब्ध झालेल्या अंकात वाक्य दिसत नाही.

लेख

Liberal Tradition

The tactless muddle which led to the refusal of the Pandal of the All-India Libe al Federation at Poona for the use of the Anti-Untouchability Conference in spite of sympathetic promises made has the merit of bringing a grave defect in the organisation of the Liberal party into clear relief. It discloses not only a lamentable lack of unity and discipline in the party but what is ---orse, a growing absence of the sense of its value. The history of Liberalism in this country is almost coextensive with the history of our social reform activities. There is no getting round the fact that the democratic concept of the Liberty of a citizen is an essentially Western product. It is England and English character which brought, implanted and nourished this exotic in the Indian soil. The great Indian souls who dreamed the first dreams of India's political uplift were very ardent advocates of freedom. But to unbounded enthusiasm they joined the gifts of a searching political introspection and a correct political imagination. They were quick not only to discern existing defects in the structure of Indian Society, but to foresee the evils, if not the impossibility, of establishing democracy in the land while Indians remained slaves to essentially undemocratic prejudices and customs. It was, therefore, an essential article of creed with them that it would be national suicide to allow social reform to wait till complete political emancipation was reached. Their ideal consisted in democratising the Indian Society simultaneously with the Indian nation.

Untouchability has been the outstanding blot on the social arrangements of Indians. It is also the outstanding block to the evolution of nationality in India. Naturally enough the pioneers of political agitation in India early discerned the gravity of this social defect and made anti-untouchability an important plank in their platform.

The soundness of this view is proved, if proof were needed for a self evident truth, by the recent inclusion, theoretical as it is, in the Swarajyist programme of the removal of untouchability. Up till very lately it was the boast of Indian Extremism that it was purely political party with a purely political creed, having less than nothing to do with and less than nothing to waste over such paltry, inconvenient and unprofitable questions as cleavage of castes, war of creeds or the social helotry of a fifth of the entire population of the country. The recent smuggling of anti-untouchability in the party programme of

Swarajyists, be the motive what it may, is a truant's belated homage to the value and wisdom of the ancestors of the present-day Liberal party in India.

The Liberal thus have a glorious ancestry and inherit high traditions of political wisdom. The cause of anti-untouchability bears a long and close association with the cause of Liberalism in India, so long and so close in fact that the two used to pass as inseperables. No wonder then that the Pandal incident at Poona during Xmas last should come as a painful surprise to the students and admirers of Indian Liberalism. Liberal Tradition whose letter appeared in these colums in the last issue has subjected that event to a severe dissection, and we agree with the conclusions arrived at in that letter that the case is not one of a general climbdown from accustomed heights in thought or conduct, not a universal 'alling-off from inherited principles and traditions, but it helps to direct the attention of the public to the stolid indifference of the Liberal party to details of what we feel tempted to phrase as individual member's party conduct.

The tantalisation practised on the Depressed Classes' Conference in reference to the promised use of the Federation Pandal is bound to stultify the Liberal party, although we are inclided to believe with Liberal Tradition that the party as such had no conscious privity to the transaction. That it is the penalty a party has to pay for the sins of members it does not care to expose and publish. But this vicarious suffering has a sure tendency to undermine prestige which no party, however good its intentions and however high its moral ideals, can afford to lose.

It is one thing to spare an offending member, however, and quite another to try to hoist the offence on an unoffending stranger. The attitude of the Dnyan Prakash in the matter of the Pandal is one of rank injustice and monstrous cowardice. The worst of it is that our Poona contemporary pretends to be the principal Liberal organ in Marathi in Maharashtra. From its vacillation and doling out praise and blame in promiscuous alternation one would at once detect its consciousness of the badness of its case. Mr. Cooper is vaguely run down for an alleged perniciousness of unspecified political and social views in one issue and is smgled out in the next for a spirited encomium for a fearless exposition of sound political and social views.

With wish out of sincerity for the Liberal Party that the antics of this paper in this matter in question had received a dignified quietus at this point. But it seems to take a devilish delight in a mad career of blundering along. From an atrociously unminted attack against the President of the recent Anti-untouchability Conference for certain unknown and unspecified views of the party to which he belonged, the immaculate journal proceeds with evident reluctance and out of sheer helplessness to bestow a meed of minimum praise for the soundness of his individual views and the faultlessness of his conduct in the chair. From this outrageous quibble, the paper passes on to have an illnatured fling at Messrs. Bagde and Bhaurao Patil. The readers of Prabodhan will recollect that we have not spared Mr. Bagde where it was necessary to criticise his public conduct. But in this particular case, the Dnyan Prakash ought to know that a gibe for conversion to good principles has a tendency to strangely recoil on whomsoever utters it. Even a belated acceptance of the good is desirable. To thrust the nose deep for the acceptor's motive is, to say the least, un-Liberal. The mere fact of acceptance is a source of satisfaction to Liberalism. Hence it is that the entry of the principle of Anti-

untouchability into the Extremist camp was hailed by none so delightedly as by Liberals. If, therefore, Mr. Bagde tries to project his personality into the affairs of the Depressed Classes with a view to their elevation he does not render himself an object of public decision on at least in Liberal quarters, even though he is * to appropriate the lion's share of credit for emancipation work to the Non-Brahmins. A Liberal organ should be above pettinesses. It should at least be just in doling out punishments.

As for Mr. Bhaurao Patil, we are inclined to think that it is either gross misapprehension or wilful misrepresentation on the part of the Dnyan Prakash to remark that his insistence on the practical ideals of anti-untouchability being pitched far above the least inconvenient act of interdining with untouchables was only a disguised anxiety to evade the issue of interdining. Interdining is an antequated and inadequate reform even as present ideal to be placed before the public. We believe that is what Mr. Patil means and we challange the Dnyan Prakash to show that our friend Mr. Patil, although far from the limelight, has lost a single opportunity to interdine with a clean untouchable in his own house or that a single appeal for help for literacy from untouchable boy within the wide limits of the Satara Dist. has gone unheeded, although Mr. Patil's purse is none too fat.

We suspect we could see a distinct deterioration in the morale of the Dnyan Prakash, since the recent Liberal sweep off the board in the council elections. With Liberal Tradition we still have faith in the future of the Liberal Party. We only desire that the party should not lay itself open to a charge of connivance at individual members flouting party discipline and bringing entire Liberalism into disrepute, and above all, should not allow a paper bearing its label to conquer with injustice and disgrace and to say in one issue things which it wishes unsaid and practically withdraws in the next.

□□□

* उपलब्ध झालेल्या अंकात मजकूर नाही.

स्फुट लेख

God save Mahatma Gandhi

The last fortnight tossed the whole country like an earthquake shock and elbowed almost all the serious topics of the day into a corner when the news of the serious illness of Mahatma Gandhi suddenly flashed throughout the length and breadth of the country and abroad. No doubt some faint whispers had long ago leaked through the newstight walls of the prison cells where the Mahatma had been locked up; but it never touched even the flying fancy of anybody that the crisis was so near and so threatening. But God be praised, our Mahatma is now safe and the catastrophy is averted. God save Mahatma Gandhi.

A move for Mahatma's immediate release :- We quite sympathise with the constitutional moves which some Members of the Legislative Assembly propose to take for the immediate relief of Mahatma Gandhi, and trust Government of India proves thoughtful and prudent to avoid any eventual collision between the rulers and the ruled. It will be a political madness to insist upon the continuation of imprisonment of Mahatma Gandhi, in view of the fact that the procedure of his incarceration had actually belittled the dignity of British Judicature in India. We hope that saner element prevails in the camp of the higher gods of burocracy and Mahatma is freed to the pacification of Indian Unrest, which has been so unthoughtfully aggravated by the burocratic whims and fancies in and out of season.

Yes, Govt., must answer :- We reproduce below a few questions which Mr. C. Duraiswami Iyangar M.L.A. proposes to place before the Assembly. The indifference and carelessness meted out in the case of such a high and universally worshipped personality like that of Mahatma Gandhi, can safely be taken as an index of what must the fate of prisoners of lesser or no merits. It is not our desire to dilate upon the much discussed problem of inhuman treatment in Indian Jails; we wish the jailors to behave like men towards the human beings unfortunately condemned to their care. The following interpellations betray a serious lack of humanity on the part of the Yeravada Jail authorities and it is now high time that Government takes immediate steps to humanise their prisons and -ave the British traditions from being blackmaned thruout the civilized

world. The interpellations are as under:-

(1) Is it a fact that no communication of Mr. Gandhi's illness was made to his wife or sons until Mr. Ramdas Gandhi wired to the Superintendent of Yerawada Jail on information from other sources?

(2) Is Government aware that the Superintendent replied that Mr. Gandhi was suffering from ordinary fever whereas the next day an operation was found urgently necessary?

(3) Will Government state how the Jail Medical Officer failed to diagnose the illness of Mr. Gandhi and why he failed to seek for better medical advice to have a proper diagnosis earlier than the twelfth?

A personality of universal magnetism :- Thousands and millions may differ from Mahatma Gandhi in his views and opinions of the political regeneration of India, yet there are no two opinions of his being a Man of the Hero-type. It is the magnetic personality which has so far illumined his life and his saintliness of mind transperently glitters throughout his words and actions. The practical world may find out hundred and one blunders in his work in the political field, but the world cannot blunder, pay it did not blunder at all in finding in him a Man o' unfathomable love for his Country, with patriotism deeply impressed on every fibre of his frail body. Just see what a * he wrought. No sooner the report of his transfer to the Sassoon Hospital of Poona for a surgical operation of the greatest responsibility touched all corners of the country than the party-feeling vanished in an instant, political jeolousies crumbled down and there ran to do homage to this Saint of India numberless leaders of all shades of opinions and views without the least cognizance of their differences. Those human wolves who a week ago wrangled with each other and tore each other's flesh for some paltry political dissentions between them, came as meek lambs before that indescribable personality of Mahatma Gandhi and offered themselves without exception and without reserve to obey his commands whatever they *

□□□

* उपलब्ध झालेल्या अंकात मजकूर दिसत नाही.

अग्रलेख

रक्तशुद्धीच्या कल्पनेचे भूत

हिंदु समाजाच्या वर्तमान विस्कळीत स्थितीची कारणे शोधणाराला अनेक राजकीय सामाजीक व धार्मिक प्रमेयांच्या भवति न भवतीतून अखेर याच मुद्यावर येऊन थांबावे लागते की आमच्या सर्व अधःपतनाला मूळ कारण जर कोणते असेल, तर ते रक्तशुद्धीच्या कल्पनेचे भूतच होय. चतुर्वर्गव्यवस्था गुणकर्मविभागशः तत्वावर निर्माण झाली असे बाह्यतः दिसते खरे; तथापि त्या व्यवस्थेतून उत्पन्न झालेला जातिभेद मात्र निःसंशय या रक्तशुद्धीच्या कल्पनेमुळेच आजपर्यंत टिकलेला आहे. निरनिराळ्या जातींत श्रेष्ठ कनिष्ठपणाचा तुसडा भाव याच कल्पनेने प्रचलित केला आहे. अस्पृश्य समाजाची इतकी अफाट लोकसंख्या निर्माण करणारी सामाजीक बहिष्काराची प्रवृत्ति याच कल्पनेची कन्या होय. जातींतल्या जातींत शेकडो पोटजातींची लहान लहान गळवे याच कल्पनेने उत्पन्न केली आणि आज जाती-संघटनाच्या विवेकी सुधारणेला हीच कल्पना जोराचा विरोध करीत आहे. विधवांच्या पुनर्विवाहाला आणि मिश्रविवाहाला हिचाच कडवा प्रतिबंध होत असतो आणि स्पृश्यांमध्ये सुद्धा अस्पृश्यतेचा 'विटाळ-शिवशील' हीच माजवीत असते. असे ते रक्तशुद्धीच्या कल्पनेचे भूत आहे तरी काय? याचा थोडा विचार प्रबोधनाच्या प्रिय वाचकांच्या सेवेला रुजू करण्याचा मानस आहे.

रक्तशुद्धीची कल्पना बरीच प्राचीन असून, ती सर्व राष्ट्रांत शुद्धाशुद्ध अवस्थेत आजहि आहे. अभिमानास्पद इतर अनेक विषय कितीहि असले, तरी रक्ताचा अभिमान हा सर्व राष्ट्रांत फार उच्च दर्जाचा मानला जातो, राष्ट्राभिमानाची ज्योत भडकविण्यासाठी व्यक्तिमात्राच्या रक्ताभिमानाला प्रथम चेतवावे लागते. युद्धाचे मकाबले रंगविण्यासाठी सैनिकांच्या रक्ताला हांक मारून, त्यांच्या 'बीजा'ची व 'अवलादी'ची त्यांना मुद्दाम जाणीव करून देण्याचा संप्रदाय इतिहासांत पदोपदी दृष्टीस पडतो. स्वयंशासित राष्ट्रांतले स्त्री-पुरुष विशेषतः आपल्या राष्ट्राच्या इभ्रतीसाठी स्वतःच्या विवक्षित रक्ताभिमानाला फार जपतात. राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी पूर्वजांनी अनेक समरांगणांवर सांडलेले तेजस्वी रक्त आपल्या व वंशजांच्या नसा धमन्यांत निर्लेप निष्कलंक राखण्यांत स्वतंत्र लोक अतिशय दक्षता बाळगतात. त्यांतच जित व जेते अशा दोन राष्ट्रांचा संबंध जेथे आला असेल, तेथे तर जित राष्ट्राच्या गुलाम रक्ताचा नुसता चुटपुटता संपर्कहि आपल्या जेत्या रक्ताला न लागेल याची जेते फार काळजी

घेतात. रक्तशुद्धीची ही कल्पना राजकारणी श्रेष्ठत्वाच्या सिद्ध्यर्थ प्रत्येक स्वयंशासित स्वतंत्र राष्ट्राने आजपर्यंत आपल्या प्रवृतींत उत्कट भावनेने पाळलेली आहे, तशी ती ऋग्वेदकाळी आर्य जनांनीहि पाळली होती. आर्यांनी हिंदुस्थान देश पादाक्रांत करून मूळ या रहिवाश्यांना गुलाम बनविल्यावर, आर्य जेते आणि अनार्य जित असा ठळक भेद पडला आणि आपले नेतृत्व व सर्वच बाबींतला आर्य (श्रेष्ठ) पणा अबाधीत राखण्यासाठी त्यांनी रक्तशुद्धीच्या कल्पनांना जन्म दिला.

Rule Britania Rule !
Britania rules the waves
Britons never shall be slaves.

ही गर्वोक्ती ज्या कल्पनेत जनन पावली त्याचे कल्पनेने न तु एव आर्यस्य दासभावः (आर्य कधीहि कोणाचा गुलाम होणार नाही) ही राजकीय वर्चस्वाची अभिमानोक्ती आर्यजनांच्या तोंडून वदविली. या उक्तीत रक्ताभिमानाचा मसालाच आरपार भरलेला होता, हे सांगणे नको. इंग्रेजांना, जर्मनांना, जपान्यांना किंवा अमेरिकनांना जी एक आपल्या स्वातंत्र्याची स्तुत्य घमेंड आहे, तीच एका काळी ऋग्वेदप्रणेत्या आर्यांना होती, कडव्या रजपुतांना होती आणि महाराष्ट्रीयांनाहि थोडी फार लाभली होती. या घमेंडीचा प्राण रक्ताभिमानावरच अवलंबून असल्यामुळे, रक्तशुद्धीची उर्फ नेतृत्वाची एक विशिष्ट श्रेष्ठत्वदर्शक कल्पना त्यांच्या भावनांच्या मुळांशी धमधमत असली तर त्यांत कांही नवल नाही. रक्तशुद्धीची ही एक राजकारणी अतएव व्यावहारीक बाजू झाली. ही व्यावहारीक कल्पना कल्पनेच्या व्यवहारापुरती कितीहि गोंडस व बाळसेदार दिसत असली, तरी मानव जातीच्या उत्क्रांतीला सहायभूत होणाऱ्या रक्तशुद्धीच्या कल्पनेचा खरा व्यवहार काय आहे, हे पहाण्यासाठी आपल्याला प्रत्यक्ष शारीरशास्त्राच्या मदतीनेच याची चिकित्सा करणे प्राप्त आहे. यासाठी आर्यांच्या रक्तशुद्धिविषयक प्राचीन कल्पना व भावना काय होत्या, याचाहि इतिहास आपणांस सारांशाने पहावा लागेल.

प्रथम एकच ठळक मुद्दा वाचकांनी लक्षांत ठेवावा कीं हल्लीचा हिंदुसमाज ज्या नैराश्यवादांत आकंठ बुडालेला आहे, त्याचा प्राचीन आर्यांना संपर्कहि नव्हता. ते कट्टे आशावादी महत्वाकांक्षी आणि अशक्यालाच शक्य करून दाखविणारे कर्मवीर होते. अशा गुणांनी फुरफुरलेले आर्यवीर साऱ्या जगाला पादाक्रांत करणारे जगज्जेते झाले, यांत निसर्ग-नियमांनी आपला सन्मानच करून घेतला, असेच ह्मणणे प्राप्त आहे. आर्यांची वृत्ति आजच्या हिंदूंप्रमाणे संकुचित व एकलकोंड्या घडणीची नव्हती. आर्यांची संख्या वाढावी, त्यांची संघशक्ती वज्रप्राय व्हावी आणि आर्यसंतानांनी अवघा पृथ्वीचा गोल आवळ्याप्रमाणे आपल्या तळहातावर झेलावा, या उमेदी महत्वाकांक्षेने सणाणलेल्या आर्यांची विवाहनीति व तिचा तपशील रक्तशुद्धीच्या स्पष्टीकरणार्थ विचारार्ह आहे. वधूच्या पाणिग्रहणसमयी वर प्रतिज्ञा करतो की गृभ्णामि ते सुप्रजास्त्वाय हस्तम्. तुझ्यापासून मला सुप्रजा, आर्य ठशाची, आर्य तेजाची सुप्रजा प्राप्त व्हावी, ह्मणून हे वधू, मी तुझे पाणिग्रहण करीत आहे. आर्यांची सुप्रजा-जनन-शास्त्राची परिणति किती कमाल विकास पावलेली होती, याचे पुसट परंतु विश्वसनीय चित्र विवाहविधीच्या आर्यब्रुव हिंदुजनांत सुप्रजा-जननाविषयी गाढ अज्ञान माजलेले आहे, विवाहविधी व्यापारी सट्ट्यांच्या धोरणांवर सर्रास होत आहेत; मंत्रांचा अर्थ विधिदर्शक भटांप्रमाणे खुद्द वरवधूला किंवा कोणालाहि समजत नाही, समजून घेण्याची प्रवृत्ति नाही; गोत्र ह्मणजे काय, त्याचा सुप्रजानिर्मितीसाठी प्रयोजन

काय, याची कोणाला दाद नाही; मात्र रक्तशुद्धीची भ्रष्ट कल्पना स्वजातीच्या-म्हणजे एका मूठभर संख्येच्या टोळीच्या कुंपणापुरती शिल्लक उरली आहे. आर्य स्वतंत्र जगज्जेते होते, आजचे हिंदु इंग्रेजांचे व स्वतःच्या कुकल्पनांचे गुलाम आहेत. आर्यांची शारिरीक व बौद्धिक शक्ति श्रेष्ठतम होती, हिंदु जनांजवळ दोहोंचाहि खडखडाट आहे. आर्य सुप्रजा-निर्मिते होते, आजचा हिंदुसमाज कुप्रजा प्रसविण्याच्या कामी समृद्ध कुसव्याची खाण बनला आहे. तरी त्याच्या रक्तशुद्धीच्या कल्पना मात्र अत्यंत सोवळ्या तीव्रतेने रात्रंदिवस सणाणत असतात हे मोठे दुःखद आश्चर्य नव्हे काय?

रक्तशुद्धीची आजची कल्पना ह्मणजे स्वजातीय ठरावीक रक्ताची त्यातल्या त्यात मिसळ, इतर भिन्न गुणधर्मीय रक्तापासून त्याला अजीबात असंपर्क ठेवणे, अशी आहे. गोत्रभिन्नतेची आणि असापिंड्यत्वाची कसोशीची चिकित्सा-चिकित्सेचा फार्सच तो! करण्यांत येते; परंतु त्यामुळे आपण काय साधतो किंवा साधू इच्छितो याची एकालाहि दख्खल नसते. वैदिक विवाहशास्त्रांत वधुवरांचे गोत्र भिन्न असले पाहिजे, अशी योग्य अनुज्ञा आहे. गोत्रभिन्नतेचा खरा अर्थ असा आहे की वर आणि वधु दोघांच्या धार्मिक प्रवृत्ति आणि बौद्धिक व अध्यात्मिक संस्कृति परस्परभिन्न असल्या पाहिजेत. हा सिद्धांत उदाहरण घेऊन स्पष्ट करू. युरप अमेरिका आणि एशिया खंडांतील आधुनिक संस्कृतीच्या कुटुंबात वाढलेल्या तरूण व तरुणींच्या मनोवृत्तीत शैक्षणिक बौद्धिके व अध्यात्मिक (Spiritual) भिन्नभिन्न संस्कृतींचा जो भेद असतो व स्पष्टहि दिसतो, त्या भेदाला वास्तवीक गोत्रभिन्नता ह्मणतां येईल. या गोत्रांच्या उत्पादकांच्या नांवांवरून, ह्मणजे त्या त्या बौद्धिक व अध्यात्मिक शिक्षण क्रमाच्या भेदाभेदावरून गोत्रांची नावें निरनिराळी पडलेली असतात. जसे, भृगु अंगिरा वशिष्ठ कपिल बुद्ध कृष्ण क्रिस्त इत्यादि. सापिंड्य शारिरीक परंपरा दर्शविते, तर गोत्र अध्यात्मिक शिक्षणाची गुरुशिष्य-परंपरा दर्शविते. क्षत्रिय वर्गात गोत्राची ओळख गुरुशिष्य परंपरेवरूनच मानण्याचा प्रघात आहे. ब्राह्मणांची मात्र अशी (गैर) समजूत आहे की वशिष्ठ गोत्री ह्मटला ह्मणजे थेट वशिष्ठांच्या अस्सल रक्ताचा बिनतोड वारस. अर्थात ब्राह्मण वर्ग सापिंड्य आणि गोत्र यांच्या ब्रह्मघोटाळ्यांतच गिरक्या मारीत असतो. क्षत्रियादि ब्राह्मणेतर ब्राह्मणांचेच मानसिक गुलाम असल्यामुळे त्यांच्याहि गोत्रविषयक कल्पना अशाच भ्रष्ट बनलेल्या आहेत, हे निराळे सांगण्याची आवश्यकता नाही. सध्यां हिंदुत्वाचा ऱ्हासकाळ चालू आहे. खऱ्या अध्यात्मिक संस्कृतीची व आमची फारकत होऊन शेकडो वर्षे लोटली. अर्थशून्य मंत्रांच्या फोनोग्राफी पोपटपंची पलीकडे आमच्या ज्ञानाची दृष्टीच जाणे बंद पडले आहे. तेव्हा संस्कृतिपरंपरेच्या सापिंड्यत्वाचा एकच चिवडा होऊन बसला आहे. सारांश, गुरुशिष्य परंपरा आमूलाग्र गेली, संस्कृतिवशिष्ट्यांची जाणीव मेली. सुप्रजाननशास्त्राची नासाडी झाली, सापिंड्य किंवा गोत्रभिन्नतेची वाताहात लागली, रक्तशुद्धीची घमेंड मात्र तेवढी उरली आहे. रक्तशुद्धीचे आमचे प्रयत्न एवढे कसोशीचे व चिकित्सेचे जर होत आहेत तर सध्यांचा हिंदुसमाज बौद्धिक, आध्यात्मिक व विशेषतः शारिरीक बाबतीत दिवसेंदिवस दुबळा कां बनत चालला आहे? याचे उत्तर सापिंड्य गोत्राभिमानी शहाण्यांनीच दिलेले बरे! प्रत्येक छोटी मोठी जात दर लग्न सराईत जर एवढी मोठी रक्तशुद्धीच्या तत्वावर लग्नाचे सट्टे ठरविण्याची यातायात करते, तर या लग्नांची प्रजा अशी दुर्बळ कां? कोठे गेले ते शुद्ध रक्त? शुद्ध रक्ताची, शुद्ध ऋषिरेताची, शुद्ध आर्यठशाची प्रजा अशी अंतर्बाह्य गुलाम कां? ही कां प्रश्नावली तरुण भारताने अवश्य विचारांत घेणे जरूर नाही कां?

प्रस्तुत लेखांत सुप्रजाजनन शास्त्रांचे विवरण करावयाचे नाही. येथे इतकेच दाखवावयाचे आहे की रक्तशुद्धी रक्तशुद्धी ह्मणून ज्या कल्पनेचे भूत आमच्या बोकांडी बसलेले आहे, ते भ्रममूलक अतएव निंद्य व त्याज्य आहे. भिन्न गुणधर्माच्या रक्ताच्या संमीश्रणानेच खरी रक्तशुद्धी होत असते. सध्या हे संमीश्रण मुळीच होत नसल्यामुळे हिंदुसमाज सर्वच बाबतीत दुर्बळ बनला आहे. जातीभेद मोडण्यासाठी प्रथम ही रक्तशुद्धीची कल्पना किती अशुद्ध आहे, हे शास्त्रीय विवेचनात्मक ग्रंथप्रसाराने व व्याख्यानांनी हिंदुजनांना पटविण्याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे. कोणतीहि सुधारणा पापाशुद्ध झाली पाहिजे. जातिभेद-विध्वंसनाची आवश्यकता कितीहि असली आणि ती अंमलात आणण्यासाठी कांही धैर्यवान नवमतवाद्यांनी कितीहि सक्रीय उदाहरणे घडवून आणली, तरी जनमताची सहानुभूती या कार्याला मिळविण्यासाठी रक्तशुद्धीच्या प्रचलित कल्पनेत आमूलाग्र क्रांति घडविणाऱ्या अधिकारी लेखक वक्त्यांनी पुढे सरसावले पाहिजे. शारीरशास्त्रविषक वाङ्मय मराठीत फारच कमी आहे. सुप्रजाननशास्त्रावर फारसे कोणी विद्वानांनी श्रम घेतल्याचे आढळण्यांत नाही. हा विषय इतका राष्ट्रीय महत्वाचा आहे की त्याचा परामर्ष घेण्यासाठी अनेक साहित्यसेवकांनी व समाजसुधारकांनी प्रथम हात घातला पाहिजे. अधिकारी विद्वज्जनांच्या प्रस्तुत विषयक लेखांना प्रबोधन आनंदाने स्वागत करील.

□□□

स्फुट विचार

दिवाण जनतेचे हितवादी कसे?

राजकीय हक्कांच्या ज्या नवीन भिक्षा स्वयंनिर्णयेच्छु हिंदी जनांच्या पदरांत पडल्या आहेत, त्यांत शिक्षण, अबकारी व जंगल या तीन खात्यांचा कारभार तीन हिंदी दिवाणांच्या सुपूर्द करण्यांत आलेली भिक्षा आशाळभूतांना खरकट्यांतल्या तुपाप्रमाणे वाटत आहे. लोकांनी निवडलेला प्रतिनिधि सरकारच्या मेहेर नजरेने सरकारी मंत्रिपदावर आरूढ होतो; केवढा हा जनमताचा सम्मान! सरकारला जनमताची केवढी ही दरकार!! सत्ताभिलाषाचा केवढा हा सरकारी राजसंन्यास!! असे भोळ्या भाबड्या लोकांना वाटत असल्यास नवल नाही. ब्रिटिश राज्यपद्धतीची घटना व यंत्ररचना ज्यांना नीट अवगत आहे, ते या भ्रमांत असणे शक्य नाही. सर्वस्वी गुलाम व परावलंबी बनलेल्या हिंदी लोकांना 'आपला प्रतिनिधी मंत्रि झाला' ही कल्पनाच हर्षवायू होण्याइतकी वाटते. स्वतंत्र तीन खात्यांचा मुखत्यारी अधिकार आता आमच्या अगदी मुठीत आला. दिवाण म्हणेल ती पूर्व दिशा, देईल त्या सवलती आणि करील त्या सुधारणा, अशी सर्वांची भावना अलीकडे बनलेली दिसते. इतकेच नव्हे, तर मंत्रीपदावर नेम धरून निवडणुकीच्या दंगली रंगविणारे धोरणी धूर्त आपल्या मतदारांना याच भावनेच्या थापा देत असतात. परंतु वास्तवीक स्थिति फार निराळी आहे. दिवाण जरी लोकनियुक्त असले तरी मंत्रीपदावर त्यांची योजना होतांच, ते सरकारचे मुखयंत्र (mouthpiece) उर्फ नोकर बनतात. नोकरशाही गिरणीच्या यंत्ररचनेतील एक चक्र, हीच त्यांची वास्तवीक अवस्था असल्यामुळे, त्यांच्या सर्व कारभाराच्या हालचाली ठरावीक ताळेबंद चक्रगति प्रमाणेच होत असतात. दिवाणांच्या हातांत मुखत्यारीने करण्या इतकी काय स्वतंत्रता असते, हे त्यांनीच सांगितलेले बरे! आजपर्यंत इंग्रज दिवाण असे त्या ऐवजी हिंदी दिवाण आला; राजकारणी यंत्ररचना आहे ती कायम. यापेक्षा अधिक फरक कांही नाही. दिवाण इंग्रेज असो नाहीतर हिंदी असो, ब्राह्मण असो वा ब्राह्मणेतर असो, त्याला सरकारी नोकरशाहीच्या ठरावीक धोरणानेच आपली पावले टाकावी लागतात आणि कौन्सिलमध्ये सुद्धा सरकारी धोरणानेच समर्थन करावे लागते. अर्थात् हे दिवाण म्हणजे नोकरशाहीचेच भाइबंध बनत असल्यामुळे त्यांना जनतेचे हितवादी कसे मानावे? हा खरोखरच विचाराचा प्रश्न नव्हे काय? हिंदी दिवाणाचे आंतडे कितीहि हिंदी असले व त्याला कितीहि हिंदी तिडका येत असल्या, तरी ते इंग्रजी नोकरशाहीचे पगारी गुलाम बनल्यामुळे व घशांत दरमहा उतरत असलेल्या स्वादिष्ट मलिद्यामुळे त्या

तिडका त्यांच्या मस्तकापर्यंत भिडणेच शक्य नसते. यदाकदाचित भिडल्याच तरीहि त्याचे हातपाय व तोंड विशिष्ट राज्यरचनेच्या यंत्रांत जाम दडपून बसविल्यामुळे 'जशी प्लेट तसे गाणे' या पलीकडे या दिवाणांना जनहिताचे कसलेहि कार्य स्वयंनिर्णयाने करतां येणे शक्य नाही. सारांश दिवाणांच्या पूर्वावताराचा जन्म जरी लोकनियुक्ततेच्या पोटी झालेला असला, तरी त्याचा उत्तर भाग नोकरशाहीच्या गुलामगिरीचा असल्यामुळे त्यांना जनतेचे प्रतिनिधी किंवा हितवादी मानण्याचे मुळीच कारण नाही. हिंदी दिवाण म्हणजे इंग्रेजी नोकरशाहीचे पगारी पुरस्कर्ते होत. सरकारनियुक्त उमेदवारांपासूनहि जनतेने जरा चार बोटे दूरच राहिलेले बरे. हिंदी दिवाण व सरकारनियुक्त हिंदी उमेदवार यांचे गोत्र जवळ जवळ एकच. फरक एवढाच की दिवाण सरकारी मलिद्यावर जगतो व हे शिष्ट त्या बाबतीत दिवाणे असतात. परंतु सरकारच्या मेहेरबानीनेच त्यांच्या कपाळाला कौन्सिलदारीची बाशिंगे लाभल्यामुळे सरकाराला विरोध करण्याचा कधि प्रसंग आला तर यांची शिंगे बाशिंगांच्या बुरख्यांतून बाहेर कशाला दिसतील? याची ठळक उदाहरणे पाहू इच्छिणारांनी गत कौन्सिलांतील सरकारनियुक्त उमेदवार श्री. भास्करराव जाधव व वसंतराव दाभोळकर या प्रसिद्ध बाशिंग्या दुक्कलीची कामगिरी अवश्य पहावी. जेव्हा पहावे तेव्हा यांचे हात सरकारच्या बाजूला! जणूं काय सरकारी गणपतीच्या चारी भुजा म्हणजे जाधव-दाभोळकरांचे दोन दोन हात. या हातांचा कलंडता झोक चुकून सुद्धा कधि लोकपक्षाकडे झुकला नाही. आता सामान्य नियमाला अपवाद हे असणारच आणि कौन्सिलांतली निवडणूक लोकांकडून होवो वा सरकारकडून होवो, आपले लोकहितवादाचे ब्रीद लवमात्र ढळूं न देणारेहि कांही स्पष्टवक्ते गत कौन्सिलांत होतेच. के. रा. ब. साठे, श्री. लालजी नारायण, कानजी द्वारकादास, पुरुषोत्तमदास ठाकुरदास, घोलप वगैरे सरकारनियुक्त सभासदांनी लोकपक्षाचा केवार घेण्यात मुळीच कसून केली नाही. पण हे असले अपवाद फारच थोडे. नॉमिनेटेड मेंबरांत हांजी हांजीवाल्यांचाच भरणा फार. सारांश दिवाणांप्रमाणेच हे बाशिंगे कौन्सिलर जनतेचे हितवादी प्रतिनिधी म्हणतां यावयाचे नाहीत. हे सर्व सरकारी बगलबच्चे होत.

इंग्रेजांचा राष्ट्रधर्म

इंग्लंडात जहाल मवाळ खट्याळ वगैरे कितीही पंथ व मतभेद असले, तरी राष्ट्रहिताचा प्रश्न आला की सर्व एकसूत्री एकधोरणी कसे बनतात हे मोठे अनुकरणीय आहे. हिंदी स्वराज्यवादी जहाल चळवळ्यांना मजूर पक्षाच्या हाती इंग्लंडची राज्यसूत्रे कधि जातील याची फार तहान लागली होती. तिकडे मजूर पक्ष बराच जोरावर व बंडखोर म्हणून प्रसिद्ध आहे. या बंडखोर प्रवृत्तिपासून हिंदुस्थानाला कांही तरी विशेष फायदा होईल, निदान स्वराज्याच्या नांवाखाली इकडे चाललेल्या शेकडो तिरपगड्या हुल्लडींना त्या जोरावर पक्षाची सहानुभूती मिळेल, अशी या मंडळींची फार अपेक्षा होती. गेल्या विलायती निवडणुकीत मजूरपक्ष विजयी झाला आणि इंग्लंडच्या मंत्रिपदाची माळ मि. रॅम्से मॅकडोनल्डच्या गळ्यांत पडून त्यांनी आपले मंत्रिमंडळहि निवडून घेतले. नुकताच मद्रासच्या 'हिंदु' पत्राचा खास बातमीदार मि. मॅकडोनल्ड यांच्या मुलाखतीस गेला असतां, साहेब बहादुरानी हिंदुस्थानांतल्या उत्तान स्वराज्यवादी चळवळ्यांना पाठविलेला संदेश अनेक दृष्टीनी मनन करण्यासारखा आहे. राजकारणी सूत्रे हाती नसतांना हिंदी मजूरपक्षाशी-किंबहुना

अखिल हिंदी आकांक्षांशी समवृत्ति असणारा ब्रिटिश मजूरपक्ष, हातांत सत्ता येतांच ब्रिटिश राष्ट्रधर्माला कसा कडकडीत जागतो, हे या संदेशांत छान स्पष्ट झाले आहे. मि. मॅकडोनल्ड आपल्या संदेशांत म्हणतात ''सनदशीरपणा आणि अत्याचार यांत माजणाऱ्या बंडाळीचे हिंदुस्थान जर रणांगण होणार असेल तर त्याच्या कल्याणाची कोणीहि आशा करू नये. जबरदस्तीच्या धमक्यांनी किंवा सरकारी राज्यकारभार बंद पाडण्याच्या अडवणुकीच्या वल्गनांनी ब्रिटनचा कोणताहि पक्ष वंगणीस येणार नाही, हे ध्यानांत ठेवा. आणि तशी कोणाची समजूत असेलच, तर असल्या हुल्लडीचे भविष्य काळी होणारे परिणाम त्या समजूतीची सपशेल निराशा करण्याइतके कडकडीत ठरतील. माझी सर्व हिंदी लोकांना कळकळीची विनंती आहे की, त्यांना जर आमच्या विचारांशी व सदिच्छेशी परिचित व्हायचे असेल तर त्यांनी दूर फटकून न वागतां आमच्या जवळ आले पाहिजे.'' मि. मॅकडोनल्ड यांनी अत्याचारी प्रवृत्तीला व तिरसट तुसड्या सुतकी बाण्यालाहि आपल्या भाषणांत खरपूस दम भरलेला आहे. आपण एवढाच सारांश घ्यावयाचा आहे की इंग्लंडची साम्राज्यसत्ता ज्या विशिष्ट धोरणाने व गतीने नियंत्रित झालेली आहे, ते धोरण व ती गति अबाधित राखण्याच्या कामी, म्हणजेच इंग्लंडचा राष्ट्रधर्म उज्वल राखण्याच्या कामी, तिकडील पक्षभेद व पंथभेद ताबडतोब एकजिनसी व एकधोरणी होतात. 'माझेच खरे' असला कट्टर-फत्तर-पणा ऐन कार्याच्या प्रसंगी उरत नाही. उदार लिबरल असो, आकडू कांन्झर्वेटिव असो, नाहीतर मजूर लेबर असो, राष्ट्राच्या इभ्रतीचा व सत्ताटिकावाचा प्रश्न आला की सर्व इरसाल राष्ट्राभिमानी इंग्रज बनतात; हे राष्ट्रधर्माचे चित्र चिंतनीय व आचरणीय असेच आहे.

एक शुद्ध बावळट नक्कल

गेल्या डिसेंबरांत पुण्यास जी चवथी अस्पृश्यांची प्रांतिक परिषद सातारचे खा. ब. कूपर यांच्या अध्यक्षते खाली झाली, तीत पसार झालेले ठराव अझून कोठेच प्रसिद्ध झाल्याचे आमच्या अवलोकनांत आलेले नाही. स्पृश्य पत्रांनी अस्पृश्यांच्या ठरावांवर घातलेला हा बहिष्कार अस्पृश्यांना बराच शहाणपणा शिकवील अशी आशा आहे. या परिषदेने एक ठराव असा केला आहे की ''सरकारी दप्तरांत अस्पृश्य मानलेल्या लोकांबद्दल अस्पृश्य, निकृष्ट (डिप्रेस्ड) अशा नावांनी उल्लेख न करता, त्यांना आदि हिंदु संबोधण्यात यावे व आदि हिंदु असा उल्लेख करावा. त्याचप्रमाणे इतर लोकांनीहि त्यांना आदि हिंदु ह्मणावे, अशी या परिषदेची सरकारास व सर्व लोकांस विनंती आहे.'' ही आदि हिंदूची कल्पना कोणाच्या सुपीक मेंदूतून बाहेर पडली नकळे! त्यांत मनोवृत्तीच्या संकुचितपणा बरोबरच इतिहासाचे गाढ अज्ञान मात्र व्यक्त झाले. नावांची ही आदलाबदल पाहिली की शेक्सपियरच्या ''नावांत काय आहे? गुलाबाला गुलाब न ह्मणतां दुसरे कांही नांव दिले तर त्याच्या सुवासांत काय फरक पडेल?'' या सुप्रसिद्ध उक्तीची आठवण झाली. अस्पृश्य किंवा डिप्रेस्ड (अधःपातित) या दोन शब्दांत खरे पाहिले तर सात अष्टमांश स्पृश्य हिंदी लोकांच्या राष्ट्रीय मूर्खपणाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडविणारा दारू गोळा साठविलेला आहे. अनेक महात्म्यांच्या कर्मयोग्याने या शब्दांना आज इतकी जाज्वल्य तीव्रता आलेली आहे की स्वराज्यवादी स्वयंनिर्णयेच्छू स्पृश्यांना त्यांचा उच्चार करतांना शरमेने त्यांची तोंडे काळी पडतात. लीग ऑफ नेशन्सच्या किंवा ब्रिटीश

पार्लमेंटच्या दरबारांत 'मी हिंदुस्थानांतल्या अस्पृश्य समाजाचा एक घटक आहे' अशी एकच आरोळी कोणी मारली पुरे की स्वराज्याच्या गप्पा मारणाऱ्या शेकडो शास्त्रीबुवांची पुराणे ठिकच्या ठिकाणी गारद होतील, इतके महत्व या शब्दांत आज आले आहे. या शब्दाचा उच्चार होतांच हिंदुजनांच्या अधःपाताचा, त्यांच्या व्यभिचारी न्यायबुद्धीचा, त्यांच्या सडलेल्या सामाजिक विचारांचा गेल्या हजार वर्षांचा इतिहास दृष्टीपुढे चटकन् उभा राहतो. 'अस्पृश्य' या उच्चाराने अस्पृश्य समाजावर स्पृश्यांनी लादलेल्या सामाजीक व धार्मीक जुलमांची कल्पना जशी चटदिशी येते, तशी आदि हिंदु शब्दाने खास येणार नाही. आदि हिंदु शब्दाची योजना मद्रास कडच्या अस्पृश्यांच्या 'आदि द्रविड' शब्दयोजनेवरून इकडच्या शोधकाच्या टाळक्याला सुचली असावी असे स्पष्ट दिसते. पण ही शुद्ध बावळट नक्कल आहे.

वस्तुस्थितीचे अज्ञान

मद्राशी अस्पृश्य आणि महाराष्ट्रीय अस्पृश्य यांची ऐतिहासिक मूळपिठिका एकजिनसी नाही. आर्य संस्कृति आणि द्रवीड संस्कृति यांत दक्षिणोत्तर भिन्नता आहे. उत्तरेकडून दक्षिणेकडे आर्य संस्कृतीची अवनति कलंडल्या प्रमाणावर होत गेली असून तिचे विकृत अधःपतन द्रविडि संस्कृतीत आज पहावयाला मिळते. तिकडले अस्पृश्य आज २० व्या शतकात १६ व्या शतकांतले जीवन कंठीत आहेत. महाराष्ट्रांतला अस्पृश्य समाज मद्राशी अस्पृश्या इतका खात्रीने हिणकस नाही. तो शुद्ध आर्य आहे, मद्राशी अस्पृश्यांप्रमाणे द्रविडि उर्फ अनार्य खाणीतला नव्हे. एकट्या महार जातीतल्या शेकडो कुटुंबांची आडनांवे पाहिली तरी ती सुद्धा भोसले, धुमाळ, शिंदे, गायकवाड, जाधव, घोलप, कदम, घाटगे, सावंत, थोरात, रोकडे, पवार इत्यादि आज शेकडो वर्षे परंपरेने चालत आली आहेत, ती कां? या प्रश्नाचा या 'आदि हिंदु' डोक्याने वास्तविक विचार करावयाला हवा होता. महाराष्ट्रीय अस्पृश्य समाज आदि हिंदु नसून शुद्ध हिंदु आहे, हे सिद्ध करणे फारसे कठीण नाही. वरील आडनांवे कूपर, वेलिंग्टन, वॉर्डन या पारशी आडनांवाप्रमाणे युरोपियन पुरस्कर्त्यांच्या स्मारकार्थ उगाच अवचित उत्पन्न झालेली खास नव्हेत. त्यांत वंशवेलांचा इतिहास आहे. स्पृश्यब्रुब हिंदुसमाजांत प्लेग कॉलऱ्या प्रमाणे माजलेल्या तुसड्या बहिष्कार-प्रवृत्तीचा घाणेरडा निंद्य इतिहास आहे. संस्कृत-साम्याच्या दृष्टीने पाहिले तरी आजच्या विद्यासंपन्न महारांत किंवा चांभारांत व संस्कृतिश्रेष्ठत्वाची शेखी मिरवणाऱ्या ब्राम्हणादि जातीतल्या विद्यासंपन्नात कसलाहि फरक दिसत नाही. नुसता विद्येचा संस्कार होताच चटकन स्पृश्य व सुशिक्षित हिंदूंत बेमालूम सरमिसळ होऊन जाणारा अस्पृश्य महार किंवा चांभार आदि हिंदु उर्फ अनार्थ कोटीत ढकलण्याचे धारिष्ट करणाऱ्या शहाण्यापाशी ऐतिहासिक पुराव्याचे काय पातडे आहे, ते त्याचे प्रसिद्ध केल्यास बरे होईल. दुसरी एक आपत्ति आहे ती निराळीच. आम्हाला अस्पृश्य किंवा डिप्रेस्ड म्हणू नका, आदि हिंदु म्हणा, असली 'एकमताच्या ठरावाची विनंती' सरकारला व जनतेला करणाऱ्यांवर डिप्रेस्ड क्लासेस मिशन या संस्थेचे नांव प्रथम बदलण्याची जबाबदारी आता येऊन पडली आहे. ती त्यांनी प्रथम पार पाडल्याशिवाय सरकारने किंवा जनतेने त्यांच्या ठरावाला का मान द्यावा, हे समजत नाही. तात्पर्य, आदिहिंदुत्वाची कल्पना शुद्ध बाष्कळ व पोरकट आहे.

□□□

लेख

Native States - A problem

We are in a age of problems. India especially is confounded with a number of intricate problems; through the solution of which she is struggling to regain her lost independence and national glory. The nationalists think that democracy is the panacea to relieve India of all her miseries. Whether this prophesy is correct or incorrect, it is a fact that India is bent upon reviving her original national spirit, by breaking down the bonds which enslaved her inwardly and outwardly. Under the British regime, India has grasped the principles and elements of national freedom, which the west evolved through incessant labours of many centuries, and though India now groans me under the heels of British burocracy, she is tow struggling from within to assert herself by any and every means within her reach. Whatever may be the evils which British burocracy has wrought by its heartless system of government in this country, no al of rational bent of mind can be so ungrateful as not to acknowledge the liberties which British rule has given to the Indians for the expression of their thoughts. In native states the word liberty has no meaning. When compared with the freedom of speech and writing enjoyed by the people of the Khalsa provinces, it betrays a most miserable situation. It is quite natural that we should feel a sort of pride and love for the native states, as the little remnants of the ancient Indian royal dynasties. Related by blood as these hereditory kings of several states stand to the people of India, mere idea of their wholesale extinction is likely to make one's heart bleed. The Hindu and Moslem Empires in India met their ruin, not without a cause; but our slave mentality still clings to these hereditory rulers of the native states with a blind devotion, which literally blinds us to their obvious defects. There are people who trumpet the existence of the native states as symbols of inspiration to revive India's lost independence. There are sycophants who tell us in loud voice that had it not been for these states, we would have long ago forgotten our Shivaji, our Ranjitsingh, or our Mahadji Shinde. There are flatterers large in numbers who worship some of the hereditory kings as incarnations of gods, and fail to see how these gods have turned their states into a sort of prison, or big cage in which teeming millions of people having ears should hear not and having eyes should see not. Alike hereditory priest craft hereditory monarchy stands condemned in all nations of the present-day

world. This is an age of republicanism and democracy. It knows no god, no Emperor, no king, except the Voice of the People. It has exposed the evils of hereditory monarchy in all its nakedness. In India we see every day a keen tug of war going on between the partizens of Burocracy and champions of Democracy. If the people of India desire to substitute democracy in place of burocracy, certainly they cannot afford to permit the autocracy of native states remain as a perpetual menace and hindrance in their path of progress towards Swarajya, whether under the aegis of the British Empire or otherwise.

Mr. Sully, a western writer describes the ruin of monarchies most graphically as under.

He says, "The cause of the ruin or decline of monarchies exhorbitant subsidies; monopolies, chiefly those relating to corn; neglect of merchandise, trade, agriculture, arts and manufactures; the great number of public employments, the fees and excessive authority of men in office; the cost, the delay, and the injustice of tribunals; idleness, luxury, and all that is connected with it,- debauchery and corruption of manners, confusion of ranks, changes of the value of money, unjust and imprudent wars, the despotic power of sovereigns, their blind adherence to particular persons, their prejudice in favour of particular conditions, or professions; the greediness of ministers and favourites; the degradation of persons of quality; contempt or neglect of men of letters; the connivance at bad customs, and infraction of good laws; and obstinate adherence to customs either mischievous or indifferent and multiplicity of edicts and useless regulations." This is a very nice description of the causes which sought or may eventually seek the ruin of monarchies, especially the hereditory monarchies. Let the people groaning under the autocracy of Indian Native States come forth and say on oath if all or some of the mischiefs summarised above are not at all prevalent in their State. But what is the use of challenging them, poor people muzzled by harsh regulations of their respective Rajahs? They have no right to speak out their sentiments. They cannot express their say through the medium of newspapers; the Native States of India possess no outspoken journals, except some worthless rags indulging in disgusting sycophancy of the Rajahs or writing something childish or foolish which may please the particular fancies of the ruler of the State. In spite of the relentless burocratic rule in British Khalsa territory, the Indian Press enjoys full liberty of expression and the Voice of the People is at once heard and honoured. The British Indian Press could have and did run to the help of the muzzled people of native states in order to ventilate their innumerable grievances, but there came the weapon of an act notoriously known as the Princes' Protection Act, which now leaves the unfortunate victims of native autocracy to suffer their lot without complaint. The introduction of this unjust act warns the Khalsa journals to maintain dead neutrality so far as the autocracy of the princes is concerned. The princes consider their states as hereditory estates left to their care by their forefathers. No institution is permitted to crop up in their territory which may boldly express public sentiments. The people form as if the part and parcel of the hereditory Royal Estate as do the horses, the dogs, the cattle or the concubines. No branch of administration bears the touch of public control or public consultation. The revenue collected may and can be wasted and spent in any way the princes may choose. The people have no right to say yes or no to what the princes desire to do through their "Yes Please" deputies. In short, we have no hesitation

to say that these native states with all their tight methods of autocratic administration are instrumental in keeping a large portion of India's sons and daughters in perpetual slavery and thus maintain a hindrance in the way of India's evolution towards the achievements of democracy.

Whatever may be the defects of the British administration in India, one plain fact none can deny, viz. the public opinion is free here. Through conferences, public platforms, dramas, novels, newspapers and many other similar channels we can express ourselves boldly. These expressions are allowed to reach all the countries in the world, which in return either reciprocate the public views or condemn them in a fearless spirit of democracy. The groanings of Indian State people are never permitted even to be whispered. The way to their ventilation is securely guarded and those who show the faintest or even doubtful sign of not yielding to the "desires of his highness" are forthwith exported or thrown into dungeons without enquiry. Freedom of speech and writing are quite unknown to the people unfortunately residing in State territories. This separation of state subjects from their relatives in the Khalsa territory is a menace to the new life which throbs in the nerves and veins of young India. It has lowered the princes into the estimation of the Indians at large, not to talk of the unrest which foams within their territories. there are exceptions of a couple of Indian princes whose administration can be said to show some signs of advancement and granting of freedom to their people, but a large number still continues that autocratic method of administration, which has estranged them from the sympathies of British India people. It is not our desire to dilate upon the details. Enough to say that as we advance on the path of progress towards Swaraj, these States, which now serve the purpose of buffers here and there throughout the Indian Continent would prove the worst possible sources creating unimaginable difficulties in our way. We are afraid; the time is not far off when the people residing in Native States shall have to throw off the yokes of their autocratic princes in vindication of their natural rights as men and women. In order to avoid this eventual catastrophy, there has come into being an institution called Daxini Samsthan Praja Parishad, report of whose third sessions at Belgaum is at present on our table for review.

The Parishad aims at bringing the princes to their sense of duty by offering a number of recommendations to grant their people in conformity with those enjoyed by their brethren in Khalsa India. They do not desire extinction either of the princes or their States, the speeches of several speakers reproduced in the said report are full of moderation and sublimity. The effort appears to be a timely one and in a right direction. But it being directly in opposition to the hereditory habit of autocracy ingrained in the blood of the several Deccan Princes there is much likelihood of the appeals of the Parishad falling flat on the ground.

it is surprising to note that the Non-Brahman party, which in and out of season trumpetted itself as the champion of the people and lover of democracy, desisted from taking any part in this Parishad movement, on the ground that it aimed at crushing down the Non-Brahman state of Kolhapur. Can there be any ridiculous foolish idea than this? We know there are many people mentally enslaved, who consider a Rajah as an incarnation of god. Especially among the followers of the Non-Brahman Party the number of such silly devotees of these human-gods is surprizingly large. The bad itch

of deification has sorely affected the satellites of the Non-Brahman party. Crafty men are taking full advantage of this contagion and heralding themselves as their leaders. While they hiss and storm against mental slavery begot by Brahmanical scriptures and Jagadgurus, they themselves are now manufacturing the same with shamelessness all their own. Such a people can scarcely have any idea as to what human rights mean and what amount of mischief is being wrought by the autocratic government of their beloved princes, whom they adore as gods. As long as the Non-Brahman party maintains its adherence to the favours of Native Princes, it shall be taken as an index of their cold indifference to the true principles of democracy and public service.

In conclusion, we make ourselves bold to remark that whatever may be the relations of the British Government with the Native States, so far as India's evolution towards democracy is concerned, these states shall ultimately come forth as indegenous obstacles in the way of Swaraj and it no immediate steps are taken to un-muzzle the subjects of these hereditory autocrats India al have tray a very heavy tax in losing the cooperation of a number of millions now roaming in various native states. It is indeed a problem ransacking the best of a statesman, and we trust the Princes would save the country from being forced to take any apparent drastic measures to relieve their kith and kin from the one-man rule of their provinces. As at present constituted, the Native States are but spots of leprosy on the body of India and none but we shall be too glad to see the whole map of India coloured in red before it changes to some other colour designatory of responsible dominion government evolved on clear lines of republicanism.

□□□

अग्रलेख

माणसांतले सुरवंट

या जगांत अनंत आश्चर्यें आहेत. आश्चर्यांनी ही सृष्टी नटलेली नसतीं, तर इहलोकची जीवनयात्रा अत्यंत उदासीन व कष्टप्रद झाली असती. कोठेंहि नजर टाका, जिकडे तिकडे कांहीं ना कांहीं आश्चर्य म्हणून आहेच. पृथ्वीच्या अगाध उदरांतील खनिज द्रव्यांच्या चमत्कारांपासून तों थेट मनुष्यस्वभावाच्या चमत्कारापर्यंत एकापेक्षां एक वरचढ अशा अनंत आश्चर्यांनीं आपल्या सभोंवारची ही सृष्टी आरपार फुललेली आहे. परंतु सर्वसाधारण मनुष्याला या आश्चर्यांचे निरीक्षण व अभ्यास करण्याइतकी फुरसद नसते म्हणा किंवा प्रवृत्तीच नसते म्हणा. विशेषतः साता कोसावरचें दिसतें, पण हाताजवळचें भासत सुद्धां नाहीं, हा माणसाचा स्वभावधर्मच पडल्यामुळें, हा स्वभावधर्मच केवढें मोठें आश्चर्य आहे, याची कोणी सहसा दाद घेत नाहीं. इतर सर्व शास्त्रांपेक्षां मानवस्वभाव-निरीक्षण व परीक्षण हें एक महत्वाचें शास्त्र आहे. व्यक्ति तितक्या प्रकृति ही म्हण आपण नेहमीं बोलतों व लिहितों. पण या भिन्न भिन्न प्रकृति निरनिराळ्या व्यक्तींत कां दिसतात, त्यांचा परिपोष कसा होतो, त्या प्रकृतीचा व्यक्तींच्या अंतर्बाह्य चारित्र्यावर कांहीं ठसा उमटतो कीं नाहीं, उमटत असल्यास त्याचें परीक्षण कसें करावें, इत्यादि प्रश्नांचा विचारच कधिं आपल्यास सुचत नाहीं. मानसिक विकारांची सारी घडामोड अंतःकरणांत चाललेली असते. या घडामोडीचें प्रतिबिंब चेहऱ्यावर स्पष्ट उमटतें. म्हणूनच एका तत्ववेत्त्यानें म्हटलें आहे कीं मनुषचा चेहरा म्हणजे अंतःकरण-घड्याळाची तबकडी होय. या तबडकीवर सर्व विकाराचे काटे बिनचूक फिरत असतात. इतकेंच नव्हें तर त्यांच्या या बिनचुक विकारदर्शनाचीं ठोकळ चिन्हें चेहऱ्यावर कायमची ठसलीं जातात. फिझिऑनमी म्हणजे चेहरेपट्टीवरून स्वभाव-परीक्षण करण्याचें एक स्वतंत्र शास्त्रच आहे. या शास्त्राच्या साह्यानें व्यक्ति तितक्या प्रकृति कशा? एवढ्याच प्रश्नाचें उत्तर मिळतें असें नव्हें, तर वदनाकृतीवरून प्रकृतीचेंहि तंतोतंत निदान ठरवितां येतें. नेहमीच्या व्यवहारांत किंचित चिकित्सक दृष्टीनें माणसांच्या चेहरेपट्टीचा त्यांच्या बोलण्या चालण्याशीं व आचारविचारांशीं तुलनात्मक निरीक्षणाचा अभ्यास ठेवला तर कांहीं दिवसांनीं फिजिऑनमीचें शास्त्र न पाहतांहि आपल्यास मानव-स्वभाव-परीक्षणाची कला हस्तगत होणें शक्य आहे. हा एक अत्यंत महत्वाचा विषय आहे आणि त्याचें ज्ञान करून घेणें प्रत्येक विचारी व व्यवहारी मनुष्याला हितकर आहे. हा अभ्यास वाटेल तेव्हां वाटेल तेथें सुरू करता येतो. याला भांडवल लागत नाहीं.

गुरुपदेशाची जरूर नाहीं. साहित्याची अडचण नाहीं. डोळे उघडे असले म्हणजे झाले. निरीक्षणाची कसोशी, मननाची पराकाष्ठा आणि आपले सिद्धांत आपणच पडताळून पहाण्याची न्यायनिष्ठुरता, एवढ्या सामुग्रीवर हा अभ्यास तोंडांतून एक अवाक्षरहि न काढतां इतका बळावतो कीं पुढें पुढें नुसता फोटो पाहून सुद्धां एखाद्या माणसाच्या स्वभावाचें अचुक निदान ठरवितां येतें. या मनोरंजक विषयाकडे प्रबोधनाच्या वाचकांचे लक्ष वेधावें, म्हणून माणसांतले सुरवंट कसे असतात याचा थोडा शब्दपरिचय करून देण्याचें योजिलें आहे.

सुरवंट हा कीटक पितर पक्षांतल्या हंगामांतच विशेषतः उत्पन्न होतो आणि 'पितरपाखांतली खीर' खाल्ली कीं गुप्त होतो. माणसांतले सुरवंट असेच खिरीचे मोठे भोक्ते असतात. यांचा आणि श्रीमंतांचा मोठा परिचय. हे नेहमी श्रीमंतांच्या भोवतीं गोंडा घोळीत फिरत असायचे. यांचें पीक हिंदुस्थानाइतकें इतर कोणत्याहि राष्ट्रांत उमाप पिकत नाहीं. हिन्दुस्थानांतल्या राजेरजवाड्यांनींच या सुरवंटांची अवलाद या देशांत प्रथम मुलबलक पैदा केली; आणि त्यामुळेंच आज हिंदु श्रीमंतांचे दिवाणखानें व आंगणें या प्राण्यांनीं गजबजून गेलेलीं आढळतात. श्रीमंतांना या सुरवंटांचें महत्वहि तसेंच जबरदस्त आहे. जगांतून हे मानवी सुरवंट जर नाहींसे झाले किंवा केले, तर श्रीमंतांना आपल्या खऱ्या खोट्या श्रीमंतीचीचशी काय, पण खुद्द माणुसकीची बोंब तिव्हाट्यावर येऊन स्वतः मारावी लागेल. शेणाच्या कुझक्या पोहोट्यांत ज्याप्रमाणें विंचू महाराज आपले बिनचूक उदयास येतात, त्याप्रमाणें श्रीमंतीच्या उबाऱ्यांत हे मानवी सुरवंट आपोआप झळकूं लागतात. श्रीमंतांच्या बेअक्कल पोरांचा जन्म होऊन त्यांच्या तोंडांत मधाचा बिंदु जाण्यापूर्वीच या सुरवंटांच्या स्तुतिपाठाचा पाट आईबाप आणि ते पोर यांच्या कानांत धो धो कोसळतो. पावसानें डोळे वटारून साऱ्या दुनियेला तब्बल बारा वर्षे जरी निर्जळी एकादशी घातली, तरी श्रीमंतीच्या उबाऱ्यावर जागणाऱ्या सुरवंटाच्या स्तुतिपाठाच्या पाटाचें पाणी रतिमात्र हटायचें नाहीं. सुरवंट हा श्रीमंतांचा 'सर्वंट' असो वा नसो, त्याच्याशिवाय श्रीमंताच्या श्रीमंतीला विधवेप्रमाणें दाहीदिशा शून्य होतात. आपली श्रीमंती विधवा होऊं नये, आपल्या वैभवाचा डांगोरा पोटांतल्या पोटांत जिरूं नये, आपल्या बाष्फळ व थिल्लर वर्तनाचें लोकांत नागवें प्रदर्शन होऊ नये आणि आपण स्वतः इतर प्राकृत माणसांप्रमाणेंच माणूस आहों ही जाणीव इतरांस व खुद्द स्वतःसहि होऊं नये, म्हणून मानवी सुरवंटांचे थवेच्या थवे जवळ बाळगिण्याचा संप्रदाय प्राचीन भारतीय राजेलोकांनींच सुरू केल्यामुळें, तो आजपर्यंत अव्याहत चालूं ठेवण्याचें पुण्य कार्य सध्यांचें राजे व गर्भश्रीमंत लोक करीत असतात. काय करतील बिचारे ! वडिलांच्या पावलावर पाऊल टाकून चालणारीं हीं इमानी मेंढरें !! राजे व श्रीमंत तोंड असून मुके, कान असून बहिरे, डोळे असून आंधळे, आणि माणूस असून बेअक्कल कां? अशी शंका पुष्कळांना पुष्कळ वेळां येते. श्रीमंतांचीं शेंकडां ९९ पोरें मूर्ख, लहरी व पोरकट कां असतात? याचेंहि पुष्कळांना कोडें पडतें. परंतु माणसांतला सुरवंट हा प्राणीच असा पराक्रमी आहे कीं श्रीमंतांच्या श्रीमंतीला त्याची झळ लागतांच हे सर्व चमत्कार घडविणें त्याच्या बत्तीस दातांचा मळ ! श्रीमंतीच्या उबाऱ्यात जन्मलेली आणि त्या उबाऱ्यावरच जगणारी ही माणसांतल्या सुरवंटांची संख्या हिंदुस्थानात अलीकडे इतकी भरंसाट फुगली आहे कीं त्यांची हएक स्वतंत्र जातच बनली आहे. सुरवंटांचा एक संप्रदायच निर्माण झालेला आहे. या सुरवंटांचें मुख्य आकर्षण केंद्र जरी श्रीमंतांचे कासोटे व पायजमे असले, तरी त्यांच्या चळवळी समाजात सर्वत्र सुरू असतात. हा प्राणी दिसतो तसा नसतो. याचा चेहरा बावळट असला तरी अंतःकरण अचाट खटपटींत

गुंग असतें. अंतःकरणांतले विकार चेहऱ्याच्या तबकडीवर केव्हांच उमटूं न देण्याची त्याची कुशलता वर्णनीय नसली तरी निरीक्षणीय खास असते. सुरवंटाच्या संप्रदायाचा गंडा मनगटावर चढविण्यापूर्वी प्रत्येक उमेदवाराला आपल्या हृदयाच्या कारभाराच्या दोऱ्या चेहरा-तबकडीपासून आमूलाग्र उखडून काढाव्या लागतात. तोंडांत दातांची बत्तिशी शिल्लक असो वा नसो, आपल्या श्रीमंत पुरस्कर्त्यांच्या तोंडून निघणाऱ्या बऱ्यावाईट शब्दाला हीहीहीहीचें आगत-स्वागत देण्यासाठीं त्याची बत्तिशी हुकमी सज्ज पाहिजें. त्याच्या पाठीचा कणा बजरंग बलीच्या सोट्याप्रमाणें ताठ आणि कणखर असला, तरी श्रीमंतांच्या समागमांत येतांना कमरेपाशीं तो धनुकली प्रमाणें वाकविलेला असावा. खऱ्या खोट्याची चाड मुळींच न बाळगण्याइतकी त्याची मनोवृत्ति परमहंस बनलेली असावी. उमेदवाराला चहाचें व्यसन असो वा नसो, त्यानें चहाड्या चुगल्या सांगण्याची कला उत्तम हस्तगत-नव्हे जिव्हागत-करून ठेंवलीच पाहिजे. श्रीमंतांना पंचपक्वान्नांच्या मेजवानीपेक्षां चुगलखोरांच्या चुगल्या खाण्याची फार आवड असतें. वेळीं अन्नपाण्याशिवाय श्रीमंत लोक पंधरा वीस दिवस सहज जगतील, पण सुरवंटांच्या चहाड्यांशिवाय ताबडतोब आत्महत्या करतील. श्रीमंतांच्या प्रत्येक सुस्काऱ्याला एकदां हां व एकदां जी करण्याचा सुरवंटांचा संप्रदाय असल्यामुळें, कोणी त्यांना हांजीहांजीखोर असें म्हणतात. त्यांना श्रीमंतांनीं कधिं झिकारलें लाथाडलें तरी बिनचुक त्यांची पिकदानी धरायला ते राजीखुषीनें अक्कलहुशारीनें धावतात, म्हणून त्यांना कोणी जेहत्ते लाळघोटे असेंहि म्हणतात. देवाला जसें संध्येंतल्या निरनिराळ्या २६ नांवानें हांका मारल्या तरी देव अखेर एकच, तसें हांजीहांजीखोर, लाळघोटे, पाजी, चुगलखोर, भाडखाऊ वगैरे अनंत नांवें या महात्म्यांना कोणी दिली, तरी अखेर यांचें खरें नांव माणसांतले सुरवंट हेंच होय.

प्राचीन राजें लोकांनीं या सुरवंटांना खुद्द दरबारांत मानाची खुर्ची देण्याची वहिवाट पाडल्यामुळें, त्यांच्या पागलपणाची मोठी चलती उडाली. दरबारी खुषमस्कऱ्या व दरबारी मानकरी या दोघा नंदीबैलांत खुषमस्कऱ्याची पायरी वरची. मानकरी खुषमस्कऱ्या नसे किंवा खुषमस्कऱ्या मानकरी बनत नसे असें नाहीं. पण खुषमस्कऱ्यांचें पाऊल थेट सरकारस्वारीच्या रंगमहालापर्यंत लांबत असें; मानकऱ्याला आपल्या मानेभोंवतींच गिरक्या मारीत फिरावे लागत असे, एवढाच फरक खुषमस्कऱ्याला जिव्हांचांचल्य आणि चुगलखोर लाळघोटेपणा एवढाच भांडवलावर राजाच्या हृदयाच्या अंतरंगापर्यंत जाण्याची परवानगी; पण शत्रूचा पाडाव करून आलेल्या सरधोपटमार्गी तलवारबहाद्दर गड्यास मानसन्मानाची दरबारांतल्या दरबारांत बोळवण असा प्रकार असल्यामुळें सुरवंटांचा समुदाय सहाजिकच अधिक वाढला आणि अखेर त्यांचें रूपांतर देशद्रोही देशघातकी मातृगमन्या नरपशूंच्या संख्याविषयांत झालें. सुरवंट हे बोलून चालून खिरीचे भोंक्ते. खीर संपली कीं सुरवंट गेले. गेले म्हणजे मेले नव्हेत. सुरवंटाचें फुलपांखरांत रूपांतर होतें. सुरवंट असतांना धिमेधिमे रांगणारा प्राणी रूपांतरांत मनस्वी भराऱ्या मारणारा बनतो. राजेरजवाड्यांच्या प्राचीन खुषमस्कऱ्यांची संस्था आज जरी नामशेष झाल्यासारखी दिसत असली, तरी विद्यमान राजांच्या भोंवतीं निरनिराळ्या रूपांतरानें सुरवंटांचीच कुंपणें पडलेली आहेत. त्याचप्रमाणें खुशालचेंडु श्रीमंतपुत्रांचीं दालनें, अचाट बुद्धि चालवून बळेंच लक्ष्मी मिळविलेल्या श्रीमंतांचीं माजघरें आणि एखादी विशिष्ट चळवळ चालविणारांना मधून मधून उगाच लहरी दाखल देणग्या देऊन स्वतःचा बडेंजाव माजविणारांच्या ओसऱ्या सध्यां नानाविध सुरवंटांनीं नुसत्या गजबजलेल्या आहेत.

हिन्दुस्थानच्या राष्ट्रीय अस्तित्वाची व त्याच्या स्वातंत्र्याची जर कोणी राखरांगोळी केली असेल तर

या चुगलखोर सुरवंटांनींच होय. गझनीच्या महंमदांच्या स्वारीपासून तों थेट सातारची छत्रपतीची गोदी ईष्ट इंडिया कुंपणीच्या आंगाखालीं जाई पर्यंत, नव्हे, १८५७ च्या बंडापर्यंत, हिंन्दुस्थानच्या स्वातंत्र्यार्थ जे जे बरे वाईट प्रयत्न झाले, त्यांच्या नाशाला या हरामखोर चुगलखोर लाळघोट्यांची सुरवंटशाही कारण झाली, असा इतिहासाचा पुरावा आहे. सातारच्या प्रतापसिंह छत्रपतीला याच स्वराज्यद्रोही स्वार्थी चोरांनी राज्यभ्रष्ट कसें केलें आणि सत्तावनच्या बंडांत कोणकोणत्या मानवी सुरवंटांनीं चहाड्या चुगल्यांच्या चुल्हाणावर रंगो बापूजी गुप्त्यासह शेंकडों राष्ट्रसेवकांना जिवंत भाजले, याचा इतिहास याच लेखणींतून प्रबोधनाच्या आश्रयदात्यांच्या सेवेला क्रमशः रुजू होत आहेच. तत्कालीन चुगलखोरांनीं हिंदवी स्वराज्याचा मुर्दा पाडून, त्याच्या रक्तावर आपल्या जहागिरी व इनामें वंशपरंपरा रंगवून घेतली, आणि आपल्या पुत्रपौत्रादिकांना 'पितरपाखांल्या खिरी'ची अखंड सोय करून ठेवली. आज तर ही चुगलखोर सुरवंटांचीं संस्था हिंदी राजे, श्रीमंत व कोट्यधीश गिरणी कारखानदार यांनीं चांगलीच आश्रय देऊन चालविली आहे. हल्लीं देशांत ज्या अनेक चळवळी सुरू आहेत, त्यांतहि या राजे व श्रीमंत लोकांनीं आपल्या सुरवंटाची मुबलक पेरणी पेरून ठेविली आहे. उद्यांची अपेक्षित भारतीय लोकशाही म्हणजे राजेशाही व श्रीमंतशाही यांच्या उरावर फिरणारा रावणी वरवंटा होय, ही त्यांची खात्री असल्यामुळें त्यांना आपल्या सुरवंटांमार्फत प्रत्येक चळवळींत फाटाफूट पाडून आपलें सुरवंटी ऐश्वर्य कायम राखण्याचा प्रयत्न करणें आवश्यकच होऊन बसलें आहे. कित्येक श्रीमंत आपल्या सुरवंटामार्फत आपल्या नकली जनसेवेची टिमकीहि पिटवून घेत असतात. सारांश, सध्याचें हिंदीराष्ट्र हें चुगलखोरांचें राष्ट्र बनलें आहे. श्रीसमर्थ आज अवतीर्ण झाले तर एकदम संतापानें ओरडून म्हणतील कीं

देशद्रोही तितुके कुत्ते । मारुनि घालावें परते ।।

चुगलखोरी आणि हांजीहांजीखोरपणा या दोन दुर्व्यसनांचा आज फार फैलाव झालेला आहे. प्रत्यक्ष खुनी माणूस पत्करला; पण हे हांजीहांजी करणारे लाळघोटे दगलबाज पत्करत नाहींत. खऱ्याचें खोटें आणि खोट्याचें खरें करणें ही त्यांची सहजलीला. खुनी माणसाचें काळीज उरफाटें असतें असें म्हणतात; पण या लाळघोट्यांना मुळीं काळीजच नसतें. ज्यांचें अंतःकरणच मेलेले त्यांना विवेक कसला आणि लाजलज्जा तरी कसली? लाज जाळल्याशिवाय लाळ घोटतांच येत नाहीं. ज्यांनीं लज्जेलाच लाजविली, त्यांना या जगांत वाटेल तें दुष्कर्म करण्याची मुभा ! धर्मार्थ मिळविलेल्या तांदळाचा भात त्यांच्या खुशाल पचनीं पडतो. शिक्षणप्रसारार्थ जमविलेला फंड शेतांत गुप्त झाला किंवा सार्वजनिक बोर्डिंगसाठी आणलेले पत्रे त्यांच्या घरांवर उड्या मारून गप्प बसले, तरी त्यांच्या मनाला कांहीं दिक्कत वाटत नाही; कारण या प्राण्यांना मुळीं मनच नसते. असले हृदयशून्य लोक राजे व श्रीमंतांच्या पदरीं असल्यामुळेंच त्यांच्या दुष्कृत्यांवर सफेदा चढतो व लोकांत त्यांची कीर्ती होते. माणसांतल्या सुरवंटांची खरीखुरी हालचाल ते श्रीमंतांची मनधरणी करीत असतांना व त्यांच्या मागेंमागें गोंडा घोळवितांना वाटेल त्यानें मुद्दाम निरीक्षण करावी, म्हणजे माणसाची माणुसकी किती नीच अवस्थेपर्यंत येऊन पोहचते, हें चांगलें कळेल. असले स्वार्थासाठीं वाटेल त्याचा गळा कांपण्यास मागेंपुढें न पहाणारे माणसांतले सुरवंट ठिकच्या ठिकाणीं ठेंचण्याची ठोशेबाजी ठणकाऊन सुरू केल्याशिवाय हिंदुस्थानाची लोकशाहीच्या मार्गावर प्रगति होणें बरेंच दुरापास्त आहे, एवढीच सूचना सध्यां पुरे.

□□□

स्फुट लेख

ठळक टिळक-वाद

बेळगांव शेजारीच एक नवीन वसाहत झालेली आहे. तेथें सुखवस्तु व श्रीमंत लोकांनीं आपले बंगले बांधले असल्यामुळें त्या वसाहतीला ठळकवाडी असें नांव पडलें. परंतु गांवोगांव खेडोपाडीं वाटेल त्या ओसाड मैदानाला गांधी मैदान, टिळक चौक अशीं नावें देणारे जे कांहीं पांढरटोपे पसरलेले आहेत, त्यांच्या बेळगांवच्या सांप्रदायिकांनीं आपल्या तोंडच्या अधिकारांत या ठळकवाडीला टिळकवाडी म्हणण्याची सुरुवात केली. मध्यंतरीं बेळगांव म्युनिसिपालिटीनें एकमतानें या वसाहतीला शिवनगर असें नांव दिल्याचा ठराव पसार केल्याचें समजतें. पण आमचे पांढरटोपे देशभक्त या ठरावाला थोडेच भीक घालणार? खादीच्या पवित्र प्रभावर ब्रिटिशांची राज्यसत्ता उलथून पाडण्याचीच ज्यांची भीष्मप्रतिज्ञा, त्यांना म्युनिसिपालिटीची काय पर्वा? आणि लोकमताची तरी काय एवढी दिक्कत? टाळक्यावर पांढरी टोपी चढली कीं सर्व कर्तृत्वाचा अधिकार (हातांत नाहीं तरी) जिभेंत आलाच, अशी ज्यांची परंपरागत समजूत, त्यांच्या टाळक्यांत ठळकवाडीला टिळकवाडी बनविण्याचें वेड शिरलें नसतें तर आश्चर्य ! हा ठळक - टिळक वाद नुकतांच बेळगांवच्या लोकपक्ष नामक साप्ताहिकानें सुरू केला आहे. लोकपक्ष हें वर्तमानपत्राचें नुसतें नांव आहे. बेळगांवच्या, बेळगांव जिल्ह्याच्या किंवा महाराष्ट्राच्या, लोकांचीं मतें किंवा त्यांच्या खऱ्याखुऱ्या आकांक्षा या पत्रांत व्यक्त होतात, किंवा त्याला जनतेच्या वाजवी प्रतिनिधित्वाचा पाठिंबा आहे, असें समजण्याचें कारण नाहीं. हें पत्र महात्मा गांधींच्या विशिष्ट मतांचें प्रसारक म्हणवितें. खादी चरका हीं त्याचीं ट्रेडमार्क चिन्हें आहेत. याचें संपादक प्रस्तुत वादाची सारवण करतांना म्हणतात कीं टिळकांच्या सत्तेचें बेळगांवास विशेष असें काहींच नसलें तरी ते एक राष्ट्रपुरुष होते आणि त्यांचें स्मारक नुसत्या एका वेलांटीनेंच जर आयतें होत आहे, तर कां न करावें ! अवश्य करावें. कल्पनेची गोलांटी एका क्षुद्र वेलांटीनें जर आयत्या स्मारकांत फळत असेल तर त्याचा फायदा कां न व्हावा ! स्मारकाची ही कल्पना मोठी टाळकेबाज खरी ! या पेक्षां आमची अशी सूचना आहे कीं टाळू टाळकें टाळें टोळ हे शब्दच शब्दकोशांतून नष्ट करून त्यांच्या जागीं टिळक हा एकच शब्द ठेवला तर टिळकांचें स्मारक व्यक्तिमात्राच्या टाळक्यावर उभारल्या सारखें होईल. शिवाय मराठी भाषेंतहि नवीन प्रघात सुरू होतील. उदाहरणार्थ, 'मुलाची टाळु सुजली' या ऐवजीं मुलाची टिळकी

सुजली. 'तुझें टाळकें फोडीन'च्या ऐवजीं 'तुझा टिळक फोडीन', 'घराला टाळें लाव'च्या ऐवजीं 'घराला टिळक लाव.' 'गांवांत टोळधाड आली'च्या ऐवजीं 'गांवांत टिळकधाड आली.' ही स्मारक योजना बिनखर्चाची व विश्वस्पर्शी टिळकांच्या टाळकऱ्यांनीं अवश्यक अंमलात आणून, आपल्या मनीचें कोड पुरवून घेतल्यास, गुलाम मनाचें व्यक्तीमहात्म्य किती घाणेरड्या स्थितीप्रत येऊन पोहचतें हें तरी जगाला दिसेल.

□□□

लेख

शंभर वर्षांपूर्वींचें महाराष्ट्र
(उपोद्घात पुढें चालूं)

प्रथमारंभीं सांगितलेल्या क्रांतिचक्राच्या थरथराटानें सर्व जगाप्रमाणेंच महाराष्ट्रांतहि स्वराज्याच्या कल्पनेचा प्रादुर्भाव झाला आहे. स्वराज्य हा विषय महाराष्ट्राला कांहीं नवीन नाहीं. साऱ्या हिंदुस्थान देशाला हिंदी स्वराज्याची धमक कशी काय असते, हें अलीकडच्या काळांत कोणी दाखविलें असेल तर तें एकट्या महाराष्ट्रानेंच. कलीयुगांत (म्हणजे भिक्षुकांच्या वर्चस्वयुगांत) क्षत्रिय वैश्य बियाण्यासकट ठार झाले, या कलीरूप विप्रांच्या वेदोक्त सूत्राची बत्तिशी फोडण्यासाठीं मावळ्यांसारख्या नांगऱ्यांतून परशुरामाचे बाप निर्माण करून त्यांच्या हस्ते तोरणगडावर स्वराज्याचें तोरण बांधविणाराहि महाराष्ट्रच. अशा स्थितींत हिंदुस्थानांतल्या इतर फेंटाळ पंजाब्यांपेक्षां किंवा बोडक्या बंगाल्यांपेक्षां महाराष्ट्रांत स्वराज्यकल्पनेच्या रोंपड्यानें विशेष जीव धरला पाहिजे होता. पण वस्तुस्थितीं अगदी निराळी आहे. कां? या प्रश्नाचा आजपर्यंत एकाद्या स्वराज्यप्रवचक पुराणिकानें कधिं शांतपणें विचार केला आहे काय?

आज महाराष्ट्र स्वराज्य मुमुक्षु बनला आहे. पण तो स्वराज्योन्मुख झालेला नाहीं. मुमुक्ष्वावस्था निराळी आणि उन्मुखावस्था निराळी. तो स्वराज्याचा प्रणेताच असल्यामुळें स्वराज्योन्मुख होता क्षणींच ताडकन् इतिहासाची पुनरावृत्ति घडवून आणण्यांत तों खात्रीनें अग्रेसरत्व मटकाविल्याशिवाय रहाणार नाहीं. मग घोडें पेंड कोठें खातें? महाराष्ट्र आत्मस्वरूपाला पारखा झाला आहे. त्याचा आत्मविश्वास राज्यक्रांतीच्या कठोर खडकावर अवचित् आदळल्यामुळें पार गहिवरून गेला आहे. मी कोण होतो, सध्यां कोण आहे, या दोन स्थितींचें तुलनात्मक परीक्षण करण्याची त्याची जिज्ञासा बेशुद्ध पडल्यामुळें, पुढें माझें काय होणार या प्रश्नाचें उत्तर काढणें त्याला अशक्य होऊन बसलें आहे. शंभर वर्षांपूर्वीं झालेल्या राज्यक्रांतीच्या दणक्यानें त्याचे विचारचक्र विसकटलें व विकारयंत्र भ्रमिष्ट झालें. आसपास पसरलेंल्या निरनिराळ्या समाजांच्या पूर्वपरंपरेचे धागे एकमेकांत सरमिसळ झाल्यामुळें, हितवादी कोण व हितशत्रू कोण हें चटकन् ओळखण्याची त्याची विवेकशक्ति बुळीबावळी बनली आहे. अशा अवस्थेंत स्वार्थसाधु चाणाक्ष लोक महाराष्ट्रीय जनतेचे हात आपापल्या मतांचे निदर्शक म्हणून खुशाल लांकडी बाहुल्याप्रमाणें वर खालीं खालीं घर हालवून तिच्या अब्रूचे धिंडवडें काढीत आहेत.

साऱ्या जगाला गदगदा हालविणाऱ्या चैतन्य शक्तींनें महाराष्ट्रांत स्वराज्याची मुमुक्षु वृत्ति उत्पन्न केली आहे. सध्यां सर्व जगाचाच प्रवास संक्रमणावस्थेंतून चालला आहे आणि हीच अवस्था मोठी बिकट असते. या अवस्थेंत मानवांची मनोवृत्ति अत्यंत मृदु आणि संस्कारक्षम होत असते. बाह्य परिस्थितीच्या वावटळींचे नानाविध संस्कारांचे परिमाणु या अवधींत आपल्या हृत्पटलावर नकळत येऊन चिकटत असतात आणि बाह्य निरीक्षण व आत्मपरीक्षण या दोन कुंचल्या जर आपण सज्ज ठेवल्या नाहींत, तर त्या बऱ्या वाईट संस्करांचे परिणाम पुढील पुनर्घटनेच्या उषःकालापर्यंत राष्ट्राला भोगल्याशिवाय सुटकाच नसते.

संक्रमण काळच्या प्रवासांत राष्ट्राचा विश्वासु वाटाड्या म्हटला म्हणजे इतिहास हा होय. वेळीं परमेश्वर सुद्धां आपल्या लीलानाटकांत विलक्षण चमत्काराचा ट्रान्सफर सीन घडवून आणण्यासाठीं मायेच्या जोरावर खऱ्याचें खोटें करायला कमी करणार नाहीं; पण इतिहासाच्या दरबारांत असला प्रकार कधींच व्हायचा नाहीं. पांढऱ्यावर काळें उमटतांच इतिहास जन्माला येतों, ही गोष्ट जरी खरी आहे, तरी पांढऱ्याला काळें व काळ्याला गोरे ठरविण्याची नानाफडणीशी इतिहासानें कधींही केलेली नाहीं. येइल त्याला उदरांत आश्रय देणाऱ्या सागराप्रमाणें इतिहास जरी कट्टा सर्वसंग्रही असला, तरी खऱ्या खोट्याचा अखेरचा निर्णय लाऊन घेण्यासाठीं प्रत्यक्ष काळाच्या सर्वविध्वंसक दांतांच्या चाळणींतून स्वतःचें दिव्य करून घेण्यास तो मागेंपुढें पहात नाहीं. एखाद्या कृष्णकृत्याचा पुरावा इंगळीप्रमाणें काळजाचा घास तोडील म्हणून कायद्याच्या शस्त्रानें त्या पुराव्याचा नायनाट करण्याचा मानवी सत्ताधाऱ्यांनीं कितीहि हिय्या केला, तरी त्या पुराव्यानें इतिहासाच्या चरणांला स्पर्श करतांच, इतिहास त्याला 'चिरंजीव भव' असा आशीर्वाद देऊन हृदयाच्या खोल पडद्यांत त्या शरणागताला अभयस्थान देतो आणि योग्य वेळीं त्याला बाहेर काढून मदांध दुनियेच्या छाताडावर थै थै नाचवितो. स्वदेशाभिमानामुळें राष्ट्राच्या वैभवाचा पारा किती वर चढला आणि स्वराज्यद्रोहामुळें त्याची किती डिग्र्या अधोगती झाली, हें बिनचुक सांगणारें थर्मामिटर इतिहास होय. राष्ट्रांत कोणत्या विचारांचें वादळ सुरू आहे आणि त्यांत कोणते उत्पात कोणकोण घडविणार आहेत, याची बिनचुक माहिती देणारें बॅरोमिटर इतिहासच होय. इतिहास हा एक प्रचंड शक्तीचा शोधनप्रकाश-सर्चलाईट आहें. त्याच्या प्रकाशाचें बिंब वर्तमानकाळाच्या तबकडीवरच पूर्ण पडतें असें नव्हे, तर एकीकडे भूतकाळाच्या खोल उदराच्या तळापर्यंत त्याच्या किरणांचीं फेंक जाते, तो दुसरीकडे भविष्यकाळच्या अकल्पनीय गूढ प्रमेयांच्या आंतल्या गांठी कोठें कसकशा दडलेल्या आहेत, याचेंहि दृश्य तो दाखवितो. 'एक्स' किरणामुळें माणसाच्या देहांतला अस्थिमंजर किंवा शरिरांत घुसलेली बंदुकीच्या गोळीसारखी एखादी जड वस्तूच काय ती आपण पाहूं शकतों; परंतु इतिहासाच्या शोधन किरणांमुळें व्यक्तिमात्राच्या अंतःकरणांतील विकारांचे नानाविश्व रंग सुद्धां आपणांस स्पष्ट पहावयास मिळतात. इतिहासासारखा असा जबरदस्त अल्लाउद्दीनचा दिया आपल्यापाशीं असल्यावर विचारक्रांतीच्या वादळांस राष्ट्राच्या दाही दिशा जरी धुंद झाल्या तरी त्या दियाच्या साहायानें आपल्याला खऱ्याखोट्याचा निर्णय तेव्हांच लावणें फारसें कठीण नाहीं. आज महाराष्ट्रांत स्वराज्याच्या चळवळीचें तुफान माजून राहिलें आहे. शिवाय स्वराज्याच्या नांवाखालीं दुसऱ्याहि बऱ्याच भिन्न भिन्न चळवळींचीं वावटळें रात्रंदिवस धामधूम माजवीत आहेत. हें खरें कीं तें खरें? अशी जनतेची कुंचबणा होत आहे. निरक्षरतेमुळें तर गोरगरीबांच्या

मनोवृत्तीची ही कुचंबणा निष्कारण भयंकर ओढाताण करीत आहे. ब्राह्मण आणि क्षत्रियांची तेढ विकोपास जाऊन त्यांच्या आज दुफळ्या पडल्या आहेत. सारांश, जिकडे पहावें तिकडें स्वराज्यप्रवर्तक ब्राह्मणांविरुद्ध लोकमत भयंकर खवळलेलें असतांनाही, ब्राह्मणलोक, शाहूराजानें पेशव्याला दिलेल्या काल्पनिक सनदेप्रमाणें, अखिल जनतेच्या प्रतिनिधित्वाच्या उपटसुंभ अधिकारावर खुशाल स्वराज्याचा धांगडधिंगा घालीत आहेत ! स्वराज्य ब्राह्मणांनाच पाहिजे व ब्राह्मणेतर अफाट जनतेपुढें ब्राह्मण समाज दर्यामे खसखस असल्यामुळें ती मनावर घेईल तर स्वराज्य कांहीं फार दूर नाहीं. स्वराज्य ही एक स्थिती आहे, ती कांहीं आकाशांतून पडत नाहीं किंवा विलायतेहून तिचें पार्सल यावें लागत नाहीं; ती जनतेनेंच निर्माण करावयाची असते. मग या अफाट ब्राह्मणेतर जनतेला कःपदार्थ मानून, त्यांच्या उपटसुंभ प्रतिनिधित्वावर स्वराज्याचा लढा लपविण्याची या अल्पसंख्य ब्राह्मणांना एवढी आतुरता कां? बरें, त्यांत त्यांचा हेतु शुद्ध आहे असें मानावें, तर खुद्द ब्राह्मणांवरच ब्राह्मणेतर जनतेचा पूर्ण अविश्वास! हा अविश्वाससुद्धां काल परवांचा कोंवळा नसून, त्याच्या अडीचशें वर्षांच्या आयुष्यामुळें कठीण राठ बनला आहे आणि ब्राह्मण लोकांच्या वर्तनाचें पृथःकरण केलें तर हा अविश्वास अगदींच अनाठायी नाहीं, हें त्यांच्या वर्तमान वर्तनावरूनहि सहज सिद्ध होण्यासारखें आहे.

□□□

लेख

A Peep into Bombay Presidency Jails

The Directorate of Information, Bombay, has recently issued a neat little Pamphlet on the function and administration of jails in this Presidency. The brochure succinctly summarises the Government case, and as usual provides a much needed corrective to some misimpressions which seem to have gained ground regarding the object of prisons and the uses made thereof. We partially agree with what the author of the publication in question suggests that the sort of criticism which this subject has lately evoked in the press, and on the platform is very often ill-informed and even perverse, and as such, is far from being either helpful or instructive. But while it is admitted that the declared jail policy of the Government of Bombay does not differ in ideal, or aim from the modern theory of what such a policy should be, it cannot be said that in the actual working it leaves nothing to be desired.

Government fully appreciate that the object of a prison in theory is not so much merely to punish as to reform and correct and that it is necessary in practice, while protecting society by withdrawing erring members for a time from it, to minimise the exposure of these "to the depraving influence of prison life." The reclaiming measures said to have been adopted by Government appear to be (1) a classification of convict prisoners into casuals and habituals and as far as possible, a segregation of these classes, (2) the appointment of unofficial gentlemen to visit and lecture prisoners, (3) facilities for quiet, private and unguided prayers to prisoners, (4) training in a variety of handi crafts and keeping the prisoners physically engaged during the better part of the day, (5) a system of remissions for good conduct and good work and (6) assignment to qualified prisoners of controlling duties of graded responsibility. These six ideas so far as they are courteously put into print, appear no doubt very reasonable and could scarcely be called in question. If they would have been practically worked out in all the Presidency Prisons, we believe there had been no whisper of a regular scandal wrought in Jails. May we ask the Director of Information as to what satisfactory reply government gave to the naked exposition: of Yeravada Jail scandals published in Kesari by Mr. J. S. Karandikar? Can he either prove false the statements publicly made by Mr. Govindji Vasanji in respect of Visapur Hell (it can scarcely be called a jail) by citing chapter and verse of reliable

evidence, or call upon him to answer why he blackmailed the saintly government on a groundless basis? There is every likelyhood of misimpressions unconsciously creeping into the press, but we are not prepared to admit that the Presidency Press, has altogether gone mad to give publicity to unfounded theories and false accusations against a system of Jail administration through whose furnace not a single soul is found returning worthy of the civic life of the society. Once a jail-bird, always a jail-bird, is the only evidence, we see in broad day light. If the jail returned political prisoners, especially those of the lower grade, are examined, one can at once detect a development of mental depravation and an undying wild spirit of "kuch pur * nahism" in them. Why so?

To return to the brochure itself. We pre fer to confine our remarks to duly two items" named above, viz. (1) and (2). The object of measure (1) is obviously to minimise the chances of younger and comparatively less experienced criminals getting worse by contamination with the more habitual and hardened type. But to be really effective in practice, the basis for classification cannot afford to be so broad and blunt as the mere age of the prisoner, or the mere technical record of previous convictions against him. A surer test ought to be discovered to measure the real moral depravity of each prisoner before he is given up as irreclaimable.

The existing two classes of prisoners, therefore, are not afficient, Morn must be fixed to answer scientically classified niceties of moral degradation among criminals, the aim being that as far as practicable, the prisoners do not return from the jail worse members of Society than they entered, even though they did not happen to become positively better. We are quite conscious of the fact that to carry out this suggestion in all its implications is essentially a question of finance. But at the same time there is no getting round the principle that in all palicies of the State what must be aimed at is perfection.

Measure (2) carries with it possibilities of no end of unmived good, provided the selections and appointments are made with an eye to real remits, while it is worse than useless and valueless if these are made in a haphazard, nominal or per functory manner. The aptitude usually shown in matters of this kind by the Salvation Army is wonderful, and if the Jail Administration could make arrangements to utilise the services of expert agencies of that class, it would not be futile to expect some fruit from a system of moral instructions to prisoners in Jails. This measure in short requires an nderstanding sympathy and a careful prethought, if it is really going to give us anything like the desired results.

Any review of an upto date brochure on Jails would be incomplete, indeed, without a reference to the clain popularly set up for a special sympathetic and "human" treatment for what are known as "political prisoners." Political prisoners is not quite a new commodity of the modern age, nor is it the only privilege of India to own them. Political Prisoners, of course we refer only to those who suffer imprisonment for their patriotism and genuine principles of political salvation of their country, are the true Makers of History, We would fain name them as Martyrs of their Conscience. If we take even a bird's eye view of the history of the world, we shall at once find a hoard of men and women suffering punishment at the hands of those in power, not for any worst

---

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द लागत नाही.

criminality but their efforts to speak out or write out what they thought. It is not further the sole agency of the political field to bring up political offenders. Theology, socialism, and many other fields stand condemned for having spilt the blood of millions of martyrs who dared to oppose the current convictions and beliefs and desired a change in human life topsy turvi. In short, these political prisoners are sent to jail simply for their particular trend of view which, in the constitutional opinion of the powers that be, seriously conflicts with the method and manner in which the Jugannath Car of Indian administration is dragged by the heaven-sent burocrats. It is quite natural therefore to expect the jail administrators of the 20th century to give such martyrs quite a different sort of prison treatment than what is heretofore reported to have been meted out. It is very reassuring to find that Government have taken the hint seriously and are honestly trying to make jailed prisoners of this class feel as easy and comfortable as a man found guilty on trial of an offence against the laws of the land and imprisoned, has a right to expect to be made.

On the whole progressive responsiveness to informed public opinion seems to be the predominant characteristin of prison management in this Presidency. Any constructive criticism of the prison policy of the Bombay or any other government ought to proceed on a double consideration. While on the one hand an ideal prison ought to be a moral reformatory for those who are capable of reform and a detention house in the wider interests of the community in respect of those who are past reformation, and must regard the first class of prisoners with hope and the second with humanity, it ought on the other hand to take count of the fundamental principles of penology that the conveniences, facilities, amenities and of p comforts of prison life must be so devised as not to enable that sort of life to exercise any fascination on the unfortunate sojourners of that type of place. Secondly a criticism of the kind contemplated must show itself alive to the fact that the prison department has absolutely nothing to do with the why and where fore of a particular individual being handed to it. It is the judiciary and the imagistracy who are answerable for the propriety of imprisoning him. The responsibility of the Jails Department begins only after that of the Courts ends, so that the former is answerable only for the proper treatment of those who are handed to it by the latter. If all critics jails took care never to allow these principles to escape their mind, it would clear the air of a good deal of misunderstanding on the subject and they would succeed in steering clear of even unconsciously doing an injustice to a department charged with too heavy a burden of unnatural and painful dutier already.

□□□

लेख

Of Local Interest Only

Taxy Traffic Scandal :- The taxy motor service plying between Satara City and Satara Road station is becoming a nuisance to respectable passengers. The chauffeurs behave in such a rude and indifferent manner with the passengers that it becomes an ordeal for respectable gentlemen and ladies to suffer the little journey of ten miles, getting themselves packed up hard and tight like parcels amidst heap of passengers which the King of the Car picks up here and there without the least cognizance of the inconveniences caused to those already seated. A car accommodating barely three on the back side and two on the front, is almost always seen packed up with not less than ten passengers huddled together with their luggage. Protests have no effect. Threats are useless, since the brainy chauffeurs know fall well that the passengers shall not bother themselves with indulging in placing the fellow before a magistrate, but would walk staight oll to their business when down at either end. In the case of recovering the hire charges, the passengers are unnecessarily troubled. There are agents at both ends. They settle the charges. But the chauffeurs recover whatever they desire and heap abuses on the passengers if they hesitate or refuse. For one seat, some time back, we ourselves have paid Rs 2-8-0 instead of Rupee One agreed upon by the Satara Road Agent. It was only on the 6th instant, that we were forced to pay Rs. 2-8-o for two seats, in the face of a printed bill chit showing "2 seats, I Rupee only", granted to us by Satara City agent named Havaldar of Car No. 5450. The uncivil conduct of the chauffeur and the filthy abuses heaped on us by the Bohra proprietor of this car quite without any reason for provocation, are sufficient to prove the general nature of the treatment which passengers usually receive during their trips by taxies. We urge upon the Satara Police Department and those concerned in controlling this traffic, to take immediately such measures as to safeguard the rights and prestige of passengers and not to turn a deaf ear to the mischiefs of these Taxiwallas simply because no complaints properly reach their office tables. The constables of intermediate villages and the Dasturi clerks should also be instructed to inspect the number of passengers in every car passing from before them. This would check the "devil's dance" to some extent, we believe.

MR. W. B. MANLEY

The upright and polite District Superintendent of Police, Satara, left his charge of duties and went Home on a leave of a year and a balf. He was a wonderful student of all the various movements which echo this hilly district, and possessed a correct record of all the parties concerned therein. In the recent outbreak of plague he lost his beloved wfie, and since then he lived a life of almost a pessimist. En route Bombay he called us for an interview and discussed several problems of Hindu Social regeneration quite freely. He congratulated our friend Mr. Bhaurao Patil for his selfless endeavours in enlivening this barren wasteland of Padli with a big industrial concern known as Satara Industrial Works, and in cropping up several educational schools among the villages. "You are a true Satyashodhak, Mr. Bhaurao," he said while shaking his hand. "You will surely earn the credit of ameliorating the present ills of the masses. May God give you success." Mr. Manley keenly regretted the disorganization in the Non-Brahmin camp and told us to convey to the leaders his message in the following words. "Pull cach other near and pull together and pull with all your might." We wish a bon voyage to our friend Mr. Manley and his beloved kiddies.

□□□

अग्रलेख

खिलाफतीची खिरापत

शिमगा म्हटला कीं धर्मवेड्या हिंदूंच्या फाल्गुनी लीलांचा महिमा जसा न सांगतां कोणालाहि पटतो, तसा खिलाफत हा शब्द उच्चारतांच हिन्दी मुसलमानांच्या धर्मवेड्या आकांडतांडवाचें चित्र आतां वर्णन न करतांहि वाटेल त्याला पटण्या इतकें गरमागरम ताजें आहें. महायुद्ध सुरू होऊन त्यांत तुर्कस्थानचे त्रांगडें निर्माण होण्यापूर्वीं हिन्दी मुसलमानांना खिलाफत ही चीज काय आहे हें माहीत सुद्धां नव्हतें, असें कोणी म्हणतांच त्यावर खिलाफतवाल्यांचा केवढा रोष ! खिलाफतीच्या नांवाखालीं गुलाम हिन्दी मुसलमानांनीं स्वतंत्र तुर्कस्थानच्या धार्मिक इभ्रतीसाठीं केवढा धुमाकूळ घातला, खलिफाच्या प्रतिष्ठेसाठीं जान देण्यास ते कसे उतावीळ झाले आणि जात्या हिंदी असूनहि हिन्दी स्वराज्याच्या प्रश्नाला माजी टाकून आपलेंच खिलाफती ढोलकें तें कसे बडवीत बसले, या गोष्टी कांहीं जुन्या पुराण्या इतिहासाच्या नाहींत. अगदीं चालूं घटकेच्या आहेत. विशेषतः महात्मा गांधीनींच खिलाफतीचा चरका आपल्या गळ्यांत बळेंच अडकविल्यामुळें, हिंदूंना हरएक प्रकारच्या चळवळींत जी पिछेहाट, मानखंडना आणि आत्मवंचनेचे क्लेश भोगावे लागले, त्याच्या तिडका अझून वरमल्या सुद्धां नाहींत. स्वदेशी चळवळीच्या नांवाखालीं जसें आजपर्यंत वाटेल तें खपलें, तद्वतच खिलाफतीच्या नांवाखालीं हिंदी मुसलमानांनीं वाटेल तें पिकविलें आणि हवें तसें विकलें. धर्मवेडे किंवा धर्ममाथेफिरू लोक जगाच्या पाठीवर कितीहि असले, आणि स्वतंत्र इस्लामी राष्ट्रांनीं धर्मवेडाच्या लहरींत अखिल मानवजातीवर कितीहि अत्याचार केलेले असले, तरी तुर्की प्रश्नांच्या निमित्तानें, ऐन स्वराज्यप्राप्तींच्या हंगामांत, खिलाफतीच्या नांवाखालीं हिन्दी गुलाम मुसलमानांनीं केलेल्या धर्मप्रेमाच्या (?) उचापती म्हणजे इतिहासाची शोचनीय पुनरावृत्तीच म्हटलें तरी चालेल. एकटें नुसतें मोपल्यांचें बण्डच घेतलें तरी ही पुनरावृत्ति किती आसुरी वृत्तीची होती हें दिसून येईल. या वृत्तीचा सप्रमाण परामर्ष याच कलमानें संस्कृतीचा संग्राम या ग्रंथांत घेतलेला असल्यामुळें, येथें अधिक लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. हिन्दु मुसलमानांना खिलाफतीचें दाट प्रेम इतकें अचानक व इतकें विलक्षण आलें कीं, त्यांनीं तत्प्रीत्यर्थ ठिकठिकाणीं केलेले दंगे व प्राणहत्या यांचा चित्रपट स्मृतिदीपाच्या सहायानें मनःपटलावर सहज चाळविला तरी हृदय गोठूं लागतें. त्यांनीं खिलाफतीला एवढें अकल्पनीय महत्व दिलें कीं त्यापुढें

स्वराज्यविषयक चळवळी व तत्पोषक राष्ट्रीय ऐक्य म्हणजे त्यांना कःपदार्थ वाटूं लागला. इतक्यांत मुस्तफा केमाल पाशानें आपल्या तलवारीची कमाल करून युरपचा हमाल बनूं पहात असलेल्या तुर्कस्थानला राष्ट्रीय अधःपाताच्या गर्तेतून वर खेचून काढलें. युरपियन राष्ट्रांखेरीज जगांतल्या सर्व राष्ट्रांना आनंद झाला. केमाल पाशानें कमाल केली, केमाल पाशाची धन्य असो, असे धन्यवाद सर्वत्र ऐकूं येऊं लागले. अनेक हिन्दी प्रातिनिधिक संस्थांनीं तुर्कस्थानच्या या अभिनव धडाडीचें आणि अननुभूत प्रबोधनाचें मनःपूर्वक अभिनंदन केलें. परंतु केमाल पाशाच्या या विजयाने आमचा हिन्दी मुसलमानभाई इतका बेभान बेफाम भडकला कीं त्याला हिन्दु म्हणजे किस चिडियाका नाम असें वाटू लागलें. धर्मकारणाच्या सबबीवर राजकारणांत आणि समाजकारणांतहि मुसलमानांनीं हिंदूंचा हरएक ठिकाणीं प्राणघातक पाणउतारा करण्याचें सत्र सुरू केलें. हिन्दु आणि मुसलमान हे दोन तट पुन्हा नव्याने पाडले. आमचा आपला सवता सुभा, आम्हाला काय या गचाळ हिंदूंशीं करायचें आहे? या क्षुद्र भावनेनें त्यांचे डोळे इतके उरफाटले कीं हिन्दूंप्रमाणेंच आपणहि ब्रिटिश सत्तेच्या पायांतलीं गुलाम पायतणें आहोंत, याची त्यांना दादच राहिली नाहीं. हिन्दूंच्या कपाळाला कपाळ घासून आपल्या नशिबाला उजाळा चढत नाहीं, म्हणून अवचट होतीं आलेल्या खिलाफतीच्या धांदोटीचें त्यांनीं इतकं थोतांड माजविलें कीं खिलाफत श्रेष्ठ कीं अल्ला श्रेष्ठ या प्रश्नावर मजल येऊन बितली. खिलाफत म्हणजे हिन्दी मुसलमानांचा प्राण. जगायचें खिलाफतीसाठीं आणि मरायचेंच तर तेंहि खिलाफतीसाठीं. खलीफाच्या दाढीच्या केसाची तर गोष्टच राहूं द्या, त्याच्या नुसत्या इभ्रतीवर कोणी वांकडी नजर टाकील तर त्याचे डोळे खोदून काढण्यास हिन्दी मुसलमान ऐकापेक्षां एक वरचढ आग्यावेताळ बनले होते. शेंदूर फासलेल्या दगडापुढें टाळकीं झिजविणाऱ्या धर्मभोळ्या हिंदूंना हासणाऱ्या या आमच्या (पूर्वाश्रमीच्या खास हिन्दू) मुसलमानभाईनीं लाखों रुपयांचा फंड तुर्कस्थानला पाठवून खलीफाचा प्रसाद म्हणून मोबदल्यात मिळविलेल्या पवित्र सतरंजीचे माजविलेले थेर सर्वांच्या पूर्ण स्मरणांत आहेतच. खलीफाच्या जीवासाठीं आपल्या जिवाचें रान करणाऱ्या खिलाफत कमेट्या हिंदुस्थानांत आज खेडोपाडीं अवतरलेल्या आहेत. केमाल पाशाच्या अस्सल लोकशाही स्पिरीटची यत्किंचितहि जाणीव नसलेल्या या भोळसट परंतु माथेफिरू खिलाफतिष्ठांना केमाल पाशानें खिलाफतीचा मुर्दा पाडला ही बातमी वाचून किंवा ऐकून, आपण आतां जगावें की मरावें, हा मोठा बिकट प्रश्न येऊन पडला असेल. खलीफाच जेथें रसातळाला गेला, तेथें आतां खिलाफत, खिलाफत कमेट्या आणि खिलाफतवाले यांची किंमत काय? देवच गेला कीं देव्हारा म्हणजे शिमग्याच्या होळीची धग ! आतां, एक विठोबाची किंवा मारुतीची मूर्ती चोरीला गेली म्हणून दुसरी आणून बसविणारे बडवे रगड असतात; किंवा ब्राह्मण जगद्गुरूच्या ऐवजीं क्षात्र जगद्गुरूचे बाहुलें उबविणारें महामर्द मुबलक आढळतात; तद्वत एकाच्या ऐवजीं दहा ठिकाणी दहा खलिफा निर्माण करणारे जीर्णमताभिमानी अवलिये पुष्कळ पुढें येतील. पण आतां बुंदसे गई फिर हौदसे नहि आती.

जपान राष्ट्राप्रमाणेच तुर्कस्थानचं प्रबोधन हा एक अर्वाचीन काळांतला वर्णनीय चमत्कार होऊं पहात आहे. खास धर्मवेड्या मुसलमानांची केमाल पाशाविषयीं काय वाटेल ती भली बुरी समजूत असली, तरी प्रचलीत जगाच्या विचारक्रांतीच्या नाडीचे ठोके अजमावणाऱ्यांना अखेर हाच सिद्धांत काढावा लागेल कीं केमाल पाशा म्हणजे ज्वलज्जहाल अस्सल लोकशाहीचें प्रतिकच होय. लोकशाहीची प्राणप्रतिष्ठा

करण्याचें प्रतिज्ञाकंकण मनगटावर चढविणाऱ्या वीराला प्रथम भिक्षुकशाही व जगद्‌गुरूशाहीचाच मुर्दा पाडावा लागतो. गुलामगिरीचा मूळ उगम येथेंच होतो आणि पुढें त्याचा ओघ बळावण्याला राजेशाही सरदारशाही श्रीमंतशाही वगैरे शाह्या प्रामुख्यानें सहायभूत होत असतात. मनुष्याचें मन गुलाम बनविण्याचें काम या अनेक शाह्यांनीं पूर्ण केलें कीं त्यांत मग व्यक्तिमाहात्म्याचे किडे पडण्याला सुरुवात होते. किडेच पडले कीं पुढें काय राहिलें? मग त्या देशावर समाजावर वा व्यक्तीवर वाटेल त्या टारगटानें खुशाल आपल्या सत्तेचा वरवंटा फिरवीत बसावें. तुर्कस्थानानें असल्या नरकवत् किड्यांनीं बुजबुजलेल्या स्थितींत राहूं नये, त्यानें मर्दाप्रमाणें जगावें, जगून अवघ्यास जगवावें, अस्सल लोकशाहीचे प्रणेते व्हावें, या उच्चतम महत्वाकांक्षेनें प्रेरीत झालेल्या मुस्तफा केमाल पाशानें तुर्कस्थानच्या पुनर्घटनेसाठीं जे जे प्रयत्न चालविले आहेत, त्यांकडे आत्मोद्धारार्थ धडपडणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें, प्रत्येक समाजानं, प्रत्येक राष्ट्रानें अहर्निष लक्ष देणें अत्यावश्यकच आहे. रणांगणावर तलवारीच्या धमकीवर इंग्रज दोस्त ॲन्ड को.च्या सैन्याला नेस्तनाबूद करून अभिनव तुर्कस्थानची कोणशिळा बसवितांनाच अक्कलबहाद्दर केमालनें पहिल्या धडाक्यालाच सुलतानशाहीला कोणशिळेच्या पायांत जिवंत गाडली आणि आपल्या नेपोलियनी धडाडीनें बोल बोलतां त्यावर स्वतंत्र मतवादी लोकसत्तेचा भव्य आणि टोलेजंग प्रासाद उभारून दिला. वंशपरंपरागत नृपशाहीचा गुलामगिरीप्रवर्तक कांटा मुस्तफा केमालनें जरी उखडून टाकला, तरी लोकशाहीच्या अमृतांत विष कालविणारी जगद्‌गुरूशाही व भिक्षुकशाही गेल्या ५ मार्च १९२४ पर्यंत जिवंतच होती. लोकशाहीच्या प्रभाकरानें - केमाल पाशानें - हा प्रश्न झटपट हातीं घेऊन, खलीफ जगद्‌गुरूच्या आमूलाग्र उच्चाटनाचा प्रश्न ता. २ मार्च रोजीं भरलेल्या तुर्की जनसभेच्या खास बैठकीपुढें मांडला. या दिवशीं (१) मिनिस्ट्री ऑफ पायस फौंडेशन म्हणजे पावित्र्याच्या महिम्यावर चरणारी भिक्षुकशाही व (२) थिऑलजीकल स्कूल्स म्हणजे धर्ममतांच्या घटपटादि खटपटीवर जगणारी धर्ममार्तंडशाही यांचें उच्चाटन करण्याचा ठराव सभेपुढें आला. खलीफाच्या खिलाफत-विध्वंसनाच्या बिलांत (१) खलिफाला देखत हुकूम पदच्युतता, (२) खिलाफतीचा नायनाट (३) खलीफाच्या कुटुंबातील यच्चावन् सर्व मंडळींची १० दिवसांत कायमची हद्दपारी, त्यांच्या तुर्की नागरिकत्वाच्या हक्काची व सर्व इस्टेटीची जप्ती, व (४) खलीफाला तीन लाख लीर ठोक रकम देऊन त्याचे राजवाडे लोकसरकारजमा, हीं कलमें मुख्य होतीं. या सभेंत एक दोन जीर्णमतवाद्यांनीं या बिलाला विरोध करण्याचा प्रयत्न केला, परंतु अस्सल लोकशाहीनें थरालेल्या प्रचंड बहुमतानें त्यांना हुश्श हुश्श करून खालीं बसण्यास भाग पाडलें. तुर्कस्थानांतल्या प्रागातिक पक्षानें असा खुलासा प्रसिद्ध केला आहे कीं, ''खिलाफतशाही म्हणजे लोकशाहीवर एक महान संकट आहे, असें आमचें ठाम मत आहे. इतकेंच नव्हे तर या खिलाफत संस्थेला धार्मिक किंवा ऐतिहासिक असा कसलाच समर्थनीय पुरावा नाहीं. म्हणून ही संस्था बुडवूनच टाकली पाहिजे. सध्यांचा खलिफा टाकून त्याच्या जागीं दुसरा कोणीहि नेमण्या वगैरेचा आमचा विचार मुळींच नाहीं आणि या बाबतींत इतर देशांच्या - मग ते मुसलमानी देश असोत वा नसोत - मतांची किंवा अभिप्रायांची आम्ही पर्वा करणार नाही.'' फॉरीन मिनिस्टर जनरल इस्मतपाशा म्हणतात ''खिलाफतीचा विध्वंस झाल्यामुळें आमच्या धर्मांत काहीं एक फरक होणं शक्य नाहीं. काय वाटेल तें होवो, खिलाफतीला रसातळाला नेल्याशिवाय आम्ही मुळींच रहाणार नाहीं. युद्धांत ग्रीक आणि खलिफा यांच्या नरड्यांवर आम्हीं टांच दिली म्हणूनच कॉन्स्टांटीनोपल

आमच्या हातीं राहिलें आहे. इतर देशांतल्या मुसलमानांनी आमच्याशी जी एवढी मोठी सलगी व सहानुभूती दाखविली ती आमच्या मनगटाच्या जोराला पाहून दाखविली; खलिफा आमच्या संग्रही होता म्हणून नव्हे !'' (अंगोरा असेंब्लीत टाळ्यांचा प्रचंड कडकडाट.) तुर्कस्थानचे एक माजी सुप्रसिद्ध अध्यक्ष रूटरच्या बातमीदाराजवळ म्हणाले कीं 'सन १९१९ च्या सुरवातीला जेव्हां जवामर्द मुस्तफा केमाल पाशा एशिया मायनर सोडून निघाला, त्याच वेळी तुर्की धर्माची पुनर्घटना आणि खिलाफतीचें निर्दाळण करण्याचा त्याचा निश्चय स्पष्ट व्यक्त झाला होता. या दोन गोष्टी केल्या नाहींत तर तुर्कस्थानची प्रजासत्ता कदापिहि थरारणार नाहीं असें त्याचे ठाम मत त्याच वेळीं बाहेर पडले होतें.' कधिं कोणाच्या कल्पनेंलाहि शिवली नाहीं, अशी आज घडून आलेली घटना पुष्कळांना आश्चर्यात मग्न करील. पण या परिणामाचें कार्य आज बरेच दिवस घडतच होतें. टर्कोग्रीक युद्धांत माजी सुलतानानें दाखविलेला शिळपटपणा, तरूण तुर्की राजपुत्रांत आणि सरदारशाहींत दिसून आलेला कमकुवतपणा आणि लाजीरवाणी चैनबाजी आणि तुर्की ललनांत शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळें खिलाफतीचें अस्तित्व व तिच्या मार्फत चालणारें कुराणोक्त धर्मशिक्षण म्हणजे खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याची पूर्ण गळचेपी, या सिद्धांताचा स्त्रीवर्गात झालेला प्रसार, या सर्व कारण-समुच्चयाचा परिणाम खिलाफत-विध्वंसनार्थ बाँब गोळ्याप्रमाणें घडून आला.

खिलाफत विध्वंसनाची बिलाची चर्चा तुर्की जनसभेंत चालली असतांनाच एकदम खलिफाच्या वाड्याभोंवतीं, वाड्यांतलीं बहुमोल चीजवस्तू कोठें लांबविली जाऊं नये म्हणून, कडक पहारे बसविण्यांत आले. ठराव पसार होतांच ता. ४ मार्च रोजीं इस्तंबूलच्या वलीला त्या हुकमाची १० दिवसाच्या आंत अंमलबजावणी करण्याचें फर्मान सुटलें. दुपारी दोनच्या सुमारास वली व डैरेक्टर जनरल ऑफ पब्लिक सिक्युरिटी हे पोलिसांची पार्टी घेऊन खलिफाच्या 'डोलमा बागचे' नामक वाड्यावर हजर झाले. तुझा खलिफपणाचा पोषाख चढवून तुझ्या तक्तावर आरूढ हो, असा त्यांनीं खलिफाला हुकूम फर्माविला. करतो काय बिचारा खलीफ ! मानला तर देव नाहींतर धोंडा ! खिलाफतरूपीं भिक्षुकशाहीच्या या बड्या भूताला आजपर्यंत सारी इस्लामी दुनिया कितीतरी टरकून असे. कोल्हापूरचे छत्रपति जसे क्षात्रगुरूच्या भिक्षुकी बुजगावण्यापुढें जाहीर लोटांगणें घालतात, तीच थेट स्थिति ! इस्लामी जगाचा जगद्गुरू. पण करतो काय बिचारा ! लोकशाहीच्या धूम धडाक्यापुढें या पेंढारांची काय किंमत? बसला बिचारा निमूटपणें पोषाख करून खलिफी तक्तावर. नंतर जनसभेचा हुकूम वलीनें त्याला मोठ्यानें वाचून दाखविला आणि 'चल उतर खालीं तक्तावरून आणि ताबडतोब हद्दपार होण्याची तयारी कर' म्हणून हटकलें. अवघ्या एक तासांत खलिफ, त्याच्या दोन बायका व एक पोर यांना सड्यावस्त्रानिशी मोटार मधून बेछूट तुर्कस्थानच्या हद्दीबाहेर चाटलजां येथें नेण्यांत आले. तेथें स्पेशल ट्रेन उभी होती. तींत स्वारीला ढकलून गाडी 'कॉक' करून फुलस्पीड पसार झाली. तक्त आणि राजवाडा सोडतांना खलीफ एकसारखा धाय धाय रडत होता. त्याची मुख्य राणी तर बेशुद्ध पडली व जनानखान्यावरच्या हिजड्यांचा नाइक (चीफ यूनक) तर तीन दिवस अन्न पाण्याला शिवलाहि नाहीं. मोटारींत बसतांना खलिफानें आपल्या परिचारकांचा सद्गदित कंठानें निरोप घेतला. अखेर तो एवढेंच उद्गारला ''देशाच्या हितासाठी झगडणाऱ्यांना अल्ला यश देवो !'' येणें प्रमाणें अभिनव तुर्कीच्या लोकशाही प्रबोधनानें सुलतानशाहीच्या पाठोपाठ जगद्गुरूशाहीच्या बड्या भुताला मोक्ष दिला आणि तुर्कस्थानाला मानसिक

गुलामगिरीच्या जाळ्यांतून मुक्त केलें, याबद्दल तुर्कस्थानांत सर्वत्र मुस्तफा केमाल पाशाचा जयघोष होत आहे. केमाल पाशानें कमाल केली खरी ! भिक्षुक - दास्य - विमोचित अभिनव तुर्कदेशा, अल्ला तुझ्या लाडक्या केमाल पाशाला आणि त्याच्या शिक्षित पत्नीला चिरंजीव करो. त्यांना अखंड सौख्यांत ठेवो ! तुझ्या लोकशाहिची कमान दिवसें दिवस शुक्लेंदुवत् वाढो आणि तुझ्या हातून अखिल आशिया खंडांत अस्सल लोकशाहीचीं दिव्य बीजें पेरण्याचें पुण्य कार्य घडो. भिक्षुकशाहीचें बंड मोडून लोकशाही झेंडा तुर्कस्तानांत फडफडविणाऱ्या केमालकृत अभिनव इस्लाम राष्ट्रधर्माच्या चांदताऱ्याला हा स्वधर्माभिमानी हिंदु प्रबोधनकार मोठ्या कौतुकानें, अत्यंत उमाळ्यानें आणि अदबीनें तीन वेळ लवून मुजरा करीत आहे. तुर्कस्थानच्या लोकशाहीचा विजय असो !

शेंकडों वर्षे इस्लामी समाजांवर मानसिक दास्यांची धोंड ठेवणारी खिलाफतशाही कालाच्या खोल उदरांत गडप झाली. खिलाफतीचें कीर्तन आटोपलें. आतां अखेर लोकशाहीचें स्मरण करून 'हेंचि दान देगा देवा' अशी परमेश्वराची प्रार्थना करावी, लोकशाहीचा सगुण देव मुस्तफा केमाल पाशाला कौतुकाची आरती ओवाळावी आणि चालूं महिन्यांत घडलेल्या या विलक्षण क्रांतीचें तत्व थोडक्यांत सांगून खिलाफतीची खिरापत वाटावी, हेंच बरें.

काळाची करणी कीं करणीचा काळ? काळ कोणतेंहि कृत्य घडऊन आणतो कीं कर्मयोगी आपल्या कर्तबगारीच्या जोरावर काळाचा कान पकडून एखादी अचाट घटना निर्माण करतो? विचारवंतांनीं या प्रश्नाचा नीट विचार करावा. जे परिस्थितीचे गुलाम असतात, ते म्हणतात आपण हालचाल करून काय फायदा? काळ बदलला कीं सर्व काहीं ठाकठीक होईल. पण 'काळ बदलणें' म्हणजे तरी काय? काळ म्हणजे तरी कोण? सगळेंच गाडें काळाच्या मर्जीवर, तर तुम्ही आम्ही माणसें कोण? वाऱ्यावर उडणाऱ्या वावड्या, सैरावैरा पसरलेले दगड धोंडे कीं निर्बुद्ध पशू? परिस्थिति परिस्थिति काळ काळ करीत जर माणसें बसली असती, तर आज दिसतें तें जगाचें रूप मुळींच दिसतें ना. परिस्थिति आमची मालकीण नसून दासी आहे. आमची मान काळाच्या हातांत नसून, काळाची मुंडी आमच्या हातीं आहे. काळाला हवा तसा वांकविणें हा आम्हां माणसांचा जन्मसिद्ध अधिकार आहे व तशी आमची शक्तीहि आहे. काळाला वांकवून नव्हत्याचें होतें करणारे नरवीर आजपर्यंत लक्षावधि झाले व त्यांनीं या दुनियेला नाना प्रकारच्या संस्कारांनी नटवून तिला आजचें सुंदर स्वरूप दिलें; म्हणूनच आपण त्या पुरुषोत्तमांना शककर्ते असें म्हणून स्मरतों. या शककर्त्या सुधारक कर्मयोग्यांच्या चारित्र्यांत कितीहि भिन्नपणा असला, तरी सर्वांच्या प्रयत्नांचा रोंख मानवी दुनियेची उत्क्रान्ति होऊन, प्रत्येक व्यक्तिमात्र वाऱ्याप्रमाणें स्वतंत्र व्हावा, याच बिंदूवर असे. कोणतीहि सुधारणा कधिं काळ करीत नसतो. परिस्थितीहि करीत नसते. सुधारणा घडवून आणणें हा माणसाचाच अधिकार आहे. शककर्ते नारायण आकाशांतून गप्पदिशीं खालीं पडत नाहींत; नरांतूनच नारायण - नव्हे, नराचेच नारायण होतात आणि आपल्या कडव्या निश्चयाच्या सामर्थ्यानें काळाची मुंडी मुरगाळून जनतेच्या स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा करतात.

मुसलमान समाज आज जगद्गुरूच्या जोखडांतून सुटला. हिंदु समाज काय करणार? करड्या निश्चयानें भिक्षुकशाही गुलामगिरीची यंदा होळी करणार कीं जगद्गुरूंची अंडीं उबवीत स्वतःच्या माणुसकीची होळी अखंड धडाडत ठेवणार? मुस्तफा केमाल पाशानें नुसत्या हुंकारासरशी तुर्की

भिक्षुकशाही पार देशोधडीला उधळून लावली. यावरून एवढें तरी सिद्ध झालें कीं या जगद्गुरूंच्या गाद्या रसातळाला नेउन जनतेला स्वयंनिर्णयी बनविण्याचें काम अवघ्या २४ तासांत सहज लीलेनें उरकतां येणें शक्य आहे. मठस्थ बोवाजी, गांवोगाव टिळकधाडीप्रमाणें बोकाळलेले भटभिक्षुक आणि पाद्यपूजा उकळीत भीक मागत फिरणारे ते एकेका मठावरचे पांचपांच जगद्गुरू, या सर्व पेंढारांच्या गुलामगिरींतून मुक्त होण्याचा मार्ग जवानमर्द केमाल पाशानें आज अखिल दुनियेला छातिठोक सिद्ध करून प्रत्यक्ष अमलात आणून दाखविला आहे. काळाच्या करणीवरच ज्यांच्या सुधारणेच्या कल्पनांची वरणी लोंबकळत असेल, त्या परिस्थितीच्या क्षुद्र गुलाम हिंदूंना आमचा सवाल मुळींच नाहीं. ब्रम्हण जगद्गुरूंच्या पादुकांवर टाळकीं घासून घासून भागलेल्या आणि रुचिपालटासाठीं क्षात्रजगद्गुरूच्या बुटांच्या टांचा चघळणाऱ्या भाविकांच्या भाविक मनोवृत्तीलाहि आम्ही सवाल टाकूं इच्छित नाहीं. आमचा सवाल गुलामगिरीला कंटाळलेल्या आणि लोकसत्तेच्या संस्थापनार्थाय देहाची कुरवंडी करण्यास सिद्ध असलेल्या तरूण हिंदुमात्रास आहे. हिंदु समाज सुधारणे प्रीत्यर्थ वेळ पडली तर सामाजिक व धार्मिक क्षेत्रांत बंड करण्यालाहि उद्युक्त असणाऱ्या जिवंत हिंदु तरुणांस आहे. चालूं महिना शिमग्याचा आहे. येत्या २० तारखेला प्रफुल्ल चंद्राला साक्षी ठेऊन, सामाजीक व धार्मिक गुलामगिरीच्या नांवानें अखेरची बोंब मारून, जगद्गुरूशाही आणि भिक्षुकशाही - मग ती ब्राम्हणांची असो, क्षत्रियांची असो, वैश्य शूद्रांची असो किंवा कोणाचीहि असो - यांच्या नाटकी सत्तेची होळी करून स्वयंनिर्णयी व्हा. हीच मुस्तफा केमाल पाशानें केलेल्या अभिनव राष्ट्रधर्माची आरती पुरी करून, त्याच मर्दानें खिलाफतीचा पुराणा नारळ फोडून तयार केलेली खिलाफतीची खिरापत आत्मप्रबोधनार्थ वाचकांच्या हातीं देतों.

जीते रहो मर्द केमाल पाशा !

□□□

पुस्तक परिचय

कलमबहाद्दरांस शेलापागोटें

कैवल्य गुंजारव

कवयित्री श्रीमती लक्ष्मीबाई चितळे. प्रकाशक श्री. चिंतामण त्र्यंबक चितळे, घ. नं. १५१ शनिवारपेठ, पुणें शहर. किं. ६ आणे. काव्यग्रंथ आणि कवयित्रीची समक्ष भेट असा सुयोग या पुस्तकाच्या बाबतींत आल्यामुळें, वाचन व त्यावर मनन होऊन ठरलेले विचार कसे व्यक्त करावे, हा एक मोठा प्रश्न आमच्यापुढें पडला. नुसता अभिप्रायच देऊन मोकळे व्हायचे, तर ''सदर पुस्तकांतील साधनमार्गावरील पत्रें मुमुक्षु जनांस बोधप्रद असून, परमेश्वर वर्णनपर व व्यवहार व वेदांत यांची सांगड घालून दाखविलेली पद्यें, सोप्या चाली प्रेमळ भाव व करुण रसभरित अशीं असल्यामुळें सर्वांना-विशेषतः गुरुभक्तांना-तसेंच लहान मुलामुलींना सुद्धां गातांना मनावर बोध ठसविणारीं आहेत.'' हा श्री. गोविंद अनंत केळकर प्रस्तावनाकारांचा अभिप्राय अक्षरशः खरा आहे, असें म्हणण्यास आम्ही केव्हांही तयार आहों. आधुनीक चाली, सरळ व सुबोध पद्यरचना, रूपकांची अभिनव धाटणी आणि अथेति चमकणारा रसाळपणा या बाबतींत श्री. लक्ष्मीबाईंची ही 'प्रथम कृति' अत्यंत कौतुकास्पद अतएव संग्रहणीय आहे. ठिकठिकाणच्या भजनप्रेमी मंडळींनीं या पुस्तकातलीं गाणीं भजनांत बसविलीं तर भजनरंगाचा पूर्ण आनंद त्यांना अनुभवाला येईल, असें आमचें स्पष्ट मत आहे. आमच्या या कवयित्री भगिनी सुप्रसिद्ध भाजेकर इनामदारांच्या घराण्यांतल्या आहेत. यांना एक लहान मुलगा असून, तरूणपणांतच त्यांच्यावर वैधव्याचा घाला पडला. प्रस्तावनाकार श्री. केळकर म्हणतात 'श्रीमती लक्ष्मीबाई यांनी त्यांचे पति निवर्तल्यानंतर ना प्रपंच ना परमार्थ स्थितींत राहण्यापेक्षां आपल्या देहाची सार्थकता व्हावी अशा अनन्यभावनेनें श्रीगुरू महाराज हणमंतरावजी कोटणीस यांची कीर्तनें ऐकण्याची श्रवणभक्ती सुरू केली व श्रीगुरूकृपा संपादन केली.' या कृपेचें प्रतिबिंब प्रस्तुत काव्यांत उमटलें आहे खास. भगिनी लक्ष्मीबाईंचा व आमचा अवघा पांचच मिनिटें जो भाषणयोग घडून आला, त्यावरून त्यांची विद्वत्ता व विचारसरणीची स्वच्छता पाहून आम्हाला असें वाटूं लागलें कीं इतक्या उन्नत मनाची भरारी केवळ 'आपल्या देहाची सार्थकता' लौकिकी गुरुसेवा व तन्निष्पन्न वैराग्य येथेंच कां कुंठीत व्हावी? हे वैराग्य सुद्धां आम्हाला बरेंच कृत्रिम वाटतें. श्री. लक्ष्मीबाईंच्या कर्तृत्वशक्तीला त्यांच्या दुर्दे

वी वैधव्याचा अटकाव पडल्यामुळें, साध्वी हिंदू महिलेला आजपर्यंत शोधून दिसणारा विराग त्यांनी पत्करला असल्यास नवल नाहीं. पण सघ्यांच्या मनूचा मोक्षधर्म असल्या नैराश्ययुक्त वैराग्याचा नव्हे. आज श्री. लक्ष्मीबाईंच्या धमकीचीं, विद्वत्तेचीं व महत्त्वाकांक्षेचीं भगिनीरत्नें जनसेवेच्या पवित्र मंदिराच्या आंगणांत जेवढीं येतील तेवढी महाराष्ट्राला हवी आहेत. महाराष्ट्राचा 'राम' जनसेवेनेंच प्राप्त होईल. जनसेवा हीच रामसेवा आहे. हा राम वैरागी नव्हे. आशावादी आहे, स्वराज्यवादी आहे. महाराष्ट्राचा भगिनी संघ अक्षरशः अबला आहे. त्यांत चैतऱ्याचा फुंकर घालून, राष्ट्रधर्माला प्रज्वलित करण्यासाठी श्री. लक्ष्मीबाई आपल्या उज्वल बुद्धिमत्तेचा उपयोग करतील, तर त्यांचे पुढचें 'कैवल्य गुंजारव' शिवाजी महाराज, जिजाबाई, तानाजी, बाजीप्रभु, सावित्रीबाई, झांशीकर लक्ष्मीबाई, वगैरे अनंतरूपी नटलेल्या अनंताचें गुणवर्णन करण्यांत अधिक सात्विकतेनें प्रगट होईल, अशी आमची खात्री आहे. ताईसाहेब, देवानें आपल्याला पुष्कळ संपत्ति दिली आहे. आपल्याला उन्नत मनाची व जाज्वल्य स्त्रीधर्माची जहागिर हस्तगत झालेली आहे. हा बळजबरीच्या वैधव्यजन्य वैराग्याचा पडदा दूर झुगारून, स्त्रीवर्गाच्या उन्नतीचा कांहीतरी सार्वजनिक प्रश्न हातीं घेऊन आपल्या 'देहाचें सार्थक' करा, अशी या प्रबोधनाची आपल्याला विनंती आहे.

श्रीमंत रावबहादुर अनंत शिवाजी देसाई टोपीवाले यांचे चरित्र

लेखक श्री. सदाशीव नानाभाई हाटे, एल्सीई, बीएससी. प्रकाशक श्री. रामचंद्र कृष्ण सामंत, गोरेगांव, पोष्ट मालाड, जि. ठाणें. किंमत एक रुपया. प्रकाशकाकडे लिहिजें असतां मराठी ग्रंथसंग्रहालयास मोफत मिळतें. दैव बलवत्तर की कर्म बलवत्तर या ऐदी प्रश्नाला कर्मच बलवत्तर हें सक्रीय उत्तर देऊन, रंकाचा राव बनलेल्या मुंबईच्या सुप्रसिद्ध 'टोपीवाल्या'चें हें चरित्र प्रत्येक निराशावाद्यानें आत्मोद्धारार्थ अवश्य वाचावें.

संन्यासिनी उत्तरा

लेखक श्री. काशीनाथ दादाजी रावत. बनामहाल लेन, गिरगांव, मुंबई. किं. १ रुपया. जातिभेदावरील चर्चेचे हे पंचांकी गद्य नाटक मार्मिक आहे. हिंदुसमाजाच्या पुनर्घटनेच्या प्रचलित मनूंत या शब्दचित्राचें दृश्य देखावे मराठी रंगभूमीवर दाखविण्याचें श्रेय घेण्याची बुद्धि एखाद्या नाटक मंडळीस होईल तर बरें.

जाहिर विनंती अर्ज

'इंदूर संस्थानाधीश श्रीमंत तुकोजीराव महाराज यांचे सेवेसी,' 'अर्जदार श्री. रामकृष्ण दत्तात्रेय पंतपराडकर' यांनी सादर केलेला आहे. व्यवहारी संसारात आमचे परमप्रिय बंधु श्री. पंतपराडकर उर्फ 'पंता' हे अगदीं बुळे किंवा खुळे असले, तरी बुद्धिमत्तेच्या बाबतींत ते एक झाकलें माणिक आहेत. पंतासारखा मनाचा मोकळा मित्र पंतच, असा आमचा गेल्या ६-७ वर्षांचा अनुभव आहे. कोठें काय बोलावें आणि काय नाही, याचा पोंच कमी. आंत एक बाहेर दुसरें, ही पॉलिसीबाजांची पोलिशी पंताच्या गांवीच नाही. राव असो वा रंक असो, मनाला खास पटेल तें स्पष्ट बोलून दाखवायचें, मग कोणाला राग येवो की काय वाटेल तें होवो,, हा पंताचा बाणा. असला सीधा अदमी संघ्यांच्या तेढ्यावाक्या दुनियेंत आणि व्यवहाराच्या पागल त्रांगड्यात पागल ठरल्यास आश्चर्य कसले? मोरोपंताचे समग्र काव्यग्रंथ अस्सल बरहुकूम छापून त्यांचा जीर्णोद्धार करावा, हें काव्यवेड पंताच्या डोक्यांत शिरून त्याप्रमाणें नियोजित १२ व्हॉल्युम्सपैकी ९ व्हॉल्युम्स त्यांनी महाराष्ट्रवाग्देवीच्या चरणीं उत्तम

रीतीनें नटवून अर्पण केल्याचें सर्वश्रुतच आहे. हत्ती जाऊन आतां अवघ्या ३ ग्रंथांचे शेपूट उरलें आहे. त्यांच्या प्रकाशनाखाली पंत राजाश्रयाच्या नादी लागून बडोदे इंदोर गैरे ठिकाणाच्या बंदिस्थ महाराजांचे दरवाजे ठोठावण्यासाठी गेले असतांना, इंदोर मुकामी त्यांच्या मनाची जी कालवाकालव व उलथा पालथ झाली, त्याचें आर्यामिश्रित गद्य चित्र त्यांनी या उत्तम पुस्तकांत फारच रसाळतेनें रेखाटलें आहे. ग्रथित विषयाबद्दल कांहीच अभिप्राय न देतां, आम्ही स्पष्ट म्हणतों की विवेचनांत पंताची लेखणी अशी कांही जादुगिरी नृत्य करीत अखेर पर्यंत गेली आहे कीं पुस्तक हातीं घेतलें तर शेवट होईपर्यंत खाली ठेववतच नाहीं. विशेषतः पंताच्या सहज स्फूर्तीच्या आर्या थेट मोरोपंताच्या लेखणींतूनच बारामतीच्या गणेशमंदिरांत निर्माण झाल्या कीं काय, इतक्या अस्सल 'पंती वळणाच्या' आहेत. कोणीहि भाषाप्रेमी मनुष्यस्वभाव निरीक्षकानें हा 'जाहीर विनंती अर्ज' वाचल्याशिवाय राहू नये, अशी प्रबोधनाची शिफारस आहे. पण पुस्तकावर किंमत नाही. प्रकाशन मुंबईस 'गुरुवार तारीख १४-२-२४'ला झालें. पंत हल्ली किनईस नसतात. तर पुस्तकें मागविणारांनी तीं कोठून मागवावी? याचा पंतानी जाहीर खुलासा करावा. मोरोपंतकाव्य-संग्रहाचा जीर्णोद्धार करणे महाराष्ट्राच्या हातून घडलें नाही तर ती एक बडी नामुष्कीची बात होणार आहें. अखेर पंताना आम्ही ६ वर्षांपूर्वी 'वक्तृत्वशास्त्र' ग्रंथाच्या अर्पणपत्रिकेंत व्यक्त केलेले विचार केवळ स्मरणानें सूचनेदाखल अर्पण करतों, त्याचा त्यांनी विचार करावा.

- आर्या -

अगणित भारतिं असती उदार श्रीमंत ते महाराजे।
परि ते स्पष्टचि बसले लाउनिया घट्ट सर्व दरवाजे।।
दर्शन किंचित घडतें करितां अवलंब वाममार्गाचा।
हा अनुभव बहुतांचा बहु दिवसाचा नसे असत्याचा ।।
कपटी सेवक त्यांचे धरिती रोंखून सर्वही वाटा ।
घाटावा विस्मय नच, राजाश्रय-पंथ मार्ग तो खोटा ।।

अलार्म बेल अर्थात् भयनो घंट

एक करोड हिंदुओने मुसलमान बनाववानी तरकीबोनी विवरण. प्रकाशक हिंदु महासभा, वडोदरा (बडोदे) किंमत अवघी १ आणा. हा उपयुक्त व जिव्हाळ्याच्या विषयावरील गुजराथी ग्रंथ विस्तृत विवेचनार्थ भेटीस आला आहे. विषय फार महत्त्वाचा. प्रबोधनाच्या अत्यंत आवडीचा. पण दुर्दैव! सारा जन्म मुंबईस गेला, पण गुजराथी भाषा आम्हांला मुळीच येत नाहीं व समजतहि नाहीं. कोणी तरी या ग्रंथाचे मराठी भाषांतर करून छापल्यास महाराष्ट्रावर फार उपकार होतील.

पंढरपुरावर स्वारी

(श्री चोखामेळा महाराजांची). लेखक श्री. हरीभाऊ तोरणे (महार), प्रस्तावना- लेखक, अस्सल सत्यसमाजिस्ट व जलसेवाले श्री. सोनूपंत कुळकर्णी (ब्राह्मण). प्रकाशक मेडदकर बंधु. मिळण्याचा पत्ताः- हरिभाऊ तोरणे, मु. अकलूज, जि. सोलापूर. किंमत अवघी चार आणे. यांत महान् भगवद्भक्त श्रीचोखामेळा यांचे चरित्र अनेक ग्रंथांतील उत्कृष्ट उताऱ्यांनी प्रामाणिक प्रामाणिकपणें रेखाटलें आहे. ब्राह्मण-ब्राह्मणेतर व स्पृश्याऽस्पृश्य भेदाचे खरे मूळ कशांत आहे, याचा या पुस्तकाच्या वाचनानें खुलासा होईल. विवेचनशैली उत्तम आहे.

बाहुलीचें लग्न, मांहासार, काव्यतुषार, वेणूनाद, काव्यविचार, हिंदु विधवांचा धर्म, अस्पृश्योद्धारकविचार, या ग्रंथांच्या कलम बहाद्दरांचा सत्कार पुढील अंकीं.

संपादक प्रबोधन

□□□

लेख

१०० वर्षांपूर्वींचे महाराष्ट्र

(उपोद्धात पुढे चालूं)

महाराष्ट्रांत सध्यां जो भिन्न मतमतांतराचा धुडगुस आणि परस्परविरोधी चळवळींचा सांवळागोंधळ माजला आहे, त्याचें शांतपणें निरीक्षण केलें तर 'देहली तो बहोत दूर है' हा आमच्या हितशत्रूंचा टोमणा त्यांच्या उन्मत्त प्रवृत्तीचा द्योतक असला तरी आमच्या वस्तुस्थितीशीं समर्पक नाहीं, असें कदापिहि म्हणतां यावयाचें नाहीं. एकटें नुसतें राजकीय क्षेत्र घेतलें तरी त्यांतसुद्धां प्रामाणिक मतभेदांचें पर्यवसान प्राणांन्तिक हाडवैरांत होऊन बसलें आहे. त्यांतहि पुन्हा हिन्दी राष्ट्रीय सभेसारख्या मूठभर शिक्षित जनमत निदर्शक संस्थेंत म. गांधींच्या एककल्ली हेकेखोरपणाचा शिरकाव शिरजोर झाल्यामुळें तर या संस्थेच्या प्रातिनिधिक पावित्र्याचें आज सर्वस्वीं वाटोळें झालेलें आहे. राष्ट्रीय सभा खरें पाहिलें तर बहुजनसमाजमतनिदर्शक केव्हाहि नव्हती व आजहि नाहीं. राजकारणांत पुढारलेल्या अत्यल्पसंख्य स्वयंशिष्ट शिक्षित मंडळींच्या जहाल मवाळ मतांचा सुस्कारा टाकणारी ती एक संस्था आहे. शिवाय हिला सामाजिक व धार्मिक विषयांचें वावडें असल्यामुळें, देशाच्या सर्वांगीण उन्नतीचें प्रबोधन करण्याची हिची नालायकी जगप्रसिद्ध आहे. केवळ एकांगी राजकीय उन्नतीवरच देशाचा मोक्ष आहे, या कल्पनेवर राष्ट्रीय सभेचा सर्व कारभार चालल्यामुळें तिच्या तीन तपांच्या खटपटीचें पर्यवसान निवळ बोलघेवडेपणांत झालें व देशाच्या अवनतीला व स्वातंत्र्यनाशाला कारण झालेल्या ठळकठळक दोषांकडे दुर्लक्ष झाल्यामुळें, आज सर्व देशांत सामाजीक व धार्मिक अन्यायांविरुद्ध बण्ड होण्याची कडेकोट तयारी झालेली आहे. दक्षिण हिन्दुस्थानांत ब्राम्हण-ब्राम्हणेतरांचा लढा उत्पन्न होण्याचीं कारणें राष्ट्रीय सभेच्या एकांगी चळवळीनें तर आजला विशेष व्यक्त झालीं आहेत आणि नुसत्या राजकारणी लेखनवक्तृत्वावर आपल्या देशाभिमानाचे शामभट्टी तट्टू नाचविणाऱ्यांना सुद्धां आतां या बण्डाच्या कारणपरंपरेपुढें मुठींत नाक धरून लोळपाटणी मारण्याचा प्रसंग येऊन बितला आहे. समाजसुधारणेच्छु नवमतवाद्यांच्या गेल्या पाऊणशे वर्षांच्या निष्काम कर्मयोगाला आज फळें लागलीं आहेत आणि ब्राम्हणांनीं स्वार्थासाठीं ब्राम्हणेतरांचा केलेला सर्वांगीण अधःपात आज अफाट ब्राम्हणेतर दुनियेला पटल्यामुळें, त्यांच्यांत आत्मोद्धाराचें नवचैतन्य आज बेसुमार सणाणूं लागलें आहे. परकीय गुलामगिरीचा राजकारणी वरवंटा अभेद भावानें आसेतुहिमाचल यच्चावत् हिन्दी जनतेवर फिरत आहे

व त्याच्या प्रतिकारार्थ राष्ट्रीय सभेचे शाब्दिक निषेधाचें एकांगी कार्य चालूं असतांनाच, अल्पसंख्य शिक्षित ब्राम्हणांच्या विरुद्ध अफाट व बहुसंख्य अशिक्षित ब्राम्हणेतर जनतेनें बंडाचा कर्णा बेछुट कां फुंकला आहे, याचा विचार अझून करावा तसा कोणी करूं लागला नाहीं. हा विचार कोणाला सुचो वा न सुचो, आज ब्राम्हणेतर संघ व्यवस्थित घटनेवर प्रतिकाराची तोफखानी बॅटरी रोखून युद्धासाठीं जय्यत उभा आहे व त्याची पहिली आव्हानाची सलामीहि झडली आहे. ब्राम्हणेतरांच्या अद्‌भुत प्रबोधनामुळें ज्यांच्या वर्चस्वाला आज बिनचूक शह लागला आहे, ते ब्राम्हण लोक, आपल्या हातीं असलेल्या वर्तमानपत्रांच्या शक्तीच्या सहायानें, ब्राम्हणेतरांची चळवळ स्वराज्यद्रोही व राष्ट्र घातकी ठरविण्यासाठीं प्रत्यहीं आपली जान जान पछाडीत आहेत. नाना प्रकारचीं कृष्ण कारस्थानें करून, ब्राम्हणेतर संघात घरभेद पाडण्यासाठीं बुद्धिभ्रंशाचे गुप्त हापटबार उडवीत आहेत. या नवचैतन्याची भ्रूणहत्या करण्यासाठीं ब्राम्हणांनीं प्रथम प्रथम इंग्रज सरकारचे कान भारण्याचाहि यत्न केला आणि आमची खात्री आहे कीं जे ब्राम्हण राजकीय बाबतींतल्या वर्चस्वासाठीं इंग्रज सरकारच्या उच्चाटनाचे भीमप्रयत्न करीत आहेत, तेच ब्राम्हण ब्राम्हणेतरांवर आपल्या सामाजिक व धार्मिक वर्चस्वाची छाप अक्षय ठेवण्यासाठीं, त्याच इंग्रज सरकारला बगलेंत मारून परस्पर त्यांच्या हस्तें ब्राम्हणेतरांवर उलटा पेंच मारण्यास कमी करणार नाहींत.

ब्राम्हण-ब्राम्हणेतर वादाचें स्वरूप गेल्या २५० वर्षांत कसकसें परिणत होत गेलें आहे, त्याचा इतिहाससिद्ध पुरावा पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत देण्यांत येईल. येथें त्याच्या वर्तमान हालचालींचा थोडा विचार कर्तव्य आहे. मद्रासकडे सुद्धां हा वाद बराच रंगास आला आहे व कै. डॉक्टर नायरच्या धूर्त पुढारपणाखालीं तिकडील ब्राम्हणेतर जनतेची जागृति पद्धतशीर पायावर कधींच उभारली गेली आहे. तथापि महाराष्ट्रांतील ब्राम्हणेतरांची चळवळ व मद्रास इलाख्यांतील ब्राम्हणेतरांची चळवळ यांतील मूलतत्वांचा मसाला मात्र अगदीं भिन्न आहे, ही गोष्ट वाचकांनीं अवश्य नीट ध्यानांत ठेविली पाहिजे. तिकडील ब्राम्हण लोक एवढे मगरूर घाशीराम आहेत कीं गेल्या कित्येक शतकांत त्यांनीं ब्राम्हणेतरांना पशूंपेक्षांहि नीच लेखण्याचा संप्रदाय लोकमान्य करून सोडला आहे. तिकडे ब्राम्हणेतरांचा सामाजिक दर्जा कुत्र्या डुकरांइतका क्षुद्र मानण्याचें भिक्षुकी कारस्थान ब्राम्हणांनी सर्वत्र फैलावल्यामुळें, लक्षावधि ब्राम्हणेतर हिंदु समाजाला व हिंदुधर्माला राम राम ठोकून क्रिस्ती व मुसलमान धर्मांत गेले. लोकसंग्रहदृष्ट्या हिंदुराष्ट्राचा भयंकर घात करूनहि उलट मद्रासची भिक्षुकशाही आपल्या वेदोक्त श्रेष्ठतेचे देव्हारे माजविण्यास तिळमात्र शरमत नाहीं. सारांश, तिकडील ब्राम्हणेतरांची चळवळ शुद्ध प्राणत्राणपरायण आहे. ब्राह्मणांच्या सामाजिक व धार्मिक वर्चस्वाविरुद्ध बण्ड आहे.

महाराष्ट्रांत भिक्षुकशाही जुलूम कितीहि असला आणि पौराणिक वाङ्‌मय प्रसाराच्या जोरावर तिनें ब्राम्हणेतर जनतेंत मानसिक दास्याचीं जाळीं सर्वत्र कितीहि फैलावलीं असलीं तरी इकडील क्षत्रिय वर्गानें वेळोवेळीं ब्राम्हणांची गुप्त कारस्थानें ठिकच्या ठिकाणीं ठेचण्याचा प्रघात ठेविल्यामुळें मद्रासप्रमाणे इकडील ब्राम्हणेतरांचा विशेष अधःपात झालेला नाहीं. सामाजिक व धार्मिक क्षेत्रांत ज्या ज्या वेळीं ब्राम्हणांचीं भिक्षुकी कारस्थानें शिरजोर झाली त्या त्या वेळीं इकडील क्षत्रिय वर्गांनें, सर्व ब्राम्हणेतरांच्या वतीनें, अस्तन्या वर सारून ब्राम्हणांना धुळींत लोळविण्यास कमी केलें नाहीं. याचा सविस्तर इतिहास आम्ही प्रसिद्ध केलेल्या ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास या ग्रंथांत वाचकांनी मुद्दाम पहावा. राजकीय

क्षेत्रांत स्वराज्यस्थापनेचीं विधायक कार्यें महाराष्ट्रांत आजपर्यंत क्षत्रिय वर्गानेंच घडवून आणलीं आहेत. आणि ब्राम्हणांनीं मात्र क्षत्रियांच्या गफलतीचा फायदा घेऊन प्रत्येक वेळीं त्या त्या कार्याचा विध्वंस केल्याचें पाप मिळविलें आहे. महाराष्ट्रांतील ब्राम्हण - ब्राम्हणेतर वादाचा इतिहास श्री शिवछत्रपतींच्या काळापासून तो आजपर्यंत अत्यंत स्पष्ट रीतीनें ग्रंथित केलेला उपलब्ध आहे; आणि या वादाची तडजोड करूं इच्छिणारांना त्यांतील भिन्न भिन्न विकारांच्या भरती ओहटीच्या लाटांवरील रंग विचारांत घेतल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. हा वाद सामाजिक किंवा धार्मिक क्षेत्रांतील हक्कांच्या दानानें सुटणारा नाहीं; शिवाजींच्या वेळीं किंवा अजमासें २५ वर्षांपूर्वी पर्यंत हा हक्काचा प्रश्न वेदोक्त किंवा पुराणोक्त यावरच होता. पण आज ब्राम्हणेतर जनता वेदोक्त पुराणोक्ताला फाटक्या जोड्याची किंमत देत नाहीं, किंवा ते हक्क ब्राम्हणांजवळून घेण्याची तिची इच्छा नाहीं. जेथें खुद्द ब्राम्हणांचें वर्चस्वच किंबहुना अस्तित्वच ज्यांना मान्य नाहीं, भिक्षुकशाही हिंदुधर्माची ज्यांना आतां महति वाटत नाहीं, आणि राजकीय स्वातंत्र्याबरोबरच धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्याचा झेंडा उभारण्यासाठीं ज्यांची महत्वाकांक्षा आज बेफाम फुरफुरूं लागली आहे, तो ब्राम्हणेतर संघ दिवाळखोर ब्राह्मणांपासून कसल्या हक्कांची याचना करणार? शिवाय जेथें ब्राम्हणांचें अस्तित्वच क्षत्रियांच्या कृपेवर अवलंबून आहे, तेथें ब्राम्हणांनीं क्षत्रियांना किंवा सर्रास ब्राम्हणेतरांना 'आम्ही तुम्हांला अमुक अमुक हक्क खुषीनें व अक्कलहुशारीनें देतों, घ्या' असें म्हणणें हा बावळटपणा नसेल तर निर्लज्जपणा तरी खास आहे. ब्राम्हणांचें कसलेंहि वर्चस्व आज अफाट ब्राम्हणेतर मान्य करीत नाहीं; विशेषतः चित्पावनांस तर ते ब्राम्हणहि समजत नाहींत. ग्रामण्यांचा इतिहास लक्षपूर्वक अभ्यास केला तर कोणालाहि हें स्पष्ट दिसून येईल कीं महाराष्ट्रांतील ब्राम्हण ब्राम्हणेतर वादांत इतर कोणतीहि तत्वें असलीं, तरी हिन्दवी स्वराज्याचा चित्पावनांनीं केलेल्या खुनाचा सूड प्रामुख्यानें त्यांत वावरत आहे. महाराष्ट्राच्या राष्ट्रीय अधःपाताला प्रामुख्यानें चित्पावन लोक जबाबदार आहेत, ही इतिहासप्रसिद्ध गोष्ट पुण्याच्या भारत इतिहास संशोधन मंडळाच्या बेचाळीस पितरांची पुण्याई जरी खर्ची घातली तरी खोटी पडणें शक्य नाहीं. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यस्थापनेच्या कामीं कायस्थ प्रभु मराठे इत्यादि ब्राम्हणेतरांच्या जोडीनें कांहीं ब्राम्हण तुरळक होते खरे, तथापि चित्पावन मात्र मुळींच नव्हतें, आणि त्याच शिवाजींच्या वंशाचें व त्याबरोबरच त्यांच्या छत्रसिंहासनाचें तळपट उडवायला पुढें सरसावलेले वीर महावीर मात्र एकजात चित्पावन ! ही एकच गोष्ट ब्राम्हणेतरांच्या, विशेषतः क्षत्रिय मराठ्यांच्या हृदयांत शल्याप्रमाणें रात्रंदिवस सलत आहे. अशा स्थितींत त्याच चित्पावनांकडून धार्मिक किंवा सामाजिक बाबतींत कांहीं विरोधाची अटकळ लवमात्र होतांच, किंवा स्वराज्यवादाच्या भरांत कांहीं आत्मस्तोमाचा दिमाख त्यांनीं मिरवतांच, मराठ्यांची डोकी भडकून गेल्यास त्यांना दोष कसा देतां येईल? श्री शिवछत्रपतींनी जिवाचें पाणी करून रायगडावर जन्मास घातलेल्या हिन्दवी स्वराज्याचा खून ज्या अधमाधम चित्पावनांनीं साताऱ्यास पाडला आणि त्याच्या नरड्यांतून उडणाऱ्या रक्ताच्या चिळकांड्यांत मनमुराद रंगपंचमी खेळण्यास कमी केलें नाहीं, त्याच चित्पावनांनीं आतां स्वराज्यप्राप्तीची पुराणें झोडण्यास सुरवात केली आहे, तरी कोणता खऱ्या हाडाचा मराठा, अस्सल बीजाचा कायस्थ प्रभु, नव्हे, एकजात सारी चित्पावनेतर दुनिया त्या पुराणांवर विश्वास ठेवील? तात्पर्य, महाराष्ट्रांतील ब्राम्हण ब्राम्हणेतर वादांत ही राजकीय बाबतींतील चुरस विशेष आढळून येते.

दुसरी एक विशेष गोष्ट वाचकांच्या नजरेस आणावयाची आहे. महाराष्ट्रांतल्या या वादाला ब्राम्हण ब्राम्हणेतर वाद असें जें एक सामान्य नांव दिलें जात आहे, तें अत्यंत विपर्यासी आहे, खोटें आहे, वस्तुस्थितीच्या विरुद्ध आहे. स्वतःस ब्राह्मण म्हणविणारा तेवढा एका बाजूस आणि ब्राम्हण न म्हणविणाऱ्या सर्व जाती दुसऱ्या बाजूस, असा प्रकार मुळीच पहाण्यांत येत नाहीं. ब्राम्हण पक्षांत तर देशस्थ, कऱ्हाडे, सारस्वत, दैवज्ञ, शुक्लयजुर्वेदी इत्यादि अनेक जातींचे संघ मुळींच भाग घेत नसून, ते उघड उघड ब्राम्हणतेरांच्या पक्षांशीं विशेष सहानुभूतीनेंच वागतात; नव्हे, ब्राम्हणेतरांच्या चळवळींत प्रत्यक्ष भाग घेतात. मग आतां ब्राम्हण पक्षांत राहिले तरी कोण? एकटे चित्पावन. देशस्थ सारस्वत दैवज्ञादि ब्राम्हण जाती आज जवळ जवळ दोन अडीच शतकें चित्पावनांपासून बऱ्याच फटकून वागतात व धार्मिक सामाजिक बाबतींत सुद्धां त्यांचें व चित्पावनांचें वैर लोकविश्रुत आहेच. विशेष मननीय गोष्ट म्हटली म्हणजे पेशव्यांच्या सर्वसमर्थ बळजबरीमुळें देशस्थांनीं चित्पावनांशीं जरी रोटीबेटीव्यवहाराचा मामला सुरू केला, तरी त्यांना सुद्धां चित्पावनांकडून वरचेवर उपसर्ग पोहोचतोच; नव्हे, नित्याच्या व्यवहारांत देशस्थाला वाटाण्याप्रमाणें बाजूला पडण्याचा प्रसंग येतो. या अनुभवाची देशस्थ ब्राम्हणांना अद्दल घडल्यामुळें त्यांनीं आपले स्वतंत्र जातीसंघ ठिकठिकाणीं स्थापन करून स्वावलंबनावर आत्मोद्धार करण्याचा स्तुत्य मार्ग आतां धरला आहे. रोटी खाल्ली बेटी दिली घेतली तरी देशस्थ तो देशस्थ, आणि चित्पावन तो चित्पावन, हा चमत्कार पाहिला कीं पाश्चात्य लोकांच्या 'पूर्व ती पूर्व व पश्चिम ती पश्चिम; दोघींचें संमीलन होणेंच नाहीं' या सूत्रांची आठवण कोणाला होणार नाहीं? चित्पावनी मनाची तेढच अशी चमत्कारिक आहे कीं तिचे पाचपेच चित्पावनेतर बहुजनसमाजाच्या वेळींच नीटसें ध्यानांत न आल्यामुळें हिन्दुराष्ट्राचा - विशेषतः महाराष्ट्राचा - अधःपात झाला. चित्पावनांनीं जेव्हां अवचित् पेशवाईचें दिवाळें फुंकून छत्रपतींच्या तक्तालाहि भडाग्नी दिला, तेव्हां मात्र चित्पावनेतरांचे डोळे लख्कन् उघडले, आणि हे लोक कोणत्या वृत्तीचे आहेत त्याची जो तो छाननी करूं लागला. अगदीं पहिल्या प्रथम जर कोणी चित्पावनांचा चित्पावनी कांवा धडाडीनें चव्हाट्यावर फोउला असेल तर तो कै. रावबहादुर गोपाळराव हरी देशमुख (लोकहितवादी) यांनीं. हे स्वतः चित्पावन जातीचे होते, पण सत्य प्रगट करण्याच्या कामीं त्यांच्या निस्पृहतेला अलीकडच्या काळांत तोड आढळणार नाहीं. त्यांची नेमणूक इनाम कमिशनवर झाली, तेव्हां त्यांनीं सातारचे सर्व दप्तर चाळलें आणि आपल्या स्वजातीयांनीं केलेला राष्ट्रघात पाहून ते इतके संतप्त झाले कीं आपल्या एका सुप्रसिद्ध पुस्तकांत त्यांनीं स्पष्ट असें नमूद केलें कीं ''ज्या कोणास या हिंदुस्थान देशाची उन्नति व्हावी अशी इच्छा असेल, त्यांनीं या चित्पावनांस प्रथम देशाच्या बाहेर पार हुसकून लावले पाहिजे.'' लोकहितवादीच्या या शेऱ्याचा अर्थ लाक्षणिक घ्या नाहींतर अक्षरशः घ्या, चालूं वादांत या अर्थाला सार्थ करण्याइतका त्वेष ब्राह्मणेतर संघांत भडकविण्या इतकीं दुष्कर्मे करण्याचीं चित्पावनांची खोड लवमात्र कमी झालेली नाहीं. लोकहितवादी नंतर कै. रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांनीं असें नमूद करून ठेविलें आहे कीं '' हे चित्पावन लोक मनाचे सरळ नसतात. आणि अल्प स्वल्प स्वार्थासाठीं राज्याचीं राज्यें धुळीस मिळवण्याला मागें पुढें न पाहणारे लोक या जातीमध्यें आजपर्यंत पुष्कळ उत्पन्न झाले आणि त्यांनीं आपले पराक्रमहि त्या रीतीनें दाखविले.'' चित्पावनी काव्याची ही खोंच खुद्द चित्पावनांतील अनेक विवेकी गृहस्थांनासुद्धां अलीकडे पटत चालली आहे व बरेचसे चित्पावन आपल्या जातीच्या या दुष्ट

अनुवंशिक संस्कारापासून स्वतःस अलिप्त ठेवण्याचा यत्न करीत असतात. श्री. नरसोपंत केळकर ता. ३ ऑगष्ट १९२० च्या केसरींत, - बाचकत बाचकतच का होईना ! - असें नमूद करतात कीं ''ते (चित्पावन) स्वावलंबी, मेहनती, कोठेंहि पुढें घुसणारे, दीर्घ सूचना मनांत आणणारे, पण कांहीं अंशी (?) आपल्या पुरते पहाणारे, बुद्धिमान पण संकुचित दिलाचे लोक आहेत.'' असल्या विलक्षण लोकांनीं महाराष्ट्रांतील इतर ब्राम्हणांशीं ब्राम्हणेतरांइतकेच तुसडेपणानें वागण्याचें धोरण आज कैक वर्षे ठेविल्यामुळें प्रस्तुत वाद हा ब्राम्हण-ब्राम्हणेतरांचा वाद नसून चित्पावन विरुद्ध अखिल हिन्दु जनता असा आहे. याचा सरळ अर्थ असा होतो कीं सारी दुनिया एकीकडे आणि हे चित्पावन एकीकडे. लोकशाहीची दांभिक पुराणें झोडणाऱ्या या मूठभर चाणक्यसेनेचा अफाट हिंदु समाजांत उत्पन्न झालेल्या नवचैतन्यापुढें काय टिकाव लागतो, ते भविष्य काळचे इतिहासकार सांगतील. तथापि या चित्पावन चित्पावनेतर पक्षांपैकीं लोकशाहीचें तेज कोणत्या पक्षाकडे आहे, हें वरील विवेचनारून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल.

□□□

निवेदन

प्रबोधनाची वर्गणी बुडविणारे शिष्ठ

प्रबोधन कोणत्याहि पक्षाचे अगर जातींचे मुखपत्र किंवा पुच्छपत्र नाही. स्पष्टच म्हणायचे तर ज्या विवेकवादी मतांचा प्रबोधन प्रचारक आहे, त्या मतांचा संप्रदाय महाराष्ट्रांत तरी निदान अझून बळावलेला नाही. म्हणजे आज असे म्हणतां येईल की जरी प्रबोधनाचा वाचकवर्ग महाराष्ट्रांत सर्वत्र बराच फैलावलेला आहे, तरी हे पाक्षिक जवळ जवळ ज्याला ''One Man Journal'' म्हणतात तसले आहे. म्हणूनच वर्गणीदार होण्याबद्दल कोणालाहि भीड न घालतां आत्मप्रेरणेने जेवढे प्रबोधनाचे आश्रयदाते झाले व नित्य होतात, त्यांनाच आम्ही आभारपूर्वक स्वागताने वर्गणीदारांच्या दालनांत मानाची खुर्ची देतो. दर वर्षाच्या अखेरीस अशीहि जाहीर सूचना देतो की ज्या कोणाला पुढील वर्षी वर्गणीदार रहावयाचे नसेल, त्यांनी बिनदिक्कत पत्र पाठऊन तसे कळवावे. प्रबोधन कृतज्ञतापूर्वक त्यांना प्रेमाचा निरोप देईल. परंतु वर्गणी बुडवून, व्हीपीच्या खर्चाचा हकनाहक भुर्दंड पोष्टाच्या गंगाजळीत ओतण्यास भाग पाडणाऱ्या वर्गणीबुडव्या शहाण्यांबद्दल काय लिहावे हेच आम्हांला समजत नाही. प्रबोधनाचे वर्गणीदार व्हा अशी जाहीर विनंती करणे आमचे कर्तव्यच आहे; पण तशी कांही जुलूम जबरदस्तीची धोंड तर कोणी या वर्गणीबुडव्या शिष्टांच्या उरावर ठेविली नव्हती ना? दोन दिडक्याचे एक कार्ड पाठवून 'प्रबोधन नको' असे कळविण्याऐवजी आमचे दहा दहा अंक फुकट भामटून व्हीपी परत करून आम्हांला प्रत्येक व्हीपी मागे तीनतीन आण्यांचा खर्च पाडणे, हा कोणत्या गांवचा संभावीतपणा? प्रबोधनाचा कार्यक्रम बळजबरीचा नव्हे. तो कोणावर आश्रयार्थ भीड खर्चणार नाही आणि फुकटाफाकट अंक भामटून वर्गणी बुडविणाऱ्यांचा मुलाजा राखणार नाही. प्रबोधन ज्यांना आवडत नसेल, ज्यांना त्याची वर्गणी भरणे जीवजड वाटत असेल, त्यांनी अझूनही ११ अंकांबद्दल रु. १-१२-० ची मनी ऑर्डर पाठवून आपले नांव काढून घ्यावे. सरळ व्यवहाराचा प्रबोधनास मुळीच राग येणार नाही. प्रबोधन कोणाच्या भाडभिकेवर चालले नसून शुद्ध आत्मप्रेरणेने त्याच्या जीवनाची काळजी वहाणारे हजारों रसिक महाराष्ट्रात आहेत, त्यांच्याच आशावादावर त्याचा कार्यक्रम फोंफावत चालला आहे. स्वयंस्फूर्तीने प्रबोधनाला 'आपला' मानणाऱ्या रसिकांच्या उत्तेजनावरच प्रबोधनाची उपयुक्तता वाढविण्याची जय्यत तयारी सध्या चालू आहे. असो. आगाऊ सूचनापत्रे पाठवूनहि व्हीपी नाकारणाऱ्या

शिष्ठांची नांवे खाली देण्यात येत आहेत. त्यांनी घेतलेल्या अंकांची किंमत आदा करावी, अशी आमची त्यांना जाहीर विनंती आहे. निस्पृहस्य तृणं जगत्. प्रबोधनाची भाडभीड कोणी ठेऊ नये, प्रबोधन कोणाची भाडभीड ठेवणार नाही. नवीन वर्गणीदारांना सुद्धा आमची हीच नम्रतापूर्वक सूचना आहे की आपल्याला प्रबोधनाची मते, त्याची विचारशैली, त्याचे इतिहास-संशोधन आणि त्याची वाङमयसेवा पसंत असेल, प्रबोधनाच्या वाचनाने आपल्या विचारांचे खरोखरच कांही प्रबोधन होत असेल; तरच तरच तरच आपण स्वयंप्रेरणेने त्याला आश्रय देण्यास पुढे या. एरव्ही मुळीच येऊ नका. प्रबोधन शुद्ध प्रेमाचा भुकेला दास आहे. त्याला कोणाची बळजबरीची मेहेरबानी साफ नको आहे.

अंक	नांव
९	रामचंद्र महादेव राणे, मुंबई.
९	दत्ताजीराव बळवंतराव पाटील, भिलवडी.
१०	मारुतीराव डोमाजी रिणके, नागपूर.
१०	परशुराम केशव पाध्ये, दादर.
१०	शिवराम लक्ष्मण बोर्डवेकर, आंबेवाडी, मुंबई.
९	डॉ. नरहर गोपाळ चिटणीस, पुणे.
९	सीताराम विष्णू पाटील, माहीम, दादर.
१०	गणपतराव संतराम भोईटे, तडवळे.
१०	केशव त्रिंबक प्रधान, धार.
१०	संतुराम सदाशिव कुळकर्णी, दादर.
९	मोरेश्वर आत्माराम गुप्ते, तुरंभे.
९	दत्तू महादेव हजारे, इचलकरंजी.
९	के. टी. पाटील, सु. जिजामाता बोर्डिंग, जळगांव.
१०	अंबाजीराव दौलतराव कांबळे, सबरजिस्ट्रार, साक्री.
१०	तोताराम रामचंद्रशेट शिंपी, नरढाणे.
१०	डॉ. प्रभाकर शिळोत्री, मुंबई.
१०	लक्ष्मण शिवराम प्रभु से. सातेरी प्रा. मो. वा. वेंगुर्ले.
१०	मोरेश्वर विनायक दोंदे बी. ए. ठाणे.
१०	माधवराव रामचंद्र मोरे, कल्याण.
१०	गणपत जगन्नाथ प्रधान, इंपिरियल बँक, मुंबई.
१०	नारायण रामचंद्र दोंदे, दादर.
१०	श्रीधर त्रिंबक गुप्ते, एंजिनियर, दादर.
१०	पांडुरंग कृष्णाजी कदम, मुंबई २.
१०	यशवंतराव पांडुरंगजी देशमुख, जरूड.
१०	रावबहादुर प्रो. एम. जी. डोंगरे, पुणे.

१०	यशवंतराव दगडुजी सिन्नरकर, नाशिक.
१०	दत्तात्रय मार्तंड गुप्ते, बीए. एलेल्बी, ठाणे.
१०	गोविंद बळवंत प्रधान, बीए. एलेबी, एमेल्सी, ठाणे.
१०	वामन सखाराम पेडणेकर, रेडी.
१०	रामचंद्र बाळकृष्ण बोधे, सांगली.

जे नकाराचे काम दोन दिडक्याच्या कार्डाने या वरील गृहस्थांस करता आले असते, त्या ऐवजी ९ अंक घेणारांनी रु. १-१०-० चा व १० अंक घेणारांनी १-१२-० चा दंड आम्हांला प्रत्येकी पाडला आहे. ही रकम म. आ. ने पाठवून आपला हिशोब चुकता करावा, अशी या सज्जनांना आमची जाहीर विनंती आहे. व्यवहारात भाडभीड कशाला?

□□□

वर्ष ३ : अंक १२ : ०१ एप्रिल १९२४

लेख

१०० वर्षांपूर्वींचे महाराष्ट्र

एका विवक्षित जातीचे मूठभर शहाणे एकीकडे आणि बाकीचे सर्व समाज एकीकडे, अशा स्थितींत त्या मूठभर चाणाक्यांनीं आपल्या प्रतिस्पर्ध्यांना स्वराज्यद्रोही ठरविण्याचें धाडस करावें, हें चमत्कारीक नव्हे काय? स्वराज्याची किंवा स्वातंत्र्याची आकांक्षा एकट्या चित्पावनांना मात्र लागली आहे आणि बाकीची सर्व चित्पावनेतर दुनिया गुलामगिरीच्या खातेऱ्यांत लोळण्यास राजखुषी आहे, ही कल्पना करणारें डोकें विचित्रवीर्यच असलें पाहिजे खास ! पशुपक्षी कीटक सुद्धां स्वातंत्र्यासाठीं प्राण देतात; मग ब्राम्हणेतर ऊर्फ चित्पावनेतर जनता त्या पशुपक्षांपेक्षाहि बेवकूब व नीच आहे, अशी तर या शहाण्या चित्पावनांची कल्पना नसेल ना? ''ब्राम्हणेतर ब्राम्हणांच्या चळवळीपासून अलिप्त रहातात आणि ब्राम्हणांच्या 'राष्ट्रीय' तंबोऱ्याच्या तारांशीं आपला स्वर एकजीव करीत नाहींत; हें असें कां होतें याचें कारण ब्राम्हणांनींच वास्तवीक शोधून पाहिलें पाहिजे. ब्राम्हणेतरांच्या सर्व बऱ्यावाईट चळवळींच्या नांवानें खडे फोडण्यापेक्षां, आज ब्राम्हणेतर ब्राम्हणांच्या खांद्याशीं खांदा भिडवून उभे रहाण्यास कां नाखूष आहेत, याचें मूळ राष्ट्रीयत्वाचीं दांभिक पुराणें झोडणारे पुराणीक नीट शोधून काढून आपल्या वर्तनांत सुधारणा करतील तर... त्यांच्याशीं सहकारिता करण्यासाठीं ब्राम्हणेतर खात्रीनें आपला हांत पुढें करतील.'' (ग्रामण्य, उपोद्धात पृ. ३९) हा सन १९१९ सालीं आम्हीं दिलेला जाहीर इषारा नीटसा विचारांत घेण्याची बुद्धि 'राष्ट्रीय' चित्पावनांना अझून झालेली दिसत नाहीं, हें परशुरामाचें दुर्दैव होय. कदाचित् अखिल चित्पावनेतर दुनियेशीं विरोध करून, कुटील नीतीच्या जोरावर चित्पावनांना जगज्जेते होण्याची महत्वाकांक्षा नसेल असें नाहीं ! जात्याच ते 'दीर्घ सूचना मनांत असणारे' आहेतच. अखिल महाराष्ट्राच्या तोंडाला पानें पुसून, त्याचे डोळे फटफटीत उघडे असतां, ज्यांनीं चुटकीसरसें मराठी स्वराज्याचें दिवाळें फुंकलें, त्यांना एवढी गोष्ट अशक्य आहे असें नाहीं. पण-पण आम्हांला भीति इतकीच वाटतें कीं आतांची चित्पावनेतर दुनिया पूर्वीप्रमाणें चित्पावनी काव्याला बळी पडण्याइतकी नादान व नामर्द राहिलेली नाहीं ! स्वावलंबनाच्या पायावर उभारलेला आत्मोद्धाराचा लोकशाही झेंडा चित्पावनांस न दिसण्याइतके तेहि आंधळे नाहींत खास. 'ते संकुचित दिलाचे' असले तरी 'कोठेंहि पुढें घुसणारे' आहेत. अर्थात् ब्राम्हणेतर जनतेच्या वाढत्या चैतन्याला विरोध करण्यासाठी त्यांनीं आपल्या

लेखण्या व जिव्हा मोकाट सोडण्याचा 'राष्ट्रीय' उपक्रम सुरू ठेवला आहे तो यथायोग्यच आहे. या उपक्रमाची पंढरपुरी महति वाढविण्यासाठीं त्यांनीं कै. चिंतामणराव सांगलीकराच्या भिक्षुकशाही धर्मग्रंथ मॅन्युफॅक्चरींग गिरणी प्रमाणें 'लोकमान्य महात्मा भगवान देशभक्त वीरपीर मॅन्युफॅक्चरींग कारखाना' आज गेलीं २५-३० वर्षे जोरांत चालविला आहे. कै. टिळकांना केवळ लोकमान्यच बनवून हे 'राष्ट्रीय बडवे' स्वस्थ बसले नाहींत, तर त्यांच्या मृत्यूनंतर त्यांना जादा दोन हात चिटकवून श्रीकृष्ण भगवानहि बनविण्यास कमी केलें नाहीं. दोन हाताच्या माणसाला जादा दोन हात चिकटवून श्रीकृष्ण भगवंत बनविणाऱ्यांनीं टिळकांना आणखीं तीन डोकीं व सहा हात लटकावून एकदम ब्रम्हदेव जरी बनविले असते, तरी या दीर्घशहाण्या चित्पावन विश्वकर्म्यांना जादा दोन पाय, दोन शिंगे व एक लांबलचक शेपूट चिकटवून बैल बनविण्याचा रिकामटेंकडा उपद्व्याप कोणीही केला नसता. चित्पावनांच्या या पंढरपुरी बडवेगिरीला भाळणारे ब्राम्हणेतर अझूनहि कांहीं थोडे थोडके नाहींत, रगड आहेत. त्यापैकीं बरेचसे उदास वृत्तीचे आढळतात आणि कांहीं थोडे तापल्या तव्यावर देशभक्तीची भाकर भाजून राष्ट्रीय पक्षाच्या पदराखालीं प्रसिद्धीचा मोक्ष मिळवूं पहाणारें शिखंडी असतात. परंतु ज्याप्रमाणें स्वराज्यवादाचा आरडाओरड करणारे मूठभर चित्पावन म्हणजे हिन्दु राष्ट्र नव्हे, त्याप्रमाणें हे अक्कलशून्य समाजद्वेष्टे शिखंडी म्हणजे ब्राम्हणेतर समाज नव्हे. सारांश, ब्राम्हणेतर जनता स्वराज्यद्रोही आहे व त्याच्या स्वावलंबी आत्मोद्धाराच्या चळवळी राष्ट्रघातकी आहेत, या चित्पावनी वल्गना असून वस्तुस्थिती अगदीं उलट आहे.

महाराष्ट्रांत ब्राम्हणेतरांच्या जागृतीचें बीज कोणीहि पेरलेलें असो, त्याला कर्तबगारीचें पाणी घालून त्याचा जोमदार वृक्ष बनविण्याची थोर कामगिरी कै. श्रीशाहु महाराज छत्रपति करवीरकर यांनींच बजावली खरी. छत्रपतींच्या क्षात्र तेजाच्या धडाडीनें ब्राम्हणेतरांची लोकशाही चळवळ इतकी झपाट्यानें थरारली कीं तिच्या प्रभंजनानें चित्पावनी भिक्षुकशाही स्तोमाचे पलीते भराभर विझले व खुद्द त्यांच्या घाशीरामी अस्तित्वावर लोकशाही क्षोभाचा ज्वालामुखी अग्निरसाचे लोळच्या लोळ भिरकावून देऊं लागला. चहूंबाजूंनी ब्राम्हणेतरांच्या चळवळीच्या डागण्या डाग देऊं लागतांच चित्पावन पक्षाचे अध्वर्यू केसरीकर यांनीं आपल्या इतिहाससिद्ध पूर्वपरंपरेची नातूप्रणित चित्पावनी मात्रा छत्रपतीला देण्याचा प्रयत्न केला. शाहु छत्रपतींचीं कांहीं १५/२० खासगी पत्रें केसरीत प्रसिद्ध करून, त्यांच्या आधारानें कै. शाहु छत्रपतीला स्वराज्यद्रोही छत्रपति ठरविण्याचा पोरकट व हास्यास्पद उपद्व्याप केला. त्या वेळी मराठे मंडळी किती बेफाम खवळून गेली होती तें सर्वांना माहीतच आहे. त्यांनीं ठिकठिकाणीं मोठमोठ्या सभा भरवून तो केसरीचा अंक जाहीर रीतीनें जाळला व सर्व वक्त्यांनीं केसरीच्या संपादकावर मनमुराद तोंडसुख घेतलें. परंतु एकाहि वक्त्यानें किंवा लेखकानें 'छत्रपति स्वराज्यद्रोही कसे नव्हते?' हें सिद्ध करण्याचा यत्न मात्र मुळींच केला नाहीं. जो उठला तो शिव्या देत, निषेध करीत, हातपाय आपटीत उठला. प्रत्येक निषेधकाचा मुद्दा एवढाच कीं 'हीं पत्रें छापलीं कां?' पण ती पत्रें छापवूनहि केसरीला छत्रपतीवर स्वराज्यद्रोहाचा आरोप सिद्ध करतां येतों कीं नाहीं, चित्पावनांनीं छत्रपतीला स्वराज्यद्रोही ठरविण्याचा हा उपक्रम आजच पहिल्यांदा केला कीं ही पूर्वपरंपरा आहे, आणि इतिहासावरून अस्सल स्वराज्यद्रोहाच्या पातकाचे धनि छत्रपति ठरतात कीं चित्पावन ठरतात, इत्यादि प्रश्न कोणीहि विचारांत न घेतां मन मानेल तसा आदळआपट करूं लागला. कोल्हापूरच्या आडदांड सत्यशोधक (?) मर्दांनीं

तर असें सत्य शोधून काढलें कीं हा गुप्त (?) पत्रव्यवहार छत्रपतींचया पदरच्या कायस्थ प्रभु किंवा सारस्वत लोकांनीं घरभेदेपणा करून केसरीला नेऊन दिला. माथेफिरू बरळण्याचा मासला हा असा असतो! या गोष्टीबद्दल प्रस्तुत लेखकानें खुद्द छत्रपतींना मुंबई मुकामीं खुलासा विचारला असतां, त्यांनीं त्या वेळीं काढलेले उद्गार आज त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध करण्यांत अर्थ नाहीं; कारण संभाषणप्रसंगीं दोघांशिवाय तिसरें कोणीही जवळ नव्हते. कै. शाहु छत्रपतींच्या व्यापक कर्तबगारीला असलें घाणेरडें जातिमत्सराचें संकुचित स्वरूप देऊं पहाणाऱ्या महामूर्खांकडें दुर्लक्ष करून, आपण खुद्द प्रसिद्ध झालेल्या पत्रांतील मजकुराकडें पाहिलें तर त्यांत एवढेंच दिसून येतें कीं जहाल चित्पावनांच्या चिथावणीनें महाराष्ट्रांत निर्माण झालेल्या अराजक गुप्तकटांचा नायनाट करण्यासाठीं व स्वतःचे करवीर संस्थान अराजक गुप्तकटवाल्यांची गुहा न होऊं देण्यासाठीं छत्रपतींनीं इंग्रज सरकारशीं सक्रीय सहकारिता केली. यांत स्वराज्यद्रोह कसा काय होतो? फार झालें तर इतकें म्हणता येईल कीं छत्रपतींनीं पुण्याच्या स्वयंशिष्ठ जहाल चित्पावनांच्या भिक्षुकशाहीचा द्रोह केला. मानसिक दास्यप्रवर्तक स्वराज्यद्रोही नव्हे, स्वराज्यविध्वंसक - भिक्षुकशाहीचा द्रोहचसा काय पण निःपात करणें, लोकशाहीच्या प्रत्येक भक्ताचा जन्मसिद्ध हक्कच आहे. यापेक्षां कै. शाहुछत्रपतींनीं अधिक तें काय केलें? स्वराज्यद्रोही कोण? छत्रपति कीं जहाल चित्पावन? घरभेदे कोण, कायस्थ सारस्वत कीं आणखी कोणी दुसरे? या प्रश्नांचीं उत्तरें हा ग्रंथ वाचून वाचकांनींच दिलेलीं बरीं, असें ठरवून पुढें प्रयाण करतों.

स्वराज्याची रूपरेषा कोणाला कळो वा न कळो, महाराष्ट्र आज स्वराज्यमुमुक्षु बनला आहे. चित्पावन भिक्षुकशाहीची भूक फक्त राजकारणी स्वराज्यापुरतीच असल्यानें तिच्या खटपटी एकसूत्री दिसतात व त्यांत फारशा अडचणीहि नाहींत. ब्राम्हणेतर पक्ष अथवा महाराष्ट्रांतला बहुजनसमाज स्वराज्यापेक्षां स्वयंनिर्णयासाठी आतुर झाल्यानें त्याच्या चळवळीला शतावधानी स्वरूप आलेलें आहे. आज राजकीय सत्ता व स्वातंत्र्य हातीं आलें तर चित्पावन भिक्षुकशाही आढ्याला तंगड्या लावून स्वस्थ बसेल; पण ब्राम्हणेतरांच्या लोकशाहीचा कर्मभोग राजकीय उद्धारांत नसल्यामुळें तिच्या चळवळी न मंदावतां उलट अधिक तीव्रतेनें चालूं होतील. भिक्षुकशाहीला एकट्या आंग्ल नोकरशाहीशींच टक्कर द्यावयाची आहे, पण लोकशाहीला विदेशी नोकरशाही व स्वदेशी भिक्षुकशाही अशा दोन प्रचंड व मदोन्मत्त शक्तीशीं प्राणान्तीक झगडा लढून आपला सामाजीक धार्मिक आर्थिक व राजकीय स्वयंनिर्णयाचा मार्ग शोधून काढावयाचा आहे. अशी वास्तवीक खरी स्थिती असल्यानें लोकशाही पक्ष भिक्षुकशाहीच्या स्वराज्य प्रवचनाला फारसा उचलून धरीत नाहीं, यांत आश्चर्य कसलें? भिक्षुकशाही दारच्या चोराच्या काळजींत, तर लोकशाही दारच्या आणि घरच्या चोरांच्या काळजींत. भिक्षुकशाही इंग्रेजशाहीला सुरूंग लावून उडविण्यास एका पायावर तयार, पण स्वतःच्या स्तोमाला कोणी बोट लावतांच मात्र इंग्रजापेक्षांहि गोरीमोरी होते. लोकशाहीपुढें घरांतल्या घरांतच निकड कामाचा विश्वव्याप पसरलेला आहे. भिक्षुकशाहीनें मन ठेंचून गुलामांपेक्षां गुलाम बनविलेल्या दीन दुनियेला माणुसकीची ओळख करून देण्याचें बिकट कार्य लोकशाहीच्या कर्तव्यक्षेत्रांत आपला विशाळ जबडा पसरून बसलें आहे. भिक्षुकशाहीच्या वाममार्गांचे डांवपेच वरचेवर तिच्या कार्यांत भयंकर संकटें उत्पनन करीतच आहे. फंदफितुरांचा सुळसुळाट करून ब्राम्हणेतरांच्या हातानेंच लोक शाहीला वीष घालण्याची भिक्षुकशाहीचीं कारस्थानें जितकी इतिहाससिद्ध आहेत तितकीच लोकविश्रुतहि आहेत. अशा नानाविध स्वदेशी विदेशी

अडथळ्यांना तोंड देऊन ब्राम्हणेतर लोकशाहीला आपल्या स्वयंनिर्णयाचें ध्येय गांठावयाचें आहे.

आपापसांतील तीव्र द्वैताच्या या प्रश्नाकडे जरी आपण मुद्दाम डोळेझांक केली, तरी दुसरा एक अत्यंत महत्वाचा प्रश्न आपल्याला दृष्टीआड करतांच येत नाहीं. महाराष्ट्राला आज स्वराज्य पाहिजे. लोकशाही असो नाहींतर भिक्षूकशाही असो, दोघांची या बाबतींत एकवाक्यता आहे. महाराष्ट्राला आज स्वराज्य पाहिजे, असा विचार उत्पन्न होतांच, महाराष्ट्राचें स्वराज्य पूर्वी कां गेलें? या प्रश्नाचा नीट विचार करणें प्राप्त आहे. महाराष्ट्रभू स्वराज्याची माता आहे. स्वराज्य आजपर्यंत येथेंच पिकलें. मग तें कोणी कोणाला कां आणि कसें विकले? पूर्वी हातांत असलेल्या स्वराज्याचें दिवाळें फुंकणाऱ्या महाराष्ट्राला आतां पुनश्च जरी ते प्राप्त झालें तरी त्याचेंहि तो तीन घटकेंत तीन तेरा करणार नाहीं कशावरून? दिवाळखोरीची संवय केव्हांहि झाली तरी वाईटच ! अवनति झाल्यावर उन्नतीसाठी जीव लावणें हा स्वभावधर्म आहे; पण उन्नतीवरून अवनतीच्या गर्तेत येऊन पडलात कां? याची शहानिशा झाल्याशिवाय उन्नतीचा मार्ग पुनश्च आक्रमिणें व्यर्थ आहे. ज्या कर्मन्यायानें स्वयंनिर्णयी महाराष्ट्र परक्यांचा गुलाम कुत्ता बनला, त्या कर्मांचें पूर्ण ज्ञान होऊन कृत पातकांचें प्रायश्चित्त घेतल्यांशिवाय परिस्थितीच्या उलट्या फिरणाऱ्या चक्राला सुलटी गति कदापि देतां येणें शक्य नाहीं.

शिवछत्रपतींचा महाराष्ट्र आणि त्यानें स्वराज्यासाठीं इंग्रजांकडे तोंड वेंगाडावें आं ! हो वेळ तशी आली खरी. कां आली? कोणी आणली? कशी आणली? या सर्व प्रश्नांचें उत्तर इतिहास देईल. पश्चात्तापाच्या तीव्र घर्षणानें विवेकाची चकमक शिलगवून इतिहासाचा शोधनप्रकाश प्रदिप्त करा आणि अचुक निशाण रोंखून भूतकालाच्या दिशेला त्याचा झोत सोडा. म्हणजे शिवरायानें जन्म दिलेल्या हिंदवी स्वराज्याचा खून पाडण्यांत कोणत्या व्यक्ति जबाबदार आहेत, त्यांनीं काय काय कारस्थानें कोठें कोठें केलीं आणि त्यांत कसकसले अत्याचार केले, या सर्व गोष्टी सिनेमाच्या चित्रपटाप्रमाणें तुमच्या डोळ्यांसमोर प्रत्यक्ष घडल्यासारख्या दिसतील, महाराष्ट्रांतील अनेक समाजांच्या तत्कालीन भावनांचे बरे वाईट गुप्त रंग त्या चित्रपटावर स्पष्ट उमटतील. इतिहासाचा शोधनप्रकाश इतका तीक्ष्ण हृदयभेदी असतो कीं मनुष्य किती का आंतल्या गांठीचा असे ना, त्याच्या मनाची गांठ फोडून तिचे धागे धागे सुटे करून दाखविल्याशिवाय तो कधींहि रहात नाहीं. आजपर्यंत खुनाचीं नाटके व कादंबऱ्या तुम्ही कितीहि वाचल्या असल्या, तरी हिंदवी स्वराज्याचा खून हा ऐतिहासिक सत्याचा चित्रपट पाहून तुमची मनोवृत्ती बधिर होईल. विवेकसुद्धां क्षणभर बुळाबावळा होईल आणि क्षुल्लक स्वार्थांसाठीं महाराष्ट्रदेवतेचा स्वराज्याचा बिंदीबिजवरा लाथेखालीं तुडविणाऱ्या अनेक नराधमांचीं उलटी काळींजें पाहून तुमचें काळीज धडाडल्याशिवाय खास राहणार नाहीं.

प्रस्तुतचें नाटक अत्यंत दुःखपर्यवसायी आहे. त्यांतल्या पात्रांची संख्या मोठी असून त्यांचे मनोधर्म भिन्न आहेत. यांत नवरसाचा परिपोष भरपूर आहे, तरी वीर करुण बीभत्स हे रस उत्कट आहेत. परिस्थितीच्या प्रवाहांत अनेक रंग समधात वहात आहेत. अर्थात् मूळ कथानकाकडे वळण्यापूर्वी त्यांतील कांहीं प्रमुख प्रमुख सुष्ट दुष्ट पात्रांच्या परंपरेचा इतिहास आपणांपुढें ठेवल्याशिवाय त्यांच्या भूमिकांचा स्पष्ट उलगडा आपणांस होणार नाहीं. म्हणून हा उपोद्घात येथेंच पुरा करून आतां दुसऱ्या प्रकरणांत आपण प्रवेश करूं.

□□□

अग्रलेख

क्रांतिपूर्वकालिन् वाङ्मय
(लेखांक १ला)

क्रांतिकारक वाङ्मय ! हे दोन शब्द गेल्या पंधरा वर्षात इंग्रेजी नोकरशाहीनें इतके रूढ केले आहेत कीं क्रांतिकारक वाङ्मय म्हणजे 'राजद्रोही' वाङ्मय असा त्याचा कायमचा रूढार्थ शब्दकोशांत बिऱ्हाड करून बसतों कीं काय अशी भीति वाटूं लागली आहे. इंडियन पिनल कोडाचा १२४-अ म्हणजे क्रांतिकारक वाङ्मय आणि क्रांतिकारक वाङ्मय म्हणजे १२४-अ अशीहि दुसरी भावना आज सर्वत्र प्रचलित झालेली दिसत आहे. 'क्रांति' हा शब्द उच्चारतांच गुलामगिरींत पूर्ण मुरलेले हिंदी लोकच केवळ बाचकतात असें नव्हें, तर भूमिजलपवनावर हुकमत गाजविणारें इंग्रेजी सरकारहि उलट कापूं लागतें, हें एक मोठें आश्चर्य आहे. जाळपोळ लुटालूट दरवडे खून करणाऱ्या इसमांपेक्षां क्रांतिकारक एखादाच शब्द उच्चारणाऱ्या इसमाचा सरकारला नुसता संशय किंवा वास येतांच, त्यांच्या शांतिरक्षक सैन्यांत मारे एकच धामधूम उडून जाते. जगाच्या शांतीकरितां क्रांति किती आवश्यक व किती क्रमप्राप्त आहे, याची गुलामगिरींत पिचणाऱ्या नखशिखांत गुलामांना जरी कल्पना नसली, तरी निसर्गाशीं सहकारिता करणाऱ्या शस्त्रास्त्रसंपन्न सरकारला ती मुळींच नाहीं, असें म्हणणें शुद्ध दुधखुळेपणा होय. सर्वांची धडपड शांतीकरितांच चालली आहे. ही शांतीची कल्पना वैयक्तिक स्वार्थापुरतीच जर संकुचित असेल, तिचा व्याप अखिल मानवजातीच्या सर्वांगीण परिणती इतका सर्वस्पर्शी नसेल, तर असल्या खोट्या शांतीच्या कल्पनेच्या चिंधड्या उडविण्यासाठीं क्रांतीचा कडकडाट उपस्थित करणें निसर्गाचा धर्मच आहे. निसर्गतः मनुष्यप्राणी शांतीचा कितीहि भोक्ता असला, तरी निसर्गाचा आत्मा क्रांतीनेंच सदैव व्यक्त होत असतो. क्रांति निसर्गसिद्ध आहे. क्रांति नसेल तर शांतीला कोणी पुसणार नाहीं. क्रांतीशिवाय शांतीची खरीखुरी रुचीच कोणाला कळत नाहीं; नव्हे, क्रांतीशिवाय खरी शांतीच प्राप्त होणें शक्य नाहीं. अर्थात् शांतीसाठीं क्रान्तीच करणें क्रमप्राप्त व निसर्गमान्य आहे, हें सनातन तत्व एकदां नीट पटल्यावर शांतिसूक्ताचे पाठ बडबडणाऱ्यांनीं क्रांतीलाच तेवढें बिनचूक कां बरें दचकावें? अखिल मानवतेनें याच लोकीं परमेश्वरपद प्राप्त करून घ्यावे या साठींच निसर्गांत क्रांतीचा समावेश झालेला आहे. हा उद्देश डोळ्यापुढें ठेवणारा निःस्वार्थ क्रांतीला दचकत नाहीं. स्वार्थ मात्र क्रांतीची हैबत खातो. यावरून काय तें समजावें.

खुद्द निसर्गाकडे पाहिलें तरी दर घडीला क्रांतीच त्याचें वैभव वृद्धिंगत करीत असते. निसर्गाला सुद्धां मिळमिळीत एकसुरपणा (monotony) आवडत नाहीं. पावसाळा हिंवाळा आणि उन्हाळा हे तीन भिन्न भिन्न ऋतु असूनही, शिवाय हरदिन हरघडी त्याच्या रंगारूपांत विलक्षण फेरफार होत असतात. मध्यान्ह रात्रीची गंभीर निःस्तब्धता, उषःकालचें मूकचैतन्य, अरुणोदयाच्या वेळची स्फूर्तीची चमक, सूर्योदयाची प्रफुल्लता, मध्यान्हीची तीव्रता, सायंकाळची म्लानता आणि तद्नंतर हळूंहळूं येणारी रात्रीची रुद्रता हे सर्व प्रकार पाहिले म्हणजे निसर्गाची माणसांना हीच शिकवण दिसते कीं कोणत्याहि एकाच प्रकारच्या स्थितींत तुम्ही संतुष्ट राहूं नका. क्रांतीच्या पायऱ्या चढत चढतच मानवप्राणी आज इतक्या उन्नत दशेला आलेला आहे. क्रांतीची जहागिर एकट्या राजकारणाच्याच गळ्यात बांधली आहे, अशांतला प्रकार मुळींच नाहीं. धर्मकारण आणि समाजकारण यांचें महत्व राजकारणापेक्षां किती तरी मोठे आहे. फरक एवढाच कीं गुलामराष्ट्रांत राजकारणाला वाजवीपेक्षां फाजील महत्व देऊन, तेथल्या लोकांना समाज आणि धर्म या दोन महत्वाच्या क्षेत्रांत सर्वस्वीं अजागळ व आत्मरिपू बनवून ठेवण्यांतच नेत्यांची नेतेशाही टिकवून धरावयाची असते. क्रांतीची कल्पना पिंडापासून ब्रम्हांडापर्यंत रसरसलेली आहे. मनुष्याचा गर्भसंभव, जन्म, बालपण, यौवन, वृद्धपणा इत्यादि स्थित्यंतरें क्रांतीच्या पायऱ्याच होत. या प्रत्येक क्रांतीच्या पूर्वी तत्द्योतक कांहीं विशिष्ट चिन्हें स्पष्ट दृगोचर होऊं लागतात आणि थोड्याच काळांत क्रांतीचा स्फोट होऊन ती पूर्णपणें व्यक्त होते. स्त्रियांच्या बाबतींत यौवनप्राप्तीच्या क्रांतीची चमक तर इतकी विलक्षण असते कीं लहानपणीं पाहिलेली बाला तारुण्याच्या क्रांतीची छटा उमटल्यावर चटकन् ओळखणें बरेंच कठीण असतें. अशा रीतीनें क्रांतीच्या नियमबद्ध निसर्गधर्मानें अखिल प्राणीमात्र परिणतीच्या चक्रनेमिक्रात जाम जखडलेले असतांना, क्रांतीला प्रतिबंध करूं पहाणारा मूर्ख तरी असला पाहिजे किंवा निदान लफंगा तरी असला पाहिजे. परंतु जिभेवर गुलामगिरीची बुरशी माजलेले कांहीं जडजिभे असतात. त्यांना क्रांति शब्दापेक्षा उत्क्रांति शब्द थोडासा मानवतो. या दोन शब्दांत वास्तवीक भेद काय आहे, याचा विचार त्यांनीं जरी मुळींच काहीं केलेला नसला, तरी या एरंडेली मनाच्या मवाळ महात्म्यांना उत्क्रांति शब्द कसाबसा उच्चारतां येतो. क्रांति म्हटली कीं हे मेलेच मटकन् ! उत्क्रांति उर्फ एव्होल्यूशनचा मतवाद पाहिला तर असें दिसून येतें कीं एव्होल्यूशनच्या मार्गानें काहीं जीवांची परिणति होत असतां, अखेर अशीहि अवस्था येते कीं तिचा मार्ग खुंटतो. अशा वेळीं तो जीव जगण्यासाठी एकदम धडाडीचा नवीनच मार्ग काढतो आणि रूपांतर झालें तरी पर्वा नाहीं, पण जीव जगवून त्या निराळ्या मार्गानें आपली परिणति साधीत राहतो. म्हणजे एव्होल्यूशन (उत्क्रांती) चा मार्ग खुंटला कीं अखेर त्याला रेव्होल्यूशन (क्रांती) चाच अवलंब करणें क्रमप्राप्त पडतें. सारांश, उत्क्रांती उत्क्रांती म्हणून केवढाहि जप केला तरी अखेर चक्क क्रांतीची धडाडीची धडकी दिल्या शिवाय कोणत्याहि जीवाला मग तो क्षुद्र किटक असो वा उन्नत मानव असो जगणेंच कठीण असतें.

वारे नेहमींच वहात असतात. परंतु पावसाळीं तुफानाचा वारा कोणता, मध्यरात्रीचा कोणता आणि उषःकालचा कोणता, हें आपल्याला अनुभवानें तेव्हांच समजतें. वाङ्मयाचेंहि असेंच आहे. राष्ट्राची मनोवृत्ति वाङ्मयांत होत असल्यामुळें वाङ्मयावरून राष्ट्राच्या हृदयाची मंद तीव्र गति तेव्हांच अजमावतां येते. राष्ट्र स्वयंशासनाकडे झुकत आहे किंवा गुलामगिरीचा नरक चिवडण्यांतच

धन्यता मानीत आहे, हें वाङ्मयाच्या वहात्या सुरावरून तेव्हांच अजमावतां येतें. सध्यांची महाराष्ट्रीय वाङ्मयाची नाडी कोणत्या रोगाची निदर्शक आहे हें दाखविणें, हा एक स्वतंत्र निबंधाचा विषय आहे. महाराष्ट्र अनेक परिस्थितीच्या रागारंगांतून आतापर्यंत तावून सुलाखून बाहेर पडला आहे. सन १८४० च्या कै. लोकहितवादींच्या प्रबोधक वाङ्मयापासून तों थेट चालूं काळच्या पक्षांध वाङ्मयापर्यंतचा इतिहास अनेक दृष्टीनें विचारार्ह आहे. सध्यांच्या वाङ्मयाचें स्वरूप राष्ट्राच्या पुनरुज्जीवनाचें द्योतक आहे कीं सत्ताबाजीच्या बाजीरावीचें समर्थ आहे, हें चाणाक्षांना उलगडून सांगितलेंच पाहिजे असें नाहीं. 'राष्ट्रीय वाङ्मय' नामधारी लेखनाचा सूर पाहिला तर त्यांत 'राष्ट्रीय' शब्दापलीकडे काय 'राष्ट्रीयत्व' आहे, हें समजणें फार कठीण आहे. हिंदुस्थान आज स्वराज्य मुमुक्ष झाला आहे, असे म्हणतात. पण या मुमुक्ष्वावस्थेचें 'स्वराज्य वाङ्मया'त पडणारें चित्र अत्यंत विकृत अतएव अविश्वसनीय आहे. केवळ या वाङ्मयावरूनच आमच्या देशाच्या मनोवृत्तीची चिकित्सा करूं म्हटलें तर स्वराज्य स्वातंत्र्य स्वयंनिर्णय लोकशाही वगैरे शब्दांच्या शाब्दिक योजनेपलीकडे आमच्या हृदयाला त्यांचा कसलाहि संस्कार पीळ पाडूं लागला नाहीं, असाच निर्णय द्यावा लागेल. सारांश, राष्ट्राच्या पुनरुज्जीवनाची प्रभात द्योतक आहे, स्वातंत्र्याच्या किंवा स्वयंनिर्णयाच्या उषःकालचा उत्तेजक वारा वाहूं लागला आहे आणि लोकशाहीचा बुलबुल आमच्या हृदयांत आपल्या चैतन्यपूर्ण कूजनाची ललकारी दुमदुमवीत आहे, असें मानण्या इतका क्रांतीचा आत्मा प्रचलीत महाराष्ट्रीय वाङ्मयांत मुळींच चमकूं लागलेला नाहीं, असें म्हणणें प्राप्त पडतें.

क्रांतीचा कडकडाट होण्यापूर्वीचें चैतन्याचें वारें अगदींच न्यारें असतें. हें वारें प्रथम गद्यपद्यात्मक वाङ्मयाच्या द्वारें व्यक्त होऊं लागतांच, राष्ट्राच्या विचारक्षेत्रांत मोठमोठीं तुफानें सुरूं होतात. शेंकडों वर्षें गर्वानें ताठ उभे असलेले सिद्धांताचे पर्वत आमूलाग्र भराभर उखडले जातात. देव देव म्हणून मिरवलेले अनेक सत्ताबाजीचे मानवी दगड धोंडे या वाङ्मयाच्या सोसाट्यापुढें चकणाचूर होऊन पडतात. धार्मिक सामाजिक व राजकीय स्थैर्याच्या सबबीवर अस्तित्वांत आलेल्या अनेंक बंधनांचे बंद तटातट तुटतात. मनुष्याच्या भावनांवर बाजलेलीं मानसिक गुलामगिरीच्या गंजाचीं दाट पुढें भडाभड कोंसळून खालीं पडतात. बहुजनसमाजाच्या अज्ञानावर पोळांप्रमाणें चरणाऱ्या वर्चस्वबाज समाजांच्या प्रतिष्ठेला दिवसांत ढवळ्या आगी लागतात. जुन्या पुराण्या धर्ममतांच्या चर्पटपंजरीवर आपली धर्ममार्तंडगिरी टिकवूं पाहणाऱ्यांच्या बत्तिशा निखळून पडतात. क्रांतिपूर्वकालीन् वाङ्मयाच्या चैतन्याचा सोसाटाच इतका विलक्षण असतो कीं त्यापुढें राजकीय सत्तेच्या मुसंडीला ठोंकर खावी लागते; धर्मगुरूंचीं भगवीं वस्त्रें भडाड पेट घेतात आणि सामाजीक क्षेत्रांतल्या जीर्ण मतवाद्यांचीं व लफंग्या पुढाऱ्यांचीं कंबरडीं लंजूर होऊन सांदीला पडतात. या सिद्धांतांना जगाच्या इतिहासांत अनेक पुराव्यांचे दाखले आहेत. युरपियन राष्ट्रांच्या उलथापालथीचा गेल्या दोन अडीचशें वर्षांपासून तों परवाच्या महायुद्धापर्यंतचा इतिहास म्हणजे 'क्रांतीशिवाय तरणोपाय नाहीं' याच सिद्धांताचा दर्शक आहे. राष्ट्राच्या भावी निकट पुनरुज्जीवनाला सहायभूत होणारें क्रांतिपूर्वकालीन् वाङ्मय जात्याच बंधविमोचनाच्या महत्वाकांक्षेनं फुरफुरत असल्यामुळें दादोबांचे व्याकरणी नियम तें बेधडक लाथाडीत पुढें सरसावणारे असतें. त्याला कादंबरींचा नटवेपणा, नाटकांतला कृत्रिम शाब्दिक मर्दपणा, दरबारी भाषेचा चोंबडेपणा, 'लॉयल सुर्वंटांचा' 'यस प्लीज' पणा

वर्तमान दे. भ. चा दांभिकपणा किंवा मानकापरेटरांचा * (co-operator) अनत्याचारी आततायीपणा बिलकूल * शिष्ठ - मग ते कोठच्याहि क्षेत्रांतले असोत ! त्यांच्या शिष्ठाईलाच जिवंत गाडण्याचा ज्या वाङ्मयांचा उद्देश, तें शिष्ठाची काय पर्वा बाळगणार? जें बापाला बाप म्हणणार नाहीं, तें चुलत्याला काका म्हणेल होय? क्रांतिपूर्वकालीन् वाङ्मय म्हणजे राष्ट्राच्या काळजापर्यंत थेट जाऊन भिडणारा अनिरुद्ध शोधन प्रकाश ! कोणकोण दगडधोंडे देव बनले आहेत आणि कोण कोण टगे सभ्यपणाच्या बुरख्याखालीं वावरत आहेत, हें त्यास पूर्ण कळत असल्यामुळें अनेक मानवी देवांना खेटरांची पाद्यपूजा व शेंकडों सभ्यांना भर चव्हाट्यावर पैजारांचा आहेर द्यायला त्यानें मागें पुढें कां पहावें? अशा प्रकारच्या वाऱ्या प्रमाणें स्वतंत्र वाङ्मयानें युरप व अमेरिकेमध्यें कोणत्या नवमन्वंतराची क्रांति घडवून आणली, त्याचा प्रबोधक इतिहास पुढील अंकीं.

□□□

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द लागत नाही.

टिपण

वृद्ध विवेकवाद्याचा मृत्यू

पुण्याचे एक वयोवृद्ध पेनशनर नागरिक नरहर परशराम वैद्य हे ता. २७-३-२४ रोजी आपल्या वयाच्या ८५ व्या वर्षी दादर येथें मरण पावले. हे इतिहासप्रसिद्ध रंगो बापूजी यांचे भाचे. यांनी आपल्या या मर्द मातुलाची उत्तर कारकीर्द व चळवळी स्वतः पाहिलेल्या होत्या व त्यावेळच्या अनेक गोष्टी त्यांनी आम्हांस सप्रमाण सांगून 'शंभर वर्षापूर्वीच्या महाराष्ट्र' ग्रंथलेखनांतील अनेक शंकाग्रस्त प्रमेयांचे निराकरण केलें होतें. कै. जस्टिस रानडे यांच्या प्रागतिक संघांत ते अभिमान पूर्वक यथामति कार्यभाग घेत असत. कै. नरहरपंतांना गोपाळराव आगरकरांच्या कार्याचा मोठा अभिमान असे व सुधारक पत्राचे ते एक अभिमानी सक्रीय पुरस्कर्ते असत. केसरीच्या मायावी डांवपेचांमुळे एकावेळी सुधारक पत्राचे वर्गणीदार खंडू लागले असतां, नरहरपंतांनी 'दरमहा मी ३५ रुपये मदत देतो, पण सुधारक बंद पाडायचा नाही' अशी कै. आगरकरांना सक्रीय हमी दिली. सुधारकाचा प्रत्येक अंक ते नीट जपून ठेऊन वारंवार वाचीत व आपल्या कुटुंबियांकडून वाचवीत. आगरकरांच्या समग्र लेखांचे नुकतेंच जे पुनर्मुद्रण झालें, त्याला कै. नरहरपंतांच्या संग्रहीच्या सुधारकाच्या फायल्याच मुख्यत्वें सहाय्यभूत झाल्या. ते इतके वृद्ध झाले होते तरी त्यांचे विचार अत्यंत प्रगमनशील असत. 'आगरकरांच्या विचारांचा महाराष्ट्राच्या आचारांत परिपाक झाल्याशिवाय आमचे पुनरुज्जीवन होणेंच नाहीं' असें ते नेहमीं म्हणत असत. कै. लोकहितवादीचे ते फार चहाते असत. हुंडाविध्वंसक संघाच्या चळवळींत ते प्रामुख्यानें भाग घेऊन, तरुणांच्या या नवीन जागृतीचीं पावलें नियंत्रित करीत असत. कै. वैद्यांनी रंगो बापूजी बद्दल दिलेली माहिती क्रमशः प्रबोधनांत येणारच आहे. प्रबोधनावर त्यांचे अत्यंत प्रेम असे व आम्ही जोंवर दादर येथें होतों, तोंवर रोज तास दीड तास कांही ना कांही सामाजिक महत्वाच्या विषयावर कै. नरहरपंत उर्फ काका वैद्य हे आमच्याशीं उल्हासपूर्वक चर्चा करीत असत. वयमानाप्रमाणें काकांचा मृत्यू 'शोचनीय' म्हणतां यावयाचा नाहीं. तथापि जुन्या पिढींतला हा वृद्ध विवेकवादी कालवश झाल्यामुळें मन दुःखग्रस्त झालें आहे. कै. काकांच्या आत्म्याला जगदीश चिरकाल शांति देवो!

□□□

अग्रलेख

क्रांतिपूर्वकालिन् वाङ्मय
(लेखांक २)

लोकशाहीचें वास्तवीक खरें स्वरूप अझून कोणत्याहि देशांत जरी पूर्णपणें व्यक्त झालेलें नाहीं, तरी आजपर्यंत जेवढ्या म्हणून क्रान्त्या झाल्या, तेवढ्या लोकशाहीच्या ध्येयानेंच घडून आलेल्या आहेत. जनतेच्या स्वातंत्र्याला जेव्हां एखादी शक्तीवान संस्था विरोध करू लागते, तिच्यामुळें जनतेचा आचार व विचार गढळून होऊन गुलामगिरींतच रममाण होऊ लागतो आणि मनुष्यकृत निर्बंधांचे पर्यवसान ईश्वरदत्त अधिकारांत होऊ लागते, त्या वेळीं या सर्व परिस्थितीचें आमूलाग्र स्थित्यंतर घडवून आणण्याचे विचार सर्वत्र उत्पन्न होतात. परंतु विचार आचारांत उमटवून जनतेच्या मनोवृत्तीला जोराचा धक्का देण्याची धमक मात्र सर्वांच्या अंगी नसते. हें काम एखाद दुसऱ्या व्यक्तीचेंच असतें. क्रान्ती म्हणजे खून रक्तपात अत्याचार यांची पर्वणी असा अर्थ करणें फार चुकीचें आहे. अत्याचारानें परिस्थितींत केवढाहि विलक्षण फेरबदल घडवून आणला, तरी तो कायमचा टिकत नाहीं. यदाकदाचित टिकलाच तर त्यापासून खऱ्या लोकशाहीच्या परिणतीचें कार्य न होतां, उलट जबरदस्तीच्या सवाई सोट्या कारभाराखालीं जनता बेजार होते. रक्ताचा एक थेंबहि न गाळतां, फक्त जनाच्या मनोवृत्तीला धक्का देऊन एखादी विवक्षित विचारक्रांति चिरंजीव कशी करतां येते, हें प्रो. कर्व्यांच्या चरित्रावरून खासें शिकण्यासारखें आहे. तलवारीच्या जोरावरची किंवा अत्याचाराची क्रांति सत्ताभिलाषाच्या स्वार्थानें चिडचिडलेली असल्यामुळें, त्यांत लोकशाही या मूलतत्वांचीच पायमल्ली होत असे. ज्या क्रांतीनें जनता विचारप्रवण होऊन आचारक्षम बनेल, विचार व आचार या संयुक्त शक्तीच्या जोरावर आपलें स्थित्यंतर घडवून आणण्यास स्वयंस्फूर्तीने समर्थ होईल, तीच खरी क्रांति आणि तोच खरा क्रांतिकारक. मात्र क्रांतीचें स्वरूप व ती घडवून आणण्याची कार्यपद्धति निरनिराळ्या क्षेत्रानुसार कमी जास्त चोखट किंवा तिखट असते. कित्येक वेळां केवळ क्रांतिकाराच्या नुसत्या आत्मक्लेषानें जनतेची मनोवृत्ति पालटते, तर पुष्कळ वेळां हा पालट घडवून आणण्यासाठीं क्रांतिकाराला विचार-क्षेत्रांत लेखन व्याख्यानांच्याद्वारें भयंकर धुमश्चक्री माजवावी लागते. कोणत्याहि रूढ झालेल्या आचारविचाराला भयंकर धक्का दिल्याशिवाय क्रांतीचा स्फोट होऊ शकत नाहीं आणि क्रांतिकाराची सत्यप्रियता व निःस्वार्थ जितका अधिक तेजस्वी तितकी यशाची खात्री अधिक, ही अगदी खूणगाठ समजावी. फार

कशाला, पण आत्मस्तोमाचा लवमात्र अणूरेणू त्याच्या विचाराला स्पर्श करतांच कार्याची हानी झालीच म्हणून समजावें. हा एक कठीण योग आहे आणि हा ज्यांनीं साधला तेच योगी म्हणून इतिहासांत चिरंजीव होऊन बसले आहेत.

क्रांतिपूर्वकालिन् वाङ्मयांत काव्याच्या भराऱ्या किंवा काल्पनीक स्वप्नें दृष्टीस पडत नाहींत. राणा भीमदेवी भाषा फार झालें तर नामर्द गुलामांची घटकाभर करमणूक करील. शिकंदर नेपोलियन शिवाजी सारख्या अलौकिक पुरुषोत्तमांचा चारित्र्यावर कल्पनांच्या पिचकाऱ्यांतून काव्यमय विचारांचे कितीहि फवारे उडविले, तरी त्याचा विचारक्रांतीच्या कामीं रतिमात्र उपयोग होत नाहीं आणि या गद्यपद्यात्मक व्याख्यानांचा अगर लेखांचा क्रांतिपूर्वकालीन वाङ्मययांत समावेशहि होऊं शकत नाहीं. वाडवडिलांचे गुण गाऊन आपल्या वर्तमान नामर्दाईचें कसें तरी समर्थन करणाऱ्या बोलभांड कलमकसायांचे तें, फार झालें तर, पढतमूर्ख व * म्हणता येईल. जोपर्यंत एखादे गुलाम पतित राष्ट्र काव्यकल्पनांवरच तरंगत असतें, कृत पापाचा उच्चार करण्यास बाचकतें किंवा उलट त्यावर पांघरूणच घालण्याचा प्रयत्न करते, आणि नुसत्या उदात्त तत्वाच्या लंबाचौड्या बांतावर स्वयंनिर्णयाचा मोक्ष मिळवूं पहाते, तोपर्यंत त्याची नष्टचर्यावस्था संपलेली नाहीं, असें खास समजावें. मन गुलाम झाल्याशिवाय राष्ट्र गुलाम होत नाहीं. अर्थात राष्ट्र स्वतंत्र करावयाचें असल्यास, मनावर बाजलेलीं गुलामगिरीचीं बोजड पुटे निर्दयपणानें प्रथम फोडून काढावीं लागतात. क्रांतिपूर्वकालीन वाङ्मय अवडंबरी नसतें. त्याचीं रचना सरळ व सुबोध असतें. त्याची विचारसरणी स्पष्ट असते. तें अत्यंत निर्भीड निःस्वार्थ व स्वतंत्र असल्यामुळें राष्ट्राच्या गुलामगिरीला कारण झालेल्या कोणत्याहि सत्तेच्या वरचढपणाचा तें मुलाजा राखीत नाहीं. एखादी व्यक्ती कोट्याधीश आहे, सरकार दरबारीं तिचा दांडगा वशिला आहे आणि पैशाच्या जोरावर ती साऱ्या दुनियेला झुकविण्यास समर्थ आहे, एवढ्याच मुळें तें त्याचीं अंडीपिलीं बाहेर काढून ठेंचण्यास मागें पुढें कधींच पहाणारें नसतें. सत्ता, मग ती कोणतीहि असो, भिक्षुकशाही असो, राजेशाही असो सरदारशाहि असो, श्रीमंतशाही असो, भांडवलशाहीं असो, नाहींतर गुंडशाही असो, तिच्या सत्ताबाजीमुळें जनता जर गुलामगिरींत सडत आहे, तर तिच्यावर बेगुमानपणें स्पष्टोक्तीचा हल्ला चढवायला तें वाङ्मय कधींच कचरत नाहीं.

नीट बारकाईनें विचार केला तर जगाच्या गुलामगिरीचा नरक जिवंत ठेवणारें एखादें 'फॅड' जर कोणतें असेल तर तें धर्म होय. धर्माच्या नांवाखालीं जगानें गुलामांचा जेवढा व्यापार केला आहे, तितका एकाहि सत्ताबाज अरेरावानें केलेला नाहीं. धर्म माणसाला मोक्ष देतो ही गोष्ट खरी खोटी धर्म जाणें पण धर्मानें आजपर्यंत गुलामगिरींत जितकी जिवंत माणसें ठार मारलीं असतील, तितकी रोगराईनेंहि मेलीं नसतील. राजकारणी गुलामगिरी घराच्या ओसरीखालींच थबकते, पण धार्मिक गुलामगिरी नुकत्याच जन्मलेल्या पोराच्या नाळवारीला सुद्धां जाऊन भिडते. राजकारणी गुलामगिरीचा सांपळा फार झालें तर जीत राष्ट्रांतल्या सर्व संपत्तीच्या स्वाहाकाराबरोबर तेथले दगड धोंडे माती सुद्धां पिळून मळून खाईल, पण धर्माच्या गुलामगिरीच्या चरकांत माणूस जिता असूनहि मेल्याप्रमाणें चिपाड कसा बनतो, हें हिंदु समाजाच्या वर्तमान चित्रावरून वाटेल त्यानें पाहून घ्यावें. नेत्यांचें राजकारण जितांच्या खिशांपर्यंत

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द लागत नाही.

आपला बहाद्दर नांगर घुसडवीत नेईल, पण धर्माच्या गुलामगिरीची करवती भिंगरी माणसाच्या मनाच्या चिंधड्या उडविण्यास पुरी सवकलेली आहे. म्हणूनच जगांतल्या क्रांतिपूर्वकालीन् वाङ्मयाचा इतिहास पाहिला तर त्याचा पहिला निकराचा हल्ला भिक्षुकशाहीवर उर्फ धर्ममार्तंडब्रुव वर्गावरच चढविलेला आढळतो. मनुष्याला पाठीपेक्षां पोटाची काळजी फार. पाठीवर मारा पण पोटावर मारूं नका, असें प्रत्येकजण म्हणतो. तद्वतच गुलामगिरीचा मारा देहावर झाला तर खुशाल होवो, पण मनाला त्याचा वारा सुद्धां लागूं देतां कामां नयें. परंतु भिक्षुकशाहीचें पोट माणसांच्या मनाच्या सरणावरच तरणारें असल्यामुळे राष्ट्राच्या गुलामगिरीच्या जबाबदारीचा मोठा भाग सरळ रेषेंत धर्म मार्तंडांकडेच जातो. धर्म म्हणजेच गुलामगिरी. किंबहुना गुलामगिरीलाच धर्म हा प्रतिशब्द योजला, तर 'गुलाम हिंदुस्थान' या शब्दप्रयोगाऐवजीं 'धार्मिक हिन्दुस्थान' ही शब्दयोजना खुशाल करावी. १६व्या शतकांत युरोपमध्यें क्रिस्ती भिक्षुकशाही जेव्हां मदोन्मत्त बनली, क्रिस्ती धर्माला जेव्हां तिनें पापपुण्याच्या व्यापाराचें रूप देऊन आपला आर्थिक तळीराम गार करण्याचा धूमधडाका सुरूं केला आणि भिक्षुकी अडत्यांच्या मध्यस्थीनें जेव्हां राजेशाही व सरदारशाही मुर्दाड बनून जनतेच्या काळजाचें लचके तोडूं लागली तेव्हा मार्टिन लूथरने लोकहितवादासाठीं प्रथम भिक्षुकशाही छावण्यांवरच आपल्या वाग्लेखनास्त्राचा ज्वालामुखी फेंकण्यास सुरुवात केली. भिक्षुकशाहीच्या शिव्याशापांची, प्रतिष्ठितांच्या नरकपाती या धमक्यांची आणि राजसत्तेचया 'कायदेशीर' छळाची त्यानें पर्वा केली असती, किंवा श्रीमंतशाहीच्या लाचलुचपतीची आपल्या क्रांतिपूर्वकालीन तेजस्वी वाङ्मयात फोडणी घालून तें किंचित अळणीं केलें असतें, तर युरोपमध्यें 'रिफॉर्मेशन'च्या क्रांतीचा सूर्योदय झालां असता काय? राष्ट्राचें पुनरुज्जीवन करूं इच्छिणारांना प्रथम भिक्षुकशाही सत्तेचाच मुर्दा पाडावा लागतो. मानवी प्रगतीला धर्मबर आड येत असेल आणि त्याची पुनर्घटना होण्याइतकी लवचिकता जर त्यांत शिल्लक उरलेली नसेल, तर लोकहितवादासाठीं धर्मालाहि भिक्षुकशाहीच्या मढ्याबरोबर बिनदिक्कत जाळून पोळून खाक केल्यास काहीं हरकत नाहीं. युरोपियन क्रांतिपूर्वकालीन् वाङ्मयाच्या १८व्या शतकाच्या इतिहासात गिबन व व्होल्टेर हीं नांवें प्रमुख आढळतात. या दोघांची वाङ्मयसेवा म्हणजे एक मोठे प्रस्थच होय. व्होल्टेरला अन्यायाची भयंकर चीड असे. अन्यायानें गांजलेल्या जनतेच्या वतीनें त्यानें केलेल्या संग्रामाचा इतिहास म्हणजे त्याच्या चारित्र्याचा अत्यंत उज्वल भाग होय. गिबन तर उघड उघड त्याचा शागीर्द. दोघांची मतें जवळ जवळ सारखीच. 'जगांत धर्माचें असलेलें अस्तित्व, विशेषतः क्रिस्ती धर्माच्या थोतांडाचें माजलेलें बंड, हा एक मोठा क्रिस्त घोटाळा होय. धर्माची ही बाजू म्हणजे मानवी प्राण्याच्या घटनेंतला उन्मादच म्हटला तरी चालेल.' या मताचे ते प्रवर्तक होते. गिबनचा रोमन साम्राज्याचा प्रचंड इतिहास म्हणजे या साम्राज्याच्या ऱ्हासाला व अधःपतनाला मूळ कारण झालेल्या क्रिस्ती धर्मावर निकराचा हल्लाच म्हटला तरी चालेल. क्रिस्ती धर्मानें आंतून पोंखरण घातली म्हणूनच रोमचा सत्यानाश झाला, असें गिबनचें स्पष्ट मत आहे. क्रिस्ती धर्माची सरकारी नीति म्हणजे व्होल्टेरला 'गाळीव बेशरमपणा' वाटत असे. या धर्मानें लोकांचे जीवित कोंडलें, त्यांच्या विचारांना प्रतिबंध केला आणि केवळ मतभिन्नतेच्या अपराधावरून अनेक निरपराध्याचा छळ केला' असें तो म्हणत असें. गिबन आणि व्होल्टेरच्या वाङ्मयानें युरोपच्या क्रान्तीचक्रास किती अचाट शक्ती मिळाली, तें आंग्लभाषा जाणणारांस तरी सांगणें नको. अमेरिकेच्या इतिहासांत क्रांतिपूर्वकालीन वाङ्मयांत एका बाईनें लिहिलेल्या Uncle

Tom's Cabin या ग्रंथाचा मान अग्रेसर आहे. गुलामांच्या व्यापारास बंदी करण्यासाठीं अमेरिकेंत जे युद्ध झालें, त्याचा पाया या पुस्तकानें घातला. अमेरिका स्वतंत्र होण्याला ज्यांच्या विचारांची धडाडी कारण झाली, त्यांत पॅट्रिक हेनरी व जेम्स ओटीस हीं दोन नांवें चिरंजीव आहेंत. जेम्स ओटीसचीं मतें अशी होती -

(१) ईश्वरानें सर्व माणसें सारख्याच दर्जाचीं निर्माण केलीं आहेत.

(२) ऐहिक श्रेष्ठत्वाच्या कल्पना शुद्ध शैक्षणीक आहेत, जन्मजात नव्हेत.

(३) लोकांच्या कल्याणासाठींच राजा निर्माण केला जातो; राजाकरिता लोक निर्माण होत नसतात.

(४) प्रजेला गुलाम बनविण्याचा अधिकार कोणत्याहि सरकारला नाही.

(५) बरीचशीं सरकारें वास्तवीक हम करेसो कायदा असतात व त्यामुळें ती मानवी प्रवृत्तीला बाधक व लांछनास्पद होतात, तरी कायद्याच्या दृष्टीनें तीं अरेराव ठरत नाहींत. अमेरिकनांच्या या विचाक्रान्तीचें श्रेय जॉन लॉक (१६३२ - १७०४) नामक एका इंग्रेज लेखकाला आहे. सध्यां अमेरिकेंत लोकशाहीच्या कल्पनांचा जो प्रादुर्भाव झाला आहे, ती पलट घडवून आणण्याचें काम लॉकच्या Two Treatises on Civil Government ग्रंथानेंच केलेलें आहे. कर्नल इंगरसॉलचें वाङ्मय म्हणजे क्रांतिपूर्वकालिन् वाङ्मयाचा उत्कृष्ट नमूनाच होय. फ्रान्स देशाच्या जगप्रसिद्ध राज्यक्रांतीच्या घटनेला मॉंटेस्क्यू, डिडरो, रोसो, इत्यादि लेखकांचे विचार क्रांतीकारक लेखच कारण झाले. सारांश, जगाच्या प्रवृत्तीचा ओघ निर्भेळ स्वातंत्र्याकडे अप्रतिहत वहावा, गुलामगिरी नष्ट व्हावी, माणसानें माणसाला उच्च नीच लेखूं नये, पापपुण्याच्या भीतीनें माणसांनी जनावरें बनूं नये, अशा उदात्त व निः स्वार्थ हेतूच्या प्रेरणेनें जें वाङ्मय बाहेर पडतें, त्याचा पहिला घाव धार्मिक स्वातंत्र्यार्थ भिक्षुकशाहीवरच पडतो व नंतर क्रमाक्रमानें त्याचा मोर्चा इतर शाह्यांवर वळतो, हेंच इतिहासावरून दिसून येतें.

□□□

लेख

रिकामा न्हावी भिंतीला तुंबड्या लावी

ठाण्याचे आमचे एक वृद्ध मित्र राजमान्य राजश्री अनंत महादेव उर्फ आण्णासाहेब चौबळ म्हणजे एक वल्ली आहे. हे मुंबई हायकोर्टात डेप्युटी रजिस्ट्रार आहेत. हे चांगले लेखक आहेत. यांचे वाचनहि फार दांडगें आहे. हे विचारशील आहेत. यांनीं विधवांच्या पुनर्विवाहावर साथक बाधक विवरणांचे 'पुनर्विवाह शास्त्रादि विचार' नामक एक भले जाडजूड बाडहि लिहिलेले आहे. परंतु एवढ्यावरूनच त्यांना कर्त्या किंवा बोलक्या सुधारकांत कोणी ढकलूं म्हणेल तर लालबाग परळच्या तरूण कायस्थांना जशी आपल्या हाताने आपल्या तोंडात मारून घेण्याची वेळ आली, तोच प्रसंग बिनचूक यायचा! १९२३च्या मार्च महिन्यात या तरूणांनी कै. गजाननराव वैद्य संशोधित हिंदु वैदिक विवाह पद्धतीचा परिचय करून देण्यासाठी सुप्रसिद्ध थिओसफिस्ट व कै. वैद्याचे सहचारी हिंदू मिशनरी श्री. बाळासाहेब राजे यांचे एक व्याख्यान करविलें आणि रा. आण्णासाहेब चौबळ मोठे प्रागतिक म्हणून त्यांची अध्यक्षांच्या खुर्चीत स्थापना केली. अध्यक्ष म्हटला म्हणजे ज्या विषयाचे व्याख्यान त्याची त्याला पूर्ण जाणीव असावी, त्याचा त्यावर बराच विचार झालेला असावा व तद्विषयी त्याची सहानुभूति उत्पन्न झालेली असावी. नाहीतर विषय असावा 'विधवा केशवपनापासून राष्ट्राची उन्नति' आणि अध्यक्ष तर कोण म्हणे सेवासदनाचे देवधर. विषय 'विधवा पुनर्विवाहाची आवश्यकता' आणि अध्यक्ष कोण शोधून काढलें वाईचे लेलेशास्त्री. हाच थेट प्रकार लालबागच्या कायस्थ तरूणांनी या राजमान्य चौबळांना निवढण्यात केला. त्यांना वाटलें विधवा-पुनर्विवाहावर यांनी एवढें बाड प्रसविलेले आहे, तेव्हां हे मोठे प्रगमनशील पंडित असतील. पण काय? नमनाच्या गणालाच या अध्यक्ष-गणोबानें 'मला आजच्या विषयाची काहीच माहिती नाही व मी कधि त्यावर विचारहि केलेला नाही' असला नन्नाचा पाढा वाचला. खरोखरीच जर हि स्थिति होती तर त्या कोऱ्या करकरीत भोळ्यानें अध्यक्षस्थान स्वीकारण्याची तरी काय जरूरूत होती? या वाटेल त्या उपटशुंभासाठीच अध्यक्षपदाचा जन्म झालेला आहे! अध्यक्षपद म्हणजे वाटेल त्या दगडा धोंड्यानें आंगावर शेंदूर माखून उभे राहण्याचा तिवाठा, की रिकाम्या कोनाड्यांतली पणती, की धर्मशाळेतली ओसरी! काय समजतात काय चौबळ अध्यक्षपद म्हणजे? ज्या विषयात आपल्याला गम्य नाही, जो विषय कै. गजाननरावाच्या अमदानीत त्यांनी

अखिल हिंदुस्थानात दणाणून सोडला आहे. त्यावर कधि विचार करण्याची आपल्याला सवड झाली नाही किंवा ज्या पद्धतीने एक ना दोन पन्नास लग्नें ब्राम्हण ब्राम्हणेतरादि अनेर जातीत झालीं, हिराबागसारख्या जाहीर ठिकाणी जाहीर रितीने झाली. ती पाहण्याची तसदी घेण्याची चुकूनसुद्धा बुद्धि झाली नाही, त्याच विषयावरच्या व्याख्यानाचे अध्यक्षपद स्वीकारण्याऐवजी स्पष्ट आधीच नकार दिला असता तर तुमचे कोणी कान कापणार होता? पण आण्णासाहेब चौबळांना नसत्या उठाठेवी करण्याची खोड मोठी. करमेनासे झाले की घे लेखणी, खरड कशावर काही तरी, धांव अरुणोदय छापखान्यात आणि काढ काहितरी एखादें बाड नाही तर फुलस्केप धांदोटा बाहेर, हा त्यांचा आज कित्येक वर्षाचा व्यवसाय. मग त्याला काळ असो वा नसो, महत्त्व असो वा नसो, त्याची त्यांना पर्वा नाही. मध्यंतरी अशाच कसल्या सटरफटर ज्ञातिफंडावर त्यांनी चार फुलस्केपाचे एक पुराण प्रसिद्ध केले होते. राजवाडे प्रकरणाच्या गोंवऱ्या ओंकारेश्वरावर जाऊन विझल्यानंतर कित्येक महिन्यांनी या स्वारीच 'कायस्थधर्म निबंधाचे परीक्षण' बाहेर पडले. वराती मागून घोडे हाकण्याची यांना आदतच पडलेली आहे. परंतु नुकतेच त्यांनी हिंद विवाह-पद्धतीचे संशोधन अथवा ''हिंदु मिशनरी सोसायटीच्या हिंदु वैदिक विवाहपद्धतीचें परीक्षण'' नामक एक चोपडें प्रसिद्ध करून लग्नाआधीच वरातीचे घोडे दामट्याची फुशारकी मिळवण्याचा पोरकट व हास्यास्पद यत्न केला आहे. सुरुवातीलाच हे लेखक म्हणतात ''ह्या (हिंदु मिशनरी) सोसायटीने सांप्रत हिंदु वैदिक विवाहपद्धति आपल्या मते ठरवून ती हिंदूच्या सर्व ज्ञाति समाजात त्यांच्या प्रचलित विवाहपद्धतीचे ऐवजी रुढ करण्याचा नवीन उद्योग आरंभिला आहे'' या अवतरणांतील सांप्रत, आपल्या मतें आणि नवीन उद्योग हे शब्द वाचकांनी लक्षात ठेवावे. यामुळे रा. चौबळ आपल्या भोळसर वाचकांना असे भासविण्याचा दुष्ट यत्न करीत आहेत की कै गजाननराव वैद्यांनी संशोधन करून तयार केलेली वैदिक विवाहपद्धति हा एका कल्पित कादंबरीप्रमाणे (किंवा खुद्द चौबळांच्या चोपड्याप्रमाणें) एक नवीनच काहीतरी गोडबंगाल आहे. त्यात जुने असे काहीच नसून उलट नवीन भरंमाट सोसायटींच्या मताचें फिसाट आहे, आणि हे फिसाट हिंदु समाजाच्या बोकांडी लादण्याचा ही सोसायटी सांप्रत-अगदी कालपासून नुसता उपद्व्याप करीत आहे. प्रबोधनाच्या १ल्या वर्षी विवाहविधीचें संशोधन या मथळ्याखाली प्रसिद्ध झाली लेखमाला (पहा पृ. ५० व ५८) ज्यांनी वाचली असेल, किंवा कै वैद्यांच्या ह्यांतींत निघालेले हिंदु मिशनरी साप्तहिकाचे अंक ज्यांच्या वाचनांत आतील, त्यांना रा. चौबळांचा खोडसळपणा अधिक उघडा करून दाखविणें नको. कांही वाचायला नको, पाहायला नको, त्यावर विचार करायला नको आणि मन मानेल तसे अकांडतांडव केल्याने विद्वतेचे समर्थन होईल. अशा रा. चौबळांनी व्यर्थ अपेक्षा करू नये. ज्या पंडिताने हा विधि संशोधनपूर्वक सिद्ध केला, त्या कै. गजाननराव वैद्यांपेक्षा आपण कोणि तरी मोठे जाती प्रस्थ आहोत, असें जनतेला भासविण्याचाही प्रस्तुतचा रा. चौबळांचा यत्न पोरकट व क्षुद्र बुद्धिचा द्योतक आहे. कै. वैद्य ह्यात असताना असतांना त्यांनी आपली वैदिक विवाह पद्धति प्रत्यक्ष प्रयोग रुपाने अनेक वेळा जनांसमोर मांडली त्यावर आपल्या पत्रांतून चिकित्सा केली व करविली. त्या वेळी हे ठाणेकर कलमकसायी काय करीत होते? प्रस्तुतची पद्धति अझून छापली गेलेली नाही, ही गोष्ट खरी. याला कारणेच द्यायची तर ती व्यावहारीक अडचणीपेक्षां अधिक कसलीहि नाहीत. नुसते मंत्रच छापावे ते सटीप व भाषांतरासह छापावं की सचित्र प्रयोगाचे त्यांत फोटो घालावे; कसेही असले तरी या

प्रकाशनाचें काम कोणी हाती घ्यावें, असल्या बातबेतांतच काळ निघून गेला. ही वास्तवीक स्थिति. परंतु यावर रा. चौबळांनी सोसायटीवर घेतलेले आक्षेप अत्यंत पाजीपणाचे आहेत. आमच्याच विधीनें लग्ने * अशी सोसायटीने कोणावर बळजबरी केल्याचे एक तरी उदाहरण रा. चौबळांनी दाखवून द्यावें. शिवाय या विधिवर सोसायटीचा काही एक हक्क नाही, किंवा हा विधि सोसायटीचा ट्रेडमार्क नव्हे. कै. गजाननराव वैद्यांनी हा विधि अखिल हिंदु जनतेकरिताचं संशोधन करून ठेवला आहे. अर्थात एवढे जबाबदारीचें कार्य पूर्ण करतांना, कै. वैद्यांनी कायद्याच्या प्रश्नाकडे अगदीच डोळेझांक केली असेल असे समजणारा माणूस आम्हाला तरी अझून आढळला नाही. त्यांच्या कार्यशैलीची पद्धतच अशी की आपण करूं ते कार्य लोकमान्य होण्यासाठी असतील नसतील तितक्या सामाजिक धार्मिक व विशेषतः राजकीय अडचणींचा ततरंक्षत्रीय प्रवीण सल्लागरांच्या विचार विनिमयानें त्यांची सल्ला व अनुमति प्रथम मिळवल्याशिवाय ते कोणतीहि गोष्ट प्रगट करीत नसत. कै. वैद्य प्रत्यक्ष एलेल्बी नसले तरी, एलेल्बीच्या मांडवाखालून गेलेले होते, हे चौबळांनी लक्षात ठेवावे, हि. मि. सोसायटीला कायद्याच्या बाबीत सल्लामसलत देणारें एक वकिलमंडळहि आहे आणि त्यात मुंबईचे कांही नामांकित सॅलिसीटर्स प्रेमानें ऑनररी काम करीत असतात. प्रस्तुतच्या विवाहविधीच्या संशोधन कार्यात कै. टिळकांपासून तो थेट कै. वामनशास्त्री किंजवडेकरांपर्यंत अनेक अधिकारी शास्त्रज्ञ व कायदेपंडीत यांच्या सहायाची भर पडलेली आहे. धर्म व कायदा ह्या दोनहि कसोटीला सोळा आणे उतरल तेव्हाच हा विधी प्रगट झालेला आहे व कै. वैद्यांनी तो अखिल हिंदु जनतेला अर्पण केलेला आहे. ज्यांना तो आवडतो, प्रचलित अवैदिक धांगडधिंग्यापेक्षां त्यातं ज्यांना खरा वैदिक प्रकार प्रत्यक्ष आढळून येतो आणि विवाहकार्यांचे खरेंखुरे वैदिक मांगल्य पटते, ते लोक चौबळांच्या रुखवत-ऐरणी-हुंडाप्रासादिक विधीच्या ऐवजी आपखुषीनें मान्य करीत आहेत. रा. चौबळांनी पर्वाच केली असती तर त्यांना प्रस्तुत विधीची एक नक्कल आम्हीसुद्धा दिली असती. परंतु नुसते व्याख्यान ऐकून त्यावर टिका खरडण्याची त्याची उन्मत वृत्ति पाहिली की ठाणेकर अबकारीमुक्त कायस्थाचा कैफ त्यांना आला की काय असे वाटल्याशिवाय रहात नाही. कै. वैद्यांनी संशोधनपूर्वक निश्चित केलेल्या विवाहविधीच्या कायदेशीरपणाबद्दल १९ डिसेंबर १९१८ पासून तो आज दीनपर्यंत कोणालाहि जी शंका आली नाही, ती आज रा. चौबळांना यावी, यात आम्हाला त्यांच्या चातुवर्ण्य-भिक्षुकशाही-प्रासादिक गुलाम मनोवृत्ती शिवाय दुसरे कोणतेंहि कारण दिसत नाही. आज ठाणे म्हणजे कायदे पंडितांचे ठाणे. कायदेबाजीचा प्रश्न आपल्या वाचकांच्या आंगावर ढकलून आपण नामानिराळे होण्यापेक्षां एखाद्या कायदेपंडिताचा अभिप्राय घेऊन तेवढा प्रसिद्ध करण्याची या रिकामटेकड्या उपद्व्याप्यानें कां मेहनत घेतली नाही बरें? सारांश, प्रस्तुत चोपड्यात कायदेबाजीच्या बुजगावण्यानें लोकांत प्रस्तुतच्या विधीबद्दल गैरसमज पसरविण्याचा दुष्ट हेतू आहे. हे कोणाच्याहि लक्षात येण्यास कठीण पडणार नाही. खुद्द कै. वैद्यच म्हणतात (पहा प्रबोधन वर्ष १ लें पृ. ५०-५१) ''कायद्याच्या कोर्टात हिंदु विवाहविधीचा कोणता भाग आवश्यक लागतो त्यांची चौकशी केली, तेव्हा दानप्रतिग्रह, विवाह होम आणि सप्तपदी इतकी तीन विधीकर्मे झाली म्हणजे काम होते, असे समजले.'' * त्यानी मुद्दाम प्रबोधनांत दिलेले दोन लेख पुन्हा वाचल्यास रा. चौबळांनी भिक्षुकी

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द दिसत नाही.

माया किती वात्रट आहे हे त्यांना नीट पटेल!

रा. चौबळ मोठे विद्वान असतील, खंदे वाचनमग्न असतील व फंडे लेखकहि असतील, पण त्यांची विद्वता वाचन, लेखन असून भिक्षुकक्षाहीप्रणित मानसिक दास्याच्या नरकातच फिरत आहे. चातुर्वर्ण्य आणि वेदोक्त पुराणोक्त त्यांच्या मनावर जन्मजात एवढा जबरदस्त पगडा बसलेला आहे की भटाच्या हातलावणीशिवाय झालेली लग्ने पाहून त्यांना एरंडेल प्याल्यासारखे वाटते. भटांचे पायाचे पाणी तीर्थ म्हणून पिता पितां आणि भटाच्या पोपटपंचीवर गर्भदानाची सांगता करतो पिढ्यान् पिढ्या मोक्षाला गेलेल्या जातीत भटाशिवाय लग्ने! या समजुतीच्या पुरस्कारार्थ रा. चौबळांनी सोडलेले अधिकारानाधिकाराचे पुराण व तत्सिद्यर्थ दिलेला चातुर्वर्ण्याचा शिमग्याचा हवाला पाहिला की लेखक भिक्षुकी पायतणाचा केवढा इमानी नाल बनलेला आहे. याची तेव्हाच साक्ष पटते. जेंथें कुणबी मंडळी महार मांगादि शेकडों जाती भिक्षुकशाहीच्या बेकायदेशीर मध्यस्थीला झुंगारून देऊन स्वयंनिर्णयाचा आक्रम करीत आहेत. तेथे भिक्षुकांची तरफदारी करतांना, व कायस्थांची लग्ने कायस्थांनी लावली म्हणून घासलेट प्याल्यासारखे तोंड करताना रा. चौबळांना शरम वाटली पाहिजे. काय पूर्वी कायस्थांची लग्ने कायस्थांनी लावली नव्हती! प्रामण्यांच्या इतिहासातील पृ. ११७ ते १२० वरील मजकूर वाचा एकदा चौबळ, बळवंतराव मल्हार चिटणीसाच्या पुढारपणाखाली त्यावेळी ज्या शेकडो कायस्थांच्या मुंजी व लग्ने कायस्थ पुरोहितांनी लावली ती घराणी आज कायस्थच आहेत की अकरमासे रांडलेकावळे म्हणून प्रसिद्ध आहेत? संशाधिक वैदिक विवाह पद्धतीने लागलेली लग्ने उद्या बेकायदेशीर ठरली (असे एखादे उदाहरण रा. चौबळांनी आवश्य घडवून आणावें, म्हणजे शांताकारं भुजयनशयनं मंत्राने साजऱ्या होणाऱ्या प्रचलित सप्तपद्यांची कायस्थांची लग्ने तरीं कितपत कायदेशीर ठरतात ते आम्ही पाहून घेऊं) तर पुढें त्यांच्या संततीची वाट काय म्हणून रा. चौबळांना हद्रेग लागला आहे. वाट काय लागणार? पौराणिक भिकमाग्या रुढाचाराचा लवलेष नसलेल्या अस्सल ऋग्वेदांतर्गत आश्वलायन गृह सूत्रोक्त विवाह विधी आधी बेकायदेशीर ठरवा, मग असल्या विवाहाची संतती जातिभेदाची होळी करून नुसते हिंदु म्हणून खुशाल राहील. फार चांगले होईल. कायस्थप्रभू म्हणवून घेण्यात तरी काय मोठा पुण्यांश आता उरला आहे? आणि बापजादांच्या इतिहासपठणावर तरी आजचे कायस्थी असे किती दिवस जगणार? आयतांच एक ऐदी घमेंडखोर जात नष्ट झाली तर देशाच्या मानेला लागलेल्या जातिभेदाच्या फासांचा तेवढाच एक तणावा कमी होईल. हा काय थोडा फायदा?

'ज्ञातिसमाजाच्या मान्यते'चे एक फिसाट रा. चौबळांनी काढले आहे. आम्ही त्यांना उघड सवाल टाकतो की तुमच्या कायस्थप्रभू ज्ञातिसमाजाच्या सामाजिक धार्मिक व राजकीय (अब्रह्मण्यम् ! चुकलों. राजकीय शब्द मागे घेतो. राजकारण आणि कायस्थ? वेळी हिंदु मुसलमान एक होतील, पण चुकून सुद्धा कायस्थ राजकारणाला शिवणार नाहीत) सामाजिक आणि धार्मिक भावनांचे नियंत्रण करणारी व मान्यता देणारी संस्था कोठच्या * कोठच्या कोपऱ्यात आहे? कोण गद्धा तिचा अध्यक्ष आहे! तुमच्या ज्या कॉन्फरन्सी आजपर्यंत भरल्या. त्यांच्या ठरावांची कोण किती अंमलबजावणी केली? हे मान्यामान्यतेचें कंगाट कोण कोण अधिकारी बृहस्पती चालवीत असतात? त्यांना अधिकार

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द दिसत नाही.

कोणी दिला? देवाऱ्यात नाही देव, नवसाची फुका उठाठेव कशाला करता राव? ज्या गावच्या भोरी त्याच गावच्या बाभळी. झाकली मूठ फुका उघडून सवालाखाची पत तरी कशाला नगडा उघडी करून घेता? चातुर्वर्ण्य वेदोक्त पुराणोक्त वगैरे लटपटींच्या पुराणांनी फसणारे काही थोडे भाबडे प्राणी कदाचित तुमच्या ह्या भिक्षुकी चोपड्याला बाचकतील; पण अधुनिक विचाराची गति या पेक्षां फार पुढें गेलेली असल्यामुळें, तुमच्या या क्षुद्र बुद्धिच्या प्रयत्नाला पाहून लोक असेच म्हणतील की रिकामा न्हावी भिंतीला तुंबड्या लावीत आहे, झाले! तुमच्या या चोपड्याला कचऱ्याची पेटी दाखवून आम्ही स्वस्थ बसलो असतो परंतु ढेकूण जरी क्षुद्र असला तरी त्याला ठेचायलांहि धावा धाव करावी लागतेच. त्याप्रमाणे अपरिपक्व विचारांच्या लोकांची दिशाभूल होऊ नये म्हणून आपल्या उपद्व्यापामुळे हा उद्योग आम्हाला करावा लागला, त्याची क्षमा असावी.

□□□

लेख

स्वराज्याभिमानी छत्रपतिनिष्ठ प्रभु रंगो बापुजी गुप्ते देशपांडे यांचे संक्षिप्त चरित्र

वंशावळ

भिकप्रभु, हरप्रभु, बालप्रभु, भानप्रभु,
जाऊप्रभु, सावप्रभु,
नरसेप्रभु
|
दादजी प्रभु
(शिवाजीला स्वराज्याची शपथ देणारा.)
|
कृष्णाजी (शाहुबरोबर दिल्लीस) — येसाजी
|
रामजी* — (*पानपतास पडले) — चिटको*
|
बापूजी
|
रंगो (स्वराज्यासाठी झगडून देह ठेवणारा अखेरचा सच्चा कायस्थ प्रभु वीर)

राज्य मराठी शिवरायाचे का कायस्थांचे
कायस्थांच्या रक्तावरती बुरुज उभे त्याचे ।।
प्राणप्रतिष्ठा त्या राज्याची कायस्थे केली
अवतारी शिवमूर्ती वरती मग स्थापना केली ।।

प्रस्तुत ऐतिहासिक महत्वाचा ग्रंथ अनेक मराठी व इंग्रजी इतिहासग्रंथांच्या व जुन्या अस्सल कागदपत्रांच्या आधाराने तयार केला आहे. तथापि एक अत्यंत महत्वाची गोष्ट ही की हिन्दवी स्वराज्याच्या गर्भावस्थेपासून तो त्याचा खून पडल्यावर सुद्धा त्याच्या पुनरुज्जीवनासाठी थेट विलायतपर्यंत

प्राणान्तीचा झगडा झगडण्यांत ज्या कायस्थ प्रभु घराण्याने आपला एकूणएक मोहरा बळी दिला, त्याच घराण्यातील शेवटच्या स्वराज्याभिमानी मर्दाने प्रस्तुत इतिहासाची अखेरची पुष्पांजली महाराष्ट्र भूमातेच्या चरणी वाहून आपल्या आयुष्यावर शेवटचा पडदा सोडला. ही पुष्पांजली जर त्याने वाहिली नसती व महाराष्ट्रजननीने ती आपल्या प्रेमळ हृदयांशी जर जपून ठेवली नसती, तर वाचकहो, हिन्दवी स्वराज्याच्या खुनाचा इतिहास जगापुढे केव्हांहि आला नसता. चांद्रश्रेणीय कायस्थ प्रभु समाजाने हिन्दवी स्वराज्यासाठी एकनिष्ठेने गाजविलेल्या कलम-समशेरीच्या पराक्रमाला क्षुल्लक व कःपदार्थ ठरविण्याची कृतघ्न कामगिरी भिक्षुकशाही इतिहासज्ञांनी (?) आजपर्यंत मनमुराद गाजविली; परंतु फार खेदाची गोष्ट की हीच प्रवृत्ति अलीकडे कांही सुशिक्षित म्हणविणाऱ्या मराठे बांधवांतहि दिसून येऊ लागली आहे! हे शुद्ध अज्ञान आहे. अल्पज्ञानाचा कैफ आहे, आत्मस्तोमाची व वर्चस्वलालसेची क्षुद्र भिक्षुकी नक्कल आहे. आमचे मराठेबांधव इतिहासाध्ययनांत जसजसे प्रबुद्ध होतील, तसतसा त्यांच्या हृदयांत सत्यनिर्णयाचा प्रकाश पडेल आणि स्वराज्यकालीन कायस्थांच्या एकनिष्ठ कर्तबगारीला तुच्छ मानणे म्हणजे प्रत्यक्ष श्री शिवरायाशी कृतघ्नता दर्शविण्यासारखेच घोर पातक आहे, याची प्रचीति त्यांना त्यांचा आत्मारामच आणून देईल. मराठे बांधवांच्या उन्नतीसाठी व वैभवासाठी कायस्थ प्रभु समाज भणंग भिकारी झालेला आहे. कलमसमशेरीच्या प्रभावांत त्याने आजपर्यंत जरी कोणाची टाप चालू दिली नाही, तरी स्वार्थाच्या बाबीत तो अत्यंत उदास किंबहुना बावळट आहे म्हटल्यास हरकत नाही. म्हणूनच ज्या ज्या वेळी हातात मनमुराद सत्ता लाभण्याचे प्रसंग आपण होऊन कायस्थ वीरांच्या पुढे दत्त उभे राहिले. त्या त्या वेळी त्या सत्तालक्ष्मीचा धिःकार करून, त्यांनी 'छत्रपतीच्या पायाची सेवा हीच अखंड जोड' वारंवार मागितलेली आहे. व्यावहारिक दृष्ट्या आज आम्ही असल्या वृत्तीला मूर्खपणा म्हणू, पण हा मूर्खपणा शुद्ध निःस्वार्थी होता हे कबूल करणे भाग आहे. या मूर्खपणाच्या जागी कायस्थांत चित्पावनाचा धूर्तपणा जर असतां तर, आम्ही आमच्या मराठे बंधूंना बजावून सांगतो की, आज करवीर संस्थानाच्या शेजारीच कायस्थ प्रभु चिटणीसाचेहि एक टोलेजंग स्वतंत्र संस्थान दिसल्याशिवाय खास राहिले नसते! असते आणि नसते हा वाद अप्रस्तुत असला, तरी राष्ट्राच्या अभ्युदयार्थ कायस्थ समाजाने दाखविलेल्या आत्यंतिक निःस्वार्थाचा मोबदला म्हणून त्यांना लाभलेल्या बऱ्यावाईट स्थितीबद्दल त्यांच्या वर्तमान वंशजांना तिळमात्र खेद वाटत नसून, उलट विलक्षण अभिमान वाटत असतो; मग कोणी त्यांना बावळट म्हणा, नाहीतर घरभेदे म्हणा; खरा इतिहास कधि मरत नाही. मराठी स्वराज्याच्या आदीपासून अंतापर्यंत छत्रपतींच्या वैभवासाठी आत्मयज्ञ करणारे घराणे अखिल महाराष्ट्रांत, अखिल कायस्थ समजांत एकट्या दादजी नरसे प्रभु गुप्ते रोहिडखोरेकर देशपांडे यांचे. याच घराण्यांतला शेवटला मर्द, हिन्दवी स्वराज्याचे पहिले डेप्युटेशन विलायतेस नेणारा कट्टा कर्मयोगी व प्रस्तुत ऐतिहासिक कथानकांचा सूत्रधार

प्रभु रंगो बापुजी गुप्ते देशपांडे

हा होय. या मराठ्याने दाखविलेल्या स्वार्थत्यागाला जोड देणारे घराणे अखिल महाराष्ट्रातच काय पण सबंध हिंदुस्थानांत दुसरे सापडणे मुष्किलीचे आहे. शिवाजी महाराजांची लोकसंग्रही दृष्टी अचुक सेनानी असल्यामुळे, स्वराज्यस्थापनेच्या कार्यात त्यांनी केलेल्या माणसांची निवड त्यांच्या कल्पनेबरहुकूम यशस्वी ठरली. त्यातल्या त्यांत मावळांत पादाक्रांत करण्यासाठी त्यांनी दादजी नरसे प्रभूला अगदी

प्रथमच निवडून हाताशी धरण्यांत जो आत्मविश्वास व्यक्त केला, त्या आत्मविश्वासाशी दादजीच्या घराण्याने अव्वलपासून अखेरपर्यंत कधीहि प्रतारणा केली नाही. दादजी देशपांडे आणि शिवाजी यांच्या स्वराज्यस्थापनेच्या परस्पर आणाशपथा झाल्यावर, त्यांनी मावळांतील देशमुखांच्या विरोधाला धाब्यावर बसवून, आपल्या कार्याला प्रत्यक्ष आरंभ केला. ही गोष्ट 'राजनिष्ठ' खोपडे व जेधे देशमुख यांनी विजापुरला कळवितांच तिकडील वजीराने एक सणसणीत कायदेबाज धमकीचा खलीता या 'राजद्रोही' देशपांड्यांस पाठविला.

(एप्रिल सन १६४५ चैत्र शु. १३ श. १५६७)

हजत असार दादाजी नरसे प्रभु देशपांडे कुलकर्णी ताा रोहिडखोरे व वेळवंडखोरे यासि सुा खमस अर्बैन अलफ वजारतमाहब सीवाजीराजे फरजंद शाहाजीराजे याणे शाहाजीसी (शहाशीं) बेमानगी करून तुझे खोरियांत रोहिरेश्वरचे डोंगराचे असराण (आसऱ्यांने) पुंडावेयाने मावले वगैरे लोक जमाव केला आणि तेथून जाऊन पेशजी किल्यावरील ठाणे उठवून आपण किल्यात सिरला हाली राजगड किला नाव करून बलकावला तो हि वेलवंडखोऱ्यालगत त्यास लोकाचा वगैरे जमाव तू सामील असून फिसात करून रसिद राजे मजकूरनिल्हेस देतोस व ठाणे सिरवली आभिमासी रुजु राहत नाहीस व जमाव बितरजुमा करीत नाहीस व तनखा हि हरदु तपियाचा दिवाणात देत नाहीस (व दोनहि पेट्यांचा वसूलहि सरकारांत देत नाहीस) मगरुरीचे जवाब ठागणे व नाइकवाडियासि देतोस हे जाहिरात आले त्यास हे नामाकुल गोष्ट तुझे जमेदारीचे इजतीस आहे तरी ठाणेमजकुरी आभिनासी रुजु राहणे आणि तनखा माह (जमा) करोन देणे हे न जालियास खुदावंत शाह तुजला विजापुरी नेऊन गरदन मारतील व जमेदारी हककानु चालणार नाही हे मनी समजणे आणि याउपरी दिवाणात रुजु राहणे छ ११ सफर.

(रा. खं. १५/२७१-२७२)

वजीरसाहेबांचा हा दमधाडीचा खलीता दादजीकडे आल्याचे वर्तमान शिवाजीला समजतांच त्याने दादजीला तांतडीने पाठविलेल्या पत्रांतले विचार फार चिंतनीय आहेत. (१५६७ वैशाख शुद्ध १. सन १६४५). शिवाजी राजे लिहितात :-

राजश्री दादाजी नरसे प्रभु देशपांडे व कुलकर्णी ताा रोहिरखोरे व वैलवंडखोरे यासि प्रति. सीवाजीराजे मु।। खमस अर्बैन अलफ तुम्हास मेहेरबान वजिराचा विजापुराहून हुकूम आला तो ठाणे सिरवलाहून अभिनानी तुम्हाकडे पाठविला त्याजवरून तुमचे बाप नरसिबाबा हवालदील जाले वगैरे कितेक बहुतेक लिो त्यास शाहासी बेमानगिरी तुम्ही व आम्ही करीत नाही श्रीरोहिरेश्वर तुमचे खोरीयातील आदि कुलदेव तुमचा डोंगरमाथा पठारावर शेंद्रीलगत (सह्याद्रीलगत) स्वयंभू आहे त्याणी आम्हास यश दिल्हे व पुढे तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे त्यास बाबास हवाल होऊं नये खामाखा सांगावी आणि तुम्ही तो कागद घेऊन सिताब हुजूर येणे राजश्री दादापंताचे विद्यमाने बाबाचे व तुमचे व आमचे श्रीपासी इनाम जाले ते कायम वज्रप्राय आहे त्यात अंतर आम्ही व आमचे वंशज लेकरावे लेकरी वतन वगैरे चालविण्याविसी कमतर करणार नाही हे राज्य व्हावे हे श्रीचे मनात फार आहे याप्रमाण बाकचे मनाची खातरी करून तुम्ही येणे रा छ २९ सफर बहुत काय लिहिणे

(रा. खं. १५/२७२)

शिवाजीसारख्या राष्ट्रवीराने दादजीसारख्याला एवढा दिलदिलासा दिल्यावर त्याच्या घराण्यांतील प्रत्येक वंशजाने छत्रपतीच्या तक्तासाठी प्राण देण्यास मी मी म्हणून पुढे व्हावे यांत आश्चर्य ते कसले? असले जिवांत जीव ओतणारे शिवाजीसारखे प्रजावत्सल राज्यकर्ते असल्यावर त्या राज्याची बाजी राखायला बाळाजी दादजी बार्जीचा तुटवडा कशाला पडेल? दादजी प्रभूने आपल्या 'स्वामीपाशी फार शर्थीची चाकरी, हरवक्त हुजूर राहून धारेकऱ्यांत मर्दुमकी, मोठे धाडसे जिवाची पर्वा न धरितां केली.' दादजी प्रभु राजारामाच्या कारकीर्दीपर्यंत हयात होता. परंतु त्याची स्थिति मात्र फार हलाकीची होती. बालराजे शाहु व मातोश्री येसुबाई यांच्या बरोबर त्याचा मुलगा कृष्णाजी दिल्लीस निघून गेला. जिंजीच्या राज्यक्रांतीच्या धामधुमीत मावळांत मुखत्यार नेमलेल्या शंकराजी नारायण सचीवाने दादजी प्रभूचे वतन बळजबरीने खालसा करून, शिवाजी महाराजांच्या वचनावर बोळा फिरविला. बिचाऱ्या दादजीची वृद्धापकाळी अन्नान्नदशा झाली. राज्यक्रांतीचा काळ. धनि जाग्यावर नाही. थोरला पुत्र स्वामीसेवेसाठी परदेशी गेलेला. केल्या कामाची आणि गाळल्या रक्ताची बूज राखणारा कोणी नाही. जेधे देशमुख आणि लोहोकर विरुद्ध बिथरून शंकराजी सचीवाच्या खांकेत बसलेले. अशाहि भयंकर संकटांत त्याची छत्रपतिनिष्ठा लवमात्र ढळली नाही. दादजी प्रभूने अनेक संकटे सोसून एकदा राजाराम महाराजांची गाठ रांगण्याच्या मुकामी घेऊन सर्व अवस्था निवेदन केली. त्यावरून राजाराम महाराजांनी शंकराजी नारायण सचीवाला लिहिलेले स्पष्टोक्तीचे पत्र अनेक दृष्टीने फार महत्वाचे आहे.

(१६१९ भाद्रपद वद्य ४, सन १६९७).

राजमान्य राजश्री शंकराजी नारायण पंडीत यासि आशा ऐसी जे राजश्री दादजी नरसे प्रभु देशकुलकर्णी व गावकुलकर्णी देहाये तर्फ रोहिडखोरे व वेलवंडखोरे याचे वतन तुम्ही जप्त केले. त्यांनी नजराण्याचा ऐवज * हुजूर कैलासवासी स्वामीपासी जामदारखान्याकडे दिल्हा. त्याजवर वतनाची मोकळिक सर्वा जमेदाराबरोबर मावळ प्रांताची मोकळिक जाली तेव्हां याची हि केली. पुढे तुम्ही सर्जेराऊ जेधे देशमुख याचे तर्फेने आकसामुळे याचे वतन आपल्यास जेधे याजपासून करून घेतले. येविसी खबर प्रभु देशपांडे याणी पनाल्याचे मुकामी जाऊन राजश्री रामचंद्रपंत अमात्य यास सर्व वाका समजाऊन त्यानी त्याची तकरीद घेऊन हुजूर चंदीचे मुकामी तेव्हा रा॥ केली. नंतर याचे वृत्तीचा बंदोबस्त करावा तरी तुम्हीच अफलादार्चा विशेष वतन बेवारसी आपल्यास द्यावे म्हणोन विनंती पत्र संक्राजी दुग्याबरोबर लिहिले. तेव्हा स्वामीनी राजकारणावर नजर देऊन बेवारसी वतन असल्यास तुम्हास देसी आल्यावर चौकसी करून देता येईल असे लिहिले असता त्याचे पत्रावर तुम्ही प्रभूवर बलात्कार करून घरातून कागद नेले. त्यास हाली दादाजी प्रभु हुजूर किले रांगण्याचे मुकामी चंदीस येण्याबद्दल आले. तो स्वामी देसी येता भेट घेतली. सर्व कैफियत कळविली. त्यास तेच वेळी तुम्हास पत्र लिहिले की हे वतन घ्यावयाचे नाही .....त्याचे वतन त्यास देवावे असे ठरून हे आशापत्र तुम्हास सादर केले असे, तरी देशकुलकर्णे व गावकुलकर्णे हर दु खोरी प्रां॥ मजकूरी तुम्ही व जेधे व लोहकर वगैरे मिळोन हे वतन नाहक घेतले. याचे चिरंजीव कृष्णाजी प्रभु अशा अडचणीचे प्रसंगी स्वामीस संकट समई बादशहानी चिरंजीव (शाहू) व

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द दिसत नाही.

कबिले नेले त्यापासी चाकरीवर हजर असता मागे त्याचे वतन दरोबस्त घेता हे तुम्हास उचित एकंदर नाही. तरी याउपरी याचे वतनाचे कागदपत्र नेले त्यासुधा परत देऊन याचे वतन याजकडे चालत असल्या प्रो चालवणे आणि खामा स्वारी तिकडे येताच येऊन भेटणे. यानी कैलासवासी थोरले राजश्री स्वामिपासी फार शर्तीची चाकरी हरवक्त हुजूर राहून धारकरीयात मर्दुची मोठे धाडसे जिवाची परवा न धरिता केली व स्वामी एहि (यांही) विजापुरी बंद सोसिले त्या काली सर्जेराव व खंडोजी खोपडे व बांदल देशमुख याणी तुरुक लोकासी मिळून फिसात केली आणि अडचण स्वामीस फार केली. ते वेळी खंडु खोपडे व बांदल धरून मारिले, सर्जाराव कैद केला. त्या निमित्ती आकस धरून तुम्हास गैरवाका मजकूर समजाऊन त्याचा व याचा अकस असता ही वृत्ती तुम्ही जबरदस्त म्हणोन करून देता आणि तुम्ही पत्रे करून घेऊन घेता. त्यास याचे वतन तुम्हास देण्यास जेथे याच अधिकार नाही व तुम्ही करून घेण्यास अधिकारच नाही. पेशजी व हाली या जातीने फार मर्दुम्या करून राज्य मेळविले. स्वामीकरिता खराब जाले व मारले गेले. असे यत्ने करून दिवस पूर्वीपासून काढले असता तुम्ही सरकारची चार माणसे हाती घेऊन भलाई केली व करीता. यांनी चाकरी अमाप करून व जातीने हि प्रथमपासून केली व करीत आहे. ती एकीकडे जाऊन आपले मनी मोठेपणा वागविता व पाहिजे (ते) करिता. परंतु तुम्ही याचे वृत्तीस लायनी (१) गला पडण्याचा समंध एकंदर नाही. सबब हे वतन परत देणे. मावळमजकुरी स्वारी येण्याचे पुर्वी वतन दिल्याचा मजकूर लिहिणे. याउपरी वतन न दिल्या हा बोभाटा आल्यास तुमचे अबरूस व पदास धका येईल असे स्वामीस भासत आहे. व पुढे नाना प्रकारच्या अडचणी तुम्हास अशा करणीच्या येतील. कारण चिरंजीव (शाहू) कालेकरून तरी श्री देसी आणील. तेव्हा संकटी जी माणसे उपयोगी पडली त्याच्या तसनसी आम्ही करविल्या. हे इकडे यावे त्याचे चित्ती द्वेश यावा व राज्यकर्त्यास इनसाफ पाहणे जरूर. त्यात हे तरी अविचाराचे कलम. भलाई जाली ती सारी आमची एकीकडे जाऊन असी करणी तुम्ही केली यात स्वामीद्रोहाचे च करणे. ते (शाहू) मुख्य. सर्व राज्याम अधिकारी. आम्ही करितो तरी त्याचे साठीच आहे. प्रसंगास सर्व लोकाच तिकडे च पाहणे येईल व वागतील. हे कारण इश्वरी च नेमिले आहे. उगीच भलते भरी न भरणे. पुढे उर्जित होय ते करणे. हे न केलिया केले कामाची फळे ज्याचे ते भरतील असी श्रीची इच्छाच असली तरी तुम्हीतरी का समजाल! तरी नीट चालीने वागणे म्हणजे पुढे सर्वांपरी उर्जीताचे व करण जायजे, * * समक्ष प्रो असे. तेरीख १७ सफर सु।। समाध **. (सन १७०८)

यावर शाहुमहाराज दक्षिणेस परत आल्यावर सुद्धां शंकराजी नारायण पंतसचीव माशाने गिळलेले हे वतनाचे माणिक बाहेर काढण्याची खटपट दादजीच्या मुलाने केली, परंतु ''मावळप्रांती शक्राजी नारायण पंडित याणी जबरीने दादाजी नरेस प्रभु देशपांडिया..... कृष्णाजी प्रभूचा बाप हा * जमेदार असता त्याचे वतन घेतले व आणखी हि बहुत जमेदार व रयत लोकांच्या तसनीस केल्या. ये यावे पंडित यास तुम्ही (शाहूने) आणविले (बोलविले) आसता न आले. हिरकणी खाऊन केले.''

''राजश्री दादापंताचे विद्यमाने * व तुमचे व आमचे श्रीपासी इमान झाले ते कायम वज्रप्राय आहे. त्यांत अंतर आम्ही व आमचे वंशज लेकराचे लेकरी वर्तन वगैरे चालविण्याविसी कमतर करणार

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द लागत नाही.

नाही.'' ही शिवाजी महाराजांची प्रतिज्ञा अक्षय अढळ राखण्यांत त्यांचे 'वंशज लेकराचे लेकरी' बरीच खटपट केली, परंतु संतसचिवानें संथपणे पचविलेले दादजीच्या इमानाचे इनाम अखेरपर्यंत-रंगो बापूजीला सुद्धा-त्याच्या घराण्याला लाभले नाही. जों जों छत्रपतीकडून वतनाच्या बाबतीत आग्रहाची व निकडीची पत्रे येत, तों तों पंतसचिवाचा हट्टी भिक्षुकी बाणा अधिकाधिक कणखर बनत गेला. अखेर त्याने 'पोलीशी समजुती' चा प्रयोग कृष्णाजी दादजीवर करून वाटेल तसे दस्तऐवज पोलाजी 'राजीखुषीने व अकल हुषारीने' त्याकडून लिहवून घेण्यास सोडले नाही. शंकराजी नारायणाचा संतसचिवी खराटा याप्रमाणे अनेक इमानदार लोकांचे वतनावर फिरून फिरूनच भोरच्या पंतसचीवाच्या संस्थानाची उभारणी झालेली आहे; अर्थात या संस्थानाच्या पायात किती शिवभक्तांच्या गर्दना गाडलेल्या आहेत आणि किती गोरगरीबांच्या तळतळाटावर भोर संस्थानचे ब्राम्हणी ऐश्वर्य लकलकत आहे, याची वाचकांनीच कल्पना करावी. दादजी नरसे प्रभूच्या घराण्याच्या पोटावर अशा रीतीने पंतसचीवाने निखारे ठेवून * वैभवाचे पापड भाजले व त्याच्या वंशजाना भणंग भिकारी बनविले, तथापि त्यांपैकी एकानेहि आपल्या स्वराज्यप्रेमांत व छत्रपतिनिष्ठेत लवमात्र प्रतारणा केली नाही किंवा राज्यक्रान्तीच्या धामधुमीत स्वतःचा तळीराम गार करण्यासाठी, छत्रपतिविरुद्ध बनिया कंपनीने उभारलेल्या फंदफिसाठाच्या मोहाला कोणी बळी पडला नाही. शेवटला वंशज प्रभू रंगो बापुजी याची स्थिति तर सर्व बाजूंनी अगदी विपदग्रस्तच होती. सन १८३१ साली त्याने प्रतापसिंह छत्रपतीला आपल्या करुणकहाणीचे जे विस्तृत पत्र पाठविले आहे, (राज. खं. १५ पृ. ३३५) त्यांत तो स्वतःच म्हणतो की ''मी संकटसमई सेवा केले परंतु माझा जीर्णोद्धार जाहला नाही..... हाली कोण्ही माझे बोलणे बोलून बंदोबस्त करून देवितील असा भरंसा वाटत नाही. सरकारनीच कृपा करून दिल्यास बंदोबस्त होईल. नाहीपेक्षा दारिऱ्यानी व्यापिले आहे तरी स्वामीनी सेवा घ्यावी. माझी सरकारांत वोळख सुद्धा नाही असे जाहले आहे.'' हे पत्र लांबलचक असून त्यांत अनेक ऐतिहासिक महत्वाच्या गोष्टीचा स्पष्ट खुलासा असल्यामुळे ते ग्रंथमुद्रणप्रसंगी देण्यात येईल. रंगो बापुजी इतका दारीद्र्यग्रस्त होता तरीहि त्याने छत्रपतीची सेवा करण्याचा एकहि प्रसंग दवडला नाही. बाजीराव पेशव्याने प्रतापसिंह छत्रपतीला वासोटा किल्ल्यावर कैद करून ठेविले असतां, त्यांच्या मुक्ततेसाठी चाफळचे मठाधीश स्वामी, चिटणीस यांच्या मसलती चालू असतांना साताऱ्याहून चाफळास, चाफळाहून बोरगांवास, बोरगांवाहून पुण्यास, पुण्याहून साताऱ्यास, अशा पायदौडीच्या मजला करणारा हाच. नाना तऱ्हेचे गुप्त वेष घेऊन महाराजांची * वालीची बातमी काढणारा हाच. रावबाजीने छत्रपतीच्या कैदखान्यावर नेमलेला ब्राम्हण जेलर काशीपंत बापरे म्हणजे नुसता आग्यावेताळ. पण रंगो बापुजी गोसाव्याचा वेष घेऊन छत्रपतींच्या हालअपेष्टांची खरी माहिती काढण्यासाठी छाती करून किल्ल्यात घुसलाच. महाराजांनी प्रत्युत्तरादाखल दिलेली खुलाशाची चिठी कोणास उमगू नये, म्हणून या धाडसी मर्दाने आपल्या पायाची पोटरी कापून तीत ती चिठी लपविली व वर कांही झाडपाला बांधून कुत्रे चावल्याचा बहाणा केला. लंगडत लंगडत हा गोसावी किल्ल्याच्या दरवाजांत परत येतो, तो अरे बापरे! अचानक पुढे उभे काशीपंत बापरे!! केवळ रुद्राचा अवतार. फितुराचा वहीम घेऊन त्याने या गोसाव्याचा यथास्थित झाडा घेतला, पोटभर चोप

---

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द लागत नाही.

दिला, सर्व संस्कार मनमुराद केले. पण हा आमचा छत्रपतिनिष्ठ गोसावी आपल्या कामाची, नामाची किंवा कशाचीहि दाद न देतां, सर्व छळ मुकाट्याने सहन करून, 'गरीब वेडा गोसावी' म्हणून दोन दिवसांनी उपाशीतापाशी सुटून जैतापुराकडे रवाना झाला. स्वामी चिटणिसादिकांच्या भेटी झाल्यावर ''स्वामीनी (चाफळच्या) मला पोटासी धरून नेत्रांतून पाणी आंगावर टाकिले. फार श्रमी सर्वत्र जाहले आणि बोलिले कि आज कासीपंतांनी चिंचेच्या फोका व बेडी वगैरे जरब देणे ती दिल्ही. परंतु तू कोणाचे नांव न घेता सर्वांचा बचाव केलास व माहाराजाची हातची चिठी पायाचे मणगटास बांधून आणली ही गोष्ट श्रीनी मोठी केली. वर माहाराजाचे पायास तू मळ लाविला नाहीस. मोठे संकटांतून पार पाडिलेस. नाहीपेक्षा प्राण चिटणिसानी व आम्ही व ज्याची नावे कळती त्याणी देणे आला होता. विठलपंत बाबा इत्यादि तू आज वाचविलेस.'' वाचकहो, जरा विचार करा ज्याला जतन करायला वतन नाही, रहायला घर उरले नाही, जो राजमान्य नव्हे व * राज्यश्रीवर कधीच पंतसचीवाचा नांगर फिरलेला, अन्नालाहि जो मोताद, नोकराच्या कैद खान्यांत धनि पडल्याने ज्याची महत्वाकांक्षाहि मेलेली, असा रंगो बापुजी आपल्या खापर पणजाच्या-दादजी नरसो प्रभूच्या स्वराज्यप्रतिज्ञेचे इमान कायम राखण्यासाठी एवढी साहसे करीत होतो, त्याच्या भावनेत कोणता रंग उत्कट उमटलेला असावा बरे? ठाण्याचे श्रीयुत भावे म्हणतात तसला 'स्वराज्याचा भाडखाऊपणा' की आणखी दुसरा कोणता? रंगो बापुजीच्या स्वराज्यप्रेमाला व छत्रपतिनिष्ठेला उपलब्ध महाराष्ट्रेतिहासांत दुसरी जोड कोणी दाखवीपर्यंत, रंगो बापुजीला राष्ट्रभक्तांच्या मालिकेतला मेरुमणी म्हणण्यास मुळीच हरकत नाही.

रंगो बापुजीच्या निर्हेतुक स्वराज्यसेवेचा इतिहास फार विस्तृत आहे. हिन्दवी स्वराज्याच्या उत्कटतम प्रेमाचे बिंब त्याच्या अपयशी आत्मयज्ञांत आचंद्रार्क चमकत रहाणारे आहे. रावबाजीचा भिक्षुकशाही ग्रंथ आटोपल्यानंतर कंपनी सरकारने प्रतापसिंह छत्रपतीला सातारच्या गादीवर बसविले. त्यापूर्वी ज्या वासोटा किल्ल्यावर महाराज सहकुटुंब कैदेत होते तो किल्ला पडण्याची वेळ आलीच, तर महाराजांची राजघराण्यांतील सर्व मंडळीसकट एकजात कत्तल करून टाकावी, असा किल्लेदारास रावबाजीचा सक्त हुकुम होता. या प्रसंगी या दुष्ट कारस्थानाची बातमी एल्फिंस्टनसाहेबास देऊन छत्रपतीची व त्यांच्या कुटुंबीय मंडळीची कत्तल रंगो बापुजीनेच टाळली. पुढे रावबाजीचीच ससेहोलपट होऊ लागली तेव्हा छत्रपतींनासुद्धा कबिल्यासह त्याने आपल्याबरोबर पायपिटीला घेतले आणि कंपनीच्या सैन्याची दौड निकडीने पाठीवर येतांच, छत्रपतींना मध्येच सोडून स्वारीने पोबारा केला. अष्ट्याच्या लढाईत मर्द बापु गोखले रणांगणी पडतांच, इंग्रजी सैन्याने मराठी सैन्यावर गोळीबाराचा वर्षाव सुरु केला. त्या गर्दीत खुद्द छत्रपति कबिल्यासह होते. अशा बिकट प्रसंगी गोळीबाराच्या वर्षावाला तोंड देऊन, 'थांबा थांबा, छत्रपति सरकार येथे आहेत, त्यांच्यावर निष्कारण शस्त्र चालवू नका.' म्हणून कंपनीच्या सेनापतीकडे गर्दीत घुसून जाणारे बळवंतराव मल्हार चिटणीस व रंगो बापूजी हेच. अशा रीतीने छत्रपतींचा प्राण दुसऱ्यांदा वाचविला. प्रतापसिंह छत्रपतींचा अखेर जो शोकपर्यवसायी शेवट झाला, तो होण्यापेक्षा वासोटा किल्ल्यावर किंवा अष्ट्याच्या लढाईच्या गर्दीत त्याची कत्तल झाली असती तर फार बरे झाले असते, असे वरवर विचार करणाऱ्या उदासीन परंतु कोमल हृदयी वाचकास वाटेल, पण कर्तबगारांच्या

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द लागत नाही.

कर्तबगारीची महति यश किंवा अपयश यांवर ठरविली जात नाही, त्या कर्तबगारीच्या उच्च किंवा नीच ध्येयाने ठरविली जात असते. या नियमाने छत्रपति प्रतापसिंह महाराजांचा अंत अखेर बनिया कंपनीच्या कैदेत झाला, तरी त्यांनी महाराष्ट्रात निर्माण केलेल्या सामाजिक व धार्मिक लोकशाही जागृतीचे चैतन्य त्यांना आद्य छत्रपति शिवाजी महाराजांच्या जोडीने उच्चासनावर स्थापन केल्याशिवाय खास रहाणार नाही. आजच्या ब्राम्हण * लोकशाही चळवळीचे बीज छत्रपति प्रतापसिंहानेच पेरलेले आहे, हे पुढील प्रकरणात यथास्थली स्पष्ट होईल.

छत्रपति प्रतापसिंहाला पदभ्रष्ट व जीवनभ्रष्ट करणाऱ्या नातूशाहीचे कारस्थान अखेर आवाक्याबाहेर गेले. बनिया कंपनीचे मुंबईकर अधिकारी व छत्रपति यांच्यामध्ये रेसिडंट ओवन्सची पाचर इतकी जाम बसली की इकडचा मजकूर तिकडे नाही व तिकडचा इकडे नाही, अशी स्थिति आली. बरे, मुंबईकरांकडे छत्रपतीने कांही खुलाशाचे खलीते पाठविले तर इकडे रेसिडंटाच्या 'इज्झती' ची पायमल्ली होऊन तो गरम होई व तिकडे मुंबईकर अधिकारी प्रत्येक खलीत्यांतील मजकुराबद्दल 'बीचमें मेरा चांदभाई' रेसिडेटकडे बोट दाखवीत. अशी विलक्षण कुचंबणा होऊ लागली. नातूची कारस्थाने दिवसेंदिवस आपला व्याप वाढवू लागली. महाराजांना न विचारतां रेसिडंट ओवन्स वाटेल त्याला पकडून अटकेत ठेऊ लागला. महाराजांचे कित्येक विश्वासु अधिकारी मुंबईचे एजंट, कामगार यांत अनपेक्षित धरपकड सुरू झाली. तेव्हा प्रतापसिंह छत्रपतींनी या सर्व भानगडीचे लोण थेट विलायतपर्यंत पोहचविण्याचा व्यूह रचला. या कामी प्रथम त्यांनी काही बारीक सारीक प्रयत्न केले. सय्यद मी आफजल अल्ली या नांवाचा एक मुसलमान गृहस्थ त्यांनी विलायतेस रवाना केला होता. त्यानंतर त्यांनी यशवंत राव राजे शिर्के या (क्षत्रिय मराठे) व भगवंतराव विठ्ठल चिटणीस (कायस्थ प्रभु) या दोघांना कागदपत्रांनिशी विलायतेस पाठविले. त्याची तपशीलवार हकिकत प्रकरण तीन मध्ये यशवंतरावांच्या त्रोटक चरित्रांत खुद्द त्याच्याच शब्दांत नमूद केली आहे. यशवंतराव शिर्क्यांपूर्वी '*नबाब' व 'टिपूचा मुलगा ज्यांबुद्दीन' हे आपल्या कर्माच्या पालथ्या पडलेल्या कवट्यांची रडगाणी विलायतेस गात बसलेच होते. शिर्के मुंबईहून 'रिलायन्स नं. ४७१५' नामक जहाजातून ता. १९ मार्च सन १८३९ रोजी निघाले ते केप ऑफ गुडहोपच्या मार्गाने ता. १० आगष्ट १८३९ रोजी म्हणजे १४४ दिवसांनी विलायत लंडनला पोहोचले. तेथे त्यांनी सरकार दरबारी बोट शिरकविण्याचा यत्न केला न केला तोच इकडे बाळाजीपंत नातूने आपल्या सर्व कारस्थानांचा संयुक्त बार उडवून, बनिया कंपनीच्या हातून ता. ५ सप्टेंबर सन १८३९ रोजी छत्रपति प्रतापसिंह महाराजास पदच्युत करून काशीला हद्दपार करविले. महाराज स्वतःच कैद झाल्यावर शिर्क्यांचा विलायतेस दम निघेना. पैसा आता कोठून येणार? इंग्रज सहाय्यकांनीहि हातपाय गाळले व 'आला तसे परत जा' असे शिर्के प्रभृतींना म्हणू लागले. विलायत म्हणजे पैशाचा खेळ. ज्याजवळ नसेल पैसा, त्याला कोण विचारी कैसा? यशवंतरावाची दुर्दशा व निराशा खुद्द त्याच्याच शब्दांत वाचकांना प्रकरण ३ मध्ये वाचण्यास मिळेल.

अशा बिकट प्रसंगी पोलादी निश्चयाच्या माणसाचीच फार जरूर होती आणि ती भरून काढण्यासाठी रंगो बापुजीने कंबर कसली. तक्ताचा धनि काळ्या पाण्यावर दूरदेशी गेलेला. चिटणीसासारखे

---

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द लागत नाही.

सरकारी कलमाचे इमानी अधिकारी बिनचौकशीने तुरुंगात पडलेले. इतर छत्रपतिभक्तांची दाणादाण व वाताहात झालेली. जिकडे पहावे तिकडे फंदफितुरी. घरांच्या तुळया वासे भिंती खिडक्या सुद्धा बिथरलेल्या, मग सडकांवरील धुळीच्या कणाकणांतून बाळाजीपंत नातूचा परशुरामी डोळा गटगट वावरू लागल्यास नवल काय? कोणाला काही विचारण्याची सोय नाही. शेजेच्या बायलेवर विश्वास धरवत नव्हता, मग हुक्का गुडगुडीच्या निमित्याने एकधूम्र झालेल्या मित्रांचा भरंसा कसा कोणी द्यावा! झाला प्रकार अत्यंत अन्यायाचा आहे, यात चित्पावनांचा स्वराज्यद्रोह असला तरी बनिया कंपनीचा दुष्ट राजकारणी डाव आहे, ही रंगो बापुजीची बालंबाल खात्री होती. बनिया कंपनीच्या नोकरशाहीने शुद्ध असत्याची तळी उचलून महाराष्ट्राच्या स्वराज्याचा बीमोड करण्यांत गाळीव अन्याय केला असला, तरी विलायतेतील या नोकरशाहीचे स्वातंत्र्यवादी धनि या बाबतीत खात्रीने न्याय देतील, अशी आताच्या अनेक राष्ट्रधूरिणांप्रमाणेच छत्रपतीला व रंगोबापुजीला आशा उत्पन्न झाली. इंग्रज लोकांच्या न्यायबुद्धीचा भ्रम अझूनहि आमच्या खात्रीच्या बुडाशी चरबीप्रमाणे चिकटा धरून बसलेला आहे तर रंगो बापुजीच्या वेळी त्या भ्रमाच्या भरी भरून विलायत म्हणजे न्याय समता स्वातंत्र्याचे बारमाही उमाप पीक घेणारे शेत, अशी कोणाची ठाम समजूत असल्यास त्यास दोष देणे व्यर्थ आहे.

विलायतचे राजकारण म्हणजे आतांप्रमाणेच केवळ पैशाचा खेळ जरी होता, तरी त्यात बुद्धिबळाची अवश्यकता विशेष होती. तेथे शिक्यांसारखा सरधोपटमार्गी माणूस कांही उपयोगी नव्हता. रंगो बापुजी जसा कलमाचा बांका तसा वकीली बाण्यांतहि कलमाइतकाच जिभेचा फर्डा व्याख्याता होता. त्याने एकंदर धामधुमीचा अत्यंत चौकसपणाने व दक्षतेने छेडा लावून, सर्व उघड व गुप्त दस्तऐवजी पुरावे जमा केले आणि कैदेत पडलेल्या छत्रपतींकडून वकील नात्याने विलायतेस जाण्यासाठी वकीलपत्र व आशीर्वाद गुप्त रीतीने मिळविला. 'गुप्त रीतीने' म्हणण्याचे कारणं ती वेळच तशी होती. एकीकडे बनिया कंपनीची सोटेशाही बेगुमान चालू, तर दुसरीकडे बाळाजी पंत नातूची चित्पावनी कारस्थाने रात्रंदिवस आजूबाजूला बेफाम धिंगाणा घालीत होती. अशा प्रसंगी किती सावधान राखून डावपेच लढवावे लागत असावे, याची कल्पना विशेष रंगवून दाखविण्याची आज घटकेला तरी अवश्यकता दिसत नाही. रंगो बापुजीने धडपड करून कांही रकम जमा केली आणि विलायतेच्या प्रयाणाबद्दल आपल्या डेप्युटेशनचा निश्चय सातारचा रेसिदंड कर्नल ओवन्स यांस कळविला. खडाखड सातारा, मुंबई, कलेक्टर, गव्हर्नर, कौसिलदार यांच्या उलटसुलट जाबजबाबांची डाक सुरू झाली. तहनाम्यातील शब्दांचा आणि कायदेबाजीचा कीस पडू लागला. रंगो बापुजीचे डेप्युटेशन विलायतेला गेले तर बनिया कंपनीच्या नोकरशाहीच्या धिंगाण्याचा भोपळा तेथच्या मालकशाहीपुढे फुटताच मोठा गइजब उडेल, याची पूर्ण जाणीव असल्यामुळे, बनिया नोकरशाहीने रंगो बापुजीला परवानगी देण्याचे साफ नाकारले. परंतु रंगो बापुजी हाहि बनिया कंपनीला शेरास सव्वाशेर भेटला. अमुक गोष्ट असत्य आहे, अन्यायाची आहे, एवढे पटल्यावर आणि अन्यायापुढे केसभरसुद्धा मान वाकवायची नाही, (इतिहासप्रसिद्ध अस्सल कायस्थ स्पिरिट ते हेच! लाळघोटपणा ही अलीकडची कमाई आहे.) हा एकदा निश्चय ठरल्यावर, सत्याग्रही वीराला कोणती सत्ता जिंकू शकेल? फार झाले तर प्रतिबंध करील, कायद्याच्या जोरावर कैदखान्यात झुगारून देईल किंवा नीतिमत्तेचे द्रौपदी वस्त्रहरण करून सत्याग्रहाचा प्राणांत करील;

तथापि तेवढ्याने तो वीर जिंकला जाणे कदापि शक्य नाही. बनिया कंपनीच्या मुंबईकर अरेरावांनी रंगो बापुजीला कायदेशीर प्रतिबंध करतांच त्यांनी आपला निश्चय त्यांना कळविला की 'काय वाटेल ते होवो, मी विलायतेस जाणार. परमेश्वराचे अबाधित कायदे जरी क्षणभर गुंडाळून ठेवले, तरी बनिया कंपनीच्या तहनाम्याप्रमाणे अगर कोणत्याहि कायद्याने मला विलायतेला जाण्यास तुम्हाला प्रतिबंध करतांच येत नाही.' असा रोख ठोक जबाब देऊन, त्याने कायद्याच्या मुद्यावर पुष्कळ वादविवादाचा झगडा केला. बनिया कंपनीला कायद्याच्या बाबतीत रंगो बापुजीने चारी मुंड्या चीत केल्यावर, कंपनीच्या नोकरशाहीला आडमार्गाचे डांवपेच खेळल्याशिवाय गत्यंतरच उरले नाही. तुम्ही छत्रपतीचे वकीसच कशावरून? मुखत्यारपत्र कोठे आहे? या प्रश्नांना प्रत्यक्ष मुखत्यारपत्रच दाखवून रंगो बापुजीने निरुत्तर केले. येथेहि घोड्याने पेंड खाल्यावर हे तुमचे मुखत्यार पत्र आम्हांला मान्य नाही व विलायतेतहि या चिठोऱ्याला कोणी फुटक्या कवडीची किंमत देणार नाही आणि तुम्हालाहि तेथे कोणी ओळखणार नाही, असा डाव पुढे आला. 'विलायतेस गेल्यावर ते माझे मी पाहून घेईन, त्याची काळजी तुम्हाला नको' असा स्पष्ट खुलासा करून रंगो बापुजी आपल्या शागीर्दासह मुंबईस येऊन दाखल झाला. बनिया कंपनीच्या गुप्त खात्याच्या गुप्त ठरलेल्या गुप्त मसलतीप्रमाणे रंगो बापुजी मुंबईला येताच त्याला कैद करण्यात आले. विलायतेला जाण्याचा आग्रह सोडून द्यावा म्हणून सामदामादी सर्व पोलीशी पॉलीसीचे संस्कार यथासांग झाले. पडद्याआड कितीहि काळेकुट्ट अत्याचार केले, तरी पडद्यावर कायदेबाजीचा सफेदा पांढराफेक वठविण्याची विलायती धडपड फार जुन्या परंपरेची आहे. या परंपरेप्रमाणे, तहनाम्यातील कलमांन्वये छत्रपतीच्या डेप्युटेशनवाल्यांना विलायतेस जातां येते की नाही, याचा निर्णय देण्यासाठी मुंबईच्या ॲडवोकेट जनरलला अभिप्राय विचारण्यात आला. त्याने कानामात्रा वेलांट्याची छाननी करून स्पष्ट अभिप्राय दिला की ''लंडनला हे लोक जात असल्यास मुंबई सरकारला कोणत्याहि रीतीने मज्जाव करता येत नाही व सातारचा राजा आपले वकील लंडनला पाठवीत असता त्यांत तहनाम्याचे कोणतेहि कलम आड येत नाही.'' झाले, कायदेबाजीचा उघडा रस्ता बंद झाला. नंतर या कैदी वकीलाला जामीनकीचा दंड भरून मोकळे होण्याची सवलत देण्यांत आली. या सवलतीचा उद्देश हाच की इतर उपाय हरले तरी त्याच्या पैशाच्या पिशवीलाच भोक पाडले म्हणजे सांपत्तिक ऱ्हासामुळे तरी त्यांच्या विलायतप्रयाणाच्या उड्या गार पडतील. रंगो बापुजीने दंडाची रकम भरून आपली सुटका करून घेतली व ताबडतोब एका फ्रेंच जहाजाला पाच हजार रुपये नोर भरून लंडनला जाण्याची तयारी केली. पण जहाजावरील उतारूंच्या यादीत या हिंदु मंडळींची नांवे पहातांच, मुंबई अधिकाऱ्यांनी त्या जहाजाला 'रहदारीचा दस्तक' (पासपोर्ट) देण्याचे नाकारले. कप्तानाने खूप खटपट व भांडाभांड केली, पण व्यर्थ. कायद्यांवरच गोष्ट येऊन ठेपतांच, तुमच्या जहाजांवर 'ऑब्जेक्शनेबल गुडज्' आक्षेपार्ह सामान आहे, असा आरोप बनिया नोकरशाहीने बिनदिक्कत केला. हा 'आक्षेप घेण्याजोगा माल' म्हणजे रंगो बापूजी व त्याचे शागीर्द होत, हे सांगणे नको. अखेर हा 'दोषी माल' बंदरावर परत सोडून जहाज विलायतेला निघून गेले व रंगो बापुजीने भरलेली प्रवासखर्चाची रकम पांच हजार रुपये पाण्यात गेली! बनिया कंपनीने केलेल्या या छळाचा पाढा (विलायतेस गेल्या नंतर) पार्लमेंटात इंग्रेज अधिकाऱ्यांच्या पुढे रंगो बापुजीने दणदणाटाचे वक्तृत्वपूर्ण भाषण करून कसा मांडला तो पाहण्यासारखा आहे. रंगो बापूजी म्हणाले,

''सभ्य इंग्रज गृहस्थहो, आफरिकेचे हापसी लोक याचे जन्मापासून, उत्पन्न होण्या समयापासून ते बंदे गुलाम लोक आहेत म्हणतात. ऐका ऐका हो तेच हापसी लोक या इंग्लीष प्रांती येऊन या जमीनीवर जहाजांतून उतरून पाय ठेवताच त्यांची साखळी आपोआप तुटून जाऊन ते सारे वाऱ्याप्रमाणे होऊन त्यांची सुटका तुमचे हाते तत्काळ होऊन, गुलाम नावापासून ते सारे मुक्त होतात. आणि न्याय नीतीने पाहता ते ईश्वरासिवाय दुसरे धन्यास वोलखीत नाहीत व मानीत नाहीत. पहा बरे, हिंदुस्थानांतील सर्व मनुष्ये जन्मापासून आमर्णांत आपमुखत्यारीने प्रमुख असता त्याजवर कंपनीचे चाकर अनतीने (अनीतीने) मोठा जुलुम करितात. त्याजवरून ती मनुषे आपला देश व वतन सोडून या लोकावर (नोकरशाहीवर) फिर्याद करण्यास तिकडून या मुलखी हजारो मैलावर माहान संकट समई येतात. परंतु पहा इकडे येणाराची कसी दशा व किती दुःख देऊन कसी वेवस्था या कंपनीच्या चाकरानी केली तीच ऐका हो. जसी कोणी जंगलांत जनावराची सिकार करितात आणि ते जनावर जिवाच्या भयामुले तपटून जाते जागोजागी लपत फिरते परंतु पुन्हा टेहळ ठेऊन पता लावून त्या जनावराचे पाठी लागतात त्याप्रमाणे वकीलाचे मागे चोरपालती ठेविल्या. नाना प्रकारच्या तजविजी करून शोध काढिले, भये घातली. अखेर कैद केले. सेवटी फार मोठा दंड घेतला. याचे कारण काय म्हणाल तरी अदल इनसाफाचा रस्ता बंद करण्याबद्दल असो ही तरकटे केली. आणखी पहा. हे न्यायनीतीचे खरे काम इनसाफ मागण्याबद्दल येत असता त्यास पेच दरपेच घालून त्या मनुष्यास साखलीने आपले स्वदेशीचे जमिनीस मजबुदीने खूप बांधून ठेवावा. त्या मनुषानी कोठे जाऊ येऊ नये म्हणोन कंपनीच्या चाकरानी असे काम केले.''

'कायद्याने प्रस्थापित झालेल्या' ब्रिटिश नोकरशाहीचा परवां टिळक डेप्युटेशनला झालेला कायदेशीर मज्जाव आणि 'सनदेच्या चिठोऱ्यावर' यदृच्छेने आंगावर आलेले * कारण शिंगावर घेणाऱ्या बनिया कंपनीच्या नोकरशाहीचा रंगो बापूजीला झालेला मज्जाव, या दोन गोष्टीत एक शतकाचे अंतर असले तरी त्यांच्या गो * एकजिनसीपणा विचार ऐकण्यासारखा आहे. फरक जर कांही असेल तर तो हाच की कै. टिळकांचे डेप्युटेशन लोकांनी दिलेल्या फंडावर चरत गेले व रंगो बापूजींचे डेप्युटेशन स्वतःच्या घरादाराच्या विक्रीच्या पैशाने गेले होते. असो.

नंतर लवकरच एक इंग्रजी जहाज लिवरपूलला जाण्यासाठी मुंबईच्या बंदरात आले. त्याला पुनः प्रवास खर्चाचा नोंद भरून रंगो बापुजीने प्रयाणाची तयारी केली. याहि खेपेस सदर्हू जहाजावर 'दोषी माल' असल्याची सबब पुढे येऊन त्याला मज्जाव करण्यात आला. परंतु कप्तान खरा जातीवंत इंग्रज असल्यामुळे 'माझ्या जहाजाला तुमच्या पासपोर्टाची जरूरच नाही, आणि मुंबईकरांचा माझ्यावर कसला अधिकारहि चालणार नाही' असा रोख ठोक जबाब देऊन; त्याने आपले जहाज हांकारले आणि रंगो बापुजी कसाबसा अखेर लंडनला येऊन दाखल झाला.**

** यशवंतराव शिर्क्यांच्या स्मरण वहीवरुन असे दिसते की रंगो बापुजी जवळ पुरेसा पैसा नसताहि लंडनच्या सफरीला निघाला. कारण ते माल्टा येथे उतरून पैशाच्या अडचणीत अडकला होता. त्याने यशवंतरावला लंडनास पत्र पाठवून पैसे मागितले व ते हाती आल्यावर तो लंडनास गेला. त्याचप्रमाणे दुसरी अशीहि खात्रीलायक माहिती मिळते की मुंबईकरांच्या सिएडिला बेमालूम गुंगारा देऊन, त्याने मुंबई ते लंडनचा प्रवास मस्कत आरबस्थानातून पायवाटेने केला व भूमध्य समुद्रातल्या कोठल्या तरी अज्ञात बंदरावर एक जहाज गाठून तो पुढे गेला आणि माल्टा येथे क्वारंटाईनमध्ये अडकला.

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द लागत नाही.

इकडे बनिया नोकरशाहीने आधीच गुप्त खलीते रवाना करून, या वकीलाने विलायतेस कोणी थारा देऊ नये, वगैरे मंत्र मंपनीच्या डायरेक्टर बोर्डाच्या कानात फुंकून ठेवले होते. रंगो बापुजी लंडनास येताच त्याने छत्रपतीच्या मुकादम्याची चळवळ वकील नात्याने पद्धतशीर जोराने चालविण्याची एकदम सुरुवात केली. हे वकील मंडळ इंडिया हाऊस मध्ये अधिकारी जनांच्या भेटीसाठी गेले असतां त्यांना, 'या बसा, काय काम आहे? कोठून आला?' वगैरे साधारण सभ्य माणसे देतात तसलाहि सत्कार न देतां, त्याना फार उद्धट रीतीने वागविण्यात आले. या पुढील हकीकत रंगो बापुजींच्याच तोंडून वाचकांनी ऐकावी. ''ईष्ट इंडिया कंपनीचे डरेकटर्स यास पेशजी फेरीस आगटिंग गवरनर व मुंबई कौसलदारानी लिहून पाठविले. त्याप्रमाणेच कोर्ट डरेकटर्स यांनी शिस्त ठेऊन या वकीलांस बोलविले नाही. कां आला व तुमचा मजकूर काय आहे, हे अगदी न विचारता धिःकार केला. परंतु वकील काय मागत होते ते तरी पहा बरे. आम्हास इनसाफ द्यावा हेच मागत होते. असे असता कोर्टानी बेदाढ करून मनास काही आणले नाही आणि सांगितले की तुम्ही जेथुन आला तेथे परत निघोन जावे. आणखी पहा ऐका हो. हे लोक ईष्ट इंडिया कंपनी प्रोप्रायटर यांच्या व्होटांनी म्हणजे संमतांनी ज्या वेळी हे प्रथम डरेकटर्स होऊन येतात, तेव्हां या दरएक दरएक असामीनी आपले क्रिश्चन मुख्य धर्माचे बुक (बायबल) गीते प्रमाणे हातांत घेऊन साक्षीनसी सर्वांसमक्ष ईश्वराची शपथ क्रिया करून सत्य स्वमुखांनी सांगतात की 'आम्ही आपले आपले न्याय नीतीने कायद्याप्रमाणे सर्व मनुष्यकारी बरोबर पाहून निस्पृह व कांही लोभ न करितां स * तर खरेपणानी चालवू तरच आमचे ईश्वर संरक्षण करील' या अन्वये बोलून शफथ घेऊन, क्रिया करून, हे डरेकटर्स होऊन नंतर या कोर्टाचे कामगार होतात. पहा ऐका हो, तुम्ही सर्वत्र मंडळी क्रिश्चन आहां. त्यास तुम्हास या लोकांपैकी कितीकाच्या क्रियाशफथा तुम्हाला साफ आता मी खोटे करून दाखवितो. मी विचारतो की अशी क्रिया करून नंतर खोटे काम करावे असे तुमच्या धर्मांत सांगितले आहे काय? (सभाजन तटस्थ. उत्तर नाहीं.) हिंदु अगर मुसलमान धर्मांत आहे काय? (उत्तर नाहीं. सभाजनांत शेम शेमचा कल्होळ होतो.'')

(पुढें चालूं)

□□□

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द लागत नाही.

लेख

Vykom Satyagraha

The Vykom Satyagraha is a sign of the time. The socalled untouchables of Travancore State in the Madras Presidency have started Satyagraha to assert their legitimate right as Hindus to use certain areas and roads, which were forbidden to them for centuries past by the socalled touchables there. We do not wish to dilate upon the details of the Satyagraha in question; our numerous contemporaries are doing that work most ably. The present Satyagraha attracted our attention mainly because it is started by the tyrannised untouchables of the South. It is an effort to vindicate certain rights which have been denied by the arrogant touchables to a vast population generally known as Hindus, but scorned and hissed at as untouchables.

To a nation bereft of all the means and ways of vindicating its natural rights, Satyagraha is no doubt the only weapon within its reach to make use of. It is a double-edged weapon and must be used with great caution and keen judgment. Satyagraha can only be successful where the interests and grievances of the people concerned are harmonious and homogeneous to the minutest particle. A little mixing of hypocricy, conscious or unconscious, and the object is ruined for ever. With what tremendous fatal shock it meets its doom, we have seen in the most condemnable atrocities perpetrated in the name of Satyagraha by the selfish hooligans at Chauri Chura some three years back. We have also seen how the fair name of Satyagraha was blackened by the impulsive and raw minded youth both at Nagpur and Moolshi. All those black failures go to prove that It is foolish to use this weapon for political purposes at least while the present heterogeneous condition exists among the Hindus.

The present state of the Hindu Society is so miserably disconcerted aud disjointed that herculean labours are necessary to adjust it first before the Society can, in one voice, claim any grant of political rights. The solution of India's problem depends not on the acquisition of political rights. Unless the social wrongs are adjusted and the inner life of the Hindu Society is skillfully toned to a melodious harmony by immediate eradication of several social and religious wrongs, there is no liklihood of any gift of political rights regenerating the Hindu Society. One must bear in mind that political rights can never be earned, and if earned by hooks or crooks, can never be enjoyed by a people of the

type of the present Hindus. One must be ashamed to see how in one breath the present Hindus claim equal rights with the whites of the West, and in another breath feel no moral mortification to tyranise and persecute their own co-religionists the untouchables. The nutouchables have been driven to the verge of entire despair and disappointment to get any justice at the hands of their wise brothers the touchables, and as a last resort they have taken out the weapon of Satyagraha. Consequently, one cannot but come to the conclusion that had it not been for the existence of the foreign yoke of British Burocracy, the self-aggrandising Hindus would have turned this land into a hell of quarrels, fueds and even bloodshed on the score of the "Holy Dharma" and social superiority. Every caste of the Hindu Society is at daggers drawn with each other. The Brahmans v/s Non-Brahmans is a sheer nonsense. Neither the Brahmans nor the Non-rahmans are properly organised. The cord of sympathy is nowhere to be traced. The house is divided within itself and it looks no less a naked hypocricy when the socalled "leaders" claim at the top of their voice "Swa raj for India." The Hindus have become completely dead to the most essential point of homogeneity which alone can save them from apparent ruin and consequent elimination from this land, before the well organised propaganda of the Islam and Christian Missionaries. In spite of the *

The Madras Presidency is notorious for its orthedoxy and foolish ideas of caste-superiority of the Brahmins especially. There the untouchables live a life which the beasts like dogs and cats dare not envy. The Madras Presidency always pours forth a powerful stream of garrulous patriots. Madrasi patriots are well known for their thundering speeches. Most of them are Congressites. The I. N. Congress, it is well mnown to all, did pass a resolution urging upon all to remove the scourage of untouchability and placed it at the top of Congress Constructive Program. The Vykom Satyagraha is an illustration in itself to show how far these garrulous Madras Patriots have honestly fulfilled the Congress Mandate. but they blame the Madras patriots alone? Every lamp has its shadow.

The removal of untouchability is purely a social question. It is ertirely in the hands of the Hindus to remove untouchability. Government have nothing to do with this question. Whether you retain it or remove it, they stand indifferent and unconcerned in the matter. Any widening of gulfs and dissensions between different communities of the Hindu Society, are congenial and salutory to the unobstructed continuation of their sway over this country either in the form of presnt burocracy or its change in autocracy. The stiff indifference of the conservative Hindus in refusing to treat the untouchables with equal privileges is a nett gain to the proselytising religions like the scheming Islam and caressing Christianity.

But Hindus are not yet prepared to relax a bit and grant justice to the demands of their unfortunate brethren the untouchables. They are not even prepared to permit them to draw water from public wells or take rest in public Dharmashalas. Even in public schools too their sons are treated as inferiors to dogs and *

This is a nice beginning and we wish success to the sufferings of the steel-minded volunteers and their noble minde leaders. Before Satyagraha is used to achieve political

---

* उपलब्ध झालेल्या अंकात काही वाक्य वाचता येत नाही.

ems it must be used to eradicate many of the most humans and barbarous custom which have held the Hindu Society in perpetual bondage, both mentally and physically. Social Reformers have found their preachings useless to bring aboutcertains reforms in the Hindu Society. Thousands of writers got thier pens turned blunt by writing heaps on articles on social reform. The social conferences have proved of no avail; they are at present more dramatic shows, in which certain crafty people get themesleves worshipped and glorified annually. In short, the conservatism of the Hindu Society is too tough and hard to break through and it is now necessary to use the Satyagraha weapon to rationalise it.

Child Marriages, Dowry System, barbarous treatment of the widows, conceptions of born superiority of the Brahmans in general and priests in particular, marrying the ignorant girls to Khandoba God and thus compelling them to live a life of open prostitution, selling girls for the prostitution trade and many other social evils have capped the very foundation of the Hindu Society. Those who desire to relieve the Society of these evils cannot do better than mobilising rational youths and start a Satyagraha in their respective communities first and in Hindu Society generally afterwards. Take the question of the dowry system. Its, dire consequences are too numerous to mention. It has impoverished many castes dragging them on the border of complete moral and physical degeneration. The Dowry System not only effects forced marriages, but compels numberless maidens to live a miserable life in company with unsuitable husbands. If the rational youths determine to put an entire stop to this wretched and emasculating custom of Dowry, they can do it in no time if they take out the *

□□□

* उपलब्ध झालेल्या अंकात काही वाक्य वाचता येत नाही.

लेख

प्रभु रंगो बापूजी गुप्ते देशपांडे यांचे संक्षिप्त चरित्र

(मागील अंकावरून पुढें चालूं)

बनिया कंपनीच्या डायरेक्टरांनी छत्रपतीच्या पदच्युतेबद्दल तपास करून न्याय द्यावा, म्हणून रंगो बापुजीनें वारंवार खटपटी केल्या, परंतु व्यर्थ. अखेर जवळचा पैसा संपला. उपासमार होऊं लागली. एवढें लंडन शहर, पण तेथें या बिचाऱ्या हिंदु वकिलांची कोणी दाद घेईना. बरे, छत्रपतीचे वकील म्हणून असल्या बाह्य थाटांत किंवा मेटीभवरी पाठवून तेथील नगरदेवांची मर्जी संपादन करण्यासाठी लागणाऱ्या खर्चात खंड पाडतां येईना. अशा मोठ्या * मंडळी सापडली. यशवंतराव शिकें व भगवंतराव विठ्ठल यांनी निराशेन ✻ इंग्रज मित्र सुद्धा द्रव्याभावी पाटलुणींच्या खिशात हात घालून स्वस्थ बसले. तेथला परिवार एकंदर १८ असामींचा. त्याचें वर्णन यशवंतराव शिकें असें देतात : ''लंडन मुकामी माहाराज सरकाराकडील मंडळी. खुद्द आम्ही १ चिटकोजीराव सुर्वे १ आमची माणसे असामी ३ व भगवंतराव * रावजी वैद्य १ व त्याचे माणुस १ व सयद मीर १ त्याचा दुसरा सोबती १ **

हा अर्ज जाण्याच्या सुमारासच सर्व चार्लस फोर्ब्ज ऑफ डैरेक्टर्सकडे गेलेल्या अर्जाचे उत्तर रंगो बापूजीच्या तर्काप्रमाणेंच आलें. त्यांत बोर्डानें कळविलें कीं आधीं आलेले व मागाहून आलेले असा भेद न राखतां तुम्ही सर्व 'पागडीवाले हिंदु' चळवळ्ये येथून निघून स्वदेशी जात असाल, तर बोर्ड चाळीस हजार रुपये प्रवासखर्चाकरिता मंजूर करील; एरवी नाहीं. यशवंतरावाला ही अट पटेना व पुढें काय करावें हेंहि सुचेना. रंगो बापुजीनें ही अट यशवंतरावाला मान्य करण्यास सांगितली. व त्यांतला डांवपेच उघड केला. तेव्हां त्याची खात्री पटली. बोर्डाच्या अटीला होय असे उत्तर जातांच चाळीस हजाराराची रकम मंडळीच्या पदरीं पडली आणि हे 'पगडीवाले हिंदु' ता. १ जुलै सन १८४१ रोजीं लंडनहून जहाजांत बसून निघाले. डैरेक्टर बोर्डाचा जीव खालीं पडला. पण पुढची कायस्थी मस्तकाची धडक त्यांच्या अटकळींत काय येणार! पूर्वी बेत ठरल्याप्रमाणें, जहाज माल्टा येथें येतांच, रंगो बापूजी तेथें उतरला व बाकीची मंडळी पुढें रवाना होऊन ता ५ सप्टेंबर १८४१ रोंजी मुंबईस दाखल झाली.

---

* उपलब्ध झालेल्या अंकात काही वाक्य वाचता येत नाही. * उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द दिसत नाही.

बनिया कंपनीच्या विलायती बोर्डाची अट अक्षरशः पाळून रंगो बापुजी पुनः माल्टाहून मुकदम्यानी चळवळ चालवायला लंडनला परत हजरः खटास खट भेटे व मनीचा संशय फिटे! प्रवासखर्चाची अडचण परस्परा निभावली, कंटाळलेली मंडळी स्वदेशी रवाना झाली. डैरेक्टर बोर्डाची अट शब्दशः पाळली गेली व रंगोबाची स्वारी पुन्हां लंडनमध्ये 'पुनश्च हरीः ॐ' करायला येऊन जेठा मारून बसली. अर्थात् त्याच्या खर्चाचा प्रश्न पुन्हा आलाच. पण रंगोबाने इंग्रज मित्रांस स्पष्ट जवाब दिला कीं ''मी एकटा जीव. जगलो काय आणि मेलो काय सारखाच.** नुसत्या अर्जाच्या भेंडोळ्यांनी दाद लागण्याइतकी विलायत म्हणजे परसांतली भाजी असती, तर आजचा स्वराज्याचा लढा उत्पन्न होण्याचें कांही कारणच नव्हते! विलायतेचें राजकारण लढविण्यास जाणाऱ्यानें प्रथम आपल्या घरादारांवर व कौटुंबिक मायापाशावर रखरखीत निखारे ठेऊन, फटिंग म्हणून गेले पाहिजे, हा शंभर वर्षांपासूनचा अनुभव आहे. यशवंतराव शिर्क्याचा सांसरिक व्याप दांडगा होता. त्याची भाऊबंदकीचीं लफडी विलायतेंत सुद्धां त्याला अन्न गोड लागू देत नव्हती व अखेर सुद्धा भाऊबंदांनी नवीन छत्रपति आप्पासाहेब भोसले व सचीव पंत यांच्या बगलेंत घुसून त्याच्यसा इनामी सुभ्यांस नाना दंगली सुरू केल्यामुळें, शिर्क्यांस इकडे आड तिकडे विहीर होऊन स्वदेशी परत जाण्याची विवंचना लागली होती. रंगोबाचें कुटुंबहि काहीं लहानसहान नव्हते. पण त्यानें हा विलायतचा मामला हातांत घेतांना, कौटुंबिक मायापाशाला कायमची रजा दिल्यामुळें, त्याच्या चळवळीकडे त्याला एकतानतेनें आपल्या हिमतीची पराकाष्ठा करणें सुलभ गेलें. रंगाबांच्या या निःस्वार्थी फटिंगपणाचा परिणाम असा झाला कीं आज घटकेला त्याचे वंशज अत्यंत विपन्नावस्थेंत दिवस कंठीत असल्याचें आमच्या ऐकिवांत आहे. एकनिष्ठ राष्ट्रसेवकांच्या परिवाराची काळजी घेणें राष्ट्राचें कर्तव्य आहे. पण जेथें खुद्द कायस्थ प्रभु समाजच बेदरकार व निष्ठूर बनला, तेथें रंगा बापुजी सारख्या स्वराज्यनिष्ठ कायस्थरत्नाच्या वंशजावर उकिरडे फुंकण्याचा प्रसंग आला तरी त्यांच्या हृदयाला पीळ कसा पडावा?

रंगो बापुजीनें पोटास चिमटा घेऊन छत्रपतीच्या पदभ्रष्टतेविरुद्ध मुकादमा चालविण्याची जारी तयारी केली. एक दोन वेळा छत्रपतीकडून त्याला कांही रकमांची पोंच झाल्याचा उल्लेख त्याच्या पत्रव्यवहारांत आहे. परंतु तेवढ्यानें त्याच्या अनंत खटपटीचें तोंड जेमतेमच भरत असे, असें त्याच्या स्वदस्तुरच्या अनेक पत्रांवरून स्पष्ट दिसतें.** रंगो बापुजीला सन १८४० पासून १८४६ पर्यंत बनिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी जरी दाद दिली नाहीं, तरी त्यानें इंग्रजी भाषेचा चांगला अभ्यास करून, मोठमोठ्या गृहस्थांस समक्ष भेटून, आपल्या छत्रपतीची कहाणी निवेदन करण्याचा धूमधडाका चालूं ठेवला होता. * मोठा चतुर, * व मिठ्ठास बोलका असल्यामुळें त्यानीं पुष्कळ इंग्रज सज्जनांच्या हृदयात दयेचा पाझर फोडला आणि त्यांना आपल्या बाजूला वळवून घेतले. विशेषतः रंगो बापुजीचा नीट नेटकेपणा, वक्तशीरपणा, कामाची टापटीप, मुद्दे व्यवस्थित मांडण्याची सफाई वगैरे गुणांनी तर त्यांनी अनेक मोठमोठ्या लोडांवर आपलें वजन बसविलें. मध्यस्थाची कुशल मध्यस्थि आणि सत्यप्रिय विवेकी इंग्रज गृहस्थांची कळकळीची खटपट अशा रीतीनें अपयशी ठरली तरी रंगो बापुजीनें धीर सोडला नाही. त्यानें 'मरेन पण हटणार नाही' या मऱ्हाठी बाण्यानें स्वतःच्या आत्मसामर्थ्याला परिस्थितीशीं

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द लागत नाही. ** उपलब्ध झालेल्या अंकात काही वाक्य वाचता येत नाहीत.

झगडण्यास जागृत केलें. त्याने विलायतेचें लोकमत जागृत करण्याचा उपक्रम सुरू केला. जेव्हां न्यायमंदिरातील न्यायदेवतेच्या न्यायबुद्धीचे दिवाळें वाजतें, तेव्हा अन्यायग्रस्त दीनांना जनतारूप जनार्दनाच्या दरबारांतच जाऊन आरोळ्या माराव्या लागतात. त्यानें लहान लहान इंग्रजी हस्तपत्रिका वाटून त्यात छत्रपतींवरील अन्यायांच्या गोष्टीं प्रसिद्ध करण्याची सुरुवात केली. निरनिराळ्या कौटींत खेड्यांत संस्थेत जाहीरसभा भरवून तेथें रंगो बापुजी सोप्या इंग्रजी भाषेंत सणसणीत व्याख्यानें देऊं लागला. अशा रीतीनें त्यानें अनेक इंग्रज स्त्रिपुरुषांची सहानुभूति मिळवून, त्यांना आपल्या कार्याचे अनुयायी बनविले. लोकमत-प्रबोधनाच्या चळवळीचा व्याप या एकट्या प्रभुवीरानें एवढा जबरदस्त प्रसृत केला कीं सन १८४७ सालच्या पार्लमेंटाच्या इलेक्शनच्या वेळी प्रत्येक ठिकाणच्या उमेदवाराला तेथील मतदारसंघांनीं अशी अट घालण्याची सुरुवात केली की 'हिंदुस्थानचा बादशहा प्रतापसिंह छत्रपति यावर बनिया कंपनीनें उभारलेल्या अन्यायाचें निरसन पार्लमेंटाकडून करवून घेण्याची शपथ तुम्ही देत असाल तर आम्ही तुम्हाला व्होट्स देतो; नाहीं तर देत नाहीं.' रंगो बापुजीनें आपल्या सर्व खटपटीचा इत्यंभूत प्रमाणबद्ध इतिहास मोडी लिपींत शिळा छापावर छापवून त्याची बांधीव पुस्तकें हिंदुस्थानांत रवाना केली होती. इंग्लंडमध्यें मोडी लिपीचें छापलेलें हेंच पहिलें पुस्तक होय, याचा सर्व मजकूर रंगो बापुजीनें मोत्यासारख्या वळणदार अक्षरानें स्वतःच्या हातानें लिहिला आहे. कायस्थांच्या इतिहासप्रसिद्ध कलमबहाद्दरीचा हा शेवटचा नमुना केवळ प्रेक्षणीयच नव्हे तर दर्शनीय व वंदनीयहि आहे. आतां तें दिव्य वळणदार अक्षर, मोत्याच्या सराप्रमाणें सरळ रेखलेल्या त्या नयनाल्हादक ओळी आणि मधुन मधुन पैलूदार हिऱ्यांच्या झुबक्याप्रमाणें त्या ओळींचें सौंदर्य वाढविणाऱ्या त्या फर्डेशाही लपेट्या, परमेश्वरा, आतां पुन्हा कधिंतरी पुनरुज्जीवित होतील कां रे? या मोडी पुस्तकाला प्रस्तावनेदाखल रंगोबाने जें एक जाहीरपत्र जोडलें आहे, तें वाचलें म्हणजे त्याच्या खटपटीची कल्पना होते, इतकेंच नव्हे तर सूक्ष्मदृष्टी वाचकाला त्यांत त्याचा अनुपमेय निःस्वार्थी बाणा व हृदयाची जागती जोत कळकळ स्पष्ट दिसून येईल. तें पत्र असेः

वाचणारे मंडळीस प्रार्थना. विनंती येथील कुशल ताा श्रावण वद्य ५ चंद्रवार शके १७६९ प्लवंगनाम संवत्सरे राज्याभिषेक शक १७३ मु।। ता।।३ आगस्ट सन १८४७ पावेतो मु।। शहर लंडण प्रांत इंगलीषस्थान येथें श्रीपेकरून यथास्थित असे विशेष. श्रीमन्महाराज राजश्री प्रतापसिंह महाराज छत्रपति संस्थान सातारा यांजवर खोटे फितुरी तुफाने मुंबई गव्हरमेंटानी तरकटे सदीचे जोरानी उभी करून जबरीनें राज्यावरून काढून खराब हवेत नेऊन ठेऊन सख्त सजा दिली, हा मजकूर जगजाहीर आहे. त्यास मुंबई गवरमेंटानी खोटे तरकटी फितुरी राज्याचे जहागीरदार घेण्याबद्दल उभे केले, म्हणोन गवरनर जनरल यास लिहून पाठविले. परंतु इनसाफ मिळाला नाही. त्याजवरून छत्रपति सरकारचे आज्ञेप्रमाणें या मुकामी येऊन मी व माझे दोस्त प्रथम ऑनरेबल कोर्ट डैरेक्टरर्स याची बहुत वेळा इनसाफ करण्याविषयी बोललो. परंतु कोर्टाचे उत्तर 'मुंबई गवरमेंटानी खरे अगर खोटे केले ते आम्हास कबूल आहे.' दुसरे बोर्ड कंट्रोल यासी बोललो त्याचे उत्तर 'कोर्टानी केले ते फिरावयाचे नाही' म्हणतात. तिसरे प्रिविकौन्सिल येथे काम चालवावा तो वकील बारिष्टर म्हणतात 'राजा पातशहा इनसाफ या कौन्सिलात पहाण्यास मैजेस्टी क्वीन म्हणजे राणीचा हुकूम पाहिजे' चवथे मॅजेस्टी क्वीन व्हिक्टोरिया यांस अर्जी दिली, परंतु उत्तर नाहीं. क्वीनची हुकमत पहावी तों मोठे नांव धनी, सारी हुकमत वजीर बारभाई यांच्या

हाती. पाचवे, क्वीन्स बेंच व केबिनेट कौन्सिल येथे प्रयत्न करून खोटे फितुराचे पुराव्याचे कागदपत्र दिले परंतु उत्तर नाही. सहावे, मोठी कुदरत व अदल इनसाफ मागण्याचा दरबार मुख्य पार्लमेंट, येथे मोकदमा बोलण्यासमयीं चाळीस मेंबर हजर नाहींत. ** येणेप्रमाणे इंगलीश दरबार हा बाजार (आहे.) दाद न लागे. तेव्हा इंगलीश प्रांतीचे चालीवरून पाहता सर्वत्र मुलखी लोक यांची कुदरत हुकमत पार्लमेंटचे मेंबरांवर मोठी. सबब विचार करून पाहता इंगलीष प्रांती सर्व जनास सदरहू मोकदम्याचा मजकूर जाहीर करावा, असे चित्तांत ठरवून, दरबारी लोकांस आधी खबर देऊन, काम चालविण्याबद्दल मेहेरबान ह्यूम एस्क्वायर मेंबर नामदार यास *

याशिवाय (पुष्कळ) ठिकाणी बोलणी जाहली, परंतु तपशील लिहित, वाढे सबब न लिहिले. येणेप्रमाणें वगैरे ठिकाणी जो मजकूर समजाविला तो तरजुमा लिहिला आहे, तो मजकूर नजरेंत येईल. काना मात्रा व्यंजन अक्षरें कमी जास्ती असल्यास क्षमा करून लाऊन वाचा. दुसरे, माझे मीच बोलण्याचा तरजुमा करून माझी अक्कल व गर्व करून होऊन दाखवितो म्हणाले त्यास माझा उपाय नाहीं. सरकारची आज्ञा आली तेव्हां करणें प्राप्त जाहले. या सर्वांचा सेवक बहुत नम्र आहे. लोभ असावा हे विनंति.

सही रंगो बापुजी चांद्रसेनीय गुप्ते प्रभु दुर्घट प्रवासी

या पत्रावरून आपल्याला अनेक विधानें काढतां येतील. (१) राजकीय बाबतींत इंग्रज लोकांच्या 'इज्झत'ची पाठ आतां प्रमाणेंच टणक व कणखर होती. (२) विवेकी न्यायप्रिय इंग्रज स्त्रिपुरुषांचा इंग्लंडमधें जरी दुकाळ नव्हता, तरी अन्यायग्रस्तांच्या सप्रमाण तक्रारींचा व त्यांच्या जन्मसिद्ध हक्कांचा वाजवी विचार करून, त्यांना न्याय देण्याच्या उदार बुद्धीचाहि सुकाळ नव्हता.*

लोकमतजाग्रतीच्या खटपटीचा परिणाम असा झाला कीं ता. २ दिसेंबर सन १८४६ इसवी मार्गशीर्ष शुद्ध १५ शके १७६८ पराभवनाम संवत्सर बुधवार रोजीं सायंकाळीं, लंडन येथें हानोवर स्क्वेअर क्वीन कन्सॉर्ट रूमच्या भव्य दिवाणखान्यांत एक मोठी जंगी सभा भरली व तेथें रंगो बापुजीनें सुमारे ६ तास अचाट वक्तृत्व करून छत्रपतीवरील अन्यायाचा मुकादमा दस्तऐवजी पुराव्यानिशीं सप्रमाण समजाऊन दिला. मधून मधून सर चार्लस फोर्ब्स व कॅप्टन कोगन त्याला मदत करीत होते. रंगो बापुजीच्या या व्याख्यानाचा फारच विलक्षण परिणाम श्रोतृसमूहांतील स्त्रीपुरुषांवर झाला व त्याच वेळी ४४ मोठमोठ्या वजनदार मंडळीची एक कमिटी स्थापन होऊन या प्रकरणाचा निकाल त्यांनी द्यावा असें ठरलें; त्याच प्रमाणें त्यांनी ''ठराऊन सांगितलें कीं रंगो बापूचे बोलण्याचे (व्याख्यानांचे व दस्तऐवजी पुराव्यांचें) लहान बुक या देशीचे राज्यांतील सर्व गावोगांवी व प्रांतोप्रांतीं संपूर्ण ठिकाणी पाठवून सदर्हु मजकूर सर्वत्र जनास जाहीर करावा.'' प्रस्तुत प्रकरणीं व्याख्यानांचे साद्यंत रिपोर्ट 'अधुटे अक्षरांत' म्हणजे शॉर्टहॅन्डमध्यें घेण्याचें काम मि. ग्रीन नांवाचें एक सरकारी रिपोर्टर करीत असत. त्याला १२८ पौंड १८ शिलिंगचें एक बिल (रु. १२८०) भरल्याचा उल्लेख रंगो बापुजीच्या एका खासगी पत्रांत आहे.

श्रीमन्महाराज छत्रपति प्रतापसिंह महाराज ता. १४ ऑक्टोबर १८४७ रोजीं दुपारी ३ वाजतां बनारस येथें बनिया कंपनीच्या तुरुंगांत वारले. ज्याच्यासाठी रंगो बापुजीनें एवढा भीम प्रयत्नाचा व्यूह रचला व काट्यावर धड टाकून विलायतेची हद्दपारी पत्करली, तो नरवीर अस्तंगत होतांच, रंगोबाची मनस्थिति

** उपलब्ध झालेल्या अंकात सदर मजकुराचा संदर्भ दिसत नाही. * उपलब्ध झालेल्या अंकात काही वाक्य वाचता येत नाहीत.

काय झाली असेल याची वाचकांनीच कल्पना करावी. महाराजांच्या मृत्यूची बातमी वाचतांच रंगोबा दोन तास बेशुद्ध पडला होता.*

त्यानें हिन्दवी स्वराज्यासाठी अखेरपर्यंत निकाराने झगडण्याचा निश्चय केला. आधींच बनिया कंपनीचे मुख्य प्रेसिडंट सर जॉन हॉबहौस हे प्रस्तुत मुकदम्याबद्दल या 'पागोटीवाल्या हिंदूच्या' चळवळीवर इतके गरम झाले होते कीं त्यांच्यापुढें प्रायमस स्टोवचा भडका कांहीच नव्हे. छत्रपतीचे एक इंग्रज पुरस्कर्ते कॅपटन कोगन हे त्यांना भेटले त्यावेळचे त्यांचे उद्गार मननीय आहेत. सर जॉन हॉबहौस गुरगुरत म्हणाले "Captain Cogan, you have joined a party with Sir Charles Forbes to embarass the Government, and to bring this case before Parliament - I swear that I will never allow the Rajah to sit on the Gadee again - I will support the Government of India right or wrong and put a stop to these "Turbaned Gentlemen" filling London with their appeals"

(**भावार्थ** : कप्तान कोगन, तुम्ही व सर चार्लस फोर्ब्स यांनी कट करून या गवर्मेंटला त्रांगड्यांत आणण्यासाठीं पार्लमेंटांत हा खटला आणण्याची धडपड तुम्ही करीत आहां. पण खूप याद राखून ठेवा कीं मी या राजाचे पाय गादीला कधींहि लागूं देणार नाहीं. हिंदुस्थान सरकारची करणी बरी असो, मी तिचाच पुरस्कार करणार करणार आणि साऱ्या लंडनभर अपिलांची धामधूम उडविणाऱ्या या 'पागोटीवाल्या गृहस्थां'च्या चळवळींची नांगी मोडणार.) चळवळ थोडी जोरांत येते न येते तों छत्रपतीचा मृत्यू झाला. त्यामुळें सर्व इंग्रज मित्रांच्याहि कमरा खचल्या. त्यांनी रंगो बापूजीला स्वदेशीं परत जाण्याचें सुचविलें. त्यावर रंगोबानें दिलेलें पाणीदार उत्तर पहा. ''राजा कैलासवासी जाहला परंतु इनसाफ मेला नाहीं, जिता आहे. ईष्ट इंडिया कंपनीहि मेली नाहीं, जिती आहे. त्यास इनसाफ मागण्याबद्दल मी या मुकामी जिता आहे. अखेर इनसाफ मागण्यास महाराजांचे चिरंजीव आहेत त्यास इनसाफ द्यावा... राजा गेला परंतु मोकदमा चालेल.''

*विलायतेस राज्याबद्दल वाद चालविला आहे तो शेवटास न्यावा. पेटावर नजर न द्यावी. राज्य पूर्ववत् दिले तर घ्यावे. परंतु पोटाचा बंदोबस्त करुन घेऊन राज्याचा दावा न तोडावा. दुसरे, उदेपुराकडील मेळ शेवटास नेऊन सोयरिका त्यांत व्हाव्या. हे दोन संकल्प. या बाबे रडूं आलें.'' यशवंतराव मल्हार चिटणीस यांनी हे दोनहि संकल्प पूर्ण करण्याचे आश्वासन महाराजांना अंतकाळीं दिले व रंगो बापुजीनेंहि देहपात होईपर्यंत स्वराज्याचा झगडा विलायतेंत लढविण्याचा निश्चय त्यांस कळविला. हा निश्चय रंगो बापुजीच्या स्वदस्तुर पत्रांतील (ता. ७ डिसेंबर १८४७) चिटणीसांना कळविलेल्या शब्दांनीच वाचकांनी ऐकावा. ''असा हा समय गुजरला. हा मृत्युपंथ आहे. मनुष्याच्या स्वाधीनची गोष्ट नाहीं. याजकरिता आपण व सर्वत्र लहानथोर मंडळींनी विचार करून एकदिली ठेऊन 'महाराजांचे जागी शाहु महाराज व मातुश्री राणीसाहेब महाराज यांचे दुःख विसरऊन महाराज छत्रपतीचे मागे त्यांचे पदरने मंडळीनीं हिंमत धरून कार्य शेवटास नेहले हा लौकिक करून दाखवावा. नाहीतर महाराज जाताच चार चहूंकडे होऊन काम बुडऊन पदरी कोणी मनुष्य नाही असे मात्र न व्हावे, इतके

* उपलब्ध झालेल्या अंकात काही वाक्य वाचता येत नाहीत.

मागणें. तीर्थरूप सौभाग्यवती मातुश्री गजरासाहेब व सेनापतीचे कुटुंब आदि सर्वत्रानी कृपा करून या संकटसमयी एकदिलाने चालता, क्रम चालू ठेऊन, हिंमत धरून, दिवस गुजरून, काय ईश्वर करील ते पाहवे. ईश्वर उपेक्षा करणार नाहीं. ईश्वरे सुदीन दाखविल्या अंती सर्वांस राणीसाहेब व शाहु महाराज विसरणार नाहीत. एकदिली व सरकारचा हुकूम मानून माझी मदत व्हावी. मी जिवंत आहे तों सरकारचे हुकुमाप्रमाणे क्रम चालवीन. मी मेल्यामागे दुसरे कोणी या ठिकाणी पाठवून क्रम चालवावा. परंतु सर्वांनीं महाराजांचा संकल्प शेवटास न्यावा हें सर्वांपाशीं मागणे आहे, म्हणून सांगावे अगर हेच कलम सर्वांस वाचून दाखवावे. सारांष जनांत पदरचे मंडळीचे हसें न होईल हे नजर ठेऊन सावध रहावे.''

पैशाचा तुटवडा भयंकर जाणवू लागला. कित्येक इंग्रज हितचिंतक दिवंगत झाले. भीक मागेन पण झगडा सोडणार नाहीं, असा रंगोबाने तर चंग मारला. याबद्दलची त्याची स्थिती त्याच्या पत्रव्यवहारांत स्वच्छ पहावयास मिळतें. *त्यांनी त्याला एक टोलेजंग मेजवानी देऊन अनेक राजकीय पुढाऱ्यांनी त्याचा गौरव केला आणि जणू काय कोणी आपला जवळचा नातेवाईकच आपल्याला सोडून जात आहे, या भावनेनें अनेक इंग्रज स्त्री पुरुष त्यावेळी ढळढळा रडले. त्यांनी आपली आठवण म्हणून रंगोबाला एक नक्षीदार १८ पाकळ्यांचें चांदीचें सुंदर तबक नजर केलें. त्याचा फोटो ग्रंथात देण्यांत येईल. त्यावर एकंदर २२ इंग्रज गृहस्थांच्या सह्या असून, मधल्या वर्तुळांत खालील मजकूर कोरलेला आहेः

A Memorial
of Sincere Respect and Esteem
To
RAJMANIA RAJASREE
RUNGO BAPOJEE of Satara
for 14 years the Vakeel of H. H. Pertaub Shewun
Rajah of Satara
Upon his leaving England and returning to India
after his long and painful exile
Presented by his friends
The Subscribers.
LONDON NOVEMBER 1853

यांत जे दोनचारच शब्द आहेत त्यांत रंगोबाच्या सर्व तपश्चर्येचे चित्र थोडक्यांत पण मुद्देसूद वठलें आहे. ''१४ वर्षाच्या कष्टप्रद हद्दपारीनंतर स्वदेशीं परत जातांना आदर व प्रेमयुक्त भावनेनें अर्पण केलेलें मानपत्र'' बस्स. यापेक्षा अधिक किंमतीचें पारितोषिक तें काय? हें तबक कांही वर्षांपूर्वी जगप्रसिद्ध यंत्रशास्त्र विशारद प्रो. शंकरराव आबाजी भिसे यांना लंडनमधें एका क्युरियॉझिटी शॉप (चमत्कारिक वस्तु विकण्याच्या दुकाना) मध्यें आढळलें. तें त्यांनी खरेदी करून मुंबईस रवाना केलें. आतां तें योग्य बंदोबस्तांत सुरक्षित जपून ठेविलें आहे. हिंदवी स्वराज्यासाठीं झगडणाऱ्या कायस्थ प्रभुवीराचे हें पूजनीय स्मारक मिळविल्याबद्दल महाराष्ट्रदेवी प्रोफेसर शंकररावांना आशीर्वाद देत असते.

(पुढें चालूं.)

□□□

अग्रलेख

अलार्म बेल अथवा धोक्याच्या घांटेचा घणघणाट

हिंदु जनांची पूर्व संस्कृति व पूर्व वैभव कांहीहि असो, आज हा समाज अधःपाताच्या निसरड्या कड्यावर येऊन पडलेला आहे, यांत लवमात्र शंका नाहीं. वैभव गेलें, संस्कृती नष्ट झाली, राज्यसत्ता लयाला गेली, आणि गाळीव गुलामगिरी आली, तरी देखील ज्या द्वैत भावनेमुळे हा भयंकर प्रसंग ओढवला, त्या भावनेला मूठमाती देण्याची हिंदूंना बुद्धीच होत नाहीं, या परिस्थितीचें वर्णन कोणत्या भाषेनें करावें? खुद्द महाराष्ट्रापुरतेंच बोलायचें तर वाडवडिलांच्या खऱ्या खोट्या गुणांचे पोवाडे गाण्याच्या पढतमूर्खत्वापलीकडे अधिक कसलेंहि राष्ट्रोद्धारक भांडवल त्यांच्यापाशीं उरलेलें नाहीं. जातिभेदालाच पक्षभेदाचें नाटकी गोंडस रूप देऊन, भावीवैभवाच्या मृगजळासाठीं हमरी तुमरीची शर्यत खेळत आहेत. हिंदुजनांनी पूर्वी जातीसाठीं किती माती खाल्ली त्याचा इतिहास अझून आमच्या अवलोकनांत आलेला नाहीं; पण जातीसाठीं अखिल हिंदु समाजाची माती करण्यांत ते किती तरबेज आहेत, याचा इतिहास मात्र आज प्रत्यक्ष प्रत्येकाच्या नजरेसमोर घडत आहे. कितीहि उदार आणि उदात्त तत्वावर कोणताहि पक्ष निघो, त्याचें पर्यवसान अखेर जातीभेदांत झाल्याशिवाय राह्यचेंच नाहीं, असा गेल्या १०० वर्षाचा इतिहास आहे. 'सार्वजनीक सार्वजनीक' म्हणून ब्राह्मणांनी व विशेषतः चित्पावनानीं चळवळी केल्या; आणि अखेर साधलें काय? तर स्वतःच्या ब्राह्मण वर्गाचें अवास्तव स्तोम! या स्तोमाला चीत करून बहुजन* ब्राह्मणेतर पक्षांत सर्व ब्राह्मणेतर जाती कधींच सामील नव्हत्या व आतां नाहींत, या झांकल्यांमुठीची किंमत किती लाख रुपये असावी, हें प्रत्येक पक्षाला पूर्ण माहीत होतें व आहे. पण एकदां सफेदा फांसल्यानंतर रंगभूमीवर गातां येत नसलें तर निदान रडून तरी ये, या पलीकडे दोनहि पक्षांतल्या धीरपीरांना गत्यंतर ठरलें नाहीं. अखेर व्हायचें तेंच झालें! ब्राह्मणांच्या 'सार्वजनिक' लफंगेपणाप्रमाणें ब्राह्मणेतरांची बहुजनसमजशाही अखर लोकसंख्येच्या आंकड्यांच्या चढत्या भांजणीनें 'जबरदस्ताचा मामला'च होऊन वसला! 'सार्वजनीक' ब्राह्मणांनी एकट्या चित्पावनांचे स्तोम माजविलें, तर 'बहुजनसमाजवाले' ब्राह्मणेतर आज मराठा जातीचें स्तोम माजवीत आहेत. सारांश, कोठेंहि पहा,

* उपलब्ध झालेल्या अंकात काही वाक्य वाचता येत नाहीत.

पिंपळाला तीनच पानें दृष्टांताप्रमाणें प्रत्येक जबरदस्त समाज बहुसंख्यत्वाच्या घमेंडीनें गोरगरीब दुनियेच्या नांवावर, जातिश्रेष्ठतेच्या संकुचित वृत्तीने, आत्मस्तोमासाठीं धडपडत आहे, हाच अखेर निष्कर्ष काढावा लागतो. ही लोकशाही नव्हे, हा लोकहितवाद नव्हे, हा शुद्ध आत्मस्तोमाचा भुलभुलावणीचा खेळ आहे. यांत काहीं दिवस खेळाडूंवर लोकमान्यतेची मुबलक खैरात होईल, हें कितीहि खरें असलें तरी अखेर 'सार्वजनिक' चित्पावनांना जे प्रायश्चित्त मिळाजें व सध्या मिळत आहे, तेंच प्रायश्चित ब्राम्हणेतर कपूत आत्मस्तोमाचा धांगडधिंगा घालणाऱ्या चित्पावनी मराठा व्यक्तींना मिळाल्याशिवाय खास राहणार नाहीं. एखादी जात लोकसंख्येनें कितीहि अफाट असली तर तेवढ्याच सबबीवर तिनें इतर समजांना गुरकावणें आणि आत्मप्रतिष्ठेसाठीं त्यांचा धिःकार करणें, ही गोष्ट पूर्वीच्या सुलतान किंवा मुलतानशाहींत कितीहि शक्य झालेली असली, तरी चालूं धकाकीच्या मामल्यांत आब्राह्मण चांडाळांच्या संघटनेसाठीं व एकतान उन्नतीसाठी प्रामाणीकपणें झगडणारे पांच वीर पांच कोट प्रतिस्पर्ध्यांना भारी आहेत, ही गोष्ट कोणीहि विचारवंतानें दृष्टीआड करूं नये. मराठा समाजाचा पूर्वेतिहास आणि ब्राह्मणेतर चळवळीपासून त्यांत निर्माण झालेल्या चित्पावनी ठैपाच्या कांही व्यक्तींचा खेळखंडोबा पाहिला की मन खिन्न होतें. कै. शाहू छत्रपतींच्या कार्यशैलीचा व महत्वाकांक्षेचा या चित्पावनी मराठा* पण त्या 'सार्वजनिक'पणाच्या बुरख्याखालीं करण्याचा चित्पावनी अट्टाहास कां? मराठ्यांनी आपल्या राजकीय व शैक्षणिक हक्कांना जागरूक रहावें म्हणून अस्तित्वांत आलेल्या मराठा राजकीय परिषद व मराठा शिक्षण परिषद या दोन संस्था अखिल महाराष्ट्रांतील अनेक जातींना मार्गदर्शक झालेल्या आहेत; आणि त्यांच्या कामाची पद्धतहि अत्यंत कौतुकास्पद आहे. याबद्दल कोण पाजी माणूस मराठ्यांना नावें ठेवील किंवा त्यांचा द्वेष करील? जातिविषयक चळवळींत ज्याचे ते मुखत्यार! इतरांस वाटेल तर त्यांचे स्वतंत्र अनुकरण खुशाल करावें. पण स्वजातिवर्चस्वासाठी सार्वजनिकपणाचा बुरखा घेणें हा शुद्ध चित्पावनपणा होय, हे सर्वांनीच ध्यानांत ठेवल्यास, परस्परवैराग्नीचें भडके शक्य तितके कमी होऊन, सध्यांच्या डोंबारी चलचल मदारीमुळें होणारा बहुजनसमाजाचा कोंडमारा तरी कमी होईल.

कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें तरी ब्राम्हण व ब्राम्हणेतर हे दोन पक्ष नुसते नांवाचे आहेत. कोणांतहि एकी नाहीं. जातीभेदाची किंबहुना जातिद्वेषाची तीव्रता अणुमात्र कमी नाहीं. तोंडाने सार्वजनिक कल्याणाचीं आणि ब्राम्हणेतर जनतेच्या हितवाची कोणी कितीहि पुराणें झोडलीं, तरी प्रत्येक पुढाऱ्याची दृष्टी स्वजातिवर्चस्वावर! असल्या आत्मद्रोही पक्षांनीं कितीहि गगनभेदी आक्रोशाचा हलकल्होळ उडविला, तरी त्यापासून, ज्या हिंदु समाजाचे ते घटकव्यव, त्यांतील व्यक्तिमात्राच्या उन्नतीला काय हातभार लागणार? आजपर्यंत लागला नाहीं, पुढें कधीं लागणेंहि शक्य नाहीं. जातिभेद आणि इतर आणखी सटरफटर भेद यांनीं हिंदु समाजाच्या अवनतीची आतां परसीमा गांठली आहे. स्वयंपाक घरांत बसून 'भागुबाई' ब्राह्मणांनी बौद्धिक श्रेष्ठत्वाचीं कितीहि पुराणें * ब्राम्हणेतरांनी त्यांच्या भिक्षुकी वर्चस्वाला मूठमाती देऊन स्वावलंबनाचे कितीहि पोवाडे गायले, आणि 'क्षत्रिय' मराठ्यांनी केवळ आपल्या शरीरबलाच्या घमेंडीनें कितीहि जोरजोरानें ठासठासून दंड थोपटले, तरी ते हिंदूच असल्यामुळें, त्यांचा

सर्व जातींनी, सर्व पक्षांनी व पंथांनी चटकन् एकवटले पाहिजे. असें न होईल, तर हिंदुत्वावर एक

* उपलब्ध झालेल्या अंकात काही वाक्य वाचता येत नाहीत.

भयंकर प्रसंग ओढवला आहे, त्यांत ब्राम्हण शिल्लक राहणार नाहींत व ब्राम्हणेतरहि गारद झाल्याशिवाय राहणार नाहींत. पूर्वीच्या अनेक गंडातरांत आमचें स्वराज्य गेलें, स्वातंत्र्य निमालें, पण अस्तित्व नष्ट झालें नाहीं. आतांचा प्रसंग बिनचुक आमच्या अस्तित्वावरच आहे आणि तो ब्रिटीश अंमदानींत आलेला आहे. या प्रसंगाची मुद्देसूद पुराव्यासह माहिती देऊन, हिंदुजनांना जागृत करण्यासाठी करवीरकर आर्य श्री. हरी सखाराम तुंगार यांनी मोठ्या धडाडीनें

अलार्म बेलची गर्जना

केली आहे. हल्ली मुसलमानांनीं हिंदूंना रसातळाला नेण्यासाठीं जे गुप्त कट सर्व हिंदुस्थानभर सुरूं केले आहेत, त्यासाठी * गटकवायला टपलेला निझाम आणि आगाखान यांनी पैशाची जी पिशवी मोकळी सोडली आहे आणि हिंदूंचे सफाई उच्चाटन करण्याचे निरनिराळे डांवपेच इस्लामी मिशनऱ्यांनी चालूं केले आहेत, त्याची इत्थंभूत माहिती श्री. तुंगार यांनी, 'रब्बाजा हसम निझामी कृत दाइये इसलाम' या पुस्तकाच्या या मराठी भाषांतरांत दिली आहे. ते वाचले कीं मन खिन्न होतें, विचार भडकतात, विवेकाचा दाब ढिला पडतो आणि.....! प्रत्येक हिंदु म्हणविणाऱ्या स्त्री पुरूषानें हें तीन आणे किंमतीचें पुस्तक ''मंत्री करवीर आर्यसमाज, कोल्हापूर'' यांजकडून अवश्य मागवून वाचावे, दुसऱ्यास वाचण्यास द्यावे. ही अलार्म बेल अखिल हिंदु जनतेला खडबडून जागे करील आणि हिंदूंचे उच्चाटन वाचवील अशी आशा आहे. अशा भयंकर प्रसंगी सर्व पक्षभेद पंथभेद जातिभेद या सर्वांना दूर झुगारून देऊन हिंदु समाजाच्या अस्तित्वासाठीं सर्व हिंदुमात्रांनी एकदिल बनले पाहिजे.

□□□

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द वाचता येत नाही.

लेख

Our Youths Non-Plussed !

While a great hue and cry is continuously raised to snatch Swaraj from the jaws of the British Burocracy, none appears to take the trouble of closely watching in what a pitiable plight the youths of this country stand. Just throw a cursory glance on the crowded streets of the Fort of Bombay or the congested local railway service and you will at once come face to face with hundreds of ambitious youths with High School and College distinctions wandering unsteered here and there for any good or bad job which may eventually save them from apparent starvation. That our B. A's and M. A's should thus be compelled to run from door to door in quest of some service and that too with an unpretentious object of keeping their bones and skin together, is a dire calamity a respectable nation could not bear without mortification. It is a clear sing of our national decay. Youths are the pillars of a nation's hopes. They are the faithful architects of its future destiny. But in a country where the you'hs are actually staring and in a fit off desperate pessimism are forced to live a life discordant with their ideas and ideals of manhood and educational qualifications, no prophet is needed to toretell to what a miserable depth the nation is fast sinking. In spite of the highest educational distinctions which the Indian Universities are capable of confering upon the youths, it is painful to see the future of our youths entirely clouded. While they carry certain blooming aspirations in their beads, the circustances around them offer no solution to realise their ambitions. No searchlight throws a ray of hope on their path of life. From a Master of Art down to the unfortunate non-Matric, all find their ways of future life literally blocked up. Neither can they maintain themselves, nor lend a helping hand to their parents and other members of the family, who pinned their hopes of a respectable living on the earning capacity of their educated youths. Learn they did, but earn they cannot. Wherever they go, all doors are defiantly closed against them. Every office, every industrial concern, hates their approach, and if they venture to enter, a tigerbullet of No Vacancy is immediately fired at their breasts. In short; our youths are debarred from every sphere of modern life to earn a decent living harmonious with their respective educational qualifications. A graduate cannot earn in one month what a cobbler in the street earns in a day. There may be inequality burled against the faces of Indian colonists throughout the British Empire,

but the India itself, the British Regime has maintained complete equality in the field of service-life, inasmuch a Matrics, Graduates, and ever. M.A's all are accorded complete equality in their status as drudging clerks, without the east attention being paid to their educational abilities or diplomas.

The charm and attractions which once pervaded the acquirement of University education is now illusory. Indian youths of the nineteenth century considered government service and the honours attached thereto as the only goal of their life. This state of things exists no longer. Neither the government nor the country affords suitable berths to the youths to carn their livelihood. Diplomas and distinctions have lost their worth. The educational system of the country is not only worthless but lifeless. And, the unfortunate youths who spend their precious time and life in digesting the sapless milk of the Alma Master, now stand on the same pedestal on which Shakespear's Hamlet stood with a con'used sentiment To be or not to be on their parched lips.

The present state of dark disappointment killing the mentality of the youths is most dangerous both to themselves and the nation. Hundreds of youths are becoming desperadoes every day. They cannot keep their vacant hands and mind unengaged. A proper channel to utilize their energies and burning enthujasm not being forthcoming, many of them ae joining several political parties and entering into hot conflicts thereof without the least capital of political sagacity or experience to their creadit. Crafty politicians (if they could be called politicians at all:) are using their enthusiasm for experimental purposes in the political field, such as Moolshi and Nagpur Satyagrahas and the like. In Bengal, we have occasional reports of hundreds of young Bengalis busily engaged in secret revolutionary conspiracies, and the contagion is most likely to affect other provinces sooner or later, if no steps are taken to provide channels for the utilization of young aspirations. In Bengal as well as in Maharashtra, hundreds of youths have made their lives a dirty den of wreckages, thus proving themselves quite unfit to walk with their faces up in the civic life of the society. The Madrasi youths have left and are daily leaving their motherland for Bombay and other provinces in quest of bread. They have earned sufficient notoriety for having lowered the standard of wages by their worst procedure of accepting any job at any wages, thus placing the local youths at a great disadvantage by congesting almost all avenues of service life from a clerk down to a hamal. It is indeed a great inisfortune that our youths, after wasting their precious blood and valuable energy in going through the educational course of the country, should find it impossible to earn their bread. Fie upon that learning which cannot enable the learned to earn his bread, not to talk of any further expectations of chivalry for the benefit of himself or the country.

We sound a note of grave warning to those interested in the welfare and advancement of the country to run to the rescue of our non-plussed youths without any delay. It means a suicidal policy to overlook the discontent which is driving the youths of this country on the verge of revolution simply because they cannot earn their bread and find their path of life closed against them. Even West-returned youths are not being provided for with suitable channels and means to utilise their West-earned knowledge. We can quote for example an incident of a Brahmin youth named Mr. Sahasrabudhye who returned some years back to India with complete knowledge of manufacturing dry plates required for photography. Those connected with this line of business know full well how many

crores of rupees are annually exploited by the Ilfords and Wellingtons simply by the trade of these dry plates. Mr. Sahasrabudhya showed his experiments to many experts in photography here including Dr. Mann, Messrs. S. Mahadev Sons of Belgam and others. The writer himself had the honour of giving a trial to one dry plate marufactured by Mr. Sahasrabudhye with satisfactory results. But ahs, his efforts to mobilise capital failed and this expert of dry plates is now conducting an ordinary printing business in the city of Poona, with all his ambitions quashed to ground. The same condition prevails in all other lines. Our youths do not lack any ability. They can certainly excel in any art anywhere provided the country cares to lend them a helping hand. There are no bodies or coporations whose duty ought to be always to send our bands of young men to foreign countries, supervise their training and on their return provide capital and means to use their hard earned knowledge for the enrichment of the country. Almost all the rising nations like China and Japan laid and are still laying great stress upon this point of sending out students to America, Germany and England to learn some such art which would eventually go to strengthen the hands of their nation and make it self-reliant and self-contained. Here, we have not yet begun to think seriously on this vital question of the day. We are merciless towards our youths. We do not care to see what they learn and what they earn. We have literally thrown our youths on the Sahara desert of their individual fate. Consequently, helpless, hopeless, leaderless they develope a sort of revolutionary mentality not exactly against the foreigners but against the Indians themselves. If the same element of the country cares not to rise up to the occasion created by the present pitiable plight of the Indian youths, we have no doubt of serious calamities befalling the nation in days to come.

India, in spite of the much trumpeted poverty, still holds sufficient wealth to provide for the wants of the country. But this wealth is the monopoly of the capitalists, whose motive does not go beyond * money for their own interests. The contiet between the Labour and Capital is now too need any mention. Just watch the horrible amounts wasted by different communities on the holdings of some nonsensical "Conferences." Often they amount to fifteen or twenty thousands. We have instances to show where this figure jumped to above forty thousands percession. And what did those Conferencewallahs achieve? Nothing in fact. We ask in right earnest these socalled leaders of different communities, whether it would not be more advantageous to utilise these large sumks of precious money in sending off their youths to foreign countries to acquire some such art which may help them in their life to be of much use of themselves, to their community and consequently to their country?

In India we meet with a very disheartening situation so far as capital and art are concerned. Here the artists have to find out capital, be financially responsible for its return look to the government of the factory and in short be all in all himself. This procedure kills his energy and shortly he finds himself a wreck in all respects. There must be seperate responsible bodies to govern the capital, labour, produce and the personal interests of the artist. Sooner our national leaders solve the present dilemma of the youths the better for their credit as leaders. Leaders must not be bleeders.

□□□

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द लागत नाही.

अग्रलेख

तरुणांची मुस्कटदाबी

सांत्प्रतच युग चळवळींचें आहे. नाना प्रकारच्या चळवळीच्या आंदोलनानें हा देश प्रत्येक क्षणाला आपादमस्तक मनस्वीं हादरत आहे. मानवी जीवनाच्या प्रत्येक़ क्षेत्रांत कल्पनांची उलथापालथ रात्रंदिवस घडत आहे. हिन्दु राष्ट्राच्या भाग्योदयार्थ हरतऱ्हेच्या प्रयत्नांचे तोडगे सुचवून, त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यांत अनेक कर्तबगार वीरपुरुष गुंग आहेत. कित्येक तोडगे थोडे फार यशस्वी होत आहेत, तर कित्येक राष्ट्रजीवनाच्या प्रगतीलाच विषाप्रमाणें मारक होत आहेत. प्रयत्नांचा उद्देश - बाह्यत: जरी स्तुत्य असला, तरी त्यांत एकीचा आत्माच नसल्यामुळें, सर्वत्र बोकाळलेल्या मतमतांतराच्या गलबत्यांत जनता किंकर्तव्यमूढ झालेली आहे. लोकनेतृत्वाचें स्वयंप्रेरीत हळदकुंकू कपाळाला फासटून पुढारपणाचें सौभाग्य मिरविणाऱ्यांतहि कार्यक्रमाची एकवाक्यता नाहीं. त्यामुळें हें खरें कीं तें खरें, अशी लोकांच्या मनाची कालवाकालव उडालेली आहे. या मतभिन्नतेच्या दंगलीला कांहीं शहाणे नवजीवनाचें चैतन्य असें समजत असतील! समजोत बिचारे !! आम्हाला तर जनमताचा हा शुद्ध कोंडमारा वाटत आहे. बहुजनसमाजापेक्षां किंचित अधिक शहाण्यांची ही बुद्धिमत्तेची कसरत आहे. गोरगरीब रयतेच्या अज्ञानावर आपल्या ज्ञानाचे टेंभे पाजळणाऱ्या मूठभर अक्कलवंतांचा हा निवळ खेळ आहे. तूं शहाणा कीं मी शहाणा, या हमरीतुमरींतच आजचे पुढारी दंग आहेत. सारांश आज सर्वत्र चालू असलेल्या घामघुमीचा नीट बारकाईनें विचार केला तर दुखतें पोटांत आणि पायाला मलमपट्टी असाच सारा प्रकार दिसतो. जिव्हाचांचल्याच्या सहस्राशानें जर पुढारीब्रुवांचे हात प्रत्यक्ष काम करूं लागतील, काव्यमय कल्पनांवरच भिस्त न ठेवतां डोळे उघडे ठेऊन प्रत्यक्ष वस्तुस्थितीचें निरीक्षण करण्याची तसदी घेतील, आणि पक्षभेदाच्या मुर्दाडपणानें आपल्या बऱ्या वाईट खऱ्या खोट्या कृत्यांच्या फाजील मंडनाच्या नादीं न लागतां खऱ्या लोकहिताच्या कळकळीनें देशांतल्या वस्तुस्थितीचा अभ्यास करण्यास प्रवृत्त होतील, तर आम्हांला असें वाटतें कीं सध्यां माजलेला मतांतराचा ब्रह्मघोटाळा तेव्हांच बंद पडेल आणि बुद्धीभ्रंश झालेल्या जनतेलाहि आपल्या सर्वांगीण पुनर्घटनेचा मार्ग स्पष्ट दिसूं लागेल. भांडकुदळपणाचें बाळकडू प्यालेल्या हिंदू जनांना पंथभेदाची आणि पक्षभेदाची धुळवड शेणवड खेळण्यांत कितीहि आनंद वाटत असला तरी तो आनंद आसुरी आहे. तामसी आहे. त्यामुळें हिंदु जनांच्या पुनर्घटनेचें पाऊल लवमात्र

पुढें सरकरणें शक्य नाहीं. 'जेथे येऊन पडले तट । तेथें अखंड खटखट । कोण एकाचा तरी शेवट । झालाच पाहिजे ।।' ही समर्थांची उक्ति पक्षभेद व पंथभेद माजविणारांनीं राष्ट्रकार्याच्या क्षेत्रांत तरी विशेष लक्षांत ठेवली पाहिजे.

पोटाचें बण्ड किती भयंकर आहे व त्याचे परिणाम कसकसे होत आहेत, याचा परिचय वाचकांना पूर्वी एकदां करून दिलाच आहे. स्वराज्य येतांच राष्ट्राच्या सर्व आपत्ति आमूलाग्र नष्ट होतील, या तोडग्यावर बावळटांखेरीज इतरांचा विश्वास बसणें शक्य नाहीं. पोटानें नाडलेल्यांना तत्वज्ञानाचा उपदेश म्हणजे तान्हेल्या माणसाला पाणी न देतां त्याच्या मुस्कटांत भडकविण्या इतकेंच पाजीपणाचें कृत्य होय. हिंदुस्थानांत इतर अनेक कितीहि रोग परदेशी भांडवलशाहीप्रमाणें आपलें बिऱ्हाड बाजलें कायमचें थापून बसले असले, तरी उपासमारीनें त्या सर्वांवर आज ताण केली आहे. महामारी पत्करली पण उपासमारी पत्करत नाहीं. पोटाच्या तिडकांनीं गरीब मजूरवर्गच आज तडफडत आहे असें नव्हे, तर चांगले सुशिक्षित पदवीधर तरुणहि या साथीला बळी पडत आहेत. फरक एवढाच कीं केवळ हातावर मिळऊन तळहातावर खाणारा मजूर उघड उघड ओरडतो, सुशिक्षित तरूण वर्ग पोटाच्या बण्डाच्या यातना मुकाट्यानें सहन करतो. यातना त्याच, क्लेश तेच, संकटें तीच; अशिक्षित मजूर ओरडतो, सुशिक्षित गप्प बसतो. शिक्षणाच्या अभावामुळें रयत रसातळाला चालली असा कंठशोष करणारांनीं शिकलेल्या तरुणांची उपासमार टाळण्याचे यत्न प्रथम करायला नकोत कां? नुसतें शिक्षण झाले, पदव्या मिळाल्या म्हणजे पोटापाण्याचा प्रश्न सुटत नाहीं; निदान या हतभागी हिंदुस्थानांत तरी मुळींच नाहीं. हेलपाटी करणाऱ्या अक्षरशून्य हमालाची स्थिति आजच्या बीए एमेपेक्षां बरीच चांगली आहे, असें म्हणावयास मुळींच प्रत्यवाय नाहीं. हेलपाटीवाला निदान दुपारची वेळ साजरी करण्यापुरत्या चणेकुरमुऱ्याला महाग नाहीं; पण आमच्या सुशिक्षित तरुणांना तोहि मार्ग खुला नसतो. त्यांचा कोंडमारा, त्यांची मानहानी आणि त्यांची निराशा फक्त त्यांच्या आत्मारामालाच माहीत ! उघड भीक मागण्याची सुद्धां त्यांना पंचाईत !

मुंबई मद्रास कलकत्ता पुणे वगैरे शहरांत हल्लीं सुशिक्षित तरुणांची उदरनिर्वाहाच्या बाबतींत भयंकर मुस्कटदाबी चालूं आहे. हजारों पदवीधर तरूण पोट बांधून नोकऱ्यांसाठी जोडेफाड करीत भटकत असतात. आज ते पडेल ती नोकरी करण्यास तयार आहेत, पण नोकऱ्याच नाहींत. बिचाऱ्यांनीं हाडांची काडें करून युनिव्हर्सिटीचें घोकंपट्टी ज्ञान घशांत कोंबलें आणि पदवीचें चिठोरें मिळविलें. पण माध्यान्हीच्या आगीला हें चिठोरें काय शमऊं शकणार? एकट्या मुंबई शहरांत पोटानें नाडलेल्या सुशिक्षित तरुणांची संख्या किमानपेक्षा पांच हजार तरी असावी, असा आमचा अंदाज आहे. स्वत:ची भली बुरी इभ्रत कायम राखून पोटाळा दोन घांस मिळवून देण्याइतकी सुद्धां लायकी त्यांच्या पदव्यांत किंवा शिक्षणांत उरूं नये, यावरून अनेक विचारांचे ब्रह्मांड आठवतें. आमच्या तरुणांत कर्तबगारीच नाहीं, असें आम्ही कदापिहि म्हणणार नाहीं. जर ते बेकर्तबगार झाले असतील, तर त्या पापाची जबाबदारी त्यांच्या शिक्षणावर येते. हें शिक्षणच पापी आहे. हें शिक्षणच बेकर्तबगारीचें आहे. माणसाचें गुलाम बनविणारें हें विषारी शिक्षण आहे, असें आतां म्हटल्या शिवाय गत्यंतरच नाहीं. ज्या सरकारला बीए एमे वगैरे पदव्यांचीं अंडीं मनमुराद उबवितां येतात, त्याला युनिवर्सिट्यांच्या आढींतून बाहेर पडलेल्या पदवीधरांच्या केवळ पोटापाण्याचा प्रश्न सोडवितां येऊं नये? आणि बीए एमे लोकांनी

केवळ उदरंभरणार्थ कारकुनी खर्डेघाशी केली तर त्यांत युनिवर्सिटीची तरी काय असा मोठा लौकीक उरणार? हिंदुस्थांनातल्या युनिवर्सिट्यांतून पदव्या घेऊन बाहेर पडणाऱ्या तरुणांना आपलें पोटसुद्धां नीट भरण्याची अक्कल शिल्लक उरत नाहीं, हा दुर्लौकीक सरकारला आणि युनिवर्सिटीच्या कार्यकर्त्यांना सहनच कसा होतो, हें आम्हांला समजत नाहीं.

तें कांहींहि असो, आज सुशिक्षित तरुणांच्या पोटापाण्याचा प्रश्न अत्यंत बिकट होऊन बसला आहे. ते हुशार असोत कीं मूर्ख असोत, त्यांची उपासमार टाळण्याचा प्रश्न आधीं सुटला पाहिजे. उपासमार हें एक भयंकर पातक आहे. बुभुक्षितं किं न करोति पापम्? विद्यार्थी दशेंत अनेक उज्वळ आकांक्षांचे मनोरे बांधण्यांत गर्क असणाऱ्या तरुणांना स्वत:च्या देशांत केवळ पोटापाण्यांसाठीं विंवचनेंत पडण्याचा प्रसंग येणें हें एक भयंकर राष्ट्रीय संकट होय. असहकारितेच्या सुतकानें, नखशिखांत खादी पांघरल्यानें, किंवा नुसती परीषदांची झोड उठविल्यानें ही चमडीच्या झोपडीला लागलेली आग विझणें शक्य नाहीं. सर्व असंतोष पत्करले पण उपासमारीचा असंतोष राज्यक्रान्तीला कारण झाल्याशिवाय राहणार नाहीं, असा आम्ही सरकारास व राष्ट्रीय पुढाऱ्यांत स्पष्ट इशारा देतो. रशियाची राज्यक्रांती पोटाच्या बण्डानेंच घडवून आणली आणि अखेर बेदरकार झाराला सहकुटुंब सहपरीवार कुत्र्यांच्या मोतानें गोळीबार खाऊन ठार मरावें लागलें. पोटाच्या बंडानेंच जर्मनी गेल्या महायुद्धांत पासला पडला, देशांत असंतोष माजला आहे, शेंकडों बंगाली तरुण गुप्तकटांत रममाण आहेत, वगैरे बोंबाबोंब उठविणाऱ्या सरकारनें तरुणांच्या उपासमारीचा कधिं विचार केला आहे काय? उपाशी पोट काय पाप करणार नाहीं? वाटेल तें करील. शिक्षणप्रभावाने वाढीस लागलेला विवेकाचा दाब पोटाच्या तिडकांतून उत्पन्न होणाऱ्या पापकल्पनांच्या स्वैर गतीला कितीसा नियंत्रित करणार? बुद्धिमत्तेच्या आत्मविश्वासाची माती होऊं लागली, कर्तबगारीला वाव मिळेनासा झाला आणि केवळ पोटासाठीं विद्वत्तेला असंबद्ध अशा विषम व्यवसायांत खितपत पडण्याचा प्रसंग आला, म्हणून तरुण तापट रक्तानें हवा तो धाडसाचा मार्ग धरला, तर त्यांत कायदेबाजीच्या दृष्टीनें कांहीं गुन्हा खुशाल होवो, पण निसर्गनियमान्वयें त्यांत चूक कोणती? ताज्या तापट तरुण रक्तांतच धाडसाचा वृक्ष फोंफावतो. तारुण हें एक विलक्षण वाफेचें बॉयलर आहे. या वाफेचा राष्ट्रानें नीट काळजीपूर्वक उपयोग केला नाहीं, तर कोंडलेल्या वाफेचा स्फोट कधीं ना कधीं तरी या राष्ट्राच्याच ठिकऱ्या उडवायला कमी करणार नाहीं. राष्ट्राची तरुण पिढी हें एक दिव्य भांडवल आहे. त्याची नीट जोपासना झाली पाहिजे.

परंतु फार खेदाची गोष्ट आहे कीं आम या राष्ट्राचे पुढारी तरुणांच्या नवशक्तीचें योग्य तें संगोपन मुळींच न करतां, तिचा उपयोग - दुरुपयोगच तो - कांहीं विशिष्ट राजकारणी डांवपेचांचें प्रयोग सिद्ध करण्याकडे करीत असतात. सत्याग्रहासारख्या अनिश्चित राजकारणी प्रयोगांत तरुणांना कच्च्या मालाप्रमाणें बळी देण्याची पद्धति अत्यंत घातकी व पातकीहि आहे. हिंदी राजकारणांत एकमेकांशीं चुरशीचे सामने देणाऱ्या अनेक पक्षांनीं असल्या राक्षसी प्रयोगांमुळें हजारों तरुणांच्या आयुष्याची राखरांगोळी केलेली आहे. पोटाच्या बण्डानें हतबुद्ध झालेले शेकडों तरुण आज पुढचा मागचा कांहींहि विचार न करतां खुशाल राजकारणाच्या क्षेत्रांत हवा तो गोंधळ घालीत आहेत. पुढाऱ्यांनीं स्वार्थत्यागाच्या भलत्याच कल्पना त्यांच्या मध्यांत भिनवल्यामुळें ते वाटेल त्या अत्याचारास तेव्हांच प्रवृत्त होतात. भावनावशता तारुण्याचा एक धर्मच आहे. पण त्या धर्माच्या मर्माला डंवचून आपल्या विवक्षित

राजकारणी डांवासाठीं हजारों तरुणांच्या बिनमोल आयुष्याची माती करणें; किंबहुना त्यांना जवळ जवळ माथेफिरू बनविणें, हें भयंकर पाप आहे. पोटाऱ्या पापांत माथेफिरूपणाची फोडणी पडताच त्याचा परिणाम धाडसी अत्याचारांत व्हायचा ! अत्याचारी तरुणांचा भरणा राष्ट्रांत होऊ लागला की त्या राष्ट्राचा अध:पात जवळ येऊन ठेपलच असें समजावें. प्रथम प्रथम हे अत्याचार परकीयांवर होतात, पण अखेर त्यांचा रोख बिनचूक स्वकीयांवरच वहतो. दरवडेखोराचा रोंख द्रव्यप्राप्तीवर असतो; स्वकीय परकीयावर नसतो. पोटानें नाडलेल्या तरुणांच्या क्रोधानें कधिं काळीं पेट घेतलाच तर त्या अग्नीचा लोट बिनचूक स्वकीयांवरच वळल्याशिवाय खास राहणार नाहीं. उठल्या सुटल्या वाटेल त्या गोष्टीबद्दल राज्यकर्त्यांना जबाबदार धरणें, हा गुलाम लोकांचा एक गुणधर्मच आहे. पण हिंदी तरुणांच्या आजच्या उपासमारीला मुख्यत्वें हिंदी लोकच जबाबदार आहेत. ते कसे? त्यांचें चुकतें कोठें? आणि उत्पन्न झालेलें हें संकट कसें टाळतां येईल? याचा खुलासा पुढील अंकावर टाकणेंच बरें.

□□□

स्फुट विचार

मूळ स्वभाव जाईना

कै. शाहू छत्रपतींच्या अमदानींत ब्राह्मणेतर पक्षांत पुढाऱ्यांचें जें पेंच फुटलें होतें, तें त्यांच्या मृत्यूनंतर, अर्थात् छत्रपतींची सैल सुटलेली थैली बंद होतांच, झपाट्यानें ओसरूं लागलें आहे. अनेकांचे स्वार्थत्याग किती पोकळ होते, त्यांचा बहुजन समाजाविषयी कळवळा किती नाटकी होता आणि छत्रपतींच्या तिजोरीतून भरंसाट मिळणाऱ्या देणग्यांवर त्यांचे भाडोत्री लेखन वक्तृत्व कसें डुरकण्या मारीत असे, हें आतां स्पष्ट उघड होऊं लागलें आहे. पलटणचे श्री. कीर्तीवानराव भवानराव निंबाळकर म्हणजे ब्राह्मणेतर पक्षाचे एक मोठे आधारस्तंभ. शिवछत्रपती दैनिकाचे एक उत्पादक व प्रकाशक. पूर्वाश्रमीं हे पोलीस खात्यांत सबइन्स्पेक्टर होते. कै. शाहू छत्रपतीची ब्राह्मणेतर चळवळ सुरूं होतांच त्यांनी सरकारी नोकरीला रामराम ठोकला आणि बहुजनसमाजाचा उद्धार करण्यासाठींत ते तनमनधनें (?) ब्राह्मणेतर चळवळीचे एक पुढारी बनले. त्यांनी लेजिस्लेटिव्ह असेंब्लीकरितां भीम प्रयत्न केले. आतां अखेर ते कोल्हापूर संस्थानांत दरमहा दीडशें रुपये पगारावर पोलीस सुपरिन्टेन्डन्ट होऊन बसल्याची बातमी आली आहे. या आतमींत कांहीं लोकोत्तर चमत्कार आहे, असा भाग नाहीं परंतु बहुजनसमाजाच्या सर्व कळवळ्याचें पर्यवसान अखेर मूळपदाच्या पोलीशी वैभवांतच झालेलें पाहून 'आधी होता वाघ्या, चळवळीनें कला पाग्या, त्याची पोलीसी राहीना, मूळ स्वभाव जाईना.' असें म्हटल्याशिवाय कुणाच्यानें राहवेल? जोपर्यंत असले पोटार्थी पुढारी ब्राह्मणेतर पक्षांत आहेत, तोंपर्यंत या पक्षाच्या चळवळी यशस्वी होणें शक्य नाहीं. नुसत्या स्वार्थत्यागाच्या* समाजचे समाज उद्धरून जाते, तर या वेळीं हिंदुस्थान म्हणजे केवळ इंद्राची अमरपुरी बनला असता ! डॉ. रँ. परांजपे द्रव्यप्राप्तीच्या आशेनें दिवाण बनले व जनहिताचें त्यांनी नुसतें सोंग आणलें, असा आरोप अनेक जबाबदार ब्राह्मणेतर (*) पुढाऱ्यांनीं त्यांच्यावर केलेला पुष्कळांच्या स्मरणांत असेल. द्रव्य कोणाला नको? चालून आलेल्या कामधेनूचे दूध कोण मूर्ख पिणार नाही? नोकरीच करायची तर भरपूर भाकरीला तोंड कां फिरवावें? पोट बांधून जनसेवेची वृथा फुशारकी कशाला? काय वाटेल तें झालें तरी आधीं

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द लागत नाही.

पोटोबा आणि मग विठोबा, हा मनुष्यस्वभावच आहे. परंतु डॉ. परांजपे ब्राह्मण पडल्यामुळें त्यांचा दिवाणगिरीचा भरभक्कम मासिक तनखा म्हणजे त्यांच्या नालायकीचा एक भरभक्कम पुरावा म्हणून गेल्या इलेक्शनमध्यें सर्वत्र प्रसृत करण्यांत ब्राह्मणेतर उमेदवारांनीं मुळींच कसूर केली नाहीं. इतकेंच नव्हे तर दिवाणगिरीचें ध्येय पुढें देऊन श्री. भास्करराव जाधवानीं इलेक्शनसाठीं ज्या खटपटी केल्यां, त्यांत ''मी केवळ धनप्राप्तीच्या आशेनें निवडणुकीला उभा रहात नसून, ब्राह्मणेतर जनतेच्या हितासाठींच माझ्या आयुष्यांतला हा अखेरचा प्रयत्न आहे. यदाकदाचित् मला दिवाणगिरी मिळालीच, तर सातारा जिल्ह्यांतल्या ब्राह्मणेतर (?) रयतेच्या हितासाठीं मी दरमहाच्या दरमहा माझ्या पगारांतला बराचसा भाग मी खर्च करीन.'' हा लांबलचक आशिर्वाद त्यांनीं अनेक लोकांपुढें स्पष्ट बोलून दाखविला होता. गुदस्त सालीं सातारा जिल्ह्यांतल्या ब्राह्मणेतर पुढाऱ्यांची पाडळीला जी पहिलीच सभा भरली होती त्या वेळीं खासगी बैठकींत याच मुद्यांवर श्री. जाधवरावानी विशेष जोर दिला होता. या बाबतींत सध्यां कांही मंडळींचा त्यांच्याशीं पत्रव्यवहारहि चालूं असल्याचें ऐकतों. खुलासा काय होणार तें दिसतच आहे. कोण देतो आणि कोण घेतो ! इलेक्शनी भाषा इलेक्शनपुरत्याच असतात, हें रन समजणारा प्राणी मूर्खांशिवाय दुसरा कोण असणार? 'शेतकऱ्यांचा कैवारी' इलेक्शन संपतांच शेतकऱ्याचा कसायी बनला तरी त्याचें काम करणार? फक्त ब्राह्मणेतरब्रूव पक्षांत कोणत्या मासल्याचे पुढारी आहेत, याचा स्पष्ट खुलासा करून बहुजनसमाजाला जागृत करणे एवढेंच आमचें कर्तव्य आहे.

आधीं अक्कल जातें मग भांडवल जातें

कर्झनशाहींत निजाम साहेबांनीं वऱ्हाड प्रांताचें उदक इंग्लीश सरकारच्या हातांवर सोडलें. त्या वेळीं निजाम साहेबांना G. C. B. ही एक बहुमानाची पदवी साम्राज्य सरकारकडून देण्यांत आली. या पदवीचा खरा अर्थ काय असावा तें लोकांस न समजल्यामुळे, त्यांनी Gave Curzon Berar (कर्झनला वऱ्हाड दिलें) असा आडमुठा अर्थ केला. आतां प्रस्तुतच्या निजाम साहेबांनी सर अल्ली इमाम या बड्या कायदेपंडिताला हातांशी धरून इंग्रजांना आचंद्रार्क दिलेला (Ceded in perpetuity) वऱ्हाड परत मिळविण्याची जंगी चळवळ सुरू केली आहे आणि आमचा असा तर्क आहे कीं लवकरच या चळवळीला खिलाफत प्रकरणासारखें रूप येईल. या बाबतींत निझाम साहेबानें व्हाईसरॉय साहेबांना केलेल्या कायदेबाज अर्जाच्या प्रति सर्वत्र प्रसार करण्यांत आल्या आहेत. निझामच्या राज्यांतले निरनिराळे प्रांत इंग्रेजांनीं वेळोवेळीं मकटवतांना निझामाशीं जे जे तहनामे केले त्यांचा नुसता सारांशच वाचला, तर त्यावर राजीखुषीच्या व अक्कलहुशारीच्या सह्या करतांना सर्व निजामांनी एक कांही निषाबाजी तरी केलेली असावी किंवा ते बेअक्कल असावे, असा निष्कर्ष काढण्यास कांहीं हरकत नाहीं. या तहनाम्यांचा अभ्यास करणाऱ्याला हाच सिद्धांत काढावा लागेल कीं हिंदी संस्थानिकांची आणि मुत्सद्देगिरीचा फारकत झाल्यामुळेंच इंग्रेजी मुत्सद्यां नुसत्या शब्दयोजनचातुर्यावर त्यांचे निरनिराळे प्रांत बिनबोभाट भटकावले. तें कांहींहि असो. आज खालसा प्रदेश आणि संस्थानी प्रदेश यांतील सर्वांगीण

प्रगतीचा विचार केल्यास संस्थानी मुलखापेक्षां खालसांतले लोक अधिक स्वतंत्र व अधिक सुखी असेंच म्हटलें पाहिजे. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाच्या मदांत ब्राह्मणेतरांनीं म्हणजे विशेषत: मराठे व तत्सम जातियांनीं ब्राह्मणी संस्थानांतील केरकचऱ्यावर तुटून पडावे; उलट ब्राह्मणांनी ब्राह्मणेतर संस्थानांतला उकीरडा 'कोल्हापुरी संगीत चिवडा' समजून आकंठ चघळावा; किंवा हिंदु-मुसलमान-बेकीच्या सम र्थनार्थ हिंदूंनी मुसलमानी संस्थानांतली तबलकी बाहेर काढावी; ही क्षुद्र भावनेची मिमांसा विचारांत न घेतां, निस्पृहपणें हाच सिद्धांत काढावा लागतो कीं हिंदुस्थानांतली यच्चावत् सर्व देशी संस्थानें म्हणजे अखिल हिंदुराष्ट्राच्या लोकशाहीविषयक उत्क्रांतीच्या मार्गांत गाळीव विघ्नें आहेत. लार्ड डल हौसीनें बरीचशीं देशी संस्थानांची डबकी धडाधड बुझऊन हिंदुस्थानचा पृष्ठभाग ब्रिटीश सत्तेच्या थैयथाटासाठीं सांखळी-सखल केला, म्हणून पुष्कळ लोक डलहौसीला दोष देतात. या दूषकांत लोकशाहीवर व्याख्यानें झोडणारे बरेचसे देभहि असतात, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. इंग्रेजी नोकरशाहीला लॉर्ड डलहौसीचा संस्थान-खालसाशाहीचा नांगर झपाटेबंद पुढें चालवितां येणें कांही कठीण नव्हतें. पण जात्याच ते कुशाग्र धोरणी पडल्यामुळें, ठिकठिकाणच्या उरल्यासुरल्या संस्थानी टेकाडांचा उपयोग त्यांनीं आपल्या सत्तेच्या अनिरुद्ध तणाव्यासाठीं करण्याचें ठरविलें; आणि ही आंग्रजी युक्तीच आज नोकरशाहीला बरीच पथ्यकर होऊन बसली आहे. सारांश, कसाहि विचार केला तरी हिंदुस्थानांत स्वयंनिर्णयाची जी मूक कल्पना आज उद्‌भूत झालेली आहे, तिला एक बाजूनें इंग्रेजी नोकरशाही व दुसऱ्या बाजूनें स्वदेशी संस्थानशाही अशा दुपाती कैचींतून आपला मार्ग चोखाळल्याशिवाय गत्यंतरच उरलेलें नाहीं.

निझामचा इस्लामी कावा

वऱ्हाड म्हणजे सोन्याची कुऱ्हाड ! ही परत मिळविण्यासाठीं दरबारी प्रयत्नाबरोबरच इतर मिशनरी युक्त्या प्रयुक्त्यांची निझाम शिकस्त करीत आहे. वऱ्हाडी रयतेला त्यानें असें गुळचट आमिष दाखविण्याची सुरुवात केली आहे की तुह्मी जर माझ्या सत्तेखाली येण्याची खटपट कराल तर मी तुम्हाला ताबडतोब स्वयंनिर्णयाचा निझामी मेवा देईन. या फुसलावणीला कांही खेडवळ लोक हुरळूनहि जातील. पण राजकाराणांत असल्या वचनांची काय किंमत असते, हें निदान वऱ्हाडस्थ सुशिक्षित पुढाऱ्यांना विशेष स्पष्ट करून सांगितलेंच पाहिजे असे नाहीं. शिवाय, असा एक महत्वाचा मुद्दा पुढें येतो कीं इंग्रजी नोकरशाहीचें जूं झालें काय, किंवा त्याऐवजी निझामी सत्तेचा इस्लामी तोवरा आला काय, प्रजेच्या सुखदु:खांत असा काय मोठा विलक्षण फरक पडणार? एक धनि बाजरीची सुकी भाकर चारतो, तर दुसरा ब्रेडबटरचे आमिष दाखवितो. काहिहि झाले तरी कुत्र्याच्या गळ्यांत गुलामगिरीचा पट्टा कायम तो कायमच ! चालूं. नवयुगाचा वारा लोकशाहीचा आहे. निझामशाहीचा नव्हे आणि इंग्रेजशाहीचाहि नव्हे. राजा विष्णूचा अवतार आणि निझाम पैगंबराचा खास प्रतिनिधी मानण्याचा मनू मागेंच मेला. आजच्या मनूचा संदेश 'राजा प्रजेचा धनि नसून नोकर आहे' हा आहे. किंबहुना प्रजा आणि राजा या दोन संस्था अंत:पर भिन्न न राहतां त्या एकजीव होऊन प्रजाच स्वत: राजा बनणार आहे.

अशा स्थितींत सत्तेच्या आदलाबदलीच्या निझामी उचापतानीं वऱ्हाडी जनता एकमुखानें धि:काराचा आहेर करील अशी आम्हांला फार फार आशा आहे. प्रस्तुतच्या वऱ्हाड-प्राप्तीचा प्रश्न शुद्ध राजकीयहि दिसत नाहीं. तत्यांत निझामचा इस्लामधर्मप्रसारक कावाहि आहे. प्रबोधनाच्या ज्या ज्या वाचकांनीं श्री. तुंगार यांची अलार्म बेल नीट काळजीपूर्वक वाचली असेल, त्यांना निझाम आणि आगाखान यांच्या मिशनरी कारस्थानाचा अधिक परिचय करून देण्याची जरूरच नाहीं, शिवाय नुसत्या राज्यपद्धतीचाच विचार केला तर निझामचें राज्य म्हणजे अक्षरश: मोंगलाई आहे. या मोंगलाईपेक्षां आंग्लाई शतपटीनें बरी, असा प्रत्यक्ष अनुभव असल्यामुळें वऱ्हाडस्थ जनता निझामच्या राजकीय व धार्मिक सांपळ्याला भुलण्यापूर्वी दहाच्या ऐवजी शंभर अंक मोजील यांत आम्हाला मुळीच शंका वाटत नाहीं.

अनुभवानें शहाणे व्हा

चालूं महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत सर्वत्र श्रीशिवजयंति साजरी करण्यांत आली. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें श्री. ठाकरे यांना यंदा या उत्सवांत कोठें कसलाहि भाग घेतां आला नाहीं याबद्दल दिलगिरी वाटतें. सातारकर बांधवांच्या प्रेमळ आग्रहाचा हिरमोड होऊं नये म्हणून उत्सवाच्या सभेंत फक्त दहाच मिनिटें श्री. ठाकरे यांनीं भाषण केलें. तीन वर्षांपूर्वीचा हा उत्सव आणि यंदाचा उत्सव यांत जमीन अस्मानाचा फरक स्पष्ट दिसून आला. तिगस्त सालची ती पांच सहा हजार जनसमुदायाची चिकार गर्दी व भिन्न जातीय पुढाऱ्याचें कार्यप्रेम व एकोपा आणि यंदाचा शें दीडशें पर्यंत रोडावलेला जनसमुदाय व एक दोन नवीनच व्यक्तीशिवाय इतर सर्व पुढाऱ्यांचीं गैरहजेरी व वेबनाव, या विलक्षण व शोचनीय स्थित्यंतराचें कारण उत्सवाच्या कार्यकारी मंडळीनीं अवश्य विचारांत घ्यावें, अशी आमची सूचना आहे. पुढारीब्रुवांतच जेथें लाथाळी माजते, तेथे मेंढरी अनुकरणाला बळी पडण्याइतकी जनताहि दुधखुळी राहिलेली नाही खास. सातारच्या उत्सवासाठीं 'येणार येणार' म्हणून श्री. बागडे, श्री. श्रीपतराव शिंदे वगैरे मंडळींची नांवें हस्तपत्रिकेवर घातलेली होती. पण अखेर कोणीच आले नाहींत. नाहीं म्हणायला श्री. बागडे मात्र नुसते सातारला येऊन गेले, पण त्यांनी उत्सवांत कसलाहि भाग घेण्याचें साफ नाकारल्याचें समजतें. असें कां व्हावे? या प्रश्नाचें उत्तर हेंच कीं पूर्वी जो उत्सव ब्राह्मणेतर संज्ञेखालीं व्यांपक सार्वजनिवक भावनेनें होत असें, तो आतां जातिविशिष्ट भावनेनें साजरा करण्याची कित्येक संकुचित वृत्तीच्या लोकांची कारवाई. मराठा-मराठेतर भेद माजविणाऱ्या क्षुद्र मनोवृत्तीच्या कांही व्यक्तींची गुर्मी. या वृत्तीमुळेंच ब्राह्मणेतर पक्ष खिळखिळा झाला, आणि बहुजनसमाजाच्या सहानुभूतीला आंचवला. आधीं मुळीं शिवाजीसारख्या राष्ट्रवीराच्या उत्सवाला पक्षाभिमानाचें किंवा जात्याभमानाचें पाणी चढविणें हीच वास्तवीक मोठी चूक आहे. शिवाजीचें चारित्र्य जातिभेदाच्या तत्वावर मुळी रंगलेलेंच नाही. त्या चारित्र्याने शिवाजी राष्ट्रवीरत्वास पोहचताक्षणींच त्याला जातच उरली नाहीं. जो विश्वकुटुंची बनला त्याला लौकिकी नात्यागोत्यांचा संबंध जोडीत बसणें मूर्खपणाचें आहे. नरानें नारायण होण्याचा खुशाल यत्न करावा. पण नारायणस्वरूपाप्रत पोहोचलेल्याला नरसमुदायांत खेचण्याचा क्षुद्र

यत्न करू नये. सारांश, शिवजयंत्युत्सव जर पंथ पक्ष जातिमत इत्यादि भेदांपासून पूर्ण अलिप्त अशा शुद्धाचरणानें साजरा करण्याची महाराष्ट्रीयांना बुद्धि होत नसेल, तर असले भेदाळू उत्सव करून त्या पुरुषोत्तम राष्ट्रवीराचा वार्षिक अपमान तरी कोणी करूं नये, असें आम्हांला वाटतें. अब्राह्मण चांडाळांना ज्या उत्सवांत एकदिलानें भाग घेतां येत नाहीं, तो शिवरायाचा उत्सव नसून शुद्ध उपहास होय.

कार्ये याच वृत्तीनें नासतात

तीन चार दिवसांत वायंडिंगचें काम आटोपलें की वैदिक विवाह निधीची पुस्तकें ग्राहकांकडे व्हीपीनें रवाना होतील. आद्य हिंदु मिशनरी कै. गजाननराव वैद्य इ. अ. यांनी 'अखिल हिंदु समाजाच्या वैवाहिक पुनर्घटनेसाठी' तपश्चर्यापूर्वक संशोधन केलेला आणि आपल्या हयातींतच लोकमान्य केलेला हा वैदिक विवाह विधि छापून प्रसिद्ध करण्याचें भाग्य आमच्या दैवी होतें; म्हणूनच खुद्द वैद्य ब्रदर्सचा छापखाना असतांहि इतक्या वर्षे या अत्यंत जरूरीच्या पुस्तकाचें मुद्रण त्यांच्याकडून घडलें नाहीं. त्या साठीं सातारा प्रिंटिंग वर्क्सची घटना व्हावयाची होती व हें पुण्य कार्य प्रकाशांत आणण्याचें भाग्य आम्हांला लाभावयाचें होतें, असाच योगायोग होता, असें म्हणणें प्राप्त पडतें.

खरें म्हटलें तर हें काम हिंदु मिशनरी सोसायटीचें आणि वैद्य ब्रदर्स प्रेसचें. पण कै. वैद्यांचा अंत झाल्यापासून ही सोसायटी 'बावळट' लोकांच्या हातीं पडलेली आहे, असा मागें प्रबोधनांत जो अभिप्राय व्यक्त झाला होता, तो आजहि कायम आहे. कै. वैद्य लोकोत्तर पुरुष होते. पण त्यांची गादी चालविणारांनीं निदान प्रचलित मन्वंतराला साजे शोभेशी आपल्या कार्याची धडाडी जिवंत ठेवायला हवी होती. वडलांचें 'बाळबंदी वळाण' कोण वाटेल तो रेम्याडोक्या घटवील, त्याला एवढे मोठे सुंदरराव वैद्य कशाला? बरें, दुसरा कोणी करील तर त्याला कांहीं उत्तेजन? मदत? होकार नाहीं, नकाराहि नाहीं. सर्व कारभार आईस्क्रीमचा. विशेषत: अहंपणाचा ताठा फार. हें आम्ही करूं, तें आम्हीच करूं, सर्व कांही होईल तसें आम्हीच करूं. या वृत्तीमुळें सोसायटीचा कारभार कसा मंदावत चालला आहे आणि कार्यकर्ती मंडळी कशी फटकून वागत आहेत, याचे रडगाणें खुद्द हिं. मि. साप्ताहिकांतच गाईलें जात आहे. जेथें हिं. मि. साप्ताहिकच जोमानें चालविण्याचीं मारामार, तेथें आणखी एका दैनिक चिटोऱ्याची दलामल करणाऱ्या श्री. सुंदरराव वैद्यांची कर्तबगारी काय वाखाणावी? एक ना धड भाराभर चिंध्या! प्रस्तुतचा वैदिक विवाह विधी कोणीच छापून प्रसिद्ध करीना, म्हणून आम्ही तें काम पत्करलें. श्री. सुंदरराव वैद्य नाणावलेले हिं. मि. सोसायटीचें कर्णधार. म्हणून त्यांच्याकडे आम्ही दोन विधिविषयक नकाशाची चित्रें मागितली आणि पुस्तकाची जाहिरात हिं. मि. साप्ताहिकांत देण्याची विनंती केली. पण त्याचें उत्तर सुद्धां पाठविण्याची किंवा हिं. मि.त जाहीरात छापण्याची या गृहस्थाला लहर लागली नाहीं. म्हणून दुसरें सूचनापत्र पाठविलें. त्याला त्यांच्या कारकुनाचें उत्तर आलें की 'सुंदररावाना फुरसद नाहीं.' मग कसलें किल्मिष या संशयखोर प्राण्याच्या मनांत उठलें देव जाणे ! ही यांची दक्षता, हें यांनें कार्यप्रेम आणि हा यांचा मनमिळाऊपणा !! असल्या वृत्तीच्या माणसानें कै. गजाननरावांच्या

लोकसंग्रही यशाची व्यर्थ अपेक्षा करूं नये. प्रत्यक्ष प्रतिस्पर्ध्याच्या उत्तराला प्रत्युत्तर देऊन चीत करण्याची ज्याला अक्कल नाहीं, त्यानी कै. गजाननराव वैद्याचें 'गादीवाले' म्हणून टेंभा मिरविण्याऐवजीं कांहींतरी पोटाचा धंदा करून नामानिराळें बसावें हें बरें ! कै. गजाननराव तेजस्वी होते. न तेजस्वी सहि प्रकट परतेजो बलमदा, त्यांचे 'गादीवाले' श्री. सुंदरराव वैद्य फार आंखडत्या वृत्तीचे व आंतल्या गांठीचे संसारी गृहस्थ आहेत. अशा वृत्तीच्या माणसाच्या हातून सोसायटीचा कारभार बर्फापेक्षा थंडगार आणि मेंढराप्रमाणें गतानुगतिक न व्हावा तर कसा व्हावा? आम्ही श्री. सुंदररावना दोष देतो असें नाहीं. महाराष्ट्राची परंपराच अशी शापित आहे. एखादा वीर निर्माण होतो, आपल्या हयातींत कांही तरी अचाट घटना करतो, तो मेला कीं सगळें गाडें जागच्या जागीं थंड? पुढचा कारभार सगळा बडवेगिरीचा !! शिवाजी महाराज मेले तेव्हांच स्वराज्य बुडालें. पुढचे सारे छत्रपति नामधारी. बाजीराव पेशवा मेला, तेव्हांच वास्तवीक पेशवाईचे कोळसे झाले. पुढचें पेशवे म्हणजे नाशिक पंढरपुरचे बडवे. टिळक मेले आणि बडव्यांचा सुळसुळाट झाला. गोखले वारले, आतां त्यांचे अनुयायीं सर्वंट ऑफ इंडिया सोसायटीच्या अन्नछत्रांत नुसते लोकसंख्येच्या भरतीसाठीं जगत आहेत. गोपाळराव आगरकरांच्या 'सुधारका'ला एकहि खंबीर शागिर्द अझून लाभलेला नाहीं. राजाराम शास्त्री भागवत, सरदार लोकहितवादी, यांचीं नावें व कामगिरी आतां बहुतेक विस्मरणाच्या काळ्या पडद्याआड दडतच चालली आहे, असें म्हणण्यास कसलीहि हरकत नाहीं. सारांश, अचाट घटनेचा संप्रदाय निर्माण होतो पण तो निर्माणकर्त्या कराबेरच मरतो, हा एक महाराष्ट्राच्या गादीवर आखडू सुंदरराव वसले, तर त्यांत कोणी कोणाला दोष द्यायचा आणि तो का? चालूं द्या. चाललें आहे तें ठीक आहे.

□□□

लेख

CONFLICT OF CULTURES

No. 1.

Hindus and Mahomedans! Never heretofore this problem was so full of intricacies, confusion and conflicts as it has been now. A wider gulf separates these two classes with unparalleled bitterness and mutual jealousy. The conflict is becoming every day more serious and graver consequences are apprehended, if no immediate effort is done to bring the two classes to a correct point of understanding. The bitterness pervading the conflict owes its origin to the short-sightedness of the hindus themselves. Out of homogeneity came forth heterogeneity. The original oneness of race, blood and religion developed into two different and mutually discordant stocks of humanity. Whatever may be the causes responsible for this unfortunate situation, one thing is certain. The curent conflict must in due course effect the ruin of both the races now waging a sort of war amongnst each other for this reason or that. The last Great. War has wrought a miracle. It has awakend the inner life of all nations and races except the Hindus. It has inspired the soul and electrified the sensitive fibres of all the nations and races of the world except the Hindus. While the philosophy; shows no lack of energy to accelerate the velocity of his poetical prattles on his "life beyond" and takes a devil's pleasure to play the game of superiority and inferiority among his own kith and kin, all the other nations and races are resolutely prosecuting a path of self-elevation, national regeneration and consequent material supremacy over the slow-pacing slave-mined peoples of the world. They are busy in cementing their national union. They are deeply engrossed in finding thousand and one ways to enrich their country intellectually, physically and materially. They spare no pains, no hardships, no effort to develope their indegeneous resources to keep their nation securely stationed to meet any eventual emergency and to face bravely any onslaught from without against their selfrespect as a race and as a nation. On one side stands the meek helpless philosophic Hindu and Vedantic poetry dancing on his lips, his eyes closed in deep meditation, his mourning face turned to the sky, and on the other side we find the rest of the world running hotly a race of keen competition in almost all walks of life to make their countries self-dependent and self-governing. No doubt, the Hindus of the ancient days carried in their marrow the same spirit which now animates the Western countries. They conquered a great part of the then known

world and ruled as emperors. Not only did they rule the world as political masters for political achievements and gains, but brought all the races under a common banner of their proselytising Hindu Dharma. They were a fine race of warriors, whose martial spirit still reverberates the ether. But all of their wars took place withing the boundaries of the India Peninsula, not beyong. The ancient hindus were lions in their own dens and tore to pieces almost all wolves and boars who dared entrace. But they never ventured to cross the borders of other countries and claimed every piece of land touched by them as their own, as was done by the adventurous Dutchmen, Frenchmen or the Englishmen. The Vedantic Hindu, we are sure, is an expert to pain this cowardice with a blooming color of philosophy; but this shows an entire lack of the conquering spirit which in the days of Rigveda formed the most prominent characteristic of the Aryans. To paint cowardice with colors of philosophy has become a second nature with the present Hindus. A strong man slaps the cheek of the powerless hindu and the latter laughts with a secret feeling of his "Victory of Truth over the untruth." This is the summum bonum of the current Hindu Dharma! To meekly prosptrate before any strong man or power, has been preached as the essence of Hindu Philosophy. Self-suffering, without the least effort or even intention to deal blow to blow, and tit for tat, is proclaimed, even now, as the only life and salt of Hinduism. No wonder if the Hindus meekly observing such a nonsensical gospel as the guiding star of their life, should be kicked and cudgelled by any energetic race of power and treated as nothing more than cattle, chattles, or slaves. A conquering spirit is the soul of living nation. The flames of this spirit incessantly burnt within the breasts of the Rigvedic Aryans and that is why they brought the Indian Peninsula under their heels. This flame decreased slowly and died out when this country followed the Buddha and Jain philosophy of cowardice and self-abnegation. These two sects not only killed the martial blood of the Hindus but bred them up as beggars, sycophants and slaves fit to be trampelled under the shoes of any and every enterprizing invader who might be pleased to such the milk of India-the Heavenly Cow. With teh death of the conquering spirit, died the proselytizing mission of the original Hinduism. The life became full of darkness, with ideas of "Duty" miserably blurred, nay, blotted out. Selfishness reigned supreme. Individual indifference hatched the rotten eggs of mutual jealousy. Political organizations were dislocated. Social life became a mess of intricacies guided by ever-changing conventions. As long as the Imperial Hindus were keeping fixed their eagle-eyed gaze on and beyong the frontiers and shores of India, no foreign invader dared to touch them. In fact, India is securely protected by sea on three sided and by huge mountain ranges on the other. But when the Hindus lost their unity and national strength on account of mutual quarrels and fueds, bands after bands of foreign rats began to pour in through the Khyber hole and tied their bells round and necks of the imperial Hindu cats. Those fools sho are not still ashamed to argue that it was the 'Chaturvarnya Vyavastha' and not the natural barrier of sea and mountains which protected the national sanctity of India, should ponder well over this wonderful phenomenon.

That the problem - Hindus and Mahomedans - is originated through the insanity of the Hindus, has been fully explained in our most popular Marathi book entitled "The Ordeals of Hinduism." If the Hindus had not proved faithless and dishonest to their ancient proselytizing spirit of Dharma, this question would not have come into being at all. Till the

advent of the British Burocracy into this country, the conflicts between the Hindus and the Mahomedans were purely of political nature, and none ever conceived that the root causes of those occasional conflicts had gone so deep as to sap the very foundations of the existence of the Hindus. Though the Englishmen were masters of some portions of land and were carrying on their political strategies with certain local powers here and there, none did really believe of their permanent establishment in this country as Rulers till the, "Bhugwa Zenda" of the Mahrattas was as last lowered and the "Union Jack" hoisted in its stead on the towers of Shanwar Wada in the capital of the Peshwas. At last under uncompromising and evidently impartial or indifferent administration of the British, both the Hindus and the Mabomedans were equally vanquished to live a life of common grievances. No doubt, while their fates were impartially being baked on the ovan of British administration, there were occassions of certain insignificant grumblings between both these classes, but they did not call for serious attention. In 1857 the Hindus and Mahomedans offered an exceptionally united front to their common foe the East India Company and made the last effort to regain their lost national independence : so keenly uniform their grievances had become. But God's will was quite otherwise. The suddi of the English exploiters was in the ascendant. And though the hog-grease, alleged to have been annointed to the catridges, inflamed the wrath of the Hindus and Mahomedans alike, served at last an effective lubrication to accelerate the dominance of the Britishers over the whole country. The fatal shock of 1857 ground the national unity and ambitions of the Hindus and Mahomedans to a fine powder. Their national life was ruined. They lost all their powers of activity. both the classes became helpless and indifferent. Hindus and Mahomedans who for two centuries and more played a very noble game of political ascendancy and kept the outside world at bay, were literally humbled to the ground during the 1857 days. This unfortunate tragedy created a dead silence throughout the land from Himalayas to Kamorin, and offered the god-send Britishers a good opportunity to lay the foundation of their regime effectively. The shrewd East India Company, with a view to escape the after-consuquences of the 1857 struggle, handed over their Indian territory to the care of Victoria the Good, who in return proclaimed herself as a Kaiser-I-Hind of India and pacified the unrest of both the Hindus and Mahomedans, whose superstitious mentality quickly came around when a "Queen graced their ancient Imperial Throne." Their political ambitions were now completely dead. They actually thought that since Queen Victoria and her burocracy took the arduous task of country's administration over their shoulders, they had no busiiness to think of politics at all. Both these classes determined to make the best of the unprecedented "peace" which the British regime offered them to their heart's content. They even preferred to resign their claims over the arms and armaments handed down to them by their forefathers, since they were led to believe that "the ginger of the policement" was competent enough to protect their hearths and homes at all times. To sing the songs of forefather's chivalry, to offer heaps of praises on the British administration whenever occasions like the Diamond Jubilee or Delhi Durbar occurred, and to live a life of literally peaceful citizenship, were the only items of their activities. In pre-British days the conflicts between the Moghul Imperialists and the Hindu Swarajists appear to us as between Mahomedans on one side and the Hindus on the other. But on a little closer survey of the situation, it is not very difficult

to find out that the Mahomedan foes of the Hindus were not at all Mahomedans of the genuine Turkey or Afgan blood. They were coverts with unadulterated Hindu Culture and Hindu Blood with only a Mahomedan clothing on. That is why the English people succeeded in vanquishing these two classes of homogeneous culture with but one stroke of their policy making them politically blunt, idle and useless.

□□□

अग्रलेख

चुकतें कोठें ?

आज तरुणांची जी मुस्कटदाबी झालेली आहे, त्याला पहिलें कारण त्यांची शिक्षणपद्धति हें होय. इंग्रेजी शिक्षणापासून जसे कांहीं फायदे झाले, तसे कांहीं तोटेहि झाले. ब्रिटिश अमदानीच्या पंच पंच उष:कालीं इंग्रेजी ज्ञानवल्लीचा सुगंध आम्हांला अत्यंत प्रबोधक वाटला. ती विद्या तशी प्रबोधक व चैतन्यदायक आहे यांत आम्हाला अझूनहि तिळमात्र संशय नाहीं. वर्तमान हिंदी राष्ट्राच्या स्वयंनिर्णयोत्सुक प्रबोधनाचें सर्व श्रेय इंग्रेजी भाषेलाच आहे. या भाषेनें जगांतल्या सर्व ज्ञानाचा खजिना अगदीं आमच्या ओसरीवर आणून ओतला आहे. या भाषेनें हिंदुस्थानच्या एकमार्गी गतानुगतिकत्वांत चिकित्सक बुद्धीचा संचार निर्माण केला आहे. हिंदुस्थानच्या गुलामगिरीला कारण झालेल्या आकुंचित मनोवृत्तीची कोंडी या भाषेनें धडाड फोडून तिला अखिल जगताच्या विचार-महासागराशीं नुसतें भिडविलेंच नव्हे तर जवळ जवळ समरस केलें आहे. या भाषेनें हिंदुराष्ट्राच्या पुनरुज्जीवनाची मर्यादा देशाच्या सरहद्दीच्या आंतच अत:पर न अटकवितां तिचा विकास जगाच्या कमाल मर्यादेपर्यंत नेवून भिडविला आहे. या भाषेनें जगांतील सर्व राष्ट्राशीं मोकळ्या मनानें विचार-विनिमय करण्याची बिनमोल सोय आम्हाला करून ठेविली आहे. सारांश राजकीय, सामाजिक, धार्मिक किंवा मानवी जीवनाच्या कोणत्याहि क्षेत्रांत आज ज्या क्रांति वा उत्क्रांतीचें वारें या भरतखंडांत हरदिन हरघडी बेफाम रोंरावत आहे, त्याला इंग्रजी भाषाच सर्वस्वीं कारण झालेली आहे, हें प्रांजलपणें कबूल करण्यास आमची किंवा कोणाचीहि कृतज्ञता रतिमात्र बाचकणार नाहीं.

इंग्रेजी भाषेचे हे परिणाम कितीहि चांगले असले तरी इंग्रेजी विद्येचे परिणाम हिंदी राष्ट्रावर किती वाईट व आपत्तिकारक झालेले आहेत हें प्रस्तुतच्या तरुणांच्या मुस्कटदाबीवरून स्पष्ट दिसून येण्यासारखें आहे. भाषेला जर साखरेची उपमा दिली, तर विद्येला ऊर्फ इंग्रेजी शिक्षणपद्धतीला विषाची उपमा द्यायला आम्हांस मुळींच संशय वाटत नाहीं. ब्रिटिश राज्यसत्तेच्या सुरवातीला कारकुनी अकलेची किंमत विद्वत्तेच्या बाजारांत बरीच होती. मुत्सद्देगिरीच्या आणि तलवार-बहाद्दरकीच्या उकिरड्यज्ञावर वाढलेलें कारकुंडगिरीचें रोपडें त्या वेळीं अत्यंत मोहक दिसत असे. त्याच्या फुलांचा गंध चित्ताकर्षक असे. त्याला बाजणारीं फळें रुचीनें स्वादिष्ट असत. म्हणून लाख्खो तरुण मधुकरांच्या झुंडीच्या झुंडी

कारकुंडेगिरीवर झांपा घालीत धावल्या. स्वराज्याचा नुकतांच प्राण गेला होता. स्वातंत्र्याची कल्पना नुकतीच विधवा झालेली होती. सतत दीड दोनशें वर्षे काशी ते रामेश्वर चगकणारी मराठ्याची तलवार सांदात कायमचा विसावा घेण्यास घुसली होती. अनाथ पोरक्या मुलाप्रमाणें मुत्सद्दी चातुर्य सर्वत्र भयाभया वणवण करीत फिरत होतें. अशा प्रसंगीं केवळ स्वार्थापलीकडे न पाहणाऱ्या स्वराज्यपराङ्मुख हिंदी तरुणांना सरकारी नोकरी म्हणजे इहलोकीचा मोक्ष वाटावा यांत कसलें आश्चर्य? जित राष्ट्राच्या गुलामगिरीच्या फासाच्या दोऱ्या त्या राष्ट्रांतल्या गुलामांच्या हातूनच घट्ट आवळून आपण तिऱ्हाईत नात्यानें निर्धास्त बाजूला राहणं, ही परस्पर पावणेतेरा पॉलिसी जगाच्या इतिहासांत इंग्रजांनींच मोठ्या कुशलतेनें गाजविलेली आहे. इंग्रेजी शिक्षणपद्धतीच्या पोटीं हायस्कुलें कॉलेजें वगैरे ज्या गिरण्या इंग्रेजी राज्यसत्तेनें या दशात चालूं केल्या त्यांतून आत्मद्रोही गुलामांचीच पैदास मोठ्या प्रमाणावर आजपर्यंत झालेली आहे. या गिरण्यांत एकजात कच्च्या कारकुंड्या मातीचेच घडे आज घडले जात आहेत. इंग्रेजी विद्येनें बुद्धीचें बळ कदाचित वाढविलें असेल, पण हातापायांचें बळ त्यामुळें सफाई नष्ट झालें आहे. या विद्येनें सालंकृत झालेले लोक बसल्या जागीं डोक्यांनीं चालतात; पण प्रत्यक्ष व्यवहारांत हातपाय चालविण्याची अक्कल त्यांना मुळींच उरलेली नसते. हातापायांचा लंजूरपणा सर्रास सर्वत्र माजल्यामुळें आज पोटाच्या बंडाचा हैदोस सर्वत्र सुरू आहे. आंग्लविद्या-विभूषितांच्या मर्दुमकीचा सर्व जोम आज त्यांच्या जिभेच्या टकळींत आणि लेखणीच्या पोकळींत येऊन सांठला आहे. हात पाय हालविल्याशिवाय पोट भरत नाहीं; पण हातपाय हालवावें कसें हे शिकविण्याचेंच इंग्रेजीविद्या बिनचुक चुकली आहे. ही चूक सुधारल्याशिवाय पोटाचें बण्ड थांबणार नाहीं आणि तरुणांची मुस्कटदाबी ढिली पडणार नाहीं.

इंग्रेजी विद्येला 'पोटभरू विद्या' असें म्हणण्याचा प्रघात आहे. खरोखर ती 'पोटभरू' असती तरी कांही हरकत नव्हती, पण ती तशी नाही. पूर्वी असली तरी आतां नाहीं. कारण या विद्येनें मॅट्रीक्यापासून एमेपर्यंत एकालाहि आपल्या उदरंभरणाचा प्रयत्न करण्याला वांव व अक्कल उरलेली नाहीं अर्थात् यावरून असा निष्कर्ष निघतो कीं सध्याचें कॉलेजी शिक्षण हें एक भयंकर भूत आहे. या भूताच्या भुताटकीला जो भाळला तो हयातींत उखडला, असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. शिक्षण हें निवळ पोटाची खळगी भरण्याचें साधन असूं नये. आधीं पोटोबा ही गोष्ट कितीहि खरी असली, तरी पोटाच्याहि पलीकडे कर्तव्याची मर्यादा गेलेली आहे. कुत्रेंसुद्धां बीए एमे न होतां आपले पोट भरतें व जगतें ! मग माणसांत व त्यांत भेद काय? या शिक्षणानें हिंदी तरुणांत नोकरीचा ऊर्फ मजूरीचा एक विलक्षण सोस निर्माण केला आहे. कांहीं काळ या गुलामांची ही हौस भागली; पण आतां नोकरीच मिळेनाशी झाल्यामुळें कॉलेजी शिक्षणाच्या भुताटकीची कटुतम फळें चाखीत ते उपाशी मरत आहेत. नुसत्या बीए एमेनें लोक वाचाळ पोपट बनतात, हें पाहून मायाळू सरकारनें बीएस्सी व बीएजी वगैरे पदव्या काढल्या. पण याहि पदव्या पटकावून आमचे तरूण पुन्हा नोकरीच्या मजुरदारीसाठीं आ पसरून उभेच! एमे शाळामास्तर रगड झाल्यानें आश्चर्याला कारणच नाहींसें झालें आहे, पण शेतकीची बीएजी पदवी पटकविलेला पठ्ठा मामलेदार पाहिला कीं हसूं येतें. प्रत्येक पदवीधराची उडी नोकरीवर. एलेल्बी झाला तरी सबजज्जाच्या मजुरदारीसाठीं लाळ घोटतोच. ही नोकरीची हांवच आमच्या तरुणांच्या मुस्कटदाबीला मुख्यत्वें कारण होऊन बसलीं आहे. याला उपाय काय? याला उपाय एकच आणि तो

धंदेशिक्षणाकडे तरुणांची प्रवृत्ति वळविणें हा होय. विद्या अर्थोत्पादकच असली पाहिजे. सांप्रतची विद्या अनर्थोत्पादक आहे. परंतु ही गोष्ट मोठमोठ्या शहाण्यासुर्त्या पुढाऱ्यांस कळली असूनहि कॉलेजांची संख्या वाढविण्याचा त्यांचा अट्टहास एकसारखा चालू आहेच आहे. कॉलेजांची वाढती संख्या म्हणजें निष्क्रीय गुलामांची वाढती पैदास आणि राष्ट्राच्या पुनरुज्जीवनाच्या मार्गांत भयंकर अडचण होय !

पोटाचें बण्ड मिटविण्यासाठीं अर्थोत्पादनाची शिकस्त करण्यास समर्थ अशा विद्येची प्राप्ती झाली पाहिजे. राष्ट्र धनकनकसंपन्न करण्यासाठींच तरुणांच्या सर्व ज्ञानप्राप्तीची धडपड सुरू असावी लागते. राष्ट्र धनसंपन्न झालें कीं पोटाचें बण्ड मिटलेंच. यासाठीं राष्ट्रांतले सर्व तरुण स्त्रीपुरुष धंदेशिक्षणांत तरबेज करणें आवश्यक आहे. जपान चीन सारख्या पुनरुज्जीवनकांक्षी प्रत्येक राष्ट्रानें हा धंदेशिक्षणाचा प्रश्न प्रथम हातीं घेतला आणि पाश्चात्य देशांत हजारों विद्यार्थी धंदेशिक्षणार्थ पाठवून आपल्या देशाच्या धनोत्पादनाचा मार्ग व्यवस्थित चोखाळून ठेवला. तलवारीच्या किंवा नुसत्या अकलेच्या जोरावर देश काबीज करण्याऐवजीं सध्यां व्यापाराच्या मिषानें परदेशांच्या काळजाला हात घालण्याचें युग चालूं आहे. सध्यां बीए एमे होऊन डोकीं चालविण्यापेक्षां हातपाय हालविण्याचेंच धोरण तरुणांनीं पत्करल्याशिंवाय त्यांचा तरणोपाय लागणें शक्य नाहीं.

सध्यां आमचे कांही थोडे विद्यार्थी परदेशीं जातात; नाहीं असें नाहीं. पण धंदेशिक्षण हा त्यांचा हेतूच नसतो. कोणी बॅरिष्टरकीसाठीं जातो, कोणी आयसीएस करितां पळतो, कोणी नुसता पीएचडी होऊन खिचडी खात परत येतो. यापेक्षां अधिक कांहीं नाहीं. कोणी म्हणजे जरनॅलिझम शिकायला चालले. जणूं काय जरनॅलिझमशिवाय देशाची प्रगति आजच खुंटली आहे ! कोणी येथें बीकॉम झाला म्हणून आणखी वरची व्यापारी पदवी मिळविण्यासाठीं विलायतेला गेला. बीकॉम काय, एमेस्सी काय, पीएचडी काय किंवा बॅरिष्टर काय, स्वदेशीं परत येतांच एकजात सगळे कारकुंडे आणि मजूर ! मनगट घासून द्रव्यार्जन करण्याची एकाचीहि शहामत नसते. म्हणजे परदेशगमन करूनहि पुन्हा कोरडा ठणठणीत. 'दरिद्री चले दरयेकू । करम चले साथ ।। मोतनखातर डुब्बी मारी । शंख लगे हात ।।' अशा स्थिति. बरें, या स्थितीला पुढारी म्हणविणारांनीं तरी कांहीं आळा घालावा? तेंहि नाहीं. तरुणांच्या हिंमतीचा, पैशाचा, श्रमाचा होत असलेला होम ते खुशाल उघड्या डोळ्यांनीं पहात असतात. राजकारणी ढोंगधत्तुरें नाचवायला ह्यांना लक्षावधि रुपये मिळवितां येतात, पण तरुणांच्या कोंडमाऱ्याचें निराकरण करण्याची त्यांना बुद्धि सुद्धां होत नाहीं. जो तो स्वत:च्या मानमान्यतेच्या सौभाग्यांत चूर आहे. सत्याग्रहासारख्या कामांत उड्या घेण्यासाठींच तरुणांचा जन्म आहे, या भावनेचा प्रसार करणाऱ्या किंवा खऱ्या राष्ट्रहिताचा मार्ग त्यांना न दाखवितां आपल्या विशिष्ट पंथाच्या किंवा संप्रदायाच्या महतीसाठीं तरुणांच्या हिंमतीचा होम करणाऱ्या पुढाऱ्यांना भर बारा वाजतां खुशाल फाशीं द्यावें. सध्यां देशाच्या प्रगतीच्या आड ही पुढारीशाहीच विशेषत: येत आहे. निरनिराळ्या मतांचा धांगडधिंगा रंगवितांना या मदांध पुढाऱ्यांच्या बुद्धिबळाची रग खाशी जिरत असली, तरी रयतेला असेंच म्हणण्याचा प्रसंग आला आहे कीं बाबांनो, तुमचा खेळ होतो पण आमचा जीव जातो.

□□□

अग्रलेख

प्रबोधनाची जीवनक्रान्ति

वर्तमानपत्र ही एक शक्ति आहे. साफ विद्युल्लता व पेट्रोल या आधुनिक तीन शक्ति जगांत आज बलिष्ठ मानल्या जातात. त्यांचा प्रभाव निर्जीव यंत्रांवरच काय तो चालतो. पण वर्तमानपत्राची शक्ति, वाफ विद्युल्लतादि शक्तींना आपल्या काबूंत ठेवणाऱ्या, मानवी प्राण्यांच्या मनांवर आपला अंमल गाजविते. जगांतल्या सर्व आधिभौतिक शक्तींचा सांठा आज मानवांनीं आपल्या मुठींत ठेविला आहे खरा, पण त्या मानवांनाहि आपल्या मुठींत ठेवणारी व त्यांच्या मनाचें पद्धतशीर प्रबोधन करून त्या बरहुकूम त्याचें नियंत्रण करणारी शक्ती आज नियतकालिकांत सांठविलेली आढळते. इतर शक्तीप्रमाणें या शक्तीचाहि पुष्कळ वेळां दुरूपयोग होतो. कारण ही शक्ती स्वयंभू नव्हे. तिचा नियंत्रेता मनुष्यच असल्यामुळें त्याच्या गुणावगुणाचीं व प्रकृतिभिन्नत्वाचीं बरी वाईट किरणें त्यांत शिरणें पुष्कळ वेळां क्रमाप्राप्त तर अनेक प्रसंगीं निसर्गसिद्ध असतें. परंतु ही एक शक्ती आहे, जनांच्या मनोवृत्तीला हालविणारें एक जाज्वल्य सामर्थ्य आहे आणि प्रिय हिंदुराष्ट्र हिंदुधर्म आणि हिंदुसमाज यांच्या वर्तमान उत्कान्त्यवस्थेंत त्यांच्या बावरलेल्या दृष्टीला स्थिर करणारी व थरथर कांपणाऱ्या पावलांना सांवरणारी चिच्छक्ति आहे. या शक्तीच्या द्वारें हिंदुजनतेची सेवा करण्याच्या महत्वाकांक्षेनें आम्ही या शाक्तपंथाची दीक्षा घेऊन प्रबोधनाच्या द्वारें आजपर्यंत २।।। वर्षे सेवेचा आक्रम यथाशक्ति यथामति अव्याहत केला. तो प्रिय महाराष्ट्राला, हळूंहळूंच कां होईना, मान्य झाला, हें समाधान म्हणजेच आमचें जीवन होय. प्रबोधन ही किती जरी जाज्वल्य शक्ति असली तरी तिचा नियंत्रेता जात्याच एक अशक्य माणूस. त्याचें मन जरी प्रत्यक्ष पोलादी परिमाणूंचे असलें, त्याची महत्वाकांक्षा जरी मेल्या मारल्या मरणारी नसली, आणि त्याच्या निश्चयाचा खंबीरपणा खुद्द मेरूलाही लाजविणारा असला, तरी अखेर बोलून चालून तो माणूसच ! त्याला शारिरीक मानसिक व्यावहारिक आधिव्याधींचा ताप भोगणें प्राप्तच आहे. त्या भोगांच्या कमी ज्यास्त सौम्य तीव्र प्रखरतेचा परिणाम त्याच्या जीवनावर होणारच. मग ज्याच्या जीवनशक्तीवर प्रबोधनाचें जीवन आपल्या कार्यक्रमाची पावलें टाकणार, त्या प्रबोधनावर त्या आधिव्याधींचा परिणाम कां होणार नाहीं? विशेषत: प्रबोधनाचा संप्रदाय अझून अस्तित्वांत आलेला नाहीं. त्याला पक्ष पंथ पार्टी कांहीं नाहीं. तो स्वतंत्रमतवादी आहे. स्पष्टच बोलावयाचें तर ही

एका खांबावरची द्वारका आहे. खांब उभा आहे तोंवर द्वारका, पडला कीं त्याच्या कार्याच्या एकजात खारका ! मागें एका अंकांत दर्शविल्याप्रमाणें महाराष्ट्राच्या शापित परंपरेला अननुरूप असें वास्तवीक यांत कांहींच नाहीं. फक्त व्यक्तिश: आम्हांला यांत मुळींच निराशा वाटत नाहीं. आम्ही एकलकोंडे एकटे आहों, असा भास सुद्धां कधिं होत नाहीं. प्रबोधनाच्या कुटुंबाचा व्याप अखिल महाराष्ट्रभर पसरलेला आहे. लौकिकी भावाबहिणींना आणि काका मामांना आमची अतिपरिचयादवज्ञा करण्याची जरी लहर आली, तरी प्रबोधनाला आपला सख्खा पाठचा भाऊ मानणाऱ्या भावाबहिणींची संख्या हजारांनींच मोजावी लागणार. हें काय कमी भाग्य? कोण या सुखाचें मोल करील? कोण या प्रेमाची व्याख्या करील? या आदरयुक्त भावनेचें पृथ:करण कोण कसें करणार? एखाद्या करोडोपतीला आपल्या येनकेन प्रकारेण मिळविलेल्या पैशाच्या जोरावर इलेक्शनच्या पैशाळू हंगामांत जरी केवढाहि लोकसंग्रह करतां आला, तरी अखेर ते सारे पैशाळू शाळूसोबतीच. खऱ्या प्रेमाची त्यांना कसली ओळख? खरें दिव्य प्रेम व जिव्हाळ्याचा आदर पैसा खर्चून विकत मिळत नसतो. प्रेमानें प्रेम मिळतें, असा एक सिद्धांत आहे. पण सेवेनें-निष्काम सेवाकर्मवृत्तीनें साऱ्या जगाचें प्रेम तळहातावर आपल्याला नाचवितां येते. प्रबोधनाच्या नवमतवादी कुटुंबियांची संख्या काय पैशाच्या थैल्या ओतून वाढली? नव्हे नव्हे. प्रबोधन पैशाकरितां नव्हे, पैसा प्रबोधना करितां नव्हे. पैशाच्या राशीवर धि:कारानें थुंकण्याचा मान या निर्धन प्रबोधनकाराला या जन्मांत अनेक वेळां लाभलेला आहे. पैशाच्या जोरावर प्रबोधनाचीं मतें विक्रीस काढणारे अनेक सट्टेबाज व्यापारी गेल्या ३ वर्षांत हिरमुसले होऊन परतले आहेत. त्याचप्रमाणें दादरच्या स्वाध्यायाश्रमांत आलेले अनेक पोवाडेवाले शाहीर, कीर्तनकार, कवि, गवई, बीनकार इत्यादि गुणीजन प्रबोधनकाराच्या फाटक्या खिशांतूनहि स्वाध्यायाश्रमाच्या नांवालौकिकास साजणाऱ्या सांपत्तिक पारितोषिकांनीं संतुष्ट करून त्यांना प्रेमानें निरोप देण्याचेंहि भाग्य जसें आम्हांला कमी पडलें नाही, तसें याचकांची मागणी बिनशर्त पुरी पाडणाऱ्या प्रबोधनकारावरहि याचकवृत्तीने अनेक प्रसंग त्याच्या आत्मप्रबोधनार्थ शेंकडों वेळां आलेले आहेत. सारांश, या सर्व तापसहस्रांनी तापलेली आणि अनेक व्यावहारीक संकटांच्या व अनुभवाच्या चुल्हाणावर आत्म्याला पीळ पडेपर्यंत शिजलेली मनोवृत्ती जेव्हां आपल्या मनींचे खोल बोल प्रबोधनद्वारां अस्खलित बोलूं लागली तेव्हां त्या बोलानेच अखिल महाराष्ट्राच्या हृदयाच्या हृदयांतून दिव्य निर्व्याज प्रेमाची प्रतिनिनादित साद या प्रबोधनकाराला दिली. या एवढ्याच भांडवलावर त्याच्या जनसेवेच्या व विचारक्रान्तीच्या धडपडी अखंड चालूं आहेत. इतर लौकिकी भांडवलाचें व भांडवलवाल्यांचे गोत्र प्रबोधनांशीं व्यस्तच प्रमाणांत पडत असतें.

क्रान्ति व उत्क्रान्तीच्या चक्रांत स्वत: गुरफटलेल्या, उत्क्रान्तीसाठींच मनाचें प्रबोधन करा म्हणून दर पंधरवड्याला ओरडणाऱ्या आणि जीवनांत क्रान्ति घडविल्याशिवाय हिंदुजनांचा जगाच्या धकाधकीच्या मामल्यांत टिकाव निभणार नाहीं म्हणून कंठशोष करणाऱ्या प्रबोधनकाराच्या व्यावहारीक जीवनांत क्रान्ति होऊं लागली तर त्याचा परिणाम प्रबोधनाच्या जीवनावर कसा होणार नाहीं बरें? अलबत् झालाच पाहिजे. क्रान्ति म्हटली कीं फाडतोड, जोडाजोड, तोडमोड, वगैरे धडपडी धडाधड खाडखाड व्हायच्याच. काल पहावें तो शनिवारच्या वाड्यावर भगवा झेंडा; आज पहावें तों त्याच ठिकाणीं युनियन जॅक ! काल याच वाड्यासमोर हरीपंत फडक्यांची सेना उभी; आज एल्फिस्टनची गोरी फलटण उभी. गेल्या वर्षी १६ जूनच्या १७ व्या अंकासाठीं 'जपान राष्ट्राचें प्रबोधन' हा अग्रलेख

लिहिणारा प्रबोधनकार, चालू वर्षाच्या त्याच अंकासाठीं 'जपान राष्ट्राचें औद्योगिक प्रबोधन' हा अग्रलेख लिहिणार, तोंच त्याला 'प्रबोधनाची जीवनक्रान्ति' हाच अग्रलेख लिहिणें भाग पडावें, यालाच क्रान्ति असे म्हणितात. क्रान्ति म्हटली कीं उलटापालट आलीच. होत्याचें नव्हतें आणि नव्हत्याचें होतें होत असतें. क्रान्तीच्या असल्या दणक्यानें साधारण मसाल्याच्या मानवांच्या मनाला जरी धक्का बसणें शक्य आहे, तरी प्रबोधनाच्या विचारसंप्रदायाशीं एकसूत्र असणाऱ्या किंवा त्याच्याशीं विरोधभक्तीनें वागणाऱ्या कोणाहि भगिनी बांधवांस आश्चर्याचा किंवा चमत्काराचा धक्का बसणार नाहीं खास. प्रबोधनाच्या जीवनांत क्रान्ति घडणार! कां? या प्रश्नाचें उत्तर पुढें केव्हां तरी देऊं. पण क्रान्ति घडणार किंवा घडलीच, हें मात्र निर्विवाद. या क्रान्तीला मूळ कारण -

प्रबोधन प्रिंटिंग प्रेस, पुणें

हें होय. अवघ्या नऊ महिन्यापूर्वी झालेली क्रान्ति जशी '३० मिनिटांच्या आंत' घडली, तशी प्रस्तुतची क्रान्ति ३० दिवसांच्या विचारविनिमयानें घडून आली आहे. पूर्वीच्या उलथापालथी विषयीं आमचे उद्गार पुन्हा येथें नमूद करतों :-

> **प्रबोधनाचें स्थलांतर** :- Our happiness is in the power of One, who can bring it about a thousand unforeseen ways, that mock our foresight. (भावार्थ :- आपल्या सुखाचीं सर्व सूत्रें परमेश्वराधीन असतात; आणि हीं सुखें तो अशा कांहीं अघटित घटनेनें घडवून आणतो, कीं त्यापुढें आम्हा मानवांचा दूरदर्शीपणा वायफळ ठरतो.) ही गोल्डस्मिथच्या व्हिकार ऑफ वेकफील्डची उक्ती आहे., आमच्या जीवनक्रमात * आजपर्यंत शेकडों अनुभव आले व पुढें येतील. मनुष्याने * आचरावे आणि यशापयशाचा प्रश्न परमेश्वरावर सोंपवावा. भगवत्‌गीतेच्या कर्मयोगशास्त्राचा हाच सिद्धांत आहे. प्रबोधनाची प्रिय जन्मभूमी दादर. तेथून त्याचे सातारा रोड वर प्रयाण होणे; तेथें त्याच्या तिसऱ्या वर्षांचा कार्यक्रम वाढत्या प्रमाणांत, इंग्रजी व मराठी या दोन भाषांत, स्वतंत्र छापखान्याच्या द्वारें सुरू होणें आणि महाराष्ट्राच्या नाजूक केंद्रस्थानी प्रबोधनाची मुख्य कचेरी स्थापन होणे, ही सर्व अक्षरश: अकल्पित घटना, अवघ्या ३० मिनिटांच्या आंत जुळून आली. याचें आमच्याप्रमाणेच आमच्या आश्रयदात्यांनाहि आश्चर्य वाटल्या. शिवाज रहाणार नाहीं. हा परमेश्वरी योगायोग नव्हे तर काय? हा कसा घडून आला हें आम्हाला एक कोडे पडलें आहे. पण तो आज प्रत्यक्ष घडला आहे. ही गोष्ट मात्र खरी. आम्ही स्वत: सप्टेंबरच्या पहिल्याच आठवड्यांत सातारा रोड (पाडळी व्हिलेज) येथे येऊन दाखल झालों व छापखान्याच्या मांडामांडीला लागलें. प्रबोधनाचा पुढचा (३ ऱ्या वर्षाचा १ ला) अंक आमच्या सातारा प्रिंटिंग वर्क्समध्यें छापून प्रसिद्ध होईल.''

परमेश्वरी योगायोग अतर्क्य असतात ! दादरहून सातारा रोड व सातारा रोडहून पुणें ! क्रांतिचक्राची नवलाई मोठी कौतुक उत्पन्न करण्यासारखी आहे. तींत त्रास असेल, क्लेश असतील, प्राणहानी असेल, पण प्रगति - प्रगतीचा वेग मात्र अव्याहत आहे, यांत मुळींच संशय नाहीं. सातारा रोड वरील

---

* उपलब्ध झालेल्या अंकात काही वाक्य वाचता येत नाहीत.

वनवासाचा नऊ महिन्यांचा अनुभव फार फार किंमतीचा आहे. लाख्खों रुपये ओतले तरी मिळणारा नव्हें. मातेच्या उदरीं नऊ महिन्यांची वस्ति करणाऱ्या जीवाला कविवर्णित सुखदु:खांची जाणीव नसतें; पण परिस्थिति-मातेच्या उदरांत आम्ही अनुभवलेल्या नऊ महिन्यांचा अनुभव कितीहि बिनमोल असला तरी त्याचें यथार्थ शब्दचित्र रेखाटण्याइतकी या जनसेवक प्रबोधनकाराची लेखणी आजच कांहीं कमजोर झालेली नाहीं. परिस्थिति बदलली, जीवनांत क्रांति झाली किंवा व्यावहारीक संसारांत विलक्षण उलथापालथ झाली तरी प्रबोधन आपल्या निश्चित ध्येयमार्गापासून रोगमात्र च्युत होणार नाहीं. याविषयीं मागील जीवनक्रांतीच्या प्रसंगीं काढलेले उद्गार वाचकांच्या मननार्थ पुनश्च उद्धृत केलेले बरें :-

> ''**प्रबोधनाचें ध्येय :-** प्रबोधनाचें स्थलांतर त्याच्या मतांतरास कारण होणार कीं काय? अशा शंका कदाचित् कित्येकास येणें शक्य आहे. त्यांच्या दिलदिलाशासाठीं थोडासा खुलासा करणें अप्रस्तुत होणार नाहीं. ज्यांनी प्रबोधनाच्या हातांत हात घालून नियमित स्वाध्यायशीलतेनें गेली दोन वर्षे प्रवास केला आहे, त्यांना त्याच्या विवक्षित मताभिमानाची पकड किती दांडगी आहे याची जाणीव करून देणें नलगे. स्थलांतराचा उद्देश शुद्ध व्यावहारीक आहे. त्याचा प्रबोधनाच्या मतस्वातंत्र्यावर किंवा ध्येयांवर कसलाहि परिणाम व्हावयाचा नाहीं, ही सर्वांनी खात्री ठेवावी.''

* आमच्या अनेक व्यवसायबंधूंनीं बरीच शंका घेतली होती. विशेषत: इस्लामपूरचा ** या मुद्यावर प्रबोधन करण्याचा बराच लांबलचक प्रयत्न केला होता, याबद्दल त्यांचें आज आभार मानून ठेवतो; आणि एवढेंच नम्रतापूर्वक आमच्या ताईद्वयांना विचारितों कीं 'ताईसाहेब, प्रबोधन आपल्या मनाच्या व ध्येयाच्या मार्गावरून कधि ढासळला का? त्याची निस्पृहता कधिं बाचकली कां? मन मोकळे करून बोला.'

पूर्वीच्या स्थलांतराचा शुद्ध व्यावहारीक उद्देश अशुद्ध होऊं लागल्यामुळेंच प्रस्तुतची क्रान्ति आम्ही होऊन घडवून आणलेली आहे. ज्या गतस्वातंत्र्यासाठीं सरकारी सेवावृत्तीची रौप्य शृंखळा तोडली गेली, त्याच उद्देशानें सातारा रोडवरील व्यवहाराचा स्फोट झाला. उत्तम झालें ! सातारा रोडवरील नऊ महिन्याच्या वनवासाच्या सैताना, शांत हो !! आमच्या एका लाडक्या अपत्याचा बळी घेतलास; आता तरी शांत हो! रात्रंदिवस जाग्रणाच्या व अक्षरश: मजूरदारी थाटाच्या खस्ता खात असतांना शोषून घेतलेल्या रक्तप्राशनानें तुझी पिपासां शांत होऊं दे.

प्रबोधनाचीं मतें प्रथम पुष्कळांना कडू वाटलीं, वाटतात व वाटतील. पण तीं अक्षरश: खरी ठरल्याची साक्ष आमच्या वाचकांनींच द्यावी. हा मतस्वातंत्र्याचा व निर्भिडपणाचा संप्रदाय कोणा थोरामोठ्याच्या भीडभिकेवर चालणेंच शक्य नाहीं. त्यासाठी मोडकी तोडकी कां होईना, अडीअडचणीची का असेना, शुद्ध चंद्रमौळी का असेना, स्वत:च्या मालकीची मठी पाहिजे. तेथें मनाला पूर्ण स्वातंत्र्य पाहिजे. तेथें 'अमूक रुपयाला अमूक मत द्या' सांगणारा माणूस येतांना सात वेळ ठेचाळून पडला पाहिजे. श्रीमंतीच्या गुर्मीची उर्मी त्या मठाचें दर्शन होतांच जळून खाक झाली पाहिजे. त्या ठिकाणीं संस्कारच्या सिऐडि माणसाला बिनधोक येतां जातां यावें आणि कारस्थानी नरपशूंनाहि आपल्या पशुत्वाची चिळस उत्पन्न

---

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द लागत नाही. ** उपलब्ध झालेल्या अंकात काही वाक्य लागत नाही.

व्हावी, इतकें तें प्रबोधक कल्पनांनीं सुगंधित व उज्वळ रहावें. असलें ठिकाण प्रबोधनाला पुण्यांत स्थापन करण्याची शक्ति क्रांतिचक्रनेत्या जगदीशानें दिलेली आहे व तो तिकडे आतां जाणार. **जेथें जातो तेथें तूं माझा सांगाती.**

आतां प्रबोधन पुण्यासारख्या विद्वत्तेच्या केंद्रस्थानीं जात आहे व अनेक पदवीधर विद्वान मित्रांनीं आमचा कार्यभार बराच हलका करण्याचेंहि ठरविलें आहे. क्रान्त्युत्तर काळच्या प्रबोधनाची अंतर्बाह्य व्यवस्था कशी ठरविली आहे आणि त्या बाबतींत आश्रयदात्यांनीं कोणत्या प्रकारें सहाय केलें पाहिजे, याच्या सविस्तर खुलाशाचें पत्रक लवकरच त्यांच्याकडे रवाना होईल. त्याचा त्यांनीं सहानुभूतीपूर्वक विचार करावा अशी प्रार्थना आहे. ज्यांच्या वर्गणीची अझून फेड झालेली नसेल, त्यांनी कृपा करून हा अंक पावतांच व्हीपीची वाट न पाहतां मनीआरडरनें वर्गणी खालील नवीन पत्त्यावर पाठविल्यास फार फार उपकार होतील.

-नवीन पत्ता-

संपादक प्रबोधन,

प्रबोधन प्रिंटिंग प्रेस, २७ बुधवार पेठ, पुणें शहर.

अखेर ज्या ज्या मित्रांनीं सातारा रोडवर आम्हाला अनेक प्रकारची मदत देऊन प्रेमपूर्वक उपकृत केले त्यांचे आणि सातारा प्रिंटिंग वर्क्सच्या सर्व लहान थोर कामगारांचे आम्ही प्रेमऋणमोचनार्थ अंत:करणपूर्वक आभार मानतो. सर्वांनीं प्रबोधनावर आपल्या कृपेची छाया सदैव ठेवावी आणि या दुबळ्या जनसेवकाकडून आमरण सेवा घ्यावी हीच प्रार्थना आहे.

आतां जातो पुणें गावां ।

आमचा रामराम घ्यावा ।।

□□□

लेख

CONFLICT OF CULTURES

(No. 2)

Human mind is just like a grinding stone. It always wants something to grind, or else it grinds itself. The inactivity which pervaded the Hindu and Moslem mind offered a warm welcom to the Satan to make it its abode. The chart of politics was slowly snached off from their hands. The empty mind thus had not business but to permit the Satan to commence its operations without control. Since the moment the benign Britishers relieved the Hindus and Moslems of their irksome burden of the country's administration, both these classes had no other source of activity than mere passing their days in indifferent idleness. The empty mind soon begain grinding itself. Deprived of all political interests, it found in social and religious problems a timely capital to keep itself engaged. Both the classes began enthusiastically to grind the sand of social and religious controversies, offering thus a sufficient opportunity to the East India Company to cement the foundations of their political sway over the whole country. A few hard flints got an unconscious access in the process of this idle grinding of the empty mind and their sparks boomed the first explosion in 1893 at Prabhas Puttan in Kathiawar which was a scene of a bloody riot between the Hindus and Mahomedans. Only a spark was needed to conflagrate and it was there. The fire soon spread like a contagion throughout the country and on 11th August 1893 the Jumma Musjid of Bombay sent out bands after bands of riotous Mahomedan hooligaus determined to crushthe hindus at all costs and consequences. For a continuous fortnight the whole of Bombay City bathed in human blood. The streets were covered with corpses of Hindus and Mahomedans. Innumerable and in--cribabable atrocities were perpetrated by the Moslem Hooligans. Several temples and mosques were either burnt or razed to the ground. The modesty of hundreds of hindu women was outraged. It is however noteworthy that the Kamathi women of the Kamathipura displayed praiseworthy chivalry in defending their person and their valued modesty. The notorious Bombay riots sent a terrible thrill throughout the country and shocked the public feeling to its spinal cord. The naval and military autorities found it a difficult task to restore order and peace till 25th August, when the rioteers were brought under partial control. It was the "Bombay riots" notorious for bloodshed, atrocities and murders, that first brought the problem of 'Hindus and Mahomedanss"

prominently to the notice of the world.

Out of unity came forth enmity. Enmity was hightened by gross misunderstanding. The empty mind saturated with burning thoughts of revenge, made the Hindus and Mahomedans forget their true mutual relations and common grievances. They were deaf to hear the clinking of the fetters of political slavery forged by the Britishers. A thick broad line of mutual jealousy divided both these pioneer Indian classes in almost all respects. Divided they fell, and now they are reaping the bitter fruits of madness which first shrieked in the form of an unthoughtful riot at Prabhas Puttan. No doubt, the Hindus and Mahomedans waged a number of wars during the past two centuries and more; but it was a fairplay of their commendable spirit to gain the political supremacy of the country. The motive of those wars was untinged with any silly notions of social or religious disputes, as is unfortunately the case now. It was undoubtedly a shock of curel! destiny that the empty rusted mentality of the Hindus and Mahomedans should thus be degraded to indulge in matters unconcerned with their communal progress as two strong units of India's future commonwealth. That such a sort of enmity should debar both these pioneer Indian classes from sharing the advantages of the new life begot by the last Great War, is one of the miseries, which no sane man can bear without pinching mortification.

Since the Bombay Riots the problem of Hindus and Mahomedans became a solid fact. It told that world at large that there are two mutually antagouistic races in India ready at any moment and for no substantial reason to cut each other's throats. It also proved how the mutual jeaolousies and constant fueds between these two classes were instrumental in enabling a third powerful race - the Englishmen - to found their empire in India. The world took it as an unavoidable consequence of a slave mentality created by the sudden loss of political power which both these classes handled with some dignity and a common national spirit. If we recall our memory, we shall remember the thoughts expressed by Hindu and Moslem journals of the time on this point. The Hindu journals while protesting against the atrocities wrought by the Mahomedan hooligans here and there, complimented themselves for natural gifts of statemanship and intellectual superiority over their adversaries. The Moslem journals showed their fis's to the prattling Hindus and preached their eternal Islam Law of "Might is right" The Hindu journalists consoled themselves by mere verbal threat, while the Mahomedans relied too such on their physical strength of the fist. Even late Mr. Tilak, the then representative Hindu journalists of the Deccan, showed no further widening of his heart than mere burling of dignified abuses and threats against the Government and the Mahomedans. It was a nice chance for late Mr. Tilak to handle the Moslem problem with a little more foresight and statesmanship with which he is always accused by his devotees, and thus get the question nipped in its bud. But he fanned the fire in thousand and one ways. Said he in his "Kesari" (Vide page 206 Tilak's Kesari Essays, Marathi) "Prior to the advent of Englishment in India, the Mahomedan Power was shattered to its foundation. The Enlighmen wrested the Kingdom of India, not from the Mahomedans, but from the Mabhrattas and the Shikhs..... ..If the Englishmen had not stepped in this country, a couple of Moslem States which now survive, would have gone into oblivion in no time." There was not (and there is not too) a fitter man than late Mr. Tilak whou

could have adjusted the dispute between the Hindus and Mahomedans and brought the two contending parties on some point of mutual understanding so far as national interest were concerned. But instead he too proved no wiser that an ordinary Hindu of a sentimental temparament and a susceptible skin. The Bombay Kiots were scon repeated at Yewla. Belganm, Malegaon, Rajapur and other places. The riots threatened to spread throughout the length and breadth of the country, and the saner element of Maharashtra under the leadership of late Jus. Mr. Ranade proposed to hold a conference of responsible representatives of Hindu and Mahomedan communities. Mr. Tilak instead of either offering concrete suggestions or taking the lead himself, simply devided the proposal and cavilled at the conveners of the conference. Late Mr. Tilak did not like the idea of the proposed conference, and insisted on bycotting the Mahomedans altogether.

□□□

स्फुट लेख

संघशक्तीचा दुरूपयोग

गेल्या बुधवारीं (२६-६-२४) सायंकाळी साधुवर्य तुकाराम महाराज यांची पालखीं आषाढी यात्रेच्या निमित्तानें पुणें शहरांत येऊन दाखल झाली. दुपारपासूनच कांही ठराविक रस्ते व माड्या स्त्रीपुरुष व मुलें यांनी गजबजून गेले. निरनिराळ्या आळींतून लहान मुलांच्या लटुमटूच्या छोटेखानी पालख्या 'ग्यानोबा तुकाराम' भजन करीत इकडून तिकडे मिरवत होत्या. पालखीची वेळ जशी जवळ येत चालली तशी लोकांची गर्दी खेचाखेच करूं लागली. पालखीची आघाडी व पिछाडी टाळकरी मेळ्यांनीं गजबजून सोडली होती. मधून मधून चौघड्यांच्या गाड्याहि मिरवत होत्या. खुद्द पालखीच्या सभोंवार तर इतकी गर्दी कीं खेचाखेच व धक्काबुक्की झाल्याशिवाय पालखीचे एकहि पाऊल पुढें पडत नव्हतें. एखाद्या गव्हर्नरच्या किंवा व्हाईसरायच्या आगमनासाठीं सुद्धा एवढ्याच्या एक सोळांश गर्दी जमणें शक्य नाहीं; पण 'ग्यानोबा तुकाराम' या नांवाची एक मोहनीच आमच्या मनावर इतकी जबरदस्त बसली आहे की त्यांचा काळ होऊन दोन अडीच शतकें लोटलीं, तरी यांच्या भक्तिसंप्रदायी लोकसंग्रहाची पकड वंशानुवश रतिमात्र ढिलीं पउत नाहीं ! वृद्ध तरुण पुरुष स्त्रिया मुलें मारे सारेजण आपापले घरेंदारें सोडून पालखीला वंदन करावयाला धावतात, इतकेंच नव्हें तर उन्हाचा कडाका किंवा पावसाची झुंबड सहन करून तास न तास एका जागीं तिष्ठत बसतात, हें एक मोठें कौतुकार्ह दृश्य नव्हे काय?

हें दृश्य कौतुकार्ह तर खरेंच. तें नयनरम्य आहे. स्फूर्तिदायक आहे. सर्व कांही आहे. पण हा लोकसंग्रह डोळस नव्हे. ही संघशक्ती राष्ट्रोधारक नव्हे. लोकांची ही तळमळ, ही उत्कंठा, तो आवेश, तो उमाळा नाटकी नसला तरी कार्यप्रवण नव्हे. त्यांत स्वार्थाची किंचित् झांक दिसत असली, पारलौकिक परमार्थांची त्यांत बरीच आंच भासत असली किंवा तात्पुरता का होईना भक्तीचा ओलावा त्यांत भरपूर असला, तरी ही अफाट संघशक्ती नपूसकाच्या हातीं पद्मिण या मासल्याप्रमाणें असून नसून फुकट गेलेली आहे. पूर्वी भक्तिसंप्रदायाच्या कार्याच्या प्रसारार्थ या शक्तीचा कांही उपयोग झाला असेल - नव्हे, पुष्कळच झाला पण तें कार्य आज उरलेंच नसल्यामुळें या शक्तीचा सध्यां उपयोग होत नसून, नागवा उघडा दुरुपयोग मात्र होत आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. प्रस्तुतच्या संघशक्तीची मूळतत्वें

किती उत्तम आहेत पहा. यांत जात नाही, पंथ नाहीं, भेद नाहीं, व्यक्तीच्या प्राणांची पर्वा नाही, श्रमांची दरकार नाहीं, स्त्री-पुरुष, बुद्ध-तरुण' ब्राह्मण ब्राह्मणेतर, जहाल-मवाळ, सहकार-असहकार असला कसलाहि प्रकार नाही. एकच ध्येय, एकच नाव, एकच भजन, एकच भाषा, एकच भावना आणि एकच पालखी! ग्येनबा तुकाराम' ही एकच आरोळी, दुसरी बात नाहीं. मिळेल ती आली कोरडी भाकर खाऊन, देहू ते पंढरपूर पर्यंतच्या १८।२० दिवसांचा प्रवास पायीं करणारे आणि भजनाच्या नादांत पायांत रुतलेले फत्तर काटे यांची पर्वा न करिता मैलचे मैल नाचत जाणारे हजारो स्त्रीपुरुष व लहान लहान मुलें पाहिली कीं मनाला असें वाटतें कीं या बिनमोल एकतानतेचा, या अद्वितीय संघशक्तीचा आणि या आयत्याच तयार झालेल्या लोकसंग्रहाचा महाराष्ट्राच्या राष्ट्रकार्यात कांहीच का उपयोग करून घेतां येणार नाही? ही सर्व जनशक्ति आम्ही आजपर्यंत फुकट दवडली, ती अशीच दवडणार काय? या सघाचें कार्य आज वास्तवीक उरलेलेंच नाही; पण संघ व त्याची शक्ति मात्र जिवंत आहे. पण, योजकस्तत्र दुर्लभ:!

तुकाराम बोवाच्या पालखीवरून आणखी एक मुद्दा लक्षांत घेण्यासारखा आहे. पुण्याबारामती सारख्या शहरांत ही पालखीसेना येण्याचें ठरलें कीं 'बंदोबस्तासाठी' आमच्या पोलीसांची सेना सामोरी जाते व कांही ठरावीक बंदोबस्तहि ठेविण्यांत येतो. पोलिसांशिवाय आमच्या जनसमुदायाचा बंदोबस्त राहूं नये, हा मोठी लाजीरवाणी गोष्ट आहे. ही बंदोबस्ताची लटकी घोरपड पत्करूनहि बंदोबस्त रहात नाही तो नाहींच. युरपमध्यें लाख लाख समुदायाचें अनेक प्रसंग येतात व त्यांचे अस्सल हालते चालते फोटो आपण सिनेमांत प्रत्यहीं पहातों त्यांची शिस्त पहा, त्यांचे चालण्या हालण्याचें नियम पहा, सर्व कांही टापटिपीत आंखलेलें असतें. आमचें तसें नाहीं. सगळा ब्रह्मघोंटाळा. 'कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाही' ही म्हण अक्षरश: अशाच प्रसंगी प्रत्यक्ष अनुभवास येते. म्हणजे संघशक्ति आहे, पण शिस्त नाहीं. पद्धत नाहीं. आणि या गोष्टी नाहींत याची लाजहि नाही. अलीकडे कांही संस्थांचे स्वयंसेवक असल्या गर्दीत 'बंदोबस्त' राखण्यासाठीं येत असतात. पण हे बेटे व्हालंटेर झाले तरी बेशिस्त हिंदूच ! आधी त्यानाच शिस्त माहित नाहीं, तर ते इतरांना काय लावणार? सारांश आज वाया जाणारी संघशक्ति आमच्या राष्ट्रधूरिणांनीं अत:पर फुकट न दवडतां तिचा योग्य उपयोग करावा अशी विनंती आहे.

□□□

अग्रलेख

पुण्यांत प्रबोधन

जीवन क्रान्तीच्या दणक्याला तोंड देऊन प्रबोधन पुण्यांत आला आणि परमेश्वराच्या कृपेनें आज त्याचा १८ वा अंक प्रबोधन प्रिंटिंग प्रेस मध्यें छापून श्रीमद्विवेकानंद पुण्यतिथीच्या दिवशी प्रसिद्ध होत आहे. प्रचलित राजकारणांत माजलेल्या नानाविध ढोंगधत्तुऱ्यांनीं आणि त्या ढोंगाचीं सोंगें रंगविणाऱ्या अनेक धूर्तांच्या चळवळींनी पुण्याच्या पुण्याईची किंमत महाराष्ट्राच्या बाजारांत आज बरीच कमी झालेली आहे, यांत संशय नाहीं. पुणें म्हटलें की पेशवाई आठवते आणि पेशवाई आठवली की आंगावर कांटा उभा राहतो. परंतु प्रस्तुतच्या पुणें शहराची घटना जरी पेशवाईची असली, तरी पुण्याच्या आत्म्याची पुण्याई पेशव्यांच्याहि फार पूर्वीची आहे. महाराष्ट्राचें प्रबोधन पुण्यांतच झालेलें आहे. परकीय सत्तेची टांच थेट आमच्या नरड्यावर नाचत असतांहि, ज्याचा प्रतिध्वनि सह्याद्रीच्या हरएक दऱ्याखोऱ्यांतून आजहि स्पष्ट ऐकू येत आहे, त्या सतराव्या शतकांतल्या दिव्य प्रबोधनाचा आत्मप्रथम या पुण्यांतच स्फुरण पावलो. महाराष्ट्रांतली मोठमोठी शहरें, श्रीमंत जहागीरदार, पिढीजात तलवार-बहाद्दर आणि पट्टीचे मुत्सद्दी यांना सफाई वगळून, 'करीन तर लंगोट्या नांगऱ्यांच्या हातूनच हिंदवी स्वराज्याची प्राणप्रतिष्ठा करीन' या प्रतिज्ञांच्या स्फूर्तिसाठी रात्रंदिवस तळमळणारा महाराष्ट्राचा परमेश्वर याच पुनवडीत व तिच्या आसपासच्या जंगली प्रदेशांत भटकत भटकत मऱ्हाटी जनतेच्या मनाचें प्रबोधन करीत होता. शुद्ध नागऱ्याचें मर्द मावळे याच भूमीत बनले आणि तोरण्यावर स्वराज्याचें तोरण लटकविण्याचे बातबेतहि याच ठिकाणी ठरले. हिंदुधर्माची आणि हिंदु स्त्रियांची विटंबना करण्यास सवकलेल्या मुसलमान सत्ताधाऱ्याच्या बेगुमान अरेरावीची मुंडी झपकन कशी पिरगाळावी, याचा गुरुमंत्र याच प्रबोधनभूमीतून अखिल महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांत गोफणीच्या भिंगरीप्रमाणें रोंरावत गेला. महाराष्ट्राची खरी मऱ्हाठी संस्कृति दिवाणखानी ऐदी मुत्सद्देगिरीच्या वाचाळपंचविशीची आहे, कीं ठोशास ठोसा लगावणारीं आणि एका ध्येयासाठी एकवटून आपल्या जिवाची कुरवंडी करण्यासहि मागेंपुढें न पहाणारी आहे, याच्या अखेरच्या सक्रीय निर्णयाची खास गर्जना शिवसिंहानें येथूनच केली; आणि म्हणूनच तरुणांबरोबर तरुणींनीहि आपल्या मर्दुमकीची पराकाष्टा करून या महाराष्ट्र भूमातेचा कुसवा प्रत्यक्ष स्वराज्यस्थापनेच्या मंगल सोहाळ्यानें अखेर धन्य केला.

महाराष्ट्राच्या सर्वांगीण जीवनाचें प्रबोधन करणारे अनेक प्रबोधनकार या पुण्यांतच आपल्या

प्रयत्नवादाची शिकस्त करून शांत झालें. महाराष्ट्राचें राजकारण स्वार्थानें व द्वैतानें आरपार सडल्यावर राज्यक्रांतीचा भयंकर परंतु क्रमप्राप्त स्फोट झाला, मऱ्हाटशाहीच्या ऐवजी इंग्रेजशाही आली आणि मऱ्हाठ्यांच्या हांतची तलवार हिसकली जाऊन त्यांना तोंडपाटिलकीचें व खर्डेघाशीचें वतन वंशपरंपरा बहाल मिळालें. राष्ट्रसंरक्षणाची सर्वच किचकट जबाबदारी आंग्रज बहाद्दारांनीं आपल्या आंगावर घेतल्यामुळें महाराष्ट्राची प्राणभूत कर्तबगारी महिरून गेली व तिला गंज चढूं लागला. अशाहि परिस्थितीत महाराष्ट्राच्या संस्कृतीची, त्याच्या इभ्रतीची आणि भवितव्यतेची चाड बाळगणारे अनेक प्रबोधनकार या पुण्यात आपल्या वाग्लेखनशास्त्रद्वारा अनमनाचें प्रबोधन करण्यास अहमहमिकेनें पुढें येऊन इतिहासांत चिरंजीव झाले आहेत. मऱ्हाठी स्वराज्य कां गेलें, या प्रश्नावर अखंड चिंतन करून हिंदूंच्या सामाजीक व धार्मिक गुलामगिरीचे निर्भिडपणे वाभाडे काढणारे कै. सरदार लोकहितवादी; राजकारणापेक्षांहि समाजसंघटना व धर्मशोधनाचा अट्टाहास धरणारे कै. आगरकर; हिंदु धर्माला व हिंदु समाजाला गुलाम बनविणाऱ्या भिक्षुकशाहीच्या सामाजीक वर्चस्वाला लाथ मारून, मागासलेल्या असंख्यजनसमुदायाचें सर्वच बाबतींत प्रबोधन करणारे कै. ज्योतीबा फुले; स्वराज्य गेलें म्हणून मऱ्हाठ्यांचे आत्मतेज कांहीं मेलें नाही, हें पंचखंड दुनियेला छातिठोक दणकाऊन पटऊन देणारे बुद्धिसागर कै. नाम. गोखले; सिंहाचे छावे पण मेंढरापेक्षांहि हतवीर्य बनलेल्या मराठ्यांना आत्मप्रत्ययाचा चिमटा घेण्यासाठीं आणि त्या बरोबरच मागासलेल्या सर्रास सर्व समाजांच्या प्रबोधनासाठी तनमनधनाच्या व्ययाकडे लवमात्र न पहातां आपल्या राजेपणाला विसरून वैरागी बनलेले कै. शाहू छत्रपति; इत्यादि अनेक नरवीरांनीं आपलें प्रबोधनकार्य जोमानें चालविण्यासाठीं या पुण्यालाच पसंत केलें होतें. कारण, पुणें ही महाराष्ट्राची प्रबोधनभूमी आहे. महाराष्ट्राच्या गत वर्तमान व भावी प्रबोधनाचें केंद्र आहे. त्याचें बीज श्री शिवाजी महाराजांनी स्वत: पेरलेलें आहे. या सर्व महात्म्यांच्या पुण्य चरणांस वंदन करून प्रबोधन आपल्या क्रांत्युत्तर जीवनक्रमाचा मार्ग आक्रमीत आहे. सर्व सज्जनांचा त्याला आशीर्वाद असावा.

आजचें पुण्याचें वातावरण मुळींच समाधानकारक नाहीं. तें आपल्या उज्वल परंपरेला पारखें झालेलें असून द्वैत, मत्सर, विषमता, स्वार्थ आणि असूया यांनी कोंदाटलें आहे. पंथभेद पतभेद मतभेद इत्यादि भेदांच्या कटकटी व तंटे इतकें भरंसाट भरकटलेले आहेत, की त्यांपुढें बापुडा पुराणोक्त जातिभेद आज हिरमुसला होऊन सांदीत पडला आहे. मतभेदाच्या उकीरड्यावर वैयक्तिक द्वेषाचें कांटेसराटे मनस्वी बाजल्यामुळें तर प्रगतीचा मार्ग बराच अडथळ्याचा झाला आहे. प्रत्यक्ष कृतीपेक्षा वाग्चापल्यावरच फाजील भिस्त पडल्यामुळें राणा भीमदेवी अलल्ल दुर्रपेक्षां अधिक कार्य कोणतेंच घडत नाहीं. व्याख्यानमाला आणि वर्तमानपत्री खर्डेशाही एवढ्यांतच काय तो सारा जोम दिसतो. भरीव कार्ये करणाऱ्या कांहीं थोड्या व्यक्ति शांतपणानें, निश्चयानें, विशेषसा गाजावाजा न करतां सम ाजप्रबोधनाची निरनिराळे कामें करीत असतात. पण प्रचलित कट्टर-फत्तर अंमदानीत त्यांचा मागमूस सुद्धां इतरां कोणास लागावयाचा नाहीं. कर्तव्योन्मुख तरुणाचा पुण्याइतका भरणा इतरत्र आढळणार नाहीं; मुंबईत आहे, पण पुण्याच्या विद्यार्थी तरुणांत चटकन एकवटण्याची जीं एकतानता आढळते, ती बकाली वस्तीच्या मुंबईत शक्यच नसते. पुण्याच्या तरुणांत उमेद आहे पण हिंमत नाही. बुद्धि आहे पण मार्ग दिसत नाहीं. वृत्तीचा तापटपणा आहे पण नियंत्रेता नाही. धडाडी आहे पण कोणी मार्गदर्शक नाही. भावना जागृत आहेत पण त्यांच्या सदुपयोगाची किल्ली आढळत नाहीं. करावेसें

पुष्कळ वाटतें पण हातानें घडत नाहीं. निश्चयाच्या मुसंडीनें कांही घडऊंच म्हटलें तर कोणाचें उत्तेजन नाहीं, पाठिंबा नाही. पुढाऱ्यांकडे पहावें तों ते आपल्याच विवक्षित मतांच्या मंडनाच्या जोडाजोडींत दंग ! तरुणांच्या भवितव्यतेचा कोणीच विचार करीत नाहीं. चरणीला जशी गुरें सोडतात तद्वत मुलांना एकदां हायस्कूल किंवा कॉलेजच्या दावणीला लावले कीं आपल्या कर्तव्याची हद्द संपली या खुद्द पालकांच्या व आईबापांच्या कल्पना. मग त्या तरुणानें पुढें कांही कां होईना! आज तरुणांची जी मुस्कटदाबी झालेली आहे, पोटाच्या बंडामुळें त्यांना पदोपदी जो उपमर्द सहन करावा लागत आहे आणि उपलब्ध सर्व विद्येंत पारंगत होऊनहि. अखेर तिची किंमत सुक्या मीठ भाकरीच्या संसारापुरती सुद्धां भरून येत नसल्यामुळें, त्यांना निराशेच्या व उद्वेगाच्या ज्या वेदना भोगाव्या लागत आहेत, त्याचा एकहि राष्ट्रधुरिणब्रुव विचार करीत नाहीं, ही अवस्था आतां तरुणांनी तरी कोठवर सहन करावी? वैद्यक संमेलनांची केवढी धामधूम, वात पित्त कफावर केवढी रणधुमाळी आणि आयुर्वेदाला सरकारी आश्रयाच्या खानावळीत पत्रावळीचा मान मिळत नाही म्हणून निषेधाचा केवढा आरडा ओरडा ! परंतु तरुण तरुणींत भडकत चाललेल्या शारिरीक अध:पाताकडे एकहि शहाणा लक्ष देत नाहीं. आज मोठमोठ्या शहरांतल्या डागदारांचीं रजिष्टरे धुंडाळली तर त्यांत हजारों वर्तमान तरुणांच्या करुण कहाण्यांची हृदयभेदक भेसूर चित्रें स्पष्ट दिसून येतील. अलीकडच्या तरुणांचा संसार म्हणजे नाटकांतला ट्रान्सफर सीन होऊन बसला आहे. 'ह्योच लगान न् ह्योच परसांग' हा त्राटिकेतल्या पिल्याचा शेरा तंतोतंत लागूं पडतो. कारणें कांहीहि असोत, दोष कोणाचाही असों, एवढें मात्र स्पष्ट दिसत आहे की हायस्कुलें व विशेषत: कॉलेजांतील तरुण विद्यार्थ्यांचा शारिरीक अध:पात अलीकडे फार झपाट्यानें होत चालला आहे. वर्तमानपत्रांत निरनिराळ्या रोगांवरील औषधांच्या, गंड्यादोऱ्यांच्या किंवा कामधेनु ताईतांच्या जाहिराती हिंदु समाजाच्या वर्तमान अवस्थेच्या द्योतक धरल्या तर तीत आणि नरकावस्थेंत काय फरक हेंच समजत नाहीं. 'मदनविलासामृत' 'धातृपुष्टीची दवा' 'कामोत्तेजक चूर्ण' वगैरे जाहिरातींचा सुळसुळाट हेंच सुचवितों की सध्यांच्या तरुण तरुणींच्या ब्रह्मचर्याची राखरांगोळी झालेली असून, गुलाम प्रजोत्पादनाचें कार्य वज्रांगभैरवाच्या डोसावर किंवा सुवर्णमालिनी वसंताच्या चाटणीवर येऊन बेतलें आहे. सारांश, ज्यांच्या स्वत:च्याच संसाराचा पाया पोकळ, ते आमचे वर्तमान तरुण राष्ट्रांचा संसार व तद्विषयक धकाधकीचे मासले यांत काय टिकाव धरणार?

तरुणांचा प्रश्न फार महत्वाचा आहे. तिकडे राष्ट्रधूरिणांचें लक्ष जितकें लवकर जाईल तितकें बरें. पुढारी इकडे लक्ष देत नसले, तर तरुणांनींच हा प्रश्न हाती घेऊन संघशक्तीच्या सहायानें आपल्या अडचणीचा फडशा पाडणें प्राप्त आहे. या कामीं प्रबोधन तरुण जनाना शक्य तें सहाय्य देण्यास तयार आहे. तरुण तरुणींच्या हितवादासाठींच प्रबोधनाचा जन्म आहे. विचारानें हट्टी व जीर्ण अशा म्हाताऱ्याकोताऱ्यांची प्रबोधनाला मुळींच पर्वा नाहीं. त्यांच्याकडे तो ढुंकून सुद्धां पहाणार नाहीं. प्रबोधन तरुणांकरितां आहे. पुण्यांत प्रबोधन आलें आहे तें खास तरुणांच्या हितवादासाठीं. हा हितवाद सक्रीय असावा. नुसती व्याख्यान-पंचविशी किंवा लेखन-बत्तिशीच नसावी, अशी आमची इच्छा आहे. प्रत्यक्ष भरीव कामगिरी काय करतां येईल व तिचा तरुणांना अभेद भावानें कसा फायदा घेता येईल. याचा खुलासा लवकरच प्रसिद्ध होईल.

□□□

निवेदन

आश्रयदात्यांशी हितगुज

प्रबोधनाच्या जीवनक्रांतीबद्दल सहानुभूतीची उत्तेजनाची व आशीर्वादाची शेकडों पत्रें आली आहेत व येत आहेत. या सर्व प्रेमळ भगिनी बांधवांचे आम्ही फार आभारी आहों. पत्रांची भाषासरणी कितीहि भिन्न असली, तरी सर्वांत 'हें असें होणारच अशी आमची ठाम कल्पना होती. असें झालें नसतें तर मात्र मोठें आश्चर्य होतें खरें!' हा एकच मुद्दा बिनचूक प्रमुख आढळून येतो.

+++

सातारा रोडहून अवचित पुण्यास येणें झाल्यामुळें पत्र व्यवहाराचा व बातमीपत्रांचा पुष्कळच गोंधळ उडालेला आहे. अझून सामानाच्या बऱ्याच पेट्या फोडावयाच्या आहेत. पत्रें येतात तशीच सांठवून ठेवली आहेत. हा अंक बाहेर पडल्यावर, ऑफिसाची जुळवाजुळव होतांच पत्रव्यवहाराकडे काळजीपूर्वक लक्ष देण्यांत येईल. तोपर्यंत आमच्या मुग्धतेबद्दल विनाकारण कोणी आपला गैरसमज करून घेऊं नये, अशी प्रार्थना आहे. या पुढें पत्रव्यवहाराचा पत्ता :

प्रबोधन कचेरी, ३४५ सदाशिव पेठ, पुणें शहर.

+++

प्रबोधन आतां चळवळीच्या केंद्रस्थानी आलेला आहे. तेव्हा त्याची उपयुक्तता व कार्यक्षमता अधिक व्यापक करण्यासाठीं त्याला साप्ताहिक नाही का बनवितां येणार? अशी बऱ्याच आश्रयदात्यांनी विचारणा केली आहे. सूचना योग्य आहे. निदान चालू वर्ष पुरे होईपर्यंत तरी काही बदलाबदल करणे इष्ट नाही. आक्टोबरपर्यंत परिस्थितीचें व छापखान्यांतील कामाचें मान पाहून या सूचनेचा विचार अवश्य करूं.

+++

कोणत्याहि सूचना अमलांत आणण्यापूर्वी आमच्या आश्रयदात्यांना पुन्हां एकदा ठरावीक विनंती करणें भाग आहे. प्रबोधनाचें वर्गणीदार वाढविण्यास सहाय करा मराठी नियतकालिकांची स्थिति नेहमीच क्षयरोगी असते. नेहमी कांही ना कांही कुरबुर असतेंच असते. त्यांतर पुन्हा वर्गणी बुडविणारे पाजी लोक फुकट अंक हबकून बसतात ते धरमधक्के निराळेच. सर्वांची हीच स्थिती. पुष्कळ पत्रांना

जाहिरातीचें उत्पन्न असल्यामुळें ते आपल्या कार्याचें गाडें कसेबसें रेटीत असतात. प्रबोधनांत जाहिराती फार झाल्या तर एक दोन अशा स्थितीत आमच्या प्रत्येक आश्रयदात्यानें आपल्या गांवांतून दोन दोन तरी नवीन वर्गणीदार मिळवून दिले तर फार उपकार होतील. थोड्याशा सक्रीय सहानुभूतीवर अचाट धाडस करण्याची वृत्ति आम्हांत आहे; पण आपण कांही तरी हातभार लावाल कीं नाही!

□□□

प्रबोधन वर्ष ४

एकूण अंक १२

पहिला अंक : एप्रिल १९२५

बारावा अंक : मे १९२६

अग्रलेख

शक्तीचा संदेश

किती शतकें झाली कोणास माहीत? पण चैत्राच्या प्रत्येक पौर्णिमेला अ. घा. हिंदुस्थान मोठ्या पहाटें उठून एका दिव्य शक्तीची मोठ्या भक्तीनें आराधना करण्यांत तल्लीन होत असतो. आधींच वसंत ऋतूनें निसर्गाला चित्ताकर्षक प्रावरणांनीं नटविलेलें असत. हिंवाळ्याच्या पर्णकठोर माऱ्यांतूनहि, एखाद्या धैर्यशील प्रयत्नवाद्याप्रमाणें, बचावून ताठ उभे असलेल्या वृक्षांवर कोमल हिरव्यागार पालवींचें लेणे चढलें आहे. नाना तऱ्हेच्या रानफुलांच्या मनोहर परिमळानें दशदिग्भाग दरवळुन सोडल्यामुळें, पक्षिगणांना दिवाळीचाच भास होऊन ते हर्षातिरेकानें कर्णमधुर गायनाचे आलाप काढीत आहेत. मोहरांनीं डवरलेल्या आम्रवृक्षावर कोकिळांचें पंचम सुरांत कूजन सुरू आहे. सारी रात्र हु:श हु:श करीत उकाड्यांत काढलेल्या जीनांना उष:कालचा थंडगार मंद वायू आपल्या धिम्या धिम्या लहरींनी कुरवाळून त्यांच्या चित्ताचे प्रबोधन करीत आहे. जणू काय प्रेमसागर यशोदा माता बालकृष्णाला 'जागिये किसन कुंवर' ही गोड भूपाळी गात गात जागृत करीत आहे! सर्व आबालवृद्ध स्नानें वगैरे उरकून, उत्तम वस्त्रप्रावरणांनी नटून सजून, 'आज कांही तरी विशेष आहे' या निश्चित भावनेनें हजारों मंदिरांत उल्हसित चित्तानें जमले आहेत. काय, आहे तरी काय आज? कोणाचें स्वागत करण्यासाठीं आसेतू हिमाचल हा जनसमुदाय धांवत आहे? असा कोण वीर आज येणार आहे कीं ज्याच्या दर्शनासाठीं अखिल हिंदुमात्राची एवढ्या मोठ्या पहाटेस ही धामधूम सुरू आहे? पण थांबा. ती पहा पूर्व दिशा आतां उजळूं लागली. हंसरी उषा धुक्याच्या बुरख्यांत मुरडून लपूं लागली. लोकांत गडबड सुरू झाली. प्रत्येकानें आपली मूठ भरून गुलाल घेतला. क्षितिजावर अरुणाची स्वारी येऊन त्यानें सर्व पृथिवीवर आपल्या दिव्य गुलालाचा सडा घातला न घातला तोंच या लोकांनी भरभर गुलाल उधळून

बलभीम हनुमान मारुतीचा जयजयकार असो!

असा केवढ्या मोठ्यानें गर्जनाघोष केला हा! बरोबर. आज अंजनिसुत मारुतिराय जन्माला आले. त्या चिरंजीव बलभीमाची जयंति हिंदुजनांनी साजरी केली. आज पहाल तिकडे गुलालच गुलाल! कपाळाला गुलाल, कपड्यांवर गुलाल, रस्त्यांवर गुलाल, सारा हिंदुस्थान गुलालांत लाल रंगून निघाला आहे. आज अखिल हिंदुजन मोठ्या उत्साहांत आहे.

पण हा उत्साह क्षणिक आहे. एकाच दिवसापुरता आहे. बजरंग बलीकी जय घोषणा करणारे हिंदु मारुतीरायांच्या राष्ट्रसेवेची आठवण साफ विसरले आहेत. नुसता वार्षिक उत्सव साजरा करण्यांत कांही अर्थ नाहीं. स्वयंनिर्णयोत्सुक राष्ट्रानें समारंभप्रियतेपेक्षा उत्सव-विषयक वीराच्या चारित्र्याचा विचार उच्चार व आचार वठविण्याचा शिकस्तीचा यत्न केला पाहिजे. मारुतीराय हे बलशाली राष्ट्रपुरुष चिरंजीव आहेत. त्यांचें चरित्र अत्यंत स्फूर्तिदायक असें असूनहि हिंदुराष्ट्र गुलामगिरींत कां? हा प्रश्न हनुमज्जयंतीच्या दिवशीं जर आमच्या विचारांची खळबळ उडविणार नाहीं, तर असले उत्सव काय कामाचें? हिंदुजन जर मारुतीरायांचे अनन्य भक्त असते, तर आजच्या अध:पातापर्यंत त्यांची मजलच आली नसती. आमचा भूतकाळ अत्यंत उज्वल, राष्ट्रवीर व वीरांगनांचीं चरित्रें तितकींच ओजस्वी आणि इतिहासहि पुरा खबरदार. असें असूनहि आमचा वर्तमान काळ असा गुलामगिरीचा? यांचें कारण काय? हा दोष सर्वस्वीं आमचा. 'तुझें आहे तुझ्यापाशीं। परि तूं जागा चुकलाशी' अशी आमची आज अवस्था झाली आहे. मारुतीरायांची आठवण काय आम्हाला वर्षांतून एकदांच व्हावी. आणि झाली तरी तिचें पर्यवसान काय नुसत्या गुलालाच्या मळवटांत आणि सुंठवड्याच्या फक्कींतच व्हावें? मारुतीरायांना बलभीम म्हणतात. शारिरीक शक्तीबरोबरच आत्मबलाची कमावणी केवढी प्रचंड कमावतां येतें, आणि या दोन शक्तींच्या जोरावर अवघ्या त्रिभुवनालाहि कसें पदाकांत करतां येतें, हें त्यांनीं आपल्या प्रत्यक्ष चरित्रानें दाखवून दिलें आहे. भाविककांनी मारुतीरायांच्या चरित्रावर कविकल्पनेचे कितीहि जाडजूड पांघरूण घातलें असलें. तरी त्यांतूनहि या राष्ट्रवीराचे वीर्यशील चारित्र्य आधुनीक चिकित्सकालाहि तल्लीन करण्याइतकें स्पष्ट व सहजगम्य खास आहे. मारुतीराय तरुणांचे पुढारी व प्रतिनिधी म्हणून रामायणांत प्रसिद्ध आहेत. राष्ट्रोद्धारासाठीं तरुणांनी आपल्या शरिराची व मनाची कमावणी कशी करावी हें त्यांनीं आपल्या आत्मचरित्रानें ठसठशीत दाखविले आहे. पहिली महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे

अभंग ब्रह्मचर्य

मारुतीरायांची उपासना पत्करून, त्यांच्या संप्रदायाची दीक्षा रामदासांनी घेतली, अभंग ब्रह्मचर्याच्या जोरावर ते समर्थ झाले आणि अवघा देश महाराष्ट्रधर्माच्या हलकल्होळानें खडबडून जागा केला. मारुतीरायांची कोटी देवकोटी मानून त्यांच्या पराक्रमांवर अशक्यतेचा आरोप आणूं पहणाऱ्या चिकित्सकांसाठींच समर्थ रामदासांचें चारित्र्य महाराष्ट्रांत नुकतेंच दणाणून गेलें म्हटल्यास हरकत नाहीं. ब्रह्मचर्याची महति येथें विस्तृत सांगण्याची जरूरी नाहीं. तथापि ब्रह्मचर्याचें अभंग पालन केल्याशिवाय कोणत्याहि तरूणतरूणीला साधा सामाजिक जीवनाचा भार वहाणें कठीण पडेल, मग राष्ट्रकार्याच्या धकाधकीचा मामला त्यांना कितपत मानवेल? भ्रष्ट ब्रह्मचर्याचा तरूण बुद्धिमत्तेंत सवाई बृहस्पति असला तरी त्याचा राष्ट्रकार्यास कांहीं उपयोग होत नाहीं. बोलभांड पंडितांच्या वाचाळतेंनें किंवा केवळ बुद्धिवाद्यांच्या लेखाळतेनें राष्ट्रीद्धार होत नसतो. केवळ स्वार्थत्याग करावयाचा म्हणून इरेस पेटलेल्या भावनावश उतावळ्या तरुणांच्या अत्याचारानेंहि राष्ट्रोद्धार होत नाहीं. राष्ट्रोद्धाराचें वर्त ब्रह्मचर्यपूर्ण शारिरीक व मानसिक कमावणींत आहे. आजहि शारिरीक कमावणींसाठीं तांबड्या मातींत लीळपाटणी मारणारे तालीमबाज गुंड पुष्कळ आढळतात. त्यांचे सुद्धां मारुती हेंच दैवत असते. पण हे मुलतान मातीचे सैतान आपल्या शरीर कमावणींचें प्रदर्शन करण्यासाठीं आंगांत तांबडी मळकट कोपरी, डोक्यावर तिरकी टोपीं, गळ्यांत गोंडेबाज ताईत लटकऊन, आळींत किंवा गल्लींत, उगा याला दम भर

त्याला जरब दे करीत गुंडगिरींत दंग असतात. असले लोक शरीरानें जरी रेड्याएवढें मत्तं बनले तरी ते मारुतीरायांचे लुच्चे भक्त समजावें. मारुतीरायांच्या संप्रदायांत शक्ति आणि बुद्धि यांची कमावणी समतोल असावी लागते. मारुतीरायांचा पंथ शुद्ध लष्करी. त्यांत मेंढरांना किंवा रेड्यांना मुळीं वावच नाहीं. सर्व कारभार एकजात कदरबाज (डिसिप्लिनरी). त्यांत आधुनीक पांढऱ्या भगव्या खादीवाल्यांच्या हट्टाग्रहाचें थोतांड नाहीं. बिलबिलीत लिबरलांची बिरबलगिरी नाहीं. लवंग्या जहालांची बाबळपंचविशीं नाहीं. कांही नाहीं. या संप्रदायाचें शस्त्र गदा उर्फ बजरंगी सोटा हें आहे; चरका नव्हे. हा सोटासुद्धां 'ऊठ सोट्या तुझें राज्य' असल्यां बेफामपणानें चालत नाहीं. हा सोटा विवेकी आहे. फार दूरदृष्टी आहे. अत्यंत निश्चयी आहे. मारुतीराय शक्तींने जसे भीमसेन होते. तसे बुद्धिनें हे सवाई बृहस्पति होते. त्यांच्यात शक्ति आणि युक्ति यांचे समप्रमाण मिश्रण झाल्यामुळेंच त्यांचे किंवा त्यांचें कट्टे शागिर्द समर्थ रामदास यांचे राष्ट्रोद्धारक कार्य चिरंजीव होऊन बसलें आहे. हल्लींच्या तरुणांत शक्तीचा ऱ्हास व बुद्धीचा विपर्यास हे दोन दुर्गुण जारी आहेत. ब्रह्मचर्याची तरुणतरुणींत तर भयंकर हेळसांड होत असलेली स्पष्ट दिसत आहे. कृत्रिम व यांत्रिक घोकंपट्टीच्या शिक्षण पद्धतीनें स्वराज्याच्या वाता मारण्याइतकें फोनोग्राफी वाक्यपाटव पुष्कळांच्या तोंडून गोकाकच्या धबधब्याप्रमाणें कोसळत असतें पण शक्तीयुक्तींतच लंजूर असलेल्या या पाप्यांच्या पितरांना जगांत कोणीहि गुलामांपेक्षां अधिक मानीत नाहीं. नागपूर मुळशीच्या हट्टग्रहांत असल्याच वावदुकांच्या फलटणी सामील झाल्या होत्या. त्यांत एकहि मारुतीरायांचा प्रामाणिक भक्त नव्हता. अर्थात त्यांची व्हायची तीच ससेहोलपट झाली. मारुतीरायांच्या चरित्रांतला दुसरा गुण म्हणजे

कार्यैकनिष्ठा

हा होय. आत्मोद्धार किंवा राष्ट्रोद्धार हा एकनिष्ठेशिवाय होणेंच नाहीं. एकदां ध्येय निश्चित झालें, कार्याची रूपरेषा रेखाटली गेली आणि तें पार पाडण्याच्या निश्चयाची पीळदार निषा फोंफाउ लागलीं कीं मग तो वीर संकटांना जुमानीत नाहीं. अपयशाची पर्वा करीत नाहीं, निंदकांच्या विषारी फुत्कारांची क्षिति बाळगी नाहीं, अगर प्राणांचीहि तमा ठेवीत नाहीं. मी हें अमूक कार्य करणार; केल्याशिवाय नाहीं सोडणार. कार्य तरी करणार नाही. तर करतां करतां मरणार. एवढी वज्रपाय निष्ठा असल्यावर मगु काय होणार नाहीं? हिंदुस्थानांत कसलेहि निरनिराळे दुष्काळ पडत असले, तरी निष्ठेचा दुष्काळ फार भयंकर पडलेला आहे. निष्ठेची व आमची जवळ जवळ कायमचीच फारकत होऊन बसली आहे. निष्ठेला सुद्धां प्रेमावर जगायचें असतें. कार्याचें प्रेम जेव्हां वाटेल तेव्हांच त्याविषयीं निष्ठा उत्पन्न व्हायची. पण प्रेमाचें गांवच्या आम्हाला माहीत नाहीं; मग निष्ठा कोठली आणि कशाची? यामुळें महाराष्ट्रीयांच्या हातून कोणतेंहि कार्य धडपणें तडीस जात नाहीं. मारुतीरायांचें किंवा समर्थांचें असें नसें. सींताशुद्धीची प्रतिज्ञा केली कीं मग त्याच कार्याचा ध्यास. तेंच कार्य देव. त्या देवाचांच निष्काम आराधना व त्याचेंच रात्रंदिन चिंतन. त्यासाठी महासागराचें उल्लंघटन केलें, उड्डाणांत पर्वतांना ठेंगणे पाडले आणि संकटांनाहि पराजीत केले. शक्तीच्या प्रभावाप्रमाणेंच युक्तीचीहि शिकस्त करून सीतेचा शोध लावला आणि लंकादत्ताचा प्रळय करून रावणाला रामाच्या भावी पराक्रमाची किंचित दहशतहि बसवून स्वारी मुद्द्यापुराव्यानिशीं रामदर्शनाला हजर उभी. आणि हें सर्व अचाट कार्य एकट्या जीवानें केलें! केवढा आत्मविश्वास हा? आत्मविश्वास हा निराळा कमवावाच लागत नाहीं. शारिरीक आणि मानसिक शक्तींच्या कमावणींतच आत्मविश्वासाचा वेल आपोआप फोंफावत असतो. हल्लींच्या तरुणांत

आत्मविश्वासाचा असलेला अभाव त्यांच्या शक्तीबुद्धीच्या ऱ्हासाचा द्योतक आहे. शक्ति नाहीं बुद्धि नाहीं अशा राष्ट्रांत आत्मभावच शिल्लक उरत नाहीं. मग परस्परांविषयीं आदर कोठला शिल्लक उरणार? राष्ट्राचा देशाचा गांवाचा अभिमान एक वेळ राहूं द्या, पण स्वत:च्या जातीचा किंबहुना स्वत:चाहि अभिमान महाराष्ट्रांत आज दिसत नाहीं. याचें कारण महाराष्ट्र मारुतीरायाशीं, समर्थ रामदासांच्या शिकवणुकींशीं बेइमान झाला आहे. या कर्माचीं फळें आज तो निकृष्ट गुलामगिरीच्या रूपानें भोगीतच आहे. बंगाल पंजाब मध्यप्रांत किंवा मद्रास या राष्ट्रांत त्यांची कांहींतरी एक विशिष्ट संस्कृती असलेली दिसते. महाराष्ट्राची निश्चित संस्कृति अशी कांहींच नाहीं. सगळाच कारभार भडभुंजांच्या वखारीचा! महाराष्ट्रांत कार्यकनिष्ठाच नसल्यामुळें त्याच्या हातून धडाडीचीं किंवा आद्यकल्पना चातुर्यांचीं कोणतीच कार्यं होत नाहींत. येथील लोकमान्य पुढारी सुद्धां दोषविवर्जीत नसतात. बंगाली लोकांना ते सेंटिमेंटल (भावनावश) म्हणून आपण हंसतो, पण आमच्यांत मुळीं कसली भावनाच संभवत नाहींशी झाली आहे, तिकडें मात्र लक्ष देण्याची आम्हाला बुद्धी होत नाहीं. एकमेकांविषयीं कोंकणी तुसडेपणा तर सध्यां इतका बेफाम भडकलेला आहे कीं पक्षाच्या किंवा संप्रदायाच्या नाटकी अभिमानासाठीं आम्ही एकमेकांचीं हाडें चघळतांना पाहून महाराष्ट्रांतलीं कुत्रीं सुद्धां अलीकडे लज्जित होऊन शाकाहारी बनूं लागली आहेत म्हणतात.

अखिल हिंदुस्थानांत मारुतीरायांचें पूजन होत असतें. परंतु समर्थ रामदासांनी महाराष्ट्रांत आपल्या आत्मचरित्रानें, तपश्चर्येनें, उपासनेनें आणि ग्रंथरचनेनें त्यांच्या चरित्रांतील राष्ट्रोद्धार विषयक भागाचें स्पष्टीकरण जसें ठसठशीत केलें आहे, तसें इतरत्र कोणीहि केलेलें नाहीं. महाराष्ट्रेतर हिंदवी राष्ट्रें मारुतीला नुसत्या बजरंगवली स्वरूपांत पाहतात; आम्हाला तो आदर्शतरुण, धडाडीचा कर्तबगार, अजिंक्य योद्धा, बुद्धिवान मुत्सद्दी, विवेकी भीम, सदैव तत्पर स्वयंसेवक, नीतिमान स्त्रीदाक्षिण्यपटू, अशा नानाविध रंगांत दिसतो. १६-१७ व्या शतकांत महाराष्ट्र किंकर्तव्यमूढ झाला असतां समर्थांनी त्याच्या अंतर्बाह्य शक्तीचें प्रबोधन करण्यासाठीं जो संप्रदाय काढला, त्याचें प्रतिक त्याची ध्येयदेवता-त्याच्या निषाणावरील स्फूर्तीदायक चिन्ह म्हणून त्यांनीं मारुतीरायांच्या प्रतिमेचीच निवड केली. ती कां केली? काय इतर देवदेवता त्यांना दिसल्याच नाहींत? त्या वेळीं महाराष्ट्राच्या प्रबोधनासाठीं शारिरीक व आत्मिक अशा दुजोर शक्तीच्या संदेशाचा समर्थांना कणी फुंकावयाचा होता. हा दुजोर शक्तीची स्फूर्ति मारुतीरायांच्या चरित्रावांचून इतर कोणत्याहि दैवताच्या दर्शनानें उत्पन्न होणार नाहीं, हें समर्थांनीं पूर्ण ओळखलें आणि त्या ओळखणीप्रमाणें आपला मार्ग चोखाळून त्यांनीं समर्थं-संप्रदाय अक्षरश: समर्थ करून दाखविला.

आज महाराष्ट्र संक्रमणावस्थेच्या घोटाळ्यांत गिरक्या मारीत आहे. त्याची आजची मन:स्थिति एकचित्त नाही. तो आपल्या पूर्वपरंपरेला समूळ पारखा झाला आहे. व्यक्तिगणित पंथांचा सुळसुळाट उडाला आहे. सार्वजनिक हितवादाची कोरडीं लेक्चरबाजी सुद्धां अखेर जातीभेदाच्या क्षुद्र बिंदुवर नकळत नाचूं लागत आहे. आजचा महाराष्ट्रीय तरूण शक्तीयुक्तींत कमकुवत आहे. त्याच्या अंतिम ध्येयाची उडी बीए एमए व कारकुंडेगिरी या कुंपणापुढें पडणें कठीण झालें आहे. आमचें सर्वांगीण जीवनच हतबल झाल्यामुळें आम्हीं जवळ जवळ आत्मद्रोहालाच मोक्षमार्ग समजूं लागलों आहों. सगळाच गोंधळ आहे. कवि आनंद यांनी आजच्या अंकांतल्या 'इन्कार' कवितेंत म्हटल्याप्रमाणें पूर्वी

गोंधळ मांडायला आम्ही देवाचा धांवा केला, पण आतां गोंधळ मोडायला 'देवा धांव' म्हणून धांवा करण्याची वेळ आली आहे. देवानें वाटेल तेव्हां धांवण्याचें कांहीं कंत्राट घेतलेलं नाहीं. भक्ताच्या उपासनेचा जसा जोर असेल तसा तो त्यांच्या हाकेला ओ देतो. आम्हांला आज शक्तीची आराधना केली पाहिजे. मारुतिराय हे शक्तीसागर आहेत. त्यांचा संप्रदाय, त्यांच्या चारित्र्यांतली मुख्य तत्त्वें त्यांनीं आणि समर्थांनी केलेल्या थोर राष्ट्रकार्याच्या तपशीलाचा तरूण महाराष्ट्रानें स्वाध्याय करण्याची लगबग करावी. म्हणजे आपण सर्व पुनरुजीवनोत्तर उज्जल अशा स्वयंनिर्भयी युगाचे शककर्ते होऊं.

उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत

उठा, जागे व्हा आणि भगवंतानें दिलेले वर समजून घ्या.

□□□

लेख

वैषयिक कवितांची कारण-मीमांसा

संपादकीय स्फुट विचारांत महाराष्ट्रांत बोकाळलेल्या कांही वैषयिक मनोवृत्तीच्या कवींबद्दल उल्लेख केलाच आहे. त्याच मुद्द्यावर शास्त्रीय दृष्टीनें अधिक खुलासा येथें करावयाचा आहे. हल्लीं पुष्कळ उमेदवार कवि वैषयिक विकृत कल्पनेनें जे पछाडलेले दिसतात, वैषयिक गोष्टींचेंच जें काव्यलेखन त्यांच्या लेखणींतून उतरते आणि निवळ कल्पना-सृष्टींतच प्रत्यक्ष वैषयिक लीलांचा घेतलेला आस्वाद कवितेंत लेखांत किंवा पत्रांत लिहून काढण्याची त्यांची जी भावना बेफाम भडकलेली दिसतें त्याला अंतस्थ मानसिक (सायकॉलॉजिकल) कांहीं कारणें असतील कीं काय? प्रत्यक्ष वैषयिक सुखाचा किंवा शृंगाराच्या कांहीं विशेष लीलांचा अनुभव मिळण्याची आशा नसल्यामुळें, कल्पनेच्या रम्यतेंत ही कवि मंडळी रममाण होण्याचा तसा प्रयत्न करीत नसेल ना? किंवा 'मास्टरवेशन'प्रमाणें हा एक 'पोएटिकल मास्टरवेशन'चा (काव्यात्मक भ्रष्ट मैथुनाचा) प्रकार आहे? हा दोष राष्ट्रीय आहे कीं व्यक्तिवाचक आहे? इत्यादि मुद्द्यांवर विचार करीत असतांना, एवढें चटकन् कळलें कीं हा दोष राष्ट्रीय नव्हे, वैयक्तिक आहे आणि सध्यां सर्वत्र बोकाळलेल्या वैषयिक पाजी कविता 'व्यभिचारातिरेक' वैषयिक अत्याचार 'मानसिक भ्रम' (Mental aberration) याच कारणांतून निर्माण होत आहेत. ज्याला कवींचें 'क्रिस्टल मांईड' स्फटिकवत् मन म्हणतात. तें हें नव्हे. हें मन वेश्येच्या पिकदानीचें आहे. कामाठपुऱ्यांत किंवा बावनखाणींत लोळणाऱ्या मानवी कुत्र्यांचें आहे. या मनाची चिकित्सा पाश्चात्य अधिकारी मानसशास्त्रवेत्त्यांनी कशी केली आहे, त्याचा प्रबोधनाच्या वाचकांना परिचय करून दिला पाहिजे. म्हणजे वैषयिक कल्पनांतच प्रत्यक्ष विषयाचा अनुभव घेऊं पाहाणाऱ्या कवींचा समाजांत काय दर्जा आहे, हें नींट समजून येईल. हा विषय नाजूक आहे; पण नाजूक नाजूक म्हणून त्याच्या स्पष्ट उद्घाटनाची उपेक्षा करून कसें चालेल? असले विषय आधीं कोणताहि पत्रकार हातीं घेत नाहीं. म्हणून एवढ्यानें त्याचें महत्त्व आणि सामाजीक जीवनाशीं असलेला त्याचा विशेष संबंध कमी होणें नाहीं. वास्तवीक या विषयाला वाहून घेणारीं नियतकालिकें व ग्रंथ मराठी भाषेंत मुळींच नाहींत. त्यामुळें वैषयिक विषयांत स्त्री पुरुषांचें अज्ञान त्यांच्या अल्पायुषिमरणाला किंवा क्लेशपूर्ण आयुष्याला आजच सर्वस्वीं कारण होऊन बसलें आहे. आजच्या हिंदुजनांचें 'सेवशुअल लाईफ'-

वैषयिक जीवन अत्यंत सैल सुटलेलें आहे. त्याच्या आरोग्यसंरक्षक मर्यादेचे बांध फुटले आहेत, विषमविवाहाची लाजच वाटेनाशी झाली आहे. तरूणतरूणींच्या प्रेमविषयक कल्पना 'ऑटो-मास्टरबेटरी' (आत्म-व्यभिचारातिरेकी) बनल्या आहेत. प्रत्यक्ष वैषयिक व्यवहारापेक्षां त्याच्या केवळ कल्पनेंतच वैषयिक सुखानुभव घेण्याची वासना किंवा शृंगारचाळ्यांचें शब्दचित्र काढण्याचा अनिवार्य लालसा, ही स्थिति सामाजीक ओजस्थैर्याच्या बाबतींत फार भयंकर आहे, असें शास्त्रज्ञांचे मत आहे. सद्‌गुणाचा अतिरेक सुद्धां दुर्गुणांत मोडतो. तद्वतच भावनावशता हीं काहीं मर्यादिपर्यंतच चांगली असते. विवेकाचा अगर बुद्धीचा दाब सुटून ती मोकळी भडकली कीं तिचें दुर्गुणांत पर्यवसान झालेंच.

विकार नैसर्गिक असतात. परंतु त्यांचा उद्‌भव होतांच त्यांच्या चैतन्याचा चाणक्षपणानें व विवेकानें उपयोग करून घेतला नाहीं तर त्यांच्या संचाराचे परिणाम हानिकारक व दु:खदायक होतात. या विषयीं विवेचन करतांना नीच्च (Nietzsche) म्हणतो कीं ''त्वेष क्रोध किंवा कामोद्भव झाला असतांहि त्यांच्या चैतन्याचा योग्य कामाकडे उपयोग करतां येतो. उदाहरणार्थ त्वेष आला तर लांकडें तोडावी, क्रोध आला तर पत्रें पोहचविण्याचें (नाही तर धोतरें बडविण्याचें) काम करावे आणि कामोद्भवांत खुशाल हातीं नांगर धरून शेताचें नांगरटीचें काम करावें. आपल्या विकारांचा सदुपयोग करता आला पाहिजे. विशेषत: सुशिक्षित मनुष्याकडून असेंच कांही तरीं व्हावयास पाहिजे.'' पण लव्हाळ्या कवींत हें दिसत नाहीं. आपल्या निर्बंध कामतुर वृत्तीचें ते ज्या रीतीनें प्रदर्शन करतात, त्या रीतीला ``Psyehical Onanism असें शास्त्रीय नांव आहे. याची व्याख्या ``It is a form of masterbation in which, simply by ideas, without the assistance of manual stimulation of the genital organs, sexual excitement is caused and the orgasm is induced." अशी केलेली आहे. प्रत्यक्ष स्पर्शाशिवाय, किंवा इतर कोणत्याहि शारिरीक क्रियेवाचून, केवळ कल्पनेच्या जोरावर वैषयिक चैतन्य उत्पन्न करण्याची वृत्ति म्हणजे एक प्रकारचें मास्टर बेशनच होय. Eduard Reich एडवर्ड रीच यांचा अभिप्राय असा आहे कीं या वृत्तीच्या शेंकडां ८० लोकांची ही वृत्ति प्रत्यक्ष मास्टरबेशनमधूनच उत्पन्न होते. ही वृत्ति तरुणतरुणींच्या मनांत जीव धरूं लागली कीं वैषयिक कल्पनांचीं निरनिराळीं स्वप्नें ते पाहूं लागतात. पण एवढ्यानेंच हें व्यसन थांबत नाहीं. कल्पनेला मूर्तस्वरूप कसें आणतां येईल, याची तळमळ नंतर सुरू होतें. या तळमळीला 'एरोटोग्राफोमॅनिया' (Erotographomania) असें नांव आहे. ही तळमळ प्रत्यक्ष अमलांत आणण्यास हे एरोटोग्राफर कल्पनातिरेकानें आधींच अगदीं बेहिपती व कमकुवत झालेले असतात. पण भावना तर कल्पनेचें चित्र उमटवायला धादावलेली असते. मग कोणी कवितेंत तिला वाव देतो, कोणी नाटक कादंबऱ्यांचा ठाव पहातो, तर कोणी नुसत्या प्रेमपत्रांच्या अचाकट विचकट मजकुराचें गांव कल्पनेच्या स्वैर विहाराला बहाल करतो. इवॉन ब्लॉक एम्. डी. आपल्या Sexual life of our times पुस्तकाच्या ४१९ पानावर डॉ. हॅलंड याचा एक अनुभव नमूद करतांना म्हणतात- A Patient related to him that in his thoughts of women whom he met, or those who were sitting opposite to him in the railway carriage. He was accustomed to undress them in imagination; he then would represent to himself very plainly their genital organs, and during this representation he experienced very active voluptuous sensations, enlminating in ejaeulations."

खंडाळ्याच्या घाटांत जन्माला आलेली नाथ निफाडकरांची 'स' कविता या वर्णनाच्या चौकटींत किती बेमालूम बसते! वैषयिक स्वैर कल्पनेला व्यक्त करण्याचे या एरोटोग्राफरांचे निरनिराळे मार्ग इवॉन ब्लॉक साहेब येणें प्रमाणें सांगतात-

``There are mumerous men and women who induce their lovers- male or female, as the ease may be- prostitute, massenses etc., to write to them letters with a sexually stimulating content; or or also, as very frequently occurs, they themselves write such letters, containing numerous obseenities... There exists, also, a comparatively blameless, more or less physiological, erotographomania of the time of puberty, in which most passionate letters are written to imaginary lovers, and the still obscure sexual impulse finds a satisfaction in these erotic imaginations. p. 420."

वैषयिक कल्पनांच्या कांही गुलामांना वैषयिक क्रियेच्या प्रत्यक्ष वर्णनाचीं एकमेकांना पत्रें पाठविण्याचें व्यसन जडतें, तर कित्येक तरुणतरुणी तारुण्याची छटा फांकतांच आपलें कोणीतरी एक प्रेमपात्र आहे अशी नुसती कल्पनाच करून त्याला किंवा तिला अशाच मजकुराचीं पत्रें खरडून, त्यांतच कामशांतीचें सुख मानतात; असा वरील उताऱ्याचा सारांश आहे. आमच्या लव्हाळ्या कवींची मजल याच्याहि पुढें गेलेली आहे. वैषयिक शृंगारानें सडलेल्या कल्पनेचा थयथयाट प्रेमपत्रांत कितीहि नागडा उघडा नाचला, तरी जगाला त्याची पर्वा नसते व तितकी त्याची बाधाहि होत नाहीं. पण हे लव्हाळे कधी इतके बेशरम व उन्मत असतात कीं असले विषय कवितात घालून पुस्तकाद्वारां बेधडक जगाच्या तिपाट्यावर विक्रीस मांडतात! यांच्या छिनाल कविता प्रतिष्ठित नियतकालिकें आतांशा छापीत नाहींत. नाहीं तर नाहीं! हे कवि स्वत:च आपली पुस्तकें छापीत सुटले आहेत. पुस्तकावर किंमत घालायची नाहीं. आला एखादा आणा वसूल तर ठीक, नाहींतर फुकट गेलें म्हणून हरकत काय? आमची लव्हाळीं वाचा म्हणजे झालें! सारांश, या लव्हाळ्या कवींचा हा एक घाणेरडा रोगच हिंदुसमाजांत मातला आहें असें म्हणावें लागतें.

लव्हाळ्या कवींच्या आत्ममैथुनाचीं हीं काव्यप्रदर्शनें निरनिराळ्या तर्कांची सूचक असतात. यांची कौटुम्बिक स्थिति यांच्या कल्पनेप्रमाणें सुखावह नसावी. यांची पत्नि केवळ स्वयपाकी कुरूप 'काकू' असावी. अगदीच 'काकू' नसली तर अगदीं 'कामाची तलवार' अशी नखरेल 'श्रीमती' नसावी. ब्रह्मचर्य कालांतच या कवींची मनोवृत्ति धोबीघाटाची यात्रा करीत असावी व प्रत्यक्ष संसारासाठीं यांना आतां वसंतमालीनीचें चाटण चाटावें लागत असावें. एक तर जात्याच हे छटेल व छंगीफंगी असावे किंवा घरांतली यांचीं 'गृहदेवता' यांच्या भावनेवरहुकूम विलासवति नसावी म्हणून यांचा छगीफंगीपणा बेवडेबाजी इतकाच व्यसनी बनलेला असावा. या ना त्या कोणत्या तरी एका सदरांत हे लव्हाळे कवि खास असावे, असा तर्क आहे. बाईल ना बांडा अशा तरूण सडेसोटाने वैषयिक कविता रचून आपल्या जिवाचें समाधान करून घेतलें तर आपण असें म्हणू कीं 'आहे बेटा एकटा जवान जीव; घेत आहे आपली करमणूक करून!' पण चांगल्या संसारांत बसलेल्या कवींना सुद्धां आपल्या कवितासाठीं इतर तरुणींवर नेत्रकटाक्ष फेकण्याची; कवि तापानें फणफणत पलंगावर पडला असतां भेटीला आलेल्या कुमारीला 'ये अशी बैस मजसरशीं' असें सांगण्याची; किंवा कॉलेजांत जाणाऱ्या तरुणीची हातांतलीं पुस्तकें रस्त्यावर खालीं पडलीं म्हणून 'अगं छटेल पोरी, सभ्यतेचा मोठा डौल आणलास; पण तुझी

माझी नजरभेट होतांच, तुझा खरा मात्र पहा कसा प्रगट झाला तो!' म्हणून बळेंच तिच्या पदरीं आपल्या विषयींच्या प्रेमाची मोट बांधण्याची टारगट खोड सुटत नाहीं, या वृत्तीला काय म्हणावें? यालाच मानसिक मैथुन असें म्हणतात. हा एक रोग आहे. हें व्यसन आहे. खिळखिळ्या पतित मनोवृत्तीचें हें चिन्ह आहे. स्वत:ची पत्नि असतांहि काल्पनीक इतर तरुणींना उद्देशून वैषयिक उद्गार काढण्यांत निर्ढावलेले कवि आणि उनाड टारगट गुंड यांत भेद काय? कल्पनेच्या शक्तीचा अजमास केला तर आज नुसत्या काव्यकल्पनेंत काल्पनिक किंवा सांकेतिक तरुणीवर प्रेमाचा आरोप करण्यास न भिणारे हे लव्हाळे वीर उद्यां प्रत्यक्ष तसली कृति करण्यांत कशावरून मागें घेतील? या कवींच्या 'दिव्य प्रेमाची सृष्टी' आमच्यासारख्या अरसिकांना दिसत नाहीं आणि त्या साठीं रचलेल्या यांच्या हलकट लव्हाळ्या लावण्यांतली उच्च भावनांची भरारीहि आम्हाला अजमावतां येत नाहीं हें खरें. पण केवळ अरसिक मनुष्य या नात्यानें आम्ही इतकेंच म्हणूं कीं गांवभवानींने पातिव्रत्याचा आणि लावणीबाजांनी नीतिमत्तेचा फुका डौल मिरवूं नये हें बरें. सारांश लव्हाळे कवि हे स्वत:स कांहींहि समजत असले, तरि ते आपल्या बहकलेल्या मनोवृत्तीमुळे 'पेस्ट ऑफ घी सोसायटी'- समाजकंटकच ठरू पहात आहेत, याचा त्यांनीं व समाजानें विचार करावा म्हणून या पाजी विषयाचें येथपर्यंत मोठ्या कष्टानें उद्घाटन केलें आहे. स्त्रीजातीची इतकी वैषयिक विटंबना उघड्या डोळ्यानें कवितेंत वाचणाऱ्या महाराष्ट्राला या लव्हाळ्या कवींचा वास्तवीक कधींच तिटकारा यावयास पाहिजे होता!

□□□

स्फुट लेख

प्राज्ञ पाठशाला, वांई

(क्रान्तिचक्राच्या तीव्रतम माऱ्यांशीं तोंड देण्यांत गेले ८ महिने गेल्यामुळें, वाचकांची सेवा तर अंतरलीच; पण बाह्य जगांत तीव्र झपाट्याने प्रत्येक क्षणाला घडणाऱ्या अनपेक्षित उलथापालथीकडेहि अवधान ठेवितां आलें नाहीं, याबद्दल मनाला फार खेद होत आहे. गेल्या ८ महिन्यांत इतके मोठमोठे महत्त्वाचे विषय महाराष्ट्रीयांच्या सर्वांगीण जीवनपटावर चमकून गेले कीं त्यांवर प्रबोधनाचीं रोखठोक निर्णयाचीं मतें वेळींच व्यक्त करायला प्रबोधनच सुरू नसल्यामुळें, कांहीं प्रेमळ वाचकांनीं आम्हास संतापानें दोष दिला आहे. आम्ही हा दोष प्रणिपातपूर्वक माथीं धारण करतो. आमच्या मानवी कार्यांत ते गोड दिसेल त्याचें सर्व श्रेय श्रीकृष्ण जगद्गुरूला आणि जे दोषास्पद असेल त्याचा वाटा बेधडक प्रबोधनकाराच्या पदरांत टाका; त्यानें पदर पसरूनच ठेविला आहे. या पुढें प्रत्येक महिन्यांतला जमाखर्च बिनचूक वाचकांच्या सेवेल रुजू होत जाईल. सं. प्र.)

विशिष्ट जातिविषयक संस्था व चळवळी केव्हांहि अभिनंदनीयच ठरतील. असल्या संस्थांबद्दल उत्तेजनाचे उद्गार काढण्यांत प्रबोधनानें केव्हांहि माघार घेतलेली नाहीं. परंतु जातिविशिष्ट संस्था सार्वजनिकत्याच्या बुरख्याखालीं मिरविण्याचा प्रयत्न केव्हांहि निंद्यच समजला पाहिजे. ब्राह्मणेतरांनी चालविलेलीं पत्र म्हणजे जातिविशिष्ट पत्रें मानण्याचा ब्राह्मण पत्रकर्त्यांचा व 'दे. भ.'चा नेहमींच मोठा कटाक्ष असतो. जणूं काय ब्राह्मणी पत्रांत जातींचा वास सुद्धां नसतो आणि सार्वजनिक हितवादाचा मक्ता फक्त याच ब्रह्ममुखोत्पन्नांना दिलेला आहे! प्रबोधनांत कधिंमधीं कायस्थ प्रभू समाजाविषयीं कांही उल्लेख येतांच, चटकन् ब्राह्मण पत्रकारांची काकदृष्टी संपादकाच्या जातीकडे वळते; पण केसरी पत्रांत मुंबईच्या ब्राह्मण सभेबद्दल चऱ्हाटेच्या चऱ्हाटें आलीं, संपादकांनी अग्रलेख लिहिले किंवा विस्तृत पत्रव्यवहार छापले, तर ते मात्र जात्यभिमानाच्या सदरांत मुळींच येत नाहींत. ब्राह्मण जातींचें सर्वच काम सार्वजनिक? वांईची प्राज्ञ पाठशाळा ही फक्त एवढ्या ब्राह्मणजातीपुरतीच आहे. तींत ब्राह्मणेतरांचा मुळींच शिरकाव होत नाहीं. किंवा ब्राह्मणेतरांना प्राज्ञ करण्याचा तिचा उद्देशहि नाहीं. या शाळेला 'सेवांनीं' द्रव्यसहाय द्यावें म्हणून सालोसाल केसरींतून स्फुट लेखांचे रकानेच्या रकाने प्रसिद्ध

होत असतात, ते कां? दिवेकरशास्त्री आम्हाला सातारा रोडवर एकदां भेटले असतां म्हणाले कीं ''प्राज्ञ पाठशाळा फक्त ब्राह्मणांकरितांच आहे. आम्ही फक्त ब्राह्मणांकडेच द्रव्यसहाय मागतो; इतरांकडे नाहीं. पण कोणी उदार ब्राह्मणेतरानें द्रव्यसहाय दिलेंच तर तें आभारपूर्वक घेतो.''

ब्राह्मणांना दानस्वीकाराचा अधिकार आहेच म्हणा. परंतु 'फक्त ब्राह्मणांकरितांच' असलेली प्राज्ञ पाठशाळा 'महाराष्ट्राला ललामभूत' कशी होऊं शकते? आणि या जातिविशिष्ट शाळेला 'सर्वांनीं' मदत कां करावी? कां ब्राह्मणांचे सर्वच कांहीं 'महाराष्ट्राला ललामभूत'? कां ब्राह्मण तेवढे प्राज्ञ झाले कीं महाराष्ट्राचा उद्धार होणार आहे? विवेकी ब्राह्मणेतर धनिकांनीं केसरीप्रासादीक सर्टिफिकीटाला भुरळून जाऊन प्राज्ञपाठशाळेच्या सार्वजनिकपणावर निष्कारण दानाची बळजबरी करूं नये, म्हणून ही सूचना देण्यांत येत आहे. ब्राह्मणांनीं खुशाल वाटेल ती मदत द्यावी. त्याला कोणाचीच आडकाठी नाहीं.

काव्य आणि चित्रकला

या दोन कलांचें चिकित्सक निरीक्षण अनेक राष्ट्रीय भावनांच्या बऱ्यावाईट स्थितीचे सिद्धांत सोडविण्यास सहाय्यक होत असतें. राष्ट्राच्या आत्म्याची प्रबोधनक्रिया कोठवर झालेली आहे किंवा मुळींच झालेली नाहीं; बरें, झाली असल्यास अथवा होत असल्यास तिचा कल कोणीकडे झुकत आहे, याचेंहि प्रत्यंतर या निरीक्षणानें कळत असतें. मात्र हें निरीक्षण व परीक्षण अत्यंत निस्पृहतेनें व कमाल कसोशीच्या न्यायनिष्ठुरतेनें केलें पाहिजे. काव्य गायन आणि चित्र या कला प्रत्येक वेळीं प्रत्येक देशांत व प्रत्येक समाजांत बऱ्यावाईट स्थितींत अस्तित्वांत असतातच, आणि त्या वरुनच आपण त्या त्या काळाच्या राष्ट्राच्या व समाजाच्या संस्कृतींचा अजमास करू शकतों. 'एस्थेटिक सेन्स' म्हणजे सौंदर्याचा स्वाद घेण्याची रुची सुद्धां भिन्न भिन्न असते. 'एका आवडतें तेंचि दुजाला नावडतें.' मतमतांतरांप्रमाणें सौंदर्यस्वादाची रुचि व्यक्तिश: किंवा समाजश: कितीहि भिन्न असली, तरी सौंदर्याची अत्युत्कट परिणति कोठवर असूं शकते किंवा शकेल याच्या संस्कृत लोकांच्या कल्पना पुष्कळच व्यवस्थित ठाम ठरलेल्या असतात; आणि म्हणूनच त्यांना तुलनात्मक दृष्टीनें काव्य गायन चित्रांची चिकित्सा करतां येतें. महाराष्ट्रांत एक वेळ या तीन कलांचा उत्कट उत्कर्ष झालेला असल्यामुळें आणि आतां पाश्चात्य निकट संबंधामुळें साऱ्या जगाच्या सौंदर्यविषयक कल्पनांशीं तुलनात्मक दृष्टी भिडविणें सुलभ झाल्यामुळें, या तीन कलांत महाराष्ट्राचा आत्मा किती उन्नत वा अवनत झाला आहे, याचें प्रमाण ठरविणें फारसें कठीण काम राहिलं नाहीं. गायनकलेंत महाराष्ट्रीयांना अझून हिंदुस्थान्याची शागिर्दी सुटलेली नाही चित्रकलेंत महाराष्ट्र अझून पूर्ण मागासलेलाच आहे. नुसती नक्कल वठविण्यांतहि महाराष्ट्रीय चित्रकार फारसे तरबेज दिसत नाहींत, मग आद्यकल्पनाचातुर्याची (originality) गोष्ट कशाला? डॉ. विनेट म्हणतात, 'नक्कल करणारा माणूस निसर्गाशीं फारकत करून कृत्रिमतेच्या अवडंबरांत स्वतांस गुरफाटून घेतो आणि अखेर स्वत: गुलाम बनतो.' फोन्टेन म्हणतो, ''नकल्ये लोक म्हणजे गुलामांची जात.'' नक्कल ही गुलामगिरीची निशाणी असली, तरी नकलेंतहि आत्मत्वाचें तेज, आद्यकल्पना-चातुर्याची

चमक आणि राष्ट्राच्या विवक्षित विशेष भावनांचा रंग ओतून, चित्र किंवा काव्य यांची निष्पत्ति खास करतां येईल. रविवर्म्यानें हेंच केलें. रंगमिश्रणाच्या पौर्वात्य व पाश्चात्त्य भेदांची तुलना पाहूं इच्छिणारांनीं श्रीमंत बाळासाहेब पंत प्रतिनिधी औंध व रविवर्मा यांच्या चित्रलेखनांची तुलना केली म्हणजे पुरे. बाळासाहेब हे भिवासुतार व तुळजाराम यांचे सांप्रदायिक आहेत. निरनिराळ्या रंगांचा एकजीव करून, कलमाच्या एकाच फटकाऱ्यांत 'शेड ॲन्ड लाईट' दाखविण्याची कुशलता या सांप्रदायांत विशेष. म्हणजे यांच्या रंगांत अनेक मिश्रण असलीं तरी तीं मूळ रंगांत इतक्या सफाईनें मिसळून घेतात कीं तीं सहसा उमगत नाहींत. रविवर्म्याचा संप्रदाय शुद्ध पाश्चात्य. यांत अनेक रंगांचे फटकारे मारून ठरावीक परिणाम (इफेक्ट) दाखविण्याची कुशलता फार. हें रंगकाम अत्यंत कठीण. तसेंच नाजूक आणि निसर्गावलोकनाच्या तीक्ष्ण अभ्यासाचें आहे. या दोंन पद्धतींची तुलना करूं इच्छिणारांनी बाळा साहेबांचा 'श्रीविष्णू' आणि रविवर्म्याचा 'दत्तात्रय' या दोन तसविरा जवळ घेऊन पहाव्या. नकला सर्वच आधुनिक चित्रकार करतात. डिझाइनसाठीं पुढें काहीं तरी मॉडेल हें लागतेंच. पण जेव्हां एखाद्या चित्रांत केवळ अनुकरणाच्या दास्यामुळें विवक्षित राष्ट्रीय किंवा सामाजिक भावनांचा विपर्यास होतो, तेव्हां तें अनुकरण मात्र खुशाल गुलामगिरीच समजावें. याला उदाहरणच द्यायचें तर पारख नांवाच्या चिताऱ्यानें कामिनिया हेअर ऑईलच्या लेबलादि जाहीरातीसाठीं काढलेलीं चित्रें पहा. पाश्चात्य देशांतल्या मॅगाझिन मधलीं युरपियन नट्यांचीं मुंडकीं जशींच्या तशी कापून काढलीं, तीं ड्रॉइंग पेपरवर चिकटविलीं, कपाळाला कुंकवाचा टिपका, खांद्यावर फॅन्सी पातळाचा पदर. गळ्यांत एखादा मोत्यांचा सर दाखविणारें वॉश ड्रॉइंग काढलें कीं पारखांची 'हिंदु श्रीमती' झाली तयार! मग या चिताऱ्याला त्या बाईच्या चेहऱ्यावरील पाश्चात्त्य उर्मट भावनांचा किंवा पुरुषी दणकटपणाचा रंग दिसतो कशाला? कोणीहि हीं पारखी चित्रें मुद्दाम चिकित्सेनें पारखावी, त्यांना हिंदु ललनांच्या असल्या मार्दवविरहित दांडग्या प्रतिमा पाहून चिताऱ्याच्या अनुकरण प्रियतेची चिळस वाटली नाहीं, तरी लज्जा उत्पन्न झाल्याशिवाय खास राहणार नाहीं. असल्या चित्रकलेला गुलामी कला हेंच नांव शोभेल. रविवर्म्यानें काय नक्कल केलीच नाहीं? त्याच्या सर्व पौराणिक चित्रांच्या कल्पना क्रिश्चन मायथॉलजींतील सचित्र ग्रंथांवरूनच घेतल्या आहेत. तथापि मॉडेलसाठीं रविवर्म्यानें ही नक्कल जरी उचलली तरी आपल्या चित्रांच्या उठावणींत राष्ट्रीय भावनांना किंवा सदर्भविषयक कल्पनांना त्यानें लवमात्र ढका लावलेला नाहीं. येथेच रविवर्म्याच्या कलेच खरें सौंदयर्यरहस्य आहे. मॉडेल कोणतेंहि असो; नक्कल कशाचीहि असो, पण तींतहि चतुर कारागिराला आपल्या आत्मत्वाची विशेष कल्पना ओतून आद्यकल्पनाचातुर्याची छाप बसवितां येतें, हें रविवर्म्यानें सिद्ध करून दाखविलें आहे. रविवर्म्याची परंपराहि आज हतप्रभ होऊं पहात आहे. परस्पेक्टिवच्या बाबतींत महाराष्ट्र अगदींच मागासलेल किंबहुना अडाणीं आहे. नेचर-पेंटिंगमध्येंहि त्याला अझून पुष्कळ शिकावयाचें आहे. सारांश, महाराष्ट्राची विद्यमान चित्रकला त्याच्या अप्रबुद्धतेची साक्ष पटविण्यासाठी मागासलेली आहे. आतां काव्यकलेची स्थिती पहा. सध्यांच्या काव्यांचें परीक्षण केलें तर त्यांत अनुकरणाचा भाडोत्रीपणा उर्फ कृत्रिमपण फार आहे.

Clear and bright it should be ever,

Flowing like a crystal river;

Bright as light, and clear as wind.

हीं टेनिसननें केलेली कविमनाची चिकित्सा अर्वाचीन मराठी कवींत मुळींच दिसत नाहीं. काव्याचे

विषय पाहिले तर शेंकडा ९९ कविता लव्हाळ्याच्या! लव्हाळें तर लव्हाळें, पण त्यांत तरी कांहीं विचारांचा व कल्पनांचा जोम व टवटवीतपणा? येथून तेथून सारी छिनालपणाची घाण! प्रेमपत्रांचा पाचकळपणा आणि अवयववर्णनाचा बीभत्स शृंगार! कवींची मनोवृत्ति राष्ट्राच्या मनोवृत्तीची प्रतिनिधी किंवा प्रतिमा मानली तर सध्यांचा महाराष्ट्र स्वातंत्र्योन्मुख किंवा स्वयंनिर्णयोत्सुक झाला नसून लव्हाळ्यांत लोळणारा मदनशरविद्ध डुक्कर बनला आहे, असाच निष्कर्ष काढावा लागेल. या लव्हाळ्या कवितांची महामारी आजकाल कॉलेजी विद्यार्थ्यांत बरीच बोकाळलेली दिसते. जो उठला तो लव्हाळ्या विद्यार्थ्यांत बरीच बोकाळलेली दिसते. जो उठला तो लव्हाळ्या कवि! लव्हाळ्याशिवाय दुसरी बात नाहीं. आपल्या काल्पनीक प्रेमपात्रासाठीं कवितांचा संगीत शंख करीत बसला आहे बेटा! हे आमचे विद्यार्थी, हे आमचे तरूण, आणि हे आमच्या राष्ट्राचे भावी खांब! स्वत:स शहाणे बृहस्पति समजणारे दुसरे कांहीं पोक्त वयाचे कवि पहावे तरी त्यांचाहि हा संप्रदाय! अर्धा डझन मुलें बाळें झालीं, गझल गाऊन कवाली कवळलीं, एकामागून दोन तीन बायका मरून चार बायलांचे दादले बनले, तरी कित्येक कविब्रुवांचे लव्हाळ्याचे चाळे बंद पडत नाहींत. यावरून लहान थोर कविकपींच्या मनोवृत्तीला लव्हाळ्याचा केवढा जबरदस्त चिकटा बसला आहे याची कल्पना होईल. 'वेणुनाद' नांवाच्या कवितांच्या चोपड्यांतल्या अनेक लव्हाळ्या कवितांपैकीं 'नाथ निफारडकर' कवीन 'खंडाळ्याच्या घाटांत ८/८/१९१५' ला रचलेली '-स' ही एक कविता वरील विधानाच्या पुष्ट्यर्थ येथें उद्धृत करीत आहों. आमच्या सर्व भगिनी बांधव वाचकांनीं आमच्या या धारिष्ठ्याबद्दल क्षमा करावी, अशी आगाऊच याचना आहे. विशेषत: स्त्रीवाचकांनीं आपल्या भावना या निफाडकरी 'शेले'गिरीनें संतप्त किंवा लज्जित झाल्या तरी सांभाळून धराव्या. अवघ्या आठच ओळी. 'लोकमान्य' मासिकाचे संपादक, स्वत: आपण शेले टेनिसन आहोंत अशी स्वत:च्या मासिकांतच जाहीरात देणारे जातीवंत कविवर्य, काव्य तत्त्वज्ञान वाङ्मय व राजकारण या चार विषयांना हातचा मळ मानणारे एकनाथ यादव निफाडकर '-स' म्हणतात-

समवय ललने, कटाक्षवाणें तूं तव नयनें अंधविलें
माझें मन गे तुझ्याच सुभगे, कामावेगें भ्रमवीलें.
तुज कडकडुनी भेटुनि मधुनी ओष्टांमधुनि ग मधु प्यावा,
तर हृदयावरि तव नेत्रांवरि तव केशांतरिं कर न्यावा.
दुसऱ्या हस्ते ग सुखदयिते कोमलतेतें शोधुनी
सुख भोगावें अखंड भावें तेथे जावें मी रमुनी;
परि मृगनयने सुहास्यवदने, तव आज्ञेनें सेवावी
मत्तनुहरिणें कवळीं कुरणें निर्भयतेनें फुलवावीं.

यापेक्षां शिमग्यांतल्या आचकट बिचकट फाकांत अधिक काय असतें? आगगाडींत प्रवास करतांना खंडाळ्याच्या घाटांत कोण विचारी 'समवयी मृगनयना' या जातिवंत कवीच्या कामक्षोभास बळी पडली कोण जाणे! असल्या हलकट कवितांच्या संग्रहाला 'वेणूनाद' नांव देण्यापेक्षां 'शंखध्वनि' नांव द्यावयास पाहिजे होते. सारांश, काव्यकला आणि चित्रकला यांचें परीक्षण हेंच सुचवितें कीं सध्यां महाराष्ट्राची मनोवृत्ति बरीच अवनत स्थितींत आहे.

मुळशी प्रकरण चिघळलें

पुणें म्हणजे महाराष्ट्रांतल्या सर्व चळवळींचें केंद्रस्थान असा एक लौकीक बिनबोभाट सर्वत्र रूढ आहे. येथे सर्व चळवळी आहेत आणि कोणतीच चळवळ नाहीं म्हटलें तरी चालेल. पुण्याचं वैशिष्ट्य जर कशांत असेल तर तें क्षुद्र गोष्टींचा अवास्तव गाजावाजा करण्यांतच आहे. या गाजावाज्याचा डंका एकदां का खटपट्यांच्या पत्रांतून टणटणूं लागला कीं पुण्याबाहेरच्या लोकांची अशी समजूत होते कीं या चळवळीनें पुणें उठवणीस आलें, पुण्याचे लोक बंड करायला उठलें, तळहातावर शिरें घेऊन देशोधडीला निघाले, अन्न-पाणी टाकून सत्याग्रह करूं लागले, कीं न्यायाधिशाच्या फर्मानापूर्वीच सारे पुढारी यरवड्याच्या स्वराज्यमंदीरांत जाऊन घुसले. कीं झालें तरी काय? पण खरा प्रकार असा कधींच नसतो. वाणी तशी करणी हें पुण्यांतल्या खटपट्यांचें ब्रीदच नव्हे. प्रत्येकाची नजर आपल्या स्वार्थावर न आत्मस्तोमावर! या साठीं ते कोणकोणत्या बगलबच्चांना कसकसल्या हरभऱ्याच्या झाडावर चढवतील आणि त्यांना काय काय पदव्या देतील, याचा कांहीं नेम नाहीं. मुळशी धरणाविरुद्ध सत्याग्रहाची चळवळ चालविण्यास पुढें आलेल्या पांडोबा बापटांना या खटपट्यांनी 'सेनापति' 'महर्षि' वगैरे पदव्यांची मनमुराद खैरात करून, शेकडों यप्रबुद्ध तरूण विद्यार्थ्यांच्या आयुष्याची हकनाहक राखरांगोळी केली. महर्षीच्या स्तुतिपाठक भाटांनी वर्तमानपत्रांतून त्यांच्या मातापितरांची गणेशभक्ति, तपश्चर्या व मुळशी कार्याला दिलेले वर यांची रसभरीत वर्णनें प्रसिद्ध केलीं. कोणी सेनापतींच्या योगवळाची व नेतृत्व-कुशलतेची स्तोत्रें गायिली. असा मारे जिकडे तिकडे मोठा दणदणीत डांगोरा पिटला गेला. परिषदां कशाला व केव्हां भरवितात, या विषयींचे तारतम्य लाथाडून, मुळशी परिषदेचे नाटकहि नाचविण्यांत आलें. या सर्व ब्रह्मघोटाळ्यांत एकच मख्खी होती आणि ती फक्त प्रबोधनानेंच ता. १६ जून १९२२ च्या (वर्ष १ लें, अंक १७, पृ. १३०-१३२) अंकांत 'मुळशी आणि राष्ट्रीय' या स्वतंत्र लेखांत स्पष्ट दाखविली आहे. ती हीच कीं मुळशीच्या जलशांत नाचणाऱ्यांचे राष्ट्रीय प्राण्यांनीं कितीहि शाब्दिक पोवाडे गायिले, तरी स्वत: मात्र सर्व वीर महावीर कांठावरच उभे राहिले. मुळशीच्या धरणांत मरायला जाण्यासाठीं यांनीं इतरांच्या अल्लड व मूर्ख तरूण मुलांना खूप आग्रह केला; मात्र स्वत:च्या पोरांना बरणींतल्या लोणच्याप्रमाणें जपून ठेवले. मुळशी सत्याग्रहानें डागळलेले शेंकडो तरूण आज भयाभया करीत भटकत आहेत. त्यांच्या आयुष्याची नासाडी झाली आहे. तरुणांच्या या दुर्दैवी अध:पाताचा राष्ट्राच्या जीवनावर व भवितव्यवेवर कांहींच कां परिणाम होत नसेल?

तीन चार महिन्यांपूर्वी 'सेनापति महर्षि' बापट व आणखीं त्यांचे तीन चार 'जवानमर्द ब्राह्मणभाई' तरवारी पिस्तुल घेऊन टाटाच्या मुळशी रेलवेवर मेले व तेथें त्यांनी आपलीं शस्त्रास्त्रें परजून अत्याचार केल्याचें वृत्त सर्वांना श्रुतच आहे. त्यांचा खटला सेशनकमिट झाला आहे व त्याचा व्हायचा असेल तो निकाल होईलच. प्रश्न एवढाच उद्‌भवतो कीं बापट प्रभृतींनीं हा जो अत्याचार केला तो त्यांच्या महर्षिपणाला व सेनापतिपणाला कितीसा शोभला? टाटाच्या नि:शस्त्र नोकरांवर तरवारी परजिणें व गोळी झाडणें, यांत महर्षींचे सेनानीपण व सेनापतींचें महर्षीपण व्यक्त होतें कीं माथेफिरूपणा सिद्ध होतो? मुळशीच्या सत्याग्रहाचें पर्यवसान असल्या क्षुद्र माथेफिरू अत्याचारांतच करावयाचें होतें, तर त्याला

परिषद कशाला? सत्याग्रही मूर्ख तरुणांची सेना कशाला? बयाबाई मावळीण कशाला? आणि हे महर्षि सेनापति कशाला? पावटीभर दारू पाजली कीं हवा तो गुंड हें 'राष्ट्रीय' कार्य करायला तयार झाला असता. सारांश, बापट प्रभृति माथेफिरूंनीं मुळशी चळवळींत दाखविलेला भ्याडपणा (cowardice) अत्यंत चिळस आणणारा आहे. मुळशी प्रकरणांविषयीं आम्ही व्यक्त केलेले विचार व भविष्य आतां अक्षरश: खरे ठरले आहेत, याचा वाचकांनी उपरिनिर्दिष्ट जुना लेख वाचून स्वत:ची खात्री पटवून घ्यावी.

एकवार अनुभव घेऊन पहा

आस्ते आस्ते दक्षिणी लोक व्यापारांत पडूं लागले आहेत. आजपर्यंत कच्छीमेमण, मुसलमान, पारशी, बोहरी, भाट्ये इत्यादि लोक व्यापारी क्षेत्रांत अनभिषिक्त राजे होऊन बसले आहेत. इंग्रज अमेरिकन जपानी व्यापाऱ्यांच्या सांनिध्याचाहि आमच्या दक्षिणी लोकांवर परिणाम होत आला असून, हें क्षेत्र काबीज करण्याची त्यांची आतां धडपड सुरू आहे. जाहीरातींच्या आकर्षक शब्दबाजीपासून तों थेट तराजूला किंवा गजाला हिसका मारण्याच्या ठकबाजीपर्यंत सर्व व्यापारी कला पटविण्याची दक्षिणी लोक-विशेषत: ब्राह्मणवर्ग-बरीच तालीम घेऊं लागले आहेत. सकृद्दर्शनीं ही मोठी अभिनंदनीय गोष्ट दिसते. पण हिंदु लोकांचा पिंडच असा विलक्षण आहे कीं त्यांना दोषांचें अनुकरण जितकें उत्तम साधतें, तितकें गुणांचें साधत नाहीं. तूप विकायचें तर रास्त किंमत घेऊन अस्सल विकणार नाहींत, तर त्यांत चरबी ढकलून अटीतटीच्या दरानें विकतील. एका मोठ्या सुप्रसिद्ध गुजराथी व्यापाऱ्यानें स्वत: आम्हांला उपदेश केला की ''तुमची ती तात्विक प्रामाणिकपणाची व सत्याची व्याख्या व्यापारांत लावली कीं दिवाळीच्या आधीं दिवाळें निघालेंच पाहिजे.' हे गृहस्थ थिऑसफिस्ट असून स्वराजिष्ठहि आहेत. 'एकवार अनुभव घेऊन पहा' म्हणून कवडीमोल वस्तूंचा वापर करणारे लक्षाधीश झाले आहेत. गिऱ्हाईक टिकविण्याचा त्यांचा हेतूच नसतो. देशाच्या तीस कोटी लोकांपैकी किमानपक्ष एक लाख मूर्ख जरी या धूर्तांच्या जाळ्यांत सांपडले तरी चार पिढ्या यांचा धंदा खुशाल चालतों. हिंदी व्यापाराच्या असल्या बेइमान क्षेत्रांत आतां ब्राह्मण लोक शिरूं लागले आहेत. जात्याच ते धूर्ताग्रणि. मारवाड्याचाहि तीन शेड्या ते तेव्हांच आपल्या हातांत घेतील, यांत मुळींच संदेह नाहीं. व्यापारांत प्रामाणिकपणाचें कलम जवळ जवळ नाहींच, तेव्हां या मंडळींना कोठेंच अडचण नाहीं. 'एकवार अनुभव' दिला तरी पुरे! साताऱ्याहून आम्ही पुण्यास आल्यावर ऑफीसच्या फर्निचरची व्यवस्था आम्हाला करावयाची आहे, हें ऐकून एक पुणेकर भटजी-सुतार आम्हांला भेटले. हे जरा इंग्रजी शिकलेले, डोळ्यावर नारळाच्या करवंट्याएवढं वाटोळे चष्मे, बोलण्याचालण्याची ऐट थेट पुणेरी. आधींच ब्राह्मण म्हणजे मोठा आर्जवी. त्यांत यानें 'एकवार अनुभव घ्या' सुशिक्षितांच्या धंदेविषयक यत्नाला हातभार लावा, 'मी सेवक आहे, सेवा एकवार घेऊन पहा' वगैरे पुराण गायिले. आम्ही दोन टेबल व ८-९ खुर्च्यां ऑर्डर दिली. सामान घेऊन सात आठ दिवसन होतात तोंच खुर्च्यांच्या पाठी धडाधड कोसळून लागल्या, या सुशिक्षित भटसुताला विचारतां ''तुमच्या लोकांना

खुर्च्यात बसतांच येत नाही'' असे त्याने खडसून उत्तर दिले म्हणणारा हा सुशिक्षित व्यापारी प्रामाणिक नाहीं असें कोण म्हणेल? कसबी खरा! दक्षिणी तरुणांत हीच घाणेरडी प्रवृत्ति बळावणार असेल, तर त्यांनीं व्यापार धंद्याचें क्षेत्र अस्पृश्य ठेवलेले बरें. मारवाडी गुजराथी माना मुरगळतात तेवढ्याच पुरे!

विधवा-पुनर्विवाहांतल्या अडचणी

या बाबतींत मुंबईहून 'एक सुधारक' यांनीं कांहीं महत्त्वाच्या मुद्द्यांवर विचार प्रदर्शित केले आहेत. ते असे- ''बाल किंवा तरूण विधवांचा पुनर्विवाह व्हावा व त्यांना हिंदु समाजांतल्या सामाजिक अन्यायांपासून मुक्त करावें, या विषयीं आजपर्यंत पुष्कळच काथ्याकूट झाला व थोडांबहुत विचारक्रांतीबरोबरच आचारगतिहि वाढली. पण कुमारीविवाहांच्या मानानें विधवा-विवाहांची संख्या जवळजवळ मुळींच नाहीं म्हटलें तरी चालेल. विधवाच लग्न करूं इच्छित नाहीं म्हणावें तर मुंबई पुण्यासारख्या ठिकाणींहि गटारें गल्ल्यांतून पंढपूर दररोज आढळते. याशिवाय मिश्रजातीय लव्हाळ्याच्या सिद्ध असिद्ध बाजारगप्पा जर्मन मार्की इतक्याच सवंग आढळतात. हिंदु समाजनीती कितीहि मगरूर अन्यायी असली तरी विधवांच्या काय किंवा कोणाच्या काय, व्यक्तिस्वातंत्र्याच्या वाटेत येणारा मनु याज्ञवल्क्य किंवा पराशर आज ब्रिटीश-स्मृती पुढें कस्पट बनला आहे. विवाहास विधवा तयार असतात, परंतु विधुर किंवा तरूणच काचकूच करतात; असा एक आक्षेप नेहमीं ऐकूं येतो. मलाहि हा प्रथम खरा वाटला. पण खरी अडचण ही नव्हे. संधी न मिळाल्यामुळें म्हणा अथवा कोणी प्रयत्नच न केल्यामुळें म्हणा, विवाहाचे स्वप्नहि न पहातां झुरून कन्झम्पशनच्या भक्षस्थानीं पडणाऱ्या तरूण विधवांना कोण 'सति' म्हणतील ते म्हणोत. मी तर त्यांना नीतिधैर्य नसलेल्या मूर्ख स्त्रिया हेंच नांव देईन. पंढरपूरच्या वारकरणी किंवा गुप्त लव्हाळ्यांत तडफडणाऱ्या विधवा तरुणी धाडसांत कमी असतात असे नव्हें. व्यभिचाराचें धाडस पर्ल व्हाईटच्या किंवा रूथ रोलंडच्या सिनेमा-धाडसापेक्षां कितीतरी पट भयंकर! उघडकीस येतांच आळींत तोंड बाहेर काढण्याला पंचाईत. पण पुष्कळ तरूण-विधवा पुनर्विवाहाचें नैतिक धैर्य दाखविण्यापेक्षां व्यभिचाराचे भयंकर धाडस पत्करतात. मनोवृत्तीच्या या विचित्र ठेवणीची यथातथ्य कल्पना एखादी विधवा भगिनी (आपलें खरें नांव गुप्त ठेऊनहि) जाहीर लेख लिहून व्यक्त करील काय? व्यभिचारापेक्षां विधिशुद्ध विवाह वाईट तो कसा? कोणी म्हणतील कीं व्यभिचाराचा माझा आरोप खोडसाळ आहे. म्हणणें निराळें आणि प्रत्यक्ष परिस्थिति निराळी! माझें म्हणणें एवढेंच आहे कीं विधवा-पुनर्विवाहासाठीं विधवांनींच धैर्यानें पुढें आलें पाहिजे. प्रथमविवाहाचे कन्यादान बापानें किंवा दुसऱ्या एखाद्या कायदेशीर किंवा फायदेशीर पालकानें केलें, एवढ्यावरच त्याची त्या तरुणीवर आमरण सत्ता रहात नाहीं. दान झालें कीं सत्ता संपुष्टांत आलींच. मग त्या प्रौढ विधवेला स्वयंनिर्णयाचा हक्क आहेच. अज्ञानसज्ञानपणाचा 'इंडियन मेजारिटी ॲक्ट' हिंदूंच्या विवाह, काडीमोड किंवा दत्तविधान यांत लागू पडत नाहीं. विवाहांत वधूचें (विधवेचे) वय १६ पूर्ण असलें तर

ती कायद्यानें सज्ञान ठरतें. या वयाच्या विधवेनें स्वयंप्रेरणेनें, कोणाहि वडिलधाऱ्या माणसाच्या मताची पर्वा न करतां, आपला पुनर्विवाह केला तर तो हिंदू लॉ प्रमाणें कायदेशीर ठरतो, आणि त्या विधवेवरहि कोणाला कांहीं कायदेबाजी लढवितां येत नाही. १७ व्या वर्षाच्या सुमारास ती स्वयंनिर्णयी बनते.

`In the case of a widow who is of full age, or whose marriage has been consummated, her own consent is sufficient count to constitute her remarriage lawful and valid.'

Hindu Law by Jus. D. F. Mulla, p. 402.

अर्थ : ''जी विधवा पूर्ण वयांत आलेली आहे, किंवा प्रथम विवाहांत जिचा पतिसंबंध झालेला आहे, तिचा पुनर्विवाह कायदेशीर ठरण्यास फक्त तिची संमति एवढाच आधार पुरें आहे.'' पुढें जस्टिस मुल्ला म्हणतात:

``Minority, according to the Mitakshara School, terminates on completion of the sixteenthe year."

अर्थ : ''मिताक्षरांप्रमाणें १६ वर्षे पूर्ण होतांच अज्ञान दशा नष्ट हाते.'' वरील नियमांत दोन अटी आहेत. (१) जी विधवा पूर्ण वयांत आलेली आहे, म्हणजे जिचें १६ वें वर्ष पूर्ण झाले आहे; किंवा (२) प्रथम विवाहांत जिचा पतिसंबंध झालेला आहे. म्हणजे एखाद्या १३-१४ वर्षे वयाच्या तरुणींचा पतिसंबंध होऊन ती विधवा झालीं, तर पुनर्विवाहासाठीं लागणाऱ्या स्वयंनिर्णयासाठीं तिला १६ वर्षे वयाची अट सुद्धां पाळण्याची जरूर नाहीं. फक्त तिची संमति असली कीं झालें. सारांश, समाजाच्या अन्यायी बंधनाची आडकाठी नाहीं, ब्रिटिश कायद्याचें पाठबळ आहें, अशा स्थितींतहि जर हिंदु विधवा नैतिक धैर्यानें पुनर्विवाहार्थ आपण होऊन पुढें सरसावणार नाहींत, तर त्यांच्याविषयीं केवळ शाब्दिक अनुकंपेपलिकडे तरूणांनाहि विशेष कांहीं करतां येणें शक्य नाहीं या पुढची अडचण म्हटली म्हणजे हे पुनर्विवाह जमविणारीं चांगल्या इभ्रतदार स्त्रीपुरुषांनी चालविलेली संस्था पाहिजे. असली संस्था सार्वजनिक असावी व जातिविशिष्ठहि असल्यास वाईट नाहीं. या संस्थांनीं पुनर्विवाहेच्छु विधुर विधवांचे अर्ज स्वीकारून चांगल्या डायरेक्टरांमार्फत हीं लग्नें जुळवून विधिशुद्ध लावून द्यावी. अशा प्रकारचे प्रयत्न सुधारणावादी करतील, तर विधवाक्लेशविमोचनाचा प्रश्न पद्धतशीर सुटेल, असें मला वाटतें.''

(प्रस्तुत पत्रांतील विचार आम्हांला पूर्ण मान्य आहेत. आमच्या दोन कट्ट्या सुधारक विधुर मित्रांच्या बाबतींत आम्हालांहि विधवांच्या मुक वृत्तीचाच अनुभव आला. पुनर्विवाहोत्तेजक संस्था प्रत्येक जातींतील सुधारकांनी काढल्या, तर विधुर विधवांच्या मूक वृत्तीला बरीच मोकळीक मिळेल. अव्यवस्थित व्यभिचारापेक्षां व्यवस्थित विवाह बरा, हें तत्व विधवाच मान्य करतील तर बालहत्यादि अनंत अत्याचार आपोआप बंद पडतील. सं.प्र.)

रायबहादुर भाईसाहेब गुप्ते यांचा मृत्यु

गेल्या मार्च महिन्यांत रा. ब. बाळकृष्ण आत्माराम उर्फ भाईसाहेब गुप्ते F. Z. S. हे आपल्या वयाच्या

७५व्या वर्षी कलकत्ता येथे मरण पावले. भाईसाहेबांच्या चरित्रांतील सर्व तपशीलाचा विचार करतां, मरणाच्या क्षणापर्यंत एकसारखे कांहीं ना कांही काम करीत असतां मृत्यु पावलेल्या या भीष्माचामृत्यु हा 'अकालीं' तरीं म्हणतां येणार नाहीं. बुद्धिप्रभावावर समाजांत विद्वानांत आणि सरकारांत शक्य तितका आदर व मानपान मिळवून कृतकृत्य झालेल्या भाईसाहेबांचा मृत्यु 'शोचनीय' हि म्हणतां येणार नाहीं. मृत्युला 'अभिनंदनीय' असें विशेषण तरी कसें लावावें? आजपर्यंत कोणी तें लावलें नाहीं. परंतु मृत्युक्षणापर्यंत संतत कर्म करणाऱ्या आणि बालपणच्या सर्व महत्त्वाकांक्षा केवळ मनगटाच्या जोरावर पूर्ण पाडून वयाचीं ७५ वर्षं सन्मानांत व अखंड विद्याव्यासंगांत काढणाऱ्या भाईसाहेबांचा मृत्यु अभिनंदनीय नव्हे असें म्हणतां येईल काय? भाईसाहेबांनीं आपलें इहलोकचें कर्तव्य चोख बजावलें व मृत्युनेंहि योग्य वेळीं आपलें कर्तव्य केलें, असेंच म्हणावें लागेल. भाईसाहेबांच्या मृत्युमुळे कायस्थ प्रभु समाजाच्या सामाजिक उत्क्रांतीच्या चलच्चित्र पटांतला एक भाग संपूर्ण झाला. भाईसाहेबांचा जन्म ८ जानेवारी १८५१ रोजीं झाला. त्यांचें विस्तृत चरित्र कै. धनुर्धारी यांनीं लिहिलेलें आहे. त्यांच्या सर्व जीवनयात्रेंतील चळवळींचा पाया एका सूत्रावर चाललेला असे. तें सूत्र म्हणजे Lytton's Lady of Lyons मधील हें वाक्य होय. ``I will not, were I fifty times a prinee, be a pensioner on the dead. I honour birth and ancestry when they are regrded as the incentives to exertion. not the title deed to sloth." भाईसाहेब अशा काळांत जन्मले व भरभराटींस आले कीं त्या वेळीं कर्तबगारांचीं योग्यता पारखिली जात असे. त्या वेळचे युरपियन अधिकारीहि समंजस व रसिक असत; हल्लींप्रमाणे 'धोबी' नसत. त्यामुळें त्यांच्या बुद्धिविकासाला पूर्ण वाव मिळाला आणि कर्तव्यांची अनेक क्षेत्रें त्यांना चोखाळण्यास मिळाली. असा एकहि विषय किंवा शास्त्र सांगतां येणार नाहीं कीं ज्यांत भाईसाहेबांनीं प्राविण्य पटकविलें नाहीं. त्यांच्या चरित्रांत स्वाध्याय व स्वावलंबन हीं दोन तत्त्वें मुख्य होतीं. त्यांचा लेखनव्यवसाय तितकाच दांडगा होतां. त्यांनी लहान मोठें असें ३०-३५ वर ग्रंथ लिहून प्रसिद्ध केले. मुंबई सरकारनें निरनिराळ्या जिल्ह्यांची गॅझेटियरें कँबेल साहेबांच्या देखरेखीखालीं लिहिवलीं, त्यांतहि भाईसाहेबांनी बरेंच लेखनसहाय दिलें. 'चां. का. प्रभूंच्या इतिहासाचीं साधन' नांवाचें एक मासिक पुस्तक चालवून त्यांनीं महत्त्वाच्या शेंकडों ऐतिहासिक कागदपत्रांचा जीर्णोद्धार केला. मुंबईतील राणीचा बाग व आलबर्ट म्युझियम यांची घटना व मांडणी भाईसाहेबांनीच केलेली आहे. १८८५ सालीं विलायतेंत एक साम्राज्यप्रदर्शन भरलें. त्या वेळीं हिंदुस्थानच्या दालनाची मांडणी करण्यासाठीं भाईसाहेब सरकारी खर्चानें लंडनला गेले. तेथें त्यांच्या चातुर्यांची व शतपैलू बुद्धीची महाराणी व्हिक्टोरिया व प्रिन्स एडवर्ड यांनीं स्वत: वाखाणणी करून भाईसाहेबांना खास मेजवानी दिली. होळकर शाहींतहि भाईसाहेबांनीं कमांडर-इन-चीफ व प्रधानकी गाजवून 'मत्ता होळकरकी सत्ता भाईसाहेबकी' ही म्हण चिरंजीव करून ठेवली. उतार वयांत कानानें ऐकूं येत नव्हतें व डोळ्यांनीं चांगलं दिसतहि नव्हतें. तरी त्यांचें वाचन अव्याहत चालूच असे. कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या पोस्टग्रॅज्युएट कोर्सासाठीं ते एथ्नॉप्रफी व हिस्टरीचे लेक्चररचें काम करीत असत. नुकतेच ते हिस्टरिकल रेकर्ड कमिशनवर कामासाठीं फिरतीवर होते. यांचें चरित्र इतक्या नानाविध रंगांनीं भरपूर रंगलेलें आहे कीं त्यांचा नुसतां तपशीलहि येथें देणें शक्य नाहीं. कोणी मेहनत घेऊन तें लिहिलेंच तर त्या चरित्रग्रंथाला कायस्थ प्रभूंसारख्या सुतकी वृत्तीच्या समाजाकडून मुळींच आश्रय मिळणार नाहीं. मात्र भाईसाहेबांचें

चरित्र सर्वच गोष्टींत अद्‌भुत आहे यांत शंका नाहीं. भाईसाहेब जर ब्राह्मण जातींत जन्मले असतें, तर त्यांच्या मृत्युमुळें आज सर्व ब्राह्मणी पत्रांत मोठा ठणठणाट उडाला असता! पण ते दुर्दैवानें वेदकार व आत्मद्रोही अशा कायस्थ जातींत जन्मलें!

भाईसाहेबांत 'स्वामिनिष्ठा' हा कायस्थी धर्म अत्यंत बलवत्तर होता. याच्यापायीं त्यांना अनेक अधिकारांच्या जागांवर लाथ मारून सत्तासंन्यास घ्यावा लागला. पण हा स्वामिनिष्ठेचा धर्म आतांच्या मनूंत जवळजवळ श्वानवृत्तीचा झालेला आहे, हाहि त्यांना अखेर अखेर अनुभव पटत होता. 'जन्माचा कायस्थ इंग्रजांचा कुत्ता' हें तत्त्व यापुढें तरी या समाजाच्या अध:पाताला कारण होईल, इतकें स्पष्ट मत त्यांचें झालें होतें. स्वावलंबनानेंच आत्मोद्धार व समाजोद्धार होईल, याच मताची त्यांनीं अलीकडे उपदेश-घोषणा सुरू ठेविली होती. भाकरीचे तुकडे चारील त्यासाठींच भुंकावें आणि नोकरी करूनच मोक्षाला जावें या कायस्थी प्रवृत्तीला सध्यां कवडीचीहि किंमत राहिलेलीं नाहीं. हें ओळखून, जिवंत राहूं इच्छिणाऱ्या कायस्थांनीं आपल्या जीवनध्येयाचें क्षेत्र व्यापक बनवावें, म्हणजे भाईसाहेबांच्या आत्म्याला संतोष वाटेल.

□□□

निवेदन

निंदकांचे आभार

'निंदकाचें घर असावें शेजारीं' या तुकोक्तीचा खरा गुढार्थ गेल्या १०-१२ महिन्यांच्या जीवन-क्रांतींत मला जसा स्पष्ट कळला तसा पूर्वी केव्हांहि कळला नव्हता. छळवाद्यांचा छळ, निंदकांची निंदा आणि कारस्थान्यांचीं प्राणघातक कारस्थानें मनु याच्या चारित्र्याची वास्तवीक खरीखुरी कमावणी करतात. त्यांच्या छळाच्या, निंदेच्या आणि कारस्थानांच्या ज्वाळा त्याला जिवंतपणीं भाजून काढतात खऱ्या, पण त्यामुळेंच त्याचें सत्व कसाला लागतें. सत्वच कसाला लागलें नाहीं, काळजाची पिळवटून दामटी होईल इतक्या कठोरतेनें विश्वासघाताची कट्यार जर हृदयांत खोल घुसली नाहीं, आणि उपासमारींत तडफडणाऱ्या माणसाला अन्न देऊन नगवितांच तो सापाप्रमाणें उलट आपल्यावरच उरफटला नाहीं, तर जन्माला येऊन आपण जगांतले रहस्य तें काय पाहिलें? हें रहस्य पटवून देण्यासाठीं माझा व माझ्या लहानशा कार्याचा कायमचा घात व्हावा म्हणून अनेक ब्राह्मण व कायस्थ प्रभू सज्जनांनीं गेल्या ८-१० महिन्यांत जिवापाड श्रम केले. त्यांचे आभार मी कां मानू नये? प्रबोधनाच्या शरसंधानांनीं घायाळ झालेल्या आणि जन्मत:च कारस्थानी कारभारांत मुरलेल्या कांहीं ब्राह्मणांनी मी पुण्यांत येतांच, उलटसुलट कागदांच्या 'ध'च्या 'मा'वर छापखान्याच्या खरेदींत मला सफाईनें नागविण्यासाठीं जी कायदेबाजीची कळकळ दाखविली; त्या सर्व ब्रह्मवांत्युत्पन्न महात्म्यांचा मी आभारी आहे. हुंडा-विध्वंसनाच्या माझ्या चळवळीने चिडून जाऊन, माझ्याविरुद्ध नानाप्रकारच्या कंड्या पसरविण्याची स्वयंसेवा करणाऱ्या, ठाकऱ्यांची व प्रबोधनाची मुस्कटदाबी करण्यासाठीं इरसाल ब्राह्मणांशीं सहकारिता करणाऱ्या व वेळांत वेळ काढून बीभत्स भाषेंत खुनाच्या धमक्यांची पत्रे पाठविणाऱ्या कायस्थ प्रभु तरुण वीरांचेहि मी साष्टांग प्राणिपातपूर्वक आभार मानतो. मुंबईच्या बेकारींत कण्हत कुंथत पडलेल्या ज्या दोन कायस्थ तरुणांना मी हजारों रुपयांच्या व्यापाराची कमिशन एजन्सी देऊन जगविलें, ज्यांनीं माझ्या नांवाचा व अस्पष्ट शिफारशीचा दुरुपयोग करून एका धनाढ्य मित्राकडून माझ्या नकळत कर्ज काढलें व परिणामीं त्या मित्राचें घर मला वर्ज करविलें, हातीं दिलेल्या व्यापारांत घालमेल केल्यामुळे ज्यांच्या अब्रूसाठीं मी हजार दीड हजाराची ठोकर आत्मसंतोषानें पत्करली व या कायस्थ तरुणांची चामडी वाचविली, व या सर्व उपकारांचा मोबदला, जे आज माझ्यावर सापाप्रमाणें उलटून नाना

प्रकारचीं कारस्थानें लढवून देण्यांत गुंग आहेत, त्यांचेहि मी मन:पूर्वक आभार मानतो. कायस्थ प्रभूंतहि प्यालेल्या दुधाचें वीष ओकणारे महात्मे आढळूं लागल्यामुळें, या जातीच्या निष्ठेच्या कल्पनांना मूठमाती देण्याचा प्रसंग लवकरच कायस्थेतरांना साजरा करावा लागेल असें वाटतें. प्रबोधन क्रांतिचक्रांत गुरफाटला असतां, एका व्यवसायबंधूनें 'प्रबोधनाला देवाज्ञा झाली' असा मथळा घालून प्रबोधन बंद पडल्याची बातमी प्रसिद्ध केली होती. देवाज्ञेशिवाय झाडाचें पान हालत नाहीं. स्वस्थ वैस अशी देवाज्ञा झाली म्हणून प्रबोधन अज्ञातवासांत स्वस्थ बसला. आज पुन: प्रबोधनाला देवाज्ञ झाली की ऊठ आणि आपल्या कार्याला सुरुवात कर. देवाज्ञाच ती! ती पार पडलीच पाहिजे. मी काय, नुसता निमित्तमात्र लाकडाचें यंत्र. कर्ता करविता देव. त्या देवाच्या आज्ञनें सर्व कांही आजपर्यंत घडत आलें आहे व पुढें घडत राहील. ही 'देवाज्ञा' मी या पुढें विसरू नये व कोणत्याहि कर्माच्या कर्तृत्वाचा अहंभाव बाळगूं नये म्हणून एन वेळी सूचना देणाऱ्या या व्यवससायबंधूंचे मी मन:पूर्वक आभार मानतों. सर्व निंदकांनो, छळकांनो, कारस्थान्यांनो, तुमच्याच उत्तेजनानें माझें जीवन दिवसें दिवस शुद्ध होत आहे. ईश्वर तुम्हाला चिरायू करो!

- केशव सीताराम ठाकरे

□□□

टिपण

संपादकीय खुलासा

श्रीकृष्ण जगद्गुरुंना साष्टांग प्रणिपात करून जनता जनार्दनाच्या सेवेची प्रबोधन आज पुन्हा सुरुवात करीत आहे. प्रबोधनावर क्रांतीच्या वाळवटींत कसकसले भयंकर प्रसंग आले याची सविस्तर माहिती आधीच्या आमच्या आश्रयदात्यांना कळविलेलीं असल्यामुळें तिचा येथें पुनरुच्चार करण्याचें कारण नाहीं. प्रबोधनाचा अंक या पूर्वीच तयार झाला होता. परंतु पोष्टाकडून रजिष्टर नंबराची परवानगी मिळविण्याला तब्बल दोन महिने लागले. ८ मार्चाच्या पत्राची पोंच ८ एप्रिलला मिळाली. सध्यांच्या बिनतारी संदेशयुगांत असली दिरंगाई पोष्टखात्यांत झालेली पाहून क्षणभर अठराव्या शतकांत असल्याचा आम्हाला भास झाला. ही परवानगी हातीं आलीं तेव्हां हा अंक बाहेर पडला. कोणतेंहि कारण असो, दिरंगाई झाली खरीं, त्याबद्दल 'क्षमस्व' म्हणून आश्रयदात्यांची याचना करणें आमचें कर्तव्य आहे.

प्रबोधन मुद्रणालयांतल्या मशिननें आमची आतांपर्यंत इतकीं हाडें मोडली कीं तितकी डेंग्युनेंहि मोडली नसतील. हें जर्मन ट्रेडल अगदीं कोरें करकरींत मुंबईस खरेदी केलें. तेथून रवाना करणाऱ्यांनीं त्याचें इतकें भिकार पॅकिंग केलें कीं पुण्यास येतां येतांच त्याचे बहुतेक भाग रेलवेच्या धसळामुसळींत खडाखड फुटले. व्यापाऱ्यांना काय? या नुकसानीचा त्यांना थोडाच घाम फुटणार आहे? माल गोडोनच्या बाहेर पडला की जबाबदारी खलास! फार झालें तर 'सॉरी' म्हणून डोळ्यावर रुमाल फिरविला कीं झालें. यंत्राचीं हाडें रेलवेने फोडली, त्याचा सूड यंत्रानें आमचीं हाडें फोडून यथास्थित उगवला. गेल्या ऑक्टोबरपासून तों मार्चच्या मध्यापर्यंत या यंत्राची डागडुजी करण्यांत पैसा आणि श्रम यांची मनस्वीं उधळपट्टी केली तेव्हां हें जर्मन सैतान काबूंत आलें. हल्लीं जर्मन ट्रेडल पुण्यामुंबईत बरीच बोकाळलीं आहेत. अमेरिकन मशिनपेक्षां हीं बरीच स्वस्त असल्यामुळें ती खरेदी करण्याचा आमच्याप्रमाणें पुष्कळांना मोह उत्पन्न होतो. पण या स्वस्ताईच्या पायीं विनाकारण भरसाट बुडीत खर्चाच्या खस्ता खाव्या लागतात, या आमच्या कटुतम अनुभवाचा लोकांनीं फायदा घ्यावा अशी आग्रहाची शिफारस आहे. सारांश, अडचणींतून मार्ग काढतां काढतां जीव व्याकूळ झाला. पण अखेर 'निश्चयाचें बळ' कसाला लागलें व आजचा अंक त्याच मशिनवर मुद्रित होऊन वाचकांच्या सेवेला रुजू झाला.

मशिनची बंडाळीं कांही केल्या आटपेना. आज हा भाग बसवावा तर दुसरा कोसळला, त्याची

रिपेर करून मशिन चाललेसें वाटावें तों एकदम चवथ्याच भागाचे खडाड तुकडे व्हावें. अशी संकट परंपरा मुद्रणालयाच्या सुरुवातीलाच चालू झाली तेव्हां कांत्याची छपाईचें काय करावें, ही विवंचना अन्नांत वीष कालवू लागलीं. प्रबोधनाच्या अज्ञावासांची मुदत आतां आणखी कितीं दिवस लांबणार? संकट परंपरेची तर जणूं काय अशी प्रतिज्ञाच दिसूं लागली कीं आमचें प्रत्येक जाहीर वचन अक्षरश: खोटेंच पाडायचें! विचारांच्या काहुरानें मन:स्थिति गोंधळून गेली. अखेर हाच विचार कायम केला कीं प्रबोधनाच्या ४थ्या वर्षाचा कार्यक्रम प्रथम चालू करावा आणि मग क्रांत्यकाची छपाई हातीं घ्यावीं. क्रांतीच्या धरणीकंपाने प्रबोधन आणि त्याचे आश्रयदाते यांची जी ताटातूट झाली आहे ती प्रथम मिटवावी आणि मग इतर मोठ्या कामाला हात घालावा. आमच्या विनंतीला मान देऊन अनेक सहृदय व आश्रयदात्यांनी कर्जद्वारा, देणगीद्वारां व चवथ्या वर्षांच्या आगऊ वर्गणीद्वारा सांपत्तिक मदत भराभर पाठविली, याबद्दल त्यांचे उपकार मानण्यास शब्द असमर्थ आहेत. कांही नवीन आश्रयदात्यांनीहि प्रबोधनवर कृपेची पांखर घातली आहे. सांपत्तिक ताण सध्यांहि बराच तीव्र आहे. आमच्या बऱ्याच नव्या व जुन्या वर्गणीदारांनी हा अंक पावतांच चवथ्या वर्षाची वर्गणी ताबडतोब मनीऑर्डरने रवाना केली. तर आमच्यावर फार फार उपकार होतील पहिल्या वर्षाच्या २४ अंकांपैकी २० अंक बाहेर पडले तेव्हाच वर्गणीची मागणी केली. २ऱ्या व ३ऱ्या वर्षी इतकाच धीर धरला. पण या वर्षी परिस्थितीनें नाइलाज केल्यामुळेंच आगाऊं सांपत्तिक मदतीची याचना करीत आहे. कनवाळू आश्रयदाते या याचनेकडे विशेष लक्ष देतील अशी आशा आहे.

सांपत्तिक मदत करणाऱ्या आश्रयदात्यांची नांवें.

१. दिवाण बहादूर वासुदेवराव माधवराव समर्थ.
२. प्रोफेसर माणिकराव.
३. चां. कायस्था प्रभु युनियन, कुर्ला.
४. श्री. केशवराव बी. देशपांडे, बी.कॉम.
५. श्री. वासुदेव गणेश देशपांडे, बी.ए. एलेल्बी.
६. श्री. गणपतराव नारायण दळवी.
७. श्री. आर. व्ही. गुप्ते, सॉलिसिटर.
८. श्री. हिंदु मिशनरी सोसायटी.
९. श्री. रामचंद्र बी. के., दादर.
१०. श्री. अनंत दत्तात्रय कारखानीस.
११. श्री. चंद्राजी शिवराम मांडवीकर.
१२. श्री. आनंदराव जीवन नाखवा.
१३. श्री. शंकरराव यशवंत प्रधान, कॉन्ट्रॅक्टर.
१४. श्री. मार्तंडराव सखाराम प्रधान.
१५. श्री. नारायण आत्माराम प्रधान.
१६. श्री. नारायण आत्माराम वैद्य.
१७. श्री. रामचंद्र नरहर वैद्य.

१८. श्री. नारायण बळवंत वाळवेकर.

१९. श्री. जयराम नाना.

२०. श्री. गजानन लक्ष्मण मथुरे.

२१. श्री. बळवंतराव भवानीशंकर दादरकर.

२२. श्री. गजानन परशुराम कारखानीस.

२३. श्री. गणपत महादेव बोरकर.

२४. श्री. भगवंत नरहर वैद्य.

२५. श्री. केशव बाळकृष्ण वैद्य, बी कॉम.

२६. श्री. श्रीधर लक्ष्मण जडे.

२७. श्री. धोंडू पांडू पाटील.

या सर्व सज्जनांच्या चरणीं आमचे कृतज्ञतेचें अश्रुसिंचन असो! त्याचप्रमाणें पत्रद्वारे उत्तेजनाचे व धैर्याचे चार प्रेमळ गोड शब्द लिहून धाडणारे आश्रयदाते शेंकडों आहेत. त्यांनाहि हा प्रबोधनकार कृतज्ञतेनें साष्टांग प्रणिपात करीत आहे.

''शंभर वर्षांपूर्वीचे महाराष्ट्र'' अथवा ''हिंदवी स्वराज्याचा खून हा ग्रंथ अझूनहि प्रसिद्ध न झाल्यामुळे कांहीह आश्रयदात्यांचा आमच्यावर रोष झाला आहे. या रोषांत प्रेमाचाच भाग पुष्कळ असल्यामुळें तो आम्हांस नित्य उत्तेजनकारकच होत आहे. या ग्रंथाबद्दल एवढा खुलासा सध्यापुरें आहे कीं पत्रप्रारंभी आम्ही ठरविलेल्या मर्यादेपेक्षा त्याचें क्षेत्र आज पुष्कळ वाढले आहे आणि कल्पनेलाहि चकित करून सोडण्याइतका नवीन नवीन पुरावा नित्यश: हाती लागून ठरावीक प्रमेयें उलथी पालथी होत आहेत. शिवाय ऐतिहासिक ग्रंथलेखनासाठीं आवश्यक लागणारी चित्तशांति गेलीं दोन वर्षें आम्हाला मुळींच लाभलीं नाहीं. अशाहि अवस्थेत हा ग्रंथ लिहून लवकरच पूर्ण होईल असा आमचा विश्वास आहे. तत्पूर्वी कोदण्डाचा टणत्कार या आमच्या लोकप्रिय ऐतिहासिके महत्त्वाच्या ग्रंथाची सर्वस्वीं सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति आतां प्रसिद्ध झाली आहे. सर्वांनीं त्वरीत मागणी करून आम्हांला सहाय द्यावें. आजच्या अकांत मागणीची छापील कार्डें पाठविलीं आहेत, तीं भरून पाठवावीं अशी सर्व वाचकांना विनंती आहे. टणत्काराच्या पाठोपाठच १०० व. पू. महाराष्ट्रा'ची छपाई सुरू होईल, ही सर्वांनीं खात्री बाळगावी. कांत्यंक नक्का केव्हां प्रसिद्ध करतां येईल त्याचा खुलासा पुढील अंकीं करण्यांत येईल.

जग गुरू श्रीकृष्ण प्रबोधनाच्या हातून महाराष्ट्राच्या व हिंदुसमाजाच्या पुनरुज्जीवनाची काहीं तरीं भरीव कामगिरी घडवो; एवढी प्रार्थना करून, क्रांत्युत्तर कार्याला प्रबोधन या अंकाने सुरुवात करतो.

□□□

लेख

स्त्रियश्चरित्रं देवो न जानाति

इमान ही एक मोठी अजब चीज आहे. इमानाचें वास्तवीक स्वरूप काय आणि त्याची खरी किंमत किती, याचा निश्चित निर्णय अझून कोणीच करू शकला नाहीं. पुष्कळ वेळां इमानाची किंमत कवडीमोल होते, तर कित्येक प्रसंगी जगातल्या सर्व संपत्तीलाहि त्याच्या मोलाचे माप मोजवत नाहीं. सुख पाहतां जवापाडे दु:ख पर्वताएवढे, हा तुकारामांचा सिद्धांत खरा मानला, तरी एवढें कबूलच करावें लागेल की, जवांपाडे कां होई ना, पण सुख म्हणून काहींतरी अस्तित्वात आहेच. जगाच्या व्यवहारांत दुष्टांची संख्या पुष्कळ असली, तरी सुष्टांची संख्या थोडीतरी असतेच असते. तद्वतच बेइमान प्राण्यांच्या खटपटी व्यवहाराचा प्रवाह क्षणोक्षणीं कितीहि विषारी बनवीत असल्या, तरी अल्पसंख्य इमानी प्राण्यांच्या उज्वल चारित्र्याचीं उदाहरणे खग्रास ग्रहणोत्तर चंद्रविंबाप्रमाणे सर्वं जगाचें लक्ष चटकन वेधण्या इतकीं आकर्षक खास असतात. नानाविध आधीव्याधींच्या रामरगाड्यांत हरघडी रगडून निघणाऱ्या मानवतेला बेइमानाच्या निखाऱ्यांवर पाय पोळून घेण्याचे प्रसंग वारंवार येत असलें तरी कधी काळींच का होई ना, इमानाचा स्वर्गसुखतुल्य स्पर्श उपभोगण्याचा आनंद तिला मिळतोच मिळतो. बाइल ना बांडा असा एकादा एकांतवास प्रिय सडेसोट मनुष्य, व्यवहाराच्या कांटेरी बाजारांत दिवसाची उदरनिर्वाहाची दलामल करून घरीं परत येतांच टाम्या कुत्र्याच्या त्या प्रेमदर्शक उड्या, त्याचे चाटणे, भुंकणें, आंगावर खेळणें, वगैरें इमानी प्रेमाचे प्रकार अनुभवून आपल्या सर्व व्यवहारक्लेषांना साफ विसरतो, आणि कुत्र्यासारख्या पशूच्या सहवासांतहि वर्णनीय सुखाचा आनंद अनुभवतो. पशु पक्ष्यांदिकांतहि इमान फार बलवत्तर आढळतें. कित्येकांत तर एकपतिव्रत व एकपत्निव्रत मनुष्यांपेक्षा अधिक निश्चयी व कमाल अव्यभिचारी असें दिसतें. कुत्र्यासारखा इमानीं प्राणी दुसरा आढळत नाहीं. पण माणसांत पुष्कळ वेळां कुत्र्याचें इमान सुद्धां मिळत नाहीं; म्हणून जगाचा व्यवहार दिवसें दिवस कष्टप्रद होत आहे, असा कित्येकांच्या विचाराचा सूर वहात असतो.

इमानाची देणगी देवानें कुत्र्यांनाच जास्त दिली आहे आणि माणसांना कमी दिली आहे; किंवा ती पुरुषांत अधिक आहे आणि बायकांत मुळींच नाहीं, असा वास्तवीक प्रकार नाहीं. गुणावगुणांचें प्रकटीकरण व्यक्तिमात्राच्या मनोवृत्तीवर होत असतें. मानवी मन हा एक गूढ विषय आहे. वेळीं

इंद्रधनुष्याचे रंग मोजता येतील आणि त्यांचें बिनजूक पृथ:करणहि करता येईल, पण क्षणोक्षणीं आजूबाजूच्या परिस्थितीशीं आघात प्रत्याघाताचा अखंड व्यापार करणं माणसाचें मन कोणत्या वेळी कसल्या रंगाची रंगपंचमी खेळेल याचा नेम नाही, मनाचा हा तरळपणा स्त्रियांना मात्र लागूं आणि पुरुष तेवढें पार्थिव मनाचे, हा भेद बेइमानी अर्थात अन्यायाचा आहे.

स्त्रीजात तेवढी बइमान!

हा सिद्धांत ठोकणारा शेक्सपियर स्त्री नव्हता हें लक्षात ठेवावें. हॅम्लेट नाटक जर एखाद्या शेक्सपियरणींने लिहिलें असतें, तर ऑफिलियेच्या तोंडी 'पुरुषजात तेवढी बेइमान' असें वाक्य कदाचित् घातलें नसतें कशावरून? मनुष्य सिंहाचे चित्र काढतो किंवा पुतळा बनवतो, तेव्हा एका माणसानें आपल्या हातानें सिंहाचा जबडा उचकून त्याला चीत केलें आहे, असा देखावा दाखवितो, उलटपक्षीं सिंहाच्या तडाक्यांत मनुष्य सापडला तर तेथें काय देखावा दृष्टीस पडतो? हॅम्लेटच्या भूमिकेची पूर्णता करण्यासाठी शेक्सपियरनें 'स्त्रीजात तेवढीं बेइमान' हे वाक्य त्याच्या तोंडी घातले असलें तरी ते सिद्धांत होऊ शकत नाहीं. शेक्सपियरच्या सर्व नाटकांत हीरो (नायक) कोठेंच नाही म्हटलें तरी चालेल; त्यानें आपल्या बुद्धिवैभवाचें सर्वं जरतारी लेगें वास्तवीक हिरॉइन्स (नायिका) वर उधळून, त्यांचीच चित्रें उदात्त भडक रंगांत रंगविलीं आहेत, हें विसरतां कामां नये, पुरुषांनी स्त्रियांवर बेइमानपणाचा आरोप लादणें, त्यांना 'पायांतलीं खेटरें'मानणं, त्यांच्या नाकांत नथ, पायांत तोडे, हातांत काकणे घालणें, तोंडावर कांही ठिकाणीं गोंदणें वगैरें गुलामी चिन्हांनी त्यांना 'क:पदार्थ' ठरविणे, इत्यादि प्रकार पुरुषांच्या सत्तामदाचे व स्त्रियांच्या सहनशील मृदुल व अडाणी मनाचे द्योतक असले तरी ते अन्यायी घाशीरामीचे आहेत. एकजात स्त्रियांना बेइमान ठरविणारे पुरुष तरी एकजात इमानी असतात काय? व्यवहारांत जी मानकापी व दंडादंडी सदैव चालू आहे, त्यांत इमान पुरुषांचीच दंगल बेफाम भडकलेली आपण नित्य पहातों. इतकेंच नव्हे तर पुरुष बेइमान झाला तरीहि आमरण इमानी राहण्यांत स्त्रियाच निक्षयी असलेल्या आढळतात. एखादी सटवी बाजारबसवी निघाली म्हणजे 'स्त्रीजात तेवढी बेइमान म्हणावी, तर दररोज एकमेकांविरुद्ध कारस्थानें लढविणारे पुरुष शेकडां ७५आढळल्यास सर्व पुरुषांची कत्तलच उडविणें रास्त होईल.

एवढी गोष्ट मात्र खरी कीं इहलोकीं स्त्रीजात आकर्षणाचें एक विलक्षण मानसचुंबकी केंद्र असल्यामुळें, स्त्रीचरित्राचा परिणाम जगाच्या इतिहासावर बऱ्याच दणक्याने उमटलेला आहे, एवढें मोठे पराक्रमी रजपूत लोक, पण केवळ स्त्रियांच्या पायीं नामोहरम झाले. त्यांचे ते जोहार, त्यांनीं कसल्याहि उदात्त भावनेनें केलेले असो, तो त्यांच्या नामदाईचा किंवा रानटीपणाचा कळस म्हणा अगर दुसरे काय वाटेल ते नांव द्या, त्यांतहि स्त्रीचरित्रच प्रधान होतें. मानवी सृष्टींत स्त्रियांचे आकर्षण इतके बलवत्तर आहे कीं केवळ त्यांच्यासाठीं होत्याचे नव्हतें आणि नव्हत्याचें होतें' होतें. स्त्रीजात तेवढी बेइमान म्हणणारे पुरुष एकाद्या इमानीं मर्द पुरुषाच्या उदरांतून न जन्मतां, बेइमान स्त्रीचाच कुसवा धन्य करतात, हें एक नवलच म्हटलें पाहिजे. जेथें मानवांची उत्पत्ति स्त्रीच्या पोटीं स्थितीसुद्धां स्त्रिसहवासावरच, तेथें त्यांचा लयहि स्त्रीसाठींच झाला, तर स्त्रिया बेइमान कशा? पुरुष स्त्रियांना कितीहि क्षुद्र लेखोत, स्त्रियांची निसर्गदत्त मोहनीच अशी पराक्रमी आहे कीं स्त्रियांच्या सहवासाशिवाय पुरुषवर्ग तेव्हांच आत्महत्या करून मोकळा होईल. आई शिवाय मूल

आणि बाईशिवाय बुवा ही स्थितिं आणि मसणवटीं यांत का भेद? मुलाची आई मेली तर दुसरी एखादी बाईच त्याला वाढवते, बुवांचा उपयोग कांही नाहीं. नाटक कादंबरी सिनेमा काय वाटेल तें घ्या, त्यांत जर स्त्री नसेल तर त्यालाकोणी ढुंकूनसुद्धा पहात नाहीं. स्त्रियांची ही विश्वव्यापी मोहनी काय करणार नाही? तोंडातून ब्रहि न काढतां ती वाटेल त्या रंकाचा राव करील व रावाला धुळीला मिळवील. या मोहनीनें नसेल त्याला अब्रू दिली व असेल त्याची चव्हाट्यावर फुंकली. या मोहनीनें आजपर्यंत शेकडों धनुर्धरांना नुसत्या नेत्रकटाक्षानें षंढ केले आणि शेकडों षंढांच्या हातून राज्यकारभार चालविले. हीं मोहनी फाटलेली अंत:करणें जशीं बेमालूम जुळविते. तशी बेमालूम जुळलेली हृदये केवळ एका फणकाऱ्यांत टरटरा फाडते. दारिद्र्याच्या क्लेशांना सुखकर करणारी शशिज्योत्स्ना हीच आणि अलोट संपत्तीच्या वैभवाला रखरखीत निखारे बनविणारी विद्युल्लताहि हीच. वैधव्याची कुऱ्हाड कोसळली असतां अन्नान दशेत स्वत:च्या पोटाला चिमटा घेऊन एकुलत्या तान्ह्याला जगविणारी हीच आणि राणीपदावर असूनहि राजकारणी डावपेंचासाठीं पोटच्या पोराचा खून करणारीहि हीच. असें कोणतें महाकाव्य आहे की ज्याची स्फूर्ति या मोहनीनें दिलेली नाहीं? सीतेसाठी रामायण झालें, द्रौपदीसाठीं महाभारत जन्माला आलं आणि हेलनसाठी होमरचे इलियड सप्तस्वरांची ललकारी फोडू लागले, सारांश, स्त्रीचरित्र असें सर्वोग-पराक्रमी आहे. या पराक्रमाचें मूळ त्यांच्या ईश्वरदत्त मोहनींत आहे. या मोहनींत कोणकोण शहाणे गद्धे बनतात आणि कोणकोण गद्धे शहाणे ठरतात. हे सांगणें फार कठीण आहे. एका संस्कृत कवींनें म्हटलं आहे कीं

स्त्रियश्चरित्र पुरुषस्य भाग्य।

देवो न जानाति कुतो मनुष्य:।।

पांच महिन्यांपूर्वी मुंबईस मलबार हिलवर बावला नांवाच्या एका धनाढ्य मुसलमानाचा खून झाल्याचे वृत्त आतां सर्वांना माहीतच आहे. हा खून मुमताज बेगम ऊर्फ कमलंदेवी नामक एका चटोर पोरीमुळें झाला आणि ही चटोर नार पूर्वी होळकर सरकारजवळ होती. प्रस्तुत खुनामुळें मोठमोठ्या लोकांच्या धरपकडी वगैरे धामधूम व खटल्यांच्या सुनावण्या चालू आहेतच. या सर्व धामधुमीचा शांतपणें विचार करीत असतां स्त्रियश्चरित्रं पुरुष्यस्य भाग्यं कीं मरण? हा प्रश्न विचारार्थ पुढें आला आणि

मुमताज चरित्रं बावलस्य मरणं।

होळकर् न जानाति कुतो मनुष्य:।।

असं वाटू लागलें. या प्रकरणाला जो इतका भडक रंग चढून भडका उडाला त्यांचे कारण इतकेंच कीं या लव्हाळ्याच्या त्रांगड्यांत एक खून पडला. नुसती वाचायची किंवा मारामारी होती तर मुंबईच्या पोटभरू व भांडकुदळ इंग्रजी मराठी दैनिकांची दोन चार दिवस चांगली चंगळ उडाली असती, या पलीकडे कांहीं नाहीं. पण येथे तर खून पडला! छिनाल तरुणींच्या पायीं मुंबईत व इतरत्र काय कधि खून पडलेच नाहींत! का आज पडत नाहींत? कां पुढें कधिं पडणार नाहींत? मुंबईसारख्या गोचिड वस्तीच्या बकाली शहरांत लव्हाळ्याच्या बांगड्याचे खून नेहमीच पडत असतात. त्यांची योग्य ती व्यवस्था पाहण्यास पोलीस खाते आहेच. मग या मुमताज प्रकरणाचाच एवढा गवगवा का? खून होतांच टाईम्ससारख्या आंग्लपत्रकारांनीं जो एकदम मोठ्या तारस्वरांत गिल्ला केला, त्यांत त्यांची एवढीच चिंता स्पष्ट दिसत होती कीं मलबारहिलवर ज्या ठिकाणीं हा खून झाला ती जागा म्हणजे युरपियन क्लबाच्या

अगदीं शेजारीं, सायंकाळपासून मध्यरात्रीपर्यंत हवाखाऊ गुलहौशी लोक, आषुकमाषुकें आणि लव्हाळीं पात्रें या ठिकाणावरून हँगिंग गार्डनकडे नेहमीं जात येत असतात. मलबार हिलवर राहणाऱ्या युरपियन लोकांच्या मोटारी जाण्याचा हमरस्ता, तेव्हां खुनासारखें प्रकार जर तेथे होऊं लागले, तर या सर्यांवर मोठाच अनवस्था प्रसंग! एरवीं साऱ्या मुंबईच्या नाक्यानाक्यावर पठाणांची सोटेबाजीं भरदिवसा चालली तरी लोकांच्या चिंतेचा घांमसुद्धा ज्या या आंग्लपत्रकारांना कधिं फुटायचा नाहीं, त्यांना या अनवस्था प्रसंगाची एवढी दहशत कां? तर तो रस्ता म्हणजे युरपियन लोकांच्या जाण्यायेण्याच्या हमरस्ता म्हणून! खुनाबद्दल कोणी झाली तरी तीव्र संतापच व्यक्त करील आणि इतर देशी पत्रांप्रमाणे या पत्रांनीहि केला यांत नवल नाहीं. पण सुरवातीलाच चवथ्या सप्तकांत चढविलेला यांचा सूर एकदम मध्येंच खर्जांत कां घसरला देव जाणें! बरें, ज्याचा खून झाला तो तरी असा कोण मोठा गृहस्थ होता कीं त्याच्यां मृत्यूमुळें सारें हिंदुस्थान एकदम हादरून जावें? बावला म्हणजे कांही इजिप्तचा सरदार सर लीस्टॅक नव्हे, कीं नाशिकचा कलेक्टर जॅकसन नव्हे. बावला मोठा धनाढ्य असेल. मुंबईचा शेरीफ व नगरशेट द्वारकादास धरमसी काय कमी श्रीमान होता? पण त्याचा खून झाला त्यावेळी असा दणदणाट काहीं उडाला नाहीं. मग या प्रकरणांतच एवढा भयंकर गाजावाजा का? तर या खुनाला कारण झालेली चटोर चिमणी मूमताझ ही पूर्वी इंदोरचे तुकोजीराव होळकर यांच्याजवळ होती, हा संबंध त्यांत प्रामुख्याने पुढें आला म्हणून. विलायतेस चाललेल्या रॉबिनसन केसमध्यें काश्मिरचे युवराज हरिसिंग यांना लव्हाळ्याच्या लफड्यांत पिळून काढणाऱ्या इंग्रजी हरामखोरांचा कट नुकतांच जनजाहीर झालेला होता. त्यांत होळकर सरकारच्या या खऱ्या खोट्या लफड्याची दारू पथ्यावरच पडली. त्यानीं या बावला-मुमताझ-होळकर प्रकरणावर वाटेल ते खरडून आपली मनिषा तृप्त करून घेतली. अझूनहि हा शिमगा चालूच आहे. के. शिवाजीराव होळकरावर 'न्हाणवली भादरल्याचा' आरोपांचा बेशक मारा करणाऱ्या 'भुत' 'गुराखी' विक्षिप्त' प्रभृति माजी पत्रांची संतति आज उमाप पिकलेली असल्यामुळें, आज २५-३० वर्षांनी होळकरांची होळी करण्याचा आलेला सिंहस्थ योग कोण धूर्त पत्रकार गमावून बसेल? ज्यांचे जीवनच कुचाळ्यांवर चाललेलें, त्यांना ही संधि म्हणजे अमूल्य पर्वणीच नव्हे तर काय? पण आपला हा मुख्य मुद्दा नव्हे. खून झाला आहे. त्याचा योग्य तो तपास लावून, मुद्दयापुराव्यानिशी गुन्हेगार ठरतील त्यांना शासन होणें आवश्यक आहे आणि तें काम सरकारच्या न्यायमंदिरांनीं योग्य रीतीनें केलेंच आहे. त्रयस्थ दृष्टीनें या भयंकर प्रकरणांतून आपल्याला काय बोध घेतां येईल तो पहावा, एवढाच या लेखाचा उद्देश आहे. यासाठीं या नाटकांतील प्रत्येक मुख्य पात्राचें स्वभावपरीक्षण व त्यांची परस्पर नातीं यांचा प्रथम विचार केला पाहिजे. या कामीं लागणारा तपशील अनेक वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेल्या माहितीवरूनच घेतला आहे. बाजारगप्पांवर विश्वास ठेवणें योग्य होणार नाहीं जिच्यामुळें हे लव्हाळें नाटक रक्तलांछित झालें ती नायिका.

मुमताझ बेगम उर्फ कमलादेवी

नाव सोनुबाईं आणि हातीं कथलाचा वाळा असें या नायिकेचें, नव्हे, नायकिणीचें चारित्र्य आहे. जिच्या उज्वल चारित्र्याची कीर्ति अजरामर करण्यासाठीं जगविख्यात ताजमहाल आजहि यमुनेच्या तीरावर उभा आहे. ती शहाजहान बादशहांची मुमताझ कोणीकडे आणि ही चटोर गांवभवानी कोणीकडे! नखरेलपणाच्या जादूनें श्रीमान तरुणांना भुरळ घालून आपली पोतडी भरणाऱ्या ज्या

उलट्या काळजाच्या धाडसी स्त्रिया (Adventiuress) असतात, त्यांतलीच ही एक छिनाल तरुणी आहे. हिच्या आईप्रमाणें हिला गातां नाचता येतें की नाहीं, हें आम्हांला माहीत नाहीं; पण आज तरी या महामायेनें तिघांना फांसावर, चौघांना हद्दपार करून अनेक मोठमोठ्या लोकांना रडत नाचावयास लाविलें आहे खास. जात्याच वेश्या-खाणींतली हिरकणी असल्यामुळें 'ही कामाची तलवार, करिल ज्या वार, ठार तो समजा' हे प्रत्यंतर कधीं काळीं येणारच येणार, हें होळकर महाराजांना य बावलाला कळू नये, या धुंदीलाच प्रेमाची आंधळी कोशिंबीर म्हणतात. जिच्या प्रेमाची सरकगांठ फक्त लाखों रुपयांच्या जडजवाहिऱ्यांच्या डबोल्याला चिकटलेली, तिला इमानाची ती पर्वा काय? 'एकवरि मन ठेउनिं नेवें खूण करिती दुसऱ्याला' असल्या वृत्तीच्या साहसी स्त्रियांच्या प्रेमपाशाचे फास धनकनक-संपन्न तरुणांच्याच गळ्यांत अचून पडत असतात. असल्या फासांत काश्मिरचे हरिसिंग, इंदोरचे तुकोजीराव किंवा इतर धनाड्यांनी न अडकावें तर कोणी? मुमताझच्या तारुण्याची कळी होळकरांच्या राजवाड्यांतच प्रथम उमलली, आणि तेथेंच ही बेगम कमलादेवी बनून महाराजांच्या प्रेमालिंगनास पात्र झाली, सर्वसामान्य नर्तकी नायकिणीच्या अपेक्षे पेक्षाहि हा राजाश्रय मुमताजला पुष्कळच किफायतशीर झाला असावा असें मानण्यात चिंता नाहीं. पण बोलून चालून वेश्येची अवलाद! तिचा पाय एक ठिकाणी कसा ठरणार? वेश्येच्या बाबतींत निष्ठेचा किंवा इमानाचा प्रश्नच येत नाहीं. होळकरांची स्वारी दौऱ्यांवर असतांना कांहीं गुप्त बातबेत ठरवून ही कमलादेवी दिल्लीच्या स्टेशनांत महाराजांच्या क्षीरसागरी आश्रयाचा त्यागा करून पळाली आणि अखेर मुंबईस येऊन बावला नामक एका धनाढ्य खोचा तरुणाच्या गळ्यांत पडली. ती आपले पूर्वचरित्र विसरली आणि आतां उघड माथ्याची गांवभवानी बनली. मुमताज बेगमच्या प्रसिद्ध झालेल्या हिंदू पेहरांवातील पोषाखावरून ती कोणी मोठी उर्वशी मेनका रमा असावी असें मुळींच वाटत नाहीं. तारुण्याच्या सहजसिद्ध टवटवीवर 'एकनर औरत तो दस नूर कपडा' यापेक्षां आकर्षक कांही दिसत नाहीं. तरी पण तिनें आज आपल्या चवचाल प्रकृतीला बळी दिलेल्या व देऊ घातलेल्या नरमेधाची कल्पना डोळ्यांपुढे उभी राहिलीं कीं तिच्या राक्षसी आकर्षणाकडे साऱ्या जगाचें डोळे कां वेधूं नयेत? तिचा 'दिल्दार यार' बावला 'असता ओक्ष'ठार व्हावा अशी तिची इच्छा असणं केव्हाहिं शक्य नसलें, तरी तिच्या कृतकर्मीचा बिपाक केव्हां नां केव्हां असाच व्हावा, एवढी तरी तिची व खुद्द बावलाची कल्पना नव्हतीच असें मात्र नव्हे, सारांश-

मुम्ताज बेगम चरित्रं अपूर्व साचें।
ते भाग्यलेखन विचित्रचि बावलाचें।।
त्या चारचक्षु नृपराज नरोत्तमाते।
ज ना कळे, कुठुनि तें जड पोलिसातें।।

पोलीस येऊन जाऊन खुनी इसमाचा शोध लावून त्यांना न्यायाधीशांकडून शासन करवतील. पण मुम्मताजच्या चवचाल प्रेमाच्या आडाख्यांचे रहस्य-शोधन तें करणारे नाहींत. तें त्यांचे क्षेत्र नव्हे. ते त्यांचे कर्तव्य नव्हे.

हतभागी बावला

एखाद्या अपघातामुळे किंवा हृदयद्रावक मृत्यूमुळेंच प्रसिद्धीस येण्याचें ज्या व्यक्तींचे नशीब असतें त्यांपैकीं बावला ही एक तरुण व्यक्ती होय. बावलाचा खून झाला नसता तर या क्षुद्र व्यक्तीला कधीच

कांहीं महत्त्व आलें नसते. बावला मुंबई म्युनिसिपल कारपोरेशनचा सभासद होता. म्हणजे एवढ्यावरू तो मोठा विद्वान, जनहितकर्ता आणि लोकप्रिय फिरोजशा मेहता होता असें नव्हे, संपत्तीच्या जोरावर वाटेल तो ऐदी रेम्याडोक्या कारपोरेटर किंवा कौन्सिलर होऊ शकतो. मुन्सिपालट्या, लोकल बोर्डे किंवा कौन्सिलें यांत केवळ पैशाच्या जोरावर व्हट्ट मिळवून घट्ट बसलेले शेणाचे मठ्ठ गोळे कोणाला काय दिसत नाहींत? असलाच हा एक मठ्ठ गोळा होता. मुंबईत तर याचें नांव बहुजनसमाजाला खून झाल्यावर कळलें. केवळ नुसती श्रीमंती ही कांही बावलाच्या थोरवीची विमापॉलिसी नव्हे. कदाचित तो मोठया व्यापारी असेल, त्याच्या जातींत मोठा वजनदार असेल. अथवा कारपोरेशनच्या क्लबांत तो मोठी जॉली फ्रेंडही असेल. पण एवढ्यांनेहि त्याच्या थोरवींचें होणें नाही. तो एक श्रीमंत तरुण होता. बराच रगेल होता. कोणाच्या आगीदुगीत फारसा पडणारा नव्हता. अपलें काम, आपला दाम, आपली व्यसनें आबांत संभाळून मोटारी उडविणारा एक उमदा जवान होता. इतकेच. इंदौर सरकारला बगल मारून मुमताझ बावलाच्या बगलेंत घुसण्यापूर्वी त्यानं तिचा कोणत्या मुद्द्यावर स्वीकार केला असावा ? ती काय अशी मोठी अस्मानची परी होती, कीं शुद्ध प्रेमाची गंगाभागीरथी होती. कीं कोणी अनाथ अपंग होतीं म्हणून या धनाढ्याने तिला आश्रय दिला? मुमताझच्या स्त्रीधर्माचा सर्व इतिहास कळल्याशिवायच त्यानें तिला आपल्या उंबरठ्यावर घेतलें, या म्हणण्यांत कांही अर्थ नाही. असें होणेंच शक्य नाहीं. सद्गुणांप्रमाणेंच दुर्गुणांतहि एक प्रकारची चुरशीची अहमहमिका असतें. राज्यक्रांती घडविणाऱ्या वीराला जसें वाटते कीं मी अमक्या तमक्या राजाची राजधानी हस्तगत केली, त्यांची गादी मी पटकावली, त्याचप्रमाणें वेश्यागमनी लोकांतहि अमक्या तमक्याची रखेली मी पटकावली म्हणून गर्व वाहण्याची एक आसुरी अहमहमिका असते. ही बहुधा बिनधोक पचलीं जात नाहीं. तिच्यापायीं खुनासारखे प्राणींतिक प्रकार अनिवार्यच असतात, हे न समजण्याइतका बावला खरोखरच बावळा असावा काय? होळकर सरकारला फसवून पळून आलेली मुमताझ आपल्या घरांत घेतांना, वरील आसुरी अहमहमिकेने बावला जरी क्षणभर फुरफुरला असला, किंवा तिच्या बरोबर असलेल्या लाखी डबोल्याच्या वासाला भुरळला असला, तरी या महामायेच्यामुळें पुढें मागें आपणांवर काही संकट येणे शक्य आहें की काय, याचाहि ज्याला कांही विचार सुचला नाहीं, किंवा सुचला असल्यास ज्यानें जुमानला नाहीं, तो बावला एक तर मुमताजप्रमाणें धाडसी धूर्त असावा, नाहींतर मूर्ख असावा, यापेक्षां तिसऱ्या कोणत्या संज्ञेत त्याला बसवितां येईल? असेंहि म्हणतात कीं मुमताजला बावलानें आश्रय दिल्यापासून त्याला धमक्यांची अनेक पत्रें येत होतीं. पण तीहि त्यानें विचारांत घेण्याचें टाळलें. यावरून मुमताजच्या जिवाला जीव देण्याचा त्याचा आसुरी अहमहमिकेचा निश्चय वज्रप्राय दिसतो. अर्थात असल्या व्यभिचारी लफड्याचा होणारा तीच अनिवार्य परिणाम झाला आणि मुमताजच्या जिवासाठीं बावला आपल्या जिवाला मुकला! विषाची परीक्षा पाहणाराला मृत्यूशिवाय सुटका कोटली? सामान्य विचार करणारांना 'हें असें होऊं नये' असें वाटतें खरें आणि बावलाच्या दुर्दैवी प्राणान्ताबद्दल वाईटही वाटतें, पण खुद्द बावलाच जेथें काट्यावर धड टाकतो, तेथें तुम्हा आम्हा त्रयस्थांची ऐदी विचार काय कामाचा? सारांश, ज्याला आपण 'कल्चर्ड सोसायटी' (सुसंस्कृत समाज) म्हणतो त्याला न शोभेसें बावलाचें जे वर्तन होतं. बाह्यात्कारी जरी तो मुंबई म्युनिसिपालिटी कारपोरेशनचा सभासद होता, तरी त्याचें खासगी वर्तन निंद्य होतें, असें म्हणण्यास मुळीच प्रत्यवाय नाहीं. मुमताज त्याला

पचली असती, तर आतां उघडकीस आलेलीं त्याचीं व्यसन व व्यभिचार कृत्यें पैशच्या दमावर सफाईत झांकली गेली असती. मेल्या म्हशीला दूध फार या न्यायानें कोरून उकरून काढलेल्या त्याच्या कांही गुणांचे पोवाडे गाणें स्तुतिपाठकांना भागच आहे. पण सामान्यत: इतर रंडीबाज माणसापेक्षां बावलाला संस्कृतीच्या बाबतींत फारसे अधिक मार्क मिळणं शक्य नाहीं.

या नाटकांतले तिसरे आणि विशेष निंदेला पात्र झालेलें, किंबहुना कांही हुल्लडखोर पोटभरू पत्रांना किफायतशीर झालेलें पात्र म्हणजे श्रीमन्महाराज तुकोजीराव होळकर हे होय. सेशन कोर्टांत आतांपर्यंत झालेल्या उलट सुलट छाननींत, श्रीमंतानीं मुमताजला दिलेल्या राजवैभवी आश्रयापेक्षां त्यांचा अधिक कसलाहि दोष सिद्ध झालेला नाहीं. ज्यांना राजवैभवाची कल्पनाच नाहीं, राजेलोकांच्या राहणीची माहितीच नाहीं ज्याचा सारा जन्म येरे दिवसा भर रे पोटा अशा दलामलीतच जाणारा त्या लोकांना होळकरांनी मुमताजला दिलेला आश्रय 'दोष' वाटणे साहजिकच आहे. होळकरांनी मुमताजला काहीं पट्टराणी बनविली नव्हती राजे लोकांच्या दिमतींत कितीक तरी अशा मुमताजा पडलेल्या असतात. ज्यांचे जोडे पुसणाऱ्या हुजऱ्यांच्या हातांत सोन्याचे तोडे झळकतात, ज्यांच्या शौचकुपाच्या झाडूला विशेष आनंदाच्या प्रसंगीं हजार हजार पांच पांच हजार रुपये केवळ बक्षिसादाखल मिळतात, त्यांनी मुमताजसारखीला लाखों रुपयांच्या जवाहिरांत गर्द गाडली तर त्यांत विशेष तें काय? मात्र, जिचा जन्मच नुसता सैंय्याभैंय्यावर जायचा, तिला दैवयोगानें होळकरांचा आश्रय 'विशेष'वाटणे साहजिक आहे. परंतु राजवैभवी क्षेत्रांत या गोष्टीला कसलेंहि महत्त्व नाहीं. खालसांतल्या लोकांना आज राजवैभवाची कसलीच कल्पना नसल्यामुळें, एखाद्या महाराजाच्या पायांत रत्नजडित चढाव पाहतांच 'संपत्तीचा हा शुद्ध सत्यानास' वाटून संतापाने घेरीहि येईल. राजेलोक जेवायला बसलें कीं ताटांत वाढलेल्या अनेक उंची पक्वान्नांना नुसता स्पर्श करून उठतात, तर दररोज सांजसकाळ मुदपाकखान्याचा शेंकडों रुपयांचा खर्च त्यांना 'फाजील उधळपट्टि'हि वाटणें अगदीं साहजिक आहे. गव्हर्नर व्हाइरायादि आंग्रेजी देवांचा थाट तर याहिपेक्षां शतपट लाखी लखाखीचा असतो. राजे गव्हर्नर व्हाइसरायच आंबटवरणभात खाऊन खादी पांघरु लागले तर सामान्य प्रजा आणि राज्यकर्त्यांत भेद तो काय राहिला? सारांश, लाखी जवाहिराच्या ढिगांत चमकणारी मुमताज सर्वसामान्य माणसांना मोठी चटकचांदणी दिली, तरी होळकरांच्या राजवैभवी क्षेत्रांत त्यांच्या दिमतीला असलेल्या शेकडो परिजनांच्या मानानें 'दर्यामे खसखस' इतकेंच महत्त्व फार झालें तर तिला मिळेला. मुमताज जात्या स्त्री असल्यामुळें स्त्रीदाक्षिण्याची खरी खोटी घमेंड मारणाऱ्या पुरुषांना तिची बाजू घेऊन होळकर सरकारची यथास्थित नालस्ती करतांना, या महामायेच्या उलट्या काळजाचें विस्मरण झालें नसतें तरच मोठे आश्चर्य वाटतें. पत्नि असो वा रखेली असो, तिच्याविषयीं एक प्रकारचा आपलेपणाचा विश्वास परिचयानें परिणत होत असतो, हा विश्वास पति किंवा पत्नि अथवा यजमान आणि रखेली यांपैकी कोणीहि एकानें दुखावला तर त्याचें पर्यवसान पुष्कळ वेळां सुडांत होतें. कोणत्याहि सेव्यसेवक भावनेंत हाच प्रकार असतो. शिवाजीच्या अमदानींत प्याद्याचा फर्जी झालेला हिरोजी फर्जंद संभाजीशीं लवमात्र बेइमान होतांच त्याला संभाजीने चिपळूणाहून पकडून आणून ताडकन् हत्तीच्यां पायाखाली चिरडून ठार केला. मुमताज ही एका क्षुद्र कलावंतीणींची पोर. कलावंतिणी राजदरबारांत ठेवण्याचा प्रघात होळकरांनीच नवीन पाडला असें नाही. दरबारांतल्या निवडक कलावंतिणींनी आजपर्यंत शेकडों राजांचा रेखेलीपणाहि पटकाविल्याचीं

उदाहरणें आहेत. होळकरांचा आश्रय न मिळतां तर ही चटकचांदणी मुमताज दैवाची परासीमा गांठली तरी गांवभवानीपेक्षां अधिक महत्वांस चढली नसतीं. होळकरांचा आश्रय मुमताजला इतका अपूर्व वाटला कीं हा कायमचा टिकतो कसा याची तिला चिंता उत्पन्न झाली व मिळालें आहे तेवढे घबाड घेऊन पसार व्हावें इकडे तिचें लक्ष लागलें. या निमित्ताने या उलंट्यां काळजाच्या महामायेनें केलेले उपव्याप व गुप्त कट कधीतरीं मुद्दा पुराव्यानिशीं जगापुढें येतीलच येतील, अशी आम्हांला खात्री आहे. स्वदेशी राज्यांत अजुनहि अनेक कच्च्यापक्क्या गुणांची बूज राखली जाते. त्याप्रमाणें मुमताज होळकरी आश्रयात 'कमलाबाईसाहेब' बनली. परंतु दैववशात् हातीं लागलेले लाखों रुपयांच्या जवाहिराचे घबाड पचविण्यासाठी तिने अनेक युक्त्या-प्रयुक्त्या लढवून, अखेर ती होळकरांच्या अन्नाशी बेईमान झाली व त्यांना दगा देऊन पळाली. विश्वासाचा घात केला, दिलेल्या मानाची मान कापली आणि आपला निसर्गसिद्ध बाजारबसवेपणा सिद्ध केला. इंग्लंडात हरिसिंग यांना कारस्थानी लोकांच्या जाळ्यांत पकडून लाखों रुपये उपटण्याचा कट रचणारी हलकट रंडी रॉनिबनसन आणि ही पाताळयंत्री मुमताज या दोघी एकाच सूत्रगोत्राच्या अवलादी आहेत. रॉबिनसन केसमधें सर हरिसिंग यांचा कांही दोष कोरून उकरून काढलाच तर हाच म्हणता येईल कीं त्यांनी मिसेस रॉबिनसनला रखेली ठेविली. होळकरांचीहि एवढीच चूक की चेहऱ्यामोहऱ्यानें मोहक दिसणारी ही छटेल मुमताज रखेली ठेवून दिली. यापेक्षां अधिक काय आहे? रखेल्या ठेवूं नयेत, हें तत्त्व चांगलें खरें. पण कोणी ठेवल्याच तर त्या रखेलीनें विश्वासघात करावा हें तरी माणुसकीला किती शोभतें? रखेल्या ठेवण्याची पद्धत अजूनहि पुष्कळ रूढ आहे. बेळगांव धारवाड कर्नाटक गोमांतक इकडे तर 'रांड ठेवणें' हें सभ्यपणांत मोडतें. नवीन विचारांच्या प्रगतीमुळे हा सभ्यपणा कोणी पूर्वीप्रमाणें फारसा बोलून दाखवीत नसलें तरी ही रूढी आहे तशीच बिनअटकाव चालू आहे. इकडे मुंबई पुणें प्रांतांत हा व्यवहार नाना प्रकारच्या सोंगाढोंगाखालीं चालू आहेच. रंडीबाज लोक बऱ्याच लघळ लांब जिभाचे असल्यामुळें कोणी आक्षेप घेतांच ते नाकाला जीभ लावून चटकन मोकळे होतात, एवढेंच. सारांश, रखेल-बाजी ही कोणत्या ना कोणत्या रूपांत सर्व काळीं सर्व ठिकाणीं रूढ होती, आज आहें आणि जोपर्यंत मानवांच्या भावनांत आमूलाग्र विलक्षण क्रांति होणार नाही तोपर्यंत पुढेंहि ती तशीच चालू राहणार. मग संपत्तिमान लोकांना व स्वयंनिर्णयी राजांनाच तिचे वावगें कां म्हणून असावें? श्रीमंतच वास्तवीक रखेल्या ठेवूं शकतांत व पोसूं शकतात. हातावर मिळवून तळहातावर खाणाऱ्या पोटार्थ्यांचा तो प्रश्नच नव्हें. नीतींचीं तत्त्वें कांहीहि असली तरी लव्हाळ्याचें त्रांगडेंच असें मोठे विलक्षण आहे कीं त्यापुढें ब्रह्मदेवाच्या अकलेची सुद्धां टाप चालली नाहीं, मग मनुस्मृतीला कोण भीक घालतो? आणि पोटार्थी पुराणिकाच्या पापपुण्याच्या पुराणांना पुसतो कोण? 'अव्यवस्थित व्यवहारापेक्षां विवाह बरा' हें सूत्र मान्य झालें कीं 'गुप्त व्यभिचारापेक्षां उघड रखेली बरी' हे सूत्र व्यवहारांत तरी निदान फारसें निंद्य ठरणार नाही. शेकडों विधवांना व कुमारिकांनाहि पंढरपूरच्या वारकरणी बनविणारे हजारों नराधम आज हिंदू समाजांत प्रतिष्ठितपणे वावरतांना काय कोणाला माहीतच नाहीत? होळकर किंवा हरिसिंग यांच्यावर टीकेचा भडिमार करणारे शहाणे स्वत: तरी नीतीमत्तेचे निष्कलंक पुतळे आहेत काय? वर्तमानपत्राचा संपादक बनतांच त्याच्या शेकडों निंद्य कृष्णकृत्यांवर छापखान्यांतल्या शाईचा काळ पडदा पडतो आणि 'सारे खून माफ' झालेला हा प्राणी 'केवळ पोटासाठी'नीतिमत्तेच्या ढोंगाने वाटेल त्यावर लूत लागलेल्या कुत्र्याप्रमाणें भुंकण्यास समर्थ

ठरतो, असें समजण्याचा काळ अजून आलेलां नाहीं, पुढे कदाचित् आलाच तर या ढोंगी तत्ववेत्त्यांना भर तिव्हाट्यावर जोडे, पैजार करायला विवेकी जनतेला फाटक्या पायतणांचा तुटवडा खास पडणार नाही. तात्पर्य मुमताजला होळकर सरकारने आश्रय देण्यांत, पोटभरू पत्रकर्त्यांकडून आपल्या बेचाळीस पितरांचा उद्धार करून घेण्याइतका मोठा भयंकर अपराध केला आहे, असे मुळीच नाही. श्रीमन्महाराज तुकोजीराव होळकर हे आपल्या अफाट इंदोर संस्थानांत अत्यंत लोकप्रिय असे नृपति आहेत. लोकांची त्यांच्यावरील श्रद्धा व प्रेम वर्णनीय आहे. गांव तेथे महारवडी आणि घर तेथें शेतखाना या नियमानुसार महाराजांचेच अन्न खाऊन त्यांच्या तळपटाचे चिंतन करणारे कांही भिक्षुकी अड्डे खुद्द इंदोरात आहेत. नाहीं असे नाहीं. पण एकंदर लोकसंख्येच्या मानानें या कृतघ्न कारस्थान्यांची संख्या मूठभर म्हटली तरी चालेल. मागें चार पांच वर्षांपूर्वी एका इरसाल भटाने असेंच एक 'बलात्कारें ब्राह्मणी भोगिली'चें काहूर महाराजांविरुद्ध बॉम्बे क्रॉनिकल पत्रांत उठविलें होतें. त्यावेळचे संपादक आग्यावेताळ हॉनिमन यांनी तर त्यापराचा भयंकर कावळा केला. भिक्षुकशाही छावण्यांत तर एकच सूर वाहूं लागला कीं हॉनिमनाची चार पाच सणसणीत आर्टिकले फडकली की-

इंदोर संस्थान खालसा झालेंच!

स्वर्ग अगदी दोन बोटे उरला. पण इतक्यात इंदोरच्याच प्रजाजनांनीं अक्रारविक्राळ विराट स्वरूप धारण करून सर हुकूमचंद शेटजींच्या सुखानें 'मुद्यापुराव्यानिशी कोण मायेचा पूत पुढें येत असेल त्यानें यावे' असे दणदणींत आव्हान देतांच सर्व भिक्षुकी कारस्थान ठिकच्या ठिकाणीं थंडगार! असें कोणतें ब्राह्मणेतर संस्थान आहे कीं ज्याचें तळपट उडविण्याच्या कामीं भिक्षुकांनी व भिक्षुकी पत्रकारांनी आपल्या कारस्थानी अकलेला तणावे दिले नाहींत? सातारच्या प्रतापसिंह छत्रपतीला यांनीच नाना प्रकारचीं कुलंगडी उपस्थित करून कायमचा उखडला. कोल्हापुरच्या राजावर या राजापूरच्या कोल्ह्यांची तर केवढी वक्रदृष्टी! बेळगांवच्या नामदार बेळवींनीं एका कुळकर्णी परिषदेंत सांगितले "In Kolhapur no Man's life or wife is safe" (कोल्हापुरांत कोणाहि माणसाचा जमाना किंवा जनाना बिनधोक नाहीं.) तर आमच्या केसरी दादानीं पांचजन्य ठोकला कीं ''पहा हो पहा. हा शाहूमहाराज स्वराज्यद्रोही छत्रपति आहे.'' यापेक्षां निंदेचा व शिव्याश्रापाचा कडेलोट कडेलोट म्हणतात तो कोणता? बडोद्यास ऐतखाऊ भटांची खिचडीं बंद केली तेव्हां सयाजीरावांवर केवढा गहजब! २५-३०वर्षांपूर्वी कै. शिवाजीराव होळकरांवर उठलेलें भिक्षुकी काहूर पुष्कळांच्या स्मरणांत असेलच. आज तुकोजीरावांची बेलगाम निर्भत्सना करणाऱ्या पोटभरू भिक्षुकी पत्रांतल्या हलकट चित्रांशीं व पोरकट लेखांशी ते ताडून पाहिलें, तर स्वदेशी राजांची अवहेलना करून त्यांच्या निंदेवर आपली लोकमान्यता सांवरण्याची ही एक अखंड भिक्षुकी परंपराच आहे असें स्पष्ट दिसून येईल. शिवाजीराव होळकरांच्या वेळीं मुंबईस आवसेपौर्णिमेला अवतरणारें फाटकांचे भूत, १८९२ ते १८९६पर्यंत मुंबईला 'सोनेरी टोळी' नांवाखालीं धुडगूस घालणाऱ्या पटाईत लुटारू कंपूंतल्या भाट्यांचा गुराखी व विक्षिप्त हीं पत्रें म्हणजे आजच्या मौज चाबुक वगैरे पाचकळ पत्रांचे पूज्य पित होत. एका ब्राह्मण न्हाणवलीची मिरवणूक चालली आहे, शिवाजीराव ती न्हाणवली पकडीत आहेत व न्हाव्याकडून तिचे केस भादरीत आहेत, असलीं चित्रें 'इंदोरातील अत्याचार 'मथळ्याखालीं या पत्रात दर आठवड्यास प्रसिद्ध होत. त्याचप्रमाणें इंदोरांतील वकीलांकडून राजवाड्यासमोरची सडक उकरून तीवर खडी दाबण्यासाठीं वकीलांना टोणग्याऐवजीं मुन्सिपालटीच्या

रुळाला जुंपले आहेत. हळदकुंकवास जाणाऱ्या ब्राह्मण बायकांना शिवाजीराव भंग्याकडून खराट्यांचा मार देत आहेत. शेंकडों ब्राह्मणांच्या घरांवरून व देवळांवरून शिवाजीराव गाढवांचे नांगर फिरवीत आहेत. प्रजाजन जीव घेऊन स्टेशनावर भयभित पळत आहेत; भररस्त्यावर शिवाजीराव ब्राह्मणांच्या पगड्या भंग्यांच्या डोक्यावर व भंग्यांच्या टोपल्या ब्राह्मणांच्या डोक्यांवर चढवीत; इत्यादि हजारों अनन्वित काल्पनीक आरोपांची शिळा छापाची कार्टून चित्रें व तसल्याच धर्तीचे घाणेरडे लेख भुत गुराखी विक्षिप्तादि पत्रांतून एकसारखे प्रसिद्ध होत असत. शिवाजीराव होळकरांची ही भिक्षुकी निंदा अखेर त्यांच्या राजसंन्यासाला कारण झाली व कारस्थान्यांच्या नवसाला परशुराम फळला. ही एक चणचणित भवानी निंदन पत्रांच्या संप्रदायाला दोन अडीच तपांपूर्वी प्राप्त झालेली असल्यामुळें, महामाया मुमताजच्या पुण्याईनें आज हाताशी आलेली होळकर-उच्चाटनाची पर्वणी कोणता भिक्षुक पत्रकार गमावून बसेल? स्वराज्याचा, स्वयंनिर्णयाचा, स्वातंत्र्याचा सध्या केवढाहि हैदोस सुरू असला आणि या हैदोसांत भिक्षुकी वाघ सिंहाचा कितीहि थैमान असला, तरी कोल्हापूर, ग्वाल्हेर इंदोर बडोद्यासारखीं मोठमोठी ब्राह्मणेतर संस्थानें या स्वराज्यवाद्यांच्या डोळ्यांत वाळुप्रमाणें सलत आहेत, ही गोष्ट बहुजनसमाजाला व खुद्द ब्रिटिश सरकारला आतां पूर्ण माहीत आहे. त्याचप्रमाणें ीतिदाक्षिण्याचा मोठा आव आणून स्वदेशी राजांच्या अनीतीचे वाभाडे काढणारे पत्रकारहि सामाजिक नीतिमत्तेच्या ताजव्यांत काय दर्जाचे आहेत, याचीहि माहिती जनतेला व सरकारच्या गुप्तपोलीस खात्याला मुळींच नाहीं, असें मुळींच नाहीं. टैग्मसारख्या आंग्लहितवादी पत्रांनी संस्थानबुडव्या डलहौसीचा हौशी सूर काढून स्वदेशी राजांच्या उच्चाटनाचा मंत्र म्हटला तर त्यांत कांहीं नवल नाहीं. तो त्यांना शोभून दिसेल. इतकेंच नव्हे तर स्वदेशी पत्रांनींच स्वदेशी राजांच्या आईमाईचा उद्धार करण्यांत मोठ्या अहमहमिकेनें पुढाकार घेतला तर ती सुद्धां आंग्लपत्रकारांना एक इष्टापत्तीच होत असते. राष्ट्रांतलेच लोक एकमेकांच्या पाडावाचा प्रयत्न करीत असतो, लाथाळीचा व गुह्यस्फोटाचा शिमगा खेळूं लागलें, तर नेतृत्वानंदात डुलणाऱ्या राज्यकर्त्यांना तो कपिलाषष्ठीचा योग का भासू नये? बावला खुनाच्या पहिल्या आर्टिकलात टेम्सनें तर एवढा मोठा गडगडाट केला की, 'या प्रकरणात कोणी एखादा स्वदेशी राजा जरी असला तरी त्याचाहि हिंदुस्थान सरकारनें मुलाजा राहू नये, असा आमचा आग्रह आहे.' मुमताजसारख्या छिनाल तरुणीच्या पायी बावलासारखी एक अप्रसिद्ध व्यक्ति कांही क्षुद्र माथेफिरू मारेकऱ्यांच्या हातून ठार मारली जातांत ओढून ताणून लावलेल्या संबंधांवर जर इंदौर संस्थान चेचण्याची अप्रत्यक्ष सूचना करण्याइतकीं ही अंग्रेजी पत्रें बेगुमान बनतात. तर पंजाबात निष्कारण कत्तली करणाऱ्या डायर ओडवायरच्या हिंदुस्थानांतल्या आंग्लाईबद्दल परराष्ट्रीयांनी असलेच उद्‌गार काढले तर टैम्स प्रसृतींना ते कितपत मानवतील? पण आंग्लराष्ट्रें असा राष्ट्रद्रोह कधींच करणार नाहींत. स्वार्थासाठीं तीं एकमेकांशी कितीहि झगडलीं, तरी परकीयांपुढें आपलीं गुह्यें कधींच प्रगट करणार नाहींत. थोड्याच दिवसांपूर्वी लंडनांत खुद्द राजघराण्यांतिल एका राजपुत्राचें लव्हाळें लफडें उपस्थित झालें होतं. पण इंग्लिश जनता कडवी स्वाभिमानी असल्यामुळें आत्मद्रोही गुलाम हिंदूप्रमाणें त्यांनी या प्रकरणाचा, प्रस्तुत होळकर-निंदेच्या गलिच्छ शिमग्याप्रमाणें. पराचा कावळा न करतां. ती बातमी उगाच नांवाला एका कोपऱ्यांत अस्पष्ट. भाषेंत प्रसिद्ध करून ठिकच्या ठिकाणीं दडपून नामशेष केली.

गुलाम हिंदूंना स्वाभिमान नाहीं.

महाराष्ट्रीयांनी स्वाभिमानाची प्रथम होळी केली तेव्हांच त्यांचे स्वराज्य सरणारवर चढलें. आज स्वराज्याचा स्वातंत्र्याचा आणि स्वयंनिर्णयाचा केवढाहि डांगोरा पिटला जात असला; तरी त्यांत स्व कोठेंच नाहीं. गुलामगिरींत पिचत असतां पक्षभेद पंथभेद जातिभेद इत्यादि भेदांचा नरक चिवडण्यांतच आपल्या उरल्यासुरल्या अकलेची धुळवड शेणवड खेळणाऱ्यांना स्वाभिमान ही चीज पारखीं असल्यास काही आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. आपलेपणाची आमची जाणीव मेली आहे. वैयक्तिक स्वार्थापुढें प्रत्यक्ष स्वकीयांच्या व स्वदेशियांच्याहि अब्रूचा होम करण्यास निरढावलेल्या माणसांत माणुसकीचा अंश तरी सांपडणे शक्य आहे काय? महाराष्ट्रीयांचा स्वाभिमान जर जागृत, असता त्यांच्यांत आपलेपणाचा ओलावा असता आणि केवळ टीचभर पोटाच्या खळगीसाठीं परक्यांना चहाड्या चुगल्या सांगून आत्मद्रोही घरभेदाचा भिक्षुकीपणा त्यांनी केला नसता, तर आज ते इंजेजी असता राजसत्तेच्या पायांतली खेटरें व त्यांच्या नोकरांच्या हंटरखाली शिस्तीच्या गोणी वहाणारी गाढवें झालेच नसतें. महाराष्ट्रांतला इग्रेंजीं राज्यसत्तेचा पाया महाराष्ट्रीयांच्या घरभेदावर आणि आत्मद्रोहावरच उभारलेला आहे. ही इतिहाससिद्ध गोष्ट धडधडीत डोळ्यांपुढें असूनहि जर आम्हांला अझुन एकमेकांना खाली ओढण्याची आसुरी प्रवृत्ति दाबून टाकतां येत नाहीं, तेव्हां आमची अवनत मनोवृत्ति किती सडून कुझुन गेली आहे. हें न दाखवितांहि सिद्ध होण्यासारखें नाहीं काय? सारांश, स्वकियांच्या व स्वदेशियांच्या निंदा नालिस्तीवर पोट भरण्याची प्रवृत्ति हेंच सुचवितें कीं हिंदू लोकांना मुळी स्वाभीमानच (Self respect) अर्थात् कदरबाज व स्वाभिमानी इंग्रजी राजसत्तेचा वरंवटा फिरून खालसा झालेल्या गुलामांना स्वयंशासित स्वदेशी राजांचा तीव्रद्वेष व बदनामी करण्यांतच होणारा आनंद आसुरी व आत्मद्रोही प्रवृत्तीचा द्योतक आहे. या द्वेशांत व बदनामींत सत्यप्रियतेचा अन्यायाच्या तिटकाऱ्याचा कितीहिं दिखाऊ मालमसाला घातल्याचा बहाणा निंदक करीत असले, तरी ज्यांना या निदंकांच्या चारित्र्याचा सुळसुळासकट तपशील पूर्ण माहीत आहे, त्यांना हा बहाण्यांतले ढोंग समजत नाहीं असें नाहीं. तात्पर्य, नीतिदाक्षिण्याच्या सबबीवर होळकर सरकारची विटंबना करणाऱ्या पोटभरू पत्रांचा चालू असलेला शिमगा म्हणजे सैतानांचा बायबलपाठ होय. या सैतानांचा नुसता नामनिर्देश करणें म्हणजे नरकांत धोंडा टाकून आपल्या आंगावर घाण उडवून घेण्यासारखें आहे, हें महाराष्ट्रांत आज तरी कोणाला नव्यानें सांगण्याची जरूरीं नाहीं. बावला खुनाचें प्रकरण उपस्थित झाल्यापासून तों खुनी लोकांना शिक्षा होईपर्यंत महाराष्ट्रांतल्या यच्चयावत पत्रकारांनी मौन धारण केले असतां, मौज व चाबूक या दोन छिनाल वाङ्मयप्रसारक पत्रकारांनीं होळकरांची निर्भत्सना व बीभत्स् विटंबना केली, म्हणून या दोन विवेकच्युत संपादकांना महाराष्ट्रांत एक तरी विचारवंत सत्यप्रियतेचें व नीतिदाक्षिण्यांचें सर्टिफिकीट देईल, असें आम्हांला वाटत नाहीं. मयत 'भूत' 'गुराखी'च्या 'विक्षिप्त' पणाची घाणेरडी भिक्षुकी परंपरा चालवून, इतिहासाची पुनरावृत्ति घडवून आणल्याचा कितीहि आसुरी आनंद या पत्रकारांना होत असला, आणि आचकट विचकट अशा हलेकट वाङ्मयप्रसारावर त्यांनी आपल्या पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यांत कितीहि कौशल्य दाखविलें असलें, तरी महाराष्ट्राच्या सामाजीक धार्मिक राजकीय व विशेषत: नैतिक क्षेत्रांत या ''मौज'' व ''चाबुक करयाचा भाव काय आहे? स्वत:च्या नीतिभ्रष्टतेचा व सामाजिक नालायकीचा तिळमात्र विचार न करतां, केवळ 'मी पत्रकार आहे' एवढ्यांच भांडवलावर या पत्रांनीं

वाटेल त्याच्या अब्रूवर निखारे ठेवून, त्यावर आपल्या उदरनिर्वाहाचें पापड भाजीत सुटावें, ही गोष्ट त्यांना व्यक्तिश: तर बेशरमपणाची आहेच, पण मराठी 'जर्नालिझम'ला अत्यंत लांछनास्पद आहे. वाचकांना हें आता सांगायलाच नको कीं, कै. टिळकांचीहि बीभत्स विटंबना करण्यास न शरमलेले संदेशकार आज चाबूकस्वार असल्यामुळें आमच्या स्पष्टोक्तीबद्दल आमच्यावरहि आपल्या वाङ्मयट्रेनेजचा पंप सोडण्यास आतां कमी करणार नाहींत; आणि लवकरच प्रबोधनकार ठाकरे, चाबूक मौजेच्या गटारगंगेत आपादमस्तक हबकून चुबकून निघालेले सर्वांना दिसतील. नरकांतच घोडा टाकल्यावर आंगावर कांही उडालेंच तर आम्हाला तक्रार करण्याची किवा प्रत्युत्तर देण्याची कांहीच जरूरी नाहीं.

होळकर-विटंबनेचा हेतु

होळकरांच्या निंदेवर जगणारी पत्रें उघड उघड पोटार्थी. इंदोराहून कांही मलिद्याची पार्सलें जर या सज्जनांच्या पदरांच गुपचूप येऊन पडतीं, तर त्यांचा चालू असलेला शिमगा तेव्हांच बंद पडला असता, असें मानण्यास अवसर आहे. या शिमग्यांत अनीतीची चीड नाहीं, सत्याची चाड नाहीं, काही नाहीं. हा दिखाऊ दिमाख आहे. भुंक भुंक भुंकले की माणूस त्रासून जातो आणि भाकरीचा एखादा लठ्ठ तुकडा किंवा एखादे हाडूक पुढ्यांत फेकून कुत्र्याचा भुकभुकाट बंद पाडतों. एवढीच अपेक्षा या होळकर निंदकांची दिसते. पण शुन: कपाले लगुडप्रहार:' हीच त्यांची योग्य संभावना, हें ते विसरतात. मागें कोल्हापुरच्या महाराजांच्या गुप्त दानानें संदेशचें तोंड बंद झाल्याचा गवगवा पुष्कळांच्या स्मरणांत असेलच. प्रस्तुत लेखकानें खुद्द छत्रपतींना त्याचा खुलासा विचारला असतां ते म्हणाले, ''हें एक जंतरमंतर आहे. कोणी काहीं बरे वाईट लिहिले म्हणून माझ्या आंगाला काहीं खांडके पडत नाहींत. हें पहा, Money makes the margo अशी इंग्रजीत एक म्हण आहे. पण मी पैशानें घोड्यांचीच नव्हे तर माणसांचीसुद्धा गाढवें बनवितो ती हीं अशीं!'' कै. शिवाजीराव होळकरांनी 'गुराखी'च्या भाट्याची तर फारच योग्य संभावना ठेवलीं. फर्स्ट क्लास प्रवासखर्च पाठवून त्याला इंदोरास आमंत्रण दिलें. भाट्याला वाटले कीं माझा शिमगा फळाला आला. खुद्द शिवाजीराव जातीनें स्टेशनवर सामोरे गेलें. हे गाडीतून उतरतांच वेटिंग रूममध्यें नेऊन हंटरखालीं यथास्थित चोप देऊन परत मुंबईला रवाना केलें. शुन! कापाले, लगुडप्रहार हाच होळकरी मलिद्याचा 'मेन्यू' हें मौज चाबुककर्त्यांनी लक्ष्यांत ठेवावें. सारांश श्रीमंत तुकोजीराव होळकरांचे निंदक माजीं गुराखी भूत प्रभृतींचे सांप्रदायिक आहेत, एवढें लक्षांत ठेवलें म्हणजे त्यांच्या छिनाल शिमग्याला काय किंमत द्यायची ती विचारवंतांना सांगणेंच नको. काश्मिरचे सर हरिसिंग आणि इंदोरचे श्रीमंत तुकोजीराव यांच्यावर दुसरा असा एक आक्षेप घेता येईल कीं लक्षावधि प्रजाजनांच्या सुखदु:खाची जबाबदारी यांना पार पाडावयाची असल्यामुळें, सामान्य माणसाप्रमाणें यांची बुद्धि कमकुवत व दृष्टि आकुंचित असतां कामा नये. ज्यांना रॉबिनसन मुमताझसारक्या चंवढाळ नारी बोलताबोलतां फसवितात त्यांची बुद्धी तीव्र व दृष्टि धोरणी कशी मानावीरी? हे कशाचे मुत्सद्दी आणि डीप्लोमटस्? शंका बरोबर आहे. दोघेहि लव्हाळ्यांत सपशेल फसले. ही फसवणूक त्यांच्या कमजोर धोरणांमुळें झाली, असें जरी क्षणभर मानले, तरी एक गोष्ट विसरून भागणार नाहीं, कीं ते विश्वासघांताला बळी पडले. सर्व घात पत्करतात पण विश्वासघातापुढें कोणाची कांहीं अक्कल चालत नाहीं. मनुष्याचें सर्व व्यवहार विश्वासावरच चालतात. अशी कोणती गोष्ट आहे कीं जिच्या सांगतेसाठीं विश्वासाची तिळमात्र जरूर लागत नाहीं. एकहि आढळणार नाहीं.

आजपर्यंत ज्या मोठमोठ्या राजक्रांत्या झाल्या, त्यात पराजीत नृपतीला विश्वासघातानेंच धुळीला मिळविलें. एवढा मोठा न भूतो न भविष्यति विजयशाली नेपोलियन बोनापार्ट; पण त्याची सुद्धा अखेर विश्वासघातानेंच मान कापली गेलीं. विश्वासघातापुढें बृहस्पतीचीहि अक्कल ठार व्हायची, तेथे हरिसिंग होळकरांचा पाडाव काय? जेथें धडधडित विश्वासघात होत आहे, तेथें फसलेल्या मनुष्याची कींव केली नाहीं तर निंदा करण्यास मुळींच वाव नसतो.

मुमताझ महामायेचा थैमान

बावलाच्या खुनांत सुरू झाला आणि त्याची अखेर तिघांना फाशी व चौघांना हद्दपारी यांत झाला. याशिवाय धरपकड, तात्पुरती कैद, साक्षीपुराव्यांसाठीं हेलपाटगिरी, झडत्या, बाचाबाची, उलटसुलट तपासण्या वगैरे अनंत भानगडींत शेकडों लोकांची धुळपट निघाली, ती वेगळीच. शनिवार ता. २३ मे १९२५ रोजीं, सेशन कोर्टाने या थैमानाचा सर्व इतिहास तपासून, ज्यूरी व न्यायमूर्ती यांनी एकमताने कमाल कसोशीचा न्याय दिला. या न्यायामुळें फांसावर चढणाऱ्या तिघा आरोपींपैकी पोंडे व दिघे हे दोघे अगदीं भरज्वानीचे तरुण असल्यामुळें त्यांच्या दुष्कृत्यांची चीड आली तरी त्यांच्या दुर्दैवाबद्दल करुणा उत्पन्न झाल्याशिवाय रहात नाहीं. तारुण्याच्या उमेदीला विवेकाची दावणी (ब्रेक) नसली म्हणजे मनुष्याच्या हातून केवढें भयंकर दुष्कृत्य होतें, हें पोंडे व दिघे यांच्या चरित्रावरून स्पष्ट दिसून येईल. राजे लोक कशाने खूष होतात, याचा वास्तविक कोणालाच थांग लागत नाहीं, इतके ते बहुश: खोल मनाचे असतात. लोकसंग्रहाच्या बाबतींत ते प्रत्येक व्यक्तीची पूर्ण पारख करून त्याविषयीं आगाऊच आडाखा अजमावून ठेवतात. तरी बाह्यत: भल्या बुऱ्याला एकाच दावणीचा आश्रय देतात. त्यामुळें प्रत्येकाला असें वाटतें कीं महाराज माझ्यावरच विशेष खूष आहेत. पण खुद्दांचा आडाखा काही न्याराच असतो. कै. शाहू छत्रपती या लोकसंग्रहाविषयीं बोलत तेव्हां म्हणत ''आमची ही एक मेनेजरी आहे. येथें माणसांतले सर्व प्रकार आहेत. जनावरांत कोल्ह्यामाकडापासून तों सिंहापर्यंत जसे आमच्या संग्रही आहेत, तसेच मातृगमन्यापासून तों थेट अव्वल ब्रह्मज्ञान्यापर्यंतचीं माणसेंहि या मेनेजरींत आम्हाला ठेवावीं लागतात. ''मुमताझच्या थैमानांत फांशी जाणारे पोंडे दिघे व हद्दपार होणारा फणसे, या तिघांखेरीज बाकीचे लोक एकजात लोफड दिसतात. या सर्वांनी महाराजांच्या 'खुषी'चें कांही तरी काल्पनिक चित्र रंगवून त्यांच्या प्रसन्नतेवर स्वत:च्या ऐश्वर्याची परासीमा गांठण्यासाठीं हा गुप्तकट रचला आणि केवळ काठ्यावर धड टाकावी तशी अचाटबुद्धी चालवून बळेच लक्ष्मी मिळविण्याचा हा उपदव्याप केला, असे दिसून येतें. या गुप्त कटाचें बातबेत ठरवितांना धाडसी कृत्याचे सिनेमा चित्रपट त्यांना बऱ्याच अंशीं उत्तेजक व प्रेरक व स्फूर्तिदायक झाले असावे, असे अनुमान करण्यास पुष्कळ जागा आहे. अचाट धाडसाचें सिनेमा पाहतांना सर्वसामान्य माणसें आश्चर्य व कौतुक करतात. पण उमेदवार व महत्त्वाकांक्षी तरुणावर त्यांचा कसला भयंकर परिणाम होणें शक्य आहे, याचा विचारवंतानींच विचार करावा. बहुतेक धाडशी सिनेमा फिल्मांत लाखों रुपयाचें डबोलें, एक चटक चांदणी मुमताझ आणि तिच्या प्राप्तीसाठी धडपड करणारी कटवाल्यांची एक टोळीच असते. त्यांत मोटारी असतात, आगगाड्या असतात. गुप्त भाषेचे टेलिग्राम असतात. लग्नापूर्वी हुंडा हबकणारा शफी अहमद असतो, दिसेंबरात कॉलेज जॉइन करणारा पोंडे असतो. नाशिक रस्त्याने 'फ्रूटस' पाठविणारा 'तराणवाला' असतो, नूतनजान असते. मसणजान असते. सर्व कांहीं असते. बावलाचा

खून पाडण्यासाठी रचलेला हा 'मुमताजकट' म्हणजे नेहमी आपण पहातो तसल्या धाडशी कृत्यांच्या सिनेमापटाची हुबेहूब नक्कलच नाही काय? सिनेमाने करमणुकीच्या साधनांत कितींहि भर टाकलेली असली तरी त्याचेहि दुष्परिणाम समाजाला कसे भोगावे लागत आहेत ते पहा. सेशन कोर्टांत प्रत्येक मुद्द्याचा भूस न् भूस निघाला पण त्यांत 'मुमताझ ही होळकरांची रखेली होती. यापेक्षा अधिक कसलाहि पुरावा पुढें आलेला नाहीं. खुद्द महामायेच्या जवानींतहि तिनें याविषयीं एक अवाक्षर काढलेलें नाहीं. फणशाच्या जवानीवरून या सर्व कटाचा उगम, राजद्रोह व पैशाची अफरातफर या आरोपावरून इंदौरच्या तुरुंगात खडी फोडीत बसलेल्या शंकरराव गावड्यांतच असावा असे मानावयास पुष्कळ जागा आहे. अर्थात या कटात होळकर सरकारचा संबंध कसाबसा ओढून ताणून आणण्यात ऐदी गप्पीदासांना व बुभक्षित पत्रकारांना जरी मोठा दीर्घदृष्टीचा व मुत्सद्देगिरीचा भास होत असला, तरी तो चुकीचा गैरसमजुतीचा व बहुतांशी निव्वळ मत्सराचा परिणाम आहे यांत मुळीच शंका नाही. हुजऱ्यांचा हौसहोल्ड ऑफिसर बनलेला शंकरराव गावडे म्हणजे

इंदोरचा त्रिंबकजी डेंगळा

म्हटला तरी चालेल. प्याद्याच्या फर्जी बनलेल्या या प्राण्याच्या हालचाली श्रीमंत तुकोजीरावांना माहींत नसाव्यांत असें मानता येत नाही. नाकापेक्षां जड बनलेलें हें मोती एक जाडे धेंड होऊन बसले होतें. पण पापाचें माप भरताच होळकर सरकारनें या धेंडालाहि पेंड चारण्यास कमी केले नाही. लहानाचा थोर हुजऱ्यांचा खासगी कारभारी अशा महान् अधिकारावर चढविलेल्या शंकरराव गावड्यालाहि अन्यायाची परमावधि होताच. न्यायाच्या चरकांत बोलताबोलता ताडकन् चिरडून भरडून काढणारे होळकर सरकार, मुमताजसारख्या चटोर रांडरूसाठी शफी अहमद रिसालदार, मोटार ड्रायव्हर बहादूरशहा व अबदुल लतिफ असल्या लोफड लोकांच्या कटाला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मान्यता देतील ही कल्पना करणारे डोकें फाजील कल्पक म्हणून सांदीत टाकलेले बरे!

आतां अखेर ज्या महामाया मुमताज भवानीच्या छिनाल थैमानामुळे एक तरुण ठार मारला गेला तिघे फांसावर चढले, चौघे हद्दपार झाले. तिच्या बुद्धिवैभवाची काकड आरती करून हा निबंध समाप्त करू. जस्टीस * यांनी मुमताजविषयी असा अभिप्राय दिला आहे कीं, ''या मुमताजचे शिक्षण जरीं बेतास बातच असले तरी हीं जात्या कुशाग्र बुद्धिची असून तारतम्य जाणणाऱ्या डोक्याची (clear head) आहें. जिच्यापायीं इतक्या जणांची डोकीं मारली गेलीं ती बाईं डोक्याची नव्हें असें कोण म्हणेल? असा कोटकिस सहज कोणाला सुचला तर तो निव्वळ विनोद न ठरतां यथार्थ ठरेल. तब्बल दहा तास न डगमगतां जिने क्रॉस तपासणीत प्रश्नांची उत्तरे खडाखड न कचरता दिलीं त्या बाईची गणना सामान्यांत कोण करील? 'पट्टीस दे पावली' पैंकी साधीभोळी भावली ही खास नव्हें. होळकरी डबोले लांबविण्यासाठी प्रथमपासूनच ठिकठिकाणच्या पोलीस कमिशनरांना स्वसंरक्षणार्थ गुप्त अर्जं पाठवण्याची मुमताजची धोरणी कारवाई पाहिली कीं या महामायेच्या बुद्धिप्रभावाचें खरोखर कौतुक वाटतें. 'चाबूक' स्वार म्हणतात, इंदोरचे राजकारण म्हणजे रांड पण या रांडेला जी राजकारणी अक्कल आहे ती 'चाबूक'स्वाराला कळायला दहा जन्म घ्यावे लागतील. केवळ स्वार्थासाठी बेइमान

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द दिसत नाही.

होण्याची अवदसा जर मुमताजला आठवली नसती, तर याच तिच्या 'क्लिअर हेड'ची सर्वत्र तारीफ झाली असती. राजकारणी डावपेच लढवण्याइतकी चाणाक्ष बुद्धिमत्ता हिच्याकडे आढळल्यामुळेंच कदाचित श्रीमंत होळकरांनी या तरतरीत तरुणीला आश्रय दिला नसेंल कशावरून? पण अखेर ती आपल्या जातीवर गेली. म्हणूनच तिच्या सर्व बुद्धिवैभवाची आता काळीकुट्ट माती झाली. आईचा, सावत्र बापाचा आणि महंमदअलीसारख्या पोटभरू पागलांचा तिने आपल्याभोवतीं जो गुप्त गराडा घालून घेतला, त्यामुळेच तिला होळकर सरकारचा विश्वासघात करण्याची कुबुद्धि आठवली,आणि अखेर बाजारबसवेपणाची दीक्षा घेण्यातच तिच्या सर्व मनोरथांची अखेर झाली. जस्टिस क्रंप ज्युरीला म्हणतात, ''असल्या बाईच्या भोंवती (महंमद अल्लीसारखे) जे लोक जमा झाले होते त्यांत त्यांचा कांही उच्च उद्देश (High motive) असेंल असें मानतांच येत नाहीं. शिवाय मुमताझ आपल्या हातांतून निसटून बावलांकडे जावीं अशी तिच्या आईबापाची इच्छा असणेंहि शक्य दिसत नाही.'' यावरून मुमताज जात्या कितीहिं तरतरीत डोक्याची असलीं तरीं डबोल्याचे घबाड पचविण्यासाठीं तिनें आपल्या भोवतीं जमा केलेल्या जिवाच्या माणसांमुळेच तिचा जीव धोक्यात पडून आणखी आंठ जीवांचा जीव गेला! जिच्या तारूण्याच्या भर अमदानीला इतक्या भयंकर नरमेधाची आहुती पडली, तिचें पुढील आयुष्य कसें काय जाणार, हें -

तुज ठांवे ईश्वरा!

ॐ शांति: शांति: शांति:

□□□

अग्रलेख

घड्याळाची टक टक

रात्री १२ ची वेळ जिकडे तिकडे नि:शब्द शांतता. वारा वहात नसल्यामुळे झाडाचें पानसुद्धा हलत नव्हतें. मानसिक व्यग्रतेच्या गुलामांशिवाय आणि चिंतनमग्न विचारवंतांशिवाय सारे शहर गाढ झोपेत होते. मधून मधून रौंडाच्या शिपायाची पावले ऐकू येत होती. कुत्रीं सुद्धां भुंकत नव्हती. सारें जग दिवसाच्या श्रमाचा शिणभाग उतरण्यासाठीं स्वस्थ निजलें होते. पण भितीवरील घड्याळाची टकटक मात्र बिनतक्रार पद्धतशीर चालूच होती. सारें जग निजलें तरी घड्याळाला झोंप नाहीं. त्यानें दिवसा इमानें इतबारें नोकरी बजावली, तरी रात्रीं विसाव्याचा वाव नाही. एकसारखी एका दमात नोकरी सुरूंच. दर रविवारीं त्याला एकदां पोटभर चावीचें वेतन दिलें कीं आठवडाभर कामात खंड नाहीं. कधीं झोपेची डुलकी नाहीं. टिफिन अवरची सबब नाही. कामात अळंटळं नाहीं. कांही नाहीं. जेव्हां पहाल तेव्हां टकटक, टकटक, टकटक अव्याहत चालूंच आहे. उत्तरायण-दक्षिणायनाच्या सबबीवर सूर्यसुद्धा आपल्या हजेरीच्या वेळांत मागेंपुढें होतों; पावसाळ्यांत तर उशीरा कामावर येऊन लवकर घरी पळतों; पण घड्याळाला तीं संवय नाहीं. सूर्य लवकर उगवो; नाहीतर उशीरा उगवो, घड्याळाचे कालमापन अगदीं बिनचूक. उजेड असो वा अंधार असो. तुम्ही घरांत रहा नाहीतर टाळे ठोकून बाहेर जा. याचा टकटक क्रम अखंड चालूच असतो. तुम्ही त्याकडे पहा, नका पाहू; अमूक वेळ झाली म्हणून नियमित घंटा वाजवून ते आपल्या इमानाची साक्ष देण्यास कधीच चुकत नाही. तुम्ही त्याला खुंटीवर टांगा, भिंतीवर ठेवा, खिशात बंद करा, मनगटावर बांधा अगर अंगठीच्या कोंदणात जखडबंद करा. त्याचें इमान टकटक टकटक अखंड चालू असते. अपघाताने किंवा दुखण्याने धन्याच्या जीवन -घड्याळाची क्रिया जरी बंद पडली, तरी घड्याळ आपल्या टकटक सेवेला कधींच चोर होत नाही. डॉक्टरने तुम्हाला क्लोरोफॉर्म दिला अगर तुम्ही अवचित बेशुद्ध पडला; तरी सावध होताच अमूक तास, अमुक मिनिटे, अमूक सेकंद तुम्ही बेशुद्ध होता, हे सांगायला घड्याळच प्रथम पुढे येते. आपल्याला अमुक वेळेला उठावयाचे आहे. इतका कानमंत्र घड्याळाला देताच नेमक्या क्षणाला कधीं मंजूळ गीत गाऊन, कधी जोरदार घंटा वाजवून तर कधीं थांबून थांबून मधुर गजराच्या भुपाळ्या गात, घड्याळ बिनचूक इशारा देतें की,'धनीसाहेब उठा' धनिसाहेब कुंभकर्णाचे अवतार असले तर कोणत्याहि प्रकारचा आडपडदा

किंवा भीडभाड न ठेवता, बाईसाहेब, धनिसाहेबाना जागे करा,' म्हणून ओरड करायलाहि घड्याळ चुकत नाहीं. दुर्दैवाने दोघेहि कुंभकर्णी ब्रीदाला जागणारे असले, तर त्यांच्या प्रबोधनाची शिकस्त करून कंटाळलेल्या गजराचा हात कपाळावर मारून 'आता थकलो' म्हणून ते आपल्या रोजच्या व्यवसायाचा क्रम अखंड चालू ठेवते. पण 'तूं मुळीच आम्हांला हाक मारली नाहींस' असा अन्यायी आरोप कोणी त्याच्यावर केलाच तर 'मेहेरबान, तुम्हाला हांका मारमारून मोकळी झालेली ही माझी आंतडी पहा आणि खात्री करा. ' असा सडेतोड जबाब द्यायला घड्याळ पुरे खबरदार असतें. जन्ममृत्यूच्या नोंदीवर घड्याळाचें सर्टिफिकीट पडल्याशिवाय मुन्सिपालटींत जित्या मेल्या माणसाची मोजदाद होत नाहीं, आणि ज्योतिर्विदांनाहि त्यांच्या जनन मरणाचा तपशील उमगत नाहीं. घड्याळाची नोंद अवमानतांच मस्तिष्क परीक्षकांना जिवंत माणसांच्या कक्टवावरील दैवाच्या रेषा स्वदेशी सिनेमांच्या फिल्मांवरील भुरकट पुसकट रेघोट्यांप्रमाणें दिसून त्यांच्या भाकिताचे ठोकताळे सपशेल चुकतात. प्रेमबद्ध तरूण तरुणींनीं आपल्या भावी विवाहाचा 'इसारा' म्हणून एखाद्या एकांत स्थळीं, 'पहिल्या चुंबना'चा विधी साजरा करतांना, मनगटावरील घड्याळाचा कितीहि धि:कार केला, तरी प्रत्यक्ष विवाहाच्या वेळीं घड्याळाच्या नेत्रकटाक्षाखालींच विधिसांगतेची कवायत करून आपल्या पापाचें प्रायश्चित्त घ्यावें लागतें. एवढ्या मोठ्या प्रचंड सामर्थ्याच्या आगबोटी आगगाड्या, पण घड्याळाचा इषारा मिळाल्याशिवाय त्यांना एक पाऊल-पुढें मागे सरतां येत नाहीं. रोगी जगणार कीं मरणार याचा निर्णय ठरवितांना आधुनिक अश्विनीकुमारांना त्याच्या नाडीची व हृदयाची टकटक घड्याळाच्या टकटकीवरच अजमावून पहावी लागते. आकाशात नक्षत्रादि ग्रहांशी प्रत्यक्ष परिचयाची घमेंड मारणाऱ्या ज्योतिष्यांनी 'दृक्प्रत्यया'ची कितीहि बडबड केली, तरी त्यांनाहि क्षणोक्षणीं घड्याळांचीच पायधरणी करावी लागते. सारांश, मनुष्याच्या जन्मापासून तों त्याच्या मृत्यूपर्यंत हरएक बाबतींत त्याच्याशीं इमानानें वागणाऱ्या या घड्याळ-मित्राच्या अखंड टकटकींत आणखी कांही गूढ रहस्य भरलेलें आहें कीं काय हे पाहिलें पाहिजें.

घड्याळाची यंत्ररचना प्रथम ज्या यांत्रिकाने केली तो कोणीं तरी मोठा तत्ववेत्ता असावा. निदान घड्याळ बनविण्यात त्यानें साधलेल्या यांत्रिक कुशलतेच्या परमावधींत बऱ्याच गूढ तत्वाचा नकळत समावेश झाला, असें म्हणायला तरी हरकत नाहीं. नुसत्या घड्याळाच्या यंत्ररचनेवरून आपल्याला किती तरी उपदेश घेतां येण्यासारखा आहे. आज घटकेला हिंदुस्थानांतलें राजकारण, समाजकारण किंवा कोणतेंहि कारण जंगलांत फेकलेल्या प्रेताप्रमाणें थंडगार विस्कळीत व छिन्नविच्छिन्न अवस्थेंत आहे. याची कारणें अनेकजण अनेक देतील. जन्माची कारणपरंपरा शोधण्याच्या भानगडींत फारसे कोणी पडत नसले, तरी मृत्यूचीं वार्ता कारणपरंपरेशिवाय कोठेंच कोणी बोलत नाहीं. अमका मुलगा जन्माला कां आला? या प्रश्नापेक्षां अमका तमका कां मेलां? काय झालें त्याला? या प्रश्नांची विशेष चौकशी होते. हिंदुस्थानांत जें नवीन चैतन्य उत्पन्न झाले आहे, त्याचा जीवनक्रम असा चढउतरींचा का? आज पहावें तों हिंदुस्थान साऱ्या जगाला गिळायला उठलेला सिंह, तर दुसऱ्याच क्षणाला मेंढरांपेक्षा मेंढरु आज पहावें तों स्वदेशीं बहिष्काराच्या सुरुंगानें लँकशायर मँचेस्टरच्या गिरण्या गदागदा हलवीत आहें, तर उद्या मँचेस्टरवाल्यांकडूनच स्वत:चे खदखदा हांसू करून घेत आहे. या क्षणाला रस्त्यावरील खड्यागणित पुढाऱ्यांचा सुळसुळाट, तर लागलीच त्यांचा इतका खडखडाट उडतो, कीं

हे चातुर्मासें बेडूक एकदम गुप्त होतात कोठें आणि कसे यांचेच ज्याला त्याला नवल वाटतें. आतां पहाव्या तों मारे हजारों तरुण योद्ध्यांचे तांडे त्या तांडे मुळशी नागपूरचे हट्टाग्रह लढवायला धाव घेत आहेत : पुन्हां पहावें तों जिकडे तिकडे वीरांचा शुकशुकाट! एका क्षणाला देशासाठीं जान देण्यासाठीं निकरावर आलेले वीर दुसऱ्याच क्षणाला स्वत:च्या मानासाठी देशाची जान घेण्यास एकेरीवर येतात! हे प्रकार हेंच सुचवितात कीं आमच्या मनाची यंत्ररचना अजून घड्याळाइतकी कदरबाज व ठाकठीक ठरलेली नाहीं. किंबहुना आमच्या मनाला काहीं रचनाच नाहीं. हिंदी मनोवृत्ति-विशेषत: हिंदू मनोवृत्ति म्हणजे शेकडों शतकांच्या जुन्यापुराण्या भल्याबुऱ्या संस्कारांचा एक टोलेजंग उकीरडाच म्हटलें तरीं चालेल. श्रेष्ठ कनिष्टत्वाची हाडकें, साक्षर नाक्षरतेच्या चिंध्या स्पृश्यास्पृश्यत्वाचा चिखल, ब्राह्मणांच्या ब्रह्मसुखोत्वाचा धुरोळा, वकीलांची स्वार्थी कावेबाजी, व्यापाऱ्यांची गळेकापू दगलबाजी, नटव्या पुढाऱ्यांची थापेबाजी तुरळ्या अल्लड तरुणांची हुल्लडबाजी, अशा लाखों घाणेरड्या जिचा या उकीरड्यांत भरलेल्या आहेत. देशाच्या वातावरणांत वाऱ्याचा जसा जोर असेल तशी या उकीरड्यांतली एकेक चीज सर्वत्र अधळून कांही काळ दिशा धुंद करतात. वावटळ मंदावलें कीं जिकडे तिकडे स्मशान शांतता! आमच्या मनाच्या ठेवणींतच, असा एक परंपरेचा दोष आहे कीं चैतन्य उत्पन्न झालें कीं त्याची शक्ती सर्व अवयवांनी यथायोग्य प्रमाणांत वाटली न जाता त्याचा ठिकच्या ठिकाणी तात्काळ स्फोट होतो. चैतन्याचा स्प्रिंग आंवळला जातांच तो इतर अवयवांच्या पद्धतशीर चालनेला उपयोगी न पडतां, भर्रकन् सुटतो व निर्जीव होऊन पडतों. यामुळें त्याचा आवाजहि मोठा होतोआणि या भरंसाट धडेबाजीनें आजूबाजूची पुष्कळ लहान मोठीं चक्रें दुखावतात किंवा दांत मोडून निकामी बनतात. महाराष्ट्राच्या राष्ट्रीय जीवनाच्या घड्यांळातलीं बहुतेक चक्रें अशीच वेडी वांकडी व दांतपडकीं होऊन बसलीं आहेत. भलती चक्रें भलत्याच ठिकाणीं भलत्याच 'पिनीयन' 'पिव्हट'वर फिरण्याचा अट्टहास करीत आहेत. कोणाचा कोणाशीं मेळ नाहीं. एकाचा दांता दुसऱ्याशी जुळत नाहीं. सगळींच एकदम फिरूं लागलीं तर पहिल्याच गिरकीला एकमेकाशीं खरचटतात किंवा उगाच एकाच बाजूला तीव्र गतीनें भर्रर्र फिरून ठिकच्या ठिकाणीं गतप्राण पडतात. कोठें कसलेंच नियंत्रण नाहीं, विवेकाचा दाब नाहीं, यंत्ररचना अस्थानीं, झकझकीत चक्रांशी गंजड चक्राची योजना, यामुळें महाराष्ट्रांत कसलेंहि नवचैतन्य थरारलें तरी तें जेव्हांच्या तेव्हां फटकन् फुटून वाया जातें कोणी चैतन्याची स्प्रिंग आवळून या महाराष्ट्रीय डवऱ्यांत प्राण ओतण्याचा प्रयत्न केलाच, तर किल्लीचा शेवटचा आढा पुरा होतांच फाडकन् सगळा स्प्रिंग उफलून त्या चैतन्यकाराचीच महात्मा गांधींप्रमाणें-बत्तिशी हालवितो. मऱ्हाठ्यांत स्प्रिंग असला तरी त्याला नियमनाचा 'कॅच' (कुत्रा)च नाहीं. त्यामुळे स्प्रिंग पिळताच आजूबाजूची चक्रे कशीं तरी गिरक्या मारू लागतात; पण इतक्यांत तो उफलला की सगळ्यांच्या गिरक्या भिरक्या थंडगार पडतात.

घड्याळाची यंत्ररचना पहा. फार विचार करण्यासारखी असते. त्याच्या स्प्रिंगाचा जोर काय कमी असतो? जरा कुठे सुटला तर आजुबाजूला सुरुंगाप्रमाणे घातपात केल्याशिवाय सोडायचा नाही. पण त्याची चौकट, त्याच्या चक्राच्या दात्यावर दाब ठेवणारा तो 'कुत्रा' त्याच्या शक्तीचा ठराविक प्रमाणातच उपयोग करणारा तो 'हेअर स्प्रिंग'वर फिरणारा 'बॉल' आणि बॉलच्या नाजूक गतीने फिरणारी ती अन्यान्यावलंबी चक्रें, वगैरे रचना विचारवंतांना विचाराचें ब्रह्मांड शिकविण्यालायक आहे. एवढा मोठा जबरदस्त स्प्रिंग, पण त्यालासुद्धा काबूंत ठेवण्याचें काम एक लहानसा 'बॉल'करतो.

कोणतेंहि लहान मोठें चक्र त्या, तें आपली ठरावीक, पद्धतींची कदरबाज गति सोडून रेसभरसुद्धा इकडे तिकंडे चळायचें नाहीं. तास मिनिटें सेकंडाचे काटे बिनचूक आपापली कामे करीत आहेत. तास अर्धातास अलार्म घंटा ठरावीक वेळीं बिनतक्रार व्हावयाच्याच. उच्च नीचत्वाच्या लहान मोठेपणाच्या किंवा कसल्याहि सबबीवर कोणत्याहि जातिभेद किंवा कसल्याहि सबबीवर कोणताहि जातिभेद किंवा पक्षभेद घड्याळांतल्या नानाविध भिन्न चक्रांत आढळावयाचा नाहीं. कोणी कसला भेद उपस्थित करून अडथळा आणील, सत्याग्रह हट्टाग्रह करील, तर ताडकन् त्याची बत्तिशी उखळून त्याला सांदीला पडण्याचीं शिक्षा फर्मावण्यांत येते.

इंग्रजी राजसत्ता ही घड्याळासारखी शिस्तवार आहे व कदरबाज आहे. कोणी म्हणतात, कीं ही राजसत्ता 'हार्ट लेस' म्हणजे पाषाणहृदयी किंवा विनाकाळजाची आहे. यांचें कारण एवढेंच कीं तिच्या शिस्तीपुढें कोणाचा कांही मुलाजा चालत नाहीं. आडवा आला कीं काप, नाहीं तर दडपून टाकत. हा या घड्याळाचा दंडक आहे. इंग्रेजी साम्राज्य गजकर्णाप्रमाणें जें साऱ्यां भूगोलावर पसरलें आहें व दिवसेंदिवस पसरत आहे, त्याला मुख्य कारण असलेली त्यांची शिस्तवार घटना विल्यम धी काकरर पासून परिणत होत होत आज तिला हे जाज्वल्य असें कदरबाज स्वरूप प्राप्त झालेलें आहे. या शिस्तीसाठीं इंग्लंडनें भयंकर तपश्चर्या केलेलीं आहे. नुसत्या लेक्चरबाजीनें वर्तमानपत्री लेखाळतेनें किंवा सत्याग्रहाच्या हुल्लडीनें इंग्लंड एवढें पराक्रमी झालेलें नाहीं. हळूं हळू लोकसत्तेच्या आत्म्याचें बोधन करीत करीत आपल्या 'साम्राज्यवृद्धी'चें ध्येय गाठण्यासाठीं राजकारणीं घटनेच्या घड्याळांतली सर्व लहानमोठी यंत्र रचना पद्धतशील ठाकठीक बसवून, नंतरच त्यानें आपल्या चळवळींच्या लंबकाला गति दिली. येशूचा 'कुरूस' हातीं घेऊन मूर्तिपूजक पाप्यांच्या आत्म्यांच्या तारणासाठी येणारे मिशनरी हातात तागडी घेऊन हिंग, जिऱ्या मिऱ्याचा व्यापार करणारे व्यापारी, किंवा घर ना दार असे भयाभया करीत जिकडे तिकडे भरला दरा, तोच देश बरा' अशा वृत्तीचे धाडसी, भटक्या अगर दुसरा आणखी कोणीहि असला, तरी सर्वांच्या मनोवृत्तींत 'साम्राज्यवृद्धी' ही एकच चैतन्यशक्ती इंग्लिश राज्यकारभाराच्या यंत्ररचनेने विलक्षण जागृत केलेली आहे. इंग्रेजी घड्याळांत व्यक्तीला कांहींच महत्त्व नाहीं. सर्व महात्म्य समष्टींचें. इंग्लिश व्यक्ती समष्टीसाठींच झगडते. धार्मिक मुखवट्यांचा मिशनरी, शैक्षणिक बुरख्याचा प्रोफेसर, पोटार्थी सिविलियन, हिंदी वर्तमानपत्राचा गोरा 'एडिटर,' दवाखान्यावरचा सर्जन, हेअर कटिंग सलूनचा हजाम, कोणीहि इंग्रज असो, त्याच्या स्वदेशी राज्यसत्तेच्या घड्याळानें त्याची मनोवृत्ति इतकी शिस्तीची बनविलेली असतें कीं तो वाटेल तो व्यवसाय करीत असला तरी त्याच्या हृदयाची टकटक 'साम्राज्यवृद्धी-साम्राज्यवृद्धी' हा एकच मंत्र जपत असते. सर्व युरोपियन राष्ट्रांच्या स्वभावांत जो एक विलक्षण एकसूत्रीपणा आढळून येतो, त्याला कारण त्यांच्या राज्यसत्तेच्या घड्याळाची शिस्त हेंच होय. इंग्लंडचा राजासुद्धां या घड्याळापुढें केवळ 'माणूस'ठरतो. राजाची वैयक्तिक मतें कांहींहि असली, त्याचे विचार वाटेल ते असले, तरी राज्यसत्तेच्या घड्याळांतल्या इतर चक्रांच्या अनुरोधानेंच त्याला आपल्या विचारांचे भ्रमण ठरवून घ्यावें लागतें. त्यांत लवमात्र थातरमातर चालत नाहीं. इंग्लंडचा राजा प्रोटेस्टंटच पाहिजे, ही एक शिस्त ठरली कीं राजाचा खरा कल जरी कट्ट्या थिऑसफीस्टाचा असला तरी 'मी कट्टा प्रोटेस्टंट आहे' ही साक्ष त्याला ईश्वराला स्मरून द्यावीच लागते. इंग्लंडच्या शिस्तीचा दुसरा असा परिणाम आहे कीं त्यांच्या कदरबाज सत्तेची परंपरा केव्हांच बंद पडत नाहीं.

राष्ट्रानें वाटेल ती व्यक्ती वाटेल त्या कार्याला पसंद केली कीं ती त्या जागीं चटकन् ठाकठीक वसतो. महायुद्धाच्या भरांत लॉर्ड किचनेरसारखा कलमसमशेर बहाद्दर बुद्धमंत्रि कालवश होतांच, इंग्लंड राष्ट्र मुळींच डगमगलें नाहीं. एका क्षणाचाहि विलंब न लावतां लॉर्ड आरकविथ या साऱ्या सिविलियनाची युद्धमंत्र्याच्या जागीं निवडणूक केली व ताबडतोब लॉईड जॉर्ज या सिविल मुत्सद्द्याने युद्धाची सूत्रे हातांत घेऊन, केवळ बुद्धिबळाच्या जोरावर जर्मनीसारख्या रावणाला चारी मुंड्या चीत करून अद्‌भुत विजय मिळविला. एवढें मोठे लिबरल-उदारमतवादी-लॉर्ड मोर्ले. पण स्टेट सेरेटरीच्या चक्रात ठेवतांच त्यांनासुद्धां आपल्या उदार मतांना घरीं खुंटीवर ठेऊन, स्टेट सेश्लेटरीच्या चक्राची कदर बिनतक्रार अंमलांत आणावी लागलींच ना? मध्यंतरी मजूरपक्षाभिमानी रॅम्से मॅकडोनल्ड साम्राज्यमंत्री झालें. पण साम्राज्यशिस्तीच्या ठरावीक यंत्ररचनेंत त्यांनी किंचित् इकडे तिकडे करतांच खाडकन् उखडून सांदीला पडले. इकडे येणाऱ्या गव्हर्नर व्हाइरायांचीहि हीच स्थिति. व्यक्तिश: तुमचीं मतें काहींहिं असो, तुम्हांला तुमचें कर्तव्य साम्राज्यघड्याळाच्या शिस्तीनेंच पार पाडलें पाहिजे, हाच मुळीं पहिला इंग्रेजी राजनीतीचा दंडक आहे. सारांश, अशा जगजेत्या इंग्रेजी सत्तारूपीं घड्याळाकडून गुलाम हिंदुस्थानानें स्वराज्यप्राप्तीची अपेक्षा करण्यापूर्वी, आपलें सामाजीक धार्मिक औद्योगिक राजकीय-सर्वच-जीवन घड्याळाप्रमाणें कदरबाज बनऊन सवाई इंग्रज बनण्याचा यत्न केला पाहिजे. हाच मंत्र घड्याळाची टकटक प्रत्येक क्षणाला आपल्याला सुचवित असतें; पण तिकडे कोणाचेंच लक्ष जात नाहीं. हें लक्ष तिकडे वेधावें म्हणून हा टकटकीचा लेख विचारवंतांच्या हातीं देत आहों. ही 'घड्याळाची टकटक त्यांना कटकट न वाटता पक्षभेद पंथभेद व जातिभेद या सर्वांवर आपल्या व्यापक राष्ट्रसेवेची दृष्टी ठेऊन, सर्व राष्ट्रसेवक चटचट जाणत्या आत्मप्रबोधनाची शिकस्त करोत, एवढी आशा प्रगट करून ही टकटकीची कटकट येथें पूर्ण करितों.

□□□

स्फुट विचार

लग्नासाठी पैसे नाहीत म्हणून आत्महत्या

''**फरीदपूर** जिल्ह्यात रामचंद्रपूर येथे दीनबंधू चतरजी नावाचा इसम तीन वर्षांपूर्वी वारला. या गृहस्थाच्या मागे त्याची विधवा, दोन मुलगे व एक कन्या अशी चार माणसे आहेत. कन्येचें लग्न लावण्याइतके आईजवळ पैसे नाहींत. हें पाहून शेजारी पाजारी आईला हिणवूं लागले. तेव्हां आईची या त्रासातून मुक्तता करावी म्हणून मुलीनें केरोसिन अंगावर ओतून घेवून व त्याने आग लावून जीव देण्याचा निश्चय केला. पण कार्ही सुशिक्षित माणसांनी वर्गणी गोळा करून त्या मुलीचे लग्न लावण्याचे ठरवल्यामुळे हा प्रसंग टळला आहे.''

ही बातमी ज्ञानप्रकाशवरून घेतली आहे. अशी कितीतरी हजारों उदाहरणें या हुंड्याच्या पद्धतीमुळे हिंदू समाजात दररोज घडत आहेस. तरीहि आमचे डोळे उघडत नाहीत. किंवा हुंडानिरसनाचें कार्य निर्भयाने कोणी हाती घेत नाही. लग्नासाठी मुलींच्या जवळ पैसे नसतात तसे मुलाच्याहि जवळ नसतात. पण ते पुल्लिंगी असल्यामुळे लग्न झालेंच पाहिजे किंवा केलेच पाहिजे अशी सामाजिक जबरदस्ती तरुणांवर नाही. तरुणींची अवस्था याच्या अगदी उलट. याने कोणी हातीं घेत नाहीं. लग्नासाठी मुलींच्याजवळ जसे पैसे नसतात तसे मुलांच्याहि जवळ नसतात. पण ते पुल्लिंगी असल्यामुळे लग्न झालेच पाहिजे किंवा केलेंच पाहिजे अशी सामाजिक जबरदस्ती तरुणांवर नाहीं. तरुणींची अवस्था याच्या अगदी उलट. कपाळीं कुंकू नसल्यामुळे प्रत्येक विधवेकडे येणाऱ्या जाणाऱ्यांचे लक्ष जसें बिनचूक जातें व त्या बिचारीला 'मरण बरें पण ही येणारा जाणाराची निरीक्षण-कुशलता नको' असें होतें. तद्वतच उपवर कुमारीकडेहि लोक तितक्याच कुत्सित दृष्टीने पाहतात. त्यामुळें 'अदरीला मदार'असा 'कोणी तरी नवरा कुटुंबाला आधार' मिळून तीं या 'रसिकांच्या नजरेचा मारा' चुकेल कसा, या विवंचनेंत असतें. तरुणांना सारे कुरण सताड मोकळे! लग्नासाठी पैसें नसले, पण मानवी विकारांच्या झटक्यांत एकाद्या कुमारिकेचें पाऊल वाकडे कीं ती हयातींतून गेली. पण लग्नासाठींच नव्हे, तर पोट जाळायला दिडकीही नसलेल्या एकाद्या व्रात्य तरुणानें एक किंवा अनेक कुमारिकांना 'पंकी रुतल्या घेसू' बनविल्या, तरी यांच्या तोंडाचा उजळपणा लवमात्र कमी होत नाहीं. हिंदू समाजांतला हा न्याय त्यांची स्वराज्याची पात्रता फारच छान सिद्ध करणारा नव्हे, असें कोण म्हणेल? हुंडा रक्तपितीचा चटका ज्यांना बसतो, ते तेवढ्यापुरते हायहाय करतात. पण जात्याच

ते जाड कातडीचे निगरगट्ट हिंदूच असल्यामुळें, हा रक्तपितीचा रोग अधिकाधिक फैलावल्यास डोळ्यावर खुशाल कांतडें ओढून घेतात. ज्या हिंदू समाजाला हुंडाविध्वंसनासारखी साधी सुधारणा घडवून आणतां येत नाहीं, त्यांनी संघटन शुद्धि व अस्पृश्योद्धाराच्या वल्गना करून आपली अक्कल तिव्हाट्यावर विक्रीस काढू नये, हें बरें. सामाजिक क्षेत्रांत जे रूढीचे गुलाम आहेत, त्यांना राजकीय क्षेत्रांत स्वयंनिर्णयाचे हक्क मागण्याचा अधिकार कसा काय पोहोचतो?

अब्रूचा बाजारभाव

हिंदुस्थान सारख्या गुलामांनी गजबजलेल्या राष्ट्रांत अब्रूचा बाजार कोठें असेल अशी आमची कल्पना नव्हती. गुलामांना अब्रू ती कशाची? गुलामांनी आपल्या अब्रूचे थेर माजविणें, दगडमातीच्या गोणी वाहणाऱ्या गाढवांनी लोकमान्यतेची शेखी मिरविण्यासारखेंच दिसते. ज्यांना स्वराज्य नाहीं, स्वकीयांची पर्वा नाहीं. स्वदेशांत कुत्रा विचारीच नाहीं, परदेशांत ज्यांना थारा नाहीं, असल्या गुलामांनीं आपल्या अब्रूचा बाजारभाव अब्रुनुकसानीच्या कायदेबाजीनें ठरविण्याचा उपक्रम करावा, ही गोष्ट आमच्या देशाच्या कमाल अवनतीचे द्योतक नव्हे काय? अलीकडे प्रेसआक्टाच्या काढण्या थोड्या ढिल्या झाल्यापासून वर्तमानपत्रकारांना पायबंद लावण्याच्या कामीं अब्रूनुकसानींचीं सत्रें ठिकठिकाणीं सुरू झालीं आहेत. खानदेश, वऱ्हाड, नागपुरकडे, तर हा अब्रूचा बाजार बराच तेजी दिसतो. या अब्रुनुकसानीच्या फिर्यादी ठोठावण्यांत सरकारी हिंदी नोकरच विशेष पुढाकार घेत आहेत, ही गोष्ट विशेष चिंतनीय आहे. एरवीं सरकारी नोकर म्हणून गुर्मीत मिरविणारे हे अब्रूदार लोक फावल्या वेळांत निरक्षर रयतेचें पुढारी म्हणूनहिं मिरवत असतात. अशा या दुधारी वर्चस्वाच्या दुटप्पी लोकांनी 'अब्रू का बेअब्रू'चे खेळ खेळून कायदेबाजीच्या चापांत चित्रगुप्तांना चेचण्याचे चावट चाळे अत:पर बंद ठेवल्यास त्यांच्या अब्रूची किंमत झाकल्या मुठीतं कमींत कमी सवा लाखाची तरी ठरेल, एवढी सूचना देशबंधुत्वाच्या नात्यानें त्यांना करावीशी वाटतें. 'मला अब्रू आहे कीं नाहीं?' हेंहि सरकारी न्यायाचा शिक्का घेतल्याशिवाय ज्यांना नीटसें पटत नाहीं, त्यांना 'मी मेलो कां जिता आहे?' याचीहि खात्री पटवुन घेण्यासाठीं सरकारी शिक्क्याची आराधना करणे भाग पडणार नाहीं कशावरून? उच्च दर्जाच्या युरपियन अधिकाऱ्यांपेक्षां खालच्या दर्ज्याच्या हिंदी माणसाला अब्रूची एवढी रग असण्याचे कारण युरपियन स्वतंत्र सत्ताधारी आणि हे बेटे स्वराज्यभ्रष्ट अवनत गुलाम! दारिद्र्यालाच मानापमानाची मोठी मिजास असते.

बॅरिस्टर देशमुखांची स्पष्टोक्ती

'सार्वजनिक' भटांच्या विरुद्ध कोणी कांही लिहिलें कीं 'हा पहा देशद्रोही'म्हणून सगळें भटमंडळ कावळ्याप्रमाणें काव काव करीत असें. हा धंदा आता ब्राह्मणेतरांनी' उर्फ मराठे पुढारी व पत्रकारांनी

हुबेहूब तसाच उचलला आहे. त्यांच्या ठरावीक मतांच्या विरुद्ध जरा का कोणी-एखाद्या ब्राह्मणेतरानेंहि काढला किंवा त्यानें आपल्या प्रामाणिक मतानुसार एखाद्या ब्राह्मणेतर पक्षाचा स्वीकार केला की ही लेखक, वक्ते मंडळी त्याच्यावर तुटून पडतात. मागे श्रीयुत कोठारींवर याच अस्त्राचा मारा यांनी केला. भिक्षुकशाहीचे 'राष्ट्रीय' ब्राह्मणेतरांना वर डोके काढून देत नाहीत. त्यांच्या स्वतंत्र मताची पायमल्ली करतात. कोणी विरुद्ध बोललाच किंवा सत्य प्रगट करू लागलाच तर त्याची ससेहोलपट करतात. म्हणून ब्राह्मणेतर पक्ष निघाला. त्यातहि पेशवाई घाशीरामचि! ब्राह्मण पक्षात चित्पावन शिरजोर, तर ब्राह्मणेतरांत हे सुशिक्षित मराठे पुढारीचे पत्रकार शिरजोर!' ब्राह्मणांप्रमाणेच यांनाहि स्पष्टोक्ती आता खपेनाशी झाली आहे. याचे कारण हेच की खऱ्या लोकशाहीची तत्त्वें आचरणांत आणण्याइतका मनाचा मोठेपणा व नि:स्वार्थ ब्राह्मणांप्रमाणें यांचाहि गावी नाही. या विषयी साताराच्या महाराष्ट्राच्या प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष-बॅरिस्टर रामराव देशमुख यांचे विचार मनन करण्यासारखे आहेत. ते म्हणाले-

''ब्राह्मणेतर म्हणून जो एक क्रांतिकारकांचा पक्ष निर्माण झाला आहे, त्याला सामाजिक सुधारणा पाहिजे आहे. व ती झाल्याशिवाय राजकीय प्रगति न झाली तरी चालेल असें वाटतें. पण यांच्या सामाजिक सुधारणेचे स्वरूप काय, हे कट्टया समाजसुधारकांनाहि कळणें दुर्मिळ होऊन बसलें आहे. यांना भटभिक्षुकांची गुलामगिरी नको असेल तर नको; पण परंपरागत भटांची गुलामगिरी काढून आपल्यातील भटांची गुलामगिरी पुनः समाजाच्या पदरी बांधणे हेंहि तितकेच निंद्य व तिरस्करणीय आहे. जातीजातींमधील विषमता त्यांना काढून टाकावयाची आहे. पण ब्राह्मण जात खेरीज करून ज्या जाती हिंदु समाजांत आहेत या जातीवरील ब्राह्मणांचे वर्चस्व झुगारून दुसऱ्या एखाद्या विशिष्ट जातीनें तरी आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याची हांव काय म्हणून धरावी? महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर पक्षाच्या पंथांत आरंभी कांही एकदोन जैन व एकदोन लिंगायत प्रमुख होते. पण आज जैन व लिंगायत यांना या पंथाने बाजूला काढून मराठ्यांचे वर्चस्व या पंथात प्रस्थापित करण्याचा उद्योग सुरू केला आहे. याचा परिणाम मराठेतर वर्ग निर्माण करण्यात होणार नाही काय? मराठेतर जाती तुरळक आहेत व शिक्षणांत थोड्या अद्याप मागासलेल्या आहेत, म्हणून मराठे व तत्सम जातींचा संघ टिकून आहे. पण जैन, मारवाडी व लिंगायत यांनी एक होऊन जर मराठ्यांच्या या वर्चस्वाला शह दिला, तर मराठ्यांविरुद्ध तत्सम जातींचा संघ उलटल्यावाचून राहणार नाही. आज ब्राह्मण जातीने जे पाप केले म्हणून ब्राह्मणेतर पंथांतील मराठे ओरडत आहेत, तेच पाप या ब्राह्मणेतर पंथांतील मराठ्यांनी केले म्हणून इतर जाती ओरडू लागतील. जातिवैशिष्ट्य नको. निदान त्याची तीव्रता नको असे जर प्रामाणिकपणें या ब्राह्मणेतर पंथीयांना आज वाटतेतर ब्राह्मणेतर पंथांत तरी एकाच जातींचे वैशिष्ट्यं प्रस्थापित करण्याचे प्रयत्न झाले नसते. प्रो. लठ्ठे यांच्यासारखे सुशिक्षित व श्री. पंडितअप्पा चिकोडीसारखे सुशिक्षित लिंगायत, कौन्सिलच्या निवडणुकीत या पंथियांनी दूर झुगारून दिलेच की नाहीत? सर्व ब्राम्हणेतरांना त्यांच्या लोकसंखेच्या प्रमाणात जर जातवार प्रतिनिधी देण्यात आले असते तर त्यांत लिंगायत, जैन, मारवाडी, तेली, माळी वगैरे तुरळक, तुरळक पसरलेल्या जातींना वाव मिळाला नसता. हे नाहीं का यावरून सिद्ध होत? तेव्हां ब्राह्मणेतरांचा हा पंथ ब्राह्मणेतरांतील सर्व जातींना समान दर्जा व हक्क देण्याकरिता निर्माण झाला नसून, सार्वत्रिक चढाओढीत पुढें येण्याचे सामर्थ्य नसलेल्या पण वैयक्तीक स्वार्थाने प्रेरित झालेल्या लोकंनी निर्माण केला असें इतर जातींतील लोकांनी का म्हणू नये?''

आज अक्षरश: खऱ्या झालेल्या भविष्याची शंका मनांत येऊन कै. राजर्षि शाहू छत्रपति हयात असताना प्रस्तुत लेखकानें त्यांच्याशी मुंबई मुक्कामी मुद्दाम चर्चा केली होती. ''आपल्या ब्राह्मणेतर चळवळीचा हेतू फक्त मराठा समाजाला जागृत करण्यापुरताच आहे कीं अखिल ब्राह्मणेतर हिंदु समाजाच्या उद्धारार्थ आहे?'' असा प्रश्न विचारला असता. राजर्षि म्हणाले, ''अखिल ब्राह्मणेतर हिंदुंत मराठा समाज बहुसंख्य असला, तरी माझी चळवळ मराठ्यांपुरतीच संकुचित नाही. असलीं जातीपुरती चळवळ करायला छत्रपति कशाला? माझ्या चळवळीने ब्राम्हणेतर स्पृश्य हिंदूचेच काय, पण महार, मांगादि अस्पृश्यांचाहि उद्धार व्हावा, अशी माझी इच्छा व धोरण आहे. ब्राह्मणेतर म्हणजे ब्राह्मणेतर, मग ती कोणत्याहि जातीचा असो, तो माझा भाऊ. मी जातपात ओळखीत नाहीं. वाटेल त्याच्या हातचं मी खातो पितो ब्राह्मणेतर चळवळ करून मराठ्यांना 'ब्राह्मणेतरांतले चित्पादन.' बनविण्याची मला इच्छा नाहीं. मराठ्यांना तरी मी काय कमी दिले आहे? स्वत:च्या जातीची उन्नति करणें प्रत्येकाचे आद्य कर्तव्य आहे. याप्रमाणें 'मराठा शिक्षण परिषद' व 'मराठा राजकीय परिषद' त्यांची आहेच. जातीच्या उन्नतींसाठी ही दोन शस्त्रें मराठ्यांना पुरेशी आहेत. माझ्या ब्राह्मणेतर चळवळींत जातिवर्चस्वाचे वीष ओतण्याचें चित्पावनी काम ते कधींच करणार नाहींत. असें मला वाटतें.''

'राष्ट्रवीरा'ची धमकी

बॅरिस्टर देशमुख भटाळलेलें असले तरी त्यांचें सर्वच विचार टाकाऊ व निंद्य असें कोणीहि विचारवंत मानणार नाही. त्याचप्रमाणें त्यांचे सर्वच विचार सर्वांना मान्य होतील असेंहि नाही. व्यक्तीश: मतस्वातंत्र्यानुसार बॅ. देशमुख ब्राह्मणांशी सहकारिता करतांना त्यांच्या नखशिखांत पचनी पडतील किंवा पडेलच, असें मानावयास जागा नाही. ते पूर्ण भटाळलेले किंवा भटच झाले असें मानलें तरी त्यांच्या वरील उद्गारांत काहीच सत्य नाहीं असें म्हणणें हा वस्तुस्थितीचा धाडसी विपर्यास होय. ब्राह्मणेतर पक्षांत 'राष्ट्रवीर'हें सुशिक्षित व पदवीधर संपादकांनी चालविलेलें असें एकच भारदस्त साप्ताहिक आहे. बॅ. देशमुखांची या साप्ताहिकानें तीन मोठ्या अग्रलेखांत धुळपट काढून, मराठा-मराठेतर भेदाबद्दल ३ऱ्या अग्रलेखांत खालील धमकीचे उद्गार काढले आहेत:

''ब्राह्मणेतरांवर वर्चस्व गाजविण्याची मराठ्यांनी हांव धरिली आहे, हे देशमुखांची हाकाटी केवळ वस्तुस्थितीच्या अज्ञानाची निदर्शक आहे. आणखी महाराष्ट्रांतहि मराठ्यांचें प्रातिनिधिक संस्थांत व सरकारी नोकऱ्यांत आधिक्य राहू नये, म्हणून जर कोणी मराठ्यांना बाजूला टाकू पाहील तर ब्राह्मणेतर पक्षांत राहून जितकें हित होईल तितकें जरी स्वतंत्रपणी होणार नाहीं तरी सिंध प्रांतात मुसलमान समाज किंवा कर्नाटकांत लिंगायत समाज ज्या मर्यादेंत आत्महित करून घेण्यास समर्थ आहे तितकाच महाराष्ट्रांतील मराठाहि आज उद्या समर्थ होईल. मात्र ब्राह्मणेतर पक्षांत राहून मराठेतरांचें आज जें कल्याण होत आहे, ते मराठ्यांशी फुटून राहून मात्र साधणार नाहीं, हीहि गोष्ट मराठेतरांनी ध्यानात राखिली पाहिजे.''

कै. राजर्षि शाहू छत्रपतींच्या व्यापक व सर्वस्पर्शी तत्वाशीं प्रतारणा करणाऱ्या सुशिक्षित मराठ्यांकडून जाड अक्षरांत दाखविलेलीं धमकीच तेवढीं पुढें यावयाची राहिली होती. ती आतां आली, बरें झालें. यामुळें ब्राह्मणेतर संघांत असणाऱ्या किंवा मोडूं पहाणाऱ्या-शेकडों अल्पसंख्य मराठेतर जातींना 'आपण कोठे आहोंत'याची तरी जाणीव आतां उत्पन्न होईल. मराठ्यांना प्रातिनिधिक संस्थांत व सरकारी नोकऱ्यांत आधिक्य मिळूं नये, किंवा बहुसंख्य मराठ्यांनी सर्व क्षेत्रांत 'समर्थ'होऊ नये, म्हणून कोणकोणत्या मराठेतर ब्राह्मणेतर जातींनीं उघड गुप्त प्रयत्न केले आणि त्यामुळेंच 'मराठा-मराठेतर' भेद उपस्थित झाला, याची सप्रमाण माहिती 'राष्ट्रवीर'कार देतील तर बरें होईल. त्यांच्या चालू वर्षांच्या पहिल्या अंकाच्या अग्रलेखावरून 'मराठा मराठेतर'भेदच अस्तित्त्वांत नाहीं, असे त्यांना आतां म्हणतांच येणार नाहीं. हा आत्मघातकी भेद कोणी कोठें कसाहि उपस्थित केलेला असो, त्यामुळें ब्राह्मणेतर संघाची फळी साफ फुटली. यांत मुळींच संशय नाहीं. बहुसंख्यत्वाच्या जोरावर कै. राजर्षींचा ब्राह्मणेतर संघ अकल्पनीय धडाडीनें कार्यक्षम करणाऱ्या मराठ्यांचा द्वेष मराठेतर ब्राह्मणेतरांना करण्याचें काहीच प्रयोजन नसतांना आणि गाड्याबरोबर नळ्याला यात्रा या न्यायानें मराठ्यांच्या पाठोपाठ येणाऱ्या अनेक अल्पसंख्य मराठेतर जातींना 'राष्ट्रवीर'कार जीं धमकी देत आहेत, ती अत्यंत साहसी व चिळस आणणारी आहे, एवढेंच त्यांच्या नजरेस आणणें आहे. या धमकींतल्या 'कल्याणा'च्या बुजगावण्याला भिण्याचा काळ आतां राहिलेला नाहीं, हें त्यांनी लक्षांत ठेवावें. सारांश, साऱ्या ब्राह्मणेंतर नांवाखालीं असणारा पक्ष कै. राजर्षि शाहू छत्रपतींच्या व्यापक धोरणांशी बेइमान झालेला पक्ष आहे, असेंच सर्व अल्पसंख्य मराठेतर ब्राह्मणेतरांना वाटल्यास त्यांत त्यांची चूक होईल काय?

आधीं राजकीय कां सामाजिक?

या वादाच्या किसण्या किसतां किसतां राष्ट्रांच्या अर्धशतकाचा सत्यानास झाला. टिळक पक्षाला सामाजिक प्रश्न आतापर्यंत जवळ जवळ क्षुद्रच वाटत असें. राजकीय सुधारणा झाली कीं सामाजिक वाद तेव्हाच मिटतील ही या पक्षाची आजपर्यंतची घमेंड. काँग्रेसच्या मंडपात सामाजिक परिषद भरेल तर तो मांडव सुद्धा जाळण्यास हा पक्ष एका वर्षी काचा कसून उभा होता. पण अलीकडे ब्राह्मणेतर चळवळींने आपले उग्र स्वरूप धारण केल्या दिवसापासून या पक्षालाआपली राजकारणीं पुराणें एकांगी असल्याचा अनुभव येत चालला; व आज तर तो कै. जस्टिस रानड्यांचीच भाषा बोलू लागला आहे. समाजसुधारकांनी राजकीय सुधारणा आम्हांला नको असें कधींच म्हटलें नाहीं. अल्पसंख्य सुशिक्षितांची एकांगी राजकीय चळवळ सामाजिक आत्मप्रबोधनाच्या अभावीं फोल ठरेल, म्हणून एकदम बहुजन समाजांतील नानाविध भेदांची तीव्रता कमी करणाऱ्या सामाजिक नानाविध भेदांची तीव्रता कमी करणाऱ्या सामाजिक सुधारणेकडेहि तितकेंच किंबहुना विशेष लक्ष पुरविल्याशिवाय गत्यंतर नाहीं. एवढेंच रानडेप्रभृतिं सुधारकांचें म्हणणें होते. पण राजकारणी चर्पटपंजरीनें शेफारलेल्या बथ्थड डोक्याच्या टिळकपक्षीय जहालांना ते पटायला तब्बल अडीच तपाचा अवधी लागला; आणि सामाजिक भेदांचा

व गुलामगिरीचा नायनाट झाल्याशिवाय राजकारणी संबंधांचा किंवा सुधारणेच्या वायद्यांचा राष्ट्राला काडीचाहि उपयोग होणार नाही, हा सिद्धांत या बेहोष दै. भ. सेनेच्या गळीं उतरविण्याची कामगिरी कै. राजर्षि शाहू छत्रपतींच्या ब्राह्मणेतर संघानेच अखेर बजावलीं. आज हा संघ निर्नायक व अनियंत्रिक अवस्थेंत कसाहि बागडत असला, तरी त्याच्या अस्तित्वाशिवाय महाराष्ट्राचें राजकारण धर्म किंवा समाजकारण अथवा कोणतेंहि कार्य शिस्तवार चालणार नाहीं आणि स्वधर्माचा व स्वराज्याचा घात करण्यास सवकलेल्या भिक्षुकशाहीच्या विविध कारस्थांनास आळा बसणार नाही. ब्राह्मणेतर चळवळीनें 'राष्ट्रीय' प्राण्यांच्या अनुभवांत जी एक चरचरीत जिऱ्यामिऱ्याची फोडणी घातली आहे, तिचा परिणाम गेल्या सामाजिक परिषदेचे स्वागताध्यक्ष राजमान्य राजेश्री दादासाहेब करंदीकर यांच्या प्रास्ताविक भाषणांत व निमंत्रणपत्रिकेंत उत्तम उमटला आहे. दादासाहेब म्हणतात-

''राजकीय परिषदेप्रमाणेंच सामाजिक परिषदांची राष्ट्राच्या उन्नतीकरितां अत्यंत जरूरी आहे. राष्ट्राची सर्वांगीण उन्नति होण्याकरितां जे जे मार्ग उपलब्ध असतील त्या त्या सर्व मार्गांचे अवलंबन करणें प्रत्येक देशभक्ताचें कर्तव्य आहे. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादासंबंधाने ते म्हणाले, कीं ब्राह्मण हा आपल्या कर्मानेंच मरेल. ब्राह्मणांनी आपली श्रतिमतिविहित कर्तव्य करण्याचें बंद केल्यास तो ब्राह्मणत्वापासून च्युत झाला म्हणून समजावें. त्यांनीं ऐषआरामास सुरुवात केली की त्याचा ऱ्हास होणार हें खास. ब्राह्मणांना अद्यापीहि फारसा त्रास होत नसला तर त्याला ब्राह्मणेतरांची उदारबुद्धिच कारण आहे म्हणून समजावें. विद्वान अब्राह्मण हा ब्राह्मणच आहे. ब्राह्मणेतरांच्या न्याय्य मागण्यांचा सहानुभूतिपूर्वक विचार जर ब्राह्मण करतील तर ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद लोवकरच मिटण्यास विशेष हरकत राहणार नाहीं. आमच्या ब्राह्मणेतर बंधूंनीहि ब्राह्मणांपासून फटकून न राहतां दोघांचे हितसंबंध एकच आहेत हें लक्षात ठेवावें. हिंदुधर्मसमाज व सामाजिक परिषद यांमध्ये भेद आहे. सामाजिक परिषदेत हिंदु धर्मसभेपेक्षां अधिक व्यापक स्वरूप आहे, आणि आपल्या प्रांतांत जे जे म्हणून भिन्नधर्मीय समाज आहेत व ज्यांचे हितसंबंध प्रांतांतील सुधारणांवर अवलंबून आहेत त्या सर्वांचा या परिषदेमध्ये अंतर्भाव होतो यांत संदेह नाही.''

श्रुतिस्मृतिविहित कर्माचरणच्युतींतच ब्राह्मणांच्या ब्राह्मण्याचा मृत्यु असेल, तर आज महाराष्ट्रांत एकही ब्राह्मण शिल्लक नाहीं, असेंच म्हणावें लागेल. आणि ब्राह्मणच जेथें ठिकाणावर नाहीं, तेथें हा ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद तरी कोठून आला? हा प्रश्न सोडवावा लागेल. श्रुतिस्मृतिविहित कर्मे ब्राह्मण करो वा न करो त्याचें ब्राह्मण्य वेदोक्तांत वसों नाहीतर पुराणोक्तावर रुसों, ब्राह्मणेतरांना त्याचें सुहेरसुतक कांही नाहीं. दक्षिणी ब्राह्मणांत अजून आत्मवर्चस्वाची जी पेशवाई घमेंड व मगरूरी आहे त्या विरुद्धच वास्तवीक ब्राह्मणेतरांचा मुख्य कटाक्ष आहे. साक्षरतेच्या व प्रबुद्धतेच्या जोरावर ब्राह्मणांनी ब्राह्मणेतर अनेक समाजांचा आजवर इतका भयंकर तेजोभंग व मानखंडना केलेली आहे व आजहि शेकडों ब्राह्मण दे* पत्रकार, ग्रंथकार, इतिहास-संशोधक, वक्ते, सरकारी कामगार करीत आहेत कीं ब्राह्मणांच्या खऱ्या खोट्या सहकार्याच्या भाषेवर त्यांचा विश्वासच बसणें कठीण झालें आहे. दादासाहेब म्हणतात, ''ब्राह्मणांना अद्यापिहि फारसा त्रास होत नसला तर त्याला ब्राह्मणेतरांची उदारबुद्धीच कारण

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द दिसत नाही.

आहे.'' आमचा असा तर्क आहे, कीं उदारबुद्धीपेक्षां ब्राह्मणेतरांचा बेशिस्तपणा अज्ञान व निरक्षरता ही ती कारणें आहेत. आज ब्राह्मणेतरांची काही थोडी नियतकालिकें चालूं आहेत; तीं पेशवाई वळणाच्या भिक्षुकी पत्रांच्या टोल्याला टोला देत आहेत. डोकेबाज ब्राह्मणांइतकी शिस्त व एकसूत्रता नसली तरी व्याख्यानें परिषदा सभा उत्सव होत आहेत आणि त्यामुळें निरक्षर रयतेंतहि थोडी श्रवण मनन निदिध्यासानें जागृति झाली आहे. तरी देखिल ब्राह्मणेतरांच्या वास्तवीक हक्कांची व आकांक्षांची चीड येण्याजोगी निष्कारण नालस्ती करणारी किती फाजील भिक्षुकी पत्रें ग्रंथ व वक्ते दादासाहेबांना आम्ही दाखवून द्यावी? सर्वांचीच मान एका दाव्यांत अडकली आहे हे शहाण्या ब्राह्मणांनाच काय तें कळतें आणि अडाणी ब्राह्मणेतरांना कळत नाहीं; अशी वृथा समजूत दादासाहेबांनी किंवा कोणी करून घेऊं नये. जोपर्यंत ब्राह्मणांचा आत्मवर्चस्वाचा पेशवाई ताठा कायम राहील, तोपर्यंत हा वाद आहे तसाच राहणार, किंबहुना अगदीं निकरावरहि येणार. मग त्यासाठीं खऱ्यांचा ब्राह्मणेतर संघ कमकुवत ठरून नामशेष झाला तरी त्याच्या राखेंतूनहि दुसरें नवीन चैतन्य जन्माला येऊन बहूजनसमाजाच्या वतीनें ब्राह्मणांच्या भिक्षुंकशाही बंडाला चेचण्यास कमी करणार नाहीं.

श्रीयुत बागडे यांचे महत्पाप

पुण्याचे श्रीयुत केशवराव बागडे यांनीं वर्धा ब्राह्मणेतर परिषदेचे अध्यक्ष या नात्यानें जें भाषण केलें, त्यामुळें बऱ्याच भिक्षुकी पत्रकारांची माथीं भडकून गेलेलीं दिसतात. आज केशवरावांनी जें महत्पाप केलें आहे, तें इतकें भयंकर आहें, इतकें घोर आहे कीं तें जर त्यांच्या आवाजानें केलें असतें भर बुधवारांत त्याची जीभ कापण्यांत आली असती आणि आज जर महात्मे, पेशव्यांचे राज्य असतें, तर केशवरावला फाशीशिवाय दुसरी कसलीहि शिक्षा मिळाली नसतीं. आज जरी इंग्रजांचें राज्य असले तरी त्यांनी फार शेफारून जाणें बरें नव्हें! राज्य इंग्रजांच्या नावांचें असलें तरी नांव त्यांचे आणि गांव भटभिक्षुकांचें हें त्यांनी विसरून चालावयाचे नाहीं. पुष्कळ वेळां पुष्कळांना अनुभव आला असेल कीं अशा शेकडों भिक्षुकी गुर्मीच्या गोष्टी ब्राह्मणेतरांच्या उरावर नाचतात कीं त्या वेळीं राज्य इंग्रजांचें कीं भटाभिक्षुकांचें? असा प्रश्न उद्भवतो; आणि त्याचें उत्तरहि हेंच द्यावें लागतें कीं इंग्रजी सत्ता ही नुसती माया आहें आणि खरी सत्ता भिक्षुकांचीच आहे. ब्राह्मणेतरच तेवढे भिक्षुकांच्या पायाचे तीर्थ पितात असें नव्हे, तर इंग्रज सरकारसुद्धा अजून ब्राह्मणांच्याच ओंजळीने पाणी पीत असल्याचें दिसून येते. असे हे सर्वसमर्थ ब्राह्मोव्युत्पन्न ब्राह्मण त्यांच्यावर केशवराव बागड्यांनी भव्य प्रांतांतील वर्तमान ब्राह्मणेतर चळवळीच्या बऱ्याच परिषदेंत वाटेल तसे तोंड सोडावें या पापाचें प्रायश्चित्त ते कोठें भोगणार?

सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळींनी ब्राह्मणांच्या मनुस्मृति प्रासादिक अहंमन्यतेच्या पाठीचे मणके मणके मोजून काढलें तरी भिक्षुकांची गुर्मी कांही वठणींवर येत नाहीं. घोरपडांची मान कापून शीर धडावेगळें केलें तरी तें कित्येक तास जिवंत राहतें, सरपटत जातें. इतकेंच नव्हे तर कीडा मुंगी माशींलाहि मटकावतें. असलाच कांही तरी मामला इरसाल ब्राह्मण्याचा दिसतो. केशवराव बागड्यांचें

भाषण म्हणून दोन तीन कॉलम मजकूर नागपूरच्या महाराष्ट्र पत्रांत प्रसिद्ध झाला आहे. बातमीदाराने तो लघुलेखन पद्धतीने घेतला कीं कल्पनेत साठवून मग निवांतीनें घरी बसून प्रसविला, हा महत्त्वाचा मुद्दा गौण मानून आहे तसाच मजकूर खरा मानला, आणि त्यातील 'टाळ्यांच्या'ऐवजी 'हंशा' वगैरे पोरकट भिक्षुकी मल्लीनाथी बाजूला ठेवली, तरी त्यांत असे कोणते विधान आहे कीं ते बागडेच तेवढें नव्यानें बोलले आणि जे आजपर्यंत कधीच कोणी सप्रमाण सिद्ध केलेले नाही? ब्राह्मणेतर पत्रें नव्हतीं तेव्हां अशा प्रकारचे खोटेनाटें रिपोर्ट व मल्लिनाथ्या ब्राह्मणेतरांनीं निमूट मान्य केल्या. पण मनु आता बदलला-नव्हें ठार मेला आहे. आतां या जुन्यापुराण्या डुंबत्या उपायांची शस्त्रे कशाला पाजळता? श्री. बागड्यांच्या व्याख्यानांतलें अनेंक उतारे अनेक भिक्षुक पत्रकार उद्धृत करून त्यावर आपली भिक्षुकी मल्लिनाथी भिरकावीत आहेत. आज पर्यंत कोणत्याहि ब्राह्मणेतर अध्यक्षांचें भाषण भिक्षुकी पत्रांत इतकें दुमदुमलेले आठवत नाहीं. त्या बागड्यांवर भिक्षुकांची कृपादृष्टी बरीच दिसते. भिक्षुकी पत्रांना नाचावयास लावणाऱ्या अनेक उताऱ्यांपैकी एक उतारा खाली दिला आहे-

''पुराणरचना, धर्मपंथांची निपज, दुसऱ्या धर्मांचा पाडाव वगैरे साऱ्या गोष्टी या ब्राह्मणांनी स्वत:च्या चैनींसाठी केल्यां. आम्ही ब्राह्मणांचे बैल झालो; व ब्राह्मण ऐदखाऊ,बलिष्ट व उन्मत्त भिकारी झाले. आम्ही भिक्षा द्यावयांची व उलट आम्हीच त्यांच्या पाया पडावें! ब्राह्मणाला स्वत:च्या पोटापुढें दुसरें कांही दिसत नाही. हिंदु लोकांचें मोठें संकट म्हणजे ब्राह्मणाचें पोट होय.(हंशा) (या उद्गाराने श्रोते हसले कीं हा गद्धा रिपोर्टर हंसला? (सं.प्र.) या पोटापायीं आपलें स्वातंत्र्य गेलें. ब्राह्मणांच्या पोटांत न्याय, सत्य, देव, साधुसंत सर्व कांही गेलें। हे ब्राह्मण नांदत्या घरास काडीं लावण्यासाठीं निघाले आहेत. ब्राह्मणरोग सध्यां बराच पसरला आहे. परवां तर पी. सी. रॉय म्हणाले कीं, ''माझ्या हातीं सत्ता आली तर मी ब्राह्मणांचे पार्सल करून पासिफीक महासागरांत फेंकून देईन.'' मी म्हणतो तसे करू नका. उगाच तेथील माशांना हा व्याप नको! ब्राह्मण जात बोलल्यांप्रमाणे काहीं करींत नाहीं. त्यांच्या कोणत्याही स्वार्थत्यागावर माझा विश्वास नाहीं. ह्यांच्यापैकी कोणी प्रत्यक्ष जीव दिला तरी त्यांत स्वार्थ हा असावयाचाच! काहीं नाहीं तर मेल्यानंतर देऊळ उभे होईल; आणि त्याला पैसा मात्र ब्राह्मणेतरांचा लागेल! हे ब्राह्मण सर्व गोष्टींचा फायदा घेतात. घर जळलें, घर बांधले, मुलगा जन्मला, माणूस मेला, बारसें झालें, लग्न झाले, नाही तर श्राद्ध झालें काही झाले तरीं ते आपले पैसा मिळवितातच. मला एक म्हण आठवली. आहे-

''इस दुनियामें तीन कसाई,
खटमल पिसव, बम्मनभाई।''

जगांत तीन कसाई असून त्यात ब्राह्मणांचा नंबर लागतो. ढेंकूण आणि पिंसू हे मुंगी वगैरे प्राण्यांप्रमाणे अन्नाचें रक्त न बनविता आयतें रक्त शोषून घेतात. तसेंच हें ब्राह्मण आयत्या ठिकाणीं येतात.''

या उताऱ्यांत कोणतें विधान खोटे आहे? महाराष्ट्रापुरतेंच पाहिलें तरी स्वधर्म आणि स्वराज्य यांचें तळपट ब्राह्मणांनीच उडविले आहे. महाराष्ट्रीयाच्या विद्यमान गुलामगिरीचें व अवनतीचें असें कोणते कारण 'महाराष्ट्र'कार दाखवून देण्यास तयार आहेत कीं त्यांच्या मुळाशीं निदान एक तरी ब्राह्मण नाहीं? बागडे हे उघड उघड मागासलेल्या जातींपैकीं एक सुशिक्षित. त्यांना ब्राह्मणांप्रमाणें सुटसुटीत डावपेंचाची मुंजेगिरी किंवा नरसोंपती कशानें साधणार? अंत:करण पेटलें, म्हणजे ते आपले विचार अशाच वेड्यावागड्या भाषेंत बोलणार. पण त्यात तरी त्यांनी असा काय मोठा सत्याचा खून पाडला

कीं 'महाराष्ट्र'कारांनी व त्यांच्या जातभाई पत्रकारांनी ब्राह्मण्याच्या कळवळ्यानें जेष्ठांतच फाल्गुन उरकून घ्यावा? बांधवहो, पुरे झाली ही तुमची आत्मवंचना. आता या तुमच्या अरण्यरुदनाला कोल्हा कुत्रीसुद्धां भीक घालणार नाहींत. आत्मसंशोधन करा, कृतकर्माचीं आठवण करा, अंत:करण जरा दिलदार बनवा. अहंपणाचा ताठा सोडा आणि मग स्वराज्याच्या गप्पा मारा. गुलामगिरीच्या प्रवर्तकांनीच स्वातंत्र्याची पुराणे सांगितलीं तर उद्यां बाजारबसव्या वेश्या पातिव्रत्यावर प्रवचनें झोडूं लागतील!

३१ मेच्या 'महाराष्ट्र' पत्रात खालील 'चुकीची दुरुस्ती' आली आहे-

''वर्धेच्या ब्राह्मणेतर परिषदेंत, ''केशवराव जंगमवार यांस ...जांबिया अगर तीक्ष्ण चाकू किंवा सुरी अशा प्रकारच्या शस्त्राच्या दोन जखमा झाल्या'' अशी हकीकत आमच्या गेल्या अंकी (व आजहि) दिलं आहे. त्यासंबंधी 'ही गोष्ट खोटी आहे. मला जांबियाचा वार लागला नाही.' असें श्री. केशव जंगवार(!) हे कळवितात.''

प्रत्यक्ष सभेच्या ठिकाणी हजर राहून विश्वसनीय रिपोर्ट घेणाऱ्या 'महाराष्ट्रा'च्या बातमीदाराने परिषदेतील मारामारीचे हुःश हुःशचे शिव्यागाळींचे जें इतर भारूड चित्रित केले आहे. तेहि याच मसाल्याचें समजायचें कीं काय? प्रत्यक्ष नांव देऊन रक्तपाताची बातमी प्रसिद्ध करणारा प्राणी रिपोर्टर का पोर्टर? सं.प्र.

गुरूची विद्या गुरूस भोवते

स्वराज्यवादी केसरीनें कै. शाहू महाराज करवीरकर यांना स्वराज्यद्रोही छत्रपती ठरविल्यानंतर व विशेषत: त्यांच्या मृत्युदिनापासून, ब्राह्मणेतर वादाची चर्चा केसरी बऱ्याच विवेकाने व सावधगिरीनें करीत असतो. इतकेच नव्हें तर, पुष्कळ वेळां त्याच्या सूचनाहि ग्राह्य असतात. मात्र ही विचार पालट, हृदय पालटाचेच चिन्ह आहे, असे सिद्धांत बांधण्याचे धारिष्ट आजच करणें बरे नव्हें. केसरी कंपू कोणत्या वेळी कशी पगडी फिरवून कोणाला काय टोपी घालील याचा अंदाज बांधणे कठीण आहे. गेल्या २ जूनच्या अंकात १३ ते १७ अशी पांच स्फुटे ब्राह्मणेतर वादावर केसरींत आली आहेत. त्यांचा यथास्थल येथें विचार करणें प्राप्त आहे. १३व्या स्फुटात श्री. बागडें यांच्या वर्धा व्याख्यानानें उत्पन्न केलेल्या ज्वालामुखी स्फोटाचा उल्लेख आहे. हे व्याख्यान व त्यावर भिक्षुकी पत्रांनी चालविलेला थैमान पाहिला तर श्री. बागडे पुष्कळच बेफाम भडकले असले पाहिजेत, असे बिनचूक अनुमान काढण्यास कांही हरकत नाहीं. पण त्यांच्या समग्र व्याख्यानात सत्य गोष्टींच्या -किंचित् जहाली 'राष्ट्रीय थाटाच्या वळणावर -स्पष्टतम उद्घाटनापेक्षां कमी अधिक कांही नव्हते, हें प्रत्येकाला कबूलच करावें लागेल. श्री. बागडे स्वत:ला कितीहि शहाणे व स्वतंत्र मतवादी समजत असले, तरी ते जहाल भटजींचेच अनुकरण करीत आहेत. त्यांच्या थैमानांत काहींच फरक नाहीं. निववळ नक्कल. तीच उर्मट भाषा, तीच बेगुमान विधानें तोच आवेश तोच त्वेष तीच व्याजोक्ती स्पष्टोक्ती व निंदोक्ती आणि लोकांची मनें खवळून सोडणारी तीच आग्यावेताळगिरी! या पेक्षां निराळें व नवीन काय आहे? आजपर्यंत जहाल

भिक्षुकांनी पत्रद्वारां, व्याख्यानांद्वारां, काँग्रेसद्वारा व आणखी शेकडो मार्गांनी जी आग्यावेताळगिरी ! इंग्रेजांविरुद्ध व ब्राह्मणेतरांविरुद्ध गाजऊन घेतली त्याची ही शुद्ध नक्कल आहे. श्री. बागड्यांची ही जहाली नक्कल पाहून 'ब्राह्मण हे ब्राह्मणतेर दुनियेचें जगद्गुरू' नव्हेत म्हणणाला प्राणी मूर्खच समजला जाइल. जे आजर्यंत जहाल ब्राह्मणांनी केलें त्याचीच हुबेहूब नक्कल हे जहाल ब्राह्मणेतर वठवीत आहेत. गुरूची विद्या गुरूला आंता फळत आहे. आपले ब्राह्मणेतर शिष्य जहालपणांत आपल्यावरहि कडी करीत असलेलें पाहून, जहाल ब्राह्मण जगद्गुरूंना वास्तविक ब्रह्मानंद निदान चिपळूणकरानंद व्हावयास पाहिजे. तो न होतां ते एखाद्या क्षुद्र पिसाटाप्रमाणें सैरावैरा थयथयाट करूं लागलतील, तर त्यांच्या विश्वव्यापी थोर पोटांत रसिकताच तेवढी बिनचुक मेलेली पाहून सारे जग या जगद्गुरूंची टवाळी करू लागेल, याचा त्यांनी विचार करावयास नको काय? महाराष्ट्रांतील सर्व चळवळींचे आद्यगुरू जे जहाल ब्राह्मण त्यांनींच जर आग्यावेताळगिरीचा पाया घालून ठेवला आहें, तर नुकत्याच जागृत झालेल्या ब्राह्मणेतरांनी तीच परंपरा त्याच अवमानांत पुढें चालविली तर यांत बिघडले कोठें? दुसऱ्याकरितां लावलेल्या सांपळ्यांत आपणच स्वत: सांपडल्यावर पाचजन्मयाला जागाच उरत नाहीं.

तुम्हाला तरी नैसर्गिक अधिष्ठान काय आहे?

सामाजिक प्रश्नाला गौण मानून केवळ राजकीय प्रश्नांत देशाच्या उद्धाराची मोट बांधणाऱ्या केसरीने ''ज्ञातिविषयक चळवळीं अखेर राष्ट्रोक्तीसच उपयोगी पडतील व त्या अभिनंदनीय आहेत.'' असा अभिप्राय व्यक्त केल्याबद्दल त्याचे अभिनंदन करणें जरूर आहे. केसरीकार म्हणतात, ''इतर अनेक जातींच्या जशा परिषदा भरतात तशीच ब्राह्मणेतरांची परिषद भरल्यास व तींत स्वोतिकारक गोष्टींची चर्चा होऊन तदनुसार ठराव झाल्यास कोणीहि त्या परिषदेचे अभिनंदनच करील.'' आजपर्यंत ज्या ज्या ब्राह्मणेतर परिषदा ठिकठिकाणीं झाल्या त्यांत 'स्वोक्तिकारक गोष्टींची चर्चा झालीच नाहीं, म्हणून त्या अभिनंदनीय नव्हेत, असा या विधानाचा सरळ अर्थ होतो. पण हा वस्तुस्थितीचा खोडसाळ विपर्यास आहे. स्वोक्तिकारक गोष्टींचीं चर्चा करण्यासाठींच परिषदा भरत असतात; ब्राह्मण भोजनासाठी नव्हेत. आतां या चर्चेत ब्राह्मणांच्या वर्चस्वाला खच्ची करण्याचा भाग असला आणि तो ब्राह्मणांच्या काळजाला झोंबण्याइतका जहाल असला तरी तो 'स्वोक्तिकारक'सदरांत कां पडूं नये, हें समजत नाहीं. भिक्षुकशाहीचे बंड मोडण्यांसाठीच जो ब्राह्मणेतर संघ निघाला, त्याच्या कार्यक्रमांत भिक्षुकांविरुद्ध चळवळीची चर्चा होऊ नयें, तर काय त्यांच्या पाद्यपूजेची अर्चा व्हावी? हे ब्राह्मणांच्या दृष्टीने 'अभिनंदनीय नसेल कदाचित. नाहीं तर नाहीं. ब्राह्मणांच्या बऱ्यावाईट सर्टिफिकीटावर हा संघ कधीं सुजला होता? केसरीकार पुढें म्हणतात ''हल्लीच्या ब्राह्मणेतर परिषदेला असें नैसर्गिक अधिष्ठानाच नसल्यामुळें तिला केवळ ब्राह्मणद्वेषाचे संकुचित स्वरूप प्राप्त होतें.'' ब्राह्मणेतर संघ ब्राह्मणद्वेषांसाठींच उभारला आहे, हीच ज्यांच्या कल्पनेला कावीळ झालेली. त्यांना ब्राह्मणेतरांची सर्वच चळवळ त्याज्य निंद्य राष्ट्रद्रोही व समाजविध्वंसक वाटल्यास तेथें कोणाचा काय इलाज? ब्राह्मणांनी आजपर्यंत

ब्राह्मणेतरांचे काय पसंत पडलें आहे, तर ही चळवळ पसंत पडली नाहीं. म्हणून त्यांनीं ओरडा करावा? शिक्षणांत अगदींच मागासलेल्या ब्राह्मणेतर समाजांच्या चळवळींत आज मोठी पद्धतशीर घटना किंवा चालना नसेल; आम्ही म्हणतो मुळींच नाही. पण हे 'नैसर्गिक अधिष्ठाना'चे बंड काय आहे? लक्षावधि ब्राह्मणेतरांच्या मूकवृत्तीचा फायदा घेऊन ब्राह्मणांनीं आजपर्यंत जे 'सार्वजनिकपणाचे ढोलकें पिठलें व 'राष्ट्रीय'पणाचे खेळ खेळले, त्याला तरी नैसर्गिक अधिष्ठान कसलें होतें?

शब्दच्छल कीं सत्याचा खून?

ब्राह्मणेतर पुढारीब्रुवांना फुटलेला गांधी-प्रेमाचा उमाळा शुद्ध दांभिकपणाचा आहे. ही केसरीची टीका वाजवी आहे. ब्राह्मणेतरपक्षानें गांधींच्या कोणत्याहि कार्यक्रमाबद्दल कधींहि सहानुभूति दाखविलेली नाहीं, मग आचरण कोठलें? उलट 'गांधींच्या असहकारी चळवळीविरुद्ध पूर्वी ठराव प्रसार झालेले आहेत. असें असतां केवळ गांधीभक्तीची ढाल पुढें करून ब्राह्मणांवर टीकास्त्र सोडण्याचा वागडेप्रकृति मंडळीचा प्रयत्न हास्यास्पदच नव्हे. तर तर धि:कारार्ह आहे. पण यापेक्षां शतपट धि:कारार्ह कर्म केसरीनें १६ व्या स्फुटांत येणें प्रमाणें केलें आहे-

''१६ इंग्रजांचे राज्य ब्राह्मणांच्या जोरावर चाललें आहे' असेंहि एक धादांत खोटें विधान श्रीयुत बागडे यांनी केलें. इंग्रजांचे राज्य स्वत: इंग्रजांच्या मेंदूंच्या व मनगटाच्या जोरावरच चालले आहे आणि त्यांना हिंदुस्थानांत जर कोणी साहाय्यकनें असतील तर ते ब्राह्मण नसून ब्राह्मणेतरच आहेत. लष्करांत सर्व भरती ब्राह्मणेतरांचीच आहेत. पोलिसांत बहुतेक सर्व भरणा ब्राह्मणेतरांचाच आहे, आणि केवळ महाराष्ट्रापुरती संकुचित दृष्टि न ठेवतां सगळ्या प्रांतांचा विचार केला तर बहुतेक मुलकी व दिवाणी कामेंहि ब्राह्मणेतरांच्याच हातून चालली आहेत. अर्थातच इंग्रजांची सत्ता या देशांत प्रस्थापित करण्याचें आणि सांप्रतकाळी या सत्तेची बजावणी कराण्याचे पाप जर कोणाच्या माथीं मारावयाचें असेल तर तें सर्व न्यात: ब्राह्मणांच्या माथीं मारावें लागेल, हे श्रीपंत बागडे आणि त्यांच्या कक्षेंत बागडणारे ब्राह्मणेतर यांनीं लक्षांत ठेवावें.''

संस्कृतींचें वळण नवें असो नाहीं तर जुनें असो भट आपल्या वळणावर बिनचुक कसा जातो. याचें हें स्फुट बिनतोड प्रत्यंतर आहे. आम्ही जेव्हां हें वाचलें तेव्हां हा एकादा चिपळूणकरी वाडांतला उतारा घेतला कीं काय असेंच प्रथम वाटलें. कारण 'आपण सर्वच एका जुन्या संस्कृतींत होतो व सर्वच एका नव्या संस्कृतीच्या वळणानें जात आहोंत.'' असें म्हणणारे केसरीकार असलें अनैतिहासिक व विषर्यासी विधान कसें करतील? पण हा समज अखेर खोटा ठरला. इंग्रजी राज्य ब्राह्मणेतरांच्या जीवावर चाललें आहे, ब्राह्मण कोठें औषधाला सुद्धा मिळायचा नाहीं, हें दाखविण्यासाठीं केसरीकार लष्कर व पोलिस खात्याकडे बोट दाखवितात. या खात्यांत पोकळकाष्ट्यां भटजींचा काय उपयोग? लष्करांत जंगी भटारखाना असला तरी तेथें रमणा झटत नाहीं. शिवाय येथें पोलीस खात्याप्रमाणेंच इमानाची आवश्यकता विशेष लागते. ब्राह्मणांच्या इमानाचा पुरावा बाळाजीपंत नातुप्रभुति महात्म्यांनीं एल्फिरटन बरोबरच इंग्लंडांत

आंदण पाठविलेला! मग इंग्रजांनीं ब्राह्मणेतरांचाच भरणा लष्कर पोलीसांत न करावा तर काय भेकड व स्वार्थी भटांचा करावा? लष्कर व पोलीसखाते राज्यकारभार चालवितात असें गृहीत धरलें तर कोळसा आगगाड्या चालवतो. टैपरायटर सेक्रेटरीअट ऑफिसचे काम करतो व स्टोव खायला घालतो असें कां म्हणूं नयें? ही कल्पना आज एखाद्या शेतकऱ्याला सांगितली तर तो सुद्धां पोट धरधरून हांसेल, मग स्वत:स राजकारणांतला 'नार' मनणाऱ्या केसरीला कोणी अजागळ म्हटलें तर त्यांत चूक कशी? राज्य कारभराच्या नाजूक सूत्रांच्या सर्व खात्यांत आज ब्राह्मण ढेकूण चिलटा पिसवांइतके उमाप आहेत. सर्व सेवोटरीएटें त्यांनींच गजबजलेलीं आहेत. मामलेदार सुनमफ रजिस्टरांच्या खुर्च्यां ब्राह्मणेतरांच्या संख्येच्या शतपट ब्राह्मणच खतवीत आहेत. गुप्त पोलीस खात्यांत ब्राह्मणांचा सुळसुळाट मनस्वी आहे. वाटेल तेव्हा प्राणावर गदा पडायची अशा लष्करी व पोलीसीं सुळावरच्या पोळीचा लाभ ब्राह्मणेतरांना आणि गादीवर बसून 'गोष्टी सांगेन युक्तिच्या चार'साठीं ब्राह्मणांची गोचिड गर्दी. ही वस्तुस्थिती हेंच दाखविते कीं इंग्रजी राज्यांत ब्राह्मणेतर ब्राह्मणांच्या नुसत्या पखालीचे बैल आहेत आणि 'ब्राह्मणी राज्य कैदवार' इंग्रजांच्या नांवावर 'एका परीस एक मसलती' असे ब्राह्मणच चालवीत आहेत. इंग्रेजी राज्य ब्राह्मणेतरांच्या जिवावर सुखरूप चालले आहे हे जरी वादार्थ गृहीत धरले तरी महाराष्ट्राचे स्वराज्य ब्राह्मणांनीं आपण होऊन इंग्रजांच्या पायाशी बळी दिले. हे तरी कबूल करण्याइतकी सत्यप्रियता केसरीकारांत शिल्लक आहे काय? केसरी दादा शब्दच्छल करून लोकांना भुरळ घालण्याचे दिवस आतां गेले. जसें ब्राह्मणांचे धार्मिक वर्चस्व व पेशवाई परत येणार नाही, असें आपण म्हणतां. तद्वतच असल्या खोट्यानाट्या गप्पांवर फसण्याइतकी जनताहि आज खुळी राहिलेली नाहीं. ब्राह्मणेतरांच्या चळवळींत न्यून पहण्यापेक्षा आपल्याच जातभाई पत्रकारांची कानउघाडणी करण्याचा यत्न कराल तर प्रस्तुत वादाचे तीव्र स्वरूप सौम्य होण्यास फारसा अवकाश लागणार नाहीं.

या अत्याचाराचे मूळ कोठे आहे?

नागपूरच्या महाराष्ट्र पत्रावर अब्रूनुकसानीचा खटला चालवून त्यात यशस्वी झालेले काटोलचे तहसिलदार रावसाहेब बाजीराव निंबाळकर या करारी परंतु वृद्ध गृहस्थाला ठार मारण्याचा कट उघडकीस आला आहे. सुमारे १ महिन्यापूर्वी रात्री ९च्या सुमारास तीन चार मारेकऱ्यांनी रावसाहेबांवर अचानक हल्ला करून निपचीत पाडले. हल्लीं ते नागपूरच्या मेयो इस्पितळांत अत्यवस्थ आहेत. या अत्याचारांत डॉ. पाचखेडे नांवाचे कोणी प्रतिष्ठित स्वराज्यपक्षीय गृहस्थ पकडण्यात आले असून त्यांच्या घरात मारामारीच्या खुणांची एक लाठी सांपडली आहे. रा.सा. निंबाळकर हे करडे अंमलदार व ब्राह्मणेतर पक्षाचे कट्टर अभिमानी आहेत. महाराष्ट्र पत्रावरील खटला, नुकतीच एका जमीनदाराला रा. सां.नी ठोठावलेली शिक्षा वगैरे मजकूर नीट लक्षांत घेतला तर प्रस्तुतचा अत्याचार म्हणजे केवळ काकतालीय न्यायाचा ठरणार नाहीं असा अंदाज आहे. मध्यप्रांतीय सरकारनें या प्रकरणाच्या कुळामुळांचा पूर्ण तपास करून गुन्हेगारांना कडक (डिडरंट) शिक्षा ठोठावल्याशिवाय राहू नये अशी आग्रहाची सूचना आहे.

□□□

खास पुरवणी

कै. धनुर्धारीचे उद्गार

सन १८९६ साली कै. शिवाजीराव होळकरांवर खालसांतल्या भिक्षुकी पत्रांनी बीभत्स निर्भत्सनेचें जें भयंकर काहूर उठविलें होतें, त्यांचें निराकरण करण्यासाठी त्या वेळचे 'केसरी'चे उपसंपादक कै. टिकेकर उर्फ 'धनुर्धारी' यांनीं अनेक लेख लिहून 'मुंबईच्या नित्याहिक प्रभाकर पत्रांत'होळकरांची 'इंदूर प्रकरणाची दुसरी आणि खरी बाजू' प्रसिद्ध केली होती. त्याचा एक २६० पृष्ठांचा व अधिक ७६ पानें पुरवणीचा एक ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यांतील कांहीं उतारे खालीं देत आहों त्यावरून या नि:स्पृह ब्राह्मण लेखकाच्या सत्यप्रियतेची उत्तम साक्ष पटेल. एवढेंच नव्हे, तर सध्या मौज चाबूक व करमणूक या पोटार्थी पत्रकारांनी चालविलेला शिमगा वाचणाऱ्या वाचकांनाहिं पुष्कळ बोध होईल.

''उणें पुरें एक वर्ष झालें. इंदूरकर श्रीमंत महाराज सरकार बाळासाहेब यांच्यासंबंधानें अत्यंत असभ्य व पराकाष्ठेच्या उद्वेगजनक भाषेंत दर आठवड्याच्या आठवड्यात एक सारखी छापील निंदा चाललेली आहे. आणि ती अक्षरश: खरी असावी असें पुष्कळांस वाटते. कारण (अ)आर्धी आमचा समाज अत्यंत मूढ विश्वासाचा पडला. वाटेल त्या वाटेल तशा गप्पा-मात्र स्वत:शीं अर्थाअर्थी संबंध नसणाऱ्या बाबतींत ठोकिल्या तरी त्यांजवर आमच्या लोकांचा विश्वास हा आपला बसावयाचाच. नुसता विश्वास बसून रहावयाचा इतकेंच नाहीं, तर हस्तेपरहस्तें त्या निंदेचा फैलाव करण्याच्या कामीं आगंतुकी कुमक हटकून व्हावयाची. (ब) आपल्या फुरसतीची वेळ लोकांची नालस्ती आणि निंदा करण्यात घालविण्याची दुष्ट खोड आमच्या लोकांस फार लागली आहे, ती इतकीं कीं चार चौघे जमलें कीं त्यांची करमणूक म्हणजे लोकांच्या खऱ्या खोट्या निंदेंत जीभ विटाळविणें होय, असा प्रकार सर्वत्र आढळतो. आणि त्यामुळें व्यंगाकडे नजर म्याग्निफाइंग ग्लासासारखी अत्यंत ढोबळ होते आणि गुणाकडे पाहणें जिवावरले संकट वाटावें अशांची संख्या फार आढळते. (क) काय लिहिलें आहे हें न पाहतां किती लिहिलें हें पाहूनच जास्त जोरानें व शिरा ताणून बोलणाराचा 'पक्ष सबळ असला पाहिजे' याप्रमाणें इतके सगळे का खोटे असेल?' अशासारखीं विधानें बांधण्याचा सांप्रदाय फार आढळतो. (ड) छापील मजकूर उघड उघड लिहिला असूनही तो खोटा म्हणण्याचीं कोठेंच कांही हालचाल दिसत नाहीं तेव्हां तो मजकूर खरा असावा अशा प्रकारें तर्क लढविणारेहि कोणी कोणी आहेत. (इ) 'आम्हीं

छापील निंदा केली आहे ती खोटी ठरऊन आम्हाला वाटेल तर शिक्षा करा,' अशा प्रकारच्या गर्जना चाललेल्या असतांहि ज्यांच्या अब्रूवर सपाटून हल्ला होतो ते स्वस्थ मूग गिळून बसतात तेव्हां काहीं तरी तेथें पाणी मुरत असलेच पाहिजे ही कोटी पुढें येणें साहजिक आहें. (फ) एकानें निंदा करणाचा विडा उचलला तर त्याच्या इतर व्यवसाय बंधूंनी आपल्या स्वस्थ बसण्यानें काय म्हणूक कुमक करावी? (ग) पूर्ण विचारी, खऱ्याखोट्याची निवड करण्या इतपत तर्कशक्ति असणारे आणि विद्वान, देश हितैक बुद्धि, परोपकारस्त आणि सत्याभिमानी अशी मंडळीसुद्धां 'नरो वा कुंजरोवा' म्हणून स्वस्थ बसते.''

+++

''भाईंनो हे इंदूरप्रकरण तुमची सर्वांची किंमत किती हे चांगलें व्यक्त करीत आहे. तुमच्यांत सत्याभिमना किती आहे हें अजमावून पाहणें या इंदूरप्रकरणाने चालविलें आहे. सत्याची चाड, देशाचा अभिमान खऱ्याखोट्याची पारख, स्वत्वाचा जोर, गुणग्राहकतेचा जोम इत्यादिकांचें वास्तव्य महाराष्ट्रीयांत किती आहे हे पाहण्याचा निकषच हे इंदूरप्रकरण होय असे खास समजा. खोट्या व एकतर्फी निंदेच्या श्रवणानें असें मूर्खासारखें वाहवत जाऊन आपला भंपकपणा व्यक्त करून दाखविण्याव्यतिरिक्त तुम्ही कांहींच साधन करीत नाहीं हे विसरूं नका. एकतर्फी मजकुराच्या वाचनानें आहे हेंच खरें. अशी ठाम समजूत करून घ्यावयाची, दुसरी बाजू ऐकावयाची नाहीं, ती ऐकण्यास नाखुषी दाखवायची यांत तुमच्या अकलेचा नादानपणा तेवढा व्यक्त होत आहे हें कसें तुम्हाला अद्याप कळत नाहीं. ऐकीव व एकतर्फी निंदेच्या श्रवणानें तर्र झाल्यामुळें एक प्रकारची धुंदी चढली आहे म्हणून दुसऱ्या आणि खऱ्या बाजूचीं कल्पनासुद्धा तुम्हांस असह्य वाटतें असें आपल्या आचरणावरून तुम्ही दाखवूं लागलां तर त्यांत तुमच्यां नादान विचारशक्तीचीच किंमत होणार आहे हें कसें तुम्हीं विसरतां? एकतर्फी व अतिशयोक्तीची खोटी निंदा ऐकून व वाचून ती खरी मानण्याइतका तुमचा मेंदू पोकळ झाला आहे कीं काय हें कांहीं कळत नाहीं! यास्तव स्वत:ची अशी फजीती होऊं नये म्हणून तरी दोन बाजू चांगल्या ऐकल्याखेरीज स्वत:चे कांहींच मत बनवू नका एवढी तरी कृपा करा म्हणजे पुरे. मनुष्यमात्राला आपली अब्रू ही प्राणांपेक्षांही जास्त प्यारी असते. अब्रूसाठी कैकांनी प्राण दिलेले आपण पाहतों आणि ऐकतो. एखाद्याच्या द्रव्याचा अपहार केला तर तो बापडा तेवढ्या रकमेनें निर्धन होऊन आपणा स्वत:ला तितकी श्रीमंती तरी येईल. पण एखाद्याची अब्रू खराब केली तर स्वत:चा कांहीं एक फायदा न होता त्या बिचाऱ्याचा प्राणाहून प्यार अशा अब्रूचा मात्र खून होतो. प्राणाचा खून करणाऱ्यांपेक्षा अब्रूची हानी करणारा अत्यंत अधम म्हटला पाहिजे. इकडे लक्ष ठेवा. श्रीमंत बाळासाहेब होळकर यांच्या अंगच्या गुणांचे चीज त्यांच्या देश व भाषाबंधूंनी करू नयें तर करावे तरी कोणी? मनुष्यप्राणी म्हटला म्हणजे तेथें दोष शक्य आहेत. पण डुक्कर सुग्रास अन्नाकडे न पाहतां घोणरड्या विष्ठेकडे तडक मुसंडी मारीत पळतो, त्याप्रमाणे गुणराशीकडे दुर्लक्ष्य करून दोषकणांचें इतकें प्रस्थ माजवावें ही काय माणूसकी? हा काय स्वदेशबांधव प्रेमा? कां ही स्वराज्याची कळकळ? याला म्हणावे तरी काय, याचा कोणीच कसा विचार करीत नाहीं याचे मोठें आश्चर्य वाटते. जाग्याला जागा कोण करणार? आमच्या देशात आज्ञाधारकाचा लोप होऊन ज्ञानसूर्य उगवला आहे. प्राच्य राष्ट्रांत पाश्चिमात्य सुधारणा, शहाणपणा, स्वाभीमान, स्वदेशीची कळकळ स्वकल्याणेच्छा इत्यादिकांचा खुराक लागत चालला आहे इत्यादि प्रकारची घमेंड आम्ही बाळगावयास लागतो न लागतो तोच पाहू कितपत हें सर्व मुरलें आहे ते असें म्हणण्याचा सांप्रत हा प्रसंग आला

आहे. नवीन जोमाचे अवसान किती हेंहि या इंदूरप्रकरणावरून चांगले ठरणार आहे.

यास्तव कृपा करून पुढें दुसरी बाजू येत आहे ती लक्षपूर्वक अवलोकन करा आणि मग काय तें आपलें मत बनवा, एवढ्या प्रार्थनेचा पुन: पुन: उच्चार केला आहे त्याची क्षमा असावी.

+++

प्रबोधनाच्या मे १९२५ च्या मुख्यांकांत 'स्त्रियश्चरित्रम देवों न जानाति' हा लेख 'महामायेचा थैमान'या नांवाच्या पुस्तकरूपानें आज सर्व महाराष्ट्रांत यापूर्वीच फैलावला आहे. त्यांत कै. शिवाजीराव होळकरांवरील १८९६ सालच्या काहुराबद्दल आम्हीं जी पुराव्याचीं विधाने केलीं आहेत, त्यांवरून एका पोरसवद्या परंतु होतकरू पत्रकारानें आमच्यावर असा आरोप केला आहे की, या मुमताझ प्रकरणांत ठाकरे ब्राह्मणांनाहि निष्कारण घुसडीत आहेत. आमचें पुस्तक नीट काळजीपूर्वक वाचणारांना हा आरोप किती बाष्कळपणाचा आहे हें सांगावयास खास लागणार नाहीं. मुमताझ प्रकरणांत ब्राह्मण नव्हतें व नाहींतहि. तें होते असें आम्हीं कोठेंहि म्हटलेलें नाही. मात्र १८९६सालाप्रमाणेच १९२५ सालच्या होळकर निंदेतहि मौज चाबूक करमणून इत्यादि ब्राह्मणी पत्रकारांनीच विशेष पुढाकार घ्यावा, ही खेदाची गोष्ट तर खरीच; पण योगायोग मोठा विलक्षण नव्हे, असें कोण म्हणेल? कै. शिवाजीरावांच्या वेळीं ब्राह्मणांनी कोणता भाग घेतला होता? याविषयी कै. धनुर्धारी यांचेच उद्‌गार येथें नमूद केले आहेत : (पृ. ६९७२ इंदूर) इंदूर संबंधांचा बोधाटा सारा माजविला. * 'पंडत लोकांनी' म्हणजे इंदूरास असणाऱ्या * दक्षिणात्य ब्राह्मणांनी. कामवाल्याचा वर्ग म्हणजे सारी * ब्राह्मण मंडळी. निंदक गिरणी व तिला कच्चा माल पुरविणारे, तिच्यातून बाहेर पडणाऱ्या मालाचें कौतुक करणारे इत्यादि सर्व महाराष्ट्रीय ब्राह्मणच. आजमितीला ब्राह्मण हा बेइमानपणाचा पर्याय शब्द झाला आहे. ब्राह्मण पुष्कळांच्या डोळ्यांत यथायोग्यपणें सलूं लागलें आहेत. ब्राह्मणांचे कैक चाळे दरोबस्त ब्राह्मण तोंडास काळे फासीत सुटतात आणि ब्राह्मणांचे तेज त्यांचेच गुण पाजळण्यानें आहे हचा झाला आहे. जिकडे तिकडे ब्राह्मणांचा खटला होईल असें बोलण्यावागण्याची प्रवृत्ति आढळते. परवानगी रसरसीत सत्य तर खरें, पण पराकाष्टेचे विशेष बोलणें बोलावयाचें म्हणजे हल्लींचें ब्राह्मण आहें. भयंकर नादान व निर्लज मतलबी होत चालले आहेत व झालेले आढळतात. प्रत्यक्ष देवासारखी योग्यता म्हणून म्हणून शतकानुशतकें डंका गाजविणारी ब्राम्हण मंडळी विषारी सर्पासारखी जहाल वाटावी हे खचित भयंकर दुर्दैव होय. आपल्या एकाच्या कृतीने इतर स्वजातीयांस खाली मान घालून बसण्याचा प्रसंग यावा याची क्षिती ब्राह्मण अपराध्यांस कांहीच वाटूं नये हें अखिल जातीचें दुर्दैव आहे; आणि असला भयंकर अपराध करणाऱ्यांचे मुखावलोकनही करू नये, इतकी जहाल तिरस्कारबुध्दि इतर स्वजातीयांत उपजेल तेव्हांच एकाच्या दुष्कृतीचें परिणाम इतर निरपराध्यांस भोगावे लागणार नाहींत. जन्मात येऊन मिळवावयाचे काय तर कीर्ति किंवा अपकीर्ती ही गोष्ट साऱ्या शहाणपणाचा मक्ता घेणाऱ्या ब्राह्मणांच्या ध्यानात येऊ नये हे त्यांच्या पेक्षा त्यांच्या दरोबस्त जातभाईंचेच दुर्दैव होय. न्यायाने मिळविलेल्या पैशांतली एक फुटकी कवडीसुद्धा आपल्या प्रेताबरोबर येत नाहीं मग अन्यायाने मिळविलेल्याची गोष्ट कशास बोलावी? हें तत्त्व ब्रह्म जाणणाऱ्या ब्राह्मणांच्या मनांत बिंबलेले त्यांच्या कृतीवरून तरी निदान

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द दिसत नाही.

दिसत नाहीं हे फार आश्चर्यकारक आहे. इंदूर संस्थानांतील कांहीं 'ब्राह्मण मंडळींस' हात जोडून प्रार्थना करावयाची ती एवढींच कीं, महाराज भृदेवहो तुम्ही शिवाजीसारख्या पृथ्वीपतीची खोटी खोटी निंदा करून कोणत्या पुण्याची शिवाजी महाराजांस वैताग येई अशा तुमच्या नादान व बेईमानी चाळ्यांची फळें आतां तुम्ही कोठें भोगणार? तुमच्या या बेईमानाचे परिणाम तुमच्या इतर जातवाल्यांस विनाकारण भोगावे लागतात, तरी कांही शरम धरां, अधिकार पैसा विषयलालसा अशा खोट्या आणि क्षणभंगुर गोष्टीस भुलून ज्यांत जन्मला त्या कुलाचें वाढला त्या देशाचे वागतां त्या मंडळांचे नांव बहुकरांत स्वत: नरकाच्या घोर यातनांचा उपभोग घेण्याची साधने का संपदिता?

यात काय अक्कल आहे? तुम्हीं ज्ञानी म्हणवितां, धर्मगुरू म्हणविता तुमची ऐट आणि स्वामीद्रोह, राजद्रोह, निंदा सत्यापलाप भल्याच्या अब्रूचे खराबी लोकांस फार भयंकर पातकांचे कारे बाबांनो विनाकारण जमले कीं तटकरी होतां? मनुष्य आहे तिथें दोष असतोच. खोट्या नेत्रांनी दुर्गुणांकडे पहावें, पदरचें, आश्रीत अशांची नजर सद्गुणांकडे असली पाहिजे. आपणांस भोगावें लागणारें दु:ख आपल्या कर्मांचे फळ नव्हें म्हणून भासविण्याचा तुमचा प्रयत्न मनुष्यापुढे सिद्धिस जाईल. पण ईश्वरापुढें खरें लपणार नाहीं. शिवाजीराव महाराज तुमचा मालक, तुमचा अन्नदाता, तुमचा पालनकर्ता, तुमचा प्रभु त्याची निंदा दुसऱ्यानें केलेलीं ऐकून तुमच्या आंगाचीं लाही लाही झाली पाहिजे. त्याचा अभिमान बाळगणें तुमचे शील, त्या महाराजांचें कौतुक करणें तुमचे कर्तव्य पण तसें कांही एक न करितां सर्व पाडे उलटें चालवितां यांत तुम्हां तुमच्या खाविंद शिवाजीरावांचे, ईश्वराचें आणि एकंदर तुमच्या मंडळींचे अपराधी होत आहां हे कांही चांगले नाहीं, याचा विचार करा, आणि लौकरच शुद्धीवर या. पाप हें फार दिवस टिकून राहात नाहीं. पापाचा झाडा हा द्यावा लागतोच लागतो. याच्यापेक्षां जास्त 'ब्रह्म'जाणणारे अशी घमेंड बाळगणाऱ्यांस सांगावयाचें तें काय आहें?''

ही १८९६ची वस्तुस्थिती आज खालसांतल्या भूदेवांनाच लागूं पडते. इंदूरांत या मासल्याचे ब्राह्मण जवळ जवळ आतां नसावें असें मानण्यात पुष्कळ जागा आहे. आमच्याकडे आलेल्या अनेक सभांच्या अहवालावरून इतकें बिनचूक दिसतें कीं 'इंदोरात ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद मुळींच नाहीं आणि महाराजांवर आब्राह्मण मुसलमान शीख आदींचे प्रेम व विश्वास वज्रलेप आहे तसाच कायम आहे.

चवताळलेली वाघीण

मुमताझ बेगमची सध्याची स्थिती चवताळलेल्या वाघिणीप्रमाणें झालेली असल्यास त्यांत नवल नाहीं. तिचा 'लव्हर' बावला ठार झाल्यामुळें तिला दाहिं दिशा शून्य वाटणे साहजिक आहे. इतकेंच नव्हे तर आपले भावी आयुष्य कसें, कोठें आणि कोणाजवळ जाणार या भ्रांतीने तिची चित्तवृत्ति बेफाम भडकलेली असल्यास त्यांतहि निसर्गाविरुद्ध असें कार्ही नाहीं. चरित्राच्या पूर्वार्धात केलेल्या कृतकर्मांचा परिपाक भयंकर नरमेधांत झाल्यामुळे उत्तरार्धांत या बाईंच्या पाणिग्रहणाचा मान आपली मान गहाण ठेवून कोण स्वीकारील? हीहि विवंचना या महामायेला लागली असेल. चवचाल मनोवृत्तीच्या नाटकाचा

एक अंक समाप्त झाला. परंतु इंदोराहून लांबविलेल्या जवाहिऱ्याच्या घबाडाचा दुसरा अंक आता लौकरच चालू होईल आणि त्यातून आपल्या सफाई कसें निसटतां येईल याचें डावपेच लढविण्यात ही तरतरीत डोक्याची बाई रात्रंदिवस गुम आहे. घबाड घेऊन सुखरूप निसटण्यासाठीं निरनिराळ्या ब्रिटिश अधिकाऱ्यास तिने केलेल्या गुप्त अर्जांची भेंडोळी आतां सर्वांना माहितच झालेलीं आहेत. शिवाय कायदेबाजीत आणि कज्जेदलालींत मुरलेल्या मुरब्बी मुरंब्याच्या बरणींत ही बया सध्यां सांपडल्यामुळें, जवाहिऱ्याच्या वासासाठीं किंबहुना ग्रासासाठीं वाटेल त्या कायदेबाजीचें खेळ तिला खेळावयास लावणाऱ्या कज्जेदलालांची आज बकाली मुंबईत वाण नाही. तिच्या स्तुतिपाठकांना ती जरी आज अस्मानाची हिरकणी वाटत असली तरी इंदूरचे जवाहीर पचवितांना तिला हिरकणी खाण्याचा प्रसंग न येवो म्हणजे मिळवली. खुनाच्या प्रकरणात ब्रिटिश रियासतीचे पोलिस पकड वॉरंटे घेऊन इंदूर रियासतींत जाताच होळकर सरकारनीं कोठच्याहि प्रकारचें आढेवेढे न घेतां किंवा कसलाहि प्रतिबंध न करतां केवळ न्यायाला मदत व्हावी एवढ्याच उद्देशानें वाटेल त्याला गिरफदार करण्याची मोकळीक सर्रास दिली, तर मुमताझनें केलेल्या विश्वास घाताचे वॉरंट इंदूर कोर्टांत उद्या सुटलेच तर ब्रिटिश रियासतीला त्याला मज्जाव करण्याची काय प्राज्ञा आहे? स्वसंरक्षणार्थ माझ्यावर बंदोबस्त ठेवावा अशा प्रकारचा जो एक अर्ज मुमताझने व्हाइसरॉयकडे पाठविलेला आहे त्याच्यापाशी जवाहिर पाठविण्याची कारवाई आहे हे किंचित विचार केला असता कोणासहि समजून येण्यासारखे आहे. प्रस्तुत कटांतले आणखी बरेच लोक जिवंत आहेत म्हणून मुमताझने केलेली हाकाटी हा एक त्या कारवाईवर चढविलेला आडाखेबाज डाव आहे. 'लव्हर'मेल्यामुळें चवताळलेली वाघीण वाटेल त्याच्या नरड्याचा आतां चावा घेऊं म्हणेल तर तसें तिला कोण करूं देणार? बरें इंग्रज सरकार उठल्या सुटल्या असल्या कारस्थानी गांवभवान्यांना संरक्षण देऊ लागेल तर ते संरक्षण म्हणजे तरी काय? सारांश, मुमताझचा स्वसंरक्षणार्थि केलेला अर्ज म्हणजे होळकरी चापांतून निसटण्याची धूर्त कारवाई आहे, हें व्हाइसरॉय साहेबांना न कळण्याइतके ते खास दूधखुळे नव्हेत.

विपर्यस्त व कलुषित वातावरण

मुमताझ महामायेच्या थैमानात बळी पडलेल्या बावलाच्या खुनाच्या खटला मुंबईच्या सेशन कोर्टात चालून झालेला निकाल आतां सर्वांना समजलाच आहे. ज्यूरीनें आणि न्यायमूर्तींनी एकमताने दिलेला न्याय शिरसावंद्य मानने प्रत्येक कायदाप्रिय नागरिकाचें कर्तव्यच आहे. न्यायासन आणि न्याय यांविषयीं मानवतेच्या मनांत प्रत्यक्ष पारमेश्वरी अस्तित्वाइतका आदर जरी वसत असला, तरी न्यायदानाचें कटुकर्तव्य बजावणारे सन्माननीय जनमानवच असल्यामुळे त्यांचे विकार व विचार बऱ्यावाईट भावनेच्या वातावरणांत कधीं काळी हेलकावें खाणारच नाहींत असें नाही. प्रस्तुत खटल्याच्या न्यायदानाबद्दल यत्किंचतूही पक्षपाताची शंका व्यक्त न करतां त्रयस्थ नात्यानें सुचलेले विचार प्रदर्शित करणें आमचें कर्तव्य आहे. प्रस्तुत खून झाल्यापासूनच मुंबईच्या वर्तमानपत्रांनीं मनोभावना क्षुब्ध करणाऱ्या नाना

प्रकारच्या उलट सुलट बातम्या, टीका, मन:कल्पिक वर्णनें आणि बेजबाबदार विधानें प्रसिद्ध करून वातावरण इतकें प्रक्षुब्ध व कलुषित करून ठेविलें कीं सारासार विचारांवर कोणाहि मनुष्याचें मन स्थिर होणें अशक्य होऊन बसलें. खटला चालतांना न्यायमूर्तींनी व आरोपींच्या बॅरिस्टरांनी वर्तमानपत्री गाजावाजांनी तुमच्या मनावर कांही कलुषित कल्पनांचा पगडा बसला असेल, तर तो साफ करून टाका असे कितीहि आग्रहपूर्वक बजावून बजावून ज्यूरीला सांगितलें तरी ज्युरी हे मानवीच असल्यामुळे मानवांच्या मनोवृत्तीची ग्रहणक्षमता व तिजवर होणाऱ्या कल्पनातरंगांचा होणारा थयगान त्यांना दाबून टाकतांच आला असेल असे म्हणणें म्हणजे मानवी स्वभावाचें अज्ञान प्रगट करण्यासारखें आहे. खुनासारखें संतापजनक कर्म घडल्यामुळें माणसांना निसर्गत:च येणारी चीड वर्तमानपत्री गाजावाजांने इतक्या भयंकर इरेस पेटली कीं, तपासासाठी अटक घातलेलीं प्रत्येक व्यक्ती गुन्हेगारच असावी असें ज्याला त्याला वाटूं लागणें साहाजिक आहे; आणि वर्तमानपत्री बातम्यांनी प्रत्येक भल्याबुऱ्या माणसाच्या मनावर जेथें हाच परिणाम होत होता, तेथें आरोपींना आपला खटला दुसऱ्या एखाद्या हायकोर्टांत वर्ग करण्याची परवानगी मिळणें, न्यायाच्या कमाल कसोशीच्या दृष्टीनें विशेष न्यायी झालें असतें असें आमचे प्रामाणिक मत आहें. कलुषित वातावरणांत मिळणारा न्याय कितीहि निर्मळ, निस्पृहतेचा असला तरी तेवढ्यानें आरोपींच्या मनाची शांति होत नसते. बचावाची सर्व साधने आरोपीला मुबलक देऊन त्याच्या कृतकर्माच्या बरेबाईटपणाबद्दल त्यांची खात्री पटविण्यासाठी इंग्रजी राज्यांत तरी असल्या सवलतींत सरकार आपला हात कधींच मागें घेत नाहीं असा लौकिक आहे. म्हणूनच प्रस्तुतचा खटला दुसऱ्या एकाद्या हायकोर्टांस वर्ग करण्याची परवानगी न देण्यांत मुंबई सरकारनें चूक केलीं असें आरोपींना वाटल्यास ते चूक होईल काय?

हेतू व त्याचा परिणाम

खटल्याचा सर्व तपशील आरोपींच्या जबान्या आणि फिर्यादीपक्षानें पढें आणलेले पुरावे विचारांत घेतां असें स्पष्ट दिसतें कीं, फणसे किंवा गावडे यांनी उभारलेल्या कटाचा मुख्य उद्देश 'कसेंहि करून मुमताझला इंदोरला पळवून नेणें' एवढाच दिसतो. हा उद्देश पार पाडतांना खुनासारखें एखादें भयंकर कर्म आपल्या हातून घडेल अशी त्यांची कल्पना नसावी. मुख्य लेखांत* आलेल्याप्रमाणें प्रस्तुत कटांतील तरुण मंडळीं अगदी सिनेमाची नक्कल करण्याच्या कल्पनेनेंच गेली होती. त्यांचा असा समज झाला होता चित्रपटाप्रमाणें दमधाटी दाखविली की तिकडे दोन चार बार काढले की बावला व मुमता ही भयभीत होऊन पळू लागतील व आपण मुमताझला उचलून मोटारीत घालून पसार होऊ, परंतु प्रत्यक्ष वस्तुस्थिती निराळीच घडली आणि करावयाला गेले एक व झाले भलतेच. जेथे खूनच पडला तेथे फाशी किंवा हद्दपारी अन्यायाची कोण म्हणेल? परंतु आरोपीच्या तरुण अतएव अपरिपक्व भावनांचा विचार

* उपलब्ध झालेल्या अंकात काही वाक्य वाचता येत नाहीत.

केला तर नि:स्पृह न्यायदेवतेने आपल्या सडेतोड न्यायदानांत दयेला थोडीशी जागा दिली असती तर बरे झाले असते. असे ज्याच्या त्याच्या तोंडी आज जे उद्गार निघत आहेत, त्याचा नामदार गव्हर्नर व्हाइसरॉय साहेब सहानुभूतीने विचार करतील एवढी आशा व्यक्त करण्यापलीकडे आमच्या हाती काय आहे?आरोपींच्या गुन्ह्याचा भयंकरपणा विचारांत घेता त्यांना सोडून द्यावे असे कोणीहि शहाणा म्हणणार नाहीं. परंतु त्याचें तारुण्य व त्यामुळेंच त्यांच्या हातून त्यांच्या उद्देशाव्यतिरिक्त अकस्मात घडून आलेला, अर्थात बुद्धिपुरस्सर न केलेला खून विचारांत घेतां आणि हा त्यांचा पहिलाच अपराध असल्यामुळे, दिलेल्या शिक्षेपेक्षा कमी दर्जाच्या अनेक शिक्षांपैकी एखादी दिल्यास दयामुक्त न्यायाची इंग्रजी कदर केव्हाही स्तुत्यच ठरेल.

बावलांचा खून व इंदूरचे महाराज

कित्येक वर्तमानपत्रकर्त्यांनी बावलांच्या खुनांच्या हकीकतींशी इंदूरच्या महाराजांचा खोडसाळ संबंध जोडून कित्येक विषारी लेख लिहिले, याबद्दल इंदूर शहरांत दोन सभा भरून जाहीर रीतीने निषेध करण्यात आला. सदरहू खटल्याचा निकाल प्रसिद्ध झाला असून त्यांतील ४ आरोपींस काळें पाणी व ३ आरोपींस फांशीची शिक्षा देण्यात आली. अश्लील वाङ्मय चव्हाट्यावर आणून त्याचा फैलाव करण्याचा गर्हणीय प्रयत्न मुंबईतील कित्येक पत्रकारांनी केला, याचा आम्ही निषेध करितों. मागे खून झाल्यावर 'बंगाली'पत्रांत बावला व मुमताझ यांच्या फोटोबरोबर इंदूर महाराजांचा फोटो छापण्यात आला. ** घालण्याचा ठराव पुणे येथील साहित्य संघाने पास केला. अनेकांची माथी बिघडवून त्यांना भलतीच चट लावणाऱ्या या वाङ्मयाचे प्रसार बंद करण्याचें श्रेय सरकार घेईल काय?

- नवप्रभा, सावंतवाडी, ७-६-२५

इंदोर प्रजाजनांच्या विराट सभा

हल्ली इंदोरात सर्व जातींच्या निरनिराळ्या व संमिश्र सार्वजनिक अशा अनेक सभा भरून, (१) मुमताझ कटांतील आरोपींबद्दल तिटकाऱ्याचा खेद, (२) आरोपींच्या दयेच्या अर्जाचा मुंबई सरकारनें सहानुभूतीपूर्वक विचार करावा अशी विनंति, (३) महाराज सरकारबद्दल खालसांतील पत्रांनी उठविलेलें बेजबाबदार काहूर व विशेषत: मौज चाबूक करमणूक इ. पत्रांनी चालविलेली बेलगाम बीभत्स बदनामीबद्दल तीव्र संताप व निषेध, आणि (४) श्रीमन्महाराज तुकोजीराव होळकरांविषयी उत्कट

* उपलब्ध झालेल्या अंकात वाक्य वाचता येत नाहीत.

राजनिष्ठा व प्रेम व्यक्त करणारे शेकडो ठराव दररोज पसार होत आहे. ''असल्या हजारो सभा भरल्या तरी त्याची किंमत काय असणार!'' या ज्ञानप्रकाशच्या टीकेला अनुलक्षून इंदोरचे एक 'पदवीधर कोकणस्थ ब्राह्मण' कळवितात कीं, ''कोणत्या सभेत किती किंमत द्यांयची याचें एखादें सभामीटर ज्ञानाचें प्रकाशांत सापडलें असल्यास, तें घेऊन संपादक महाशयांन मुद्दाम इंदोरला यावें व येथील विराट सभांत व्यक्त होणारी जनमनोवृत्ति अजमाऊन पहावी. उगाच बाष्कळ विधानें करू नये.''

निराधार गटारगप्प

'इंदोराधिपति श्रीमंत तुकोजीराव होळकर हे पांच वर्षे विलायतेस जाऊन रहाणार व त्यांचे प्रिन्स गादीवर बसणार, ही 'मुस्लिम औटलुक'नें प्रसिद्ध केलेलीं बातमी खोटी आहे. त्याचप्रमाणें 'शुद्धी आणि संघटन'कार्यासाठी ८९ हजारांची देणगी दिल्याची बातमी चूक असून, ही रक्कम सरकारने फ्लसच्या लोकांच्या उद्धारार्थ देणगी दिली, असे एक जबाबदार इंदूरकर कळवितात.

□□□

अग्रलेख

संपादकीय स्फुट विचार

शिवाजीच्या रखेल्या

मुंबईचे माजी पोलीस कमिशनर व विज्ञान इतिहास संशोधक मि. एस. एस. एवर्डस् I.C.S. यांनीं विलायतेत नुकतेच कोठेसें प्रसिद्ध केलें की, 'शिवाजी महाराजांनी आठ रखेल्या ठेवल्या होत्या' व्रर्णार्थ पशुच्या शिरावरि चनी उभे काकसे असे जे मुंबईचे टाइम्सकार यांना ही बातमी म्हणजे आकाशांतल्या बापाच्या पुत्रोत्सवाइतकीच वाटून, त्यांनी आपल्या नेहमींच्या हिंदूद्वेष्ट्या प्रवृतीच्या अनुसरुन शिवाजीवर 'अष्टपैलू अष्टावधानी' इत्यादी उपहासात्मक कोट्यांचा भडिमार केला. हे भडिमार करणारे लेखक जातीनें इंग्रजच असतात असे मात्र कोणी समजू नये. हिंदूजनांची निंदा करण्यासाठीं टाईम्स कचेरींत पुष्कळ भाडोत्री हिंदू लेखक 'केवळ पोटासाठी' असला शिखंडीपणा गाजविण्यास नेहमींच सज्ज असतात. टाईम्सनें शिवाजीच्या कुचाळ्या करण्यास सुरुवात करतांच, आमचे सर्व हिंदू पत्रकार लेखक आपापल्या लेखण्यांची टोकें पाजळून टाईम्सवर शिव्यांचा तोफखाना झाडू लागले. हे सगळेच लेखणीबहाद्दर गोलंदाज म्हणजे इतिहासपंडित आहेत किंवा असतात असें मुळींच नाही. या शिवाजीला आम्ही आतां अगदीं देव म्हणून सोवळ्या पंढरपुरी भावनेनें देवळे उभारून पूजीत आहों. त्या देवाची निंदा हा यवन एडवर्ड्स किंवा म्लेंच्छ टाईम्स कोण करणार? तुम्ही आमच्या शिवाजीला एक शिवी द्याल, तर त्या ऐवजीं आम्ही एक लाख शिव्यांचा मारा तुमच्यावर करू. एवढाच या सोवळ्या शिवभक्तांची उसाळी व तळमळ दिसते. टाईम्सला काय? दाणे टाकून कोंबड्या झुंजविण्यासाठींच त्यानें मुंबईस जन्म घेतला! ब्राम्हणेतरांनी भिक्षुकी * आरोप करणें जितकें मूर्खपणाचे आहे. तितकेंच अखिल हिंदुजनांनी कॉनिकल डेलीमेल प्रभृतीवर हिंदवी * विश्वास ठेवणें बेअक्कलपणाचे लक्षण आहे. शिवाजीने आठ रखेल्या ठेवल्या असें गृहीत धरलें तरी त्यांने * वाडींतल्या जमनाजी गमनाजी * का कोणाच्या लग्नाच्या बायका पळविल्या? * आठव्या हेनरजीप्रमाणे. एकामागून * राणीचा खून करून

* उपलब्ध झालेल्या अंकातील मजकूर वाचता येत नाहीत.

सहासात * दादला बनला? कांही संशोधक म्हणतात की एवर्डस् साहेबांनी आकड्यांचा घोटाळा केला आहे. शिवाजीला सहा राण्या व दोनराखा * होत्या. दोन राखा काय किंवा दोनशें काय, आकड्यांचा प्रश्न महत्वाचा नाहीं. शिवाजीनें राखा ठेवल्या तर त्यांत अनीति कोठें घुसली आणि त्याचें चारित्र्य कलंकीत झालें कसें? हाच वास्तवीक महत्वाचा मुद्दा आहे. शिवाजीचा एक 'रक्षापुत्र' मदनसिंग राणी येसूबाईबरोबर दिल्लीस गेल्याचा दाखला इतिहासांत आहे. रक्षेशिवाय रक्षापुत्र आला कोठून? तेव्हां शिवाजीला रक्षा मुळींच नव्हती या मुद्यावरचा वाद केवळ वितंडवाद होय.

रखेली ठेवण्याच्या मुद्यावर अनीतिचा शिक्का मारण्यास धाधावलेले कांदेपंडित रखेली आणि रांड यांतला मुख्य भेद विचारांत घेत नाहींत. रखेली राख किंवा रक्षा ही पत्नीप्रमाणेंच संबंधापूर्वी अक्षतायोनी असावी लागते. तिचा यजमानाशीं प्रत्यक्ष विवाह लागलेला नसला, तरी तिला 'कायदेशीर पत्नि' पदाचे सर्व हक्क मिळतात. हिंदू लॉ मध्यें अवरुद्ध स्त्री, उपपत्नी, भोगस्त्री, दासी यांचे हक्क पूर्ण मानण्यांत येतात. मात्र विवाहबद्ध पत्नी इतकेंच अखंड पतिव्रत्य रक्षेला सुद्धां चालवावें लागतें. अशा उपपत्न्या ठेवण्याची चाल प्राचीन काळापासून हिंदू मुसलमानांत अनिरुद्धपणें चालत आली आहे व या उपपत्न्यांची मुलें आपल्या बापाच्या राज्याचे जहागिरीचे किंवा इस्टेटीचे मालक झाल्याचीहि शेकडो उदाहरणे इतिहासांत आहेत. बाजीराव पेशव्याची मस्तानी ही कांहीं वेश्या नव्हे; ती श्रीमंतांच्या सौ. गोपिकाबाई इतक्याच अधिकाराची (पण विवाहविधीशिवाय पत्नी बनलेली) पट्टराणीच होती. रक्षा म्हणजे वेश्या नव्हे. शिवाय वेश्या असलेली स्त्री रक्षा म्हणून कोणी स्वीकारीत नाहीं. आजचे तंजावर घराण्यांतले भोसले * त्यांना कोणी वेश्यापुत्र म्हणणार नाहीं. राणी कीं रखेली हा प्रश्न विचारणाऱ्यांना हे कळत नाही कीं, राणी ही विवाहबद्ध पत्नी असली. तरी विवाहविधीच्या चर्पटपंजरी शिवाय केवळ एकनिष्ठेच्या भावनेवर रखेली ही सुद्धां राणीपदाचाच मान अनुभवीत असते. आजपर्यंत राजे महाराजे जहागिरदार यांनी रखेल्या ठेवल्या त्या पत्निभावनेनेंच ठेवल्या व त्यांच्या पोटच्या पुत्रकन्यांना औरसा इतकाच मान देऊन त्यांचेंही वंश वेलविस्तार वाढविले. यांत अनीति कोठे आली? विवाहविधीचे मंत्र म्हटलें कीं, नीतीची विमापालिसी उतरली असें थोडेंच आहे? लग्न रजिस्टर केलें म्हणजे तरी काय होतें? पुरुषानें म्हणायचे 'मी हिचा पती या जगीं असे' आणि स्त्रीनें म्हणायचे 'मी यांची पत्नी होऊं इच्छिते' व रजिष्टरानें दोघांच्या सह्या घेऊन 'तथास्तु' म्हटलें की झालें. रजिष्टराच्या पुढें केलेली प्रतिज्ञा तेवढी सोवळी आणि परस्पराकर्षि जोडप्यानें परस्परांनाच साक्ष ठेऊन केलेला विवाह तेवढा तस्साच हे त्रयराशिक चालूं घडीच्या विवेकवादाला सुद्धां मान्य नाहीं, मग पूर्वीच्या रक्षापद्धतींत अनीति कशी? सारांश रक्षा ठेवणें म्हणजे वेश्या ठेवणें नव्हें. हे एक तत्व नीट पटलें तर शिवाजीविषयीं उत्पन्न झालेल्या वादाला ठिकच्याठिकाणीं मोक्ष मिळणें फारसें कठीण नाही.

---

* उपलब्ध झालेल्या अंकातील वाक्य वाचता येत नाहीत.

हाहि एक गुप्तकटच दिसतो

बावला सारखी एक श्रीमान परंतु क्षुद्र वर्तनाची व्यक्ति ती काय आणि त्याच्या खुनामुळें वर्तमानपत्रांत चाललेली बोंबाबोंब केवढी! हा सर्व प्रकार पाहिला की बावला हा या पत्रकारांचा कोणी थोर पूर्वज, मुंबईचा प्राण, ब्रिटिश राजसत्तेच्या दण्डधारी, हिंदु मुसलमानांचा जगत्‌गुरू, श्रीराम पैगंबराचा अवतान कीं कोण? असा प्रश्न उद्‌भवतो. एवढा मोठा लोकप्रिय कलेक्टर जॅकसन ठार मारला गेला आणि व्हाइसरॉय लॉर्ड हार्डीजवर बोंबचा मारा झाला, त्यावेळी सुद्धां मुंबईच्या पत्रांनी-व विशेषतः मराठी पत्रांनी-एवढा गुजराथी ऊर बडवून घेतल्याचें आठवत नाहीं. तेव्हां चाललेला हा सारा प्रकार म्हणजे ब्रिटिश राज्यांतला एक कांही गुप्तकट असावा असें आम्हांला वाटतें. त्या शिवाय या क्षुद्रसामान्य गोष्टीचा एवढा गाजावाजा भिक्षुकी व इस्लामी पत्रांनी करण्याचें काहींच कारण दिसत नाहीं. बॉम्बे क्रॉनिकल सारख्या स्वराज्यपक्षीय पोशिंद्या इस्लामी पत्रानें या शंखध्वनींत विशेष अहमहमिकेनें भाग घेतला आहे आणि मुंबईच्या बहुतेक सर्व भिक्षुकांनी आपापल्या पत्रांत दररोज बावलाचें पितृवत् तर्पण चालविले आहे. या सर्व भानगडी जरी वरवर सत्यधोधनाच्या व लोकशाहीच्या इस्लामी व भिक्षुकी बुरख्यानें आपादमस्तक लपेटलेल्या दिसतात, तरी तो बुरखा इतका विरळ व पारदर्शक आहे कीं या सर्व एडीटरांच्या लेखणीच्यादोन्या कोणी पटाईत गुप्तकटवालेच हालवीत आहेत, असा दाट संशय आल्याशिवाय रहात नाहीं. नुकतेंच हैदराबादच्या निझामसाहेबांविरुद्ध गुलबर्गा प्रकरणावरून खालसांतले हिंदुजनमत खवळले होतें व आजहि तें तसेंच आहे. बावला खुनाच्या क्षुद्र परांचा कावळा करून इंदोर प्रकरणावर आग पाखण्याचा क्रॉनिकली उपद्व्याप म्हणजे निजाम निंदेच्या इस्लामी सुडाचा एक आडाखेबाज डाव नाहीं कशावरून? खिलाफत चळवळीचा इतिहास ज्यांच्या स्मरणांत ताजा असेल आणि सध्यां संघटनाविरुद्ध मौलाना मौलवींचें जें लहान मोठे उघड गुप्त प्रयत्न धडाक्यानें सुरू आहेत, त्यांकडे ज्यांचे अवधान असेल, त्यांना आमच्या या म्हणण्याचा गूढार्थ विशेष स्पष्ट करून सांगितलाच पाहिजे असें नाहीं. गुलबर्गा प्रकरणानें खवळलेल्या हिंदुजनमतास निजामचें हैदराबाद कोपरखळीला विशेष कणखर लागल्यामुळें त्या बाबतींतील चर्चा चातुर्मास्यांतल्या पुराणाइतकीच अल्पायुषी झाली; परंतु इंदोर संस्थान जात्याच मवाळ हिंदु प्रवृत्तीचें असल्यामुळें भिक्षुकी व इस्लामी प्रवृत्ती असलेल्या पत्रकारांच्या कोपरखळीला तेथील माती विशेष मवाळ व भुसभुशीत लागल्यामुळें त्यावर सध्यां आपल्या थैमानाची शिकस्त करण्यास वृत्तपत्रीं कटवाल्यांस मुळींच कठीण जात नाहीं. इस्लामी आडाख्यानें इंदोर संस्थानच्या छतीत कॉनिकली जंबियाचा बार येनकेन प्रकारेण जेर झालाच तर संस्थानद्वेष्ट्या भिक्षुकी पत्रकारांनासुद्धां ती एक इष्टापत्तीच होईल, परस्पर पावणेतेरा हा भिक्षुकी कटांचा नेहमींचाच एक आडाखा आहे. १८९६ सालच्या होळकर प्रकरणांत खालसांतल्या भिक्षुकीपत्रकारांनीं इंदोरस्थ गुप्तकटवाल्यांच्या प्रेरणेनें कोणता भाग घेतलेला होता, हे मागील अंकी कै. धनुर्धारी यांच्या शद्बानेंच आम्ही स्पष्ट दाखविलें आहे. आजसुद्धां होळकरांच्या निंदेवर आपला आयुष्यक्रम रेटणारी भिक्षुकी पत्रें इंदोरस्थ कटवाल्यांचेच हस्तक आहेत व सांप्रतचा त्यांचा शिमगा

१८९६ सालच्या इतिहासाचीच पुनरावृत्ती आहे असें कोणास वाटल्यास तो तर्क चुकीचा ठरणार नाहीं. स्वदेशी संस्थानविरुद्ध लोकशाहीच्या बुरख्याखालीं भिक्षुकीपत्रकारांनी केलेले अत्याचार ही एक अखंड परंपराच आहे. या परंपरेच्या तपश्चर्येच्या फलश्रुतीचा काळ जवळ आहे कीं लांब आहे, हे सांगणें कठीण आहे. तथापि, त्या दिशेचा भिक्षुकांचा निष्काम कर्मयोग संघटन-द्वेषाइतकाच करड्या निश्चयाचा आहे. हें किंचित विचाराअंती सर्वांस पटेल. खालसाप्रमाणेंच संस्थानांतूनही गुप्तकटांचे अड्डे असतात. या कटवाल्यांत पळीपंचपात्रीं खडबडविणाऱ्या भिक्षुकापासून तों पदच्युत केलेल्या एकाद्या दिवाणापर्यंत किंवा राजोपाध्यांपर्यंत सर्व दर्जांच्या असंतुष्ट माणसांचा समावेश होतो. त्यांत 'लग्न होय कीं कुंवार अजुनी' असल्या संशयांत बळी पडलेल्या सुंद्राबाईपासून तों एकाद्या अडसुळाच्या कामाग्नींत भाजून निघालेल्या जिजा बाई पर्यंत सर्व दर्जाच्या स्त्रिया असतात. खालसांतील राजनीति देवदूतांची आणि संस्थानांतील मात्र सैतानांची असें नाहीं. राजनीतीच्या ठरावीक सरळ सोसाट्यांत जखमी झालेल्या गुन्हेगारांची मनें त्या त्या राजसत्तेबद्दल असंतुष्ट राहणें हा मानवीमनाचा धर्मच आहे. या धर्मातूनच राजसत्तेच्या लहान मोठ्या धर्मावर चोचा मारून मारून गुप्तकटांची कर्मे परिणत होत असतात. आज पर्यंत संस्थानी कटवाल्यांनी खालसांतल्या पत्रकारांच्या मदतीनेंच आपल्या खऱ्याखोट्या तक्रारींचा बागुलबोवा नाचवून संस्थानांविरुद्ध आपल्या छोट्या मोठ्या सुडाची रग जिरवून घेतल्याचे दाखले आहेत व आजच्या बावला प्रकरणांतही हाच प्रकार असावा असें अनुमान काढण्यास पुष्कळ जागा आहे.

ब्रिटिश सरकारचा मित्रद्रोह

ब्रिटिश सरकार आणि स्वदेशी संस्थानें यांचे जे करार मदार व तहनामे आहेत, त्यांच्या तपशीलावरून याचें परस्पर दोस्तीचें व स्वतंत्र राज्यकारभाचें नातें स्पष्ट सिद्ध होतें. आज राज्यकारभार व राजनीतीची शिस्त ब्रिटिश कायद्यांच्या अनुरोधानेंच संस्थानांत सर्रास चालू आहे. प्राणावर बेतलीं असतां जें ब्रिटिश साम्राज्य या आपल्या दोस्तांच्या तिजोरीवर व सैन्यावर मध्यरात्रीं आपला हक्क सांगण्यास कचरत नाहीं. बाँबसारख्या किंवा सत्याग्रहासारख्या गुप्तकटांच्या चळवळींना जमीनदोस्त करण्यासाठीं जें ब्रिटिश सराकर या आपल्या दोस्तांच्या साहाय्याची याचना करण्यास मागें पाहात पुढें पाहत नाहीं, तेंच ब्रिटिश सरकार व त्याचें गव्हर्नर व्हाइसरायदि प्रातिनिधिक अधिकारी त्याच दोस्त संस्थानांचीं आपल्या मुलुखांत बेजबाबदार बीभत्स निर्भत्सना होत असतां एकाद्या मुर्दाडाप्रमाणें डोळ्यावर कातडें ओढून स्वस्थ बसतें, या स्थितीला मित्रद्रोह यापेक्षां दुसरें काय नांव देतां येईल? असें गृहीत धरलें कीं, भिक्षुकी पत्रकार दर्शवितात त्याप्रमाणें राज्यकारभाराच्या किंवा एकंदर शिस्तीच्या बाबतींत हीं देशी संस्थानें म्हणजे शुद्ध नरक होय, तर असल्या नरकाधिपतींचा दोस्तपणा ब्रिटिश नराधिपांना नि:संकोच

मानवतो तरी कसा? परंतु ज्या अर्थी तो ब्रिटिशांसारख्या स्वाभिमानी व कदरबाज सत्ताधाऱ्यांना मानवतो. त्याअर्थी एकतर संस्थानविषयक खोडसाळ गोष्टी या शुद्ध सत्यविपर्यासी असाव्या किंवा ब्रिटिश दोस्तांना सत्यासत्याची कांहीं चाडच नसावी, यापेक्षां तिसरा कोणता निष्कर्ष निघूं शकेल! धारवाडचा कलेक्टर पेंटर तो काय आणि तेथील गोळीबाराबद्दल क्रॉनिकल विरुद्ध अबरू नुकसानीची फिर्याद द्यायला मुंबई सरकार त्याला परवानगी देतें काय! लोहगांवच्या खटल्यांत केसरींने सरळ चार शब्द लिहिले, तर त्यांत सुद्धां ब्रिटिश न्यायदेवतेचा अपमान होऊन ५००० रु. दण्डाच्या फासावर केसरीची मान लटकविण्यास ब्रिटिश राजसत्तेच्या इज्झतीने मागें पुढे पाहिलें नाही. राज्यसत्तेच्या इज्झतीसाठी जें ब्रिटिश सरकार मानापमानाच्या इतक्या नाजूक रेशमी धाग्यावरसुद्धां कायदेबाजीची कसरत करायला एक क्षणाचाही अवधी दवडीत नाहीं, त्याच ब्रिटिश सरकारनें आपल्या रियासतींत दोस्त संस्थानिकांच्या आईमाईचा प्रत्यक्ष उद्धार होत असतां पिरॅमिडप्रमाणें महंताची वृत्ती स्वीकारावीं या मनोवृत्तीचें पृथक्करण करणें कठीण आहे. एरवीं जित्या मेल्या वाटेल त्या कायद्याच्या तपशीलाचे धागे रबराप्रमाणें ताणून ब्रिटिश इज्झतीला लवमात्र ढका लावणाऱ्यांना कायद्याच्या चापांत चेचणारें ब्रिटिश सरकार आपल्या होळकर दोस्ताची छिनाल भाषेत बीभत्स निर्भत्सना करणाऱ्या बेजबाबदार निंदकांकडें अजीबात पाठ फिरवून स्वस्थ राहाते, तर तो प्रिन्सेस प्रोटेक्शन ॲक्ट लोकमताला न जुमानतां अस्तित्वांत आणलां तरी कशाला? समान ऐश्वर्याच्या व समानसत्तेच्या विश्वासार्ह दोस्त नरपतींना बेजबाबदार टारगट पत्रकारांच्या शिवराळ चांदमारींच्या तोंडीं देणें याला जर मित्रद्रोह म्हणावयाचे नसेल तर याला दुसरा कोणता शब्द वापरावा, हें ब्रिटिश सरकारनेंच सांगितलेले बरें. एकादा रस्त्यावरचा गंजड मनुष्य सुद्धां ज्या शिव्या व निंदा क्षणभरसुद्धां सहन करणार नाहीं, तसल्या शिव्यांचा व निंदेचा आपल्या दोस्त संस्थानिकांवर होणारा भडीमार पाहून ब्रिटिश सत्तेच्या प्रतिनिधिक अधिकाऱ्यांना मोठें भूषण वाटत असावें काय? आम्हांला आशा आहे कीं, मुंबईचे नेक नामदार गव्हरनर व व्हॉइसरॉयसाहेब प्रस्तुतच्या होळकर निंदेच्या शिमग्याला कायदेशीर मार्गानें होळींत टाकून लोकमत विपर्यासाला शक्य तितक्या लौकर मूठमाती देतील.

स्वत:च्या दर्जाकडे पहा

होळकर सरकारवर टीकास्त्राचा मारा करणारे खालसांतलें लेखक व पत्रकार यांना 'बेजबाबदार' हे विशेषण लावण्याचीं कारणें स्पष्ट आहेत. स्वत:ला हे जरी प्रत्यक्ष चित्रगुप्ताच्या अधिकाराचे यमराजाश्रित कलमधारी म्हणवीत असले, तरी खुद्द खालसांतल्या लोकव्यवहारांत या पत्रकार व्यक्ती लिलावांत फुंकण्यास काढल्या तर यांचा काय भाव येईल? ज्यांची लायकी आचारीपणाक्या, किंवा जास्तींत जास्त गंधाचे रोळे व सुगंधी तेलें विकणाऱ्या कंपूपलीकडे मुळींच नाहीं, असले लोक स्वत:चा दर्जा विसरून जेव्हां मोठमोठ्या अधिकाऱ्यांवर एडिटरकीच्या घमेंडीनें अद्वातद्वा

कलमकसायीपणा गाजवतात, तेव्हां त्यांना कोणी भुंकऱ्या कुत्र्याची उपमा दिली तर त्यांत चुकलें कोठें? आज महाराष्ट्रांतल्या अनेक पत्रांचे एडीटर 'मागता येईना भीक तर एडीटरकी शीक' याच उत्पत्तीचे आहेत, हें ब्रिटीश सरकारच्या सीऐडी खात्याला पूर्ण माहीत आहे. महाराष्ट्रीय वृत्तपत्रांच्या कोल्हेकुईला सरकार मुळींच वचकत नाहीं याचें कारण हेंच कीं तें या कलमकसायांच्या बेजबाबदार चारित्र्याला पूर्ण पारखून बसलें आहे. आणि जनतेलाहि या एडीटऱ्या व्यक्ती काय शिलामोलाच्या आहेत हें माहीत नसते असेंहि नाहीं. स्वाध्यायशील, विवेकी, नीतिमान् व जबाबदारीनें जनमताला सात्विक वळण देण्याची पात्रता कमविलेले आचार विचार संपन्न लोक महाराष्ट्रीय जरनॅलिझमच्या क्षेत्रांत मोजूं म्हटलें तर एकाच पंजाची बोटें खास पुरतील. बाकी जिकडे पहाल तिकडे अनधिकारी कलमकसायांचा सुळसुळाट! इतर क्षेत्रांप्रमाणेंच या थोर दर्जाच्या क्षेत्रांतहि भटभिक्षुकांच्या बेकार बजारबुणग्यांनीं बेगुमान बेरडगिरी माजविली आहे. प्रथम पासूनच हें क्षेत्र भिक्षुकांनीं सर केलेलें; त्यांत आतां राजद्रोहाच्या, सत्याग्रहाच्या, गुप्त कटांच्या, खोट्या चेकांच्या वगैरे अनंत अपराधांनीं डागळून लोकव्यवहारांत जवळजवळ बहिष्कृत पडलेल्या भिक्षुक तरुणांचा अमर्याद सुळसुळाट झाल्यामुळें, महाराष्ट्रीय जरनॅलिझम म्हणजे पिसाळलेल्या कुत्र्यांचा पांजरपेळच म्हटला तरी चालेल. अशा या बेजबाबदार क्षुद्र व्यक्तींनीं इंदोराधिपति होळकरासारख्या स्वतंत्र व स्वयंनिर्णयी नृपतीची वाटेल त्या बीभत्स रीतीनें निर्भत्सना करण्यास उद्युक्त व्हावें, हा नि:संशय नैतिक अध:पात होय. कोठें होळकर आणि कोठें हे पत्रकार! काय पत्रकार झाला, म्हणजे ब्रह्मदेव झाला, का गव्हर्नर झाला, कां व्हाईसराय झाला, का बादशहा झाला? रस्त्यावरचा टाळाचावीवाला जरा 'अरे' म्हणतांच खाडकन खेटरानें तोंड रंगवून लहर लागली तर 'कारे' म्हणतो आणि हे पत्रकार इंदोराधिपतीच्या निर्भत्सनेंत एकहि नवी जुनी शिवी शिल्लक ठेवीत नाहींत! 'कुत्तर भुकत वाको भुकवा दे' असें म्हणून हत्ती जरी त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो, तरी भुंकण्याचा एकच हलकल्होळ उडाला म्हणजे सहजच जाणारा येणाऱ्याला एखादा सणसणीत टोला त्या कुतरड्याच्या टाळक्यांवर हाणणें भाग पडतें. असले हे बेजबाबदार भिक्षुकपत्रकार म्हणे राजकारणीं चर्चा करणार आणि देशाला स्वराज्य मिळवून देणार! ज्यांना देशी संस्थांना धिपतींच्या अधिकारांची व योग्यतेची जाणीवच नाहीं; त्यांनी राजकारणीपणाची पोरकट मिजास तरी मिरवूं नये. इंदौर कोल्हापूरचे महाराज म्हणजे मुंबईचे व्हिक्टोरियावाले, का पिठे फोडून देशभक्ती गाजविणारे असहकारहवादीं? काय समजतता काय, हे पोटभरू पत्रकार? गोऱ्या सार्जंठाच्या गोऱ्यामोऱ्या चेहऱ्याच्या कदरीखाली शिस्तीचे पाठ घेत आयुष्य कंठणाऱ्या क्षुद्रांनीं देशी संस्थानाधिपतींच्या राज्यकारभारावर किंवा त्यांच्या अधिकारावर बेजबाबदार टीका करण्यापूर्वी स्वत:च्या लायकीची आजमावणी केल्यास निदान माणुसकीचा तरी आपणांत अभाव नाहीं. एवढें तरीं त्यांना कळेल. ब्रिटिश साम्राज्यांत देशी संस्थानिकांचा दर्जा काय आहे व त्यांना कोणत्या व कोणच्या कायद्यांचे बंधन आहे किंवा नाहीं, हे ब्रिटिश मुत्सद्दी व पार्लमेंट जाणून आहेत. कटवाल्या चिंधोट्या धांदोट्यांची कोल्हेकुई ऐकून ते जर ढुंगाचें डोक्याला गुंडाळून नाचूं लागले, तर ते काय भिक्षुक आहेत होय? ज्यांना स्वदेशीयांच्या अधिकाराची व योग्यतेची चाड नाहीं, त्यांना या जगांत कोण किती किंमत देणार व काय लायकीचे लेखणार याचा विचार झालेला बरा.

खुनशीपणाची परासीमा

बावला खुनाचा खटला सेशन कोर्टाच्या शेवटच्या शिगेला जाऊन कटवाल्यांचा लागायचा तो सोक्षमोक्ष लागला. तरी म्हणे या कटांतले पुढारी अजून सांपडले नाहींत आणि सरकारनें या बाबतींत आणखी कस्सून चौकशी करावी. मग आतांपर्यंत झालें ते काय? कटाचा पुढारी फणशे यांनी कटाचा उद्देश व त्याबद्दलची सर्व जबाबदारी व प्रेरणा आपली स्वत:ची, असा स्पष्ट व सडेतोड जबाब देऊन जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षाहि पत्करली. तरी म्हणे पुढारी सांपडलाच नाहीं. असला आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ ब्रिटिश रियासतींत हाच पहिला दिसनो. हा पाहिला म्हणजे व्यभिचारिणी बायकोचा खून करून येणाऱ्या नवरोबाला मुंडासें धोंगडें पांघरून त्याचा गौरव करणाऱ्या पेशवाईला हसायला जागाच उरत नाही! आणि काय म्हणतात? ''या बाबतींत कोणी कितीहि मोठ्या दर्जाचा मनुष्य असला तरी त्याचाहि सरकारनें मुलाजा राखतां कामा नयें.'' याचा असा ध्वनि निघतो कीं या खुनाच्या मुळाशीं खुद्द इंदोराधिपति श्रीमंत तुकोजीराव होळकर आहेत. पण तसें स्पष्ट कोणी कां बोलत नाहीं? स्पष्टवक्तेबाजींची घमेंड असणारांनी वास्तविक हा आरोप स्वत: पुढे येऊन धैर्यानें उघड करावा आणि आपल्या विधानाचा पुरावा पाठविण्यासाठीं सरकारला खुशाल उघड मदत करावी. तसें न करतां भाषाबाजींचे हे पारदर्शक शिखंडी डांवपेच कशाला? या डांवपेचांमुळे मुंबईच्या धूर्त व धाडसी पोलीस अधिकाऱ्यांनीं आतांपर्यंत केलेल्या श्रमांवर निष्कारण काळीमा फांसला जात आहे. इतकेंच नव्हे तर त्यांनीं चोर सोडून संन्याशांना फांसावर लटकविण्याचा घोर अपराध केला आहे, असा अप्रत्यक्ष आरोप त्यांच्यावर सिद्ध होऊं पहात आहे. याबद्दल योग्य त्या रीतीनें आपला निषेध व्यक्त करण्यास तें खातें खंबीर आहें.

या बाबतींत संस्थानद्वेष्ट्या भिक्षुकी पत्रकारांनी, हिंदुद्वेष्ट्या इस्लामी पत्रकारांनी आणि टैम्ससारख्या हिंदद्वेष्ट्या आंग्रेजी पत्रांनीं लोकमत इतकें बेफाम भडकविलें आहे कीं आज त्याला विवेकाचा कांहीं बंधच उरलेला नाहीं. जागृतिकार म्हणतात त्याप्रमाणें हें लोकमत नसून लोकमताचा उकीरडा आहे. या उकीरड्याला फुंकण्याइतका गाढवपणा करणारे कोण सज्जन पुढें येतात तेंच पाहणें आहे. ज्यांची विवेकाची दृष्टीच फुटली त्यांना सारासार तारतम्य विचार तरी कसचा सुचणार? स्वराज्याचा नांवाखालीं देशांत जो भयंकर सांवळा गोंधळ राजकारणीं पुढाऱ्यांनी माजविला आहे, त्याची फलश्रुति सध्यां एवढीच दिसते कां देशांत एक प्रकारचा खुनशीपणा मात्र बेफाम बोकाळला आहे. इंग्रेजी सत्तेच्या नरडीचा घोट घ्यायला जरी आज सांपडला नाहीं, तरी कोणाच्या तरी नरडीचा चावा घेतल्याशिवाय त्या खुनशी प्रवृत्तींचें समाधान होणार नाहीं. डोळ्यावर खून चढलेला मनुष्य जसा आपपर भेदाला पूर्ण पारखा होतो, तीच रुधिरलालसा भिक्षुकीपत्रांनीं प्रस्तुत प्रकरणांत उत्पन्न केलेली आहे. ब्रिटिश सत्तेच्या सिंहासनाच्या ठिकऱ्या होतील तेव्हां होतील; पण सध्यां एका देशी संस्थानाचें वाटोळें करण्याची खरी खोटी कच्ची पक्की संधी आली आहे ती तरी कां हातची

दवडा? या शिवाय सध्यांच्या लोकमताचें आणखी निराळें स्वरूप काय आहे? या असल्या खुनशी लोकमतानें पाघळण्याइतकें ब्रिटीश सरकार आजच इतके नादान बनले असेल असें आम्हांला वाटत नाहीं. एका उलट्या काळजाच्या छिनाल रांडरू पायीं एका विषय लेपट खुशालचेंडूचा खून होतो काय आणि त्यासाठीं गुन्हेगार लोकांचा सर्व तपासणी सुनावणी शिक्षा वगैरे पद्धतशीर कायद्याने होऊन, पुन्हां इंदोराधिपतीलाहि तोफेच्या तोंडी दिल्याशिवाय आमच्या जिवाची तळमळ शांत होणार नाहीं. असा लोकमताचा रंग भिक्षुकीपत्रें व्यक्त करतात काय, याची वास्तविक लोकांनाच किळस आली पाहिजे. वाटेल त्या खोडसाळ भावनांचा रंग चोपडून लोकमत जर असें बेजबाबदार रीतीने व्यक्त होऊं लागेल; अगर कोणी तें तसें करण्याचा धाडसी यत्न करील; अगर कोणी तें तसें करण्याचा धाडसी यत्न करील, तर त्याचा वेळींच बंदोबस्त लोकांनीच न केला तर लोकमत म्हणजे वाटेल त्या कटवाल्याचें एक मोफत मिळणारें भांडवल होऊन बसेल, याची विवेकी सज्जनांनी वेळींच दक्षता ठेवावी, अशी प्रार्थना आहे.

विवेकानें सर्व स्थिती पहा

खुनशी मनोवृत्तीचें क्षेत्र सोडून शांतपणाने व विवेकानें सर्व स्थिति पाहिली तर काय निष्कर्ष निघतो तो पाहिला पाहिजे. खून होतांच मुंबई पोलीस खात्यानें झटपट सर्व धागेदोरे जमऊन इंदोरकडे मोर्चा वळविण्यासाठीं पकड वारंटें मिळविली. इंदोर संस्थान हें ब्रिटिशांच दोस्तराष्ट्र आहे. त्या राष्ट्राधिपतीची परवानगी मिळाल्याशिवाय मुंबई पोलीसाला तेंथें पाऊलहि टाकतां येणार नाहीं. न्यायाला मदत व्हावी म्हणून एकमेकांच्या हद्दींतील आरोपी एकमेकांस द्यावें असे परस्पर करारमदार झालेले असले, तरी पुढें केलेल्या (Prima facie) पुराव्यावरून अमुक एक आरोपीवर गुन्हा शाबीत होऊं शकतो कीं नाहीं हें ठरविण्याचें काम त्या राष्ट्रांतल्या मॅजिस्ट्रेटाचे व आधिपतीचें आहे; आणि त्यांच्या मनानें आरोप सिद्ध होण्याइतका पुरावा नसेल तर आरोपीला ब्रिटीश पोलीसांच्या हवालीं करणें किंवा साफ नाकारणें त्या राजाच्या खुषीवर असते. आरोपींना पकडण्यासाठीं सुटलेलीं एक्स्ट्राडिशन वारंटें म्हणजे इंग्रेजांकडून होळकर सरकारच्या मानेला लावलेला जरबेचा चाप, अशी कोणाची समजूत असेल तर ती चुकीची आहे. होळकरांना वाटलें असतें तर हीं वारंठें गेलीं तशीं फेटाळून लावणें त्यांना मुळींच कठीण नव्हतें. गोवा पांदीचरी सारख्या प्रदेशांत किंवा संस्थानी हद्दीत आरोपी आश्रयाला पळून जातात ते याच आधारावर, की वेळ आली तर तेथे कांहीं तरी धडपड करून, ब्रिटीश हद्दींतील वारंटें फेटाळून लावता येतात; निदान तहनाग्याच्या अटींचा कीस काढीत महिना दोन महिनें सहज डांगळत ठेवतां येतात. संस्थानीं हद्दींत ब्रिटिशांचा वाटेल तो उघड किंवा गुप्त पोलीस बिगर परवानगी जाऊन वाटेल त्याला पकडू म्हणेल किंवा वाटेल त्याची झडती घेऊ म्हणेल तर तें शक्यच नाहीं. मग इंदोरसच हें 'आव जाव घर तुम्हारा' काय म्हणून? हाच महत्त्वाचा मुद्दा आहे आणि त्याचाच विवेकानें नीट विचार केला पाहिजे.

मुंबईची पकड वॉरंटें घेऊन पोलीस इंदोरास जातांच महाराजांनी ताबडतोब त्यांना वाटेल ती चौकशी करण्याची सर्रास परवानगी दिली. आरोपी असतील त्यांना पकडा आणि चाते व्हा, असाहि निर्बंध त्यांनी घातला नाहीं. ओळख पटविण्यासाठी गेले. सार्गाटला पोलीसनें नेलें तेव्हांहि शहरभर वाटेल तेथें फिरण्याची व वाटेल त्याविषयी विचारपूस करण्याची त्यांना सवलत दिली. आपले सीएडी लोक, इन्स्पेक्टर जनरल व मोटारी त्यांच्या मदतीला दिल्या. इतकेंच नव्हे तर ॲडज्युटंट जनरल फणसे या पोलीसांना तीन दिवस सांपडले नाहींत; तेव्हा खुद्द महाराजांनी शोधून काढून त्याला पकडून स्वत: मुंबई पोलीसांच्या हवालीं केलें. महाराजांच्या बेजबाबदार टीकाकारांना फणसे किंवा दिघे यांची आज कांहीं किंमत वाटत नसली, तरी फणसे ॲडज्युटंट जनरल व दिघे कॅपटन एअर फोर्स असे मोठे जबाबदार अधिकारी होते. जे होळकर महाराज मुंबई सरकारची मागणी होतांच असले मोठमोठे जबाबदार जागेवरील अधिकारी आपण होऊन बिनतक्रार मुंबई पोलीसांच्या हवाली करतात, ते न्यायाला मदत व्हावी म्हणून? कां खुनाच्या कटाचे आद्यप्रवर्तक म्हणून? याचा विवेकानेच विचार केला पाहिजे. महाराजांवर शिखंडीपणानें खुनाचा आरोप लादू पाहणाऱ्या शहाण्यांनीं या त्यांच्या वर्तनाचा विचार केला तर भिक्षुकी व कारस्थानी पत्रांनीं त्यांच्या मनांत कालविलेला खुनशीपणाचा अंमल खास कमी झाल्याशिवाय राहणार नाहीं. आजहिं मुंबई पोलीसाला इंदोरचे दरवाजे सताड मोकळे ठेवलेले आहेत. 'या, वाटेल तो तपास वाटेल तसा करा आणि जा.' आम्हांला असें वाटतें की न्यायाच्या बाबतींत इतकी मुबलक सवलत व इतकी खास मदत देशी संस्थानिकांकडून मिळाल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे. आपल्या राज्यांतील अपराध्यांना फांशीची शिक्षा ठोठावण्याचाहि ज्यांचा अधिकार, त्या होळकर महाराजावर एका क्षुद्र इसमाच्या खुनाचा आरोप करणारांनी आपलें विचार यंत्र कोणत्या विकारांनी गजड बनले आहे, याचा नीट तपास करून घ्यावा, यापेक्षां बेजबाबदार खुनशी प्रवृत्तीला आणखी कोणत्या सौम्य शब्दांत प्रार्थना करावयाची?

कटवाल्यांचें स्मारक तरी करा

बावला खुनाच्या पराचा कावळा करून होळकर सरकारच्या रक्ताने आपली राजक्रांतीची रुधिरलालसा शांत करू इच्छिणाऱ्यांना आणि 'बावलायन' रचून रामायणाची किंमत फाटक्या पायतणाची ठरविणाऱ्या बुद्धिभ्रष्टांना आमचा एकच सवाल आहे. डोकेबाज (clear headed) महामाया मुमताज, नऊ आरोपी, गाडाभर साक्षीदार, ॲडव्होकेट जनरल किंवा न्यायमूर्ती यांपैकीं एकानेहिं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, हळूं किंवा मोठ्यानें, जिभघसरींनें किंवा नारोशंकरी घंटानादानें 'मुमताज ही महाराजांची रखेली होती' या पलीकडे अधिक कोणताहि संदर्भ महाराजांविषयीं केव्हांहि व्यक्त केलेला नाहीं. खुद्द फणशे म्हणतो कीं, 'मी हा सर्व व्युह माझा मित्र जो शंकरराव गावडे त्याच्या हितासाठीं व माझ्या भाग्योदयासाठीं रचला.'' तोहि महाराजांचें नांव घेत नाहीं.

किंवा त्यांचा कसलाहि संबंध दर्शवीत नाहीं. आज या सर्व आरोपींच्या माना फासावर लटकल्या आहेत. काळ त्यांच्यापुढें आ पसरून उभा आहे. त्यांच्या सर्व आयुष्याची महत्त्वाकांक्षांची व संसाराची आज राखरांगोळी झाली आहे. मृत्यूच्या दाढेंत मान अटकली असतांहि ते अझुन महाराजांचा कोणत्याहि रीतींनें नामनिर्देष करीत नाहींत. त्यांच्या दयेच्या अर्जालाहि (भिक्षुकी पत्रांच्या निदर्य भाषेंत बोलायचें तर) 'वाटाण्याच्या अक्षता मिळाल्या.' आम्ही सर्व महाराजांच्या प्रेरणेंनें किंवा त्यांच्यासाठीं केलें, असा अस्पष्ट जरी एखादा सूर त्यांच्या दयेच्या अर्जांत निघतां तरी त्यांच्या फासावरच्या माना सुटण्यास पुष्कळच आशा होती. पण तेंहि त्यांनीं केलें नाहीं. महाराजांची या दुष्कृत्याला कांहीं सूचना, प्रेरणा, प्रत्यक्षाप्रत्यक्ष मदत, चिथावणी किंवा निदान मूक संमति होती, असे गृहीत धरलें, तर आरोपींच्या या वर्तनाची वासलाद कशी लावता येणार? याला एकच मार्ग आहे. एक तर हे खुनी आरोपी कट्टे राजनिष्ठ स्वार्थत्यागी (martyrs) तरी असावे किंवा भिक्षुकी पत्रकारांचा महाराजांवरील खुनाचा आरोप शुद्ध बेजबाबदार पाजीपणाचा आणि जाणून बुजून केलेल्या बदनामीचा असावा, यापैकीं कोणता तरी एक मार्गं होळकरांच्या दुष्मानांनीं पत्कारल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. आपल्या मालकाच्या नावासाठीं जान देण्यास तयार झालेल्या नेताजी पालकर, धनाजी जाधव, संताजी घोरपडे, खंडो बल्लाळ, बाजी प्रभू देशपांडे या ऐतिहासिक स्वार्थत्याग्यांच्या पंक्तीला ही खुनी कटांतली मंडळी martyrs म्हणून बसविण्यास 'बावलायन'वाले भिक्षुक व हिंदुद्वेष्टे आंग्लपत्रकार तयार आहेत काय? असल्यास त्यांनीं त्यांचें एक मोंठें देऊळ, मशीद किंवा चर्च क्रॉनिकल किंवा टाईम्स ऑफिसानजीक उभारण्याचा फंडगुंडी स्मारकयत्न करून, या बावलाघातकी देवांचे बडवे बनावे, अथवा होळकर महाराजांच्या निष्कारण बदनामीबद्दल बिनशर्त माफी मागावी. या दोहोंपैकीं कोणता मार्ग हें शहाणे पत्करतात तेवढें लवकरच दिसून येईल.

केवढी ही सत्यशोधनाची निष्ठा!

टाईम्स क्रॉनिकल डेलीमेल वगैरे पत्रें लोकमत निदर्शक म्हणून समजण्याचा एक आंधळा संप्रदाय आहे. साधारण बहुजनसमाजाला हीं पत्रें म्हणजे मोठी देवबाप्पा वाटतात. या पत्रांत प्रत्येक गोष्टीच्या दोन्ही बाजू प्रांजलपणें मांडल्या जातात असा लोकांत एक (गैर) समज आहे. खरी वस्तुस्थिति फार निराळी आहे. इतर धांदोट्या चिंधोट्या प्रमाणेंच हीं बडीं धेंडें आपल्या ठराविक धोरण विरुद्ध मतांची गळचेपीं करण्याचें मुर्दाड काम करीत असतात. या कामीं 'असोशिएटेड प्रेस' ही बातम्या पुरविणारी प्रतिष्ठित संस्था सुद्धां वारंवार भिक्षुकी वळणाचे फेफरें आणतें. बावला प्रकरणावर या तीनहि पत्रातलीं विधानें, बातम्या व इतर पत्रव्यवहार यांचा खोडसाळपणा दाखविणारीं इंदोरस्थ अनेक जबाबदार व प्रतिष्ठित नागरिकांची पत्रें त्यांनी न छापतां धुडकावून दिल्याचें आम्हांस समजतें. खुद्द आमच्याही दोन पत्रांना त्यांनीं दिलगिरीचें लिंबलोण लाऊन परत केलीं. हा सर्व

मुस्कटदाबीचा प्रकार पाहिला कीं या पत्रांचा एका विशिष्ट धोरणानें कांहीं ठराविक उद्देश साधण्याचा गुप्त कटच झाला आहे कीं काय असें मानणें प्राप्त पडतें. सत्यशोधनाची, न्यायप्रियतेची आणि कोणत्याही एका पक्षाचा पक्षपात न करणाऱ्या नि:स्पृहतेची या पत्रकाराची मिजास किती खोटी व दांभिक आहे, हें या त्यांच्या अरेरावी वर्तनावरून सहज दिसून येईल. विचार-प्रकटीकरणाच्या मार्गांत आपल्या एडिटरकीच्या अधिकाराची धोंड टाकून विवक्षित उद्देशाचाच टेंभा मिरविणारे हे पत्रकार लोकशाहीचे प्रवर्तक का झब्बुशाहीचे मुर्दाड कटवाले, याचा विवेकी सज्जनांनींच विचार करावा. मुमताझ प्रकरणांत या दीर्घशहाण्यांना सत्यशोधनाचा जर इतका घोसरा लागलेला आहे, तर दोनहि बाजूचें स्पष्ट विचार आपल्या पत्रांत प्रसिद्ध करतांना यांची नि:स्पृहता व सत्यप्रियता बिनचूक कशी व्यभिचारी बनते? सारांश, होळकरांची होळी करू पहाणाऱ्या या सर्व इंग्रजी मराठी पत्रकारांचे खावयाचे व दाखवायाचे दांत अगदी वेगवेगळे आहेत; आणि बाह्यात्कारीं जरीं तीं राजकारणी भुसाड गोष्टींच्या वादांत निरनिराळ्या पक्षभेदाचीं मुखपत्रें शेपुटपत्रें दिसतात, तरी असल्या प्रसंगीं ते सर्व एकजिनसी उद्देशाचे जानीदोस्त कटवाले बनतात. हेंच स्पष्ट सिद्ध होतें.

देशी संस्थानाधिपतींची मुस्कटदाबी

खालसांतल्या पत्रकारांनीं वाटेल तितकी बीभत्स निर्भत्सना केली तरी हे राजे स्वस्थ कां बसतात? आज होळकर सरकारांविषयी उघड कांढलीं जाणारीं घाणेरडी बेअब्रूकारक व अपमानपूर्ण लेख व चित्रें, खालसांतल्या एखाद्या आडूमाडू मामलतदारविषयीं जर असती, तर त्या पत्रकाराला कायद्याच्या घरटांत दळून त्याचें पीठ पाडायला त्या रावसाहेबाला चोवीस तासांचा सुद्धां अवधी लागला नसता. मग हे स्वयंनिर्णयी सत्ताधीश राजे लोकच मूग गिळून स्वस्थ कसे बसतात? तेव्हां येथेंच कांहीं तरी पाणी मुरत असले पाहिजे खास. असें पुष्कळांना वाटत असेल. पण खरी वस्तुस्थिती काय आहे? फ्रेंच किंवा जर्मन राष्ट्राच्या प्रेसिडेंटावर मनमुराद तोंडसुख घेणाऱ्या हिंदी पत्रकाराला ब्रिटिश रियासतींत जितका आडोसा सांपडतो, आणि तो प्रेसिडेंट एक तर त्या शिवराळाला क्षुद्र समजून जितका कानाडोळा करतो किंवा आंतरराष्ट्रीय करारमदारांच्या भानगडी एवढ्या क्षुद्र कारणावरू कोणी उपस्थित कराव्या म्हणून नाइलाजानें स्वस्थ बसतो, तितकाच कोंडमारा या राजेलोकांना सहन करावा लागतो. प्रश्न परहद्दींतील शिवराळांचा पडतो. स्वत:च्या हद्दींतील प्रश्न असता, तर असल्या बेजबाबदार कलमकसायांना जबाबदारींचें शिक्षण देण्यापुरतें संस्थानी कायदे, त्यांची न्यायकोर्ट व अखेर तेथलीं 'स्वराज्यमंदीरें' खंबीर आहेत. इतकेंच नव्हे तर संस्थानिकांच्या ब्रिटिश दोस्तांच्या गलधठपणाचा पूर्ण फायदा घेत खालसाच्या कुंपणाआड लपून, संस्थानिकांवर मनमुराद भुंकणारीं कुत्रीं संस्थानी हद्दींत कधी काळीं सांपडलींच तर त्यांना त्यांच्या कृतकर्माचें प्रायश्चित देण्याइतका संस्थानिकांचा कायदा व अधिकार खास समर्थ आहे. १८९६ सालच्या होळकर प्रकरणांतील भिक्षुकी पत्रकारांच्या शिमग्यांविषयी कै. धनुर्धारी यांनीं केलेला खुलासा वाचला म्हणजे निंदकांच्या

जिभेला कोलदांडे घालण्याच्या कामीं संस्थानिकांच्या मार्गांत किती अडचणी असतात हें नीट लक्षांत येईल.

''आतां ज्यांच्या अब्रूवर हल्ला होत आहे त्यांनीं काय म्हणून स्वस्थ बसावें हा प्रश्न आहे. पण त्यांनीं तरी करावें काय? मराठी पत्रें आणि त्याचें ओरडणें यांची आधीं कोणी पर्वा बाळगीत नाहीं. मराठी पत्रकर्त्यांचा आवाज अद्याप फार कोता आहे आणि कुवतहि फार कच्ची आहे ही गोष्ट नाइलाजानें आपली आपण बोलून दाखवावी लागते. आणखी दुसरी अशी गोष्ट आहे कीं निंदेचें चालू असलेलें यंत्र इंग्रजांच्या मुलखांत, तेथें कायदेशीरपणानें इलाज योजूं जाणें अनेक कारणामुळें अगदीं निरुपयोगी. अब्रू साफ करून घ्यावयास स्वतंत्र व दोस्त सरकारपणाची योग्यता अंगीं असणारानें साधारण कोर्टांत फिर्यादी होऊन जावें ही कल्पना तरी गस्त होईल काय? दोस्त सार्वभौमाकडे जावें तर कायदेशीर रस्ता आणि पिनलकोडाकडे बोट यांहून जास्त काय मिळणार आहे? फौजदारी गुन्ह्यांत फिर्याद मुखत्यारामार्फत चालत नसते. तेव्हां आमचें कायदेशीर खंडण करा, आमची तयारीं आहे, या म्हणण्यांत कितपत अर्थ आहे, हें उघडच दिसतें. आश्रितादि मंडळींने लेखनद्वारा खंडण करून दुसरी बाजू पुढें आणिली तर त्यांचें म्हणणें जमेस धरण्याला सकृद्दर्शनींच अडचण पुढें येऊन शिवाय अनेक अन्य कारणांमुळें तसें करण्यांत अर्थ नाहींसा होतो. म्हणून तिकडूनहि अडचण. तेव्हां खरी बाजू पुढें यावी कशी? आणि भरधाव पुढें पळत सुटलेल्या साप्ताहिक निंदेचें खंडण व्हावें कसें? आणि तें झालें नाहीं म्हणून पुढें येत आहे ती निंदा खरी असें धरून चालणें शहाणपणा आहे काय? याचा ज्याचा त्यानेंच आपणाशीं विचार करून पहावा. सांगण्याचा मुद्दा येवढाच कीं दुसरी बाजू आजवर पुढें आली नाहीं किंवा एकच बाजू पुढें येते तिचें कायदेशीर किंवा लेखनद्वारा खंडण होत नाहीं म्हणून ती बाजू खरी असावी असें समजणें केवळ चुकीचें आहे. पुढें आलेल्या एकतर्फी निंदेचें खंडण करण्याच्या कामीं वर सांगितलेले व इतर अनेक अडथळे आहेत. अशा परिस्थितींत आपली निंदक लेखणी मनमुराद 'निर्वेदमुवींतलम्' तलम म्हणून सारखी भरकटत सोडावयास चांगलें फावतें. पण तेवढ्यावरून ती बहकते तें सर्व खरें असें मानतां कामा नये.''

मूल मेलें का मारलें?

विषयलपटपणाला बळी पडलेल्या बावलासारख्या एका क्षुद्र व्यक्तीला देवकळा देण्यासाठीं 'बावलायन' रचणाऱ्या क्षुद्रांनीं महामाया मुमताझला देवता जगदंबा किंवा प्रत्यक्ष आपली आई मानून तिचेंहि देव्हारे माजविले नसते, तरच तें मोठें आश्चर्य झालें असतें. या देव्हारे माजविण्याच्या थेरांत मुमताझच्या पोटीं जन्मलेल्या गर्भमृत (Still-born) मुलींचे एक मोठें नाजूक कलम घुसडून त्यावर भावनाप्रधान नाजूक लेखांचा व काव्यांचा स्तुतिपाठकांनीं मोठा खच पाडला आहे. महामाया म्हणते ''माझे बाळ जन्मल्यावर मेलें असें मला सांगण्यांत आलें.'' तें मेले किंवा अर्धमेल्या स्थितींतच जन्मलें, तेव्हां ते काय जिवंत आहे म्हणून तिला सांगायचें? ''मूल मेल्यामुळें मला इंदोरचा तिटकारा

येऊ लागला.'' शक्य आहे. आईचेंच आंतडें तें! पण इंदोरास राहून आणखीं मुलें झालीं नसतीं कशावरून? त्यासाठीं तिटकाऱ्याचा त्रागा करून मुंबईच्या गांवभवान्यांची पागा बसविण्याचीच कांही जरूर नव्हती! मुमताझचे अनन्य भक्त असें लोकांना भासवीत आहेत कीं हें पोर महाराजांनीं ठार मारविलें. सुटका करणारी लेडी डॉक्टर व नर्सेस म्हणतात कीं मूल अर्धमेल्या अवस्थेंत जन्मलें व ताबडतोब मेलें. मुमताझभक्त म्हणतात महाराजांनीं मारविलें. मुमताझला मुलगी झाली होती. आम्ही म्हणतो कीं मुलगा झाला असेंच गृहीत धरलें तरी त्यामुळें महाराजांवर व इंदोरच्या गादीवर त्यामुळें अशी काय मोठी आपत्ति गुदरणार होती कीं त्यासाठीं महाराजांनीं त्या बालकाचा जन्मतांच जीव घ्यावा? मुमताझच्या पोटीं संततीच होऊं नये अशी जर महाराजांची इच्छाच असती तर तसा शास्त्रीय किंवा औषधीय बंदोबस्त आगाऊच करायला त्यांना कोणती अडचण पडती? तोंडांतून शब्द निघायचा अवकाश तर ती व्यवस्था करायला अत्युच्य पदवीधर व पटाईत शस्त्रज्ञ सर्जन व डॉक्टर काय त्यांच्या दिमतीला हजर नव्हते? बरें ती मुलगी किंवा मुलगा जगलाच असता तर तो काय युवराजविरुद्ध होळकरांच्या गादीचा वारसा भांडत बसता? मुलगा जगता तर रक्षापुत्र देशी राज्यांत कोठेंच नाहींत? का त्यांचा तेथें कांहीं मान नाहीं? का त्यांना जहागिरी नाहींत? आणि ही तर होती मुलगी! तिला मारण्यांत महाराजांना काय मिळालें? का ती राज्यावर हक्क सांगणार होती? का तिला पोसायचें महाराजांना सामर्थ्य नव्हतें? महाराजद्वेष्टे लोक काय कारण समर्थनार्थ देतात? रखेलीला सुद्धां राणी बनवून तिच्या पोटच्या मुलाला राज्याचा वारस ठरविण्याच्या खटपटी करणारी एक दोन संस्थानें जेथें आज प्रत्यक्ष अस्तित्वांत आहेत. तेथें मुमताझच्या मुलीची हत्या करण्यांत महाराजांना काय मिळवायचें होतें, याची विवेकमान्य कारणमीमांसा निंदकांनीं पुढें मांडली तर बरें होईल. तोपर्यंत असल्या बेजबाबदार आरोप बरळणाऱ्या क्षुद्रांच्या विचारक्षुद्रतेची कींव करण्यापेक्षां अधिक काय करतां येईल? प्रस्तुतच्या मुमताझ प्रकरणामुळें एक मात्र फायदा असा झाला आहे कीं देशभक्तीच्या पांघरुणाखाली वर्तमानपत्राचा प्रतिष्ठित धंदा करणाऱ्यांत साव किती आणि बेरड चोर किती यांचा अंदाज करतां येणें सोपें झालें आहे.

एवढा पैसा कोठून आला?

इंदोरधिपति होळकर सरकारच्या रक्तासाठीं तान्हेलेल्या भिक्षुकी व हिंदद्वेष्ट्या आंग्रेजी पत्रकारांना आतां एक असा मोठा जिव्हाळ्याचा पेंच येऊन पडला आहे कीं मुमताझ कटांतल्या आरोपींनी डिफेन्सची कायदेबाजी लडवायला एवढा पैसा आणला कोठून? जणू काय हा प्रश्न जर नीट सुटला नाहीं तर टाईम्स प्रभृति पत्रकारांच्या सत्यान्वेषणी अकलेवर वैधव्याचा दावाग्नी कोसळणार आहे. यदाकदाचित् आरोपी जर नुसते खाका बगला वर करून कोर्टात उभे राहते, तर हे आंग्रजी व भिक्षुकी पत्रकार आपापलीं घरेंदारें गहाण ठेऊन त्यांच्या बचावासाठीं पैशाच्या थैल्या घेऊन धांवले असते, असें मात्र कोणी समजूं नये. शंका एवढीच येते कीं बॉम्बे क्रॉनिकलवर धारवाड गोळीबाराच्या बाबतींत पेंटर कलेक्टरनें बेअब्रूची फिर्याद लावली, तेव्हां त्या कज्जेदलालीला लागणारा

खर्च झेपण्याइतकी कलेक्टरांची सांपत्तिक स्थिती वास्तविक असते काय? आणि जर ती नसते, तर तो खर्च पेंटर साहेबांनीं कसा झेपला? कोठून आला एवढा पैसा? हे प्रश्न विचारण्याची त्या वेळीं एका तरी आंग्रेजी व भिक्षुकी पत्रकाराची छाती झाली काय? फंडगुंडांचीं बंडें अखंड चालवून त्यावर आपला तळीराम थंडगार करणाऱ्या कांहीं लुच्या भिक्षुकी पत्रांनींहि या बाबतींत मोठ्या सत्यशोधनाचा डौल मिरवावा, ही मोठी बेशरमपणाची गोष्ट आहे. टाईम्स क्रॉनिकल डेलीमेल प्रभृतींचे काय! हिंदवी हितवादाचा त्यांचा पारदर्शक मुखवटा उचकून फेकून दिला तर त्यांना बारसें बाराव्याचा आनंद सारखाच, इतकें त्यांचें काळीज निगर्गट्ट आहे. फंडगुंडी, भटुरडे काय किंवा हे पाटलोणे सोदे काय, जरा कोठें चोंच मारायला जागा सांपडली कीं हीं गिधाडें साध्या पुळीचेंहि भाकडखांडूक बनवायला कमी करायची नाहींत. श्रीमन्महाराज तुकोजीराव होळकर यांना खुनाच्या खटल्यांत कसेंहि करून गोंवण्याचा हा जो वर्तमानपत्री गुप्त कट आस्ते आस्ते प्रगट होत आहे, त्याचा हा पैशाच्या सबबीचा एक फासा आहे, हें चाणाक्ष वाचकांना समजण्यास फारसे आयास पडणार नाहींत, या कटवाल्यांना एवढेच सिद्ध करावयाची विवंचना लागली आहे कीं हा पाण्यासारखा पैसा होळकरांच्या तिजोरींतून आला. खरी वस्तुस्थिती बाजूला ठेऊन आपण क्षणभर असेंहि गृहीत धरून चालूं कीं होय, होळकर सरकारनींच आरोपींच्या बचावासाठी आपली तिजोरी मुक्तद्वार फोडली यांत अन्याय काय झाला? खुनाची तरकदारी कशी सिध्द होते? आणि बिघडलेते काय तनमनधनाचा व्यय करणारे नातेवाईक मित्र, मालक किंवा कारखानदार हेहि आरोपीच्या गुन्ह्याचें साथीदार ठरतात, असा कायदा पेशवाईंत कदाचित असेल, पण ब्रिटीश रियासतींत असल्याचें मात्र आम्हाला माहीत नाहीं. टिळक विरुद्ध चिरोल खटल्यांत मुंबई सरकारनें चिरोलच्या बचावासाठीं काय परिश्रम व किती पैसा खर्च केला, याचा हिशेब टाईम्सनें कधीं विचारला होता काय? या खटल्यांतील चिरोलच्या बचावाच्या तपशीलाचा अभ्यास केला तर असें स्पष्ट म्हणावें लागतें कीं मुंबई सरकारच्या सिएडी खात्याची व इतर खात्यांची चिरोलला जर खास मदत नसती तर तो खटला जिंकायची त्याची काय माय व्याली होती? मुंबई सरकारचा चिरोल कोण? काय गव्हर्नर का जांवई, का मानसपुत्र? मग त्याला ही एवढी खास बचावाची मदत काय म्हणून? असा प्रश्न विचारतांना ज्यांच्या दांतखिळ्याच बसल्या, त्यांनीं मुमताझ कटांतल्या आरोपींच्या 'पाण्यासारख्या पैशा'नें बिचकून जाण्याचे वास्तवीक कांहीं कारण नाहीं. प्रस्तुत खटल्यांतले तिघे आरोपी इंदोर संस्थानांतले मोठे अधिकारी आहेत. त्यांनीं करूं नये ती गोष्ट केलीं खरी; परंतु सरकार या नात्यानें त्यांना बचावासाठीं शक्य ती मदत इंदोर सरकारनें वास्तवीक द्यावयास पाहिजे होती. एवढेंच नव्हे तर हा खुनाचा खटला इंदोरच्याच सेशन कोर्टात आम्ही चालवितो असा हट्ट त्यांनीं धरावयास पाहिजे होता. तें कांहींच न करतां आपले मोठमोंठे अधिकारी मागणी होताच ब्रिटिश दोस्त सरकारच्या हवालीं करून आपण नुसते टाइम्स क्रॉनिकल वाचीत बसण्यांत होळकर सरकारनीं आपल्या कर्तव्याला पाठ दाखवून गाळीव मूर्खपणा केला, असें आमचें मत आहे. ब्रिटीश साम्राज्याच्या इज्झतींसाठीं चिरोलेसारख्या एका इंग्रजी पत्राच्या बड्या रिपोर्टरासाठीं बचावाचा त्रिखंड आटारेटा करणारे मुंबई सरकार कोणीकडे आणि ॲडज्युटंट जनरल, कॅप्टन एअर फोर्स व मानकरी यांसारख्या संस्थानच्या बड्या अधिकऱ्यांना बिनतक्रार मुंबई सरकारच्या ताब्यांत देऊन

'मी न्यायाला मदत केली' म्हणून अभिमान वाहणारे इंदोराधिपति कोणीकडे, होळकर सरकार, आपण न्यायाला कांटेकोर मदत केली, म्हणून अभिमान वहाणारे इंदोराधिपति कोणीकडे, होळकर सरकार, आपण न्यायाला कांटेकोर मदत केली, पण व्यवहाराला पारखे होऊन आपल्या पदरच्या आश्रितांना ऐन प्रसंगी बचावासाठीं काडीचीही मदत केली नाहींत, या सेवकद्रोहाचा वाटा तुम्हाला गपचूप पदरांत घेणेंच भांग आहे. उघड उघड दिसणाऱ्या गुन्ह्यांत एखादा मित्र सांपडला तरी त्याच्याहि कायदेशीर बचावासाठी आपण पदरमोड करून उघड उघड खटपटी करतो. कायदेबाजी लढवितो. कज्जे दलालांची घरें भरतों आणि कसहि करून त्या मित्राला वाचविण्यांचा यत्न करतो. परंतु त्यामुळें त्या गुन्ह्यांत आपण प्रत्यक्ष सामील आहों, असें थोडेंच होतें? खुनी इसमाला बॅरिस्टर देतां आला नाहीं तर इंग्रजी कोर्टांत सरकारतर्फे त्याला बचावाची सर्व तरतूद मोफत करून देण्यांत येत असते. सांराश, कटवाल्यांना होळकरांनी बचावाची लागेल ती मदत दिली असती, तर ती गोष्ट त्यांना अधिक शोभली असती. पण तें त्यांनी केलें नाहीं ही मोठी चूक झाली.

पण ज्याच्या सुटकेंसाठीं मुमताझ कट अस्तित्वांत आला तो शंकरराव गावडे किंवा फणशे दोघेहि मोठे धारेणी. त्यांनीं प्रथम पासूनच महाराजांची पर्वा केलीं नाहीं. दोघेहि घरचे श्रीमंत. फणशे जमीनदार, तर शंकरराव गावड्यानीं पैशाची भयंकर अफरातफर केली म्हणूनच तुरुंगात गेलेला अशा अवस्थेत महाराजांच्या कवडीची फणसे आशा तरी कशाला करतो? जेथें सगळा कटच गुप्त, तेथें त्यांची वाच्यता महाराजांना कां कळावी? आणि कळविण्याइतका फणशे मूर्ख असता, तर गुप्तकट कशाला करता? या पाण्यासारख्या पैशाबद्दल इं. डे. मेल पत्रांत R. N. P. Gufle यांनीं केलेला खुलासा समाधानकारक आहे. श्री. गुफळे म्हणतात-

Mr. Phanse is a Zemindar and Shankar Rao is supposed to have secreted a large amount of money. For Shankar Rao's friend to get money ts easier than it is for even the Government with the highly elaborate checks and balances of the finance Department. The wonder is not that Phanse had so much money, but that he and his friends lacked `brain power' as otherwise they would not have so openly associated themselves with the plot or made the attempt in so prominent a place. This alone would suffice to disarm any suspicions about the identity of the `prime mover' it proofs were needed. But it is useless to argue. when newspapers take advantage of the relative gullibility of the Indian Public for propagating conclusions drawn long before the police had any evidence and the trial in the two Courts.

(**भावार्थ :** फणशे जमीनदार आहे आणि शंकररावनें तर पैशावर यथास्थित गुप्त हात मारल्याचें सर्वश्रुतच आहे. खुद्द सरकारला रकमा पाहिजे असतील तर तिजोरी खात्याच्या आढाव्या वाढाव्याच्या त्रांगड्यांतून पद्धतशीर कवायतीनें जावें लागते. पण फणशाची स्थिति तशी नाहीं. त्याला केव्हांहि पैसे मिळणें कठीण नव्हतें. फणशाजवळ एवढा पैसा कोठून आला या प्रश्नांत कांहींच अर्थ नाहीं. त्यांत काहीं नवल नाहीं. पण त्याच्या सारख्या माणासानें असल्या कटांत उघड भाग घेऊन मुंबईसारख्या शहरांत त्याचा धाडसी यत्न करावा, या त्याच्या महामूर्खपणाचेंच वास्तवीक विशेष

आश्चर्य वाटलें पाहिजे. या एकाच गोष्टीवरून कटाच्या मुख्य चालनेविषयीं कोणाला जबाबदार धरावें या शंकेचें समाधान होतं. पण या बाबतींत विधान करायला वर्तमानपत्री गाजावाजानें कांहीं जागाच ठेवलेली नाहीं. पोलीसांनीं पुरावा गोळा करण्यापूर्वींच व दोनहि कोर्टात खटला चालण्यापूर्वीच जीं पत्रें हिंदी लोकांच्या भोळ्या मनोवृत्तीचा फायदा घेऊन या बाबतींत बेछूट विधानें ठोकून मोकळी होतात, त्यांच्यांशी हुजत घालीत कोण बसतो?)

□□□

काव्य

वीररत्न बाजीप्रभू देशपांडे यांचा पोवाडा

(चाल -विजयादशमी सण विजयाचा).

जय जय अंबे माय भवानी तुळजापुरवासी ।।
उदो उदो श्री जगदंबे रक्षि बाळकांसी ।।ध्रु.।।
गोंधळ अंबे! तुझा घालण्या अनन्य भावाचा ।।
दिवटा घेउनि करीं नाचतो शाहिर शिवबाचा ।।१।।
तुझ्या कृपेची पांखर अंबे । कवनावरि पाडी ।।
पहा कसा मग कवि मोत्यांचा जणुं पाउस पाडी ।।२।।
तूंच नाहिं कां केलें अंबे! शिवबाला धन्य ।।
सांग कुणाच्या पदीं रिझे तो तुजवांचुनि अन्य ।।३।।
आळविलें तुज परोपरीनें रामाच्या दासें।।
कुठे जाउं मी टाकुनि असलें मोक्षदपद खासें ।।४।।
स्फूर्तीच्या तेलांत भिजविला दिवटा कवनाचा ।।
पेटविला बघ नाचुनि गातो शाहिर मानाचा ।।५।।
मीच नाचलों शिवबापुढतीं रायगडावरतीं।।
थाप डफावर पडे पडे तों अस्तनि हो वरतीं ।।६।।
मी मी म्हणुनी पुढें सरकले शूर वीर गाजी ।।।
हाच भराडी ललकारीनें चेतवि राज बाजी ।।७।।
।। चाल ।। जय उदो उदो उदो अंबेचा ।। जय.।।
जगदंबेचा । महाराष्ट्राचा ।।
एळकोट मार्तंडाचा ।। जय छत्रपति शिवबाचा ।।
जय किल्ले रायगडाचा ।। जय भगव्या जरिपटक्याचा ।।

हर हर हर हर महादेव गर्जना करा खाशी ।। उदो. ।।

(२)

वर्दी गेली विजापुराला पडला अफझुल्ला ।।
तुटला उजवा हात शहाचा झाला बहु गिल्ला ।।१।।
बिकट पेंच हा पडला होता खुद्द शिवाजीला ।।
कारण अतिशय शूर वीर लढवय्या अफझुल्ला ।।२।।
अफाट सेना निवडक हातीं दैत्यासन शक्ती ।।
परंतु करिती मात मऱ्हाठे! धन्य राष्ट्रभक्ती ।।३।।
वाघनखाच्या कचक्यासरसा लोळविला खालीं।।
कदरबाज महाराष्ट्र म्हणुनिया गोष्ट अशी घडली ।।४।।
जय हर जय हर म्हणतां शिवबा निशाण विजयाचें।।
उंच फडकतां येत मावळ्यां भरतें शौर्याचें ।।५।।
नायक पडतां मोंगल हटलें धैर्य सर्व सुटलें।।
त्यांत मावळे हल्ला करितां धूम पळत सुटले।।६।।
प्रतापगडचा प्रताप सारा स्वार्थत्यागाचा।।
राष्ट्रभक्तिचा, धारिष्टाचा, अचाट हिमतीचा ।।७।।
महाराष्ट्राच्या धर्माविरचें संकट हें मोठें ।।
श्रीअंबेने पार पाडिलें अडलें नच कोठें ।।८।।
।। चाल।। मन एक सर्व राष्ट्राचें ।। मन.।।
एक मताचे ।। एक जिवाचें ।।
यानेच दिलें यश कार्यां ।। गुरुकिल्ली ही चिर विजया ।।
भुलवी न कुणा रिपुमाया ।। ये धांवत लक्ष्मी पायां ।।
गजांत लक्ष्मी ऐश्वर्यातेंकरिशिवप्रभु दासी ।।उदो.।।

(३)

पडतां समरीं पिता चढे तो त्वेषहि पुत्राला ।।
फाजल महमद उठे कडाडुनि घे करिं शस्त्राला ।।१।।
पातशहाला धिक्कारुनि तो वदे ''कसे बसला।।
'स्वस्थ पढा हो'' चिरडि शिवाजी माझ्या बापाला ।।२।।
''पहाडका वो चुव्वा काफर क्यों न मिले ज़िंदा!।।
''मैं अकेला खतम् करूंगा'' अशी करी निंदा।।
शिवयुक्तीच्या पुढती ठरते फोल सर्व शक्ती ।।
कुणी कुणावर करू शकेना बुद्धाची सक्ती ।।४।।
ठका महाठक असा रचुनिया कपटाचा कावा।।
निघे संगरीं फाजल ध्याया शिवकंठीं चावा।। ५।।

शिद्धी सरजास्तान निघाले घेटनि सैन्याला।।
जाणुनि पुरतें मनीं भेटण्या जातों दैन्याला ।।६।।
'जंगलका वो शेर शिवाजी' पन्हाळ किल्ल्याला ।।
आला ऐशी खबर लागतां वेढा त्या दिधला ।।७।।
जाळ्यामध्यें पुरा पकडला सिंह मऱ्हाठ्यांचा।।
वाटे सर्वां येथ बुडाला बेत शिवाजीचा ।।८।।
।।चाल।। लागली तात मानेला ।। लाग.।।
श्रीशिवप्रभुच्या । महाराष्ट्राच्या।।
धडकलें सैन्य त्या रिपुचें ।। चढविले धमधर्म मोर्चे ।।
यावनी वीर नच कच्चे ।। जावते बंद किल्ल्याचे ।।
हा पहा शिव झाला अंबे! कारागृहवासी।। उदो.।।
(४)
दाणा वैरण दारूगोळा भरपुर किल्ल्याला ।।
होता म्हणुनी जुमानिले ना परकी हल्ल्याला ।।१।।
किल्ल्याखालून न तोफ सुटे ये गोळा परतोनि ।।
वरुनि लोटता सहज दगड रिपु मरती चिरडोनी ।।२।।
तोफातोफी बहुतचि केली मरे न मरगठ्ठा ।।
हिंमत खचली जरि तो फाजल हिमतीचा कट्टा ।।३।।
वरचा मारा अचाट मारी शत्रुसैन्य भारी ।।
तारी ज्याला तुळजादेवी त्यास कोण मारी? ।।४।।
कितिक मऱ्हाठे फकीरवर्षे शत्रुगणीं घुसले ।।
खुशाल फिरुनी वेध काढिती कुणाा न ते दिसले ।।५।।
दाणा वैरण मिळे न रिपुला कारण नेताजी ।।
रोंखुनि बसला बाहिर सगळ्या वाटा रणगाजी ।।६।।
किल्ल्यावरचा मार त्यांत भर उपासमर झाली ।।
विजापुराची सर्वच सेना रडकुंडी आली ।।७।।
मुसलमान आणि शूर मराठे चार मास लढले ।।
मिळे न किल्ला चढे न हल्ला मुसल्मान थकले ।।८।।
।। चाल ।। 'चल् छोड देवजी किल्ला' ।। चल. ।।
एकच गिल्ला । करिती हल्ला ।।
मग धीर देत त्या शिद्धी ।। ''ही योग्य म्हणे नच बुद्धी ।।
''येईल आपणां सिद्धी ।। संपली रिपूची सद्दी ।।
''ताड ताड तट फोडूनि जातों या या पाठीशीं ।। उदो.।।

(५)

सावधान द्या श्रोतेगणहो । झोंपु नका कोणी ।।
नातरि ठरतिल बहिऱ्यापुढचीं हीं माझीं गाणीं ।।१।।
राष्ट्रविनाशक काळझोंप कां अझुनी नच गेली ।।
डुलक्या पाहुनि वाटे तुमची हितबुद्धी मेली ।।२।।
कशास चिडतां प्रियबांधवहो? वटारितां डोळे? ।।
सांभाळाहो! शिद्धी फेंकतो तोफेचे गोळे ।।३।।
अनेक युक्त्या वरवर करि जरि देहं शिवाजीचा ।।
विसरूं नका त्यामधें विहरती आत्मा बाजीचा ।।४।।
बाजी म्हणतां नाक मुरडितां? हा नच तो बाजी।।
ज्या नामदें राज्य गमविलें ठरवि तुम्हां पाजी ।।५।।
शिवरायाचा केवळ आत्मा सागर शौर्याचा ।।
प्रभूवीर तो बाजी झाला विषय पवाड्याचा ।।६।।
चार मासपर्यंत झुलविली मुसल्मान सेना।।
फाजल शिद्धी खुद्द डुलविती आश्चर्ये माना ।।७।।
ज्या कायस्थें रक्त ओतिलें शिवप्रभुच्या कार्या ।।
अग्रगण्य हा बाजी त्यांतिल पूज्य सर्व आर्यां ।।८।।
।। चाल ।। जोहार चढवि मग हल्ला ।। जोहा.।।
अति निकराचा ।। प्राणान्तीचा ।।
रोखिली तोफ ती बुरुजा ।। करि फस्त मुख्य दरवाजा ।।
'जय' म्हणति मऱ्हाठे 'तुळजा' ।। 'देशाचि राख तू लज्जा'
हां हां म्हणतां करील सर तो फाजल किल्ल्यासी ।। उदो. ।।

(६)

दाणा दारू सर्व संपली उरलि मात्र चिंता ।।
प्रसंग आला विकट सुचे ना अक्कल धीमंता ।।१।।
शिवाजि बाजी कृष्ण पार्थ जणु करिती एकांता ।।
टाळ्या मारित 'ठरलें' म्हणती टळवूं आकांता ।।२।।
शह उठवा मग तह करण्याला शिवराजा राजी ।।
कळवी ताजी खबर शिद्धिला परस्परां बाजी ।।३।।
तहनाम्याचें वृत्त ऐकतां फाजलखां रमले।।
कारण होते सैनिक त्याचे अतिशय दमलेले ।।४।।
''अच्छा अच्छा बहोत खाशी तहनामा करना''
सैनिक म्हणती 'जल्द करो अभि क्यों नाहक मरना'।।५।।
केडि पसरतां थंडीं पडली मुसल्मान सेना ।।

खाना पीना चम्मन रंडी दारू नाच गाना।। ६।।
घोड्यावरचे, जीन उतरले तोफाही निजल्या ।।
मेजवानिच्या हंड्या सगळ्या छावणींत शिजल्या ।।७।।
जिकडे तिकडे रंगराग कुणि गाती कुणि खाती ।।
आतां ऐका काय मऱ्हाठे किल्ल्यावर करिती ।।८।।
।।चाल ।। पाहुनी ढिलाई रिपुची।। पा.।।
फाजलखांची ।। जोहाराची ।।
छातिचा कोट मग केला ।। शिवप्रभू पुढारी झाला ।।
सोडिला पन्हाळा किल्ला ।। तुडवीत मोगलां गेला।।
निशेमधें जे पिसे शिपाई कोण पुसे त्यासी ।।उदो. ।।

(७)

अरी करीं तो तुरी देऊनी निसटुनिया गेला ।।
अशी वदंता कळतां फाजल वदे ''सुभान्नला!'' ।।१।।
''भागो भागो दवडो दवडो'' एक शब्द उठला।।
झोंप साखरी लागे कोणा कुणि वरळत सुटला ।।२।।
डंका झडला 'हुशार रहना कुच करना जल्दी'।।
परंतु मानी कोण अवेळीं चढाइची वर्दी ।।३।।
घोड्यावरचें जीन चढविलें बैलाच्या पाठीं।।
हत्तींवर कठाळि ओढि तो उंट तोफ मोठी ।।४।।
राकट कडवे परंतु रडवे राउत ते सजले।।
शिंग फुंकतां अति त्वरेनें शिवमार्गे गेले।।५।।
वायुवेगां सारुनि मागें मोंगल चमु धांव ।।
खरोखरी त्या तीव्र गतीला कवीनिंही गावें ।।६।
भल्या पहाटें सैन्य मऱ्हाठी गाठियलें त्यांनीं ।।
नंतर कुत्तरतोड लढाई करिति दळें दोनी ।।७।।
मरे परी तिळ हटे न ऐशा चिकट मऱ्हाट्यांशीं ।।
मुसल्मान अति प्रेमें लढती करुनि शिकस्तीशी ।।८।।
।।चाल।। मावळे लोक बहु थोडे ।। मावळे.।।
जिवाचे धडे । करिती सौगडे ।।
परि शत्रुसैन्य जोराचें ।। करि हल्ले अति निकराचे ।।
जणु तुफान बावटळीचे ।। ढांसळवि गिरी आशेचे ।।
प्रळयकाळ हा गिळतो वाटे जणुं महाराष्ट्राशी ।। उदो.।।

(८)

झडकरि आपण महाराज ! या खिंडींतुनि जावें ।।

अपार शत्रुसेना ग्रासिल क्षण न येथ रहावें ।।१।।
मी धरतों हें नाक दाबुनी पावनखिंडींचें ।।
तोंवर जावें खुशाल घेउनि सैन्य मावळ्यांचें ।।२।।
ठेवा निवडक कांहिं मावळे माझ्या पाठीशीं ।।
उभा राहतों असा इथें मी ठोंकुनि छातीशीं ।।३।।
सुखरुप जोंवरिं असे शिवाजी तोंवरिं काळाला ।।
भीक न घालूं लाख रिपूंना दडपूं पाताळी ।। ४।।
असें निक्षुनी बोले बाजी शिवप्रभु गहिवरला ।।
महिवर हा जणुं भक्त मारुती संकटिं अवतरला ।।५।।
आलिंगुनि बाजीस चालला शिव ढाळित असवें ।।
मनीं म्हणे ती धन्य जननि ते धन्य तिचे कुसबे ।।६।।
कसा एकटा प्रभूवीर हा देइं तोंड अरिला ।।
म्हणुनि शंकुनी वरचेवर शिव फिरवी मानेला ।। ७।।
तलवारीनें 'जा जा' बाजी खुणवि फिरवि पट्टा ।।
राहि न क्षण शिर नीट धडावर ज्यांस बसे रट्टा ।।८।।
।। चाल ।। विसरलों गोष्ट मुद्द्याची ।। विस. ।।
शिवरायाची ।। प्रभु बाजीची ।।
बाजीस धरी शिव पोटीं ।। हृदयांस आणिलें ओठीं ।।
भडभडून आलें पोटीं ।। सांगितलि एक हितगोष्टी ।।
ठोकिन तोफा पांच पोंचतां रांगण किल्ल्यासी ।। उदो. ।।

(९)

गडी मावळे मुठभर सारे तोंडीं खिंडीच्या ।।
उभे राहुनी छाटिती सप सप तुकड्या शत्रूच्या ।।१।।
गुं गुं भरभर सों सों सुटती दगड गोफणींचें।।
बाणांचा सणसणाट पाडा ढिगार प्रेतांचे ।।२।।
चमचक चमकति तलवारींचीं भाल्यांचीं पातीं ।।
शिरे कितीतरि चेंडुसारखी भरभर वर उडतीं ।।३।।
चहूंकडे घनदाट चालले पाटचि रक्तांचे ।।
धारातीर्थी 'खतम्' जाहले वीर फाजलाचे ।।४।।
हत्ति बुडेसा चिखल जाहला रक्तामांसाचा ।।
युद्ध नव्हे ! तो पसरे जबडा विश्वभक्षकाचा ।।५।।
तोंडावरती उभा वीर प्रभु बाजि देशपांडे ।।
समशेरीच्या फटक्यासरसा करि अरिचीं खांडें।।६।।
पट्टा फिरवित उभा ठाकला काळ अविधांचा ।।

दाट पडे तठ पाठीमागें मर्द मावळ्यांचा ।।७।।
हल्ल्यांवरती हल्ले चढती देती किति टकरां ।।
परंतु उतरी बाजी खासा फाजलचा नखरा ।।८।।
।। चाल।। नाहला उभा रक्तांनीं ।। नाह.।।
किति जखमांनीं ।। युद्धश्रमांनीं।।
मागें न पाय तिळ घेईं ।। हल्ल्यांची नित्य नवाई ।।
पट्ट्याची अति चपळाई ।। ही शिवबाची पुण्याई ।।
अखेर अवघे साठ मावळे उरले पाठीशीं ।। उदो.।।

(१०)

उरतां थोडें सैन्य दणाणे धाबे शिद्धीचे ।।
शक्ती युक्ती हरलि संपले प्रभाव बुद्धीचे ।। १।।
चढवी चिडुनी अखेरचा मग निकराचा हल्ला ।।
संधि साधुनीं वर्मी बाजीप्रभु जखमी केला ।।२।।
बांधुनि जखमा तयार झाला वीर दुजोऱ्यानें ।।
हटे न तिळ जरि शिकस्त केली शिद्धि फाजलानें ।।३।।
एक दोन ना बारा झाल्या जखमा बाजीला ।।
भान न त्याला परी लढे तो स्वामीकार्याला ।।४।।
शिवरायाची तोफ जोंवरी पडें न मम कानीं।।
तोंवरी आला काळ तरी त्या ठेंचिन लाथांनीं ।।५।।
जय हर जय हर बोलुनि चेतवि सर्व सौंगड्यांना ।।
तेही पठ्ठे कसून लढती त्यजुनी देहभाना ।।६।।
तोफ येइना ऐकूं म्हणुनी व्याकुळ मनिं बाजी ।।
पांच तास तो लढला परि नच हटला रणगाजी ।।७।।
उभा ठांकला पुढे काळ साक्षात त्यास खाया।।
परंतु मानी त्यास न तिळ धरि चित्त प्रभूपाया ।।८।।
।। चाल।। धोम् धडडड धडडड ऐसा ।। घोम् .।।
ध्वनि तोफांचा ।। शिवरायाचा ।।
शेवटीं पडे तो कानीं ।। जीवास धन्य तों मानी ।।
जयशिव जयशिव हें म्हणुनी ।। अंतिचा श्वास सोडोनि ।।
धारातीर्थी मोक्ष मिळे प्रभु रणशुर बाजीशी ।।
सुरनर किनर गाउनि करिती सुपुष्पवृष्टींशी ।।

(११)

बाजी पडतां सिद्धि धांवला त्या आलिंगाया ।।
फाजल महमद उडी घेउनी ये स्तवना गाया ।। १।।

'भले बहाद्दर भले बहाद्दर दुस्मन् तूं दाना' ।।
तलवारीनें वंदन करिती वांकवुनी माना ।।२।।
बाजीला मग मुजरा केला अखेर सर्वांनीं ।।
मुसल्मानही रडले जरि ते फुगले गर्वांनी ।।३।।
सभोवतीं मग जमला मेळा मर्द मावळ्यांचा ।।
मुक्तकंठ तो शोक कुणी बा! वर्णावा त्यांचा ।।४।।
सन्मानानें प्रेत बाजिचें नेलें शिवपाया ।।
रडे मुलापरि धायधाय शिवराय पडे ठायां ।।५।।
बळी दिला तूं तुझ्या जिवाचा केवळ मजसाठीं ।।
राष्ट्रोन्नतिची जणूं बसविली कोणशिला मोठी ।।६।।
ज्या भूमीवर रक्त सांडले या प्रभु वीराचें।।
दर्शन घेतां गहिंवरतीं नर अलोट धीराचे ।।७।।
बाजी गेला कीर्त करुनिया बखरी त्या गाती ।।
विसरे ज्या दिनिं महाराष्ट्र त्या खाइल तें माती ।।८।।
आकाशीं जोंवरीं चमकती चंद्र सूर्य तारे ।।
गातिल शाहिर कवनांवरती कवन करुनि सारे ।।९।।
।। चाल ।। प्रभु बाजि देशपांड्याचा ।। प्रभु.।।
पवाडा पुरा । मोत्याचा तुरा ।।
वाहिला बाजिच्या पायीं ।। त्याचींच सर्व पुण्याई ।।
ती प्रसन्न अंबाबाई ।। म्हणुनि हें कवन मी गाई।।
शाहिर केशव अखेर करितो मुजरा सर्वांसी ।। उदो.।।

□□□

अग्रलेख

साताऱ्याचें दैव का दैवाचा सतारा!

सातारा! एकच शब्द आणि तीनच अक्षरें. पण त्यांत किती सुखदुःखाच्या गोष्टी, आशा निराशेचा इतिहास आणि अंगावर रोमांच उभे करणाऱ्या स्फूर्तीची व हृदयविदारक कल्पनांची साठवण झालेली आहे? हिंदवी स्वराज्याच्या पुनर्घटनेचा धडाडीचा भगिरथ प्रयत्न येथेंच झाला आणि त्या स्वराज्याच्या बलीदानाचा भिक्षुकी यज्ञ येथेंच धडाडला. छत्रपतींच्या सार्वभौम सत्ताप्रसाराची दिव्य शक्ती येथेंच प्रथम फुरफुरली व अटकेपार गुरगुरली; आणि छत्रपति मालकाची स्वारी पेशवे नोकरांच्या कैदखान्यांत येथेंच झुरणीस लागून बेजार झाली. समाज व धर्म कारणांच्या क्षेत्रांत आज मगरूर झालेल्या व राजकारणांत साऱ्या महाराष्ट्राची स्वयंमान्य बडवेगिरी गाजविणाऱ्या चित्पावन बृहस्पतींच्या लोकिकाची प्राण प्रतिष्ठा येथेंच साजरी झाली; आणि चित्पावनांनी आपल्या आत्मप्रतिष्ठेखातर छत्रपतीच्या प्राणाची व सत्तेची आहुती याच नगरींत दिली. जिंजीच्या आत्मयज्ञांत महाराष्ट्राची राष्ट्रीय इभ्रत तावून सुलाखून काढणारे पुरुषोत्तम येथेच नांदले; आणि त्याच इभ्रतीचे हातपाय चित्पावनांनी केवळ आपल्या स्वार्थासाठी इंगेजी डावपेचांच्या लोखंडी शृंखळांत बांधले. शिवरायाच्या नांवासाठी तमाम हिंदुस्थानांत रक्ताचे सडे घालणारे वीर महावीर येथेंच थरारले; आणि भिक्षुकी पेशवे राहूंचें छत्रपतीला खग्रास ग्रहण लागतांच ब्राह्मण-भोजनाच्या खरकट्या पत्रावळी व द्रोणांचे पर्वतप्राय खच येथेंच पडले. भिन्नभिन्न संस्कृत्यनुरूप महाराष्ट्रांतील यच्चावत् सर्व ब्राम्हण ब्राम्हणे तर जातींचा देशहितसाठीं व राष्ट्रोद्धारासाठी याच साताऱ्यांत उद्धार झाला आणि चैनी व रंगेल शाहू छत्रपतीच्या राजविलासी मग्नतेचा फायदा घेऊन चित्पावनांनी चित्पावनेतरांना माजी पाडण्याच्या कटाचा भिक्षुकी पाया येथेंच घातला. हिंदुंच्या हिंदुत्व-रक्षणाचे व प्रसाराचे प्रयत्न येथेंच झाले आणि ब्राह्मण-ब्राह्मणेतर भेदाच्या विषवल्लीचे पुणेरी बीज येथेंच प्रथम पेरलें गेलें.

गाई ब्राह्मणांच्या संरक्षणाचे प्रतिज्ञाकंकण चढविलेले छत्रपति याच साताऱ्यांत गाजले; आणि ब्राह्मणी धर्माच्या यज्ञांत त्याच छत्रपतींना पेशव्यांनी जिवंत भाजून टोपकरी सेनेला गोमांसाच्या मेजवान्यांनी येथेच संतुष्ट केले. भट घराण्याची पेशवाई चिटणिशी कलमाच्या मखलाशींत येथेंच जन्म पावली; आणि पेशव्यांच्या मखलाशीने चिटणिशी घराण्याची राखरांगोळी येथेंच झाली. क्षत्रिय मराठ्यांच्या दणकट क्षात्रतेजावर ब्राह्मणांच्या जानवी शेंड्यांचे रक्षण याच राजधानीने केले; अखेर त्याच

ब्राह्मणांनी आपल्या जानवी शेंड्यांच्या वर्चस्वासाठीं परकी टोपकरांशी संगनमत करून, मराठ्यादि अखिल चित्पावनेतरांना 'शूद्राधम' ठरविण्यासाठीं छत्रपति प्रतापसिंहाचा गळा याच साताऱ्यांत भर मध्यान्ह रात्रीं कापला. ब्राम्हणी विद्येला उत्तेजन देणारी वेदशाळा छत्रपतीनींच येथें स्थापन केली; आणि कायस्थ मराठ्यादि क्षत्रियांना शूद्र ठरविण्याचीं भिक्षुकी कारस्थानें अखेर येथेंच शिजली. विद्यासंपन्न भिक्षुकांना छत्रपतींनीं शालजोड्यांची खैरात येथेंच वाटली; व त्याच भिक्षुकांच्या सैतानी कारस्थानांनी हद्दपार होणारी छत्रपतीची मूर्ती एका मांडचोळण्याशिवाय उघडी जागडी स्वराज्य स्वदेशाला येथेंच सुकली. छत्रपतींच्या पायाच्या धुळींतून पंत सचीव, पंत आमात्य, पंत प्रति निधि, पंत पेशवे इत्यादि भिक्षुकी पंतें येथेंच निर्माण झाली; आणि अखेर याच पंत संतांनी ब्राम्हणी कारस्थाने रचून छत्रपतीला याच साताऱ्यांत अखेरची धूळ चारली रायगडला विस्कटलेली स्वराज्याची घडी दैवाच्या सताऱ्याने साताऱ्यास वसविताना छत्रपति राजाराम महाराजांनी ब्राम्हणांना आकंठ अमृतभोजन घातले ते येथेंच; आणि ब्राम्हणी वर्चस्वाचा भिक्षुकी स्वराज्याचा कंठ चरचरा चिरून ब्राम्हणांनी ब्राम्हणेतरांचा सूड उगविला तेहि येथेंच. ब्राम्हणांना चारलेल्या अमृताच्या मेजवान्यांचे पारणे अखेर हिंदवी स्वराज्याच्या खुनाच्या मुखशुद्धीत पार पडले. दैवाचा सतारा फिरला, रायगड डळमळला. छत्रपति हाल हाल होऊन मोंगलांच्या छावणींत ठार मारला गेला; पण महाराष्ट्रांतल्या खऱ्या राष्ट्रवीरांचा धीर सुटला नाहीं. त्यांनी लगबग करून करनाटकांत राजकारणी नाटक केले आणि स्वराज्याच्या अकल्पनीय पुनर्घटनेनें मोगली मुत्सद्देगिरीला चारी मुंड्या चीत केले. साताऱ्याचे दैव उदयाला आलें. पुन्हा दैवाचा सतारा फिरला आणि

४ सप्टेंबर १८३९ च्या मध्यरात्रीं

बारा वाजतां छत्रपति प्रतापसिंहाच्या हद्दपारीनें साताऱ्याचे दैव फिरले आणि भिक्षुकांच्या देशद्रोहाला, धर्मद्रोहाला आणि राष्ट्रद्रोहाला हिंदवी स्वराज्याची अखेरचा बळी पडला.

ब्राह्मणांनीं हिंदवी स्वराज्याचा खून केला

यानंतर यशवंतराव शिर्के, भगवंतराव विठ्ठल चिटणीस आणि स्वराज्यवादी रंगो बापूजी इत्यादि अनेक पुरुषोत्तमांनी विलायतेची कायदेबाजी लढवून थकल्यावर, रंगो बापूजीनें १८५७ साली साताऱ्याच्या फिरत्या दैवाचा सतारा पलटविण्यासाठीं साताऱ्याच्या फिरत्या दैवाचा सतारा पलटविण्यासाठी स्वराज्याच्या पुनर्घटनेचा अखेरची मऱ्हाटशाही धडाडीचा यत्न केला. पण ऐन घटकेलाच पंत सचिवांच्या घरभेदाच्या टोपकरी चापांत तो सांपडला आणि उत्तर हिंदुस्थानांत रचलेल्या व्यूहांत 'मर्दानी झांशीवाली' दैवी लक्ष्मी, धोंडोपंत नानासाहेब, तात्या टोपी प्रसृति वीरांना हकनाहक राष्ट्रोद्धाराच्या यत्न-यज्ञांत ठार मरावे लागले. केवळ स्वार्थासाठी राष्ट्रकार्याला आग लावण्याची ब्राह्मणी कारस्थानांची ही अखंड परंपरा पाहिली की विद्यमान राजकारणांत ब्राम्हणांच्या कांसोट्यांच्या आधारानें आत्मोद्धार साधू पाहणाऱ्या माणसांना माणूस म्हणणारा माणूस एक माथेफिरू तरी असावा किंवा अजागळ गद्धा तरी असावा. भिक्षुकांच्या हात लावणीने आणि कावेबाज टोपकरांच्या मेहेरबानीनें, भावाच्या गादीवर घरभेद्या आप्पासाहेब भोसला छत्रपति म्हणून १८ नवंबर १८३९ रोजी जरी बसला, तरी साताऱ्याच्या दैवाचा सतारा एकदां उलटा फिरला तो कायम साताऱ्याचे स्वराज्य गेलें तेव्हांच तेथल्या भोसले घराण्याचे छत्रपतित्व मेलें. या पुढचे छत्रपति म्हणजे ईस्राइम करीमच्या हरण छापाच्या छत्र्या वापरणारे दत्तक जहागिरदार! यापेक्षां अधिक काय राहिलें आहे? आजचा सातारा म्हणजे पूर्वीच्या स्वराज्यरूपी आत्मा

वावरलेल्या देहाचें नुसते मढें आहे. स्वराज्याच्या आकांक्षा साताऱ्यांत कधीच जळून खाक झाल्या आहेत. भिक्षुकी कारस्थानांच्या त्या पापभूमीवर स्वराज्याचें बीज मुळीं जीवच धरणार नाहीं, इतकी तेथील जमीन ब्राम्हणी तंत्रयंत्रादि मंत्रांनी वांझोटी बनली आहे. साताऱ्याच्या आसपास त्याच पूर्वीच्या टेकड्या आणि डोंगर आजहि आहेत. अजिंक्य तारा तोच आहे. राजवाडाहि जुनाच उभा आहे. त्यांतच जुन्या माणसांचे नवे वंशज कसे तरी कोठें तरी रहात आहेत. पण बाह्य दृष्टीला दिसणाऱ्या या जड सृष्टींत आज कसलें चैतन्य आहे? डोंगर टेकड्यांतून आज स्वराज्याचा पडसाद उमटत नाहीं. त्यावरून वाहणाऱ्या वाऱ्यांत आज कसल्याहि स्फूर्तीचा संदेश नाही. अजिंक्य तारा म्हणजे दगड मातीचा एक डोंगर. कधीं काळीं मामलतदाराचा 'फास' घेऊन एकदा फेरफटका करून येण्याच्या लायकीचें जुनाट टेकाड. राजवाड्यांत तर काय कायदेबाजी आणि कज्जेदलालीचा व्यापार भरभक्कम चालूंच आहे. समर्थांच्या त्या सज्जनगडावर अवघ्या दुर्जनांचा सुळसुळाट. कोठेंहि पूर्वीच्या मऱ्हाटशाहीचा जिवंतपणा उरलेला नाहीं. खुद्द सातारा शहरसुद्धा उदास आणि ऐदी दिसतें ज्या शहरांत अखिल महाराष्ट्राच्या राजकारणी स्वयंनिर्णयी चैतन्याचा खून ब्राह्मणांनीं पाडला, तेथें कसले तेज आणि कसली भरभराट? आज सातारा स्वराज्याकरिता प्रसिद्ध नाहीं. साताऱ्याची प्रसिद्धी म्हणजे -

सातारी पेढा व ब्राम्हणांचा वेढा

यांत आहे. स्वराज्याचा विध्वंस केल्या दिवसापासून सातारा जिल्ह्यांतला पवित्र ब्रम्हवृंद मारवाडी कसायाच्या धंद्यानें ब्राम्हणेतर मराठ्यांच्या अज्ञानावर पोळाप्रमाणे चरून, बराच घनकनकसंपन्न होऊन बसला आहे. इंग्रजी विद्येचा प्रसारच तदंगभूत विवेकवाद कितीहि फैलावला असला आणि पदवीधरांचे प्रमाण कितीहि वाढले असलें, तरी ब्राम्हणांची भोजनाची चटक कांही केल्या कमी होत नाहीं. खरकट्याच्या जन्मसिद्ध स्वराज्याच्या हक्कासाठीं लढायला दरसाल कितीतरी पुणेरी भिक्षुक वीर बिनचूक सज्जनगडावर जात असतात. सारांश, साताऱ्याचे दैव सध्यां अशा प्रकारचें आहे. विशेष कांही असेल तर एवढेंच कीं पुणेरी देशभक्तांच्या तोंडाळ लेखाळपणाचा प्रतिध्वनि साताऱ्यांत बिनचुक उमटतो, इतका या दोन शहरांत भिक्षुकी एकजिनसीपणा आहे. एखादा ऐतिहासिक पुनरावृत्तीचा दाखला कोणी मागितलाच तर पुण्याच्या बाळंभट नातूचा 'डिअरफ्रेंड खुरशेदजी मोदी' याचा एक अवतार हल्लीं साताऱ्यांत सार्वजनिक हितवादाच्या क्षेत्रांत लुडबूड करीत असतो. खालसांतल्या इतर सामान्य शहरापेक्षां साताऱ्याला अधिक वैशिष्ट्य कांहींच उरलेलें नाहीं. तेथें स्वराज्य नाहीं, स्वराज्याची अभिमानास्पद स्फूर्ति नाही, छत्रपति नाहीं, कोणी नाहीं. हिंदु लोक जात्याच देवभोळे असल्यामुळें, ब्राह्मणांच्या चिथावणीनें ते वाटेल त्या दगडाधोंड्याचा देव बनवून त्याच्या भजनानंदांत पृथ्वीवर स्वर्ग उतरल्याच्या कल्पनेंत तल्लीन होतात. असल्या क्षणिक तल्लीनतेत त्यांना असेहि वाटतें की साताऱ्याचें दैव उदयाला आले! तीन चार महिन्यापूर्वी सातारचे श्रीमंत भाऊसाहेब महाराज भोसले दिवंगत झाले. ते निपुत्रिक वारल्यामुळें त्यांच्या राणीनें एक अल्पवयी मुलगा दत्तक घेतला. या दत्तविधानाचा इतका मोठ्या थाटाचा समारंभ सातारा शहरांत झाला कीं 'गेल्या १०० वर्षांत असा टि साताऱ्यांत कोणी पाहिला नाहीं' असें विश्वसनीय लोकमत आहे. बहुजनसमाजाचा आनंद तर वर्णनीय होता. ब्राम्हणांपेक्षां ब्राम्हणेतरांची दाटी अर्थात् विलक्षण दांडगी होती. भोळी बिचारी रयत! त्यांना घटकाभर स्वराज्याच्या व छत्रपतीच्या प्रत्यक्ष अस्तित्वाचाच भास होऊन, साताऱ्याचे दैव पुन्हा उदयास आलें असेंच वाटूं

लागलें. ब्राम्हणी कारवाईला छत्रपति प्रतापसिंहाचा बळी पडून त्यांच्या गादीवर घरभेद्या आप्पासाहेब भोसला बसला. त्यावेळच्या राज्याभिषेकाच्या सुतकी थाटानंतर आज ८६ वर्षांनी साताऱ्यानें हा दत्तविधानानिमित्त केलेला भव्य समारंभ पाहिला. मग आनंदाला काय पारावार? पण हा आनंद क्षणाक आहे. नुसत्या समारंभप्रियतेचा परिणाम आहे. एक शतकपर्यंत दडपून पडलेल्या स्वातंत्र्याच्या उत्कृष्ण भावनांची ही उसाळी आहे. छत्रपतींच्या तक्ताबद्दल महाराष्ट्रियांच्या नसानसांत फुरफुरणाऱ्या निर्व्याज व निष्कलंक प्रेमाचा हा उमाळा आहे. आपलेपणाच्या तेखदार रक्ताचा हा सणसणाट आहे. पण त्या उसाळीचा आणि उमाळ्याचा आज काय उपयोग आहे? उत्पद्यते विलीयन्ते दरीद्राणां मनोरथापैकींच सारा प्रकार. मानवांची समारंभप्रियता असल्या एखाद्या विशिष्ठ प्रसंगी आपल्या भावनांना मनसोक्त विहारासाठी मोकळे सोडते; पण तेवढा समारंभ झाल्यानंतर पुढें काय? तात्पुरता आनंद, त्याची तात्पुरतीच फलश्रुति. आज सातारा हें स्वतंत्र संस्थान नाहीं, तेथें स्वराज्य नाहीं, आणि छत्रपतीहि नाही अर्थात् विधानानिमित्त परवां तेथें झालेल्या भव्य समारंभात, हत्ती वरल्या मिरवणुकींत आणि त्या नाटकी दरबारांत, भिक्षुकी कारस्थानामुळें पालथें पडलेलें साताऱ्याचे दैव यत्किंचितहि उलटें सुलटें होण्याचा संभव नाहीं. दगडाधोंड्यांना शेंदूर फासून त्यांना देवकळा आणण्यात पटाईत असलेल्या हिंदुजनांना, केवळ आपल्या भावनांच्या खुषीसाठीं, वाटेल त्या व्यक्तीपुढें 'छत्रपति-महाराज-सरकार-मायबाप' म्हणून लोटांगणे घालण्यास काहींच अडचण पडत नसते. पण या नुसत्या लोटांगणांनी स्वराज्य किंवा छत्रपति निर्माण होते तर पृथ्वीचा स्वर्ग व्हायला काहींच अवधि लागता ना. सारांश परवा साताऱ्यास झालेल्या दत्तविधान समारंभाने साताऱ्याच्या दैवात जरी कांही फेरबदल झाला नाहीं, तरी दत्तक बसलेल्या भाग्यवान मुलाच्या दैवाचा सतारा मात्र कुतुहल उत्पन्न करण्यासारखा आहे खास.

इतिहासाकडे पाहिलें तर असे दिसून येतें की शिवछत्रपतीचा वंश म्हणजे दत्तविधानाच्या बाबतींत अनेक व्यक्तींना दैवाचा सतारा ठरलेला आहे. या वंशातील कांही दत्तविधानें राजकारणी बळजबरीचीं झालीं, तर कांही वाडीबंदरच्या एखाद्या भिवबा पांडबाला घोड्याच्या शर्यतींत लाख रुपयांचे टिकीट लागण्यासारखी झालीं. नुसत्या अस्सल रक्ताच्या भांडवलाचाच विचार केला तर कित्येक भोसले जे एकदां परिस्थितीच्या प्रवाहांत वहात अज्ञात कोपऱ्यांत पडले ते पडले, आणि भलतेच घराणेवाले भोसले बनले. साताऱ्याच्या शाहू छत्रपतीनंतर जेवढे दत्तविधानी छत्रपति गादीवर आले त्यांच्या शेळपठणाला हा दत्तविधानी दैवाचा सताराच मूळ कारण झालेला आहे. शाहू छत्रपति करवीरासारख्या अचाट बुद्धिमतेच्या एक दोन व्यक्ति बाद केल्या, तर बाकीचे सर्व छत्रपति म्हणजे दैवाच्या झोल्यांत हेलकावे खाणारे व भोसल्यांचा वंश कसा तरी आडनांवी पुण्याईवर पुढें चालविणारे प्राणी होते, यापेक्षा अधिका कांही नाही. कै. भाऊसाहेब महाराज सुद्धां याच पंक्तींतले. अलीकडे एक दोन ठळक प्रसंगी पुण्यातल्या भिक्षुकी पत्रकारांनी त्यांना छत्रपति छत्रपति म्णून जे विशेष उचलून धरले होते, ते साताऱ्याच्या किंवा छत्रपतीच्या घराण्याच्या अभिमानानें नसून केवळ ब्राम्हणेतर पक्षाच्या चुरशीनें होय. ब्राम्हणेतरांनी करवीरकर खऱ्याखुऱ्या स्वयंशासित छत्रपतीला आपला पुढारी मानला, तर भिक्षुकांनीं तोडीस तोड म्हणून साताऱ्याच्या सांदीतला छत्रपति उजाळा देऊन पुढें मांडला. ब्राम्हणेतरांचे कोल्हापूर, तर भिक्षुकांचा सातारा, ही चुरच कांही आजकालची नाहीं. फरक एवढाच कीं सातारचा छत्रविरहित छत्रपति भटांचा गुलाम असतो आणि करवीरचा छत्रपति भटांनी गुलाम बनविलेल्या कोट्यवधि

मूक रयतेच्या हृदयावर स्वयंनिर्णयी आत्मोद्धाराचें छत्र धरून त्यांना स्वावलंबनाच्या चैतन्यांत रंगवून सोडतो. सातारच्या भोसले घराण्याबद्दल भिक्षुकी प्रेमाचा लोंढा केवढा गिरसप्पी आहे, हे कांही नव्यानें कोणाला सांगणे नको. पण कै. भाऊसाहेब व त्यांच्या हासपास असणारीं कारस्थानी कुत्रीं माकडें जात्याच भटांची पायचाटी करणारीं असल्यामुळें, भिक्षुकी छावण्यांत भाऊसाहेब महाराजांचा बोलबाला दक्षिणेच्या भरती ओहटीप्रमाणें कमी अधिक घुमत असे, यांत कांही नवल नाहीं.

कै. भाऊसाहेब भोसल्यांनी दत्तकाच्या पसंतीसाठीं अनेक तरुणांना आपल्याजवळ ठेऊन घेतले, त्यांची तैनात चालविली, पण अखेर दत्तविधान न होतांच ते दिवंगत झाले. या पाच सहा तरुणांनी कै. भाऊसाहेबांच्या हयातींत खाण्यापिण्याची खूप मजा मारली, पण बेट्याचें दैव तितकेंच. समर्थ रामदासांच्या ब्रम्हचर्याचा * सूड एकामागून एक अशा सात बायका करून घेणाऱ्या चाफळ मठाधिशाच्या मांडीवर दरबारांत वसण्याचें त्यांचे भाग्य नव्हतें. त्यांच्या उलट्या अंबारीच्या नशिबाच्या कवटींत अंबारीचा हत्ती नव्हता. हा दैवाचा सतारा साताऱ्यांतहि नव्हता. तो भाटघरच्या धरणावर भिरभिरत होता. तो जलमंदिरांत आपल्या आयुष्याचे दिवस मोजीत पडलेल्या भाऊसाहेब भोसल्यांच्या निर्णयांत नव्हता, तो भाटघर धरणावर पोटासाठी राबणाऱ्या मजुरांच्या झोपड्या झोपड्यांतून भटकत होता, त्या दैवाच्या सताऱ्याची छाया सतारच्या राजवाड्यांतल्या मिष्टान्नावर नव्हती, ती हातावर मिळवून तळहातावर खाल्ल्या जाणाऱ्या कदन्नावर होती. ती दत्तविधानाच्या उमेदवारीवर नव्हती, ती कल्पनेलाहि चकविणाऱ्या अकस्मात लपलेली होती. हा दैवाचा सतारा 'प्लकी' नव्हता, 'लकी' होता. तो तारुण्यावर भाळणारा नव्हता, तो एका बालमूर्तीवर - मल्हारराव होळकराच्या मस्तकावरील नागाच्या फडेप्रमाणे -डुलत होता. तो नुसता 'वंशाला आधार' शोधीत नव्हता, तर भोसल्यांच्या औरस बीजाला व अस्सल रक्ताला धुंडीत होता. हें रक्त अज्ञात दशेच्या कवचाखालीं दडलें होतें. राजवैभवी कल्पनेला ते पूर्ण पारखें झालें होतें. परिस्थितीच्या दणक्यांनीं त्याचा भूतकाळ अंधकारमय बनला होता, आणि त्याला भविष्य काळ तर मुळींच माहीत नव्हता. वर्तमानकाळांत 'भोसले' या आडनावांपलीकडे त्याला कशाचीही दाद नव्हती. मागें पुढें अंधार व दृष्टीपुढें दारिद्र्य, यापलीकडे जगाची कसलीच कल्पना नव्हती. काहीं र-ट-फ शिकणे झालें तर शिकावें, नाहीं तर दणकट मनगटाची मजुरी करून पोट भरावें, यापेक्षां अधिक कसल्याहि महत्वाकांक्षेची पुसटसुद्धां ओळख त्याला नव्हती. साताऱ्याच्या दैवाच्या जरी ठिकऱ्या ठिकऱ्या उडालेल्या असल्या तरी या बालमूर्तींच्या दैवाचा सतारा मात्र मोठा जबर. बापाची सारी हयात भाटघर धरणाच्या स्टोअर्स खात्यांत मजुरी करण्यांत गेली, तरी मुलाच्या दैवानें त्याच्या कोंड्याच्या भाकरीचा मांडा झाला. दुपारी बारा वाजलें म्हणजे आईनें बांधून दिलेली झुणका भाकरीची शिदोरी बापाला नेऊन पोहोंचविणारा गरीब 'चंदऱ्या' सातारच्या भोसले घराण्याचा श्रीमंत सरदार होणार हे खुद्द आई बापालाच उमगलें नाहीं, तर इतरांची काय कल्पना असणार? भाऊसाहेब भोसले जिवंत असतांना जरी हा मुलगा त्यांच्यापुढें उभा केला असता, तरी त्याच्या बाह्य वेषानें त्यांच्या मनांत निवडणुकीची प्रेरणा झालीच असती, असें सांगतां येणार नाहीं. दैवाचा सतारा आपल्या ठराविक धाटणीनेंच परिपक्व होत असतो. जेथें ज्योतिषी बुवांची अक्कलच लोळपाटणी खातें तेथें कुंडलींतल्या

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द दिसत नाही.

ग्रहांचीं गृहें परळ महालक्ष्मीच्या सिमेंट चाळीप्रमाणें बिनचुक ओसाड पडलेली दिसल्यास त्यांत नवल नाहीं. ज्याच्या जन्मापासून आज सात वर्षं जगाने या मुलाची कसलीच दाद घेतली नाहीं, तोच मुलगा एकदम श्रीमंत शाहू महाराज भोसले म्हणून सातारा शहरांत हत्तीवर मिरविला जातो, हा चमत्कार 'भविष्य' म्हणून वर्तविणारा एकहि ज्योतिषी महाराष्ट्रांत जिवंत आढळू नयें, हें दैववाद्यांचें दैव का ज्योतिषशास्त्राचा फोलकटपणा? आकाशस्थ रोहिणीवर दृक्प्रत्ययी नजरबाजीचे डोळे मारणाऱ्या कुंडली बहाद्दरांनी आतां जागे होऊन दैवाच्या सताऱ्यानें साताऱ्याचें दैव उदयास येईल कीं नाही, याचे फल ज्योतिष वर्तविण्याची लगबग करावी. नाहीं तर भविष्यानें भूताची * चढविल्यावर वर्तमानकाळाच्या पेशवाई झऱ्यांत ठोकताळ्याचे ढेकूण शोधण्याचा तडफडाट जगाच्या उपहासाला मात्र पात्र होईल, हें या पंचांग पंडितांना सांगितलेंच पाहिजे काय?

सात वर्षाचा चंद्रसेन भोसला केवळ आपल्या नसांतल्या रक्ताच्या पुण्याईवर सातारच्या जहागिरीचाश्रीमंत जहागिरदार झाला. या अकल्प्य घटनेचा सातारच्या जनतेला कल्पनातीत आनंद वाटला आणि तो तिने न भूतो न भविष्यति अशा थाटानें व्यक्तहि केला. दत्तविधान, दरबार, हत्तीवरील मिरवणूक वगैरे समारंभांनी सातारा राजधानीचा आनंद गगनांत मावेना, त्यांतच ब्रिटीश सरकारनें या सर्व कृत्यांना आपली सार्वभौमी सहानुभूती दाखविल्यामुळे तर या आनंदाला पारावारच उरला नाही. पण हा आनंद अपूर्ण आहे. हा आनंद खेदमिश्रित आहे. या आनंदांत निराशेच्या वेदना आहेत. हा आनंदी वर्तमानकाळ दुःखमय भूतकाळांतील अनेक दुर्दैवी घटनांनी व्यथित झालेला आहे. आनंदाच्या या विरळ आवरणाखाली अनेक राष्ट्रद्रोही कारस्थानांचीं पिशाच्चें नंग नाच घालीत असलेलीं अजूनही आपल्याला दिसतात. या आनंदाच्या देखाव्याचा पार्श्वभाग काळा कुट्ट असल्यामुळे विरोधाभासानें त्याची रुची विद्यमान साताराकरांना अमृतापेक्षांही जरी गोड वाटत असली, तरी त्या रुचींत आत्मद्रोहाच्या जहराचा फणफणाट अजूनही विचारवंतांच्या विचारांत विलक्षण खळबळाट उडवीत आहे. चिरंजीव शाहू महाराज भोसले आज ज्या गादीवर दैवाच्या सताऱ्यानें अधिष्ठित झाले आहेत, त्याच गादीवरून प्रतापसिंह छत्रपतीला ४ सप्टेंबर १८३९ रोजीं रात्रीं भर १२ वाजतां उघड्या नागड्या स्थितींत हद्दपार व्हावें लागलें आहे, ही गोष्ट नजरेआड केली तरी हृदयफलकावरून पुसून टाकतां येत नाही. ही गादी महाराष्ट्राच्या अनुपमेय स्वार्थत्यागावर राजाराम छत्रपतींच्या हस्ते जरी स्थापन झालेली आहे, तरी तिच्यावरील प्रत्येक छत्रपति पेशव्यांच्या भिक्षकी कारस्थानाला बळी पडलेला आहे, ही गोष्ट विद्यमान मातुश्री ताराबाईसाहेब यांनी विसरून भागावयाचें नाहीं. सातारच्या गादीला भिक्षुकी वर्चस्वाचें कायमचें ग्रहण न लागतें तर मुंबईच्या टोपकर बनिया कंपनीची प्रतापसिंह छत्रपतीच्या आंगाला हात लावण्याची काय छाती होती? ज्या मराठ्यांनी जिजीचें राजकारण लढवून औरंगजेबसारख्या कर्दनकाळ दैत्याची मुत्सद्देगिरी आणि लष्करी डावपेच, डोळ्याचे पातें लवतें न लवतें तोच ठेचून जमीनदोस्त केले, तेच मराठे वीर आपल्या छत्रपतीला पापस्मरण बाळाजीपंत नातू आणि कर्नल ओव्हान्स यांनी दंडाला धरून तक्तावरून खेचून हद्दपार करतांना नामर्द हिजड्यांप्रमाणें स्वस्थ कसे आणि कां बसले? त्यांच्या तलवारीचीं पातीं आणि भाल्याची फाळें एकदम अवचित बोथट कां

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द दिसत नाही.

पडलीं? त्रिखंडविश्रुत मराठ्यांचा दरारा त्याच काळरात्रीं कमकुवत कसा झाला? या प्रश्नांचीं उत्तरें ताराबाई मासाहेब आपण आपल्या हृदयाला विचारा, म्हणजे आपल्या युवराजाच्या दैवाचा सतारा यापुढें कोणत्या शिस्तीनें वळविला पाहिजे याची आपल्याला पूर्ण जाणीव होईल. आजहि आपल्या भोंवती स्वार्थी लाळघोट्या कारस्थान्यांचा गराडा पडलेला आहे. त्यांच्या कारवाईची योग्य वेळींच वाट लावली नाहीं, तर आपल्या युवराजाच्या दैवाच्या सताऱ्याची वाट ठरवल्यासारखीच म्हणावी लागेल. भिक्षुकी वर्चस्वाचें जंतर मंतर आपल्या काळजाला आरपार भिनून ते जर थंडगार पडले असेल, तर ज्या तक्तावर आज आपण एका भाग्यवान युवराजाची स्थापना केली आहे, त्या तक्तापुढें येत्या ४ सप्टेंबर रोजीं मध्यरात्रीं आपण शांत चित्ताने चिंतन करीत बसा म्हणजे त्या तक्ताच्या हृदयांतून पिळवटून बाहेर पडणाऱ्या रक्ताच्या चिळकांड्या आपल्या व आपल्या युवराजाच्या वास्तविक स्थितीची आपणांस पूर्ण कल्पना करून देतील. वेशासंपन्न आप्पासाहेब सांगलीकर आणि चित्पावन आयागो बाळाजीपंत नातू यांच्या उलट्या काळजाच्या धर्मकारणाला आपल्या ऊर्ध्वसुखी राजकारणाची फाडणी देऊन बनिया कंपनीनें त्या तक्ताला दिलेला भडाग्नी जड सृष्टींत आपल्या लौकिकी डोळ्यांना जरी दिसत नसला, किंवा आपल्या पूज्यपतीच्या गादीखाली तो भासत नसला, तरी तो विझवण्यासाठी आणि महाराष्ट्राच्या हृदयांत चिरकाल विराजमान झालेल्या शिवछत्रपतीच्या शिवतक्ताच्या पुनरुज्जीवनासाठीं, एक दोन नव्हे तर सतत १४ वर्षे विलायतेच रंगो बापूजीनें लढविलेला प्राणांतिक झगडा, आणि सरतेशेवटीं सत्तावन सालीं मऱ्हाठशाहीनें अवघ्या हिंदुस्थानाला पाठीशी घालून दिल्लीच्या समरांगणावर केलेला अखेरचा मर्दानी थैमान याचा चित्तवेधक, स्फूर्तिदायक परंतु हृदयाचें पाणी पाणी करणारा खेदजनक इतिहास तें तक्त आपणांला, मासाहेब, मोठ्या आवेशानें खास खास कथन करील. ज्या तक्तावर चिरंजीव शाहू महाराजा आपल्या दैवाच्या सताऱ्याने बसले आहेत, त्या तक्ताखालीं ब्राह्मणेतरांच्या सर्वांगीण प्रबोधनाचा प्रश्न अर्धवट मेल्या स्थितींत कण्हत कुंथत पडलेला आहे. त्या तक्ताच्या खालीं प्रतापसिंहाच्या सत्याग्रहाच्या धडाडीबरोबरच भोसले घराण्यांतल्या राजस्त्रियांच्या किंकाळ्या आपल्याला अजून ऐकू येतील. त्या तक्ताच्या खालीं ब्राम्हणांच्या राष्ट्रद्रोहाबरोबरच आप्पासाहेब भोसल्यांचा घरभेद, आप्पाशिंदकराचा हरामखोरपणा, तात्या केळकराचे खोटे शिक्के, नागोदेवरावची मिकी सोनारीण, भोरचे संतपचीव* वगैरे अनेक वीररत्नांच्या कारस्थानांचे देखावे, ताराबाई साहेब, आपल्याला त्या रात्री स्पष्ट दिसूं लागतील. छत्रपतींच्या तक्ताला पेशवाई वळणाचें भिक्षुकी ग्रहण कसें लागलें, ब्राम्हण ब्राम्हणेतर वादामुळें अभिमानाऐवजी स्वदेशद्रोहाचें बाळकडू मऱ्हाटे कसे प्याले आणि कायदेबाजीच्या सबबीवर बनिया कंपनीने सातारच्या या पूज्य छत्राचें तीन तेरा आपल्याच लोकांच्या हातून कसे वाजविले, या सर्वा गोष्टींचा आपण नीट मननपूर्वक अभ्यास केला, आणि त्या दिशेनें युवराजाच्या आत्मप्रबोधनाचा मार्ग आखलांत, तर केवळ काकतालीय न्यायाने घडून आलेल्या आपल्या चिरंजीवांच्या दैवाच्या सताऱ्याबरोबरच साताऱ्याचे दैवसुद्धां उदयास येण्याची आशा अजून नष्ट झाली नांही, असे आशाखोर मानवी मनाला वाटत असल्यास तो आशावाद खात्रीने निंद गणला जाणार नाहीं, अशी आम्हाला आशा आहे.

इतिहास कसाही उलट सुलट वाचला आणि राजाकरणाची तांगडी कशीही उलथीपालथी करून चोखळाली तरी एक गोष्ट निर्विवाद आहे कीं, अवघा महाराष्ट्र सातारा राजधानीकडे कांही एका वर्णनीय

भावनेने नेहमी पाहात असतो. आज या देवळांतला देव जरी नीट झाला असला तरी त्याची पडकीं भिंतीडें आणि रडके बुरूज त्या देवाची आठवण त्यांच्या हृदयात क्षणोक्षणी उंच बळवीत असतात. सातारच्या छत्रपतीच्या उच्चाटणाचे पाप जितकें स्वकीयांच्या पदराला बांधता येईल, तितकेच तें ईस्ट ईंडिया कंपनीच्या पाटलोणीलाही भिडविता येईल. जितक्या प्रमाणांत आमचें देशबंधु या कामीं जबाबदार ठरतील, त्यापेक्षां शतपट प्रमाणांत या पापाचा वाटा ब्रिटिश सरकारच्या मूळमाया कंपनीला - अर्थात् ब्रिटिश राष्ट्रालाही घ्यावा लागेल. प्रतापसिंह छत्रपतीचें उच्चाटण हा ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवरला कधींही न पुसला जाणारा कलंक आहे, अशा प(कारचे तत्कालीन ब्रिटिश मुत्सद्यांचे अभिप्राय आज कागदोपत्रीं प्रसिद्ध आहेत. हिंदु लोकांनी राष्ट्रद्रोह केला, तर ब्रिटिशांनी अन्याय केला, असा या प्रकरणाचा सारांश निघतो सर्वांचीच त्यावेळी बुद्धी फिरली, म्हणून शिव छत्रपतीची सातारा राजधानी खालसा होऊन तेथील भोसल्यांना नुसत्या साध्या जहागिरीवर संतुष्ट राहण्याची वेळ आली. आज काळ बदलला आहे. फाटलेल्या मनोवृत्ति सांधण्याचा सर्वत्र प्रयत्न होत आहे. हिंदी व ब्रिटिश लोकांचे संबंध समरस करण्याचें श्लाघ्य प्रयत्न चालू आहेत. गतेतिहासाचा कसलाहि विकल्प मनांत न आणतां, मराठे वीरांनी गेल्या महायुद्धात ब्रिटिशांच्या अब्रुसाठीं फ्रान्सच्या समरंगणांवर सांडलेले रक्त अजून लालबुंद चमकत आहे. अशा परिस्थितींत अखिल मराठ्यांना अमरावतीप्रमाणें प्रिय असलेली सातारा राजधानी जर या नव्या मन्वंतरांत पुनश्च स्वतंत्र मऱ्हाठी संस्थानाच्या पुनरुज्जीवनाला पात्र होईल, ब्रिटिश न्यायदेवता जर साताऱ्याच्या शिवछत्रपतीच्या परमप्रिय गादीची पुनर्घटना करील, तर त्यामुळें 'शिवराया प्रणिपात कराया' ब्रिटानियेनें आपल्या उद्यांच्या बादशहाला हिंदुस्थानांत पाठवून जो कृतज्ञ भाव व्यक्त केला, त्या भावनेला काहीं तरी अर्थ आहे, असे महाराष्ट्र समजेत. आज हा विचार कित्येकांना रुचणार नाहीं. अनेकांना ही कल्पित कादंबरी वाटेल. बरेंच विचारवंत याला स्वप्न म्हणतील. परंतु जेथें जेथें खरें मर्दानी मऱ्हाटी हृदय धमवमत असेल तेथें तेथें हा साताऱ्याच्या पुनरुज्जीवनाचा प्रश्न काळजाला जाऊन भिडल्याशिवाय कधींही राहणार नाहीं, अशी आमची खात्री आहे. भांबुर्ड्याच्या घोड्यांवर कसलें तरी कांहीं तरी स्मारक उभारण्यापेक्षां सातारच्या संस्थानचें जर आज पुररुज्जविन होईल, तर महाराष्ट्राप्रमाणेंच ब्रिटानियेलासुद्धां एका महत्पातकाचें प्रायश्चित्त मोठ्या आबांत घेण्याची मंगल पर्वणी प्राप्त होईल. ब्रिटिशांसारख्या सर्वसमर्थ, धूर्त व कदरबाज राष्ट्राला महाराष्ट्राची जर कांही कदर वाटत असेल, मराठ्यांच्या आत्मयज्ञाची त्यांना बूज राखावयाची असेल, तर तिवाठ्या तिवाठ्यावर दगडाधोंड्याचीं स्मारकें उभारण्यापेक्षां होसूर, काशी वगैरे खालसा झालेल्या कांही संस्थानचें जसें त्यांनी पुनरुज्जीवन केलें, तद्वत सातारच्या छत्रपतीचें व त्यांच्या पुरातन तक्ताचें पुनरुज्जीवन केल्यास मर्द मराठ्यांच्या हृदयांत आपलेपणाविषयी भावना जागृत केल्याचे श्रेय त्यांना खास मिळेल. ही अशक्य कोटींतील गोष्ट नव्हे. ही ब्रिटिशांना सहजशक्य गोष्ट अहाहे. ही न्यायाची मागणी आहे. कृतकर्मांचे प्रायश्चित घ्या आणि सतची जाल राखा, असा हा उघडाउघड सवाल आहें. रात्रंदिवस शल्याप्रमाणें हृदयांत डाचत असलेल्या अमंगल गतैतिहासाच्या पुनरुज्जीवनाच्या मंगल कार्यानें पावन करा, असा हा न्याय्य मागणीचा अर्ज आहे. या कामीं ब्राम्हणब्राम्हणेतरांनी एकवटून कार्याला सुरवात केल्यास त्यांच्या पूर्वजांनी छत्रपतीच्या उच्चटणाचें जें दुष्कृत्य केलें त्याच्या पापापासून त्यांची मुक्तता होईल आणि सातारा ही इतर देशी संस्थानांप्रमाणे पुनरुज्जीवित अशा शिवछत्रपतीची शिवनगरी झाली, तर तो मंगल सोहाळा महाराष्ट्राला

त्याचप्रमाणें ब्रिटिश लोकांना मोठ्या अभिमानाचा सत्यप्रियतेचा आणि न्यायप्रियतेचा म्हणून भावी इतिहासांत रेडियमच्या अक्षरांनीं चिरंजीव होऊन बसेल.

साताऱ्याची शिवनगरी बनविण्यासाठी ब्राम्हणांनों, पूर्वग्रहांना विसरून एकनिश्चयानें तुम्ही तयार व्हा; कारण तुमच्या पूर्वजांनी केलेल्या कर्माचें प्रायश्चित्त तुम्हांला घ्यावयाचें आहे. तें या उमद्या मार्गानें घ्या. यांत सारें जरा तुमच्या बुद्धिमत्तेचें कौतुक करील. तुमच्या पाप भीरुत्वाची इतिहासालाही देईल. ब्राम्हणेतरांनों, क्षत्रिय मराठ्यांनो तुम्हांला शिवस्मारक पाहिजे ना? मग त्या भांबुर्ड्याच्या धोंड्यावर डोकी फोडण्यापेक्षां या अभिनव शिवनगरीच्या उद्धारासाठीं तुम्ही आपलीं डोकीं अवश्य चालवा. आज तुम्हांला अस्सल भोले कुठांतला एक बालवीर दैवाच्या सताऱ्यानें साताऱ्याचें दैव गदगदा हालविण्यासाठीं अकस्मात प्राप्त झाला आहे या संधीचा फायदा घेऊन तुम्ही शिवनगरीचा जर ध्यास घ्याल आणि प्रबोधनाच्या कल्पनेत खेळणारी ही कल्पनासृष्टी प्रत्यक्ष अस्तित्वात आणण्याचा प्रयत्न कराल, तर बंदिवासाच्या हाल अपेष्टांत काशीला मरण पावलेला प्रतापसिंह छत्रपती आणि त्यांच्या नांवासाठी व तक्तासाठी अनुपमेय आत्मयज्ञ करणारा रंगो बापूजी यांच्या स्वर्गस्थ आत्म्यांना खात्रीनें संतोष वाटेल सरतेशेवटी ब्रिटिश राजकर्त्यांना आमची अशी विनंति आहे कीं, साताऱ्याच्या पुनरुज्जीवनाचा हा प्रश्न आपण आतां ही जर न सोडविला तर सत्य, न्याय आणि माणुसकी या तीनही तत्त्वांच्या दृष्टीनें ती एक मोठी नामुष्कीची गोष्ट होईल, असें छातीठोक विधाने करण्यापुरता पुरावा गतेतिहासांतून आम्ही लागेल तितका काढून देऊ. ब्रिटिशांना महाराष्ट्राच्या मनोभावनेची जर कांही दरकार असेल तर त्यांनी हा शिवनगरीचा प्रश्न अवश्य विचारांत घ्यावा. सद्दीच्या जोरावर छत्रपतींचे तहनामे रद्दी ठरविले गेले जाऊं द्या. तत्कालीन् रेसिदंटांनीं गव्हर्नरांचीं मनें, ब्राम्हणांच्या चिथावणीनें, कलुषित केलीं; करूं द्या. रंगो बापूजीच्या १४ वर्षांच्या विलायती वनवासाला यश आले नाहीं; न येऊं द्या. अनेक ब्रिटिश मुत्सद्यांची न्यायबुद्धी व सत्यप्रियता त्या वेळीं वांझोटी ठरली; ठरूं द्या. भूतकाळ मेला; मरूं द्या. भविष्याकडे लक्ष द्या. भूतकाळाच्या भूतांना वर्तमानकाळांत गति देऊन, भविष्य काळाला उज्वल करा. शिवरायाला नुसता मुजरा करूं नका; त्याचें जिवंत स्मारक करा. प्रतापसिंह छत्रपतीची पदच्युतता म्हणजे अखिल महाराष्ट्राच्या काळजांत खोल घुसलेला आंग्रेजी जंबिया आहे. तो एक अन्याय आहे. ती एक सत्याची बेगुमान मुस्कटदाबी आहे. तो जेबिया आतां खेचून काढा. तो महाराष्ट्राचा अपमान आतां पुसून टाका. लढाईंत जिंकलेले टिपू वाघाचें राज्य ज्या ब्रिटीश सरकारनें वडेयार हिंदु घराण्याला परत देऊन म्हैसूरचें राज्य पुनरुज्जीवित केलें; काशीच्या राज्याची पुनर्घटना केली, त्याच ब्रिटानियेला शिवरायाचे मूळ तक्त पुनरुज्जीवित करायला फारसें कठीण नाहीं. ब्रिटानिये! तुझ्यासाठीं मराठ्यांनीं आपलीं उमलती जवान पिढी बुरपच्या रणयज्ञांत बळी दिली आहे, हे विसरूं नकोस. तुझ्या उद्याच्या नृपतीनें व हिंदुस्थानाच्या बादशहानें आमच्या शिवदेवापुढें टोपी काढून मुजरा केला आहे, हे लक्षांत घेऊन, सातारच्या अन्यायाचे परिमार्जन करायला यावेळीं तूं तुझ्या इतिहासप्रसिद्ध न्यायबुद्धीचा उपयोग धोरणानें करशील अशी आशा आहे.

□□□

पुस्तक परिचय

कलमबहादरांस शेलापागोटें

देशाचे दुष्मन

लेखक श्री. दिनकरराव जवळकर. प्रकाशक श्री. केशवराव जेधे, जध मॅनशन्स, शुक्रवार पेठ, पुणें शहर, किं. ४ आणें.

ऑगष्टचा पहिला आठवडा म्हणजे सर्वत्र कै. टिळकांचा गजर ! वर्तमानपत्रें घ्या, व्याख्यानें घ्या, पुराणें ऐका, प्रवचनें श्रवण करा, सर्वत्र टिळकच टिळक! ''टिळक आणि चिपळूणकर! दीन दुबळ्या दुनियेचे धुरंधर पुढारी! राष्ट्राला खडबडून जागे करणारे नवयुगीन भारताच्या नव चैतन्याचे विद्युतप्रवाह! देशाभिमानाच्या चळवळींचे आद्यजनक! लोकनायकांचे नेते, स्वदेशींचे प्रणेते, स्वकीयांचे चहाते आणि विद्वतेचे भाते! देशाभिमान टिळकांचा व लेखाभिमान चिपळूणकरांचा! अशी जोडी मागें झाली नाहीं; सध्यां नाही व पुढें होणार नाही. देशबंधु दास मेले पण त्यानें सुद्धां टिळकांच्या मरणाइतकें देशाचें नुकसान झालें नाहीं. ब्रह्मदेवानें जेव्हा सद्‌गुणांचे सहस्त्र भोजन घातले, तेव्हां ही टिळक चिपळूणकर नांवाचीं दोन भटें इतकी कुटुंब जेवलीं. कीं, दुसऱ्यांच्या वाट्याला जायला सद्‌गुण शिल्लकच राहिला नाही. पश्चिमेचा उद्धार करण्याकरिता आकाशांतल्या बापाचा एकच पूत धांवत आला, पण पूर्वे चा ब्रम्हांड पांडित्याचा झेंडा फडकविण्याकरिता ब्रह्मदेवाच्या सुखांतून एक पलटणच्या पलटण येथे आली आहे. या पलटणांचे कर्ममार्तंड (Commander) कै. टिळक आणि चिपळूणकर हे होत! टिळक चिपळूणकर देवबाप्पांच्या भगतगणांनीं आपल्या आराध्य देवतेचा असा महागजर चालवलेला असतो कीं हे 'टिळक चिपळूणकर' म्हणजे काय गौडबंगाल आहे. याचा नीट खुलासा करून टाकणें हेच खऱ्या देश-सेवकाचें आद्य कर्तव्य होऊन राहिलें आहे.'' (पृ. १) या विचारानें प्रेरीत होऊन श्री. जवळकर यांनीं हा ५६ पानांचा कमाल स्पष्टोक्तीचा 'मशिन गनो' ग्रंथ लिहिला आहे. ''महात्मा जोतीरावांच्या 'गुलामगिरी' पुस्तकानंतर आज पन्नास वर्षांनीं या निर्भीड पुस्तकाचा महाराष्ट्राला लाभ होत आहे. कलमकसायी ब्राह्मणांच्या काळजाला जर घाव घालावयाचा असेल तर सत्यशोधकी कलमबहाद्दरांनी आपल्या लेखणीला किती तीक्ष्ण धार लावावी लागते याचें ढळढळीत उदाहरण हें पुस्तक आहे. ''या प्रकाशकाचा शेरा वास्तवीक आहे. हा ग्रंथाची भाषा उत्तम, विवेचन, जोरदार,

प्रतिपादनाची शैली तर्कशुद्ध आणि एकंदर ओघ हॉवित्सर तोफगोळ्याप्रमाणें असल्यामुळें पुस्तक हातीं घेतलें की, पुरें केल्याशिवाय खाली ठेवणारा वाचक आढळणेंच शक्य नाही. मराठ्यांना 'नांगरे' म्हणून हिणविणाऱ्या जन्मसिद्ध लेखन-पटूंनी हा नव्या मनूंतल्या मराठ्याचा मर्दानी मारा पाहून आपल्या भविष्याचे पडताळे रेवतीप्रिय रघुनाथ पंडिताकडून आतांच पटवून घ्यावे हें बरें. ब्राह्मण-ब्राह्मणेंतर वाद हा नुसत्या वर्तमानपत्री लेखनाच्या कसरतींत उरलेला नाहीं, त्याचें क्षेत्र फार निराळें झालें आहे, त्यावर वेदोक्त पुराणोक्ताच्या मलमी पट्ट्या आतां निरुपयोगी आहेत, असें जें आम्हीं म्हणतों, त्याचें प्रत्यंतर ब्राह्मणांनीं या मराठ्या मर्दाच्या पहिल्याच हॉवित्सरी सलामींत पाहून घ्यावें. प्रत्येक ब्राह्मणेतरानें हें पुस्तक अवश्य एकवार वाचावें अशी शिफारस आहे.

□□□

अग्रलेख

सार्वजनिकपणाचें गाडगें फुटलें

भट लोक मोठे डोक्याचे, अशी आमची आजपर्यंत समजूत होती. सर्व ब्राह्मणेतरांचे आम्ही गुरू म्हणून मिजास मारणाऱ्या या लोकांची बुद्धी इतकी कोती असेल व धोरणांत तर हे खंक पोकळडोक्ये असतील असें आम्हांला वाटलें नव्हतें. पण दिवसेंदिवस ब्राह्मणवर्ग अकलेच्या क्षेत्रांत मागासत चाललेला पाहून या चातुर्वर्ष्यमय भरतखंडाची पुढें काय गति होणार, हें समजत नाहीं. सार्वजनिकपणाच्या बुरख्याखालीं ब्रह्मणेतरांवर कुरघोड्या चढविण्याचे केलेले लाखों ढोंगधत्तुरे आजपर्यंत बिनबोभाट सफाई पचले गेले, पण आतां मनू बदलला आहे-नव्हे, ठार मेला आहे, हेंहि ज्यांना आतां नीट उमगत नाहीं, त्यांच्या पायाचें तीर्थ पिऊन बेचाळीस पूर्वज वंशजांसह उद्धरून जाणारे कोण पागल असतील ते असोत. बहुजन ब्राह्मणेतर समाजरूपीं झोपीं गेलेला सिंह आतां जागृत होऊन आपली भयंकर आयाळ झटकून पंजांची नखें पाजळीत आहे. त्याच्या जागरूकतेची पहिली गर्जना झाली न झाली तोंच अवघा महाराष्ट्र पडसादानें गदागदा हादरू लागला. धर्ममार्तंडांची तिरपिट उडून एकजात जगद्गुरूंची पीठाळ दर्भासनें धडाड कोसळूं लागली. राजकारणांतल्या भिक्षुकी ढोंगधत्तूऱ्यांना आडव्या कोलदंडड्याचा चाप बसून, समाज व धर्माकारणांत आज भिक्षुकाला नासक्या बटाट्याचीहि बाजारांत किंमत येईना अशी स्थिती झाली आहे. लोक मान्यतेची बडवेगिरी आज जेथें नागडी उघडी पडली असतां माबाप सरकारची पोलिशी पुण्याईच काय ती तिच्या पट-वर्धनार्थ शिल्लक उरली आहे. तेथें फेंडगुंडांना भर बाजारांत पाद्यपूजेचा सन्मान मिळून, सार्वजनिकपणाचें गाडगें कडांड फुटलें तर त्यांत नवल काय? हल्लीं सर्वत्र उसळलेल्या क्रांतीसागराच्या लाटांची दिशा पाहून भिक्षुकी ब्राह्मण शुद्धीवर येतील, अशी पुष्कळांना अपेक्षा होती. पण त्यांच्या उलट्या काळजाची बेशुद्धी इतकी बेफाम भडकलेली आहे की काळाची करणी ओळखण्याइतकी त्याच्या चित्ताची शुद्धी आतां ईश्वराधीन तरी राहिली आहे कीं नाही, याचीच जबरदस्त शंका येऊं लागली * कुत्र्यालाहि आतां लाजऊ लागला आहे. हे विचार सुचण्यांचे कारण दादरच्या सार्वजनिक भटांनीं गेल्या गणेशोत्सवांत आपल्या भिक्षुकी गुर्मीचा केलेला शिमगा होय. या

* उपलब्ध झालेल्या अंकात वाक्य वाचता येत नाहीत.

शिमग्याची हकिकत इतरत्र दिलेली आहे. फंड सगळ्या दादरचा आणि कारभार मात्र या भिक्षुकी रेवरंड फादरचा! असा हा मामला गेली १५-१६ वर्षे बिनअटकाव निखटका इतर ठिकाणाप्रमाणेंच दादरला चालूं होता. कार्यकारी मंडळांत एकजात एका पराचे भटजणूं काय सर्व जनांच्या सार्वजनिकत्वाचे हे आमरण जन्मसिद्ध वंशपरंपरेचे अनभिषिक मुखत्यार ! हे करतील तें कारण आणि बांधतील तें तोरण ! बरें पुढारपणाचा शेंदूर ही फासलेली भिक्षुकी पोरें तरी काय अशा मोठ्या अवसानाची ? पण 'मम जन्म विप्रकुळीं' हीच त्याच्या सनातन पुढारपणाची सनद. यांचे सर्व जीवितेच सार्वजनिक. यांचीं स्वत:ची जायवळें, मुलींच्या मंगळागौरी, पोरांच्या मुंजी, बापाचीं तेरावीं, सुनांचीं गर्भादानें, गणपति गौरीचे उत्सव, झाडून साऱ्या गोष्टी सार्वजनिक ब्राह्मणांचे जातिविषयंक असें कांहींच नसतें. त्यांचें सर्वच सार्वजनिक! त्यांचीं वर्तमानपत्रें सार्वजनिक, त्यांची व्याख्यानें पुराणें कीर्तनें प्रवचनें सार्वजनिक; फार काय, पण त्याचें जगणें व मरणें ही सुद्धां सार्वजनिकच. अशा महिम्याच्या माणसांनीं आज इतक्या वर्षे आपल्या ठरावीक बगलबच्चांखेरीज इतरांना सार्वजनिक बगल मारून, सार्वजनिक गणेशोत्सवाचा धांगडधिंगा घालावा, हें त्यांच्या सनातन भिक्षुकी धोरणाला धरून नव्हतें असें कोण म्हणेल? जोंपर्यंत हें धोरण बहुजन समाजाच्या सुप्त स्वाभिमानास फारसें बोंचलें नाहीं, तोंपर्यंत या सार्वजनिक रमण्याची फारशी कोणी पर्वाच केली नाहीं. त्यामुळें हें दादरचे भिक्षुकी अरेराव सर्वच बाबतींत वहिवाटीचा हक्क गाजऊं लागलें. त्यांना दीनदुनिया खातरजमेंत राहिली नाहीं. लापेकमत म्हणजे त्यांना आपल्या चंचींतली सुपारी वाटूं लागली. दादरचे ब्राह्मणेतर, पुढारी म्हणजे त्यांना शेणाचे पुतळे दिसूं लागले. ब्राह्मणेतर जनता या ब्रह्मांड शहाण्यांना खिजगणतींत भासत नाहींशी झाली. कारकुंडींत कुझणाऱ्या भट तरुणांच्या सोटेबाजीवर व गणेश चतुर्थीपूर्वी २।३ दिवस चटावर स्थापना केलेल्या ब्राह्मण व्यायाम * वाटलें बिनकुडाच्या राजाराम वैद्याच्या पगडीच्या झिळमिळ्या धरून आपण आपल्या भिक्षुकी प्रतिज्ञेची वैतरणी तरूण जाऊं. त्यांना वाटलें कीं कार्यकारी मंडळींत चाणक्य धोरणानें ढकलेल्या गडकऱ्या सारख्या बावळट कायस्थ पोरांच्या टोपींत आपण आपली प्रतिज्ञा बिनधोक लपवून ठेऊ. त्यांनी असा विचार केला कीं पांडबा सहस्रबुवांच्या हजार धारी अकलेच्या कारंजाखालीं आपण आपली कारस्थानें सहज भिजवून काढूं, त्यांना वाटलें कीं जोशी मास्तरासारख्या भोळ्या माणसाच्या अध्यक्षतेखालीं आपण आपला सार्वजनिक शिमगा बिनबोभाट ब्राह्मणेतर तरुणांच्या छाताडावर नाचऊं. त्यांना अशी घमेंड कीं वेळ पडली तर पोलिसांच्या पायतणांना आणि सार्जंटांच्या बुद्धांना चाटूं, पण म्हणू ते करूं. त्यांनीं असें कां ठरऊं नये? त्यांना आजपर्यंत कोणी हटकलें नाहीं कीं दटकलें नाही. ब्राह्मण करतील ती पूर्वदिशा! काळ बदलत चालला आहे. स्वयंनिर्णयाची कळ आज प्रत्येक ब्राम्हणेतराच्या काळजांत सणाणत आहे. ब्राह्मणांच्या कसल्याहि पुराण प्रवचनाला बहुजन समाज फाटक्या पायताणाची किंमत देत नाहीं. ह्या सर्व गोष्टी या दादरच्या सार्वजनिकवाल्यांना कळावयास पाहिजे होत्या. 'आजपर्यंत तुम्ही जेपी कोठें मेला होता?' असा उर्मट प्रश्न श्रीयुत बोल्यांना विचारणाऱ्या टारगटाची बत्तिशी अझुन शाबूत राहिली आहे, याचें कारण दादर माहीमच्या ब्राह्मणेतर तरुणांचा प्रशंसनीय विवेकच होय. ज्या तरुणांच्या तक्रारीचा वाजबीपणा नुसता हवेतून उडत उडत चुटकीसरसां विरार कल्याणपर्यंत धडकला

* उपलब्ध झालेल्या अंकात वाक्य वाचता येत नाहीत.

व बोलबोलतां दोन अडीच हजारांचा जनसमुदाय भिक्षुकी अरेरावांच्या नरड्यावर टाच देऊन उभा राहण्यास धांवत आला, त्या तरुणांच्या पुढाऱ्यांविरुद्ध या उप्पर एक सुस्कारा निघतांच त्याचें पर्यवसान कशांत होणें शक्य आहे. हेंहि यापुढें हे सार्वजनिवकवाले विचारांत न घेतील, तर त्यांच्या खांद्यावर डोकीं नसून कच्च्या मातीची मडकीं आहेत, असें म्हणण्यांचा दुर्दैवी प्रसंग कोणावर आला, तर तो निव्वळ काव्यकल्पनेचा प्रकार होईल, असें आम्हांला वाटत नाही.

वास्तविक पहातां बहुजन समाजाच्या आक्षेप * बाबतींत भोपटकरांनीं किंवा का. का. मंडळाच्या सभासदांनी कांहीच विवेक किंवा सभ्यपणा दाखविलां नाहीं. उलट, लोकमताला धाब्यावर बसवून भोपटकरांचें व्याख्यान आम्हीं करविणारच, असा त्यांनी चंग बांधला व उघड बोलूनहि दाखविला. अर्थात् दादरकर जनांनीं या चंगाला उलट टांग जेव्हांच्या तेव्हां मारली नसती तर ती एक मोठ्या नामुष्कीची गोष्ट होऊन, त्यांतच पेशवे सांप्रदायिकांचा मोठा जय झाला असता ! वेशासं भास्करपंतांचें व्याख्यान बहुजन समाजाच्या विराट रूपानें बंद पाडलें खरें, पण तेवढ्यानें चिडून जाऊन उत्सवाचा सर्व कार्यक्रमच बंद पाडण्याइतकी डोकींत राख घालण्याचें का. कां. मंडळाला वास्तविक कांहीच प्रयोजन नव्हतें. दुसऱ्या दिवशीं स्त्रियांच्या व्याख्यानाची कार्यक्रमहि उत्तम निर्विघ्न पार पडला. रात्रीं श्रीयुत पेंढारकरांच्या गायनासाठींहि पुष्कळ समाज शांतपणें उत्सुक होऊन जमला. पण तेथेंहि भटांच्या हट्टवादानें पाजीपणा केला. उत्सव बंद करण्याचीं कारणें देतांनां का. का. मंडळानें जें हस्तपत्रक वाटलें त्यांत ३ कैलमांत श्री. पंढारकर व जनता यांच्यावर असा आरोप लादला आहे :-

''काल मंगळवारी रात्रीं श्री. पंढारकर यांचें गायन त्यांच्याच अशक्यतेमुळें बंद पडलें असतांहि कांही मंडळींनी गैरसमज करून घेऊन मंडपांत गडबड सुरू केली.''

या सार्वजनिक भटजींचें हें विधान किती खोडसाळपणाचें किंबहुना हलकटपणाचे आहे, याचा विचार वाचकांनींच श्री. पेंढारकरांचा नवा काळां''तील खुलासा वाचून करावा.

दादर सार्वजनिक गणेशोत्सव

श्री. पेंढारकर यांचा खुलासा

संपादक ''नवाकाळ'' यांस :-

दादर सार्वजनिवक गणेशोत्सवामध्यें मंगळवार ता. २५ रोजीं माझ्या गायनाचा प्रोग्राम होता. परंतु सोमवारीं रात्रीं रा. भालाकर्ते भोपटकर जनतेनें विनंति केल्याप्रमाणें माफी मागेनात, त्यामुळें त्यांचे भाषण रहित झाले. अशी परिस्थिति असूनहि मंगळवारीं दुपारीं स्त्रियांचा कार्यक्रम आणि रात्रींचें व्याख्यान वगैरे कार्यक्रम सुरळीत झालें. असूनहि माझ्या गायनाचा कार्यकारणीभूत झालें या संबंधानें अत्यंत अनिष्ट गैरसमज पसरविला जात आहे; आणि यांत कार्यकारी मंडळांतील सभासदहि भाग घेत आहेत ही खेदाची गोष्ट आहे. वरील आशयाचें पत्र आमचे एक स्नेही आणि दादर सार्वजनिवक गणेशोत्सव मंडळाचे एक सभासद यांनीं मजकडे धाडिलें आणि या बाबतींत खरी वस्तुस्थिति काय आहे, 'याचा खुलासा होणें इष्ट व जहर असल्यामुळें मी खालील प्रमाणे खुलासा धाडीत आहे.

खुलासा

''दादर सार्वजनिक गणपतीपुढें मंडळाच्या विनंतिप्रमाणें माझ्या गायनाचा कार्यक्रम ता. २५ मंगळवार रोजीं रात्री ठरविण्यांत आला होता, व त्यास मी मान्यताहि दिली होती. त्याप्रमाणें मंगळवार रात्रौ ९ वाजेपर्यंत मी कार्यक्रमास

जाण्याच्या तयारीनें वाट पहात होतो. परंतु रात्रौ. ९ वाजतां कार्यकारी मंडळांच्या सेक्रेटरीनें रा. दाते व रा. आगरकर यांनीं 'आपण आजंच्या कार्यक्रमास हजर राहूं नये' अशी विनंति केली; आणि त्यामुळें नाइलाजास्त मला इच्छा असतांहि येतां आलें नाहीं. तरी या बाबतीत मजबद्दल कोणीहि गैरसमज करून घेऊं नये अशी विनंति आहे. क. हे. वि.

व्यंकटेश बळवंत पेंढारकर, ललितकलादर्श सं. मंडळी

गिरगांव मुंबई, ता २६।८।२५

यावरून सार्वजनिवक उत्सव कायमचा बंद पाडण्याची कारवाई भटांचीच असल्याचें स्पष्ट सिद्ध होतें. का. का. मंडळानीं प्रसिद्ध केलेलीं दोन हँडबिलें व दाते आगरकरांचा उलट खुलासा म्हणजे वस्तुविपर्यासाचा उघड उघड शिमगा म्हटले तरी चालेल. पण आजपर्यंत भिक्षुकी हृदयानें कोणतें पाप कबूल केलें आहे, तर या बाबतींतल्या पापाचें माप ते पदरांत घेतील? त्यांनीं बेधडक या आपल्या पाजीपणाचें खापर दादरच्या कायस्थ तरुणांवर फोडण्याचा उपक्रम केला, व गुदस्त सालच्या पुणेंकर हरदासाच्या पाजी कृत्याच्या प्रायश्चित्ताचा सूड उगविण्याचा प्रयत्न केला.

दादर येथे कायस्थ प्रभूंचीं कमींत कमी ५०० वर बिऱ्हाडें आहेत. प्रत्येकीं दोन तरुण जरी बाहेर पडले तरी, हजाराची भरती सहज होते. कायस्थ तरुणांत प्रत्यक्ष कार्यक्षमतेची काय धडाडी आहे, हें दादर लत्याच्या जनतेला पूर्ण माहीत आहे. असल्या तरूणांचा जमाव बहुजन समाजासाठीं एखाद्या चळवळीच्या अग्रभागी येऊन उभा राहिला, तर ती 'जातिविषयक चळवळ' असें राजाराम वैद्यासारख्या बिनबुडाच्या वटवाघळानें म्हटलें आणि तें त्याच्या अनुवंशिक, माथेफिरू संस्काराला कितीहि शोभलें, तरी त्यांत कायस्थ तरूणांनीं एवढें काय घोडें मारलें? चार दोन तरूण कायस्थ कुलुगी कुत्री पेशवाई भटजींच्या कोंकणी पायतणांत लुडबुडली म्हणून इतर कायस्थ तरुणांचा स्वाभिमान आजच कांहीं सोनापुरांत गेलेला नाहीं. कायस्थ हा बहुजन समाजाच्या हितवादासाठींच जन्मलेला असतो. श्री. केशवराव ठाकरे दादर सोडून गेले, तरी त्यांच्या मागें त्यांचें जनसेवेचें कार्य चालवायला त्यांचे धाकटे बंधु यशवंतराव दादरला आहेत. प्रस्तुत प्रकरणीं यशवंतरावांच्या खांद्याला खांदा भिडवून श्री. बोले जे. पी. श्री. कवळी जे. पी. श्री. नारायणराव पाटील. जे. पी. वगैरे पुढारी व श्री. पडवळ, श्री. कोलेकर, ताम्हणे, कवळी, मोकाशी वगैरे शेंकडों तरूण उभे राहिले, तरीहि ज्या बुद्धिमदांना ही 'कायस्थी चळवळ' वाटते, त्यांना तरी सार्वजनिकत्वाचें सर्टिफिकीट कोणत्या गध्यानें दिलें आहे हें बाहेर पडले तर बरें होईल.

अतिशय खेदाची गोष्ट म्हटली म्हणजे दादरच्या जनरल एज्यूकेशन सोसायटीच्या कार्यकारी लोकांनीं अलीकडे असल्या 'सार्वजनिक' भानगडींत प्रामुख्याने लुडबूड करावी, ही होय. रा. जोशी ओक प्रभृतींना शिक्षण क्षेत्रांतच इतकी कामें आहेत, कीं त्यांनीं वास्तवीक पांडबा चित्पावनाच्या वळणानें जाणें म्हणजे सोसायटीचा आत्मघात करणें होय. पांडबा स्वत:ला कोणीहि समजत असले, तरी जनता या खालमुंड्या मुलूख धुंड्याला पूर्ण ओळखून आहे. राजाराम वैद्यांनाहि आमची जाहीर सूचना आहे कीं राव, आपण जर आपल्या लायकीचा अजमास पहा. कॉर्पोरेटर निवडून आलात म्हणजे गगनाला हात पोहचत नाहीं. आज तुम्ही भिक्षुकी कंपातली 'मांजराची डावली' आहांत, हें तुम्हाला उमजत नसलें, तरी लोकांना पूर्ण समजलें आहे. ब्राह्मणी छावणींत कायस्थांची निंदा आणि कायस्थी जमावांत ब्राह्मणांची वकिली, ही 'आपा शिंदकरी' अखेर आपल्या पगडीला भोवल्याशिवाय खास राहणार नाहीं, एवढी प्रेमाची सूचना पुरें आहे.

वेशासं भास्करपंत भोपटकरांचे नियोजित व्याख्यान हें कारण असलें, तरी झाला प्रकार दृष्टीनें इष्टापत्तीच होय. सार्वजनिकत्याच्या पांघरुणाखालीं वाटेल तो गोंधळे घालून लोकमताची पायमल्ली करण्यांत ब्राह्मण लोक किती शिरजोर बनले आहेत, याचें प्रत्यंतर दादरकर जनतेला केव्हां ना केव्हां तरी यावयाचेंच होतें. तें आलें. सार्वजनिवक म्हणजे भिक्षुकी असा शब्दप्रयोग मराठी कोपांत आतां खुशाल करावा, एवढें तरी लोकांना आतां पटलें. पुष्कळच कार्य झालें. धडधडीत खोटी विधानें छापून जाहीर करणाऱ्यांना सत्याची कितपत चाड असेल आणि लोकमत प्रदर्शनाचें प्रतिनिधित्व पत्करण्याची ब्राह्मणांची काय लायकी उरली आहे, याचा आतां विचारच होणें जरूर आहे, उत्सवाच्या ठिकाणीं एकूण एक ब्राह्मण हातांत लाठी घेऊन हजर होता, हें पोलीस इन्स्पेक्टरनें पाहिलेंच आहे. यावरून ब्राह्मणांच्या अरेरावीची व मूळ उद्देशाची पुष्कळच कल्पना होते. हातांत लाठ्या घेऊन लोकमत वळविण्याची ही भिक्षुकी शक्कल चाणक्यालाहि माहीत नसावीशी दिसते. पण ब्राह्मणांच्या हातांत लाठी पाहिली कीं लोकांना मात्र हंसू आवरत नाहीं. हा अनुभव दादर प्रमाणेंच पुण्याच्या गणपति-दंगलींत पुष्कळांना आलेला आहे. आज टिळकांच्या पुतळ्याची राखण करायला भटजीची लाठी कामीं न येतां, माबाप सरकारच्या पोलिसांची पलटण ब्राह्मणांना मागवावी लागली. शिवाय लाठी पाहून ब्राह्मणेतर बहुजनसमाज व त्यांचे पुढरी दचकतात, वाचकतात; का हातहि वर न करतां नुसत्या डोळ्याच्या जरबेनें उन्मत्त भटांना गणपतीच्या मागें दिवे विझवून लपणें भाग पाडतात, हें बोले पंडवळ कवळी प्रभृतीनीं जनतेच्या चांगलेंच निदर्शनास आणलें आहे. हॅन्डबिलांतून किंवा वृत्तपत्रांतून ध चे मा करण्याची भिक्षुकी कारवाई आजपर्यंत भोळ्या व अंधश्वासू जनतेनें मुकाट्यानें खरी मानली. पण या उप्पर ब्राह्मणांनीं आपला असला कलमकसायीपणा विनाकारण चव्हाट्यावर मांडून आपण 'कॉमन सेन्स'च्या बाबतींत सुद्धां नर्मदेतले गोटे आहोंत हें उघड न करण्याची मेहेरबानी करावी, अशी सूचना आहे.

दादरला ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद उघड नव्हता, ही गोष्ट खरी. पण तो बुरख्यांतूनहि वावरत नव्हतां, असें मुळींच मानता येणार नाहीं. भिक्षुकी कारस्थानाचे काटे पदोपदीं पायांत रुतत, पण तिकडे फारसें कोणी लक्षच दिले नाहीं. लक्ष न देण्याचें कारण संघटनेचा अभाव * संघटना करीत होते. या संघटनेच्या जोरावरच ते सार्वजनिक बुरख्याखाली बहुजनसमाजाचें पुढारपण बळेंच आंगांवर घेऊन शिंगावर नाचविण्यास समर्थ झाले. पण आतां घडलेल्या चिडखोर व अपमानकारक भिक्षुकी गुंडगिरीनें बहुजनसमाज जागा न होईल, तर तो कायमचा तुडविला जाईल. प्रत्येक चळवळीचा झेंडा ब्राह्मणाच्या हातीं आणि लोकांनीं मात्र नुसते फंड देऊन, ब्राह्मण ठरवितील तीपूर्व दिशा मानून, स्वस्थ बसणें यालाच गुलामगिरी असें म्हणतात. दादरच्या जनतेनें गेल्या ४-५ वर्षांत असहकारी चळवळीच्या दंगलींत कट्टर, फत्तर हुक्कर वगैरे नानाविध भिक्षुकी ढोंग धत्तुरे शांतपणानें चालूं दिलें. पण यापुढें लोकमताचा असा कोंडमारा न होऊं देण्याची शिकस्त केली पाहिजे. आम्हाला अशा आहे कीं या प्रसंगी श्रीयुत बोले, कवळी, पडवळ पाटील व यशवंतराव ठाकरे प्रभृति खऱ्याखुऱ्या सार्वजनिवक संघाच्या घटनेकडे लक्ष पुरवून एफ व जी वॉर्डांतल्या लोकमताचें सामर्थ्य केंद्रित करण्याची खटपट करतील. या कामीं दादरचा प्रत्येक कायस्थ प्रभू तरूण त्यांच्या पाठीशीं उभा आहे ही त्यांनी खात्रीं बाळगावी. इतकेंच नव्हे तर का. का. मंडळाची काजळी न लागलेले शेकडों ब्राह्मणहि या कामीं त्यांना सक्रीय पाठबळ देण्यास तयार आहेत.

□□□

Current Topics

Untouchable Gods of the untouchable Brahmins

The people outside Maharashtra can not well understand the genesis of the veiled mischiefs carried on by the arrogant Brahmins against the Non-Brahmins, who are now trying to recover themselves from the centuries old lethargy and bone-stuffed mental slavery. It is a conflict between the most crafty, articulate community on one side and the ignorant millions with few leaders on the other. Till late a few years, the voice of these dumb millions was actually bushed down under the systematic tomtoming of the quack patriotic manovours of the Brahmins, who posed themselves as the only representatives of the people. Whatever may be the field, whether social, religious, educational. or political, the Brahmin stood as the unquestioned representative of the public opinion and his voice ruled the destinies of the non Brahmins, whether they liked it or not. Since however the non Brahmins disowned the conspiring Brahmin element as anybody and struggled to assert their own birth right to express themselves through their own journals and institutes, the Brahmins realised their shaky position. At pre sent they are disregarded and hissed at as non-entities and open opponents. The non-Brahmin journals, by no means so much intelligent or sufficiently powerful, have done a great service to speak out the heart of the teeming millions. Brahmin priest has no voice in matters of religion in the Deccan, though a few over-wise com munities like the Kayastha Prabhus and others still prefer to wallow in the mire of the bondage of the priestly dominance. The efforts of the tricky Brahmins to keep their grip over the ignorant masses in the face of open challenges and wide-spread opposition, are too numerous to accommodate in this small note. Enough to say that they are now trying to pre judice the view of the Indian people outside Maharashtra with a number of false reports published in their own journals. Generally, they appear to champion the cause of anti-untouchability, Shuddhi and Sangathan; the only fields where they can now carry on their dramatic activities. But actual facts are quite otherwise. These patriotic Brahmins desire the untouchables to be touchables. But they do not bear the sight of even a pure Kshatriya Maratha enter a Hindu temple and worship the idol there with his own hands. They cry at the pitch of their voice for Hindu Sangathan. But they enjoy to insult the non-Brahmin leaders and their activities of self-determination. A Brahmin hates a Kayastha

Prabhu and frowns to see a Maratha claiming equal rights with him; and still the crafty genius rattles over the Sangathan. A Brahmin hungers for Shuddhi, but allows no non-Brahmin enter a temple, because merely a shadow of the latter pollutes not only the plinth and walls of the temple, but the god itself within. Hundreds of such polluted gods are reported in the priestly journals and the pseudo-protectors of Hindu Dharma feel no shame to appeal to Government to prosecute the non-Brahmin tresspassers into the Most Holy precincts of the temple. When such morbid efforts of a degenerated mentality, which a notorious Brahmin carries with him, are seen, we are driven to say that it would be a perpetual solace to see all the Hindu temples with their idols ground to dust, rather than keeping them as constant signs of menace to all the non-Brahmins at all times. We do not like to bear an idea of an untouchable God in the prison-cell of an untouchable priestly class whose sincerity, the millions of non-Brahmins now seriously question and challenge.

Barbarity under British Flag

The Prabodha, a vigilant Marathi weekly of Dhulia, in its issue of 30th August, exposed a serious case of inhuman tortures practised by the Police of Mehunbara and Pahura in Khandesh, upon unfortunate suspects conneccted with some a dacoity. The several methods of torture used by the demon--hearted police to extract confessions from the suspects, not only shock the human sentiments, but put even the so called Iron Age civilization to shame. We shudder to reproduce the details, of those dirty tortures published by Prabodha in bold letters. We wish the Government to forthwith institute enquiries into this affair and drag the culprit police officers to books. It would certainly be a shame and disgrace to permit such scandals of official barbarity pass unseen and unpunished under the British Flag. It is reported that a strong public committee is formed under the chairmanship of Mr. S. S Dev of Dhulia, to carry investigations into the matter, which has also received the warm and practical sympathies of the Collector of the District. Those idlers, who in and out of season, make it their pastime to accuse the Indian States of barbarous maladministration, should now come forth to show their true worth and genuine feelings of wrath against inhuman tortures and help the Government to prove the truth of them.

Religious and Social Reform

Mr. C. Y. Chintamani, the President of the Bombay Provincial Conference, Poona, has a very cogent message for the Young India in respect of the most urgent need of Religious and Social Reform, in his following utterances:

"I invite you to bear in mind at all times that politics is only a part of national life. Religious and social reform is a paramount need of the country. We have lessons to learn, the foremost of them is not to neglect but to apply ourselves to those problems

of religious and social reform, without solving which our nation cannot achieve fame or prosperity nor become righteous. Our religious beliefs and practices must be freed from the accretions of superstition and our social institutions, customs and usages liberalised and reformed so, that truth, justice, mercy, equality and freedom may be the ruling principles. Our departure from the precepts of our ancient religion, our division of society into so many castes and sects, our treatment of the so called depressed classes, the many disabilities we have imposed upon women, constitute a disgrace which we have to do our honest best to wipe out. It is my conviction that mere political agitation will not bring salvation to India any more than to other countries, and I humbly invite you to show yourselves to be true Liberals and patriots by striving for religious and social reform not less zealously than for political Swaraj. Not that I seek in any manner to belittle the importance of self government- I do not and you do not; but our supreme end ought to be to see the reign of love and justice and truth established in this Land of ours, the land which we believe to be the favoured of God Himself. However dismal the immediate future may look to our imperfect vision, the faith is undying in us that India will live and live honourably and it is our duty to act in the spirit of unselfishness and with the zeal which righteousness begets to realize her glorious destiny. And in all our work, we can always derive consolation, comfort and strength from

an assured belief
That the procession of our faith, however
Sad or disturbed, is ordered by a Being'
Of infinite benevolence and power,
Whose ever-lasting purposes embrace
All accidents, converting them to good.

Out of its Infancy

There are stages through which every rising power has to go as a matter of course. No man or movement of any noticeable worth can afford to avoid its passage through them. The Non-Brahman movement of the Deccan has now passed through a stage of its infancy, when its opponents thought it a worthless, negligible and foolish "business of a few selfish people". The grievances underlying the movement were laughed at. The leaders were hissed at. It was not even recognised as a Party by the Anglo-Indians, Brahmans and the wise Government till the last Council Election. The great leader like late Shahu Maharaja Chhatrapati of Kolhapur was trumpetted as the most worthless and treacherous man blackmailing the milk-white traditions of Shivaji the Great. The N. B. movement has passed through this stage of derision and worthlessness and its foes, particularly the conspiring Brahmans, have now fully realised its gravity and volume of public support at its back. Even the Solomons of the socalled Swaraj Party" had to flee away from the Council Chambers, like huffish women, in protest against the representatives of the N. B. Party, before whose influence, good or bad, their overflowing patriotism could not withstand. Journals like the Times of India and others, who formerly danced to the tune of the most prattling Brahman Journals, have now put on a robe of

Daniel, and commenced their sermons of "Peace" and admonitions of “Truth, Justice and Fair -play,” All these changing phases of the situation show that the N. B. Movement, with all its defects and merits, has passed out of its infant life.

Yes. A Social Revolution

A true sympathiser of the N. B. Movement must not blush to confess that since the unfortunate removal of that great illustrious personality of Shahu Chhatrapati from the helm of this movement, it is almost leaderless. The leaders of the day lack all the qualities which constitute one. We even venture to say that the movement is constitutionless. We can point to nobody who directs its forces and controls its activities. But these points by no means can prove that the movement is lifeless or baseless. The boiler is full with steam. And certainly if no one steps forth immediately with unquestioned virtues of a leader to control its operations there is every likelihood of a great mischief being wrought in the near future. We quite agree with bystanders like the Times of India, when it says that greater precautions should be taken to watch its further developments on a healthy path. It is painful to observe any Dick Tom and Harry strutting forth to represent the movement and conducting it in manner best suited to his individual fancy. But with all these drawbacks and defects, no sane man can say affirmatively that the N. B. Movement has its meaning. It has its message. It clearly shows that the Hindu Society is in its melting pot. It is an effort not to seek the entire elimination of the trifling Brahman community: (as they and their brainy compatriots always cry at the top of their voice), but to get the re-adjustment of the Hindu Social Polity and Hindu Dharma, which at present is as iron-framed and reckless as the beaurocracy which handles the destinies of India. It is a fight between the articulate and the inarticulate communities of the common hold. It is an effort to regain rights of bare humanity, which ever the God hath no right to deprive the teeming millions of. None should be so foolish as to say that the real sympathiesers’ of the N. B. Movement have become so devoid of common sense as to kick off the intellectual support which a Brahman carries with him. The people want the Bramans, but shorn of all their bigotry, of supermanism, claims or asserting their communal “gooda-giri” over the masses, and particularly their bonebred habit of conspiring even against their co-religionists when their private ends are to be achieved. It is the tricky mentality of the Brahmans, and not his person, which must be crushed first of all. The Brahmans have lost all confidence with the N. B. communities without | exception and till the latter are convinced of the entire removal of this notorious mentality, there is no likelihood of the Deccan people ever joining hands with them in any walk of life. In short, it is a social revolution and it shall have its way in spite of the enormous obstructions, whether Brahmanical or Governmental. The only precaution, a sane thinker should take, is to see that this resolution ends without staining the pages of history with human blood. As humble student of the science of history, we may assure the frightened opponents of this movement that there is still sufficient scope for sane and sympathetic interference to pilot its course to a bloodless finish.

Rabid Journalism

Superficial observers and those whose nostrils have now been stunk with the rabid campaign of penmanism carried during the Phule Statue Controversy in Poona, are now protesting against this degeneration of a worthy profession of journalism. While we do not deny the degenerated mentality of some Marathi Newspaper writers, we have to point out that Anglo Indian journalists too are not less rabid or less mischievous. On the other hand, we can boldly say that journalistic rabidity claims its parenthood to the heartless Anglo Indian journalism. It is they who have played more mischief, in perverting the facts, misrepresenting the situations, prejudicing the parties and maligning the Indian worthies than any Marathi writer can be accused of. Had it not been for the malicious perversion of facts and systematic misrepresentations indulged in by the Anglo Indian journals like the Times of India and others of its feathers, we feel sure that there would have been probably no widened gulf between the rulers and the ruled, whose co-operation these Western Solomons stand accused of having disturbed. It is the Anglo Indian journals who have trained the Indian people to treat first class scoundrelism as the soil of Statesmanship. It is they, and none else, who have educated the young journalists of this country in hurling veiled abuses and practicing respectable villainy of penmanship against each other. We have indeed a very bad specimen of Anglo Indian journalism before us to imitate to our discredit and discomfiture. What evils have not been wrought by this heartless institute in India? But they too have been paid, in their own coin by their honest adepts the Brahman journalists of the Deccan, who show no difference whatever in their Machiavellian tactics both against the foreigners and their co-religionists. In turn, cropped up the growth of Nom Brahman journalists, especially the Maratha writers, whose sense of respect and human rights had been mortally wounded by the Brahman journalists for years past. Finding the priestly journals entirely antagonistic to represent the cause of the backward classes, the Marathas had no alternative but to start their own papers, and certainly they are doing a very commendable service to the cause just near their hearts. If they have not done anything, they have at least taught their opponents the Brahmans that Brahmanical phraseology of sarcastical taunts is not now the monopoly of theirs and they could very easily be paid kick for a hiss, and a shot for a whisper.

Doctor Heal Thyself

The educational awakening among the Marathas is of yesterday, while that of the Brahmans, according to their own confessions, dates from 5000 years B. C. Naturally this evident difference between their respective cultures must be taken into consideration while passing judgments upon the conduct of the journals of them both. We cannot expect the Marathas, and Non-Brahmans, who are just peeping above their thick environment of lethargy and ignorance and struggling to speak out what they feel, to be so much systematic and diplomatic as the Brahmans are. The Marathas are still a simple yet patriotic race. Though they know well to keep unsullied their self-respect as

an important unit of the great Hindu Society, they have not yet mastered the notorious journalistic art of the Brahmans to blow hot and cold with the same breath; or to achieve their ends at the cost of their honour or personal mortification. They write and speak what they feel. They speak and write, in the language of their heart. This process is in consonance with the degree of their educational achievements which falls far short below the one already mastered by their rank enemies the Brahmans. But we do not think that in spite of their educational disabilities they have ever permitted their pens to transgress the limits of decency. They are not expert pencrafts; they do not deny it. But when some over-wise men try to accuse them with indecency and violence of language and volunteer to awaken the ever-alert Government to muzzle them, we cannot but say "Doctor, Heal Thyself first." It was in definite protest against the indecent, violent and mischievous journalistic propaganda of the Brahmans that these N. B. journals came into existence. It is by all means a self deception to believe all the Brahman journals to be saints not whispering even a syllable of indecent and violent language. Those fools who are now taking objection to the firebrand language of a common local weekly conducted by a Maratha, ought to have raised a storm of protest when their own chickens the obscene Mouj and Chabook traded in the filthiest manner possible on the Mumtaz scandal. But so long as the victims of abuse and scandal are some non-Brahmins or their worthies, the satanic saints of Deccan journalism prefer to put on a Spynx-like indifference and callousness. But when now the tables are turned against them, the devil is citing scriptures to save his skin from being scorched to the marrow of the bone.

Friends or Foes?

One word to our Anglo Indian friends and we close. It is still a mystery to many as to what role they generally play in India. But as a third party, Indians expect them to be more rational and impartial than they have hitherto proved to be. They must know that the language is the medium of thought. It is from the scorching heat of the language that one judges the feelings of the heart. Only shrewd people or rascals of the first water play the dubious play of arraying the words and clothing the thoughts with artificial drapery. The non-Brahmans, especially the brave Marathas are plain blunt fellows. You cannot expect them to indulge in artificial verbosity as do the articulate Brahmans. You can correctly find the pangs of the backward classes actually photographed in their crude method of journalism. There they pour out their sentiments as they occur to them. They call a spade a spade, and not an oblong instrument of manual husbandry, as an erudite Brahman would prefer to put it. Because one cannot express himself in a stylish way, he should be gagged to death, is a Satan's sermon ill fitting an Anglo Indian bystander. In fact they have no reason whatever to interfere into this question of life and death involved between the Brahmans and non-Brahmans on the score of social equity. It is foolish to think that the non Brahman movement is based and conducted with only one object of exterminating the Brahman caste. The Anglo Indians must bear in mind that a handful of Brahmans on the strength of their age-long educational superiority have licentiously

traded upon the ignorance of the millions of souls, who now under a common name of Non-Brahmans are labouring to stand upon their own legs. Their efforts of expressing their sentiments may not be stylish or even learned; but it is not an insult and injury added together to say that they should not and must not say a word unless and until they develop a rhetoric and verbosity that would suit and please the taste of Brahmans or the Anglo Indians? The duty of a rationalist is to study the sentiment and not its clothing. We assure that the Maratha journals are not at all so poor in their expressions as the wily Brahmans make their temporary allies - the Anglo Indians - believe. The Marathas have fully convinced the priestly patriots that they are more than a match for them in all walks of life and hence this loud cry of the Brahmans in the wilderness.

□□□

पुस्तक परिचय

कलमबहादरांस शेलापागोटें

श्रीमच्छत्रपति शाहू महाराजं यांचें चरित्र

(लेखक - प्रो अण्णासाहेब बाबाजी लठ्ठे, एम. ए. एलेल्बी. किं. २ रुपये मिळण्याचा पत्ता :- श्रीरामतत्व प्रकाश प्रेस, बेळगांव)

प्रो. लठ्ठें यांनीं 'मेमॉयर्स ऑफ शाहू महाराज छत्रपति ऑफ कोल्हापूर' या नांवाचा इंग्रजींत एक मोठा दोन भागी ग्रंथ लिषहिला आहे. त्याचें हे उत्कृष्ठ मराठी भाषांतर आहे. प्रस्तुत मराठी ग्रंथांत ७३ फोटों दिलेले असून, हा ४७५ पानांचा अँटिक पेपरवर उत्तम छपाईचा व आकर्षक बांधणीचा ग्रंथ अवघ्या २ रुपयांत देणें म्हणजे लहानसहान धाडस नव्हे. पण या धाडसानें गरीब मराठी वाचकांना मात्र एका महापराक्रमी महात्म्याच्या चारित्र्य-तपशिलाची खमंगी मेजवानी थोड्या खर्चांत मिळण्याची सोय झाली. याचा फायदा प्रबोधनाच्या आश्रयदात्यांनीं अवश्य घ्यावा अशी आमची खास शिफारस आहे.

राष्ट्राच्या जीवनाला बेधडक धक्का देऊन, सामाजिक व धार्मिक क्षेत्रांत अकल्पनीय विचारक्रांति करणारे व त्यामुळें राजकीय क्षेत्रांत बोकाळलेल्या ढोंगी मुत्सद्यांच्या कारस्थानांना कायमचा पायबंद लाऊन बहुजनसमाजाच्या आत्म्याचे बिनचुक प्रबोधन करणारे आजपर्यंत जे कांहीं थोडे महात्मे या महाराष्ट्रभूच्या कुसव्यांत पैदा झाले, त्यांत राजर्षि शाहू महाराज करवीरकर यांचा पहिला नंबर लागेल. प्रस्तुत ग्रंथांत प्रसिद्ध झालेले त्यांचे बाळपणापासूनचे फोटोच जरी नीट परीक्षण केले तरी त्यांच्या कदरबाज चेहेऱ्यावरून हा कोणी तरी मोठा अलौकिक धडाडीचा पुरुष असावा, असें तेव्हांच वाटतें. सर्वसाधारण संस्थानिवक नृपत्तींचा जीवनक्रम आणि शाहू महाराजांचा जीवनक्रम यांत जमीन अस्मानाचा फरक दिसून येतो. संस्थांनी प्रजाजनांचें आपल्या नृपतीवर अकृत्रिम प्रेम असणें अगदीं साहजिक आहे. पण शाहू महाराजांची लोकप्रियता संस्थानच्या हद्दीचे तट ओलांडून, सोमवडी धरणाऱ्या लोंढ्याप्रमाणें अवघ्या महाराष्ट्रांत प्रसार पावली. ही लोकप्रियता रामदासी बगलबच्चांच्या भिक्षुकी चिथावणीची नव्हती. ती स्वयंस्फूर्त होती. ही बळजबरीच्या शिकवणुकीची किंवा थापबाजीच्या नाटकी कसरतीची नव्हती. ती हृदयाला जाऊन भिडलेल्या व पटलेल्या स्वानुभवाची होती. या लोकप्रियतेनें बहुजनसमाजाच्या हृदयाचा ठाव पहाण्यासाठीं पंढरपुरी बडवेगिरी केली नाहीं कीं नाशीकची कार्टे

शाही कामाला जुंपली नाहीं. तिचा उगम जसा शुद्ध भावनेंत, तसा तिचा प्रसाहि शुद्ध हृदयांत. अशुद्ध हृदयें तिच्या सोसाट्यापुढें चकणाचूर झाली. राजर्षींच्या शुद्धांत करणांत बहुजनसमाजाच्या, विशेषत: मागासलेल्या व खालावलेल्या हीन दीन दुनियेच्या आत्मोद्धाराचा एवढा विश्वव्यापी प्रश्न जन्म पावला कीं त्यानें संस्थानी क्षेत्राचे तट तडाड फोडून अवघ्या महाराष्ट्राला कंवटाळलें नसतें, तरच तें एक मोठें आश्चर्य होतें. महाराजांनीं संस्थानी दृष्टीचा आपपर भेदच मानला नाहीं. त्यांच्या चरित्राची कमावणीच अशा विलक्षण परिस्थितींत झाली कीं इंग्रेजी राजसत्तेचा किचपट चाप या भरतखंडावर नसता, तर या २० व्या शतकांत सम्राट अशोकाच्या इतिहासाची पुनरावृत्ति महाराज खास घडवू शकले असते. ही पुनरावृत्ति त्यांनीं घडवून आणलीच नाहीं असें मात्र म्हणतां येणार नाहीं. जें कार्य तीन डझन काँग्रेसना, शेंकड्यावारी सामाजिक व धार्मिक परिषदांना, रांजणभर जगद्गुरूंना आणि ढेंकणापिसवा चिलटा इतक्या उमाप 'लोमा' ना व 'देभ'च्या बापांना साधलें नाहीं, तें राजर्षि शाहू छत्रपतीनीं अवघ्या ४-५ वर्षांच्या अवधींत चुटकीसरसें घडवून आणलें. या कामीं त्यांना कोणकोणत्या भयंकर संकटांच्या दिव्यांत स्वत:ला पोळून घ्यावें लागले, कोणकोणत्या आणि कोणाकोणाच्या कारस्थानी व्यूहांतून अक्कल हुषारीनें सफाईंत बाहेर पडावें लागलें इत्यादि तपशील प्रो. लठे यांनीं अस्सल कागदपत्रांच्या आधारानें अत्यंत निस्पृह स्पष्टतेनें रंगविला आहे. लोकमान्यतेच्या बडवेगिरीनें हतबुद्ध झालेल्या मतिमंदांना या सवाई शिवाजीची कामगिरी आज जरी नीट कळली नाहीं, तरी जसजसा काळ लोटेल, अनुभवाच्या ठेचा लागतील आणि गार व हिरा पारखण्याइतकी डोळ्यांची नजर निवळेल, तसतसे तेच लोक राजर्षींच्या राश्ट्रकार्याचे महत्व गाऊं लागतील, असा आम्हांला पूर्ण आत्मविश्वास आहे.

महाराजांचे व त्यांच्या थोर कार्याचे मुख्य शत्रू जर कोण असतील तर तो कोब्रा चित्पावन. पण ते शत्रुत्व कोणाचें करीत नाहींत? तो त्यांचा तर विशेषच आहे. असें कोणतें राज्य आहे, कोणती रियासत आहे, इतिहासाचा कोणता कल आहे, कोणता लोकहितवादी जनसेवक वा नृपति आहे कीं त्याच्या नरड्यांला हा कोब्रा डसला नाहीं? हा कोब्रा कोणत्या वेळी कसली मोहक व तुकतुकीत कात अंगावर चढवील आणि वेळ येतांच केव्हां ती चटकन टाकून नरड्याला डसेल, याचा कांहीं नेमच नाहीं. जेथें जेथें मत्सर, द्वेष, असूया, तंटे, द्वैत व घातपात झाला असेल, तेथें ज्योतिष्याची, तर्कशास्त्राची, रमलची किंवा मेन्टल टेलीपथीची कसलीहि यातायात न करतां बेधडक सांगावें कीं जवळपास केठें तरी एखाद्या बिळांत एखादा तरी कोब्रा असलाच पाहिजे. हा सिद्धांत आहे; नुसता तर्क नव्हे. हा लक्षावधि लोकांचा अनुभव आहे, केवळ कादंबरीचें विधान नव्हे. राज्यक्रांत्या घ्या, समाजविघटन घ्या, धर्मविध्वंसन घ्या, नाहींतर गाड्यांत अडकलेली खीळ घ्या, तेथें कोब्राची स्वारी हटकून जेठा मारून बसलेली आढळणारच. मग शाहू महाराजांच्या सर्व चरीत्रावर डांबर ओतलेली आढळतांच तेथें कोब्राचें वेटाळें बिनचूक कां सांपडूं नये? यांत आश्चर्य तें कसलें? आणि जळफळा तो काय म्हणून करायचा?

दुसरा एक सनातन सिद्धांत वाचकांनीं आमरण लक्षांत ठेवावा. कोब्रा ज्याच्यावर आपल्या फडेची अबदागीर धरील, वेटाळ्यानें कवटाळील, जिभेनें चाटील फडेची छाया नाचवील, तो कोणी तरी 'पावणेआट प्राणी वीर पुरुष म्हणून रंगविलेला खास समजावा आणि ज्या मनुष्यावर किंवा कार्यावर कोब्रा फूत्कार टाकील, फडा आपटूं लागेल, तोच खरा राष्ट्रवीर तेंच अस्सल राष्ट्रकार्य म्हणून खुशाल खुणगांठ बांधावी कोब्रा ज्याच्या नरडीला डसला, काळजाला चावला किंवा त्याच्या वेटाळ्याचा त्याच्या

कार्याच्या मानेला गळफांस बसला, कीं डोळे झांकून सांगावें कीं या माणसानेंच कांहीं तरी विशेष कर्तबगारीचें कार्य खास केलेलें असावें त्या शिवाय कोब्रा त्यावर इतका फोंफावत उलटणे शक्यच नाहीं. स्पष्टोक्तीच्या क्षेत्रांत एक पाऊल पुढे जाऊन आम्ही म्हणतों, (वाचकांनीं हा अनुभव घेऊनच पहावा.) कीं कोब्रा पत्रांत ज्या व्यक्तीची वस्तूची मनसोक्त निंदा होईल, त्या व्यक्तींत कांही तरी विशेष 'राम' असतो व ती वस्तू तर संग्रहणीय समजावी. ज्यांना हा अनुभव घेण्याइतकें धारीष्ट नसे त्यांनीं कोब्रांची पत्रें वाचतांना उलट्या भिंगाचा चष्मा वापरावा आणि पुराणें प्रवचने ऐकतांना कानाचें काम नाकास सांगावें.

प्रस्तुत ग्रंथांत प्रो. आण्णासाहेबांनीं बऱ्याच महत्वाच्या खासगी व दरबारी कागदपत्रांचे तपशीलच उद्धृत केलेले असल्यामुळें वरील कोब्रा प्रवृत्तीच्या सनातन सिद्धांताचा परिपोष वाचकांनीं ग्रंथवाचनानेंच आपल्या मनाशीं पटवून घ्यावा. हा ग्रंथ केवळ 'आठवणी' वजा भारुडाचा नसून, त्यांत एका क्रांतिकर्त्या महावीराचा सर्वांगीण जीवन वृत्तांत बारीकसारीक तपशीलानें यथाप्रमाण रेंखाटला आहे. त्यावरून महाराष्ट्रांत बहुजन सेवेचा मार्ग किती भयंकर संकटांनीं कंटमय बनलेला आहे, यावरून जातांना काय काय आपत्ति येतात, कोठकोठें लहान मोठे खांच खळगे व कांटेरी चाप उघडून ठेवलेले आहेत, समाजसेवकांना कोणकोणत्या दिव्यांत बळी पडावें लागतें आणि या सर्व स्थितींतून राजर्षी शाहूमहाराज अढळ धैर्यानें, अचाट हिंमतीनें व बेदरकार धडाडीनें कसें गेले, इत्यादि सर्व गोष्टी वाचतांना वाचकांचीं मनें कधी आनंदानें डुलतील, अभिमानानें फुलतील, त्वेषानें हालतील, क्रोधानें संतापतील, तर अखेर धन्य हा राजर्षि आणि धन्य त्यानें केलेलें बहुजन जागृतीचें कार्य, या उद्गारानें गारीगार होऊन जातील. शाहूमहाराजांविषयीं कोब्रा कंपेनें प्रसृत केलेल्या विषारी धुरावर हें ग्रंथरूपीं विश्वसनीय अस्त्र निर्माण केल्याबदद्दल प्रो. आण्णासाहेबांचें प्रबोधन कौतुकानें अभिनंदन करीत आहे.

महात्मा गांधी

(ले. एक राष्ट्रसेवक प्र.- द. गो. सडेकर. लोकमित्र कचेरी, खानापूर जि. बेळगांव, किंमत ८ आणे.) महात्मा गांधी यांचें हें तपशीलवार चरीत्र बरें लिहिलें आहे. शेवटीं महात्माजींच्या व्याख्यानांतील व मुलाखतींतील कांहीं महत्वाचे उतारे (मराठी भाषांतर) दिले आहेत. इंग्रजी न जाणणाऱ्या लोकांनां हें पुस्तक अवश्य वाचावें. प्रस्तावना बेळगांवचें श्री. सदाशिव लक्ष्मण सोमण यांनीं लिहिली आहे. एके ठिकाणीं ते म्हणतात ''लोकमान्य टिळकांच्या प्रमाणें 'जे का रंजले गांजले त्यांसी म्हणें जो आपुले' हें 'साधु' लक्षण महात्माजींच्या ठिकाणीं पदोपदीं दिसून येत आहे'' याचा इत्यर्थ एवढाच कीं टिळक हे मोठे 'साधु' आणि त्यांच्यावरून महात्मा गांधींत असणारीं साधुत्वाची लक्षणें वाचकांनीं पडताळून पहावीं. टिळक म्हणजे साधुत्वाचे 'मॉडेल' आणि गांधीत साधूपणा किती कमी किती जास्त आहे हे या मॉडेल वरून तोलून पहावयाचें, या खोडसाळपणालाच 'चित्पावनी कावा' असें नांव आहे. पण असल्या बडवेगिरीनें महात्मा गांधींच्या चरित्राच्या सबबीखालीं टिळकांच्या आंगीं नसता साधूपणां चिकटविण्याचा यत्न क्षुद्र व तिरस्करणीय आहे.

□□□

संपादकीय स्फुट विचार

पुतळ्यांचा प्लेग

पुण्यास राहणाऱ्या कोणत्याहि माणसाचें डोकें आजकाल तपासा, त्यांत संगमरवरी धोंडे, घणांचे फटकारे आणि पाथरबटांचा तांडा यांचा नुसता धुमाकूळ उडालेला दिसेल. ज्याच्या त्याच्या तोंडांत पुतळा. घरांत पुतळा, दारांत पुतळा, हॉटेलांत पुतळा, पोलीस चावडीवर पुतळा, ओंकारेश्वरावर पुतळा, जिकडे पहाल तिकडे पुतळेच पुतळे. मारे पुतळ्यांचा प्लेगच पुण्यांत उद्भवला आहे. एरवीच्या प्लेगावर इंजेक्शनचा उपाय तरी आहे, पण या पुतळ्याच्या प्लेगावर इंजेक्शनचा उपाय योजण्याविषयीं सरकारी दवाखान्यांत-नव्हे, खलबतखान्यांत अझून एकदमत होत नाहीं. प्लेगानें घरांतल्या घरांत माणसांचे मुर्दे पडतात. या पुतळा प्लेगानें- माणसांचे खून पडतात कीं काय? अशी जबरदस्त भीती ४ सप्टंबरपर्यंत आगजूर कलेक्टरापर्यंत सर्वांना होती. पण गणपति बाप्पानें 'विघ्ना वार्ता' फोल ठरविली आणि हा पुतळ्याचा प्लेग म्हणजे वाटला तितका डोकेफोडीचा नसून, त्यामुळें मुद्रालयांची मात्र पोळी बरीच पिकणार असा रंग दिसतो कारण हल्लीं हस्तपत्रिका, पुस्तकें, लीफ्लेटें यांचा इतरत्र सुळसुळाट उडाला आहे कीं मुन्सिपालिटीच्या झाडूं त्यांच्याशिवाय दुसरें कांहीं रस्त्यावर झाडायलाच मिळत नाहीं.

रयतेच्या पैशाची उधळपट्टी

वादाचें मूळ कारण मंडईच्या कट्ट्यावर उभा केलेला टिळकांचा पुतळा. हा पुतळा उभा करण्याच्या कामीं पुणें मुन्सिपालटींतील बहुमत्या कोब्रांनी खेळलेले सार्वजनिकपणाचे ढोंगधत्तरे त्या वेळीं सफाईंत पचं- गेले. टिळकांना 'लोकमान्य लोकमान्य' म्हणून कोब्रांनीं कितीहि नाचविलें तरी हा पुतळा बहुजन समाजाच्या संमतीला मुळींच मान्य नव्हता व आत नाहीं, हें पुतळाविरोधकांच्या अफाट संख्येवरून त्यांच्यांत उडालेल्या खळबळाटावरून स्पष्ट दिसतें मुन्सिपालट्यांनीं करदारांचा पैसा पुतळ्यांत खर्च करणे ही शुद्ध उधळपट्टी अथवा बेगुमान भांगरेगिरी होय निदान पुण्याच्या मुन्सिपालटीनें तरी या व्यसनांत करदारांच्या पैशाची माती करणें गैरशिस्त आहे. सडक गटारें ड्रेनेज दिवाबत्ती संडास व इतर शेंकडों आरोग्यदायी सुखसोईच्या गोष्टी पुण्यांत इतक्या घाणेरड्या अवस्थेंत असतात कीं मागें श्रीयुत विश्वन, थपंत, राजवाडे म्हणाले होतें कीं 'पुणे हा एक मोठा शेतखाना आहे तें अक्षरश: सत्य वाटूं लागतें. ज्या पुणे मुन्सिपालटीला शहर सुधराईचें कोणतेंहि काम आजपर्यंत नीट पार पाडतां आलें नाहीं आणि

प्रत्येक प्रश्नाला पैशांची ठरावीक रड पुढें मांडण्यांत येतें, त्या स्थानिक स्वराज्य संस्थेनें पुतळ्यापायीं १६ ते २० हजार रुपयांची बेशक माती करावी, ही करवसुलीची उधळ पट्टी का सार्वजनिवक दरवडा? रयतेच्या कसल्याहि सुखसोयीकडे न पहातां करदारांकडून पिळून काढलेल्या रकमांचा जर असल्या फत्तर-महात्म्याकडे विनियोग होत असेल, तर लोकांनीं बेलाशक करवंदीची चळवळ करून मुन्सिपालटीच्या कारभाऱ्यांचा मेंदू ताळ्यावर आणल्याशिवाय मुळींच राहतां कामा नये. 'सार्वजनिवक चव्हाट्यावर ज्यांना पुतळे उभारावयाचे असतील त्यांनीं खुशाल खासगी वर्गण्या जमवून, जागा विकत घेऊन, त्यावर आपापल्या दैवताचे धोंडे थापविणे. पण तेवढ्यासाठीं मुन्सिपालटीनें आपल्या तिजोरीवर पेट्रोल ओतून त्याला काडी लावणें, हा शुद्ध अन्याय आहे. ही लोकमताची पायमल्ली आहे. करदारांवर हा जुलूम आहे. हा जुलूम ज्या करदारांना मान्य नसेल त्यांनीं कायदेशीर मार्गानें मुन्सिपालटीच्या या पुतळेबाजीबद्दल तिला योग्य तें प्रायश्चित्त देणें आवश्यक आहे. करदारांचा पैसा पुतळेबाजीसाठीं उकळण्यांत येत असतो काय? उद्यां हे शहाणे कोणशीलदार रावबाजीच्या बावनखणीचें ऐतिहासिवक माहात्म्य चिरंजीव करण्यासाठीं एखाद्या सुप्रसिद्ध न्हन्नुजानचा पुतळा उभारू म्हणतील तर तें करदारांना मान्य होईल काय? तात्पर्य, मुन्सिपालटीला पुतळेबाजी ही रंडीबाजीइतकी व लांछनास्पद गोष्ट आहे. करदारांना एवढीहि बाजी बंद पाडता येत नसेल, तर स्वराज्याच्या आणि स्वयंनिर्णयाच्या गप्पा मारून त्या शूद्रांना काळीमा तरी लाऊं नका.

टिळकांची लोकमान्यता

कै. टिळक हे 'कोणी तरी' होते, इतक्या क्षुद्र भावनेनें पहाण्याइतकी प्रबोधनाची दृष्टी क्षुद्र नाहीं. त्यांच्या कर्तबगारीची, बुद्धिमत्तेची व स्वार्थत्यागाची आम्हांला पूर्ण जाणीव आहे व तितकाच आदरहि आहे. पण त्यांना 'सकल गुणालंकृत' 'भगवान्' किंवा 'अनामिका सार्थवति' करणारे 'लोकमान्य' ठरविण्याचा कोब्राकंपूंचा प्रयत्न केवळ क्षुद्रच नव्हे, तर शुद्ध बडवेगिरीचा, म्हणूनच हलकट असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. टिळकांविषयी आज जर बहुजनसमाजांत तिटकारा फैलावला असेल, तर त्याला खुद्द टिळकांची एकांगी देशभक्त जितकी कारण असेल, त्यापेक्षां त्यांच्या बडव्यांची पेशवांई घाशीराम शतपट जबाबदार आहे. ज्या काळीं अफाट ब्राह्मणेतर जनता अडाणी मांसाचा गोळा होती, केवळ अंधविश्वासांत मग्न होती, तिला खऱ्या खोट्याचा निर्णय लावतां येत नव्हता, गतेतिहासाशीं वर्तमान इतिहास ताडून पाहण्याची जिज्ञासा नव्हती, त्या काळी ऊर्ध्वबुद्धि चळवळ्यांच्या वर्तमानपत्रां मोहजालांनें व पुराण प्रवचनांच्या 'चल् चल् मदारीनें' बहुजनसमाज टिळकांना 'लोकमान्य, भगवान्, महात्मा' समजला-नव्हे, तशी त्यांची 'पोलीशी' समजूत करून दिली, तर त्यांत आम्हांला किंवा कोणालाहि आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. ठकबाजीला मोठमोठे शहाणे सुर्ते डोळे उघडे ठेऊन बळी पडतात. पण पुष्कळ वेळां पुष्कळ लोक ठकले गेले, तरी सगळा काळ सगळेच लोक ठकले जात नाहींत. टिळकांच्या सत्कर्मांची आणि दुष्कर्मांची आज निर्दय छाननी होण्याचा काळ आला आहे. आणि यांत टिळक भक्तांना भिण्यासारखे तरी काय आहे? परमेश्वराप्रमाणें टिळक जर खरोखरच 'सर्व गुणादर्श किंवा 'भगवान्' असतील, तर निंपदकांच्या मशिन गनी माऱ्यानें त्यांच्या लोकमान्यतेचें काय वांकडे होईल? उलट, असल्या निंदेच्या भट्टींत टिळकांचें सोनें होईल.

तेवढ्यासाठीं आकांड तांडव करण्याची ब्राह्मणी पत्रकार व बोलभांडांना कांहीं जरूर नाहीं. टिळकचरित्र म्हणजे अशोकाच्या शिलालेखाइतकी किंवा इराणांत सांपडलेल्या आर्यन गाडग्या मडक्यां इतकी मोठी दुर्गम गोष्ट नव्हे. टिळक चरित्र हें वेदांइतके पवित्र किंवा 'अपौरुषेय' आहे, कीं साध्यासुध्या मानवी गुणदोषपूर्ण परंतु एका विशेष कर्तबगारीच्या माणसाचें काल परवाचें प्रत्यक्ष पाहिलेलें व अनुभविलेलें दृश्य आहे, हेंहि ब्राह्मणांपासूनच शिकलें पाहिजे, असा थोडासा प्रश्न आहे? मुलाचें नांव जगदीश ठेवलें म्हणून तो जगाच्या ईश थोडाच होतो? टिळकांना लोकमान्य ही उपाधी लोकांनीं चिकटविली नसून ती त्यांच्या कोब्रा बडव्यांनीं विशेष धोरणानें त्यांच्या माथीं बळेंच लादली आहे. पण तेवढ्यानें ते खरेखुरेच लोकमान्य थोडेच होतात? 'आपल्या जगमान्य प्रबोधन पत्रांत...' असल्या मायन्याचीं शेंकडों पत्रें आमच्याकडे नेहमीं येतात म्हणून काय आम्हीं प्रबोधन जगमान्य मानायचें? कोठें जग आणि कोठें प्रबोधन ! कशास कांही मेळ? कोठें लोक आणि कोठें टिळक ! आणि म्हणे ते लोकमान्य ! आईबापानें लाडूकपणानें मुलाचें नांव ठेवावें वसंत आणि मुलगा पहावा तो हाडांचा सांपळा. मुळीचे नांव गुलाब आणि पहावी ते पिचक्या डोळ्याची, फेफट्यज्ञा नाकाची आणि बाबरओठी. असलाच प्रकार या लोकमान्य पदवीचा. राजकारणांत टिळकांनी सर्वस्पर्शी कामगिरी केली असें त्यांचे भगत म्हणतात. मग राजकारणांत ब्राह्मणेतर असंतुष्ट कां? टिळकानुयायी कोब्रांवर त्यांचा गैरविश्वास कां? टिळकांची कामगिरी जर लोकांकडून मान्य होण्यासारखी झाली म्हणावी, तर आज तिच्या पूर्ण अमान्यतेचीं प्रदर्शनें बहुजनसमाज कां दाखवितो? लोकांचीं डोकींच फिरली कीं कृतज्ञतेलाच ते पारखे झालें? टिळकांच्या लोकामन्यतेचा दांभिकपणा धिटाईनें फोडणारा बहुजन समाज माथेफिरू आणि मूठभर टिळक काय ते शहाणे, असें तर कोब्राकंपूचें म्हणणें नाहीं ना? असेल तर त्यांच्या सारखे दीडशहाणे तेच. राजकारणांत आपल्या विशिष्ट कोब्रा कंपूशिवाय कोणाशीं टिळकांचें मरेपर्यंत पटलें? धार्मिक व सामाजिक क्षेत्रांत तर टिळकांसारखा भिक्षुकशाहीचा नादीरशहा न भूता न भविष्यति. अशा मनुष्याला लोकमान्य म्हणणें म्हणजे 'लोक' शद्बाची व्याप्ती गाईकवाड वाड्याच्या ओसरीपुढें आणतांच येत नाहीं. लोकमान्यतेचा शेंदूर फासून दगडांत देव उबविला, तरी त्या देवाचें लोकमान्यत्व अजागळाप्रमाणें स्वत:च्या गळ्यांत हकनाहक अडकवून घेण्याइतके आतां लोक बावळट राहिलें नाहींत, त्याला कोणाचा काय इलाज? जेथें 'लोकमान्य' शद्बाचा शिवीसारखा उपयोग होऊ लागला, तिथे त्याच कोब्रांनीं अपौरुषेयत्वाच्या धावळ्या पांघरणें मूर्खपणाचें आहे. यामुळें टिळकांच्या असेल नसेल त्या थोड्या फार गुणांचीहि गुदभर होईल, हें लक्षांत असावें.

अतिप्रसंगाचें मूळच उखडा

व्यक्ती-स्वातंत्र्याच्या दृष्टीनें वाटेल त्यानें वाटेल त्याची खुशाल पूजा बांधावी. पण घरांतला लंगडा बाळ कृष्ण किंवा एखादा कुळस्वामी दैवत म्हणून लोकांना मान्य करावयात भाग पाडणें, हा निव्वळ जुलू आहे. टिळकांविषयी वाटत असलेल्या त्यांच्या भक्तांच्या भावना दुखविण्याचा जसा इतरांस अधिकार नाही. तसा इतरांच्या टिळकांविषयीं असलेल्या रास्त कल्पना दुखाविण्याचा टिळकभक्तांना अधिकार नाही. टिळकभक्तज्ञांना टिळक हे चतुर्भुजधारी भगवान वाटतात, ते लोकमान्य दिसतात, ते मोठे सुपरमॅन भासतात. बहुजनसमाजाला ते तसे होते असें मुळींच वाटत नाही, कारण तसे त्यांचा

अनुभवच नाही. टिळकांविषयी त्यांच्या भक्तांना अलोट प्रेम वाटतें; बहुजनसमाजाला टिळक एवढें नांवच कपाळाची तिडीक उठविण्यास पुरेसें होतें. पुणें म्हणजे टिळकांचा बालेकिल्ला. पण तेथेहि त्यांना वाढत्या लोकसत्तेचा दरारा जिवंतपणींच प्रत्यक्ष अनुभवास आला. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मराठी व भगतगणांची पाठराखणी त्यांच्या लोकमान्यत्वाच्या पुण्याईवर न होतां, त्यासाठी माबाप सरकारच्या शिपायांच्या पलटणी बोलावून आणाव्या लागतात. टिळकांची लोकामान्यता जर शंभर नंबरी अस्सल कसाची असती, तर त्यांच्या पुतळ्याला किंवा वाड्ड्याला हात लावण्याची कोणाची प्राज्ञा होती? त्यासाठी सरकारी पोलीसांच्या बॅग्नेटांची आवश्यकता होतीच कोठे? बुधवारांतल्या दत्तमंदीरांत लक्षावधि लोकांचे दैवत दत्तरूपानें आहे. संगमरवरी दगडाचीच मूर्ती, केवळ पुतळा, पण त्या मूर्तीला कोणी हात लावूं म्हणेल तर लक्षावधि दत्तभक्त तिच्यासाठी आपल्या देहाची कुरवंडी करायला कशाचीहि परवा करणार नाहींत. टिळकांच्या चारित्र्यांत यच्चावत महाराष्ट्रियांचें हृत्गत काबीज करण्याइतकी कांही सामुग्री अगर पुण्याई असती, तर दत्ताप्रमाणें त्यांच्या पुतळ्यापुढें लक्षावधि स्त्रीपुरुषांची मस्तकें खात्रीनें हरक्षणाला विलीन झाली असती. पण प्रकार पहावा तो अगदीच उलटा ! गेल्या गणेशोत्सवांत पुतळ्यांपुढें उभे राहून हजारों लोकांनीं टिळकांविषयी उच्चारूं नये ते शद्ब उच्चारले. तशी हॅन्डबिलें सुद्धां वाटण्यांत आली. हें काय अभंग लोकमान्यतेचें लक्षण? सारांश, बहुजनसमाजाच्या टिळकांबद्दलच्या भावनांचे रंग कांहींहि असोत. हा मंडईंतला पुतळा म्हणजे, संकट परंपरेची एक बाउच होऊन बसला आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. दयाळूपणा उतास जाऊं लागलेल्या माबाप सरकारनें गणेशोत्सवांत कोणा तरी शहाण्याच्या चिथावणीवरून दहा दिवस सशस्त्र पोलीसांकडून या दगडी बाहुलीचें रक्षण करविलें पण पुढें काय? उघड उघड जी बाब, चिंतेचा सुरूंग, असंतोषाचें मूळ, तें केव्हां भडका करील याचां काय कोणी नेम सांगावा? पुढारी कितीहि विवेकी असले, तरी 'उगाच मौज' म्हणून कळ लावणारे कळीचे नारद समाजांत नेहमीच असतात. अशा आग लावून मजा पाहाणाऱ्यांची पुढाऱ्यांना किंवा सरकारला शाश्वति देतां येईल काय? जर ती देतां येणें शक्यच नाहीं तर त्या बाँबचें संरक्षण कोण कसें करणार? काय त्यासाठीं सरकार खास प्युनिटिव पोलीस ठेवणार? म्हणजे करदारांची मृदंगवत् स्थितीच झाली म्हणायची. आधीं मुन्सिपालटीनें १६ हजाराला लुटलें. त्यावर ही दक्षणा ! त्यापेक्षां सोपा उपाय म्हणजे पुतळाच मंडईतून हालवावा व गाईकवाड वाड्यांत किंवा नव्या टिळक रोडवर किंवा डेक्कन जिमखान्यासारख्या ब्राम्हणी वसाहतींत नेऊन उभारावा, हें बरें. आधीं करूं नये ती गोष्ट केली, ती पुरी निस्तरली पाहिजे. सरकार या सूचनेचा स्वीकार करून अतिप्रसंगाचें मूळच उखडील अशी आशा आहे.

परस्पर पावणेतेरा

पुतळे उभारण्याच्या व्यसनाविरुद्धच आमची तक्रार असल्यामुळें प. बा. समाजसुधारकाग्रणी जोतीबा फुल्यांचा पुतळा मुन्सिपालटीनें उभारावा कीं नाहीं, या प्रश्नाचे उत्तरच शिल्लक उरत नाहीं. परंतु या पुतळ्याच्या ठरावाला हाणून पाडण्यासाठीं मुन्सिपालटींतील कोब्रा सांप्रदायिकांनीं आपल्या नीच मनोवृत्तीचें जें प्रदर्शन केलें, तें कितीहि चिळस आणणारें असलें तरी बरेंच विचार करण्यासारखें आहे. जनमताला धाब्यावर बसवून आणि करदारांच्या प्रातिनिधित्वाचा गैरफायदा घेऊन टिळकांचा उभारलेला पुतळा, हेंच वास्तवीक मोठें पाप झालें. हें पाप झालें नसतें तर जोतीबाच्या पुतळ्याचे माप

मुन्सिपालटीच्या पदरांत घालायला केशवराव जेधे अखिल ब्राम्हणेतरांतर्फे स्वयंस्फूर्तीनें कधींच उंठले नसते, हें उघड आहे. आरंभी प्रश्न अगदी सरळ होता. ब्राह्मणांनीं आपल्या खुषीसाठीं टिळकांच्या पुतळ्याचा सौदा केला, आतां ब्राम्हणेतरांच्या खुषीसाठी फुल्याचा पुतळा बुधवारांत उभारा. वाटेल ती उलटी सुटी कारस्थानें करून टिळकांचा पुतळा जर म्यु. ला उभारतां येतो, त्या वेळीं या दारिद्र्यरत म्यु. ला पैशाची दरकार वाटत नाहीं, तर फुल्यांच्या पुतळ्याच्या वेळींच उलटी सुलटी कोब्राशाहीं कां? फुल्यांच्या पुतळ्याचा प्रश्न ज्या रीतीनें ज्या सवयीवर आणि ज्या मार्गानि कोब्रांनी लाथाडून लावला, ती सबब, ती रीत व तो मार्ग कोब्रांच्या परंपरेला कितीहि धरून असला, तरी तो अत्यंत असभ्य, निंद्य आणि अत्यंत कुबुद्धीचा असेंच म्हणणें भाग पडतें. टिळकपुतळ्याची घोडचूक कबूल करून, म्यु. च्या दारिद्र्याच्या सबबीवर सामोपचारानें व सीयपणानेंहि हा ठराव फाईल करता आला असता. पण असें कांहींच न करतां, पोलीस पार्ट्या काय बोलावल्या, पासांचे फार्स काय केले, बंडांच्या अफवा काय उठवल्या, बिनबुडाचे ब्राम्हणेतर काय फितवले, फुल्यांची निंछदा काय वदवली, जेध्यांच्या भाषणांत अडथळे काय आणले, ते निघून गेल्यावर निंछदाव्यंजक ठराव काय पास केला, काय ही सारी शहाणपणाची मुत्सद्देगिरीची लक्षणें? म्यु. सारख्या स्थानिक स्वराज्याच्या कारभारांत जर इतका क्षुद्र पोरकटपणा व कडवी कोब्राशाही, तर निर्भेळ स्वराज्य म्हणजे पेशवाईची पुनर्घटना म्हटलें तर जिवंतपणींच जीव ओंकारेश्वरावर कां जातात? ठरावाच्या पास नापास होण्याशीं आम्हांला कांही कर्तव्य नाहीं. परंतु तो नापास करण्यासाठी कोब्राकंपूनें पुण्यांत माजविलेला फितवेगिरीचा शेणसडा अत्यंत धि:कारार्ह आहे. त्यामुळें कोब्रा हृदयाचें काळें अंतरंग पुन्हा एकवार जगाला दिसलें. कोब्रा कोणतीहि गोष्ट स्वत: करीत नाहीं. परस्पर पावणे तेरा ही त्याची सनातन पॉलिसी. त्याप्रमाणें जेध्यांच्या ठरावाला हाणून पाडायला व फुल्यांची निंदा मनसोक्त करायला त्यांच्याच जातभाईंपैकीं कांही 'मांजराच्या डावल्या' त्यांनीं पुढें आणल्या. मुन्सिपालटींत ब्राम्हणेतरांची बहुसंख्या असतांना ठराव कां हो नापास होतो? म्हणून पृच्छा करणारांपैकीं बरेच अजागळ व पुष्कळ लुच्च असतात. लुच्चांना खरी मख्खी माहीत असतें. आजपर्यंत कोणत्या लहान मोठ्या पापांत कोब्रांनीं प्रत्यक्ष भाग घेतला आहे? हंडी आपण शिजवायची, पण फोड वावयाची मात्र भलत्याकडून. आपण स्वच्छ नामानिराळे शपथेला मोकळे. जोतिबा फुल्यांची निंदा तर करायचीच पण त्या महात्म्याला टारगट ठरवायला त्याचाच अस्सल टारगट वंशज 'बनवून' पुढें ढकलायचा. कायस्थाचा खून कायस्थाकडून मराठ्याची नाकठेची म राठ्याकडून, माळ्याची विटंबना माळ्याच कडून, आपण नुसते पडद्यामागें टाम्टीम (प्रॉम्पटिंग) करीत गप्प बसून मौज पहावयाची. फुटलीं टाळकी तर परस्परा ब्राम्हणेतर घेतील बघून एकमेकांना. ब्रह्मवांत्युत्पन्नांना त्याचें काय? 'हिंदु समाजा ग्रासुनि वरती शतांगुले ते उरले' च आहेत. पण कोब्राचें हें 'कोब्रा पॉलिश' आपल्या तोंडाला लावून घेण्याइतके आत्मद्रोही प्राणी ब्राम्हणेतरांत जोंपर्यंत निपजत आहेत, तोंपर्यंत कोब्राची फडा केव्हांहि शिरजोरच राहणार.

टिळक आणि फुले

परिस्थिति ही एक मोठी चमत्कारीक घटनाच म्हटली तरी चालेल, ही घटना नसती तर जगद्रंगभूमी वरील नटांच्या भूमिका आपल्याला दिसतात तशा खुलून दिसल्याच नसत्या. परिस्थिती कोण नराला कसा विनाकारण नारायणे बनवील; आणि कोणा नारायणाचा नाऱ्या बनवील त्याचा नेम नाहीं. कर्मयोग दैवयोगाचे वाद कितीहि चालले, तरी परिस्थिति अशी कांही विलक्षण चेटकी आहे कीं ती

सतीच्या घराला बत्ती लाऊन वेश्येच्या दारीं हत्ती झुलविते. पुष्कळ वेळां परिस्थितीच अपयशाला दिव्य यशाचा मुखवटा चढविते, तर अनेक प्रसंगीं निष्कलंक यशालाच काळें फासून साऱ्या जगभर त्याची धिं:का काढते. निस्सीम प्रयत्नवाद्यांच्या प्रयत्नांना कधीं ती निराशेशिवाय दुसरें फल देत नाहीं, तर प्रयत्नाला नुसता स्पर्श केला असेल नसेल अशा उनाट माणसाच्या गळ्यांत कल्पनातीत विजयाचे हार खच्चून घालते. एखाद्या महापंडिताला ती सुक्या भाकरीच्या तुकड्याला महाग करते; तर केवळ 'हरि कवि' असे शब्द जिभेवर नाचले असतील नसतील अशा माणसाला त्रिखंडपंडीत म्हणून चव्हाट्या चव्हाट्यावर मिरवतें. साऱ्या जगांतल्या अरेराव नृपतीचे सुकूट भराभर वितळऊन टाकणांरा सवाई शिकंदर नेपोलियन वॉटर्लूच्या क्षुल्लक पराभवामुळें कायमचा क्षुद्र ठरतो आणि हरणा भेकरांच्या शिकारीशिवाय हाता बंदुकीचा योग क्वचितच अनुभवणारा सातवा एडवर्ड 'पीसमेकर' (शांतिसम्राट) म्हणून जगप्रसिद्ध होतो. ही घटना कोणाची? परिस्थितीची. ही चवंडाळ भवानी कोणाला कसा राव रंक बनवील, तें सांगतां पुरवत नाहीं.

परिस्थितीनें एखाद्या नाऱ्याचा नारायण केला आणि नारायणाच्या चारित्र्याचा नारळ केला, तर विचारी दोघांची वास्तविक किंमत ठरवितांना त्यांच्या चारित्र्याची व ध्येयाचीच सूक्ष्म तपासणी करतात. ध्येय जर उच्च असेल, विचारांचा प्रवाह सर्वस्पर्शीं असेल आणि हृदयाची तळमळ कमाल शुद्ध असेल, तर त्या माणसाचा देह आमरण फाटक्या चिध्यांतच वावरला असला, त्याच्या कार्यानीं त्याच्या झोंपडीचा उंबरठाहि पाहिला नसला, आणि शिकस्तीनें उभे केलेले त्याच्या कार्याचें डोल्हारे उभारता क्षणींच कोसळले असले, तरी विचारवंत असेंच म्हणतील कीं, 'थोर माणूस तो हाच.' परिस्थितीनें त्याला लाथाडलें, तरी त्याच्या ध्येयानें त्याला अमर केलें. अपयश आलें. जनांच्या डोळ्यांत कार्य भरलें नाहीं. परिस्थितीच्या चिथावणीनें लोकांनीं त्याचा उपहास केला. मित्रांनीं शत्रूवत् छळलें आणि अखेर तो जीव कोणाचाहि बरा शब्दं न घेतां मेला; कांहीं हरकत नाहीं. जीव मेला पण जीवाचें कार्य मरणार नाहीं. छळ झाला, देहाचा छळ झाला, विचारांची धडाडी छळाला जुमानीत नाहीं. मनुष्य गेला, त्याच्या कार्याचा आत्मा जो विचार तो मरत नाहीं. विचारावरूनच माणसाच्या थोर नीच पणाबद्दल जग अखेर न्याय देत असते. या न्यायापुढें परिस्थितीचा तात्कालीक रंगढंग तेव्हांच फिका पडतो आणि इतिहास खऱ्या खोट्याची नोंद आपल्या पानांत चिरंजीव राखतो.

ज्याला नावलौकीक मिळवायचा असतो, लोकमान्यता टिकवायची असते, तो लोकांच्या पावलानें, लोकांच्या मलानें चालत असतो. जसा वारा वाहील तशी आपलीं शिडें फडफडवीत असतो. लोकांना खुष ठेऊन आपली मान्यता त्याला राखावी लागते. लोकांना जें रुचेल व पचेल तेवढेंच तो बोलतो व करतो. टिळक या कोटींतले होते. ही कोंटी उच्च नव्हे. अगदी सामान्य परंतु धोरणी माणसे या मार्गानें सवंग लोकप्रियता तेव्हांच मिळवितात.

खरा सुधारक हा जवळ जवळ बंडखोरच म्हटला तरी चालेल. त्याचे बंड रूढीच्या विरुद्ध असते. त्याचा मारा प्रचलीत लोककल्पनांवरच असल्यामुळें लोकमान्यतेचा तो प्रथम संन्यास करून, कडव्या निश्चयानें कार्यक्षेत्रांत उडी घेतो. अर्थात् लोकांना तो अप्रिय असतो. त्याचें सत्यशोधन लोकांच्या अनादरास पात्र होतें. त्याला कर्तव्याची चाड असते, लोकजागृतीची तळमळ असते. सत्यावर त्याचा अढळ विश्वास असतो; पण तो कोणाच्या अभिप्रायाची पर्वा बाळगीत नाहीं.

त्यामुळें ज्यांच्या कल्याणाविषयीं तो झगडत असतो, तेच त्याला अतोनात विरोध करतात, त्याचा छळ करतात; वेळीं त्याचा प्राणहि घेतात. जोंतिराव फुले या उच्च समाजसुधारक कोटींतले महात्मा होते. ते टिळकांप्रमाणें बीए एलेल्बी नसले, तरी हिंदु समाज व धर्मसुधारणेंत त्यांनीं टिळकांपेक्षां कितीतरी पट श्रेष्ठ कामगिरी केलेली आहे. ते लोकमान्य झाले नाहींत, हीच त्यांच्या श्रेष्ठ कर्तव्याची साक्ष आहे. लोकमान्य होणें सोपें; पण जोतीरावचें एकादें मत नुसतें प्रतिपादन करणें फार कठीण. लोकमताला वळण देण्याचें काम लोकमान्यतेच्या भरी पडणाऱ्यांच्या हातून जगांत आजपर्यंत घडलेलें नाहीं आणि हें काम करणारे लोकहितवादी, भागवत् आगरकर, कर्वे, शिंदे, शाहूछत्रपति, वगैरे सुधारक लोकक्षोभाला बळी पडल्यावाचून राहिले नाहींत. टिळकांनीं भिक्षुकशाहीला चुचकारून चुचकारून आपली स्वत:ची व स्वपक्षियांची प्रतिष्ठा अतोनात वाढवून सवंग लोकप्रियतेचा मोक्ष मिळविला. त्यानी इतर सामान्य अप्रबुद्ध माणसाप्रमाणेंच आगरकर लोकहितवादी स्वामी दयानंदादि समाज व धर्मसुधारकांची मनमुराद निंदा करून लोकांची खुषी संपादन केली. जोतीराव बोलून चालून कडवा सुधारक. त्याला कसली लोकमान्यता? आणि त्याचा अस्तित्वाची तरी कोण दाद घेतो? आपला आजा कोण होता हें नातवाला सुद्धां भाडोत्री भटांजवळून शिकण्याचा प्रसंग, तेथें लोकमान्यतेच्या चौघड्यापुढें बिचाऱ्या फुले सुधारकाच्या चरित्राची टिमकी लोकांना काय माहीत असणार? सारांश, जोतीराव तोडू पहात असलेले गुलामगिरीचे पाश टिळकांनीं मुद्दाम घट्ट आवळले, एवढाच काय तो दोघांत फरक एरवी दोघेही मोठेंच.

तारखांचें ऐतिहासिक महत्व

गेल्या गणेशोत्सवांत कोब्रांच्या उघड गुप्त फूत्कारावरून पुण्यांत जी पोलीशी हडेलहापी झाली, त्यांतल्या कांहीं तारखा वाचकांनीं मनन करण्यासारख्या आहेत. कोब्रा एरवीं कितीहि देशभक्तीच्या स्वार्थत्यागाच्या आणि लोककल्याणाच्या गप्पा बरळला, तरी त्याच्या स्वार्थाला जरा का कोठें चिमटा बसण्याची वेळ आली कीं तो चामडी बचवायला वाटेल त्याच्या पायीं लोळण घेईल, वाटेल त्याच्या दाढीला हात लावील, काय वाटेल तें करील. करू नये करील, पण वेळ मारून नेईल. सरकारचें आणि कोब्राचें सूत किती 'खानदानी खादी' चें आहे, हें आतां कांहीं नव्यानें सांगायला नको. पण छत्रपति मेळा व त्याच्या पाठीशीं असलेला ब्राम्हणेतर बहुजनसमाज यांची खोड मोडायला यंदा कोब्रा सरकारी पायपोसांत घुसला आणि गेल्या गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत साऱ्या पुण्यांत पोलीसोत्सव साजरा केला. ३१ ऑगष्ट, १ सपटंबर व ४ सपटंबर या तीन तारखा महाराष्ट्राच्या स्वराज्यविषयक जीवनक्रांतींत अत्यंत महत्वाच्या आहेत. ३१ ऑगष्ट १८३९ रोजीं पुण्यांत पोलीसांची व लष्कराची अशीच एकदम उठावणी झाली. १ सपटंबर रोजीं १११ ग्रेनेडियरची २५ वी फलटण साऱ्या पुण्याला आपला हडेलहप्पी दरारा दाखवून साताऱ्याकडे 'क्विक् मार्च' करीत गेली. ४ सपटंबरला दुपारीं २ वाजतां साताऱ्यास आली, सायंकाळीं ७ वाजतां राजवाड्याला वेढा दिला आणि रात्रौ १२ वाजतां छत्रपति प्रतापसिंहाला गाढ झोपेंतून उठवून कैद व हद्दपार केलें.* बरोबर ८६ वर्षांनीं यंदा पुण्यास तसंलाच प्रकार घडला. ३१ ऑगष्ट १९२५ रोजीं. 'छत्रपति मेळा निघणार' म्हणून पोलीस पाट्यांची केवढी धामधूम. १

* हा सर्व इतिहास आमच्या 'हिंदवी स्वराज्याचा खून' या पुस्तकांत वाचा. किंमत २ आणें.

सपटंबर रोजीं गणपति-विसर्जन. त्या दिवशींची कडेकोट जय्यत तयारी काय विचारतां? जिकडे पहावें तिकडे हत्यारबंद पोलीसच पोलीस. ४ सपटंबर रोजीं पुण्याच्या मुन्सिपालटीनें पुतळाप्रकरणांत आपल्या कोब्राशाहीची गाजविलेली कत्तलची रात्र. १८३९ सालाप्रमाणेंच १९२५ सालींहि कोब्रांचीच कारवाई, तेव्हां ही किती मननीय इतिहासाची चिंतनीय पुनरावृत्ति बरें?

छत्रपति मेळ्याची कामगिरी

गणपति मेळ्यांच्या खुळाला कोब्रांनीं इतकें चिळस आणणारें रूप दिलें कीं मेळ्यांचा धिंगाणा म्हणजे दुसरा शिमगाच बनला. या शिमग्यांत गणपति देवाचें नुसतें नांव आणि टिळक देवाचें गांव, हा प्रकार असला, तरी सुधारक, मवाळपक्ष, सरकार, गांधी, ब्राह्मणेतर यांच्या बेचाळीस पूर्वजांचा उद्धार पद्यांतून करण्यांत येत असे. विशेष टाळ्यांच्या कडकडाटाची गोष्ट म्हटली म्हणजे शिक्षित प्रागतिक स्त्रियांची बीभत्स निंदा ही होय. हे सर्व प्रकार टिळकांच्या मृत्यूनंतरच बोकाळले असें नव्हे, तर खुद्द त्यांच्या नाकासमोर बिनबोभाटीं मोठ्या अहमहमिकेनें चालूं असत. या कोब्राशाहीला प्रतिबंध करण्याच्या कामीं वर्तमानपत्री लेख व 'शांत सभ्य विद्वत्ताप्रचुर थंडगार विवेकी ब्राम्हणी' भाषेंत सजविलेले शाब्दिक निषेध नंपूसक ठरले. सभ्यपणाचे कांदे सोलणारा एकहि ब्राम्हणवीर या मेळाशिमग्याला बंद पाडायला पुढें सरसावला नाहीं. साऱ्या देशाच्या शांतीची जबाबदारी घेतलेल्या सरकारनेंहि या बीभत्स, पद्यगायनाकडे ढुंकून पाहिलें नाहीं. यावरून ब्राम्हणाचा प्रत्येक शब्द व कृति वेदमान्य व अपौरुषेय आहे, अशी सरकारचीहि खास समजूत असावी, असें वाटतें. बेताल भडकलेल्या या भटी वेताळाला ताळ्यावर आणण्याचें काम अखेर ब्राम्हणेतरांना छत्रपति मेळा काढून करावें लागलें. जोंपर्यंत 'अरे'ला 'कारे' ची उलट सलामी नव्हती, तोंपर्यंत कोब्राशाही बेनुमान होती. पण छत्रपति मेळ्यानें भिक्षुकी कारस्थानांच्या सुळालाच हात घालतांच कोब्रा पिसाळला आणि शाब्दिक वाक्प्रहाराला प्रत्यक्ष दंडुक्याची दटावणी दिसूं लागतांच माबाप सरकारशीं या मेळ्याविरुद्ध खलबत्ते घोटूं लागला. जीं पापें आपण गेलीं २० वर्षे स्वत: केलीं तींच छत्रपति मेळ्यावर लादण्याची कारवाई पुण्याच्या गटारयत्नानें व कोंब्रापत्रांनीं केली. छत्रपति मेळ्याचा पद्यसंग्रह आतां प्रसिद्ध झांला आहे. तो पहा. आणि सन्मित्र समाजाचा पद्य संग्रह पहा. म्हणजे भल्या बुऱ्याचा निकाल तेव्हांच लागेल. 'आचकट बिचकट' पणा, बायकांची छिनाल नालिस्ती वगैरे दोषारोप छत्रपति मेळ्यावर करणाऱ्यांनीं गटारयंत्राचें गटार उपासण्यापेक्षां प्रत्यक्ष तुलनेचा अनुभव घ्यावा. म्हणे या मेळ्याच्या पत्रांत 'ब्राम्हणांची निंदा' आहे ! जणूं काय 'ब्राम्हणां' नीं आजपर्यंत कोणाची टवाळी कुचाळी निंदा कधिं केलीच नाहीं. अगदी रवळींतले धुतलेले तांदूळ ! ज्या शहाण्यांना बायकांचा कुचाळी गेली २० वर्षे बिनबोभाट पचते, त्यांनींच ब्राह्मणांच्या निंदेचे एवढें स्तोम माजवावें, या पाजीपणालाच भिक्षुकशाही म्हणतात. बोल बोलतां वाटलें सोपें फळें भोगतां कां छाती कांपें? ब्राह्मण स्वत:ला व्यासाचे किंवा ब्रम्हदेवाचे बाप समजत असले, तरी अखिल ब्राम्हणेतर दुनिया त्यांना कोण समजते, एवढेंच छत्रपति मेळ्यानें आपल्या पद्यांत दाखविलें आहे. माकडाला माकड म्हणूं नये तर काय त्याला माणुसकीचें सर्टिफिकीट द्यायचें? इतिहास व अनुभव यांत प्रत्यक्ष पुरावा न सांपडणारें एकहि विधान छत्रपति मेळ्यानें केलेलें नाहीं, एवढें सांगितलें म्हणजे पुरें.

भट का ब्राम्हण ?

पुतळा-प्रकरणीं वादविवादांत पुणे म्यु. चे अध्यक्ष यांनीं जेधे यांच्या 'भट' शब्दाला आक्षेप घेतल्याचें प्रसिद्ध झालें आहे. शिव्यांच्या यादींत 'भट शब्द कधिं घुसला कोण जाणें. भट म्हटल्यानें राग येतो

चित्पावन म्हटलें तरी अपमान होतो. भिक्षुक म्हटले तरीहि क्रोधाचा भडका होतो. कोब्रा म्हणावें तरीहि आतां पंचाईत. बरें, असल्या विलक्षण समजुतीच्या समाजाला ब्राम्हण तरी कसें म्हणावें? कोब्रांना ब्राम्हण म्हणायचे तर कोल्ह्याला तरी ब्रम्हदेव कां म्हणूं नये कोणत्या कोब्राचें वर्तन ब्राम्हण शब्दाची अब्रू उजळ करण्यासारखें आहे? कोब्रा म्हणजे ब्राम्हण उपाधीच काळाकुट्ट कलंक आहे. त्याला भट किंवा भिक्षुक म्हटलें पाहिजे. भट ही कांहीं शिवी नव्हे ! प्रभू हा शब्द उच्चारण्याइतकी भटांची जीभ खास बोजड नाहीं. प्रशब्दाचा एखाद्या अशिक्षितानें परभू असा उच्चार केला किंवा एखाद्या अनभिज्ञ ग्रँट डफनें परव्हो असा केला तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. पण एरवी व्यवहारांत लेखांत व विशेषत: शालोपयोगी पुस्तकसुद्धां परभू शब्द वापरण्याची भटांची खोड अझून कां सुटत नाहीं. मराठ्यांना कुणबट म्हणणारे भटच हजारों आहेत. कोंकणांत तर सर्रास भट मराठ्यांना शूद्र असें उघड म्हणतात. पण त्या भटांचीं अझून कोणी कानउघडणी केल्याचें ऐकिवांत नाहीं. एथॉसाहेबांचा Castes & Tribes in India ग्रंथ मुंबईंच्या सरकारी सेंट्रल प्रेसांत छापला * असतां, यांतील Prabhu प्रकरणांत साहेबांकडून फायनल प्रुफ गेल्यावरहि एका भटी पुफरीडरानें त्यांत A अक्षर ढकलून Parabhu करायला सोडलें नव्हतें. पुढें ही भटी घालमेल एन्थॉबेन साहेबांना कळतांच त्यांनीं त्या A ची व भटाची योग्य ती व्यवस्था लावली, हें सांगणें नको. प्रभूंना प्रभू म्हटलें काय, परभू म्हटलें काय किंवा परव्हो म्हटले काय, त्यामुळें रागावण्यासारखें काय आहे? असा परोपदेशे पांडित्याचा आंब आणणाऱ्या कोब्रांना भट म्हटलें तर राग कां यावा हें समजत नाहीं. मुंबईस सर्व कचेऱ्यांतून चहा, शेव, कचोऱ्या व पाणी देण्यासाठीं नेमलेल्या ब्राम्हणाला 'भट'च म्हणतात. पण 'भट' म्हटलें तर त्याचा अपमान होत नाहीं. मग या पुणेरी भटांनाच चीड यावी? आमची सर्व कोब्रांना सूचना आहे कीं ज्या गोष्टी आज तुम्हाला मोठ्या आचक्या दचक्याच्या वाटतात, त्या तुमच्याच दुष्कर्माची फळें आहेत. केल्या कर्माचीं फळें भोगल्या शिवाय सुटकेचा मार्गच नाहीं. भट हे खट असले, तरी त्यांना अझून भटच म्हणतात, हा भटेतरांच्या मनाचा मोठेपणा नव्हे काय? हांसत कर्महि केलें भोगा तें रडत चिडत परिणामीं.

तत्वभ्रष्टांची धर्मनिष्ठा

व्यक्तिस्वातंत्र्याचा व मतस्वातंत्र्याचा परीघ कितीहि मोठा असला आणि त्यांत आवडीनिवडीचा कितीही समावेश होत असला, तरी सामुदायिक हितवादाच्या क्षेत्रांत निश्चित तत्वांचा मान राखल्याशिवाय कोणाही सुधारकाची सुधारणांप्रियता अभिनंदनीय ठरत नाहीं. आज प. वा. राजर्षि शाहू छत्रपति यांच्या धार्मिक स्वयंनिर्णयाचा संदेश ब्राम्हणेतरांत व विशेषत: मराठा समाजांत बराच प्रसृत झालेला आहे. देव आणि मानव यांतल्या दलालांची हकालपट्टी करण्यांत सत्यशोधक सांप्रदायिकांपेक्षांही क्षत्रिय-मराठा समाजानें बरीच आघाडी मारलेली आहे, हें आतां कोणाला नव्यानें सांगायला नको. धर्मक्षेत्रांतून भिक्षुकांची हकालपट्टी म्हणजे ब्राम्हण समाजाच्या उदंरभरणावर उतलेला बिब्बाच असल्यामुळें क्षत्रिय मराठ्यांचा हा धार्मिक स्वयंनिर्णय भिक्षुकांच्या कपाळाची तिडीक उठवूं लागला, तर त्यांत अस्वाभाविक कांहीं नाहीं. परंतु राजर्षीचे अनुयायी म्हणून मिरविणाऱ्या व वेळीं अवेळीं बहुजनसमाजापुढें पुढारी म्हणून नाचणाऱ्या लोकांकडूनच जेव्हां तत्वनिष्ठेचे खून पडतात, जेव्हां त्यांची वाणी त्यांच्या करणीशी व्यभिचारानें वागते, तेव्हां अशा क्रियानष्ट व तत्वभ्रष्ट पुढाऱ्यांना ठिकच्या ठिकाणीं जनसेवेच्या क्षेत्रांतून खड्याप्रमाणें निवडून

* उपलब्ध झालेल्या अंकात हा शब्द दिसत नाही.

काढणेंच श्रेयरकर आहे. हे विचार सुचण्याचें कारण गेल्या श्रावणी पौर्णिमेला सातारचे लोक विश्रुत सत्यशोधकाभिमानी ब्राम्हणेतर पुढारी रा. सा. आढाव यांच्या घरीं भिक्षुकांच्या हातलावणीनें पावन झालेला श्रावणी समारंभ होय. या श्रावणींत रा. आढवांच्या पाटाला पाट भिडवून रा. दुधुरकर मामलेदार, कदम पेन्शनर मामलेदार, अमेरिकेची वारी करून आलेले डे. ए. इन्स्पेक्टर श्री. तावडे, श्री. नलावडे वकील, रा. सावंत हुजुर डेप्युटी कलेक्टर इत्यादि मोठमोठ्या क्षत्रियवीरांनीं भिक्षुकी मंत्रानें गोमुत्र गोमयाचा प्रसाद सेवन केला. हा पापविमोचनाचा वार्षिक धर्मविधी यथासांग चालविण्याचें कर्म दत्तोपंत अवचट नांवाच्या एका ब्राम्हणानें केले धंद्यावर बराच पैसा यांनीं मिळविला आहे. साताऱ्यांत कासार मंडळीचें सावकार म्हणून हे सर्वश्रुत आहेत. आणि भिक्षुकीच्या घसरत्या धंद्याला पाठबळ म्हणून वेशासं अवचटांनीं हल्लीं कासारी भांडी विकण्याचें एक लोकमान्य दुकान चालविलें आहे. असला सर्वगुणसंपन्न ब्राम्हण धर्मवीर आढाव दुधुस्करासारख्या क्षेत्रीय कर्मवीरांना लाभल्यावर हा श्रावणीविधी गोमुत्राइतकाच चटकदार व रुचकर कां होऊं नये? श्री. राणे वकील यांनीं या बाबतींत आढावप्रभृति भटांच्या गुलामांची बरीच कानउघाडणी केली असें ऐकतों. त्याप्रमाणेंच या धर्मनिष्ट पुढाऱ्यांच्या तत्वभ्रष्टतेचा निषेध करणारी अनेक पत्रें राष्ट्रवीर, विजयी मराठी, विश्वबंधु व सत्यप्रकाश या पत्रांकडे गेली असूनही, या गोष्टीची परिस्फुटता करायला एकाचीही न्यायबुद्धि व तत्वनिष्ठा आपल्या ब्रीदाला जागली नाहीं असें स्पष्ट दिसतें.

श्रावणी करावी किंवा करूं नये, केल्यास शेण खाणें तें ब्राह्मणी मंत्रानें खावें किंवा न खावें, हा वादाचा मुद्दा नव्हे. एखाद्या अजाण मनुष्यानें आढावी अडाणीपणा केला तर तो कोणी लक्षांतही घेतला नसता आणि घेतही नाहींत. पण आढाव प्रवृत्ति लोक म्हणजे कोणी आडूमाडू नव्हत. जात्या ते तसें असले, तरी पुढारपणाचा शेंदूर तोंडाला फासून ज्या अर्थी ते बहुजनसमाजांत मिरवत असतात त्या अर्थी स्वत:ला अब्रूची चाड नसली, तत्वनिष्ठा हिणकस असली, तरी त्या शेंदूराच्या अब्रूसाठीं तरी या लोकांनीं असला नंगा नाच घालावयास नको होता. जोपर्यंत या पुढाऱ्यांचे खावयाचे व दाखवावयाचे दांत निरनिराळे आहेत तोंपर्यंत असल्या तत्वभ्रष्टांना ब्राम्हणेतरांनीं व सत्यशोधकांनीं आपल्या चळवळींच्या क्षेत्रांत कोणती जागा द्यावयाची हे आतांच ठरविलेले बरे.

प्रस्तुत प्रकरणीं एका वृद्ध व सन्माननीय क्षेत्रीय मराठा बंधूच्या पत्रांतून आलेले माननीय उद्गार येथें देत आहोंत. यापेक्षां या चिळस आणणाऱ्या तत्वभ्रष्टतेवर अधिक लिहिण्याची आमची इच्छा नाहीं.

''परवां साताऱ्यास 'महाराष्ट्र प्रांतिक परिषद' झाली. त्या सभेचें अध्यक्ष श्रीमंत रामराव देशमुख बॅरिस्टर हे होते. त्या रामराव देशमुखांचा वाड्यापुढील पटांगणांत निषेध करणारी सभा भरवून या ब्राम्हणेतर पुढाऱ्यांनीं केवढा दंगा केला? ते जसे ब्राम्हणकच्छपी आहेत तसे हेही लोक ब्राम्हण-कच्छपी आहेत. व यांतील बरेच लोक या सभेस हजर होते. मग आतां तशाच तऱ्हेची निषेधाची सभा या कार्याबद्दल कां भरविण्यांत येऊं नये? आपण आपल्या बोलण्या चालण्यामध्यें मेळ ठेवावयाचा नाहीं. आपण कांहींहि केलेले चालते, कांहींहीं बोललेले चालतें. आपल्या समाजांतील लोक मूर्ख आहेत, आपण मोठे ते मोठेच राहणारे लोक आहोत. अशीच ना यांची समजूत आहे? अशी जर समजूत नसती तर पाहाणाऱ्या मंडळीनीं म्हणजे मि. राणे वकील वगैरे मंडळींनीं यांचा जाहीर निषेध व्यक्त करावयांस हवा होता. हे पुढारी म्हणविणारे लोक आतां दुसऱ्यांना जुमानिनासे झाले आहेत.''

□□□

लेख

ब्राम्हण्याभिमान्यांनो! इस्लामी बडग्याचा विचार करा

गेल्या गणेशोत्सवापासून वऱ्हाडांत हिंदुमुसलमानांचा तंटा बराच धुमसत होता. अकोल्यास तर हिंदूंचे गणपति विसर्जनाची वाट पाहात घरोंघर स्वस्थ बसले आहेत. इतक्यांत या धुमसणाऱ्या ज्यालामुखीला आर्वी मुक्कामीं तोंड फुटून हिंदु-गुसलमानांत रक्तपात झाला. सरकारी अधिकाऱ्यांना तारा, मध्यस्थ पुढान्यांना तारा, त्यांचें उलटजबाबी आशीर्वाद, 'प्रचंड' सभा, निषेधाचे ठराव आणि अखेर हजार रोगांवर एक दवा या न्यायाचा सत्याग्रह, इत्यादि ठरावीक हिंदु उपचारांत हिंदु गर्क आहेत. सरकारी अधिकारी 'शांतता प्रस्थापित करीत आहेत. त्यांचे काम तेवढेंच! मुसलमानांना जें वाटेल ते ते करीत आहेत. या प्रकरणाचा निकाल कसा लागणार तें दिसतच आहे. हिंदु संघ न शुद्धीवर दांत ओंठ खाऊन चरफडणारे हसन निझामी आज निझाम सरकारच्या आश्रयाला जाऊन बसले आहेत. वऱ्हाडांत पेटलेला हा वणवा जागच्या जागीं विझेलसे वाटत नाही. हिंदूंकडे पहावे तर आज बैल गेल्यावर ते झोपा शोधीत आहेत व तहान लागल्यावर विहीर खणीत आहेत. हिंदूंना पूर्ण पादाक्रांत करायला धूर्त इस्लामियांना आजच्या सारखी संधी पुढे केव्हांहि मिळणार नाही. हिंदुलोक संघटनेच्या कितीहि वल्गना करीत असले, तरी ते अत्यंत विस्कळीत स्थितीत आहेत. जातीभेदाने सडलेला हा समाज उध्वस्त व्हायला केवळ एकच जबरदस्त इस्लामी धढकी पुरें आहे. ब्राम्हण लोक तर काय आज वर्णश्रेष्ठत्वाच्या वावडीवर स्वर्गापासून चार बोटावर उडत आहेत. त्यांना आज इस्लामियांची दरकार नाही. त्यांना ब्राह्मणेतरांना आज चेचावयाचें आहे. त्यांना मराठ्यांच्या घरादारांवर गाढवाचे नांगर फिरवून ब्राम्हण्य संरक्षण करावयाने आहे. कायस्थ प्रभूंना स्वराज्यविध्वंसक व स्वधर्म घातकी ठरवून त्यांना आपली प्रतिष्ठा वाढवायची आहे. ब्राम्हण मुसलमानांना भीत नाहीत. कडवा इस्लामी इंगा फिरलाच तर ते इंग्रज सरकारच्या मागें लपून केवळ वैदिक शापाच्या फुत्कारासरसे मुसलमान दंगेखोरांच्या ठिकच्या ठिकाणी लोथी पाडतील. ब्राम्हण्यसंरक्षणार्थ वेळ पडली तर ते मुसलमानांशी वाटेल त्या अटींचा तह करतील, मुसलमान होतील किंवा मुसलमानांना बाम्हण करतील; पण या मरगठ्यांना आणि त्यांच्या चवळीशी सहानभूती दाखविणाऱ्या सुधारकांना आणि ब्राम्हणेतरांना ते बलीप्रमाणे पाताळांत चिरड़न गाडून दकतील. सनातन वैदिक धर्मोक्त वर्णश्रेष्ठत्वावर आणि भागवत

धर्मोक्त टाळचिपळ्यावर इस्लामी चांदताऱ्याची झांप झपकन अवचित येऊन पडलीच, तर ब्राम्हण्य-संरक्षक सर्व परिषदांचे सर्व ठराव प्रत्येक ब्राम्हणबच्चा व त्याचा ब्राम्हणेतर बगलबच्चा घडघड पाठ म्हणून त्या झोपेची झेंप वरच्यावर उधळून लावील. पण मराठ्यांशी व त्राम्हणेतरांशीं तो कधी नमते घेणार नाहीं. सारे, ब्राम्हणेतर क्रिस्ती किंवा मुसलमान किंवा अस्पृश्य झाले, अगर ठार मेले तर त्याची ब्राम्हणांना पर्वा नाहीं. त्यांचे ब्राम्हण्य जिवंत राहील तर ते नाकाच्या एकाच शिंकरीत प्रतिसृष्टी निर्माण करतील. ब्राम्हण्य जिवंत ठेवण्यासाठी, ब्राम्हणांचे सार्वक्षेत्रीय वर्चस्व टिकविण्यासाठी साऱ्या ब्राम्हणेतर दुनियेची राखरांगोळी झाली, तरी ब्राम्हणांचे हृदय लवमात्र कंपित होणार नाहीं. इस्लामी इंगा फिरतांना दंगेखोरांनी अत्याचाराचा नांगर ब्राम्हणांच्या देव घरापर्यंत किंवा स्वयंपाक घरापर्यंत जरी घुसडीत नेला तरी ब्राम्हण केवळ ब्राम्हण्यसंरक्षणासाठी त्याची दरकार करणार नाहीं. पण मेल्या गेल्या ब्राम्हणांबद्दल जर एखादा मराठा किंवा ब्राम्हणेतर जाणून नेणून तोंडांतून किंवा लेखणींतून ब्र काढील तर परशुरामांच्या इतिहासाची पुनरावृत्ति करण्यासाठीं कोणताहि ब्राम्हण अब्रूची पैशांची किंवा माणुसकीची राख करायला मागें-पुढें पहाणार नाहीं. मुसलमानांनी डोकी फोडली तर ब्राम्हण हूं का चूं करणार नाहीं. मुसलमानांनीं मशिदीपासून आगेंमागें ५० फुटावर टिपरींचा नाद मना केला तर ब्राम्हण एकहि वैदिक निषेधाची ऋचा न बरळता घरीं स्वस्थ बसेल. पण कवडी किमतीच्या ब्राह्मणेतर हिंदूनें वर्तमानपत्री बेजबाबदार शिमग्याची एकच फाक घातली तर त्याला सहकुटंब सहपरिवार फांसावर लटकविण्यासाठी सर्व ब्राम्हण्याभिमानी कावळ्याप्रमाणे भराभर एकवटतील. इस्लामी दंडूक्यापुढे ब्राम्हण आपल्या अब्रूला पूज्य किंमत देत असला, तरी ब्राम्हणेतरांची पाळेमुळे, खणण्याच्या महत्त्वाकांक्षेत त्याच्या अब्रूचे पूज्यत्व परमेश्वरापेक्षाहि विशेष किंमतीचें ठरत असतें. इस्लामी डुरकणीमुळे, विघ्ननाशक गणोबाची स्वारी घरांतल्या घरात सावडून ठेवण्याचा प्रसंग आला तरी वैदिक सनातन धर्माचें छप्पर केव्हाहिं कोसळत नाहीं. पण एकाद्या ब्राम्हणेतरानें हिंदू देवळातल्या देवावर स्वतः नुसता पाण्याचा शिंतोडा उडविला तर लगेच धर्माला आग लागून त्याचे कोळसे होतात; आणि हे कोळसे विझवण्यासाठी एकजात ब्राम्हण्याभिमानी प्रतिसृष्टीकर्ते त्या ब्राम्हणेतर हिंदूचें तळपट उडविण्यासाठीं सरकार दरबारीं आपल्या अकलेचे कोळशे करण्यास मुळींच शरमत नाहींत. किती तेजस्वी हें ब्राम्हण्य! केवढी ही आमच्या हिंदूंची एकी! काय आमच्या हिंदु धर्माची ही समानता! किती जाज्वल्य ही आमच्या परस्पर माणुसकीची भावना! असल्या अमानुष धर्माचे व राक्षसी समाजाचे अनुयायी व घटकावय म्हणवून घेण्यापेक्षां धर्मलंड पाखांडीपणाच अधिक श्रेयस्कर नव्हे काय? बाम्हण्याचा स्वार्थांध वेताळ माजलेल्या दांभिक धर्माच्या क्षेत्रांत मोक्ष मिळण्यापेक्षा त्या धर्माचा खून पाडून नरकांत गेलेलें काय वाईट? जो धर्म आचरल्यामुळें हिंदूंचा राजकीय सामाजिक धार्मिक नैतिक अध:पात एवढ्या अमानुष थराला गेला आहे कीं एकमेकांच्या माना कापतांना देवाची भीति मरो, पण माणुसकीचीहि चाड वाटेनाशी झाली आहे, ज्या धर्मानें आंजंचा हिंदू शेळपट व नपुंसक सत्याग्रही बनविला आहे आणि ज्या धर्माच्या जोरावर आज वाटेल तो भट आपल्या जन्माच्या पुण्याईने अखिल भटेतरांवर वर्चस्वाचा टेंभा मिरवितो, तो धर्म आमूलाग्र उखडल्याशिवाय, खऱ्या सनातन धर्माची प्राणप्रतिष्ठा होणेच शक्य नाहीं. हिंदूचे प्रचलित धर्मप्रेम म्हणजे प्राण निघून गेलेल्या मढ्याला मारलेल्या मिठ्या होत. ब्राम्हणांना या मढ्याचे मोठें प्रेम वाटत असेल तर तें त्यांच्या गळ्यांत वंशपरंपरा अडकवून अखिल ब्राम्हणेतरांनी खऱ्या

धर्माच्या जीर्णोद्धाराचा सवता सुभा उभारावा हेंच श्रेयस्कर आहे. ब्राम्हणांनो, स्वार्थांध होऊ नका. कृत कर्माचे नीट समालोचन करा. वर्तमान काळाचा संदेश नीट ऐका. भविष्याविषयीं फाजील बेपर्वाई दाखऊ नका. वऱ्हाडांत भडकलेला वणवा तेथेच विझत नाहीं. त्याचा भडका आतां महाराष्ट्राकडे लवकरच वळणार. खोट्या धर्माच्या धुंदीनें हिंदू समाजांत यादवी माजवाल तर धर्म आणि समाज दोनीहि गमावून वसाल. नीट विचार करा. ब्राम्हण-ब्राम्हणेतर भेदाचे वारें चहादार्णीतले वादळ आहे. त्या हंगामी वादळाचा बाऊ करून ब्राम्हणेतरांच्या उरल्या सुरल्या सहानुभूतीला पारखे व्हाल, तर याच देही याच डोळा इस्लामी दंडुक्याचा मोक्ष पहाल. हिंदू हिदुकरतां मेला नाहीं. तरी हिंदूचे प्रेत हिंदुच्याच खांद्यावर जाईल इतकें तरी हिंदुत्वाचें वारें तुमच्यांत शिल्लक राहो. म्हणजे मिळवली.

इस्लामी दंडुक्याचा एक विशेष

गुलबर्ग्याला उगम पाऊन आतां सर्वत्र पसरत असलेल्या इस्लामी वणव्याचा एक विशेष आढळून येतो, त्यांकडे आमच्या 'जवानमर्द ब्राह्मण भाई' चे लक्ष वेधणे अगत्य आहे. वरील स्फुट बन्हाडांत आर्वीचा दंगा झाल्यावर लिहिलें. तोंच ३०-१०-२५, च्या टाईम्सने सोलापूरच्या दंग्याचे वृत्त जगजाहीर केले. सोलापूरच्या दंग्याची तयारी मुसलमानांनी आगाऊच पद्धतशीर आखून ठेवली असल्याचे टाइम्स स्पष्ट म्हणतो. मशिदी पाशी हुल्लड सुरू होताच, एकसमयावच्छेदे शहरांतल्या निरनिराळ्या भागांत जी मारहाण व लुटालूट झाली, तिचा कटाक्ष विशेषतः ब्राम्हणांवर विशेष होता. ब्राम्हणांच्या जोडीने लिंगायत जैन मारवाडी या श्रीमंत वर्गा लाहि उपसर्ग पोहचल्याचें समजते. 'जातिओमें झगडे बढानेकी कारवाई बम्मनहि कर रहे हैं. इसके लिये उनोकोही सबसे पहले बेदम करना चाहिये. झगडे तो वम्मन बढाते, और मोकेपे गोरगरीबोंको आगे करते हैं' असेहि मुसलमान गुंड ओरडत असल्याचें कळतें. श्रीमंत वर्गाविरुद्ध तक्रार तर आता सर्वत्रच आहे. सोलापुरास मराठे वर्गाच्या बस्तींत कसलाहि त्रास झाला नाहीं. यावरूम वारा कसा यहात आहे, याचा शहाण्या ब्राम्हणांनी नीट विचार करून ब्राम्हणेतरांच्या सहानुभतीला पारखे न होण्याची खबरदारी घेतली तर बरे, एवढी सूचना करण्यापेक्षा आमच्या हाती अधिक काय आहे ?

२-११-२५

समान सत्तावादाचा संदेश

ब्राम्हणांवदल सामान्यतः जे सिद्धांत आज शेकडों वर्षांच्या अनुभवाने ठरलेले आहेत, ज्यांना इतिहासात स्पष्ट पुरावा आहे. आणि जे चालू घडीला पुष्कळांच्या पुष्कळ वेळा प्रत्यक्ष अनुभवासहि

येत आहेत, त्यांचा उच्चार केला की पुष्कळ नामधारी ब्राम्हणांना राग येतो. स्वतःच्या आचार विचारांत सुधारणा करण्याऐवजी, अथवा टीकाकारांचा रोख आपणांवरच विशेष कां असावा, याचा विवेकाने कांहीच विचार न करता, निवळ आत्मस्तोमाच्या घमेंडीत ब्राम्हणवर्ग सध्यांहि गर्क राहतो, हे हिंदु समाजाचे दुर्दैव आहे. एरवीं बुद्धिश्रेष्ठत्वाची पुराणें झोडायची, अखिल हिंदु समाजाचे आम्ही जन्मसिद्ध पुढारी म्हणून मिजास मारायची, आणि व्यवहारांत क्षुद्रालाहि लाज आणतील अशी क्षुद्र कर्मे करावयाची, हा चालूं मनूंतील ब्राम्हणांच्या ब्राम्हण्याचा महिमा पाहून मन खिन्न होतें. या क्षुद्र बाम्हणी मनोवृत्तीचें निषेधक सगळे ब्राम्हणेतरच असतात असा प्रकार नाही. पुष्कळ विवेकवादी ब्राम्हणहि निषेधक झाले आहेत व त्यामुळे त्यांनाहि ब्राम्हणेतर निषेधकां प्रमाणेच इरसाल ब्राम्हणांच्या कृष्णकृत्यांस वळी पडावे लागत असते. ब्राम्हणांच्या भिक्षुकशाही मनोवृत्ती विरुद्ध बंडाचे पहिले निशाण निषेधक ब्राम्हणांनीच उभारण्यांत पुढाकार घेतलेला आहे. ब्राम्हणेतर निषेधक ही कालपरवाची संस्था आहे. तेव्हा ब्राह्मण वर्गाच्या मदांध वर्चस्वलालसेवर निषेधकांचे होणारे हल्ले म्हणजे यच्चावत् ब्राम्हणब्रुव व्यक्तीचा द्वेष मानणारा माणूस एक गुप्तकटवाला तरी असावा, नाहींतर बावळट असावा. समानसत्तावाद हा वर्तमान काळाचा संदेश आहे. अशा काळांत ब्राम्हणांची गुलामगिरी जशी कोणाला मान्य नाही, तशी ब्राम्हणेतरांची गुप्त उघड वर्चस्व तृष्णाहि कोणी जुमानणार नाही. जात जिवंत ठेवायचीच तर 'जातिक्षेत्रांत ज्याचे ते मुखत्यार.' पण ब्राम्हण्यसंरक्षणाच्या नावाखाली स्वजातिवर्चस्वाचे कोणी स्तोम माजवील, अथवा ब्राम्हणेतर ब्राम्हणेतर म्हणवून एकट्या मराठा जातीचें वर्चस्व वाढवील, तर तें समान सत्तावादी वर्तमान काळांत अखेर रक्तपातमय यादवीला कारण होईल. समानसत्तावादाला ब्राम्हणांचाच व प्रामुख्याने विरोध आहे. ब्राम्हणेतरांत जातिश्रेष्ठतेचें वीष फैलावत असेल, तर त्याला सुद्धां ब्राम्हणी प्रवृत्तीचेच अनुकरण जबाबदार आहे. संघटन संघटन म्हणून ब्राम्हण कितीहि आरडा ओरडा करीत असले, तरी त्यांची संघटनेची भिंगरी स्वजातिवर्चस्वाच्या कुंपणांतल्या कुंपणांतंच गिरक्या मारीत असते. ब्राम्हण कितीहि उदारमतवादी बनला, तरी त्याच्या उदार-मनस्कतेंत सुद्धा एक प्रकारचा सोंवळा संकुचितपणा स्पष्ट दिसतों. आत्मवर्चस्वाला लवमात्र ढका न लावतां, इतर वाटेल त्या बाबतींत ब्राम्हण स्वार्थत्यागच काय, पण आत्मत्यागहि करील पण वेळ आली तर 'स्व' साठीं वाटेल त्याच्या नरडीचा घोट घेईल. त्या वेळी त्याला विवेकाची पर्वा वाटत नाहीं, ज्ञानसंपन्नतेची दिक्कत रहात नाहीं, जनमताची तो चाड करत नाही, किंवा माणूसकीचीहि तो क्षिति बाळगीत नाहीं. हिंदु समाजाच्या अस्तित्वावर आलेल्या इस्लामी गंडांतरावर सामाजिक व धार्मिक समानसत्तावाद हें एकच दिव्यौषध आहे. हें एकच अमृत आहे. हा एकच तोडगा आहे. पण तो अंमलांत येण्यास ब्राम्हण वर्गाचा जन्मसिद्ध तुसडेपणा ही एकच भयंकर अडचणीची धोंड मार्गात आडवी पडलेली आहे. पंजाबांतल्या अकाली चळवळीचा विजय केवळ सत्याग्रहाने झालेला नाहीं. नुसत्या सत्याग्रहानें कोणतेहि कार्य यशस्वी होणेंच शक्य नाहीं, याचा अनुभव अगदीं ताजा आहे. चळवळींतील व्यक्तिमात्रांत समानसत्ता वादाचा आत्मविश्वास फुरफुरल्या शिवाय त्यांच्या आत्म यज्ञाचें सामर्थ्य केव्हांहि अजिंक्य ठरत नाही. अकालींचा समानसत्तावाद वज्रप्राय होता, म्हणूनच त्यांचा सत्याग्रह अखेर विजयी झाला व अमोघ शस्त्रास्त्र संपन्न ब्रिटीश सरकाराला त्यांच्या आत्मतेजापुढें सपशेल हार खाणें भाग पडलें. हिंदु समाजांत जोपर्यंत जातीद्वेष चालूं आहे, सामाजिक उच्चनीचपणा, धर्माची खोडसाळ कल्पना, जन्मप्राप्त

वरीष्ठ-कनिष्ठपणा आणि या सर्व महा पातकांची जन्मभुमी जी ब्राम्हणी खुनशी मनोवृति, ही अवस्था आहे, तोपर्यंत हिंदुजनांनीं आपल्या अस्तित्वाची अतःपर फारशी आशा धरूं नये. हिंदुना हिंदू म्हणून जगावयाचें असेल, तर त्यांनी ताबडतोब सर्व वादाची होळी करून, समानसत्तावादाला देव म्हणून कायावाचामनें पूजला पाहिजे. या मुद्यावर प्रबोधनांत आजपर्यंत पुष्कळ अट्टहासाची चर्चा झालेली आहे. पैंकी वर्ष ३, अंक १४ वा. तारीख १ मे १९२४च्या अग्रलेखांतील एक उतारा प्रिय वाचकांच्या पुनर्विचारार्थ येथे उद्धृत केला आहे :

''कोणत्याही दृष्टीने पाहिले तरी ब्राम्हण व ब्राम्हणेतर हे दोन पक्ष नुसते नांवाचे आहेत. कोणांतही एकी नाही. तोंडाने सार्वजनिक कल्याणाची आणि ब्राम्हणेतर जनतेच्या हितवादाची कोणी कितीहि पुराणे झोडली, तरी प्रत्येक पुढाऱ्यांची दृष्टी स्वजाति वर्चस्वावर! असल्या आत्मद्रोही पक्षांनी कितीहि गगन भेदी आक्रोशाचा हलकल्लोळ उडविला, तरी त्यापासून, ज्या हिंदू समाजाचे ते घटकावय, त्यांतील व्यक्ति मात्राच्या उन्नतीला काय हातभार लागणार? आज पर्यंत लागला नाही, पुढे कधी लागणेहिं शक्य नाही. जातिभेद आणि इतर आणखी सटरफटर भेद यांनी हिंदु समाजाच्या अवनतीची आतां परासीमा गांठली आहे. स्वयंपाक घरांत बसून 'भागुबाई' ब्राम्हणांनीं बौधिक श्रेष्ठत्वाची कितीही पुराणें झोडली, 'मर्द' ब्राम्हणेतरांनीं त्यांच्या भिक्षुकी वर्चस्वाला मूठमाती देऊन स्वावलंबनाचे कितीहि पोवाडे गायले, आणि क्षत्रिय मराठ्यांनी केवळ आपल्या शरीरबलाच्या घमेंडीने कितीहि जोरजोरानें ठासठासून दंड थोपटले, तरी ते सर्व हिंदूच असल्यामुळें, त्यांचा ऱ्हास व अधः पात अगदीं एकजिनशीच आहे. ते सारे गुलाम आहेत. त्यांच्या परिषदांना, ठरावांना, त्यांच्या वल्गनांना आरोळ्यांना हिंदुस्थानांत व जगांत कवडीची किंमत नाहीं. त्यांच्यात अशी एकही संघटनेची शक्ती नाहीं की जिच्यामुळें ते हिंदुधर्माच्या, हिंदुसंस्कृतीच्या व प्रत्यक्ष हिंदु समाजाच्या अस्तित्वावर उठलेल्या एकाही संकटाला तोंड देऊं शकतील. आजच्या हिंदूंत अशी एकही भावना उरलेली नाहीं कीं जी त्यांच्या प्रत्यक्ष अस्तित्वावर उगारलेल्या काळकुन्हाडीचा घाव चुकविण्यास झपकन् जागृत होईल. ब्राम्हण-ब्राम्हणेतर वाद हे, फार झाले तर, निवांतीच्या वेळी खेळण्याचे खेळ म्हटलें तरी चालतील. पण राष्ट्रावर संकट येतांच, असले वाद जागच्याजागी चिरडून राष्ट्रधर्मासाठी सर्व जातींनीं, सर्व न पक्षांनी व पंथांनी चटकन् एकवटलें पाहिजे. असे न होईल, तर हिंदुत्वावर एक भयंकर प्रसंग ओढवला आहे, त्यांत ब्राम्हण शिल्लक राहणार नाहींत, व ब्राम्हणेतरहि गारद झाल्याशिवाय राहणार नाहीत. पूर्वीच्या अनेक गंडातरांत आमचे स्वराज्य गेले, स्वातंत्र्य निमाले, पण अस्तिव नष्ट झालें नाहीं. आतांचा प्रसंग बिनचुक आमच्या अस्तित्वावरच आहे आणि तो ब्रिटिश अमदानींत आलेला आहे.''

स्वयें उद्धरोनी जगा उद्धरावें

प्रत्येक व्यक्ती व समाज आज आत्मोद्धारार्थ झगडत आहे. पण प्रत्येकाच्या उद्धाराच्या मार्गाच्या कल्पना अझून स्पष्ट झालेल्या नाहीत. याला कारण अज्ञान. दुसरे तिसरे कोणतेहि नाही. कोणाला

वाटते की भटांच्या पायचेपीने माझा आत्मोद्धार होईल. कोणाची भावना अशी की भट लबाड, तेव्हां भटेतरांच्या मागे लागलो तर माझा उद्धार होईल. पण या सर्व समजुती निखालस चुकीच्या आहेत. कोणी कोणाचा उद्धार करीत नसतो. ज्याचा तो उद्धारार्थ किंवा अधःपातार्थ मुखत्यार असती. अस्पृश्यांना वाटतें कीं स्पृश्यांशी खेळीमेळी करून आपली अस्पृश्यता नष्ट होईल व आपणास साध्या माणुसकीचे हक्क मिळतील. गरीबांना वाटते श्रीमंतांची हांजी हांजी केली तर आपला भाग्योदय होईल. मागासलेल्या समाजांची समजूत की थोडीशी साक्षरता आणि पुढारलेल्या समाजांचे अनुयायित्व असलें की आत्मोद्धाराचा मार्ग मोकळा. पण हे सर्व समज चुकीचे आहेत. कोणी कोणाचा उद्धार करीत नसतो. स्वतःचा उद्धार स्वतःच करावा लागतो. आध्यात्मिक मोक्षासाठी जशी भिक्षुकाची दलाली फोल आहे, तशी ऐहिक आत्मोद्धाराच्या मार्गात कोणत्याहि दलालींची कोणी पर्वा ठेऊं नये. स्वावलंबना सारखा गुरू नाही. या बावतींत अस्पृश्य बांधवांना १६ जानेवारी १९२४ च्या (वर्ष ३, अंक ७) प्रबोधनांत 'अस्पृश्यांनो, स्पृश्यांपासून सावध रहा' असा स्पष्ट व विस्तृत इषारा दिला होता. सार्वजनिक चळवळीतहिं 'जीवो जीवस्य जीवनम्' विधान आहे. लोकांच्या अज्ञानाचा व असहाय स्थितीचा फायदा घेऊन, लोकहितवादाच्या पांघरुणाखाली, शहाणे सुर्ते लोक आत्मस्तोमाचे देव्हारे माजविण्याचाच धंदा करीत असतात. 'धंदेवाईक पुढारी' बनले की आत्मोद्धाराच्या मार्गातले हे नवीन दलाल अखेर धार्मिक भिक्षुकशाही इतकेच भयंकर तापदायक होतात. म्हणून आत्मद्धारेच्छू सर्व समाजांनी निर्भेळ स्वावलंबनाची कास धरावी, असा प्रवोधन स्पष्टोक्तीचा इशारा देत आहे.

जबाबदार मराठ्यांचा बेजबाबदार दृष्टिकोन

कै. राजर्षि शाहू छत्रपतींची ब्राम्हणेतर चळवळीची दिशा आणि सध्या कांही जबाबदार मराठी पुढाऱ्यांनी तिला लावलेले वळण, यांत दक्षिणोत्तर धुवा इतका फरफ आहे. मराठा जातीचा आत्मोद्धार आणि ब्राम्हणेतर बहुजन समाजाचा आत्मोद्धार या दोन गोष्टी राजर्षींनी शक्य तितक्या अलग अलग ठेवल्या होत्या. इतकेंच नव्हे तर सत्यसमाजाची कडवी सुधारक चळवळ पायाशुद्ध न चालल्यास तिच्या सांसर्गाचा ब्राम्हणेतर चळवळींत विनाकारण गोंधळ माजेल, या दृष्टीनें खुद्द राजर्षींनी 'सत्यशोधक समाजाशी माझा कांहींहि सबंध नव्हता व नाही' असा जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. ब्राम्हणेतरांत 'मराठ्यांचा अंतर्भाव होतोच. परंतु ज्ञातिक्षेत्रांत ज्याचे ते मुखत्यार' या सूत्रान्वयें मराठ्यांचा जातितः आत्मोद्धाराचा मार्ग व्यापक व सार्वजनिक अशा ब्राम्हणेतर चळवळीच्या रामरगाड्यांत विनाकारण कोंदटून जाऊ नयें, म्हणून राजर्षींनी खास मराठ्यांकरितांच मराठा शिक्षण परिषद व मराठा राजकीय परिषद या दोन जबरदस्त संस्था निर्माण केल्या. या दोन शस्त्रांच्या शक्तीनें मराठ्यांना काय वाटेल तें साध्य प्रयत्नान्तीं साधणें कठीण नाहीं, स्वजातीच्या उन्नतीचीं साधनें स्वतंत्र निराळीं तयार असतांना ब्राम्हणेतर नामक व्यापक चळवळींत जबाबदार मराठ्यांना जाति भेद माजविण्याची वास्तवीक कांहीं जरूरच नव्हती. परंतु गेली दोन तीन वर्षे या बाबतींत आम्ही स्वतः जें निरीक्षण केलें व सातारा

रोडच्या अड्यावर प्रत्यक्ष अनुभव घेतला, त्यावरून असे स्पष्ट म्हणावयास कांहीं हरकत नाहीं कीं जाधवराव प्रभृति मराठा पुढाऱ्यांनीं ब्राम्हणेतर पक्षांत शुद्ध चित्पावनाही माजवून, या पक्षाच्या ध्येयाचा व कार्यपद्धतीचा विचका करून टाकला आहे. ब्राम्हणेतर चळवळींत सत्यशोधक चळवळीची भर पडून उडालेल्या गोंधळांत क्षात्र जगद्गुरूंच्या संप्रदायाचा आणखी एक विलक्षण कोलदांडा पडल्यामुळें, तर या सर्वच चळवळीला कांही धरबंध व शिस्त उरली नाहीं. ठिकठिकाणीं ब्राम्हणेतर परिषदा, लिगा काँग्रेसा भरल्या. पण त्यातहि या सावळा गोंधळाची फोड व उलगडा झाला नाहीं. आज पहावें तर, कोणी स्पष्ट बोलत नसला तरी, ब्राम्हणेतर पक्षांत बहुतेक मराठेतर जाती साशंक व उदासीन झालेल्या आहेत. ब्राम्हणेतर नावाखालीं जाधवरावांसारखे कडवे मराठे पुढारी 'तत्सम' जातींबद्दल मोठमोठीं पुराणें झोडतात. पणण यांनीं आजपर्यंत या 'तत्सम' करितां कितीशी कातडी सोलवटून घेतली आहे? मराठ्यांनी स्वाभिमानी अवश्य रहावे. त्यांनी आपल्या जात्युन्नतीची जरूर शिकस्त करावीं. पणण तेवढ्यासाठीं ब्राम्हणेतर चळवळीचा बुरखा कां?: आणि त्या चळवळीच्या व्यापक तत्त्वांची अशी पायमल्ली कां? सार्वजनिक चळवळींत ब्राम्हण जातीचें आत्मस्तोम व वर्चस्व जर आज कोणी जुमानीत नाहीं, तर ब्राम्हणेतर चळवळींत एकट्या मराठा जातींतल्या पुढाऱ्यांचा शिरजोरपणा कोण मान्य करणार? समानसत्तावादी नाहीं ती चळवळ सार्वजनिक कधींहि होणार नाहीं. जातिवर्चस्वाचे गुप्त डावपेच चित्पावनां सारख्या उर्ध्वबुद्धी खटपट्यांच्या आंगांवर रक्तपिती प्रमाणें फदफदलेले पहात असूनहि जबाबदार मराठे पुढाऱ्यांनीं अखिल ब्राम्हणेतरांच्या प्रातिनिधित्वाच्या सबबीखालीं स्वजातिवर्चस्वाचें स्तोम माजविणें, हा मूर्खपणा नसेल तर बेजबाबदारपणा तरी खास आहे.

'राष्ट्रवीर' कर्त्यांचें 'ब्राम्हणेतरत्व'

बेळगांवचे 'राष्ट्रवीर' साप्ताहिक 'ब्राम्हणेतर पक्षाचे मुखपत्र' म्हणून प्रसिद्ध आहे. या पत्राचे धोरण अलीकडे इतके बेताल 'मराठी' झालेलें आहे की राष्ट्रवीर म्हणजे ब्राम्हणेतरांतला केसरीच म्हटले तरी चालेल, या पत्राने मराठा-मराठेतर भेद माजविण्यांत बराच पुढाकार घेतला असून, आतां तर तो कायस्थ प्रभू ज्ञातींवरहि उघड उघड चित्पावनी आरोप करू लागला आहे. ब्राम्हणांप्रमाणेंच कायस्थ प्रभूहि या 'ब्राम्हणेतर पक्षाच्या मुखपत्रां'त काडेचिराइता प्रमाणें सलू लागले आहेत. स्पष्ट बोलायचे तर कायस्थ प्रभू समाज कोणत्याच पक्षाचा अगर संप्रदायाचा जातितः अनुयायी नाहीं. भटी भिक्षुकशाही विरुद्ध त्यानें गेली २५० वर्षे झगडा लढवून आपलें विशेष संस्कृतीचे वैशिष्ट्य मोठया चिकाटीने टिकवून धरले आहे. अभेद भावानें अखिल ब्राम्हणेतरांसाठी या समाजानें केलेली सेवा इतिहासांत मंजूर आहे व देवाघरी रुजू आहे. एकट्या मराठा जातीसाठीं या ज्ञातीने खाल्लेल्या राजकीय सामाजिक व धार्मिक खस्ता लोकविश्रुत आहेत. या समाजाचे वर्तमान चारित्र्य भटामिक्षुकांच्या कृपाप्रसादावर, मराठ्यांच्या पाठबळावर अगर सरकारच्या बटर ब्रेडवर अवलंबून नाहीं. या समाजांतील आमच्या सारख्या काही तुरळक व्यक्ती सार्वजनिक क्षेत्रांत आयुष्य वेचण्यास उतरतात, त्या अभेद भावाने

साधेल तितकी जनसेवा करण्यासाठींच. भेद असेल तेथें कायस्थ प्रभुचे कोणाशींच पटणार नाहीं. या समाजाला ब्राम्हणांचे शिरजोर वर्चस्व जसे आजपर्यंत मुळीच खपलं नाही, तसेच तो इतर कोण्याहि वहुसंख्य वा अल्पसंख्य समाजाची तिस्मारखानी पत्करणार नाही. सार्वजनिक हितवादाच्या क्षेत्रांत जेथे खरेंखुरें राष्ट्रकार्य असेल, तेथे तो पक्षभेदाची गुलामगिरी न पत्करता इमानें इतबारें लोकसेवेची शिकस्त करील. जातितः हा समाज ब्राम्हणेतरच असल्यामुळे अखिल ब्राम्हणेतरांच्या उन्नतीकडे त्याचें लक्ष वेधणे निसर्गसिद्धच आहे. ब्राम्हणांच्या मस्तवाल घाशीरामीखालीं अपमानाच्या, उपमर्दाच्या आणि प्राणघातक कारस्थानांच्या शेकडों दिव्यांत हा समाज तळून पोळून निघालेला आहे. ब्राम्हणांना तुल्यबली, किंबहुना पुष्कळ अनेक सांस्कृतिक बाबतींत वरचढ असणाऱ्या या समाजाला 'जया आंगीं मोठेपण' या न्यायानें 'तया यातना कठीण' भोगाव्या लागल्या व लागत आहेत. या जातीला दडपून नामशेष करण्याचे ब्राम्हणी संघटित प्रयत्न केवळ पेशवाईंतच झाले असें नव्हे, तर इंग्रेजी अंमदानींतहि आज घटकेला होत आहेत. आठ वर्षांपूर्वी भारत-इतिहास संशोधक मंडळाने केलेली या समाजाची दस्तऐवजी बदनामी या समाजाच्या काळजाला कायमची झोंबलेलीं आहे. या भेटी मंडळानें कायस्थ प्रभूंच्या उत्पत्तीलाच केवळ बदनाम केले असे नव्हें. तर

(१) कायस्थ प्रभूंमुळेंच हिंदू समाज व हिंदू धर्मांचा सत्यानाश झाला, आणि

(२) कायस्थ प्रभूंमुळेंच मऱ्हाटी स्वराज्य नष्ट झालें. असे दोन ठळक आरोप या समाजावर केलेले आहेत. ब्राम्हणांप्रमाणे अत्याचारी खुनशीपणा जर या समाजांत असता तर, मंडळाला योग्य ते कायदेशीर प्रायश्चित्त यापूर्वींच मिळालें असतें. पण विवेकाची व कायस्थ प्रभूंची खुनशी ब्राम्हणांप्रमाणें अझून फारकत झालेली नाहीं. सध्यांचा प्रश्न एवढाच आहें की इंग्रेजी राज्यात ब्राम्हणांच्या बऱ्या वाईट अभिप्रायांवर कोणत्याहि समाजाचे किंवा त्यांतील व्यक्तींचे बरें वाईट जरी अवलंबून नाहीं, तरी 'हिंदू समाज-धर्म-स्वराज्य-विध्वंसकत्वाची भिक्षुकी सनद छाताडावर लटकवून, ब्राम्हणांच्या स्वराज्यवादाच्या जलशांत कोणता स्वाभिमानी कायस्थ प्रभू भाग घेईल? अर्थात् स्वतंत्रमतवादी म्हणूनच जनसेवेच्छू कायस्थ प्रभूला प्रचलित वातावरणांत कार्य करीत रहाण्याशिवाय गत्यंतरच उरलेलें नाहीं. पण एवढ्यासाठीं तो ब्राम्हण वर्गाची हांजी हांजी करीतल किंवा ब्राम्हणेतरांतील शिरजोरांच्या मागें निष्कारण गोंडा घोळवीत फिरेल, अशी कोणीहि कल्पना करण्यास अवसर नाहीं. अथवा ब्राम्हणेतरांच्या आत्मोद्धारासाठी कांही कायस्थ प्रभू व्यक्ती कळकळीनें प्रामाणिक कार्य करतात. म्हणून त्यांनी आपल्या शिरजोरपणाची धोंड लोकांच्या माथीं लादण्याचे भटी दलालीचे यत्न, आजपर्यंत कधीं केलेले नाहींत व पुढें करणारहि नाहींत. राष्ट्रसेवेंत गर्क असतांना स्वार्थ साधण्याचे, आपला तळीराम गार करण्याचे आणि ब्राम्हणेतर समाजांवर कसल्या तरी वर्चस्वाची कुरघोडी करण्याचे शेंकडों प्रसंग कायस्थप्रभू पुढाऱ्यांनी गेल्या २५० वर्षांत अनेक वेळा लाभले असतांहि, त्यांनीं चुकून सुद्धां कधिं तीं भटी दुष्कर्मे केली नाहींत. याविषयीं साक्ष देण्यास इतिहास खंबीर आहे. कायस्थ प्रभूंवर चित्पावनी ठशाचे आरोप करणाऱ्या 'राष्ट्रवीर' कंपूंतल्या मराठा पंडितांनी आपल्या विद्वत्तेच्या कसरती करतांना इतिहासाकडे अगदींच पाठ फिरवूं नये. कायस्थ प्रभू मराठ्यांच्या आत्मोद्धाराच्या मार्गांतले, ब्राम्हणांप्रमाणेंच, दुष्ट धोंडे आहेत, हें जर या कंपूला प्रामाणिकपणे वाटत असेल, तर त्यांनी तसे स्पष्ट बोलावे. आमच्यामुळें कोणत्याहि महाराष्ट्रीय जातिसंघाच्या उन्नतीला यत्किंचितहि उपसर्ग होऊं नये, अशी प्रत्येक कायस्थ

प्रभूची इन्छा आहे. त्यांचे सहकार्य ज्यांना नको असेल, त्यांनी तसें स्पष्ट बोलावे. 'राष्ट्रवीर' असे स्पष्ट बोलत आहे. फार चांगलें. आभारी आहों.

संघटनेच्या लळीतांची तयारी

कौन्सिल निवडणुकीची वेळ आली की ब्राम्हणेंतर उर्फ मराठे पुढारीबुवांना 'ब्राम्हणेतर संघाच्या संघटनेची बिनचूक विवंचना लागते. संघटनेच्या तुताऱ्या वाजू लागल्या कीं खास समजावें कीं कौन्सिल-निवडणूक आतां जवळ आली. अस्पृश्यांच्या उद्धाराची पुराणें प्रवचनें झडूं लागली की बिनदिक्कत भविष्य सांगावे की कौन्सिल-निवडणूक जवळ आली. मागासलेल्या वर्गांच्या शिक्षणाविषयीं नकराश्रुंचा धवधवा बेफाम कोसळूं लागला की खास तर्कशास्त्र लढवावें कीं कौन्सिल-निबडणूक आतां लवकरच होणार. शेतकऱ्यांच्या दैन्याबदल भांडवलशाही शाहिरांचे करुणरसोत्पादक कळवळ्याचे पोवाडे आंतडी पिळवटून बाहेर पडू लागले कीं खुशाल डोळे झाकून सांगावे कीं कौन्सिल-निवडणूक जवळ आली. मागासलेल्या वर्गांच्या शिक्षणाविषयीं नक्रांश्रूंचा धबधबा बेफाम कोसळू लागला कीं खास तर्कशास्त्र लढवावें कीं कौन्सिल-निवडणूक आतां लवकरच होणार. शेतकऱ्यांच्या दैन्याबद्दल भांडवलशाही शाहिरांचे करुण रसोत्पादक कळवळ्याचे पोवाडे आंतडी पिळवटून बाहेर पडूं लागले कीं खुशाल डोळे झांकून सांगावें कीं कौन्सिल निवडणूक आतां अगदी माथ्यावर येऊन भिडली. वहुजनहितवादावर लेखण्यांचीं व जिभांची टोकें घासडूं लागली कीं तेव्हांच उमगावें कीं आलें रे आले कौन्सिल इलेक्शन जवळ! वेडुकांचा डराव डराव बेंडवाजा चालूं झाला कीं पावसाळ्याची सुरुवात जशी उमजते, तद्वतच लोकहिताच्या व स्वराज्यसंपादनाच्या टिमक्या ठणाणू लागल्या म्हणजे तोंडपाटलांच्या कौन्सिलांत निवडून जाण्याच्या धडपडी सुरू झाल्या असें समजावें.

'ब्राम्हणेतर पार्टी' म्हणून जी एक पार्टी अलीकडे राजकारणाच्या क्षेत्रांत मिरवत असते, त्या पार्टीचा शेंडा बुडखा काय आहे, याची अझून स्पष्ट वाच्यता कोणीहि केलेली नाहीं. ही पार्टी कोणाची, कोण कोणांचा हींत समावेश होतो, हिचे ध्येय काय, कार्य पद्धत काय, प्रातिनिधित्व काय वगैरे प्रश्नांची उत्तरें अजून एकहि जबाबदार पुढाऱ्याने किंवा 'ब्राम्हणेतर पक्षाची मुखपत्रे' म्हणविणारांनी दिलेली नाहींत. बाम्हणेतर जाती अनेक आहेत. त्यांच्या संस्कृतीत व तक्रारींतहि एकजिनसी पणा नाहीं. या सर्वांचे प्रमाणबद्ध प्रातिनिधित्व ब्राम्हणेतर पक्षात मुळीच नाही किंवा त्या प्रतिनिधित्वाची या पक्षाच्या पुढारीबुवांनी आजपर्यंत पर्वा केलेली नाहीं. गव्हर्नर व्हाईसरायादि भारतदेवांकडे ब्राम्हणेतर पार्टीची वेळोंवेळीं अनेक डेप्युटेशने गेली व त्यांतल्या नामांकित 'पुढाऱ्यांनी मन मानेल, त्या मागण्यांची याचना केली. तरी सुद्धा त्या मागण्या आपण कोणांकरिता, काय उद्देशाने, कोणाच्या सांगण्यावरून, प्रातिनिधिकत्वाच्या कोणत्या अधिकारानें करीत आहोंत, याची न्या नामांकित बृहस्पतींनी दरकार केली नाहीं. असली विनशेंड्याबुडख्याचा चळवळ चालवून पुढाऱ्यांना स्वत:चा कांही दिवस उदो उदो करता आला, तरी आतां त्यांच्या अनिर्बंध थैमानाच्या जाळ्यांत ते गुरफांटू लागले आहेत. याच वेळी

हे पुढारी शुद्धीवर न येतील व आपल्या चळवळीला निश्चित स्वरूप न देतील, तर, तर ही ब्राम्हणेतर चळवळ म्हणजे शुद्ध पोरखेळ किंवा मूठभर डोकेवाजांचा स्वार्थसाधू बाजार या सदरांत पडणें फारसें कठीण राहिलेलें नाही. जेथें ब्राम्हणेतर पक्षाच्या ध्येयाच्या व कार्यपद्धतीच्या कुळागुळाचा पत्ता नाहीं, तेथें त्यांत आणखी सत्यसमाजाच्या चळवळीची बेशिस्त भेसळ झालेली आहे. ब्राम्हणेतर चळवळ कोणती, क्षात्र जगद्गुरूच्या बुटांवर टाळकी घासणारे क्षत्रिय मराठे कोणते, आणि देवमानवांतल्या दलालावर बाहिष्कार घालणारे सत्यसमाजिष्ठ मराठे ब्राह्मणोतर म्हणजे यच्चावत नब्राम्हण जानी का फक्त मराठे तत्सम जाती व सत्यशोधक? इत्यादि मुद्यांचा एवढा भयंकर सांवळा गोंधळ ब्राम्हणेतर उर्फ मराठे पुढाऱ्यांनी माजविला आहे कीं आहे तोच गुर्मींचा प्रकार पुढें चालूं राहिला तर ही चळवळ भटांच्या स्वराज्य-चळवळीप्रमाणें लफंव्या स्वार्थांध व धेंडांची एक क्षुद्र धडपड म्हणून लोकांच्या तिरस्कारास पात्र झाल्याशिवाय मुळींच राहणार नाही. या मुद्यांवर प्रबोधनानें सन १९२२ सालीं 'ब्राम्हण ब्राम्हणेतर वादाची चिकित्सा' चार अग्रलेखांत कमाल स्पष्टोक्तीनें केलेली वाचकांच्या संग्रहीं आहेच. पण प्रबोधनान्या सूचनांचा या नामांकित पुढाऱ्यांवरचे त्याच्या मुखपत्रांवर काहींच परिणाम झाला नाहीं, हें उघडच आहे. त्या नंतर सन १९२४ साली Today's Maharashtra या इंग्रजी अग्रलेख मालेतून सुद्धां प्रस्तुत प्रकरणावर आम्ही कळकळीचे इषारे प्रसिद्ध केलें. त्यांचीहि या घमंडानंदनांनी पर्वा केली नाही.

हे विचार सुचण्याचे कारण ना. जाधव यांनी नुकताच स्वदस्तुरच्या सहींने प्रसिद्ध केलेला ''ब्राम्हणेतर पक्षाची संघटना' नामक खलिता. या खलित्याच्या मागें ना. जाधव यांच्या कोणकोणत्या आत्मस्तोमी भावना दडून आहेत, हें आम्हाला समजत आहे. पण या खलित्यांत सुद्धां आमच्या वरील प्रश्नांचे उत्तर नाहीं. 'ब्राम्हणेतर' शब्दाची ना. जाधवांची व्याख्या सातारा जिल्ह्यांत सर्वांना माहीत आहे आणि त्यांचें सत्यसमाजतहि किती शंभर नंबरी आहे, हेंहि त्यानीं मागेंच जाहीर केलेलें आहे. तथापि ते आपल्या या नवीन खलित्यांत काय म्हणतात तें पहा :

ब्राम्हणेतरांना आपली धार्मिक, सामाजिक, राजकीय वगेरे सर्व बाबतींत उन्नति करून घ्यावयाची आहे. अगोदर राजकीय हक्क. संपादन करूं या व मागाहून धार्मिक व सामाजिक वगैरे सुधारणा आपोआप होतील हे मत आम्हांस मान्य नाहीं. आमच्यात शिक्षण वाढलें पाहिजे, आमच्या सामाजिक चालीरीतींत असलेले दोष जाऊन सुधारणा झाली पाहिजे, धर्मासंबंधीं आमचे अज्ञान नाहीसें होऊन आम्हांला माणुसकीचे हक्क पाहिजेत, व त्याबरोबरच आम्हांस आमच्या संख्येच्या व आम्ही कर देतों त्या प्रमाणांत सर्व प्रकारच्या प्रातिनिधिक संस्थांत आमचे प्रतिनिधी गेले पाहिजेत.

आमच्या योग्य हक्काचा उपभंग आम्हांस मिळत नाहीं, व ज्यांनी आजपर्यंत पुढारीपण मिरविलें ते लोक आपलें वर्चस्व आमच्यावर कायम ठेवण्यासाठी दीर्घ प्रयत्न करीत आहेत. आमच्या हेतूंचा विषर्यास करून आम्हांविषयीं सर्वत्र गैरसमज पसरविणें, आमच्या लोकांची दिशाभूल करणें, आमच्यांत फाटाफूट करणें वगैरे काम हे लोक सतत करीत राहणार. आम्हांसहि त्यांना या बाबतींत तोंड देणे जरूर आहे.

ब्रम्ह आणि मायेच्या पुराणापेक्षां या उद्‌गारांत अधिक काय आहे? पण यांत स्पष्ट खुलासा तरी कसला आहे? सर्वसामान्य परंतु संदिग्ध तक्रारीच्या शब्दांचें हें चऱ्हाट सांगायला जाधवरावाइतके वडे

विद्वान् कशाला? हें काम वाटेल तो खेडवळ पाटील सुद्धां आतां करतो, जलशेवाला करतो आणि कोण बाटेल तो रेम्याडोक्या करतो. पण पक्षाची संघटना करण्यास निघालेल्या शहाण्या पुढाऱ्यानें चळवळीचा आजपर्यंतचा बरा वाईट अनुभव विचारांत घेऊन, संघटनेची रूपरेषा विशेष स्पष्ट करावयास पाहिजे होती. 'आम्ही, ब्राम्हणेतर' म्हणजे कोण? ब्राम्हणेतरांत कोणकोणाचा समावेश होतो? 'दिशाभूल करणारे, पुढारीपणा मिरविणारे' कोण अडाणी जनतेनें काय समजायचे? कटु सत्यच का हो ना. पण जरा स्पष्ट बोला की राव. आता आडपडद्याचा बुरखा कशाला? ब्राम्हणेतर या भुलभुलावणीच्या व्यापक नांवाखाली एकट्या मराठा जातीची चळवळ करावयाची असेल नव्हे करीतच आहांत-तर तसें स्पष्ट सांगा. आम्हांला त्यांतहि आनंद व अभिमानच वाटेल. पण सार्वजनिक म्हणून भटांनीं आपल्या पोळीवर सपाटून तूप ओतून घेतले आणि तुम्ही आतां ब्राम्हणेतर करून एकट्या मराठ्यांच्या उठावणीस लागला! यापेक्षां स्पष्ट मराठा जातीच्या सर्वांगीण उन्नतीचा प्रश्न हाती घेऊन, संघटना करण्यास निघालेल्या शहाण्या पुढाऱ्यानें चळवळी त्या कामी तनमनधनाची शिकस्त कराल, तरी महाराष्ट्राला तुमची चळवळ विशेष स्पष्ट कळून तिकडे तो खास कौतुकानें पाहूं लागेल. तें तुमचे 'तत्सम जातीचें' तुणतुणेहिं द्या आतां उघड धैर्यानें फेकून. त्याचप्रमाणें सत्यशोधक समाजाचीहि दिशा एकदां स्पष्ट करा. एकीकडे म्हणायचे मी सत्य शोधक. दुसरीकडे म्हणायचे मी ब्राम्हणेतरांचा पुढारी आणि कौन्सिल निवडणुकीच्या हंगामांत जाहीर पत्रकें काढायची कीं जो मराठ्याच्या बीजांचा असेल तो मराठ्यालाच मते देईल. ही टोलवा टोलवी आतां बंद करा, आणि निवळ मराठे म्हणून या महत्वाच्या अफाट समाजाच्या उन्नतीचा प्रश्न अधिक शिस्तीने व प्रामाणिकपणानें हाती घ्या. 'तत्सम' व मागासलेले शेकडों समाज आहेत. ते मराठ्यांची प्रगति पाहून स्वयंस्फूर्तीने आपोआप पुढें सरकतील. पण त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन, त्यांच्या प्रातिनिधित्वावर स्वतःचें सौभाग्य पिवळें ढवळें करून घेण्याची तुमच्या सारख्यांना कांही जरूर नाहीं.

'ब्राम्हणांप्रमाणेच कायस्थ प्रभूंची स्वार्थांधतेमुळे हिंदुत्वाची दृष्टी फुटली'

मराठा मराठेतर भेद माजविण्याकडे 'राष्ट्रवीर' कसा झुकत चालला आहे, याचा सूचनात्मक इषारा चालूं वर्षाच्या २ऱ्या अंकांत (पृ. ३१) आम्ही दिलाच होता. पण इतक्या लवकर 'राष्ट्रवीर' आपल्या इरसाल मराठा भाल्याची फेंक ब्राम्हणांच्या पोटांतून प्रभूंच्या छाताडांत घुसवील, अशी मात्र आमची कल्पना नव्हती. ता. ८ सपटेंबर १९२५च्या अंकांत ''ही सरकारची समदृष्टी कीं भेदनीती'' या मथळ्याखालील चार स्फुटांत १८९७ सालापासून भरलेल्या डेप्युटी कलेक्टरांच्या ४४ जागांवरील जातवारीचें पृथःकरण करतांना, आणि लोकसंख्येच्या प्रमाणांत नोकऱ्यांची विभागणी व्हावी' या तक्रारींचें समर्थन करतांना, राष्ट्रवीरकर्त्यानें खालील मुक्ताफळें गाळलीं आहेत :

''राजकीय क्षेत्रांत लोकसंख्येच्या प्रमाणांत हिंदु समाजाला (?) हिस्सा मिळाला पाहिजे यासाठीं

प्रयत्न करण्यास एकहिं ब्राम्हण किंवा प्रभू पुढें येणार नाहीं. इतकेंच नव्हे तर ती मागणी हाणून पाडण्यासाठींच ते कंबर बांधतील. याचें कारण त्यांच्यांत स्वार्थांधतेमुळें हिंदुत्वाची दृष्टी उरली नाही.''

खऱ्या हिंदुत्वाचे द्रष्टे व हिंदु समाजाचे पुरस्कर्ते काय ते हे राष्ट्रवीरकार! सरकारी नोकऱ्यांचा मोक्ष सरकार कोणकोणत्या हिंदु हिंद्वेतर समाजांना कोणकोणत्या प्रमाणांत देते आणि लोकसंख्येच्या प्रमाणांत नोकऱ्या मिळणें, हें काय भाग्याचें वर्म आहे, हे वादाचे मुद्दे येथें नाहींत. सरकारी नोकरी हा काय भाग्याचा मामला आहें, हें अजून राष्ट्रीरकारांना नीटसें उमगलेलें दिसत नाहीं एवढे मात्र खरें कीं त्यांच्या मताच्या पुष्कळ मराठ्यांना असा मोह उत्पन्न झाला आहे कीं सर्रास सरकारी नोकऱ्या मिळणें हीच भाग्योदयाचीं लक्षणें! असेल. कदाचित् यच्चावत् सर्व राजकीय सामाजिक धार्मिक दुखण्यावर हें एक लिटलचे ओरिएंटल बाम ठरणार नाहीं कशावरून? पण आम्हांला याहि मुद्यार्शी माथे-फोड करण्याची इच्छा नाहीं. आत्मोद्धाराचा जो मार्ग बरा दिसेल तो बाटेल त्यानें वाटेल तसा चोखाळावा. पण ब्राम्हणांप्रमाणेंच कायस्थ प्रभूहि स्वार्थांध झाले आहेत व त्यांची हिंदुत्वाचीहि दृष्टी फुटली आहे, या विधानाला राष्ट्रवीरकारांपाशी जो कांहीं पुरावा सापडला असेल तो त्यांनी अवश्य प्रसिद्ध करावा; म्हणजे सरकारी नोकऱ्यांच्या मोक्षाच्या वाटेवरील कायस्थ प्रभू वाटमाऱ्या असतो तरी कसा, हें महाराष्ट्राला व विशेषत: मराठे बांधवांना नीट समजून येईल. होय. राष्ट्रवीरकार या बाटमाऱ्यांची थोडाशी रूपरेषा अशी देतात:

''४० लाख लोकसंख्येच्या पारशी, ख्रिश्चन, मुसलमानांना २७ जागा व १५० लाख हिंदूंना फक्त १७ च जागा या स्पष्ट विषमतेबद्दल त्यांना (ब्राम्हण-प्रभूंना) मुळींच खंती वाटणार नाहीं. कारण तेहि दोन समाज हिंदूंना मिळालेला राजकीय क्षेत्रांतील तुकडा आपल्याच समाजाच्या घशाखालीं घेण्यांत निमग्न झाले आहेत, हें हिंदूंना मिळालेला डे. कलेक्टरच्या १७ जागांपैकी १२ जागांवर १०-१२ लाख लोक संख्येचे ब्राम्हण व प्रभू विराजमान झाले आहेत. यावरून उघडपणें दिसून येतें. फाजील प्रमाणांत दुसऱ्यांच्या (?) हक्कांचा (?) उपभोग घेतल्यामुळें ज्यांचे पोट तुडुंब भरून तें फुटण्याच्या बेतास आलें आहे, ते आपली भावी आपत्ति टाळणाऱ्या औषध- योजनेंत गुंग न होतां, हिंदुत्वाचा अभिमान धरून सरकारशीं झगडण्यास पुढें होतील हें शक्यच नाहीं. लोकसंख्येच्या प्रमाणानुसार राजकीय क्षेत्रांत मागणीं करण्यास आम्ही (?) तयार झालों कीं आधीं आपण उपभोगत असलेल्या वऱ्याच हक्कांवर पाणी सोडावें लागेल, हें ब्राम्हण-प्रभूंना पुरतेपणीं ठाऊक आहे, म्हणून मरत ना का ते १४० लाख मागासलेले हिंदू, असें म्हणून लोकसंख्येस अनुसरून असलेल्या मागणीला तेहि विरोधच करीत राहातील.''

राष्ट्रवीरकारांनी ब्राम्हण प्रभूंना स्वार्थांध ठरवून १४० लाख मागासलेल्या हिंदु समाजांचे इरसाल हिंदुवाच्या घवघवीत भावनेनें अस्सल प्रातिनिधित्व व अभंग पुढारीपण पत्करल्याचें जाहीर केल्याबद्दल त्यांचें आम्ही अभिनंदन करतो. कोणाहि कोंबड्याच्या आरवण्यानें उजाडलें तरी आम्हांला त्यांत आनंदच आहे. १४० लाख मागासलेल्यांचे हित प्रत्यक्ष साधणारा 'राष्ट्रवीर'अखेर बेळगावांत अवतरला, म्हणून बेळगांवाचेहि आम्ही अभिनंदन करतो. सध्यांचा मनू असा आहे कीं बहुजन हितवादाच्या पुण्यकार्यांत जन्मदेता बाप आडवा आला तरी त्यालाहि छाटण्यास खऱ्या राष्ट्रवीराने मागें पुढें पाहूं नये. मागासलेल्यांच्या उन्नतीचा प्रश्न जर सरकारी नोकऱ्यांच्या परीस-स्पर्शावरच अडकून पडला असेल आणि त्यांत जर ब्राम्हण प्रभु वा दोनच 'अहिंदु' जाती आडव्या येत असतील, तर ब्राम्हणेतर पक्षानें इतर सटर फटर बाबींवर माथीं न फोडतां, या १०-१२ लाख वस्तीच्या दोन समाजांना क्षात्रजगद्गुरूच्या फर्मानानें

प्रथम हिंदुत्व बहिष्कृत करावें. ब्राम्हण लोक जात्याच बहुसंख्य असल्यामुळे जन्मजात खुनशीपणानें ते राष्ट्रवीरपंथी अस्सल हिंदूशी कदाचित् टक्कर देतील. पण ३० हजार वस्तीची प्रभू जात तेवढेंहि करणार नाही. तसें करण्याची त्यांना इच्छाहि नाहीं. १४० लाख देश बांधवांची अधोगति जर केवळ प्रभूंच्या सरकारी नोकरदारीनें होत असेल, तर त्या नोकरदारी मोक्षावर थुंकण्याची त्यांची केव्हांहि तयारी आहे. इतकेंच नव्हे, तर इतिहासप्रसिद्ध पूर्वपरंपरेला अनुसरून, क्षत्रिय मराठ्यांच्या कल्पनेलाहि शिवले नसतील, असे स्वार्थत्याग केवळ मागासलेल्या देशबांधवांच्या उद्धारासाठीं करायला आज प्रभू जात तयार आहे. सरकारी नोकरी ही काय गौडबंगाली चीज आहे व तिजमुळें कसल्या धर्तीचा आत्मोद्धार होतो, याचा अनुभव या जातीनें आजपर्यंत इतका घेतला आहे कीं, दीनदयाळ मराठे बांधवांनी त्यांना या आत्मोद्धाराच्या गर्तेतून उचकून फेकण्याचा प्रत्येक यत्न त्यांना आनंददायी वाटेल.

ब्राम्हणांप्रमाणेंच मराठ्यांनीहि कायस्थ प्रभू हे अहिन्दु, स्वार्थी, पोटासाठीं १४० लाख मागासलेल्या हिन्दूंचे गळेकापू ठरविल्यामुळें, त्यांचा प्रचलित ब्राम्हणेतर चळवळींत डोळे झांकून समावेश करणाऱ्यांचे डोळे आतां तरी उघडोत.

कावळ्यांचे शाप

ठाकरे वारले अशी बातमी दादर मुंबई कडे पसरवून कांही ब्रम्हमुखोत्पन्नांनी आपल्या जिवाचें समाधान करून घेतलें. इतकेंच नव्हे तर दादरच्या आमच्या बिऱ्हाडी जाऊन, काहीं भटी वीरानीं ही बातमी मुद्दाम कळविली. अर्थात् तीन दिवसच कां होई ना, पण आमची उलट जबाबाची तार जाईपर्यंत, प्रवोधनाच्या हितचिंतकांत बरीच खळबळ उडाली. असल्या खोडसाळ बातम्यांची उत्पत्ति कोठून कशी कां होते हें आम्ही पूर्ण ओळखतों. इतकेंच नव्हें तर

ठाकरे यांचा मृत्यू

असा मथळा वर्तमानपत्रांत पहाण्यासाठी पुष्कळ ब्राम्हण वीर वृत्तोत्सुक झालेले आहेत, हेंहि आम्ही जाणून आहोंत. ही बाजारगप्प उठतांच ''हुंड्यावरचा शनि मेला, इडापिडा गेली'' असे उद्गार एकादोघा कायस्थ वीरांनी काढण्याचे शौर्य दाखविलें. बिचाऱ्यांना त्याच दिवशीं अन्न रुचकर व गोड लागलें असेल. पण मित्रांनो, ठाकरे अशा कुत्र्याच्या मोतानें मरणारा नव्हे. मरतां मरतां हुंड्याचा मुरदा तरी पाडील किंवा पाडतां पाडतां मरेल.

प्रबोधन पुण्यास आल्यापासून येथल्या इरसाल ब्राम्हणांच्या पोटांत द्वेषाग्नि बराच धुमसूं लागला आहे. एरवीं महारा मांगांचा उद्धार करणाऱ्यांच्याहि डोळ्यांत प्रबोधन म्हणजे मुसळा एवढा वडस बाजला आहे. पहिल्या प्रथम आमच्या घरवाल्याच्या नाकांत काड्या घालण्याचे वेदोक्त प्रयत्न झाले, पुराणोक्त खटपटी झाल्या व शेवटी 'संघटणी' उचापतीहि झाल्या. पण त्या फळल्या नाहींत. या यावाबतींत आमच्या घरवाल्या मित्राला आईमाईवरून वेदोक्त शिव्याहि खाव्या लागल्या. कित्येक जबाबदार ब्राम्हणी छावण्यांत ठाकरे यांना रसातळाला नेऊन गाडण्याच्या परशुरामी प्रतिज्ञा झालेल्या आहेत.

लवकरच ओंकारेश्वरावर बेलभंडार उचलण्याचा नानाफडणिशी विधी उरकण्यांत येणार आहे. प्रबोधनाच्या निःपक्षपाती स्पष्टोक्तीवर प्रत्युत्तरार्थ विधानांचा खडखडाट उडाल्यामुळे, त्याच्या माथी पुण्यांत सध्या बोकाळलेल्या क्षुद्र वृत्तपत्री शिमग्याचें पितृत्व बळेंच लादून, आमच्या विषयीं नाना तऱ्हेच्या कुटाळ वल्गनांचा सुळसुळाट स्थानिक भिक्षुकी गटारयंत्रामार्फत सुरू ठेवण्यात आलेला आहे. 'देशाचे दुष्मन' हे पुस्तक ठाकरे यांनींच लिहून जवळकरांच्या नांवाने प्रसिद्ध केलें अशी एक गटारगप्प कज्जेदलालांचे एक अध्वर्यू एका रात्रीं कायदेवाजांच्या अड्यांत ठासठासून ओरडत होते. याविषयीं ज्ञानप्रकाश दैनिकांत आम्ही जेव्हांच्या तेव्हांच खुलासा केलाच आहे. गेलीं २० वर्षे आम्ही लेखनव्यवसाय करीत आहोंत, पण स्वत:चें लेखन दुसऱ्याचें नांवावर प्रसिद्ध करण्याची शेंदाड शिखंडीशाही या लेखणीला माहीत नाहीं. शेंदाडी संग्राम भटांनी करावा. तो त्यांना चांगला शोभतो व सफाईंत साधतो. कायस्थाच्या कलमाचें ते ब्रीद नव्हे. प्रबोधन कोणत्याहि पक्षाचा गुलाम नाहीं. लोकहितवादासाठीं तो ब्राम्हणांचे दोष पोटांत पचविणार नाहीं, किंवा ब्राम्हणेतरांच्या डावपेचांची पेकाटे सडकण्यास कचरणार नाहीं. स्वजातीच्या किंवा परजातीच्या फाजील अभिमानास बळी पडणार नाहीं. क्षुद्र स्वार्थ आणि आडपडद्याचा दंभ, मग तो कारस्थानी भटांचा असो, नाहींतर उतावळ्या भटेतरांचा असो, प्रबोधनाची कलमसमशेर त्यावर बेछुट वार करायला जगांतल्या कोणत्याहि शक्तीची तमा बाळगणार नाही.

लोकमान्यतेच्या भावनांचा प्रथम बळी दिल्यावरच ही लेखणी विवेकवादाचा निःसंदिग्ध संदेश आब्राम्हण चान्डाळांना गेली ३।। वर्षें देत आहे. सत्य, मग तें किती का कडूजहर असे ना, तें स्पष्ट सांगणें हेंच प्रबोधनाचें काम आहे. त्यापुढे लोकक्षोभाचीहि त्याला दिक्कत वाटत नाहीं. ज्यांना आमची विचारसरणी पटते, ज्यांचा विवेक आमच्या विवेकाशीं समगामी ठरतो, तेवढेच सज्जन प्रबोधन वाचतात. कित्येक मध्यंतरीहि 'प्रबोधन बंद करा' असें म्हणतात. तरीहि कार्य चालूंच आहे. आमची बिनपक्षाची व बिनसंप्रदायाची स्वतंत्र मतें वाटेल तेवढ्या लांबीरुंदीत व्यक्त करण्यासाठींच प्रबोधन मासिक व प्रबोधन मुद्रणालय या स्वतंत्र संस्था भगवंताच्या कृपेनें अस्तित्वांत आल्या आहेत, विचारप्रदर्शनासाठीं पुण्यांत उसळलेल्या हंगामी चिंधोट्या धांदोट्यांचाच आश्रय घेण्याची आम्हाला जरूर नाही. ज्यांची घोड दौडी लेखणी जनानखान्यांत ठाणबंदी पडल्यामुळें मोकाट बोकाळायला खुरकुतली असेल, त्यांनी या चिंध्या खुशाल पांघरून आपल्या मनींची हौस फेडून घ्यावी. आमची विधाने खोटी पाडता येत नाहीत एवढ्याच सबबीवर ज्यांना नुसता शिव्यागाळीचा शिमगा करावयाचा असेल, त्यांना शेकडों भटी पत्राचें रकाने रिकामे आहेत. पण टीकाच करायची असेल किंवा खटले भरून कायदेवाजीची रग जिरवून घ्यायची असेल. तर वाटेल त्याने 'ठाकरे कृत' ग्रंथांवर व लेखांवर इंडियन पिनल कोडाच्या घणांनी खुशाल माथीं फोडून घ्यावी. पण तेवढ्यासाठी गांवांतल्या छिनाल - शिमन्यांशी आमचा बादरायण संबंध जोडून पुणेकर उपव्याप्यांनी व त्यांच्या मागें लपणाऱ्या पगडीपटाइतांनीं आपल्या अकलेचा शिमगा करूं नये, एवढीच प्रार्थना आहे. मराठी नियतकालिकांच्या क्षेत्रांत अलीकडे इतक्या विलक्षण मसाल्याच्या मासल्याची रंगरूट भरती होऊं लागली आहे कीं हाच क्रम असाच अप्रतिहत चालूं राहील, तर देशाच्या सभ्यपणाच्या मोजणींत महाराष्ट्र कोणत्या पायरीवर आढळेल याची कल्पनाच करवत नाही.

ठाकरे अमर नाहींत. तें केव्हां तरी मरणार खास. या विषयीं आमची पक्की खात्री आहे. वाचकांना

आम्ही बजावून बजावून सांगतो कीं ठाकरे केव्हां तरी खास मृत्यूवश होणार. ते निसर्गकरमानें मेले, पुणेकर अचाट देशभक्तांच्या कृपेनें मारेकऱ्यांकडून मारविले गेले अगर उतास जाऊं लागलेल्या कायदेवाजीच्या फांसांत फांशी गेले, तरी आमच्या सर्व मित्र अमित्रांनी एकच गोष्ट लक्षांत ठेवावी कीं ठाकरे प्रतिपादीत असलेलीं तत्वें काळाच्या बापाला दाद देणारी नव्हेत. सदसद्विवेक बुद्धीला चटका बसल्याशिवाय आजपर्यंत एक सिद्धांतहि ज्या लेखणींतून बाहेर पडला नाही, ती लेखणी ज्या वेळीं सत्याचा मार्ग सोडून, लौकिकी लाभासाठीं व लोकमान्यतेसाठीं दांभिक व छिनाल बनेल, त्याच वेळीं तिला 'रांड' अशी शिवी हासडून तिचा कायमचा चंदामेंदा करायला हा लेखक मागेंपुढें पहाणार नाही. पण जोंपर्यंत हा दुर्दैवी प्रसंग आलेला नाहीं, तोपर्यंत सत्यप्रतिपादनाच्या कामीं हा नम्र जनसेवक प्रबोधनकार प्रत्यक्ष काळाचीहि पर्वा करणार नाही; मग मरत्या मानवांची कथा ती काय ? कावळ्याच्या शापानें ढोरें मरती, तर ब्राम्हणांच्या शापानें या वेळीं सारी दुनिया सहारा वाळवंट बनती!

***

मराठेतर ब्राम्हणेतरांची फसवणूक

ब्राम्हणेतर चळवळीला एकांगी एकजातीय वर्चस्वाचें रूप देण्यांत मूठभर मराठे पुढारी आपल्या बुद्धिकौशल्याची आपणच पाठ थोपटीत असले, तरी सर्व मराठा समाज आजच कांहीं राष्ट्रवीर जाधव ॲन्ड को.च्या मगजाचा झालेला नाही. या कंपूंतील व्यक्तींच्या वैयक्तिक महत्वाकांक्षांची भरारी कोणत्या कुंपणापर्यंत आहे, हें समजणे फारसे अवघड नाहीं. सरकारी नोकऱ्यांची शिलेदारी मिळवून हे जनसेवेची आज कितीहि बडबड करीत असले, तरी या शिलेदारीनें ही फुलपांखरे अखेर कोणत्या स्वरूपात रूपांतर पावंणार आणि यांच्या हातून समाजसेवा व जनसेवा अशी काय घडणार, याची स्पष्ट रूपरेषा पुढील अंकी मुद्देसूद अवश्य रेंखाटली जाईल. परंतु या कंपूने ब्राम्हणेतर नांवाखालीं जो चित्पावनी जातीभेद माजविला आहे, त्यामुळें मराठेतर अनेक ब्राम्हणेतर जातींची आज शुद्ध फसवणूक झालेली आहें. ब्राम्हणेतर चळवळीमुळें आपला झाला तर कांही आत्मोद्धारच होईल असें जें या जातींना वाटत होतें, तो आतां त्यांचा भ्रम ठरू पहात आहे. नुसत्या आंधळ्या अनुयायीत्वावर मूठभर मतलबी शहाण्यांना निष्कारण डोक्यावर घेऊन नाचणारे शेळपट लोक आता कोणत्याहि लहान मोठ्या जातींत उरलेले नाहींत. अज्ञानामुळें किंवा अल्पसंख्येच्या धास्तीमुळे कोणाला स्पष्ट बोलण्याचे धारिष्ट करवलें नाहीं, म्हणून त्यांची मूकवृत्ति ही प्रतिनिधित्वाच्या सनदेची संमति असें कोणी शहाण्यानें कितीहि मानलें, तरी आतां याहि जाती आतांपर्यंतच्या अनुभवानें शुद्धीवर आल्या नाहीत किंवा येणारच नाहींत, असे मानणें मूर्खपणाचें आहे. ठिकठिकाणी चाललेले प्रकार पाहिले तर या सर्व मराठेतर ब्राम्हणेतर जाती एक तर मराठ्यांना वगळून आपला निराळाच सवता सुभा स्थापन करतील अगर आपल्या जाती पुरताच आत्मोद्धाराचा आकुंचित मार्ग आखून घेतील. ब्राम्हणेतर नांवाखालीं स्वजातीवर्चस्वाचे गुप्त यत्न करण्यांत जाधव प्रभृति मराठे पुढारी खऱ्याखुऱ्या जन संघाची घटना उध्वस्त करीत आहेत. मागासलेल्या जातींत मराठ्यांची लोकसंख्या जितकी अफाट, तितकीच त्यांची जागृतीहि मोठी कौतुकास्पद आहे. अशा बहुसंख्य समाजानें जातिवर्चस्वाचे भटी बाळकडू न पितां अखिल ब्राम्हणेतर जातींचा आत्मोद्धार करण्याचें हातीं आलेलें निःस्वार्थी पुण्यकार्य असल्या तुसड्या प्रवृत्तीनें लाथाडून टाकणे हा निवळ आत्मघात आहे.

असें आम्ही त्यांना निक्षून सांगतों. रागालोभाची पर्वा प्रबोधनाला मुळींच नाहीं. मागासलेल्या जातींच्या मूक अवस्थेचा फायदा घेऊन आपली स्वत:ची लोकमान्यता पिंवळी करून घेणारे ब्राम्हण असोत, मराठे मसोत, कायस्थ प्रभू असोत, नाहींतर आणखी कोणी असोत, प्रबोधन त्यांचा मुलाजा राखणार नाहीं. ब्राम्हण ब्रम्ह मुखोत्पन्नच असल्यामुळें स्वसमाजाची काळजी करण्यास व स्वतःच्या हक्कांसाठीं देशाचीहि मान कापण्यास ते सर्वसमर्थच आहेत. प्रश्न उरती अखिल ब्राम्हणेतर बहुजनसमाजांचा. यांचा आत्मोद्धार कसा होईल, कसा करावा, याचीच आजपर्यंत आजपर्यंत प्रबोधन चर्चा करीत आला आहे. या लोकहितवादांत स्वजातिवर्चस्वाचा गुप्त सुरुंग उडविण्याची कोणी कारवाई करील, तर त्याची प्रबोधन मुळींच पत्राजा राखणार नाहीं. ना. जाधव प्रभृतींच्या आत्मस्तोमी सर्व खटपटी आम्हांला पूर्ण माहीत आहेत. त्यांच्या नामदारीला प्रबोधन केव्हाच बाचकणारा नव्हे. हा कंपू ब्राम्हणेतर नांवाखाली केवळ मराठा जातीचेंच वर्चस्व मराठेतर ब्राम्हणेतर समाजांवर लादण्याच्या प्रयत्नांत गढलेला असतो, असा आमचा उघड उघड आरोप आहे. छाती असेल तर पुढें या. मुद्दा पुराव्यानिशी पापाचें माप भरपूर मोजून पदरांत घालायला प्रवोधन तयार आहे. मराठेतर ब्राम्हणेतर जातीनीं यापुढें आपल्या आत्मोद्धाराचा मार्ग चोखाळतांना विशेष दक्षतेने पुढें पाऊल टाकावें, असा आमचा स्पष्ट इषारा आहे, जातिभेदाच्या व आत्मस्तोमाच्या दृष्टीनेच चळवळी करावयाच्या तर त्यासाठीं 'ब्राम्हणेतर' नांव कशाला? ती नाटकी पार्टी कशाला? तीं अप्रातिनिधिक डेप्युटेशनें कशाला? आणि महात्मा फुल्यांचे नांव बद्दु करणारी ती सत्यसमाजाची ओढणी कशाला? खुशाल मराठा संघ स्थापन करून उघड माथ्यानें समाजोन्नति करा. आम्ही तुमचें कौतुकानें अभिनंदन करूं. जात्युन्नंतीचे यत्न कां करू नयेत? अलबत करावे. पण त्यासाठी भटी सार्वजनिकपणाचा दांभिक-पडदा कशाला हवा?

□□□

लेख

कलम, समशेर आणि तागडी

दिसायला किती लहान वस्तू, मूर्ति लहान पण कीर्ती? आकाशाला गवसणी घालण्याइतकी अचाट आणि अफाट. तिचें तें अणकुचीदार टोंकच पाहिलें तर त्यांत कांहीं आश्चर्य वाटत नाहीं. पण तेथेंच जगांतल्या सर्व आश्चर्यांचा महासागर सामाऊन बसला आहे. जगांतल्या माणुसकीचा जन्म येथेंच आणि जन्माला येऊन माणुसकीनें जगाला जगविण्याची शक्तीहि येथेंच. ज्या ज्ञानानें माणसाला माणुसकी दिली त्याचा अखंड खजिना येथेंच आणि नराचा नारायण बनविण्याची गुरुकिल्लीहि येथेंच. केवळ स्पर्शमात्रानें लोखंडाचें सोनें करणारा परीस, ही केवळ कल्पना असली, तरी संकार होतांच पशूंचीं माणसें व आंधळ्यांचे धडसे करण्याचें चैतन्य लेखणीच्या टोकांत खास आहे. देवी सरस्वतीचें निवासस्थान हेंच. येथेंच ती क्रीडा करते. तिच्या विश्वमोहक दिलरुब्याचा झणत्कार येथेंच झणाणतो. तिच्या राजहंसाचा कलध्वनि येथेंच त्या झणत्काराला मंजुळ ध्वनीची साथ देतो. नादब्रह्मानें मोहित होऊन तिच्या भोंवतीं नृत्य करणाऱ्या मयुराची केका येथेंच प्रस्फुरण पावते. मानवाच्या आत्मज्ञनाचीं किरणें येथूनच निघाली व सर्व जगभर विस्तारली. जगाच्या सुधारणेची गंगा याच मानससरोवरांतून उगम पावली. जन्मत: मनुष्यप्राणी आणि पशू यांत कांहींच भेद नसतो. हाताचा व लेखणीचा संस्कारयोग घडला म्हणजेच माणसाला माणुसकीचा अधिकार प्राप्त होतो. लेखणी हातांत घेऊन-

श्रीगणेशायनम:

श्रीसरस्वत्यैनम:

ॐ नम: सिद्धम्

हीं मंगलाक्षरें मुलाच्या हातून काढवितांच तोच त्यांचा उपनयनविधि, तोच त्यांचा द्विजत्वाचा संस्कार आणि तेंच त्यांचें माणुसकींत परावर्तन. वरवर पहाणारांना लेखणीच्या टोकांतून शाईचा प्रवाह वहात आहेसा दिसतो; पण त्या प्रवाहांत अनेक चमत्कारांचीं माणिक रत्नें खच्चून वहात असतात. मानवांच्या प्रगतीला कारण झालेल्या बुद्धिमत्तेचे कोंब प्रथम याच चिमुकल्या जागेंत थरारले व शाईच्या वहात्या ओघाबरोबर अवघ्या दुनियेभर भरारले. 'एकम् सत्' हा सनातन सिद्धांत विचार-क्षेत्रांत जरी जन्माला आला, तरी आचार क्षेत्रांतला त्याचा विश्वव्यापी संचार कलमाच्या टोकानेंच केला. स्फूर्तीच्या

ताळेबंद नर्तनांत निर्माण झालेलं ऋग्वेदाचें प्रचंड काव्य आर्यांनीं सुखाद्भुत करून कांहीं काळ जरी जिवंत राखलें, तरी त्या प्रतिभावान् दिव्य वाङ्मयाला चिरंजीव करण्याचें श्रेय अखेर लेखणीलाच मिळालें. वसुंधरेच्या नाना रत्नांच्या खजिन्यांत जर लेखणी ही एकच चीज नसती, तर तो सर्व रत्नसमुच्चय आज कवडीमोलाचा ठरला असता. 'आम्ही प्रगमनशील' म्हणून मानवांना जो अभिमान वाटतो, त्या प्रगतीचा ताळेबंद इतिहास कोणी जिवंत राखला? अर्थात् कलमानें, आत्मानात्म विचारांचा ऊहापोह जगाच्या अंतापर्यंत का चाले ना; परंतु त्यांची जन्मभूमी जीं उपनिषदें त्यांना शुद्ध स्थितींत चिरंजीव राखण्याचें पुण्य कार्य लेखणीच्या नांवेच जमेला पडलेलें आहे. पूर्वी आम्ही कोण होतो, आज कसे आहों आणि पुढें आमचें काय होणार, या प्रश्नांचीं उत्तरें बिनवाचकतां खडाखड देणारा इतिहास जर लेखणींतून अखंड वहाणाऱ्या अमृतानें अमर केला नसता, तर आज आमच्या प्रगतीचें मापन आम्हांला बिनचूक करतां आलें असतें काय? खात्रीनें नाहीं. मानवांच्या प्रगतीचा इतिहास प्रत्यक्ष रंगवून लक्षावधि वीर वीरांगनाचे देह या पृथिवीतलावरून नष्ट झाले, हजारों धर्मोद्धारक व समाजसुधारक आपल्या स्वार्थत्यागानें आम्हां मानवांच्या चारित्र्याचें रूप उत्करांत करून कालपटलांत अदृश्य झाले आणि कोट्यवधि नराधमहि आपल्या चाण्डाळ कर्मांनीं मानवतेला त्रस्त करून मृत्यूवश झाले. देहानें जरी ते नष्ट झाले, तरी त्यांचीं बरीवाईट चारित्र्य-चित्रें भावी मानवतेच्या जीवन-नियंत्रणासाठीं लेखणीनेंच अजरामर करून ठेविली आहेत. सरस्वती देवीच्या प्रेरणेनें व्यासमुखीचा 'जय' ग्रंथ मुद्रांकित करण्यासाठीं लेखणीनें अगदीं पहिल्या प्रथम गणेशदेवाच्या हातीं प्रवेश केला व 'जय' ग्रंथ लिहून काढला. लेखणीचा 'श्रीगणेशा' जयानें झालेला आहे. त्या जयाच्या मागें सरस्वतीची कृपादृष्टी, व्यास महर्षीची विशाळ विचारसृष्टी आणि गणांचा ईश, जनतेचा जनार्दन, संघशक्तीचा ईश, जो विद्यादाता त्याची अमर्याद लेखनकौशल्याची वृष्टी, अशा त्रिवेणी सगमांत या लेखणीच्या जीवनक्रमाला प्रारंभ झालेला आहे.

लेखणी ही एक शक्ती आहे. मानवतेची प्रगति अखंड रहावी, सद्धर्माची ज्योत सतत प्रज्वलित तेवत रहावीं आणि व्यक्तींच्या आत्मोद्धारा बरोबरच राष्ट्रोद्धार व्हावा, एवढ्या साठींच या दिव्य शक्तीचा थोर थोर महात्म्यांनीं उपयोग केला. संतांनीं काव्यें लिहिलीं, इतिहासकारांनीं इतिहास लिहिले, कवींनीं आपल्या प्रतिभांना मूर्त केल्या आणि चिकित्सकांनीं आपले चिकित्सक प्रबंध निर्माण केले, त्या सर्वांत हा एकच हेतू प्रधान असे. लेखन-कौशल्याचा उपयोग स्वार्थासाठीं, आत्मस्तोमासाठीं किंवा लौकिकी लाभासाठीं करणें हा त्या दैवी शक्तीचा दुरूपयोग होय. हा शक्तीचा उगम सरस्वतीच्या कृपेंतून होतो. ही कृपा संपादण्यासाठीं जन्मानुजन्म स्वाध्यायाची तपश्चर्या करावी लागते. कवि जसा 'जन्मावा लागतो' तसा गद्यलेखकहि 'जन्मजात' 'जातीवंत' असावा लागतो. सत्यप्रतिपादन हे त्याचें ब्रीद. या ब्रीदाशीं त्यानें यत्किंचितहि प्रतारणा केली कीं तो योगभ्रष्ट समजावा. मानवतेचा शक्य तितका आत्मोद्धार व्हावा म्हणून निःस्पृहतेनें विचार-प्रदर्शन करतांना, सत्य व सनातन तत्त्वांच्या प्रतिपादनामुळे लोकमान्यतेच्या बाजारांत मूर्ख पाखंडी धर्मद्रोही समाजद्वेष्टा म्हणून कावडी किंमतीलाहि लिलावांत कोणी विचारलें नाहीं तरी हरकत नाहीं; परंतु सरस्वतीच्या कट्ट्या शागीर्दानें क्षुद्र लौकिकी बोलावल्यासाठीं अगर इंद्रधनुष्याप्रमाणें अखंड बदलत असणाऱ्या लोकमताची चाड राखण्यासाठी आपल्या लेखणीला व्यभिचारी बनविणें हें मातृगमना इतकेंच चिळस आणणारे कर्म आहे. मानवतेचा बुद्धिविकास व सनातन सत्य तत्वांचा पुरस्कार हें एकच ध्येय आजपर्यंत प्रत्येक प्रामाणिक सरस्वतीभक्तीने प्राणैर्कण्ठैर्गतेरपि

पाळलें, म्हणूनच व्यास ज्ञानेश्वर समर्थ मुक्तेश्वर मयूरादि महर्षि शारदा देवीच्या उपवनांत चिरंजीव विहार करीत राहिले.

मानवतेच्या उद्धाराचीं आधुनिक युगांत दोनच अस्त्रें आहेत. कलम आणि समशेर. हीं दोनहि शस्त्रें दुधारी असल्यामुळें त्यांचा इतिहास बरा आणि वाईट अशा दोनहि प्रकारचा आढळतो. दोघांचा उद्देश एकच. परंतु शस्त्रधाऱ्याच्या कच्च्या पक्क्या कुवतीप्रमाणें आणि ठिसूळ, भरीव प्रवृत्तींप्रमाणें त्या उद्देशांचा चांगला वाईट परिणाम होत असतो. या परिणामांतच माणसांच्या माणुसकीच्या नानाविध तरंगांची पारख विचारी द्रष्ट्यांना दिसून येत असते. कलम आणि समशेर हीं अन्योन्यावलंबी असलीं पाहिजेत. कलमसंन्यास झाला कीं नुसत्या समशेरींचा पराक्रम कसा वांझोटा ठरतो, हें मऱ्हाठी राज्याच्या इतिहासांत पहा. समशेरसंन्यास झाला कीं नुसत्या कलमाची खर्डेघाशी मानवतेला बुद्धिभ्रष्टेतच्या व पोकळ बडबडीच्या कसल्या नरकांत पिचवते, हें वर्तमान स्थितीवरून अजमाऊन घ्या. आणि कलम-समशेरीची सव्यसाची कुशलता महायुद्धाच्या ज्वालामुखींतूनहि साम्राज्याचा बचाव कसा बोल बोलतां करते, हें इंग्लंडच्या वर्तमान चारित्र्यावरून नीट पडताडून पहा. लेखणी सरस्वतीची, तर समशेर लक्ष्मीची. लक्ष्मी सरस्वतीची जोडी एकत्र टिकविण्यासाठीं प्रत्येक राष्ट्रानें कलम-समशेरीचें सव्यसाचीत्व पटकविल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. लेखणीचा विचार तलवार आचारांत आणते आणि तलवारीच्या आचाराचा लेखणीच पुरस्कार करते. एकांगी कलमबहाद्दर आणि एकांगी समशेरबहाद्दर वास्तविक कसलीच घटना घडविण्यास असमर्थ असतात. केवळ एकट्या लेखणीवर किंवा एकट्या तलवारीवर कोणतेहि राष्ट्र समाज किंवा व्यक्ती आपले अस्तित्व टिकवून धरूं शकत नाहीं; मग आत्मोद्धाराची गोष्ट कशाला? कलम आणि समशेर या दोन शक्ती एकजीव होतात, तेव्हांच अघटित वाटणाऱ्या घटना घडतात, अशक्यताचें शक्यांत रूपांतर होते आणि मातीच्या चिमटींतून साम्राज्यें निर्माण होतात. या दोन शक्तींची फारकत झाली किंवा केली कीं अध:पात ठेवलेलाच म्हणून समजावा. वरवर पहाणारांना कलमवारी खेर्डेघाशा खड्गधारी लढवय्यापेक्षां अधिक सुखी व भाग्यवान वाटतो. कलमधारी काळ्या कुळकुळीत शाईच्या पुटांत गादीवर लोळतो, तर तलवारधारी लढवय्या जीवावर तुळशीपत्र ठेऊन रक्ताच्या पाटांत समरभूमीवर मरतो. पहिला बुद्धीच्या कसरती करतो, तर दुसरा 'मारीन नाहीतर मरेन'च्या सौद्यासाठीं समरभूमीच्या खडतर अंकावर लोळण घेतो. पण या दोघांमध्ये जर एकवाक्यता नसेल, ध्येयाची एकजिनशी तळमळ नसेल आणि अन्योन्यावलंबी सव्यसाचीत्व नसेल, तर त्या दोघांचेहि पराक्रम फोल ठरतात. हा सिद्धांत स्पष्ट करण्यासाठी चांद्रश्रेणीय कायस्थ प्रभू व मराठे या दोन समाजांचेच उदाहरण घ्या.

शिवकालापूर्वी कायस्थ प्रभू समाज अल्पसंख्य असतांहि तत्कालीन् तुरळक तुरळक पसरलेल्या राज्यांतून कलम-समशेरीच्या दुधारी शस्त्राला सव्यसायचीत्वानें परजण्याची उजळणी घेत होता; म्हणून प्रत्यक्ष राज्यकारभारांत त्यात वांव मिळालेला दिसतो. शिवाजीचा उदय होतांच त्याचें लक्ष प्रथम याच चिमुकल्या कलम-समशेर-प्रवीण समाजानें वेधून घेतलें. शिवशाहींत तर या समाजानें लेखणीच्या अगदीं बरोबरीनें तलवारीहि गाजविली, म्हणूनच त्याला महाराष्ट्रांत विशेष अस्तित्व प्राप्त झालें. शिवशाहींतील कायस्थ प्रभूंची राष्ट्रसेवा कलमसमशेरीच्या संयोगांत चमकली. आज आंग्रेज बहाद्दरांच्या महाकृपेनें अखिल हिंदुस्थान समशेर-संन्यासी झाल्यामुळें, हा समाज सध्यां एकट्या

लेखणीच्या दांड्यावर जगण्याची धडपड करीत आहे. नुसत्या कारकुंडेगिरींने किंवा खर्डेधाशीनें आत्मोद्धार होणें कसें शक्य नाहीं, हें या समाजाच्या विद्यमान चारित्र्यावरून खासें समजण्यासारखें आहे. केवळ जगायचें म्हणून जगणें आणि अस्तित्व टिकवायचें म्हणून टिकविण्यासाठीं माणसाचाच जन्म नको आहे. तत्व एवढेंच घ्यावयाचें कीं देशाच्या सर्वांगीण आबादीच्या सबबीखाली आंग्रेज बहाद्दरांनीं जी शस्त्रसंन्यासाची मुसळधार कृपावृष्टी या भरतखंडांत पाडली, तींत अनेक इतर समाजांप्रमाणेंच या कायस्थ प्रभू समाजाची कौतुकास्पद कर्तबगारी करपून गेली; आणि आजला हा समाज कलमबहाद्दर असूनहि समशेरीच्या फारकतीमुळें कारकुंड्या उपासमारीचें नाटकी ऐश्वर्य भोगीत आहे.

आतां मराठा समाजाकडें पहा. मूळचा हा शेतकरी वर्ग. अझूनहि महाराष्ट्राच्या अन्नधनोत्पादक शेतकीचा अधिकार व अभिमान याच समाजानें जिवंत राखला आहे. शिवकालापूर्वी कांही बुद्धिवान् मराठे नांगर टाकून तलवारबहाद्दर व स्वतंत्र राजे बनले, तरी समाजशस्त्र क्षात्रकर्माची संधि शिवकालापूर्वी या समाजाला फारशी लाभली नाहीं. असें म्हणण्यास हरकत नाहीं. शिवकालाचा उदय होतांच या समाजानें नांगराबरोबरच तलवारीला हात घालला. लक्षांत ठेवा, नांगर टाकून तलवार उचलली नाहीं. कायस्थ प्रभूंनीं लेखणीला जशी तलवारीची जोड दिली, तशी मराठ्यांनीं नांगरालाहि तलवारीची जोड दिली. शिवाजीच्या अभेदभावी व चाणाक्ष लोकसंग्रही प्रवृत्तीमुळें लेखणी समशेर आणि नांगर या तीन शक्तींचा बेमालूम मिलाफ होतांच हिंदूंचे हिंदवी स्वराज्य कल्पनेच्या क्षेत्राचा त्याग करून मूर्तिमंत अस्तित्वांत आले. शस्त्रसंन्यासाचा आंग्रेजी महाप्रसादानें कायस्थांच्या हातीं जसें बोरूचें कांडरूंच शिल्लक राहिलें, त्याचप्रमाणें मराठ्यांच्या हातीं फक्त नांगराचा फाळच काय तो शिल्लक उरला आहे. तात्पर्य, दोघांच्या हातीं बाकी उरलेल्या लेखणी व नांगर या दोन एकलकोंड्या शक्ती वास्तवीक एकेकट्या बिनजोरच असल्यामुळें हे दोनहि विशिष्ठ कर्तबगारीचे समाज आज आत्मोध्दाराला व राष्ट्रोध्दाराला सर्वस्वीं असमर्थ होऊन बसले आहेत.

मराठा समाजांतल्या वर्तमान जागृतीचा ओघ पाहिला तर त्याचीहि दिशा सर्वस्वीं बिनचूक नाहीं. ते एका चुकीच्या मोहाला बळी पडत आहेत. त्यांच्या हातांत आज तलवार नाहीं आणि ती नाहीं म्हणून इतर सर्व शक्तींचा कांहीं उपयोग नाहीं, हेंहि त्यांना कळलेलं दिसत नाहीं. साक्षरतेच्या अभावानें त्यांची अनेक शतकें झालेली व होत असलेली अधोगति थांबविण्याचे त्यांचे प्रयत्न योग्य मार्गानें होत आहेत, यांत संशय नाहीं. परंतु साक्षरताप्राप्तीच्या महत्त्वाकांक्षेच्या उसाळींत ते नांगराला कायमचा रामराम ठोकून लेखणीच्या खर्डेधाशी साठींच जर ध्येयाची धडाडी एकवटतील, तर थोड्याच काळांत ते ब्राह्मण प्रभू वगैरे समाजांप्रमाणेंच सुशिक्षित हतबलेच्या बुभुक्षित गर्तेत घसरतील. महाराष्ट्रांतील यच्चावत् समाजांनीं, नव्हे प्रत्येक स्त्री पुरुषानें, पूर्ण साक्षरच काय पण पूर्ण विद्यासंपन्न झालें पाहिजे. परंतु या विद्यासंपन्नतेचें ध्येय मात्र सरकारी नोकरी ऊर्फ कारकुंडेगिरी असूं नये. हल्लीं साक्षर होत असलेल्या मागासलेल्या वर्गांतील तरुणांपुढें, त्यांचे पुढारी ठेवीत असलेले सरकारी नोकरीचें ध्येय बाह्यत: कितीहि मोहक दिसत असलें, तरी अतीं ते आत्मघातकी आहे, असें आम्ही अनुभवानें सांगतो. साक्षरतेचा चुटपुटता संस्कार जर आतांच मराठे तरुणांत नांगराचा आणि शारिरीक कष्टाचा तिटकारा उत्पन्न करीत आहे, तर पुढें, इतर पुढारलेल्या (?) ब्राह्मणादि पोषाकी तरुणांप्रमाणें भावी मराठा समाज कागदी पेहलवान झाल्याशिवाय राहणार नाहीं. साक्षरतेचा व उच्च शिक्षणाचा ओघ शेतीसुधारणा व

लष्करी ज्ञानप्राप्तीकडे जर न वळेल; म्हणजे लेखणीचा नांगरांत व समशेरींत जर यथाप्रमाण मिलाफ न होईल, तर मराठा आपल्या इतिहासप्रसिद्ध मराठपणापासून पदच्युत व्हायला वेळ लागणार नाहीं. भावी काळ इतक्या भयंकर जबाबदारीच्या काट्याकुट्यांनी भरलेला आहे कीं मराठा समाज जर क्षात्रकर्मांत कमजोर होईल, अन्नधनोत्पादक अशा शेतीची उच्च शिक्षणसंस्कारानें जोपासना करण्यास असमर्थ ठरेल, तर समाजश: त्याचा अध:पात तर होईलच होईल, पण महाराष्ट्र सुद्धां अखेर रसातळाला जाईल. विचारवंतांनीं या आमच्या इशाऱ्यांचा विवेकानें नीट विचार करावा.

ज्या राष्ट्राच्या हातीं तलवार नाहीं, त्या राष्ट्राला गुलामगिरीशिवाय दुसरें भाग्यच नाहीं. हल्लीं जगांत शांततेची आणि युद्धनिर्मूलनाचीं पुराणें फार सवेग बोकाळलीं आहेत. पोलादी तलवार कायमची नष्ट करून तिच्या जागीं लेखणीची पोलादी बोथी स्थापन करण्याची शेखी मिरविणारे मुत्सद्दी तलवारीच्या पोलादीं पात्यानेंच शांतीची शांतिसूक्तें गात असतात, इकडे आपण दुर्लक्ष करतां कामां नये. युद्धजन्य रक्तपाताला आळा घालण्याचीं प्रवचनें लेखणींतून कितीही जन्माला येत असली, तरी स्वार्थाची भूक शमविण्यासाठी तलवारीच्या पात्याचाच थैमान रात्रंदिवस सर्वत्र चालूं आहे. शांतीचीं प्रवचनें गुलाम राष्ट्रांसाठी असतात; स्वतंत्र राष्ट्रें आपल्या स्वातंत्र्यासाठीं तलवारीलाच परमेश्वर म्हणून पूजतात; ही बारीकशी मेख गुलामांना उमगत नाहीं, म्हणूनच ते गुलामगिरींत आनंद मानतात. मिसेस बाल्फोर एका ठिकाणीं म्हणतात की ''पूर्वीच्या काळचे लोक युद्धाच्या धुमश्चक्रींत व तोफांच्या घनदाट धुरांत आपल्या हातांतील पोलादी पातें परजून विजय संपादन करीत असत. हल्लींचे लोक आपल्या ग्रंथसंग्रहालयांच्या शांतिपूर्ण दालनांत बसून, आपल्या हातांतील पोलादी बोथीनें मोठमोठ्या राष्ट्राचें व महायुद्धांचे नियंत्रण करीत असतात. भूतकाळचें पोलाद म्हणजे तलवार, वर्तमान काळचें पोलाद म्हणजे लेखणीची बोथी.'' मॅसिडोनच्या फिलीप राजाची एक गोष्ट अशीच मोठ्या अभिमानानें सांगतात. याला एक युद्धांत एक अनपेक्षित मोठा विजय मिळाला. पण त्यानें तो आनंदी न होतां दु:खी झाला. दु:खाचें कारण विचारतां तो म्हणाला ''हाय हाय! तलवारीनें संपादन केलेले यश तलवारीनेंच गमविण्याची पाळी येते.'' असले उद्‌गार नेतृत्वाच्या महत्त्वाकांक्षेनें सदैव फुरफुरलेली राष्ट्रें आपल्या कोवळ्या पिढीला शिकवितांना फार काळजी घेतात. हीं पुराणें तात्विकदृष्ट्या कितीहि कल्पनारम्य असलीं, तरी प्रत्यक्ष व्यवहारांत 'जगावें की मरावें' या प्रश्नाचें उत्तर सोडवायला लेखणीच्या जोडीनेच तलवार नसेल, तर 'मरावें' या उत्तरांतच आपला भविष्यकाळ ठरलेला समजावा. लेखणीं बुद्धीची तलवार वीर्याची आणि तागडी धनकनक संपन्नतेची आद्यदेवता आहे. लेखणी + तलवार + तागडी = स्वतंत्र साम्राज्य. हें गणित सनातन आहे. ते अविनाशी सत्य आहे. या तीन शक्तींची इंग्लंड उपासना करीत आहे, म्हणूनच ऋद्धिसिद्धी त्याचे पायपोस पुशीत बसल्या आहेत.

आज हिंदुस्थानच्या हातांत तलवार नाहीं आणि तागडीहि नाहीं. या दोनहि शक्तींचा मक्ता मायबाप दयाळू इंग्रेज सरकारनें घेतला आहे. लेखणीच्या बरोबरीनें तलवार व तागडी पेलण्याची हिंमत व कौशल्य आमच्यांत मुळींच नाही असें नाहीं. परंतु या हिंमतीचा व कौशल्याचा बिकट प्रसंगीं कच्च्या मालाप्रमाणें उपयोग करून घेण्याचा मक्ता आम्हीच 'राजीखुषीनें व अक्कलहुषारीने' इंग्रेज बहाद्दरांना कंत्राट-खरेदी दिल्यामुळें, सध्यां फक्त लेखणीच्या कुरकुरीचे चुरमुरे फांकण्यांतच आमच्या मानवी जीवनाच्या साफल्याचा मोक्ष ठरून बसला आहे. ब्राह्मण कारकून, क्षत्रिय कारकून आणि वैश्यसुद्धां

कारकूनच, म्हणजे लेखणीदांडेबहाद्दर! सगळेच जेथे कारकुंडे तेथे राष्ट्रोद्धाराच्या व स्वराज्याच्या वल्गना म्हणजे जिव्हारीं पाडलेल्या जखमांवर मिठाचें पाणी हबकून, वर हसडलेली शिवी ऐकण्याइतकाच प्रसंग नव्हे काय? ब्राह्मण्याची, क्षत्रियत्वाची आणि वैश्यत्वाची पोकळ मिजास मारणाऱ्या लोकांच्या टोळधाडी कितीहि असल्या, तरी सर्वांचें जीवन आज कारकुंडेगिरींत, म्हणजे नुसत्या लेखणघाशीवर चाललेलें आहे. सगळेच बुद्धीचे उपासक. सर्वांचीच ओढ लेखणीकडे. इतर शक्तीसाधनांचा विचारच कोठें नाहीं. बुद्धीबळाच्या कागदी पटावर या अक्कलबहाद्दरांनी अकलेच्या गोलांट्यांवर कसल्याहि डावाची प्रतिस्पर्ध्यांवर मात केली आणि प्याद्यांना फर्जी केले. तरी त्यामुळें राष्ट्राच्या प्रत्यक्ष भवितव्येवर कसला परिणाम होणार? केवळ बुद्धिबळाच्या कागदी कापडी किंवा लाकडी पटावरील राजांच्या किंवा राज्यांच्या उलथापालथीनें जर राष्ट्रोद्धार होता, तर सांगलीचा बुद्धिबळपटू खाडीलकर किंवा शतावधानी बापट यापूर्वीच हिंदुस्थानचा बादशहा म्हणून मिरवला असता! सारांश, लेखणी कितीहि पराक्रमी असली, तरी तिला जर तलवार तागडींचा पाठिंबा नसेल, तर ती प्रस्तुतच्या लेखासारखे शेकडों लेख प्रसविण्यापलीकडे विशेष काहीं करूं शकणार नाहीं. हें तरुण महाराष्ट्रानें विचारांत घेऊन, आपल्या स्वाध्यायाची दिशा ठरवावी.

□□□

लेख

धर्मक्रान्तीसाठीं बण्डाची तयारी

हिन्दु जनांचा जो सर्व बाजूंनी ऱ्हास व अध:पात झाला आहे व आजहि जो वाढत्या प्रमाणावर सुरू आहे. त्याला खरें कारण त्यांचा नासका कुझका धर्मंच होय. धर्माला आम्ही तळहातावरच्या फोडाप्रमाणे मानतो. पण फोड झाला तरी केव्हांना केव्हां तरी फोडावाच लागतो; मग तो तळहातावरचा असो, नाहीं तर थेट तळपोटातला असो. त्याची कींव करून भागणार नाहीं. नाहीं तर या नाजूक फोडाला सर्व शरीराचा बळी द्यावा लागेल. फाजील धर्माभिमानी म्हणतात कीं धर्मापुढें देहाची काय पर्वा? कबूल. पण दहाचा बळी देण्याइतकी तरी धर्माची लायकी व त्याची शुद्धता जिवंत आहे कीं नाहीं, हे तरी पहाल कीं नाहीं? कीं धर्म धर्म म्हणून कसल्या तरी फिसाटावर देहाची कुरबानी करणार? शिवाय, एवढें जर धर्माला मोठें महत्त्व देतां, तर देहाचा नाश झाल्यावर धर्माला काय चाटायचें आहे? व्यक्तिविषयक स्वार्थाची ही दृष्टी बाजूला ठेवली आणि केवळ व्यक्तीच्या आत्मयज्ञावर धर्माची अब्रू सांवरून धरली, तर तो धर्म तरी निदान असा पाहिजे कीं जो मानवतेचा अभेद भावानें आत्मोद्धार करील.

हिंदुधर्माचें आजचें स्वरूपच असें आहे कीं त्याचा नायनाट केल्याशिवाय हिंदु जनांचा आत्मोद्धारच होणें शक्य नाहीं. आज प्रचलित असलेल्या धर्मकल्पना इतक्या घाणेरड्या, क्षुद्र आणि बेजबाबदार आहेत कीं त्यांना आमूलाग्र उखडून टकाण्यासाठीं बण्डाचीच तयारी करणें आवश्यक आहे. प्रचलित धर्माच्या स्वरूपाचा व आचारणाचा निर्लज्ज गुलामांशिवाय इतर कोणालाहि अभिमान वाटणें शक्य नाहीं. धर्म कसाबसा जगवायचा म्हणून जगविण्याची धडपड, लाडक्या म्हाताऱ्या आईचें लोणचें घालून ठेवण्याइतकेंच मूर्खपणाचें आहे. हिंदुधर्म पूर्वी असा होता आणि तसा होता, त्याचें तत्त्वज्ञान आकाशाला गवसणी घालील, मोक्षाची मख्खी त्यानेच प्रथम उमगून काढली, वगैरे वलग्नांवर अत:पर हिंदुजनांचा तरणोपाय नाहीं. आजचा हिंदुधर्म असा पाजी व हलकट आहे कीं हिंदुजनांना हिंदू म्हणून जगायचे असेल, तर या प्रचलित

धर्माचा प्रथम खून

पाडला पाहिजे. वेदांत सनातन तत्वांचा महासागर असेल, उपनिषदांत आत्म्याच्या आदिअंताचे बिनतोड पृथ:करण असेल नाहीं कोण म्हणतो? पण आजच्या धर्मांत वेदहि नाहींत आणि उपनिषदेंहि

नाहींत. आम्ही सनातनिष्ठ म्हणून बोलभांडगिरी करणाऱ्यांचें आचरण व जीवन कसल्या सनातन तत्वांवर चाललें आहे तें त्यांच्याच जिवाला माहीत! आजचा हिंदुधर्म हा मुळीं धर्मच नव्हे. ही एक सैतानी महामारी आहे. ही एक प्राणघातक रक्तपिती आहे. हा एक गुलामगिरीचा सापळा आहे. माणसांना जनावरें बनविण्याची ही एक राक्षसी कला आहे. गुलामांचा पांजरापोळ बनविणाऱ्या कैदखान्याचा हा कांटेरी कठडा आहे. माणसांच्या मनाला ठेचण्याचा हा एक प्रचंड पाटावरवंटा आहे. दयामाया नसलेला हा एक सूळ आहे. न्यायबुद्धीचा लवलेश नसलेला हा एक फांस आहे. स्पर्श होतांच सेन्याची माती, अमृताचें वीष आणि दुधाचें मद्य बनविणारें हे एक भयंकर पातक आहे. असल्या धर्माच्या नावाखालीं चाललेले अत्याचार बिनबोभाट सहन करणारे अवघ्या जगांत एकटे हिंदूच. म्हणूनच या धर्माला हिंदुधर्म ऊर्फ निलाजऱ्यांचा धर्म असे नाव मिळालें आहे. हा धर्म एवढा पराक्रमी आहे कीं या ज्या राष्ट्राला चुटकीसरसें मातींत जावयाचें असेल, आपलें स्वातंत्र्य गमाऊन अक्षय गुलामगिरींत लोळावयाचें असेल आणि माणसं असूनहि पशूंप्रमाणे आचारविचार पाळावयाचे असतील, त्यानें या धर्माची दीक्षा घ्यावी. पाश्चिमात्य राष्ट्रें आधिभौतिक आणि मी मात्र आपादमस्तक आध्यात्मिक, अशी शेखी मिरवणारा हा धर्म इतक्या उलटसुलट व परस्पर विरोधी सूत्रांनीं गजबजलेला ऊर्फ चिडचिडलेला आहे, कीं पाश्चिमात्य राष्ट्रें हॉवित्झर तोफांच्या सरबत्तीनें जर देशच्या देश उजाड करीत असले, तर हा धर्म नुसत्या पुस्तकी सूत्रांनीं कोट्यवधि धर्माबांधवांना शतकानुशतकें अस्पृश्य म्हणून प्रत्यक्ष उकीरडा फुंकावयास लावीत आहे. 'मातृदेवो भव' ही आज्ञा कण्ठरवानें आळवून आळवून गात असतां, 'जिस खानिसे पैदा हुवे राम कृष्ण हनुमान्' त्या स्त्रीजातीला जिवंत जाळणारा वैदिक धर्म तो हाच. फिरती राज्यकर्त्यांनी आपल्या पायांतील बुटाची टांच थोबाडावर हाणल्यामुळें 'सती'चा हा भूतदयेचा प्रघात नाइलाज म्हणून जरी बंद पडला, तरी परपुरुषस्पर्शाबद्दल स्त्री जातीवर पठाणी करडी नजर रोखणारा हा दयाळू धर्म अबालवृद्ध विधवांच्या हजामतीचा भागवती सोहळा उरकीत असतांनाहि, अमेरिकेतल्या 'लिंचिंग'ला दांत काढून हिणविण्यांत मुळींच कसर करीत नाही. 'भूतमात्रीं परमेश्वर' मानणारा हा हिन्दुधर्म माणसामाणसांत मी श्रेष्ठ तूं कनिष्ठ मला वेदांचा अधिकार, तूं तर त्यांतला एक उच्चारहि ऐकण्यास नालायक; मी ब्रह्मदेवाच्या तोंडातून गटकन पळलेला, तुझी उत्पत्ति देवाला विचार असली

उच्च नीचत्वाची धुळवड शेणवड

खेळण्यांतच वैदिक अभिमानाची कंडू शमवून घेत आहे. जग ज्या ज्ञानाचा एकाद्या पिसाटाप्रमाणे शोध करीत आहे, त्या ज्ञानाचा अव्वल अखेर शेंडा बुडखा लक्षावधि वर्षांपूर्वी माझ्या वेदांनींच हुडकला म्हणून गर्वभार वहाणारा हा हिन्दुधर्म आज साऱ्या जगाचा अडाणी हमाल म्हणून तिटकाऱ्याचा विषय होऊन बसला आहे. याला निवृत्तभांसतेची केवढीहि घमेंड असली तरी माणसानें माणसाला कसें खावें, एकमेकांनीं एकमेकांचा विष्टेसमान तिटकारा कसा करावा आणि शेजारच्या घराला आग लागली असतां अगर धर्मप्रेमानें बळेंच लावली असतां आपण 'मरे ना का तो शिंदळीचा!' म्हणून गाढ समाधींत मग्न कसें पडावें, हें याच धर्मापासून शिकून घ्यावे. प्रचलित हिंदुधर्म इतक्या नाजूक आंतड्या कांतड्याचा आहे कीं त्याला गाईच्या शरीरांत तेहतीस कोटी देव दिसतात, पण भटांशिवाय कोणत्याहि प्राण्यांत आत्मा असल्याची प्रचीति त्याला अझून पटत नाहीं. वाटेल तें खाणाऱ्या गाईला तो लक्ष नमस्कार घालून तिचें तोंड आपल्या जिभेने पुशील, कुत्र्याला बैठकीवर-नव्हे, थेट स्वयंपाक घरापर्यंत जाऊं येऊं

देईल, उंदराच्या रक्तानें बरबटलेले तोंड मनीमांजरीला खुशाल दुधांत धुवूं देईल, आणि श्रावणींच्या निमित्तानें गोमुत्र शेणाचा स्वाहाकार मणावारी करील, परंतु अस्पृश्याचीच काय पण कोणत्याहि भटेतरांची अन्नोदक प्रसंगीं नुसती सावलीहि या सोवळ्या धर्माला खपायची नाहीं. असल्या धर्माची कांस धरून ऐहिक पारलौकिक वैतरण्या तरून जाणाऱ्या हिंदूंना आहे त्या गुलामगिरीपेक्षां विशेष कोणत्या भाग्याचा मोक्ष सहजसाध्य आहे, हें ब्रह्मदेवानेंच चारी मुखानें पांचजन्य मापटें ठोकून सांगायला नको! असल्या धर्मानुयायांची म्हणे संघटना करा. इतर धर्मांतले लोक शुद्धी करून परत या. हिन्दु नावाला बाचकत असतील तर आर्यनावाने परत घ्या. याहि ढोंगाला ओळखत असतील तर शुद्धी हेंच शुद्ध नाव बरे. तेहि कवडीसारखें कणखर लागले तर म्हणा पतितपावन. अरे लेकाच्यांनो, सगळेच जेथे तुम्ही पतित आणि हतप्रभ, त्या तुमच्या अस्मानी सुलतानी पांजरपोळांत येतो कोण मरायला? पण नव्हे. निलाजरेपणा आणि कोडगेपणा हा प्रचलित हिंदु धर्माचा ट्रेडमार्क आहे. स्वत:वर आतां कुत्र्या डुकराच्या मोतानें मरण्याची पाळी आली आहे, तेव्हां तंगड्या झाडतां झाडतां आणखी कोणी साथीदार मिळाले तर पहाण्यापलीकडे या संघटन शुद्धींत दुसरा कसलाच अर्थ नाहीं. गंगा उगमाजवळ शुद्ध असते. पण पुढें तिच्या प्रवाहांत घालघुसडा घालणारे तिचे परिजन व भगत तद्वतच हिंदु धर्माचा उगम कितीहि शुद्ध असला, त्याचें तत्वज्ञान केवढेंहि सनातन असले व त्याची जोपासना व वृद्धि करणारे कोणीहि महात्मे असले, तरी ती शुद्धता, तें तत्वज्ञान व ते महात्मे यांपैकीं प्रचलित हिंदुधर्मांत कांहींहि शिल्लक नाहीं. जगतां मरतां जशी 'जाती'ची नोंद झाल्याशिवाय कोणाहि गुलाम हिंदूला जन्ममृत्यूचा संस्कार घडत नाहीं, तसा 'मी हिन्दुधर्मी' हा उच्चार केल्याशिवाय जगाच्या बाजारांत त्याला कोणी विचारीत नाहीं. पण तूं हिन्दुधर्मी कशावरून? कां? तर मी हिंदु आहे म्हणून. या पलीकडे विशेष काहीं नाहीं. बरें 'मी हिन्दु' असें सांगतांना मनांत काहीं भावना तरी उसळतात म्हणावें, तर तेंहि नाहीं. सगळांच खडखडाट! 'हिंदू कां?' तर मुसलमान क्रिस्ती नाहीं म्हणून! यापेक्षां अधिक कोणत्या भावना आणि कसल्या चेतना उत्पन्न होणें शक्य आहे? तुझें नांव बजरबट्टु कां? तर आई-बाप त्याच नावानें हाक मारीत म्हणून. आणि बजरबट्टुचें नाव ब्रह्मदेव ठेवलें तरी त्याचें बजरबट्टुत्व थोडेंच त्यामुळें जाणार आहे!

हिंदु धर्म बजरबट्टुचा धर्म आहे. याला धर्म म्हणण्यापेक्षा थोतांडच म्हणणें अधिक योग्य आहे. याला अधर्म म्हटलें तरी त्यांत त्याचा बहुमान होण्याचा दुर्दैवी प्रसंग येईल, हा चोर आहे. कारण हा चोरांच्या हातांत असतो. हा उठल्या बसल्या, धांवतां पळतां, खातां पितां, जगतां मरतां जो वेदोषनिषदांची नातींगोतीं सांगतो, ती त्याची तोतयेगिरी आहे. वेदांचा व या तोतयाचा अर्थाअर्थी कांही संबंध नाहीं. हा उपनिषदांनाहि जुमानीत नाहीं. या चोरानें वेदोनिषदांचे वाडे लुटले आणि नकली स्मृत्या पुराणांच्या छावण्या ठिकठिकाणीं थापल्या. यानें सोनें पळवून

हिंदूंच्या हातांत सोनखत

ठेवलें. यानें माणुसकीच्या भावनांना सुळावर चढवून सैतानांच्या हातीं धर्म नांवाचें कोलीत दिलें. या कोलीतानें एकट्या भटवर्गाशिवाय २० कोटी हिन्दु जनांना माणुसकींतून उठवून त्यांच्या सामाजिक नैतिक व राजकीय अस्तित्वाचे कोळसे पाडले आहेत. या मुर्दाड धर्मानें २० कोट लोकांना भटाभिक्षुकांच्या पायांतलीं खेटरें बनविलें आहे. उच्च तत्वज्ञानाच्या गाठोड्याची वेळी अवेळीं लालूच दाखविणाऱ्या या तोतयाशिरोमणींने सगळा हिंदुसमाज निरक्षर गुलाम बनविला आहे. धर्माच्या नांवाखालींच उच्च

नीचतेच्या चढत्या उतरत्या भांजण्याचीं निसरडीं खोदून ठेवल्यामुळें, समाजव्यवस्थेचे तीन तेरा उडाले आहेत. ज्या धर्मानें माणूसच आत्मवंचक व आत्मद्रोही बनविण्याची शिकस्त केली, त्या धर्माकडे या २० कोटी भटेतरांनीं आतां तिरस्कारानें व उपहासानेंच पहाणें प्राप्त आहे. नव्हे, या सैतानी धर्माचा खून पाडणें आवश्यक आहे. प्राचीन काळीं हिंदुधर्माला मानवधर्म असें नांव होतें. पण आजचा हा अमानुष धर्म जर त्याचीच अवलाद असेल, तर सूर्यापोटीं आलेल्या या शनेश्वराला शक्य तितक्या लवकर जिवंत समाधी दिली पाहिजे.

प्राचीन हिंदु धर्मानें साऱ्या जगाला कवटाळलें होतें. आजचा छिनाल धर्म भटाच्या पोटांत बसला आहे. पूर्वीचा धर्म श्रीमान् व धीमान् होता. आजचा धर्म भिक्षुकी ऊर्फ भीकमाग्या आहे. प्राचीन धर्मानें सारें जग ज्ञानांकित केलें. आजचा भिक्षुकी धर्म ऐतखाऊ भटांचीं लठ्ठ पोटें कुरवाळीत आहे. प्राचीन धर्म कट्टा लोकसंग्रहीं, तर प्रचलित धर्म नासका कुझका तुसडा आणि पोटभरू आहे. या धर्मानें माणसांना माणुसकीला पारखें केले, ज्ञानाला मुकविलें आणि अखेर परसत्तेच्या रावणरगाड्याखाली घालून आपाद मस्तक चिरडलें. आजचा धर्म दिव्य दृष्टीच्या द्रष्ट्यांचा नव्हे. प्रचलित हिंदुधर्म सनातन नव्हे; हंगामी उपऱ्या खापऱ्या चोर आहे. हा साधु संतांचा धर्म नव्हे. हा भटांभिक्षुकांचा स्वार्थी धर्म आहे. यानें कोणहि माणसाची माणुसकी शिल्लक उरणार नाहीं, मग मोक्षाची कसली अपेक्षा? नाना प्रकारच्या पंथ संप्रदायांचे ढोंगधत्तुरे माजवून, जातीभेदाच्या चल् चल् मदारीनें, २० कोट भटेतरांना आजपर्यंत भटांनीं झुलवून आपल्या धार्मिक वर्चस्वाचें अस्तित्व कसेंबसें टिकवून धरलें. खरा धर्म लोपला आणि हा भटी सैतानी धर्म पुढें घुसला. प्रचलित हिंदुधर्म भटांचा आहे. तो खास भटांसाठीं भटांनींच 'राखीव खाते' म्हणून पाळला आहे. त्यावरच ते जगत आहेत. त्यानेंच ते २० कोट भटेतरांना शेळ्यांमेढ्यांप्रमाणें हाकीत आहेत. भटाच्या जन्माचें सारें वर्म या प्रचलित भटी धर्माच्या प्रसारांत आहे. या धर्मालाच सुरूंग लावून उध्वस्त केला कीं भटाचें ब्रह्मसुखोत्पन्नत्व गतीला गेलेंच म्हणून समजावें. शतकानुशतकें धर्मवान् भटांनीं मंत्र सामर्थ्यावर २० कोट भटेतरांचे बाप गतीला पाठवून त्यांनाहि जिवंतपणीं मातीला मिसळले. या उपकाराचीं फेड म्हणून २० कोट भटेतर भटी धर्माला उध्वस्त करून भटांना गति देण्यास नाहीं का तयार होणार? बिचाऱ्यांनीं किती युगें धर्माचा खटारा ओढावा? थकले बापडे! डोक्यांतली बुद्धीची शक्ती पोटांत सांठून तें तुडुंब फुगलें. अशाहि अवस्थेत उपकृत भटेतरांनीं धर्माच्या जोखडापासून भटांची मुक्तता करूं नये, हा शुद्ध अधमपणा होय.

भटांनीं केवळ आपल्या पोटासाठीं धर्माचा दांभिक डोलारा कसा उभा केला आहे, हे प्रत्येक हिंदूला स्पष्ट दिसत आहे व प्रत्यक्ष भासत आहे. त्याचें अधिक वर्णन केलेच पाहिजे असें नाहीं. आपल्या तुसड्या वर्तनानें व भरारून धर्मबाजीनें मूठभर भटांनीं २० कोट भटेतरांना आजपर्यंत धि:कारानें वागविलें व सध्यां वागवीत आहेत. कोट्यवधि रुपये खर्चून भटेतरांनीं धर्मप्रेमानें देवळें बांधावीं. त्यांत मूर्ति स्थापन करावी, मूर्तीला लक्षावधि रुपयांचे जवाहीर वतनें वर्षासनें चालूं करावी आणि

आयत्या बिळांत नागोबा

प्रमाणें भटांनीं तेथें खुद्द देवळाच्या मालकांवर फूत्कार टाकीत बसावें. त्यांना दुरून दर्शनाची फक्त सवलत. मूर्तींच्या गाभाऱ्यांत येण्याची चोरी. मग पूजाविधी कशाचा? भटेतर शिवला कीं ज्या धर्मांतला देव वाटतो, तो धर्म कीं शिमगा? देव बाटला कीं त्याची शुद्धी संघटण करायला उलट भट मुखत्यारच.

देवाची शुद्धी करणारा भट ब्रह्मदेवाचा अस्सल मुलगा का औरस बाप? काय हें सार्टेलोटे आहे ब्रह्मदेव जाणें! देवाचें आणि धर्मांचें हें विकृत रूपांतर आतां इतक्या घाणेरड्या स्थितीला येऊन भिडलें आहे कीं धर्मस्थापनेची कीर्ती सांभाळण्यासाठी भटेतरांनीं प्रचलित हिंदुधर्माविरुद्ध बंडाचा झेंडा उभारणें क्रमप्राप्त झालें आहे. या बण्डाची बरीच तयारी झाली आहे, सध्यां होत आहे. बण्ड हें झालेच पाहिजे. नव्हे, केलेंच पाहिजे. हिंन्दूंना राष्ट्र म्हणून जगायचें असेल तर धर्मक्रान्तीसाठीं उघड उघड बण्डाचा थैमानच त्यांना घालावा लागेल. उत्क्रान्तीसाठीं क्रान्तीचेच निखारे खावे लागतात.

इतिहास पाहिला तर आजपर्यंत जेव्हां जेव्हां धर्माला विकृत भिक्षुकी अवकळा आली, तेव्हां तेव्हां क्षत्रिय वैश्यादि भटेतरांनींच बण्डाचा पुढाकार घेतलेला आहे. भटांनीं धर्मोन्नति किंवा समाजोन्नति केल्याचा दाखलाच नाहीं. ते नेहमी आयत्या बिळांत घुसणारें. क्षत्रियादि भटेतरांनीं धर्मस्थापना करावी आणि भटांनीं तिचे बारा वाजवावे, असा हा सनातन ठोकताळा आहे. ''आजपर्यंत साधूंचा परित्राण, दुष्कृताचा विनाश, आणि 'पृथिव्यां सर्व मानवा:'ला विळखा घालून त्यांना विश्वात्मैत्व भावाच्या एकछत्री साम्राज्याखालीं आणणारी धर्मसंस्थापना क्षत्रिय वीरांनींच केलेली आहे. भिक्षुकशाहीनें जर कांहीं केलेंच असेल तर आपल्या इतिहास प्रसिद्ध संकुचित व क्षुद्र हृदयाच्या खाणींतून

पंथभेदाचे दगडी कोळसे

मात्र मनमुराद उकरून काढलेले आहेत. धर्मस्थापना करावी ज्ञातिपुत्र महावीर जिनानें; धर्मस्थापना करावी शाक्य बुद्धानें; आदक्षिणोत्तरध्रुव धर्माचा प्रसार करावा. क्षत्रिय सम्राट अशोकानें आणि आमच्या अर्वाचीन स्वामी विवेकानंदानें; धर्मरहस्याच्या नवनीताचे गोळेच्या गोळे चहूंकडे फेकून मानवी संसार-चक्रांतली करकर बंद पाडून जनतेच्या तप्त हृदयाला गारीगार करण्याची पुण्य कामगिरी करावी श्रीमद्राम कृष्ण परमहंसांनी भिक्षुकशाहीच्या कर्णधार आद्य शंकराचार्यांनी काय केलें? तर भिक्षुकशाहीची तळी उचलून धरणारा एक पंथ निर्माण केला. त्या पंथाच्या संन्याशी धर्मानें हिंदुस्थानच्या राष्ट्रीय जीवनाची नौका अखेर निराशावादाच्या खडकावर नेऊन कशी हापटली, ते आजची परिस्थितीच सांगत आहे. धार्मिक काय सामाजिक काय किंवा राजकीय काय, कोणतीहि सत्ता भिक्षुकशाहीच्या हातीं गेली पुरें कीं तींत अनुदारपणाच्या किड्यांचा बुजबुजाट झालाच म्हणून समजावा. काय म्हणे, ब्रह्म जाणें तो ब्राह्मण! पण आजपर्यंत कोणत्या ब्राह्मणानें आत्मज्ञानाच्या जोरावर ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेतलें, त्याचा विश्वसनीय दाखला तर कोठेंच मिळत नाहीं. उलट एवढे मोठे

ब्रह्मदेवाच्या तोंडांतून पडलेले

ब्राह्मण, पण त्यांना अध्यात्म विद्येचा गुरूपदेश क्षत्रियांच्या पायाचे तीर्थ पिऊन पिऊनच प्रात करून घ्यावा लागला. एखाद्या इरसाल पतिव्रतेप्रमाणे ज्या अध्यात्म विद्येनें क्षत्रियांचे वामांक सोडून भिक्षुकशाहीकडे प्रसन्नतेंचा एकादा कृपाकटाक्ष कधिं चुकून सुद्धां टाकला नाहीं, त्या भिक्षुकशाहींने मानव आणि देव यांच्यामध्यें अडत्येगिरीचा सनदशीरपणा मिरवावा, हे चमत्कारीक नव्हे काय?'' (भिक्षुकशाहीचें बण्ड, पृ. ५८-५९) भट संघटणेच्या कितीहि वल्गना करो, तें त्याचें कर्म नव्हे. संघटणा क्षत्रियांनी करावी, भटांनीं संघटनेची विवटना करावी. हाच त्यांच्या परंपरेचा इतिहास आहे. अस्पृश्योद्धार संघटन शुद्धी धर्मोन्नति, काय वाटेल त्या बाबींवर भट माथें फोडूं लागला कीं खुशाल कयास बांधावा कीं यांत या बेट्याचा कांहींतरी डांव आहे आणि अखेर हा

भट जातीवर बिनचूक जाणार

स्वजातीसाठीं माती खाणारा सच्चा आदमी फक्त भटच. क्षत्रियादी भटेतर मानवतेसाठीं माती खातील. स्वजातीच्या कुंपणांत भटांनीं गिरक्या माराव्या. क्षत्रियादि धर्मसंस्थापकांचं ते ब्रीद नव्हें. त्यांनीं धर्मसंस्थापनेची कीर्ति सांभाळली पाहिजे. एवढे मोठें रामदास समर्थ म्हणवून गेले. पण अखेर-

उदंड राजकारण तटलें।

तेणें चित्त विभागलें।।

अशा अवस्थेंतल्या क्षत्रिय शिवरायालाच त्यांनीं-

धर्मसंस्थापनेची कीर्ति।

सांभाळली पाहिजे।।

अशी प्रार्थना केली. या 'समर्थ' ब्राह्मणालाहि धर्म संस्थापना करतां कां येऊ नये? ती काय 'शुद्र' शिवाजीनें करून दाखवावी? हाच भट-भटेतरांतला फरक आहे. धर्मसंस्थापना हें क्षत्रियांचें कार्यं आहे. तें त्यांनींच केलें पाहिजे. तें सद्य:स्थितींत कसे करावे. हे पुढील अंकी निवेदन होईल.

□□□

अनुवाद

श्रीमत् अश्वघोष कृत वज्रसूची

जगद्गुरू जो मंजुघोष त्याचें कायावाचामनें स्तवन मी (त्याचा शिष्य) अश्वघोष, (अनेक) शास्त्रांच्या आधारानें वज्रसूची नामक ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ करितो.

ज्यांत धर्म आणि अर्थ सांगितलेला आहे ते तुमचे वेद आणि स्मृत्या या चांगल्या व विश्वसनीय आहेत आणि त्यांत जेथें जेथें मतमतांतराचा झगडा असेल तेवढा भाग त्याज्य व अविश्वसनीय आहे, असें प्रथमत: खुशाल गृहीत धरून चाला. तरीसुद्धां चतुर्जातींत ब्राह्मण काय तो श्रेष्ठ, हें विधान त्या ग्रंथांवरून मुळींच सिद्ध होत नाहीं.

मला प्रथम हें सांगा कीं ब्राह्मण ब्राह्मण म्हणजे तें काय? काय जीव म्हणजे ब्राह्मण्य, कां जात जन्म कुल देह ज्ञान आचार कर्म किंवा वेदज्ञान म्हणजे ब्राह्मण्य? (काय ब्राह्मणाची व्याख्या काय तुमची?)

जीव (जीवित) हेंच ब्राह्मण्य, असें जर तुमचें विधान असेल, तर त्या विधानाला वेदांत तर कोठंच कांहीं आधार नाहीं. कारण वेदांत स्पष्ट म्हटलें आहे कीं-

ओम् । सूर्य: पशुरासीत । सोम: पशुरासीत ।

इंन्द्र: पशुरासीत । पशवो देवा: ।।

आद्यन्ते देवा पशव। श्वपाका अपि देवा भवन्ति।। सूर्य चंद्र इंद्रादि देवता प्रथम 'पशु' होत्या; दुसऱ्या काहीं देवता प्रथम पशूच होत्या, नंतर त्या देव बनल्या, अहो फार काय पण, नीचापेक्षां नीच असे जे श्वपाक (कुत्र्याचें मांस खाणारे) ते सुद्धां देव झाले. या पुराव्यावरून जीव किंवा जीवित म्हणजे ब्राह्मण्य नव्हें, हें स्पष्ट सिद्ध होतें. तेंच तत्व आणखी महाभारतातील पुराव्यानेंहि अधिक स्पष्ट होतें. त्यांत एके ठिकाणी लिहिलें आहे की कालींजल टेकडीवरील सात शिकारी व दहा हरीण, मानससरोवरावरील एक बदक (राजहंस), शरद्वीपांतील एक चक्खाक, हे सर्व कुरुक्षेत्रांत ब्राह्मण असे जन्माला आले आणि वेदविद्यापारंगत झाले. मन् देखील आपल्या धर्मशास्त्रांत (!) असें म्हणतो कीं, चतुर्वेद व त्यांचीं आंगे व उपांगें यांत प्रवीण असलेला जो कोणी ब्राह्मण शूद्रापासून दक्षिणा किंवा इतर

दोन घेईल, त्याला * १२ जन्म गाढवाचे, ६ जन्म डुकराचे आणि ७० जन्म कुत्र्याचे येतील.'' यावरून हें उघडच होत आहे कीं, जीवित हें कांहीं ब्राह्मण्य नव्हे अगर ब्राह्मण्याचा पुरावाहि नव्हे; नाहींतर हे असले विचित्र प्रकार का घडते?

आतां, तुमचें असें म्हणणें असेल कीं ब्राह्मण्य हें आईबापावर, जन्मावर किंवा जातीवर अवलंबून आहे- म्हणजे ब्राह्मण व्हायला ब्राह्मण आईबापांच्या पोटींच जन्म घेतला पाहिजे; तर स्मृतीमधील एका सर्वप्रसिद्ध श्लोकानें या तुमच्या म्हणण्याचा पोकळपणा तेव्हांच उघड होत आहे. या श्लोकांत म्हटलें आहे कीं, अचल मुनीचा जन्म हत्तीच्या पोटीं, केशपिंगलाचा घुबडा या पोटीं, अगस्ति मुनीचा अगस्त्याच्या फुलापोटी, कौशिक मुनीचा गवताच्या पोटीं, कपिलाचा माकडाच्या पोटीं, गौतम मुनीचा शालतरूवरील वेलीच्या पोटीं, द्रोणाचार्यांचा मडक्याचा पोटीं, तैत्तिरी ऋषीचा खबुतरा या पोटी, व्यास मुनीचा कोळणीच्या पोटीं, कौशिकाचा शूद्रिणीच्या पोटीं, विश्वामित्राचा चांडाळणीच्या आणि वसिष्ठाचा जन्म वेश्येचा पोटीं; असे हे जन्म झालेले प्रसिद्ध आहेत. यांपैकी एकाचाहि बाप अथवा आई ब्राह्मण नव्हती. (मनुष्य योनीसुद्धां कित्येकांना लाभली नाही. भा. क.) तथापि या सर्व मंडळींना तुम्हीं ब्राह्मण्याच्या सदरांत ढकलून दिलें; यावरून असा निष्कर्ष निघतो कीं ब्राह्मण्य हें आईबाप, जाति अगर ग्रंथातले आधार यावंर अवलंबून नसून तें लोकमान्य उत्पत्तीचें एक चिन्ह आहे. यावर अझूनहिं तुमचें असें म्हणणें असेल कीं, ज्याचे आईबाप दोघे ब्राह्मण तो ब्राह्मण, तर मग (या व्याख्येप्रमाणें) शूद्राचें पोरसुद्धां ब्राह्मण होण्याचा संभव आहे. कसें तें स्पष्ट सांगायला माझी ना नाहीं; पण त्यामुळें तुम्हीं मात्र नाके फेंदारूं नका.

ब्राह्मण आईबापाच्या पोटीं जन्मलेला तो ब्राह्मण असेंच तुमचें म्हणणें ना? येथें एक मोठी शंका आहे. 'ब्राह्मण आईबाप' म्हणतांना अगदीं गाळीव शुद्ध आणि खरे खुरे ब्राह्मण आईबाप असाच तुम्ही अर्थ घेतां ना? मग महाराज, या व्याख्येप्रमाणें ब्राह्मणी अवलाद कधींच संपुष्टांत आलेली आहे, हें नीट लक्षांत ठेवा. ब्राह्मणांच्या बापजाद्यांचा इतिहास पाहिला तर त्यांच्या पत्न्यांनीं कुविचारानें शूद्रांशीं व्यभिचार केल्याचा जो दाट संशय अस्तित्वांत आहे, त्या संशयाच्या तडाख्यातून एकसुद्धां ब्राह्मण धड सुटणार नाहीं. अर्थात् खरा बाप जर शूद्र तर नुसती आई ब्राह्मण आहे एवढ्याच सबबीवर त्या (शूद्र अवलादी) पोराला ब्राह्मण म्हणतां येईल काय? मुळींच नाहीं. यावरून मी असे विधान काढतों कीं ब्राह्मण्य हें काहीं जन्मावर अवलंबून नसतें. या विधानाला मानवधर्म ग्रंथाचाहि आधार आहे. तो ग्रंथ म्हणतो कीं जो ब्राह्मण मांस खाईल तो तात्काळ ब्राह्मण्यापासून च्युत होतो; जो ब्राह्मण मेण, मीठ व दूध विकतो तो तीन दिवसांत शूद्र होतो.

या सर्व विवेचनावरून जन्माचा आणि ब्राह्मण्याचा काडीमात्र संबंध नाहीं, असें नाहीं कां तुम्हाला वाटतं? ब्राह्मण्य जर जन्मावरच निश्चित होणारें असतें, तर तें नीच प्रकारच्या कर्मानें एकाकीं पतित व

---

* शिवाजी महाराजांच्या शूद्र घराण्यांत ज्या ज्या वेशासं ब्राम्हणांनीं पुरोहीतपणा करून हव्यकव्याच्या सांगतेकरितां करोडों रुपयांच्या दक्षिणा व जहागिऱ्या मिळविल्या, ते सारे या वेळीं गाढवाच्या डुकराच्या किंवा कुत्र्याच्या योनींत जन्म घेऊन फिरत असतील; कदाचित् दक्षिण महाराष्ट्रांत सध्यां दिसणारीं गाढवें व डुकरें हीं त्या वेदशास्त्रसंपन्नांचेच खास अवतार नसतील कशावरून? आतां तरी वेशासंपन्नांनीं कोल्हापूरच्या शूद्र राजाच्या दक्षिणा हबकून आपल्या सोन्यासारख्या नरदेलाला गाढव डुकरांच्या योनींत ढकलण्याचें महापाप करूं नये, अशी शिफारस आहे.
भाषांतरकर्ता

भ्रष्ट कां होत होतें? आकाशांत उडणारा घोडा पृथ्वीवर उतरतांच एकदम डुक्कर बनल्याची कथा तुम्ही कधीं ऐकिली आहे का? अशक्य?

शरीर हें ब्राह्मण आहे, असें आतां म्हणतां? हेंहि सपशेल खोटें ठरत आहे. शरीर जर ब्राह्मण म्हटलें, तर ब्राह्मणाचें प्रेत सरणावर जाळतांच प्रत्यक्ष अग्नीवर खुनाचा आरोप शाबीत धरणें प्राप्त आहें; त्याचप्रमाणें ज्या ज्या आप्तेष्टांनीं तें प्रेत अग्नीच्या स्वाधीन केलें ते ते सर्व खुनांत साथीदार म्हणून जबाबदार धरले पाहिजेत. या तुमच्या विचारसरणींत जितका मूर्खपणा आहे, तितकाच पुढील विधानांतहि आहे. आई क्षत्रिय वैश्य किंवा शूद्र कोणीहि असली तरी हरकत नाहीं; पण बाप जर ब्राह्मण असेल तर त्याच्या मुलाला खुशाल ब्राह्मण म्हणावें. कारण किती झालें तरी बापाच्या हाडाचें हाड व मासाचें मास आहे ना? काय हें राक्षसी विधान! कधीं कोणी ऐकलें होतें? पुन्हां, यजन, याजन, अध्ययन, अध्यापन, दान प्रतिग्रह आणि इतर दुसरीं पवित्र कृत्यें हीं सारीं ब्राह्मणाच्या देहापासूनच निर्माण झालीं असतात. नव्हे कां? तर मग तो ब्राह्मणाचा देह नाश पावला कीं त्या साऱ्या कृत्यांचे गुणधर्म सुद्धां नाश पावतात काय? 'मुळींच नाहीं' असें तुम्ही उत्तर द्याल. अर्थात असें जर होत नाहीं, तर ब्राह्मण हें देहावर मुळींच अवलंबून नाहीं.

बरें, ज्ञानामुळें ब्राह्मण होतो, अशी तुमची आतां जबानी आहे का? ही तर अगदींच चुकीची आहे. का? कारण ही विचारसरणी जर खरी धरली तर ज्ञानप्राप्तीच्या जोरावर पुष्कळ शूद्रसुद्धां ब्राह्मण होऊं शकतील. चतुर्वेद, व्युत्पत्तिशास्त्र, मीमांसा, सांख्य, वैशेषिक व ज्योतिष तत्वज्ञानांतले पंडिताजणी झालेले पुष्कळ शूद्र माझ्या माहितीचे आहेत; परंतु त्यांपैंकीं एकालाहि कधीं कोणी ब्राह्मण म्हटलेलें नाहीं. यावरून ब्राह्मण्य हें ज्ञानावर अवलंबून आहे, असें मुळींच सिद्ध होत नाहीं.

आचारानें ब्राह्मण्य सिद्ध होतें, असें तुमचें म्हणणे आहे काय? हें विधान तर सपशेर खोटें आहे. कारण तें जर खरें असते, तर पुष्कळ शूद्र ब्राह्मण बनले असते. नट, भाट, कैवर्तक आणि भांड लोक पहा. मोठमोठें कष्ट सोसून ते नेहमीं कडकडीत धर्मांचार पाळीत असतात. या लोकांचा आचार इतका उत्तमोत्तम असून त्यांच्यापैंकी एकालाहि चूकूनसुद्धां कधी कोणी ब्राह्मण म्हटलेलें नाहीं. यावरून हें सिद्धच होते कीं आचार हा काहीं ब्राह्मणाचा पुरावा किंवा चिन्ह नव्हें.

कर्मांवरून ब्राह्मण होतो असें तुम्ही म्हणतां काय? मी म्हणतो मुळींच नाही. कारण वर दिलेलीं विधाने या ठिकाणीं तर विशेष ठसठशीत लागूं पडतात. अर्थात् कर्मांवरून ब्राह्मण बनतो ही कल्पनाच येथें टिकाव धरूं शकणार नाहीं.

वेद पठण केल्यानें एखादा मनुष्य ब्राह्मण बनतो, अशी आपली समजूत आहे काय? असेल तर ती अजिबात खोटी आहे. ऋक्, यजुस्, साम आणि अथर्व या चारी वेदांत रावण राक्षस पारंगत होतो, हें तर प्रसिद्धच आहे; आणि रावणाच्या वेळीं यच्चावत् सर्व राक्षस वेदाभ्यास करीत असत. परंतु त्यामुळें एखादा राक्षस ब्राह्मण झाला असें काहीं तुम्ही म्हणत नाहीं. यावरून हें सिद्धच होतें कीं वेदपठणानें कोणी ब्राह्मण बनत नसतो.

तर मग ब्राह्मण ब्राह्मण म्हणतात तो प्राणीं तरी कोण आहे? वेदपठण, संस्कार, आईबाप, कुल, कर्म यांपैंकी एकाच्याहि योगानें जर ब्राह्मण्य प्राप्त होत नाहीं, तर मग होतें तरी कशानें? मला असें वाटतें की, कुंदफुलांच्या बर्फवत् शुभ्रवर्णाप्रमाणें ब्राह्मण्य हा एक निष्कलंक गुण आहे. ज्याच्या योगानें पाप

विनष्ट होतें तें ब्राह्मण्य. त्यांत व्रत, तप, नियम, उपवास, दान, दम, शम आणि संयम इत्यादिकांचा अन्तर्भाव होतो. जो मनुष्य अविवेक अहंकार, संग, परिग्रह, राग आणि द्वेष यांपासून पूर्ण निवृत्त असतो तोच ब्राह्मण असें वेदांत म्हटलेले आहे. शिवाय सर्व शास्त्रांतहि असें लिहिलें आहे कीं, सत्य, तप, इंद्रियनिग्रह आणि दया. हीं ज्याच्या ठिकाणी आढळतील तो ब्राह्मण; या सद्गुणांच्या विरुद्ध दुर्गुणांचा मनुष्य चांडाळ समजावा. ब्राह्मण्यांचें दुसरें लक्षण म्हणजे त्याचा जन्म, देव, मानव, किंवा पशु कोटींतून कां होईना, त्याने अविवेकी स्त्रीसंभोगापासून अलिप्त असले पाहिजे. शुक्राचार्य याच्याहि पुढें जाऊन सांगतात कीं देवांना जातीची पर्वा नसते, अधमाधम गणलेल्या जातींत जन्म घेतलेल्या सज्जनाला ते ब्राह्मणच समजतात. या सर्वांवरून मी असा निष्कर्ष काढतो कीं जन्म, जीवित, शरीर ज्ञान, धर्माचारपरिपालन, किंवा कर्म यांचा ब्राह्मण बनविण्याच्या कामीं कवडीचाहि उपयोग होत नाही.

शुद्राला प्रव्रज्येचा (संन्यासधर्माचा) अधिकार नाहीं, व त्या ऐवजीं त्यानें विनम्र भावाने ब्राह्मणाची सेवा करून रहावे असें एक तुमचें विधान आहे. याचे कारण काय, तर म्हणे चातुर्वर्ण्याच्या यादींत शूद्राचें नांव शेवटीं येते व म्हणून तो नीच ठरतो. वाहवा! हा तुमचा कोटीक्रम फार छान आहे बुवा. याला पोरकट म्हणावे कीं अश्लील म्हणावें हेच समजत नाहीं. बरें, हा कोटीक्रम खरा मानला तर इन्द्रालासुद्धां नीचांतल्या नीच कोटींत ढकलायला काहीं हरकत नाहीं. कारण पर्णीसूत्रांमध्यें इन्द्राला कुत्र्याच्याहि खाली नमूद केलेला आहे. (श्व-पुर-मधवन्). लिहिण्याचा अगर बोलण्याच्या क्रमपद्धतीवरून कोणत्याही व्यक्तीचा अगर प्राण्याचा दर्जा उच्च नीच ठरविणे व्यवहार्य होणार नाहीं. उमा महेश, दंतोष्ठ या शब्दरचनेवरून पार्वती महेशापेक्षां मोठी मानायची, कीं दातांना ओठांपेक्षा वडील मानायचें? सुटसुटीत उच्चार व्हावा म्हणून व्याकरणाला साजेशोभेसा शब्दयोजनेचा क्रम उच्चनीचतेचा दर्शक होऊ शकत नाहीं. दातांचा जन्म कधीं ओठाच्या आधीं होत असतो वाटतें? कां शिवाच्या आधीं पार्वती जन्माला आली असें तुमचें धर्मज्ञान शिकवितें? अर्थात शूद्र तेवढा नीच व ब्राह्मण तेवढा उच्च व सर्वाधिकारसंपन्न कां? तर चातुर्वर्ण्याच्या शब्दयोजनेत ब्राह्मणाचा नंबर पहिला लागला व शूद्राचा शेवटीं आला! हा कोटीक्रम मूर्खपणाचा अतएव फोल ठरतो. तेंव्हा शूद्राने विनम्र भावानें ब्राह्मणाची सदैव सेवाच करून राहिले पाहिजे, या तुमच्या दुराग्रही प्रतिपादनाला कसलाहि आधार नाहीं आणि ब्राह्मणा इतकाच शूद्रालाही प्रव्रज्येचा अधिकार आहे असें सिद्ध होतें.

आणखी ऐका. मनूकृत धर्मशास्त्रांत असें सांगितलें आहे कीं ज्यानें शूद्रिणीचें स्तनपान केलें आहे, शूद्रिणीनें ज्यावर नुसता आपला सुस्कारा टाकला असेल किंवा ज्याची आईच शुद्रीण असेल अशा ब्राह्मणब्रुवाला प्रायश्चित्तानें सुद्धां ब्राह्मण जातींत परत येतां येत नाहीं. याच ग्रंथात आणखी असेंहि म्हटलें आहे की जो ब्राह्मण शूद्रिणींच्या हातचें अन्नपाणी घेईल तो याच जन्मीं शूद्र व पुढच्या जन्मीं कुत्रा होईल. मनू आणखी सांगतो कीं जो ब्राह्मण शूद्र स्त्रीशी संबंध ठेवतो, तिला 'अंगवस्त्र' म्हणून बाळगतो, त्याचा देव आणि पितर धि:कार करतील व अखेर तो मेल्यावर नरकांत जाईल. मानवधर्मशास्त्रांतल्या या असल्या दण्डकांचा विचार केला कीं ब्राह्मण्य म्हणजे एकाद्या ठरावीक जातीची अगर अवलादीची कधींच नष्ट न होणारी, अविनाश्य अमरपट्ट्याची निशाणी नव्हे; तर तें केवळ सद्गुणी जनाचें एक लक्षण आहे, असें स्पष्ट दिसतें. मनूच्या शास्त्रांत असेहि सांगितलें आहे कीं पुण्यशील आचरणाच्या जोरावर शेंकडों शूद्रांनीं ब्राह्मण्य पटकविलें. उदाहरणार्थ- काठीन मुनि, समिधांच्या घर्षणापासून उत्पन्न

झालेल्या अग्निज्वाळेत याची उत्पत्ति. पण तप:सामर्थ्यानें हा ब्राह्मण झाला. त्याचप्रमाणें ऊर्वशी नामक वेश्येच्या पोटीं जन्मलेला वशिष्ठ मुनी, कोळणीच्या पोटचा व्यास, हरिणीच्या पोटचा ऋष्यशृंग, चाण्डाळणीच्या पोटचा विश्वमित्र आणि कलालणीच्या पोटचा नारद हे सर्व आपल्या तप:सामर्थ्यानेंच ब्राह्मणत्वाला पोहचले ना? यावरून ब्राह्मण हें केवळ जन्मावर (जन्माच्या अपघातावर) ठरलेलें नाहीं, हें सिद्ध होत नाहीं काय? आत्मदमन करतो तो यति, तपश्चर्या करतो तो तपस्वी आणि ब्रह्मचर्य पाळतो तो ब्राह्मण, या व्याख्या सर्वश्रुतच आहेत. ज्याचा आयुष्यम निष्कलंक आहे, ज्याची स्वभावप्रवृत्ति सदा आनंदी आहे, तोच खरा ब्राह्मण; कुळाचा यांत काहींहि संबंध नाहीं, हें स्पष्ट होत नाहीं काय? ''शुद्र व सात्विक चारित्र्य हेंच सर्वांत श्रेष्ठ. केवळ वंशपरंपरा आदरास पात्र नाहीं, वंश मोठ्या राजाचा असला आणि सद्‌गुणांची वाण असली, तर तो सुद्धां निरूपयोगी व तिरस्करणीयच होय.'' अशा अर्थाचे पुष्कळ श्लोक मानवधर्मांत आहेत. काठिनमुनी व्यासमुनि आणि इतर ऋषि जन्मानें जरी शूद्र होते, तरी त ब्राह्मण म्हणून जगमान्य झालेच ना? हीन गणल्या गेलेल्या कुळांत जन्मून, सदाचरणाच्या जोरावर आणखी शेकडों लोकांनी स्वर्गप्राप्ती पटकविल्याची उदाहरणें आहेतच. या विवेचनावरून ब्राह्मण म्हणजे एकाद्या ठरावीक जातींत जन्माला आलेला प्राणी, हें विधान फोलकट आणि खोटें आहे.

ब्राह्मण (ब्रह्मदेवाला) तोंडांतून, क्षत्रिय बाहूपासून, वैश्य मांड्यांतून आणि शूद्र पायांतून निर्माण झाले, हें तुमचे विधानहि निराधार व फोलकट आहे. ब्राह्मण म्हणजे कोणा एका ठरावीक जातीची मिरास नव्हे. कैवर्त (कोळी) कुळांत, रजक (परीट, धोबी) कुळांत चांण्डाळ कुळांत जन्मलेले शेकडों लोक या जगांत होऊन गेले. त्यांनीं चूडाकर्म, मौंजीबंधन, दंतकाष्ठ इत्यादि ब्राह्मणांना विहित कर्मे स्वत: आचरलीं आणि मरणोत्तर व आतांहि त्या लोकांची 'ब्राह्मण' म्हणून जगांत प्रसिद्धी आहे.

ब्राह्मणांबद्दल मीं जें आतांपर्यंत म्हटलें तें क्षत्रियांच्याहि बाबतींत तंतोतंत लागूं आहे. चार जातींच्या कल्पनेचें मतच मुळीं खोटें आणि खोडसाळ आहे. सगळ्या मनुष्यांची जात एक.

आतां काय म्हणतां? सर्व माणसे एका ब्रह्मापासून निर्माण झालीं? मोठाच चमत्कार म्हणायचा! मग त्यांच्यांत या भिन्नभिन्न. एकमेकांशी फटकलेल्या चार कोंड्या कशा निर्माण झाल्या हो? माझ्यापासून माझ्या बायकोला चार मुलगे झाले, तर एकाच आईबापाचीं मुलें म्हणून तीं तत्वत: एकाच जातीची असलीं पाहिजेत, हे उघड आहे. प्राणीमात्रांच्या निरनिराळ्या जातींची भिन्नता, त्यांच्या शारीरिक इंद्रियादि रचनेच्या भिन्नतेवरून तेव्हांच समजतें, हे तुम्ही जाणतच आहांत. घोड्याचा पाय हत्तीच्या पायासारखा नसतो. वाघाची तंगडी आणि हरणाची तंगडी एकसारखी नसते. अगदीं निराळी असते. इतर सर्व प्राण्यांत हे शारीरिक व इंद्रीयविषयक भेद पुष्कळच आहेत. आणि भेदांच्या चिकित्सेवरून आपणास चटकन उमजतें कीं हे काहीं एकाच जातीचे प्राणी नव्हते. पण क्षत्रियाचा पाय ब्राह्मणाच्या पायापेक्षां किंवा क्षूद्राच्या तंगडीपेक्षां निराळा असतो. असें मात्र कोठें ऐकलें नाहीं किंवा पाहिलेहि नाहीं. सर्व माणसें एकसारखी एकजिनशी अवयवांचीच असतात.

---

* माणसांचीं मुलें माणसेच असतात. माणसांच्या पोटीं कुत्रीं मांजरे डुकरें पैदा होत नाहींत, असा भावार्थ. लाक्षणिक अर्थ घेतला तर ब्राम्हणाच्या किंवा क्षत्रियाच्या एकाच घरांत पशु-पक्ष्यादि दुनियेचें प्रदर्शन सांपडणार नाहीं असें थोडेंच आहे.

भाषांतरकर्ता

अर्थात् ती सर्व एकाच जातीची असलीं पाहिजेत, हें उघड आहे. बरें; बैल, टोणगा, घोडा, हत्ती, गाढव, माकड, बोकड, मेंढा इत्यादी प्राण्यांचीं जननेंद्रियें, रंग, आकार, मलमूत्र, वास व आवाज यांतलीं भिन्नता पाहिली कीं हे प्राणी नि:संशय निरनिराळ्या जातींचे आहेत, हे तेव्हांच दिसून येतें. चिकित्सेच्या याच तत्वांशीं ताडून पाहिला तर ब्राह्मण हा कांहीं क्षत्रियापेक्षां भिन्न दिसत नाहीं. अगदीं एकाच खाणींतला एकाच जातीचा असतो. शारिरीक व इंद्रियविषयक लक्षणांच्या भिन्नतेमुळें चतुष्पाद् जनावरांत जातिभिन्नता कशी असते, हें मी उदाहरणानें दाखविलें. आतां पक्ष्यांचीं कांहीं उदाहरणें पहा. हंस कबूतर पोपट मोर इत्यादि पक्ष्यांची जातिभिन्नता, त्यांचे आकार रंग पंख पिसारा चोची वरून तेव्हांच सिद्ध होते; पण ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्रांदि माणसांत असा कांहींच भेद दिसत नाहीं. अंतर्बाह्य ते सारे सारखेच असतात. अर्थात ते मूलत: भिन्न असें कसें म्हणतां येईल? वृक्षांचे उदाहरण घ्या. वड बकूल पळस अशोक तमाल नागकेशर शिरीश चंपकादि वृक्षांची जातिभिन्नता त्यांचीं खोडें पानें फुलें फळें सालीं बिया गंध रस यांवरून सहज लक्षांत येते. पण ब्राह्मण क्षत्रियादि माणसें मांस त्वचा रक्त हाडें आकार मलमूत्र आणि जननपद्धति यांत कांहीं भिन्न दिसत नाहींत. सर्वांचें सर्व सारखेंच असतें. यावरून हें स्पष्ट सिद्धच होतें कीं ते एकाच जातीचे आहेत. बरें असें तरी म्हणतां का कीं ब्राह्मणाच्या सुखदु:खाच्या भावना क्षत्रियांच्या भावनांपेक्षां काहीं निराळ्या असतात? एक ज्या रीतीनें जगतो व ज्या कारणांनी मरतो. तीच रीत व कारणें दुसऱ्याला असतात कीं नाहीं? बौद्धिक सामर्थ्य, कर्मे किंवा त्या कर्मांचे उद्देश यांत कांहीं फरक असतो काय? त्यांची जन्मण्याची पद्धति आणि त्यांच्या आशा व भीतीचीं कारणें भिन्न असतात काय? तिळमात्र नाहीं. यावरून ते सर्व एकच असले पाहिजेत खास, हें निर्विवाद सिद्ध होते. औदुंबराच्या आणि फणसाच्या झाडाला खांद्या खोड सांधे मूळ सर्व ठिकाणीं फळें बाजतात. पण खांदीवरचे फळ खोडावरच्या किंवा मूळांतल्या फळापेक्षां निराळें असतें कीं काय? खांदीच्या टोकाला उंबर आलें म्हणून तें ब्राह्मण-उंबर आणि पायथ्याशीं मुळाला बाजलें म्हणून तें क्षूद्र उंबर म्हणणार? मुळींच नाहीं. तद्वतच एकाच शरीराच्या चार निरनिराळ्या भागापासून उत्पन्न झालेलीं माणसेंहि चार भिन्न वर्गाची कशी असूं शकतील? तुम्ही म्हणतां ब्राह्मण (ब्रह्मदेवांच्या) तोंडांतून उत्पन्न झाला. ठीक आहे. बरें, ब्राह्मणी कोठून पैदा झाली? तेथूनच? ब्राह्मणाप्रमाणें तोंडांतूनच ना? मग काय भाऊ-बहिणींच्या लग्नाचाच हा प्रसंग! खासा रोजगार! अशा तऱ्हेचा अगम्यगमनाचा व्यवहार जगांत राजरोस सुरू झाला की पापपुण्याच्या कल्पनांवर बोळाच फिरवला पाहिजे.

ब्राह्मण तोंडांतून उत्पन्न झाला असें म्हणतांच वरील आपत्ति दत्त पुढें उभी राहते. तुमचे विधान अक्षरश: चूक आहे हेंच याचें प्रत्यंतर. भिन्न भिन्न आचरण आणि व्यवसाय यामुळेंच ब्राह्मण क्षत्रिय वैश्य आणि शूद्र यांच्यांत भिन्नता दिसते. हेच वैशंपायन-युधिष्ठिर-संवादावरून सिद्ध होत आहे. एके दिवशीं पंडुराजाचा मुलगा तत्कालीन विद्वानाग्रणि युधिष्ठिर यानें आदरपूर्वक हात जोडून वैशंपायन ऋषींना 'आपण ब्राम्हण कोणाला म्हणता आणि ब्राह्मण्याच्या खुणा काय' असें विचारलें. त्यावर वैशंपायनानें उत्तर दिलें कीं, ''ब्राह्मणाची पहिली खूण म्हणजे तो फार सोशीक आणि सद्गुणी असतो. कुकर्म आणि अत्याचार त्याच्या हातून कधीं घडत नाहींत. तो मांसाहारी नसतो आणि सजीव प्राण्याला तो दुखवीत नाहीं. दुसरी खूण म्हणजे तो दुसऱ्याची रस्त्यावर सांपडलेली वस्तु सुद्धां मालकाच्या परवानगी वांचून केव्हांहि घेत नाहीं. तिसरी खूण म्हटली म्हणजे तो सर्व ऐहिक विकारांचे आणि

आकांक्षांचे दमन करतो. लौकिक हिताऽहिताबद्दल तो पूर्ण विरक्त असतो. चवथी, त्याचा जन्म म नुष्यांत होवो, देवादिकांत होवो अगर पंशूमध्यें होवो, तो मैथुनादि विकारांना बळी पडत नाहीं. पांचवी, सत्य, दया, इन्द्रियदमन, परोपकार आणि तपाचरण हे शुद्ध गुण त्याच्या ठायीं असतात. ब्राह्मण्याचे हे पांच गुण ज्याच्या ठायीं असतात. त्याला मी ब्राह्मण्य समजतो आणि ज्याच्या ठायीं त्यांचा अभाव तो शूद्र. कुळावर, जन्मावर अगर विशिष्ठ क्रियाकर्मांवर ब्राह्मण्य अवलंबून नसतें. वर सांगितलेलं पांच गुण एखाद्या चांडाळाच्या ठायीं असले तर तोही ब्राह्मण होतो. हे युधिष्ठिर राजा, पूर्वी आपल्या भूलोकावर फक्त एकच जात होती. पुढे आचार आणि धंदे यांच्या भिन्नत्वांमुळे चातुवर्ण्याची उत्पत्ति झाली. सर्व मानवांची उत्पत्ती स्त्रीपासून एकाच पद्धतीने होत असते. सर्वांच्या शारिरीक गरजा सारख्याच असतात. अंतरेन्द्रिये आणि बहिरोन्द्रियेंहि सर्वांना सारखीच असतात. परंतु ज्याची वागणूक सर्रास चांगली असते तो ब्राह्मण आणि वाईट असते तो शूद्र-नव्हे, त्याहूनहि अगदीं नीच. उलटपक्षीं जो शूद्र या गुणांनीं युक्त असतो तो ब्राह्मण होय.

''हे राजा, पंचेन्द्रियांच्या मोहापासून अलिप्त राहिलेल्या एकाद्या शूद्राला दान दिलें, तर तें एक सत्कृत्य होय आणि त्याबद्दल स्वर्गांत खास बक्षिस मिळतें. त्याच्या जातींकडे लक्ष देऊं नकोस, फक्त त्याच्या सद्‌गुणांकडे पहा. जो आपले सर्व आयुष्य सत्कृत्यें करण्याकडे खर्च करतो, जो दुसऱ्याच्या कल्याणाकरितां अहर्निश सिद्ध असतो तोच ब्राह्मण. जो सर्व ऐहिक भानगडीपासून अलिप्त राहून सर्वस्वीं मोक्षसाधनार्थ आपणास वाहून घेतो त्यालाहि ब्राह्मण म्हणतात. जो प्राणिहत्येपासून, मायापाशापासून कुकर्मांपासून इन्द्रिय-विकारांपासून आणि चहाडीचुगलीपासून पूर्ण अलिप्त असतो, त्याची गणना ब्राह्मणांत होते. ज्याच्या ठायीं क्षमा, दया, दमन, दान, सत्य, शौचन (शुद्धी), स्मृति (नैतिक ज्ञान), घृणा (भूतदया), विद्या, विज्ञान इत्यादि सद्‌गुण असतात तोच ब्राह्मण समजावा. हे युधिष्ठिर राजा, एखाद्या मनुष्यानें एक रात्रभर जरी ब्रह्मचर्य पाळलें, तरी त्याचें पुण्य हजार यज्ञांहून अधिक आहे. ज्यानें सर्व वेदांचें अध्ययन केलें आहे, आणि जो सर्व तीर्थे हिंडून आला आहे, त्याला ब्राह्मण म्हणतात. आचारानें, विचारानें अगर वाणीनें सुद्धां जो सजीव प्राण्यांस दुखवीत नाहीं, तो मेल्यानंतर ब्रह्मपदीं विलीन होतो.'' ही वैशंपायन ऋषींचीं वाक्यें आहेत. हे मित्रा, अज्ञानांत लोळणाऱ्या ब्राह्मणादि लोकांनी यांचा नीट अभ्यास करून शहाणे व्हावें आणि सन्मार्गाला लागावें, एवढ्याच करिता मी हें प्रवचन केलें आहे. त्यांना पटले तर त्याकडे ते लक्ष पुरवितील, परंतु न पटून तिकडें कोणी दुर्लक्ष केलें तरी आम्हाला त्याचा विधिनिषेध नाहीं.

□□□

स्फुट लेख

बावलाचे लोकमान्य भूत

भटी अंत:करण ही एक मोठी विचित्र घटनेची चीज आहे. हिचें पृथ:करण आजवर अनेकांनीं अनेक वेळां अनेक तऱ्हांनीं केले, पण तिच्या खऱ्या रंगाचा पत्ता अझून कोणासहि लागलेला नाहीं. एवढें मात्र खरें की इरसाल खुनशीपणाची खाण म्हणजे भटी अंत:करण, हा सिद्धांत पुराणकाला इतका पुराणा आहे. हा सिद्धांत सनातन आहे. काळ बदलो, परिस्थिती बदलो, संस्कृती पालटो, नाहींतर सारी दुनिया उलटो, भटी अंत:करण आणि खुनशीपणा याची समरसता देह आणि आत्म्या इतकी दाट आहे. मुंबईला बावलाचा खून होऊन, गुन्हेगारांपैंकी दोघे फांसावर गेले. बाकीच्यांची बहुतेक वासलाद लागलेलीच आहे. ब्रिटीश अंमदानींत शक्य असलेल्या तपासण्या उपसण्या किसण्या घासण्यादि सर्व विधी कमाल कसोशीचे होऊन, न्यायदान झालें व त्याची अंमलबजावणीहि होऊन चुकली. वास्तवीक ह्या चिळस आणणाऱ्या दु:खपर्यवसायी नाटकाचें 'मरत वाक्य' होऊन या प्रकरणावर अखेरचा पडदा पडला. पण खून झाल्यापासून पोटाच्या आगीनें बेफाम बोकाळलेला भटी सैतान अझून शांत झाला नाहीं. तो कधींच शांत होणे शक्य नाहीं. वेसूबियस ज्वालामुखी जसा रात्रंदिवस धुमसतच असतो, तसा भटी हृदयाचा खुनशीपणा रात्रंदिवस पोटांतल्या पोटांत पेटलेलाच असतो. बाह्यात्कारीं तो जरी लोकहितवादाची पांढरी शुभ्र राख पांघरतो, तरी अंतर्यामीं त्याचे खुनशीपणाचें कुंड अखंड धडाडलेलेच असतें. या कुंडांत आजवर साम्राज्येच्या साम्राज्ये जळून खाक झालीं आहेत. बावला प्रकरणाला निष्कारण बेसुमार रंग चढविण्याची कारवाई याच कुंडांतून उद्भवली नसती तर या क्षुद्र गोष्टीच्या पराचा कावळा झालाच नसता. या प्रकरणाची इतकी सांगोपांग मुद्देसूद छाननी प्रबोधनानें केलेली आहे कीं पुन्हा या विषयावर काहीं लिहिणे म्हणजे इंग्रेजी मराठी वृत्तपत्रांच्या पिंड्यावर बसलेल्या काहीं क्षुद्र भटांना व भटी वृत्तीच्या खुनसटांना निष्कारण महत्त्व देण्यासारखे आहे. सुराज्य-संरक्षणार्थ व दुष्टांच्या निर्दाळणार्थ इंग्रेजी राज्यव्यवस्थेनें जितकी कांहीं यंत्रतंत्रादि साधनें या देशांत अहर्निश जागृत चालूं ठेवली आहेत, त्या सर्वांच्या बिनमुर्वत चरकांतून या प्रकारणाचें वस्त्रगाळ पीठ पडले आणि माथेफिरू अपराध्यांना योग्य तें शासनहि मिळालें. ज्या मुंबई पोलीस खात्यानें अवर्णनीय चपळाई करून या गुन्ह्याचा शेंडा बुडखा सप्रमाण पुराव्यानिशी बोलबोलतां हुडकून काढला, त्यांतल्या अंमलदारांना मुंबई

सरकारनें बक्षिसेहि वाटली; आणि अखेर हे प्रकरण निकालांत निघालें. परंतु इंग्रेज सरकारापेक्षांहि स्वत:स अधिक शहाणें व सत्यान्वेषी समाजणाऱ्या कांही चोखंदळ भटी पत्रकारांना या प्रकरणांत 'न्याय झाला नाहीं' असें वाटतें. यांच्या वाटण्या न वाटण्यावर इंग्रेजी राज्य पद्धतीची कदर व शिस्त येऊन बसलीच तर २० व्या शतकांत मुर्दाड पेशवाईंचा भिक्षुकी सैतानरगाडा आंधळे सुद्धां पाहूं शकतील! परंतु जावत्काल इंग्रेजी कदर या देशांत आहे. तावत्काल तरी या वृत्तपत्री भटांच्या शापांना भिण्याचें कोणाला कांहींच कारण नाहीं. हिंदी लोकांचें ज्या दिवशीं नशीब फिरेल. त्या दिवशी सर्व राजकारणाचीं सूत्रें भटांच्या हातीं जाऊन, भटी वृत्तपत्रकारांच्या अभिप्रायांवर लोकांच्या जीविताचा सोक्षमोक्ष अवलंबून राहील! आज या चित्रगुप्तांच्या हाती काडीचीहि सत्ता नसताना लोकमताच्या कलमप्राप्त कल्पित अधिकारावर त्यांनीं राजकारणाचा, समाजस्थैर्याचा आणि धार्मिक हक्कांचा माजविलेला गोंधळ न दिसण्याइतकी अगर न अजमावण्या इतकी इंग्रेजी राज्यसत्ता आंधळी किंवा मूढ नाही. नाहींतर या भटी खुनशी मनोवृत्तीनें निर्माण केलेल्या परांच्या कावळ्यांनीं साऱ्या महाराष्ट्राला त्राही भगवन् झालें असतें!

राम राक्षस का रावण राक्षण?

संबंध रामायणाचें पारायण झाल्यावर श्रोत्यानें पुराणिकाला प्रश्न विचारला ''बुवा, मला सर्व रामायण कळलें. कोठें कसलीहि कांही शंका उरली नाहीं. फक्त एकच शंका राहिली आहे. ती हीच की राम राक्षस का रावण राक्षस?'' आपल्या एकनिष्ठ श्रोत्याची ही शंका ऐकून पुराणिक बुवा थंडगार पडले. अखेर ते म्हणाले, ''हे एकनिष्ठ श्रोत्या, तुझ्या श्रवणशक्तीची तारीफ करावी तेवढी थोडीच. तुझी शंका लोकमान्य आहे. पण राम राक्षस नव्हता व रावणहि राक्षस नव्हता.'' पेशव्यांच्या पागोड्याएवढें तोंड वासून श्रोता उद्गारला, ''ओ! असं कसं हो पुराणीक बुवा! राक्षस राक्षस म्हणत होता ते कोण?'' बुवा म्हणाले. ''होय. राक्षस नाहीं कोण म्हणतो? दोन राक्षस आहेतच. एक तू आणि एक मी.''

हाच प्रकार 'बावलायन'वाल्या भटी पत्रकारांचा कसा झालेला आहे. हें २२-११-२५ च्या 'लोकमान्य' दैनिकांतल्या 'मृत्यूच्या पडद्याआड' हा अग्रलेख वाचणाऱ्या वाचकांना सांगणे नको. आम्ही ज्या खुनशी भटी मनोवृत्तीविषयीं वाचकांना वारंवार 'धोक्याच्या सूचना' देत असतो तिचें खरें स्वरूप या लोकमान्य लेखांत स्पष्ट प्रतिबिंबित झालेलें वाटेल त्यानें पाहून यावें. ''महामायेचा थैमान'' किंवा ''Temptress'' मध्यें या मनोवृत्तीचा जो आम्ही निर्दय निःस्पृहतेनें सप्रमाण स्फोट केला आहे, तो किती वाजवी व सत्यपूर्ण आहे आणि महाराष्ट्रीय नियतकालिकांच्या क्षेत्रांत कसल्या क्षुद्र मसाल्याची रंगरूटभरती झालेली आहे, हे वाचकांनीं विवेकानें पाहूनच मनाशीं पटवून घ्यावें. सारें 'बावलायन' आटोपलें, एका खुनाबद्दल तीन फांशी गेले व चार जिवंत असून मेले, प्रकरण प्रीव्ही कौन्सिलपर्यंत जाऊन न्यायनिष्ठुरतेच्या कदरीची थप्पड खाऊन परत आले, मुंबई पोलीसांच्या दक्षतेची वाखाणणी होऊन ब्रिटीश इंडियन न्यायदेवतेचा न्याय अनन्यथाकरणीय (irea vocable) ठरला तरीहि-

(१) बाबुलांचा खून करणारे हात दिवे पोंद्यांचे होते; पण तो खून करण्याची प्रेरणा त्यांचीच होती काय?

(२) त्यांना प्रोत्साहन देणारी नि:संशयपणें एखादी शक्ती असली पाहिजे व त्या शक्तीस योग्य शासन होईपर्यंत बावला प्रकरणाचा न्यायास अनुसरून निकाल झाला असं म्हणण्यामागे कोणीही सहसा

धजवणार नाही.

हे लोकमान्य भटाचे पुराण चालूच आहे. ज्या हातानें हे पुराण खरडलें जात आहे. त्या हाताला आज नाशिक कटांतल्या आपल्या जातभाईंच्या कारस्थानांची आठवण कशाला होईल? जॅकसन कलेक्टरचा खून करणारा हात जरी कान्हेऱ्याचा होता आणि रेन्ड आयरर्टंचा प्राण घेणारा होत. चाफेकरांचा होता, पण ते खून करण्याची प्रेरणा त्यांचीच होती काय? चिरोल प्रकरणांत या मुद्द्याचा इतका स्पष्ट खुलासा झालेला आहे की वृत्तपत्री न्यायप्रियतेच्या सबबीखाली वरील प्रश्न विचारायला लोकमान्य सांप्रदायिकांना लाज नसली तरी तोंड नाहीं, ज्या मनोवृत्तींत जॅक्सन रँन्ड सारख्यांच्या खुनाचें बीज थरारलें, ती मनोवृत्ती जोपर्यंत महाराष्ट्रांतून हद्दपार झालेली नाहीं, तोपर्यंत नुसत्या कान्हेऱ्या चाफेकरांच्या फांशींने किंवा सावरकरदिकांच्या हद्दीपारीनें महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाचा व सरकारच्या इंग्रेजी व हिंदी अधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेचा विमा उतरल्याची हमी कोणी घेतली आहे? लोकमान्य म्हणतो-

या प्रकरणांतील पुराव्याचा विचार करता, चार आरोपींना जन्मठेपीची शिक्षा देण्यांत न्या. क्रंप यांनी त्यांच्यावर खरोखरच दया दाखवविलेली आहे. वस्तुत: पाहतां ते चौघेजणहि फांसावर लटकले जावयास पाहिजे होते.

न्यायूमर्ती क्रंप साहेबांनाहि न्याय शिकविणाऱ्या लोकमान्याची ही लोकमान्य 'जस्टिस ॲन्ड मर्सी'ची दृष्टी खरोखरच विचार करण्यासारखी आहे. इंग्रजी राज्य आहे, म्हणून तपासणी सुनावणीसाठी उगाच नऊ दहा महिने फुकट गेले. आमच्या भूदेवांचे भटीराज्य असते तर खुनाच्या दुसऱ्या दिवशींच साऱ्या इंदोर संस्थानावर पेशवाई नांगर फिरला असता! न्यायदानाचा हा भिक्षुकी ताजवा सावरकर प्रकरणाच्या वेळीं कोठें सांदीला पडला होता? 'वस्तुत: पाहतां नाशिक कटांतले सर्व आरोपी फांसावरच लटकले जावयास पाहिजे होते' असा त्या वेळीं कोणी ओठांतल्या ओठांत पुटपुटला असता, तर या वृत्तपत्रीय पेशवाईनें सारा महाराष्ट्र कोल्हेकुई करून डोक्यावर घेतला असता. पण त्यावेळी जॅकसनच्या खुनाबद्दल मामुली नक्राश्रू पलीकडे एकाहि वृत्तपत्री पेशव्यांचें हृदय द्रवलें नाहीं. त्याचा सारा टपाक कणखरपणा 'आरोपींना कडक शिक्षा झाल्या, न्यायादेवतेंनें फाजील उग्र रूप धारण केलें' ही बोंबाबोंब करण्यांतच खर्ची पडला. खून केव्हांहि झाला व कोणीहि केला तरी वाईटच. मग त्यांतहि भट-भटेतर भेद कशाला? भटांनीं पाडलेले खून देशभक्तीचे द्योतक आणि भटेतरांनीं केलेले खून म्हणजे 'ब्रिटीश खालसावरची परचक्रें, खालसांतल्या लोकांच्या 'जीवितावरचें संकट' मानणाऱ्या भटी पत्रकारांच्या खुनसट मनोवृत्तीची धन्य असो, या पलीकडे काय म्हणावें? भटाला सारे खून माफ करणारी पेशवाईच सध्यां अंमलात आहे, या अंमलांने तर झालेली ही भटी पत्रें म्हणे हिंदुस्थानाला स्वराज्य मिळऊन देणार! बावलाचे खुनी उघडकीस न येते तर ''फांसावर लटकलेले व जन्मठेप भोगीत असलेले गुन्हेगार! आजला वाढत्या श्रीमंतींत व अधिकारांत लोळत पडले असते.'' हे बेजबाबदार विधान खरडणारे हातच आज नाशिक कटाग्रणी सावरकर बंधूंना शेकडों रुपयांच्या थैल्या अर्पण करून त्यांच्या नानाविध पूजा बांधण्यांत गर्क आहेत. नि:शस्त्र बावलावर गोळ्या झाडणारे दिघे पोंदे हे जर भ्याड (Coward) मानले, तर टाटा कंपनीच्या मजूरावर गोळ्या झाडणाऱ्या पांडोबा बापटाला 'महर्षि' 'सेनापति' इत्यादि पदव्या अर्पण करणारी तोंडें व लेखण्या भटांच्याच आहेत म्हणून शोभून दिसतात.

तुलनेचा भटी ताजवा

खून, मग तो राजकारणासाठी असो किंवा आणखी कशासाठीं असो, तो वाईटच. 'वाईट' हें विशेषण सुद्धां त्याच्या क्रौर्यापुढें मवाळ ठरतें. जगाच्या वर्तमान उत्क्रांतींत खून हें एक चिळस आणणारें दृष्कृत्य असल्यामुळें, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष खुनी माणूस केव्हांहि मानवतेच्या तिटकाऱ्यासच पात्र होतो. खुनाची प्रवृत्ति अमूकच संस्कृतींच्या मनुष्यांत उत्पन्न होते, असा ठराविक नियम नाहीं. ती जशी रानटी लोकांच्या पाशवी-मनोवृत्तींत थरारते, तशी ती बॅरिस्टर सावरकर व पांडोबा बापट यांसारख्या विद्वानांतहि उभ्दूत होऊ शकते. मानवी विकार दर्याप्रमाणें खवळून केव्हां कोणाला कोठें नेऊन कसल्या दुष्कृत्याच्या खडकावर नेऊन हापटतील याचा कांही नेम नाहीं. परंतु विकारांच्या वावटळींत एखाद्याच्या हातून खुनासारखें दुष्कृत्य घडले, एवढ्याच वरून त्याच्या इतर चांगल्या गोष्टी लक्षांत न घेतां, त्याला सर्रास 'क्षुल्लक' किंवा 'क्षुद्र' मानण्याचें तिऱ्हाईत प्रेक्षकांना कांहींच कारण नाहीं. बावला प्रकरणांतील फणसे दिघे प्रभृति लोकमान्याच्या लेखकाला 'क्षुल्लक' वाटतात. त्यांच्या हातून खून घडला तरी फणसे ॲडज्यूटंट जनरल व दिघे कॅप्टन एअर फोर्स होते. ॲडज्युटंट व कॅप्टन हे ''क्षुल्लक कामगार'' मानणाऱ्या संपादकाच्या कचेरींतले शाहू एम.ए. बॅरिस्टर असावेत, असें वाटतें! एका दुष्कृत्यामुळें जर सर्वच चारित्र्य क्षुद्र ठरवायचें तर सावरकरांना तरी कोणत्या सबबीवर पूज्य मानायचें, पर्स द्यायची व त्यांचा उदो उदो करायचा? ते तर धिंग्रा जॅकसनच्या खुनातले कटाग्रणि! काळ्या पाण्याची शिक्षा भोगून परत आलेले! काय म्हणून त्यांचा सन्मान?

पण ही विचारसरणी क्षुद्र मनाची द्योतक आहे. फणसें पोंदे दिघे प्रभृति अविचारानें व अविवेकानें भलत्याच दुष्कृत्याला बळी पडले, म्हणून त्यांना क्षुद्र लेखणें ही भटी मनोवृत्ती आहे. सावरकरांच्या सुटकेविषयीं प्रबोधनानें १६-१२-२३च्या अंकांत जें इंग्रजी स्फुट लिहिलें, त्याचा मथळाच Honour the Intellect (बुद्धिमत्तेचा आदर राखा.) असाच घेतला होता. त्यांतील विचार पुनरुद्धृत करण्याचें कारण नाहीं. परंतु एकाच परिस्थितींतल्या हतभाग्यांकडे पहाण्याची भटांची व भटेतरांची दृष्टी कशी भिन्न असते, एवढेंच आमच्या वाचकांच्या नजरेस आणावयाचें आहे.

हा हात आणि तो हात

बावला प्रकरणांतील गुन्हेगारांविषयीं मुंबई पोलिसांनीं इतका कस्सून तपास केलेला आहे कीं आतां असा एकहि मुद्दा राहिलेला नाहीं, की ज्यावर शंकेचा शिंतोंडा उडवितां येईल. बचावासाठीं फणशाच्या नातलगांनीं सोडलेल्या पैशाच्या महापूर पाटाचाहि उगम त्यांनीं अजमावून पाहिला. इंदोरांतल्या बड्यांतल्या बड्या बुळे सरकार जहागिरदाराला कर्जाऊ रकमा देणाऱ्या फणसे सावकाराची श्रीमंती सव्यापव्याच्या गोप्रदाना पलीकडे नजर न गेलेल्या भटांना व भटी पत्रकारांना कशी येणार? या मुद्द्यावर चालू वर्षाच्या ३ ऱ्या अंकांत (पृ. ३७) 'एवढा पैसा कोठून आला?' याचें प्रबोधनांत स्पष्ट दिग्दर्शन केलें आहे; तरीहि 'अशा क्षुल्लक इसमांनीं एवढी भरभक्कम रक्कम आणली तरी कोठून?'' ही लोकमान्याला शंका आहेच. यावर मल्लीनाथी करताना हा लेखक म्हणतो की ''ती रक्कम पुरविणारा जो हात, तोच वस्तुत: बावलांचा खून करणारा हात होय. तो हात कलम होई तोपर्यंत बावला प्रकरणाची परिसमाप्ती झाली, असें कसें म्हणतां येईल?'' बावलाच्या खुनांत प्रत्यक्षाऽप्रत्यक्ष भाग घेणारे कांहीं फांसावर गेले व कांही देशोधडीला लागले, तरी खून करणारा हात दिघे पोंद्याचा नव्हे, शफी अहमदचा

नव्हे, मनमुराद पैसे व मोटार पुरविणाऱ्या फणशाचाहि नव्हे, तो दुसराच आहे. त्या खऱ्या खुनी हाताचें कलम झाल्याशिवाय लोकमान्याच्या कलमाचा जीव खालीं पडणार नाहीं. या विधानाचा असा सरळ अर्थ निघतो कीं पोलीस काकांनीं नीट तपास केला नाहीं, खरा गुन्हेगार लुच्चेगिरीनें वगळला, आणि चोर सोडून संन्याशांना फांसावर दिलें. मुंज्या मुलाच्या पत्रावळी एवढ्या विस्तीर्ण विद्वत्तेच्या लोकमान्याने एवढा हा गुप्त पोलीसांवरहि ताण करणारा शोध लावल्यानें, ही चाणाक्ष आंग्लाई आहे कीं टका शेर भाजी टका शेर खाजाची मोंग्लाई आहे, असा लोकांना संशय आला तर तो गैरवाजवी नाही असें कसें म्हणावें? या संशयाचीहि स्पष्ट निवृत्ति झालेली आहे. परंतु मुंबईच्या शताक्ष पोलीसांच्या अकलेपुढें आपल्या भाटी अकलेचें तट्टु धावडणाऱ्या शहाण्याला सेशन कोर्टांतला कडव्या सत्यशोधनाचा नागवा न्यायसुद्धां आडपडद्याचा दिसावा, या मनोवृत्तीचीच येथे फक्त छाननी करावयाची आहे.

देहांत शिक्षा म्हणजे थट्टा नव्हे. देहांत शिक्षा ऐकणें म्हणजे शिवाजी मंदिरांतलीं पुराणें ऐकणें नव्हें, किंवा लोकमान्यांत कॉलमभरतीसाठीं लेख खरडणें नव्हे. साक्षात मृत्यू आ पसरून समोर उभा राहिला कीं माणूस जीव बचावण्यासाठीं कोणाचीहि पर्वा करीत नाहीं. त्यांच्यामागें कोण असतील नसतील त्यांचीं नावें सांगून तो मोकळा होतो. खरी परिस्थिती स्पष्ट सांगतो. जॅकसनची खून करणाऱ्या कान्हेऱ्यानें फांसावर चढतांना स्पष्ट जबानी दिली की-

केसरी राष्ट्रमत काळ वगैरे पत्रांतून जुलुमांची उदाहरणे मी वाचीत असे. त्यावरून मला असें वाटू लागलें कीं साहेब लोकांचे खून पाडल्याशिवाय आमच्या लोकांना न्याय मिळणार नाहीं. स्वत: माझ्यावर कधिं जुलूम झालेला नाहीं किंवा कोणावर झाल्याचें मला माहित नाहीं. जॅक्सन साहेबांना मारल्याबद्दल मला आतां खरोखरच पश्चात्ताप होत आहे. एका चांगल्या माणसाचा मी निष्कारण खून केला.

याशिवाय नाशिक कटांत आणखी जेवढे वीरपीर होते, त्यांचीहि नांवे कान्हेऱ्यानें प्रगट केली. चाफेकरानें सुद्धां केसरी वाङ्मयाकडेच बोट दाखविलें. याविषयीं सर व्हॅलेंटाईन चिरोल यांचा तीन लाख रुपये किंमतीचा अभिप्राय येणेंप्रमाणे आहे.

``It was no personal experience or knowledge of his own that had driven Kanhere to his frenzied deed, but the slow persisten poisen dropped into his ear by the Tilak press. Thought it was Kanhere's hand that struck down `a good man causelessly' was not Tilak rather than Kanhere the real another of the murder? It was merely the story of the Poona murders of 1897 over again."

(**भावार्थ** : स्वत:च्या अनुभवानें किंवा बुद्धीनें हें माथेफिरूपणाचें दुष्कृत्य करण्यास कान्हेरे सिद्ध झाला असें नव्हें, तर टिळक सांप्रदायीं वृत्तपत्रांतून जे विषाचे थेंब अखंड त्याच्या कानांत ओतले जात होते, त्यामुळेच तो या कर्मास प्रवृत्त झाला. 'एका चांगल्या माणसाचा निष्कारण खून पाडणारा हात जरी कान्हेऱ्याचा होता, तरी खरा खुनी हात टिळकांचाच नव्हे काय? ही १८९७ सालच्या पुण्यांतील खुनांचीच पुनरावृत्ति होय.) चिरोलचा हा अभिप्राय आज 'सेटल्ड फॅक्ट' (सिद्ध सत्य) होऊन बसला आहे. तो खोटा आहे, ही टिळकांची बदनामी आहे, असें म्हणण्याची आतां कोणाचीही छाती नाही. दीन दुबळ्या महाराष्ट्राच्या झोपड्यातल्या चिंध्यांचा पिळोटा करून काढलेल्या तीन लाख रुपयांच्या दक्षिणेने हें सिद्ध सत्य खास विलायतेस खरेदी केलेलें आहे. हा हात म्हणजे हाडे रक्तमांस स्नायूंचाच असावा लागतो असे नव्हे. 'टिळक प्रेस' म्हणजे 'लोकमान्य सांप्रदायी

नियतकालिके.' यांनाच जस्टिस दावर यांनीं `A curse to the country' 'देशाचे दुष्मन' असें म्हटलें आहे. हाच तो हात. हीच ती मनोवृत्ति. हीच ती प्रवृत्ति. हिला खून घडवून आणणें म्हणजे 'शाई भरल्या हाताचा मळ' वाटतो; हें चिरोल केसमध्यें अथपासून इतिपर्यंत स्पष्ट सिद्ध झाले असतांहि, लोकमान्यानें मोठ्या नि:स्पृह जज्जाचा डौल आणून बावला खुनाच्या अदृश्य हाताच्या काल्पनिक अस्तित्वाची बोंब ठोकावी, हा शुद्ध मुमताझपणा आहे. शफी अहंमद दिघे फांसावर गेले. पण त्यांपैकी एकानेंहि आपल्या कंपूपलीकडे दुसऱ्या कोणाकडे चुकून बोट दाखविलें नाहीं. फणशानें तर बेछुट आपल्या पहिल्या जबानींत सर्व खुलासा केला. मग तो हात तो हात तो कोणता? लोकामन्याच्या संपादकाला या कटाची पोलीसांपेक्षाहि आणखी विशेष माहिती, असा आमचा तर्क आहे. त्याच्या टीकाविषयक लेखामुळे मुंबईच्या पोलींसावर निष्काळजीपणाचा अप्रत्यक्ष आरोप येऊं पहात आहे. म्हणून या चौकस संपादकाला खास माहितीचा प्रत्यक्ष पुरावा दाखल करण्यास सरकारनेंच आव्हान द्यावें, हेंच योग्य होईल. फांसावर गेलेल्या व जाणाऱ्या आरोपीनाहि माहीत नसलेला हात जर लोकमान्याच्या संपादकीय हातात आला असेल, तर तो भरभक्कम पुराव्यानिशीं मागवून घेणें पोलिसांचे काम आहे. विरोल केसमध्ये सिद्ध झालेला 'तो हात'च जर 'हा हात' अस्तित्वांत असल्याची सरकारला धमकी देत आहे, तर त्याच्या भरभक्कम पुराव्याची मागणी करणें सरकारचें काम आहे. पूर्वीचा 'तो हात' अझून महाराष्ट्राच्या टाळक्यावर रात्रंदिवस सफाई फिरत आहे. इतकेंच नव्हे तर बावला प्रकरणाला विडखोर रंगाचा हात याच हातानें चढविण्याची कामगिरी केलेली आहे. महाराष्ट्रांतल्या असं तोषाचा वणवा याच हाताच्या नानाविध उघड गुप्त हालचालीने भडकविला जात आहे. म्हणून काल्पनीक हाताच्या छायेमागें न धांवता खऱ्याखुऱ्या सिद्ध शाबीत हाताच्या हातचाळ्यावर सरकारनें विशेष लक्ष ठेवणें आर्थिक श्रेयस्कर आहे एवढीच सूचना पुरे. साध्या पुटकुळीची साकडजखम करणारा भटी खुनशीपणा अझून महाराष्ट्रांत जागताज्योत जिवंत आहे, हें पाहून बाळाजीपंत नातूंना स्वर्गातहि धन्यता वाटत असेल!

नैतिक धैर्याची अवश्यकता

सामाजिक आत्मोद्धारी या बाबतींत कितीहि विचारक्रांती झाली, तरी आचारक्रांती व्हावयाला नैतिक धैर्याची आवश्यकता विशेष लागते. बालविवाह, हुंड्याची भाड, विधवांवर अमानुष संन्यासाची बळजबरी वगैरे शेंकडों घाणेरड्या रुढींविरुद्ध लोकमतांत कितीहि विचारक्रांती झालेली असली, तरी आचारक्रांती करण्यास अवश्य लागणारें नैतिक धैर्य क्वचितच आढळून येते; आणि असें धैर्य दाखविणारी एखादी 'अबला' पुढें सरसावली तर कोणा प्रगमशील मनुष्याला कौतुक वाटणार नाहीं! उद्धरेत् आत्म आत्मानम्. ज्याचा त्यानेंच आत्मोद्धार करून घेतला पाहिजे, त्यासाठीं जो लोकमताची किंवा समाजाच्या मान्यतेची वाट पहात बसेल तो ठार मेला; त्याला तरणोपाय नाही, त्याचा उद्धार होणार नाहीं, विधवापुनर्विवाहाच्या बाबतींत विधवांनींच नैतिक धैर्यानें पुढें आले पाहिजे, अशा विषयीं स्पष्ट इशाऱ्याचा एक लेख चालूं वर्षाच्या १ल्या अंकांत (पु. ३६) प्रसिद्ध झालेला वाचकांच्या स्मरणांत असेलच. हा लेख मुद्रसंस्कारांत असतांनाच आमच्या हातीं एका विधवा भगिनीचें पत्र पडलें. कौतुक वाटलें व आनंदहि वाटला. आमच्या भगिनी वर्गांत आत्मोद्धाराचा निश्चय धैर्यानें बळावत चालला म्हणून कौतुक वाटलें आणि समाज ज्या रुढीविध्वंसनाकडे अझूनहि बऱ्याच संशयित दृष्टीनें पहात असतो, पुष्कळ वेळां निंदा करतो, गलिच्छ मनाचे चाण्डाळवृत्ती लोक बिननांवी बीभत्स पत्रें पाठवून विटंबनाहि करतात, अशा नाजूक विषयांत प्रबोधनकारावर पित्याप्रमाणें विश्वास टाकण्याइतकी आदरबुद्धी आमच्या

भगिनी वर्गांत उत्पन्न झालेली पाहून आनंद वाटला. खरोखरच हें आम्ही आमचें भाग्य समजतों.

आमच्या भगिनीच्या नैतिक धैर्यानें आमच्या प्रयत्नांना यश दिले. आमचे नागपुरस्थ मित्र श्रीयुत पांडुरंग परशुराम प्रधान यांनी विधवा-परिणयाचा आपला निश्चय सन १९२२ सालीच आम्हाला स्पष्ट कळविला होता. त्यांनीं त्या निश्चयाला अनुसरून ता. २६ सपटंबर १९२५ रोजीं उपरोक्त आमच्या भगिनी श्रीमती काशीताई (मंदसोरचे रा. वासुदेवरावजी चिटणीस यांच्या कनिष्ठ भगिनी) यांचे वैदिक विवाह पद्धतीनें नागपूर मुक्कामीं पाणिग्रहण केलें. विवाहविधी आचार्य श्री. चिंतामणरावजी मराठे यांनी चालविला. निमंत्रणपत्रिका सुवर्णाक्षरांकित होत्या व त्यावर

श्रीयुत व श्रीमती आर. आर. जयवंत

श्रीयुत व श्रीमती के. एन. प्रधान

श्रीयुत व श्रीमती एम. आर. प्रधान

श्रीयुत व श्रीमती आर. टी. देशमुख

अशा प्रतिष्ठित स्त्रीपुरुषांच्या सह्या होत्या. विवाहाला आबालवृद्ध कायस्थ प्रभू जन व इतर जातीय बरेच मित्र हजर होते. सर्व समारंभ उत्तम रीतीनें व उत्साहानें साजरा झाल्याचें वर्तमान वाचून आम्हाला मोठा आनंद वाटला. नागपूरकर भगिनी बांधवांनीं दाखविलेल्या सक्रीय उत्साहानें सामाजिक उत्क्रांतीचे एक पाऊल पुढें पडले. ईश्वर त्यांचें कल्याण करो. श्रीयुत प्रधान व भगिनी सौ. काशीताई यांचा संसार विश्वंभर सौख्यपूर्ण करो. या कामीं प्रबोधनाची घडलेली अल्प सेवा श्रीकृष्णार्पणमस्तु.

भगिनीनींच पुढें आले पाहिजे

सामाजिक सुधारणेची जेवढी जबाबदारी पुरुषांवर आहे, तेवढीच किंबहुना अधिक स्त्रियांवर आहे. सुधारणेच्या क्षेत्रांत प्रत्यक्ष कार्य करून दाखविण्याची पुरुषांची नालायकी जर स्त्रीवर्गाच्या आत्मोद्धाराची गळचेपी करीत असेल, तर स्त्रियांनीं पुरुषांच्या शहाणपणाला गुंडाळून ठेवून कडब्या निश्चयानें सामाजिक दुष्ट रुढींचें निर्दाळण करायला नैतिक धैर्यानें पुढें सरसावले पाहिजे. हुंड्याचा वार्षिक हैदोस आतां सुरू झाला आहे. यावेळीं प्रत्येक कुमारिकेने असा निश्चय केला पाहिजे कीं हुंड्याची गुप्त किंवा उघड रक्तपिती फुटलेल्या तरुणाचें मी कधींच पणिग्रहण करणार नाहीं. बळजबरीनें मंडपांत उभी केलीच, तर अंतरपाट फाडून टाकीन, त्या हुंडारक्तपित्या तरुणाच्या नरड्याचा चावा घेईन, पण विवाह होऊ देणार नाही. दहा बारा ठिकाणी असली कडकडीत सत्याग्रहाचीं उदाहरणें घडतील तर मोठेच कार्य होईल. स्नेहलतेचा आत्मयज्ञाचा मार्ग भेकड आहे. स्वत:चा यज्ञ करण्यापेक्षां हुंडारक्तपित्यांचा यज्ञ केला पाहिजे. जें हुंडाविध्वंसनाचें कार्य २० पोपटपंची परिषदा भरऊन होणार नाहीं ते दहा-बारा कडव्या निश्चयाच्या कुमारिका सहज घडवून आणतील.

पुनर्विवाहाच्या बाबतींत सुद्धां विधवा भगिनींनी गुराढोराप्रमाणें मिटल्या तोंडी स्वस्थ बसूं नये. अन्नपाण्याप्रमाणेच वैवाहिक सौख्य हा मनुष्याचा निसर्गसिद्ध हक्क आहे. या हक्काला विरोध करणारा धर्म मुळी धर्मच नव्हे. त्या धर्माला खुशाल लाथ मारावी. त्यावर थुंकावें. पालनाची घमेंड मारणारे पालक किंवा आई-बाप जर डुकरांप्रमाणे स्वस्थ बसतील, तर आपण स्वत: पुनर्विवाहार्थ प्रयत्न करावा. पुनर्विवाहाची इच्छा म्हणजे कांही पातक नव्हे!

□□□

पुस्तक परिचय

कलमबहाद्दरांस शेलापागोटें

ब्राह्मण-अब्राह्मण-बोध

चैतन्योत्पादक ग्रंथमालेचें २ रें पुस्तक. संपादक श्री. वासुदेव दामोदर मुंडले, इसलामपूर. किं. २ रुपयें) यांत मुंडले यांच्या सुप्रसिद्ध ब्राह्मणपत्रिका मासिकांतील निवडक निबंधांचा संग्रह केलेला आहे. ब्राह्मण कितीहि विद्वान झाला, त्यानें विवेकी विवेचनाची केवढीही शिकस्त केली आणि सात्विकपणाची कसलीहि प्रौढी मिरविली, तरी ब्राह्मण-ब्राह्मणेतर-वादांत ब्राह्मणेतरांच्या-बेशिस्त व असंघटीतच कां होई ना-चळवळीकडे पाहण्याची कट्टर ब्राह्मणाची दृष्टी कशी असते, हें या ग्रंथावरून फार चांगलें पटतें. शिवाय, ब्राह्मणेतरांची चळवळ ब्राह्मणजातीच्या द्वेषावरच उभारलेली आहे, इतकें दृष्टीकोणाचें सुकाणू कायमचें तिरपागडे फिरवून ठेवल्यावर वाटेल त्या तीक्ष्ण मंद डोळ्याच्या दृष्टीला या चळवळीचे परिणाम व त्यांतल्या कार्यकर्त्यांची चित्रें किती वेडीविद्री व भेसूर दिसू शकतात, हे या पुस्तकांत छान पहावयास सांपडतें. प्रत्येक इरसाल ब्राह्मणाने हें पुस्तक मुखोद्गात करावें, म्हणजे 'सार्वजनिक' व्यासपीठावरील शाब्दिक रणधुमाळीचे सामने सफाईत लढवितां येतील. 'निंदकाचें घर असावे शेजारी' या न्यायानें प्रत्येक ब्राह्मणेतरानें हे पुस्तक एकवार तरी अवश्य वाचावें. अशी शिफारस आहे.

अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रें

(ले. विनायक सदाशिव वाकसकर, श्री. जुम्मादादा व्यायाम मंदिर, बडोदे. किं. १ रुपाया) प्रस्तुत उपयुक्त ग्रंथ श्री सयाजी साहित्यमालेचें ९८वें पुष्प म्हणून प्रसिद्ध झाला आहे. यांत रामचंद्र बाबा सुखटणकर, रामदासपंत, चंगिसखान, अहिल्याबाई, खंडो बल्लाळ, नानक, अहमदशहा अबदाली, रामशास्त्री, भास्करराम, मुजफरखान गारदी, तुळाजी आंगरे, रंगो बापूजी, इभराहिमखान गारदी, सखाराम हरी या १४ ऐतिहासिक महत्त्वाच्या व्यक्तींची चरित्रचित्रे रंगविलेली आहेत, शिवाय होळकर व रंगो बापूजी यांच्या वंशावळी पुस्तकांस जोडल्या आहेत.

मराठ्यांच्या इतिहासविषयक ताजमहालाचें बांधकाम करण्यांत सध्यां जे अनेक कारागीर गुंतले आहेत. त्यांत श्री. वाकसकरांची गणना होते. हे उद्योगी संशोधक आहेत. नेहमी काही तरी इतिहासविषयक चर्चेत श्रमत असतात. मिळेल तितकी माहिती छापतात. प्रस्तुत पुस्तक असल्याच

उद्योगाचे फळ आहे. मात्र संकलीत केलेली सर्वच माहिती पूर्ण आहे असें नव्हे. रंगो बापूजीच्या चरित्रांत तर पुष्कळ गोष्टी श्री. वाकसकरांना अझून शिकावयाच्या आहेत. तथापि मिळालेली माहिती सरळ भाषेंत संकलीत करून श्री. वाकसकरांनी मराठी इतिहासाची गोड सेवा केली आहे यांत मुळींच संशय नाहीं. प्रबोधनाच्या इतिहासप्रेमी वाचकांनी हें उपयुक्त पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें अशी शिफारस आहे.

विद्युत स्वावलंबन

(सचित्र. ले. गोविंद केरोबा दाते, विद्युत्प्रवीण, मु. मालाड, जि. ठाणे, किं. ६ आणें.) हल्लीं बिजलीचें युग सुरू आहे. परंतु या विषयींचे वाङ्मय इंग्रजी भाषेंत असल्यामुळें निवळ मराठी भाषा जाणणारांची फारच गैरसोय होत असे. विद्युत् शास्त्राचा श्री. दाते यांचा स्वाध्याय व प्रत्यक्ष अनुभव मुंबई लत्त्याला सर्वश्रुतच आहे. केवळ मराठी भाषेतून या बिजलीच्या शास्त्राचें सर्व ज्ञान सचित्र पुस्तकाच्या द्वारे देण्याचा श्री. दात्यांचा उपक्रम प्रसंशनीय आहे. त्यांनी लिहिलेले (१) विद्युत व विद्युत क्रेन आणि (२) विद्युत ताराची रचना (किं. ३ ।। रुपये) या मराठी ग्रंथांनीं पुष्कळ बिन इंग्रेजी लोक इलेक्ट्रिशियन्स वायरमेन इ. बनले आहेत. हीच त्यांच्या ग्रंथांच्या उपयुक्ततेची साक्ष होय. प्रस्तुतचे छोटेखानी पुस्तक ज्यांच्या घरांत विजेच्या बत्त्या व पंखे आहेत अशांना फारच उपयुक्त आहे. ह्यामध्ये विजेचा खर्च कसा कमी करावा; आग कां लागते, त्यांची दुरुस्ती आपण स्वत: कशी करावी व धोक्याच्या वेळीं आपण काय करावें इत्यादि सूचना सचित्र दिल्या आहेत. प्रत्येक वस्तूचा उपयोग कसा करावा; विजेच्या बत्त्या म्हणजे काय? त्या किती प्रकारच्या असतात; त्याची वीज ग्रहण करण्याची शक्ती किती असते; विजेचा खर्च कसा कमी करावा; विजेचे कॉंट्रॅक्ट कसें द्यावें; योग्य भाव काय आहेत, काटकसर कोठें व कशी करावी इत्यादि माहिती भरपूर दिली आहे. पुस्तक अत्यंत उपयुक्त झालें आहे.

आर्यधर्मेन्द्र दयानंद सरस्वति यांचा महाराष्ट्रास अल्प परिचय

(ले. हरि सखाराम तुंगार, कोल्हापूर, किं. ८ आणें.) या पुस्तकाला श्रीयुत लक्ष्मणराव भोपटकर यांनी छोटी प्रस्तावना जोडली आहे. 'प्रश्न आणि उत्तर' (Catechism) या पद्धतीनें आर्यधर्मेन्द्र स्वामी दयानंद सरस्वति यांचें चरित्र, त्यांची आर्यसमाजाची चळवळ, आर्यधर्माचे व्यापक मूळ स्वरूप. त्याच्या पुनरुद्धारार्थ स्वामीजीनीं केलेली व आर्यसमाजानें जोराने पुढे चालविलेली पुण्यप्रद कामगिरी, तिचा देशावर होत असलेला राष्ट्रीय-भावना-संवर्धक परिणाम, इत्यादि सर्व तपशील श्री. तुंगार यांनी या पुस्तकांत मनोवेधेक रंगविला आहे. प्रत्येक स्वाभिमानी हिंदूनें हें पुस्तक मुद्दाम स्वाध्यायांत आणावें.

सुवेळचे बोल

(संग्राहक : पां. सी. दोंदे, सोलापूर. किं. १ आणा) यांत काही सन्मार्गप्रवर्तक म्हणीवजा वचनें दिलीं आहेत. ती चांगली आहेत. भाषा तर मराठी, पण वाक्यरचना यांत्रिक व बळजबरीची आहे. भाषांतराचा परिणाम दिसतो.

''ज्या स्त्रीचे हात सुंदर आहेत ती साधी असूं शकत नाही.''

या सूत्रांतला अर्थ काढणे वडारणीचे केस पिंजण्याइतकेंच कठीण कर्म नव्हे काय?

''व्यापार द्रव्याची जननी होय.'' व्यापार शब्द पुल्लिंगी. 'तो' व्यापार. त्याला 'जननी' बनविली. गणितांत त्रयराशिकें सोडवितांना पुरुषांच्या बायका करण्यांतलाच हा प्रकार!

''कोळणींचा बाजार भरवावयाचा असल्यास चार स्त्रिया आणि एक-हंसी-एके ठिकाणीं जमवावी.''

या वचनाचा अर्थ लावतां लावतां कोणाच्याहि डोक्यांत कोळणीचा बाजार तेव्हांच भरेल.

'सुवेळचे' काय? काय हे भाषेचे धिंडवडे!

पुरुषोत्तम योग

(संपादक व प्रकाशक रा. रा. बाळकृष्ण धोंडदेव दिवेकर, हेडमास्तर ए. व्ही. स्कूल, एदलाबाद, पूर्व खानदेश, किं. २ आणें.) श्रीमत् भगवद्गीतेचा १५ वा अध्याय मूळ श्लोक व अन्वयार्थासह यांत स्वतंत्र छापला आहे. कठीण संस्कृत शब्दांची पदें सोडवून त्यांचे अर्थ सोप्या मराठींत वर्णानुक्रमाने शेवटीं जोडले आहेत. असलीं पुस्तकं लहान सुबक आकारांत व आकर्षक मुद्रणांत बाहेर पडलीं पाहिजेत.

मागविण्याचा पत्ता : दिवेकर बंधू, २३४ शनिवार, पुणे शहर.

शिक्षण स्फूर्ति

किंवा सन्मार्गदायी पोवाडा. (कवि व प्रकाशक श्री. गंगाधर कृष्ण काकडे, हेडमास्तर, श्रीनामदेव रात्रीची मोफत शाळा, बेळगांव, किं. दीड आणा.) घरोघरी झाले कवी। गद्यपद्याची काकवी।। या पुस्तकांतली अक्षरें पद्य म्हणावीं, तर ती गद्यासारखी दिसतात. गद्य म्हणावें तर हें पद्यच आहे, असें 'कवि' ठांसून सांगतात. असल्या 'विटाळ्याच्या कविता' रचून महाराष्ट्र काव्यदेवीचे वस्त्रहरण करण्यापेक्षां व स्वत:स 'कवि' म्हणून घेण्यापेक्षां श्री. काकडे शुद्ध गद्य भाषेंत बोलतील तर बरें होईल, या पुस्तकाचें उत्पन्न शिक्षण फडाकडे जावयाचें आहे.

भयंकर अत्याचार आणि पंढरपूर येथील बडव्यांचा बुद्धिभ्रंश

(ले. अनंत गणेश मांढरे, संपादक सहकारी नामदेव, ७८ निहाल पेठ, पुणे शहर. किं. १ आणा.) या छोट्या पुस्तकांत ७ पानें संत नामदेवाचें संक्षिप्त चरित्र भक्तिभावाच्या भाषेंत दिलें आहे. पुढें 'नामदेवाची पायरी' हीच 'नामदेवाची समाधी' असा ६०० वर्षे समज असलेल्या पायरीबद्दल पंढरपूरच्या बडव्यांनीं (ब्रह्ममुखोत्पन्न पवित्र सात्विक तपस्वी अशा शुद्ध भटांनीं) १९२४ सालापासून नामदेवाच्या पालखीला, टाळकुट्या साधुसंतांना (?) दगड धोंडे सोटे ठोसे यांचा खरपूस चोप देण्याचा जो वार्षिक अत्याचार सुरू केला आहे, त्याची शोचनीय माहिती दिलेली आहे. नामदेवांच्या जातभाईंना, टाळकुट्यांना भट बडवे मारे रट्ट्या चोप देत आहेत, पालखी मोडून अस्ताव्यस्त पडली आहे, नामदेवाच्या पादुका भक्तजनांच्या पायतण पागोट्यांबरोबरच कोठेतरी उपड्या तिपड्या पडल्या आहेत, साधुसंत (अर्थात् मेंग्ये टाळकुटे) पाठपोटभर भटी गचांड्या खाऊन रक्तबंबाळ स्थितींत एकमेकांवर कोलमडून पडले आहेत, असें एक चित्रहि पुस्तकाच्या कव्हरावर छापलें आहे. हा सर्व प्रकार पाहून हंसावें कीं रडावें हेंच कळेनासें होतें. 'आम्हांला बडव्यांनीं बदडलें होंऽऽ!' म्हणून भोकाडा पसरणाऱ्या या नामर्द व पुळचट नामदेव शिंप्यांची आम्हांला कींव येते. भटें बदाड बदाड बदडतात आणि या लोकांचें हात काय केळी खायला जातात? पायरीच्या हक्काचा प्रश्न कांहीहि असो. ती नामदेव शिंप्याची समाधी असो, नाहींतर बडव्यांच्या सावत्र बापाचे थडगें असो. पण मूर्खांनो, भटांचे रट्टे खाऊन शेळपटासारखे हों हों करीत रडत परत येता? परशुरामाच्या भयानें छपून बसलेले क्षत्रिय ते छिपी; छिपीचे झाले शिंपी आणि म्हणून आम्ही क्षत्रिय; हा और ऐतिहासिक शोध लावणारे तुम्ही मर्द ना? मग फुकटा फाकट मार खाऊन, त्याची पुन्हा जाहीरात देतां, हें क्षत्रिय तेज कांहीं न्यारें खरें! नामदेवाचे अभंग पाठ म्हणून

तुमची दरसाल मऊ होणारी पाठ कांही ताठ रहाणार नाही. आजचा मनू टाळकुट्यांचा पाठीराखा नाहीं. संतांच्या शिकवणीनें देशाचे कल्याण कितपत झालें, हें कोणाला पाहावयाचें असेल तर या मेषपात्र पालखीवाल्यांकडे पाहिले म्हणजे झालें. बेटे तडाड मार खातात तरी हूं का चूं करीत नाहींत! हाच जर साधूसंतपणा असेल तर तो जमीनदोस्त करण्यांत बडवे भट खरोखरच एक 'राष्ट्रीय' कर्म करीत आहेत, असें म्हटलें पाहिजे. 'जबरदस्तानेंच जगावें' (Survival of the fittest) या नात्यानें बडव्या भटांचा वार्षिक चोपाचा रतीब खाऊन मरावें, कीं एका टोल्याला दहा टोले लगाऊन जगावें, हा महत्त्वाचा प्रश्न नामदेव शिंप्यांनी आतां सोडवावा. टाळकुटे रडवे, त्यांना चोप देणार बडवे! ठीकच आहे.

ज्या नामदेवाच्या पायरीबद्दल शिंपी बांधव हक्कासाठी भांडत आहेत, त्याचा इतिहाससिद्ध पुरावा तर कोठेच दिला नाहीं. नुसती '६०० वर्षांची वहिवाट' किंवा 'समज' हा काहीं पुरावा नव्हें. नामदेव दोन तीन होऊन गेले. ज्ञानेश्वर समकालीन नामदेव निराळा, 'दामाशेटीचा नामा' निराळा, आणि 'विष्णुदास नामा' निराळा, अशा त्यांत भानगडी आहेत. नामदेवाच्या अभंगांची गाथा ही सुद्धां विश्वसनीय नाहीं. कारण 'नामा' शब्द दिसला तो अभंग या गाथेंत घुसडला आहे. त्यामुळें परस्परविरोधी मतांचे कित्येक अभंग एकाच नामदेवाच्या नांवानें एकाच गाथेंत सापडतात. अर्थात खुद्द नामदेवाचाच जेथे पत्ता नाहीं, तेथें त्याच्या पायरीच्या हक्काचा प्रश्न सोडविण्यासाठीं शिंपी बांधवांनी नुसते हातबोटें चोळण्यापेक्षां, ही पायरी दामाजी शेट शिंप्यांचा मुलगा संत नामदेवाचीच आहे, हें स्पष्ट सिद्ध करण्याचाच प्रयत्न केला पाहिजे. नुसते टाळ कुटून, काठीला भगवी चिंधी बांधणाऱ्या मेषपात्राना 'साधुसंत' ठरवून, किंवा भक्तीच्या आणि चमत्कारांच्या अभंगांची झोड उठवून हा प्रश्न सुटेल असें आम्हांला वाटत नाहीं. बडव्यांसारख्या मानवी राक्षस भटांशीं सामना देणाऱ्यांनीं आपला टाळकुटेपणा प्रथम टाकल्याशिवाय, लठ्ठालठ्ठीच्या किंवा कायदेबाजीच्या सामन्यांत टिकाव लागणार नाहीं. तुका म्हणे तेथें पैजाराचें काम। अधमाशीं तो अधम।।

□□□

लेख

नाताळातील विचार क्रांतीचा आठवडा

(लेखाचे सुरुवातीचे पान गहाळ आहे.)

आत्यंतिक अवमान व निर्भत्सना होईल असें कांहींहि बोललें अथवा लिहिलें तरी तें चालतें; पण ना. जाधवांसारख्यांनी या अवमानाच्या व निर्भत्सनेच्या तिडका स्पष्ट व्यक्त केल्या. आणि सोद्यांना सोदे असें स्पष्ट म्हटले तर त्यात वावगें तें काय? ना. जाधवांचे कांही सिद्धांतरूप स्पष्टोद्धार खालीं दिले आहेत-

मध्यप्रांत आणि वऱ्हाडांतील भटांची स्वराज्याची कळकळ आणि भिक्षुकशाही स्तोमाची तळमळ हीं समगोत्री होत.

धार्मिक आणि व्यावहारिक क्षेत्रांत आपलें वर्चस्व येनकेन प्रकारेण टिकवून धरणे, एवढाच भटांचा मुख्य उद्देश आहे. परिस्थितीच्या पालटीमुळें त्यांनीं आपल्या राजकारणी डांवपेचांत केवढाहि पालट केला, तरी त्यांच्या उद्देशाचे सुकाणूं कधींच बदलत नाहीं.

महाराष्ट्रांतला 'लिबरल' (मवाळ) भटजी स्वराज्यवाल्या जहाल भटापेक्षां फारसा निराळा नाहीं. (उलट. उघड उघड कट्टा जहाल भट पत्करला. कारण तो उघड विरोधी असतो; पण लिबरलत्वाची ओढणी घेतलेले मवाळ भटजी फार भयंकर! असा अनुभव आतां पुष्कळांस येत आहे. वेळीं जहाल सोडावा. पण मवाळ ठेचावा. (सं.प्र.)

भट नेहमीं उच्च वातावरणांतल्या वेदांती गप्पा मारतो, पण त्याच्या मनाची आंतली गांठ तो कधीच उघड दाखवायचा नाहीं. त्यामुळें राजकारणी भटांचा कावा सर्वांच्या टाळक्यांवर हात फिरवून आपल्या स्वजातीचें स्तोम माजविण्याचाच आहे हें आतां सर्वांना पटूं लागलें आहे. भटांत कांहीं चांगले भट आहेत; नाहींत असें नाही. पण ते इतके थोडे आहेत कीं सर्वसामान्य भटेतर माणसाला भल्या बुऱ्याची पारखच करणें जड जातें.

हिंदू महासभेच्या द्वारें संघटनाचा आणि एकीचा जो प्रयत्न चालूं आहे, त्यांत सुद्धा महाराष्ट्रीय भट आपल्या जातीच्या स्तोमासाठीं गोंधळ केल्या शिवाय राहणार नाहीं, अशी माझी समजूत आहे.

या उद्धारांत ना. जाधव यांनीं असत्य असें काय सांगितलें, हेंच आम्हाला समजत नाहीं. ज्यांना नुसतें केवळ टाळ्यांसाठी जिभेच्या लाटण्यानें टाळूच्या पाट्यावर काव्यकल्पनेच्या पोळ्या लाटावयाच्या

असतात किंवा लाटलेल्या आवडतात, त्यांच्यासाठीं यंदा राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षस्थानी काव्यकल्पलता सार्वजनिकबाई नायडू यांची खास सोय केलेली होतीच. पण तसल्या नाटकी काव्यकल्पनांची भटांनीं व भटाळलेल्यांनीं भटेतर पुढाऱ्यांकडून अपेक्षा करणें, हा शुद्धभटी मूर्खपणा नव्हे काय?

उमरावतीचें प्रबोधन

वऱ्हाड मध्यप्रांतांतली ब्राह्मणेतर जनता आतांपर्यंत भटांभिक्षुकांच्या 'मम आत्मना'वर झुलत असे. तिच्यावर पडले मानसिक दास्याच्या शाबरी मंत्रांचें दडपण उडविण्याचे वैयक्तिक लहानसहान प्रयत्न पुष्कळ झाले. प्रयत्नांनीं नांगरटीचें काम केलें आणि तें इतकें उत्तम व खोलवट केलेलं कीं आत्मिक प्रबोधनाचा प्रभाव व्यक्त झाला असेल नसेल तोंच झाडून साऱ्या भिक्षुकांच्या आंगाचा तिळपापड उडाला. वर्चस्वहानी ही प्राणहानी पेक्षांहि भयंकर जाणवते! ब्राह्मणेतर जनता म्हणजे मेंढरे आणि पाटलूण पंचेबहाद्दर जहाल मवाळ भटजी म्हणजे त्यांचे मेंढपाळ, ही आजपर्यंतची स्थिती होती. भट ठरवील ती पूर्व दिशा! यामुळें वऱ्हाड म्हणजे भटी दे. भ. सोद्यांना इच्छाफलदायी सोन्याची कुऱ्हाड होती. फंडगुंडीचा धांगडधिंगा आजपर्यंत वऱ्हाडच्या ब्राह्मणेतर जनतेच्या आंतडी पिळण्यानेंच साजरा झालेला आहे. वऱ्हाड मध्यप्रांत म्हणजे भटांभिक्षुकादि पोळांचें चरण्याचें ताम्रपटी कुरण. परंतु यदा ब्राह्मणेतर काँग्रेस वगैरे परिषदांनीं वऱ्हाड मध्यप्रांताच्या मानसिक गुलामगिरीवर आत्मिक प्रबोधनाची कुऱ्हाड घालून, बहुजनसमाजाला माणुसकीची ओळख पटवून दिली, हा १९२५ सालच्या इतिहासांतला एक चिरस्मरणीय प्रसंग होय.

पिशाच्चानें पछाडलेला माणूस एरवीं फारसा आततायी नसतो. पण तेंच त्याची व मांत्रिकाची नजरानजर झाली कीं तो इतका बेफाम होतों कीं झाडाला बांधून ठेवला तर वेळीं तें झाडहि मुळांसकट उपटतो. भिक्षुकीं सैतानशाहींवर ब्राह्मणेतर चळवळ हा असा जालीम मांत्रिकी तोडगा आहे कीं सैतानाच्या वाढत्या थैमानावरून या मंत्राचा दीर्घवेधी परिणाम डोळे झांकून अंदाजावा. उमरावतीच्या प्रबोधनाविरुद्ध जेव्हां भटी वृत्तपत्रें मरल्या कोंबड्याचा तडफडाट दाखवूं लागलीं व कल्पनातीत खोडसाळ बातम्यांनीं आपापलीं तोंडें डांबरी रंगांत रंगवून नाचूं लागलीं, तेव्हांच सर्व विवेकी जगानें अंदाज बांधला कीं वऱ्हाड मध्यप्रांतातल्या बहुजन समाजाचें आत्मप्रबोधनाचें कार्य भिक्षुकी सैतानशाहीच्या मर्माला बिनचूक डागण्या देऊं लागले. सैतान खवळला कीं, मंत्र लागूं पडलाच म्हणून खूणगांठ बांधावी. कांहीं चोखंदळ ब्राह्मणेतर हातांत भटीं पत्रें धरीत नाहींत. पण ही त्यांची भटचूक आहे. ब्राह्मणेतरांच्या स्वयंनिर्णयाची प्रगति कोठवर आली, हें भटी पत्रांच्या सैतानी थैमानावरून जितकें ताळेबंद कळतें, तितकें ब्राह्मणेतरांचीं 'मुखपत्रें' वाचून समजणार नाहीं. मात्र भटी पत्रांतलें लेख पत्रव्यवहार बातम्या वगैरे 'पवित्र वेद' वाचतांना

उलट्या भिंगाचा चष्मा

बिनचूक वापरावा. नाहींतर वाटेल तो म्हसोबा देवदूत दिसेल आणि उपटशुभाची शंकराचार्य म्हणून पायतणपूजा करण्याचा प्रसंग यायचा. उमरावतीच्या ब्राह्मणेतर प्रबोधन-कार्याची भटी पत्रांतून झालेली नालिस्ती विचारांत घेतली तर तेथल्या सर्व परिषदांचा परिणाम अत्यंत यशस्वी व चिरफलदायी असाच झाला, यांत तिळमात्र संशय नाहीं.

ब्राह्मणेतर काँग्रेस

काँग्रेसच्या या दुसऱ्या अधिवेशनाचें नेतृत्व मद्रास इलाख्यांतील पानगळचे राजेसाहेब यांनीं स्वीकारलें

होतें. प्रचलित राजकारणाची राजेसाहेबांनीं केलेली मार्मिक चिकित्सा त्यांच्या राजकारणपटुत्वाची बिनतोड साक्षच होय. या चिकित्सेमुळें ब्राह्मणेतर पक्षाच्या राजकीय आकांक्षा व त्या साधण्याचे त्यांचे साधनमार्ग यांचा स्पष्ट उलगडा, आमच्या मतें, याच परिषदेंत झाला. ब्राह्मणेतर काँग्रेसला 'तमाशा' 'जलसा' इत्यादि नांवें ठेवणाऱ्या भटी पत्रकारांच्या विवेकाची तिरडी ओंकारेश्वरावर गेलेली नसती, तर आम्हीं त्यांना हेंच सांगितले असतें कीं 'लाडक्या भटबंधो, राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षाच्या काव्यकल्पनेच्या भराऱ्यापेक्षां या ब्राह्मणेतर काँग्रेसच्या विचारांत व उच्चारांत आचरणीय राजकारणाचा मार्ग स्पष्ट पाहून घे.' परंतु विवेकभ्रष्टांना विचाराचा आग्रह, बहिऱ्यापुढें गायनाइतका- किंवा तमाशासारखा-क्षुद्र ठरला, तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. राजेसाहेबांचे भाषण सामाजिक व राजकीय दृष्टीनें व्यवहारक्षम असेंच झाल्याबद्दल हिंदद्वेष्ट्या आंग्ल पत्रकारांनींहि स्तुति गायिली आहे.

मुसलमानांचा मिलाफ

या काँग्रेसमध्यें पुढाऱ्यांनीं 'ब्राह्मणेतर' व्याख्येंत मुसलमान पारशी ख्रिश्चनादिक हिंद्वेतरांचा समावेश करण्याचें जें धोरण स्वीकारलें, तें मात्र अत्यंत चुकींचें झालें. मुसलमानांच्या गळ्याला मिठ्या मारून त्यांच्या नाटकी प्रेमाच्या व तात्पुरत्या लाभाच्या मृगजळानें, या पुढाऱ्यांची कोणत्या धोरणाची तृषा शांत झाली, किंवा होणार, हें सांगणें कठीण आहे. हिंदु ब्राह्मणेतरांनीं मुसलमानांशीं मित्रत्वाच्या नात्यानें वागूंच नये, असें कोणीहि म्हणाला नाहीं, म्हणत नाहीं व म्हणणारहि नाहीं. परंतु ब्राह्मणेतरांच्या स्वयंनिर्णयी चळवळींत त्यांचा समावेश करणें, म्हणजे या चळवळीच्या मूलतत्वांनाच हरताळ फासण्यासारखे आहे. ब्राह्मणेतर चळवळीच्या जन्मसिद्ध द्वेष्ट्या भटबामणांचा सूड उगविण्यासाठीं 'एकसे दो भले' एवढ्याच कल्पनेनें ही शेंडी दाढीची गांठ असेल, तर काँग्रेसचे चालक लोक बेअक्कल समजले पाहिजेत. रा. ब. नायडू यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत केलेला इस्लामप्रेमाचा खुलासा जितका हास्यास्पद आहे तितकाच पोरकट आहे. हिंदुसभा स्थापन करून ब्राह्मणेतरांत आणि मुसलमानांत ब्राह्मणांनीं तेढ उत्पन्न केली व मुसलमानांकडून ब्राह्मणेतरांची डोकीं फोडविली, असलें विधान निदान नागपूर कायदे कौन्सिलच्या दुय्यम अध्यक्षाला खास शोभलें नाहीं. भट कितीहि आंतल्या गांठीचे सोदे असले, तरी भटेतरांची व मुसलमानांची लठ्ठालठ्ठी जुंपवून मौज पहात बसण्याइतकी त्यांची शक्ती खास नाहीं. इस्लाम दोस्तीचा मद्रास कडील चळवळीचा रा. ब. नायडूंनीं दिलेला दृष्टांतहि त्यांच्या संकुचित दृष्टीचा द्योतक आहे. मुसलमानांचा किंवा पार्शी क्रिश्चनांचा ब्राह्मणेतर चळवळींत समावेश करणें म्हणजे या चळवळींच्या मूळ उद्देशांची मान मुरगाळून, खुद्द तिचीहि आत्महत्त्या करण्यासारखें आहे. बुद्धिमत्तेंत वरचढ परंतु अल्पसंख्य, आणि म्हणूनच धकाधकीच्या मामल्यांत सर्वस्वीं कमजोर अशा भटांचा नक्षा उतरण्यासाठी मदांध मुसलमानांना ब्राह्मणेतरत्वाच्या दीक्षेंत घेणें, हा मुत्सद्दीपणा तर नाहींच, पण हें धोरणहि पुढाऱ्यांच्या पुढारीपणाला नामुष्की आणणारें आहे. हिंदु आणि मुसलमान हा प्रश्न किती भयंकर अटीतटीचा झालेला आहे आणि सध्यां मुसलमानांच्या चळवळी कसल्या गुप्त धोरणानें सुरू आहेत, याचा विचार केला तर उमरावती काँग्रेसच्या पुढाऱ्यांना बेअक्कल हीच पदवी देणें भाग आहे. मुसलमानी धोरणांचा इतिहास कोणकोणत्या वळणांनी चालला आहे याची सप्रमाण मुद्देसूद माहिती

संस्कृतीचा संग्राम

(किं. १ रुपया) या आमच्या ग्रंथांत संकलित केलेली आहे. या बेअक्कल पुढाऱ्यांनीं हा ग्रंथ विकत

घेऊन अवश्य वाचावा, अशी आमची आग्रहाची शिफारस आहे. त्यांनीं टाकलेलें पाऊल आत्मघातकी कसें आहे, याविषयीं राष्ट्रवीर पत्रानें २९-१२-२५ च्या अंकांतल्या अग्रलेखात स्पष्ट सिद्ध केलें आहे. राष्ट्रवीर म्हणतो :

''ब्राह्मणेतर ब्राह्मणांना मूठभर म्हणतात. मग अशा बहुसंख्याकांनीं चिमूटभर ब्राह्मणाची रग किंवा मस्ती जिरविण्याकरितां मुसलमानांच्या पाठिंब्याची आवश्यकता बाळगावी, हें ब्राह्मणेतरांनीं आपल्या नेमळेपणाची कबुली देण्यासारखेंच होय. मुसलमानांच्या मदतीनेंच ब्राह्मण हटत असतील तर मूठभर ब्राह्मणांचा कायमचा हल्ला चुकविण्याकरितां अफाट संख्येच्या ब्राह्मणांचा कायमचा हल्ला चुकविण्यांकरिता अफाट संख्येच्या ब्राह्मणेतरांनी मुसलमानांची मनधरणी अखंड करीत राहाणें निरुपायाचें होऊन बसेल, ही गोष्ट मुसलमान समाजास जर चांगल्या प्रकारें कळून आली तर ते ब्राह्मणेतरांवर कुरघोडी करण्यास कमी करतील तर जगांत जगावयास ते नालायक ठरतील. लहान मासे व मोठे मासे एकाच समुद्रांत राहातात, दोघांचेंहि जीवन एकच व ते एकाच मनोधर्मांचे आणि जातीचे. असें असतां लहान माशांस गिळंकृत करून मोठा मासा जगत असतो. मग मुसलमान तर सांगून सवरून भिन्न हितसंबंधाचे, भिन्न संस्कृतीचे, भिन्न धर्माचे व भिन्न जातीचे. तेव्हां अशांच्या मदतीवर हरिणासारख्या भित्र्या स्वभावाच्या ब्राह्मणांना आपल्या कुरणांतून हाकून देण्यासाठीं आपखुशीनें मुसलमानांचा लगाम आमच्या तोंडांत घेऊन त्यांना पाठीवर स्वार होऊ दिलें तर इसापनीतींल घोड्यापेक्षां आम्ही कमअकलेचे व लांब कानचि म्हणजे गाढव ठरूं. म्हणून केवळ ब्राह्मणालाच जर दमवायचें आहे तर त्यासाठीं मुसलमानाच्या पाठिंब्याची अपेक्षा बाळगणें जरुरीचें आणि योग्य दिसेल तर आम्ही स्पष्ट सांगतों कीं, ब्राह्मणेतर हिंदु केव्हांहि गुलामच राहणार.''

उमरावतीच्या काँग्रेसमध्ये ब्राह्मणेतर पार्टीचें क्रीड ठरणार, संघटना होणार, 'ब्राह्मणेतर' शब्दाची व्याख्या ठरणार, वगैरे लंब्याचौड्या वलगनांचा अखेर हा परिणाम! करणार होते गणपति, तों झाला मारुती! ब्राह्मणेतर पक्ष प्रथमत: ज्या कारणांनीं निर्माण केला, तीं कारणें आतां मागें पडून, कांहीं अगडबंब स्वार्थसाधू म्होरक्यांनीं आपल्या राजकारणी स्वयंमन्यतेचें घोडें या उमरावतीच्या पर्वणी-गंगेत धुवून घेतलें, या पलीकडे अधिक कांहीं झालें नाहीं. ब्राह्मणेतर पक्षाचें मुखपत्र' म्हणविणाऱ्या 'राष्ट्रवीरा'च्या 'भाषेंत बोलावयाचें तर आतां ''ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनीं केवळ स्वार्थी संकुचित दृष्टीनें मुसलमानांच्या गळ्याला मिठ्या मारून, ब्राह्मणेतर पक्षाची हिंदुत्वाची दृष्टी फोडली' असें स्पष्ट म्हणावे लागतें. या शोचनीय स्थितीचे परिणाम किती भयंकर होणार आहेत, याची कल्पना आमचा 'संस्कृतीचा संग्राम' वाचा म्हणजे नीट होईल. मुसलमानांशीं ब्राह्मणेतरांनीं मित्रत्व ठेऊंच नये, किंवा तें आजपर्यंत ठेवलेंच नाहीं, असें मुळींच नाहीं. पण शुद्धी व संघटणासाठींच अस्तित्वांत आलेल्या हिंदु सभांवर बेलाशक शत्रुत्वाचा आरोप करणाऱ्या मुसलमानांशीं ज्या मुद्द्यांवर ब्राह्मणेतर पुढारी संघटण करूं पाहात आहेत, ते मुद्दे इतके अदूरदृष्टी आहेत कीं ब्राह्मणेतर चळवळीला जिवंत ठेवण्यासाठीं या पुढाऱ्यांना फांसावर दिले तरीं तें कर्म पुण्यप्रद ठरेल, यांत मुळींच शंका नाहीं.

ब्राह्मणेतर सामाजिक परिषद

ब्राह्मणेतर चळवळीच्या वर्तमान उष:कालांत तिच्या जीवनक्रमाचीं पाउलें पद्धतशीर पडोत वा न पडोत, तिच्या पुढाऱ्यांत शंभर नंबरी कसाचें तेज असो वा नसो, ही चळवळ खऱ्या लोकशाहीची

अस्सल लोकहितवादी चैतन्यसरिता आहे, हें आतां पुष्कळ थोर थोर विचारवंतांना पटूं लागलें आहे. कोणत्याहि नवचैतन्याचीं पावलें प्रथमत: बिनचूक पडत नाहींत. पुढारी लोकांची निवड कसोशीनें होत नाहीं. शेकडों बाजार बुणगे व उपटशुंभ (अपस्टार्टस) पुढारपणाच्या बुरख्याखालीं आत्मस्तोमार्थ त्या गंगेचा प्रवाह वाकडा तिकडा करीत असतात. कित्येक वेळां अनुभवशून्यतेमुळें पुष्कळ प्रामाणिक पुढारी भलत्याच धोरणानें वागून कार्यनाशाच्या पापाचे वाटेकरी होतात. चुका या व्हावयाच्याच. त्या झाल्याच पाहिजेत. त्या होणारच. परंतु तेवढ्यानें ब्राह्मणेतर चळवळीचें राष्ट्रीय महत्त्व लवमात्र कमी होत नाहीं. राष्ट्रीय काँग्रेस आणि राष्ट्रीय सामाजिक परिषद केवळ वार्षिक लळीतें ठरल्यानंतर बहुजनसमाजहितवादी अशा ब्राह्मणेतर चैतन्यानें या दोनहि परिषदांची कार्यशक्ती आपल्या हातीं घ्यावी, हें स्वाभाविकच आहे.

स्वागताध्यक्ष रा. सा. निंबाळकर यांचें भाषण त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवांचे स्पष्ट चित्रच म्हटलें तरी चालेल. प्रत्यक्ष वस्तुस्थिती दाखविणारीं व्याख्यानें 'राष्ट्रीय' म्हणून डांगोरा पिटलेल्या कोणत्याहि परिषदेंत जीं कधींच ऐकावयास किंवा वाचावयास मिळत नसत, तीं या ब्राह्मणेतर चैतन्यामुळें स्पष्ट व्यक्त होऊं लागलीं आहेत. देश, राष्ट्र, देशबंधू, स्वराज्य इ. शब्दांना उलट्या काळजाच्या भर्टी धांगडधिंग्यामुळें कांही अर्थच राहिलेला नाहीं. यंदाच्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षीण बाईंचें व्याख्यानच घ्या. काव्यकल्पनेच्या भराऱ्या आणि रुम झुम पैंजणी शब्दांचा फाफट पसारा! यापेक्षां त्यांत काय अधिक आहे? ब्राह्मणेतरांच्या परिषदेंत निश्चित विचार व स्पष्टोक्ती यांचा बिनतोड मिलाफ विशेष प्रशंसनीय होता. स्वागताध्यक्ष रा. सा. निंबाळकर यांनीं ब्राह्मणेतर चैतन्याचा भावी संघटनांच्या व कार्यक्षमतेच्या दृष्टीनें सर्वंट ऑफ इंडिया सोसायटीच्या धर्तीवर एखादी मध्यवर्ती सोसायटी स्थापन करण्याची जी सूचना सभेपुढें मांडली आहे, तिची योग्य ती संभावना कार्यकर्ते पुढारी लवकर करतील, अशी आम्हांला आशा आहे. मात्र सर्वंट ऑफ इंडिया सोसायटींचे अनुकरण करतांना, तिच्यांतल्या चांगल्या तत्त्वांचाच तेवढा स्वीकार करावा. सध्यां ही सोसायटी म्हणजे

बजरबट्टू भटांचा भटारखाना

झालेला आहे. वेळीं इरसाल टिळकी भट पत्करला; तो निदान त्याचें भटी मत उघड बोलून लिहून दाखविण्याइतका प्रामाणिक असतो. पण हें बिलबिलीत धोरणाचे लिबरल बिरबल भट मोठें भयंकर. यांच्या मूळ स्वरूपाचा थांग लागणें कठीण. 'भाला' पत्र जितक्या निर्धोकपणे वाचणें सोपें, तितकें 'ज्ञानप्रकाश, सर्वंट ऑफ इंडिया' दि बिरबली पत्रें फार धोक्याची! 'भाला' पत्रांत निदान आंत बाहेर कांहीं नाहीं. भटी मतें तर भटी मतें. पण तो तीं स्पष्ट व्यक्त करतो. हे मवाळ बिरबल मात्र पक्के मिशनरी आंतल्या गांठीचे. जहाल भटांनीं घालावी गोळी आणि मवाळ भटानीं पसरावी झोळी, असा हा सिद्धसाधकांचा चोरबाजार आहे, याची वाचकांनीं जाणीव ठेऊन खबरदारीनें वागावें. असा आमचा स्पष्ट इषारा आहे. जहाल भट पत्करतात. कारण ते उघड उघड कुचाळ्या करतात. पण मवाळ भट साळसूद दिसतात, पण त्यांच्या कारस्थानांचा व खुनशीपणाचा पत्ता ब्रह्मदेवाच्या बापाला सुद्धां लागायचा नाहीं. म्हणून ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनीं या मवाळी सोसायटीचें अंधानुकरण करूं नये. एवढीच सूचना आहे. संघटनेसाठीं व कार्यनियंत्रणासाठीं असल्या संस्थेची फार जरूर आहे. इकडे दुर्लक्ष झाल्यास ही चळवळ पद्धतशीर व जबाबदारीनें न चालतां, दीर्घसूत्री भटांच्या कारस्थानांना बोलबोलतां बळी पडेल.

सामाजिक परिषदेचे अध्यक्ष छत्रपति महाराज यांचे भाषण वर्तमान विचारक्रान्तीला अनुरूप असेंच झालें, त्यांच्या व्याख्यानाचा केंद्रबिंदू खालील उद्गारांत आढळतो. छत्रपति म्हणाले :

सद्‌गृहस्थहो! सामाजिक सुधारणेच्या आधीं राजकीय सुधारणा पाहिजे, असें म्हणणारे ज्याप्रमाणें कांहीं लोक आहेत, तद्वतच राजकीय सुधारणेच्या आधीं सामाजिक सुधारणा हवी असें म्हणणारेही लोक आहेत, हें आपणांस ठाऊक आहेच. या दोन्ही प्रकारच्या लोकांना मनुष्यस्वभावाची पारख नाहीं, असें म्हणावे लागतें. एवढेंच नव्हे, तर सामाजिक व इतर चळवळीच्या प्रश्नांचा राजकीय चळवळींशीं किती निकट संबंध आहे, या गोष्टीकडे राजकीय चळवळीचे पुरस्कर्ते दुर्लक्ष करीत असल्यामुळें व त्याप्रमाणेंच सामाजिक चळवळीचे प्रवर्तक इतर चळवळीकडे त्याचदृष्टीने पहात असल्यामुळें, गोंधळ माजून त्या दोघांनाही यश मिळेनासें झाले आहे. राजकीय बाबतींत लोकशाहीच्या तत्वाचा जोरानें पुरस्कार करणाऱ्यांकडून आज अस्तित्वात असलेल्या जातिभेदाच्या बाबतींत मात्र त्या तत्वाचें अवलंबन करण्यांत येत नाहीं. जन्मावरूनच मनुष्य श्रेष्ठ अगर हीन ठरतो, या दुष्ट भावनेचा अशा पुढाऱ्यांनीं प्रथम नायनाट केला पाहिजे; नाहींतर त्यांची लोकशाही खरी नसून लटकी आहे, असें म्हणावें लागेल. भक्तिभावाने देवळांत शिरतांना अगर सार्वजनिक हौदावर पाणी भरतांना एखाद्या माणसाला- अमुक जातींत जन्मला म्हणून-मज्जाव करून, राजकीय बाबतींत मोठमोठ्या प्रश्नांचा विचार करतांना मात्र 'तूं हिंदमातेचा पुत्र आहेस, तुझा आमचा दर्जा सारखा आहे' असें त्याच माणसाला सांगितलें असतां, त्याचा विश्वास त्यावर बसेल काय? एखाद्या माणसाला लष्करी शिक्षण दिलें असतां तो इतरांबरोबर स्वदेशरक्षण करण्यास समर्थ होतो व विश्वविद्यालयांतील बौद्धिक प्रदेशांतही त्यांचा नंबर खालीं नसतो. परंतु बुद्धीनें कोणत्याही तऱ्हेनें कमी नसतांना त्या माणसाला शूद्र म्हणून त्याला वेदाचा अगर यज्ञोपविताचा अधिकार नाहीं, तो फक्त ब्राह्मणांचाच, असें सांगितल्यास त्याची खात्री पटेल काय? या मुद्दयांवर जास्त जोर देण्याचें कारण हें आहे कीं, हिंदुस्थानांत खरी व मजबूत अशी लोकशाही स्थापन करण्याचें कामीं आम्हांला कां अपयश येत आहे, हेंच मला दाखवून द्यावयाचें आहे.

अस्पृश्यतानिवारक परिषद

या परिषदेचे स्वागताध्यक्ष श्रीयुत गवई यांनीं आपल्या भाषणांत 'दुखणें वेशीवर टांगण्या' इतकी स्पष्टोक्ती दाखविली. राष्ट्रीय काँग्रेसच्या मामुली लळीतांत रूढ झालेली नाटकी देशाभिमानाची व देशसेवेची कृत्रिम भाषा जाऊन, त्या ऐवजी वस्तुस्थिती निदर्शक स्पष्टोक्तीचा दिवसेंदिवस जास्त अवलंब होत आहे, ही मोठ्या समाधानाची गोष्ट होय. श्री. गवई हे अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधी असल्यामुळें त्यांच्या उद्‌गारांना विशेष महत्त्व आहे. हे म्हणाले -

इंग्रजांना देशांतून अगोदर घालवून देऊन स्वराज्य मिळवूं आणि मग अस्पृश्यता ठेवावी किंवा नाहींशी करावी, या संबंधाचे भांडण आपण सुखानें पाहूं, अशा अर्थाची भाषा परवापर्यंत कांहीं 'भामटे' वापरीत होते. आज ते स्वराज्य मिळविण्याच्या कामीं तुम्हीं आम्हांला मदत करा, म्हणजे तुमची अस्पृश्यता जाईल असें म्हणू लागले आहेत. परंतु, अस्पृश्यता ही इंग्रजांनीं आणलेली नाहीं. ती भिक्षुकशाहीचें माप आहे व तें नाहींसे करण्याला इंग्रजी राज्याची बिलकूल हरकत नाहीं, इतकेंच नव्हे तर या अमानुष चालीविरुद्ध महार मांगांना ओरड करण्याची इंग्रजी राज्यामुळें मुभा, नव्हे हक्क प्राप्त झाला आहे हे पेशवाईतील महाराचें चित्र आपल्या मन:चक्षूपुढें ठेवून कोणीही सांगू शकेल.

तुकाराम, नामदेव, चोखामेळा, रोहिदास वगैरे संतांचा झालेला झळ कशाचें द्योतक आहे? मराठ्यांची राजसत्ता भटभिक्षुक पेशव्यांनीं घेऊन त्यांनीं त्या सत्तेच्या जोरावर हा अस्पृश्यतेचा जुलूम परमावधीवर नेला. आज पेशवाई नाहीं व त्यांचा तो कायदेशीर जुलूमही नाहीं. ही गोष्ट खरी असली तरी अस्पृश्यासंबंधांने पेशव्यांची जी असुरी वृत्ति होती, त्या वृत्तीचे प्राणी त्यांच्या जातभाईत आज लाखांनीं मोजण्याइतकें जिवंत आहेत, हेंही कांहीं खोटें नाही.

प्रस्तुत परिषदेचे अध्यक्ष नामदार भास्करराव जाधव यांनीं अस्पृश्य बांधवांना दिलेला खालील इषारा ते विचारांत घेऊन आचारांत उमटवितील तर त्यांच्या आत्मोन्नतीचा उष:काल कांहीं लांब नाहीं. नामदार भास्करराव म्हणाले :

''आपण अस्पृश्य आहों ही आपल्या मनांतील भावना अस्पृश्यांनीं प्रथम अज्जीबात काढून टाकली पाहिजे. मानसिक अवनति नष्ट झाल्याशिवाय कसलीहि उन्नति होणें शक्य नाहीं. उच्च वर्गांतले वाईट गुण -अनुकरणाच्या सांसर्गानें- खालच्या वर्गांतहि उतरत असल्यामुळें, चांभार महार मांगादि समाजांतहि परस्पर अस्पृश्यता दिसून येते. हा मनाचा कमकुवतपणा आहे. तो काढून टाकल्याशिवाय अस्पृश्यांची उन्नति होणें कठीण आहे.''

'मनाचा कमकुवतपणा' हा अखिल हिंदु समाजाचा सार्वत्रिक दोष आहे. तो जसा अस्पृशांत आहे, तसा स्पृश्यांतहि आहे; आणि त्यामुळेंच हिंदुजनांच्या आत्मोद्धाराच्या सर्व चळवळी थरारत नाहींत. फार झालें तर त्यांची प्रगति विचार-प्रदर्शनापर्यंत होते; आचारांत विचार उमटतच नाहीत. कै. राजर्षि शाहू छत्रपति यांनीं आपल्या राज्यांत अस्पृश्यतेचें निर्दाळण करून आपली कीर्ती अमर केली, ही गोष्ट जितकी सत्य आहे, तितकीच 'ब्राह्मणांपेक्षां कांहीं मराठ्यांकडूनच अस्पृश्यांना कोल्हापुरांत अझून त्रास होतो 'हीहि गोष्ट खरी आहे. यालाहि 'मनाचा कमकुवतपणा' हेंच वास्तवीक मुख्य पाप होय.

सत्यशोधक परिषद

कानपुराप्रमाणें उमरावतीला जें परिषदांचें सत्र साजरें झालें, त्यांत याहि परिषदेनें वऱ्हाडस्थ जनतेच्या आत्मप्रबोधनांत भर टाकली. स्वागताध्यक्ष स्वानंदस्वामी यांनीं सत्यशोधक समाजाचें ध्येय काय, याचा खुलासा असा केला आहे:

महात्मा जोतीराव यांचा सत्यशोधक समाज स्थापना करण्याचा मुख्य हेतू हा कीं ज्या अर्थी सर्व मानवांस एकाच निर्माणकर्त्यानें उत्पन्न केलें आहे, त्या अर्थी तो एकच सर्व मानवांचा पिता असोन सर्व माणसें एकमेकांचे बंधू आहेत, व सर्वांनीं एकमेकांशीं बंधुत्वाचें नात्याचें वागणें इष्ठ आहे. परमेश्वराच्या घरीं जातींत श्रेष्ठकनिष्ठत्वाच्या भावना असणें हें अत्यंत घातक असून सर्वांनी एकमेकांच्या बरोबर सारख्या व बंधुत्वाच्या नात्यानें वागावें, हेंच आपले पवित्र व श्रेष्ठ कर्तव्य आहे. सत्यशोधक समाजाचा कटाक्ष जातिभेदावर व विशेषत: सद्य:प्रचलित त्याच्या ओंगळ स्वरूपावर आहे. आचरणानें व गुणानें कितीही उत्तम असून जन्माने नीच असल्यास तो नीच, व आचरण कितीही गर्हणीय व दुर्गुणाचा मूर्तिमंत पुतळाच पण जन्मानें उच्च असेल तर तो केव्हांही श्रेष्ठच मानला पाहिजे, असलें जें आधुनिक हिंदु धर्माचें समंजस माणसास न पटणारें हिंदु वर्णाश्रमधर्माचें ओंगळ स्वरूप आहे, तें नाहींसे होऊन समानतेच्या तत्त्वाचा प्रसार झाला पाहिजे, हें सत्यशोधक समाजाचें मत आहे.

धार्मिक कल्पनांत क्रांति करून शुद्ध धर्माचें ज्ञान जनतेला व्हावें, हा सत्यसमाजाचा महत्त्वाचा मुद्दा

मात्र कोणालाच आठवलेला दिसत नाहीं. धर्मविषयक स्वाध्याय व चिकित्सक विवेकवादी प्रवचनें यांचा कर्तव्यबुद्धीनें प्रसार व्हावयास पाहिजे. त्याशिवाय हीं उच्चनीचतेचीं भुतें कायमचीं गाडलीं जाणार नाहींत.

केवळ भटांच्या संकुचित मनोवृत्तीचा व आत्मस्तोमी दुर्गुणांचा निषेध करण्यांतच सर्व शक्ती खर्ची पडतील तर

आळीला माशीचा निदिध्यास

या सनातन तत्वाप्रमाणें भटांची भटी वृत्ति खुद्द सत्यशोधकांच्या आंगीं भिनण्याची फार भीति आहे. समाजमतें सत्यनारायण आणि तुळशीचीं लग्नें जोपर्यंत लागत आहेत. तोपर्यंत धर्मक्रांतीचा ओनामाहि सुरू झालेला नाहीं, असें म्हणणें प्राप्त आहे. भिक्षुकी वर्चस्वाला सुरुंग लावण्याइतकी समाजानें कामगिरी केली. आतां धर्मसंशोधनाची स्वाध्यायशील कामगिरी त्यानें हातीं घ्यावी, अशी आमची सूचना आहे. 'मनाचा कमकुवतपणा' धर्मविषयक भ्रष्ट कल्पनेंत पैदा होतो. तेथेंच सामाजिक अस्वस्थतेचे जंतू निर्माण होतात. यासाठीं विद्वान व कर्तबगार धर्मसेवकांची सत्यशोधकांच्या कार्यकारी सेनेंत भरती झाली पाहिजे. वाटेल त्या बेजबाबदारानें उठावें, स्वत:स सत्यशोधक म्हणवावें आणि कोठें तरी कांहीं तरी बेजबाबदार आचरटपणा करावा, ही सध्याची स्थिति यापुढें बंद न पडेल व समाजाच्या कार्यावर संघटनेचा व शिरतीचा दाव न राहील, तर या समाजाच्या मूलतत्त्वांचा उत्कृष्टपणा निकृष्ठ दर्जाच्या कार्यकर्त्याकडून ठार मारला जाईल. बाजारबुणग्यांच्या हातून कार्ये होती, तर मऱ्हाठशाहीं केवळ कागदी वावड्यांच्या उलटपालटानें विंग्रेज बहाद्दरांच्या पचनीं पडली नसती. तात्पर्य, सत्यशोधक समाजाचें कार्य सर्वव्यापी देशहितवर्धक व चिरंजीव व्हावें अशी पुढाऱ्यांची जर कळकळ आहे, तर ही चळवळ कमाल कसोशीच्या शिस्तीनें या पुढें चालवून, तींत सध्यां घुसलेलें बेजबाबदारीचें बांडगूळ साफ छाटून टाकणेंच अगत्याचें आहे. या परिषदेचे अध्यक्ष श्रीयुत केशवराव बागडे यांच्या व्याख्यानांत

भटांनीं सर्व घात केला

या मामुली तुणतुण्या शिवाय अधिक विचाराचा कोणताहि मुद्दा नाहीं. भावी कार्याची दिशा दाखविण्याची जबाबदारीं वास्तवीक अध्यक्षाच्या भाषणांत असावी लागते. दिशा जितकी स्पष्ट, तितकी अध्यक्षाची लायकीं श्रेष्ठ. केवळ शब्दजंजाळ अथवा वाक्पांडित्य यांनीं अध्यक्षत्वाचें मंडण होत नाहीं. सत्यशोधक चळवळीच्या बऱ्या वाईट परिणामाचा आंकडेवार आढावा काढून, मागें काय झालें व पुढें मार्ग कसा आक्रमण करावा; पूर्वी काय काय चुका झाल्या, कां झाल्या, कोणी केल्या, त्या कशा सुधाराव्या इ. मुद्द्यांचें स्पष्टोद्घाटन मुळींच न करतां, नुसतें भटनिंदेचें पुराण वाचल्यानें सत्यशोधक चळवळीचें समर्थन किंवा वर्धन होईल, असें आमच्या अल्प मतीस वाटत नाहीं. बुद्धीच्या भांडवलाशिवाय विवेकाची वृद्धी होत नाहीं. विवेकाचा चाप असल्याशिवाय शिस्तीची स्प्रिंग काम करीत नाही. आणि शिस्त नाहीं, तेथें यशहि नाहीं. या त्रोटक इषाऱ्यावरून सूज्ञांनीं काय तें उमजावे.

महिला परिषद

इतर परिषदांच्या स्फूर्तीनें उमरावतीस अखिल भारतीय ब्राह्मणेतर महिला परिषद सौ. लक्ष्मीबाई नायडू यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. हें पहिलेंच अधिवेशन असल्यामुळें विचारांची मर्यादा सर्वसाधारणच राहिल्यास नवल नाहीं. ब्राह्मणेतर स्त्रीवर्गाच्या प्रबोधनाची ही प्रभात आहे. एवढ्याचसाठीं

आम्ही या परिषदेच्या कार्यकारी भगिनींचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. आमचा अखिल भारतीय भगिनी संघ हीच आमची भारतमाता. या मातेच्या उदरांतूनच तिचे उद्धारक जन्माला यावयाचे. पण आज ही आमची माता बौद्धिक धार्मिक व सामाजिक अज्ञानांत हतप्रभ पडलेली आहे. हिच्या उद्धाराच्या महत्त्वापुढें स्वराज्यप्राप्तीच्या चळवळीची किंमत पूज्य. गद्यपद्याच्या द्वारें अलीकडच्या वाङ्मयांतून स्त्रीजातीची होत असलेली प्रत्यक्षाप्रत्यक्ष विटंबना पाहिली कीं मन क्षुब्ध होते. आम्ही हिंदुजन या आमच्या राष्ट्रदेवतांची किंमत किती ठेवीत असतो, हें दरसालच्या शिमग्यांत प्रत्येक जिवंत हिंदु ऐकत पहात असतो. ज्यांना स्त्रीवर्गाची विटंबना करण्याची लाज वाटत नाहीं, त्यांनीं राष्ट्रोद्धाराचा व स्वराज्य संपादनाचा ग्यानाक्रोश करूं नये. आमच्या सर्व हिंदु बांधवांना साष्टांग प्रणिपातपूर्वक एक प्रार्थना आहे. शक्य तो प्रयत्न करून हिंदुपंचांगाला लागलेल्या

शिमग्याच्या ग्रहणाचा मोक्ष

यंदापासून कायमचा लावा आणि या भारतमाताची वार्षिक विटंबना बंद पाडा. जोपर्यंत तुमचा शिमगा चालूं राहील, तोपर्यंत परमेश्वर तुमच्या सर्व चळवळींचा शिमगाच करीत राहील. बंधूंनो,

नारियोकूं निंदो नहीं।
नारी नरकी खान ।।
जिस खानिसे पैदा हुये।
राम कृष्ण हनुमान ।।

परिषदा भरविण्यापर्यंत ज्या स्त्रियांचें आत्मप्रबोधन झालेलं आहे, त्या आमच्या भगिनी आपापल्या घरापुरत्याच जरी निषेधाचा रुद्रावतार धारण करतील तर शिमगी वाङ्मय व प्रत्यक्ष शिमगा यांत भाग घेण्याची त्यांच्या पुरुषांची व मुलाबाळांची खास छाती होणार नाहीं.

भिक्षुकांचा जळफळाट

उमरावतीला अनेक परिषदांचें जें प्रबोधनकार्य झालें, तें पाहून भिक्षुक 'देभ' वर्गाच्या आंगठ्याची तिडीक शेंडीच्या टोकाला गेली. हें असें व्हायचेंच. झालें नसतें तर आश्चर्य. ब्राह्मणेतरांच्या प्रत्येक चैतन्याची मनमुराद निंदा करणें, त्यांच्या पुढाऱ्यांना शिव्या देणें आणि सरकारांत त्यांच्याविषयी कलुषित विपर्यास पसरविणें, एवढेंच कर्म करून भटांच्या देशाभिमानाची आणि स्वराज्य-पुराणांची भूक आज शमत आहे. उमरावतीच्या परिषदांविषयी देशाभिमानानें आरपार फुललेलें, स्वयंमेव मृगेंद्राची घमेंड मारणारे केसरीकार आपल्या निष्कलंक अद्वैत भावनेचे तारे तोडतांना बरळतात-

एका मुहूर्तावर अनेक कार्ये उरकून घेतात त्याप्रमाणें उमरावती येथें नामधारी ब्राह्मणेतर पक्षानें गेल्या नाताळांत एकाच परिषदेला चार दिवस चार नावें देऊन व चार निरनिराळे अध्यक्ष करून तिच्या चार परिषदा बनविल्या. परिषदांची स्वागत कमिटी एकच, डेलिगेट व प्रेक्षकजन तेच व मंडपहि तोच. लहान मुलें भातुकलीच्या खेळांत तेच पोहे चार बोळक्यांत घालून त्याला भात, भाजी, पोळी अशी नावें देऊन जेवण करतात, त्यासारखाच हा प्रकार झाला. भटांच्या विश्वव्यापी महाकृपेमुळें भटेतर जनतेची बौद्धिक बाबतींत जी संभावना राखली गेली तिचेंच हें फळ आहे. जागृतीच्या उष:कालीं आत्माध्दाराचे प्रयत्न करतांना भटेतर जनतेनें लहान मुलांच्या भातुकलीचा प्रकार केला तर त्यांत ब्रह्मवांत्युत्पन्न बृहस्पतींना दांत काढून हांसण्यासारखे काय आहे? उमरावतीला भटेतरांनी पात्रांची अदलाबदल करून भातुकलीचा

खेळ केला; आणि या टिळकी टाळक्याच्या टोळांनीं कानपुरास काय केलें? तेथें ज्या डझनवारी भरंसाट परिषदा भरल्या, त्यांत ती न तीच पात्रें निरनिराळ्या रंगाढंगांनीं नाचत होती, का प्रत्येक भूमिकेसाठीं आकाशांतून एकेक भट टिळकांच्या धर्मबिंदूंतून पटापट टपकत होता? भटेतर बोलून चालून अज्ञान. त्यांनीं भातुकली खेळली तरी तींत निदान एकवाक्यतेचा सूर त्यांनीं कायम ठेवला. पण देशाभिमानाच्या पांघरुणाखालीं अज्ञान रयतेच्या चिंध्या चिरगुटांवर चरणाऱ्या चोरांनो, तुम्ही कानपुरास तर पगडीपालट करून आत्मस्तोमासाठीं राष्ट्रीय काँग्रेसचा शुद्ध तमाशा करून सोडलात. त्याचें प्रायश्चित्त येत्या कौन्सिल इलेक्शनमध्यें तुम्हांला बिनतक्रार घ्यावें लागेल, याची आठवण ठेवा.

'तेरी मेरी'च्या भट-भटेतर वादाचें उमरावतींचें क्षेत्र ओलांडून आपल्याला आतां कानपुराकडे वळलें पाहिजे. तेथेंहि विचारक्रांतीच्या बंडाळींतच आपल्याला तत्वशोधनाचें काम करावयाचें आहे. उमरावतीच्या विचार क्षेत्रांतून कानपुरी कत्तलीकडे जाण्यापूर्वी चित्ताच्या प्रसन्नतेसाठीं आपण

काशीच्या गंगेंत स्नान

करावें, तेथें हिंदु युनिव्हर्सिटीच्या कन्वोकेशन प्रसंगीं सर जगदीशचंद्र बोस यांनीं अध्यक्ष नात्यानें जें रत्नमूल्य प्रबोधक व्याख्यान दिलें, त्याचा, आत्मप्रबोधनार्थ रसास्वाद घ्यावा, हेंच बरें. ओसाड रखरखीत कंटाळवाण्या अरण्यांतून प्रवास करतां करतां, प्रवाशाला जसें एखादें विस्तीर्ण वट वृक्षाच्छादित स्थल व जवळच स्वच्छ पाण्याचा जिवंत झरा आढळावा, तद्वतच गेल्या नाताळांतल्या परिषदांच्या सुळसुळाटांत विचाराला चित्तप्रबोधक तत्वश्रवणाची प्रसन्नता फक्त काशीलाच लाभली. इतर सर्व ठिकाणी अक्षरश: ना-ताळच म्हटलें तरी चालेल. सर जगदीशचंद्र यांचें सर्वच व्याख्यान आत्मोत्साहवर्धक आहे. त्यांतल्या दोनतीन मुद्द्यांचा भावार्थ येथें नमूद करण्याचा मोह आवरत नाहीं. सर जगदीश म्हणाले-

(१) नवीन शोध लागत आहेत. नवीन मतें प्रगट होत आहेत. त्यांचा नवमतवाद जुन्यापुराण्या ठरावीक जीर्णमतांशीं जमत नाहीं, एवढ्याचमुळें संकुचित धार्मिक भावना आणि परमतासहिष्णुता यांच्या जोरावर त्या नवमतवादाला विरोधाची टक्कर देण्याचा एक प्रघातच पडून गेला आहे. आमच्या ज्ञानवृद्धीला व विकासाला हा विरोध अत्यंत घातुक आहे. प्रचलित कल्पनांच्या विरुद्ध एकादे नवीन सत्य प्रतिपादन करणारा म्हणतो तरी काय, हेंहि ऐकण्यास या देशांत कोणी कबूल नसतो, ही गोष्ट फार शोचनीय आहे. वाटेल त्या बाबतींत हवी तेवढी चिकित्सा करण्याचा मनुष्याला जन्मसिद्ध हक्कच आहे. त्या हक्काकडे कानाडोळा करून, उगाच भासकट भुसकट कार्यनिष्पत्तीचे चोचले माजविणें, हें अध:पाताचें स्पष्ट चिन्ह आहे.

(२) आपले बापजादे केवढे थोर, काय त्यांचे पराक्रम, केवढी त्यांची कीर्ती; यापेक्षां आपल्याला अधिक करून काय मिळवायचें आहे? असा सल्ला देणारा मी देशाचा दुष्मान समजतो. असल्या ऐदी भावनेनें आम्ही जागच्या जागीं कुजून मरून जाऊं. आमच्या थोर पूर्वजांची थोरवी जर आम्हाला टिकवायची असेल, तर प्रयत्नांची अखंड कमाल कसोशी करून, एकापेक्षां एक वरचढ कार्यांत आम्ही यशांसाठीं झगडत राहिले पाहिजे. आमचे पूर्वज स्वयंभू ज्ञानी होते, त्यांना शिकण्यासारखें कांही राहिलेंच नव्हते. जगांतील सर्व ज्ञानाचा शेंडा बुडखा त्यांनीं आरपार हस्तगत केला होता, अशा वल्गनांनीं त्यांचा अपमान मात्र करीत असतो. त्यांनीं तें कांहीं ज्ञानसंशोधन केलें, त्यासाठीं त्यांनीं केवढे अचाट परिश्रम केले, याची आपण कल्पना तरी करून पहा. दुरून सर्वच डोंगर साजरे दिसतात.

शेकडों शतकांचे त्यांचे परिश्रम आज आपल्याला लहानशा ठिपक्यासारखे दिसत असले, तरी त्यांच्या उलाढालींची तीव्रता अणूमात्र कमी होणें नाहीं. ते एवढें ज्ञानसंपन्न झाले, तरी सत्य तत्वांशीं वेदांचे वाक्य विरोधी असेल, तर वेदांनाहि गचांडी द्यावी, इतकें स्पष्ट मत व्यक्त करण्याइतका मोठेपणा नाही का त्यांनीं दाखविला? ते खरे संन्साशी स्पिरिटचे संशोधक होते. तत्वशोधनासाठीं त्यांनीं देहाची पर्वा केली नाहीं, ध्येयाची चिकाटी सोडली नाहीं, किंवा कसल्याहि लौकिकी लाभाला मोहून जाऊन त्यांनीं हातीं घेतलेलीं कार्यें मध्येंच टाकली नाहीत. हें स्पिरिट आज नष्ट झालें आहे. आतां नवचैतन्याची कमावणी करणें प्राप्त आहे. या नवीन चैतन्यानें आपण सर्व क्षेत्रांत कार्याची शिकस्त करायला अहर्निश झगडत राहिले पाहिजे, आणि ज्या ऐदीपणामुळें अध:पातरूपी मृत्यू आ पसरून आमच्या समोर उभा राहिला आहे, त्याला दूर झुगारून, आमच्या प्रगतीचा मार्ग मोकळा केला पाहिजे. हें आत्मप्रबोधनाचें चैतन्य अंतर्यामांतूनच उत्पन्न झालें पाहिजे. तें उत्पन्न होत आहे, हें चालूं घडीच्या राष्ट्रीयत्वाच्या जाणीवेवरून सिद्ध होत आहे.

(३) विश्वविद्यालयांची संख्या वाढत आहे. आपल्या बौद्धिक जीवनांत वाढ होत आहे याचें हें चिन्ह आहे. परंतु या बाबतींतहि कांहीं धोके आहेत व त्यांची प्रथमपासूनच खबरदारी घेतली पाहिजे. ज्ञानवर्धन हें त्यांचे एकच ध्येय नकळत बाजूला पडून, त्यांच्याऐवजीं हीं विश्वविद्यालयें म्हणजे जातिविषयक तंटे बखेड्यांचे अड्डेहि होण्याचा संभव आहे. ज्ञानप्राप्तीची हीं विद्यापीठें म्हणजे क्षुद्रबुद्धी खटपट्यांच्या भंरसाट चळवळी खेळण्याचे पीठेहि बनण्याची भीति आहे. परस्परांत प्रतियोगी चुरस नसावी. दिलदार मैत्रीची स्पर्धा असावी. प्रत्येक विद्यापीठानें ज्ञानाची एकेक शाखा हातीं घेऊन त्यांतच विद्यार्थ्यांना खास कसोशींचें (स्पेशलाईज्ड) ज्ञान देऊन पारंगत करावे. म्हणजे प्रोफेसर व स्कॉलर्सनांहि या पीठांतून त्या पीठांत सहकारितेनें कार्य करण्याची मनमोकळी सवलत राहील. (पुण्याच्या फर्ग्युसन व न्यू पूना कॉलेजवाल्यांना हा उपदेश पटणें शक्य नाहीं.)

(४) मी पूर्वी विद्यार्थी होतो आणि आताहि मी विद्यार्थीच आहे. माझें वय बरेंच झालें असलें, तरी ज्ञानप्राप्तीचा धाडसी पाठलाग करतांना अझुनहि मी एखाद्या तरण्याबांड जवानाप्रमाणें फुरफुरतो. शिक्षकाचें काम मी धंदा म्हणून करीत नाहीं, पण तें एक उच्च समजून करतो. हिंदुस्थानच्या विद्यार्थी वर्गानें मजवर मित्र आणि नेता या नात्यानें जो विश्वास ठेवला आहे, त्याच्या मोबदला म्हणून मी त्यांना माझी

अंतर्यामीची खुणगांठ

आज मोकळी करून दाखवितो. यांत मी मिळविलेल्या ज्ञानाचा अत्युच्च कस आहे. मला तुमचे दोष दाखवायचे नाहींत. मला तुमच्या सामर्थ्याला जागृत करावयाचें आहे. म्हणून मी अगदीं साधी सोपी गोष्ट तुमच्यापुढें मांडीतच नाहीं. उलट, कठीणांतली कठीण गोष्टच तुम्ही कार्यासाठी पसंत करा असा माझा जबरीचा आग्रह आहे. भूतकालचा अनुभव तुम्हाला वाटेल त्या कष्टप्रद कार्यांत हात देण्यास खडा उभा आहे. परंतु भूतकालीन गोष्टींचे गुलाम न बनतां त्यांतल्या ज्ञानाचे तुम्ही औरस वारस बनण्याची शिकस्त करा. पुष्कळशा कुकल्पना आज तुमच्या मनांत रणकंदनाची धुमाळी माजवीत आहेत. विद्यादेवीच्या या मंदिरांत असलेल्या शिस्तीच्या नियंत्रणाचा दाब झुगारून देण्याचे कित्येकजण प्रयत्न करीत आहेत. त्यांची अशी गैरसमजूत झालेली दिसते की विश्वमंदीरांतले शिस्तवाले विद्यार्थ्यांच्या

स्वातंत्र्यावर घाला घालून त्यांना नुसते गुलाम बनवीत आहेत. शिस्तीशिवाय कार्य नाहीं. कोठेंहि जा नियंत्रण हें असणारच. बेशिस्त कारभारांत यश केव्हांही येणार नाहीं. शिस्त ही पाळलीच पाहिजे. जी शक्ती विवेकाच्या नियंत्रणांत राहते, तीच शक्ती खरीखुरी अजिंक्य असते, हें सनातन तत्व कधीं तुमच्या विचारांना शिवलेंच नाहीं का? या तारुण्यांतच शक्तीचें विवेकी नियंत्रण करायला शिकायचें नाहीं, तर केव्हां? शिस्त पाळायला आतांच शिकलें पाहिजे. मनाचें आणि मताचें स्वातंत्र्य हिरावून नेणारी अशी कोणती शक्ती जगांत आहे? देशसेवा तुम्ही अज्ञानानें करणार कीं ज्ञानानें? वर्षानुवर्षे जेव्हां विवेकाची शिस्त पाळाल, तेव्हांच तुमचें भावी आयुष्य रंगारूपाला आणणारी खरी शक्ती व दिव्य तेज तुम्हांला प्राप्त होईल. गाद्या-गिर्द्यावर लोळण्याचा हा मामला नव्हे. चणे खावे लोखंडाचे, तेव्हां ब्रह्मपदीं नाचे. आपत्तींचे आघातावर आघात होतील तेव्हां तुमच्या अणूरेणूंत खऱ्या शक्तीची चेतना सणाणूं लागेल. आजच तुम्ही नुसत्या बोलभांडगिरींत शक्तीची उधळपट्टी उडवूं लागला, तर पुढें शीलाची कमावणी करायला तुमच्यापाशीं काय भांडवल उरणार? गत कालांतल्या गोष्टींचा पोपटपंची पाठ करूं नका; त्यांतल्या उदात्त तत्त्वांनीं तुमचें जीवन प्रबुद्ध होऊं द्या. इतरांना शिस्त शिकविण्याचें काम तुमचें नव्हे; स्वत: शिस्त पाळीत जा. धकाधकीच्या मामल्यांत जो भाग घेणार नाहीं, चामडी बचावण्याचा यत्न करील, तो नामर्द असले नामर्द जगाला देणार तें काय, आणि संन्यास तरी कशाचा करणार? जो आपल्या निश्चित ध्येयाच्या क्षेत्रांत पडेल, झडेल, वाढेल, तोच प्रयत्नवादी यशस्वी होईल; आणि तोच आपल्या बिनमोल अनुभवाच्या ज्ञानानें जगाच्या ज्ञानांत भर टाकील. भरतखंडाचा प्राचीन इतिहास कर्मयोग्यांच्या अखंड कर्मश्रेणीनींच रंगलेला आहे; ऐदी लोकांच्या कार्यपराङ्मुखतेनें नव्हे. प्राचीन कर्मयोग्यांच्या अखंड उद्योगांचे उत्कृष्ट परिणाम तत्कालीन मोठमोठ्या युद्धांच्या यशश्रींतहि चमकलेले आहेत. इतरांच्या सुखासाठीं आपण झटल्याशिवाय स्वत:ला सुखाचा खरा स्वाद लाभणार नाहीं. 'उठा. जागे व्हा आणि कार्याला लागा' असा पडसाद देशाच्या कोनाकोपऱ्यांत घुमत असतां, निंद्य अशा ऐदी जीवनांत राहणें किंवा फक्त आपल्या पुरत्या सुखाची काळजी घेणें, हें आपणांस कधींच शोभणार नाहीं.

सर जगदीश चंद्र बोस यांचे हे उद्गार आपल्या विद्यापीठाच्या वार्षिकोत्सवाचा शिमगा करणाऱ्या आणि प्रिन्सिपालची स्वत: व इतरांकडून गलिच्छ निर्भत्सना करविण्यांतच आनंद मानणाऱ्या तरूण फर्ग्युसोनियनांनीं विचारांत घेऊन आचारांत उमटवितां आल्यास पहावे. शीलवर्धनाच्या प्रभातकाळींच शिरतीची ज्यांना एवढी चीड, ते भविष्य काळीं कोणत्या शक्तीची शिस्तवार संघटना करणार हें दिसतच आहे.

प्रस्तुत लेख बराच लांबला. अझूनहि बराच लांबचा पल्ला गांठावयास आहे. तेव्हां या ठिकाणीं थोडी विश्रांती घ्यावी व पुढील अंकीं सर्व प्रवास पुरा करावा हेंच बरें.

(पुढें चालू)

□□□

अग्रलेख

देशी संस्थानें आणि आंग्रेजी नोकरशाही

छायेशिवाय वस्तू नाहीं, अंधाराशिवाय दिवा नाहीं आणि दोषाशिवाय माणूस नाहीं. राज्यव्यवस्था आणि राजकारण हे शब्द ऐकण्यांत किंवा वाचण्यांत केवढाहि मोठा गंभीरपणाचा भास झाला, तरी त्यांचें कर्तृत्व माणसांकडेच असल्यामुळें, त्यांतहि दोषांचीं कोठारें हवी तेवढीं सांपडतात. कोणत्याहि राज्यव्यवस्थेने निर्दोषपणाची घमेंड मारूं नये. देशी लोकांची राज्यव्यवस्था भिकार आणि परदेशी लोकांची तेवढी चांगली, असले उद्गार जगांत फक्त इंग्रेजी बुटांचे नाल बनलेले लोकच काढतात. ज्यांना काहीं विचार आहे, कांहीं इतिहास मननपूर्वक वाचला आहे, विवेक जागरूक आहे आणि परिस्थिती नखशिखांत गुलामगिरीची असूनहि ज्यांचें मन तरी निदान गुलाम झालेलें नाहीं, असले लोक असें मूर्खपणाचे उद्गार कधीच काढणार नाहींत. इंग्रेजी राज्यपद्धति व राजकारण ही काय गौडबंगाली चीज आहे, हें १८ व्या व १९ व्या शतकांतल्या आमच्या अदूरदृष्टी आजा पणजांना जरी उमगलें नाहीं, तरी आज या दोनहि स्वर्गीय अमृतांनीं हिंदी प्रजेला कोणत्या रंगाढंगाचे सुराज्य लाभलें आहे. हें डोळे धड असणारांना स्पष्ट दिसत आहे. इंग्रेजी राजसत्तेनें कांही फायदे झाले असले, तर पुष्कळ असेहि तोटे झाले आहेत कीं त्यामुळें हिंदी लोक स्वत:च्या देशांत व स्वत:च्या घरांत एकमेकांचे वैरी बनले आहेत. द्रोह अनेक प्रकारचे आहेत. त्यांच्या बऱ्या वाईट परिणामांचीं क्षेत्रेंहि भिन्नभिन्न आहेत. परंतु आत्मद्रोह हा असा भयंकर रोग आहे कीं त्याचा माणसावर पगडा बसला कीं अध:पात फारसा दूर नाहीं, ही खूणगांठ बांधावी. हिंदुस्थानी सरकारनें म्हणजे परकीय इंग्रेजी सत्तेनें राजद्रोहाचा अगडबंब कडक कायदा केलेला आहे व या कायद्याचे पराक्रम हिंदवासियांच्या पूर्ण परिचयाचे झाले आहेत. या कायद्याचा अर्थ एवढाच आहे कीं परकीय इंग्रेजी राजसत्तेच्या दाबाखालीं असणाऱ्या गुलाम हिंदी लोकांनीं या दाबाच्या दाबणीबद्दल प्रेमाचें प्रदर्शन केलें नाही तर त्याची पर्वा नाहीं; पण त्यांनी कळत नकळत प्रत्यक्षाप्रत्यक्ष यत्किंचितहि प्रेमाभाव व्यक्त केला तर मात्र त्याचा मुलाजा ही सत्ता मुळींच राखणार नाहीं. परकीय सत्तेच्या पद्धतशीर चक्रांत राजद्रोहाच्या कलमाची कणिक तिंबून आंबून कितीहि फुगली असली, तरी व्यक्तीमात्राच्या माणुसकीला कीड लावणाऱ्या आत्मद्रोहाच्या रक्तपितीपुढे राजद्रोहाची महति फुटक्या कवडीचीहि नाहीं. सत्ताधीशांच्या चष्म्यांतून राजद्रोही माणूस कितीहि

फुकट गेलेला दिसला, तरी जोपर्यंत तो आत्मद्रोही बनला नाहीं, तोपर्यंत तो वास्तवीक कवडीमोल ठरत नाहीं. पण एकदां का माणूस आत्मद्रोही बनला कीं आरपार सडलाच. मग त्याला स्वातंत्र्याची गोडी नाहीं, स्वदेशाची चाड नाहीं, स्वकीयत्वाची जाणीव नाहीं, फार काय पण स्वत:ची सुद्धां किंमत नाहीं! आत्मद्रोह हा अशा प्रकारचा एक रोग आहे कीं त्यानें एकदां घर घेतलें कीं त्याची पोखरणी थेट काळजाला भिडते. मग त्या माणसाला जन्मदात्या आईची पर्वा रहात नाहीं; तर मातृभूमीच्या इभ्रतीची दाद कोठली?

कोणत्याहि व्यक्तीला समाजाला आणि राष्ट्राला पादाक्रांत करण्याचीं जीं अनेक राजकारणी तंत्रयंत्रें आहेत, त्यांत आत्मद्रोहाचा फैलाव हें मुख्य तंत्र होय. परराष्ट्रांतील लोकांत स्वकीयांविषयी तिटकारा उत्पन्न करण्याचा प्रयोग यशस्वी झाला कीं बंदुकीचा बायबारहि न काढतां वाटेल तें राष्ट्र बिनबोभट कसें पचनीं पडतां येतें, हें हिंदुस्थानांतील इंग्रेजी सत्तेच्या उष:कालच्या इतिहासावरून खासें समजून येतें. ''आम्ही तलवारीच्या जोरावर हिंदुस्थान जिंकले आणि तलवारीच्या जोरावरच तें आम्हीं आचंद्रार्क टिकविणार.'' ही आधुनीक इंग्रेजी मुत्सद्यांचीं मुक्ताफळें विनयशीलतेची द्योतक आहेत. तो त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. तें त्याच्या आंग्लभाषाप्राविण्याचें व शेक्सपीरिअन काव्यकल्पनापटुत्वाचें गोरें चिन्ह आहे. आमच्यांतले कांही उद्धट इतिहासाभ्यासी विद्वान या उक्तीचा शब्दश: अर्थ घेऊन विनाकारण हातपाय आपटतात. वेदांताप्रमाणेंच राजकारणी डांवपेचांचे सिद्धांत सुद्धां अंतर्मुख होऊन सोलावे लागतात. राजकारण विशेषत: आंग्रेजी राजकारण, म्हणजे भटी हॉटेलांतली हरभऱ्याची उसळ नव्हे! इंग्रेजांच्या पराक्रमाच्या इतिहासांत तलवारीला मोठेसें महत्वच नाहीं. तलवारींच्या पात्यावरच इंग्रेजांच्या राजकारणी वर्चस्वाची मदार असती, तर नेपोलियन बोनापार्टाच्या क्षात्रचारित्र्याचा इतिहास त्यांनीं गर्भातल्या गर्भांत ठेंचला असता. वॉटरलूच्या युद्धांत नेपोलियन इंग्रेजांच्या तलवारीला बळी पडला नाहीं. तो त्यांच्या क्षात्रतेजानें दिपला नाहीं. तो स्वत:च्या फ्रेंच सेनाधिपतींच्या आत्मद्रोहाला बळी पडला. गेलें युरोपियन महायुद्ध सुद्धां इंग्रेजांनीं तलवारीच्या जोरावर जिंकले नाही. तें बुद्धिबळावर जिंकलें. इंग्रेज लोक क्षत्रिय नव्हत. ते वैश्य आहेत. शक्तीपेक्षां युक्तीवर त्याची मदार मोठी.

इंग्रेजी तलवार म्हणजे युक्ती.

या युक्तीच्या प्रभावानेंच हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याला मुक्ती मिळाली. या युक्तीनेंच अमेरिकनांना युरोपच्या महायुद्धांत निष्कारण लुडबूड करण्याची भक्ति उद्‌भवली. या युक्तीनेंच अखेर जर्मनांच्या लष्करी आसक्तीची पुढें २५ वर्षे निस्तरण्याइतकी कंबक्ती जिरवली. इंग्रेज वैश्यांच्या युक्तीपुढें आज हरएक शक्ती फोल ठरत असतांना, 'हिंदुस्थान आम्हीं तलवारीच्या जोरावर जिंकले' ही आंग्रेजोक्ती त्यांच्या शालिन्याचीच द्योतक नव्हे काय?

हिंदुस्थान इंग्रेजांनीं युक्तीच्या जोरावर जिंकलेला असो, नाहींतर शक्तीच्या जोरावर जिंकलेला असो, हिंदी लोक प्रथम आत्मद्रोही बनले, तेव्हांच त्यांचीं स्वराज्यें इंग्रेज लोकांच्या बुटाखालीं गेलीं. इतकेंच नव्हे तर इतिहासाच्या दाखल्यांवरून आम्हीं स्पष्ट म्हणतों कीं आत्मद्रोहाची आग शमविण्यासाठीं हिंदी लोकांनीं आपण होऊन आपलीं ठिकठिकाणचीं स्वराज्यें आंग्रेज बहाद्दरांना- बनिया कुंफणी सरकारला- स्वातंत्र्यासह दान दिली. महाराष्ट्राकडे पाहिलें तरी हेंच दिसून येईल कीं विद्यमान आंग्रेजी रियासतींत राजद्रोही म्हणून प्रसिद्धी पावलेल्या समाजांनींच मऱ्हाठी स्वराज्याच्या व महाराष्ट्राच्या

स्वातंत्र्याच्या उरावर आपण होऊन आत्मद्रोहाच्या कुऱ्हाडी घातल्या व त्यांचें इंग्रेजांच्या हातावर उदक सोडलें. चालू घडीला हेच आत्मद्रोही व स्वराज्यघातकी समाज जेव्हां स्वराज्य - संपादनावर वाचाळ व लेखाळपणाच्या कसरती करतात, तेव्हां क्षणभर जरी अडाणी लोकांना मोठें कौतुक वाटलें, तरी विचारवंतांना या स्वराज्येच्छू लोकांच्या आत्मद्रोही परंपरेविषयीं फार धास्ती वाटूं लागते. आजकालच्या राजकारणी हैदोसधुल्ल्याचें भुतकालीन् इतिहासाच्या चष्म्यांतून निरीक्षण केलें तर हेच दिसून येतें कीं ज्या आत्मद्रोहानें महाराष्ट्रांतल्या मऱ्हाठी रियासती केवळ कागदी घोड्यांच्या थैमानांत आंग्रेजी युक्तीच्या पचनीं पाडल्या, जो आत्मद्रोह आजहि उघड माथ्यानें उरल्या सुरल्या देशी संस्थानांच्या बलीदानासाठीं कागदी थैमानांचे फांस तयार करण्यांत गढला आहे आणि जो आत्मद्रोह आधुनिक राजकारणांत केवळ आपापल्या जातीपुरत्याच हितवादाच्या क्षुद्र रंगणावर धिंगाणा घालत आहे, तो आत्मद्रोह-स्वदेशियां विषयीं, स्वधर्मियांविषयी, स्वदेशी राज्यकर्त्यांविषयीं तीव्र तिरस्कार फैलावणारा आत्मद्रोह करवीरकर शाहू छत्रपत्रींच्या मृत्यूची बातमी येतांच पेढे वाटण्यास फुरफुरणारा अमानुष आत्मद्रोह-बडोद्यास दक्षिणी विरुद्ध गुजराथी द्वैताची पोंखरण घालणारा आत्मद्रोह- 'उत्तर हिंदुस्थानांत हा मरगट्ठा शिंद्याकाय म्हणून राजा?' अशी बुरखेबाज तिरस्काराची भाषा बरळणारा आत्मद्रोह- आणि चालूं घडीला इंदोर संस्थानचें वाटोळें होतें कधीं आणि आम्ही पाटिभर पेढे खातो कधीं, या आतुरतेनें अधीर झालेला आत्मद्रोह जोंपर्यंत वाढत्या प्रमाणावर आहे, तोपर्यंत स्वराज्यप्राप्ती या ढोंगाखालीं माणसागणित पाट्र्या निघून त्यांचें जलसें गल्लोगल्लीं नाचले, तरी हिंदवासियांच्या गुलामगिरीच्या श्रृंखळांतला एक दुव्वाहि ढिला पडणार नाहीं, हा प्रबोधनाचा कडवा इषारा विचारवंतांनीं अगत्य विचारांत घ्यावा. जेथें आपणच आपले वैरी, तेथें विसरा स्वातंत्र्याची चौरी!

देशी संस्थानांचे बलीदान करण्यांत आमच्याच हिंदी देशबांधवांनीं वेळोवेळीं जो मोठ्या चढाओढीनें पुढाकार घेतला, त्याचें कारण तरी आत्मद्रोहच. हा रोगच असा आहे कीं त्याचा पल्ला काळजापर्यंत भिडला कीं-

माझा नवरा मेल्याचें दु:ख नाहीं,

पण तुझ्या कपाळीं कुंकू पहावत नाहीं,

ही वृत्ति बेफाम भडकते. चालुं घडीला स्वराज्यप्राप्तीचे धिंगाणे घालणाऱ्या आत्मद्रोही व कारस्थानी भटांनीं देशी संस्थानांबद्दल व देशी राज्यव्यवस्थेविषयीं तिटकारा पसरविण्याचा जो एक गुप्त कट केला आहे आणि ज्या कटाला येल्या गुडीपाडव्यापासून

''संस्थानी स्वराज्य''

नांवाचें साप्ताहिकी तोंड फुटणार आहे, त्यांत सुद्धां हीच वृत्ति स्पष्ट दिसून येते. अशा या खोल कटाच्या विस्तृत वावटळींत, देशी संस्थानांविषयीं सन १८५३ सालीं मि जॉन डिकिन्सन (ज्यूनिअर) यांनीं-

नोकरशाहीच्या अमलाखालची

हिंदुस्थानाची राज्यव्यवस्था

नामक ग्रंथांत नमूद केलेल्या कांहीं महत्त्वाच्या विचारांचा भावार्थ वाचकांच्या विचारक्रांतीसाठीं नमूद केला आहे. सन १८५४च्या 'आक्टान्वयें' ईस्ट इंडिया कंपनीची बनियेशाही पुरी होऊन, मलिका

मा अझमा 'देवी विक्टुरिया सार्वभौगिनी' नें हिंदुस्थानचें राज्य आपल्या कदरबाज नोकरशाहीच्या सुपूर्द करण्याच्या वेळीं हा ग्रंथ लिहिला गेला आहे. कंपनीच्या या राज्यसंन्यास प्रसंगीं हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत होणाऱ्या फरकांचें स्वरूप कसें असावें व कसें नसावें, याचा विचार करण्यासाठीं हा ग्रंथ ग्रंथकारानें लिहिला. १८५७ च्या बंडाचें स्वप्न या लेखकाला आधींच पडलें होतें, असें खालील उद्गारांवरून दिसून येते: -

''(देशी संस्थानें गटकविण्याच्या पद्धतीमुळें) सरकार ठिकठिकाणीं जे निरनिराळे शत्रू निर्माण करून ठेवीत आहे, त्याचा भयंकर परिणाम केव्हां ना केव्हां तरी, भोगावा लागले. एखादें जबरदस्त देशी राज्य गिळतांना आंत गांधीलमाशी घुसलेलें फळ भटकवितांना येणारा प्रसंग या सरकारावर न येवो म्हणजे मिळविली! त्या धोरणामुळें असें एखादें भयंकर तुफान उत्पन्न होईल कीं त्याच्या सोसायट्यापुढें आमचें बूड सांभाळतां सांभाळतां पुरें वाट होऊन जाईल. देशी राज्यें मटकविण्यांत आम्हाला होणारा आणि झालेला फायदाहि खर्ची घालून त्या तुफानांत आमचा टिकाव लागणार नाहीं.''

लॉर्ड डलहौशीनें मोठ्या हौशींने देशी संस्थानांवर वरवंटा फिरविला आणि आपल्या गोऱ्या देशबांधवांना मोकाट चरण्याचीं कुरणें सताड मोकळी केली. या नाहीं त्या सबबीखालीं देशी राज्यें घशांत उतरून बनिया कंपनीचे पोट इतकें लठ्ठ फुगलें कीं अखेर या आंग्रेजी घाशीरामीला १८५७ च्या बंडाची बस्ती द्यावी लागली. तेव्हांपासून भल्या बुऱ्या तंत्रमंत्रांनीं कंपनीनें कमावलेलें हिंदुस्थानचें राज्य जरी इंग्रेजी नृपावळीच्या 'किरिटांकित' झालें असलें, तरी देखील जॉन डिकिनसननें तक्रार केलेली प्रवृत्ति

बूड सुकलें तरी शेंड्याला पालवी

या न्यायानें अझून जिवंतच आहे; आणि न्यायप्रविण म्हणून गाजलेल्या लॉर्ड रेडिंग साहेबांची व्हाईसरायी कारकीर्द तर आज नाभा संस्थानची नाभी फोडून इंदोरच्या मानेला दार बांधण्याच्या खटपटींत आहे. हिंदुस्थानचा राज्यकारभार थेट पार्लमेंटाच्या जबाबदारीशीं बांधला गेला आहे, तरी सन १८१३ आणि १८३३ सालीं बनिया कंपनीच्या सनदांचा नवीकरण (renewal) समारंभ साजरा झाला, त्या काळच्या आणि आजच्या कारभारांत दृष्टीकोणाचें सुकाणू फारसें मुळींच बदललेलें दिसत नाहीं. हा भेद ठळकपणे लक्षांत येण्यासाठी डॉन डिकिन्सनचेच उद्गार खालीं दिले आहेत :

१८१३ : ''कंपनीच्या नोकरशाहीकडून हिंदुस्थानच्या लोकांना केवळ गुरांढोरांप्रमाणे वांगविण्यांत येत असे. त्यांचे हिताऽहित, भावना, आशा, चिंता यांची मुळींच कोणी दखल घेत नसे. इंग्रेजी खिंसा गरम होण्याचीं भगदाडें कोठकोठें कसकशीं आहेत, इतक्याचीच वार्ता हौस ऑफ कॉमन्सला कळविण्यांत येत असे. केवळ आपापल्या व्यापारांची वाढ करण्यास धाधावलेल्या संघांनीं, कंपनीच्या सनदा बदलून घेण्याच्या ज्या धडपडी केल्या, त्या देशी लोकांच्या छाताडावर लढविल्या. परंतु या कोट्यवधि लोकांपासूनच आपल्या व्यापारी थैल्यांची बुडें जड होतात, तर त्यांच्या हिताकडे थोडे तरी पाहूं या, म्हणून एकालाहि घाम फुटला नाहीं. अखेर पार्लमेंटाचा होकार मिळविण्यासाठी धडपडणारे हौस ऑफ कॉमन्समधले दिवाण, स्वत:ची खासगी तुंबडी भरण्यास लालचटलेले कंपनीचे डायरेक्टर्स व व्यापारी, यांनीं नाना प्रयत्न करून सौदा पटविला, स्वत:चा तळीराम गार करण्याची व्यवस्था आंखून घेतली, हिंदी लोकांबद्दल नाटकी कळवळा दाखविला आणि हिंदुस्थानावर जुन्याच घाशीरामीचा वरवंटा आणखी वीस वर्षे फिरविण्याची सनद हस्तगत करून घेतली.

१८३३- ''न्यायखात्यांतल्या घालमेलीचे दोष घालविण्याच्या सबबीखालीं आम्ही काय केलें? तर कंपनीच्या कलकत्ता कौन्सिलमध्ये एक जादा गोरा मेंबर वर्णी लावून भरला. मालकम एल्फिन्स्टन मनरो यांनीं मोठ्या अधिकाराच्या जागा देशी हिंदी लोकांस द्याव्या अशी हाकाटी केली होती. त्याची वासलाद अशी लावली कीं कोणाला त्या द्याव्या व न द्याव्या हें विलायतेच्या डायरेक्टरांनीं ठरवावें. ते तर या बाबतींत पक्के नाकमुरडे! खरें पाहिलें तर या बाराबत्तल दलामलीची त्यांना दरकारच नव्हती. इंग्रेजी पोतडी जेणें करून गडगंज भरेल, तेवढ्यापुरतीच माहिती डायरेक्टरांना देण्यांत येत असे.''

काळ कितीहि बदलो, परिस्थितीचे रंगढंग कितीहि उलटे पालटे होवोत आणि मानवी दुनियेचे विचार कितीहि उत्क्रांत किंवा अपक्रांत होवोत, इंग्रेजी राजकारणी मनोवृत्ति इतकी ताठर आहे कीं वेळीं इजिप्तमधला स्फिंक्स नांवाचा दगडी पुतळा सुद्धां जिवंत माणसाप्रमाणें खदखदा हांसूं लागेल, पण इंग्रेजी राजकारणं आपल्या ठरावीक गुप्त धोरणापलीकडे कल्पांतीहि एक रेसभर चळणार ढळणार नाहीं. नोकरशाहीच्या प्रांतिक पंचवार्षिक नायकांकडून वक्तृत्वाचे नायगारे आणि गिरसप्पे हवे तेवढे पाडवून, त्यांच्या प्रवाहांत चिंब भिजून वाटेल तर थंडगार पडा, पण राजकारणी धोरणाच्या गिरणींतलें फोलकट भुसहि डोळ्यांत घुसण्याची अपेक्षां करूं नका. मि. जॉन डिकिनसन यांनीं आपल्या ग्रंथांत आपल्या गोऱ्या देशभाईंच्या हिंदुस्थानांतील घाशीरामीचीं अनेक उदाहरणें दिलीं आहेत. त्यावरून वरील सिद्धांत अधिक दृढतर होतो. 'परकी बेजबाबदार राज्यकारभारामुळें हिंदी लोकांच्या संपत्तीची लूट' हिंदुस्थानच्या कल्याणासाठीं इकडे येणाऱ्या कंपनीच्या गोऱ्या नोकरशाहीनें कशी केली, देशी राजांना कसें फसवून पिळले, देशी उद्योगधंदे ठार मारून लोकांना भिकेला कसे लावले, वगैरे माहिती देतांना मि. डिकिनसन म्हणतात ''हिंदी उद्योगधंद्यांच्या नसांतलें रक्त मात्र शोषून नेलें, पण त्यांना निदान जिवंत राखण्यासाठीं तर कांहीं तरतूद राखायची होती?''

लोकसेवा हें मुळीं नोकरशाही
राज्यव्यवस्थेचे ब्रीदच नव्हे.

''माझा कोता आवाज माझ्या देशबांधवांच्या कानापर्यंत जाऊन आदळेल कीं नाहीं याची मला शंकाच आहे. पण कदाचित तो पोहचलाच तर मी त्यांना स्पष्ट सांगू इच्छितो कीं ज्या नोकरशाहीच्या हातांत तुम्ही हिंदुस्थानचा बेजबाबदार जुलमी राज्यकारभार सोंपविला आहे, त्यांनीं हिंदी लोकांच्या सुखाची माती करून त्यांचा आत्मभाव, स्वत:ची इभ्रत, मालमत्ता आणि नैतिक भावना यांचेंहि मातेरें करून टाकलें आहे. लोकसेवा हेंच प्रत्येक सरकारचें ब्रीद होय, हें तत्व त्यांनीं साफ लाथाडलें आहे. प्रजेच्या हितांत आणि प्रेमांत वास्तवीक राज्यसत्तेची मुळें रुजावीं लागतात. पण या घाशीरामांचें धोरण कांहीं न्यारेंच! हे शुद्ध भाडेकरी. केव्हां तरी जागा सोडायचीच आहे तर निघेल तितकें उत्पन्न ओरबाडून काढून आपली तुंबडी भरावी व वेळ आली कीं गाशा गुंडाळावा.''

ब्रिटीश नोकरशाहीच्या अंमलापेक्षां देशी राजांच्या अंमलाखालची प्रजा विशेष सुखी असते.

''या मुद्द्याचा मी जसजसा अधिकाधिक विचार करतों, तसतसें माझें ठाम मत आहे कीं अगदीं सामान्य अशा देशी राजाच्या राज्यांतली प्रजा इंग्रजी नोकरशाहीच्या अंमलापेक्षां खास अधिक सुखी होती. या सिद्धांताचा निर्णय देणारे जज्ज आमचे आम्हींच असल्यामुळें निकालविषयीं अधिक कांहीं बोलायलाच नको. हिंदुस्थानांत बंडाळीचा मनू चालूं असतांना आम्ही आपल्या सत्तेचें पाऊल रोवलें

व तेथें सर्वत्र शांतता केली, यावरून नेहमी आम्हीं असें गृहीत धरून चालतों कीं हिंदुस्थान म्हणजे बंडाळींतच खितपत पडलेला होता. त्याचप्रमाणें, पुष्कळ देशी राजे युद्धप्रिय आणि कडक माथ्याचे होते, यावरून सारी प्रजा अगदीं गांजून गेलेली हाती, असा निष्कर्ष काढणें आमच्या हातचा मळ झाला आहे. पण आपण हें विसरून चालावयाचें नाहीं कीं हिंदुस्थान हे युरप इतकेंच मोठें खंड आहे. समजा, हेच आरोप आम्ही युरपखंडावर केले तर ते शहाणपणाचे ठरतील काय? हिंदी राजांवर जुलमीपणाचें आरोप करतांना, युरपियन राजांचे जुलूम, तीं रक्तपाताचीं युद्धें, आठराव्या शतकाच्या अखेरी अखेरीपर्यंत त्यांनीं केलेले अत्याचार, रयतेच्या सुखदु:खाची तिळमात्र दरकार न बाळगतां केवळ स्वत:च्या महत्वाकांक्षा व स्वार्थ साधण्यासाठीं त्यांनीं वाहविलेले रक्ताचे पाट नजरेआड कां टाकतां? धर्माच्या नांवाखाली माथेफिरूपणानें मानवतेवर केलेले अत्याचार तर युरपच्या कित्येक शतकांत खचून सांपडतील; मग हिंदुस्थानकडे तरी बोट दाखविण्याचा आम्हांला काय अधिकार? फ्रेंच रव्होल्यूशनच्या काळापर्यंतचा युरपचा इतिहास लिहिणारांचे ग्रंथ उघडून वाचा आणि मग हिंदुस्थानांतील बंडाळी युगाला हांसा.

''प्रामाणिकपणानें या सर्व गोष्टीचा आम्ही विचार करूं लागलों. तर मी हांसे लोकाला, शेंबुड माझ्याच नाकाला. या न्यायानें हिंदुस्थानवर खडा टाकायला आम्हांला तोडच उरत नाहीं. हिंदुस्थानांत जशीं युद्धें झालीं, माथेफिरूपणा बोकाळला, अंदाधुंदींचीं राज्यें झालीं, तशीं तीं जगाच्या पाठीवर इतरत्रहि झालीं. पण असल्या वाईट गोष्टींची भरपाई भरून काढणाऱ्या इतर पुष्कळ चांगल्या गोष्टी हिंदुस्थानांत होत्या. तेथें मोठमोठ्या पुरातन परंपरेचीं सरकारें आणि त्यांची कोट्यवधी संतुष्ट प्रजा होता. मुसलमानी जेत्यांनीं तेथें वसाहत केली, परंतु तात्काळ तें हिंदी लोकांच्या हिताहितांत समरस झाले. त्यांनीं हिंदी लोकांचा धर्म, त्यांच्या रीतीभाती, त्यांच्या भावना, त्यांची मालमत्ता यांचा पूर्ण आदर राखला. यांत जरा कोठें कोणी कांहीं अतिक्रम केला तर नि:स्पृह इंग्रेजी बखरकारांप्रमाणेंच त्यांच्याहि बखरनवीसांनीं त्यांचे वाभाडे सोलण्यास कमी केलेलें नाहीं. प्राचीन स्थानिक स्वराज्यसंस्था, लवाद मंडळ्या व उत्कृष्ट पोलीस यांमुळें देशांतील लोकांच्या जीविताचें व मालमत्तेचें संरक्षण फारच थोड्या खर्चांत बिनबोभाट होत असे. या संस्थांची मुसलमानी राज्यकर्त्यांनीं चांगली निगा राखली. त्यांनीं हिंदुस्थानावर 'राष्ट्रीय कर्जा'चा बोजा लादला नाहीं. करांच्या रूपानें गोळा झालेल्या कोट्यवधि रुपयांतून त्यांनीं लोकोपयोगी (पब्लिक वर्क्स) कामें व लोकशिक्षणावर मोठमोठ्या रकमा खर्ची घातल्या. विशेषत: देशांतले कामकरी मजूर, कारखानदार आणि व्यापारी यांना भांडवलाचा बिनतक्रार पुरवठा करणारा सरदार जहागीरदार इनामदारादि श्रीमंत वर्गाला त्यांनीं धुळीस मिळविण्याचा कधीच यत्न केला नाहीं. त्यांनी हिंदी रयतेला कधीं क्षुद्र लेखलें नाहीं. रयतेच्या सामाजिक संघटनेत ते मिळून मिसळून वागत. मुसलमानी अमदानींत हिंदी रयतेच्या नशिबीं कारकुंडेपणा सारख्या भिकार दर्जाच्या जागांचा खास सुभा कधींच लागला नाहीं. महत्त्वाच्या मोठमोठ्या अधिकारांच्या जागा त्यांना मोकळ्या असत. त्यामुळें वाटेल त्या कर्तबगार माणसाला नीच स्थितींतून उच्च स्थितींत येण्याचा व दिवाणी व लष्करी अधिकार पटकविण्याचा राजमार्ग बिन अटकाव खुला असे. यामुळें, मि. एलफिन्स्टनच्या भाषेंत सांगायचें तर, 'रयत नेहमीं दिलखुष रहात असे.'

''सारांश मुसलमानांनीं कर्तुमकर्तुम् परदेशी हक्कदार सत्ताधीश आणि देशी आज्ञाधारक गुलाम

असे दोन ठळक भेद पाडून हिंदी रयतेची इभ्रत लाथाळली नाहीं. शेकडो वर्षांच्या राज्यकारभाराच्या अवधींत त्यांनीं लक्षावधि लोकांवर जुलूम केले नाहीं असें नाहीं; पण तेवढ्यामुळें त्यांची प्रजा कधीं निराशेनें हैराण झाली नाहीं. प्रत्येकाला वर येण्याची आशा जिवंतच असे. प्रामाणिक महत्वाकांक्षेच्या प्रत्येक मनुष्याला आपल्या कर्तबगारीची पैलथडी सहज गांठता येत असे. कोणत्याहि बुद्धीमान, उद्योगी व धाडसी माणसाला राजकीय अधिकाराच्या व मानमान्यतेच्या जागा पटकविण्याचा मार्ग मुसलमानी अंमदानींत मोकळा असे व त्यांना देगण्या जमिनी वगैरेहि इनाम मिळत असत.

आतां, हिंदुस्थानांतील इंग्रेजी जेत्यांच्या राज्यकारभाराकडे पहा. ही स्थिती वरच्यापेक्षां अगदीं भिन्न आहे.

''म्हणे आम्ही देशांत शांतता राखली! अहो, पण ती आमच्या सोयीसाठीं राखली. त्यामुळें शेतकी व व्यापार कांहींसा थरारलेला दिसतो. पण यांत विशेष तें काय? आपली स्थिती सुधारण्याची मनुष्यमात्रांत जी एक नैसर्गिक धडपडीची प्रेरणा असते, त्या प्रेरणेनें कोणत्याहि लोकांच्या आर्थिक प्रगतीचा गाडा कसाबसा रेटला जातो. पण त्यालाहि कांहीं मर्यादा आहेच. बेताल राज्यकारभारामुळें याहि गाड्याची गति कोठें ना कोठें तरी ठेचाळून पडतेच. मग पुढें काय?

''हिंदुस्थानांत आम्ही शांतता राखली हें एकच सुख हिंदी रयतेच्या उपरोक्त अनेक दु:खांची भरपाई करणारें मानलें तर मानावें. हा एकच मुद्दा घेतला आणि सर्व हिंदी रयतेची आमच्या राज्यपद्धतीनें झालेल्या दारिद्र्यावस्थेची व अवहेलनेची भरपाई करणाऱ्या शांततेच्या एवढ्या एकाच मुद्द्याचें तुणतुणें आम्ही वाजवीत बसलों, तर हिंदुस्थानांतील आमच्या घाशीरामीबद्दल भावी इतिहासकार काय लिहितील?''

इंग्रेजी राज्याचे 'उपकार'

या मथळ्या खालीं मि. डिकिन्सन यांनीं आठ कलमांत निरनिराळ्या ८ मुद्द्यांवर जे स्पष्टोद्गार काढले आहेत, त्यांतल्या ७ व्या कलमाचा भावार्थ असा आहे :

''७ : आज कितीतरी वर्षे आम्ही देशी सरदारशाही (Native aristocracy) पद्धतशीर रीतीनें नेस्तनाबूद करीत आहोंत. विलासांच्या व व्यापाराच्या हरएक जिनसांचा खप याच लोकांत होत असे. कामगार, कारागीर, कारखानादार, व्यापारी लोकांना यांचेंच उत्तेजन असे. कलाकौशल्याचे आश्रयदाते हेच सरदार लोक. शेतकीची सुधारणा, सार्वजनिक कामें इत्यादि गोष्टींत हिंदी रयतेच्या सुखवृद्धींसाठी व हालअपेष्टांच्या निर्मूलनासाठी आम्हाला या लोकांच्या मदतीचा केवढा तरी मोठा फायदा करून घेतां आला असता? देशी राज्येंच्या राज्यें सुद्धां आम्ही पार रसातळाला नेत आहोंत. सर थॉमस मनरोचेच उद्गार नमूद करावयाचे तर याचा परिणाम अवघ्या राष्ट्राला वर आणण्याऐंवजीं आम्हीं खालीं तुडवीत भ्रष्ट करीत आहोंत.'' (In place of raising, to debase the whole people) आणि ड्यूक ऑफ वेलिंग्टनच्या भाषेंत सांगायचें तर ''हिंदी लोकांना भ्रष्ट आणि भणंग भिकारी करून त्या सर्वांना आपले शत्रू बनविण्यासारखें आहे.'' (to degrade and beggar the natives making themall enemies)इतकेंहि असून 'आम्हीं तुम्हांला केव्हांहि भटकावून टाकूं.' (threat of absorpation) ही आमची धमकावणी त्यांच्या कानींकपाळीं एकसारखी सुरू असल्यामुळें, आपला देश सुधारण्याचा कोणताहि प्रयत्न करण्याची देशी राजांना व श्रीमंत सरदारी लोकांना मुळीं छातीच होत नाहीं.''

हिंदी सरदारशाहीचा सत्यानाश

''शोअरचे उद्गार : हा विषय इंग्रेजी हृदयाला व मनाला नीट पटण्यासाठीं त्यांनीं आपल्या इंग्लंड देशाकडे प्रथम नजर टाकावी, प्रत्येक व्यक्तीच्या आचारणाचा तेथील परिस्थितीवर काय परिणाम होत असतो तो नीट परीक्षण करावा आणि मग या हिंदुस्थान देशाच्या स्थितीचें निरीक्षण करावें. आपण एक इंग्लिश कंट्री जंटलमन आहों, अशी कल्पना करा. आपल्या इस्टेटीची आपण व्यवस्था पहात आहों. शेतकीच्या सुधारणेंत गढलों आहों. सार्वजनिक इमारती व रस्ते सुधारण्याच्या कामांवर देखरेख करीत आहों. स्थानिक धर्मकार्यांत फंडाला मदत करीत आहों. शेजाऱ्यांशीं मिळून मिसळून भ्रातृभावानें आदरपूर्वक वागत आहों. आपल्या घरांतील प्रत्येकजण व्यापक देशहितबुद्धीनें शक्य ती सुखवर्धनाची खटपट करीत आहे. हें चित्र पहा आणि त्याची हिंदुस्थानांतल्या स्थितीच्या चित्राशीं तुलना करून पहा.

''वर वर्णन केलेल्या स्थितींत जे श्रेष्ठ दर्जाचे हिंदी लोक होते त्यांचा आज नायनाट होऊन, त्यांची जागा परकीयांनीं पटकावली आहे. हे परदेशी (foreigners) हिंदी लोकांपासून नेहमीं फटकून वागतात आणि त्यांचें ध्येय 'खाना पीना चम्मनमे रहना' आणि गडगंज पैसा कमवून 'एक दिन विलायतकू चले जाना' या पलीकडे कांहीच नसतें.''

''इभ्रतदार आणि कुळशीलवान सरदार लोकांची केवढी संख्या हिंदुस्थानांत नामोहरम झालीं, हें पाहूं इच्छिणारांनीं इंग्रेजी वस्तीचीं ठाणीं सोडून, जरा थोडें लांब, आजूबाजूच्या वाटेल त्या तालुक्याच्या ठिकाणीं व खेडेगावांत जाऊन नजर टाकावी म्हणजे झालें. हीं असंख्य घरें व हे वाडे पहा. हे पूर्वी चांगले सुस्थितींत होते. पूर्वी यांत टापटिपीचे इभ्रतदार हिंदी जंटलमन रहात असत. या वाड्यांत त्यांचे नोकर चाकर, घोड्यांच्या पागा, हत्तीशाळा, त्यांचे सरंजामखाने इत्यादि थाट ठाकठींक चालत होता. पण आज त्यांची काय स्थिति आहे! हे वाडे ओसाड, भिंती कोसळलेल्या, तट ढासळलेले! आणि येथें राहणाऱ्या त्या जुन्या सरदारांचे वंशज कोठें आहेत? ते पहा. मातीनें मढविलेल्या चंद्रमौळीं झोपड्यांत कशी तरी सुकी ओली मीठभाकर खाऊन दारिद्र्यांत आयुष्याचे दिवस कंठीत आहेत.

''आणि वाचकांनीं हें लक्षांत ठेवावें कीं हिंदी सरदारशाहीचे इतकें वाटोळें झालें आहे तरी उरल्या सुरल्यांना सुद्धां चिरडण्याची गिरणी अझून बेफाम चालूंच आहे. ब्रिटीश सत्तेचे हे हिंदीलोकांवरचे 'उपकार' काय वर्णन करावें?''

संस्थानांचें निर्मूलन

इंग्रेजी सत्ताजन्य आत्मद्रोहानें ज्यांचीं अंत:करणें सडलीं आहेत व मनें कुजलीं आहेत, ज्यांनीं- किंवा ज्यांच्या बापजाद्यांनीं पेशवाईचें वाटोळें करून आपलीं छोटी छोटी भटी संस्थानें चौकोनी ठाकठिकींत बचावून घेतली आणि सातारच्या शिवछत्रपतीच्या सिंहासनालाहि आग लावण्यासाठीं कारस्थानें करतांना ज्यांची मनोदेवता बाचकली नाहीं, शरमलीं नाहीं, कीं छत्रपतीच्या बनवाशी हालअपेष्टेनें नरमली नाहीं, त्या आत्मद्रोही लोकांना व समाजांना एखाद्या देशी राज्याचें मरण म्हणजे पुत्रोत्सवाचें तोरण असें वाटल्यास नवलाचें कारण नाहीं. मराठी स्वराज्याचा घात करायला यांनीं हात मागें घेतला नाहीं, 'त्यांच्याच अस्सल औरस अवलादीनीं उरल्या सुरल्या मराठी संस्थानांपैकीं इंदोरच्या मानेला तात लावा म्हणून व्हाईसरापर्यंत बोंबाबोंब करावी, यालाच

असें म्हणतात. क्रिस्ती मिशनऱ्यांच्या सहेतुक परंतु उदार व स्वार्थत्यागी प्रयत्नामुळें पिढ्यान्‌पिढ्या अट्टल गुन्हेगार जातीसुद्धां आतां निवळल्या आहेत; पण स्वराज्यघात करण्यांत शिरोमणी म्हणून इतिहासप्रसिद्ध असलेल्या, कांहीं कुप्रसिद्ध महाराष्ट्रीय समाजांची देशीराज्य-रक्त-पिपासा अझून तिळमात्र बदललेली नाहीं, हा मुद्दा मानसशास्त्रवेत्यांना गोंधळांत पाडण्याइतका बिकट खास आहे. देशी राज्यें खालसांत चिरडण्याचा अट्टहास धरणें म्हणजे या आत्मद्रोही समाजांना ढेंकूण चिरडण्याइतकेंच सहजलीलेचें कर्म वाटतें. अशा लोकांचे अभिप्राय व चिथावण्या इंग्रेज सरकार काळजीपूर्वक विचारांत घेऊन झटपट आचारांत उमटविणार नाहीं, तर तें इंग्रज सरकार तरी कसलें? परंतु देशी राज्यें व खालसा यांतील राज्यकारभाराच्या परिणामांचा भेद काय असतो, तो मि. डिकिन्सन यांनीं मि. सुलीव्हानच्या उद्गारांत दाखविला आहे. त्याचा विवेकी हिंदवासियांनीं विचार करावा.

''मि. सुलीव्हानसाहेब लिहितात, गेल्या दहा वर्षांत पांच देशी स्वराज्यांचा नायनाट झाला. नेटिव्ह लोकांसाठीं अधिकाराच्या ज्या कांही थोड्या जागा अलिकडे आम्ही खुल्या ठेविल्या आहेत, त्यां एका बाजूला धरा, आणि देशी राज्यांच्या उच्चाटनांमुळें हिंदी लोक गमावून बसलेल्या अधिकारांच्या जागा समोर ठेऊन विचार करा, म्हणजे हिंदी लोकांच्या घाताचा भयंकरपणा ठळकपणें सिद्ध होईल. कारण अशा वेळीं हिंदी लोकांचें जें नुकसान तो इंग्रजी लोकांचा फायदा होत असतो. एखादें देशी राज्य खतम् केलें कीं काय परिणाम होतो पहा. कोणीतरी एखादा इंग्लिशमन येतो आणि कमिशनर म्हणून त्या स्वयंशासित नृपतीची जागा पटकावतो. आणखी दोघे तिघे इंग्रजी अधिकारी येतात आणि २-३ डझन सरदारांना घरीं बसवून त्यांचा अधिकार चालवितात. आमचे चारपाचशे गोरे सैनिक जाऊन संस्थानच्या ४-५ हजार सैनिकांना कायमची रजा देतात. देशी राज्यांतले ते आटोपशीर चिमुकले न्यायकोर्ट नाहींसे होते; राजधानीचा नूर पालटून तिच्यावर अवकळेची छाया पडते. लोक भणंग भिकारी होतात आणि इंग्लिशमन मात्र गडगंच थरारतो. हा इंग्लिशमन म्हणजे एक अगडबंब स्पंजच होय. हा स्पंज हिंदी संपत्तीच्या गंगेचें पाणी सोकून घेतो आणि तें तमसेच्या पात्रांत नेऊन पिळतो.

मि. डिकीनसन म्हणतात, ''इतक्यावरच गाडें थांबत नाहीं. देशी राजे आणि त्यांचे दरबार देशी उद्योगधंदे आणि कलाकौशल्य यांना भरपूर उत्तेजन देऊनच थांबतात असें नव्हे, तर त्यांच्या विशिष्ट देशी अमदानींमुळें रयतेचें मत आणि हिंमत चांगली थरारते. रयतेच्या जीवनाला सुखी व समृद्ध करणारा प्रत्येक प्रयत्न तेथें बळावतो. कित्येक वेळां देशी राज्यकारभार जुलमी बनतो, नाहीं असें नाहीं; पण त्याच्या दडपणापेक्षां 'आमच्या इंग्रेजी संस्थान'ची जोखडशाही त्यांनी मान भोडे इतकी जड असते. अयोध्येचें राज्य खालसा केलें तेव्हां त्यांतल्या अंतर्व्यवस्थेची मि. सुलीव्हानला कंपनी सरकारनें जी कल्पना करून दिली होती, त्यापेक्षां फार निराळीच स्थिती त्याला तेथें पहावयाला मिळाली. सारा प्रदेश सुपीक, उत्तम स्थितींत आणि लोकही भरभराटीस आलेले. हे पाहून तो आश्चर्यचकीतच झाला. एकदोन वर्षांपूर्वी (अजमासे १८५०) बिशप हेबर नांवाच्या एका जर्मन प्रवाशानें एका समजूतदार हिंदी गृहस्थाला विचारलें की तुम्हीं ब्रिटीश लोकांच्या सत्तेखालीं येऊं इच्छितां काय? त्यानें चटकन उत्तर दिलें, ''सर्व अरिष्टें पत्करलीं, पण या अरिष्टाची मेहरबानी करा.''

आणखी असे पुष्कळ उतारे आहेत. वाचकांनीं विस्तृत माहितीसाठी खालील पुस्तकें अगत्य मागवून

त्यांचा मननपूर्वक स्वाध्याय करावा.

Governament of India under a Bureaucracy, By John Dickinson; Rs. 2.0

The company and the crown, By hon'ble T. J. Havell-Thurlow.

India Reform Creacts, Nos. IV and IX.

Empire in Asia- How we came by it - a book of confessions.

By W. M. Torrens, M. P.

To be had of. Major B. D. Basu, I. M. S.

(P) Bahadur Gunj, Allahabad, U. P.

□□□

स्फुट विचार

निःस्पृहस्य तृणं जगत्

बावला - प्रकरणाला निष्कारण भरंसाट चेतविण्याच्या कामीं बिनकाळजाचें आंग्ल पत्रकार व उलट्या काळजीच जहाल मवाळ भटी पत्रकार यांनीं प्रारंभापासून जो भयंकर खोडसाळपणा चालविला, त्याचा व्हायचा तो अनिष्ट परिणाम झाला आहे. बेजबाबदार व्यक्तींच्या हातीं वृत्तपत्रीय शक्ती गेली कीं लोकमत-प्रदर्शनाच्या भटी ढोंगाखाली कसकसले देशद्रोही अत्याचार घडून येतात, याबद्दल आम्ही वेळोवेळीं स्पष्ट व्यक्त केलेले सिद्धांत आज अक्षरश: खरे झाले कीं नाहीं, याचा निकाल आमच्या वाचकांनींच द्यावा. कारण कितीहि क्षुद्र असो, सबब न्याय्य असो वा नसो, आणि कार्यकारणाचा संबंध कसाहि फोलकट असो, भटी मनोवृत्ति त्यावर पराचा कावळा करण्याच्या दृष्ट हेतूनें एकदा का थैमान घालूं लागली कीं त्या गोष्टीचें चुंबन घेण्याचा मोह कदरबाज इंग्रेजी नोकरशाहीलाहि आंवरत नाहीं. ही नुसती कल्पना नव्हे. हा नुसता विचार नव्हे. हा फलज्योतिष्याचा ठोकताळा नव्हे. हा इतिहाससिद्ध परंपरेचा सिद्धांत आहे. भटी पत्रांचा बेजबाबदारपणा व त्यापासून गेल्या २०-२५ वर्षांत निष्पन्न झालेले अत्याचार सरकारला माहीतच नाहींत असा प्रकार मुळींच नाहीं. लोकमताच्या नांवाखालीं चेतविलेल्या सार्वजनिक असंतोषाचें मूळ कोठें आहे आणि लोकमत लोकमत म्हणून बेजबाबदार व्यक्तींनी वृत्तपत्रद्वारां अहर्निश चालविलेल्या धिंगाण्याचे रहस्य कशांत आहे, हेंहि सरकारला उमगत नाहीं असा प्रकार नाहीं. भटी वृत्तपत्रांच्या संपादकीय अडणीवर कसकसल्या पुण्याईचे शंख कलम-कसायीपणा गाजवीत असतात, हेंहि सरकारनेंच वेळोंवेळीं उघड करून दाखविलेलें आहे. अशा स्थितींत बावला-प्रकरणात इंदोरच्या महाराजांचें नुसतें नाव येतांच भटी व इंग्रेजी (यांतहि भटच असतात) पत्रांनीं माजविलेल्या उर्मट बीभत्स अपमानकारक व बेजबाबदार हलकल्होळाकडे जेव्हां मुंबई सरकार व हिंदुस्थान सरकार सफाई पाठ फिरवून बसले, तेव्हांच आम्ही तर्क केला कीं या वरवर साध्या दिसणाऱ्या प्रकरणांतूनहि सातारच्या दुर्दैवी इतिहासाची पुनरावृत्ति बाहेर पडणार!

इंग्रेजी मुत्सद्देगिरीच्या आकाशांत भयंकर गडगडाट होऊं लागला कीं कोणाला फारसें भिण्याचें कारण नसतें. पण नातूवृत्ती वृत्तपत्रीय टोळांच्या टोळ धाडीचा कर्णकठोर घणघणाट सुरू झाला, खग्रास सूर्यग्रहणाची कुंद छाया सर्वत्र पसरली आणि टोळांच्या कुरतडण्याच्या किटकिट किटकिट कटकटाटांत

मोठ मोठ्या वृक्षांची पालवी झडू लागली, म्हणजे वर आकाशांत घडत असलेल्या वज्रप्रहारी घटनांची मात्र धास्ती वाटूं लागते. इंग्रेजी मुत्सद्देगिरीचा विशेष हाच आहे. तिची शांत समाधी म्हणजे कोणत्या तरी देशी राजसत्तेच्या समाधीची खास तयारी, ही अगदीं खूणगांठ बांधावी. इंग्रेजी राजकीय धोरणांचा गडगडाट पत्करतों, पण हा समाधीकालीन् शुकशुकाट भयंकर भवितव्याच्या भविष्यानें बेसुमार भयभीत करतो. त्यांतल्या त्यांत आमच्या दिलदार देभ कोब्रांनीं हा कार्टाचे देवे कंठशोषपूर्वक गाण्याचें आक्रंदन सुरू केलें की साऱ्या हिंदुस्थान देशाची पुण्याई आडवी आली तरी, वाटेल त्यावेळीं, वाटेल त्या स्थळीं सातारच्या प्रतापसिंह छत्रपतीचा इतिहास अक्षरश: उमटलेला दिसलाच पाहिजे. इंग्रेजी केसरी आपण होऊन कधीं कोणावर पंजाची झांप टाकीत नाही. हिंदुस्थानांतला असा एकहि प्रांत किंवा परगणा दाखवितां येणार नाहीं कीं ज्याच्या प्राप्तीसाठी इंग्रेजी केसरी आपल्या जागेवरून एक इंचभर तरी हलला! पुढ्यांत आयतें ताट वाढून येत असल्यास हलण्या डुलण्याची यातायात कोण शहाणा करील? पाकनिष्पत्ति हा भटांचा जन्मसिद्ध गुणधर्मच आहे. याबाबतींत त्यांचा आजपर्यंत कोणीच हात धरला नाहीं. पुण्याचा पेशवाईचा पुलावा आणि सातारच्या छत्राची बिरयाणी भटांनींच पकवून इंग्रेजी केसरीच्या पुढें ताट भरून सारली. प्रस्तुतच्या बावला प्रकरणाचे डाळ तांदूळ निवडण्याची देशाभिमानी मेहनत जहाल भटांनीं जिवाचें नांव शिवा ठेऊन केली, नंतर मवाळ भटांनीं उदारमतवादित्वाच्या शेगडीवर त्याचा भात शिजविला, आणि वाढणीचें काम कांहीं भटी इंग्रेजी पत्रांच्या पात्रांतून होत आहे. अशा स्थितींत पुढचें कार्य काय होणार, हें न सांगतांहि न कळण्या इतके आमचे देशबांधव बथ्थड डोक्याचे आहेत काय?

बाणांचा पिसारा माझ्याच पंखाचा आं?

इसापनीतींत एक गरुडाची गोष्ट आहे. पारध्यानें मारलेल्या बाणानें विव्हळ होऊन तो खालीं पडला आणि छातींत घुसलेल्या बाणाच्या टोकाकडे पाहूं लागला; तों त्याला लावलेला पिसारा गरुडाच्या पंखाचाच त्याला दिसला. तेव्हां गरुड कळवळून म्हणाला ''अरेरे ! मरणाचें मला दु:ख नाहीं. पण माझ्या छातींत घुसलेल्या बाणाच्या पिसाऱ्याला माझ्या जातभाईच्याच पंखाची पिसे असावी आं?''

महात्म्यांना मरणाची क्षिति नसते. स्वयमेव मृगेंद्राच्या तडफीच्या कुलशीलवान राजांना राज्यसंन्यासाची दिक्कत नसते. योध्याला जखमांची पर्वा व प्राणाची तमा नसते. पण शत्रूपेक्षां मित्रानें घातलेला घाव त्याला मृत्यूपेक्षांहि जास्त विव्हळ करतो. समोरासमोर छातीठोक युद्धांत अहमदशहा अबदलीनें आम्हां मऱ्हाठ्यांची केलेली लांडगेतोड व ससेहोलपटहि आम्ही कौतुकस्पद मानूं; पण मऱ्हाठी स्वराज्य इंग्रजांच्या पदरी बांधण्यासाठीं आमच्याच देशबंधू भटांनीं केलेलीं उलटसुलट कारस्थानी कोलांगडी जगाच्या अंतापर्यंत जातीवंत मऱ्हाठ्याच्या काळजांत संतापाच्या तिडका भडकवित राहतील! महंमद तघलखानें जिवंत हिंदी माणसें सोलून टाकली; अवरंगझेबानें हिंदु देवळांना दळून काढले, किंवा डायरनें जालियनवाला बागेंत हिंदी लोकांची अमानुष कत्तल केली, तर त्या गोष्टी आम्ही सहजलीलेनें

विसरून जाऊं. पण आमच्या देशी राज्यसंस्था, देशी राजे आणि हरएक स्वदेशीय चैतन्य केवळ स्वार्थासाठीं परक्यांच्या पदरीं बांधणाऱ्या देशी घरभेद्यांची देशद्रोही कृष्णकर्मे कोणताहि जातिवंत अवलादीचा मऱ्हाठा मेला तरी विसरणार नाहीं. स्वदेशबांधवांच्या पंखाच्या पिसाऱ्याचे बाण छातींत घुसल्यावर जातिवंत मऱ्हाठ्याच्या काळजांत कसल्या तिडक्या पेटतात, याची जाणीव पिसाऱ्यासाठीं पंख पुरविणाऱ्या पापी भटांनाच होत नाहीं, तर केवळ पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठीं हिंदुस्थानाला दत्तक आई मानून स्वातंत्र्याच्या भाडोत्री लढाया लढविण्याची मिजास मारणाऱ्या उपटशुंभ हॉर्निमन होलसिंजरांना काय होय? या मोलेंरडाया घातलेल्या भाडोत्र्यांना कसलें आसूं आणि कसली माया! त्याला 'जातीचें' पाणी लागतें. राज्यें काय, राजे काय किंवा कोणी का, कोणी आचंद्रार्क अस्तित्वाचा अमरपट्टा घेऊन आलेले नाहींत. सर्वांना मृत्यू हा आहेच. आधणांतले रडत असले, तर सुपांतल्यांनीं हांसूं नये. निदान परदेशावर राज्य कारणारांनीं तरी सुपांत बसून हासू नये. कालचक्राच्या तडाक्यांत त्यांनाहि केव्हां ना केव्हां आधणाची वाट चोखाळावी लागतेच लागते, हा इतिहासाचा सनातन सिद्धांत आहे. नागपूरचा भोसला चिरडला गेला किंवा सातारचा छत्रपति भरडला गेला तर त्यांत वाईट वाटण्याचें कारण नाहीं. १९ व्या शतकांत ते पडले नसते, तर आतां २० व्या शतकानें त्यांना गाडले असते. ते थोडेच चिरंजीव होते? पण त्यांच्या छातींत जे बाण घुसले त्यांचा पिसारा भटी होता. भटी होता, भटी होता, हे शल्य कोणत्या जातीवंत मऱ्हाठ्याच्या अंत:करणांत आगीचा डोंबाळा पेटवणार नाहीं? सर्वसमर्थ सर्वभक्षक काळा. तुझ्या करणीचीं कमाल असो! बरोबर शंभर वर्षांनीं आज १९२६ सालांत तूं इंदोर संस्थानांत १८२६ सालचा सातारा उत्पन्न केलास! काळपुरुषा, तू जरी अगम्य व अगोचर असलास तरी करणी करण्यासाठीं तू लीलामात्रें निर्माण केलेल्या नरवंट्यांची कारस्थाने तू बखरकारांसाठीं तरी गम्य आणि गोचर ठेवतासे, हें आम्हां मर्त्य मानवांवर तुझे मोठे उपकार आहेत बाबा.

इंग्रेजी सत्ता आणि भटवर्ग

ऋषीचें कूळ आणि नदीचें मूळ शोधूं नये, असें एक सूत्र आहे. कां शोधूं नये? तर तें तसेंच 'कांहीतरी' असतें. तद्वतच राज्यसत्तेच्या उत्पत्तीचेंहि मूळ शोधून पाहू नये, असें एडमंड बर्कनें म्हटलें आहे. ऋषीचें कूळ व नदीचें मूळ शोधन केलें नाहीं तर मोठीशी आपत्ति येईल असा प्रकार नाहीं. पण राज्यसत्तेच्या आद्यबीजाचा नीट तलास केला नाहीं, तर त्या सत्तेच्या पुढील इतिहासाचें खरें स्वरूप केव्हांहि भ्रष्ट आणि विकृत दिसेल. इतिहासच विकृत झाला कीं मग खऱ्याखोट्याचा निर्णय लंगडा पडून, मानवी प्रगतीचा किंवा अधोगतीचा कांही थांगच लागणार नाहीं. आज अखिल भरतखंड इंग्रेजी सत्तेचे गुलाम होऊन बसले आहे. ह्या सत्तेची कदर इतक्या पद्धतशीर यंत्ररचनेंत ठाकठीक बसली आहे कीं खुद्द सत्ताधीश आणि सत्ताधीन यांनाहि कायदेबाजीच्या ठरावीक घटनेपलीकडे पाऊल टाकतांना तलवारीवरच्या कसरती कराव्या लागतात. इंग्रेजी राज्यसत्ता भरतखंडांत कितीहि दृढमूल झालेली

असली, तरी या सत्तेच्या उत्पत्ति स्थितीचीं पाळेमुळें कोणाला अवगतच नाहींत, असें मुळींच नाहीं. वर्तमान स्थितींत इंग्रेजी नोकरशाही आपल्या राज्यकारभाराचा गाडा पांच रुपड्याच्या शिपायाकडूनहि बिनतक्रार हांकण्याइतकी शिस्तवार घटना करून बसली असली, तरी हिंदुस्थानांतील इंग्रेजी सत्तेच्या उदयाचा इतिहास खुद्द इंग्रेजांनाहि मोठासा अभिमानास्पद वाटेल इतका शिलामोलाचा खास नाहीं. पूर्वी येथें अनेक हिंदु व मुसलमानी देशीं राज्यें हाती. त्यांच्या उच्चाटनावरच आजचे इंग्रजी राज्य उभारलेलें आहे. ही देशी राज्ये कशी उद्ध्वस्त झाली, काय कारणें झाली, कोणी केली, याचा इतिहास जितका मनोरंजक आहे, तितकाच विचार क्रांतिकारक आहे. जितका चित्तवेधक आहे तितकाच चित्तभेदक आहे. जितका तो श्रवणीय आहे तितकाच मननीय आहे. त्यावरून एक ठळक सिद्धांत काढतां येतो कीं या सत्तेच्या बीजारोपणांत क्रिस्ती धर्मानुयायी बनिया कंपनीच्या नोकरशाहीनें कितीहि ढोंग धत्तुरे केलेले असले, तरी त्यांत हिंदी लोकांच्या देशद्रोहाचेंच खत विशेष पडल्यामुळें हा वृक्ष येथें बेसुमार फोफावला व ताडमाड अस्ताव्यस्त वाढला. केवळ महाराष्ट्रपुरतेंच बोलायचें तर बनिया कंपनीच्या बुटाच्या टांचेखालीं एकूण एक देशी राज्यें चिरडण्याची त्या देशद्रोही लोकांनीं आत्मवंचक प्रवृत्तीनें मन मानेल ती कारवाई केली, त्या लोकांची ही प्रवृत्ति रतिमात्र कमी न होतां, अझूनहि वाढत्या प्रमाणवरच असलेली दिसून येते.

देशी राज्यांत अनागोंदी कारभार होता, असा देवासारख्या ब्राह्मणांचा हंबरडा ऐकून, त्यांच्या पवित्र चिथावणींने तीं राज्यें खालसा करण्याची इंग्रेजांनी जी वेळोंवेळीं उठावणी केली; त्याचाहि इतिहास अझून आम्हांला तोंडपाठ आहे. महाराष्ट्रांतील देशी राज्यांचें उच्चाटन करून, तेथें इंग्रेजी सत्ता दृढमूल करण्याच्या पवित्र कामांत भटवर्गानेंच जिवापाड श्रमसाहस केलेले असल्यामुळें, या भट दोस्तांवर इंग्रेजी अधिकाऱ्यांची मेहरबानी विशेष असल्याबद्दल भटेतरांना तक्रार करण्याचें कांहींच कारण नाहीं. राज्यवृद्धीच्या जे कामीं आले त्यांची राज्यकर्त्यांनी बडदास्त ठेवलीच पाहिजे; आणि तशी ती ठेवली जात आहे, हें सध्यांच्या इंदोर प्रकरणावरूनहि सिद्ध होण्यासारखें आहे. दक्षिणी भट आणि इंग्रेज सरकार यांचा अंतस्थ जिव्हाळा वरवर पहाणारांना विरोधाचा वाटला तरी तो इरसाल भक्तीचा आहे. ही एक विरोधी भक्तीच म्हटली तरी चालेल. बाह्य व्यवहारांत राजद्रोह बाँब खून इत्यादि लीलांत भटदोस्त कितीहि रंगला, तरी त्याच्या या लीलांची मासुली कायदेबाजी पलीकडे इंग्रेज रसिकांनीं फारशी दाद घेतल्याचें दिसत नाहीं. याचे कारण इंग्रेजी सत्तेच्या उत्पत्ति स्थितीचा प्राण म्हणजे भटवर्गच होय. या उत्पत्ति स्थितीचा हा प्राण आपल्या हिंदी साम्राज्याचा, स्वदेशी साम्राज्याप्रमाणें, प्राण घेणार नाहीं, एवढ्या बंदोबस्तानें इंग्रज सरकार आपला कारभार हाकण्याइतके सवाई खंबीर आहे. पण भटांच्या आवडी निवडी बरहुकूम इंग्रेजी धोरणांची पावले पडताना पाहिली कीं दोघां या समरस्ते विषयीं शंकाच उरत नाहीं. फार काय, पण आजूबाजूच्या परिस्थितीचा, किंवा भटेतर बहुजनसमाजांच्या मूक भावनांचा तिळमात्र विचार न करतां भटी पत्रांच्या आकांड तांडवा बरहुकूम हिंदुस्थान सरकार जे हां एखाद्या धोरणाची गिरणी बिनमूर्वत चालूं करतें, तेव्हां हिंदुस्थानावर इंग्रेजांचें राज्य आहे कीं नातूशाही भटी पत्रकारांचें आहे, असा संशय चांगल्या समजूतदार माणसालाहि क्षणभर आल्याशिवाय राहत नाहीं. आजपर्यंतचा इतिहास पाहिला तर कोणतीहि हिंदी राज्यक्रांती इंग्रेजी राजनीतीनें आपण होऊन कधींच केलेली नाहीं. भटांच्या गुणधर्माप्रमाणेंच 'परस्पर पावणेतेरा' हीच इंग्रेजी राजकारणाची पूर्व परंपरा आहे.

भटांनीं कारण काढावें आणि कार्य इंग्रेज बहादुरांनीं लढवावें, असा हा साट्यालोट्याचा कार्यकारण व्यवहार आजपर्यंत चालूं आहे. बावला-प्रकरणाला चेतविण्याची आणि त्यांतून इंदोर-प्रकरण उपस्थित करण्याची भटी पत्रकारांत चढाओढ चालूं असतांना, आमचे मुंबई सरकार व हिंदुस्थान सरकार अगदीं हिमालयाप्रमाणें अचल व थंडगार बसले होते. हूं नाहीं का चूं नाहीं! ही बाजू नाहीं, ती बाजू नाहीं. अगदी निर्भेळ समानदृष्टी. शुद्ध समाधी. इकडे सेशन कोर्टांत न्यायदान चाललें असतांनाहि उत्तररंगाची बीभत्स व खोडसाळ रंगपंचमी भटी पत्रें बेभान खेळत होती, तरी अटकाव नाहीं का दटकाव नाहीं. या जानीदोस्तांचा कलकलाट एवरेस्ट शिखराला पोचतांच एकदम इंदोर सरकारच्या गळ्यांत कमिशनचा फांस! यांत आम्हांला स्वत:ला कांहीं आश्चर्य वाटत नाहीं. हंसूहि येत नाहीं आणि रडूंहि येत नाहीं. उलट, इतिहास आपली पुनरावृत्ति किती बिनचूक ताळेबंद करीत असतो. आणि काळ विचार आचार परिस्थिती कितीहि बदलली तरी मानवांच्या हाडींमासीं खिळलेली गुणधर्मांची परंपरा कशी बिनफरक कायम राहते, याच तत्वाचें आम्हांला मोठें कौतुक वाटलें. वाहवा रे वाहवा भटी मनोवृत्ति आणि धन्य धन्य इंग्रेजी राजनीति! वेळीं मेरू ढळेल, पण तुमचा रंग बदलणार नाहीं. गणिताच्या मोजणीनें १८२६ ते १९२६ पर्यंत पुरापूर शंभर वर्षे लोटली, तरीहि १९२६ सालांत १८२६ साल आम्हां अज्ञ जनांना हुबेहूब दाखवितां! इंदोर सरकार ब्रिटिश साम्राज्याचे म्हणे दोस्त सरकार. या दोस्तांनीं आपल्या 'मेन ॲण्ड मनी'चा होम करून ब्रिटीश दोस्तांवरील युरपियन महायुद्धाचे प्राणांतिक गंडातर टाळून त्या या पुनर्जन्माला मदत केली. पण भटी पत्रकारांनीं या दोस्ताची मन मानेल तशी विटंबना केली तरी ज्या हिंदुस्थान सरकारनें ब्र काढला नाहीं, आणि त्याच पत्रांनीं 'होळकराला पदच्युत करा', 'त्याला कोर्टांत खेचा', कोणी म्हणतो 'त्याला फांशी द्या' असली बेजबाबदार हाकाटी करतांच हिंदुस्थान सरकार गपचूप कमिशनचें जाळे इंदोर दोस्तसरकारवर फेंकते, तेव्हां ब्रिटीश एपांयरचे जानी दोस्त भट का हे संस्थानिक, याचा विशेष खुलासा करायलाच नको. बनिया कंपनीचा जानींदोस्त बाळाजीपंत नातू १८२६ सालीं त्याचा अवतार निरनिराळ्या जहाल मवाळ भटी पत्रांत झालेला आहे, हें भटेतर दुनियेनें लक्षांत घ्यावें.

कायद्याचा प्रश्न

बेजबाबदार वृत्तपत्रांच्या आरड्याओरड्याला बळी पडून, हिंदुस्थान सरकारनें इंदोर सरकारवर कमिशन नेमण्याचीं घोरपड सोडली आहे, तिच्या योग्यायोग्यतेचा विचार होणें अगत्याचें आहे. इंग्रेज सरकार आज वाटेल तें करण्यास समर्थ आहे, याविषयीं आम्हांला मुळींच शंका नाहीं. पण कायदेबाजीच लढवायची तर कायद्याचा प्रश्न तरी त्यांनी यथासांग सोडवून इंदोरचा कायद्योक्त बळी घ्यावा. याविषयीं मुंबई कायदे कौन्सिलचे सभासद व नाशिकचे सुप्रसिद्ध कायदेपंडीत रा. आर. जी. प्रधान यांनी तारीख ११ फेब्रुआरी १९२६ च्या 'डेली मेल'मध्यें प्रसिद्ध केलेल्या पत्रांतील कांही ठळक मुद्दे खालीं दिले आहेत.

''इंदूर सरकारचा बावलाच्या खुनाशी संबंध असल्याच्या संशयावरून त्यांची चौकशी करण्याकरितां

जे कमिशन अथवा कमिटी नेमण्यांत आली आहे, ती मॉंटेग चेम्सफर्ड रिफार्म्सच्या कर्त्यांच्या ध्यानींमनीं सुद्धां नसली पाहिजें अशी माझी ठाम समजूत आहे. कच्ची चौकशी करण्यापुरतेंच कमिशन नेमावयाचें असेल तर तसें करण्यास कांहीं हरकत नाहीं आणि संस्थानिकांनींही अशा चौकशीच्या कामास मन:पूर्वक मदत करावी. परंतु अशा कमिशनला संस्थानिकाची चौकशी करण्याचा कोणताच अधिकार पोहोंचत नाहीं.

''दुसरा प्रश्न असा उद्भवतो कीं मॉंटेग चेम्सफर्ड रिफार्मच्या ३०९ कलमान्वयें कमिशन नेमण्याचा अधिकार कोणास आहे? नुसती कच्ची चौकशी करण्याकरितांच जर कमिशन नेमावयाचे असेल तर ते गव्हर्नर जनरलला आपल्या अधिकारांत नेमता येईल; परंतु रिपोर्टाच्या ३०९ कलमामध्यें नमूद केल्याप्रमाणें जेव्हां एखाद्या संस्थानिकाचे हक्क आणि अधिकार काढून घेण्याचा प्रश्न निघतो, तेव्हां त्याला आपल्या अधिकारांत कमिशन नेमता येईल किंवा नाहीं हा एक कूट प्रश्न आहे. वरील कलमामधील नुसत्या शब्दांचाच कीस काढीत बसलें तर व्हाइसरॉयला कमिशन नेमण्याचा अधिकार आहे असें वरवर पहाणाराला दिसते. परंतु वरिष्ठ सरकाराची संमती घेतल्याशिवाय व्हाइसरायला कमिशन नेमण्याचा अधिकार आहे व तसाच सुधारणेचा कायदा करणारांचाही उद्देश होता, असें म्हणणें बरेंच धाडसाचें आहे.

''सुधारणेचा कायदा करणारांच्या मनांत काय होतें आणि काय नाहीं हें तूर्त बाजूला ठेवून प्रस्तुत विषयाचा स्वतंत्र रीत्याच विचार करू. श्रीमंत सरकार होळकरांसारखे संस्थानिक आणि ब्रिटिश सरकार यांचे स्नेहसंबंध तहनाम्यांनीं निगडीत झालेले आहेत. कांहीं विवक्षित परिस्थिती उत्पन्न झाल्यास सार्वभौम सरकारला आपल्या संस्थानिकांचे अधिकार कायमचे अगर कांहीं काळापर्यंत काढून घेण्याची मुभा आहे. परंतु तहनाम्यांच्या अटीवरून पाहातां सार्वभौम सरकारलाच तसा अधिकार पोहोचतो. हिंदुस्थान सरकारला या बाबतींत ढवळाढवळ करतां येत नाहीं. यावरून हें सिद्ध होते कीं अशा तऱ्हेचे कमिशन नेमण्याचा अधिकार सार्वभौम सरकारला किंवा सार्वभौम सरकारच्या समतीनें हिंदुस्थान सरकारला आहे. परंतु प्रस्तुत जे कमिशन नेमले आहे त्याला वरिष्ठ सरकारची परवानगी होती काय? तशी जर होती म्हणावें तर ऑफिशियल कम्युनिकमध्ये जाहीररितीया हेंही प्रसिद्ध कां केलें नाहीं? इतक्या महत्त्वाच्या मुद्द्यावर कम्युनिक अगदीं मौन स्वीकारते याचा अर्थच असा कीं व्हाइसरॉयनें कमिशन नेमण्याकरितां परवानगी मिळवलेली नाहीं. आणि ती न मिळविणें म्हणजे कायद्याच्या दृष्टीनें एक अत्यंत मोठी घोडचूक आहे.

''आतां कमिशन नेमण्याच्या बाबतींत कायदेशीरदृष्ट्या चूक नाहीं असें एक वेळ धरून चाललें, तरी कमिशनची घटना कशी असावी हा एक प्रश्न राहातोच. सुधारणा कायद्याच्या ३०९ कलमान्वयें ह्या कमिशनची योजना झाली असें समजून चाललें तर कमिशन हें होळकर सरकारची चौकशी करण्याकरितां एक न्यायमंडळ बनते आणि हिंदुस्थान सरकाराकडे फिर्यादीची भूमिका येते. असें असतां कोणत्या तत्वांवर या कमिशनची घटना होणें रास्त आहे? गेल्या महायुद्धाच्या परिसमाप्तीनें दोन तत्वांचा प्रादुर्भाव नि:संशय झालेला दिसतो. पहिले तत्त्वं म्हटलें म्हणजे नैसर्गिक कायद्याचे उल्लंघन एखाद्या मोठ्या स्वतंत्र राजानें जरी केलें तरी त्याला न्यायासनासमोर जाब द्यावा लागतो आणि दुसरें तत्व असें कीं त्या राजाची चौकशी तटस्थ व तिऱ्हाईत न्यायमंडळाकडूनच व्हावी लागते.

हिंदुस्थानांतील संस्थानिक म्हणजे अगदीं स्वतंत्र राजे आहेत असें नसलें, तरी स्वतंत्र राजांची चौकशी करण्याकरितां ज्या तत्वांचा अंगिकार केला जातो त्यांचेच अवलंबन संस्थानिकांच्या बाबतींत कां करूं नये? न्यायदान करणाऱ्या मंडळाबद्दल कोणताच आदेश राहूं नये अगर मंडळावर कोणत्याच पक्षाचे वजन पडू नये अशी खबरदारी घ्यावयाची असल्यास तें मंडळ तटस्थ तिऱ्हाईतच असावयास पाहिजे. याचा अर्थ असा कीं या मंडळांत संस्थानांतील अगर ब्रिटिश साम्राज्यांमधील रहिवाशी नसावेत. अशा तऱ्हेचें मंडळ स्थापणें मोठें कठिण नाहीं. आणि न्यायप्रियतेला अनुसरून व हिंदी संस्थानिकांच्या इभ्रतीला साजेल असे वरील प्रकारचे मंडळ नेमणें अधिक श्रेयस्कर आहे. कांहीं विशिष्ठ बाबतींत संस्थानिक हिंदुस्थान सरकारचें मांडलीक आहेत हें जरी खरे असलें तरी तेवढ्यावरूनच त्यांची चौकशी हिंदुस्थान सरकारच्या प्रजाजनांकडून, अधिकारी वर्गाकडून अगर त्यांनी नेमिलेल्या इतर लोकांकडून व्हावी हें रास्त ठरत नाहीं. हल्लीं जें कमिशन नेमण्यांत आलें आहे तें वरील ताबांना मुळींच अनुसरून नाहीं. आणि ज्या कमिशनमध्ये हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधी (फिर्यादीच जेथें न्यायाधीश) नाहींत अशा कमिशनकडूनच माझी चौकशी व्हावी असा होळकर सरकारनें आग्रह धरला तर तो त्यांचा न्याय्य व वाजवी असा हक्कच ठरेल. कमिशनमध्ये पोलिटिकल डिपार्टमेंटच्या अधिकाऱ्यास मुळींच वांव मिळू नयें हे तर अगदीं उघडच आहे. परंतु हायकोर्ट जजेस यांचा सुद्धां त्यांत समावेश होणें चांगले नाहीं; कारण किति झालें तरी ते सुद्धां सरकारचे नोकरच.''

फिर्यादीच न्यायाधीश !

कोणत्या का पुण्याईनें होई ना, पण सध्या उपस्थित झालेल्या इंदोर-प्रकरणापुढें बावला-प्रकरणाला आतां खराट्याचीहि किंमत राहिलेली नाहीं. कमिशनच्या नेमणुकीची कायदेशीर योग्यायोग्यता कायदेपंडित अजमावून पहाण्यास समर्थ आहेत. सकारण व निष्कारण आपणांवर झुगारलेल्या आरोपांचा पद्धतशीर रीतीनें प्रतिकार करण्याइतकें चातुर्य धडाडी व बुद्धिमत्ता देवी अहिल्येच्या सिंहासनावर बसणाऱ्या श्रीमन्महाराज सर तुकोजीरावांत खास आहे. देशी राज्यांच्या उच्चाटनापूर्वी किंवा देशी राजांच्या पदच्युततेपूर्वी उघड किंवा गुप्त कमिशनांच्या नेमणुकांचे पर्यवसान नेहमीं बिनचूक कशांत हात आलें आहे, त्याचेहि दाखले इंग्रेजांच्याच बखरींतून आम्ही शिकलों आहों. मॉंटफर्ड सुधारणांचा कायदा झाला काय, किंवा प्रतापसिंह- कालीन् सर जेम्स कारनॅकसाहेबांचा दमधाटीचा वायदा झाला काय, दोघांतहि 'फिर्यादीच न्यायाधीश' हें एक सूत्र अखंड व अबाधितच आहे. फिर्यादी इंग्रेज सरकार आणि न्याय देणाराही इंग्रेज सरकारच. मल्हारराव गायकवाडाची चौकशी झाली, तेव्हां तीन सरकारी गोरे व दोन हिंदी राजपुरुष पंच होते. पंचांतच गोऱ्यांचें बहुमत. हिंदी पंचांनीं मल्हाररावला 'पूर्ण निर्दोषी' ठरविलें तरी अखेर गोऱ्या पंचांच्या मताधिक्यानें त्याला फुटबॉलप्रमाणें तडाड उखडून मद्रापुरीला भिरकावून दिलाच कीं नाहीं? आजच्या इंदोर कमिशनवर सुद्धां तीन गोरे सरकारी अधिकारी व दोन हिंदी नृपति हेंच पंचमंडळ आहे. शिवाय, कमिशन भरविण्याच्या ठिकाणच्या विचारांची तागडीसुद्धां त्या राक्षसी

गांवभवानीच्या आवडी निवडींकडे कलंडत आहें. अशा अवस्थेंत या न्यायदानाच्या फार्साचें भरतवाक्य कशांत होणार, हें सामान्य जनांना चटकन उमजलें नाहीं, तरी इतिहासाभ्यासी चाणाक्ष विचारवंतांना समजत नाहीं असें थोंडेच आहे? हिंदुस्थान सरकारला बावला -खुनासारख्या क्षुद्र पराच्या कावळ्याला एका प्रगतिपूर्ण तडफदार देशी राज्याचे पिंड घालून न्यायदानाचा फोर्स पद्धतशीर नाचवायचाच असेल, तर होळकर सरकारच्या चौकशीचा प्रश्न त्यांनीं एक तर खासगी रीतीनें पोलिटिकल खात्यामार्फत चौकशी करवावी, अथवा हा प्रश्न लीग ऑफ नेशन्सच्या न्यायमंदीरांत पाठवावा हेंच श्रेयस्कर होईल. यांत फिर्यादी हिंदुस्थान सरकार व आरोपी होळकर सरकार या दोघांचीहि अब्रू सांभाळली जाईल.

आमचा इमानी वाटाड्या

इंदोर प्रकारणावर आतांपर्यंत जे विचार प्रबोधनांत प्रसिद्ध झाले, त्याचे इषारे आम्ही केवळ मागील इतिहासाच्या दाखल्यांनुसारच दिले व यापुढें प्रसंगोपात देऊं. वर्तमान काळाचे अनुभव भूतकाळच्या दाखल्यांशीं पडताळून पाहूनच भविष्यविषयीं सावधगिरीने इषारे देणें, हें पत्रकार नात्यानें आमचें कर्तव्य आहे. ऐतिहासिक दाखल्यांपलीकडे नजर टाकून, आजूबाजूचा सोम्या गोम्या काय बरळतों, इकडें लक्ष देण्याचें, आम्हाला प्रयोजन नाहीं. इंदोर प्रकरणाचा विचार करतांना हिंदुस्थानांतील यच्चावत् खालसा झालेल्या देशी संस्थानांचा इतिहास नीट अभ्यासून सनातन सिद्धांत व परंपरेचीं अबाधित राजकारणी तत्वें शोधून काढली कीं सामान्य विचारांच्या माणसाप्रमाणें मन भांबाऊन जात नाहीं, विवेक डळमळत नाहीं आणि निश्चित तत्वप्रतिपादनाच्या मार्गावरून विचार घसरत नाहीं. इतिहास हा असा इमानी वाटाड्या आहे कीं कोणत्याहि राजकारणी घडामोडींत, तपशील कितीहि बदलला तरीं, बऱ्या वाईट कृत्याच्या कर्त्याच्या परंपरा, भूमिका आणि धोरणें हीं जशींच्या तशीं अभंग राखून ठेवतो. इंदोर प्रकरणाच्या भूत वर्तमान भविष्याचा जसजसा विचार होतो, तसतसें प्रतापसिंह छत्रपत्रीचें सातारा प्रकरण अक्षरश: पुनरुद्धत होत असल्याचा भास होतो. इंदोरहून येणाऱ्या नित्य नव्या बातम्यांच्या प्रसिद्धीचा अनुक्रम विचारांत घेतला, तर इतिहासाची पुनरावृत्ति इतक्या बिनचूक तपशिलानें कशी होते, याचेंच मोठें आश्चर्य वाटतें. एक कांही तरी सामान्य सबब, तिचे कसलें तरी एक द्राविडी प्राणायामाच्या संबंधांचें पिसाट, त्या पिसाचा कावळा करण्याचा अग्रमान भटांनीं घ्यायचा, नंतर 'घात झाला, न्याय बुडाला, दुनिया धोक्यात पडली' अशा अर्थाची त्यांनीं हाकाटी करायची, इंग्रज सरकारनें अगदीं मौन धारण करायचें, हाकाटीचा जोर वाढायचा, मग एकदम सरकारनें कमिशन नेमायचें, त्यांत फिर्यादी तोच न्यायाधीश, राजानें चिडून जायचे, कमिशन नाकारायचें, सैन्य नि:शस्त्र करायचें, इंग्रेजी लष्कर तेथें यायचें, राजानीं लोकांना आपल्या गळ्याची शपथ घालून निषेध सुद्धां करू नका म्हणून फर्मानें काढायचीं, दिवाणानें फिर्यादी व आरोपी अशा दोनहि बाजूला भलेपणा राखून रियासत वाचविण्याच्या शिकस्तीचे आपणच गोडवे गायचे, अखेर रीजन्सीच्या कारभाराची पेशवाई आपणच पटकवायची, इ. या प्रकारांत नवीन काय आहे? हा तर इतिहाससिद्ध मामुली फार्स आहे. त्याचा आद्यंत ठरलेला

आहे. मग उगाच मुत्सद्देगिरी या दिमाखानें महाराजांनीं असें करावें आणि इंग्रेज सरकारनें तसें करावें. असल्या वायफळ मुद्द्यावर कलमकसायीपणा करण्यांत काय अर्थ? मेंढरूं भटकविण्याचेंच ठरल्यावर 'तूं नाहीं तर तुझ्या बापानें शिव्या दिल्या'चे पुरावे सातारा प्रकरणांतून हवे तेवढे काढून देऊं. कायद्याचे कीस काढण्यांतहि कांही अर्थ नाहीं. कायदे करणारे, कायद्यांचा अर्थ लावणारे, कायदे वापरणारे आणि कायदे बजावणारे फिर्यादी आणि न्यायाधीश एकच! तात्पर्य, प्रबोधन इतिहासाच्या दाखल्याची भाषा बोलत आहे, त्याला वर्तमान काळांतल्या नटांशीं कांहीं कर्तव्य नाहीं. तो फक्त भूमिकांचा वाचकांना परिचय करून देत आहे.

महाराष्ट्रांत जातीवंत मराठा जिवंत असता तर-

भटेतर चळवळीमुळें वर्तमान इतिहासांत विशेष प्रामुख्यानें पुढे आलेला कोणता समाज असेल तर तो मराठा समाजच होय. हें त्यांचे प्रामुख्य, ही त्यांची जागृति, नवीन नवीन 'ब्राह्मणेतरी मुखपत्रां'च्या द्वारें व्यक्त होणारा त्यांचा 'आर्टिक्युलेट'पणा (विचारव्यक्तता) वगैरे गोष्टी कौतुकास्पद आहेत. पण हा सर्व वरवरचा बुडबुडा आहे. अंतर्यामीच्या घटनेंत अझून खडखडाटच दिसतो. अखिल भटेतर बहुजन समाजाच्या प्रातिनिधित्वाची जबाबदारी पेलण्याच्या मराठ्यांच्या वल्गना आज सपशेल फोल असल्या तरी स्वत:च्या जातिहितसंरक्षणाच्या बाबतींतहि हा समाज म्हणजे त्याचे फेटाळ पुढारी- तितकेच मंदबुद्धि व बिनधोरणी असल्याचे या इंदोर- प्रकरणावरून स्पष्ट सिद्ध होत आहे. भटेतर चळवळीला अखिल भटेतर समाजांचा पाठिंबा असो वा नसो; तो प्रश्न आम्ही गौण समजतो. पण ही चळवळ मराठा संस्थानिकांच्या द्रव्यबळावर आजपर्यंत चालली. शिवस्मारकासारख्या मराठ्यांच्या इतर लोकोपयोगी चळवळी सुद्धां मराठा संस्थानिकांनींच उचलून धरल्या आहेत. म्हणजे भटेतरांची सर्व प्रकारची हालचाल मराठा संस्थाकांच्या मेहेरबानीवर चालली आहे, हा मुद्दा धोरणी भटांच्या लक्षांत असून, त्या मुद्द्यावर नाना प्रकारच्या मुद्यांचा उघड गुप्त भडीभार ते नेहमीं करीत असतात, हे मर्म या फेटाळ पुढाऱ्यांच्या ध्यानीं मनीं सुद्धां आलेलें दिसत नाहीं. मराठे संस्थानिक जिवंत गाडलें कीं भटेतर चळवळ मेलीच, हें भटांचें धोरण त्यांच्या कुशाग्र बुद्धीची महति पटविण्या इतकेंच 'राष्ट्रीय' आहे. भटेतरांच्या आत्मोध्दाराकडे सहानुभूतींने पाहणारा प्रत्येक मराठा संस्थानिक या 'राष्ट्रीय' बुद्धीलाच बळीं पडलेला आहे. छत्रपति प्रतापसिंहाला या एकाच कारणानें वनवासी व्हावें लागलें. राजर्षि शाहू छत्रपतींच्या निर्भत्सना व हालअपेष्टा तर ताज्या जिवंत नजरेसमोर आहेत. अशा अवस्थेंत, बावला- प्रकरणासारख्या क्षुद्र गोष्टींत इंदोर सरकारचा, चुटपुटताच कां होईना, संबंध येतांच त्यावर भटी पत्रें एवढी घसा फोड फोडून काय धोरणानें भुंकत आहेत, हेहि ज्या मराठा 'मुखपत्रां'च्या व कौन्सिली व बिनकौन्सिली फेटाळ मराठा पुढाऱ्यांच्या लक्षांत आलें नाही, त्यांच्या धोरणी बुद्धीची काय तारीफ करावी? होळकरांकडे फंडगुंडी डेप्यूटेशने नेतांना शिमले- शिलेदारांची संख्या कितीहि भरंसाट फुगली, तरी त्याच उदारधी कर्णावर भट कुत्रीं बेफाम भुंकत असतांना 'जागृति' खेरीज एकाहि 'बामणेतर' मराठा पत्राची दांतखिळी

उघडली नाहीं, का एखाद्या फंडगुंडोबानें निषेधाचा उद्गार काढला नाहीं. कौन्सिलांत व असेंब्लींत प्रश्नोत्तरें झालीं तरी मराठे कोणशीलदार दगडी पुतळ्याप्रमाणे थंडगारच बसले. मानपानासाठीं धाधावलेल्या श्रीमंत ज्ञानहीनांना आणि अल्प शिक्षणाने अवास्तव फुरफुरलेल्यांना कौन्सिलादि ठिकाणीं निवडून पाठविलें म्हणजे हितसंबंधाचे संरक्षण कोणत्या धर्तीचे होतें, हें अखिल भटेतरांनीं या एकाच गोष्टीवरून पाहून घ्यावें. महाराष्ट्रांत जातीवंत मराठा शिल्लक असता, तर श्रीमन्महाराज तुकोजीराव होळकरांच्या विटंबनेचा पहिलाच शब्द आणि पहिलेंच गलिच्छ कार्टून चित्र पाहतांच वाघाप्रमाणे बेफाम भडकला असता! सातारच्या छत्रपत्रीच्या तक्त छत्राचें भटी कारस्थानांनीं होळकुकडें केलें त्या वेळीं स्वतंत्र व सशस्त्र असतांनाहि जो मराठा स्वस्थ बसला, त्याची आजची इंग्रेजी अंमदानींत वाढलेली नातवंडे परतवंडे सर्व मराठी संस्थानांची वाताहात लागली तरी तोंडातून 'कॉन्स्टिट्यूशनल' ब्र हि काढणार नाहींत, ही आमची आतां अगदीं खात्री आहे. आमच्या सारख्या 'स्वार्थांधतेनें हिंदुत्वाची दृष्टी फुटलेल्या कायस्थ प्रभू'ने यावर विशेष लिहिणें बरें बरें नव्हे.

माबाप सरकारला इषारा

क्षुद्र व बेजाबाबदार वृत्तपत्रांच्या कलकलाटाला आणि त्यांच्यामार्फत इंदोर संस्थानचा सूड उगविण्यास टपलेल्या साळसूद कारस्थानांच्या खटपटीला जमेत धरून दोस्त इंदोर सरकारवर आपण कमिशनची जी घोरपड आज चढविली आहे, तिच्या वाजवीपणाबद्दल आपल्यापाशीं कांहींहि पुरावे असले, तरी तिच्या परिणामांचा आपण करावा तितका विचार केलेला दिसत नाहीं. युरपच्या महायुद्धाचें साम्राज्यावर गंडांतर आलें, त्या वेळीं याच दोस्तांनीं तुमच्या बचावासाठीं लढाऊ माणसांचा व कोट्यवधि रुपयांचा नुसता होम केला. त्या वेळी तुम्ही त्यांना अगदीं बरोबरीचे लेखले व दोस्त सरकार म्हणून त्यांचा दर्जा जाहीर केला. मग आतां एका खुनाच्या प्रकरणांत क्षुद्र लोकांच्या बडबडीवर अचानक उठावणी करून आम्ही सार्वभौम सत्ताधारी आणि तुम्ही 'कोणी तरी' असल्या भावनेनें कायद्याचा कीस काढून या दोस्तावर कमिशनच्या चौकशीची वारंटवजा नोटीस काढणें, तुम्हीच फिर्यादी आणि तुम्हीच न्यायाधीश होणें, ही 'गरज सरो आणि वैद्य मरो'ची मनोवृत्ति हिंदवासियांच्या मनांत अनेक कुकल्पनांचें तुफान माजविण्याइतकी खास भयप्रद आहें, असें आम्हांला वाटते. रस्त्यावरचा भिकारी सुद्धां आपल्या प्राणदात्याचे उपकार कधिं विसरत नाहीं; आणि या हिंदी संस्थानिक दोस्तांनीं तर तुमचें अस्तित्व राखण्यासाठीं आपल्या सर्वस्वाचा होम केला असतांहि, या महायुद्धोत्तर काळी सर जेम्स ग्रांट, सर जेम्स कारनॅक, लॉर्ड डलहौसी प्रभृतींच्या मनोवृत्तीचें वारें फिरून येथें वावरूं लागावें, हें विनाशकाले विपरीत बुद्धीचें लक्षण ठरूं नये, अशी आमची फार इच्छा आहे. आपली धोरणी मुत्सद्देगिरी आज कोणाला परिचित नाहीं? पण केवळ मुत्सद्देगिरीपेक्षां सदसद्विवेक बुद्धीचा प्रश्न अगदींच लाथाडून चालणार नाहीं. सत्यशोधनाचे अनेक मार्ग राजकारणाच्या शास्त्रांत आहेत, त्यासाठीं होळकर सरकारच्या इभ्रतीच्या दोस्त नृपतीला तुमच्या तीन सिविलियनां पुढें आणि दोन समान दर्जाच्या हिंदी मित्रांपुढे एखाद्या

आरोपी प्रमाणें उभा करण्यांत तुमच्या तरी सार्वभौमी इभ्रतीचा दर्जा असा कितीसा गौरवास्पद ठरणार आहे? तुमच्या उच्च पोलिटिकल खात्याकडून ऑफीशियल वाटेल ती चौकशी कस्सून केल्यास होळकर सरकार खात्रीनें त्याला सहकार्याची मदत देतील. ज्या तुमच्या दोस्त नृपतीनें केवळ न्यायाला मदत व्हावी म्हणून मागणी होतांच, प्रायमा फेसीचा मामुली कायदेबाजपणा यत्किंचितहि न दाखवितां, बोट दाखविले ते छोटे मोठे आरोपी भडाभड तुमच्या हवालीं केले, त्या होळक़र सरकारावर आरोपाची नुसती कल्पना बसवितांना मुत्सद्देगिरीपेक्षां सारासार विचाराचाच सल्ला आपण घेणें इष्ट होतें. कांहीहि असो, आज तुम्ही एका तडफदार व मानी हिंदु राजावर आपल्या सार्वभौमी सत्तेचा शह देऊन चुकला आहांत. त्याच्या भल्या बुऱ्या कारणांची मीमांसा करणे आतां व्यर्थ आहे. तुम्ही जितके मानी आहां तितकांच तुमचा दोस्तहि मानीच आहे. तुम्ही साम्राज्यकर्ते आहां, तों राज्यकर्ता आहे. तुम्ही सर्वशक्तिमान् आहां तो अल्प शक्तिमान- आणि आज तर पूर्ण नि:शस्त्र- आहे. तुम्ही फिर्यादी आणि न्यायाधीश आहां. तो फक्त आरोपी आहे. तुम्ही लोकरंजनासाठीं सत्यशोधक बनला नसेल तर आतां बनेल, आणि सत्याग्रहाला उचित अशा भवितव्याला मर्दाप्रमाणें हांसत हांसत कवटाळण्यासहि कमी करणार नाहीं. तो हिंदू राजा आहे. तशांत तो क्षत्रिय मराठा आहे. मल्हारराव होळकराचे नांव त्याला सांगायचें आहे, देवी अहिल्येची सत्याग्रही तडफ त्याला बदनाम करायची नाहीं. त्याला आपली विटंबना नको आहे. महायुद्धांत त्यानें तुमची विटंबना होऊं दिली नाही. आतां तुमच्या नोकरशाहीकडून स्वत:ची विटंबना करून घेण्याची त्याला इच्छा असणें शक्य नाहीं. या टग ऑफ वॉरचा काय वाटेल तो निकाल लागो, पण त्यामुळें खुद्द इंदोरांत व खालसांतल्या कोट्यवधि जनतेवर या प्रकरणाचे काय काय परिणाम होतील, याची सरकारास आगाऊच जाणीव करून देणें पत्रकार नात्यानें आमचें कर्तव्य आहे.

इस्लामी पक्षपाताचा संशय

कारणें कांहींहि असोत, आज हिंदू आणि मुसलमान यांच्या भावना उघड उघड शत्रुत्वाच्या होऊन बसल्या आहेत. खुद्द मोंगलाईंत हा प्रश्न जितका अस्तित्वांत नव्हता, तितका या आंग्लाईंत तो आज अत्यंत नाजूक होऊन बसला आहे. वेळीं पेट्रोलच्या पिंपाजवळ जळती मेणबत्ती बिनबोभाट एक रात्रभर जळेल, पण हिंदु-मुसलमानांत केव्हां कोठें आग भडकेल याचा नियम नाहीं. निझामच्या सरहद्दी जवळच्या वऱ्हाडांत तर ही आग बेफाम बोकाळल्याचें वृत्तपत्रांवरून समजते. उत्तर हिंदुस्थानांत व सिंध प्रांतांत काय चाललें आहे, हें आम्हीच सांगायला पाहिजे असें नाहीं. आजपर्यंत लक्षावधि खून झाले असतील. राजकारणी खूनहि कांहीं कमी झाले नाहींत. मुंबईस तर निदान दररोज एक तरी खून होत असावा, असा अंदाज बांधण्यास हरकत नाहीं. पण बावलाच्या खुनाइतकें महत्त्व जॅकसनच्या खुनाला किंवा व्हाईसरॉय लॉड हार्डीजवर फेकलेल्या बॉंबलाहि आलेले नव्हते. प्रस्तुत प्रकरणीं खून झालेला बावला मुसलमान, आणि त्या घाणेरड्या आरोपाचा कुठला तरी एक धागा एका हिंदु राजाशीं जोडण्याची नुसती कल्पनाच सद्य:स्थितीत आम्हांला भयंकर असंतोषाची द्योतक वाटत आहे. एका मुसलमाचा खून

होतो काय आणि त्यासाठी एका मोठ्या मराठी रियासतीवर गंडांतर येते काय! खुनाचा कसून तपासणी होते, न्यायदान होतें, आरोपी फाशी जातात, तरी सुद्धां या प्रकरणाचा धागा शक्य तितक्या लांबवर लांबवून इंदोर संस्थानवर फांस पडतो, तर यात सरकारच्या इस्लामी पक्षपाताचा संशय हिंदु रयतेच्या अंत:करणांत पोखरण घालण्याला पुष्कळ वांव आहे. त्यांतून इंग्रेजी राज्याची छापखान्यांवरची कदर कर्दनकाळ असून, हिंदुस्थान सरकारच्या हाती प्रिग्सेस प्रोटेकशन ॲक्टचें जाज्वल्य शस्त्र असतांहि, 'मुस्लिम औटलुक'सारखी पत्रें 'होळकराला फांशी द्या' असें जाहीर बडबडत असतांहि जर सरकार त्याची दरकार करीत नाहीं, तर हा दुष्ट संशय अखिल हिंदु जनांच्या काळजाचा ठाव पाहूं लागला तर त्याची सर्व जबाबदारी सरकारवर आहे, असा नम्र इषारा आम्ही वेळींच देऊन ठेवतो. हिंदुजनांत कितीहि भेदभाव असले आणि भट भटेतर वादासारखे वाद कितीहि धुमसत असले, तरी पाण्यापेक्षां रक्त घट्ट असते आणि चिखलाला चिखल तेव्हांच मिळतो, इकडें सरकारचे अवधान असावें.

मऱ्हाट्यांच्या भावना दुखऊं नका

स्वातंत्र्य आणि गुलामगिरी हे दैवाचे झोले आहेत. आज चढला तो उद्यां पडेल, आज पडला तो उद्यां उठेल. या सनातन तत्वावर कोणीहि गुलाम झाला तरी आशावादाचे दिवस कंठीत असतो. मऱ्हाठी स्वराज्य हातचें गेलें- आम्ही होऊन घालविलें वाटेल तर म्हणा, पण गेले. राज्यक्रांतीच्या घटनेंत स्वतंत्र मऱ्हाठे इंग्रेजी राज्यसत्तेचे राजनिष्ठ प्रजाजन झाले. देशी राज्याचे स्वतंत्र नागरीक व राज्यकर्ते होते, ते अजब चमत्कारानें खालसांतले कायदावंद्य शांतिप्रिय नागरीक बनले. वंशपरंपरागत छत्रपतीला व पेशव्याला देव मानून पुजीत होते, ते हरघडी बदलणाऱ्या कलेक्टराला व पंचवार्षिक उगवत्या मावळत्या गव्हर्नराला देव मानूं लागले. अडाणी गोरगरीब प्रजा तर शिपायीबुवालाच राजा समजते. म्हणजे, मऱ्हाठे पूर्वी एका सगुण देवाचे उपासक होते, ते आतां निर्गुण निराकार इंग्रेजी सत्तेचे दास झाले. यक्षिणीच्या कांडीच्या या पराक्रमाबद्दल कोणाची कांही तक्रार नाहीं. कारण ती चालत नाहीं. मऱ्हाठी राज्य गेलें, तरी त्याचें प्रेम मऱ्हाठी हृदयांत अझून मेलें नाही, माबाप. श्रीमंतानें दत्तक घेतला म्हणून जन्मदात्या दरिद्री आईला विसरतां येत नाहीं. पाश्चात्यांच्या प्रबोधक सहवासानें उत्पन्न झालेल्या उत्क्रांत राजकीय कल्पनेच्या क्षेत्रांत आमचे छत्रपति आम्हांला दिसणार नाहींत, ही गोष्ट कितीहि सत्य व स्पष्ट असली, तरी छत्रपतींच्या छत्राची कल्पना आम्हांला विसरतां यावयाची नाहीं, हेंहि तितकेंच नागवें सत्य आहे. शिवशाहीचा बाह्य डोल्हारा कोसळून पडला, तरी त्याच्या स्थापनेसाठीं आमच्या बापजाद्यांनीं या महाराष्ट्रभर घातलेले रक्ताचे सडे आम्ही कसे विसरावे हो. ही भावना काय चीज आहे आणि ती आम्ही मऱ्हाठे कशी केव्हां आणि कोठे पूजतो, तें सांगावें तरी कसें? पुण्यस्मरण शिवरायाच्या उद्धवस्त समाधीच्या मातींत लोळण घेतांना आम्हा मऱ्हाठ्यांच्या हृदयांत ज्या प्रेमाचा हिंदी महासागर खवळतो, सिंहगडाचें नांव निघतांच भावनांची जी कालवाकालव होते, पावनखिंडीचा बाजी आणि पुरंदरचा मुरारी ज्या प्रेमाच्या तक्तावर अझूनहि थै थै नाचतो, 'गिलचा गिलचा म्हणजे काय बिशाद' हें सदाशिवराव

भाऊचे बखरींतले उद्गार वाचतांना रोमांचित देहाचा मगदूर ज्या कौतुकानें थरारतो, तें प्रेम, ती कालवाकालव तो उमाळा, तें कौतुक यांचा लोंढाच्या लोंढा, माबाप हिंदुस्थानसरकार, आजहि या इंदोर बडोदे कोल्हापूर ग्वालेराच्या उरल्या सुरल्या देशी नृपतींच्या सिंहासनाकडे अविच्छिन्न वहात असतो. ही प्रत्येक मऱ्हाठ्याच्या मनीची गुपित गोष्ट नजरेआड करूं नका. 'सत्यासाठीं प्राण गेला तरी बेहत्तर, पण खोट्या आरोपांपुढें मान वांकवणार नाहीं' म्हणून छातीठोक जबाव देऊन काशीचा वनवास पत्करणारा सवाई शिवाजी प्रतापसिंह आणि 'राजा मेला तरी न्याय मेला नाही' म्हणून उपासमारींतहि सातारच्या स्वराज्याचा झगडा विलायतेस लढविणारा रंगोबापूजी, मायबाप सरकार, आपण इतक्यांतच विसरूं नका. महाराष्ट्रांतला मऱ्हाठा बहुजनसमाज अडाणी आहे. फार पापभीरू आहे. मूकवृत्ति आहे. कायद्याची शिस्त पाळणारा आहे. त्याला हृदयाच्या तिडका नीटशा व्यक्त करतां येत नसतील. त्याला तें सामर्थ्य व साधन अझून हस्तगत झालेलें नाही. त्याच्या हजारों बचड्यांनीं इंग्रेजी साम्राज्याच्या बचावासाठीं फ्रान्सच्या समरांगणावर देहाची पांखर घातलेली आहे. पुण्यांतल्या शिवस्मारकाच्या पायाच्या दगडा पुढें तुमच्या उद्याच्या बादशहानें टोपी काढून शिवरायांचे आणि त्याच्या अखिल पराक्रमांतून निर्माण झालेल्या अखिल शिवशाहीचे मऱ्हाठा स्पिरीट वंद्य मानलें आहे. त्याच स्पिरीटचे अंशभूत इंदोरचे होळकर सरकार यांच्या इभ्रतीला विटंबनेचा लवमात्र ढका लागेल, तर मऱ्हाट्यांच्या या मूक भावना कितपत जखमी होण्याचा संभव आहे, हें सार्वभौम सरकारास आम्ही सांगणें धाडसाचें नव्हे काय?

□□□

लेख

प्रभु रंगो बापूजी गुप्ते देशपांडे यांचें संक्षिप्त चरित्र

रंगो बापूजी सन १८५३ च्या दिसेंबरांत मुंबईस येऊन दाखल झाला. त्याच्याबरोबर बनिया कंपनीच्या बोर्ड ऑफ डिरेक्टर्सचा एक गोरा प्रतिनिधी आला होता. या प्रसंगाची विस्तृत माहिती नुकतेच स्वर्गवासी झालेले त्यांचे नात भाचे नरहर परशराम वैद्य यांनीं आम्हांस सांगितला. त्यावरूनच खालील मजकूर येथें नमूद करीत आहोंत.

खुद्द रंगो बापूजीला पाहिलेले सात-आठ वृद्ध गृहस्थ- त्याचे जवळचे नातेवाईक- म्हणतात की रंगो बापूजी विलायतेला गेला तेव्हांच तो चांगला उतार वयाचा होता. परत आला तेव्हां त्याचे सर्व केस पिकले होते. वर्ण गोरा व लाल बुंद झाला होता. त्याची चर्या इतकी पाणीदार व तेज:पुंज असे कीं त्याच्या डोळ्यांला डोळा भिडवून भाषण करणें सहसा शक्य नसे. १४ वर्षे लंडनला काढल्यामुळें त्याला अस्खलीत इंग्रजी बोलतांना पाहून इकडील लोकांस मोठें आश्चर्य वाटत असें. त्याचे कपडे इंग्रजी धाटणीचे असत व वृद्धावस्थेंत सुद्धां त्याची व संभाषणाची तडफ तत्कालीन् तरुणांना लाजविण्या सारखी होती. त्याच्याबरोबर एक मोठा इंग्रज अधिकारी गृहस्थ आलेला होता. ज्या अर्थी गोरा साहेब रंगोबाच्या बरोबर आला आहे आणि मुंबई सरकारहि, पूर्वीचा द्वेष विसरून, परळच्या गव्हर्नमेंटस हौसमध्यें त्या दोघांच्या बिऱ्हाडाची सोय लाऊन त्यांच्या सरबराईंत काटकसर करीत नाहीं, त्या अर्थी रंगो बापूजी काम फत्ते करून आला, अशी सर्व देशांत एकच बातमी गेली. ग्वालेर दिल्ली कराची इंदोर धार नागपूरा पर्यंतचे हजारो लोक रंगो बापूजीला पाहाण्यासाठी मुंबईला धावले. जिकडे तिकडे पाहुण्यांचा सुळसुळाट उडाला. बैलांचे रेकलेवाले दुप्पट चौपट पैसे उकळूं लागले. परळ गव्हर्नमेंट हौसवर लोकांची दाट रहदारी सुरू झाली. उचल्यांचाहि कारभार बराच उसळला. अखेर मुंबई सरकारनें जाहीरनामा काढून सकाळ व संध्याकाळ भेटीच्या वेळां ठरवून टाकल्या. त्या वेळाखेरीज इतर वेळीं गव्हर्नमेंट हौसकडे कोणी जाईल त्याला पोलीस मज्जाव करीत. ठरावीक भेटीच्या वेळी रंगो बापूजी बंगल्याच्या बाल्कनींत येऊन उभे रहात व खालीं जमलेल्या दाट लोकसमुदायास वरचेवर नमस्कार करीत. हा विधी सकाळ संध्याकाळ दोन दोन तास असा सतत १५ दिवस चालला होता. 'रंगोबानें आपल्याबरोबर विलायतेहून एक चमत्कारीक छापखाना आणला होता. त्यांत कागद घालून बोटें फटफट आपटली कीं तो कागद एकां

पलकांत सुंदर ठशांत छापून निघे. (कै. वैद्य) हा छापखाना म्हणजे टैपरायटरच यंत्र होय, हे आताच्या मंडळींना सांगणें नको. त्याचप्रमाणें निरनिराळ्या विषयांवरची इतकीं इंग्रजी पुस्तके व इतर 'विलायती चिजा' रंगोबानें आपल्या बरोबर आणल्या होत्या कीं कारी (मुळशी पेठा) येथें त्या रवाना करतांना ५२ खटारे भरले. बहुजन समाजाच्या बरोबरच त्याचे आप्तेष्ठ मित्रहि भेटीसाठी धांवून आले. पंधरा वर्षाच्या हद्दपारी नंतरच्या त्या भेटी! तेव्हां त्या प्रेमाचें व उत्सुकतेचें वर्णन कोणी करावें? भेटी झाल्या. पण रंगोबा विलायतेहून आलेला! बाटला. त्याला प्रायश्चित्ताशिवाय धर्मांत व विशेषत: जातींत परत कसा घेतां येणार? प्रायश्चित्ताचा प्रश्न निघण्याची थांतड, धर्ममार्तंडांच्या टोळ्याच्या टोळ्या परळला वेढा देऊन उभ्या! पतीचा प्रायश्चित्तविधि उरकल्या शिवाय पत्नीं तर त्याचें दर्शनहि घेई ना. अखेर विधी, दक्षिणा, ब्राह्मणभोजन वगैरे थाट चमचमीत उडाल्यावर रंगो बापूजी पंक्तिवान झाले.

रंगो बापूजीच्या एकंदर वृत्तीवरून तो फार शांत, उल्हासी व आनंदी दिसत होता. त्याच्या बरोबर गोरा 'हफसर' होता, तोहि रंगोबाशीं अत्यंत जिव्हाळ्यानें वागत होता. त्यावरून सातारा राज्याचा कांहीं तरी अनुकूल असा स्वतंत्र बंदोबस्त विलायत बोर्डाने करून त्याच्या अंमलबजावणीसाठीं हा गोरा अधिकारी येथें आला आहे, असा सर्वांचा दाट समज होता. पुढें रंगों बापूजी आपल्या जन्मभूमीचें दर्शन घेण्यासाठीं कारी येथें गेला असतां, हा गोरा अधिकारी मुंबईस एकाकी मरण पावला व त्याची कागदपत्राची पेटीहि नाहींशी झाली. ही बातमी समजतांच रंगों बापूजी तांतडीने मुंबईस आला. या अपघातानें तो फारच चिडला. त्या गोऱ्या इसमाचें व त्याचें काय रहस्य होतें तें कोणालाच स्पष्ट उमगलें नाहीं. पण बंगल्यांत पाऊल टाकतांच 'साहेबाच्या कागदाची पेटी कोठे आहे?' एवढाच तपास त्यानें प्रथम केला. ती नाहींशी झाली; असें कळतांच तो क्षणभर खिन्न झाला, पण लगेच त्यानें उग्र मुद्रा धारण केली. या हकीकतीला अझून कागदोपत्रीं पुरावा मिळालेला नाही. परंतु रंगों बापूजीची पुढील चळवळ विचारांत घेतां ही हकीकत केवळ दंतकथाच असेल असें वाटत नाहीं.

१८५७ च्या बंडांत रंगो बापुजी होता किंवा नव्हता, हा एक चर्चेचा प्रश्न आहे. मेजर बसूंच्या मतें रंगो बापुजीवर बंडाचा आरोप म्हणजे बनिया कंपनीची कारस्थानी कारवायी असें दिसतें; परंतु रंगो बापुजीचें स्वदेशीं आगमन आणि बंडाच्या धामधुतींत त्याचा अज्ञात अंत, या मधला महत्त्वाच्या हकीकतीचा दुवा मेजर बसू यांना गवसला नसल्यामुळे त्यांनीं वरील मत प्रतिपादन केलेलें दिसते. स्वातंत्र्याच्या लढायांचा इतिहास संशोधन करतांना त्यांच्या उत्पादकांच्या मनोवृत्तीचा मूळ रंग संशोधकांनीं आपल्या स्वत:च्या कल्पनेंतून पाहून भागत नसतें. केवळ अपयश आलें म्हणून स्वातंत्र्य-प्राप्तीच्या श्लाघ्य प्रयत्नांना 'बंड' असें तिरस्करणीय नांव देणें आणि तेच प्रयत्न यशस्वी झाले तर 'दिग्विजय' असें गोड नांव देणें, हा मनुष्यस्वभावाचा एक तालेवार गुणधर्मच म्हटला तरी चालेल. आज बंड हा शब्द कानीं पडतांच थंड पडण्याइतका कायदेप्रिय षंढपणा आमच्या अंगीं भिनलेला असला तर तो सद्य:स्थितीचा एक परिणाम आहे. परंतु तेवढ्यानें १८५७ सालच्या अखिल भारतीय प्रबोधनाला 'स्वातंत्र्यासाठीं स्वयंनिर्णयेच्छू भारतीयांचा अपयशी परंतु कौतुकास्पद असा निर्वाणीचा थैमान' असें समजण्याइतका मनाचा मोठेपणा विवेकाच्या क्षेत्रांत खात्रीनें आढळेल. रंगो बापुजीचें नांव सत्तावनच्या बंडाशीं संलग्न झाल्यानें त्याच्या चारित्र्याची व स्वराज्यविषयक देशसेवेची महती कोणत्याही दृष्टीनें हिणकस ठरते असें मुळींच नाही. प्रयत्न केला, कांहीं कारणानें तो फसला, म्हणून प्रयत्नांतल्या मूळ उद्देशाची थोरवी केव्हांही क्षुद्र ठरत

नसते. महाराष्ट्राचा छत्रपति शिवाजी स्वातंत्र्याच्या युद्धांत यशस्वी झाला म्हणून त्याची कीर्ति जितकी अजरामर झाली आहे, तितकीच, किंबहुना त्याहून विशेष अशा पूज्य भावनेंत स्काटलंडचा अपयशी विल्यम बॉलेस प्रत्येक स्कॉच व्यक्तीच्या हृदयांत अजरामर होऊन बसला आहे. तात्पर्य, यशापयश हें ईश्वरी देणें आहे, तेवढ्यावरून कोणत्याही कार्याचा किंवा त्याच्या कर्त्याचा उच्चनीचपणा उद्देशाच्या उच्चनीचपणा वरून ठरविणें प्राप्त आहे. या नियमानें पाहिले असतां रंगो बापुजीनें सत्तावनच्या बंडांत जो प्रमुख भाग घेतला होता त्यांतील उद्देश पाहतां त्याच्याविषयी कोणाही हिंदी व्यक्तीला- मग तो मुसलमान असो वा हिंदु असो. शीख असो वा पठाण असो, स्पृश्य असो वा अस्पृश्य असो- अभिमान वाटलाच पाहिजे. कर्मण्येवाधिकारते मा फलेषु कदाचन.

सत्तावनच्या बंडांची तयारी रंगो बापुजीनें केली यांत मुळींच संशय नाहीं. प्रत्यक्ष कार्य करणारीं पात्रें पुष्कळ होती व तीं इतिहासांत नमूद आहेत. परंतु त्या प्रचंड प्रेरणेचा मुख्य चालक व सूत्रधार खास रंगों बापुजीच होता. कायदेबाजीचे कमाल कसोशीचे डावपेच खेळल्या नंतर निराश झालेल्या मनोवृत्तीनें वैतागून जाऊन बंडाच्या उठावणीला हात घालावा; हा मनुष्यस्वभावच आहे. त्यानें बंडाची तयारी कसकशी केली वगैरे तपशील या त्रोटक चरित्रांत देण्याचें कारण नाहीं. परंतु त्यानें आसेतूहिमाचल प्रवास करून सर्व सूत्रें ठाकठीक बसविली. मावळांतही त्यानें शिवकालीन लौकिकाच्या अनेक कर्तबगार लोकांची संघशक्ति आपल्याकडे वळवून घेतली होती. विलायतेस इंग्रजी टापटिपीचे त्यानें प्रत्यक्ष ज्ञान मिळविलेले असल्यानें मोठमोठ्या संस्थानिकांपासून तो थेट दिल्लीच्या समरांगणावर ठराविक दिवशी हजर राहण्यास सिद्ध झालेल्या शिपाईगड्यापर्यंत सर्वांना त्यानें एकजिनसी कदरेंत सूत्रबद्ध केले होते.

परंतु या अवाढव्य कारस्थानाला हाणून पाडण्यासाठीं कंपनी सरकार अत्यंत जागरूकतेनें आपलीं सूत्रें गुप्तपणानें हालवीत होतें. तें त्यांचें कर्तव्यच होते. कंपनीनें मावळांतील संघटना हाणून पाडण्यासाठीं भोरच्या पंतसचिवाना आपल्या बगलेंत घेतले होतें. पंतांनीं कृष्णाजी सदाशिव शिंदकर या नांवाचें एक कायस्थ प्रभू गृहस्थ रंगो बापुजीच्या कटांत सीएडी म्हणून घुसडून ठेविले होते. रंगो बापुजीच्या सर्व हालचाली या गृहस्थाकडूनच पंतसचिवाच्या मार्फत कंपनी सरकाराला कळत असत. शिंदकर वरवर मात्र रंगो बापुजीचा अगदीं उजवा हात म्हणून वागत असे. इतकेंच नव्हे तर खुद्द पंतसचीव सुद्धां बंडाच्या कटांत तनमनधनावर तुळशीपत्र ठेवण्याइतकें रंगो बापुजीला सामील असल्याचा बहाणा करीत होता. आमचे मित्र श्री. गोपीनाथराव पोतनीस उरवडेकर यांच्या जुन्या दप्तरांच्या गळाठ्यांत सांपडलेली तीन अस्सल पत्रें खाली उदधृत करीत आहोत. त्यावरून आमच्या विधानाची सत्यता पटेल, ही पत्रें चिमणाजी रघुनाथ सचीव यांनीं रंगो बापुजीस जरी लिहिलेली आहेत तरी पाकीटावर मात्र-

चिरंजीव राजश्री कृष्णराव सदासीव सिद कर मु।। कसबे भोर येथे दीजे रवाना माहाडाहून

असा पत्ता लिहिलेला आहे. यावरून तोंडी किंवा पत्रद्वारें पंतसचीव रंगो बापुजीला ज्या हुलकावण्या देत होता त्या सर्व कृष्णराव शिंदकराच्या मार्फतच होत, यांत मुळींच संशय नाहीं.

चिमणाजी रघुनाथ सचीव
याची तीन अस्सल पत्रें

श्रीरामचंद्र

राजश्री रंगो बापूजी

विशष आपले व आमचे भोर मु ।। बोलणे
जाले त्या प्रो आम्हाकडून जवीज करून
मागाऊन चिठी पाठवितो तिकडील आ-
पण तजवीज करावी ।। ७ जुन सन १८५७ ई।।

चिमणाजी रघुनाथ सचीव.

श्रीरामचंद्र

राजश्री रंगो बापूजी
विशष आपण अै(व) जाविसी तजवीज क-
रावी म्हणोन लिहिले त्यास आयल्या लि।। प्रो
तजवीज करून पाठवितो ता ९ जून सन १८५७ इ।।

चिमणा रघुनाथ सचीव.

श्रीरामचंद्र

राजश्री रंगो बापूजी
विशेष आपण ताां. १५ जूनची सर्व कामा
बदल तजवीज ठेविली म्हणोन लिहिले ते समजले
त्या प्रो आपण करून मग इकडू(न) सर्व संकेता
प्रो आम्ही करू आणि आम्ही तुमचे बाहेर
नाही या प्रो माहाराज पासी सांगावे
आनमान करू नये ता १० जून सन १८५७ इ।।

चिमणा रघुनाथ सचीव.

बंडाच्या उठावणीची सर्व व्यवस्था शिस्तवार लावून मावळांतील सैनिक दिल्लीकडे रवाना करण्यासाठी रंगो बापुजी मुळशी पेट्यात आपल्या गांवीं कारीला आला. तत्पूर्वी बरेच लोक दिल्लीकडे गुप्त वेषानें रवानाहि झाले होते. त्यांत रंगो बापुजीचे दोन तरूणपुतणे पुढें निघून गेले होते. हिंदुस्थानांत सर्वत्र एकदम उठावणी करण्यांचा एक नक्की दिवस गुप्तपणें ठरलेला होता. संघांतल्या इतर मंडळींप्रमाणें कृष्णराव शिंदकर यानेंही आपल्या मंडळीच्या जमावासह दिल्लीकडे जाण्याचे ठरलेले होते. रंगो बापुजी कारीस येतांच शिंदकरानें 'मी हिवतापानें आजारी आहे मला येऊन भेटून जा.' असा निरोप पाठविला. उठावणीची तारीख तर जवळ आली आणि शिंदकराची तर कांहीं हालचाल नाहीं. हें पाहून रंगो बापूजी तांतडीनें त्याला भेटण्यास गेला. ही भेट कंपनी सरकार, सचीव आणि शिंदकर यांनीं फारच कुशलतेनें जमवून आणली. या प्रसंगांचें वर्णन आज ह्यात असलेले, बालब्रह्मचारी, आसन्नमरण स्थितींतलें रंगो बापुजींचें वृद्ध पुतणे वामनराव देशपांडें यांनीं आम्हाला प्रत्यक्ष माहितीनें कळविले आहे. या भेटीच्या प्रसंगीं शिंदकराच्या घरांत एका खोलींत गोऱ्या सोजीरांची एक पार्टी गुप्त आणून ठेविली होती.

शिंदकराच्या भेटीस रंगो बापुजी जातांच त्यांचे असें संभाषण झालें-

रंगोबा - कायरे, वेळ तर जवळ आली आणि तूं बिछान्यांत?

शिंदकर : (कण्हत कण्हत) काय करूं. हिंवतापानें जीव खाल्ला. होताहेत लोक रवाना. बरं पण कशी काय व्यवस्था लावलीस. कोणकोण राजेरजवाडे आपल्याला सामील झाले. उठावणीचे बातबेत कसे काय ठरले. ते तरी सांग बाबा मला.

(रंगो बापुजी खिशांतून कागद काढून सर्वांची नावें वाचून दाखवितो व इतर माहिती देतो.)

शिंद : वा! फान छान शिस्त लावलीस. (हुश्श हुश्श करीत) फार छान शिस्त लावलीस. सारखी अंगाची आग होत आहे. रंगोबा, या खोलीचा एवढा दरवाजा तरी उघड म्हणजे वारा तरी आंत येईल.

रंगोबा उठला आणि त्यानें कडी काढून दरवाजा उघडतांच गोऱ्या सोजीरांची पार्टी एकदम बाहेर पडली आणि त्यानें रंगो बापुजीला पकडले. कंपनीचें कारस्थान यशस्वी झाले. हातापायांत बेड्या पडून बंदीस्थ झालेला रंगो बापुजी शिंदकराला उद्देशून त्वेषानें म्हणाला, ''बुवा शिंदकर, हेंच का तुला साधायचे होते? अरे, मी मेल्याचें दु:ख नाही किंवा पकडला गेल्याचा खेद नाहीं. पण हरामखोरा, आज तूं मला फासावर चढवीत नसून माझ्या देशाचा गळा तूं कांपीत आहेस. ईश्वर तुझा सत्यानाश करील. आज तूं जातीच्या नांवाला काळीमा आणलास. तुझा निर्वंश होवो!'

रंगो बापुजीला कारीस पकडून रत्नागिरीच्या तुरुंगांत नेऊन ठेवलें. नंतर तेथून उचलून ग्वाल्हेरच्या तुरुंगांत नेऊन ठेवले. तेथून अचानक पहारेकऱ्यांच्या हातावर तुरी देऊन तो जो निसटून पळून गेला त्याचा आजपर्यंत कोणालाही ठावठिकाणा लागलेला नाही. अर्थात् त्याचा मृत्यु कोठे व कसा झाला याचीं कांहींच निश्चित माहिती मिळणें शक्य नाहीं. रंगो बापुजीला 'राजद्रोही' म्हणून बनिया कंपनीने फांशी दिला, असा लोकांचा समज आहे. खरें खोटें बनिया कंपनी जाणें किंवा आकाशांतला बाप जाणे! परंतु रंगो बापुजीचा अंत केव्हां कसा व कोठें झाला, हें एक अझूनपर्यंत गूढच आहे. तें कोणी उकलावें?

सिंदकराच्या कामगिरीबदल पंतसचीव व कंपनी सरकार यांच्याकडून अनेक गावें इनाम मिळालीं. ती अझून चालू आहेत.

बंडाचा मोड होण्यास इतर बाह्य कारणें बरीच आहेत. तथापि सर्व घटना शिस्तवार ठरविणारा सूत्रधार ऐनवेळीं दुरावल्यामुळें इतर पुढाऱ्यांच्या कार्यक्रमांत थोडासा गोंधळ उडून त्याचा परिणाम युद्धाच्या अपयशांत झाला असेही मानावे लागेल. दिल्लीच्या समरांगणावर लॉर्ड लेकनें मोठा विजय मिळविला. त्या युद्धांत हिंदी सैनिकांबरोबरच रंगो बापुजीचे दोघेही तरुण पुतणे मोठ्या करारानें लढले पण यशाचा वाटा कंपनीचा होता. लॉर्ड लेकाने जखमी किंवा मेलेले असा कांहीच भेद न पाहातां युद्धभूमीवर पडलेल्या सर्व सैनिकांची शिरें एका बाजूला व धडें दुसऱ्या बाजूला अशा मोठ्या राशी घालण्याचा धडाका सुरू केला. हे दोघेही तरूण जखमांनीं घायाळ होऊन समरांगणावर पडले होते. किंचित शुद्धीवर येऊन पाहतात तों वरील प्रकार. धाकटा वामनराव यानें मोठ्या सावधगिरीनें आपल्या भावाचा रांगत फरपटत शोध केला आणि दोघेही धडांच्या राशींत डोकीं दडवून प्रेतासारखे पडून राहिले. अशा स्थितींत ते दोन दिवस पडून होते. नंतर मध्यरात्रीच्या सामसुमीचा फायदा घेऊन ते दोघेहि तेथून निसटले व वेषांतरानें कोकणांत आले. तेव्हांपासून तों राणीसरकारचा जाहीर ॲमनेस्टीचा (माफीचा)

जाहीरनामा झळकेपर्यंत आतवण्याच्या जंगलांत कंदमुळें खाऊन रहात होते. नंतर ते प्रगट झाले. कांहीं दिवसांनीं त्या दोघा तरूण गुप्त्यांपैकी थोरल्याच्या लग्नाचा प्रश्न निघाला. त्यावेळीं त्यानें उत्तर दिले, ''अहो, जेथें आमच्या देशाचे लागत असलेलें लग्न दिल्लीस मोडलें तेथें माझ्या लग्नाची एवढी खटपट कशाला? पारतंत्र्यांत वंशवृद्धी करण्यापेक्षां आमच्या घराण्याची नकल झाली तर त्यांत वाईट काय?'' या तरुणानें लग्न केलें नाहीं. पुढें कांहीं वर्षांनी हा तरूण आसन्नमरण आजारी पडला असतां त्याचा धाकटा बंधु वामनराव गुप्ते यांनीं आजन्म ब्रह्मचर्यत्वाची आपल्या वडील बंधूच्या मृत्युशय्येवर शपथ घेतली, आणि ''आमचा हिंददेश कधी स्वतंत्र होईल काय'' अशा अपेक्षेंत धाकट्या भावाच्या प्रतिज्ञेचा आनंद मिश्र करून वडील भावानें प्राण सोडला. वामनराव आज अत्यंत वृद्ध स्थितींत हयात आहेत. डोळ्यानें दिसत नाहीं व कानांनीं ऐकूं येत नाहीं. तरी आपल्या कर्तबगार रंगो बापुजी चुलत्याबद्दल माहिती ते देऊं लागले म्हणजे डोळ्यांतून अश्रूंचा प्रवाह सारखा थबथब वहात असतांना ते इतके आवेषांत येतात कीं आसन्नमरणवृद्धांत सुद्धां मनाचे तारुण्य बेफाम चमकते. महाराष्ट्राच्या स्वराज्यासाठीं कायावाचामनें झगडून बदललेल्या परिस्थितींत आतां केवळ मृत्यूच्या भेटीची अपेक्षा करणाऱ्या या वृद्ध वीराला आमचे साष्टांग प्रणिपात असोत. महाराष्ट्रांत स्वराज्य नाहीं, हिंदुस्थान स्वतंत्र नाहीं, म्हणून स्वराज्यसेवक देशपांडे गुप्त्यांचा वंश निष्कारण पुढें जगूंच नये म्हणून आमरण ब्रह्मचर्याची शपथ घेणाऱ्या वामनरावांचा स्वार्थत्याग व आत्मयज्ञ आज अखिल भारताला प्रथमच जाहीर करण्याचा मान प्रबोधनाला मिळत आहे, हें एक प्रकारचें भाग्यच होय.

दीनदयाळा परमेश्वरा, आमच्या स्वराज्यनिष्ठ रंगो बापुजीचा अंत कसाहि झालेला असो. त्याच्या गळ्यांत इहलोकीच्या दुस्मानांचा फांस पडलेला असो अगर विश्वभक्षक काळाचा परिचित मृत्युफांस पडलेला असो, तो आतां तुझ्या दरबारांत कोठें तरी मुकाट्यानें एका बाजूला बसलेला असेल. तो फार भिडस्त आहे. छत्रपतीच्या वतीने वकीलीं करतांना तो दणदणाटाचें वक्तृत्व करील, पण देवा, स्वत:बद्दल 'मी अमूक' म्हणून कोणाजवळ चकार शब्दहि कधिं काढणार नाहीं. त्यानें महाराष्ट्राच्या हिन्दवी स्वराज्याची वकीली करण्यासाठीं सातासमुद्रांची दिक्कत बाळगिली नाहीं, उपासतापासाचीं पर्वा केली नाहीं, अपमानाचा बाण हृदयांत खोल घुसूं दिला नाहीं कीं भय मध्यान्हीच्या वणव्यांत कच खाऊन त्यानें हातचें कार्य सोडलें नाहीं, त्या आमच्या रंगोबाची वकीली कोणीतरी करून त्याची तुझ्या दिव्य चरणापर्यंत दाद लावली आहे काय? नसेल तर कोणी दाद लावली, तर देवा तूंच स्वत: ऊठ आणि शोध कर. कुठें तरी एखाद्या कोपऱ्यांत रंगोबा घुंगट मारून पडला असेल. काय करील? बिचाऱ्याची सारी हयात कष्टांत गेली. त्याच्या साऱ्या घराण्यानें स्वराज्यासाठी आपल्या सर्वस्वाचा होम केला. थकला बिचारा. निजला असेल कुठेंतरी तुझ्या न्यायी दरबारांत निवांतपणें. देवा, तुला जर आमच्या रंगोबाची ओळख पटत नसेल, तर दादजी नरस प्रभूची श्रीशिवरायांच्या मार्फत आधीं भेट घे. ते दोघे एकत्रच चर्चा करीत बसले असतील. दादजीबाबा रंगोबाला तेव्हांच हुडकून काढतील. पांचवी पिढी झाली म्हणून काय झालें? रक्ताला रक्त तेव्हांच ओळखतें. रंगोबा भेटतांच, देवा, त्याला तूं प्रेमानें मिठीच मारशील, अशी त्याची तपश्चर्या आहे. शिवबाच्या लाडक्या महाराष्ट्राकरितां, त्यांच्या हिन्दवी स्वराज्याकरितां, त्यांच्या भोंसले घराण्याच्या इभ्रती करितां, अखिल हिन्दुस्थानाकरितां आजन्ममरण देह कष्टविणाऱ्या रंगो बापुजींचें महत्त्व या नाठाळ दुनियेला जरी अझून कळलें नसेल, तरी भगवंता

चिडीमुंगीच्या पावलागणित फिरणारी तुझी न्यायी नजर रंगोबाच्या कर्मयोगाची बूज राखल्याशिवाय कशी राहील! देवा, पुरे झाली ती कौस्तुभ मण्याची आवड. दे फेंकून तो कौस्तुभमणी आणि ठेव त्याच्या जागीं हिंदमातेचा स्वराज्यभक्त कोहीनूर रंगो बापुजी गुप्ते प्रभुदेशपांडे.

रंगो बापुजीच्या आत्म्याला, त्या कायस्थप्रभु वीराला, महाराष्ट्राच्या स्वराज्यनिष्ठ देशपांड्याला साष्टांग प्रणिपात घालून, कौतुकानें थरथरणारी ही लेखणी तिसऱ्या प्रकरणाकडे वळवितों.

□□□

लेख

शंभर वर्षांपूर्वीचा महाराष्ट्र

(प्रकरण ३ रें.)

(१) शिवाजी महाराजांचे पहिले सुप्रसिद्ध बाळप्रभु चिटणीस.

(२) जिंजी प्रकरणांत प्रसिद्धीस आलेले स्वार्थत्यागी खंडोबा.

(३) छत्रपतीची जिंजींतून सुटका करण्यासाठीं बापाच्या जागीं कैद पत्करून आत्मयज्ञ करणारा इतिहास प्रसिद्ध बहिरोबा.

(४) मराठ्यांच्या इतिहासाचा मूळ पाया घालणाऱ्या बखरी लिहिणारे कलमबहादर मल्हार रामराव चिटणीस.

(५) प्रस्तुत कथानकांतील छत्रपति प्रतापसिंहाचे चिटणीस.

(६) छत्रपति प्रतापसिंहाबरोबर बनारसच्या तुरुंगात आत्मस्फूर्तीने जाणारा तरूण चिटणीस.

शिवाजी महाराजांच्या वेळीं जीं अनेक कायस्थ प्रभु घराणीं स्वराज्यसेवा करण्यास पुढें सरसावलीं, त्यांत प्रमुख घराणें म्हटलें म्हणजे 'चिटणीसांचे घराणे' हें होय. याची पूर्वपीठिका श्री. सरदेसाई येणेंप्रमाणें देतात : ''आबाजी हरी चित्रे मुजुमदार नांवाचा एक प्रभु गृहस्थ जंजिऱ्याचे सीदीजवळ दिवाण होता. त्याजवर हबशी सरकारची इतराजी होऊन त्याला व त्याचे भावाला हबशानें ठार मारले; आणि आबाजीचे बायका-मुलांस मस्कत येथें नेऊन गुलाम म्हणून विकण्याचा हुकूम केला. आबाजीची बायको गुलबाई ही धूर्त होती. तिनें खलाशांचें मन वळविलें तेव्हां मस्कत येथें न नेतां त्यांनीं तिला राजापूर येथें आणून सोडलें. राजापूर येथें गुलबाईचा भाऊ विसाजी शंकर हा मोठा व्यापारी होता. त्यानें ही आपली बहीण आहे अशी ओळख न देतां खलाशांपासून त्या मंडळीस विकत घेतलें. बाळाजी हा गुलबाईचा वडील मुलगा होय. चिमणाजी व श्यामजी असे आणखी त्यास दोन भाऊ होते. विसाजीनें या तिघां मुलांचा विद्याभ्यास चांगला करविला. बाळाजी मोठा झाल्यावर हबशीं सरकारच्या भीतीमुळें त्यास आपल्या नावानें प्रकट होण्याची शक्ति नव्हती. शिवाजी नांवाचा कोणी पराक्रमी पुरुष यवनांच्या हातांतून हिंदूंची सुटका करण्यास अवतरला आहे, ही खबर बाळाजीस लागतांच त्यास अत्यानंद झाला. त्या वेळेस तो राजापुरांतील कसबेद्राराच्या हाताखालीं कारकुनीचें काम करीत असे. संधि साधून आपल्या दैन्यावस्थेचें एक पत्र त्याने शिवाजीस लिहिलें. पुढें शिवाजी राजापुरास आला, त्यावेळेस पकडलेल्या इतर मंडळींमध्यें बाळाजी सांपडला. बाळाजीची चौकशी चालत असतां, त्याच्या आईनें धांवत येऊन शिवाजीचे पायांवर लोटांगण घातलें; आणि आपली सर्व हकीकत निवेदन केली. त्याच वेळेस शिवाजीने त्या कुटुंबास आपल्या पदरीं ठेविलें, आणि बाळाजीची हुशारी पाहून त्यास आपल्या चिटणीशीचें काम सांगितलें. (सन १६४८) यापुढें शिवाजीचा चिटणीस बाळाजी आवजी हा शिवाजीच्या हरएक व्यवहारांत नेहमी हजर असे. (पृ. २०४) कोणत्याहि स्थितींत असतां स्वामीभक्तींत अंतर पडूं द्यावयाचें नाहीं, हा जो प्रभूंच्या आंगचा मोठा गुण, तो बाळाजीच्या अंगी परिपूर्ण असे. ... ह्या चिटणीस घराण्याचे महाराष्ट्रावर फारच उपकार आहेत. आज जे राष्ट्रेतिहास उपलब्ध आहेत, ते सर्व चिटणीस घराण्यानें लिहिलेले आहेत. राष्ट्रेतिहास लिहून ठेवण्याची महत्त्वाची कामगिरी दुसऱ्या कोणी बजावलेली नाहीं, हें ध्यानांत ठेविलें म्हणजे सर्वांनी प्रभु जातीचे हे उपकार स्मरले पाहिजेत.'' (मराठी रियासत पृ. ५५०)

दादजी नरसे प्रभूच्या घराण्याप्रमाणेच शिवशाहीच्या आदीपासून अंतापर्यंत एकनिष्ठपणे हिंदवी स्वराज्याची सेवा या चिटणीस घराण्यानें कसकशी बजावली आहे, तें इतिहासांत नमूद आहे. त्याची वाटाघाट करण्याचें हे स्थळ नव्हे. चिटणीस घराण्यावर भिक्षुकशाहीची पहिल्यापासूनच परशुरामी मेहरबानी फार विशेषत: शिवाजी महाराजांना वेदोक्त राज्याभिषेक करविण्याच्या कामीं बाळाजी आवजीनें भिक्षुकशाही कारस्थानांचीं पेकाटें मोडून, क्षत्रियांच्या अस्तित्वसिद्धीची जी विलक्षण चळवळ यशस्वी केली, तीमुळें तर सारा ब्राह्मण समाज कायस्थ प्रभूंचा कायमचा हाडवैरी बनला. हें हाडवैर अझूनपर्यंत

धुमसत आहे. प्रतापसिंह छत्रपतीच्या कारकीर्दीत ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद भयंकर पेटला असता, त्यांत बळवंतराव मल्हार चिटणीसांनी पुढाकार घेऊन अखिल ब्राह्मणेतरांच्या वतीनें भिक्षुकशाहीशीं निकराचा झगडा चालविला आणि धार्मिक, सामाजिक क्षेत्रांत भिक्षुकशाहीशीं असहकारिता पुकारून ब्राह्मणेतरांचें निर्भेळ स्वातंत्र्य प्रथमत: जाहीर केलें. या वेळच्या भिक्षुकशाही बण्डाच्या धामधुमीचा विस्तृत इतिहास आम्ही ''ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास'' या ग्रंथांत अस्सल कागद पत्रांसह प्रसिद्ध केला आहे, तो वाचकांनी अवश्य पहावा, म्हणजे बळवंतराव चिटणीसाच्या कामगिरीची त्यांना चांगली कल्पना होईल. तथापि थोडेसे उद्गार येथें नमूद करतों. बळवंराव आपल्या एका जाहीर पत्रांत म्हणतात ''(ब्राह्मण लोक) आमची गरज सोडेन आमचीच फजिती आरंभून दिकार (धि:कार) करितात, त्या अर्थी आम्हासही त्यांची गरज नाहीं. केले हे व आणखी पाहिजे ते ब्राह्मणाशिवाय आपले ज्ञातींत मुखत्यारपणें पाहिजे ते चालवूं... आमचे ज्ञातींत ब्राह्मणांनी दखल करणें गरज नाही. आम्हास मात्र म्हणतात हे नवीन करतात. ब्राह्मण आपले कर्म सोडून दुसरियाचे करितात. तीन वर्णाची कर्मे आपण आपला धर्म सोडून करितात. क्षत्रियाचे कर्म शस्त्रधारण वगैरे करितात. व आम्हास लेखनवृत्ती भार्गव रामानी शस्त्र सोडवून उपजीविकेस दिले ते आपण चालवून आमची उपजीविका बुडवीत चालले. वैशाची कार्मे सेतकी उदीम वाणीपणाची दुकानें हेच घालून व व्याज बटा वगैरे ते आपण करितात व शूद्राचे कर्मसुद्धा करून सिपायांत शुद्रासारखी पागोटी बांधून प्यादेगिरी वगैरे नीच कर्मे पत्करून करावयाची. कोणास उपजीविकेस कुटुंब संरक्षणास जागा न ठेविता आपण करावे व जमीन वगैरे इनाम घेतें समयी भट म्हणवून दानपत्र वंशपरंपरेचे करून घ्यावे. रोजगार व्यापाराचा करावा. भट म्हटले असता रागास यावे. पंत व दरखदार म्हणविले पाहिजे. तीन ज्ञाती व इतर सुद्धां भिकेस लावून अतिनीच कसबिणीस लावण्या सिकवून मागे सारंग्या वाजवाव्या गावे. अशा अनेक तऱ्हा काय म्हणून उच्चाराव्या.'' बळवंतराव चिटणीसानीं भिक्षुकशाहीवर कडकडीत बहिष्कार घालून ज्ञातिधर्मांत ज्याचे ते मुख्यत्यार अशी चोहीकडे द्वाही फिरवून मठाभिक्षुकांच्या मध्यस्तीशिवाय विवाह उपनयन अंत्येष्ठ्यादि सर्व धार्मिक विधि स्वत: करण्याची सुरुवात केली व अग्निहोत्रादि दीक्षाहि घेतली. त्या वेळीं खुद्द कायस्थ प्रभु समाजांत शेंकडों मुंजी व लग्ने कायस्थ पुरोहितांनीं लावल्याचे दाखले जिवंत आहेत; तरीहि सध्यां जिवंत असलेल्या कोणत्याहि कायस्थाचे आईबाप भटाच्या हातलावणीशिवाय स्वर्गाला पोहचत नाहींत किंवा त्यांची लग्नें मुंजी वगैरे विधि भटजीच्या पायाच्या घाणेरड्या पाण्याचे प्राशन केल्याशिवाय घसघशीत पार पडत नाहींत. असलीं हीं भटभिक्षुकांच्या पायातलीं पायतणें बनलेली कायस्थें 'आम्ही प्रगमनशील' म्हणून उलट वाचाळपंचविशी करायला तयारच! न्हावी धोबी समाजसुद्धां या बाबतींत स्वतंत्र मुख्यत्यार झाले, पण हा 'प्रगमनशील' कायस्थ प्रभु समाज अझून भटभिक्षुकांच्या चरणीं लोळपाटणी घेतोच आहे! धि:क् धि:क् तयांचें जिणें!!

बाळाजीपंत नातूचें कारस्थान शिजून तयार झालें. परंतु बळवंतराव चिटणीसाचा कांटा दूर केल्याशिवाय त्याची सिद्धी शक्य नव्हती. बळवंतराव जर आपल्या चिटणीशीवर चुकून माकून कायम रहाता, तर त्याच्या चिटणीशी लेखणीच्या घोड्यांनीं स्वराज्यद्रोही नातूकंपूच्या घरादारांवर गाढवांचे नांगर फिरवून, राष्ट्रद्रोहाच्या पापाचे भरपूर माप त्याच्या पदरांत बांधलें असते. पण चित्पावनी काव्याचा पोंच जबरदस्त. बळवंतरावचा चिटणीशी पराक्रम नातु जाणून होता. चिटणीस कायम असेपर्यंत

छत्रपतीचा रोमहि वांकडा होणार नाहीं, ही त्याची पुरी खात्री होती. चिटणीशी लेखणीपुढें परशुरामाच्या वरप्रसादाची पुण्याई वांझोटी ठरणार हा अनुभव त्याच्या पूर्ण प्रचीतीचा होता. म्हणून हा चिटणीसी कांटा उपटण्यासाठीं नातूनें रेसिडंट ओव्हन्सकडून बळवंतराव चिटणीसाला अचानक पकडून कैद केलें. याची हकिकत वाचकांनीं खुद्द चिटणीसांच्याच तोंडून ऐकावी. ''साताऱ्यास रेसिडंट ओविन्स साहेब यानी आम्हास बाळाजीपंत किबे व भालदार पाठवून कैद करून तारीख १ ऑगस्ट सन १८३७ इसवी आषाढ वद्य ३० रोजीं आपले बंगल्याजवळ वेगळा बंगला तेथें नेऊन ठेविलें व पाहरा ठेविला. फार इजा केली कीं एक शिष्या (खितमतगार) व एक चाकरीचा माणुस जवळ ठेविला. त्यासी बोलूं नये. ती माणसे झाड्यास व आंधोळीस गेली असतां त्या बराबर शिपायांनी जाऊन कोणासहि बोलूं देऊं नये. व घरांतून खाना अन्न व कपडे, येतील ते उलगडून पहावे व रात्रींस दर तासास पाहऱ्याचे वेळेस आम्ही शाबुद आहों नाहीं हें तोंडावरील पांघरून उघडून पहावे. असे करीत दोन महिनेपर्यंत सातारचे बंगल्यांत ठेविले. बेवीस दिवसपर्यंत आमची काहीं भेट व बोलणे विचारणे केले नाहीं. नंतर तेविसावे रोजी बोलावून नेले.'' रेसिडंट ओव्हान्सनें बनिया कंपनीच्या सामर्थ्याचा धाक घालून चिटणीसाला उलट सुलट अनेक प्रश्न विचारून, छत्रपतीवरील राजद्रोहाच्या (?) नातुशाही किटाळाला अनुकूल अशी जबानीं त्याच्याकडून काढण्याचा पुष्कळ यत्न केला. लांचलूचपतीची लालुच दाखविली. सर्व काहीं केलें. परंतु व्यर्थ मुळांतच बाजार खोटा, तेथें चिटणीस खऱ्याचें खोटें करण्याइतका चित्पावन थोडाच होता? त्यानें स्पष्टस्पष्ट उत्तरें देऊन छत्रपतीवरील आक्षेपांचे खंडन केलें व नातुकारस्थानाचें वाजवी स्वरूप ओव्हान्सपुढें निर्भीडपणें मांडलें. ओव्हन्सच्या दमधाटीला उत्तर देतांना बळवंतरावानें काढलेले उद्गार त्याच्या चिटणीस घराण्याच्या लौकिकास साजेसेच होते. ते म्हणाले ''वास्तवीक असेल ते जबाब करूं. केवळ आपले कायद्यासाठीं लबाड बोलून दुसऱ्याचें घरावर आग ठेवणें हें कधीच व्हावयाचें नाहीं. आम्ही पुस्त दरपुस्त सात पिढ्याचे नोकर मातबर आब्रूचे आहोत. केली ही चाकरी दोनी सरकारचे नजरे समोर व पूर्वी वडीलांनीं सेवा बहुत केली. त्याचे बक्षीस व कल्याण हल्लीं बेआब होतो हेच मिळत आहे- खावंदाकरितां होते, विलाज काय!... लोभामुळें शाई दिवाले हजारो सरकारमेहेरबानीकरितां उभे राहतील, आम्हास मजकूर माहीत नाहीं. आमचा गुन्हा फंदकितुर दस्तऐवजी मुद्द्यानिशी आम्हावर लागू जाहल्यास तोफेची बती आपले हाते अगर दारूचा बदरा आम्ही घेऊं. चिटणीसांना पुन्हा एकदां ओव्हन्सनें बोलावून नेले. त्यावेळीं बाळाजीपंत नातूनें पाचपन्नास जबानीपत्रकें तयार करून त्यांवर चिटणीसानें मुकाट्यानें कबुलीजबाबाच्या सह्या कराव्या; अशी व्यवस्था केली होती. परंतु चिटणीस नातूच्या बापाचें बारसें खाल्लेला. त्याने जबानीपत्रकांतील आक्षेपार्ह मजकुराचा खोटेपणा सिद्ध करणारे दगलबाज याचे मनांत असें होतें कीं आपण सातारचे राज्याचे मुख्य दिवाण व्हावे आणि महाराजा छत्रपतिपाशी या नातूनी दिवाणगिरी मागितली. परंतु नातूस दिवाणगिरी दिली नाहीं; व याजपासून चाकरी घेणें हेहि कबूल केलें नाहीं. त्याजवरून महाराज छत्रपतिवीसी या नातूचे चित्तांत मोठा राग येऊन फार देशाची तरकटी खोलखोल कामें केली. आणखी ऐका. हा दुषमानी करण्यास कवि विसरावयाचा नाहीं असें प्रसिद्ध असतां, यासच तरकटाची सरदारी मुंबई गवरभेंटानी दिली. परंतु पहा, महाराज छत्रपति सत्य आणि पुण्यवान महान समर्थ कीर्तीमान पुरुष जगप्रख्यात असतां हा नातु दुष्ट घातकी दुराग्रही यांनीं हीं सारीं कामें द्वेषानी केला. पहा हो, तरकट करणारे दुष्ट मनुष्यांचा जमाव करून

नातू दगलबाज हे मुखत्यार करून या नातूनी चहाड्या चुगल्या सांगून ज्या ज्या कल्पना चित्तांत योजून समजावीत गेला. ते ऐकोन घेऊन, मुंबई गवरमेंटानी तरकटास मदत केली व या लबाड व खोटे तरकटी लोकांस लांच रुपये इनामे बक्षिसीसे दिली. परंतु हे देण्यास मुंबई गवरमेंट किती धर्मनीतीनें उदार किंवा अनीतीनें किती तरकटी मूर्ख उदार ते तुम्हींच पहा.''

बाळाजीपंत नातूबद्दल माहितीचा जो पुरावा रंगो बापुजीनें ठिकठिकाणीं खासगी पत्रें लंडनहून पाठवून मिळविला होता, त्यांत आबाजी हरी शहाणे वांईकर गृहस्थाचें ता. ११ एप्रील सन १८४२ चें एक पत्र आहे. खंडेराव रस्त्यांच्या शागीर्दगिरींतून नातू कसा वाढला, नागो देवरावचा व त्याचा संबंध कसा काय होता व बाजीरावींत त्यांच्या काय काय धामधुमी झाल्याचें तुम्हाला माहीत आहे, अशी रंगो बापुजीनें पृच्छा केली होती. त्यावर रा. शहाणे उत्तर देतात कीं ''बाजीरावीच्यावेळीं मी लहान होतो. म्हणून वाडवडील बोलतात तेंच कळवितो. सन १८१९ मध्ये बाळाजीपंत नातूनें आपली मुलगी निळकंठशास्त्री थत्त्याच्या मुलाला दिली. त्यावेळीं नातु व नागो देवराव यांचे फार सूत होते. नागो देवराव सन १८३७ त मरेपर्यंत दोघांची मैत्री होती. एक गोष्ट मात्र मला पक्की स्मरतें. बाळाजीपंत नातूनें एकदां बाईचे बरेच ब्राह्मण जमवून, तो त्यांना रहिमतपुरास घेऊन गेला. त्यावेळीं मालकम साहेब धारवाडास जाण्यासाठीं तेथें छावणी ठोकून होता. नातूच्या पुढारपणाखालीं त्या शेकडों ब्राह्मणांनीं छावणी भोवतीं जमून मोठा गिल्ला केला व प्रभुजातीच्या विरुद्ध नाहीं नाहीं त्या कागाळ्या साहेबाच्या कानावर घातल्या. त्यांत नागो देवरावहि होता. कित्येक दिवसापर्यंत हा ब्राह्मणांचा जमाव मालकम साहेबाच्या छावणीबरोबर हिंडत पाठलाग करीत होता. अखेर साहेबानें कंटाळून त्यांना जबाब दिला 'कीं तुमच्या व इतर हिंदूंच्या धार्मिक तंटेबखेड्यांत पडण्याची आम्हांला जरूर नाहीं.' गोवे सरकाराशीं राजद्रोही कट छत्रपतीनीं केला, अशी बाळाजीपंत नातूच्या चिथावणीवरून, नागो देवरावनें धारवाडच्या सुभ्याकडे जी तक्रार केली होती, त्याचा कोर्टांत उलटसुलट शहानिशा व तलास होऊन जज्जानें निकाल दिला कीं "After making the necessary inquiries into the matter, the judge dismissed the case, on the ground of the discrepancies and improbable nature of the evidence attempted to be proved against His Highness. Which indueed that gentleman (the Judge)to look upon the ease as an infamous attempt of the Brahmans to criminate the Raja.'

(**भावार्थ** : राजाविरुद्ध आणलेले पुरावे असंभाव्य, भुसभुशीत व अविश्वासनीय असे सिद्ध झाल्यामुळें जज्जानें खटला काढून टाकला आणि एकंदर प्रकरणाचा विचार करून जज्जानें निर्णय काढला की राजाला निष्कारण पेचांत आणण्यासाठीं ब्राह्मणांनी उभारलेला हा सर्व हरामखोर कट होय.) गोविंद महादेव साने वाईकर यानें बनारसेहून ता. २१ एप्रील १८४२ रोजीं लंडनास रंगो बापुजीला पत्र पाठविलें त्यांतहि हा सर्व मजकूर असून, विशेष माहिती अशी दिली आहे कीं 'पूर्वी बाळाजीपंत नातू आमचे चुलते गणेश नारायण साने यांचे शागीर्द होते, व खंडेराव रास्त्यांकडे काकांचे निरोप नेणे आणणेचे हारकारूचें काम करीत असत.''

नातूनें छत्रपति व बनिया कंपनी यांत वितुष्ट पाडण्याचें यश मिळविल्यावर, शेवटचा चित्पावनी बार उडविण्यापूर्वी, मोठ्या माणुसकीचे एक काम केलें. ता. २८ ऑगस्ट सन १८३८ रोजीं भास्करपंत मराठे नांवाच्या एका 'राष्ट्रीय' दूताला छत्रपतीकडे पाठवून असा सवाल टाकला कीं 'जर महाराज सालीना

बारा हजार रुपयांची जहागीर बाळाजीपंत नातूला वंशपरंपरा लिहून देत असतील, तर कंपनी सरकारच्या मनांतला किंतु काढून दोघांची दिलजमायी नातू करून देण्यास तयार आहे.'' या सवालाला छत्रपति प्रतापसिंह महाराजांनी शेण भरल्या खेटराला आहेर केला, हें सांगणे नकोच. एकंदरीत बाळाजीपंत नातू थोर मनाचे, यांत संशय नाही. या पाजी हरामखोरानें छत्रपतिविरुद्ध जीं चार पांच कारस्थानें उभी केली त्यांतल्या प्रमुख हस्तकांची वर्गवारी ४६ ब्राह्मण व २२ ब्राह्मणेतर अशी लागते. या कारस्थानांचा उल्लेख पुढें येणार असल्यामुळे, बाळाजीपंत नातूच्या या काळ्याकुट्ट राष्ट्रद्रोही इतिहासाला बंद ठेवलेला बरा.

३) यशवंतराव राजे शिर्के : क्षत्रिय मराठा समाजांत समशेरीचा पराक्रम त्रिलोकविश्रुत आहे; पण समशेर बहाद्दरीच्या जोडीनें कलमबहाद्दरी गाजविणारा मराठा बच्चा यशवंतराव शिर्क्याशिवाय दुसरा आम्हाला आढळांत नाही. हे सुप्रसिद्ध 'शिरकाण' केलेल्या शिर्के घराण्यांतले असून, यांच्या भाऊबंदकीचे तंटे बखेडे फारच असत. या बखेड्यांच्यापायीं एका घराण्याची अनेक घराणीं झाली व त्यांचा परस्पर संबंध अहिनकुला इतकाच प्रेमाचा असे. यशवंतराव फार टापटीपीचा सरळ परंतु संशयखोर मनाचा गृहस्थ दिसतो. यानें लिहून ठेवलेली स्मरणवही अनेक दृष्टीनीं फार महत्त्वाची आहे. त्यांचे मोडी अक्षर वळणदार शुद्ध आणि प्रेक्षणीय आहे. लिहिण्याची सफाई, शोध घालण्याची पद्धत व बारीक-सारीक मजकूर मनमोकळ्या दिलानें तपशीलवार लिहून ठेवण्याची दक्षता प्रशंसनीय आहे. शिर्क्यांनीं आपल्या स्मरणवहींत भाऊ बंदकीचीं अनेक त्रांगडी, त्यांचा पूर्वापार संबंध व त्यांचे परिणाम मुद्देसूद तारीख मितिवार लिहून ठेवले आहेत. या भाऊबंदकीची रडकथा लिहीत असतानांच, छत्रपति प्रतापसिंहानें त्याला विलायतेला जाण्यास सांगितलें. अर्थात् भाऊबंदकीचें पुराण तसेच राहून पुढें विलायत-पुराण सुरू झाले. हें विलायत-पुराणसुद्धां यशवंतरावनें मोठें मार्मिक व शोधक दृष्टीनें लिहून ठेवले आहे. त्यांतील विलायतची माहिती आम्ही आमच्या प्रबोधन पत्रांत छापलेली पहावी. त्यावरून आणि या प्रकरणांतील काहीं अस्सल उताऱ्यांवरून यशवंतरावाची टापटीप व स्वभावप्रवृत्ति चांगली व्यक्त होते.

शिर्क्यांची भाऊबंदकी म्हणजे एक मोठे भयंकर प्रकरणच. त्यात फसवाफसवी, ठोकाठोकी, मारामारी, जाळपोळ, लुटालूट, खून व रक्तपांत या सर्वांचा समावेश झालेला दिसतो. याचा परिणाम यशवंतरावाच्या स्वभावावर विपरीत होऊन, तो जात्या धाडसी व उमदा असूनहि, अत्यंत चिडचिड्या, संशयी व कोणावर सहसा विश्वास ठेविनासा झाला. जिकडे तिकडे त्याला विश्वासघात दिसत असल्यामुळें, त्याच्याबरोबर काम करणाऱ्यांवर त्यानें संशयखोर वृत्तीनें नाना प्रकारचे आरोप घेण्यास कमी केलेले नाही. प्रत्येक गोष्ट मी स्वत: करीन. तो अमकातमका माणूस अमूक काम करीलच कशावरून. अमकी रकम त्याला तुम्ही दिली कीं स्वत:च हबकली, अशा प्रकारच्या अनंत संशयांनीं यशवंतराव नेहमींच व्यग्र असे. यामुळें छत्रपतीनीं त्याची रवानगी विलायतेस जाण्याकरितां जून १८३६ मध्यें केली. तरी १९ मार्च १८३९ पर्यंत त्याचा पाय मुंबईहून निघाला नाहीं. या मुदतींत सुद्धां त्याच्या भाऊबंदकीची लफडी चालूं होतीच व अनेक वेळां तो घरी व साताऱ्यास परत येई व मुहूर्त पाहून मुंबईला प्रमाण करी.

नातूप्रकरणाची वावटळ उठून बनिया कंपनीचे डोळे धुंद झाल्यावर छत्रपति प्रतापसिंहांनीं विलायतेला प्रतिनिधि पाठविण्याचें ठरविलें. या पुढील हकीकत यशवंतराव अशी सांगतात. ''नंतर

सरकारानी सांगितलें की तुमची व आणखी मंडळीची नेमणूक विलायतेस जाण्याची केली आहे. तर तुम्ही येथून निघोन मुंबईस कागदपत्रसुधा घेऊन जावे आणि तेथे मीर आफजल आली मुसलमान विलायतेस जाऊन आलाला माहीतगार आहे. त्याची भेट घेऊन तुमचे त्याचे विच्यारे पुढे विलायतेस जाण्याचा बेत ठरवावा. म्हणोन उभयेता बंधु सरकारांनी सर्वत्र मंडळी जवल असता आज्ञा केली व विलायतेस पाठवावयाचे काय कारण ते कागदपत्र तयार जाहले होते ते दाखविले आणि जेष्टमासी वाा १३ शके १७५८ व सन १८३६ जून सुक्रवार रोजी मुहूर्त पाहून निघते समई जी मंडळी निघणार ती रंगो बापुजी व हणमंतराव दलवी कोकणात बिऱ्हेर येथे राहणार याच्या आमच्या समक्षता केल्या व उभयेता बंधु सरकार श्री देवीपासी येऊन उभे राहून त्या कागदाचा रुमाल श्रीचे पुढे ठेविला आणि आम्हास उचलावयास सांगितला कीं कोणतीहि प्रर्तणा करूं नये. श्रीस स्मरोन वागावे. म्हणोन शफती घेतल्यादाखल केले. नंतर विडे सरकारानी उभयतांनी देऊन ते कागदपत्र व खर्चास सुधा मुंबईकडे रवानगी केली व वस्त्रेहि आधले रोजीच दिल्ही होती. विलायतेस बोलणार पाठवावयाचे कारण की पेशजीचे तहनाम्याचे वहिवाटीस फरक इंग्रजी सरकारचे कामगारानी आणिला साा त्याचा बंदोबस्त विलायतेहून करावयाचा म्हणोन.'' यशवंतराव मुंबईस आल्यावर जहाज मिळण्याची वगैरे व्यवस्था लवकर लागे ना. त्यावेळीं 'पी. ॲन्ड. ओ.'ची व्यवस्था नसल्यामुळें कोणातरी व्यापाऱ्याच्या सवलतीनें भरंसाट किंमत देऊन जहाज प्रवासापुरतें विकत घ्यावें लागत असे. इतर बरोबरची मंडळी जहाजासाठीं ज्या खटपटी करीत, त्यावर यशवंतरावचा विश्वास बसत नसे. कोठें थोडी चिरिमिरी वाटली कीं हा म्हणे ही पैशाची उधळपट्टी. सर्व गोष्टी सरळ घडून याव्या, त्यांत आंत बाहेर उधत गुप्त कांही नसावें, ही त्याची इच्छा. परिस्थितीप्रमाणें बद्दल करण्याची वृत्ति नाहीं. सगळा मार्ग सरधोपट. त्यामुळें रंगो बापुजी व भगवंराव विठ्ठल वगैरे मंडळी कंटाळून गेली. प्रत्येक वेळेला संशय व बेविश्वास. असें चाललें असतां, यशवंतराव अनेक वेळां मुंबईहून सातारा, साताऱ्याहून सिंदास, सिंदाहून मुंबईस, अशा येरझारा घालीत बसला. इकडें पहावें तों नातूप्रकरणाला चांगला कढ येऊन तें अनेक बटाट्यांना शिजवूं लागलें. पहिल्या धडाक्याला ''गोविंदराव फडणीस दिवाण याजवर रसिदंटानी फितुराचे तुफान विलायतेस जाणारे निघाले साा उभे करून शके १७५८ भाद्रपद वाा १२ रोजी बोलावून नेऊन कापात कैद करून ठेविले.''

('उभयता' हा शब्द छत्रपति प्रतापसिंह व आप्पासाहेब भोसला यांना उद्देशून आहे. पण दुर्दैव पहा कीं हाच आप्पा भोसला अखेर छत्रपतीच्या विरुद्ध जाऊन नातूच्या मार्फत बनिया कंपनीला सामील झाला.)

सर्वत्र आणखीहि धरपकड सुरूं असल्यामुळें छत्रपतींनीं ''तुम्ही पुणीयास जाऊन तेथें स्वस्त राहावें'' असें यशवंतरावास सांगितलें. ''म्हणोन सातारियाहून फालगुण मासी शके १७५८ या साली निघोन पुणीयात येऊन च्यार पाच महिने राहिलो.'' त्यांवर ''महाराजाकडून बोलावणे आले की जलद सातारियास येणें. त्यावरून निघोन आशाढ वाा ११ शके १७५९ या रोजी सातारियास पोहचलो. सातारियास पोहचतांच माहाराज सरकारची भेट घेतली. तेव्हां सरकार बोलले कीं ''आमचे दुस्मानदार लोकांनीं आमची व कुंपणी सरकारची तेड हाकनाहक दिवसेंदिवस फार वाढविली. त्याविसी डाकतर मिलन बोलण्यांत घातला परंतु त्याच्यानें कांही होत नाहीं व दुसरीहि पुरकल मेहनत त्याची आमची सफाई होण्याविसी करीत आहो. परंतु इंग्रजी सरकारातून गोविंदराव धरल्यापासून आमचेकडील

यादीपत्राचा जबाव कांहीच येत नाहीं. तेणेकरून पुढे कोणते वेलेस काय होईल याचा नेम लागत नाही. यास्तव... तुम्ही विलायसेस निघोन जाण्याचे केल्यास आम्हास पुढील कामाचा भरवसा वाटेल.'' पुन्हा आणाशपथा, प्रतिज्ञा, सुमुहूर्त वगैरे होऊन शिर्के मुंबईस आला. रंगो बापुजी व भगवंतराव विठ्ठल यांनीं खटपटी करून एका उलमाराला मथवून 'जॉर्ज कुबेर' नामक एक फ्रेंच जहाज ठरविलें. ''त्याची तारीख माघ अखेरीस फेब्रुवारी महिन्यांत निघावयाची होती ती आम्हास उलमार याणें सांगितली. तेव्हां इकडे आमचाहि सरंजाम वगैरे तयारीं बहुतेक आटपली होती व दुभाशी जवल पाहिजे म्हणोन पेशजी माहाराजानी नरसिंगराव मुनसी पाठविला होता तो चांगला नहुता. म्हणोन व त्याचे गुण नीट नसोन त्याचे मनांत जावयाचे नहुते. साा परत गेला होता. त्याचे बद्दल फिरंगी करस्ताव नाव पेट्रो लोरेस देमोत यास दरमहा करून ठेविला.'' जहाज निघावयाचे वेळेस उतारुंच्या यादींत हिंदूंची नावें आढळल्यामुळें बनिया कंपनीची सरकारी चौकशी सुरूं झाली. यशवंतराव, भगवंतराव वगैरे मंडळींच्या जाबजबान्या घेण्यांत आल्या. त्यांची रोजच्या रोज तपासणीसाठी तांगड लागली आणि सातारच्या रेसिडंटाकडे चौकशीचे खलीते रवाना झाले. अखेर जहाजाच्या कप्तानानें ठरल्या तारखेपेक्षां पांच सहा अधिक दिवस वाट पाहून, यांचे सामान उतरून, जहाज हांकारून निघून गेला, आणि भरलेला पांच हजार रुपयांचा नोर पाण्यांत गेला.

या सर्व भानगडीच्या बरोबरीनेंच शिर्क्यांची भाऊबंदकीचीं खट्याळ लफडीं सुरू होतीच. त्यामुळें वडिलाच्या पत्राप्रमाणें यशवंतराव पुन्हा एकदां घरीं परत आले. ''आमचे चौकशीबद्दलचे लिहिणे मुंबईहून सातारियास गेल्यावर महाराजास रसिदंट याणी कलविले.'' त्याचा जबाब महाराजांनीं दिला कीं ''आमचेवर दुस्मानानी दुस्मानी करून इंग्रजी सरकारांत गैर समजाविले. त्यावरून इंग्रजी सरकारासी आम्ही बोलत असता व यादीपत्र पाठवीत असता त्याचा जाबच आज च्यार वर्षे येत नाही. सा यशवंतराव राजे सीर्के व भगवंतराव विठल व चिटकोजीराव सुर्वे हे विलायतेस बोलण्यास व आजपर्यंत जो जाहला मजकूर तो इंग्रजी सरकारास कलवण्यास विलायतेस जाण्याविसी सांगितले आहे.'' त्यावर बनिया कंपनीच्या अधिकाऱ्यांचें खलबत होऊन यशवंतरावाला सेक्रेटरी मि. बैट यानें समक्ष बोलावून सांगितलें की ''तुम्हांस विलायतेस जाण्यास गौरमेंटचा आटकाव नाही. परंतु गौरमेंटचे सल्याशिवाय तुम्ही विलायतेस गेल्यास तेथे तुम्हास वकील असे म्हणणार नाहीत व जाणे तर इंग्रजी जाहज करून जावे, याप्रमाणे तुम्हास कलवावयास मजला गौरमेंटचा हुकूम जाहला.'' सेक्रेटरीच्या या त्रोटक हुकमांतील वाक्यरचना व धोरणी डांवपेच वाचकांनी किंचित काळजीपूर्वक विचारांत घेतल्यास, इंग्रजी डिप्लोमसी (राजकारणी मुत्सदपणा)चे बीज किती जुनाट व खोलवर रुजलेलें आहे, याची त्यांना कल्पना होईल. असो! एनकेन प्रकारेण बनिया कंपनीच्या नोकरशाहीच्या कायदेबाज गुंतागुंतीच्या गाठी सोडून यशवंतराव शिर्के व भगवंतराव विठ्ठल प्रभृति मंडळींचे डेप्युटेशन ता. १९ मार्च १८३९ रोजी मुंबईहून रिलायन्स जहाज नं. ४७१५ यांतून निघाले तें केप ऑफ गुड होपच्या मार्गानें लंडनला ता. १० आगष्ट १८३९ रोजी म्हणजे १४४ दिवसांनीं येऊन पोहचलें.

(या प्रवासाची मनोरंजक हकिकत आम्ही आमच्या प्रबोधन पाक्षिकाच्या १९ व्या अंकात (पृ. १४६-१४७) वर प्रसिद्ध केलेली आहे ती पहावी.)

यशवंतराव लंडनला आल्यावर त्यानें सर चार्लस फोर्ब्स प्रभुति सज्जन इंग्रज गृहस्थांच्या मदतीने सातारा

प्रकरण बनिया कंपनीच्या डैरेक्टर बोर्डापुढें मांडण्याची तजवीज चालविली. यासाठीं अनेक दुभाष्ये व भाषांतर कार नोकरीस ठेवून मराठी भाषेंतील कागदपत्रांचे इंग्रजी तरजुमे करण्याचें काम सुरू झालें. आमच्या डेप्युटेशनवाल्यांना तर यसफ्यसचा गंधहि नाहीं. त्यामुळें त्यांच्या अडचणी निष्कारण फुगत चालल्या. त्यांत यशवंतराव म्हणजे उघडाउघड सीधा आदमी. त्याची समजूत कीं एकदां एक मुद्देसूद पुराव्यांचे अपील डैरेक्टरांच्या बोडक्यावर आदळलें कीं झालें; पाण्याच्या तोटीप्रमाणें चावी फिरवितांच निकाल-गंगेची धार आपोआप धो धो सुरूं. त्याला इंग्रजी मनाचे आडाखे व कायदेबाजीची तेढी बाकी वळणें मुळींच जाणिवेंत घेतां आली नाहींत. त्यामुळें ज्या दुसऱ्या कांही अन्य मार्गांनीं खटपटी करावयाच्या, त्या न करतां, तो चार दोन इंग्रज मित्रांपलीकडे दृष्टी न फेकतां, नुसते तरजुम्याचें काम होलपटीत बसला. कें काम अजमासें तीन महिने चालतें न चालतें तोंच इकडे साताऱ्यास बाळाजीपंत नातूच्या कारस्थानाचा बांब उडाला आणि ता. ५ सपटंबरला छत्रपतीची काशीला उचल बांगडी झाल्याचें वर्तमानपत्रद्वारें जाहीर झालें. सगळ्यांचा धीर सुटला. खुद्द छत्रपतीचेंच उच्चाटण झाल्यामुळें शिर्के प्रभृतीचा आधारच नाहींसा झाला. मुख्य प्रश्न पैशाचा! तो आतां येणार कसा व कोठून, ही विवंचना त्यांस उत्पन्न झाली. शिर्के आपल्या नोंदवहींत म्हणतात ''असे वर्तमान कल्ल्यावरून चितास चैन पडेना. की आधी विलायतेस कोणी येणे न होईना याबद्दल महाराज सरकार फार खराबीत आले. त्यातून ईश्वरे ही गोष्ट घडविली. अता येथें पैशाचे काम. आम्हाजवल तर पैसा थोडा. वेलेस रवानगी जाहली ते वेलेस निघोन विलायतेस जाऊन पोहचू आसा भरवसा सरकारास नहुता. साा खर्चास वाटबेगमी पुरते आणि साहा च्यार महिन्याचे जाजती दिल्हे आणि तुम्ही तेथे पोहचल्यावर मागाहून पाठवून देईन म्हणोन समक्ष सांगितले. त्याप्री मागाहून यावयाचे तो असे जाहले. तेव्हा आता विच्यार काय? महाराज गुंतले गेले व जबलचा पैसा सरत आला. या मुलकात पैसा पुस्कल आसोन आम्हास कोण उगीच देतो म्हणोन वगैरे पुरकल विच्यार ध्यानात येऊन चैन पडे ना. नंतर त्या विच्यारातच तेथील दोस्ती जाहलेले लोकाकडे जाऊन येविसीचे आता पुढे कसे करावे म्हणोन विच्यारिले. तेव्हा त्याची सला पडो लागली की इकडील काम पैशाचे असता तुम्हाजवळ पैसा तुमचे पोटखर्चासच नाही. भाड्याचे घरात आहा त्याचे भाड्यास दरमहा रु. ३९२ द्यावे लागतात व दुभाशी जाहाजात नवा किरीस्ताव याचा दरमहा व मुंबईचा प्रथमबरोबर आणिलेला त्याचा येकूण दोघास रु. २०० व कपतान जवल माहीतगारीस वगैरेस उस्तवारी गोरा लोक ठेविला त्याचे रु. २५० व सिवाय घरजागा साफ करण्यास दरमहा रु. ४५ याचे माणुस आणि गाडीखर्च रोज रु. १५ व कागद व लिहीणार इंग्रजी येकूण येकंदर मिळोन पंधरासे रुपये दरमहा. हाच बाहेरचा खर्च. व सिवाय या महागाईचे देशांत तुम्हा इतक्या हिंदु माणसास भोजनखर्च व वगैरे खर्च आणि कपडे. असा सर्व खर्च तीन हाजारावर जाईल. हा निभतो कसा? याज करिता अता दुसरा विच्यार काहीयेक नाहीं. तुम्ही आला तसे परत आपल्या देशात जावे. या प्रो बहुतेकाची मला पडली.'' तथापि स्वदेशीं परत जाण्यापूर्वी काहीतरी कागदपत्री धडपड करून मग जावें, असें शिर्के यांनी ठरविलें. पण आज २० व्या शतकाच्या भर अमदानींत कागदी घोड्यांना विलायत सरकार जर सहज लीलेनें गिळून बेपत्ता पचवीत आहे, तर शंभर वर्षांपूर्वी शिर्के प्रभृतीच्या अर्जांच्या भेंडोळ्यांना कोण धूप घालणार? शिवाय शिर्क्याला इंग्रजीचा गंध नाहीं. स्वभाव शंकेखोर, खर्चाला चिकट आणि सारी खटपट तर केली पाहिजे इंग्रजी दुभाष्यांच्या तोंडांनीं व हातांनीं. जवळचा

पैसा संपत आल्यामुळें बिचारा अगदीं 'मॅड' होण्याच्या पंथाला लागला. पैशाबद्दल एक जिकीरीचें पत्र छत्रपतींना काशीस पाठविलें; त्याचें उत्तर आलें कीं ''आम्हाजवळ पैसा नाही तेव्हा तुम्हास काय पाठवावे? आमची सर्व दौलत व खासगी जिनगीसुद्धां गेली. येके वस्त्रानी बाहेर निघालो. फार आमचीच आडचण. खर्चास दरमहा देतात तो पुरत नाही. तुम्ही तिकडे भीक मागून पोट भरा आणि सरकारी काम करा. तुमचे वडील असेच कामी आले.'' शिर्के निराश झाला. सरंजामी थाटानें रहाणाऱ्या व पैशाचा पुरवठा बंद पडतांच हातपाय गाळणाऱ्या माणसाकरितां विलायतचा मामला आजहि नाहीं, मग त्या वेळी कोठून असणार? इतक्यांत मस्कत आरबस्थानच्या मागें येऊन माल्टा येथें क्वारंटैनमध्यें अडकून पडलेल्या रंगो बापुजीचें पत्र येऊन धडकलें. त्यांत त्यानें लंडनला येण्यापुरत्या पैशाची बेगमी करण्याबद्दल शिर्क्याला विनंति केली. आधींच दुष्काळ, त्यांत हा तेरावा महिना कशाला, असें शिर्क्यास वाटल्यास नवल नाहीं. शिर्क्यानें पैसे रवाना केल्यावर ता. ३० जून सन १८४० आषाढ शु. १ मंगळवार शके १७६२ रोजी रंगो बापुजी लंडनला येऊन दाखल झाला. त्याच्या बरोबर 'सिशा (शिष्य म्ह. सेवक) रावजी बापाजी, गडी विठु कुढला व सख्या पोरगा' असे आणखी तिघे आसामी होते.

यानंतर सुमारें एक वर्षभर या सर्व मंडळींनी छत्रपतीच्या मकदम्याचें काम जेमतेम कसेंबसें चालुं ठेवलेंच होतें. पण जवळ पैसा नाहीं, मंडळींचा लबेदा फार, शिर्क्याची साशंक व त्रस्त चिडचिडी वृत्ति आणि रंगो बापुजीच्या धडाडीच्या मसलती यांचें गोत्र जुळे ना! अखेर शिर्क्यानें रंगो बापुजीच्या मसलतीप्रमाणें बनिया कंपनीच्या डैरेक्टरांजवळून ४० हजार रुपये घेतले व रंगो बापुजीशिवाय सर्व मंडळी ता. ६ सपटंबर १८४१ रोजीं मुंबईस येऊन दाखल झाली.

यशवंतराव शिर्के विलायतेस गेला व तेथें त्यांनीं छत्रपतीसाठीं कागदोपत्री खूपच मेहनत घेतली. पण त्याची उमेद एकांगीच असल्यामुळें, आणि असल्या कार्यात अवश्य लागणाऱ्या स्वार्थत्यागाची जोड त्या उमेदीला नसल्यामुळें तो गेला तसा परत आला. विलायतेंत होता तरी घरच्या भाऊबंदकींत तो नेहमीच व्यग्र असे. स्वदेशीं परत आल्यावर बनिया कंपनीच्या नोकरशाहीकडून स्वत:ला व स्वत:च्या इष्टेटीला काहीं उपद्रव्य होईल, या भीतीने, त्यानें डैरेक्टरांस अर्ज करून ''आम्ही आपले बंदोबस्ताविसी लिहिले की आम्ही आपले मुलकात गेल्यावर आम्हांवर कोणी दुस्मानी करू लागतील त्याचा बंदोबस्त सरकारातून होत असावा आणि जे आम्हाकडे गावखेडे वडिलोपार्जित चालत आले ते आमचे आम्हाकडे चालावे. त्यात कोणी गैरसिरत आम्हासी चालू लागेल त्याचा बंदोबस्त करावा म्हणोन तारीख (तीन चतुर्थांश इंच जागा कोरी) मारचे पाठविले. त्याचा जवाब या तुमचे लिहिण्याप्रो बंदोबस्ताविसी मुंबई सरकारला पत्र पाठविल्याचा आला.'' इतके आश्वासन मिळाल्यावर शिर्क्याचा पाय विलायतेहून हलला. विलायतेहून परत आल्यानंतरचा शिर्क्याचा इतिहास आम्हास मिळाला नाहीं व त्याचें प्रस्तुत ग्रंथांत कांही प्रयोजनहि नाहीं. सारांश, यशवंतराव राजे शिर्के हा एकनिष्ठ स्वराज्यसेवक होता, यांत कांही शंका नाहीं.

चिंतामणराव सांगलीकर : मराठशाही बुडवून, ब्राह्मणेतरांवर ब्राह्मणांची सनातन गुलामगिरी लादण्याच्या कामीं, जे जे चित्पावन स्वराज्यद्रोही १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत पुढें आले. त्यांत चिंतामणराव सांगलीकर हा मुख्य धाडसी प्राणी होय. याच्या इतका ब्राह्मणेतरांचा कट्टा हितशत्रू हाच. याला स्वत:च्या चित्पावन जातीशिवाय इतर कोणत्याहि जातीचें- खुद्द देशस्थादि ब्राह्मण जातींचें

सुद्धा- वर्चस्व तिळमात्र खपत नसे. बाळाजीपंत नातूच्या सर्वस्पर्शी कारस्थानांच्या धामधुमींत यानें चित्पावनेतरांचा. विशेषत: छत्रपतीच्या गादीचा अभिमान बाळगिणाऱ्या क्षत्रिय मराठे व कायस्थ प्रभूंचा, धार्मिक व सामाजिक अध:पात करण्याची राष्ट्रीय कामगिरी आपल्या आंगांवर घेतली होती; आणि चित्पावनांत असलेल्या सहजसिद्ध कुशाग्र कुटिलतेच्या जोरावर त्यानें ती उत्तम बजावली, यांत मुळींच संशय नाहीं. या कामांत त्यानें जे भिक्षुकमंडळ जमविलें होतें, त्याचें अध्वर्युत्व बाळाजीपंत नातूचा व्याही निळकंठ शास्त्री थत्त्याकडे होते. या भिक्षुकमंडळानें हिंदूंच्या सर्व धर्मग्रंथांची चित्पावनी अभिनवावृत्ति काढण्यासाठीं सांगलीस एक मोठी फॅक्टरीच काढली होती. या वेळीं श्रुति स्मृति पुराणादि ग्रंथांत मन मानेल तशी घालघुसड करून, चित्पावनांच्या सर्वांगीण श्रेष्ठतेचे व चित्पावनेतरांच्या सर्वांगीण नीचतेचे काल्पनीक श्लोक सूत्रें व जादा प्रकरणें रचून थत्ते शास्त्रानें धर्मग्रंथांचीं आंतडीं भिक्षुकी काव्याच्या राष्ट्रीय न्युमोनियानें बेमार सुजवून किंबहुना कुजवून ठेविली. निवळ धार्मिक अभिमानाच्या बुरख्याखालीं वेदशास्त्रसंपन्नतेच्या शस्त्रानें त्या वेळच्या ब्राह्मणबुवांनीं ब्राह्मणेतरांवर जे अनंत अत्याचार केले व स्वत:च्या धार्मिक व सामाजिक वर्चस्वाप्रीत्यर्थ ब्राह्मणेतर छत्रपतीच्या पुरातन तक्तछत्राचें वाटोळें करण्यांत महाराष्ट्राचा जो राजकीय अध:पात केला, त्यांचे वर्णन यथास्थलीं पुढील प्रकरणांत येईल. येथे इतकें म्हटले म्हणजे पुरें की या धामधुमींत चिंतामणरावानें, छत्रपतीचा व छत्रपतीबरोबरच अखिल महाराष्ट्रीय ब्राह्मणेतर जनतेचा सर्वस्वनाश साधण्यासाठीं, जीं अनेक कारस्थानांची त्रांगडीं निर्माण केलीं, त्यांत त्यानें खुद्द श्रीशंकराचार्यालासुद्धां हाणमार चोप देऊन, खोटीं आज्ञापत्रें लिहून देण्यासाठीं पोलीसी संस्कारांचा प्रयोग केला. इतकेंच नव्हें तर गोव्याच्या फितुराची जी एक उपटसुंभ राजकीय घोरपड छत्रपतीच्या नरड्यावर बसण्यासाठीं चिंतामणरावानें उत्पन्न केली. तिच्याहि कैचींत त्या परमहंस परिब्राजकाला बिनदिक्कत अडकवायला कमी केले नाहीं. या कामीं चिंतामणराव निळकंठशास्त्री थत्ते या दोघा चित्पावन राष्ट्रीय ब्राह्मणांनीं अनेक ब्राह्मण देशभक्तांची सेना आपल्या हाताखालीं जमा केली होती आणि आज जसे मुळशीपेटा सत्याग्रह, टिळक कोटी फंड, पैसाफंड, ज्युबिलीफंड, टिळक स्मारक फंड, वगैरे शेकडों फंडगुंडी धांगडबिंगे घालण्यासाठीं हजारो राष्ट्रीय ब्राह्मणपुत्र खादी पांघरूण गांवोगांव व खेडोंपाडी ठोळधाडीप्रमाणें ते बोकाळले होते. छत्रपति प्रतापसिंह महाराजांविषयीं कोठें केव्हांहि लिहितांना, हे राष्ट्रीय ब्राह्मणवीर पुरातन 'क्षत्रियवंशावतंस' या मायन्याचा उपयोग न करितां 'भोसलेवंशावतंस' असा नवीन चित्पावनी मायना लिहित असत. राज्याभिषेक शकाला खुद्द नाना फडणीसानें आधींच गचांडी दिलेली होती. गांवोगांवीं खोटेंनाटें जाहीरनामें फडकवून, व्याख्यानें देऊन, पुराणें सांगून प्रतिस्पर्धांविषयी, लोकमत बेसुमार खवळून सोडण्याची राष्ट्रीय चित्पावनी परंपरा फार जुनी आहे; तथापि चालूं मन्वतरांतल्या भिक्षुकशाही चित्पावनी मामल्याचे मूळपुरुषत्व सांगलीकर चिंतामणराव पटवर्धन व बाळाजी पंत नातु या दोन चित्पावन-टिळकांकडे देण्यास कांही हरकत नाहीं. 'छत्रपति प्रतापसिंह हा हिंदूच नव्हे; हिन्दूंच्या राष्ट्रधर्माचा वैरी आहे; कायस्थ प्रभू लोक शूद्राधम आहेत; दैवज्ञ व विश्वब्राह्मण हे सोनार अतएव शूद्र आहेत; मराठे नीच बीजाचे आहेत; इत्यादि राष्ट्रीय वचनांचे जाहीरनामें खेडोंपाडी नाक्यांनाक्यावर फडकविण्यासाठी हजारो ब्राह्मण स्वयंसेवक चिंतामणरावाच्या निशाणाखालीं रात्रंदिवस राबत होते. सारांश स्वराज्याच्या नावानें आज चालूं असलेल्या राष्ट्रीय चित्पावनांच्या अष्टपैलु चळवळींची सरडेवजा धोरणें व धामधुमी ज्यांनी बारकाईनें निरीक्षण केली

असतील, त्यांना चिंतामणरावाच्या तत्कालीन् भिक्षुकशाहीच्या बंडाच्या मालमसाल्याची बरीच ठळक कल्पना येण्यास अडचण पडणार नाहीं. धार्मिक बाबतींत ग्रामण्यांचीं प्राणघातक बंडें सर्वत्र चालवीत असतांनाच, त्यांचीं सूत्रें राजकीय फितुरांत अडकवून, क्षुद्रबीजत्वाच्या जोडीनें चित्पावनेतरांना बनिया कंपनीच्या घरटांत परस्परा भरडण्याची चिंतामणरावाची कुशल शैली पाहून, स्वराज्यद्रोही अधमाग्रणी बाळाजीपंत नातूसुद्धां बहोत खुष झाले. हल्लीं ज्याप्रमाणें ठिकठिकाणी कारस्थानी राष्ट्रीय चित्पावन लोक वाटेल त्या नांवाच्या परिषदा व सभा भरवून त्या शुद्ध 'सार्वजनिक' म्हणून भासवितात व मोठ्या तावातावानें 'तीव्र निषेधाचे ठराव पास' करून आपल्या राष्ट्रीयत्वाचीं पारणीं हरहमेश घालतात, तसलाच प्रकार चिंतामणराव सांगलीकरानें चालविला होता. तत्कालीन् सर्व भिक्षुकी संस्थानिक पेशवाईचें श्राद्ध खाल्ल्यानंतर बनिया कंपनीच्या ताटाखालचीं मांजरें बनले होते. अर्थात अशाहि परावलंबी स्थितींत चित्पावनांचा वरचढपणा कायम राखण्यासाठीं त्यांनीं चित्पावनेतरांवर ग्रामण्यांच्या ज्या ज्या चढाया केल्या, त्यांना राजकीय स्वरूप देऊन बनिया कंपनीच्या रोषास चित्पावनेतरांवर पात्र करण्याची संधि त्यांनी मुळींच वाया दवडली नाहीं. ही चळवळ चालविण्यासाठीं चिंतामणरावानें 'नागो देवराव वैद्य' या नांवाचें एक चित्पावन पात्र हातीं धरलें होतें. हा नागोबा खरोखरच नागोबा होता. कोठे कोणच्या मसलतींच्या बिळांतून चटकन् निसटून जाईल आणि पटकन् कोणास दंश करून झटकन् एखाद्या बिळांत गुप्त होईल, याचा नेमच लागत नसे. या नागोबाच्या मार्फत गांवोगावचे शेंकडो ब्राह्मण जमा करून, त्यांचे तांडे बनिया कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या छावण्यापुढें चिंतामणराव नेऊन उभे करी. हे सर्व ब्राह्मण तेथें मोठमोठ्यानें रडा ओरडा करून, 'सातारच्या छत्रपतीनें आमचा छळ चालविला आहे, आमची मालमत्ता बायकांपोरे संकटांत आहेत, आमची धर्मकार्मे या मरगठ्या राजानें बुडविली, त्याचे साथीदार हरामखोर शूद्राधम परभू लोकांनी वेदोक्ताचा सत्यानाश केला, मराठे लोक आमचीं घरेंदारे लुटतात' वगैरे तक्रारी त्या अधिकाऱ्यांपुढें त्वेषानें जाहीर करीत असत. राष्ट्रीय चित्पावनांची ही राष्ट्रीय बोंबाबोंब सुरू झाली कीं त्याची चित्पावनी मखलाशी करायला अधमाग्रणी बाळाजीपंत नातु तेथें हजर असतच. पण वाईट वाटतें तें एवढ्याच साठीं कीं आताच्या 'कायद्यानें प्रस्थापित झालेल्या' आंग्रेज सरकाराप्रमाणेंच, मूळमाया बनिया कंपनीनें सुद्धा राष्ट्रीय चित्पावनांच्या असल्या चित्पावनी कावकावची दाद घेतली नाही. सगळाच जेथे वरपासून खालपर्यंत चहाडखोरांचा व स्वराज्यद्रोह्यांचा बाजार, तेथें बनिया कंपनी काय, हिंदुस्थानी सार्वभौमत्वाचा अनंत अमरपट्टा मिळविला आहे असें म्हणणारे आतांचे आंग्रेज बहादुर काय किंवा या नोकरशाही अमरपट्ट्याला लोकशाही कमरपट्टा चढविणारे उद्याचें लोकसत्तानुवर्ति स्वराज्यमंडळ झालें काय, स्वार्थासाठीं व आत्मवर्चस्वासाठी हपापलेल्या राष्ट्रीय चुगलखोरांची खेटरांशिवाय अधिक कोणत्या साहित्यानें पूजा बांधणार? कै. लोकहितवादी याबद्दल लिहून ठेवतात, ''पेशवाईंचे अखेरीस चहाड लोक फार उत्पन्न झाले होते व त्यांस बाजीरावाचे मक्तेदार, मामलतदार, कमाविसदार, वगैरे लोक आश्रय देत असत. त्यांनीं खोट्या फिर्यादी कराव्या व सुभेदारांस पैसा मिळवून द्यावा.'' आधींच एकूण एक भिक्षुकी संस्थानाची उभारणी निमकहरामीवर झालेली त्यांत पेशवाई झोटिंगशाहीची भर पडून बाजीरायींत तिचा कळस झाला. बाजीरायीचें वर्णन करतांना कै. लोकहितवादी म्हणतात ''बाजीरायींत सोदेगिरी फार माजली. त्या वेळेस उनाड लोक शेंडी संजाबदार, पागोटें कंगणीदार, जोडा अणीदार, अंगरखा कळीदार, मिशा पीळदार, धोत्रें चुणीदार,

भोंवया कमानदार गंध साखळीदार आणि छाती गोलदार अशीं ढोंगे करूं लागून पूर्वीचा साधेपणा गेला!'' बाजीरायींनंतर नांवाला बनिया कंपनीची तहनाम्यांची तागडीशाही सुरूं झाली, तरी वास्तवीक बाळाजीपंत नातू प्रणीत चित्पावन भिक्षुकशाहीचे बण्ड नेटानें सुरूच होते. त्या बण्डानें छत्रपतीच्या स्वराज्याचा बळी घेतल्यावरच तें शांत झालें.

नातुशाहीच्या छत्राखालीं चित्पावनांनी धर्मसंरक्षणाच्या मुखवट्याखाली चित्पावनेतरांवर केलेल्या नानाविध प्राणघातक दंगलींची हकिकत 'ग्रामट्यांचा साद्यंत इतिहास' या ग्रंथांत पहावी. चिंतामणराव सांगलीकरानें नीळकंठशास्त्री थत्त्याला हातीं धरून खोटे बनावट धर्मग्रंथ लिहून प्रसिद्ध करण्याची जी चित्पावनी फॅक्टरी सांगलीस स्थापन केली होती, तींत अनेक चित्पावन वीर, देशभक्त, देशसेवक खोटे दस्तऐवज, बनावट सह्या, बनावट शिक्के वगैरे बनविण्याच्या कामीं लवकरच निष्णात झाले; आणि 'कर्ममार्गामाजी सुलक्षणी' चिंतामणरावानें जेव्हां धार्मिक व सामाजिक ग्रामण्य बंडाच्या तंगड्या राजकीय गुप्त कटांच्या गळ्यांत अडकवून छत्रपति प्रतापसिंहाचें उच्चाटन करण्याचे कारस्थान रचलें, तेव्हां बाळाजी काशी किवे, वांईकर बाळंभट जोशी, बाळकोबा तात्या केळकर, कृष्णाजी सदाशिव भिडे, सखाराम बल्लाळ महाजनी, महादेव सप्रे, भाऊशास्त्री लेले वगैरे अनेक चित्पावन वीर महावीर खोटीं बनावट पत्रें, शिक्के, सह्या वगैरे बनविण्याच्या राष्ट्रीय कामावर, आतांच्या फंड गुंडांप्रमाणेंच, रात्रंदिवस इमानें इतबारें राबत होते. हा इतिहास पुढे योग्य स्थलीं सांगण्यांत येईल. सारांश चिंतामणराव पांडुरंग सांगलीकर हा चित्पावनांस जरी ब्रह्मदेवाइतका किंवा वरचढ पूजनीय वाटणें साहजिक असला, तरी त्याच्या स्वराज्यद्रोही कर्मांचा इतिहास नातूच्या राष्ट्रद्रोही पातकांइतकाच घाणेरडा असल्यामुळे प्रात:काळीं या पुरुषाचें स्मरण होतांच 'आजचा दिवस वाईट जाणार!' अशी एखाद्या भोळ्या भावाच्या ब्राह्मणेतराची समजूत झाली, तर ती अगदीच चुकीची म्हणतां येणार नाहीं.

□□□

लेख

१०० वर्षांपूर्वीचा महाराष्ट्र

(प्रकरण ३ रें)

(१० व्या अंकावरून पुढे चालू)

(५) आतां, बाळाजीपंत नातूनें प्रतापसिंह छत्रपतीवरच्या अनेक कारस्थानांची कुलंगडी उपस्थित केली त्यांची रूपरेषा व त्यांत सामील झालेल्या ब्राम्हण ब्राम्हणेतर पात्रांची नांवे यांचा उल्लेख करून हे प्रकरण पुरें करूं. कारस्थानें म्हटली म्हणजे त्यांच्या शाखा उपशाखा, भेद पोटभेद पोटपोटमेट थेट हिंदू समाजांतील जातिभेदांप्रमाणे अगणितच असायचे. त्या प्रत्येकाची माहिती व वर्णन देतां येणे शक्य नाहीं, म्हणून त्यांतले मुख्य भेद सांगूनच पुढे गेलेले बरें. हे मुख्य भेद तीन होते :

(अ) इंग्रजांना महाराष्ट्रांतून हांकून लावण्यासाठीं छत्रपतींनीं गोव्याच्या पोर्तुगीज गव्हर्नरांशी गुप्त कारस्थान बरींच वर्षे चालविले. (गोवा कट.)

(व) याच उद्देशाने नागपूरच्या पदच्युत भोसल्याशी गुप्त खटपटी केल्या. (जोधपूर कट.)

(क) इंग्रेजांच्या फलटणींत नोकरी असलेल्या हिंदी शिपायांस फितूर करण्याची गुप्त कारस्थाने केली. या तीन कटांची छत्रपतींवर शाविती करण्यासाठीं नातूनें जी अनेक ब्राम्हण ब्राम्हणेतर वेताळोपवेताळांची सेना आपल्या परशुरामी छत्राखाली जमवून आपल्या चित्पावनी लोकसंग्रहाची पुण्याई कमाविली, त्यांची जातवार नांवनिशी खाली देतो :

(अ) गोवा कटांतील 'ब्राम्हण देशभक्त'.

१ वासुदेव शास्त्री.

२ दाजीबा वैद्य.

३ बाळकोबा तात्या केळकर.

४ मोरोपंत जोशी.

५ हरीपंत फाटक.

६ नारायणभट चितळे.

७ रावजी कोटनीस.

८ खंडो व्यंकटेश.

९ काशी वाजीराव.
१० गोपाळ जयराम कोलटकर.
११ आबाजी नारायण जोशी.
१२ मोरोपंत पटवर्धन.
१३ निळो आवाजी भडकमकर.
१४ संजीवन, ब्राम्हण.
१५ पुरुषोत्तम अनंत गोसावी.
१६ विष्णु केशव देवस्थळी.
१७ बाळाजीपंत नातू.
१८ काशी शिवराम बोंद्रे.
१९, रामचंद्र गंगाधर.
२० दाजीवा जोशी दप्तरदार.
२१ राजारामभट मुंडले.
२२ गोविंदराव (दिवाण.)
२३ विष्णुपंत फणशीकर.
२४ नारायण भट सिधये.
२५ शिवरामभट लाडकर.
२६ बाळाजीपंत जोगळेकर.
२७ हरभट विन रामचंद्रभट हळवे.
२८ रामचंद्र सदाशिवभट अभ्यंकर.
२९ धोंडो विष्णु आपटे. (सावंतवाडीचे छत्रपति तर्फेचें वकील.)
३० नागो देवराव.

गोवा कटांतील नागोदेवरावच्या हाताखालचें ब्राम्हणेतर हरामखोरांचे पथक.

१ आवजी बिन हिराजी.
२ सखोजी बिन लिंबाजी.
३ वेंकप्पा विन पिलाजी.
४ हैबती बिन ज्योत्याजी.
५ पद्रु विन सुलतानजी.
६ खंडोजी बिन तुकोजी.

एकूण ३० ब्राम्हण आणि ६ ब्राम्हणेतर.

(ब) जोधपुर कटांतील ब्राम्हण देशभक्त.'

१ कृष्णाजी चिंतामण आगाशे.
२ बाबाजी महिपती.
३ पुरुषोत्तम अनंत.

४ राघोपंत दत्तसकल
५. काशीपंत बोंद्रे.
६. गोविंदराव दिवाणे
जोधपूर कटांतील ब्राम्हणेतर पात्रें
१ ऐळोजी मोहिते*
२ आप्पाजी जाधव
३ विठू बोगणा
४ विठू पट्टेकर
५ केदारी मन्या
६ धोंडी तात्या
७ आबा महाडिक*
८ आबा पारसनीस (कायस्थ)
९ दिनकरराव मोहिते
एकूण ६ ब्राम्हण आणि ९ ब्राम्हणेतर

(क) शिपायी फितुराच्या कटांतील 'ब्राम्हण शिष्ठ'

१ सुभेदार गुलजार मिश्र
२ परशुराम गांधी
३ काशीपंत बोंद्रे*
४ अंताजी
५ गोविंदराव दिवाण*

ब्राम्हणेतर पात्रें

१ सुभेदार शिवगुलामसिंग.
२ हवलदार चंदरसिंग.
३ काश्या मालू.
४ आवा महाडीक*
५ आबा पारसनीस (कायस्थ)*
६ एळोजी मोहिते.
७ आबा मोहिते.*
एकूण ५ ब्राग्हण व ७ ब्राग्हणेतर.

(* खूण केलेलीं पात्रें एकापेक्षां अधिक कटांत सामील होती.) या कटवाल्यांची जातवार वर्गवारी अशी होते:

कटाचे नांव	**ब्राम्हण**	**ब्राम्हणेतर**
अ) गोवा कारस्थान.	३०	६
ब) जोधपूर भोसले कारस्थान	६	९
क) शिपायी फितुराचे कारस्थान	५	७
एकूण	४१	२२

या शिवाय आणखी बरेच छोटे मोटे सज्जन छत्रपति विरुद्ध उभारलेल्या नातु संप्रदायांत सामील होते, त्यांची नांवे या प्रकरणाच्या कागदपत्रांत मधून मधून आढळतात. विशेषतः आपा शिंदकर हें एक कायस्थ पात्र या यादीत जरी चमकलें नाहीं, तरी छत्रपतीच्या पदभ्रष्टतेच्या कार्यात या पात्रानें एखाद्या चित्पावनाला शोभेशी कामगिरी करून, विप्रोत्तम बाळाजी नांतूंचे 'वेदोक्त बक्षिसींचे आशीर्वाद' मिळविलें, हे नमूद करायला हें कायस्थी कलम निस्पृहतेला पराङमुख होणार नाहीं. त्याचप्रमाणे आम्हांला राहून राहून आश्चर्य वाटते ते हेच की ज्या वेदशास्त्र संपन्न कायस्थाने आबा-पारसनिसानें वेदोक्त प्रकरणाच्या भयंकर ग्रामण्य युद्धात छत्रपति प्रतापसिंह महाराजांच्या वतीने, काशी ते रामेश्वरपर्यंतच्या मोठमोठ्या पंडिताग्रणीशीं वाग्युद्धाचा सामना देऊन क्षत्रियांचे क्षात्रतेज व वेदाधिकाराचा सनातन हक सिद्ध केला, आपल्या सिद्धांत विजय नामक संस्कृत ग्रंथापुढें त्या पंडिताग्रणींना 'क्षमस्व' म्हणून डोकीं घासावयास लावलीं आणि प्राचीन ग्रंथाधारें स्वतः रचलेल्या वेदोक्त राज्याभिषेकविधीप्रमाणें,आपल्या स्वतःच्या देखरेखीखाली, छत्रपती प्रतापसिंहाला राज्याभिषेक करविला, तोच गृहस्थ अखेर छत्रपतीच्या विरुद्ध उठलेल्या नातुशाही वावटळींत सामील व्हावा, ही गोष्ट सकृतदर्शनी अविश्वसनीय वाटेल; पण ती खरी आहे. उठल्या बसल्या राजनिष्ठेच्या पारायणांत ऐहिक मोक्ष साधूं पहाणाऱ्या 'लॉयल' कायस्थांना आप्पा शिंदकर व आवा पारसनीस ही दोन उदाहरणे विचारांत घेण्यासारखीच आहेत. जोपर्यंत माणसें ही माणसंच राहणार तोपर्यंत लोभ मोहादि स्वार्थी चिकारांची वादळे सर्वत्र समप्रमाणात राहणारच. उगाच कोणी सात्विकतेच्या अढळपदाची घर्मेंड मारूं नये. काही अकल्पनीय चमत्कारानें माणसें देव बनूं लागली, तरी देखिल दानवांची मुंडी मुरगळण्यासाठी त्यांना माणसांच्याच बऱ्या वाईट डांवपेचांचा कित्ता घटवावा लागेल, यांत मुळीच संदेह नाही. एवढें मात्र खरें कीं आबा पारसनीसानें आप्पा शिंदकराइतका राष्ट्रीय चित्पावन पणा मुळीच केलेला दिसत नाहीं; किंवा खुद्द छत्रपतीचाहि त्याच्याविरुद्ध फारसा आक्षेप दिसत नाही; ग्रॅट डफनें त्याला 'गैर वर्तना'मुळे हद्दपार केलें, एवढाच आक्षेप त्यावर होता व त्यामुळे छत्रपतीची त्यावर 'गैरमर्जी' झालेली दिसते. यातील खुद्द छत्रपतींचे व मुंबईचे गव्हर्नर सर जेम्स कारनाक यांचें झालेलें संभाषण पहा :

छत्र. -आबा पारसनीसाला कॅप्टन ग्रँटनें गैरवर्तणुकीवरून बडतर्फ केला त्याला मी क्षमा करणार नाही.

सर कारनाक. - पण एक वेळ पारसनीस तर तुमच्या नाकचा बाल होता.

छत्र. - होता. पण, इंग्रेजांची त्याच्यावर झालेली गैरमर्जी सुधारण्यासाठी तो माझ्याविरूद्ध गुप्तकटांत सामील झाला, असल्या लोकांना क्षमा किंवा त्यांना काही तनखा (अ) देणें माझ्याच्यानें साफ होणार नाहीं. इंग्रेज सरकारांनी त्यांची मनचाहील तशी बडदास्त ठेवावी.

सर कारनाक. - हा मनुष्य इतका जर वाईट होता तर राजेसाहेबांनी त्याला आपल्या नोकरीत कशाला ठेवला होता.?

छत्र. - गुप्त कारस्थानांतील सामील होण्यासाठी कांहीं की त्याला पोसला नव्हता!

(Sattara Case Proceedings 1840. John Wilson, page 19.)

सारांश आबा पारसनीस व छत्रपति प्रतापसिंह यांचे कोठें तरी बिनसलें होतें, पण एकंदर सातारा प्रकरणाच्या भानगडींत नातूकंपूला जाऊन मिळण्या पलीकडे त्याची फारशी हालचाल कोठेंच दिसत

नाहीं. असो.

वर नमूद केलेल्या प्रसिद्ध कटवाल्यांशिवाय छत्रपतीच्या विरूद्ध नाना तऱ्हेची कुभांडें रचून आरडाओरड करण्यासाठी महाराष्ट्रांतली बहुतेक ब्राम्हणांची घरे न् घरे जिवंत झाली होती. तरूण विद्यार्थ्यांपासून तो भिक्षुकीवर संसारगाडें रेंटणाऱ्यापर्यंत सर्वांनीं विप्रवर्य नातूंच्या 'राष्ट्रीय' चळवळींस प्रत्यक्षाऽप्रत्यक्ष हातभार लावण्यास मुळीच कसूर केली नाही. त्या वेळीं - 'छत्रपतीच्या विरुद्ध मी अमूक अमूक कारस्थानाची बित्तंबातमी देईन' अशी बनिया कंपनीच्या लहान मोठ्या - अधिकाऱ्यांना गप्पा सांगून, त्यांच्याकडून पैसे उकळण्याचा एक धंदाच ब्राम्हणांनी चालविला होता. त्यावेळी - जेथे जेथें कंपनीच्या सैन्याचा तळ पडत असे, तेथे तेथे काही ब्राम्हण तरूण 'इंग्रजी शिकण्या'च्या निमित्ताने, त्यांतल्या कांहीं समंजस अधिकाऱ्यांकडे ये जा करीत असत. साधारण परिचय होतांच आणि ओळख नसतांहि परिचय पाडण्याची कला ब्राम्हणांइतकी दुसऱ्या कोणासहि अवगत नाहीं !- हे त्यांना राजधानींतल्या व राजघराण्यांतल्या कांही खोट्यानाट्या, किंवा खऱ्या खोट्या गोष्टी तिखटमीठ लाऊन सांगत असत. कंपनीच्या सैन्यांत अचाट बुद्धि चालवून बळेंच लक्ष्मी मिळवूं पाहणारे ऊर्ध्व महत्वाकांक्षी आंग्लजवान पुष्कळ असत. जात्याच ते गुणग्राही असल्यामुळे व एतद्देशीय भाषेची त्यांना हरघडी अडचण पडत असल्यामुळें, इंग्रजी विद्येच्या मोबदला मराठी भाषा या ब्राम्हणाकडून शिकण्याची संधि वांया दवडींत नसत. विशेषतः तो काळ क्रान्तीचा असल्यामुळें, मराठीं राजेरजवाड्यांच्या घरांतला घरभेद एखाद्या स्वदेशियाकडून समजून घेऊन त्याची बातमी वरीष्ट अधिकाऱ्यांना देण्याचें पुण्य म्हणजे बढती मिळविण्याचा राजमार्ग होता. या राजमार्गानिंच अनेक अडुमाडू इंग्रेज तरुण येथें नांवलौकिकास आले. हा राजमार्ग नीट चोखाळून सुकर व साफसूफ करण्याच्या कामीं अनेक ब्राम्हणपुत्रांनी आंग्लजवानांना मराठी शिकविण्याची संधि वांया दवडिली नाहीं. इंग्रजी मराठी भाषेची ही परस्पर देवघेव म्हणजे छत्रपति विरुद्ध वाटेल त्या कागाळ्या इंग्रजी छावणींत प्रसृत करण्याची नित्यपर्वणी झाली होती. वाटेल त्यानें यावें आणि एकाद्या टोपकराला सांगावे कीं मला जर अमूक हजार रुपये देत असाल तर अमक्या तमक्या गुप्तकटाचे गुप्त कागदपत्र मी तुम्हांस बजिन्नस दाखवून देतो; किंवा छत्रपतींचीं अमक्या तमक्या बाबतींतली गुप्त कटाची मंडळी दाखवून देतो. महत्वाकांक्षी आंग्लजवानांना या असल्या भटी गप्पा बायबलाइतक्या सच्च्या वाटत आणि ते त्या गप्पीदासांच्या नादी लागून शेंकडों रुपयाचें शेण करीत. अर्थात् तत्कालीन् ब्राम्हणवीरांना फुकटाफाकट पैसे उकळण्याचा हा एक फंडगुंडी राष्ट्रीय धंदाच होऊन बसला होता. छत्रपतिविरुद्ध नसतीं कुलंगडीं निर्माण करणाऱ्या अट्टल ब्राम्हणीं कारस्थान्यांना या धंद्यामुळें, स्वतः नामानिराळे राहून, उलट सुलट बातम्यांचे धागे थेट अल्पिष्टन साहेबाच्या कानापर्यंत पोंचविण्याची फार छान सोय झाली होती. याविषयीं अनेक कबूलजबाब सातारा प्रकरणी पार्लमेंटरी दप्तरांत नमूद झाले आहेत. त्यांपैकी नमुन्यादाखल, कॅप्टन डराक, लैन आडज्युटंट यानें आपल्या रबदस्तुरच्या ता. २७ सप्टेंबर सन १८३७ च्या एका पत्रांत कबूल केल्याप्रमाणें व त्या पत्रासोबत जोडलेल्या अस्सल जबानीपत्रकांवरून खालील माहिती देतों. (Sautam Official-Papers P-115-150. भाऊ लेले नावाच्या गृहस्थाने पांडुरंग पंत नांवाचा एक लटपट्या ब्राम्हण पोऱ्या शोधून काढला. इंग्रजी शिकण्यासाठी हा नेहमी छावणीत जात येत असे व त्याचा तेथें बराच परिचयहि झालेला होता. भाऊ लेले त्यांना म्हणाला, ''पांडोबा तुम्ही छावणींत वरचेवर जात येत असता. तेव्हां तेथें जाऊन

तुम्ही सांगा कीं जर साहेब मला एक हजार रुपये बक्षिस देतील तर छत्रपति महाराज इंग्रेजांना हांकून देण्यासाठीं गोव्याच्या पोर्च्युगीजांशी जें राजद्रोही बंडाचें कारस्थान करीत आहेत, त्यांविषयीं खुद्द गोविंदराव दिवाणाच्या सहीशिक्क्याचे अस्सल कागदपत्र तो मिळवून देण्याची खटपट करील. हजार रुपयांशिवाय काम फत्ते झाल्यावर आणखी एक लाख रुपये बक्षिस देण्याचें साहेबाने लेखी आश्वासन दिले पाहिजे.'' पांडोबाने हैबतराव नांवाच्या एका सोबत्यासह कॅ. डराकची भेट घेऊन भाऊ लेल्याचा 'वेदोक्त संदेह' त्यास श्रुत केला. १२ जून १८३७ रोजी के. डराकनें पांडोबा, हैबती व भाऊ लेले या त्रयींची गांठ घेतली. लेले म्हणाला प्रथम खर्चाकरितां एक हजार रुपये व काम झाल्यावर चांगलें ठसठशीत पेनशन जर कुंफणी सरकार मला देईल, तर मी सर्व अस्सल कागदपत्रें साहेबाला मिळवून देईन.'' थोडी कायदेबाज चर्चा व घासाघीस झाल्यानंतर १८ जून रोजी लेल्याने कॅ. डराकपासून हातखर्चासाठीं १५० रुपये उपटले, एक महिनाभर दडी मारून स्वारी डराकला येऊन भेटली व सांगितलें कीं 'ज्याच्या जवळ ते कागदपत्र आहेत. तो मला भेटला नाही. येत्या नागपंचमीला तो पुण्यास येणार आहे. आला कीं १५ दिवसांत मी कागद घेऊन साहेबाकडे येईन.' डराक म्हणाला 'तुला काम साधलें नाही; बस्, घेतलेले पैसे परत आण.' 'ठीक आहे' म्हणून दोनतीन दिवसांनी लेले पैसे घेऊन आला व म्हणाला 'साहेब, तुम्ही समजतां तसे आम्ही बाम्हण कांही द्वाड नव्होत. आणखी १५ दिवसांची मुदत द्याल तर याच पैशांत काम करून येतो.' डराकने 'बरे' म्हणतांच स्वारी पुण्याकडे जी गेली ती कायमची परागंदा. अझूनहि पत्ता लागलेला नाही. पुढें तपास सुरू झाला. भाऊ लेल्यानें एक व्यंकटराव करमरकर नावाचे ब्राम्हण पात्र 'वकील' म्हणून पुढें केलें होते. तपासांती असे उघडकीस आलें कीं या ब्राम्हण देशभक्तांनी पुण्यास बनावट दस्तऐवज व शिक्के सह्या बनविण्याची एक 'राष्ट्रीय संस्था' काढलेली होती. त्या संस्थेतून वाटेल तसा वाटेल त्या मजकुराचा दस्त निर्माण होत असे. छत्रपतीवर अमूक एका प्रकारचें किटाळ उठवायचें इतकें ठरल्यावर 'उभ्या दक्षिण देशाचा दस्तुरखुद एकवटलेल्या' या पुणेरी गिरणींतून हवा तो कागद चटकन् पैदा होत असे. भाऊ लेल्या गुप्त होताच त्याचे सर्व हस्तक सुद्धां एकदम एकाकी लुप्त झाले. महात्मेच म्हणायचे!

छत्रपतीच्या उच्चाटनाप्रीत्यर्थ उभारलेल्या नातुशाही कारस्थानांत इतर अनेक जुलूम जबरींचा समावेश 'राष्ट्रीय' पणानें करण्यांत आला होता. जबरदस्तीचा आणि पोलीशी अत्याचाराचा असा एकहि प्रकार राहिला नाहीं कीं जो नातुसंप्रदायांत संग्रहित झाला नाही. या 'लोकसंग्रही' पटकीच्या झटक्यांत महाराष्ट्राबाहेरचे गयेच्या गयावळासारखे यात्रेकरूसुद्धां झपाटले गेल्याशिवाय राहिले नाहींत; मग खुद्द महाराष्ट्रांत घरोघर केवढा आकांत उडाला असेल याची आतां कल्पनाच केलेली बरी. नमुन्यासाठीं एका गयावळ ब्राम्हणाची कैफियत पहा :

''मेहेरबान गौरनर साहेब. सेवेसी अर्जी राघोबा भट नि।। छोटेलाल वैद्य गयावल राहणार श्रीक्षेत्र गया प्रांत बंगाल जिल्हे बिहार अर्ज करितो ऐसाजे. आम्ही वैद्य गयावल याचे मुखत्यार गुमास्ते आहो. या देशांत यात्रा न्यावयासी नेहर्मी येत असतो. येते वेली श्रीभागीरथीची कावड घेऊन श्रीश्वेतुबंध रामेश्वरास जात असतां इलाखा सातारा येथे माहुली मुकामी आमची बाईको आपले बापाचे घरी आहे तेथे मी येऊन राहिलो. तेथून माघ वा. ३० शके १७५० फेब्रुवारी सन १८३८ रोजी बालाजीपंत नातू यांचे जासूद ३ व रसिदेंट वोविन्स साहेब याचे पटेकरी २ व प्रतिनि(धी) चा वकील दाजीबा पटवर्धन ऊर्फ

माहादाजी गंगाधर १ व त्याचे सिपाई ४ ऐ।। दाह आसामी येऊन आम्हास कैद करून रसिदेंटापासी बारावर तीन वाजता आणिले नेथे पाहाऱ्यात कैदेत ठेऊन रसिदंट पुसो लागले की माहाराजाकडून तुम्हास पगार पंध्रा रुपये पोहचतो की काये व माहाराजानी तुम्हास कागद देऊन कोठे पाठविले होते व फितुराबाबद मजकुर काये ठाऊक आहे तो लिहून द्यावा. त्याजवरून जबाव दिल्हा की आम्ही श्रीक्षेत्र गया येथील उपाध्ये आहो. त्याबाबद माहाराजानी उपाध्येपणाचा कागद मात्र आम्हांस लिहून दिल्हा. त्यासिवाय पगार आम्हास पोचत नाही व फितुराबद्दल वगैरे कागदपत्र आम्हास काहीच ठाऊक नाही. असे सांगितले असता रसिदंट साहेब बोलिले की तुम्ही च्यार ४ दिवस येथे राहावे काही पुसावयाचे आहे. आम्ही जबाब दिल्हा जे आठ दिवस पाहिजे तर राहूं. सरकरातून जे पुसणे असेल ते पुरावे. रसिदंट साहब याणी बालाजीपंत किंबे यासी आमच्या खाण्याचा पिण्याचा बंदोबस्त करावा म्हणोन सांगितले. परंतु आमचा ब्राम्हणधर्म करिता कैदेत संध्याकाली दुध खाऊन उपोसीत होतो. दुसरे दिवसी रसिदंट साहेब याणी सांगितले की बालाजीपंत नातु व दाजीबा पटवर्धन सांगतील त्याप्रो ऐकावे. त्याजवरून बालाजीपंत नातू व दाजीबा पटवर्धन या दोघानी आम्हास खोलीत नेऊन सांगो लागले की ज्यपूर जोतपुरचे राजे व सिंदे होलकर गायकवाड याजकडे फितुराबाबद माहाराजानी पत्रे दिल्ही ती आम्ही पोहचविली असे तुम्ही कबूल करून लिहून द्यावे अगर बाला साहेब सेनापति यांचे तरी नाव लिहून द्यावे म्हणजे रसिंदट साहेब याजकडून तुम्हास दाह हजार रुपये बक्षीस व एक गांव इनाम देवितो. यांत तुमचे कल्याण आहे. आम्ही जबाब केला की थोर मनुष आणि असे सरकार खोटे लिहुन देणेविसी बोलता हे ठीक नाही. त्याजवरून बालाजीपंत नातू बोलिले की आम्ही सांगतो हे ऐकावे म्हणजे इंग्रेजी सरकार तुम्हावर मेहेरवानी ठेवितील. तूर्त कैद मंडली आहे त्याणी आमच्या सांगण्याप्रो लिहून दिल्हे त्याजवर रसिदंट साहेब याची मर्जी बाहल आहे. त्याप्रो तुम्हावर खुश मर्जी होईल. हे तुम्ही कबूल होत नाही तर तुम्हास काल्या पाण्यावर पाठऊ आगर फांसी देऊ अथवा वेडी घालून जन्मठेप देऊ असे भय घालून लिहून मागो लागले. परंतु आम्हास मुळीच काही ठाऊक नाही त्यापेक्षा खोटे काय लिहून द्यावे असे बोलिलो. नंतर नातू पटवर्धन याणी आम्हास रसिदंटापाशी आणिले आणि सांगितले की आम्ही सांगितल्याप्रो हे लिहून देत नाही. त्याजवरून रसिदंट साहेब वोविन्स याणी आम्हास धमकी देऊन बहुत घुसा केला की तुम्ही बालाजीपंत नातू सांगतील त्याप्रो लिहून देत नाही तर फासी देऊ अगर काल्या पाण्यावर पाठऊ. हे ऐकिल्यावरून आम्हास जिवाचे भय दिसोन चित बेहोष जाहले आणि मनांत विच्यार केला की रसिदंट साहेब सरकारचे कामगार याचीहि नजर बालाजीपंत नातू सांग- तील तसे लिहून द्यावे. त्यापेक्षा आता काय होणार ते होईल. असे चिंत दिलगीर जाहले. नंतर नातू व पटवर्धन याणी आपला स्वज्ञाती गणेश विष्णु गुणे, कारकून निा मंत्री, यासी आणोन रसिदंटाचे समक्ष, रुजु वोविन्स यांचे समक्ष, कागद लिहविला. त्याजवर माझी सई करून मागो लागले. आम्ही जबाब केला की कागद कशाचा लिहिलात तो आम्हास ठाऊक नाही. मोडीचे अक्षर आम्हास लिहिता येत नाही. असे सांगत असता पटकर्धन व त्याज बरोबर येक दांडगा, गुण्या, होता त्याचे नाव आम्हास ठाऊक नाही या दोघानी माझे हाती लेखणी देऊन हात धरून अक्षरे काढून घेतली. असे तेरा १३ दिवस पर्यंत दररोज वोविन्स रसिदंट साहेब व नातू व पटवर्धन हे कागद लिहून त्याजवर माजे हाते लेखणी देऊन हात धरून अक्षरे काढून घेत होते व आमची कंठाल (केठाळी) जमा करून आणली त्यांत कागदाचा

रुमाल होता तो वोविन्स रसिंदट साहेब याणी आम्हास दाखविला. परंतु त्यांत कागद कोणी काय घातले व काढून नेले हें आम्हास कळले नाहीं. असा जुलूम आम्हावर कैदेत टाकून केला व सिकवीत होते त्याप्रो कबुल न जाहल्यामुले आम्हास साडे आठरा महिने कैदेत ठेविले. रसिंदंट साहेब याजपासी दाद न लागे. गौरनर साहेब सर जेम्स कारनाक सातारियास येतात, हे हिंदू रिवाजास वाकबगार व मोठे आकलवान आहेत, चांगली चौकसी करितील, असा भरवसा धरून आम्ही खुष होतो की जसा परमेश्वर तसेच गौरनर साहेब या आहेत. ते आमची चौकसी करून दाद करतील, परंतु कैदी लोकाची चौकसी काहीच जाहली नाही. इंग्रेजी सरकारात असा जुलूम करून लिहून मागण्याचा कायेदा व दस्तुर नाही. माझी सर्वोपरी नुकसानी जाहली. मोठेमोठे यजमान व राजेरजवाडे व जहागिरदार व संस्थानी याजपासी दक्षणा मागणे व यात्रा नेणेचा उद्योग कर्णे व क्षेत्र गया येथे आमची प्राप्ती मोठी. त्याबद्दल मिलोन सुमारे साठ हजार रुपयाची लुकसानी जाहली. याजकरिता गौरनर साहेबपासी ही अर्जी केली आहे व गौरनर साहेब या देशातील रयतेचे धणी मालक. तेव्हा या लुकसानीचा जाब आम्ही कोणास पुसावा याची तजवीज होऊन हुकूम व्हावा व ही अर्जी कौसलात कौश्यल होईल ते समई मजला समक्ष बोलाऊन दर्याप्ती व्हावी. म्हणजे मजवर बेनाहक वोविन्स रसिदंट याणी बालाजी नारायण नातू व दाजीबा, पटवर्धन व बालाजी कासी किबे याच्या सांगण्यावरून जुलूम केला असी गौरनर साहेब व कौसलदार याची खात्री होईल, गौरनर साहेब दयावंत होऊन चांगली दर्याप्ती करून माझा भिक्षुक ब्राम्हणाचा बऱ्याच होणेविसी कर्णार खाबंद मुखत्यार आहेत. ताा. २४ मार्च सन १८४०.

सही रायोभट ह ।। खुद

स्वराज्यद्रोही नातूकंपूच्या लीला किती उलट्या काळजाच्या असत, याचें प्रत्यंतर या पत्रावरून चांगलेच स्पष्ट होतें. अशी शेकडों पत्रे आहेत व त्यांतील ब्राम्हणी नीचपणा कोणत्याहि विवेकी ब्राम्हणास संताप आणल्याशिवाय रहाणार नाहीं, मग ब्राम्हणेतरांनी शिव्याश्रापांची लाखोली वाहिली, तर आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. सारांश, नातु पटवर्धन प्रभृतींनी बनिया कंपनीच्या अधिकाऱ्यांना बगलेत मारून, सातारचे छत्र- पतीचें तक्त उद्ध्वस्त करण्याच्या कामीं केलेले अत्याचार 'अमानुष' होते, एवढें म्हणून आपण पुढें चालूं लागावें हेच बरें.

□□□

अग्रलेख

मृगजळामागें धांवणारीं हरणें

(लेखांक १ ला)

सरकारी नोकरी हाच काय तो मोक्ष

ब्राम्हणेतर चळवळ सध्या इंद्रधनुष्याप्रमाणें झालेली आहे, त्याचा खरा रंग कोणता हें खुद्द पुढाऱ्यांनाच उमगेनासें झालें आहे. या चळवळीला कोणी जबाबदार कर्णधारच नसल्यामुळें हिचें रंग दरघडीला सरड्याप्रमाणें बदलत आहेत. प्रथमत: हिचा उगम भिक्षुकी वर्चस्वाला हाणून यच्चावत् ब्राम्हणेतर जातींचे सामाजिक व धर्मिक स्वातंत्र्य प्रस्थापित करण्यासाठी झाला, नंतर त्यांत मराठा-मराठेतर भेद अस्पष्ट डोकाऊं लागला व आतां तों अगदीं स्पष्ट उघड झाला. या पुढची पायरी म्हणजे, एकजातीय मराठ्यांचे वर्चस्व अचानक कोणीं मान्य करणार नाहीं, म्हणजे खुद्द ब्राम्हणेतरांतच पुढारलेले आणि मागासलेले असा ठळक भेद करून, या चळवळीला शुद्ध राजकारणी रूप द्यावयाचे आणि सामाजिक धार्मिक प्रश्नांना माजी टाकावयाचे ही. या राजकारणांतहि बहुजनहितवादाची व्यापकता नाहीं. मागासलेल्या वर्गांपैकी विशेष जागरूक अशा मराठा समाजाला, त्याच्या अफाट लोकसंख्येच्या प्रमाणात, सरकारी नोकऱ्या मिळाल्या; म्युनिसिपालट्या, कौन्सिल, असेंब्ली, लोकल बोर्डादि संस्थांत मराठा जातींचे बरेचसे प्रतिनिधि गेले; कीं या राजकारणाची भूक शमणार! सरकारी नोकऱ्यांचा या जातींवर मनमुराद खैरात होतांच, त्याची व इतर सर्व तत्सम मागासलेल्या वर्गांची सर्वांगीण उन्नति होणार, असें ब्राम्हणेतर नांवाची चळवळ करणाऱ्या मराठा पुढाऱ्यांस वाटत आहे. उन्नतीच्या मार्गांत चळवळीचे घोडे कोठे जर अडखळत असेल तर तें येथेंच सामाजिक सुधारणा, आर्थिक उद्धार, धार्मिक स्वातंत्र्य, बौद्धिक पराक्रम वगैरे चट साऱ्या गोष्टी सरकारी नोकऱ्यांच्या खैरातीची यक्षिणींची कांठी फिरतांच चुटकीसरशी घडून येतील, या कल्पनेत ते दंग झाल्यामुळें त्यांनी ब्राम्हणेतर चळवळीचे निशाण आतां फक्त सरकारी नोकऱ्यांच्या प्राप्तीवर रोखून धरलें आहे. सध्यांच्या ब्राम्हणेतर चळवळीचें एवढेंच ध्येय आहे. मराठा तरुणांपुढे हेंच ध्येय ठेवण्यांत येत आहे. ही यक्षिणींच्या कांडीची कल्पकता कितपत योग्य आहे व हिच्यापासून फायदे काय व तोटे किती, याचा या लेखांत शक्य तितक्या निस्पृहतेनें विचार करावयाचा आहे. हें कटू सत्य आहे, पण तें आतां स्पष्ट उघड सांगणें स्थितिप्राप्त आहे. वाचकांनी विवेकाला पूर्ण जागृत ठेवून आमच्या विचारसरणीचा व सूचनांचा काळजीपूर्वक विचार

करावा. अशी प्रार्थना आहे.

इमानी सरकारसेवक म्हणजे नालायक जनसेवक

प्राचीन तत्ववेत्त्यांनी एक सनातन सत्याचें सूत्र चिरंजीव केले आहे तें असें :

नरपतिहितकर्ता द्वेष्यतां याति लोके।
जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन।।
इति महति विरोधे विद्यमाने समाने।
नृपतिजनपदानां दुर्लभ-कार्यकर्ता।।

याचा अर्थ एवढाच की जी इमानी सरकारसेवक तो इमानी जनसेवक राहू शकत नाहीं आणि जो इमानी जनसेवक तो सरकारला प्रिय असत नाहीं. शासित शास्त्यांना समानप्रिय असता प्राणि सशाच्या शिंगाइतकाच दुर्मिळ. आतांपर्यंत ब्राम्हणेतर चळवळींत पुढाकार घेणाऱ्या मराठ्यांनी जनसेवेंचें तर खूपच अवसान आणलें होतें. विशेषत: कै. राजर्षि शाहू छत्रपतींच्या अमदानींत सरकारी नोकऱ्याचे भडाभड राजीनामे देऊन ब्राम्हणेतर चळवळींसाठीं स्वयंसेवा करण्यासाठीं पुष्कळ मराठे वीर मी मी म्हणून मिशीवर पीळ भरीत पुढें सरसावले. कोणी वर्तमानपत्रें सुरू केली, कोणी संप काढले, कोणी व्याख्यानांची धुमश्चक्री चालवली, कोणी ग्रंथमाला काढल्या; असा मारे एकच धडधडाट उडाला! लोकांना वाटले कीं कोण हे देवदूत अवचित आमच्या उद्धारासाठीं अवतीर्ण झाले? शाहू महाराजांचा पाठिंबा जातांच मात्र हे सारें स्वयंसेवक बहाद्दर खरेखुरे स्वत:ची सेवा करणार ठरल्याचे उघडकीस आले. कोणी कोल्हापूर दरबारचे मानकरी होऊन बसले. कोणाला ३५ रुपये, कोणाला ५० रुपये असे लहान मोठे पगार मिळू लागले. कोणी तर प्रत्यक्ष नोकऱ्याच पटकवल्या. चळवळ राहिली चळवळीच्या ठिकाणी आणि हे आपले स्वार्थाच्या भजनी! फुरसदीनें चार दोन व्याख्याने झोडायला मात्र केव्हाही ना नाही. आता तर काय? उघड उघड सरकारी नोकऱ्या हेच या चळवळीचे ध्येय ठरले आहे. या ध्येयाच्या प्राप्तीसाठी मराठे पुढारी आज ब्राम्हणांविरुद्ध तर आदळआपट करीतच आहेत; पण खुद्द ब्राम्हणेतरांतीलच पुढारलेल्या अनेक जातींच्या नावाने खडे फोडून 'ब्राम्हणेतर चळवळ म्हणजे फक्त मराठा जातीची चळवळ' असे नवीन भाष्य प्रचलीत करीत आहेत. या साध्यासाठी ब्राम्हणेतर चळवळीच्या मूळ ध्येयाचे वाटोळे झाले तरी त्यांना आतां पर्वा नाही. ब्राम्हणांना ज्या दुष्कर्मासाठी मराठे दोष देत आले, त्याच दुष्कर्मांत ते आतां या चळवळींचा बळी देत आहेत. प्रश्न इतकाच उरतो की जनसेवेची घमेंड मारणारे वीर महावीर सरकारी सेवावृत्तीचे पट्टेदार बनल्यावर जनसेवा व समाजसेवा कशी काय करणार?

सगळे एकाच माळेचे मणी.

ब्राम्हण नोकरशाही रयतेच्या हिताकडे पहात नाहीं. ब्राम्हण अधिकाऱ्यांकडून रयतेला त्रास होतो, न्याय मिळत नाहीं, जुलूमहि होतो, म्हणून बहुसंख्यांक ब्राम्हणेतर जनतेच्या कळवळ्याचे ब्राम्हणेतर अधिकारी शेकडा ५० ते ७५ प्रमाणांत जर सरकारी नोकऱ्यांचे पट्टेदार बनतील, तर रयतेची आवादानी होईल हा एक मुद्दा नोकऱ्याभिलाषी मराठे पुढारी नेहमीं पुढे आणतात. या मुद्यांत मनुष्यस्वभावाचें जितकें अज्ञान आहे, तितके वस्तुस्थितीचेंहि आहे. सरकारच्या राज्यकारभाराचा गाडा त्यांच्या ठरावीक धोरणांच्या कडक शिस्तीने चालविण्या साठीच 'सरकारी नोकरी' ही संस्था निर्माण झालेली आहे.

राज्यकर्त्यांचे राजकारणी नाटक सूत्रबद्ध व ताळेबंद चालण्यासाठी सरकारी नोकऱ्या या लहान मोठ्या निरनिराळ्या भूमिका आहेत. नाटकांतली हरिश्चंद्राची भूमिका घेणारा नट जात्या जरी कवडीचुंबक कांचनभट असला, तरी त्याची भूमिका वठवितांना त्याला स्वप्नांत दिलेल्या वचनासाठीं राज्यसंन्यास करून सहकुटुंब वनवास पत्करणेच प्राप्त असते. तद्वतच सरकारी नोकरी बजावतांना कोणाहि व्यक्तीला आपली वैयक्तिक हितबुद्धी खुंटीला अडकवून, त्या नोकरीची शिस्त पाळणेच प्राप्त असते. तसे तो न करील तर आपोआप उखडून जाईल. आजहि ब्राम्हण आणि ब्राम्हणेतर असे दोनहि जातीचे नोकर सरकारी नोकर आहेत. पण दोघांच्या वृत्तीत फारसा फरक कांहींच नाहीं. २०-२५ रुपड्या कमावणारा ब्राम्हण कारकून रोज संध्याकाळी कडोसरी फगवून घरी जातो, आणि ब्राम्हणेतर कारकून दररोज दिगंबर बनतो असे मुळीच नाहीं. ८०-९०चा ब्राम्हण ब रजिस्ट्रार २-३ वर्षात कोकणांत 'गांधी' ७-८ हजारांची 'विष्टेंक' करतो, आणि कायस्थ प्रभू किंवा मराठा सब रजिस्ट्रार काय कानांत तुळशीपत्रे कोंबतो? कायस्थ किंवा ब्राम्हण मामलतदार मुनसफ घरीं चालत येणाऱ्या कामधेनूच्या प्रसादाने आपल्या बायकोला पिंवळी ढवळी करतो, आणि मराठा मामलतदार काय रयतेला आपले घरदार धुवून देतो? ब्राम्हण अधिकारी रयतेला वस्तऱ्याच्या धारेवर धरतात, तर ब्राम्हणेतर अधिकारी काय त्यांना बापदेव मानून देव्हाऱ्यांत पुजतात? पाटील पटवाऱ्यादि ब्राम्हणेतरांना ब्राम्हण अधिकारी आंगणांत तिष्ठत उभे करतात, तर मराठे अधिकारी त्यांना झटपट क्षेमालिंगन देऊन आपल्या मांडीवर घेऊन बसतात की काय? न्यायखात्याचीच गोष्ट घ्या. कायस्थ व ब्राम्हण न्यायाधिकारी ब्राम्हणेतरांना नीट न्याय देत नाहीत, अशी एक बुरखेबाज कुरबूर ऐकू येते. ही कुरबूर कोणी उघड बोलून दाखवो न दाखवो, अमक्या तमक्या ठिकाणच्या ब्राम्हण किंवा कायस्थ मामलतदाराला बदलून टाका, अशा अर्थाचे ठराव झालेले पुष्कळ लोकांना माहीत आहेच. ब्राम्हण किंवा कायस्थ सारस्वतादि मामलतदार अगर डे. कलेक्टर अधिकारी सर्वच देवमामलेदार आणि दामाजीपंत असतात असे कोणीहि म्हणणार नाही. परंतु त्यांच्या न्यायान्याय बुद्धीची छाननी त्यांच्या जातीवरून करूं पहाणाऱ्या शहाण्यांना सरकारी नोकरांच्या जातीची माती कसल्या खाणीची असते हेंच कळत नाही असे म्हणावे लागते. एखाद्या खटल्यांत ब्राम्हण डे. कलेक्टराने एखाद्या ब्राम्हणेतर आरोपीला 'संशयाचा फायदा' हि न देतां कडक शिक्षा ठोठावली तर तेथे त्या डे. कलेक्टरांच्या जातीकडे चटकन् बोट दाखविणाराला कोणी झाला तरी हाच प्रश्न विचारील कीं त्या ठिकाणी ब्राम्हणाच्या ऐवजी एखादा इरसाल मराठा डे. क. असता, आणि त्या आरोपीच्या जातीचा मुद्दाच तेवढा विचारात घेऊ त्याला दोषमुक्त केले, तर त्यांत त्याची जातिहितबुद्धी वाखाणावयाची का न्यायबुद्धीचा व्यभिचार निंदावयाचा? सारांश, सरकारी नौकरीवाले जन्मतः कोणत्याहि जातीचे असले तरी ते सरकारचे इमानी अधिकारी बनतांच त्यांची एक निराळीच जात बनते. एखादा रजिष्टर मामलेदार किंवा डेप्युटी कलेक्टर माठाच्या भाजीच्या जुडीपासून तो थेट व्हिस्कीच्या पिंपापर्यंत भक्तजनांचा प्रसाद डोळे मिटून जो मटकावतो, तो मी ब्राम्हण, मी कायस्थ, मी मराठा, या कल्पनेने मुळींच नव्हे. अधिकारी बनला का या सर्व भल्या बुऱ्या या मटकावण्याच्या मटक्यांची उसळ त्यावर उसळच येते. जन्मप्राप्त जाति हिताच्या धोरणाने सरकारी नोकरी बजावणारा माणूस नोकरीप्राप्त जातीच्या चरकांत खड्यासारखा उखडून पडल्याचीहि उदाहरणे नाहीत असे नाही. तात्पर्य, जन हितवाद्याने सरकारहितवादाचे सोंग आणणे, आणि सरकारी नोकराने जनहितवादाची किंवा जातिहितवादाची

मिजास मारणें, या दोनहि गोष्टी अशक्य अतएव ढोंगीपणाच्या होत.

इंग्रजी सत्तेची गेनबाची मेख.

सरकारी नोकऱ्यांच्या सर्व जागा भरगच्च भरून आपल्या विवक्षित समाजांचा सर्वांगीण आत्मोद्धार करण्याची शेखी मिरविणारे पुढारी लोक कसल्या शेणामेणाचे पुतळे असतात आणि नोकऱ्यांच्या हुलकावण्या दाखवून ते आपल्या समाजबांधवांच्या जागृतीचा आपल्या स्वतःच्या हळद कुंकवासाठी कसा उपयोग करून घेतात, हे आम्हांस पूर्ण माहीत आहे. प्रश्न उरतो तो एवढाच की सरकारी कुत्तेगिरीचे पट्टे गळ्यांत अडकवल्यानंतर हे श्वानवृत्तीचे समाज आपला सामाजिक आत्मोद्धार करून स्वराज्याला पात्र कसे होणार? इंग्रेजी राज्यसत्तेचें वर्म जर सेक्रेटरिअटच्या कारकुंड्या खर्डेघाशीत सांठविलेले असते, तर मराठ्यादि ब्राम्हणेतरांपेक्षां चाणक्य बुद्धांत केव्हांहि शतपट प्रवीण असणाऱ्या ब्राम्हणपुत्रांनी या पूर्वीच त्या वर्मांचे मर्म आपल्या निसर्गजात कारकुंड्या कौशल्याने हस्तगत केले असते. मारूतीचे वर्ग त्याच्या शेपटांत होतें कीं टाळक्यांत होते, हा प्रश्न आज फारसा महत्वाचा नसला, तरी इंग्रेजाच्या हिंदुस्थानावरील राजसत्तेचे वर्ग न त्यांच्या चिटणिसी दप्तरांत मात्र खास नाही. वेळ पडली तर दिल्लीच्या कागदी वावड्यांच्या किल्ल्या इंग्रेज सरकार भर्रदिशी हिंदी कारकुंड्यांच्या स्वाधीन करील, आणि म्हणेल कीं

घ्या हें तुमचें स्वराज्य

राजकीय वर्चस्व हे मुळी इंग्रेजी सत्तेचे साध्यच नव्हें. ते साधन आहे. उघड उघड इंग्रेज लोक म्हणजे बनिये आहेत. व्यापारी आहेत. तागडीचे उपासक आहेत. त्यांच्या तागडीच्या वर्चस्वासाठी तलवारीचा आणि लेखणीचा नाइलाज म्हणून त्यांना पुरस्कार करावा लागतो. इंग्रज म्हणजे तागडी आणि तागडी म्हणजे इंग्रज, अशी परिभाषा अंमलात यायला आता फारसा अवधि लागणार नाहीं. तोंडाळ व लेखाला हिंदी लोकांनी काही भयंकर सत्याग्रही अत्याचार केला तर

लेखणीचे स्वराज्य

त्यांच्या गळ्यात अडकवायला धोरणी तागडी आंग्रेज बहाद्दर मुळींच मागे पुढे पहाणार नाहीत आणि नुसते खर्डेघाशींचें स्वराज्य चालवायला जर खास शिवाजीचे मराठेच पुढे येत असतील, तर ती देखील अंग्रेजांना एक इष्टापत्तीच होईल. केवळ लेखणीच्या टोकावर वैयक्तिक सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनाची मान लटकविणारांची संख्या हिंदुस्थानांत जितकी वाढेल, तितके आंग्रेजी तागडीला फायदेशीरच आहे. लेखणीच्या कुरकुरीवर जान कुरवान करायला निघालेल्या क्षत्रिय मराठ्यादि वर्गांनी शेतकीसारखा अर्थधनोत्पादक धंदा लाथाडला, तरी तिकडे दयाळू आंग्रेज सरकारला दुर्लक्ष करून चालणार नाही. हिंदुस्थानासारख्या शेतकीप्रधान खंडाची शेती नापिक राहू देण्याइतके आंग्रेज बहाद्दर नापित खास नव्हतं! कारकुंडेगिरीच्या जबरदस्त पैदासी मुळे जर हिंदी शेती ओसाड पडेल, तर विलायतेच्या टॉमीच्या फलटणी आणून त्यांच्याकडून शेतकीची निगा राखणें त्यांना नाइलाज म्हणून हाती घ्यावीच लागेल.

वऱ्हाड खानदेशातल्या हिंदी कापूस पिकव्यांकडून आंग्रेजी व्यापाराच्या तागडीचे पारडें मनपसंत झुकत नाहीं, म्हणून सक्कर धरणाचा पाया घालून तेथे दयाळू अंग्रेजी व्यापाऱ्यांना कापूस पिकविण्याची योजना सरकारला नाइलाजाने करून देणे भागच पडेल ना? सगळेच शहाणें हिंदी

लोक जर ज्ञानयोगाचे ज्ञानेश्वर बनले, तर मनगट घासून धनोत्पादक धंदे करणाऱ्या विलायती बेरोजगारी कर्मयोग्यांच्या टोळ्याच्या टोळ्या हिंदुस्थानच्या कल्याणासाठी येथे आणणे माबाप सरकारला भाग पडेल आणि त्या दिशेने प्रयत्नांची सुरवातहि होऊ लागली आहे. या शेतकीप्रधान देशांतल्या शेतींत आमच्या शेतकरी वर्गाला जरी माती दिसत असली, तरी मातीचेहि सोने करून त्या सोन्याने विलायतेला पिवळी ढवळी करण्याची किमया तागडीबहादर आंग्रेजांना पुरी माहीत आहे. अर्थात् देशातील सर्व तरुणांची वृत्ति जर कारकुंडेगिरीत रममाण झाली आणि ओसाड पडलेल्या अर्थधनोपादक क्षेत्रावर जर विलायती टोळांच्या टोळधाडी येऊन पडल्या, तर हिंदी लोकांच्या सर्वांगीण गुलामगिरीचा पेला कांठोकांठ भवन, ते साऱ्या तागडीबहाद्दर राष्ट्राच्या पखाली वाहणारे बैल बनल्याशिवाय खास राहणार नाहीत.

नोकरमान्या वर्गाचे आर्थिक वैभव

अज्ञान व नाक्षर दशेतून ज्ञानी व साक्षर दशेंत येत असलेल्या मराठ्यादि मागासलेल्या वर्गाला आज कारकुंडगिरीचा डोंगर मोठा साजरा दिसत आहे. ज्याच्या तीं लेखणी, त्याच्या हातीं परिसाच्या खाणी, अशी त्यांची भावना होऊन बसली आहे. अशा अवस्थेत निवळ कारकुनीवर जगू पाहणाऱ्या समाजांची स्थिती आज काय झालेली आहे, हे त्रोटक रीतीनें अभ्यासून पहाणें आवश्यक आहे. यासाठीं आम्हाला स्वमात्र परिचयाच्या विशेष अधिकाराने चिकित्सा करतां येण्याजोगा महाराष्ट्रीय समाज म्हणजे कायस्थ प्रभू हा होय. तेव्हा त्याचेंच उदाहरण घेतलेले बरें. गेली ३०० वर्ष हा समाज प्रामुख्यानें कलमबहाद्दर म्हणून प्रसिद्ध आहे. मावळांतल्या कांही थोड्या घराण्यांनी प्रत्यक्ष शेती केली व सध्यां करीत आहेत. या शेतीची उत्पत्ती त्यांच्या तलवारींतून झालेली आहे.

परंतु आंग्रेजी अंमदानीपासून यांची तलवारीची उपासना सुटली, शेतकीहि माजी पडली व जगायला फक्त लेखणीचे बोरूचे कांडरू काय ते उरले. कायस्थाची लेखणी हीच त्याचा लाईफ बोय! अर्थधनोत्पादक दुसरे कसलेंहि साधन त्याच्या हाती राहिले नसल्यामुळे, कारकुंडेगिरीच्या बदलत्या रंगढंगाप्रमाणे विद्यार्जनाचे व पदव्यांचे बदलते रंगढंग मिळवूनच हा समाज आजपर्यंत कसा बसा जगत आला आहे. जोपर्यंत कारकुनी क्षेत्रांत स्पर्धा नव्हती, तोपर्यंत या समाजांतील पदवीधर व साधारण चाणाक्ष लोक यांना पोटापाण्याची फारशी विवंचना नसे. कारकुनी पुरती अक्कल मिळविली की संसाराच्या गाड्याला चबचबीत वंगण मिळत असे व जीवन-ध्येयाचाहिं क्षितिज-किनारा हस्तगत होत असे. जीवितसर्वस्वाचे केंद्रीकरण कारकुनी पेशांतच सामावल्यामुळें, अर्थोत्पत्तीचें व उद्योगधंद्याचे इतर मार्ग या लोकांना अज्जीबाद पारखे झाले. कारकुनी म्हणजे कायस्थाचा जीव. त्या पलीकडे आणखी कांहीं जग आहे. किंवा जगांत जगण्याचे कांहीं स्वतंत्र व स्वावलंबी मार्ग आहेत, याविषयी त्यांची कल्पनाच ठार मेली. महिना भर लेखणीची कुरकूर करावी आणि

पहिल्या तारखेला आण्याचे तिकीट

घेऊन मासमुरा घ्यावा व जगावें, यापेक्षा अधिक कसलीहि महत्वाकांक्षा या जातींत जिवंत उरलेली नाहीं. कायस्थाचें प्रत्येक पोर कारकुनीच्याच किंकाळ्या मारीत जन्माला येते. पिंडी ते ब्रम्हांडी. पण ब्रम्हांडांतच कारकुर्नीचे उच्चाटन झालें, किंवा कायस्थेतरानींच कारकुनीच्या ब्रम्हांडांतून स्पर्धेच्या जोरावर कायस्थांचे पद्धतशीर उच्चाटन केले, की कारकुनी पिंडाच्या कायस्थांना प्रतिष्ठित उपासमारी पलीकडे

कसला मोक्ष लाभणार? कायस्थ कारकुनीसाठीच कां घडपडतो? तर जीवनकलहांत टिकाव धरण्यासाठी कारकुनीपेक्षां दुसरी कसलीहि अक्कल त्याच्यापाशी शिल्लक नाही म्हणून. 'इस्कूल फलानेल' झाला किंवा 'गरजू एड' झाला, तरी कारकुनीच्या कुंपणापर्यंतच या सरड्यांची धाव! जेथे पिंडच ठेंचाळला, तेथें ब्रम्हांडांत काय आढळणार? शिवाय, कारकुनीचे वैभव मिठागरांतल्या टॅलीक्लार्कपासून तों डेप्यूटी कलेक्टरापर्यंतचे असलें, तरी अर्थप्राप्तीचे प्रमाण काम तसा दाम असल्या ठरावीक मानाचेंच असणार. कारकुनाची कारकुनी व स्वतः कारकून जिवंत आहे तोपर्यंत महिना गेला, वर्षे गेली, पगार वाजे खणाणा नोकरि जातां, स्वतःच सरतां, कुटुंब करते ठणाणा

अशी परिस्थिति शेकडां ९० कुटुंबांची झालेली आहे. शेतकी किंवा इतर स्वतंत्र उद्योगधंदा करणारे लोक दुर्गादेवी दुष्काळाच्या तुफानांत सांपडले तरी कोंड्यावर जगण्याची त्यांची हिंमत असते. परंतु ठरावीक तनख्यावर जगणारा कारकूनवर्ग तनखा नसला कीं सुबत्तेच्या दिवसांतच भिकेला लागतो. कारकुनी पेशाचा दुसरा भयंकर दोष म्हणजे ठरावीक कामाचा ठरावीक दाम घेण्याची सवय किंवा सवलत हाडमासी खिळल्यामुळे, साहस घडाडी महत्वाकांक्षा काटकपणा इत्यादी आत्मोन्नतिवर्धक व राष्ट्रोन्नतिपोषक गुणांचा या वर्गांत खड खडाट होतो. अर्थात् असल्या विनसाहसी अल्पसंतुष्ट हमालांची संख्या राष्ट्रांत वाढविणें हें अखंड गुलामगिरीचेंच चिन्ह होय. अशा अवस्थेत अर्थोत्पादक स्वतंत्र उद्योग धंद्याकडे तरुणांची मनें वळविण्या ऐवजीं त्यांना कारकुनी वैभवाचे व्यसन लावणारांनीं आपल्या आत्मघातकी चळवळीचा नीट विचार करावा.

(पुढे चालूं.)

□□□

लेख

श्रीहरीच्या चरणीं

प्रबोधनाच्या जीवनक्रमांतील चवथ्या वर्षाचा हा शेवटला १२ वा अंक जनतारूप जनार्दनाच्या चरणीं सादर अर्पण करून, आश्रयदात्यांच्या व्यावहारीक ऋणांतून आज आम्ही मुक्त होत आहों. नवीन वर्षारंभापूर्वी गत वर्षातील प्रबोधनाच्या बऱ्या वाईट जीवनदशेचा आढावा काढून, तो त्याच्या जीवनदात्यांच्या पुढें स्पष्ट मांडण्याची हीच वेळ आहे. या वेळीं कोणत्याही प्रकारचा आडपडदा न ठेवतां, गेल्या वर्षांतील आमच्या बऱ्यावाईट अनुभवांचे सर्व दाखले, वाचकांपुढें ठेवून, त्यांच्या न्यायबुद्धीची आम्हांला याचना करावयाची आहे. या आत्मनिवेदनामुळें गेल्या सबंध वर्षांत प्रबोधन व प्रबोधनकार यांच्यावर हितशत्रूंकडून जे जे गुप्त कारस्थानाचे आघात झाले, पुण्याच्या आंगवळणी पडलेल्या गटार गप्पांमुळें आम्हांला जो ताप भोगावा लागला आणि निष्कारण गैरसमजाचीं वावटळें उठलीं, त्यांचा भ्रमनिरास होईल, अशी आम्हाला आशा आहे.

गेले वर्ष सर्व देशाला अत्यंत विचारक्रांतीचें व विकारांदोलनाचें गेलें. राजकीय व सामाजिक क्षेत्रांत तर इतकी भयंकर तुफानें झालीं कीं अनेक मोठमोठे पुढारी माजी पडून, अनेक क्षुद्र प्यादीं फर्जी म्हणून पुढें मिरवूं लागलीं. वाङ्मयक्षेत्रांतहि हाच प्रकार. राष्ट्रीय ऐक्याचें पर्यवसान आज हिंदु मुसलमानांच्या अमानुष रक्तपातांत होत आहे. सामाजिक संघटनेची पुराणें सुरू असतांनाच ब्राम्हण-ब्राम्हणेतरांचे ठळक भेद आज सख्या भावाभावांत आडवा विस्तव जाऊं न देण्याइतक्या तीव्रतेत भडकले आहेत. वर वर दिसणाऱ्या डझन अर्धा डझन राजकारणी पक्षभेदाच्या आजूबाजूला नजर टाकली, तर माणसागणित व्यक्तिभेदाची दाट कुंपणें सर्वत्र पडलेली स्पष्ट दिसत आहेत. ब्राम्हणवर्गाच्या सामाजिक संघटनेची माहिती आम्हीं देणें अनधिकाराचें होईल. परंतु ब्राम्हणांशिवाय इतर सर्व बहुजन समाजाचा हितवाद करण्यासाठीं सरसावलेल्या ब्राम्हणेतर पक्षांतहि आज कसलीच एकतानता उरलेली नाही. तेथेंही बारा पुरभय्ये आणि तेरा चुलीचाच प्रकार! बिचाऱ्या अस्पृश्यांची दैना तर सांगायलाच नको. त्यांच्या प्रतिनिधित्वाचा मामला म्हणजे बिनवारशी पेढी. वाटेल त्यानें शेट व्हावे आणि पुढारी म्हणून खुशाल मिरवावें! अशा या सर्वव्यापी दंगलींत स्वतंत्रमतवादी प्रबोधनाला हरघडी कोपरखळ्यांची खैरात मिळाल्यास नवल ते काय! बाह्यात्कारीं प्रत्येक चळवळ्या जरी अभेद जनसवेची भाषा बोलतो,

तरी अंतदृष्टीनें प्रत्येकजण आपापल्या जातीपुरताच पहात असतो. ब्राम्हण जातीपुरते पहातात म्हणून ब्राम्हणेतर पक्ष निघाला, तेंथेहि जाती महात्म्यांचे थेर जबरदरत! कौन्सिल इलेक्शनच्या हंगामात हें जातिमहात्म्य कोणाला फारसे जिभेवर नाचतांना दिसलें नाहीं, तरी त्याची सर्व सूत्रें अंतःकरणांत हालत असतातच. अशा अत्यंत घोटाळ्याच्या सर्वव्यापी अवस्थेंत प्रबोधनाच्या कार्यांत किती अडथळे येत असतील, याची सज्जन वाचकांनी कल्पनाच केलेली बरी.

कांहीहि असले तरी आमची जात आम्हांला लपवितां येत नाही. ती लपत नाहीं आणि कोणी लपवूंहि देंत नाहीं. ब्राम्हणांचे -विशेषत: चित्पावनांचे-आणि आमच्या जातींचें मोठें प्रेम! परंतु ब्राम्हणेतर पक्षांत सुद्धां आमच्या जातीकडे चित्पावनी कृपादृष्टी टाकणारे वीर पुष्कळ आहेत. बरें, खुद्द आमच्या जातभाई कायस्थांकडे पहावें, तर त्यांचीहि आमच्यावर चित्पावनी मेहरबानीच. या मेहरबानीचा पारा सन १९२३ सालच्या आमच्या हुंडाविध्वंसनाच्या चळवळीनेंच फार वर चढला, हे प्रबोधनाच्या वाचकांना तरी नव्यानें सांगणें नको. आज ठाकऱ्यांचें नाव निघतांच सचैल स्नान करणारे कायस्थ प्रभू वीरपीर शेकडां ८० सांपडतील. या जातींत भांडवलशाही मुळींच नसली तरी नोकरमानी व कायदेबाज साहेबशाही बरीच आहे; आणि तिची आमच्यावर अगदीं पहिल्यापासून कडवी मेहरनजर! तिगस्तसालीं छापखाना खरेदीच्या पुणेरी फांसात ठार बुडाली. त्यावेळीं ब्राम्हणांपेक्षा कायस्थानांच हर्ष झाला. निष्कांचन स्थितींत दादर येथे आसन्नमरण आजारी पडलों असतां, आणि पुण्यास मुद्रणयंत्राचें तुकडे तुकडे उडाले असतां 'ठीक झालें. बेटा फार शेफारला होता. देवाने हाडेंहि मोडली व छापखानाहि मोडला' असे उद्‌गार काढणारे कायस्थच. 'कोदंडाचा टणत्कार' मुंबईस छापण्यासाठीं दिला असतां, छापखानेवाल्याच्या नाकांत काड्या घालून, त्याला हस्तलिखित प्रत परत करण्यास उद्युक्त करणारे हुंडाशायलॉक कायस्थच. केवळ आमच्या शब्दावर विश्वसून तीन हजारांचे मुद्रणसाहित्य पुरविणाऱ्या व्यापाऱ्याला चिथविण्याचें काम करणारे आमचे जातभाईच. फार काय, पण सध्यां आमच्यावर चाललेल्या खटल्याचें वकीलपत्र श्री. गडकरी यांनीं घेतलेंच कशाला, म्हणून त्यांच्या बिऱ्हाडीं खेट्या घालणारे वीर कायस्थ प्रभूच. भटांनी या भटाळलेल्यांनीं आमच्या पाडावाचा प्रयत्न केला, अथवा आपल्या पत्रांतून आमच्या विषयीं वाटेल तो कलमकसायीपणा गाजविला, तर त्यांत कांही आश्चर्य नाहीं. परंतु, वाचकहो, ज्या जातींत आमचा जन्म, त्या जातींतले मर्द वीर आम्हाला कोणत्या भावनेनें लेखतात ते आपण नीट विचारांत घेतलें, तर स्वजातिवर्चस्वाच्या उद्देशाचा आमच्यावर आरोप करणारे ब्राम्हण व ब्राम्हणेतर किती मूर्ख आहेत याचा तेव्हांच उलगडा होईल. तात्पर्य, आम्हीं ज्या विशिष्ट मतांचे प्रवर्तक, तीं तत्त्वें भट भटेतरांना तर मान्य नाहींतच, पण आमच्या जातभाईंनाहि पटत नाहींत. अर्थात्, प्रबोधनकार ठाकरे यांची अस्पृश्या पलीकडे आणखी कोणती स्थिति आहे?

पण वर्तमान काळाचा दण्डकच असा दिसतो कीं कोणाहि हिंदु माणसाला जातीशिवाय समाजांत व पक्षाशिवाय राजकारणांत जगण्याची परवानगीच नाहीं. एका क्षणाला पशू लगेच दुसऱ्या क्षणाला पक्षी, अशा वटवाघुळी स्थितीपेक्षा कसल्यातरी पक्षाचे पंख व कोठल्या तरी जातीची माती पत्करणें अधिक व्यवहारी खरें, पण जेथें जातीभेदाविरुद्धच आमचा कटाक्ष आणि राजकारणी पक्षभेदच आम्हांला अमान्य, तेथे आमची जात व पक्ष कोणत्या परिभाषेनें व्यक्त करावा! एवढें मात्र खरें कीं आम्ही व आमचा सहकारी मित्रवर्ग ज्या मातीचा आहे, त्या मातीचीहि एक जात आहे, मग तिला कांही नांव

असो वा नसो. या निनांवी जातींत लोकहितवादाचें एक निश्चित ध्येय पुढें ठेवून काम करणारी जी मंडळी आहेत, त्यांत लौकिकी परिभाषेनें ओळखले जाणारे ब्राम्हणहि आहेस आणि ब्राम्हणेतरहि आहेत, आणि प्रबोधन द्वारा जे विचार व्यक्त होतात ते या अल्पसंख्य हिदु सुधारकांचेच असतात. या हिंदु सुधारक संघाचा व्याप आज अगदींच चिमुकला आहे. याची मतें आज तरी निदान कधींच लोकमान्य व्हावयाची नाहींत. तीं कोणाला आवडोत वा नावडोत, तीं यथाक्रम प्रबोधनांत प्रगट करून ठेवावी, शक्य तितकी निमूटपणें आचरणांत आणावी आणि साधेल तितकें लोकहिताचें कार्य करीत राहावे, अशी ही कार्यपद्धति आहे. हिंदू समाज-सुधारणेच्या ज्या क्रांतिकारक विचारांनीं स्वयंस्फूर्त होऊन, आम्हीं हा प्रबोधन कार्याचा पेशा पत्करला, त्या विचारांचें आणि भिक्षुकशाही भांडवलशाही साहेबशाही आणि सरदेशाही यांचे कट्टे हाडवैर. अर्थात् केवळ राजकारणी भुसाड गोष्टीसाठीं सरकारशीं कागदी युद्ध करणाऱ्या देभ वीर पोरांपेक्षां आमच्या कार्यक्षेत्रांत विरोधकांचा विरोध विशेष दांडगा आणि विशेष निकटचा. कोणत्याहि देशाचें कोणत्याहि काळचें प्रबोधनकार्य अनंत आधीव्याधींतून होरपळत तडफडतच करावें लागलेलें आहे. महाराष्ट्रांत व विशेषत: पुण्यांत-एकहि हिंदु समाजसुधारक, मग तो आगरकरांसारखा ब्राम्हणेतर असो, भिक्षुकशाही या धुळवड शेणवडींतून वांचलेला आढळणार नाहीं. प्रश्न सामाजिक सुधारणेचा असो, धार्मिक मतांच्या उलथापालथींचा असो, नाहींतर ऐतिहासिक सत्यशोधनाचा असो, नाठाळ भिक्षुकशाहीचा एकच महामंत्र 'खरे बोलू नका, बोलाल तर निदान स्पष्ट बोलू नका' गेल्या वर्षांतील आमचा असा अनुभव आहे कीं सामाजिक सुधारणेंची आमचीं कडवीं जहाल मते भिक्षुकशाही निमुटपणें ऐकून घेईल; पण आम्ही सातारा प्रकरणीं जे ऐतिहासिक सत्यशोधन प्रबोधनाद्वारां सुरू केलें आहे, ते मात्र तिला मुळींच सहन होत नाहीं. या आमच्या महापातकाबद्दल आम्हांला भयंकर प्रायश्चित्त भिक्षुकशाही देणार आहे. तशी तयारीहि चालू आहे आणि आमच्यावरील आतांचा खटला म्हणजे 'परस्पर पावणेतेरा' या लोकविश्रुत भटी पॉलिसीची पहिली पेशवाई सलामी आहे.

'परस्पर पावणे तेरा' ही भटी कारस्थानाची मख्खी आम्ही आजपर्यंत शेकडों वेळां उघड बोलत आलों आहों. आमच्या सर्व ग्रंथांनी जर विशेष कोणतें काम केलें असेल तर तें हेंच कीं ऐतिहासिक पुराव्यांनीं आम्ही भिक्षुकशाहीचे थेर मुळांसकट उचकून, लोकमतावरची भिक्षुकी मांड अगदीं खिळखिळी करून टाकली आहे. सन १९१८ साली आमचा 'कोदण्डाचा टणत्कार' बाहेर पडल्या दिवसापासूनच भिक्षुकी छावण्या आमच्या पाडावाचा प्रयत्न करीत आहेत. आज ब्राम्हणेतर चळवळींतून जे विचार सोसाट्यानें बाहेर पडत आहेत, त्यांची स्फूर्ति मुख्यत: ठाकरेकृत वाङ्मयाने रंगविली जात आहे, ही गोष्ट भटांप्रमाणेंच आम्हांलाहि नाकबूल नाहीं. कंसाला ज्याप्रमाणें कृष्ण जळीं स्थळीं काष्टीं पाषाणीं दिसे, तद्वतच आज एकजात भटांना ठाकरे आणि त्यांचा लेखनव्यवसाय दिसत आहे. पुणें शहर म्हणजे भिक्षुकशाहीची राजधानी. जोपर्यंत आम्हीं मुंबईला होतो, तोपर्यंत पुण्यांतल्या भिक्षुकी घालमेली अप्रत्यक्ष कळत; पण गुदस्त सालीं आम्ही पुण्यांतच प्रस्थान ठेवल्यामुळें त्या आम्हाला प्रत्यक्षच दिसतात. असा आमचा एकहि ग्रंथ अथवा लेख नाहीं कीं जों प्रसिद्ध होतांच 'यावर खटला करतां येईल कीं नाहीं?' याचा खल भटी पत्रकारांनींच बेसुमार चिथावलेलें! अर्थात् आम्ही जेव्हां या हिंदी संस्थानद्वेष्ट्या भटांवरच प्रतिकाराचीं चढाई केली, तेव्हां त्यांचा कोपाग्नी आमच्यावर किती भडकला असेल याची कल्पनाच केलेली बरीं.

होळकरांचा राजसंन्यास.

गेल्या वर्षी प्रबोधनानें हुंडाविध्वंसना इतक्याच जोमानें जर कोणता विषय हातीं घेतला असेल, तर तो होळकर प्रकरणाचा. हें प्रकरण आम्हीं हातीं का घेतलें? कोणत्या बुद्धीनें घेतलें? आमचा दृष्टीकोण कोणता? आमच्या शंका व भयें कितपत खऱ्या ठरल्या? इत्यादि अनेक मुद्द्यांचा स्पष्ट खुलासा याच अंकीं करून, या प्रकरणांवर अखेरचा पडदा टाकणार आहोंत. या स्पष्ट आत्मनिवेदनांत ज्यांचा ज्यांचा नाइलाज म्हणून नामनिर्देश आम्हांला करावा लागेल, त्या त्या सज्जनांनी आमच्या हेतूंचा अर्थ नीट समजाऊन घेऊन, मग वाटेल तर बेअब्रूच्या खटल्यासाठीं कज्जेदलालांचे पाय धरून कोर्टाची पायरी चढावी. आमच्या हितशत्रूंनीं आपल्या ब्रीदाला व बीजाला शोभतील असे कितीहि गटारयंत्री गैरसमज सर्वत्र फैलावले असले, तरी त्याची आम्हांला मुळींच पर्वा नाहीं. त्यांचें काम ते करतात व करतील. आमचेंहि आत्मनिरूपणाचें काम आम्हाला केलें पाहिजे.

सातारच्या दुर्दैवी प्रतापसिंह छत्रपतीच्या उच्चाटनाचा समग्र इतिहास गेलीं दहा वर्षे आम्ही अभ्यासित आहोंत. या इतिहासाच्या संशोधनासाठी इतर अनेक तत्सम दुर्दैवी हिंदू मुसलमान राजांचेहि इतिहास अभ्यासाचे लागले. या अभ्यासामुळें आमची काहीं काहीं विशिष्ट मते सिद्धांतरूप बनली आहेत आणि चालू घडीच्या प्रत्येक गोष्टींत जुनाच इतिहास आपली पुनरावृत्ति किती बिनचुक ठोकताळ्याने घडवीत असतो, हें कौतुकाने आजमाऊन पाहण्याचें आम्हाला जवळ जवळ एक व्यसनच लागलें आहे म्हटलें तरी चालेल. काळावरोवर माणसाच्या कल्पना कितीहि बदलत्या, तरी संस्कृति ही अशी एक चमत्कारीक चीज आहे कीं ती वाटेल त्याबदललेल्या परिस्थितीच्या रंगभूमीवर जुनेच नाटक हुबेहूब वटवून दाखविते. फक्त थेटर कपडे सीनसीनरी व पात्रे मात्र नवीन. बाकी प्लॉट तोच, देखावे तेच, भाषणें तीच आणि नांदी भरतवाक्यहि तसेंच. हिंदी संस्थानिकांच्या राज्यसंन्यासाविषयीं या दृष्टीने विचार करण्याची प्रबोधनाचा हां कांही पहिलाच प्रसंग नव्हें. दुसऱ्या वर्षाच्या शेवटल्या अंकांत (पृ. १८० ता १६ सपटंबर १९२३) नाभा प्रकरणावरील 'इतिहासाची पुनरावृत्ति' हा आमचा अग्रलेख ज्यांनी वाचलेला आहे, किंवा आताहि जे कोणी मुद्दाम वाचतील त्यांना आम्ही असल्या प्रकरणांकडे कोणत्या दृष्टीने पहातो व कसल्या विचारांची वाचकांना दीर्घ सूचना देत असतो, हें विशेष खुलाशानें सांगण्याचे श्रम वाचतील. व्यक्ति आणि चळवळी यांची विद्यमान बाह्य आवरणें कशीहि कडक भडक असली, तरी इतिहास हा असा विलक्षण शोधनप्रकाश आहे कीं तो त्यांच्या खऱ्या अंतरंगाची कुंडली बिनचूक मांडून ठोकताळ्याचा निश्चित इशारा तेव्हांच देतो. रोजच्या व्यवहारांत सुद्धा कांहीं कांहीं दाखले विचार करण्यासारखें असतात. आळीत एखादें कुतरडे जर दररात्री रडत फिरूं लागलें तर अनुभवी वृद्ध लोक म्हणतात की 'आपल्या आळीत कोणावर ना कोणावर तरी यमराजाची हुंडी येणार खास.' तद्वतच इतिहासाची अशी बिनतोड खटक्याची साक्ष आहे कीं एखाद्या हिंदी राजाविरुद्ध भटी कुत्री रात्रंदिवस रडूं लागलीं तर १२ महिन्याच्या आंत त्या राजाचें कडबोळे झालेच पाहिजे. पूर्ण गरगरीत वाटोळे झाले नाही, तरी अर्थाअर्थी झालेच पाहिजे. सातारा प्रकरण घ्या, नागपूर घ्या, मल्हारराव गायकवाड घ्या, शिवाजीराव होळकर घ्या, कोल्हापूर घ्या आणि ताजें इंदोर घ्या. सगळीकडे एकजात एकरंगी एकशिंगी मासला. उगवत्या मावळत्या गव्हर्नर व्हाईसरायांची हिंदुस्थानविषयक भाषणें जशी एकाच ठरीव साच्याची, तशी ही ऐतिहासिक परंपरेची गेनबाची मेख सुद्धा ठरीव साच्याची, ठरीव धोरणाची,

ठरीव वळणाची आणि ठरीव आडाख्याची. त्यात अणुमात्र फरक पडावयाचा नाही. वेळीं ज्योतिष शास्त्राचे ठोकताळे चुकतील, पण इतिहासशास्त्राचे चुकणार नाहींत. महाराष्ट्रांतल्या यच्चावत भट भटेतर समाजांची कुंडली महाराष्ट्रेतिहासांत उमटलेली आहे; आणि कोणी कितीहि बदलत्या रंगाढंगाचे थेर करूं लागला तरी अखेर तो मूळ वळणावरच गेला पाहिजे, हा सनातन सिद्धांत आहे. किंचित स्पष्ट सांगायचे तर हा रक्ताचा प्रश्न आहे. ठाकऱ्यांनी होळकरांची बाजू कां उचलली? त्यांनीं नाहीं उचलायची, तर काय भटांनीं उचलायची? एकजात भटी पत्रांनी होळकर प्रकरणाच्या पराचा कावळा करून इंदोरास सातारा कां उमटविला? कां म्हणजे? भटांनीं आजपर्यंत हीच कामे केली व करीत आहेत. यापेक्षा निराळे विशेष कांही करण्याचे माहात्म्य त्यांच्या रक्तांतच नाही. क्षत्रिय मराठे पत्रकार व पुढारी प्रथम अगदीं स्वस्थ का बसले आणि सारी दिल्ली गडगडल्यावर एकदम डुरकण्या का फोडूं लागले? त्यांची हीच सनातन प्रवृत्ति. ता म्हणताच ताक भात ओळखण्या इतका दूरदृष्टीचा पोच जर मराठ्यांच्या अवसानांत असता, तर छत्रपति पेशव्यांचे गुलाम कधींच नसते आणि मराठे आज आहेत त्यांपेक्षा कांहीं निराळ्याच स्वयंनिर्णयी स्थितींत असते. भटी प्रवृत्ति अष्टपैलू, तर कायस्थ व मराठे एकांगी. भटी धोरणांची नाडी कायस्थालाच पुरी उमगायची. ते मराठ्यांचें कामच नव्हे. ती त्यांची प्रवृत्ति नव्हे, तो त्यांच्या रक्ताचा संस्कारच नव्हे. मराठ्याला कोणत्याहि घटनेचे पाचपेंच चटकन उमगत नाहींत. कोणतीहि गोष्ट त्याच्या काळजाला भिनायला फार वेळ लागतो; आणि त्या गोष्टीचा भटांनीं एळकोट करायला आणि मराठा खवळायला जवळ एकाच घडीची गांठ पडतें. आजपर्यंत हें असेंच होत आलें आहे. ज्या ज्या वेळी भटेतरांनीं भटी कारस्थाने हाणून पाडली, त्या त्या वेळी 'मराठा धडावर कायस्थी डोकें' असा बिनतोड संयोगच इतिहासांत दिसून येईल. शिवशाहीपासून तों मराठ्यांच्या उरल्या सुरल्या देशी राज्यासाठी कायस्थ प्रभू मुत्सद्दीच श्रमत मरत आले आहेत. देशांतील व परदेशांतील झाडून साऱ्या कायदे पंडित चंद्र सूर्यांच्या मसलती बोथट पडल्यावर, इंदौर प्रकरणांतहि होळकरांना अखेर कायस्थी मसलतीचाच विश्वास शोधावा लागला ना? भट भटेतर आणि मराठा मराठेतर भेदांच्या वर्तमान दंगलींत आज कायस्थ प्रभु न हिंदुर्न यवन: झाले असले आणि मराठा संस्थानाधिपतींच्या रियासतींतहि आज कायस्थांचा भाव कांहींच उरला नसला, तरी कायस्थ प्रभूंचा देशी स्वराज्यांचा अभिमान आजच ठार मेलेला नाहीं; निदान प्रबोधनकाराचा तरी मेलेला नाहीं. अशा स्थितींत वृत्तपत्रकार नात्यानें इतिहासाची साक्ष डोळ्यापुढे ठेऊन, होळकरांच्या अफाट निंदकसेनेला तोंड देण्यासाठीं आम्ही एकटेच कायस्थ लेखक पुढें सरसावलों आणि सर्व शक्तिमान् प्रतिस्पर्ध्यांच्या उघड गुप्त शरवर्षावांनी घायाळ होऊन पडलों, तर त्यांत नवल तें काय आणि दु:ख तरी कशाचे? भटांनी आपल्या रक्ताचा गुणधर्म गाजविला आणि आम्हीहि आमच्या जातीच्या लोकविश्रुत परंपरेला पारखे न होतां, रक्ताची आठवण ठेऊन, इंदोरच्या स्वराज्याची वकीली केली. असलीं कामें भाडोत्री तडफेनें होत नसतात. त्याला रक्ताचा जिव्हाळा आणि परंपरेचा अभिमान लागतो. होळकरांनीं फंडगुंडी आणि टाळकुट्या कलमबहाद्दल भटांना काय थोडेथोडके मलीदे चारले? पण अगदी होळीपौर्णिमेलाच होळकरांची होळी होत असतांना या भटांनी निदान कर्तव्य म्हणून तरी कृतज्ञतेची एखादी वेदोक्त बोंब मारावयाची होती. इस्लामपूरच्या ब्राम्हणपत्रिकेंत ठाकरे व त्यांच्या कायस्थ प्रभू जातीचा उद्धार करणाऱ्या पवित्र ब्राम्हणाला आपल्या वेदमान्य लेखणीचा उपयोग असल्या निष्कारण शिमग्याकडे करण्याऐवजी, महाराजांकडून मिळणाऱ्या

मासिक दीडशें रुपये वेतनाची कृतज्ञता खात्रीनें सत्यनिरूपणाद्वारें व्यक्त करतां आली नसतीच असें नव्हे. पण भटी संस्कृतीत हा गुणधर्मच नाहीं. तेव्हां त्यांचा तरी इलाज काय?

तेथें पाहिजे जातीचें.

५ नवंबर १९२४ पासून तों १९२५च्या फेब्रुवारीपर्यंत आम्ही दादर येथें आसन्नमरण आजारी होतो. फेब्रुवारीच्या मध्यावर पुण्यास आलों. मार्च अखेर प्रकृति साधारण सुधारतांच प्रबोधनाच्या प्रकाशनाच्या खटपटीकडे लागलों. या वेळीं भटी पत्रांचा होळकरी शिमगा अगदीं कडेलोटावर थैमान घालीत होता आणि बडोद्याच्या 'जागृती' शिवाय इतर सर्व ब्राम्हणेतर व विशेषत: मराठ्यांचीं 'मुखपत्रें' अगदी थंडगार स्वस्थ बसलेली आढळलीं. मराठा संस्थानिकावर भयंकर प्रसंग आणि मराठे कलमशिलेदार स्वस्थ? एरवीं फंडासाठीं इंदोरास डेप्युटेशनावर डेप्युटेशनें नेणारे मराठे पुढारी सुद्धां थंडगार! भटी पत्रांतून नाना प्रकारचे आचकट विचकट चिथावणीचे लेख व संतापजनक कार्टून चित्रें साऱ्या महाराष्ट्रभर थैमान घालीत आहेत, तरीहि एक मराठा पत्रकार व पुढारी ब्र काढीत नाहीं? एरवीं एखाद्या निपुत्रिक धनाढ्य ओंडक्याला पुत्र होतांच, त्यावर अभिनंदनाचे लेख लिहिणारे पत्रकार अणि धडाधड सभा भरवून जाहीर अभिनंदनाचे ठराव पसार करणारे जातीवंत पुढारी याच भयंकर घटनेच्या प्रसंगी दगडी पुतळ्याप्रमाणें स्वस्थ कां? भटी पत्रांच्या संघटित माऱ्यानें देशी नृपतींचा कोंडमारा कसा करण्यांत येतो. सत्य स्थितीची मुंडी मुरगाळून पराचा कावळा कसा नाचविण्यांत येतो आणि देशी राजांची बाजू स्पष्ट पुढें मांडण्याची साधनें मुळींच नसल्यामुळें 'लोकहितवादी' छत्रपति 'स्वराज्यद्रोही छत्रपति' म्हणून कसा गिरविला जातो, इत्यादि पुराव्याच्या गोष्टींची कै. शाहू छत्रपतींच्या विस्तृत चरित्रग्रंथांत रात्रंदिवस पारायणें करणाऱ्यांनाहि होळकर प्रकरणाच्या आदिअंताचा अंदाज अजमावतां येऊ नये, त्यांनी अगदी कडकडीत मूग गिळून बसावें, हा सर्व प्रकार पाहून आम्ही तर अगदी चकितच झालो! ज्यांच्या हातीं विस्तृत प्रसाराचीं मोठमोठी लांबरुंद ब्राम्हणेतर साप्ताहिके तेच जर गारीगार बसलेले, तर आमच्या सारख्या एकांड्या कायस्थ शिलेदारानें पुढें होऊन तरी काय उपयोग?

पण-पण आमचीही कायस्थ परंपरा व रक्ताची तळमळ आम्हाला स्वस्थ बसू देई ना. या वेळी आमचे वृद्ध भीष्माचार्य कै. भाईसाहेब गुप्ते हयात असते तर ते स्वस्थ बसले असते काय? १८९६त शिवाजीराव होळकरांवर भटी कटवाल्यांचा असलाच गहजब उसळला असता, माईसाहेबांनी शक्ती युक्तीच्या जोडीनेंच गाजविलेली कलमबहाद्दरी, तेव्हांच्या व आजच्या भटांना कितीहि 'भिकारडी' वाटली, तरी तिचें महत्व इंदोरला विसरतां येत नाही व आम्हांला डावलता येणार नाही. भटीपत्रांच्या खुनशी चिथावणीने सारा देश शिवाजीराव होळकरांवर. बिथरला असतां, खऱ्या ब्राम्हणी वृत्तीने सत्यशेधनाचे ज्या 'धनुर्धारी' टिकेकरांनीं लोकमतच्या वाह्यात वावटळींची पर्वा न करतां 'इंदोर प्रकरणाची खरी आणि दुसरी बाजू' धडाडीने महाराष्ट्रापुढें मांडली, तो हयात असता तर आज हात जोडून स्वस्थ बसला असता काय? फार दूर कशाला, ज्यांनी धनुर्धारीच्या जोडीनेंच 'प्र'सहीने बडोदावत्सलांत अनेक लेख लिहून होळकरांच्या निंदकांना जबरदस्त शह दिला ते आमचे मातुल पितामह कै. राजारामपंत गडकरी आज जिवंत असते, तर वृद्धाबस्थेच्या आत्यंतिक क्षीणतेत सुद्धां ते निष्क्रिय बसले नसते. हे सर्व जन कालवश झाले, पण 'मी तर मेलो नाहीं ना? १८९६ साली कोमल विद्यार्थी दशेत 'प्र' चे सारे लेख लिहिण्याचे भाग्य ज्या याच लेखणीला लाभलें, ती लेखणी तर मेली नाहीं ना?' या व असल्या

विचारांनींच आमच्या वर्तमान इंदौरविषयक लेखांचा पार्श्वभाग तयार केला.

असली कामे देणग्यांच्या हमेण्यांनी साधत नसतात. त्याला जातीवंत कळवळा लागतो. त्याला परंपरेची पुण्याई लागते. इंदोरची दिवाणगिरी व कमांडर इन चीफगिरी गाजविली, पण वेळ येतांच सड्या वस्त्रानिशीं भाई साहेबांनी इंदोरला रामराम ठोकला ना? होळकरांच्या कितीश्या हमेण्या वृद्धापकाळी त्यांच्या उपयोगी पडल्या? धनुर्धारी टिकेकराची होळकरांनी कितीशी झोळी भरली? ज्या 'प्रभाकर' साप्ताहिकांत त्यांची लेखमाला क्रमशः प्रसिद्ध झाली, त्याच्या एडीटराच्या घरावर कितीशी सोन्याची कौलें चढ़ली? कै. राजारामपंत गडकऱ्यांबद्दल (प्रबोधन वर्ष २ रे, अंक पहिला पृ. ७ ता. १६ आक्टोबर १९२२ च्या अंकात) आम्ही ''होळकर सरकार इकडे लक्ष द्या'' मथळ्याच्या लेखांत केलेला स्पष्ट खुलासा वाचकांनी मुद्दाम आतां वाचावा, अशी आग्रहाची विनंती आहे. या लेखाचा समारोप आम्ही असा केलेला आहे :--

सत्यनिरूपणाच्या कलमसमशेरीने शिवाजीराव होळकरांच्या नावलौकिकाचा गड याच राजाराम पंत गडकऱ्यांनी राखला. हाच जर एकादा भटजी असता, तर त्यानें शिवाजीराव होळकरांची गाठ घेऊन, त्यांना आपल्या कर्तबगारीचें पुराण सांगून, भरभक्कम दक्षिणा उपटल्या शिवाय सोडली नसती. पण बोलून चालून पडला कायस्थ प्रभू, त्यानें मरेपर्यंत या कामगिरीचा उच्चार केला नाही, तो आज आम्ही करीत आहोत. इ. इ.

दक्षिणा हबकल्याशिवाय मंत्रच म्हणावयाचा नाहीं. हीच ज्या भटी पिंडाची ब्रम्हगांठ, त्यांनी अवघ्या महाराष्ट्रांत एकट्या प्रबोधनकारानें होळकरांची बाजू उचलून धरलेली पहातांच, हजारो रुपयांच्या थैल्यांच्या काल्पनीक वासानें त्यांची घ्राणेंद्रियें कोंदाटून कां जाऊ नयेत? वृत्तपत्रीं शक्तींच्या जोडीनेंच पुणेरी गटारयंत्र ही एक भटांची व भटाळलेल्यांची महाशक्ती आहे. या दुजोड शक्तींच्या जोरावर भटलोक आज वाटेल तें बरें वाईट कर्म चुटकी सरसे करूं शकतात. राज्य इंग्रेजांचे असो, नाहींतर जर्मन जपान्यांचे असो, भट जोपर्यंत या दोन शक्तींचे उपासक आहेत, तोपर्यंत ते वाटेल ती सृष्टी घडवतील व घडलेली बिघडवतील. आमच्यावरील खटल्याच्या मुळांशी काल्पनिक हजारो रुपयांच्या होळकरी हणेम्यांचे भटी भूतच नाचत आहे हे चाणाक्ष वाचकांस तेव्हांच उमजून येईल. हमेण्यांच्या गटारगप्पांनी भटी पत्रें व भटलोक कितीहि वायचटले, तरी आमच्या प्रोमिसरी नोटांची पुडकी दप्तरीं बाळगणारे आमचे सावकार मित्र मात्र पोट धरधरून हासले! पुण्याच्या गटायंत्रांतून होळकरी खजिन्यांची गप्प निर्माण होतांच ता. १८ जून १९२५च्या प्रबोधनाच्या खास पुरवणींत इंग्रेजी बाजूनें आम्ही खालील खुलासा केला होता :

Self Explanatory :

Since we have commenced to write articles and publish pamphlets in protest against the mischievous and unjustifiably scandalous cam aign of several Khalsa Journals against H. H. Tukojirao Ilolkar, the popular Maharaja of Iniore, somne idlers have set afloat an idle ruinour that we have been bought over by the Maharaja to defend him. Similar false rumours were rampant in Bombay during the first stage of Mumtaz affair, that the Times of India, Bombay Chronide ard some other powerful Dailies have been

secretly gagged by the Indore State with big loafs of several Lakhs of rupees Thoughtful peo; le no doubt gave the rumour its proper worth nd pitied only the Newsrags which manu actured such silly lies. Compared with the Times, Chronicle or the Daily Mail, our ambie little journal is quite a meagre instru ent in all respects, to be attractive enough catch the eye of the Maharaja to alwet his binties o i, at ea for a pur which the sbe powerful Hd Images circulated journals have anomaly anda linear aud extremely agitated effexplanationn, let us way onc for all that w have neither tden the brif of the Maha raj nor in faire to the dicates of our holy conscience fall in in with the most undignified and mischievous attitude adopted by when notorious journalists of Bombay Their burping and the black side of the affair stem o justice, nor credit them with anxiety go seek the Truth We care more for the exposition of Truth rather than winning the sympathy of her of the Maharaja of In dore or the se Dur bretheren, We want to bring to light the other side of the affair and we will not shirk our duty to enlighten the pub lie opinion on the right track, whether In dreds and the nds of idlers accuse us of anything as bad as a bribe or worst than that.

तूप असेल तरच खरकटें चाटण्याची ज्या भटी पत्रांची प्रवृति, त्यांची या खुलाशाने थोडीच शंकानिवृति होणार? शंभर वर्षांपूर्वी भटी कटवाल्यांच्या चिथावणीनेंच बनिया कुंफणीनें मटकावलेल्या सातारा छत्रपतीच्या तक्ताच्या पुनर्घटनेसाठी आम्ही अलीकडें जो अरण्यरुदनाचा कंठशोष चालविला आहे, त्याच्यासाठीं सातारकर भोसल्यांकडून आम्हांला किती हजारांचे तोडे आले? का, साताऱ्याची स्वतंत्र शिवनगरी बनलीच तर आम्हाला तेथली दिवाणगिरी उकळायची आहे? परंतु असल्या स्पष्ट विधानांनीं भटांचे, समाधान कधींच होणे शक्य नाहीं. त्यांची मनांतली आढी त्रिभुवन जळलें तरी जायचीं नाहीं. त्यांचे तेवढें खरें. ते म्हणतील ती पूर्वदिशा, लिहितील तो वेद, बोलतील ती स्मृतिं, करतील तें कारण आणि बांधतील तें तोरण! असल्या शिरजोर भटांच्या कारस्थानांत आमच्या सारखा एकहातीं एकमुखी काम करणारा स्वतंत्रमतवादी हाफटला धोपटला गेला, तर त्यात हितशत्रूंना हासण्यासारखे आणि मित्रांना वाईट वाटण्यासारखें आहे तरी काय? भटांच्या कोल्हेकुईंत आणि गटारयंत्रांत जो सांपडला तो चिरडलाच पाहिजे

हीच इतिहासाची साक्ष

आहे. मग तो प्रतापसिंह छत्रपति असो शिवाजीराव होळकर असो नाहींतर तुकोजीराव होळकर असो, त्यांचें उच्चाटन झालेंच पाहिजे. भटांचा शाप हा असा महापराक्रमी आहे. मग तो भट जहाल असो नाहीतर मवाळ असो. गबाळ असो, देशी काळा पगडबंद अथवा परदेशी गोरा टोपडा असो. तुकोजीराव होळकरांवर गोरी भटी पत्रें जेव्हां एकजात आरडा ओरडा करू लागली, तेव्हांच आम्ही भाकीत करून बसलों कीं इंदोरास सातारा निर्माण होणार! भाकीत ठरलें तरी प्रयत्नाला पारखे होणे माणुसकीला तरी शोभत नाही. असले प्रयत्न 'आधी दाम मग काम' असल्या भटी पिंडाच्या वकीलीने होतच नसतात. त्याला रक्ताची तिडीक लागते. अपयशाची पर्वा नाहीं, तेजो भंगाची दरकार नाही,

हानीचा खेद नाहीं, असली इमानी वृत्ति लागते. आजपर्यंत देशी रियासतीसाठी झगडून मेलेल्या कायस्थांना काय असा सुखाचा शब्द आणि डबोल्याचे घबाड लाभलेले आहे, तर आम्ही त्याची अपेक्षा करावी? हिंदवी राज्याच्या पुनर्घटनेसाठी १४ वर्षे विलायत लढवून अखेर १८५७ चा थैमान घालणाऱ्या रंगो बापूजीलाहि ज्या भटी इतिहास संशोधकांकडून 'भाड खाऊ, घरभेद्या' असलीं शेलकी पुष्पांजली आजहि मिळत आहे, तर आमच्या सारख्या यःकश्चित लेखकाला भटांकडून कसकसलीं विशेषणें मिळतील, याचा आम्हीं आधींच कयास बांधून मगच काय करावयाचें तें करीत असतो. त्याप्रमाणें आणि गतेतिहासाचे पुरावे नजरे समोर ठेऊनच आम्ही भरंसाट बहकलेल्या विषयांत लोकमताची, काळ्या गोऱ्या भटी पत्रांची, आणि पुणेरी गटारयंत्रांची, मुळींच पर्वा न करतां, इंदोर प्रकरणावर स्पष्टोक्तीचे विचार प्रगट केले. ते सत्यनिरूपणार्थ होते का कशाचे होते, देशहितबुद्धीचे होते का भाडोत्री होते, इत्यादि मुद्द्यांचा निकाल भविष्यकाळ सांगेल. त्यासाठीं भटांनीं विनाकारण आपल्या अकलेचा आटारेटा आतांच करूं नयें हें बरें. लाभाची यशाची लोकप्रियतेची किंवा भटी मेहेरबानीची तिळमात्र पर्वा न करतां वृत्तपत्रकार नात्यानें आम्ही आपलें कर्तव्य चोख बजावलें आहे, तें श्रीकृष्ण भगवंताच्या चरणीं अर्पण असो.

आमच्या हितशत्रूच्या सन्मानार्थ असेंहि गृहीत धरून चालूं कीं इंदोरचा खजिना आमच्या खिशात खळखळला म्हणून आम्ही होळकर सरकारची तरफदारी केली. ज्यांना पाव पाव लाखाच्या उघड देणग्या मिळालेल्या वर्तमानपत्रांत ठणाणल्या त्यांना जर मारवाडी विद्यालयांतल्या बहुजनसर्वपक्ष प्रातिनिधिक सभेला नुसते हजर राहून कमिशनच्या निषेधाला हुंकाराचा पाठिंबा देण्याची बुद्धी झाली नाहीं आणि होळकरांविषयी रक्ताचा जिव्हाळा बाळगणाऱ्या या क्षत्रिय मराठा पत्रकारादि पुढाऱ्यांना अगदी ऐन प्रसंगी मौनव्रताची लहर आली, त्यांपेक्षां आम्ही आमच्या कायस्थ प्रभू रक्ताच्या परंपरेला स्मरून लेखनद्वारा केलेली लोकमताची विचारक्रांति किती जबरदस्त झाली, हे आमच्यावर सध्यां सुरू असलेल्या हार्निमनी खटल्याच्या सत्रानेच सिद्ध होत आहे. उघड डबोली हडपणारांपेक्षा गुप्त हमेण्या पचविणारांकडूनहि जर एवढी कामगिरी झाली असेल, आणि त्या कामगिरीने होळकर द्वेष्ट्यांच्या छावण्या जर गदगदा हादरल्या असतील, तर त्यांतहि आम्हाला विषाद बाळगिण्याचें कांहीं कारण नाहीं. उघड देणग्या घेऊन निष्क्रीय राहणारांनाच वास्तवीक विषाद बाटावा ! इंदोरी खजिना गुप्तपणें पचविण्याचा आमच्यावर आरोप करणाऱ्या कारस्थान्यांनी वास्तविक असा विचार करायला पाहिजे होता कीं असल्या गडगंज गंगाजळांत आकंठ बुडालेला प्रबोधनकार क्रौन फोलीयोंचें एक मोडकें तोडकें ट्रेडल व टायपांच्या ५-६ केसी घेऊन आपल्या मासिकाची दोनदोन पानें छापीत कां बसला? अजूनहि त्याला सावकारांचे व क्रेडीट सोसायट्यांचे हप्ते कां भरावे लागतात? परंतु बाजारगप्पांवरच पोट भरण्याचे ज्यांना व्यसन आणि कोणीकडून तरी आम्हाला रसातळाला नेण्याचा ज्याचा निश्चय, त्यांची समजूत घालणें निदान आमच्या ताकदी बाहेर आहे. इंदोराधिपति होळकर सरकारांच्या बाजूनें सत्यनिरुपणार्थ चार स्पष्टोद्गार काढणारे लेखक व वक्ते लागलीच 'होळकरांनी पैसें चारलेले' ठरतात. पण जिकडे घुगऱ्या तिकडे उदो करून, होळकरांच्या राजसंन्यासाची परिस्थिती निर्माण करणारे काळे गोरे भटी पत्रकार व कज्जेदलाल मात्र मुमताझच्या कवडीचेहि निमताळे होऊ शकत नाहीत, या गोष्टींत विचार करण्यासारखी अनेक तत्त्वें आहेत. असो. इंदोरवरील आपत्तीनें पर्यवसान उघड राज्य विध्वंसनात

न होतां, केवळ राजसंन्यासांत झाले. यांतच आता समाधान मानलें पाहिजे. ही इतिहासाची पुनरावृत्ति आहे. चालूं घडीच्या राजकारणाची ही एक सूचक निशाणी आहे. ब्राम्हणेतर चळवळीच्या आणि मराठा बांधवांच्या जागृतीच्या कच्चेपक्केपणाची ही साक्ष आहे. ब्रम्हमुखोत्पन्न भिक्षुकांच्या 'आम्ही म्हणू तें करूं' या वाग्लेखन-सामर्थ्याचा हा बिनतोड पुरावा आहे. या पेक्षां वर्तमान काळीं आम्ही अधिक कांहीं लिहिण्यांत आतां अर्थच नाहीं. काळ हा अनंत आहे. पृथिवी विस्तीर्ण आहे. येईल, असाहि काळ येईल कीं त्या वेळीं या इंदोर प्रकरणांतला हिंदु लोकांचा देशद्रोह, सातारा प्रकरणाप्रमाणेच, जगाच्या नजरेला येऊन, महाराष्ट्राला पश्चात्तापाचे प्रायश्चित्त घ्यावें लागले. ॐ शांति: शांति: शांति:

प्रबोधनाचा पुढील कार्यक्रम

गेलें वर्ष अनेक अडचणींनी व्याप्त असें गेलें. मनःस्थितीहि अर्थात व्यग्रच. अशा अवस्थेंत वर्षांचे १२ अंक आश्रयदात्यांच्या सेवेला रूजू झाले, ही श्रीकृष्ण परमात्म्याचीच कृपा होय. पुढील पांचव्या वर्षी वर्गणी थोडी कमी करून, वर्गणीदारांच्या वाढत्या संख्येच्या जोरावर, अंकाची पृष्ठें वाढवावी व इतरहि कांही अंतर्गत सुधारणा कराव्या, असे मनचे मांडे मनात खात असतांनाच, १० अंक घेतलेल्या २५० वर्गणीदारांनी वर्गणी पाठविण्याच्या तीन चार प्रत्यक्ष सूचनांना धाब्यावर बसवून अखेर व्हीपीचाहि नाकार केला. त्यामुळें खाडकन् एक हजार रुपयांची प्रबोधनाला ठोकर बसून, त्याच्या कर्जाच्या फासाला आणखी एक भरभक्कम गांठ बसली. आमचे कांही आश्रयदाते अशा प्रकारानें प्रबोधनाच्या जीवनक्रमांत प्राणघातक अडचण निर्माण करतील, अशी खरोखरच अटकळ नव्हती. यामुळे सबंध वर्षभर वर्गणीच्या विश्वासावर बिनतक्रार अंक पाठविण्याची आमची पद्धतच मूर्खपणाची ठरली. तेव्हां यापुढें नवीन वर्षी दोन अंक हातीं पडताच ज्यांची वर्गणी मनीऑर्डरीनें रवाना होईल, किंवा जे पहिलाच अंक व्हीपीने मागवतील, त्यांनाच लिस्टावर कायम ठेऊन पुढील सर्व अंक पाठवायचे, असा स्पष्ट नियम ठरविणे ओघानेंच क्रमप्राप्त झालें. ही व्यवस्था आमच्या आश्रयदात्यांना मान्य होईल, असा भरंवसा आहे. जवळ जवळ २५-३० सार्वजनिक मोफत वाचनालयांना प्रबोधनानें वर्षभर मोफत भेट दिली. परंतु वर नमूद केलेल्या द्रव्यहानीमुळे यापुढें अंक मोफत पाठविणे शक्य नाही, असे दिलगिरीनें जाहीर करावें लागत आहे. तथापि ज्या संस्थांकडून हा अंक पावतांच दोन रुपये मनीऑर्डरीनें येतील, त्यांना खास सवलत म्हणून वर्षभर अंक पुरविले जातील. गेल्या वर्षी प्रबोधनाच्या व्यवस्थेत एका गैरवर्तनी कारकुनाच्या खोडसाळपणामुळें पत्रव्यवहारांत व वर्गणीच्या बाबतींत पुष्कळच घोटाळे उडाले आहेत. ही सर्व भानगड मिटविण्यासाठी आम्ही स्वतः आजपासून काम करणार आहों. या कामी थोडी कमी जास्त दिवसगत लागणार. परंतु सर्व व्यवस्था सूत्रबद्ध करता यावी म्हणून ५ व्या वर्षाचा पुढचा १ला अंक १ जुलई १९२६ रोजी प्रसिद्ध होईल व तोच महिना वर्षारंभाचा धरला जाईल. नंतर प्रत्येक महिन्याचा अंक नियमित १ ल्या तारखेलाच पोष्टांत पडत जाईल.

प्रबोधनाचा नवीन कार्यक्रम

नवीन ५ व्या वर्षी ऐतिहासिक विषयांकडे प्रबोधन विशेष नेटाचा प्रयत्न करील. 'शंभर वर्षापूर्वीचा महाराष्ट्र' एकदम ग्रंथरूपांत न काढतां, संकलित केलेलें साहित्य व चर्चात्मक निबंध प्रथम प्रबोधनद्वारां प्रसिद्ध करण्याचा संकल्प केलेला आहे. हा विषयच मोठा भानगडीचा आहे कीं ग्रंथमुद्रणाकडे एकदम धांव घेण्यापेक्षां प्रथमतः विषय जसा तयार होईल, तसा छापणेच श्रेयस्कर आहे. अग्रलेखांचें धोरण

सुद्धां ऐतिहासिक सिद्धांतरूप राहील आणि सुरुवातीचे लेख

हिंदुस्थानांत क्रिस्ती सत्तेचा उदय

कसा झाला याची साधार माहिती देतील. सध्यां महाराष्ट्राच्या राजकारणी क्षेत्रांत जी बजबजपुरी माजली आहे, ती योग्य का अयोग्य, महाराष्ट्राने कोणकोणत्या परदेशी रंगढंगवाल्यांपासून स्वतःस जपले पाहिजे, मिशनरी कावे पूर्वी कसे होते व सध्यां ते कसे चालूं आहेत, इत्यादि अनेक इतिहाससिद्ध गोष्टींचे पुरावे तरूण महाराष्ट्राला अत्यंत चित्तप्रबोक व विचार क्रांतिकारक वाटल्याशिवाय खास राहणार नाहींत. याशिवाय नेहमींप्रमाणें प्रबोधक कविता, सामाजिक सुधारणेचे व धर्मक्रांतीचे लेख वगैरे विषय भरपूर येतील. तात्पर्य, प्रबोधन आपल्याकडून कामगिरीची शिकस्त करीत आहे व प्रबोधनकार जिवंत आहे तोपर्यंत करील. परंतु आश्रयदात्यांनी त्याच्या दाण्यापाण्याची आबाळ करू नये, अशी प्रार्थना आहे. यंदाप्रमाणेच जर दरसाल एकेक हजाराची ठोकर बसूं लागली, तर ही गाजराची पुंगी सुद्धां बंद पडेल. ती बंद पडावी यासाठी आमच्या हितशत्रूंच्या अफाट सेना रात्रंदिवस खस्ता खात आहेत. हे आश्रयदात्यांनीं विचारांत घेऊन प्रबोधनाची सेवा घ्यावी, एवढीच विनंती आहे.

व्यवसायबंधूंचे आभार

ज्या आमच्या प्रिय व्यवसायबंधूंनी प्रबोधनाला वर्षभर प्रेमानें प्रतिभेट दिली, त्यांचे आम्ही कृतज्ञ भावनेनें आभार मानतो.

त्याच प्रमाणें ज्या ज्या व्यवसायबंधूंनी आमच्यावरील खटल्याच्या व इतर निमित्तानें आमचा यथास्थित समाचार घेतला, त्यांचें ऋण तर आम्हाला फिटणेंच शक्य नाहीं. त्यांचा प्रत्येक शब्द आम्ही ईश्वरी प्रसाद मानतो; कारण त्यामुळेंच आमचा आत्मशुद्धीचा व महाराष्ट्र-निरीक्षणाचा मार्ग आम्हाला स्वच्छ दिसतो.

एका अत्यंत सज्जन व दयाळु हृदयाच्या व्यवसाय बंधूनें अखिल महाराष्ट्राला अशा अर्थाची शिफारस केली आहे कीं ठाकरे यांच्या प्रत्येक लेखावर व ग्रंथावर खटला करतां येण्यासारखा असल्यामुळें, तसा प्रयत्नआतां प्रत्येकानें अगत्य हातीं घ्यावा. सूचना फारच योग्य आहे. लेखकाच्या ब्रीदाला व बीजाला ती शोभणारी आहे आणि आम्हांलाहि ती फार पसंत आहे. परंतु सूचना एवढीच आहे कीं निरनिराळ्या ठिकाणी खटल्यांची तोंडे लावण्यापेक्षा कोणत्यातरी एकाच ठिकाणी सर्व खटलें भरण्याचे व ठाकऱ्यांना जिवंत गाडण्याचे कोणाला तरी सहकारी तत्वावर कंत्राट दिलें तर बरें होईल. म्हणजे सगळ्या मसणवटींत थोडथोडा प्राण सोडण्यापेक्षां एका मसणांत सबंध मरण्याची सवलत आम्हांला मिळेल. जहाल मवाळ देशी परदेशी देमनीं याचा विचार करावा.

यंदाच्या वर्षी ज्यांनी आश्रय देऊन सेवा घेतली त्या सर्वांचे आम्ही अत्यंत कृतज्ञतेनें आभार मानतो. त्यांनी आपली आश्रयाची सावली प्रबोधनावर कायम ठेवावी अशी आग्रहाची विनंती आहे. नवीन वर्ष सर्वांना सुखप्रद व विचारक्रांतिकारक जावो. हें आत्मनिवेदन श्रीकृष्ण व भगवंताच्या चरणी अर्पण करतो.

□□□

PRABODHAN :—A Fortnightly Journal devoted to the Social, Religious and Moral Regeneration of the Hindu Society.

उचित जागृत प्राप्य वराभिबोधत.

Vol. I. वर्ष १ ले. } दादर:—मुंबई तारिख १६ ऑक्टोबर १९२१. श्रीशिवराज शक २४८. { No. 1. अंक १ ला.

INDIAN RATIONALISTIC SOCIETY

[Registered under Act XXI of 1860]

Constitution non-political, non-sectarian: **propagates** knowledge on the basis of Science, Truth, Rational and free thinking: **membership on application.** Its monthly journal **"Bulletin"** Yearly sub. **Rs. 3.** Other publications:—(1) **Reprint "Bulletin"** (June—Dec. 1919) **Price Re. 1.** (2) **"K. M. Chatterjee and His Times"** being history of Social and political evolution by N. Chatterjee. **Price Rs. 2.** Well reviewed in the Indian Daily News, The Bengalee, The new Empire. (3) **"The Decline and Fall of the Hindus"** (Sir P. C. Roy foreworded calling it 'the book on India's regeneration') by S. C. Mookerjee. **Price Re. 1.** Well reviewed in the London Times Literary Supplement of may 20th 1921 and in the Inquirer as also in the "Modern Review," the "Servants of India," "Epiphany", "The Times of Assam", "The Indian Daily News", "The Indian Messenger", "The Maha-Bodhi".

Apply to the Secretary, I. R. Society[P].
6, Ballygunje Circular Road, Calcutta.

DRINK & ENJOY YOUR BREAKFAST WITH
MANOHAR COMPANY'S

डॉक्टर व वैद्य यांनी शिफारस केलेले
हेंच तें
सर्वांवर ताण करणारें

या औषधानें शौचास सा... हटकून बरे होतात. या...

रामदास-पंचपटी. [नांवें नोंदवा!!
...ण लिहिते, १४ डॉ. गाडेजी रोड दादर.
...आणवाची तिकीटें पाठवावी.

महाराष्ट्राच्या संदर्भात काही चर्चा सुरू असल्यास 'पुरोगामी महाराष्ट्र' हा शब्दप्रयोग हमखास केला जातो. हा पुरोगामी महाराष्ट्र आभाळातून पडला नाही. त्याला पुरोगामी बनवण्याच्या प्रक्रियेत काही विचारवंतांची आयुष्ये खर्ची पडली आहेत. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, महात्मा जोतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या परंपरेत असणारे अखेरचे नाव म्हणजे अर्थातच केशव सीताराम ठाकरे हे होय. ठाकरे यांनी ज्या माध्यमातून हे कार्य केले त्याचे नाव 'प्रबोधन'. म्हणून तर ठाकरे यांची प्रबोधनकार ठाकरे अशी ओळखच निर्माण झाली. 'प्रबोधन' या नियतकालिकाचा पहिला अंक मुंबईहून १६ ऑक्टोबर १९२१ या दिवशी प्रसिद्ध झाला. म्हणजेच २०२०-२१ हे 'प्रबोधन'चे शताब्दी वर्ष होय. या शताब्दीच्या निमित्ताने सचिन परब यांनी संपादित केलेला 'प्रबोधन'मधील प्रबोधनकार' हा त्रिखंडात्मक ग्रंथ वाचकांना सुपूर्द करण्यात 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'स कर्तव्यपूर्तीचे समाधान लाभत आहे.

डॉ. सदानंद मोरे

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे.